म. ग्रं. सं. ठाणें.
विषय ... निबंध ...
सं. क्र. 9254.

करूण नाट्यांतील कांहीं नायक

शिवराम गोविंद भावे

किंमत तीस रुपे

REFBK-010932

करुण नाट्यांतील कांही नायक

शिवराम गोविंद भावे

करुण नाट्यांतील कांही नायक

लेखक

शिवराम गोविंद भावे



अनुक्रमांक 24360 दि 7/10/11
स्मांक 9294 नों दि 2313140.

REFBK-0010932

प्र का श क :
रा. ज. दे श मु ख
दे श मु ख आ णि कं प नी
७३९, बु ध वा र, पु णे, २

प्रथमावृत्ति, १९६०

चित्र : दीनानाथ दलाल

किंमत तीस रुपये

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

मु द्र क :
शि व रा म गो वि द भा वे,
मॅनेजिंग डायरेक्टर, विमा मुद्रक आणि
प्रकाशक, लिमिटेड, सातारा यांच्या
विमा छा प खा ना, सा ता रा

माझे थोर गुरु दिवंगत
प्राध्यापक गणेश हरि केळकर
यांच्या आदरणीय स्मृतीस

ऋण - निर्देश

पहिलें ऋण माझे थोर गुरु दिवंगत प्राध्यापक गणेश हरि केळकर यांचें. फर्ग्युसन महाविद्यालयांत मी विद्यार्थि असतांना आणि त्यानंतरही मला फार मोलाचें मार्गदर्शन त्यांनी केलें. मूळच्या माझ्या साहित्यप्रेमाला त्यांनी अभ्यासाचें वळण लावलें; माझ्याकडून पुष्कळ वाचवून घेतलें; नेहमीच स्वतंत्र अभ्यासाची ओढ निर्माण केली. त्यांच्या अमोल ग्रंथसंग्रहाचा मनमुराद उपयोग करायला तर त्यांनी मला संधि दिलीच; पण मुद्दाम कांही कांही दुर्मिळ ग्रंथ खास माझ्यासाठी मिळवून मला उपलब्ध करून दिले. तसे कांही ते कधी मला पाठ देत बसले नाहींत. परंतु त्यांच्या प्रेमळ प्रोत्साहनाने आणि एखाद्याच वेचक सूचनेने मला जें साध्य झालें त्याचें मोल शब्दांनी वर्णन करणें अशक्य आहे. त्यांच्या त्या खडबडीत बाह्य आवरणाच्या आंतील अथांग प्रेमाचा लाभ मला झाला हा माझ्या आयुष्यांतील एक महान भाग्याचा योग मी मानतों. आज हा आपल्या प्रिय शिष्याचा प्रसिद्ध होणारा ग्रंथ पाह्यला ते असते तर त्यांना केवढा तरी आनंद झाला असता; आणि त्यांच्या शाबासकीने माझ्या अंगावर मूठभर मास चढलें असतें. परंतु हें भाग्य माझें नाही; आणि म्हणून हा ग्रंथ त्यांच्या स्मृतीला अर्पण करूनच मला भागवावें लागत आहे.

दुसरें ऋण महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणें आणि फर्ग्युसन महाविद्यालयांतील महाराष्ट्र वाङ्मय मंडळ या संस्थांचें. त्यांच्या विद्यमाने मला व्याख्यानरूपाने या विषयासंबंधीचे विचार व्यक्त करायला संधि मिळाली. योगायोग असा की, माझें पहिलें वाङ्मयटीकेचें पुस्तक, 'गडकऱ्यांचा विनोद' हें, महाराष्ट्र वाङ्मय मंडळाच्या विद्यमाने झालेल्या व्याख्यानांतूनच निर्माण झालें. पण मंडळावर माझा एक प्रकारचा हक्क तरी होता. तसा माझा साहित्य परिषदेवर कसलाच हक्क नव्हता व नाही. तथापि त्या संस्थेच्या मंडळींनी मला व्याख्यानांना संधि दिली हें त्यांचें मजवर फार मोठें ऋण झालें.

आणि तिसरें ऋण श्री. रा. ज. देशमुख यांचें. विस्ताराने एवढा मोठा आणि ज्याला ग्राहकवर्ग अगदी मर्यादित अशा प्रकारचा हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची धाडसी जबाबदारी त्यांनी पत्करिली म्हणूनच हा ग्रंथ रसिकांपुढे व विद्वानांपुढे ठेवण्याचा योग येत आहे.

या महान ऋणांचा फक्त निर्देश मीं केला आहे. त्या ऋणांतून उतराई होण्याचा यत्न करणें, नव्हे तसा विचार मनांत आणणें हा सुद्धा त्या त्या व्यक्तींचा आणि संस्थांचा अपराध होईल. आणि हें ऋण शिरावर घेऊन राहण्यांतच मला अधिक धन्यता वाटत राहील.

सातारा, प्रजासत्ताकदिन, शके १८८१ — शिवराम गोविंद भाबे

या लेखकाचीं इतर पुस्तकें

स्वतंत्र

गडकऱ्यांचा विनोद
भावकथा
जकात्यांच्या माऊचें लग्न
प्रेमगीतें
जनता-वेताळ
त्यागाचं तेज
सातारा जिल्ह्यांतील
शेतसारावाढीचा अन्याय
भाई नाथ घाणेकर
यांचें अल्पचरित्र

भाषांतरित

मधुराणी
चार बंगाली गोष्टी
मुक्तधारा
चौघांच्या चार तऱ्हा
वाल्मीकि-रामायण-परीक्षण
जागतिक इतिहासाचें
ओझरतें दर्शन

अनुक्रम

प्रकरण	विषय	पृष्ठ
पहिलें	प्रास्ताविक	१
दुसरें	हॅम्लेट	७
तिसरें	राजा ईडिपस ;	
	ॲन्टिगनी व क्रीऑन	५६
चवथें	मॅकबेथ	९८
पांचवें	व्हेनिसचा मूर—ऑथेल्लो	११९
सहावें	डॉक्टर स्टॉकमन	१५४
सातवें	स्टीफन मूर	१८०
आठवें	अब्राहाम लिंकन	२०७
नववें	कोरिओलेनस	२३३
दहावें	राजा लिअर	२६७
अकरावें	हेडा गाब्लर	३०३
बारावें	हालवर्ड सोलनेस	३५१
तेरावें	इलेक्ट्रा—लॅव्हिनिया	३९२
चौदावें	एब्रेन	४४३
पंधरावें	ब्लॅन्श	४६७
सोळावें	खाडिलकरांचे चार नायक	५०८
सतरावें	इंदुमती	५७०
अठरावें	देवदत्त	५८२
एकोणिसावें	राजा राम	५९७
विसावें	जयंत-लीला	६०९
एकविसावें	संभाजी	६३१
बाविसावें	बॅरिस्टर विश्राम	६५३
तेविसावें	सामान्य निष्कर्ष	६७६
चोविसावें	पडताळा : सुधाकर	७०७
पंचविसावें	उपसंहार	७४५

नाटककार व नाटकें

काल व वापरलेल्या आवृत्या

सोफोक्लीस (ग्रीक नाटककार)– जन्म इ. स. पूर्वी सुमारें ४९६ : मृत्यू इ. स. ४०६ : राजा ईडिपस (वहुधा इ. स. पूर्वी ४२९), ॲन्टिगनी (अंदाजें इ. स. पूर्वी ४४१), एवरीमॅन्स लायव्ररी, (डेंट आणि कंपनी) मधील सोफोक्लीस– दि ड्रामाज : क्र. ११४ या संग्रहांत : भाषांतरकार : सर जॉज यंग मुद्रण–१९५७

भवभूति (संस्कृत नाटककार)– काळ इ. स. सातव्या शतकाची अखेर : उत्तररामचरितम् : निर्णय-सागर आवृत्ति (दहावी : १९४९)

शेक्स्पीअर वुइल्यम– १५६४ ते १६१६ : हॅम्लेट (१५९९-१६०२), मॅकवेथ (१९६०), ऑथेल्लो (१६०४), राजा लिअर (१६०५-१६०९), : कोरिओलेनस (१६०८-९) : आक्सफर्ड आवृत्ति : त्रिखंडात्मक : १९१५ : पैकी एक खंड. : प्रकाशक आक्स्फर्ड युनि. प्रेस : संहिता : डब्ल्यु. जे. क्रेग; प्रस्तावना : एडवर्ड डाउडन.

इवसेन हेनरिक– १८२८-१९०६. एनिमी ऑफ दी पीपल (१८८२), हेडा गाब्लर- (१८९०), मास्टर विल्डर (१८९२), इवसेन्स प्लेज, : मॉडर्न लायव्ररी, न्यूयॉर्क, : जी–१८ या संग्रहांत.

गाल्सवर्दी जॉन– १८६७-१९३३ ; दि मॉब, १९१४ : प्लेज ऑफ जॉन गाल्सवर्दी- प्रका. डकवर्थ : लंडन; तृतीय मुद्रण, १९३२, या संग्रहांत.

ड्रिंकवाटर जॉन– १८८२–१९३७ : अव्राहाम लिंकन, (१९१८); सटीप आवृत्ति: टीपा–एफ. एच. स्पेनलो : प्रका. लॉगमन्स ग्रीन्स : हिंदी मुद्रण १९४५,

युजीन ओनील– १८८८–१९५३ : मोर्निंग विकम्स इलेक्ट्रा (१९२९–३१), डिझायर अंडर दि एल्म्स (१९२४) : नाइन प्लेज वाय युजीन ओनील : दि मॉडर्न लायव्ररी, न्यूयॉर्क : जी ३५ या संग्रहांत.

टेनेस्सी विल्यम्स– जन्म--१९१४ ; ए स्ट्रीटकार नेम्ड डिझायर : आवृत्ति १९५७ प्रका. सेकर ॲण्ड वारबर्ग, लंडन.

खाडिलकर कृ. प्र.– १८७२–१९४८ ; कीचकवध : चौथी आवृत्ति (१९४७), काचनगडची मोहना ; सहावी आवृत्ति (१९२४), माऊतंदकी- दुसरी आवृत्ति; सवाई माधवरावाचा मृत्यु : आवृत्ति तिसरी, (१९३८) : प्रका, नवाकाळ, मुंवई

जोशी शंकर परशुराम– १८८०–१९४९ : मायेचा पूत : आवृत्ति पहिली १९२१; प्रकाशक जयराम आणि कंपनी, मुंवई.

गडकरी राम गणेश-- १८८५-१९१९; प्रेमसंन्यास : आवृत्ति तिसरी, (१९२५), प्रका. परचुरे पुराणिक, मुंवई : एकच प्याला : तिसरी आवृत्ति (१९२२): प्रका. श्री. सरस्वती मंडळ, पुणे

औन्धकर विष्णु हरी-- १८९४–१९४३ : बेवंदशाही : चौथी आवृत्ति (१९४८) प्रका. ग. पां. परचुरे प्रकाशन.

अत्रे प्रल्हाद केशव-- जन्म १८९८ : उद्याचा संसार : तिसरी आवृत्ति (१९४८,) प्रका. नवभारत प्रकाशन संस्था, मुंवई.

रांगणेकर मोतिराम गजानन-- जन्म १९०७ : कुलवधू : चवथी आवृत्ति, १९४६.

करुण नाट्यांतील कांही नायक

प्रकरण पहिलें

प्रास्ताविक

इंग्रजी भाषेंत ट्रॅजेडी या शब्दाने ज्या नाट्यप्रकाराचा निर्देश केला जातो त्या नाट्यप्रकारासाठीं **करुण नाट्य** हा शब्द या ग्रंथांत योजिला आहे. या नाट्यप्रकाराला शोकात्मिका किंवा शोकांतिका असे शब्द मराठी टीकावाङ्मयांत प्रायः वापरण्याचा प्रघात आहे. त्यांतही शोकांतिका या शब्दाला अधिक मान्यता मिळालेली दिसते. परंतु प्रस्तुत लेखकाला या दोन्ही संज्ञा ठीक वाटत नाहीत.

एकतर ट्रॅजेडी हा शब्द स्त्रीलिंगी भासतो – उच्चारांतीच्या दीर्घ 'ई' मुळें — यासाठी मराठींतही या अर्थाचा वाचक शब्द स्त्रीलिंगीच बनवावा ही जी यामध्ये धडपड आहे ती आंधळ्या अनुकरणाची द्योतक आहे. मराठी भाषेंत किंवा मराठी भाषा ज्या भाषांमधून उत्क्रांत झाली त्या भाषांमध्ये अशा अर्थाचा शब्द सापडण्यासारखा नसेल तरच मग परभाषेंतील शब्दाचा अर्थ व्यक्त करण्यासाठी परभाषेचें असें अनुकरण करणें हें कदाचित समर्थनीय होईल. परंतु अशी वस्तुस्थिति नाही.

दुसरें म्हणजे शोकांतिका किंवा शोकात्मिका या संज्ञांमध्ये नाट्यकृतीचा श्रोत्यांवर किंवा प्रेक्षक-वाचकांवर कोणता परिणाम होतो हें पाहण्याऐवजी नाटकांत किंवा नाटकाच्या अंतीं कोणती घटना घडते हें पाहण्याकडे लक्ष अधिक देण्याचा प्रयत्न असतो. नाटकाच्या शेवटीं त्यांतील नायकाचा – किंवा आणखी कोणा पात्राचा – दुःखद अंत पाहावयास मिळतो म्हणून तें नाटक शोकांतिका असें सांगण्याचा यामध्ये भाव दिसतो. ललितकृतीच्या आस्वादाच्या दृष्टीनें ही रीत योग्य नव्हे. ललितकृतीमुळें वाचक, श्रोता किंवा प्रेक्षक यांच्या मनावर कोणता परिणाम होतो, त्यांच्या चित्तवृत्ती – स्थायी भाव – कोणत्या तऱ्हेने हेलावतात, त्यांच्या हृदयांत कोणत्या भावना उचंबळून येतात हें पाहणें, ही रीत ललितकृतीचा आस्वाद घेण्याच्या दृष्टीने योग्य होय. काव्याचा आत्मा जो रस तो रस काव्याचा आस्वाद घेणाराच्या ठिकाणीं उद्भूत झाला पाहिजे, किंवा होतो, हें रससिद्धांताचें गृहीतकृत्य आहे. काव्यांतील घटना दुःखात्मक आहेत किंवा त्यामध्ये कांही व्यक्तींवर कांही गंभीर, भीषण, दुःखद, शोकात्मक प्रसंग ओढवत आहेत, एवढ्यावरूनच त्या काव्याचा तशा तऱ्हेचा परिणाम वाचकाच्या चित्तावर घडतोच असें निश्चयाने म्हणतां येणार नाही. काव्याच्या घाटणींत, मांडणींत म्हणजेच 'रीतींत' तें सामर्थ्य असावें लागतें. अशा तऱ्हेच्या संवेदना रसास्वाद घेणाऱ्याच्या हृदयांत निर्माण होणें हें रसनिष्पत्तीच्या दृष्टीनें आवश्यक असतें.

हॅम्लेट नाटकांत पोलोनियसचा घात, कांहीसा अहेतुपूर्वक, हॅम्लेटच्या हातून

होतो. वास्तवांत ही घटना दुःखमय आहे, शोकात्म आहे; ती किती शोकात्म किंवा शोकांत आहे याचें विदारक दर्शन त्याच्या वेड्या झालेल्या कन्येच्या दारुण मनोव्यथेंत आपल्याला दिसतें. पण म्हणून कांही वाचक–प्रेक्षक–श्रोत्यांच्या मनांत त्या घटनेमुळे शोकाचा, करुणेचा उद्रेक होत नाही. हॅम्लेटचे दोघे शाळासोबती इंग्लंडमध्यें हॅम्लेटच्या कपटकारस्थानामुळे मारले जाण्याची व्यवस्था होते. नाटकांत अखेरच्या प्रवेशांत राजाही मारला जातो. याही सगळ्या घटना दुःखात्म किंवा शोकात्म आहेत. पण त्यांच्यामुळे श्रोत्यांच्या–प्रेक्षकांच्या हृदयांत तशा भावनेचा उद्रेक निश्चितपणें होत नाहीं.

रस आस्वादकाच्या चित्तांत प्रादुर्भूत झाला पाहिजे

तेव्हां प्रस्तुत नाट्यविषयापुरतें पाहावयाचें तर एखाद्या नाटकाचा अंत शोकात्म घटनेमध्ये, मृत्यूमध्ये होतो म्हणून तें नाटक शोकांतिका; किंवा एखाद्या नाटकांत सगळ्याच घटना दुःखमय किंवा शोकमय असतात म्हणून तें नाटक शोकात्मिका असे शब्द वापरण्यापेक्षा, भारतामध्ये फार काळापासून सुस्थित असलेल्या रससिद्धांताला अनुसरून 'करुणरसात्मक नाटक' असा शब्दप्रयोग करणें उचित आहे. रस हा आस्वाद घेणाराच्या चित्तांतच प्रादुर्भूत व्हावयाचा ही पकड घट्ट ठेवली असतां 'करुण-रसात्मक नाटक' म्हणजे ज्याच्या प्रयोगामुळे श्रोत्याच्या चित्तांत करुण रसाचा उद्रेक होतो असें नाटक हा अर्थ स्वाभाविकच त्यांतून निघेल.

करुण-रसात्मक नाटक याऐवजी करुण नाट्य ही शब्दयोजना जास्त सुटसुटीत आणि बऱ्याच दृष्टींनी सोयीची आहे. नाट्य हा समावेशक शब्द असल्यामुळे प्रहसन–नाटिका–श्रुतिकादि नाटकप्रकारांचा त्यामध्ये सहजच समावेश होतो. नाट्यकृति आणि तदनुषंगिक इतर सर्व पसारा यांचाही नाट्य शब्दांत सहज समावेश होतो. आणि म्हणून करुण नाट्य म्हणजे ट्रॅजेडी अशा समीकरणानें हाच शब्द या ग्रंथांत वापरला आहे.

असें जें गेल्या किती एक शतकांमध्ये व कितीएक देशदेशांतरांमध्ये विकसित आणि प्रतिष्ठित झालेलें करुण नाट्य त्यामधील कांही नायकांबद्दल – यामध्यें नायिकांचाही समावेश समजावयाचा – या ग्रंथामध्ये एका विशेष पद्धतीने विवेचन करावयाचें आहे. नाट्यरचनातंत्राचे कांही विशिष्ट प्रघात निकष म्हणून गृहीत धरावयाचे आणि त्या निकषांवर घासून त्या त्या नाटकाचें स्वरूप तोलावयाचें अशी जी पुष्कळदा अवलंबिली जाणारी पद्धति आहे तिच्यापेक्षा या ग्रंथांत स्वीकारलेली पद्धति वेगळी आहे.

प्रत्यक्ष नाटकांवरून ढोबळ निष्कर्षांचा शोध—

विचार असा आहे की, गेल्या दोन सव्वा दोन हजार वर्षांतील कांही करुणरस-प्रधान नाटकें घेऊन त्यांचा अभ्यास करावयाचा. अशा धोरणाने की, त्या त्या नाटकांत

ज्या ज्या व्यक्तीविषयी आस्वादकाच्या मनामध्ये अत्यंत करुणा उत्पन्न व्हावी असा नाटककाराचा हेतु आहे त्या त्या व्यक्तीचें चित्रण नाटककाराने कोणत्या पद्धतीने केलें आहे; सुरुवातीपासून अखेरीपर्यंत नाटककाराने त्या व्यक्तीचें दर्शन आम्हांला कशाकशा प्रसंगांतून, कोणत्या क्रमाने आणि आस्वादकाविषयीच्या कोणत्या अपेक्षांनी केलें आहे हें पाहावयाचें. अशा रीतीने पांचपंचवीस श्रेष्ठ करुण .नाट्यकृतींचें परीक्षण केल्यावर मग त्यामधून त्या त्या श्रेष्ठ नाटककाराने अवलंबिलेल्या पद्धतींत करुण नाट्याच्या – विशेषतः करुण नाट्यांतील नायकस्थानापन्न व्यक्तीच्या – चित्रणासंबंधी कांही ढोबळ नियम बांधतां येतात का व अशा या नियमांमध्यें दोन हजारांहून जास्त वर्षांच्या दीर्घकाळांत आणि भिन्न भाषांमधील नाटककारांत कांही समानता आणि सातत्य आढळून येतें का हें पाहावयाचें. अशा दुहेरी रीतीनें या सर्व विवेचनाचा हा प्रपंच करावयाचा आहे.

अशा प्रपंचाचें एक विशेष प्रयोजन आहे. पुष्कळदा असें होत आलेलें आहे की, कांही विशिष्ट पाश्चिमात्य व पौर्वात्य टीकाकारांनी निर्मिलेले टीकाप्रबंध अभ्यासून आणि आधाराला घेऊन त्यांच्या धोरणाने साहित्याचें मूल्यमापन करावयाचें किंवा भिन्न भिन्न साहित्यप्रकारांचा तंत्राविष्कार तपासावयाचा. आधारभूत ग्रंथामध्ये प्रत्येक लेखकाचा स्वतःचा म्हणून एक दृष्टिकोन असतो; त्यावरच भर देऊन त्याने विवेचन केलेलें असतें; त्या त्या दृष्टिकोनाला जुळतीं अशींच उदाहरणें सामान्यतः घेतलेलीं असतात. अशा उदाहरणांपुरता तो तो दृष्टिकोन सामान्यपणे न्याय्य आणि निरपवादही असतो. परंतु एका विशिष्ट दृष्टिकोनांतून पाहिलेल्या तंत्रावर आधारून नंतरनंतरच्या साहित्य-कृतींचें परीक्षण करूं म्हटलें तर अन्याय होण्याचा संभव असतो. ब्रॅडलेचा करुण नाट्याविषयी एक विशिष्ट दृष्टिकोन आहे. इतर अनेक लहान मोठ्या टीकाकारांचे दृष्टिकोन त्याहून निराळे आहेत. आणि करुण–नाट्य–तंत्राचा पश्चिमेकडील पहिला टीकाकार ॲरिस्टॉटल याच्या दृष्टिकोनाशीं या बाकीच्या सर्वांचें सुसंवादित्व आहेच असें नाही. अशा स्थितींत एखाद्याच ग्रंथकाराचा निर्णय प्रमाणभूत मानून त्याच्या अनुरोधानें एखाद्या साहित्यकृतीचा प्रकार किंवा दर्जा ठरविणें याचा अर्थ इतकाच होईल की, त्या ग्रंथकाराच्या निर्णयाशीं जुळणारी किंवा अर्धवट जुळणारी किंवा मुळीच न जुळणारी ती कलाकृति आहे; तेवढ्यावरून ती कलाकृति विशिष्ट साहित्यप्रकाराच्या सदरांत पडतच नाही असें म्हणणें न्यायाचें होणार नाही.

'एकच प्याला' वरील अन्याय—

परंतु पुष्कळदा असेंच घडतें. उदाहरणार्थ, प्रा. रा. शं. वाळिंबे यांनी 'सुधाकर-कीं एकच प्याला?' या आपल्या निबंधांत हर्फर्डचें एक लहानसें वचन उद्धृत केलें आहे; आणि करुण नाट्याचा तोच जणू एक एकमेव निकष असें मानून एकच प्याला हें करुण नाटक नाहीच असें प्रतिपादन करण्याचा अट्टाहास केला आहे. मुळांतच ही

रीत कोणत्याही साहित्यकृतीला अन्याय करणारी आहे. त्यांतच शिवाय सूत्र म्हणून स्वीकारलेल्या वचनांत नाही तेंच आपल्या पदरचें कल्पून तो नवाच आणखी एक निकष लावावयाचा व त्या निकषाला एकच प्याला हें नाटक उतरत नाही असा निर्णय करावयाचा हें त्या अन्यायाचें प्रमाण जास्त तीव्र करण्यासारखें आहे.

शेक्स्पीअरच्या करुण नाट्याच्या रचनेबद्दल हर्फर्डची, प्रा. वाळिंबे यांनी निर्दिष्ट केलेली कल्पना अशी : असामान्य श्रेष्ठत्वाने युक्त आणि गाढ आत्मिक सामर्थ्यसंपन्न अशा व्यक्तीचा, सामान्यतः विरोधी अशी बाह्य परिस्थिति आणि अशा व्यक्तीच्या स्वभावांतच मूळ धरून राहिलेली कशा तरी प्रकारची विवशता किंवा अंधता–ज्यांचा उगम पुष्कळदा त्या व्यक्तीच्या ठिकाणच्या अति उदात्त आणि अत्यंत भव्य अशा स्वभावछटांतूनच प्रत्यक्षपणें झालेला असतो–यांच्या संगमामुळें, एकत्र येण्यामुळें झालेला विनाश व मृत्यु. यामध्ये हर्फर्डपुरता त्याचा म्हणून दिसणारा मुख्य निकष म्हणजे करुण नाट्यांतील व्यक्ति ही अति श्रेष्ठ, प्रथितयश, गाढ आत्मिक सामर्थ्य असलेली असावी हा. हा दृष्टिकोन कितपत बरोबर आहे हा आधी खरा प्रश्न. आणि मग तोच एकमेव निकष मानून कोणत्याही कलाकृतीचें मूल्यमापन करणें कितपत न्याय्य हा दुसरा प्रश्न.

हर्फर्डच्या मताची भलती ओढाताण—

परंतु यांत प्रा. वाळिंबे यांनी स्वतःची आणखी भलतीच ओढाताण भरीला घातली आहे. स्वभावगतदोष आणि विरोधी बाह्य परिस्थिति यांच्या संगमांतून विनाश उद्भवतो हें हर्फर्डचें मत. परंतु प्रा. वाळिंबे मात्र निव्वळ स्वभावदोषजन्य करुण विपाक आणि निव्वळ परिस्थितिजन्य करुण विपाक असे दोन अगदी बंदिस्त कप्पे ठरवूं पाहतात. तसेंच, हर्फर्डने तसें म्हटलें नसूनही, नायक व्यक्तीची श्रेष्ठता किंवा आत्मिक गाढता नाटककाराने नाट्यकृतीमध्ये प्रत्यक्षपणें, आमच्यासमोर त्याच्या रंग-भूमीवर घडणाऱ्या कृत्यांमधून दाखविली पाहिजे असा एक स्वतःचाच निकष, जणू हर्फडने सांगितलेला म्हणून, गृहीत धरतात; या निकषानुसार कोरिओलेनस ही शेक्स्पीअरची एक उत्कृष्ट करुणनाट्यकृति असें मानतात; आणि गडकऱ्यांनी एकच प्याला नाटकांत हें केलें नाही म्हणून एकच प्याला ही एक करुण नाट्यकृति नाही असा निर्णय ते करतात.

हीच पद्धति आजकाल पुष्कळदा अवलंबिली जाते. अशा स्थितींत टीकाकार काय म्हणतात हें पाहण्याऐवजी प्रत्यक्ष श्रेष्ठ नाटककार स्वतः कोणतें तंत्र अवलंबितात हें पाहून त्यामधून सार्वकालीन व सर्वसामान्य असे करुण नाट्याचे किंवा करुण नाटकांतील नायकाच्या चित्रणाच्या रीतीचे कांही नियम सापडतात काय हें पाहावें अशी कल्पना प्रस्तुत लेखकाच्या मनांत आली. या कल्पनेनुसार प्रयत्न करून पाहत असतांना त्याला जें जें कांही प्रतीत झालें त्याचें सार म्हणजे हा ग्रंथ आहे.

ग्रंथांत अवलंबिलेली रीत—

कल्पना अशी की, आपण प्रथमच नाट्य-प्रयोग पाहायला बसलों आहोंत. नाटक पूर्वी ऐकलेलें नाहीं; प्रत तर पाहायलाच मिळालेली नाही; नाटकाचा विषय किंवा परिणति यांच्याबद्दलही कांही कल्पना नाही. अशा स्थितींत नाटकांतील एकेक प्रसंग आपल्यापुढे घडत असतांना ज्या व्यक्तीवर आपलें लक्ष विशेष खिळून राहत आहे असें आपल्याला वाटत जातें, ज्या व्यक्तीशीं आपलें साधारणीकरण होत जातें, त्या व्यक्तीच्या गुणदोषांचें, कर्तृत्व-अकर्तृत्वाचें, वागण्याच्या तऱ्हांचें, बोलण्याच्या तऱ्हांचें दर्शन आपल्याला नाटककार कसेंकसें घडवीत जात आहे हें पाहत राहावयाचें. विशेषतः हें करुण विपाकाचें नाटक आहे याचा प्रत्यय हळूहळू येऊं लागल्यावर आणि त्या आपलें मन आकर्षून घेतलेल्या व्यक्तीबद्दल आपल्याला वाढती हळहळ वाटत आहे असाही प्रत्यय येऊं लागल्यावर, हें असें कां होतें, हळहळ कां वाटते, नाटककार आमच्या मनांत ही हळहळ कशा रीतीनें उत्पन्न करीत जातो हें पाहत राहावयाचें; मग नाटक पुढेपुढे पाहत असतांनाच या गाढ होत जाणाऱ्या भावनेच्या प्रत्ययानंतर मनांतल्या मनांत, मागे घडून गेलेल्या प्रसंगांचेंही पुनरवलोकन व पुनश्चिंतन करावयाचें. अशा प्रकाराने अभ्यास-वृत्तीने अखेरपर्यंत नाटक पाहून झाल्यावर मग त्या नाटकापुरते हे प्रश्न आपण सहजच मनांत आणूं: कशा प्रकारची व्यक्ति होती ही? अत्यंत श्रेष्ठ? अत्यंत कर्तबगार? अत्यंत संयमी, अत्यंत त्यागी, अत्यंत सामर्थ्यवान? आणि त्या व्यक्तीचा नाश कशामुळे झाला? केवळ बाह्य विरोधी परिस्थितीमुळे? केवळ त्याच्या स्वभावांतच कांहीं उणेंपणा होता म्हणून? कां या दोन्ही कारणांच्या संगमामुळे? तसें असेल तर त्यामध्येही अधिक प्रभावी कारण कोणतें? कशी वागली ही व्यक्ति? कशी बोलली? तुमच्या आमच्यासारखेंच की कांही निराळें?

एकापाठोपाठ एक अशीं हीं अनेक श्रेष्ठ प्रतिभावंतांचीं नाटकें आपण या रीतीने पाहूं. मग त्यांमध्ये कांही साम्य-विषयाचें, पद्धतीचें, तंत्राचें-आढळतें कां हें पाहूं. एक खरें की, अगदी प्रथमच प्रत्येक नाटक आपण पाहत आहों हा आव बरोबर शंभर टक्के कांहीं साध्य होणार नाही. यांपैकीं बरीचशीं नाटकें आपण बहुतेकांनी वाचलेलीं नि पाहिलेलीं आहेत; त्यांबद्दल इतरांनी केलेलें मतप्रदर्शनही पाहिलेलें आहे. त्यामुळें अशा एखाद्या मताचा विचारही अधून मधून आपल्या मनांत येईल. परंतु हें गृहीत धरूनही या अभ्यासांत, अमुक ग्रंथकार अमुक म्हणतो म्हणून अमुक गोष्ट अशी हें गृहीत न धरतां, केवळ नाटक आपणापुढे कसें घडतें हें पाहत राहून, निर्विकल्पपणें नायकाचें दर्शन घेत राहणें हें आपल्याला कांही सर्वथा अशक्य होईल असें नाही.

अशा या प्रायोगिक अभ्यासानंतर जर आणि जीं कांही सामान्य धोरणें श्रेष्ठ प्रतिभावंत कवींनी करुण नाट्यांतील नायकांच्या चित्रणांत अवलंबिलेलीं आढळतील तीं म्हणजे चिरंतन आणि कधीच न बदलणारीं धोरणें होत असें केव्हाच म्हणतां येणार

नाही. ते निव्वळ ठोकताळे होत. कोणी सांगावें, नवीन प्रतिभाशाली कलावंत नव्या कलाकृती रचतील व त्यांमधून आणखी कांही नवीनच ठोकताळे पुढील पिढ्यांतील आस्वादकांना व अभ्यासकांना आढळून येतील. पूर्वी हें होत आलें आहे, पुढेही होत राहणार आहे. तेव्हा आतापर्यंतच्या श्रेष्ठांनी काय केलें; व आतापर्यंतच्या या श्रेष्ठां-शिवाय इतरांनी जें केलें तें या श्रेष्ठांच्या कार्यपद्धतीशीं कोठेसें आणि कितपत जुळणारें आहे एवढेंच पाहणें हें अभ्यासकाचें खरें कार्य आहे. याच शोधक वृत्तीनें भिन्न भाषांतील व काळांतील करुण नायकांच्या चित्रणाचा विचार ग्रंथांत यापुढे करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण दुसरें

हॅम्लेट

'डेन्मार्कचा राजपुत्र हॅम्लेट' हें नाटक आपण प्रथम पाहणार आहोंत. त्याच्या सुरुवातीलाच जे दोघेजण आपल्याला दिसतात ते तर पहारेकरी आहेत. रात्रीचा एक पहारा संपून दुसरा सुरू होत आहे; पहारा सोडून जाणाराला नवा पहारेवाला विचारतो "तुझ्या पहाऱ्यांत सगळें शांत होतें ना?" त्या वेळी आपल्याला शंका अशी कांहींच येत नाही. परंतु नव्या पहारेकऱ्याच्या मागोमाग होरेशिओ आणि मार्सेलस येतात तेव्हा त्यांच्या बोलण्यांत मात्र वरील प्रश्न कां विचारलेला होता त्याचें कारण समजतें. मार्सेलस जेव्हां विचारतो, "आज तें प्रकरण पुन्हा दिसलें कां?" तेव्हा आपण जरा कान टवकारतों. लौकरच आपल्याला कळतें की, कसल्यातरी पिशाच्च योनींतील कोणी दिसण्याचा यांत संबंध आहे. हें भूत राजपुत्र हॅम्लेटच्या पित्याचें – नुकत्याच मेलेल्या हॅम्लेट राजाचें – रूप घेऊन येतें हें आपणांस कळतें. होरेशिओ हा कांहीं खरा पहारेवाला नाहीं; या भूत प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी मुद्दाम बोलावून आणलेला पहारेकऱ्यांच्या विश्वासांतला तो एक माणूस आहे; तो विद्वान आहे, त्यानें भुताशीं बोलावें असा पहारेकऱ्यांचा हेतु आहे. भूत दिसतें, पण त्याच्याशीं बोलण्याचा होरेशिओचा प्रयत्न यशस्वी होत नाही. आणि एक जाणकार या नात्याने भुताच्या या रोज दृष्टीस पडण्याचा अर्थ लावण्याचें काम त्याच्यावर स्वभावतःच पडतें. परंतु त्यालाही या प्रकाराचा स्पष्ट अर्थ सांगतां येत नाही. अधिकांत अधिक तो एवढीच भीति व्यक्त करतो की, "आपल्या राज्यांत कांही तरी चमत्कारिक उत्पात होत असल्याचें हें चिन्ह आहे."

आपण पाहत असलेलें नाटक विशेष गंभीर स्वरूपाचें नाटक आहे, हास्यविनोदात्मक अशी ही गोष्ट खास नाही, एवढी पुसट ओळख होरेशिओच्या या सूचक उद्गारावरून आपणाला होते तोच पहारेकऱ्यांपैकी एकजण राज्यामध्ये लढाईच्या तयारीची धामधूम कां चालली आहे याबद्दलचा प्रश्न विचारतांना आपण पाहतों. नॉर्वेचा फॉर्टिंब्रास नांवाचा तरुण राजपुत्र डेन्मार्कविरुद्ध लढाई उभारण्याच्या नादांत असल्यामुळे ही धामधूम चालली असल्याचें होरेशिओ सांगतो तोच त्याला ज्यूलिअस सीझरच्या वधाच्या आधी भौतिक वातावरणांत झालेल्या उत्पात वगैरेंची आठवण होते; पुढे होणाऱ्या अशुभ घटनांची जणू ती प्रस्तावनाच होती असें तो म्हणत आहे तोच भूत पुन्हा दिसतें आणि पहारेकरी व होरेशिओ यांच्याप्रमाणेच आपलेंही अंतःकरण कोणत्या तरी भयंकर प्रसंगाच्या काठावर आपण आहोंत या विचाराने एकदम थरारतें.

हॅम्लेटची आपली पहिली अप्रत्यक्ष ओळख—

तथापि या सर्व प्रकरणाचा अर्थ रंगभूमीवरील त्या तिघांना जसा समजत नाही तसा तो आपणा प्रेक्षकांनाही समजत नाही. भुताशीं बोलण्याचा होरेशिओने पुन्हा प्रयत्न केला; पण यश आलें नाही. भूत बोलल्याशिवाय या प्रकरणाचा अर्थ समजणारच नाही, आणि आपल्याशीं तर तें बोलत नाही; तेव्हां आणखी कोणाशीं तें बोलेल का, हा विचार उत्पन्न झाला; अर्थात होरेशिओच्या मनांत; आणि त्याने निर्णय केला की, "भूत धाकट्या हॅम्लेटशीं बोलेल; तेव्हा त्याचा आपला जो लोभ आहे त्यासाठी व आपलें एक कर्तव्य म्हणूनही रात्रीचा हा प्रकार त्याला निवेदन करावा."

येथे संपलेल्या या प्रवेशांत हॅम्लेटची व आपली ओळख होते ती एवढीच काय ती. त्याला प्रत्यक्ष पाहण्याचा योग अजून आलेलाच नाही. होरेशिओ आणि त्याचे दोस्त ते दोघे पहारेकरी यांचा व हॅम्लेटचा लोभ आहे आणि भूत त्याच्या बापाच्या वेषांत येत असल्यामुळें त्याच्याशीं, म्हणजे स्वतःच्या मुलाशीं तें बोलण्याचा संभव आहे, नव्हे खात्री आहे एवढी होरेशिओंची समजूत आहे. याहून अधिक नाटककाराने हॅम्लेटविषयी आपल्याला अजून कांहीं सांगितलेलें नाही. त्याचें रूप, त्याचा स्वभाव, त्याचे गुणदोष याविषयी अद्यापि आपण अनोळखीच आहोंत.

त्याऐवजी हें मात्र नाटककाराने आपल्याला विशेष ठसठसशीतपणाने सांगितलें आहे की, डेन्मार्कच्या राज्यांत कांहीतरी उत्पात होण्याचीं चिन्हें होतीं; इतकीं की, होरेशिओसारख्या विद्वानाला ज्यूलिअस सीझरच्या वधाच्या काळच्या अत्यंत अशांत आणि भयाण परिस्थितीची आठवण व्हावी. म्हणजे हा प्रवेश संपतांना डेन्मार्कमधील अस्थिर परिस्थितीवर आणि भुताच्या दर्शनाने सूचित झालेल्या त्या राज्याच्या संभाव्य विनाशावरच आपलें चित्त अधिक खिळून राहतें.

स्वतःवर लक्ष खिळवून घेणारी व्यक्ति—

या मनस्थितींत आपण असतांनाच राजदरबार आपणापुढे उभा राहतो. राजा व राणी आणि त्यांच्या आजूबाजूला बरीचशीं दरबारी माणसें तेथे आहेत. त्यामध्ये हॅम्लेट कोणता हें समजण्याला जरी नीटसें साधन नाही, तरी एका व्यक्तीवर आपलें लक्ष खिळून राहतें. ही व्यक्ति म्हणजे एक उमदा दिसणारा तरुण आहे. हा तरुण दरबाराच्या त्या घोळक्यापासून आणि दरबारांत चाललेल्या धामधुमीपासून दूर, अगदी एका टोकाला बसलेला आहे. दरबाराकडे तर तो पाहत नाहीच; परंतु त्याची दृष्टि खिन्नता दर्शविणारी असली तरी ती कोणीकडे लागलेली किंवा खिळलेली आहे हें समजून येत नाही. दरबारांत खरोखर केवढे तरी प्रसंग एकामागून एक घडतातः परंतु त्याकडे जणू त्याचें लक्षच नाही; आणि लक्ष नाही म्हणावें तर त्या तेथल्या भाषणांमुळे त्याच्या नजरेंत आणि कपाळावर, सूक्ष्म दृष्टीने पाहिले असतांनाच दिसावे असे कांही फेरफार

होत असलेलेही आढळत आहेत, चमत्कार असा की, दरबारांत चाललेले प्रसंग पाहण्या-ऐकण्यापेक्षा – किंवा ते पाहत असतांनाच – आपलें मन, बाजूला बसलेल्या या तरुणाच्या चेहऱ्यावरचे फेरफार पाहण्याकडे अधिक आकर्षित होत आहे. तो तरुण जरी बोलत नाही तरीही रंगभूमीवरील त्याची इतराहून वेगळी बैठक आणि कांही पाहत नसतांही तो सगळें कांही पाहत - ऐकत आहे असें आपणाला भासावें अशा त्याच्या हालचाली – अतिसूक्ष्म हालचाली – यांनीच आपलें हृदय जणू व्यापून जात आहे.

त्याच्याबद्दल कांही माहिती असून हें असें घडतें असें मात्र मुळींच नाही. रंगभूमीची रचना आणि अभिनयकुशल नटाचा मूक अभिनय यांचा तो परिणाम आहे. अर्थात या सजावटींतून व अभिनयांतून खुद्द नाटककारालाच आमचें लक्ष त्याच्याकडे वेधावयाचें आहे हें उघडच आहे.

दरबारांत सुरुवातीलाच राजा आपल्या भावाच्या मृत्यूबद्दलचें अगदी ताजें दुःख, त्या दुःखाचा भार हलका झाला नसतांही स्वतःच्या कर्तव्याची जाणीव, त्याच जाणीवेने आपल्या भावजयीशीं एका डोळ्यांत दुःखाश्रू आणि दुसऱ्या डोळ्यांत आनंदाश्रू असतांना आपण केलेला विवाह, यांचें विवरण आणि समर्थन करतो आणि या सर्व प्रकाराला दरबारांतील श्रेष्ठींनी मनापासून संमति दिली याबद्दल त्यांचे तोंडभर आभार मानतो. याच वेळीं त्या तरुणाच्या कपाळावर केवढ्या तरी आठ्या पडतात. हें आभारप्रदर्शन उरकून राजा फॉर्टिंब्रासच्या संभाव्य स्वारीबद्दलचा विचार व आपण त्यासंबंधांत केलेली योजना यांचें निवेदन करतो. त्यानंतर नव्या राजाच्या राज्यारोहणाच्या वेळीं आपली खास निष्ठा दाखविण्यासाठी आलेला राजाच्या प्रमुख मंत्र्याचा मुलगा लेअर्टिस याला थोड्याशा वाटाघाटीनंतर राजा फ्रान्समध्ये पुन्हा अभ्यासाला जाण्याला परवानगी देतो. या पुढच्या दोन्ही प्रसंगांकडे त्या बाजूला बसलेल्या तरुणाचें मुळींच लक्ष नाही; त्याच्या कपाळावरून अजून त्या आठ्या दूर झालेल्या नाहीत. आणि राजा मग एकदम त्याच्याचकडे वळून जेव्हां म्हणतो,

"हो, पण आतां आमचा अगदी जवळचा नातेवाईक हॅम्लेट, आमचा मुलगा –" तेव्हा एकदम चमकून आपण त्या तरुणाकडे वळतो आणि मनांत म्हणतो, " बरोबर; तर मग हाच हॅम्लेट तर ! "

पहिलीच प्रत्यक्ष ओळख—

राजाचें तें बोलणें ऐकतांच हॅम्लेटने काढलेले स्वगत उद्गार, त्यानंतर राजा व हॅम्लेट आणि राणी व हॅम्लेट यांच्यामध्ये उडालेले संवादाचे फुटाणे यांतून आपणांस हॅम्लेटची थोडीशी प्रत्यक्ष अशी प्रथमच ओळख होते. मनांतल्या मनांत जेव्हा तो म्हणतो " हो नात्याने पुष्कळ जवळ, पण स्वभावधर्माने नाही " तेव्हा त्याच्यामध्ये आणि राजामध्ये कांहीतरी विरसता आहे याचा बोध होतो. नुकताच त्याच्या बापाचा मृत्यु झालेला आणि प्रौढ वयाची दिसणाऱ्या आईने घाईघाईने दिराशीं विवाह केलेला. या

घटनांमुळे ही विरसता उत्पन्न झाली असावी असा तर्क करून आपण पुढचीं संभाषणें ऐकूं लागतो. राजा विचारतो, " अरे हें काय ? अजून तुझ्यावरचें हें ढगाळ कायमच ? " त्यावरचें हॅम्लेटचें उत्तर, " नाही सरकार, मी तर चांगल्या भडक प्रकाशामध्ये – उन्हामध्ये आहे कीं, " हें आपल्याला त्याच्या स्वभावाची आणखी एक तऱ्हा दाखवितें. त्याच्या मनांत राजाविषयी वाकडा भाव तर आहेच, परंतु उत्तरास प्रत्युत्तर देतांना कोटिबाजपणा करण्याचीही त्याची लकब आहे हें आपल्या ध्यानांत येतें. या लकबीचा अनुभव पुढे आपल्याला अनेकदा येतो. राजाशीं बोलतांना हॅम्लेटचा जो कोटिबाजपणा आपण पाहतों तोच राणीशीं बोलतांनाही दिसतो; पण दोन्ही वेळच्या आवेशांत फार मोठा फरक आहे. " पण मग, तुलाच हें एवढें विशेष दुःख म्हणून कां भासतें ? " या राणीच्या प्रश्नाला, " भासतें नाही आईसाहेब, खरेंच आहे तें " असें कोटिप्रधान उत्तर जरी हॅम्लेटनें दिलें तरी त्यांत अलिप्तता, बेफिकिरी, तुच्छता यांचा लवलेशही नाही. उलट आपलें दुःख दाखविणारी पोशाखादि जीं अनेक चिन्हें आहेत त्यांनी आपल्या अंतःकरणांतलें दुःख कधीच दाखवितां येणार नाहीं, इतकें तें दुःख तीव्र आणि गाढ असल्याबद्दल तो मोठ्या आवेशाने आणि तळमळीने बोलतो.

आईचा अनादर करण्याची इच्छा नाही—

यांत जें दिसतें कीं, राजाशीं बोलण्याची किंवा त्याच्याकडे लक्ष देण्याची हॅम्लेटची इच्छा नाही, पण आईचा अनादर करण्याची त्याची इच्छा नाही, तेंही लगेच आणखी जास्त स्पष्ट होतें. मृत्यूबद्दल वृथा शोक करणें कसें कार्पण्याचें लक्षण आहे याबद्दल राजा भलें मोठें तात्त्विक विवेचन करतो; आतां मीच तुला पित्याच्या ठिकाणीं, तूंच पुढचा गादीचा मालक इत्यादि साखर पेरतो; आतां तूं पुन्हां विश्वविद्यालयांत जाणें आपल्याला मान्य नाही, आमच्याचजवळ, आमच्या डोळ्यांना सुख आणि समाधान देत, आमच्या दरबारचा प्रमुख मानकरी, आमच्या जवळच्या नात्याचा, आमचा प्रत्यक्ष मुलगाच अशा रीतीनें तूं राहावेस, असें हॅम्लेटला प्रेमाचा आव आणून सांगतो; पण एका शब्दाने हॅम्लेट त्याला उत्तर देत नाही. उलट राणीने " तूं येथेच राहा " असें म्हणतांच मात्र " मला होईल तेवढें करून मी तुझी आज्ञा पाळीन " असें उत्तर हॅम्लेट चटकन देतो.

व्यावहारिक जगाच्या दृष्टीने हॅम्लेट—

येथपर्यंत आपण एवढेंच पाहिलें की, मनावर कांहीतरी दडपण असणारा, आपल्या बापाच्या मृत्यूमुळे आणि आईच्या घाईघाईच्या पुनर्विवाहामुळे व्यथित झालेला एक उमदा तरुण असा हॅम्लेट आहे. राजाशीं त्याला बोलायला नको आहे. संभाषणांत तो कोटिबाज आहे. आपल्या अंतःकरणाला बोचणारी गोष्ट अत्यंत आवेशाने, काव्यमय रीतीनें सांगण्याची त्याची प्रवृत्ति आहे. तो कोणी मोठा विख्यात किंवा श्रेष्ठ मनुष्य आहे, किंवा प्रभावी वीर आहे, सामर्थ्यवान नेता आहे, पंडित आहे, अत्यंत थोर

शीलाचा, कर्तृत्वाचा किंवा विभूतिमत्वाचा पुरुष आहे अशी कोही आपली समजूत अजून होत नाही; किंवा तसें कांही नाटककार कोणाच्या तोंडून आपल्याला सांगतही नाहीं. उलट राजानें त्याच्या वागणुकीवर जो शेरा मारला आहे तो हीनत्व-निदर्शकच आहे. राजा म्हणतो, "पित्याच्या मृत्यूबद्दल पुत्राला दुःख व्हावें हें स्वाभाविक खरें; परंतु त्याच दुःखाचा ध्यास घेऊन बसणें पुरुषार्थाला शोभणारें नाही; परमेश्वराबद्दलची अत्यंत विपरीत बुद्धि यामध्ये दिसते; अशा व्यक्तीचें अंतःकरण अत्यंत अधीर आणि दुबळें, मन अत्यंत उतावीळ, विचारशक्ती अगदीच सामान्य आणि असंस्कृत होय." म्हणजे व्यावहारिक जगाच्या दृष्टीने हॅम्लेट हा उलट धर्म-पालन न करणारा, अधीर चित्ताचा, चंचल मनाचा, दुबळा, उतावीळ आणि असंस्कृत बुद्धीचा पुरुष होय असेंच आपणाला एका बाजूने दाखविलें जातें.

आतुरता आणि जिव्हाळा यांचा उद्भव—

परंतु दरबार संपवून राजाराणीसह सर्व मंडळी निघून गेल्यावर हॅम्लेट अगदी एकटा मागे राहतो त्या वेळीं हॅम्लेटच्या भावनेचा जो प्रचंड स्फोट एकाएकी होतो तो पाहिल्यावर मात्र हॅम्लेटबद्दलची आपली वृत्ति एकदम निराळी होते. एकदम अंतःकरण पिळवटून टाकावें अशा रीतीने तो जेव्हा म्हणतो, "अरेरे, माझ्या शरीरांतलें हें अतिशय, फार फार घट्ट असलेलें मांस वितळून त्याचा क्रमाक्रमाने द्राव कां होत नाही आणि अखेर दंवरूपानें तें वातावरणांत विरून कां जात नाही? नाहीतर अविनाशी अशा त्या धर्मतत्त्वामध्यें स्वतःचा वध करण्याविरुद्ध नियम तरी घालून ठेवलेला नसता तर!" तेव्हा इतका या शरीराचा उबग येण्याइतकें या विचाऱ्याला झालें आहे तरी काय अशी जिज्ञासा उत्पन्न होऊन, आपण कांहीशा आतुरतेने, कांहीशा जिव्हाळ्याने त्याचे पुढचे विचार ऐकूं लागतों. आणि मग आपण जाणतों की, हें सारें जग, त्याच्यांतील हे सारे रीतिरिवाज अगदीच कंटाळवाणे, शिळे, निरुपयोगी असें त्याला वाटूं लागलेलें आहे. हें जग म्हणजे एक जिच्यावर कोणाचा कधी हात फिरला नाही अशी बाग आहे, तिच्यांत सगळें जंगल माजलें आहे; सृष्टीमधील बेफाट वाढलेल्या आडमाडू झाडांनी ती सगळी व्यापून टाकलेली आहे. या एवढ्याशा वयांत त्याला जगाबद्दल एवढा तिटकारा येण्याचें कारण यापुढच्या त्याच्या उद्गारांत जेव्हा आपल्याला कळतें तेव्हा कसे कोण जाणे, पण आपण त्याच्या अगदी जवळ येतो. तो म्हणतो,

"या थराला गोष्टी याव्यात? मरून केवळ दोन महिने! छे, छे! इतके कुठले? दोन सुद्धां नाहीत. राजा तरी किती श्रेष्ठ; आजच्या या राजापुढे तो म्हणजे शनीपुढे सूर्यदेव. माझ्या आईवर प्रेम केवढं! स्वर्गांतील वाऱ्यानेसुद्धा जोराने येऊन तिच्या गालाला स्पर्श केलेला त्यांना सहन नाही व्हायचा. देवा, देवा, किती ताज्या, जणू डोळ्यांपुढे घडताहेत अशा या गोष्टी आहेत. उपभोग घ्यावा अन् त्यांने भूक अधिकच वाढावी अशा रीतीने ती त्यांना कशी बिलगून राहावी!

आणि असें असून एक महिन्याच्या आंत—काय म्हणूं याला मी ? हेंच की, चंचलते, तुझंच नांव स्त्री. जे जोडे घालून ती टपटप टिपें गाळीत, एखाद्या सती जाणाऱ्या हतभागिनीप्रमाणे माझ्या प्रिय वडिलांच्या प्रेतामागून गेली त्या जोड्यांवरचा रंग थोडासुद्धा फिकट झाला नाही तोच, त्या तिनेच—तिनेच—शिवशिव, सारासारविवेक नाही अशा पशूनेसुद्धा अधिक काळ शोक केला असता – त्याच तिने माझ्या वडिलांच्याच भावाशीं —भाऊ खरा, पण माझ्यांत आणि ग्रीक योद्धा हर्क्युलिस याच्यामध्यें जसें मुळींच साम्य नाही अशाशीं—त्याच तिने एक महिन्याच्या आंत—तिच्या डोळ्यांतून वाहलेल्या त्या सर्वस्वी अपवित्र नि खोट्या अश्रूंचा खारटपणा रडून मोठे आणि लाल झालेल्या डोळ्यांतून एवढाही कमी झाला नाही तोच—त्या तिनेच लग्न केलें ! काय ही दुष्ट घाई—कशासाठीं, तर इतक्या तडातडी आणि अल्हदपणें एकाच रक्ताच्या व्यक्तीच्या अंथरुणांत शिरण्यासाठी ! ही गोष्ट चांगली नाही. तिच्यांतून चांगलें कांही व्हायचें नाही. पण इकडे यामुळे माझें हृदय फाटून त्याचे तुकडे तुकडे व्हायची वेळ आली तरी यांतलें कोठे कांही अवाक्षर काढायची सोय नाही."

तळमळून निघालेल्या या उद्गारांमुळे आपलेंही मन थरारतें. हॅम्लेटच्या काळीं मृत राजाच्या भावाशीं राणीने विवाह करण्याची रीतच होती याचा सुद्धा आपल्याला विसर पडतो. भारतीय इतिहासांतील या रीतीचेंही आपल्याला स्मरण होत नाही. एक इतका उमदा पुरुष; आणि त्याच्यावर अतीव प्रेम दाखविणाऱ्या स्त्रीने चार आठवडे सुद्धां जाऊं न देतां, त्याच्याच भावाशीं, हॅम्लेट म्हणतो त्याप्रमाणे जो सूर्यापुढे शनि इतका क्षुद्र आहे त्याच्याशीं, विवाह करावा ही घटना आपल्यालाही हॅम्लेटइतकीच घृणास्पद वाटते. त्यामुळे त्याच्या अंतःकरणाची जी तळमळ होते तीच जणू आपल्याही अंतःकरणाची होते. आम्हीही क्षणभर त्याच्याबरोबर म्हणतो – खरें आहे, स्त्री म्हणजे मूर्तिमंत चंचलता.

हॅम्लेटचें निराळेंपण—

त्यांतही एका गोष्टीचा चटका आपल्याला लागून राहतो. ती म्हणजे, या सगळ्या घृणास्पद घटनेबद्दल इतकी तर सोडाच, पण थोडीसुद्धा तळमळ हॅम्लेटशिवाय दुसऱ्या कोणाला वाटत नाही. राजाचा दरबार कसा सुरळीत आणि सर्वसंमतपणें पार पडतो. जुन्या राजाची कोणाला आठवण नाही. नवा राजा आपल्या विवाहाचें समर्थन करतो; पण कुणा एकाला त्याबद्दल एवढीही आशंका वाटत नाही. परक्या स्वारीच्या निरोधनार्थ केलेल्या नव्या राजाच्या योजनेशीं सर्वजण सहमत – एकरूप होतात; लेअर्टिससारखा उमदा दिसणारा तरुणसुद्धा आपण राज्यारोहणप्रसंगीं आपली निष्ठा व्यक्त करण्याकरिता खास आलों असें म्हणतो; त्याच्या तरुण आणि म्हणूनच व्यवहाराने न निर्ढावलेल्या मनाला यांत – विशेषतः या घिसाडघाईच्या लग्नांतही – कांही वावगें वाटत नाही. त्या सगळ्याची तळमळ फक्त हॅम्लेटलाच लागली आहे; इतकी की, जग त्याला

निर्माल्यवत्, निबिड माजलेल्या बागेगत विफल वाटूं लागलें आहे; जीवही नकोसा झाला आहे त्याला; कारण – कारण झालेली घटना त्याच्या मताने दुष्ट आहे – तिच्यापासून कुणाचेंच चांगलें होणार नाही; आणि तरी तिच्याविरुद्ध, बापाचा एकुलता एक पुत्र असूनही, कांही करतां येण्याजोगी परिस्थिति नाही; खुद्द त्याची आई–की जिचें अंतःकरण थोडें तरी लाजेने चूर व्हावें – तीही या सर्व तमाशांत मोकळेंपणाने सामील आहे; आणि म्हणून हॅम्लेटला तोंड बांधून गप्प बसावें लागत आहे, अरेरे, गरीब बिचारा !

परिस्थितीविरुद्ध झगडूं पाहणारा उमदा तरुण —

ही आपली हॅम्लेटविषयीची अंतःकरणाची करुण सहभावना आहे. त्याच्या राज्यांतील जणू एकूण एक व्यक्ति या पापाचरणाच्या बाजूची; त्यामुळे या पापाचरणाबद्दल तोंडांतून ब्र काढण्यासही अवसर नसलेला आणि अंतःकरणांत कढणारा हा उमदा तरुण; अशांच्यामधील हा झगडा आहे ही या वेळीं आपल्याला साक्ष पटते; त्याच क्षणीं आपणही त्या एकट्या पडलेल्या तरुणाचे पक्षपाती होतों.

हें घडतें तें कांही त्याच्या कोणत्याही मोठेपणाची, प्रतिभावंतपणाची, विभूतिमत्वाची ओळख आपणाला पटते म्हणून मुळीच नव्हे. कारण हॅम्लेट हा कोणी असा असामान्य पुरुष होता असें अजून आपण कोणाकडून ऐकलेलें नाही; तसें वाटावें असें रंगभूमीवर आपणाला अजून कांही दिसलेंही नाही. ऐकलें, पाहिलें, दिसलें तें एवढेंच की, घिसाडघाईच्या लग्नाची एक पापी घटना घडली आहे; हॅम्लेटच्या आईने दिराशीं लग्न केलें आहे; ही गोष्ट घृणास्पद वाटून तिच्यामुळे हॅम्लेटच्या अंतःकरणाची काहिली झाली आहे; पण समाजाचा सगळा कल त्याच्या तळमळीच्या इतका विरुद्ध आहे की, त्या बिचाऱ्याला तूर्त तरी कांही करतां येण्यासारखें आहे असें वाटत नाही.

म्हणजे फार मोठी विरोधी परिस्थिति आणि तिच्यापुढे हतबुद्ध होऊन गेलेला एक उमदा तरुण असा हा झगडा आपल्यापुढे नाटककाराने उभा केलेला आपण पाहतों. नाट्यशास्त्राच्या भाषेंत येथे या नाटकाचें बीज नाटककाराने पहिल्या प्रथम आपल्यापुढे उभें केलें आहे. पुढे ज्या कांही विदारक घटना घडावयाच्या आहेत – जें चांगलें होणार नाही आहे – तें या परिस्थितीच्या परिणामाने आणि तिच्याशीं सामना देण्याला असमर्थ झालेल्या हॅम्लेटच्या दुर्दैवाने असा अगदी पहिला ठसा नाटककाराने आपल्या मनावर उमटविला आहे.

आईच्या लग्नाच्या घिसाडघाईची बोंच हॅम्लेटला किती लागलेली आहे याचा प्रत्यय पुढच्याच प्रवेशांत मिळतो. होरेशिओ वगैरे मंडळी हॅम्लेटला भुतासंबंधी सांगण्याकरिता आली आहे. तेव्हा होरेशिओला अगदी याच वेळी विद्यापीठांतून इकडे

येण्याला कारण काय घडलें हा प्रश्न निघून होरेशिओ सांगतो, "तुझ्या वडिलांच्या दिवसांकरिता मी आलों." त्यावर आपल्या त्या सहाध्यायालासुद्धा हॅम्लेट कटाक्षाने म्हणतो, "कां बाबा माझी उगीच थट्टा करतोस? सरळ सांग ना, माझ्या आईच्या लग्नसमारंभासाठी आला होतास म्हणून" आणि वर लहानशी पुस्ती जोडतो, "बाबा, काटकसर आहे बरें ही, काटकसर!" आणि मग एकदम हॅम्लेटची तळमळ व्यक्त होते. "तो दिवस (लग्नाचा) पाहण्याचें नशिबीं येण्यापूर्वी स्वर्गांत माझी माझ्या कट्टया शत्रूशीं गाठ पडती तर बरें झालें असतें – होरेशिओ, माझे बाबा एकसारखे माझ्या डोळ्यांसमोर येतात" हा त्या वेळचा त्याचा उद्गार विशेष रीतीने मनावर ठसतो.

ताबडतोब निर्णय करण्याची वृत्ति—

वडिलांचा उल्लेख हॅम्लेटने केल्यामुळें भुताची हकीकत सांगायला त्याच्या मित्रांना सवड सापडते. ही हकीकत सांगितली जात असतां हॅम्लेट नुसता लक्षपूर्वक ऐकतो आहे; अधून मधून एखादा प्रश्न विचारून स्वतःला हवी असलेली माहिती विचारून घेतो आहे. त्याच रात्रीं पहाऱ्याच्या वेळीं जाऊन या प्रकरणाचा प्रत्यक्ष पडताळा पाहायचा असें त्या चौघांचें ठरतें. त्या वेळीं हॅम्लेटच्या स्वभावाचा आणखी एक पैलू आपल्याला दिसून येतो. तो म्हणजे एखाद्या बाबतींत अगदी ताबडतोब निर्णय करून तो अंमलांत आणण्याचा. एकदम तो जाहीर करतो, "हें भूत जर मला बाबाच्या रूपात दिसेल तर मग मी त्याच्याशीं बोलणारच; मग त्यासाठी प्रत्यक्ष नरकाचें द्वार खुलें होऊन मला त्यामध्ये मुकाट्याने जावें लागलें तरी हरकत नाही. तुम्हांला एक मात्र प्रार्थना. आजपर्यंत यांतलें कांही आणखी कुणाला सांगितलें नसेल तर यापुढेही असेंच तें स्वतःच्या मनांत ठेवा. घडेल तें पाहा, समजून घ्या, पण कुठे तोंड उघडूं नका. तुम्हांला योग्य बक्षीस देईन."

काव्यमय भाषेची आणि सामान्य सिद्धांताची आवड—

हा नवा दिसलेला पैलू नीट लक्षांत ठेवून आपण पुढचें नाटक पाहूं या. रात्रीं अकरा ते बारांच्या दरम्यान पहाऱ्याच्या जागीं जमायचें नक्की करून होरेशिओ वगैरे मंडळी गेल्यावर हॅम्लेटच्या मनाची तळमळ पुन्हा एकदा व्यक्त होते. आतां त्याच्या मनांत विचार फक्त आईच्या लग्नाबद्दलचा राहत नाही. भूत आणि तें बापाचें; यांत कांहीतरी भानगड आहे; कुणीतरी कांहीतरी घात केलेला आहे; असें स्वाभाविक त्याला वाटून केव्हा एकदा रात्र होईल आणि या सर्व प्रकारणाचा उलगडा होईल असें त्याला होऊन जातें. त्यासंबंधीचा स्वतःचा विचार व्यक्त करतांना हॅम्लेट जी भाषा वापरतो त्यामधून याआधी पुसटपणें लक्षांत आलेली हॅम्लेटची आणखी एक लकब आपल्याला स्पष्ट होते. ती म्हणजे या तरुणाला काव्यमय बोलण्याची आणि पुढे आलेल्या घटनेवरून कांहीं तरी एखादा सर्वसामान्य सिद्धांत सांगण्याची सवय आहे,

हौस आहे. आईच्या विसाडघाईच्या लग्नावरून त्याने एकदम 'चंचलते तुझें नांव स्त्री' हा एक सामान्य सिद्धांत मांडला, तर या प्रवेशाच्या शेवटीं पापें पृथ्वीच्या तळाशीं दडपून ठेवलीं तरी तीं माणसांच्या दृष्टीसमोर येणारच हा सिद्धांत त्याने मांडला आहे. ताबडतोबीने निर्णय करण्याची आणि असें काव्यमय आणि सिद्धांतरूप बोलण्याची त्याची लकब अशीच पुढे दिसते का हें आपण पुढे पाहूंच.

आता भुताच्या आणि हॅम्लेटच्या भेटींत काय होतें हें समजून घेण्याची आपली आतुरता स्वाभाविक असूनही नाटककाराने त्याऐवजी आणखीच एक प्रसंग आपल्यापुढे उभा केला आहे. राजाची परवानगी मिळून लेअर्टिस फ्रान्सला जायला निघालेला आहे. त्या वेळीं त्याला निरनिराळ्या प्रकारचा उपदेश व्यवहारचतुर असा त्याचा बाप करतो आहे. पोलोनियस हा किती लुक्का माणुस आहे हें दाखविण्याचा यांत कवीचा उद्देश उघडच आहे. परंतु आपल्या अभ्यासाच्या दृष्टीने आणि खरोखर नाटककाराच्या दृष्टीनेही या प्रसंगींच्या दुसऱ्याच दोन घटना आपल्याला पाहायला हव्यात. पहिली घटना म्हणजे लेअर्टिसने ऑफिलियाला – आपल्या बहिणीला – हॅम्लेटच्या विरुद्ध दिलेला इशारा. प्रथमच येथे आपल्याला कळतें की, या मुलीशीं हॅम्लेटचीं प्रेमाचीं बोलणीं चालू आहेत. लेअर्टिस आपल्या बापाचाच अवतार आहे. कुणाचेंही बागणें किंवा बोलणें संशयानेच पाहावें; एकदम खरें म्हणून कशावर विश्वास ठेवूं नये, हें त्याच्याही व्यवहारचातुर्याचें धोरण आहे. आणि म्हणून तो बहिणीला सांगतो की, हॅम्लेटच्या प्रेमावर भरवंसा ठेवूं नको. तो तरुण आहे; रीतच आहे की तरुणांनी तरुणींकडे नजर ठेवावी; त्यांत धाडस आहे, गोडी आहे, पण स्थिरता नाही. क्षणिक आवेगाचा हा प्रकार आहे; अधिक नाही, हें तो तिला सांगतो. त्याहीपेक्षा अधिक विचारणीय असा दुसरा एक मुद्दा तो सांगतो. तो म्हणजे, हॅम्लेट राजपुत्र आहे, पुढचा राजा आहे. त्यामुळें विवाहाचा निर्णय त्याला केवळ स्वतःच्या मनाप्रमाणे करतां येणार नाही. राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याच्या निवडीला बंधन पडेल. एवढ्यावरच तो थांबत नाही; तर तिला तो धोक्याचा इशारा देतो; हॅम्लेटच्या विनवण्यांना बळी पडून स्वतःच्या अब्रूचा खेळखंडोबा करून घेऊं नकोस, त्याच्या काव्यावर विश्वास टाकूं नकोस; हॅम्लेटच्या विनवण्या स्वतःच्या मनावर व विकारांवर अजून ताबा न मिळविलेल्या तरुणाच्या विनवण्या आहेत; म्हणून त्याला आपलें हृदय किंवा आपलें पावित्र्य अर्पण करूं नकोस ...वगैरे. यामध्ये आपल्या दृष्टीने एक महत्त्वाची गोष्ट ही की, त्याच्याचबरोबरीच्या लेअर्टिससारख्या तरुणाला हॅम्लेट हा अजून अप्रौढ, अस्थिर बुद्धीचा आणि विकारांवर ताबा न मिळविलेला असा तरुण वाटतो. म्हणजे राजाप्रमाणेच त्याचीही कल्पना हॅम्लेटच्या श्रेष्ठपणाला पोषक नाही.

लेअर्टिसच्या या सगळ्या उपदेशाच्या डोसाला उत्तर देतांना कांही ऑफिलिया कच्ची मुलगी आहे असें वाटत नाही. त्याला ती ठीक बजावते की, "भाऊराया, तूं सांगतोस तें सगळें मनांत मार्गदर्शनासाठीं मी नित्य बाळगीन. पण संभाळ बाबा.

नाही तर पुराणांतलीं वांगीं पुराणांत असा प्रकार व्हायचा; पुराणिकबुवांनी आम्हांला स्वर्गसंपादनाचा पुण्यमय मार्ग दाखवावा आणि स्वतः मात्र नाही त्याच मार्गाने जावें, असें व्हायचें!"

ऑफिलियाचा हा चतुरपणा तिच्या बापाच्यापुढें टिकला नाही ही घटना मात्र हॅम्लेटच्या भोवतालची विरोधी परिस्थिती फार मोठी भयंकर आणि भीषण करायला कारणीभूत झाली. कारण तिकडून भुताच्या भेटींत तो, अंतःकरणाचा कोलाहल होऊन, मनुष्याच्या सत्प्रवृत्तीविषयी निराश होऊन कांही एका निराळ्याच तऱ्हेने वागण्याचा निश्चय करून येतो, तोच मानवाच्या, विशेशतः स्त्रियांच्या पावित्र्याविषयी, सत्याविषयी, निष्ठावंतपणाविषयी हॅम्लेटच्या विश्वासाचा चक्काचूर व्हावा आणि मुद्दाम पांघरलेलें वेड खरेंच ठरतें की काय, अशी भीति उत्पन्न व्हावी असा त्या घटनेचा परिणाम झाला.

पण त्याआधी भुताच्या भेटींत काय घडलें तें पाहावयास हवें. भुताच्या भेटीचा प्रसंग अंगावर शहारे आणणारा आणि अंतःकरण थिजवून टाकणारा आहे. भूत येतें, परंतु बाकीच्यांच्या समक्ष तें हॅम्लेटशीं बोलत नाही. त्याला खुणावून तें आपल्याकडे येण्यास सांगतें. हॅम्लेटचे सोबती भितात, जाऊं नये म्हणून त्याला सांगतात. त्यावर हॅम्लेटने दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तो विचारतो, "भीति कशाची? शरीराबद्दल पाहिलें तर त्याची किंमत एक कवडीसुद्धा नाही. आणि आत्मा तर अमर; तेव्हा भूत त्याला काय करणार आहे?" जगामध्ये व्यावहारिकतेपेक्षा तात्त्विक, अव्यवहारी दृष्टि हॅम्लेटची जास्त आहे याची चुणुक आणि कोटिबाज असा त्याचा स्वभाव आहे हें दाखविणारा हा प्रसंग आहे. होरेशिओ उत्तराच्या ओघांत याच ठिकाणीं, कुणी सांगावें, भूत अशीं कांहीं रूपें धारण करील की, त्यामुळे हॅम्लेटच्या बुद्धीवरील त्याचा निरंकुश ताबा नाहीसा होईल आणि त्यांतून त्याला वेडही लागेल अशी भीति व्यक्त करतो व पुढें जें कांही घडणार त्याची जणू नांदीच करतो.

परंतु हॅम्लेट त्याचें ऐकत नाही. त्याचा निश्चय तडकाफडकी झालेला असतो आणि त्याला तो दृढपणें चिकटून राहतो. भुताने त्याला सांगितलेला वृत्तांत कोणाही प्रेमळ, सात्विक आणि विरल तात्त्विक भूमिकेंत वावरणाऱ्या तरुणाच्या अंतःकरणाचें पाणी पाणी करणारा, त्याला हताश आणि दिङ्मूढ करणारा आहे. साप चावून बाप मेला ही वार्ता प्रसृत झाली होती. परंतु भूत काव्यमय भाषेंत सांगतें, "तुझ्या बापाला चावणारा साप आज राजमुगुट धारण करतो आहे." स्वतःच्या दारुण वधापेक्षां हॅम्लेटच्या बापाचें चित्त पत्नीच्या एकनिष्ठतेच्या अभावामुळे जास्त व्यथित होतें. केवढा तिचा अधःपात; आपलें प्रेम किती स्थिर आणि अखंड; आणि तरी तें सोडून एका अगदी नादान माणसाच्या नादीं तिने लागावें याबद्दलचा आपला तीव्र विषाद व्यक्त करीत असतांना भूतही उपमाअलंकारांनी युक्त आणि तात्त्विक सिद्धांतांनी फुललेलें असें भाषण करतें; आणि मग मुलगा नेमका याच वृत्तीचा आहे हें आपणाला ठळकपणें वाटूं लागतें. भावाने कानांत विष ओतून एका क्षणांत आपल्याला जीव,

पत्नी आणि राजमुगुट या तिहींपासून कसें वंचित केलें याची हकीकत भूत विस्ताराने हॅम्लेटला सांगतें. अशा रीतीच्या, पापाचा झाडा (Confession) द्यावयास संधि न मिळतां झालेल्या मृत्यूमुळे आपण किती घोर अवस्थेंत सापडलों आहों यांचें वर्णन करून, या गोष्टीचा हॅम्लेटने सूड घ्यावा, डेन्मार्कच्या राजाचें अंथरूण एकरक्ताशीं होणाऱ्या व्यभिचाराचें आणि विषयोन्मादाचें स्थान त्याने होऊं देऊं नये असें भूत त्याला आवाहन करतें. आणि तरीही त्याने आपल्या आईला संकटांत आणूं नये, फक्त तिच्या मनांत पश्चात्तापाचे काटे निर्माण करून त्याने तिचा पुढचा निवाडा ईश्वरावर सोपवावा आणि आपल्या मनाला कसल्याही अमंगलाची सावली शिवूं देऊं नये असेंही एक बंधन भूत त्याच्यावर लादतें.

या सगळ्या प्रकाराने हॅम्लेटच्या यापूर्वीच्या विषण्णतेची व निराशेची आग अधिकच भडकावी यांत कांहीच आश्चर्य नाही. आतां हा तरुण पुन्हा एकदा तावातावानें भडकून बडबडणार ही आपली अपेक्षाही लगेच खरी होते. स्वतःचें अंतःकरण फुटूं पाहत आहे त्याला तो थांब थांब म्हणून सांगतो; आपल्या स्नायूंची वृद्ध म्हणजे गलित होण्याची ओढ रोखून धरून ताठ राहण्याचा तो प्रयत्न करतो. भुतानें सांगितलें असतें, "माझी आठवण ठेव." "तुझी आठवण – हो आता यापुढे माझ्या स्मृतिपटलावरून इतर सर्व कांही मी पार पुसून टाकणार" असा त्यावर हॅम्लेट निर्धार व्यक्त करतो. "आतां आठवण फक्त एका गोष्टीची; बापाच्या आज्ञेची."

पण गंमत पाहा; ज्यांची आठवण विसरायची त्यांमध्ये अगदी पहिला क्रम आहे पुस्तकांतील म्हणींचा. यांतही हॅम्लेटच्या स्वभावविशेषाचें तेंच गमक आहे की, हा तरुण पुस्तकी वातावरणांत वावरणारा, अव्यवहारी, तात्त्विक गुंजनांत गुंगणारा आहे. परंतु या तरल अवस्थेंतही त्याच्या मनाला बापाचा मृत्यु — चुलत्याचें दुष्ट कारस्थान — वगैरेपेक्षा आईच्या दुराचरणाबद्दल अधिक वेदना होतात. तो म्हणतो काय पाहा—

"अरेरे, किती घातकी स्त्री ही ! दुष्ट ! दुष्ट ! हसतमुख — पापी — दुष्ट !"

या इतक्या स्फोटक अवस्थेंतही त्याचें सामान्य सिद्धांत नोंदून ठेवण्याचें वेड डोकें काढतेंच; नव्हे, तो प्रत्यक्ष आपली टिपणांची वही काढून तिच्यांत खरोखरीच नोंदून ठेवतो : "मनुष्य एकसारखा हसत राहिलेला दिसेल, आणि तरीही तो पक्का पाजी असूं शकेल. निदान आमच्या डेन्मार्कमध्यें तरी खास असें घडेल."

परिस्थितीचें तात्काल आकलन : झटकाफटकी निर्णय—

परंतु ही सिद्धांत नोंदून ठेवण्याची अनिवार्य ऊर्मि क्षणिक आहे. लगेच तो आपल्या निर्धाराकडे वळतो : आता एकच विचार – बापाचा आदेश. पुन्हा एकदा आपल्याला प्रत्यय येतो की, परिस्थितीचें झपाट्यानें पूर्ण आकलन करणें आणि त्या परिस्थितींत कसें वागायचें आणि काय करायचें याचा निर्णय तात्काळतोब आणि दृढपणें करणें याची मोठी शक्ति हॅम्लेटच्या ठिकाणीं आहे. तिघा सोबत्यांबरोबर हॅम्लेट भूत

पाहण्यासाठी आला. पण भुताशीं भेट त्याची एकट्याचीच झाली. किती आतुरता होती त्याच्या मित्रांना, काय झालें तें जाणण्याची. पण हॅम्लेटने त्यांना अवाक्षराचा सुगावा लागूं दिला नाही, चतुराईनें त्यांच्याशीं बोलून, जें पाहिलें व ऐकलें त्यांतील एक शब्दही कोठें न सांगण्याची शपथ मात्र त्याने घेवविली आणि तरीही सांगितलें कांहीच नाही. होरेशिओला सुद्धा त्याने उडवाउडवीचें उत्तर दिलें, "अरे बाबा, या पृथ्वीवर आणि आकाशांत अशा अनंत गोष्टी आहेत की, ज्यांचा मागमूस तुमच्या त्या तत्त्वज्ञान्यांच्या स्वप्नांत सुद्धा कधी लागायचा नाही."

पण स्वतःच्या पुढच्या धोरणाबद्दलची एक गोष्ट मात्र तो त्याला आणि बार्काच्यांना निक्षून सांगतो हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. "माझी वागणुक यापुढें कितीही चमत्कारिक किंवा तऱ्हेवाईकपणाची होवो; कारण कदाचित मला यापुढें कांहीशी माकड-चेष्टा करणारी वृत्ति धारण करणें उचित वाटेल; तरीपण तुम्ही कोणी मान अशी-तशी हलवून, किंवा सूचकपणे हलवून किंवा हात सूचकपणे हलवून किंवा अडकवून, किंवा "हं ठाऊक आहे आम्हांला," "असं काय!" "वाटलं तर सांगतां येईल म्हणा" वगैरे कसलेही शब्द उच्चारून बिलकूल दाखवितां कामा नये की, माझ्या एकंदर धोरणा-विषयी तुम्हांला कांही माहीत आहे." याबद्दल त्याने त्यांच्याकडून कठोर अशी शपथ घेवविली आणि अखेरीस थोडासा इषारा दिला, "चला, बरोबरच जाऊं आपण आतां. पण तोंडाला हात. नेहमी आळिमिळी गुपचिळी. काळ तर मोठ्या उलथा-पालथीचा आहे; आणि दैवाची वक्र गति अशी आहे की, यांत सगळें स्थिरस्थावर करण्यासाठी मला जन्माला घालण्यांत आलें आहे."

याही त्याच्या विनंतीमध्ये हॅम्लेटच्या भोवतालच्या विचित्र विरोधी वातावरणावरच्च नाटककाराने आपली दृष्टि खिळविलेली आहे. त्याच्या चपल बुद्धीचा आणि निर्णय-कौशल्याचा कानोसा आपल्याला लागलेला आहे; त्याच्या काव्यतरल वृत्तीची ओळख आपल्याला झालेली आहे. पण त्याच्या विशेष कसल्या श्रेष्ठत्वाची जशी आपल्याला अजून मुळीच ओळख झालेली नाही तसेच त्याचे कोणते मोठे दोषही नाटककाराने अजून आमच्या प्रत्ययाला आणून दिलेले नाहींत.

शेक्स्पीअरची करुण नायकाबद्दलची कल्पना—

परंतु जातां जातां नाटककारानें कांहीशी अभावितपणें हॅम्लेटच्या तोंडून करुण नाट्याच्या नायकाबद्दलची स्वतःची कल्पना चवथ्या प्रवेशाच्या सुरुवातीलाच वदविली आहे असें वाटल्यावाचून राहवत नाही. राज्यारोहण आणि विवाह यांच्या निमित्ताने शहरांत नाचरंगाची धमाल चालू असल्याचे आवाज पहाऱ्यावर ऐकूं येतात. दारूचे जणू लोट वाहत असल्याचें हॅम्लेट सांगतो तेव्हा, असा इकडचा प्रघातच आहे काय, म्हणून होरेशिओ विचारतो. त्या वेळीं "आमच्या देशाला दारूची ही मोठी वाईट सवय लागलेली आहे, त्यामुळे इतर देशांत आमची नाचक्की होते आणि आमच्या

बाकीच्या सर्व कर्तबगारीच्या कृत्यांवर त्यामुळे पाणी पडतें" हें सांगतां सांगतांच हॅम्लेट आपल्या सामान्य सिद्धांतप्रस्थापनेच्या सवयीनुसार सांगूं लागतो; "व्यक्तींच्या बाबतींतही पुष्कळदां हें असें होतें. त्यांच्यापैकीं कांहींच्या ठिकाणीं स्वभावांतच कांही रोगट-दोषी-कोपरा असतो, जन्मतःच तसें असतें. बरें यांत कांही त्यांचा गुन्हाही नसतो, कारण स्वभावाला कांही आपण कोठून आणि कशा स्वरूपांत जन्माला यावें हें ठरविण्याचें स्वातंत्र्य नाही. किंवा त्यांच्या स्वभावांत एखादा रंग इतका भडकपणें वाढलेला असतो की, त्याच्यापुढे सारासार-विवेकबुद्धीचे तट आणि बुरुज कःपदार्थ बनतात, त्यांचा जणू धुव्वा उडून जातो. किंवा कोणाला अशी एखादी सवय लागलेली असते की, इतर दृष्टींनी कितीही शिष्टसंमत असणारी त्यांची चालचलणूक खातेऱ्यांत पडल्यासारखी होते. अशीं हीं माणसें-त्यांच्या ठिकाणीं एकाच दोषाचा ठसा असतो; हा दोषही त्यांच्या प्रकृतिधर्मांचेंच एक अंग असतें; किंवा त्यांचा तो दैवगुण असतो. पण या एकाच दोषामुळे-मग बाकीच्या दृष्टीने त्या माणसांचे इतर सद्गुण कितीही निर्मळ, प्रत्यक्ष सौंदर्यदेवतेइतके निर्मळ असोत, मानवाला जितकें शक्य तितक्या पराकोटीला गेलेले असोत, तरी या एकाच दोषामुळे अशीं हीं माणसें सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने निंदास्पद ठरतात; अशा दोषाच्या विषाचा केवळ एक बिंदु त्यांच्या ठिकाणच्या श्रेष्ठ गुणवत्तेच्या अस्तित्वाबद्दलच शंका उत्पन्न करतो, स्वतःप्रमाणेंच ती गुणवत्ताही निंदास्पद होईल असें करतो.*

थोडक्यांत म्हणजे शरीरांतील किंवा स्वभावधर्मांतील एखादेंच वैगुण्य पुष्कळदा

---

* So, oft it chances in particular men,
That for some vicious mole of nature in them,
As, in their birth — wherein they are not guilty
Since nature cannot choose his origin,—
By the overgrowth of some complexion,
Oft breaking down the pales and forts of reason,
Or by some habit that too much o'er--leavens
The form of plausive manners; that these men,
Carrying, I say, the stamp of one defect,
Being nature's livery, or fortune's star,
Their virtues else, be they as pure as grace,
As infinite as men may undergo,
Shall in the general censure take corruption
From that particular fault : the dram of evil
Doth all the noble substance of a doubt,
To his own scandal.

व्यक्तीच्या बाकीच्या सर्व श्रेष्ठतेला मातीमोल बनवितें. नाटककार हा शेरा, जणू हॅम्लेटच्या सर्व भावी अल्प चरित्राला उद्देशूनच देत आहे असें वाटणें स्वाभाविक आहे. पुढच्याच प्रकरणांत करुण नाट्याविषयी ज्या सिद्धांताचा उल्लेख येणार आहे त्याच्याशीं पुष्कळसा सदृश असा हा विचार असल्यामुळे नाटककाराचें हें करुणनाट्यांतील नायकाचेंच वर्णन आहे असें वाटणें हेंही स्वाभाविक आहे. 'हॅम्लेट' हें आपलें पटचित्र सादर करतांना लॉरेन्स ऑलिव्हिअेने हेंच सूत्र सुरुवातीला घोषित केलें आहे; आणि स्वतःची पुस्ती तेथेच जोडली आहे की, 'हॅम्लेटचें'ही हेंच झालें; त्याला निर्णय करण्याचें जमलें नाही."

या सगळ्याचा प्रपंच या प्रकरणाच्या शेवटीं करावा लागणार आहे. परंतु हॅम्लेटचे हे उद्गार ऐकतांना हें सगळें जरी आपल्या मनांत आलें तरी अशी त्याची बाकीची अति पराकोटीची सद्गुणपरंपरा कोणती आणि ती मातीमोल होण्याजोगा त्याचा प्राकृतिक दोष कोणता हें अद्यापि प्रत्ययाला यायचें आहे हें मात्र निश्चित आहे. त्यासाठी त्याचें पुढचें चरित्रच पाहिलें पाहिजे.

" आतां फक्त पित्याची आज्ञा " अशी प्रतिज्ञा भुताशीं झालेल्या भाषणानंतर करून हॅम्लेट निघाला तेथे नाटकाचा पहिला अंक संपतो. एका रात्रीच्या मध्यापासून तो पुढच्याच रात्रीच्या पहाटेपर्यंत, म्हणजे सुमारे २८।२९ तासांचा हा काळ आहे. त्यानंतर दुसऱ्या अंकांतील घटना आपल्यापुढे येईपर्यंत किती काळ गेला हें समजणें कठीण आहे. परंतु हा काळ जवळ जवळ दोन महिन्यांचा असावा असें पुष्कळांनी मान्य केलें आहे. या दोन महिन्यांत हॅम्लेटने काय केलें याचें प्रत्यक्ष दर्शन रंगभूमीवर आपल्याला घडत नाही. परंतु ज्या गोष्टी त्याने केल्या किंवा त्याच्या बाबतींत घडल्या त्यांचे झालेले परिणाम आता आपल्याला दिसूं लागतात.

दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत ऑफिलिया अत्यंत घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करते आणि म्हणते की, मी अगदी भयंकर घाबरून गेलें आहें. तिच्या घाबरण्याचें कारण ती जें सांगते तें काव्यपूर्ण शब्दांत तर आहेच; परंतु त्यापेक्षा तें विदारक जास्त आहे. ती आपल्या अंतर्गृहांत शिवीत बसली होती, तेथे हॅम्लेट आला. अंगांतील आंगरख्याचे बंद बांधलेले नाहीत; डोक्यावर हॅट नाही; पायमोजे चुरगळलेले, त्यांना बंद नाहीत, खाली घोट्यापर्यंत ते घरंगळलेले; आंगांतल्या सदऱ्यासारखा तो पांढराफटक पडलेला; गुडघे एकमेकाशीं लडबडत असलेले आणि मुद्रा इतकी केविलवाणी की, जणू कांही एका क्षणापूर्वीच नरकांतून त्याची सुटका झाली आहे आणि तेथल्या यातनांचें चित्रच जणू त्याच्या ओठांवर आहे.

कां हॅम्लेट अशा स्थितींत तेथे आला? वेडाचें सोंग जें त्याने पांघरलें होतें त्या निमित्ताने? कां पोलोनिअस विचारतो त्याप्रमाणें ऑफिलियाच्या प्रेमाने तो वेडा झाला होता म्हणून? ऑफिलियाला तशी शंका आहे. परंतु हॅम्लेट प्रत्यक्ष कांही बोललाच नाही. त्याने प्रथम तिचें मनगट घट्ट धरून ठेवलें, नंतर सबंध हात लांबवेल इतका

दूर जाऊन तो उभा राहिला. दुसरा हात आपल्या कपाळावर त्याने आडवा धरला आणि जणू कांही तिचें चित्र काढायचें आहे अशा विचाराने किती तरी वेळ तिच्या तोंडाकडे निरखून पाहूं लागला. पुष्कळ वेळ तसाच तो पाहत होता. शेवटीं त्याने तिचा हात थोडासा हलविला, खालपासून वरपर्यंत तीन वेळा डोकें खालीवर करून तिचें आपादमस्तक निरीक्षण केलें आणि एक इतका दीर्घ आणि केविलवाणा सुसकारा टाकला की, त्यासरशी त्याच्या सर्व शरीराचे तुकडे तुकडे होऊन तो नष्ट होतो की काय असें ऑफिलियाला वाटलें. एवढें होऊनही तो एक शब्द बोलला नाही; त्याने तिचा हात सोडून दिला, डोकें खांद्याकडे वळविलें आणि डोळ्यांनी कांही न पाहतांच तो चालत राहिला; कारण, खोलीच्या दाराबाहेर जरी तो गेला तरी जातांना डोळ्यांची मदत त्याला कांहीच नव्हती. शेवटच्या क्षणापर्यंत त्याचे डोळे ऑफिलियाकडेच लागलेले होते.

हॅम्लेटविषयी आपल्या मनांत तीव्र सहवेदना आणि जिव्हाळा उत्पन्न करण्यासाठी शेक्सपीअरने हॅम्लेटच्या या मूक आविर्भावाचा आणि आक्रंदनाचा या ठिकाणीं मुद्दाम उल्लेख केला आहे. हॅम्लेटची ही इतकी तीव्र आवेगाची अवस्था होण्याजोगें मध्यंतरीच्या कांही आठवड्यांत एवढें घडलें तरी काय? पोलोनिअस ऑफिलियाला विचारतो, "अलीकडे तूं कांही त्याच्याशीं कठोर बोललीस का?" त्यावर ती अत्यंत निरागस मुलगी कर्तव्यबुद्धीच्या चेतनेनेच उत्तर देते, "नाही; तुम्हीं आज्ञा केली तशी मी वागलें. त्याचीं पत्रें स्वीकारलीं नाहीत आणि त्याला माझ्याजवळ येऊं दिलें नाही."

केवढी मोठी आघातपरंपरा—

या छोट्याशा उत्तरापाठीमागे केवढी मोठी आघातपरंपरा होती; आणि आधीच आईच्या दुराचारी वर्तनामुळे उद्विग्न झालेल्या हॅम्लेटच्या मनाला या आघातांनी केवढा धक्का दिला असेल. हॅम्लेटला भुताच्या अस्तित्वाची कल्पना कळली त्याच्या आधीच, त्याला यत्किंचितही कल्पना नसतांना या घटनापरंपरेंतील पहिली गोष्ट घडली. ऑफिलियाने भावाला जरी चोख उत्तर देऊन गप्प केलें तरी बापापुढे तिचा चतुरपणा टिकला नाही असा ओझरता उल्लेख मागे केला आहे. पोलोनिअस हॅम्लेटच्या प्रेमाविषयी विशेषच दटावून बोलला होता. थोडक्यांत त्याने तिला बजावलें होतें, "हॅम्लेटच्या आणाशपथांवर मुळीच विश्वास ठेवूं नको; त्याच्या या सर्व विनवण्या पापी आहेत, तुला भुलविण्याचें हे सगळें तंत्र आहे;" आणि शेवटीं त्याने तिला स्पष्ट आज्ञा केली होती, "यापुढे हॅम्लेटशीं बोलण्यांत एक क्षणही घालवितां कामा नये; ध्यानांत ठेव, बजावून सांगतों आहें."

करुण परिणतीचें आणखी एक बीज—

बिचारी ऑफिलिया. बापाच्या दडपणाने ती अगदी दबून जाते आणि अतीव दबल्या आवाजांत म्हणते, "I shall obey my lord"; "पिताजी मी आपली

आज्ञा पाळीन!" येथे या नाटकाच्या करुण परिणतीचें दुसरें बीज पेरलेलें आहे. आपण काय करतों आहोंत, एका निष्पाप, उमद्या, प्रेमळ तरुणाच्या घाताला यामुळे आपण केवढें मोठें कारण होणार आहोंत, याची तिला कल्पना असती तर! पण तसें व्हायचें नव्हतें. जिच्यावर हॅम्लेटला आधी कांही उपाययोजना करणें शक्यच नव्हतें अशी ही आणखी एक विरोधी परिस्थिति होती. जिच्यावर पुत्र म्हणून त्याने भाव-सुलभ अंतःकरणाने माया केली त्या आईबद्दलचा अतिशय विपरीत अनुभव त्याच्यापुढे अगदी ताजा होता. त्यामुळे त्याच्या चित्तांत आग भडकली होती. भुताच्या निवेदनानंतर ही आग अधिकच तीव्र झाली होती. तोच एक यौवनांत नवीनच प्रवेश करणारी, जिच्यावर त्याने अत्यंत अंतःकरणपूर्वक गाढ प्रेम केलें होतें अशी एक निष्पाप मुलगी त्याचीं पत्रें–त्याच्या कविता स्वीकारण्याचें बंद करूं लागावी, तिने त्याला टाळूं लागावें, त्याला तिची भेट अशक्य व्हावी, ही घटना, व्यवहारांतील खाचाखोचांना अजून अपरिचित असलेल्या आणि काव्यप्रांतांत विहरणाऱ्या त्याच्यासारख्या तरुणाचा मानवी सद्गुणावरील राहिला सवरला विश्वास नाहीसा करायला किती मोठ्या प्रमाणांत कारण झाली असेल हें हॅम्लेटशीं सहभाव प्रस्थापित झालेल्या आपल्याला तरी सहज समजून आलें पाहिजे.

ऑफिलियाने बापाला 'मी तुमची आज्ञा पाळीन' असें म्हणणें यांत जसें या नाटकांतील संघर्षाचें एक बीज आपल्यापुढे येतें त्याचप्रमाणे हॅम्लेटने तिच्या अंतर्गृहांत येऊन दीर्घ सुसकारा टाकून निघून जाणें यामध्ये नाटकांतील करुण विपाकाला सुरुवात झाली हें पण दिसून येतें. हॅम्लेटने पांघरलेलें वेड आणि त्याचें प्रेमनिराशेचें वेड यांची येथपासून सरमेसळ होऊन जाते आणि म्हणूनच तो खरोखरीच वेडा होता कीं काय याबद्दलची दाट शंका उत्पन्न होते.

अविचारी उतावीळपणा—

आतापर्यंत हॅम्लेटच्या विशेष श्रेष्ठपणाचा पुरावा जसा आपल्याला मिळाला नव्हता त्याचप्रमाणे त्याच्या ठिकाणचें अनर्थावह असें एखादें वैगुण्यही आपल्या नजरेस आलें नव्हतें. या प्रसंगीं मात्र त्याचा एक दोष उघडा होतो. तो म्हणजे त्याचा उतावीळ-पणा. तो तरुण आहे, व्यवहाराचा अनुभव त्याला कमी आहे, पुस्तकी वातावरणांत गुंगत राहण्याची त्याला सवय आहे; एवढ्याशा एखाद्या गोष्टीवरून सर्वसामान्य सिद्धांत बांधण्याकडे त्याची प्रवृत्ति आहे, हें सगळें मान्य करूनही असें वाटल्यावाचून राहत नाही की, ऑफिलियाच्या बाबतींत त्याने फार अविचाराचा निर्णय केला; त्या निरागस, निष्पाप, कोवळ्या मुलीवर त्याने मोठा अन्याय केला. जवळ जवळ दोन महिनेपर्यंत ऑफिलियाने त्याची भेट टाळली, त्याचीं पत्रें स्वीकारलीं नाहीत, त्याच्या कविता तिच्या-पर्यंत जाऊं शकल्या नाहीत हें खरें. तरीही आपल्या आईवरून त्याने जो सिद्धांत बांधला होता की, स्त्रीजात म्हणजे मूर्तिमंत चंचलता, त्याच सिद्धांताच्या दावणींत

ऑफिलियाला बसविण्यापूर्वी त्याने तिला खुलाशाची कांही तरी संधि द्यावयास पाहिजे होती. तिचें त्याच्याविषयीचें अलीकडचें दुर्लक्ष हें तिच्या स्वतःच्याच इच्छेतून उद्भवलें होतें, का तिच्या बापाचा त्यामागे कांही हात होता, याचा संशय त्याच्यासारख्या हुषार आणि पुष्कळ वाचलेल्या माणसाच्या मनांत यायला हवा होता व त्याचें निराकरण करून घेण्याचा प्रयत्न त्याने करावयास हवा होता. त्याचा प्रेमभंग झाला असें त्याला वाटलें. कांही दिवसांच्या अनुभवाने ऑफिलियाचेंही आपल्यावर प्रेम आहे हें त्याच्यासारख्या काव्यात्म माणसाला कळलेंच असलें पाहिजे. नाहीपेक्षा तिच्या नादीं तो लागलाच नसता. लेअर्टिस किंवा पोलोनिअस मानीत होते त्याप्रमाणे त्याची वृत्ति कांही फुलपाखरी, भोळ्या पोरींना नादीं लावून चैन करण्याची नव्हती. शुद्धाचरणाचा तो भोक्ता होता. ऑफिलियाच्या प्रेमाचा विश्वास त्याला पटला होता म्हणूनच त्याची काव्यलता बहरूं लागली होती. तेव्हां एकाएकी तिच्या वृत्तींत असा बदल कसा झाला याचा विचार त्याने करावयास हवा होता. विशेषतः पोलोनिअसशीं वागण्यांत पुढे हॅम्लेटचें जें धोरण आपण पाहूं लागतो त्यानंतर तर, या बापाची ही मुलगी आहे हें ध्यानांत घेऊन, तिच्या बदललेल्या धोरणाबद्दल विशेषच काळजीपूर्वक विचार त्याने करावयास हवा होता असें अधिक तीव्रतेने भासतें.

पण त्याच्या उतावीळ स्वभावामुळे त्याच्या हातून हें घडत नाही. या प्रेमभंगामुळे त्याची जी अवस्था झाली आहे तिचें शेक्स्पीअरने चांगलें वर्णन केलें आहे. नाट्यशास्त्रांत किंवा दशरूपकांत प्रेमनिराशेनंतर होणाऱ्या निर्वेदादि ज्या अनेक अवस्था सांगितलेल्या आहेत त्यांची या प्रकरणीं आठवण होते व तुलना करावीशी वाटते. परंतु तो आपला मुख्य विषय नाही. त्याचा उद्वेग फार मोठ्या प्रमाणांत वाढला होता हें आपल्या दृष्टीने महत्त्वाचें आहे. हॅम्लेट हा शरीराने व मनाने पूर्वीचा राहिलेला नाही हें पाहून राजाची चिंता वाढीस लागली आहे. त्यासाठी त्याने आपल्या कांही योजनाही सुरू केल्या आहेत. त्याचे दोन सहाध्यायी विश्वविद्यालयांतून बोलावून घेऊन त्याच्यावर हेरगिरी करण्यासाठी नेमले आहेत. आपल्या मुलीवरील प्रेमाच्या निमित्ताने हॅम्लेट वेडा झाला आहे ही पोलोनिअसची उपपत्ति राजाला मनापासून खरी पटलेली नाही; तथापि तिचा पडताळा पाहण्याला त्याने संमति दिली आहे. चार चार तास तो केव्हा केव्हा सदरेच्या पुढच्या सोप्यांत नुसताच फेऱ्या घालीत असतो, तेव्हा तेथे त्याची आणि ऑफिलियाची गाठ पडावी व काय होतें तें पाहावें असा घाट ठरतो. त्यानंतर पोलोनिअस व हॅम्लेट यांची गाठ पडते व त्या वेळीं जो संवाद होतो त्यांत नाटककाराने आपल्या कौशल्याची सीमा केली आहे. पोलोनिअसला पदोपदीं शब्दांत पकडण्याची त्याची चतुरता, बोलायचें पुष्कळ, परंतु मुद्याशीं म्हणून यायचें नाही हें त्याचें कसब, मध्येच एखादा टोला इतका वर्मी द्यायचा की, ऐकणाराने अचंबा करावा; या सगळ्या गोष्टी आपल्या प्रत्ययाला येऊन हॅम्लेटबद्दलचें आपलें कौतुक पुष्कळच वाढतें. त्याचे आपण पक्षपाती तर झालेलेच असतों. त्यामुळे आणि हॅम्लेटला

माहीत नाहीत अशा कांही दुर्बुद्धीच्या गोष्टी पोलोनिअसने केलेल्या आपल्याला माहीत असतात यामुळे पोलोनिअसबद्दल आम्हीही नाराजच असतो. म्हणून या म्हाताऱ्याची पाहतां पाहतां हॅम्लेटने भंवेरी उडविलेली पाहून आपण मोठे खूष होतों. पोलोनिअस-सुद्धा हॅम्लेटच्या या चतुराईच्या माऱ्याने चकित होतो. त्याच्यासारख्या मुरब्बी माणसाला तेव्हाच जाणवतें की, 'हें वेड असलें तरी त्यांतही कांही सुसंगत योजकता आहे.' हॅम्लेटच्या कांही उद्गारांतील अर्थगर्भता त्याला इतकी महान वाटते की, तो म्हणतो " मनुष्य नीट भानावर असतांही इतक्या चपखल रीतीने त्याला बोलतां येणार नाही; केव्हा केव्हा वेडांत माणसाला हें प्रगाढ सामर्थ्य प्राप्त होतें म्हणावयाचें."

त्या सामर्थ्याच्या दर्शनाने गांगरून जाऊन पोलोनिअस काढता पाय घेतो. त्याच्या घाबरगुंडीने हर्षित झालेल्या आपल्याला मात्र हॅम्लेटच्या या संवादचातुर्याची, दुसऱ्याचा स्वभाव आणि रोख ओळखून त्याला बोलतां बोलतां पकडींत खेचण्याची शक्ति पाहून अधिकच कौतुक वाटतें, व 'भले बहादर' अशा शाबासकीच्या भावनेने आपण त्याच्याकडे पाहूं लागतो. राजाने बोलावलेल्या त्या त्याच्या हेरकर्मी मित्रांचीही तो इतकीच गाळण उडवून टाकतो. परंतु सूक्ष्मपणें पाहणाराला त्यांत हेंही दिसतें की, पोलोनिअसशीं बागतांना हॅम्लेटची जी अगदीच हेटाळणीची वृत्ति आढळते तशी वृत्ति या विश्वविद्यालयीन सोबत्यांशीं बोलतांना त्याची नाहीं. राजाच्या बोलावण्यावरून आपण आलों हें त्यांच्याकडून कबूल करून घेतल्यावर आपल्या बदललेल्या अवस्थेचें जें वर्णन त्यांच्यापुढे त्याने केलेलें आपण ऐकतों त्यांतही हा फरक आढळून येतो. सूक्ष्म विनोद करण्याइतका त्याच्या वृत्तींत त्यांच्याशीं बोलतांना गोडवाही आहे. एवढेंच नव्हे तर, " पुरुषाला पाहून मला बिलकुल आनंद होत नाही " या त्याच्या वाक्याने त्याचे मित्र हसतातसे पाहिल्यावर त्यांतील मर्म चटकन जाणून, " आणि स्त्री पाहूनही नाही आनंद होत – तुमच्या हसण्यावरून तुम्हांला तसें वाटलेलें दिसतें आहे म्हणून सांगतों " हें बजावण्याइतकी बुद्धीची सूक्ष्मताही त्याच्या ठिकाणीं शिल्लक आहे.

हॅम्लेटच्या अंतःकरणाची खरी बोंच —

त्याच्या अंतःकरणाची खरी बोंच कुठेशी आहे हें याही संवादांत झटकन बाहेर आल्यावाचून राहत नाही. त्याच्या हेर-मित्रांनी बातमी आणली, एक नटसंघ बोलावून घेतल्याबद्दलची. त्यांची विचारपूस करतांना 'बालनटसंघाचीच सध्या चोहोकडे चलती आहे' ही गोष्ट निघते. त्यावर हॅम्लेट उद्गारतो–

" यांत तसें विशेष अस्वाभाविक कांही नाही. आमच्या काकांचेंच पाहा ना! पूर्वी, माझे वडील हयात असतांना, जे लोक काकांना वाकुल्या दाखवीत होते तेच आता त्यांना राजपद प्राप्त झाल्यावर त्यांच्या लहानशा चित्रासाठी वीस, पंचवीस, चाळीस, पन्नास, शंभर सुद्धा मोहरा मोजून घ्यायला अहमहमिकेने सरसावतात. पण

छे! हें नुसतें स्वाभाविक प्रकरण नाहीं. तत्त्वज्ञानाला शोध करून पाहतां आलें तर यांत थोडें त्याहून कांही निराळें आहे असें समजून येईल."

यांत जशी त्याच्या मनांतील बोंच दिसते तशीच त्या दोघांना तुम्ही तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी आहांत, जरा विचार तरी करून पाहा असें बजावण्याची वृत्ति दिसते. एवढेंच नव्हे तर थोडा वेळ कोड्यांतल्यासारखें पुन्हा बोलून त्यांना गोंधळांत पाडल्यावर हॅम्लेट त्यांना स्पष्टच बजावतो आहे, "माझ्या वेडाची दिशा फक्त उत्तर आणि वायव्य दिशेच्या बाजूला आहे. वाऱ्याची दिशा जेव्हा दक्षिणेकडे वळते तेव्हां मला वस्तूवस्तूंतील फरक चांगला कळूं लागतो."

एक लहानशी गोष्ट टिपून मग जरा पुढे सरकूं. आपल्या सहाध्यायांपाशी तत्त्वज्ञानाचा उल्लेख हॅम्लेटने हा दुसऱ्यांदा केलेला आहे. भुताशीं बोलून परत आल्यावर होरोशिओशीं बोलतांना तर हॅम्लेटने म्हटलें, "तुझ्या तत्त्वज्ञानाच्या स्वप्नांतसुद्धा नसतील त्याहून पुष्कळ अधिक गोष्टी या पृथ्वीच्या तळाशीं आहेत" तें आपण पाहिलें आहे. यावरून आता एवढा निष्कर्ष काढायला हरकत नाही की, विटेनबर्ग विश्वविद्यालयांत हे सगळेजण तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी होते; आणि हॅम्लेटची प्रवृत्ति त्यांच्यापेक्षा, निदान होरेशिओपेक्षा, तत्त्वज्ञान सोडून इतरच उद्योगांत रस पाहण्याची असल्याने त्यांना तो तत्त्वज्ञानी म्हणून चिडवीत असावा.

हॅम्लेटची नाट्याची आवड—

त्याला अधिक रस कशांत वाटत होता हें नटसंघाशीं झालेल्या त्याच्या मुलाखतीमध्ये चांगलें दिसून येतें. नाटकाचें आणि अभिनयाचें त्याला वेड आहे. नटसंघाचा तो चांगलाच आश्रयदाता आणि चाहता आहे. नाटकें पाहणें, तीं करविणें, त्यांतील बऱ्यावाईटाचें विश्लेषण करणें हा त्याचा नाद आहे. निरनिराळीं भाषणें साभिनय म्हणून दाखविणें आणि धंदेवाईक नटांनासुद्धा एक प्रकारें आदर्श दाखविणें, जरूर तर लिहिलेल्या संवादांत काटछाट करणें, भर घालणें किंवा नवाच एखादा संवाद लिहून देणें, हेंही सहज कसब त्याच्या अंगीं आहे. रसिकता आणि सूक्ष्म गुणदोषज्ञान हे त्याचे विशेष आहेत. आणि अरसिकांबद्दल त्याला चीड आहे. स्वतः त्याने म्हटलेल्या भाषणाला पोलोनिअसने शाबासकी दिली; आणि पुढचाच भाग नटाने तितकाच चांगला म्हटला तरीही "हा फार लांब आहे" असें त्यानेच म्हटलें. त्याबरोबर चिडून हॅम्लेटने उत्तर दिलें "ठीक, ठीक! तुमची दाढी आणि हें भाषण दोन्ही छाटायसाठी न्हाव्याकडे पाठवूं." श्रेष्ठांची हांजी हांजी आणि कनिष्ठांशीं मुजोरी या पोलोनिअसच्या धोरणाबद्दल लगेच पुन्हा हॅम्लेट तिरस्कार व्यक्त करतो; "ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे सगळी व्यवस्था करतों" असे पोलोनिअसने म्हणतांच उसळून हॅम्लेट म्हणतो, "सुईवरची माती तोलणाऱ्या माणसा, प्रत्येक माणसाला ज्याच्या त्याच्या योग्यतेने वागवायचें म्हटलें तर चाबकाच्या माऱ्यांतून एकजण तरी सुटेल का?"

हॅम्लेटची निर्णयकुशलता—

नटसंघाशीं आलेल्या प्रसंगांतही हॅम्लेटची ताबडतोब एखाद्या धोरणासंबंधी किंवा कृत्यासंबंधी निर्णय करण्याची शक्ति दिसून येते. नटसंघ आला आहे हें कळतांच त्याचा आपल्या कामासाठी कसा उपयोग करावयाचा हें त्याने ठरवून टाकलें. त्याच दृष्टीने त्यांची चाचणी घेतली. नाटक करावयाचें हें आणि कोणतें करायचें हें ठरवून टाकलें. त्याच्यामध्ये एक नवेंच लहानसें भाषण घालायचें हेंही त्याचें लगेच ठरलें. हॅम्लेट हा निर्णयकुशल आहे आणि निर्णय करण्यास लागणारी चपल बुद्धिमत्ता त्याच्या ठिकाणीं आहे हें या प्रसंगांत आपण पुन्हां एकदा पाहिलें.

तरीसुद्धा एका बाबतींत त्याच्या मनाचा निश्चय होत नव्हता. नटवर्ग निघून गेल्यावर हॅम्लेटला एकांत मिळतांच त्याबद्दलची त्याची तळमळ पुन्हा एकदा उसळी मारीत वर आली. " " ठीक, जा; देव तुमचें भलें करो, आतां एकदाचा मला एकांत मिळतो आहे. " असा उसासा टाकून नंतर जें भलें मोठें भाषण हॅम्लेट करतो, त्या भाषणाकडे या दृष्टीने आपल्याला विशेष बारकाईने लक्ष पुरविलें पाहिजे.

नटाला जें भाषण हॅम्लेटनेच म्हणायला सांगितलें, त्या भाषणांतूनच हॅम्लेटच्या विषादाची, तळमळीची आग भडकली. एका पौराणिक व्यक्तीबद्दलचें तें भाषण; तरीही नटाने तें अशा आवाजांत, अशा धाटणीने म्हटलें की, त्याच्या ठिकाणीं जणू सगळें मूर्तिमंत दुःख उभें राहिलें. केवळ नाटकांत जर नटाची ही अवस्था, तर मग स्वतःला प्रत्यक्ष हेतु असता आणि दुःखाला कारणीभूत असलेल्या व्यक्तीचा सुगावा लागलेला असता तर या नटाने काय केलें असतें आणि काय नाही; सारी रंगभूमि त्याने अश्रूंच्या पुरांत बुडवून टाकली असती, आपल्या विदारक भाषणाने सारें वातावरण तोडून फोडून टाकलें असतें, दोषी व्यक्तींना वेडें केलें असतें, दोषमुक्तांना भयभीत केलें असतें, अज्ञानी लोकांना बुचकळ्यांत पाडलें असतें आणि ऐकणारांचे कान आणि डोळे स्तिमित करून टाकले असते; असा विचार मनांत येऊन हॅम्लेट स्वतःला नाना तऱ्हांनी दोष लावून घेऊं लागतो. मट्ठ, नुसता चिखलाचा गोळा, गांवढळ अशा तो स्वतःला शिव्या देतो. कर्तव्याचें बीज आपल्या ठिकाणीं जीवच धरीत नाही आणि आपण कांही न बोलतां नुसते गप्प राहतों. एका राजाचा अत्यंत मौल्यवान जीव घेतला गेला, त्याचें सर्व जीवन बरबाद केलें गेलें, तरीही मला वाचा फुटत नाही. मग मी नेभळट तर नाही ? असा तो स्वतःलाच प्रश्न करतो. आणि मी जर नेभळट तर " मला हीन गुलाम म्हणून हिणविणारा, माझ्या डोक्याच्या चिंधड्या करणारा, माझी दाढी उपटून तिरस्काराने माझ्याच तोंडावर फेकणारा, माझें नाक धरून ओढणारा, माझ्या बोलण्यांत तिळमात्र सत्याचा अंश नाही असें सिद्ध करणारा हा दुसरा कोण आहे ? मी निराळा आणि माझी अशी हेटाळणी करणारा दुसरा कोणी आहे अशी तर अवस्था नाही !" असें म्हणून तो उसासा टाकतो. आणि स्वतःच्या प्रश्नाला

स्वतःच उत्तर देतो "दुसरें कोण ? माझेंच हृदय कबुतराचें आहे; माझ्याच ठिकाणीं त्वेषाची उणीव आहे. नाहीतर एव्हाना या पाजी माणसाच्या मांसाची मेजवानी देऊन सगळ्या घारी मीं पुष्ट केल्या असत्या;" आणि मग तो चुलत्याला शिव्या देऊं लागतो.

क्षणांत त्याचा हाही आवेग पालटतो. "दुसऱ्याला शिव्या देण्यांत काय अर्थ आहे ? मीच स्वतः शुद्ध गाढव आहे. खून झालेल्या बापाचा मुलगा; खुनाचा बदला घेण्याचा आदेश स्वर्गांतून आणि नरकांतून; आणि तरी त्या मीं एखाद्या बाजारबसवी-प्रमाणे रडून ओरडून नुसता ऊर बडवून घ्यावा – यांतच माझ्या निव्वळ भांडीघासे-पणाची साक्ष आहे" असा पुन्हा तो स्वतःला बोल लावून घेऊं लागतो. असे हे बदलते मनाचे रंग प्रगट करीत असतांना त्याची भाषा अलंकारिक आहे, काव्यमय आहे, त्वेषाची आहे. आणि तरीही आपण अमुक एक आतां निश्चयाने करणार असें कांही त्याच्या तोंडून निघत नाही. सूड घेण्यासाठी जरूर तें सर्व करावें ही तळमळ त्याच्या ठिकाणीं स्पष्ट आहे; तरीही कृति घडत नाही, तोंडांतून योजना व्यक्त होत नाही.

प्रत्यक्ष कृति टाळण्याचा हॅम्लेटचा स्वभावच आहे का ? —

याचा अर्थ अति विचाराला बळी पंडून नेहमीच प्रत्यक्ष कृति करण्याची टाळाटाळ करण्याचा त्याचा स्वभावच आहे का ? आतापर्यंत आपण पाहिलेले प्रसंग याच्या उलटच वृत्ति दाखवितात. किंबहुना ऑफिलियाच्या बाबतींत त्याने केलेला निर्णय तडकाफडकी केलेला तर आहेच, परंतु सारासार विचाराची आठवण सुद्धा न ठेवतां केलेला आहे. मग चुलत्यावर सूड घेण्याचें आजवर त्याने लांबणीवर कां टाकलें आहे. एक घाव दोन तुकडे अजून त्याने कां केले नाहीत ? वरच्या सगळ्या आत्मनिंदेच्या स्फोटानंतर मन किंचित शांत होतांच याचें उत्तर त्याने आपल्या बाजूने दिलें आहे. "काय म्हणे, माझी बुद्धि – धिक्कार, धिक्कार असो माझ्या शहाणपणाला" असें म्हणून तो सांगतो की, कोणी सांगावें, तें भूत म्हणजे खुद्द सैतान असेल; सैतानाला हवीं तीं रूपें घेतां येतात. माझ्या चित्तांतील विषण्णता आणि हळुवारपणा यांचा तो गैरफायदा कशा-वरून घेत नसेल ? तेव्हा गुन्हेगार अमुकच आहे याबद्दल अधिक मजबूत पुरावा मला मिळविला पाहिजे. या नाटकामधून हा पुरावा मिळेल. त्या वेळी चुलत्याचें मी स्वतः निरीक्षण करीन. खुनाला वाचा ही फुटलीच पाहिजे. चुलता एवढासा जरी चमकला तरी माझा पुढचा मार्ग ठरला."

असा हॅम्लेटचा आपल्या अनिश्चित वृत्तीचा खुलासा आहे. कदाचित गेले दोन महिने याच अनिश्चिततेने त्याच्या अंतःकरणाची विकल अवस्था केलेली आहे. त्या-मुळेच ऑफिलियाच्या चेहऱ्यांत अगदी खोलवर पाहण्याचा प्रयत्न करून तिच्यांतही अप्राणिकपणाचा एखादा अंश आढळतो का याची चिकित्सा त्याने केली असावी. खून खरोखरच झाला का ? अमुक व्यक्तीने तो केला का ? आईचा हात त्यामध्ये किती ? या प्रश्नांनी त्याला भंडावून सोडलें असेल. काव्यवृत्तीचा आणि पुस्तकी

वातावरणांत वावरणारा हा तरुण, जीवाला दुसरा जीव अशा प्रकारच्या सूडाच्या कल्पनेला जात्याच मनाने प्रतिकूल असणार. त्यांत हे संशय. आणखीही अडचणी त्याच्यापुढे होत्याच. त्यांतील मुख्य म्हणजे त्याच्या एकट्याशिवाय डेन्मार्कचें सारें राज्य जणू नव्या राजाच्या बाजूचेंच होतें. काळ मोठा घालमेलीचा होता. आणि त्यांत ठीकठाक करण्याची जबाबदारी, व्यवहाराची नीटशी ओळख नसलेल्या या तरुणावर येऊन पडली होती.

त्यामुळे एवढें जरी मान्य केलें की, सूडाचें कार्य पार पाडण्यांत त्याच्याकडून दिरंगाई होत आली होती, त्या बाबतींत त्याचा अजून निर्णय होत नव्हता, तरी अति विचारामुळे निर्णय करण्याचें टाळण्याचा त्याचा स्वभावच होता असा आरोप करण्यासारखें त्याच्या ठिकाणीं आतापर्यंत आपल्याला कांही आढळलेलें नाही हें स्पष्ट आहे. अशा स्थितींत त्याने सूड घेण्याचें लांबणीवर टाकावें याला आणखी निश्चित अशीं कांही कारणें आहेत का, हें त्याचें पुढचें चरित्र पाहून ठरवायला हवें. तसेंच राजा त्याच्या बाबतींत मुळींच गाफील नव्हता हीही गोष्ट लक्षांत घेऊन पुढचें नाटक पाहिलें पाहिजे.

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीला ऑफिलियाने राजवाड्याच्या सदरेंत हॅम्लेटच्या नजरेस पडावें अशी योजना सिद्ध होते. तिचें तेथें येऊन बसणें हें अनपेक्षित आहे या गोष्टीची जाणीव हें कारस्थान रचणारालाही आहे याची नोंद नाटककाराने मुद्दाम केली आहे. 'एकटी तूं येथे कशी' असें कोणाला वाटूं नये म्हणून तूं पुस्तक घऊन वाचीत बैस अशी सूचना पोलोनिअस तिला देतो. ही गोष्ट जशी या ठिकाणीं विशेष लक्षांत येते तशीच दुसरी एक गोष्ट म्हणजे झालेल्या सर्व दुष्कृत्यांचें मोठें ओझें राजाच्या विवेकबुद्धीला दडपण होऊन राहिलेलें आहे हेंही आपल्याला नाटककार स्पष्टपणें सूचित करतो.

'जगावें की मरावें' चा खरा अर्थ—

ऑफिलिया अशी एकटीच वाचीत बसलेली असतांना हॅम्लेट आपल्याच विचारांत गुंगत, फेऱ्या घालीत तेथें येतो. याच वेळीं मराठी वाचकांना सुपरिचित असलेलें "जगावें कीं मरावें, हा प्रश्न पडतो" हें त्याचें आत्मगत भाषण होतें. बहुतेकांनी अशी समजूत करून घेतलेली आहे की, आपल्यापुढे उभी झालेल्या विकट समस्येंतून सुटण्यासाठी आत्महत्या करावी असा विचार हॅम्लेटच्या मनांत जोरावला आहे आणि म्हणून आत्महत्या करावी की न करावी हा प्रश्न त्याने उपस्थित केला आहे. परंतु ही फार मोठी चूक आहे असें प्रस्तुत लेखकाला वाटतें. एक तर केवळ स्वतःला उद्देशून हें त्याचें भाषण नाहीं. स्वतःच्या निष्क्रियतेबद्दल यापूर्वी जेव्हा जेव्हा तो बोलला तेव्हा तेव्हा त्यानें स्वतःची अत्यंत तीव्र निर्भर्त्सना केलेली आढळते; तसें येथे नाहीं. आतांच्या त्याच्या बोलण्याचा कल, त्याच्या नेहमीच्या संवयीप्रमाणें, जीवनासंबंधीच्या सर्वसामान्य तत्त्वाच्या शोधनाचा आणि चिंतनाचा आहे. हें चिंतन

व्यक्तिगत, म्हणजे त्यानें स्वतः आत्महत्या करावी की न करावी अशा स्वरूपाचें तर नाहीच; पण सर्वसामान्यपणें मानवानें आत्महत्या करावी की नाहीं या स्वरूपाचेंही नाही. जीवनासंबंधी कांही एक खोल विचार करीत असतां एक विकट प्रश्न त्याच्यापुढें उभा राहिला होता; त्याचें उत्तर त्याला विचार करतां करतां सापडलें की, माणूस मरणाला भितो. आणि म्हणून, माणसापुढे जगावें की मरावें हा प्रश्न पडतो असा अस्फुट उद्गार, जणू कांही आपल्यापुढील प्रश्नाची उकल झाली रे झाली अशा जाणीवेने त्याच्या तोंडांतून बाहेर पडतो. अशा रीतीनें मरणाला माणूस भितो हें त्याच्या त्या चिंतनांतील अखेरचें फलित आहे; त्या चिंतनाची सुरुवात या विचारापासून झालेली नाही हें या भाषणाचा थोडा जरी सूक्ष्म विचार केला तरी ध्यानांत येण्यासारखें आहे.

कारण, त्याच्यापुढे मानवाच्या वागण्यांतील जो विकट प्रश्न उभा राहिला होता त्याचें विवेचन किती स्पष्टपणें, विस्ताराने याच भाषणांत तो करतो आहे. त्याच्यापुढचा खरा प्रश्न असा आहे की, मरून जाऊन सगळ्या दुःखांतून मुक्त होण्याचा सोपा मार्ग उपलब्ध असतांना मनुष्य तसें का करीत नाही? सगळें आयुष्य तो दुःखांत काढायला कां राजी होतो? निर्दय कालाचे कोरडे का ओढून घेतो? जुलुमी लोकांचे अन्याय किंवा गर्विष्ठ लोकांचा उद्दापणा कां सहन करतो? प्रेमभगामुळें मनाला होणाऱ्या अनंत वेदना, न्याय मिळण्याला लागणारा उशीर, अधिकाऱ्यांचें उद्दाम आचरण हें तो कां सहन करतो? वास्तविक मनुष्याच्या दृष्टीने अधिक उदात्त काय? दुष्ट दैवाचे कोरडे आणि बाण मुकाट्याने सहन करीत राहणें हें? का समोर उसळलेल्या क्षोभसागरा-विरुद्ध शस्त्र उचलून त्याच्याशीं सामना करून सगळे क्षोभ नाहीसे करणें हें? हा खरा प्रश्न आहे. हॅम्लेटच्या नैतिक मूल्यांचा विध्वंस दैवाने केला आहे. हें दैव outrageous आहे, म्हणजे अपमानकारक, अब्रूची धुळधाण करणारें आहे असें त्याचें स्पष्ट म्हणणें आहे. क्षोभकारणें नष्ट करावीं हेंच खरें श्रेष्ठत्व असा त्याचा खरा आशय आहे. मग माणूस तसें कां करीत नाही? तर या सामन्यामध्ये आपल्यालाच मरण येईल अशी माणसाला भीति वाटते. कां माणसाला ही भीति वाटावी? कारण मरणानंतर पुढे काय हें माहीत नाहीं; किंबहुना आगींतून सुटायची धडपड करावी आणि उलट फुफाट्यांत मात्र जाऊन पडावें अशी स्थिती व्हायची! वस्तुतः जीवनांतील डोळ्यापुढची आग कांही लहानसहान नाही. तरी मरणानंतर काय आहे हें माहीत नसल्यामुळे माणूस आहे तेंच सहन करायला प्रवृत्त होतो. माणसाच्या ठिकाणीं ही जी सार असार यांचा विचार करण्याची वृत्ति आहे त्याने माणूस भेकड बनतो आणि स्वभावतःच मनांत जे महान निश्चय उसळी मारून उभे राहतात ते त्यामुळे दुर्बळ होतात; आणि माणसाच्या ठिकाणीं कार्यहीनता येते.

स्वतःच्या भोवतालच्या आणि मनांतील संघर्षावरून सुचलेले हे हॅम्लेटचे विचार आहेत. अन्यायाच्या विरुद्ध सामना करायला माणूस कां उभा राहत नाहीं? डुक्कर-मुसंडी मारून आपले सत्प्रवृत्त निर्धार अमलांत आणायला तो का कचरतो? तर त्याला

मरणाची भीति वाटते. मरणानंतर काय होईल, आहे याहूनही अधिक अन्यायी आणि दुःखदायक अवस्थेंत तर जाऊन आपण पडणार नाही ना ही आशंका माणसाला भेडसावते. या भीतीने माणूस नेभळट बनतो असें जेव्हा हॅम्लेट तळमळून म्हणतो तेव्हा या नेभळटपणाचा निषेधच त्याला अभिप्रेत आहे, हाच ठसा आपल्या मनावर उमटतो. हा नेभळटपणा हें सामान्यत्वाचें लक्षण आहे. श्रेष्ठ असेल त्याने मरण आलें तरी वेहत्तर, पण दुःखाशीं, अन्यायाशीं सामनाच केला पाहिजे, हेंच त्याच्या या बोलण्याचें खरें मर्म वाटतें आणि हें मर्म मनांत बाळगून वागण्याचाच त्याचा निर्धार नसावा, आत्महत्या करून मोकळें व्हावें असा विचार तो करीत असावा, असें वाटण्याला त्याच्या या भाषणांत आधार सापडत नाही.

ऑफिलियाबद्दलची दारुण निराशा —

वरील प्रकारच्या विचारांत तो असतांना एकाएकी ऑफिलिया त्याच्या दृष्टीला पडते. त्याबरोबरचा त्याचा उद्गार मोठा सूचक आहे. "Soft you now. The fair Ophilia"; "हं, जरा वेताने. सुंदर ऑफिलिया"! यांत पुष्कळच ध्वनि दडलेले आहेत. बेताने म्हणतांना स्वच्छ सूचना अशी की, दुसरें कोणी तरी जवळपास आहे, तेव्हां आतां कसें वागायचें, आपलें वेडाचें सोंग पांघरायचें का, याबद्दलचा विचार केला पाहिजे. सुंदर ऑफिलिया! किती आश्चर्य, किती उद्वेग या उद्गारांत सामावलेला आहे. एकटीच ऑफिलिया आणि हातांत बायबल घेऊन वाचीत बसलेली! कोठे? तर राजदरबारच्या सदरेवर! ही काय तिची एकटीने बसण्याची जागा? आपलें घर सोडून ही येथे कशी! आणि ही काय प्रार्थनासूत्रें वाचीत बसण्याची वेळ आणि जागा? हॅम्लेटची बुद्धि इतकी तरल आहे की, यामध्ये त्याला कितीएक आशंका येऊन गेल्या असतील. ती स्वतःच्या बुद्धीने तेथे आलेली नसून त्यापाठीशीं कांही तरी कारस्थान आहे हें त्याने चांगलेंच अचूक हेरलें असलें पाहिजे.

आणि ही कल्पना दृढ करण्याला ऑफिलियाचा हा प्रश्न : "महाराज पुष्कळ दिवस झाले, आपली प्रकृति ठीक आहे ना?" या प्रश्नांतही ऑफिलियाचा सरळपणा मुळीच नाही. गेले कांही आठवडे ऑफिलियाने त्याचीं पत्रें स्वीकारलेलीं नाहीत, त्याची भेट घेतलेली नाही. दुसऱ्या अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत हॅम्लेट तिच्या अंतर्गृहांत शिरून विचित्रपणाने वागला, त्यामुळे दुःखित झालेली ऑफिलिया आपण पाहिली. तिच्यावरील प्रेम हेंच हॅम्लेटच्या वेडाचें कारण असें लगेच ठरवून पोलोनिअस तडक राजाकडे जातो; तेथे हॅम्लेटचे हेर-मित्र असतात. त्याच बैठकींत ऑफिलिया राज-भवनांतील सदरेवर एकटी हॅम्लेटला दिसावी ही योजना मुक्रर होते. त्याच ठिकाणीं लगेच हॅम्लेट, पोलोनिअस, दोघे हेर-मित्र, गिल्डरस्टर्न आणि रोझेक्रान्टझ, वगैरेंची एकत्र गाठ पडते, नटसंघ येतो व नाटक करण्याचा विचार पक्का होतो. हें ज्या दिवशीं झालें त्याच्या दुसऱ्या दिवशींच तें नाटक होतें. त्या नाटकाच्या दिवसाचीच ही हॅम्लेटची

ऑफिलियाशीं झालेली भेट आहे. म्हणजे आदल्याच दिवशीं तो तिच्याकडे जाऊन आलेला होता. त्या गोष्टीला पुरें चोवीस तासही लोटले नव्हते. त्या वेळीं ऑफिलिया अवाक्षर बोलली नव्हती, भेदरून गेली होती. आणि तीच मुलगी आज अशी येथे येऊन पुस्तक वाचीत बसते आणि विचारते, अलीकडे पुष्कळ दिवस आपली प्रकृति कशी आहे? याचा अर्थ आधीच स्त्रीजातीविषयी अत्यंत संशयी बनलेल्या हॅम्लेटने वावगा करावा यांत अस्वाभाविक असें कांहीच नाही.

तशांतच लगेच ऑफिलिया त्याचीं पूर्वीचीं पत्रें आणि भेटी त्याला परत करूं पाहते आणि आवेगाने म्हणते, "हें सगळें परंत घ्या; कारण देणाराचें मन दयाहीन झाल्यावर त्याने दिलेल्या स्वर्गाच्या मोलाच्या वस्तूही घेणाराला कवडीमोलाच्या वाटतात."

हें बोलतांनाचा ऑफिलियाचा आवाज आणि प्रकृतीची चौकशी करतांवेळचा तिचा आवाज यांत फरक आहे. पहिलें विचारणें बापाच्या आदेशानुसारचें; दुसरा विचार हा अंतरीच्या उमाळ्याचा; हा फरक हॅम्लेटच्या नजरेंतून सुटणें अशक्य. आणि म्हणूनच त्याने तिला प्रश्न केला, "तूं सच्ची आहेस का?" कारण ती सुंदर आहे हें त्याला चांगलें दिसत होतें; सुंदरपणा आणि सच्चेपणा हातांत हात घालून राहत नाहीत हा त्याला कटु अनुभव आला होता. तिचें तेथे आकस्मिक येणें आणि कृत्रिम बोलणें यामुळे तो कटु ठसा दृढ झाला होता; तोच त्याच्या कानावर तिचा दुःखावेगाचा स्वर पडतो आणि त्याच्या मनांत शंका डोकावते की ही स्त्री अपवादभूत – सच्ची असेल का? हीच शंका थोडी दुणावते – जेव्हां ऑफिलिया हॅम्लेटला दुःखावेगाने बजावते, "प्रेम नसून प्रेम आहे असें मला भासविण्यांत तुम्हीं माझी दुप्पट – अनेकपट फसवणुक केलीत" त्या वेळीं. म्हणूनच हॅम्लेट पुरुष जातीला दोष देऊन, "तुझें सच्चेपण टिकावें यासाठीं तूं मठवासिनी हो" असें तळमळून तिला सांगतो.

परंतु जणू पैडताळा पाहावा म्हणूनच की काय तो एकदम तिला विचारतो.

"तुझे वडील कुठे आहेत?"

"ते घरीं आहेत, महाराज." हें ऑफिलियाचें उत्तर ऐकून, त्याआधी थोडा वेळ तिच्या चांगुलपणाबद्दल वाटलेली हॅम्लेटची अपेक्षा एकदम कोसळून पडते; त्याची वृत्ति कठोर होते. म्हणूनच तो म्हणतो, "तर मग त्याला नीट घरांतच कोंडून ठेव; म्हणजे आपलें घर सोडून इतर ठिकाणीं आपले मूर्खपणाचे चाळे त्याला करतां येणार नाहीत." आणि एवढेंच बोलून तो थांबत नाही, तर 'जातों मी' म्हणून तिचा निरोपही घेतो.

एकंदर झाल्या घटनांवरून हॅम्लेटला दाट संशय आला असला पाहिजे की, पोलोनिअस तेथेच कोठे तरी दडून राहिलेला असला पाहिजे; आणि ऑफिलिया तर चक्क खोटें बोलते. ती कांही निर्ढावलेली खोटें बोलणारी नाही. तेव्हा तिच्या आवाजांत कंप येणार, चेहऱ्यावर भीति दिसणार आणि अगदी ओझरती का होईना पण नजर निमिषमात्र तरी तिकडे पडल्यामागे पोलोनिअस व राजा बसले होते तिकडे वळल्या-सारखी होणार. हें सगळें हॅम्लेटसारख्या रंगभूमीच्या चतुर जाणत्याच्या व नटाच्या

लक्षांत आल्याबाचून राहणार नाही. या प्रसंगाचा हॅम्लेटच्या संस्कारसुलभ मनावर केवढा मोठा परिणाम झाला असेल. थोडीशी जरी आशा रेंगाळत राहिली असेल त्याच्या मनांत की, आपण निवडलेली ही तरुणी तरी सर्वसामान्य स्त्रियांच्या मायावी-पणापासून दूर असेल, तर ती त्याची आशा या ठिकाणीं समूळ नाहीशी झाली असणार. म्हणून मग तो तिला अगदी तोडून बोलतो – कोणा मूर्खाशीं लग्न कर, नाहीतर मठांत जा; ताबडतोब जा. एवढेंच म्हणून तो थांबत नाही. तर स्त्रिया तोंडें रंगवून जगाला फसवितात असें म्हणून त्यांच्यांतच तिची तो गणना करतो. " बस्स झालें हें सर्व आतां; याने माझें डोकें फिरलें आहे " असें म्हणून यापुढे लग्नेंच होतां कामा नयेत अशी आपली मनीषा व्यक्त करतो. इतका निराशेने तो बेफाम झाला आहे. " झालीं आहेत तीं लग्नें कांही मोडायचीं नाहीत; पण एक खेरीज करून. " स्वतःच्या निश्चयाची व सूडाच्या भावनेची एवढी जाणीव त्याला आहे. पण खरोखरच त्याला वेड लागावें इतकी ही प्रेमभंगाची अवस्था त्याला जाळणारी झाली आहे. अर्थात यांत ऑफिलिया-पेक्षा तोच जास्त दोषी आहे. त्याचा उतावीळपणा या सगळ्याला कारण आहे. त्याने ऑफिलियाशीं जास्त समजुतीने घेतलें असतें, होरेशिओला विश्वासांत घेतलें तसें तिलाही विश्वासांत घेतलें असतें तर ही त्याची निराशा होण्याचें टळलें असतें; असें म्हणतां येण्यासारखें आहे.

हा दोष, आतांपर्यंत आपण हॅम्लेटचें जें चारित्र्य पाहिलें त्यामध्ये त्याला चिकटतो खरा. परंतु ऑफिलियाचाही यामध्ये कांही कमी दोष नाही असें प्रस्तुत प्रसंगावरून वाटूं लागतें. कारण बाप जें जें कांही सांगतो तें प्रेमाच्या विषयांतही तिने निमूटपणें ऐकावें हें एक तिच्या वृत्तींतील उणेंपणाचेंच लक्षण आहे. बाप सांगतो हॅम्लेटशीं भेटूं नको, बोलूं नको; ती भेटत नाही, बोलत नाही. आतुरतेने तो तिची भेट घेतो, तर तिचा विश्वास त्याला वाटावा असें प्रोत्साहन तिच्याकडून हॅम्लेटला बिलकुल मिळत नाहीं. उलट या पुढच्या प्रसंगांतील तिचें वर्तन जास्तच दोषास्पद आहे. ज्याच्यावर तिचें प्रेम आहे अशा माणसाशीं कपटकारस्थान खेळायला बाप सांगतो आणि ती ऐकते, नव्हे हातांत प्रार्थनापुस्तक घेऊन वाचण्याचें खोटें नाटकही ती केवळ बापाने सांगितलें म्हणून करते. हें सर्व नाटक आहे हें पोलोनिअसने तर तिला उघडच सांगितलें आहे. मग हा खोटेपणा, हें ढोंग करण्याला तिने कां कबूल व्हावें ? यावरून जर कोणी, विशेषतः हॅम्लेटसारख्या ताणलेल्या मनाच्या माणसाने, तीही पोलोनिअसच्याच प्रवृत्तीची, कारस्थानी, असत्यभाषणी, लुब्री आणि सरळ मनाच्या माणसाशीं खेळ खेळणारी आहे असा निष्कर्ष मनाशीं बांधला तर त्याबद्दलची जबाब-दारी तिच्या या वर्तनावरच अधिक येते. हॅम्लेटसारख्या जाणत्या तत्त्वज्ञानी माणसाने याहून अधिक धीराने वागलें पाहिजे होतें असें आपणाला त्याच्याबद्दलच्या आपुलकीने वाटतें; परंतु ऑफिलिया पोलोनिअसच्या कारस्थानांत सामील झालेली पाहिल्यानंतर, हॅम्लेटने तिच्यावर अन्याय केला असें कांही आपणांला म्हणवत नाही. सर लॉरेन्स

ऑलिव्हिअेने तर आपल्या चित्रपटांत हॅम्लेटने पोलोनिअसला लपून बसल्याचें प्रत्यक्ष पाहिलें होतें असें दाखविलें आहे. मूळ नाटकांत तसें ध्वनित नाही; अभिनयांतून हॅम्लेट तें ओळखतो असें तेथें दाखविलें आहे. कोणतीही योजना स्वीकारली तरी "वडील घरींच आहेत" हा धादांत खोटा जबाब, स्त्रियांच्या असत्याचरणाविषयी आधीच दुर्ग्रहाने पछाडलेल्या हॅम्लेटच्या उमद्या मनाला दारुण वेदना देणारा ठरावा यांत आश्चर्य कांहीच नव्हे.

हॅम्लेट तिरस्काराने निघून गेल्यावर ऑफिलियाचे जे दुःखोद्गार आपण ऐकतों त्यामध्ये अगदी पहिल्याप्रथम नाटककाराने हॅम्लेटच्या श्रेष्ठत्वाबद्दल श्रोत्यांना पुष्कळसें सांगितलेलें आढळतें. त्याचें अंतःकरण अत्युदार होतें, दरबारी माणसाच्या नजरेचा धाक त्याच्या नजरेंत होता; शिपाईगिरींत तो उत्तम खड्गधारी होता; विद्वत्तेची चमक त्याच्या वाणींत होती; राज्याच्या भावी उत्कर्षाचें तो जणू उमलूं लागलेलें सुंदर गुलाबाचें फूल होता; सगळ्या निरीक्षणकुशलांच्या नजरा त्याच्यावर जणू खिळलेल्या होत्या; पाहणाऱ्यांच्या पाहण्याचा विषय तो होता; त्याची बुद्धि श्रेष्ठ आणि अतिशय प्रभावी होती; असा अभिप्राय शेक्स्पीअरने ऑफिलियाच्या तोंडून वदविला आहे.

गुणसंपदेचें कथन मात्र; प्रत्यक्ष आविष्कार नाही—

येथें मुद्याचा प्रश्न असा आहे की, जी ही सगळी गुणसंपत्ति ऑफिलिया हॅम्लेटच्या ठिकाणीं पाहत होती तिचा प्रत्यक्ष आविष्कार शेक्सपीअरने आतांपर्यंत किंवा पुढेही या नाटकांत कोणत्या एका किंवा अनेक प्रसंगांनी दाखविला आहे काय? त्याच्या वाणींतील विद्वत्तेची चमक कांहीशी आपण पाहिली. (तरवारीच्या संबंधांतील त्याचें कौशल्य ओझरतें शेवटच्या अंकांत आपण पाहणार आहोंत.) परंतु बाकीच्या त्याच्या कोणत्याही गुणांचें प्रत्यक्ष दर्शन शेक्सपीअरने घडविलेलें नाही.

असें दर्शन या नाटकांत घडविणें सर्वथा अशक्यच आहे. जुन्या काळचीं नाटकें झालीं तरी तीं पांचसहा तासांहून कांही जास्त वेळ रंगभूमीवर होऊं शकत नव्हतीं. एवढ्या अवधींत रंगभूमीवर जेवढें कांही दाखवितां येईल तेवढ्यांत, लोकांच्या भावी आकांक्षा हॅम्लेटवर कशा खिळल्या होत्या, पाहणारे पाहण्याजोगा असा फक्त तोच हें कसें मानीत होते, त्याची बुद्धि प्रभावी आणि श्रेष्ठ कशी होती या गोष्टी, किंवा त्याची दरबारी नजर, त्याचें उदार अंतःकरण यांचें प्रत्यक्ष दर्शन शेक्स्पीअरनें करावयाचें म्हटलें असतें तर बहुतेक सर्व नाटक यांतच खलास झालें असतें. आणि नाटकाचें मुख्य उद्दिष्ट जें की, हॅम्लेटसारख्या, ज्याच्याविषयी आपल्याला अत्यंत सहानुभूति वाटते अशा व्यक्तीच्या जीवनांत, पुष्कळ अंशीं बाह्य परिस्थितीमुळे आणि कांही अंशीं त्याच्या स्वभावांतील उणीवांमुळे सगळाच करुणा उत्पन्न करणारा घोटाळा माजून शेवटीं त्यांतच त्याचा कसा अंत झाला, हें दाखवावयाचें, तें दाखविण्याला शेक्सपीअरला

सवड जवळ जवळ मुळीच मिळाली नसती. नाटकाचें उद्दिष्ट जेव्हा नायकाचें श्रेष्ठ व्यक्तिमत्व प्रस्थापित करण्याचें नाही त्या वेळीं त्या श्रेष्ठत्वाचें दर्शन करविण्यासाठी नाटककार आपला बहुमोल अल्प वेळ खर्च करूं लागला तर तें नाटकाच्या यशाला बाधक होईल. आपल्या मर्यादित वेळांत आणि साधनांतही नाटकाचें जें मुख्य उद्दिष्ट त्यावरच त्याला आपलें लक्ष केंद्रित करणें अपरिहार्य आहे; आणि तेंच शेक्सपीअरने केल्याचें आपण पाहतों.

अर्थात असें करतांना हॅम्लेटचे गुणही जातां जातां पुष्कळ ठिकाणीं तो दिग्दर्शित मात्र करतो. त्यांचें संपूर्ण प्रत्यक्ष दर्शन घडविण्याची खटपट मुळीच करीत नाही. आपण ध्वनित करून सांगितलेली पार्श्वभूमि ही मान्य करून श्रोते आपल्यापुढचें नाटक ऐकतील—पाहतील असाच त्याचा विश्वास दिसतो.

प्रश्न असा केला जातो की, नाटककाराने नायकाच्या मोठेपणाचें दर्शन जर करविलें नाही तर आम्हां वाचकप्रेक्षकांना नायकाविषयी आदर व अनुकंपा कशी वाटावी? आणि अशी भावना जर निर्माण झाली नाही तर मग करुणा कशी उत्पन्न व्हावी?

त्यावर उलट प्रश्न असा कीं, असें श्रेष्ठत्वाचें कांही दर्शन घडविलें नसतांही हॅम्लेटबद्दल आपल्याला जिव्हाळा वाटतो की नाही? त्याच्यावरच आपलें लक्ष केंद्रित होतें की नाही? त्याच्या सुखदुःखाबद्दल आपलें चित्त आतुर असतें की नाही? आणि जर असेल तर तसें तें शेक्सपीअरनें कोणत्या साधनांनी बनविलें आहे?

श्रेष्ठ नाटककाराची किमया—

ही एक श्रेष्ठ नाटककाराची किमया आहे. मानवी स्वभावांवर श्रेष्ठ कलावंताची दृढ श्रद्धा आणि पकड असते. याचाच अनुभव आपल्याला हॅम्लेटं नाटकांत येतो. हॅम्लेटबद्दल आपणाला आधी जवळजवळ कांही न सांगतां दरबारांत शेक्सपीअरने आपल्याला त्याचें दर्शन घडविलें, त्याही प्रसंगीं प्रथम कितीतरी वेळ त्याने हा हॅम्लेट असें सुद्धा आपल्याला सांगितलें नाही. पण दरबारांतील सर्व सोहाळे आणि कारभार चालू असतांना त्या सगळ्यांपासून अलिप्त आणि उद्विग्न असा एकीकडे बसलेला तो, अर्थातच मोठा उमदा दिसणारा तरुण पाहून आपलें मन अगदी सहज त्याच्याकडे वेधतें. सामान्यापेक्षा कांही तरी निराळें असें जेथे कांही दिसेल तिकडे दृष्टि माणसाची लागावी हा माणसाचा स्वभावधर्म आहे. त्याचाच फायदा शेक्सपीअरने या ठिकाणीं घेतला आहे. त्यानंतर आईशीं आणि राजाशीं होणारीं त्याचीं चतुर भाषणें त्याच्याबद्दल आपल्या मनांत अधिकच जिज्ञासा आणि आकर्षण उत्पन्न करतात. आणि लगेचच त्याच्या मनाची व्यथा आपल्याला कळून येते. त्याचें अंतःकरण जणू तुटत आहे; आपल्या आईने—अजून तिचें वय वाचकांना—प्रेक्षकांना माहीत नाही—आपल्या बापाच्या मृत्यूनंतर थोडेही दिवस वाट न पाहतां आपल्या चुलत्याशीं लग्न करावें ही गोष्ट घडूं कशी शकते हेंच त्याला समजूं शकत नाही. —बापाच्या प्रेतयात्रेच्या वेळचे

अश्रू अजून ताजे आहेत तोच तिने पुन्हा लग्न करावें, पशूइतकाही संयम दाखवूं नये या गोष्टीने तो वेफाम झाला आहे; साऱ्या स्त्रीजातीबद्दल त्याला घृणा वाटूं लागली आहे; हें पाहतांच त्याच्याकडे आपण अधिकच आकृष्ट होतो. कोणाच्याही दुःखाबद्दल अनुकंपा वाटणें हाही माणसाचाच एक स्वभावधर्म आहे. हा तरुण दुःखी आहे, त्याच्या दुःखाला चांगलें प्रबळ कारण आहे, त्या दुःखामुळे त्याला आपला जीवही नकोसा झाला आहे, एवढी परिस्थिति त्याच्या आपल्यामध्ये जवळीक उत्पन्न करण्याला अगदी पुरेशी होते. त्या वेळीं तो विद्वान आहे का ? शूर आहे का ! दरबारी चतुर आहे का ? उदार हृदयाचा आहे का ? असले प्रश्न आपल्या मनांतसुद्धा येत नाहीत.

थोड्याच वेळाने आपण पाहतो की, त्याचें जिच्यावर प्रेम आहे अशा एका निष्पाप मुलीचें मन त्याच्याविषयी विनाकारण कलुषित करण्यांत येतें. त्याही प्रसंगीं यामुळे त्या बिचाऱ्याची किती केविलवाणी – दयनीय – परिस्थिति होईल या भीतीने आपलें हृदय कंपित होतें. असा हा ठसा पुसटसा मनांत उमटतो आहे न आहे तोच भुताच्या भेटीचा प्रसंग आपण पाहतों आणि हॅम्लेटच्या बापावर आणि खुद्द हॅम्लेटवर केवढा भयंकर अन्याय झाला आहे याचें प्रत्यंतर आपल्याला मिळतें. ज्याच्यावर अन्याय झालासें वाटेल त्याचे पक्षपाती व्हावयाचें हा आणखी एक माणसाचा स्वभावधर्म आहे. त्यामुळे आपण हॅम्लेटच्या अधिक जवळ जातों.

अशा अवस्थेंत असतांना, सुमारे दोन महिन्यानंतर हॅम्लेट ऑफलियाच्या अंतर्गृहांत जातो आणि तेथे त्याचें जें विचित्र वर्तन होतें त्याचें हृदयविदारक वर्णन आफिलिया करते तेव्हा आपलें हृदय विरघळून जातें आणि आपल्यांत व हॅम्लेटमध्ये दुजाभावच शिल्लक राहत नाही. एवढें पुरें नव्हतें म्हणूनच की काय, ऑफिलिया दरबारच्या सदरेवर एकटीच हॅम्लेटच्या नजरेस पडावी हा कट आपल्यापुढे येतो आणि त्या प्रसंगीं स्त्रीस्वभावाच्या — निदानपक्षीं ऑफिलियाच्या तरी — चांगुलपणाविषयी राहिला साहिला हॅम्लेटचा विश्वास पार उडून जातो.

श्रेष्ठ नसतांही हॅम्लेटचे आम्ही पक्षपाती—

ॲरिस्टॉटल कांही म्हणो, त्याचे अनुयायी कांही म्हणोत किंवा एकच प्याल्यांतील सुधाकराची टिंगल उडवायला निघालेले प्रा. वाळिंबे हर्फर्डचा केवढाही मोठा आधार देवोत, आतापर्यंत शेक्सपीअरने तरी आपल्याला हॅम्लेटच्या अत्युदार श्रेष्ठत्वाचें कसलेंही गमक सांगितलेलें नाही, दाखविलेलें नाही. दाखविलें आहे तें एवढेंच की, तो एक उमदा दिसणारा, निर्भय, तत्क्षणीं निर्णय करणारा असा तरुण आहे, त्याचें हृदय व्यथित आहे, त्याच्यावर आणि मानवी चांगुलपणावर झालेल्या अन्यायाने तो जळतो आहे; तरीही भोवतालची परिस्थिति इतकी विरोधी आहे की, या अन्यायाबद्दल तोंडांतून ब्र काढणें सुद्धा त्याला शक्य नाही; आणि त्याचा कांही दोष नसतांना कांही फाजील शहाण्या माणसांच्या दीर्घसूत्रीपणाने त्याचा दारुण प्रेमभंग होत आहे. एका साध्या,

तुमच्या आमच्यासारख्या तरुण माणसावर आलेल्या या सर्व प्रसंगांत आपली सर्व सहानुभूति त्याच्याकडे स्वाभाविकच वळते; आपण त्याचे पक्षपाती बनतो.

अशी पक्षपाती वृत्ति झाल्यावर आतां त्याच्याबद्दल कोणी जें काय सांगेल त्याच्यावर श्रद्धा ठेवायला आम्ही तयार होतों. ऑफिलियाने त्याचें केवढें मोठें उदात्त वर्णन केलें; तें सारें आम्ही खरें मानतों. त्यासाठीं त्याचे ते ते गुण व्यक्त करणारे प्रत्यक्ष प्रसंग नाटककाराने रंगभूमीवर दाखवावयास हवे होते असें एक क्षणभरही आपणाला वाटत नाही, फार कशाला, आमची सहानुभूति अधिक घन व्हावी यासाठी आम्ही त्याच्याबद्दल शेक्सपीअरने न सांगितलेल्याही गोष्टी खऱ्या मानतों आणि सांगितलेल्या गोष्टीही डोळ्याआड करतों. "पूर्ण विकसित यौवन" असे ऑफिलियाचे शब्द आहेत. पुढे स्मशानांतल्या देखाव्यांत शेक्सपीअर स्वतः हॅम्लेटच्या वयाचा निर्देश करतो. तरीही आम्ही — नव्हे, गेल्या कितीएक पिढ्या आणि कितीएक रसिक आणि विद्वान लोकही – हॅम्लेट १८।२० वर्षें वयाचा अगदी कोवळा तरुण होता या आमच्या मनाला रोचक वाटणाऱ्या भावनेलाच चिकटून राहण्याची धडपड करतों. कारण, हॅम्लेटचें वय जितकें कोवळें तितकी त्याच्या विरोधी असणाऱ्या परिस्थितीची दारुणता अधिक आणि तितक्याच त्याच्या स्वभावगत उणीवा कमी दोषास्पद. इतके आम्ही हॅम्लेटचे पक्षपाती होतों ते दुःखित आणि अन्यायाखालीं दडपलेल्या व्यक्तीविषयी माणसाच्या ठिकाणीं जी स्वाभाविक सहानुभूति निर्माण होते तिच्यामुळें; कोणा एका श्रेष्ठ पुरुषावर कांही दुःखद प्रसंग ओढवले हें पाहून खास नव्हे.

हॅम्लेटचा चुलता क्लॉडिअस हा कांही बोळ्याने दूध पिणारा माणूस नाही. चांगला चतुर राजकारणी आहे तो. त्याचें पापी मन त्याला खात आहे. त्यामुळे हॅम्लेटच्या अलीकडच्या वर्तनावर त्याची सक्त नजर आहे. त्याच्या त्या वेडसर वागणुकीचें रहस्य शोधून काढण्याचे त्याचे सर्व प्रयत्न चालू आहेत. ऑफिलियाच्या बाबतींत निराशा झाल्यामुळे हॅम्लेटच्या वर्तनांत बदल झाला हें वस्तुतः त्याला मुळीच मान्य नाही. एक केवळ प्रयोग म्हणून, हॅम्लेटची ऑफिलियाशीं अशी गाठ पडावी या पोलोनिअसच्या बेताला राजाने मान्यता दिली. तो प्रसंग पडद्याआडून पाहणारांत राजा होताच. हॅम्लेट यापुढे मुळी लग्नेंच होऊं देतां उपयोगी नाही एवढेंच म्हणून थांबला नाही; तर तो पुढे म्हणाला, "सध्या ज्यांचीं लग्नें झालीं आहेत त्यांना जगूं द्या; फक्त एक जोडपें सोडून." याचा अर्थ राजाच्या पापी अंतःकरणाला खोल डसला असला पाहिजे. स्वतःवरच हा रोख आहे हें त्याने अर्थात ओळखलें. म्हणूनच राजा सद्-रेवर येतांच आवेशाने म्हणतो, "प्रेम? छट्, त्याची वृत्ति प्रेमाकडे मुळीच नाही. आणि तो जें बोलला त्यांत वेडेपणाचें असेंही कांही नाही. त्याच्या अंतःकरणांत खोल कांही तरी असें आहे की, ज्यामुळे सारखें चिंताग्रस्त असें त्याचें मन झालें आहे." हॅम्लेटचीं स्त्रियांबद्दलचीं विधानें, एका दंपतीला मात्र दंपती म्हणून राहूं न देण्याचा मनोदय, या सगळ्याचा अर्थ राजाने स्पष्ट ओळखला व तत्क्षणी निर्णय केला की

हॅम्लेटला आता डेन्मार्कच्या राज्यांत राहूं द्यावयाचें नाही; त्याला इंग्लंडला पाठवावयाचें. त्याआधी रात्रीं, नाटकानंतर, एकवार हॅम्लेटला त्याच्या मनोव्यथेबद्दल त्याच्या आईकडून विचारवावें ही पोलोनिअसची सूचना नाखुषीनेच राजाने मान्य केली. कारण अशा मोठ्या लोकांच्या वेडेपणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हें त्याने चांगलेंच ओळखलें होतें. यांत एक गोष्ट आणखी लक्षांत घ्यावयाची की, राजा कांही आपल्याकडून बेसावध नव्हता. हॅम्लेटच्या सर्व हालचालींवर त्याचें पूर्ण लक्ष होतें. आणि त्यामुळे कोणतीही गोष्ट स्वतःच्या मनाप्रमाणे करायला हॅम्लेटला जमीन कांही अगदीच भुसभुशीत नव्हती.

नाटक अर्धे होत आल्यावर आतां हॅम्लेटबद्दल अधिकाधिक माहिती आम्हांला देण्याची लहर नाटककाराला आलेली दिसते. नटसंघाच्या प्रमुखाशीं हॅम्लेटचें जें संभाषण होतें त्यामधून हॅम्लेट नाट्यविषयाचा केवढा दर्दी व रसिक होता, त्याची दृष्टि किती सूक्ष्म होती हें दिसून येतें. ललितकलांचा दर्दी आणि व्यासंगी असा हा तरुण स्वाभाविकच संसारांतील व्यावहारिक सुखदुःखांपासून अलिप्त राहूं इच्छिणारा आहे हीही गोष्ट लगेच त्याचें जें होरेशिओशीं भाषण होतें त्यांत शेक्सपीअरनें व्यक्त केली आहे. होरेशिओचें वर्णन त्याने जणूं स्थितप्रज्ञ असें केलें आहे. आणि अशा माणसाबद्दल स्वतःला केवढा आदर वाटतो हें तो भावभरानें सांगतो आहे. कारण, स्वतः आपण विकाराचे केवढे गुलाम झालों आहोंत याची अत्यंत विदारक जाणीव सद्यःपरिस्थितींत त्याच्या मनाला टोचून राचलेली आहे; जें नको तें त्याच्या वाट्याला आलेलें आहे.

यापुढच्या नाटकांतील नाटकाच्या प्रवेशांत हॅम्लेट आईच्याजवळ बसण्याचें नाकारतो हें सहज आहे. त्याला आपण या नाटकांत विशेष रस घेतों आहे हें दाखवावयाचें नाही; तसेंच राजा आणि राणी यांच्यापासून दूर राहून त्यांचें निरीक्षण करावयाचें आहे परंतु असें निरीक्षण आपण करीत आहोंत याचा तसा संशयही त्या दोघांना येऊं द्यावयाचा नाही. म्हणूनच तो मुद्दाम, "या इथे जास्त आकर्षक माल आहे" असा फाजीलपणा करून ऑफिलियाच्या पायांशीं टेकून खाली बसतो व तसाच फाजीलपणाने तिच्याशीं बोलत राहतो. "आम्ही पुरुष महाबिलंदर ठक असतों" असें कांही वेळापूर्वी तो ऑफिलियाला म्हणाला होता, त्याचें जणूं प्रत्यंतरच त्याला द्यायचें होतें. पोलोनिअसचा संशय की हें प्रेमवेडाचेंच प्रकरण आहे. हा संशय दृढ करून त्याची नजरही आपल्याकडे हॅम्लेटला लागूं द्यायची नव्हती; आणि शक्य तर राजाराणींनाही आपलें विस्मरण होऊं द्यायचें होतें. म्हणून जणू ऑफिलियाशीं बोलण्यांत आपण गुंगलों आहोंत असा भास उत्पन्न करावयाची त्याची खटपट होती.

नाटकांतील नाटकाचा प्रयोग —

उपनाटकांतील कांही कांही वाक्यें राजाच्या अंतःकरणाचा खोल भेद करणारीं होतीं.

नाटकांतील राणी आपण दुसरें लग्न करणार नाही असा निश्चय व्यक्त करीत असतांना जेव्हा म्हणते की, "जी पहिल्या नवऱ्याचा खून करते तीच फक्त दुसरा नवरा करते," त्या वेळीं उभयता राजाराणींच्या अंतःकरणाची केवढी कालवाकालव झाली असली पाहिजे. "ही बाई वाजवीपेक्षा फाजील अभिवचनें तर देत नाही?" असा उद्गार राणीच्या तोंडून बाहेर पडतो. राजाही अस्वस्थपणें विचारतो, "नाटकाचें नांव काय या?" त्यावर उत्तर देतांना हॅम्लेट जेव्हा म्हणतो, "सगळा पाजीपणा आहे हा; पण आपल्याला काय त्याचें? आपलीं सर्वांचीं अंतःकरणें साफ आहेत; कर नाही तेव्हा आपल्याला डर कशाला?" आणि राजाकडे क्षणभर निरखून पाहतो त्या वेळीं राजाच्या चेहऱ्यावरून हॅम्लेटला सर्व कांही निश्चित समजून चुकतें. नाटकांतील राजाच्या कानांत विष घातलेलें पाहतांक्षणीं तर क्लॉडिअसचा स्वतःवरचा ताबा सुटतो आणि तो ताडकन उठून नाट्यगृह सोडून निघून जातो.

हॅम्लेटला आतां कसलीही शंका राहत नाही. भुताचें सांगणें लाख किंमतीचें आहे असें त्याला वाटतें. तसें तो होरेशिओला सांगत आहे तोच राजाचे हेर–त्याचे सहाध्यायी त्याच्या आईचा निरोप घेऊन येतात. त्या दोघांना आपल्या अंतःकरणाचा थांगपत्तासुद्धा लागूं न देण्यासाठी हॅम्लेट त्यांच्याशीं अत्यंत चतुराईचीं भाषणें करतो. त्यापैकी एकाने आपल्याला बांसरी वाजवितां येत नाही असें म्हणतांच 'साध्या बांसरींतून हवे ते आवाज काढतां येत नाहीत, आणि तरी तुम्ही माझ्या तोंडून हवे ते सूर वदविण्याची हाव धरतां" असें म्हणून तो त्यांना फजीत करतो व त्या दोघांचा हेतु आपण ओळखला आहे हेंही स्पष्ट करतो.

हॅम्लेटची आईबद्दलची नाजूक भावना —

याच प्रवेशांत हॅम्लेटचें आपल्या आईवर केवढें प्रेम होतें हेंही दिसून येतें. "हॅम्लेटने आपल्याला अंतर्गृहांत भेटावें" ही तिची आज्ञा समजल्यानंतर हॅम्लेट म्हणतो, "आम्ही आईची आज्ञा अवश्य पाळूं. आज ती आहे त्याच्या दसपट ती तशी असती तरीही आम्ही तिची आज्ञा पाळूं." तसेंच होरेशिओसकट सर्व मंडळी निघून गेल्यावर शेवटीं आत्मगत भाषणांतही त्याची ही भावना उघड होते. "अंधाऱ्या सैतानी रात्रीचा समय आहे; अशाच वेळीं भुतें कबरींतून बाहेर पडतात; अशा वेळीं ताजें ताजें मानवी रक्त सुद्धां मी पिईन आणि दिवसाच्या उजेडांत पाहिल्यावर ज्यांच्यामुळे पाहणाराचा थरकांप उडेल अशीं घोर कृत्यें या रात्रीं मी करूं शकेन" अशी आपल्या मनाची अवस्था सांगत असतांनाच त्याला आठवण होऊन तो म्हणतो,

"हो, पण मला आतां आईकडे जायचें आहे. मना, तुझा स्वभावधर्म तूं सुटूं देऊं नको. माझें अंतःकरण दृढ राहूं दे. मी अगदी क्रूरपणाने वागेन. पण अस्वाभाविक (मातृभक्तीशीं विसंगत) असें माझ्याकडून कांही घडतां कामा नये. खूप तीक्ष्ण–जणू हृदयांत खंजीर खुपसले जात आहेत इतकें तीक्ष्ण–मी तिला बोलेन. पण प्रत्यक्ष

खंजीर वापरणार नाही. माझें मन आणि माझे शब्द यांनी हें सगळें सोंग पार पाडलें पाहिजे; पण तशी प्रत्यक्ष कृति घडतां कामा नये. मना, एवढी साथ तूं मला दे."

वाटेल तें घोर कृत्य करायला तयार होणारा हा तरुण आईचा विचार मनांत येतांच त्यापासून दूर होतो. आई दसपट वाईट असली तरी तिचें ऐकूं म्हणतो; यांत आई-वरच्या त्याच्या उत्कट प्रेमाची साक्ष आहे. इतकें उत्कट प्रेम जिच्यावर त्याचें होतें तिनेच असा अनाचार करावा याबद्दल, म्हणूनच त्याच्या मनाला एवढी खंत लागून राहिलेली आहे.

हॅम्लेटचा सामना राजासह सर्व दरबाराशीं होता —

राजाने हॅम्लेटला आईकडे जाण्याला नाखुषीनेंच सवड दिली होती हें आपण पाहिलेंच. परंतु राजा स्वस्थ मात्र बसला नाही. हॅम्लेटच्या टेहळणीवर ठेवलेले त्याचे दोघे सहाध्यायी यांना विश्वासांत घेऊन हॅम्लेटला नुसतें इंग्लंडला पाठविण्याचाच नव्हे तर तेथे त्याचा कांटा कायमचा नाहीसा करण्याचा कट राजाने आखला. या प्रवेशाचें दुसरें एक महत्त्व आहे. राजाचा जीव हा केवळ एकटा जीव म्हणून त्याकडे पाहतां येणार नाही; त्याच्या जिवावर अनेकांचे, हजारो लोकांचे जीव अवलंबून असतात. या हजारांसाठी एकाला नाहीसा करणें हें समर्थनीयच आहे असें त्या दोघा सहाध्यायांकडून शेक्स्पीअरने तेथे वदविलें आहे. पण वस्तुतः हें तत्त्वज्ञान त्या दोघांचेंच नाही, तर डेन्मार्कच्या राज्यांतील बहुतेक सारे लोक याच मताचे आहेत हें दाखविण्यासाठी मुद्दाम ही त्याची योजना आहे. हॅम्लेटला ज्या कारणामुळें दुःख होत आहे त्यासंबंधीचा विचारसुद्धा दुसऱ्या कोणाला सुचत नाही. एका राजाचा मृत्यु झाल्यानंतर दुसऱ्या राजाचा लोकांनी – जाणत्यांनी सुद्धा – स्वीकार केला आहे; त्याच्या घिसाडघाईच्या लग्नाचें सुद्धा कोणाला कांही वाटलेलें नाही. आणि म्हणून हॅम्लेटचा सामना एकट्या राजाशीं नाही, तर राजा व त्याचा सर्व दरबार यांच्याशीं आहे, हें स्पष्ट करण्यासाठीं या छोट्याशा प्रवेशाचा उपयोग आहे. नाहीपेक्षा येथे त्याचें कांही प्रयोजनच नव्हतें.

राजाच्या केवळ खुनाने सूडाचें कार्य होत नव्हतें—

आपल्या विरुद्धचा हा कट अर्थात हॅम्लेटला प्रत्यक्ष माहीत नव्हता. परंतु आईकडे जातांना, राजा एकटा सापडला असतां त्याला मारून टाकण्याची संधि हॅम्लेटने साधली नाही आणि तो कट यशस्वी होण्याला अभावितपणें मदत केली, असा हॅम्लेटवर आक्षेप आहे. परंतु हॅम्लेटने त्या वेळीं राजाचा खून करायला हवा होता असें नाटक पाहतांना आपल्याला तरी वाटतें का हा मोठाच प्रश्न आहे. हॅम्लेटपुढे आपल्या बापाच्या खुनाचा बदला घेण्याचा एकमेव हेतु होता. हा हेतु कोठे सांदीकोपऱ्यांत चुलत्याचा खून करून साधला असता का? उलट लोकांच्या दृष्टीने हॅम्लेटच दोषी ठरला असता. मागाहून त्याने आपल्या कृतीचें किती समर्थन केलें तरी तें कोणी खरें मानलें नसतें. आधीच

तो वेडा झाल्याची ग्वाही सर्वत्र होती. वेडाच्या भरांत कांहीतरी त्याने केलें असेंच मानलें गेलें असतें; राजाचा गुन्हा बाहेर आलाच नसता. हॅम्लेटबद्दल विशेष आपुलकी वाटणारे जे आम्ही त्यांची सुप्त इच्छा तरी ही की, राजाचें पाप चव्हाट्यावर येऊन मग त्याचा नाश व्हावा व हॅम्लेटला न्याय मिळून तो राजा व्हावा. आमच्या न्याय-बुद्धीचें समाधान यामध्ये आहे. म्हणून या ठिकाणीं राजाचा वध होऊन हॅम्लेटच्या जीवनाचा खेळखंडोबा व्हावा ही कल्पना आमच्या अंतर्मनाला रुचत नाही; म्हणूनच नाटक पाहतांना तरी त्या वेळीं हॅम्लेटने राजाचा वध केलेला पाहण्यास आपलें मन उत्सुक नसतें.

शिवाय या वेळीं खून न करण्याबद्दल हॅम्लेटने दिलेलें कारण हें त्याच्या अति विचारी आणि निर्णय करण्याला असमर्थ असलेल्या वृत्तीचें (?) फळ खरोखरीच आहे काय? विसाव्या शतकांतील अश्रद्ध माणसांच्या दृष्टीने या गोष्टीकडे पाहून चालणार नाही. खुद्द शेक्सपीअरचा काळ खोल धार्मिक श्रद्धेचा होता. तेव्हा आपल्या बापाला जशी सद्गति मिळाली नाही तशी चुलत्यालाही मिळतां कामा नये हा विचार हॅम्लेटच्या ठिकाणीं अगदीच अस्वाभाविक मानण्याचें कारण नाही. राजाचा प्रार्थनेचा प्रयत्न कुचकामाचा होता हें कांही हॅम्लेटला माहीत नव्हतें. तेव्हा, प्रार्थना करीत असलेल्या व्यक्तीचा वध केला तर ती व्यक्ति स्वर्गांत जाईल ही हॅम्लेटची भीति अस्वाभाविक मानणें योग्य नाही. हॅम्लेटचा प्रत्यक्ष काळ शेक्सपीअरच्या आधी किती एक शतकांचा आहे. त्या वेळीं या धर्मश्रद्धा अधिकच तीव्र होत्या. त्या काळाच्या धोरणाने या घटनेकडे पाहिलें पाहिजे.

शिवाय अजून एक कार्य हॅम्लेटपुढे शिल्लक होतें. आईची त्याला अजून कान-उघाडणी करायची होती. तिला तो राजापासून दूर करूं इच्छीत होता. तसें झालें असतें तर आई पापमुक्त झाल्याचा मोठा आनंद त्याला मिळाला असता आणि चुलत्याचा वध नंतर केल्यामुळे त्याच्या आईला कांही यातना वाटल्या नसत्या. आईची आज्ञा त्याला पाळायचीच होती; तेव्हा आई तिकडे वाट पाहत आहे, म्हणून तूर्त हें काम पुढे ढकललें पाहिजे असें त्याने ठरविणें, त्याचा आईविषयीचा प्रेमभाव पाहतां, अस्वाभाविक नाही.

अर्थात असलें खुनाचें काम करायला त्याचा स्वभावच जात्या अनुकूल नाही हें आंतरिक कारणही त्याच्या विलंबाच्या मुळाशीं आहे हें कबूल केलेंच पाहिजे. परंतु आपण केलेल्या विलंबाच्या पोटीं पुढे केवढे अनर्थ वाढून ठेवलेले आहेत याची त्याला कल्पना असती तर त्याने तडकाफडकी निर्णय अवश्य घेतला असता. तो त्याचा स्वभाव आतांपर्यंत पुष्कळदा आपण पाहिला आहे. आणि त्याचेंच आणखी एक मोठेंच प्रत्यंतर आपणाला लगेचच पाहायला मिळणार आहे.

काव्यमय भाषेची अपरिहार्यता—

त्यासाठी त्याच्याबरोबर आपणाला त्याच्या आईच्या अंतर्गृहांत जायला हवें. हॅम्लेट

नाटकांतील तिसऱ्या अंकामधील हा चवथा प्रवेश शेक्सपीअरने अत्यंत अत्यंत कलात्मकतेने रंगविलेला आहे. त्यांतील हॅम्लेटची भावनोत्कटता आणि ती व्यक्त करण्यासाठी योजलेली प्रभावी काव्यमय भाषा हा अखिल जगांतील साहित्याच्या क्षेत्रांतील एक अत्युत्कृष्ट नमुना आहे. या ठिकाणीं जागोजाग हॅम्लेटच्या ज्या भावना व्यक्त झाल्या आहेत त्या अलंकारयुक्त, लयबद्ध, काव्यमय भाषेशिवाय यथार्थपणें व्यक्त करणेंच अशक्य होतें. काव्यमय भाषा हा हॅम्लेटचा एक गुणविशेष आहे हें तर खरेंच. परंतु या प्रवेशांत काव्यमय भाषा ही सर्वथा अपरिहार्य अशी गरजच होती हें कोणीही रसिक आस्वादक मान्य करील.

वय प्रौढ असूनसुद्धा राणीने एक श्रेष्ठ पुरुष सोडून दुसऱ्या हीन माणसाबरोबर शृंगारचाळे करण्याला उद्युक्त व्हावें याबद्दल हॅम्लेटने तिची केलेली निर्भर्त्सना; प्रौढ वयांत जर हे चाळे, तर मग तरुणांच्या उच्छृंखल वृत्तीला सद्गुणांचा बोध पडावा असें म्हणावें तरी कसें, याबद्दलची हॅम्लेटने व्यक्त केलेली चीड, दोघा भावांची तुलना करून नव्या राजाला हॅम्लेटने बहाल केलेली अत्यंत चपखल अशीं सुटसुटीत विशेषणें — या सर्व गोष्टी काव्यमय भाषेशिवाय परिणामकारकपणें वठल्याच नसत्या. हॅम्लेट हा काव्यमय वृत्तीचा; पण राणी तर तशी नाही. तरीही राणीच्या अंतर्गृहांत हॅम्लेटला पुन्हां भूत दिसल्यानंतर त्याच्या झालेल्या अवस्थेचें वर्णन राणीने जें केलें आहे की, अवकाशांत, पोकळींत तो कुठे तरी पाहत होता आणि निःशरीर अशा हवेशीं संभाषण करीत होता, तें वर्णन राणीच्या तोंडींसुद्धा शेक्सपीअरने काव्यमय भाषेंतच घालावें हें स्वाभाविक वाटतें. त्याशिवाय त्या वर्णनांत प्रभावीपणा आलाच नसता, हॅम्लेटच्या अवस्थेचें चित्रण त्याशिवाय आमच्या मनावर अगदी हुबेहुब असें ठसलेंच नसतें. अशीच काव्यमय भाषा हॅम्लेटच्या अंतर्गृहांतील त्या विचित्र वागण्याचें वर्णन करतेवेळीं ऑफिलियाच्याही तोंडी शेक्सपीअरने घातलेली आहे या गोष्टीची येथें सहजच आठवण होते.

तसेंच " तुला भूत दिसतें म्हणतोस, पण हा सर्व तुझ्या बुद्धीचा खेळ आहे, उन्मादामुळे माणसाला अशा नाही नाही त्या गोष्टींचा भास होऊं लागतो " असें राणीने म्हटल्यावर " उन्माद ! " अशी सुरुवात करून हॅम्लेटनें जें आपल्या मनोवस्थेचें वर्णन केलें आहे तेंही तशा काव्यमय भाषेंतच होऊं शकतें. प्रोफेसर लोकांच्या रुक्ष, गद्य, तात्त्विक चर्चेच्या रूपांत त्याचा आविष्कार होऊंच शकत नाही.

Lay not that flattering unction to your soul,
That not your tresspass but my madness speaks

ही अत्यंत मित शब्दांतील काव्योक्ति जशीच्या तशी अन्य प्रकारानें व्यक्त करणें सोपें किंवा शक्य आहे काय ? याच्यापुढच्या ओळींतही काव्यरूपामुळें मोठा प्रभावीपणा आला आहे. आणि म्हणूनच यापुढेच आईला

" देवापुढे आपला गुन्हा कबूल कर; जें झालें त्याबद्दल पश्चात्ताप वाटूं दे; जें होणार आहे तें टाळ. " —
असे अगदी रोख ठोक आदेश हॅम्लेट देत असतांनाही त्याच्या जिभेवर पुन्हा एक चपखल अलंकार नाचतो आणि तो म्हणतो, " पालापाचोळ्यावर उकिरड्यांतली घाण टाकून तो आणखीनच सडायला मदत करूं नकोस. " आईने जें करूं नये असें त्याला वाटतें आहे त्याची कल्पना या अलंकाराने किती सहज आणि सार्थत्वाने येते. हें आहे काव्यमय भाषेचें प्रयोजन.

नव्या राजाशीं पत्नी या नात्याचा संबंध आईने सोडावा म्हणून हॅम्लेटने तिचा पुष्कळ अनुनय केला. परंतु तिच्या मनावर त्या अनुनयाचा कांही परिणाम होत नाहीसें पाहून निराशेने तो तिचा निरोप घेतो, आणि " तुला तुझ्या राणीपदाचा विसर पडत नाही, तेव्हा राणी या नात्याने तुझ्या राजाला मी जें काय बोललों तें सारें सारें तूं सांगून टाक, म्हणजे त्याला कळेल; खुशाल त्याला कळूं दे की, मी कांही खरा वेडा नाही, तर वेड हें केवळ माझें एक कसब आहे, " असें तो तिला विव्हल होऊन सांगतो. " तूं राणी आहेस; राणीशिवाय हें दुसरें कोण करील? " असें तो तिला टोचून विचारतो; रोख असा की, तूं माझी आई आहेस याचा तुला विसर पडला आहे. राणी जरी, " माझ्या तोंडून हे शब्द बाहेर पडणें म्हणजे माझे प्राणच बाहेर पडण्यासारखें आहे, " असें त्याला आश्वासन देते तरीही त्याचें समाधान होत नाही. तो म्हणतो, " माझी इंग्लंडला रवानगी व्हायची आहे, ठाऊक आहे तुला? " तिच्या संमतीनेच तें ठरलें असें त्याला म्हणावयाचें आहे आणि स्वतःच्या मुलाच्या मृत्यूला बोलावणें करण्याच्या कामांत ती सामील होत आहे हें तिला त्याला सांगावयाचें आहे. कारण त्याच्या अत्यंत चपल बुद्धीने राजाचा डाव बरोबर हेरला आहे. " सील करून पत्रें तयार आहेत " या भाषेवरून त्याला कशाचा थांगपत्ता लागूं न देतां त्याचा कांटा काढण्याचा हा कट आहे हें आईला स्पष्टपणें सांगून हॅम्लेटने तिला बजावलें आहे, " हें घाणेरडें काम करून मला नरकांत लोटण्याची कामगिरी माझ्या दोघां शाळासोबत्यांवर सोपविलेली आहे. खुशाल चालूं देत हा कट. कारण दुसऱ्याला उडविण्यासाठी पेटविलेल्या दारूयंत्राने स्वतः यंत्रकर्त्यालाच उडवून विध्वंसित केलेलें पाहण्यांत केवढी मोठी मौज आहे. पाहशीलच तूं. जरा कठीण आहे गोष्ट खरी; परंतु त्यांच्या सुरुंगाखाली दोन हात माझा सुरुंग मी ठेवीन आणि त्यांना चंद्रलोकापर्यंत उडवीन. " अशा रीतीने आपला मनांतला बेतही तो राणीजवळ उघड करतो. इतका त्याला राणीच्या मनावर आपल्या अनुनयाचा कांहीच परिणाम न झालेला पाहून त्वेष आलेला असतो; बेभान होऊन हें सारें तो बोलून जातो.

संकल्प केल्याप्रमाणें हा बेत हॅम्लेटने पारही पाडला. त्याचे शाळासोबती जहाजावर निजले असतां त्यांच्या कागदपत्रांच्या थैल्या लंपास करून त्या त्याने फोडल्या, आंतील कागदपत्र वाचले, त्यांतील स्वतःचा वध करण्याच्या आदेशाचा कागद काढून

घेतला; त्या जागीं रोझेन्क्रान्टझ व गिल्डरस्टर्न यांचा वध करण्याचा आदेश लिहून स्वतःजवळच्या बापाच्या अंगठीने जरूर तेथे सिलें केलीं; ही अंगठी डेन्मार्कच्या राज्याच्या मुद्रेची हुबेहुब नक्कल असल्याने काम बेमालूम झालें. दरम्यान एका चाच्यांच्या बोटीचा आसरा घेऊन हॅम्लेट डेन्मार्कला परतही आला.

हॅम्लेटला राजाच्या गुन्ह्याचा पक्का पुरावा हवा होता—

ही सर्व हकिकत हॅम्लेटने होरेशिओला अंक ५ प्रवेश २ मध्ये सांगितली, तो प्रसंग विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे. हॅम्लेट राजाचा वध करण्याचें आतापर्यंत टाळीत होता त्याला एक फार मोठें कारण त्याच्या भोवतालच्या समाजाला राजा गुन्हेगार आहे हें माहीत वा मान्य नव्हतें; आणि तसें सिद्ध करण्याजोगा पुरावा हॅम्लेटपाशी नव्हता हें यापूर्वी दोनतीन वेळां सांगितलें. याला जबर प्रत्यंतर या प्रसंगीं आपल्याला मिळतें. त्या दोघांमधील या संभाषणाच्या अखेरीस हॅम्लेट आपला निर्णय जाहीर करतो, "या हाताने अशा माणसाला जगाच्या पार करण्यांत एवढा सुद्धा दोष नाही." हें समर्थनपर भाषण हॅम्लेटचें झाल्यावर होरोशिओ संशय व्यक्त करतो की, हें होण्याला अवसर कसा मिळणार? कारण त्याच्या दोघा मित्रांचें इंग्लंडमध्ये काय झालें हें थोड्याच काळांत राजाला कळेल. रोख असा की, मग राजा सावध होईल. त्यावर हॅम्लेट स्पष्ट सांगतो, "त्याला असा वेळ तो काय? दरम्यानचा काळ आता माझा आहे. आणि माणसाचा जीव घ्यायला वेळ तो किती लागणार? एकाचा आकडा मोजीपर्यंत सुद्धा नाही."

इतका साफसाफ निर्णय करण्याजोगा त्याच्या हातीं जो पुरावा सापडला तो म्हणजे त्याच्या वधाबद्दल राजाने इंग्लंडच्या राजाला पाठविलेला आदेश. या आदेशपत्रांत हॅम्लेटच्या विरुद्ध नाना तऱ्हेचे खोटेनाटे भलभलते आरोप करून त्याचें जिवंत राहणें डेन्मार्कच्या आणि इंग्लंडच्याही सुरक्षितपणाचें नसल्याने देखतांक्षणी हॅम्लेटचें डोकें उडविण्याची आज्ञा होती. हें सांगितल्यावर खुद्द होरेशिओच्या तोंडीं शेक्सपीअरने पुढील प्रश्न घातला आहे.

"शक्य आहे हें?"

या प्रश्नाला फार महत्त्व आहे. कारण होरेशिओ हा हॅम्लेटचा परम मित्र; एकमेकांची गट्टी इतकी की, आतांपर्यंतच्या हॅम्लेटच्या वागण्यांतील खाचाखोचा सगळ्या होरेशिओला माहीत. तरी त्यानें "राजाने इतका अधमपणा करावा हें शक्य आहे काय?" असा संशय व्यक्त करावा, याचा अर्थच हा की, हॅम्लेटच्या नुसत्या बोलण्यावर जेथे होरेशिओचा सुद्धा विश्वास बसणें कठीण तेथे डेन्मार्कच्या इतर जनतेला तो विश्वास कसा वाटावा? आणि म्हणूनच हॅम्लेट अति उताविळीने हुकुमाचा तो कागदच त्याच्यापुढे करतो आणि "हा पाहा तो आदेश; सावकाशपणें वाच." असें उत्तर देतो. आतापर्यंत राजाच्या दुष्कृत्यास साक्षीदार होतें फक्त भूत. हॅम्लेटने तर वेड्याचे

सोंग पांघरलें होतें, तेव्हा भुताच्या बोलण्याची त्याने सांगितलेली हकीकत त्याच्या वेडाचाच एक भाग मानली जाण्याची शक्यता होती. या आदेशाच्या कागदाचें कांही तसें नव्हतें; आणि म्हणूनच हॅम्लेटचा निश्चय कायम होण्याला त्याचा फार मोठा उपयोग होता.

बुद्धिमत्ता आणि निर्णयकौशल्य —

त्याला इंग्लंडला पाठविण्यांत राजाचा काय हेतु असावा हें हॅम्लेटने अचूक हेरलें व त्या बाबतींत कशीं पावलें टाकायचीं हें तडकाफडकी ठरविलें. बुद्धिमत्ता आणि निर्णयकौशल्य यांचा हा फार मोठा पुरावा होय. A man who could not decide या ऑलिव्हिएच्या विधानाचा अर्थ ज्याला निर्णय करण्याची शक्ति नव्हती असा करण्याऐवजी, परिस्थितीच्या पेचामुळे जो निर्णय करूं शकत नव्हता असा करणेंच कसें सयुक्तिक होईल हें यावरून निखालस स्पष्ट व्हावें. कारण, आपल्या दोघां शाळा सोबत्यांना मृत्युसदनीं पाठविण्याचा निर्णय करून तो अमलांत आणण्याला हॅम्लेटने एवढाही विलंब लावला नाही. त्या कागदाची चोरी करतांना त्याचें सत्प्रवृत्त मन त्याला किती खात होतें, हा अविचार आहे असें त्याला किती वाटत होतें आणि भीतीही कशी वाटत होती हें स्वतः त्याने किती सुंदरपणें सांगितलें आहे. पण या कशामुळेही त्याने यत्किंचितपणेंही माघार घेतली नाही. अर्थात त्याच्या तत्त्वदर्शी स्वभावानुसार तो या सगळ्याचें श्रेय स्वतःच्या कर्तृत्वाकडे घेत नाही हा त्याचा गुण आहे. तो म्हणतो, "आपण मोठे खोलपणें रचलेले कट प्रेतासारखे थडग्यांत गुदमरून जातात, अशा वेळीं आपलें अविचाराने केलेलें एखादें कृत्यच आपल्या उपयोगीं पडतें. यांतून एक धडा घ्यायचा आपण की, आमच्या ओबडधोबड साधनांनी आमचे हेतु साकार करण्याचा आम्ही किती प्रयत्न करीत असलों तरी त्या हेतूंना खरा आकार देणारें दैव म्हणून कांही तरी आहेच. "दैवं चैवात्र पंचमम्।" या गीतेच्या श्लोकांतील चिरसत्यच येथें हॅम्लेटच्या तोंडीं, त्याच्या ऐन यशाच्या प्रसंगीं, घालून त्याच्या थोर विनयशील स्वभावाची ओळख एका जणू लहानशा फटकाऱ्याने शेक्स्पीअरने आपणाला करून दिली आहे. ही खऱ्या कलावंताची किमया आहे. प्रत्यक्ष रंगभूमीवर नायकाकडून श्रेष्ठत्वनिदर्शक कृत्यें करविलीं पाहिजेत असा आग्रह धरणें म्हणजे अशा कलावंताच्या प्रभावी प्रतिभेचा उपमर्द आणि आग्रह धरणाराच्या रसिकतेचें कोतेंपण किंवा अभाव मात्र आहे.

बाजी हातांतून निसटून जाते—

हॅम्लेटने अखेरचा निर्णय केला खरा; पण त्याने योजिलें होतें तसा तो पार पडापचा नव्हता. हॅम्लेट आणि परिस्थिति किंवा दैव यांच्या सामन्यांत मध्यंतरीच्या काळांत असे कांही प्रसंग घडले होते की, ज्यामुळें बाजी हॅम्लेटच्या हातून निसटून

गेली होती; आणि पुन्हा दैवच त्याला हात द्यायला आलें नसतें तर ती कायमचीच तशी निसटली असती. दैवाचा हात मिळून अखेर जरी त्याची इच्छा पुरी झाली तरीही त्यासाठी त्याच्या प्राणांची आहुति पडावी लागली आणि ज्या आईला पापांतून वांचविलेलें पाहण्याचा त्याचा ध्यास होता तिचाही बळी पडावा लागला.

हें कसें झालें तें नीट समजण्यासाठी आपल्याला थोडें माघारें फिरलें पाहिजे. कारण हॅम्लेटला राजाने इंग्लंडला पाठविल्यावर तेथे त्याचें काय होतें हें पाहण्याच्या उत्सुकतेमुळे मधले सर्व प्रसंग डोळ्यांपुढे घडत असूनही तिकडे आपलें कांहीसें दुर्लक्ष झालें. त्यासाठी आता आपण राणीच्या अंतर्गृहांत हॅम्लेट राणीला भेटला तेथे परत जाऊं या. तेथे त्यांचें संभाषण ऐकण्यासाठी पोलोनिअस कनातीच्या आड दडून राहिला होता हें आपणास माहीत आहे. राणीशीं झालेलीं हॅम्लेटचीं सुरुवातीचीं तुटक बोलणीं अत्यंत खोचक आणि राणीच्या अंतःकरणांत खळबळ उडविणारीं आहेत "मला तूं विसरलास काय" असें जेव्हां राणी कळवळून विचारते तेव्हा हॅम्लेट तिला म्हणतो, "छे! छे! असं कसं होईल? अग तूं तर राणी; तुझ्या नवऱ्याच्या भावाची बायको, आणि–आणि असें नसतें तर दैवाची केवढी खैर झाली नसती!–तूं तर माझी आई!" त्यावर राणी म्हणते, "मला कांही तुझ्याशीं बोलतां येत नाही. ज्यांना तुझ्याशीं बोलतां येईल त्यांच्याशींच तुला बोलायला लावतें." याच्यांतील ध्वन्यर्थ लक्षांत घेतला पाहिजे. हॅम्लेटला साहजिकच वाटतें की, राजाशींच ती आपल्याला बोलायला सांगणार, आणि आसपासच तो कुठे तरी असला पाहिजे. चोरून आपल्या हालचालीवर त्याची पाळत असते हें त्याला माहीतच आहे. म्हणून जणू त्यालाच ऐकायला मिळावें यासाठी तो राणीला हात धरून खाली बसविती आणि "तुझ्यापुढे येथे एक चांगला आरसा उभा करणार आहे; त्यांत स्वतःचें रूप तूं पाहिल्याशिवाय एक तसूभर तुला मी हलूं देणार नाही" असें मोठ्या आवेशाने तिला बजावतो. राजा तसा भेकड आहे हें हॅम्लेटला ठाऊक होतें आणि यदाकदाचित् राणीच्या मदतीला तो येताच तर हॅम्लेटचा आपल्या तरवारीवर एवढा विश्वास होता की, क्षणार्धांत त्याने एका राजाचे दोन राजे केले असते. म्हणूनच त्याने हा उद्धटपणा मुद्दाम आरंभला होता. कदाचित् राजा मदांध किंवा विषयांध असतांना त्याला मारण्याची संधि मिळावी हा त्याचा हेतु त्यांत सफल झालाही असता. परंतु त्याच्या उद्धटपणामुळे राणी घाबरली, "अरे तूं माझा प्राण का घेणार?" असें ओरडली. त्याबरोबर पडद्या आडच्या पोलोनिअसला एवढाही विवेक न राहून 'धावा धावा' असें तो ओरडतो. त्यासरशी कनातींतूनच तरवारीचें टोक भोसकून हॅम्लेट त्याला यमसदनाला पाठवितो. "काय केलेंस हें" असें राणी म्हणते व आपण राजाला मारलें या समजुतींत असल्यामुळे हॅम्लेट उत्तर देतो, "म्हणजे राजेसाहेब होते कां काय हे? अत्याचार? होय आईसाहेब, राजाला मारून त्याच्या भावाशीं लग्न करण्यासारखाच हा अत्याचार" आणि मृत शरीर बाहेर ओढतो. पण तो होता पोलोनिअस; तेव्हा "तुझ्याहून श्रेष्ठतर माणसाची अपेक्षा

मीं केली होती '' असें म्हणून झाल्या गोष्टीकडे जवळ जवळ दुर्लक्ष करून तो आईशीं बोलणें पुढे चालू करतो.

या आकस्मिक घटनेमुळे हॅम्लेटच्या जीवनाचें सुकाणूं त्याने किती म्हटलें तरी त्याच्या हातीं राहिलें नाही. त्यामुळे त्याला इंग्लंडला पाठवायला राजाला आयतेंच निमित्त सांपडलें. राणीही मग त्या बेताला विरोध करूं शकली नाही. घरीं राहून या गुन्ह्याबद्दल प्रायश्चित घ्यावें लागण्यापेक्षा त्याने दूर देशीं सुखी असावें असें तिच्या आईच्या हृदयाला वाटलें.

इकडे बापाच्या मृत्युमुळे ऑफिलियाला वेड लागतें. बापावर तिची आत्यंतिक श्रद्धा होती. आणि त्याचा खून कोणाकडून? तर ज्याचें तिने केवढें उज्वल वर्णन केलें होतें अशा अत्युदार आणि तिच्या हृदयाचा स्वामी होऊन राहिलेल्या हॅम्लेटच्या हातून! घरीं ती एकटी. धीर द्यायला भाऊ नाही; तो दूर फ्रान्समध्ये! या सगळ्याचा घोर परिणाम होऊन ती भ्रमिष्ट झाली. हॅम्लेट एवढा बुद्धिमान खरा; परंतु आपल्या अविचारी कृत्याचा एवढा घोर परिणाम होईल अशी त्याला कल्पना आली नाही. आणि आली असती तरी उपयोग काय होणार होता? कारण आधीच आपल्या क्रूर वर्तणुकीने ऑफिलियाच्या भावी भ्रमिष्टपणाचा दृढ पाया त्याने घालून ठेवला होता. त्यामुळें पितृवधानंतर हॅम्लेट दृष्टीस पडल्याने तिला संतापाचा झटका कदाचित अधिकच तीव्र आला असता. शिवाय त्याने येथे असणें शक्यही नव्हतें; कारण त्या वेळीं हॅम्लेट इंग्लंडकडे मरणाच्या वाटेवर प्रवास करीत होता.

शेक्सपीअरने ऑफिलियाच्या वेडाचें चित्रण केवढ्या अतुलनीय कौशल्याने केलें आहे. तिच्या सगळ्या विसंगत भाषणांतूनही तिचें दुःख जणूं उघड उघड पाझरत आहे. बापाच्या मृत्यूची बातमी ऐकून आणि त्याचे नीटपणें प्रेतसंस्कारही झाले नाहीत हें समजून बेभान झालेला लेअर्टिस राजाला जाब विचारण्यासाठी राजाकडे येतो त्या वेळीं ऑफिलियाचा प्रवेश दुसऱ्यांदा शेक्सपीअरने करविलेला आहे. त्या वेळी "तूं चांगली शहाणी असतीस आणि मला बाबांच्या वधाबद्दल सूड घ्यायला सांगितलें असतेस तरी आत्तांच्या इतकें माझें मन सूडाला अनुकूल झालें नसतें" असें लेअर्टिस म्हणतो, त्यांत अयथार्थ असें कांही नाही. ऑफिलियाच्या विदारक, विसंगत बोलण्याने आपणा सामान्य श्रोत्यांचें सुद्धा चित्त विव्हळ होतें, तेथे तिच्या प्रिय भावाची अवस्था काय झाली असेल तें वर्णन करायला शब्दच सापडणें कठीण. विशेषतः ती सगळ्यांनाच फुलें देऊं करते आणि "वायलेटस सुद्धा दिलीं असतीं मीं तुम्हांला; पण काय करूं – बाबा मेल्यावर तीं कोमेजून गेलीं आहेत हो" असें म्हणते तेव्हा शेक्सपीअरच्या कौशल्यामुळे मन स्तिमित होऊन जातें.

अर्थात यामुळे लेअर्टिसची सूडाची भावना जास्त प्रबळ व्हावी हा नाटककाराचा हेतु उघड आहे. पण तेवढ्याने पुरें झालें नाही की काय म्हणून त्याने तिच्या मृत्यूची-अत्यंत करुण मृत्यूची – वार्ता ऐन वेळीं राणीच्या तोंडून वदविली आहे. हॅम्लेट आणि

लेअर्टिस यांचें द्वंद्वयुद्ध घडवून आणावयाचें; त्या वेळीं लेअर्टिसने मुद्दाम गफलत करून धारदार तरवार हातीं घ्यावयाची व तिच्याही टोकाला विष लावून ठेवलेलें असायचें; आणि इतकेंही करून द्वंद्वयुद्धांत लेअर्टिसला अपयशच आलें तर हॅम्लेट दमला असतांना विश्रांतीच्या वेळीं त्याने घेण्याच्या पेयामध्ये राजाने जहंरी विष घालून ठेवायचें, असा कट राजाकडून रचला जात असतांना नेमकी ही वार्ता घेऊन राणी येते आणि रचल्या जात असलेल्या कटांत सामील होण्याबद्दल जो कांही थोडासा विरोध लेअर्टिसच्या सत्प्रवृत्तीमध्यें उत्पन्न होऊं पाहत होता तो या वार्तेंने पार वितळून जातो आणि कट पक्का होतो.

हॅम्लेटच्या स्वभावनिदर्शनाचे कांही किरकोळ प्रसंग—

आतां खरें म्हणजे हा द्वंद्वयुद्धाचाच महत्त्वाचा प्रसंग पाह्यचा राहिला आहे. परंतु त्यापूर्वी हॅम्लेटच्या स्वभावनिदर्शनाचे आणखी कांही किरकोळ प्रसंग पाह्यला हवेत. त्यांतला एक प्रसंग चवथ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशाच्या सुरुवातीला आहे. पोलोनिअसच्या वधाबद्दल खुलासा मागण्यासाठीं राजाने हॅम्लेटला बोलावणें पाठविलेलें आहे आणि राजा त्याची वाट पाहतो आहे. त्या वेळीं राजाने आपल्या स्वगत भाषणांत हॅम्लेटपासून आपल्याला विशेष धोका कसा याचें विवेचन करतांना, समाजांतल्या खालच्या थरांतल्या वेड्या, माथेफिरू लोकांचा हॅम्लेट आवडता आहे ही अडचण व्यक्त केली आहे. हे लोक विचार करून प्रेम करीत नाहींत; डोळ्यांनी बाह्य गोष्टी पाहून प्रेम करतात. असें झालें म्हणजे गुन्हेगाराचा गुन्हा ते पाहत नाहीत, त्याला झालेल्या शिक्षेचेंच त्यांना अधिक दडपण वाटतें. म्हणून सगळ्यांचें समाधान व शांतता राखण्यासाठी या खुनाच्या कमीं जरा जास्त विचारपूर्वक पाऊल टाकलें पाहिजे; असा राजाचा विचार व्यक्त करतांना, हॅम्लेट दिसायला मोहक असल्यामुळे, दरबारी लोक राजाला अनुकूल असूनसुद्धा सामान्य जनता हॅम्लेटविषयी आपुलकी बाळगणारी होती ही गोष्ट इतक्या उशीरा नाटककार आपल्याला सांगत आहे. आणि हेंही नुसतें कथनच आहे. सामान्य प्रजेच्या प्रेमाचें किंवा हॅम्लेटनें तें कसें मिळविलें याचें दर्शन त्यामध्यें मुळींच नाही.

यानंतर हॅम्लेट राजाकडे येत असतां वाटेंत त्याला तरुण फॉर्टिंब्रासचें सैन्य कूच करीत असतांना दिसतें. त्या सैन्याचा प्रमुख हॅम्लेटला सांगतो की, जमिनीचा एक लहानसा तुकडा मिळविण्यासाठी आम्ही चाललों आहोंत; त्या तुकड्याची वास्तविक किंमत अशी कांही नाही; कुणी पांच चवल्या दिल्या तरी त्यांत मी शेत पेरणार नाही; कुणाला विकून टाकावें म्हटलें तरी याहून जास्त कुणी किंमत देणार नाही. पण त्यासाठी नॉर्वे आणि पोलंड यांचीं सैन्यें मोठी लढाई करायला उभीं ठाकलीं आहेत.

यांतून हॅम्लेटला पुन्हा एकदा आत्मटीकेची उसळी येते. जें पाहावें त्यामध्ये सूडाच्या कार्याला चेतवणीच मिळते, तरी माझी सूडाची भावना थंडी राहते; सर्व कांही

माझ्या दृष्टीला दूषण द्यावें असेंच दिसतें, अशी तो स्वतःची निर्भर्त्सना करतो. "हें सैन्यच पाहा. त्याचा नायक एक लहान पोरगा आहे. पण कशाची तमा न बाळगतां, केवढ्याशा क्षुल्लक कारणासाठी अभिमानाने, महत्त्वाकांक्षेने आणि विजयोत्सुकतेने भारून जाऊन हे लोक चालले आहेत. आणि मी ! मला सूड घ्यायला भरपूर कारण आहे, अंगांत तसें सामर्थ्य आहे, साधनें आहेत, तरी नुसता आपल्याला ही गोष्ट करायची आहे एवढा मंत्रच मी जपीत बसलों आहें. विचार, विचार करतों आहें. त्या विचारांत शहाणपणाचा भाग आहे एक, आणि तीन भाग आहे माझा भेकडपणा" असें म्हणून सध्याच्या मनःस्थितींत श्रेष्ठत्वाची एक विचित्र व्याख्या हॅम्लेट करतो. श्रेष्ठत्व कशांत ? ज्या वेळीं स्वाभिमानाचा प्रश्न असेल अशा वेळीं खूप सारासार विचार करून निर्णय केल्याशिवाय एवढीही हालचाल करायची नाही यामध्ये नाही; तर गवताच्या क्षुल्लक एखाद्या काडीवरूही भांडण उपस्थित करणें यांत खरें श्रेष्ठत्व आहे, असें तो प्रतिपादतो.

आणि अशी आत्मनिर्भर्त्सना करून पुन्हा एकदा तो निश्चय करतो की, यापुढे एक रक्ताच्या बदल्याचाच विचार, तसें न झालें तर माझ्या विचारांची किंमत शून्य. हा प्रकार किती वेळां या नाटकांत झाला आहे हें मोजण्यासारखें आहे. याच .पुनरावर्तनामुळे हॅम्लेट हा विनाकारण शंकाकुशंका काढणारा, निर्णय करण्याची हिंमत नसलेला, नुसताच पुस्तकी पंडित आहे असें मानण्याकडे पुष्कळांचा कल होतो. परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती. आपण केलेल्या राजाच्या वधाला सबळ कारण होतें असा ज्यावरून विश्वास वाटेल असा कोणताही पुरावा त्याच्या हाती नसल्यामुळे त्याच्या मनाचें असें आंदोलन चाललें होतें आणि कोणत्याही अवस्थेंत नुसत्या आपल्या मनांतील पूर्वग्रहाचा परिणाम म्हणून आपल्या हातून कोणावरही अन्याय होऊं नये ही त्याची प्रवृत्ति होती; त्यामुळेही अखेरचा निर्णय करणें त्याला अवघड झालें होतें.

हातून अन्याय होऊं नये ही हॅम्लेटची तळमळ—

कोणावरही आपल्या हातून अन्याय होऊं नये याबद्दल दक्षता घेण्याइतकें त्याचें हृदय कसें उदार होतें याबद्दलची साक्ष स्मशानांतील प्रसंगांत आणि त्यानंतर लगेचच मिळते. स्मशानांतील थडगें खणणाराशीं हॅम्लेटचा जो संवाद आहे त्यामध्ये हॅम्लेटची चतुराई, तत्त्वज्ञ वृत्ति आणि साध्याही विषयांतून तात्त्विक सिद्धांत काढण्याची सवय या गोष्टी आपल्याला दिसतात. परंतु ऑफिलियाचें प्रेत आणून संस्कारांचा कांही जो फार्स चाललेला असतो तो दुरून पाहत असतांना हॅम्लेटला लेअर्टिस दिसतो त्या वेळी "अरे, हा तर लेअर्टिस; अत्यंत श्रेष्ठ आणि उमदा तरुण आहे हा !" असा जो हॅम्लेटचा उस्फूर्त उद्गार निघतो त्याला अधिक महत्त्व आहे. याच लेअर्टिसने दरबारांत हॅम्लेट विषण्णपणें बसला असतांना, राजाला 'आपल्या राज्यारोहणासाठी मी आलों होतों' असें उघडउघड सांगितलेलें होतें. तरीही हॅम्लेटने त्याच्याबद्दल मनांत

कसलाही आकस धरलेला नाही; एवढेंच नव्हे तर लेअर्टिसच्या गुणांबद्दल त्यांच्या मनांत निर्मळ आदरभावच आहे हें येथे आपण पाहतों.

असें असूनही लेअर्टिस ज्या वेळीं ऑफिलियाच्या मृत्यूबद्दल मोठ्याने आक्रोश करूं लागतो त्या वेळीं हॅम्लेट बेभान होऊन खड्ड्यांत उडी घेतो आणि लेअर्टिसची व त्याची झोंबाझोंबी होते. पण त्याही वेळीं तो लेअर्टिसला काकुळतीने बजावतो की, "बाबा रे, माझा गळा सोड. स्वभावाने कांही मी दुष्ट नाही; पण तरीही माझ्यामध्ये कांहीतरी असें भयंकर आहे की, तूं शहाणा आहेस, त्या भयंकर वृत्तीपासून तूं दूर राहा." यांतही लेअर्टिसवर अन्याय आपल्या हातून घडूं नये अशीच त्याची तळमळ आहे. एवढेंच नव्हे तर राणी जेव्हा लेअर्टिसला म्हणते, "अरे, त्याचें डोकें ठिकाणावर नाहीं; एवढा हा झटका जाऊं दे, मग तूंच पाहशील कसा शांत आणि निःशब्द होईल तो तें" त्या वेळीं हॅम्लेटही त्याला म्हणतो, "ऐकलंस? मग कां बाबा माझ्याशीं असं वागतोस? माझं तर नेहमीच तुझ्यावर प्रेम आहे."

या सर्व प्रसंगांत हॅम्लेटच्या मनाची उदारता जशी दिसून येते तसाच क्षणभर त्याला खरोखरीचा वेडाचा झटका आला होता हेंही आपण पाहतों. याच्या पुढच्याच प्रवेशांत होरेशिओजवळ तो त्याबद्दल मोकळ्या मनाने खेद प्रगट करतो कीं, "क्षणभर मला भान राहिलें नाही; माझ्या स्वतःच्या दुःखाच्या आरशांत आतां मला त्याच्या दुःखाचें खरें स्वरूप कळून येतें. मी त्याची क्षमा मागेन. पण हें कबूल केलेंच पाहिजे की, त्याच्या त्या दुःखाच्या अकांडतांडवामुळे माझ्या क्रोधाला पारावारच राहिला नाही." एवढेंच नव्हे तर राजदरबारांत लेअर्टिसचा हात हातांत घेतांक्षणीं हॅम्लेट त्याची माफी मागतो. "जें कांही माझ्या हातून घडलें, ज्यामुळे तुझ्या स्वाभिमानाला फार मोठा धक्का बसला, तें सगळें माझ्या वेडाने केलें. तेव्हां माझ्या वेडाला दोष दे आणि तूं उदारपणाने एवढें मान की, घरापलीकडच्या अंगणांत बाण मारीत असतांना माझ्या बाणानें चुकून माझ्या सख्ख्या भावालाच जखम झाली." अशा तऱ्हेचें त्याचें त्या वेळचें भाषण हॅम्लेटच्या मनाच्या निर्मळपणाची साक्ष केवढ्या तरी हृद्यपणाने देतें; इतक्या की, लेअर्टिससुद्धा क्षणभर विरघळल्यासारखा होतो; एवढेंच नव्हे तर आपल्या वडलांच्या मृत्यूचा बदला घेण्याचा हक्क राखून ठेवूनही तो म्हणतो कीं, "तोंपर्यंत तुझ्या प्रेमाचा मी स्वीकार करतों, त्याचा अपमान करीत नाही."

श्रेष्ठपणाचें दर्शन किती लहानशा प्रसंगांतून आणि किती नाजूकपणाने – हळुवारपणे – करवितां येतें याचें हें केवढें उदात्त उदाहरण आहे. त्याचप्रमाणे हॅम्लेट ऑफिलियावरच्या प्रेमामुळे – त्या प्रेमाचा भंग झाल्यामुळे – त्यानेच तें प्रेम दाबून टाकल्यामुळे – किती वेडा झाला होता याचेंही हें जितकें विदारक तितकेंच रसप्रकर्ष साधणारें चित्र आहे. त्यांतल्या त्यांत वेडाच्या पूर्ण आहारीं गेला असतांना सुद्धा आपण हा एक प्रकारचा वेडेपणा करीत आहोंत व अशाही वेळीं आपल्या हातून अनुचित किंवा अत्याचारी वर्तन होऊं नये याबद्दल हॅम्लेटच्या मनांत जागरूकता आहे, असा हा

मानसिक द्वंद्वाचा अपूर्व देखावा शेक्सपीअरने अलौकिक कौशल्याने किती थोड्या शब्दांत आंपल्यापुढे उभा केला आहे. . भावनासुलभ अशा तरुण वयांत हॅम्लेट केवढ्या दारुण मानसिक संग्रामांत सांपडला होता, त्यामुळे त्याच्या ठिकाणी किंकर्तव्यमूढता येणें किती स्वाभाविक होतें हेंही या सर्व प्रसंगावरून सहृदय रसिकाला सहज समजून येण्यासारखें आहे.

आतां राहिला फक्त द्वंद्वयुद्धाचा शेवटचा प्रसंग. नियम असा की, द्वंद्वयुद्धांत टोकें बोथट केलेल्या तरवारी वापरावयाच्या. त्याऐवजी लेअर्टिसने गडबडीचा फायदा घेऊन टोकाची धारदार तरवार वापरावयाची, एवढेंच नव्हे त्या टोकाला जहरी विष लावलेलें असायचें असा कट झालेला होता. इतकेंही करून डाव हुकलाच तर शेवटीं हॅम्लेटला द्यावयाच्या पेयांत विष घालून ठेवण्याची तजवीज राजाने लेअर्टिसला सांगून करून ठेवली होती. तीन वेळां तरवारीने स्पर्श करायचा प्रयत्न करायचा होता. त्यांत दोन वेळां तर हॅम्लेटनेच जिंकली. पहिल्या जयाच्या वेळीं राजाचा जीव खाली-वर झाला आणि तेव्हाच त्याने हॅम्लेटला पेय घेण्याचा आग्रह केला. पण हॅम्लेटने तो ऐकला नाही. दुसऱ्याही वेळीं हॅम्लेटचाच जय झाला. तो कांहीसा स्थूल असल्या-मुळे त्याला घाम आला. राणीचें हृदय मातृप्रेमामुळे थोडेंसें कालवलें. तिने त्याला पेय घेऊन ताजा होण्याचा आग्रह केला. त्याने तोही मानला नाही. पण राणीला स्वतःलाच थकल्यासारखें होऊन तिने तो पेयाचा पेला हातीं घेतला. हॅम्लेटसाठी खास तयार करून ठेवलेला पेला होता तो. राजा नको नको म्हणत असतांना ती तें पेय पिऊन गेली. इकडे तिसऱ्या फेरीच्या वेळीं अखेर, आपण पाप करतों आहोंत अशी मनांत टोचणी असतांनाच लेअर्टिसने बदलून घेतलेल्या तरवारीचें टोक हॅम्लेटच्या शरीरांत नियमाविरुद्ध भोसकलें. स्वाभाविकच राग येऊन हॅम्लेटनें त्याच्याशीं झटापट करून, त्याच्या हातची तरवार हिसकावून घेऊन तिनेच लेअर्टिसलाही भोसकलें; आतां हॅम्लेट बेभान झाला होता; कारण लेअर्टिसने त्याला विनाकारण आणि नियमाविरुद्ध जखम केली होती. त्यांना एकमेकांपासून दूर करा – ते वेडे झाले आहेत, असें राजा म्हणत होता, तरी हॅम्लेट 'चल, ये पुन्हा' असें आव्हान लेअर्टिसला देत होताच.

पण एवढ्यांत सारा ग्रंथच आटोपला. विषामुळे राणी पडली. त्या दोघांचें रक्त पाहून राणीला झीट आली असें राजा खोटेंच म्हणतो. पण राणीच सांगते की, "नाही, माझ्या पोटांत विष गेलें आहे." त्याबरोबर "दारें लावून घ्या; येथे विश्वासघात आहे" असें हॅम्लेट ओरडतो. त्या वेळीं, "विश्वासघात हा येथे आहे" असें म्हणून लेअर्टिस सर्व खुलासा करतो, सर्व दोष राजाचा आहे असें सांगतो.

"तरवारीच्या टोकाला विष काय ? तर मग विषा तूं आपलें काम कर" असें म्हणून लगेच हॅम्लेट राजाला जखम करतो. त्या वेळीं शेक्स्पीअरनें नाटकांत घातलेलें वाक्य असें आहे.

सर्वजण — राजद्रोह, राजद्रोह !

मराठी वि. नं. 9032

या वाक्याला फारच महत्व आहे. इतकें सर्व ऐकत आणि पाहत असूनही दरबारी मंडळी अजून राजाला गुन्हेगार मानायला तयार नाहीत; हॅम्लेटने केलें तें योग्य केलें असें म्हणायला तयार नाहीत.

अशा रीतीने राणी, राजा मरतात. लेअर्टिसही मरतो. तो मात्र मरतांना हॅम्लेटच्या यांत कांही दोष नाही हें पुन्हा बजावून सांगतो. अखेर विषाच्या परिणामाने हॅम्लेटही मरतो.

अखेरचें आत्मसमर्थन—

परंतु मरणापूर्वी तो होरेशिओला बजावून सांगतो, "सारे नुसते बघे लोक इथे आहेत. यांना या घटनांचा सगळा अर्थ समजावून सांगावासा वाटतो मला. पण मृत्यूची पकड दृढ आहे, म्हणून तें शक्य नाही. पण होरेशिओ, मी मेलों तरी तूं जिवंत आहेस. तूं या शंकेखोर असमाधानी लोकांना माझ्याबद्दल आणि माझ्या हेतू-बद्दल नीट सारें समजावून सांग. हा सारा प्रकार असा कांही घडला आहे की, त्यामध्ये कितीएक गोष्टी इतक्या अज्ञात आहेत की, त्यामुळे लोक माझ्याबद्दल नाही नाही ते अपप्रवाद मानतील. म्हणून माझ्यावरील प्रेमासाठी तूं जिवंत राहा, आणि या कठोर जगाला माझी सारी हकीकत सांग."

आपल्या हातून अन्याय होऊं नये, अन्याय झालासें कोणाला वाटूं नये, अशा-बद्दलची आपली तळमळ हॅम्लेटने अशी अखेरच्या क्षणींसुद्धां बोलून दाखवावी, त्याच्या तोंडून नाटककाराने ती वदवावी याला फार मोठा अर्थ आहे. आपण जसजशी आणखी करुण नाटकें पाहूं तसतसा आपल्याला अनुभव येईल की, बहुतेक सर्व करुण नाटकांच्या अंतीं त्यांतील नायकांनी कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत आत्मनिवेदन—आत्मसमर्थन केलेलें आहे. करुण नाटकाच्या रचनेंतील हें वैशिष्ट्य हॅम्लेटमध्येही आढळतें एवढेंच नोंदून ठेवून आपण हें नाटक संपवूं.

याच वेळीं फॉर्टिंब्रास तेथे हजर होतो व त्याच्या तोंडून हॅम्लेटबद्दल शेक्सपीअर एक अभिप्राय आपल्याला ऐकवतो. फॉर्टिंब्रास म्हणतो,

"त्याला वीराचा मान द्या. कारण त्याला संधि प्राप्त झाली असती तर त्याने आपण एक महान श्रेष्ठ राजा आहों हें दाखविलें असतें."

लक्षांत घेण्यासारखें हें आहे की हॅम्लेट एक महान श्रेष्ठ राजा होण्याच्या योग्यतेचा होता हें शेक्सपीअरने आपल्याला फक्त ऐकवलें आहे. तशा त्याच्या प्रत्यक्ष कृती त्याने रंगभूमीवर आपल्याला दाखविल्या नाहीत. खरोखर शेक्सपीअरचा उद्देश काय होता? हॅम्लेट नाटकांत हॅम्लेटचें श्रेष्ठत्व मुद्यापुराव्यानिशी त्याला दाखवावयाचें होतें की एका चांगल्या माणसाचें जीवन अखेर करुण रीतीने कसें नाश पावलें हें दाखवावयाचें होतें? हॅम्लेटचा करुण अंतच त्याला दाखवावयाचा होता म्हटलें म्हणजे पांच अंकांत आणि चार पांच तासांच्या अवधींत रंगभूमीवर जेवढे प्रसंग दाखविणें शक्य आहे,

तेवढ्या प्रसंगांत फक्त या करुण घटनेला पोषक होतील तेवढ्याच गोष्टी दाखविणें हें स्वाभाविक आहे. त्याऐवजी हॅम्लेटचा मोठेपणा दाखविणारे प्रसंग तो दाखवीत बसला असता तर कलावंत या दृष्टीने तो गैरवाकबगार आहे असेंच म्हणावें लागलें असतें.

अर्थात कोणा वाटेल त्या माणसाचा अंत किंवा विनाश वाचक-प्रेक्षकांचें चित्त आकर्षित करूं शकणार नाही, त्यांच्या मनांत करुणा उत्पन्न करूं शकणार नाही; 'अरेरे, हें व्हायला नको होतें ' असे एकप्रकारें अति विषण्णतेचे परंतु त्याच वेळीं जीवनांतील न्याय्य घटनांचा स्वीकार करणारे उद्गार त्यांच्या तोंडून निघणार नाहीत. त्यासाठी त्या माणसाबद्दल – नायकाबद्दल – त्यांना जिव्हाळा वाटला पाहिजे, समभाव वाटला पाहिजे.

हॅम्लेटबद्दल जिव्हाळा कां वाटतो ? —

कशामुळे असा जिव्हाळा हॅम्लेटबद्दल खरोखरी आपणाला वाटतो ? तो राजपुत्र आहे म्हणून ? तो कोणी वीरश्रेष्ठ आहे म्हणून ? मुत्सद्दी आहे म्हणून ? उलट आपण तर पाहिलें की, तो कोण आहे हेंही आपणांस ठाऊक नव्हतें, ज्या वेळीं तो दरबारांत एका टोकाला, विषण्ण चित्ताने स्वतःच्याच तंद्रींत गुंगून बसला होता त्या वेळीं. त्याही वेळीं त्याच्याचकडे आपलें लक्ष वेधलें. पुढे त्याचें दुःख, त्याची तळमळ आपणाला समजली. त्याच्यावर झालेल्या अन्यायामुळे आपण त्याचे पक्षपाती झालों. त्याला त्या अन्यायाचा बदला घेण्याला अवश्य सापडावें अशी आतुर इच्छा आपल्या ठिकाणीं निर्माण झाली. जगांतील अन्यायाबद्दल, पापाबद्दल ज्याला इतकी चीड येते तो मनुष्य सज्जन असला पाहिजे, असें आमच्यांतील पवित्र मानव्य आम्हांला न कळतांच ग्वाही देतें.

आणि त्याचें बदला घेण्याचें हें कार्य कसें काय यशस्वी होतें हें आपण पाहूं लागतों. बदला घेण्याचें म्हणण्यापेक्षा पापी वातावरण विशुद्ध करण्याचें असें म्हणूं या. हा त्याचा प्रयत्न हा या नाटकाचा सर्व गाभा आहे. एक सत्प्रवृत्त परंतु पापाच्या दर्शनानें तळमळत असलेला मनुष्य आणि तें पाप धुवून काढण्याच्या त्याच्या प्रयत्नांत त्याला पदोपदीं नडणारी बाह्य विरोधी परिस्थिति यांच्यामधील झगडा हा या नाटकांतील पायाभूत झगडा आहे. "सगळें कांही दिसतें आहे, पण तोंड उघडायची सोय नाही ", "काळच सगळा उलटापालटा झाला आहे; आणि केवढें दुर्दैव की, जन्माला येऊन त्याची स्थिरस्थावर करण्याचें काम सगळे सोडून माझ्यावर यावें !" या हॅम्लेटच्या उद्गारांत शेक्स्पीअरने हा झगडा किती स्पष्टपणें सूचित केला आहे.

अशा स्थितींत हॅम्लेटच्या स्वभावांतील कांही वैगुण्यामुळेच अखेर सर्व करुण घटना घडल्या हा जो सूर नेहमी ऐकण्यांत येतो त्याला पोषक पुरावा खुद्द हॅम्लेट नाटकांत मिळत नाही. परिस्थितीच्या विरोधामुळे होणारा करुण विपाक आणि स्वभावगत दोषामुळे झालेला करुण विपाक अशीं करुण नाट्यांचीं दोन दालनें परस्परांपासून अगदी भिन्न अशीं असतात की नाही, हें अनेक करुण नाटकांचें विश्लेषण करून आपण

पाहणारच्च आहोंत. परंतु हॅम्लेटमध्ये तशी अवस्था आहे असें म्हणण्याला आधार नाही. कारण, बिकट परिस्थिति आणि तिच्यावर मात करूं पाहणारा एक सत्प्रवृत्त तरुण यांच्यामधील हा झगडा आहे आणि त्यांत कांही वेळां त्याच्या कांहीशा – परंतु परिस्थिति-जन्यच–अस्थिरतेने स्वतःचें साध्य त्याच्या हातून निसटलें आहे, तर कांही वेळां, बऱ्याच अधिक वेळां, परिस्थिती त्याच्या हातांत राहूं शकली नाही हें आतापर्यंत आपण पाहिलें आहे.

खरोखर हॅम्लेट कोणी मोठा श्रेष्ठ पुरुष होता, त्याच्या ठिकाणीं कांही अपूर्व गुणसंपदा होत्या असें पहिल्या अंकांत तर शेक्सपीअरने एवढेंही दाखविलें नाहीं. जें कांही दाखविलें तें म्हणजे त्याच्यापुढे उभें असलेलें एक बिकट दुःख आणि अन्याय दूर करण्याची त्याला वाटत असलेली तळमळ. पुढे जसजसें नाटक रंगत गेलें तसतसे जातांजातां, अगदी सहज, हॅम्लेटचे अनेक स्वभावविशेष आपल्याला दिसून आले. आणि आपण पाहिलें की, या पुरुषाच्या ठिकाणी अनेक परस्परविरोधी स्वभाव-विशेषांचा विचित्र संगम किंवा संघर्ष आहे. तो नास्तिक आहे तसा श्रद्धाळूही आहे. क्षणार्धांत एखाद्या घटनेचें मर्म ओळखून तडकाफडकी निर्णय करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं आहे, तशीच निर्णयापूर्वी खूप विचार करीत राहण्याची प्रवृत्ति त्याच्या ठिकाणीं आहे; भावनाविवश तो होऊं शकतो, पण भावनाविवशतेवर त्याची श्रद्धा नाही. जें जें म्हणून निर्मळ, पवित्र आणि सत्य आहे त्याच्यावर त्याची भक्ति आहे, परंतु व्यवहारकुशलतेने आपले विचार दडवून ठेवायला तो मागेपुढे पाहत नाही. पुढे जो कोणी येईल त्याला त्याच्या स्वभावाची एकच बाजू व्यक्त होते. तो विनयाने वागतो आणि उद्धटपणानेही; तो छद्मी आहे तसाच अगदी निष्कपटपणें सरळ आहे; कोमल आहे आणि कठोरही आहे; अंतःकरण खुलें करून बोलणारा आहे तसाच तिरकस व वक्रोक्तींतही तो कुशल आहे. तो विनोदी आहे आणि उदास वृत्तीचाही आहे; तो अत्यंत निष्ठावान मित्र आहे आणि तरीही जवळजवळ एकाकी आहे; तो प्रेम करतो आणि जिच्यावर त्याने नितांत प्रेम केलें तिच्याशीं तो क्रूरही होतो. ग्रंथांचा आस्वाद घेण्याचें त्याला वेड आहे, तितकाच तरवार चालविण्यांतही तो कुशल आहे; एकीकडे तो जणू एक मोठा तत्त्वज्ञ आहे तर दुसरीकडे तो एक मोठीं कार्यें प्रत्यक्षांत करणाराही आहे, टीकाकार आहे, दरबारी आहे, राजपुरुष आहे. पण एक निश्चित की, हीं त्याच्या बुद्धीचीं आणि स्वभावाचीं जीं विविध अंगें आहेत त्यापैकी कोणत्याही अंगाचें दर्शन आपल्याला घडत असो, प्रत्येक प्रसंगीं तो एक प्रतिभावंत गृहस्थ आहे हें दिसून आल्याशिवाय राहत नाही. अशा संमिश्र व्यक्तीच्या स्वभावांतील एखादेंच अंग घेऊन त्यावर भर द्यावयाचा आणि त्याच्या परिणामाने अमुक करुण घटना घडली असें म्हणावयाचें यामध्ये हॅम्लेटवर अन्याय होतो. असा अन्याय त्याच्या बाबतींत पोलोनिअसने केला, त्याचे दोघे सहाध्यायी रोझेन्क्राट्झ व गिल्डरस्टर्न यांनी केला; तसा टीकाकारांनी करतां कामा नये.

हॅम्लेटच्या अंतरंगांत शिरलें पाहिजे—

अनेक प्रसंगीं झटक्यासरशी निर्णय करणारा हॅम्लेट आपल्या चुलत्याला शिक्षा करण्याच्या बाबतींतच एवढा दीर्घ विचार करीत कां राहतो याचें गूढ उकलणें हें खरोखर टीकाकाराचें काम असावें. हें काम करतांना प्रमुख साधन हॅम्लेट नाटकच असावें. हॅम्लेटचा स्वभाव आणि त्याचें दर्शन घडवितांना शेक्सपीअरने रचलेले प्रसंग यांच्यामधील गूढ फार संमिश्र स्वरूपाचें आहे. कल्पनेनेच तें बहुधा आस्वाद्य आहे. प्रत्यक्षांत त्याचें विवरण करूं गेल्यास आपल्या मनावरील ठसे शब्दगत करणें जवळ जवळ अशक्य होतें असा अनुभव जो जो हॅम्लेटचें वाचन करावें तो तो अधिकाधिक येत जातो. परंतु तरीही हॅम्लेट समजून घ्यावयाचा असेल तर हॅम्लेटच्याच अंतरंगांत शिरलें पाहिजे. त्याच्याबद्दल टीकाकार काय म्हणतात हें पाहून किंवा त्यापैकी एखादेंच स्वतःला रुचणारें विधान सत्य म्हणून गृहीत धरून हॅम्लेटची खरी ओळख पटण्यासारखी नाही.

हॅम्लेट प्रतिभावंत आहे, कवि आहे. तेव्हा त्याच्या भाषणाची रीत काव्यमय आणि विपुल अर्थांतरन्यासांनी विनटलेली असावी हें स्वाभाविकच आहे. तीव्र भावनाभरांत भाषा काव्यमय होणें अपरिहार्य आहे. त्यामुळे राणी आणि क्वचित राजाही काव्यमय भाषेंत बोलतांना आपल्याला आढळतात. अनेक नाटकें पाहिल्यावर आपल्याला आढळून येईल की, बहुतेक सर्व करुण नाटककार आपल्या सर्वच प्रमुख पात्रांच्या तोंडीं काव्यमय भाषा घालतात. अशा भाषेमुळे नाटकामध्ये कृत्रिमपणा उत्पन्न होतो किंवा काय याचा विचार योग्य प्रसंगीं आपण करूंच. परंतु हॅम्लेट नाटकाला तरी या काव्यमयतेने अधिक बहारच चढते असें कोणाही रसिकाला मान्य व्हावें असें वाटतें.

करुण नायकाच्या चित्रणाच्या दृष्टीने हॅम्लेटबद्दल थोडक्यांत पुढील गोष्टी ध्यानांत ठेवून पुढच्या नाटकाकडे आपण वळूं.

(१) हॅम्लेटच्या स्वभावांत हिणकस किंवा पापानुकूल असें नाटककाराने कांही दाखविलेलें नाही.

(२) वाईट किंवा निंद्य अशी कोणतीही गोष्ट त्याच्या हातून घडली नाही, किंवा घडावी असा त्याचा हेतूही नाही.

(३) त्यामुळे कोणी कोणी अवश्य मानतात ती पापप्रेरकाची जरूरीच शेक्सपीअरला या नाटकांत भासलेली नाही.

(४) हॅम्लेटचें मोठेपण **आधी** प्रस्थापित करून **मग** त्याच्याविषयीचें इतर नाटक त्याने मुळीच लिहिलेलें नाही.

(५) हॅम्लेटचा स्वभाव एकमार्गी सरळधोपट नाही. इतका संमिश्र स्वभाव क्वचितच कोणी कोणत्याही वाङ्मयांत चित्रित केला असेल.

(६) यामुळे त्याच्या स्वभावांतील कोणता तरी एखादा विशेष म्हणजेच त्याचा संपूर्ण स्वभाव असें मानून विवेचन करण्यांत गफलत होते.

(७) हॅम्लेटच्या हातून राजाच्या वधाचा निर्णय बहुत काळपर्यंत – किंबहुना जवळ जवळ शेवटपर्यंत घडला नाहीहें खरें असलें तरी तसें होण्याला त्याच्या मार्गांत फार मोठीं दुस्तर कारणें होतीं. अशा स्थितींत अति विचारामुळे कोणताही निर्णय करण्याला तो असमर्थ होता असें म्हणणें म्हणजे हॅम्लेटवर अन्याय करणें आहे.

(८) हॅम्लेट नाटकांतील करुण विपाक निव्वळ स्वभावदोषामुळे झालेला नाही किंवा निव्वळ बाह्य परिस्थितीमुळे झालेला नाही. बराचसा परिणाम बाह्य विरोधी परिस्थितीचा आणि थोडासा हॅम्लेटच्या वृत्तीचा अशी खरोखर वस्तुस्थिति आहे.

(९) हॅम्लेट नाटकांत हॅम्लेट, राणी आणि क्वचित राजाही, यांची काव्यमय भाषा रसिकाला आनंदच देते.

प्रकरण तिसरें

राजा ईडिपस : ॲन्टिगनी व क्रीऑन

१ : राजा ईडिपस

हॅम्लेट नाटक इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या अगदी सुरुवातीचें. त्याच्या-पूर्वी दोन हजार वर्षें मागे जाऊन दोन ग्रीक नाटकें आतां आपण पाहणार आहोंत. शेक्सपीअर हा जसा आधुनिक काळांतील एक अत्यंत श्रेष्ठ करुण नाटककार, तसा त्या एवढ्या जुन्या काळीं, आपण पाहणार असलेल्या या नाटकांचा कर्ता सोफोक्लीस हा एक महान श्रेष्ठ करुण नाटककार म्हणून ओळखला गेला आहे व त्याच्या कलेचा आस्वाद रसिक आज जवळजवळ चोवीसशे वर्षांनंतर तितक्याच गोडीने घेतांना आढळतात; एवढेंच नव्हे, तर करुण नाट्याबद्दलचें शास्त्रीय विवेचन साऱ्या जगांत पहिल्या प्रथमच, आणि तरीही त्यापुढील दोन हजारांहून अधिक वर्षें मार्गदर्शक ठरलेलें अशा प्रकारचें, करणारा ॲरिस्टॉटल याने आपल्या सिद्धांताच्या समर्थनार्थ सोफोक्लीसच्या 'राजा ईडिपस' या करुण नाटकाचा दाखला वारंवार दिला आहे.

हॅम्लेटमध्ये जे कांही प्रश्न आपणापुढे उभे राहिले त्यांच्याशीं समान असे प्रश्न सोफोक्लीसच्या आपल्यापुढील दोन्ही नाटकांत आहेत. त्या दृष्टीनेही हॅम्लेटच्या पाठोपाठ त्यांचा विचार करणें पुष्कळच उचित होईल. हॅम्लेटचा विचार करतेवेळीं जी पद्धति आपण स्वीकारली तीच पद्धति याही वेळीं आपण स्वीकारणार आहोंत. म्हणजे राजा ईडिपस हें नाटक ग्रीक नाट्यगृहांतच पाहायला आपण बसणार आहोंत. हॅम्लेटच्या वेळची रंगभूमीची रचना आधुनिक रचनेहून बरीच वेगळी होती हें खरें; परंतु आपल्या सध्याच्या रंगभूमीवरूनच तें नाटक पाहिलेसें वाटावें अशीं साम्यें ही तिच्यांत पुष्कळशीं होतीं. ग्रीक नाट्यगृह आणि रंगभूमी यांचें तसें नाही. म्हणून त्यांचें यथार्थ दर्शन सुरुवातीला आपल्यापुढे असणें आवश्यक आहे.

या नाट्यगृहाचा विस्तार प्रचंड मोठा असे ही पहिली गोष्ट. इतका मोठा की, ॲथेन्समधील डायोनिसस नाट्यगृहांत एका वेळीं सतरा हजार प्रेक्षकांना बसण्याची सोय होती. ग्रीक नाट्यगृह घोड्याच्या नालासारखें अर्धवर्तुळाकार असे आणि त्याच्या त्या सगळ्या गोल बाजूभर वरवर चढत जाणाऱ्या बैठकीच्या शिड्या असत. नालाचें जें उघडें तोंड तेथे रंगभूमि असे. पण या रंगभूमीची रचना अगदीच निराळी. एक तर तिजमध्ये पडदे मुळीच नसत. समोरच्या बाजूला एक भिंतीसारखें कांही तरी

असून त्या भिंतींतून आंत जाण्याकरिता किंवा बाहेर येण्याकरिता दारें असत. बहुधा दोन्ही बाजूंना दोन लहान दारें आणि मध्यभागीं एक भलें मोठें दार असें. या दारांच्या – भिंतीच्या – आंत एखादा राजवाडा, घर किंवा देवालय आहे अशी समजूत; त्यामधून पात्रांनी बाहेर रंगभूमीवर प्रवेश करावयाचा किंवा त्यांतून आंत परत जावयाचें. याशिवाय नालाच्या उघड्या तोंडाकडील दोन्ही टोकांनी श्रोत्यांना ज्याप्रमाणे नाट्यगृहांत प्रवेश करतां येत असे त्याचप्रमाणे त्या दोन्ही बाजूंनी कांही पात्रांना रंगभूमीवरही प्रवेश करतां येत असे; दूत, सैनिक किंवा अशाच तऱ्हेचीं जीं पात्रें बाहेरून यावयाचीं त्यांच्यासाठी हा मार्ग.

रंगभूमीवर पडदे, इतर नेपथ्यरचनेचीं साधनें वगैरे कांही नसावयाचें. फक्त मध्यभागीं एक प्रार्थनावेदी किंवा उंच कुंड म्हणा आणि त्याच्या दोन्ही बाजूंना अस-ल्यास पुष्कळदा दोन लहान वेदी असावयाच्या. या वेदींच्या आसपास रंगभूमीवर सुरुवातीपासून अखेरपर्यंत कायम असणारा एक मेळावा या नाट्यतंत्राचा एक आवश्यक भाग म्हणून राहावयाचा; तो म्हणजे वृंदगायकांचा ताफा. एक प्रवेश संपला केव्हा आणि दुसरा सुरू झाला केव्हा हें दाखविण्याचें पडद्याचें साधन या रंगभूमीजवळ नव्हतें. त्यामुळे या वृंदगायकांची गरज फार पडे. सुरुवातीसुरुवातीला ग्रीक नाटककार आपल्या नाट्यदर्शनामध्ये फारसे प्रगत झाले नव्हते, त्या वेळीं आपल्या पात्रांची ओळख करून देणें, नाटकांत काय होणार आहे त्याची वेळोवेळीं आगाऊच सूचना देणें, नाटकामधील निरनिराळ्या घटनांतील मर्म उकलून दाखविणें वगैरे कामांसाठी या वृंदगायकांचा उपयोग ते नाटककार करून घेत असत. वृंदगायक जसे चांगले गाणारे असत त्याप्रमाणेच अत्यंत नृत्यकुशल कलावंतांचाही त्यामध्ये भरणा असे. त्यामुळे गायन आणि नर्तन यायोगे प्रेक्षकांना आनंदित ठेवण्याचेंही कार्य या वृंदगायकांकडून होत असें.

जो जो नाट्यरचना अधिकाधिक अर्थवाही व प्रभावी होऊं लागली तो तो वृंदगायकांचा उपयोग त्या मानाने कमी प्रमाणावर होऊं लागला. सोफोक्लीस वृंदगायकांचा उपयोग फारच थोडा करतो. परंतु त्याने आणि त्याच्याच तोडीच्या इतर नाटककारांनी वृंदगायकांचा उपयोग आणखी एका कार्यासाठी केलेला दिसतो. या वृंदगायकांमध्ये त्या त्या नगरांतील कोणीएक प्रतिनिधीभूत अशी वृद्ध व्यक्ति असावयाची असा संकेत आहे. ही वृद्ध व्यक्ति नाटकामध्ये घडत असलेल्या प्रसंगाबद्दल लोकांचें मत काय आहे हें प्रमुख नायकाला आणि त्याचप्रमाणे प्रेक्षकांनाही कळविण्याच्या कामीं सोफोक्लीसादींनी उपयोगांत आणलेली आढळते.

अशा एका ग्रीक नाट्यगृहांत चांगलीशी जागा घेऊन आपण बसलों आहोंत. थीब्सि नगरांतील राजवाड्याची दर्शनी भिंत आपल्यासमोर आहे. मध्यभागीं भला मोठा दरवाजा आहे; त्याच्यासमोरच मोठी वेदी आहे; बाजूला दोन लहान वेदी आहेत;

आणि त्यांच्या पायऱ्यांवर वृद्ध पुरुष आणि मुलें बसलीं आहेत. त्यांनी ऑलिव्ह वृक्षांच्या डहाळ्या, त्यांच्यामध्ये मधून मधून लोकरीचे धागे गुंतवून, वेदींवर वाहिल्या आहेत. देवांची पूजा आणि प्रार्थना करण्याची ग्रीकांची ही एक रीत होती. सर्व माणसें बसलेलीं आहेत. परंतु झ्यूस देवाचा वृद्ध आणि आदरणीय मुख्य पुजारी तेवढा आपल्यासमोर ताठ उभा आहे. अपेक्षेप्रमाणे आज वृंदगायक गातही नाहीत अथवा नाचतही नाहींत. याऐवजी राजाचा पोशाख केलेली एक व्यक्ति मधल्या मोठ्या दरवाजांतून रंगभूमीवर प्रवेश करते, कांही क्षण स्तब्धपणें, वेदीवर बसलेल्या लोकांकडे पाहत राहते आणि मग बोलूं लागते.

त्या व्यक्तीचें नांवही आपल्याला अजून कोणी सांगितलेलें नाही. तो राजपुरुष आहे एवढेंच आपण ओळखतों. एक विशेष म्हणजे तो जें पहिलेंच भाषण करतो, त्यांत नेहमी माणसें घरगुती संभाषण करतात त्यामधील एवढीही छटा नाही. मूळ ग्रीक भाषेंत या नाटकांतील भाषणांची रचना प्रत्यक्ष वृत्तबद्धच आहे. परंतु इंग्रजी गद्य भाषांतरांत सुद्धा अत्यंत रेखीवपणा, एक प्रकारची लयबद्धता, अलंकारिकता, तालबद्धता आणि घरगुती खेळकरपणाचा अभाव जाणवून यावा असें कांहीसें पांडित्य हे गुणविशेष साधलेले प्रत्ययाला येतात.

कृत्रिम अलंकारिक भाषेची अपरिहार्यता—

अशी कांहीशी कृत्रिम भाषा या नाटकांतून वापरली जाणें ग्रीक रंगभूमीच्या दृष्टीने अपरिहार्य होतें. श्रोत्यांची संख्या फार मोठी आणि रंगभूमीपासून त्यांची बसायची जागा बरीच दूर, त्यामुळे या रंगभूमीवर मुद्राभिनयाला मुळीच अवसर नव्हता. यामुळे असो किंवा पुराणकालांतील व्यक्तींचें साम्य दर्शविण्याच्या हेतूमुळे असो, नाट्यांत सर्वच पात्रें मुखवटा घालून काम करीत. अर्थात् आंगिक स्थूल हालचाली आणि भाषा—वक्तृत्व—एवढ्याच साधनांनी प्रेक्षक-श्रोत्यांना गुंतवून ठेवणें नटांना शक्य होतें. त्यांतल्या त्यांत करुण नाट्याच्या गंभीर वातावरणांत आंगिक स्थूल हालचालींना अवसर फारच कमी. तेव्हा सारा भर नटाच्या बोलण्यांतील कौशल्यावर. त्यासाठी श्रोत्यांच्या चित्ताची अचूक पकड घेणारी काव्यमय आणि वक्तृत्वपूर्ण भाषा आवश्यकच होती. सोफोक्लीसचीं नाटकें वाचतांना विशेष प्रत्यय असा येतो की, अशीं काव्यमय आणि वक्तृत्वपूर्ण भाषा वापरून सुद्धा त्याने भाषणांत बोजड कृत्रिमता भासूं दिलेली नाही, किंवा निव्वळ ध्वनिमयतेच्या नादांत तो कोठे वाहवत गेला नाही. भाषेंतील काव्यमयतेचें सोफोक्लीसच्या बाबतींत आणखी एक कारण होतें. परंतु नाटक थोडेंफार पाहून झाल्यावरच त्यासंबंधी निर्देश करूं.

तो राजपुरुष आपल्या तालबद्ध भाषणांत प्रथमच सांगतो की, तुम्ही सगळी मंडळी येथे देवाची प्रार्थना करण्यासाठी जमला आहांत हें कळून मी—सर्व मानवांत श्रेष्ठ म्हणून

गाजलेला मी ईडिपस – याचें कारण काय हें विचारण्यासाठी येथे आलों आहें. त्यावर झ्यूसचा पुजारी त्याला लोकांच्या येण्याचें कारण कथन करतो. थीब्सि नगरीमध्ये महान साथीच्या रोगाने थैमान घातलें होतें; शेतें फुलत नव्हतीं; स्त्रियांचे गर्भपात होत होते. मग यासाठी लोकांनी ईडिपसकडे कां यावें ? तो काय मानवांना प्रार्थनोत्तर सर्व संकटांतून पार करणारा परमेश्वर थोडाच होता ? म्हणूनच पुजारी सांगतो की, देव म्हणून नव्हे, तर सर्व मानवांहून अधिक दैववान आणि अधिक सामर्थ्यशील पुरुष म्हणून लोक त्याच्याकडे, त्याने आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या बळावर किंवा त्याला जर देवाचें कांही साह्य असेल तर त्याच्या बळावर लोकांच्या या भयाण अवस्थेवर कांही उपाय काढावा अशी विनंति करण्यासाठी आले होते.

त्याच्या ठिकाणीं एवढें सामर्थ्य लोकांनी कां कल्पावें ? दुसऱ्या राज्यांतून सहज फिरत फिरत तो थीब्सिमध्ये बऱ्याच वर्षांपूर्वी आला होता; त्या वेळी स्फिंक्स नांवाच्या एका आसुरी देवतेने थीब्सिमधील जनतेला हैराण केलें होतें. डोकें स्त्रीचें, शरीर सिंहाचें आणि पक्ष्याप्रमाणे पंख असलेले, अशा या आसुरीने थीब्सिच्या लोकांपुढे एक कोडें ठेवलें होतें; लोकांनी तें सोडवावें नाहीतर तिचें भक्ष्य व्हावें असा तिने सपाटा चालविला होता. हें कोडें अचानकपणें ईडिपसने सोडविलें; त्याच्या चातुर्याने थीब्सिचा बचाव झाला. लोकांनी त्याला आपला राजा केलें; नुकत्याच मरण पावलेल्या लिअास राजाच्या राणीशीं त्याने विवाह केला. त्याच्या लोकोत्तर सामर्थ्यावर लोकांचा विश्वास बसण्याचें हें कारण होतें.

श्रेष्ठत्वाचें निव्वळ कथन मात्र —

ही हकीकत पुढे नाटकांत आपण वारंवार ऐकूं. या ठिकाणीं मात्र, पूर्वीची कसलीही माहिती नसतांना ईडिपसने स्फिंक्सचें तें कोडें सोडविलें आणि त्यामुळे लोक त्याला श्रेष्ठ पुरुष मानूं लागले, तो आपला संकटहर्ता आहे असा त्याच्यावर त्यांचा विश्वास बसला एवढेंच आपल्याला कळतें. पण ध्यानांत घ्यावयाचें हें की, हें निव्वळ कथन मात्र आहे. असा प्रसंगच आपल्यापुढे रंगभूमीवर प्रत्यक्ष दाखविण्याचें कारण सोफोक्लीसला वाटलें नाही. कथनाच्या रूपाने तो जें सांगतो त्यावर विश्वास ठेवण्या-इतके आपण सुबुद्ध श्रोते आहोंत अशी त्याची खात्री होती; आणि नाटकांत काय दाखवायचें होतें तें त्याच्यापुढे अगदी स्वच्छ असल्यामुळे इतर फापटपसाऱ्यांत पड-ण्याचें प्रयोजन त्याला वाटलें नाही.

सोफोक्लीसचें साध्य – बीज —

कारण त्याचें हें साध्य, या नाटकांतील झगड्याचें स्वरूप, नाटकाचें बीज थोड्याच वेळांत आपल्यासमोर सोफोक्लीस उभें करतो. लोकांच्या हालअपेष्टांची आपल्याला कल्पना आहे, पण हा प्रसंग असा आहे की, देवाचा कौल मागितल्याशिवाय अन्य उपाय नाही व त्यासाठी आपण आपला मेहुणा क्रीऑन याला फीबसच्या देवालयांत

पाठविलें आहे, एवढेंच सांगून राजा थांबत नाही यांत रहस्य आहे. तो पुढे म्हणतो, "क्रीऑन संदेश घेऊन येऊं दे; मग देवाच्या संदेशाप्रमाणें मी वागलों नाही तर मी सच्चा माणूसच नव्हे."

ही एवढी प्रतिज्ञा कांही उगीच सुखासुखी येथे आणलेली नाही. देवाचा संदेश आणि तो पाळण्याच्या बाबतींतील ईडिपसची खळखळ यामधील झगडा हा या नाटकाचा प्राण आहे हें येथे नाटककार स्पष्टपणें सूचित करतो आहे. देवाच्या संदेशाचा अर्थ जसजसा अधिकाधिक स्पष्ट होत जातो, तसतशी राजाची अधिकाधिक तळमळ होते; त्या संदेशाच्या अपरिहार्य परिणामापासून तो स्वतःला बचावूं पाहतो, प्रसंगीं भ्रमही निर्माण करतो आणि त्याला स्वतःच बळी पडतो. पण अखेर ही सर्व धडपड व्यर्थ आहे हें ओळखतांच त्याच्यांतील सच्चेपणाच प्रभावी होतो. पुढच्या या सर्व नाटकाची गर्भित सूचना नाटककाराने त्याच्या या प्रतिज्ञेने येथे दिलेली आहे.

लगेचच क्रीऑन संदेश घेऊन येतो;* परंतु तो संदेश सर्वांसमक्ष न सांगतां आंत जाऊन सांगावा अशी त्याची इच्छा असते. तथापि राजा त्याला तसें करूं देत नाही. कारण तो म्हणतो, "मी जो दुःखभार वाहतों आहें तो माझ्या स्वतःच्या प्राणरक्षणासाठी नव्हे; तो या जनतेसाठी आहे." नाटकांतील झगड्याचें हें दुसऱ्यांदा दर्शन लगेचच आहे. जनतेचें हित आणि स्वार्थ, सत्य आणि स्वार्थ यांमधील हा झगडा आहे.

यानंतर क्रीऑन देवाचा संदेश सांगतो. थीब्सच्या राज्यामध्ये एक महान पापी व्यक्ति आहे; या व्यक्तीने थीब्सचा राजा लिआस याचा खून केला आहे. ती व्यक्ती थीब्सच्या राज्यांत आहे तोवर थीब्सवरील संकटाचें निवारण होणार नाही; हा तो संदेश.

स्वाभाविकच इतक्या दूरच्या काळांतील खुनाचा पत्तामुद्दा कसा काय सापडणार असा राजाला प्रश्न पडतो. उलटसुलट प्रश्नोत्तरांत एक धागा त्याला सापडतो; असा की, राजाबरोबरच्या सेवकांपैकी फक्त एक माणूस भीतीने पळून गेला म्हणून वांचला आणि त्या माणसाचें सांगणें असें होतें की, पुष्कळ दरोडेखोरांच्या हातून राजा मरण पावला.

या ठिकाणीं प्रथम ईडिपसच्या मनांतील संशय जागा झाला. असा एक धागा जर उपलब्ध होता तर त्याच्या मागाने खुनाचा तलाश का झाला नाही? दरोडेखोरांशीं राज्यांतील कोणाचा तरी लाचलुचपतीचा संबंध असल्याशिवाय राजापर्यंत त्यांचे हात पोचूं शकले नाहीत असें त्याला वाटतें. परंतु लगेचच स्फिंक्सचें संकट उभें राहिल्यामुळे हा शोध होऊं शकला नाही, या क्रीऑनच्या खुलाशावर तात्पुरतें समाधान मानून ईडिपस या खुनाचा तपास लावण्याचा निर्धार जाहीर करतो. त्याच्यावर विश्वासून लोक घरोघर निघून जातात. येथे पहिला प्रवेश, किंवा अंक म्हणा, पुरा होतो.

राजा ईडिपस आंत गेल्यावर वृंदगायकांचें गाणें सुरू होतें. त्यामध्ये थीब्सला

अनुकूल असलेल्या अनेक देवांची प्रार्थना करून देशावरील संकटाचें निरसन करण्या-बद्दल आणि स्त्रिया गर्भवती राहून चांगल्या रीतीने प्रसूत व्हाव्यात याबद्दल विनंति केली जाते. सुरुवातीला वृंदगायक आर्त आक्रंदन करीत असतांना, "आम्ही सत्यानाशाच्या टोकावर आहोंत, प्रबळ भीतीने आमच्या अंतःकरणाचा थरकांप होतो आहे" असें वाक्य आहे. त्याचा संदर्भ केवळ सद्यस्थितीशींच नसावा; लौकरच उठूं पाहणाऱ्या प्रचंड तुफानाची ही गर्भित सूचना असावी असें वाटल्यावांचून राहत नाही.

वृंदगायकांचें गान संपत असतांना राजा ईडिपस पुन्हा बाहेर येतो. त्या वेळचें त्याचें भाषण फार मोठें आहे. त्यामध्ये पुष्कळ सुंदर पताकास्थानें आहेत. "लिआ-सच्या मृत्यूशीं माझा कांही संबंध नाही, त्यानंतर तर मी तुमच्यांत आलों. तेव्हा मी जो जाहीरनामा काढीत आहें त्यामुळे खुनाचा शोध लागण्याचा जास्तींत जास्त संभव आहे" असें राजा म्हणतो त्या वेळीं, किंवा "जर कोणी भीतीनें आपल्या मित्राला किंवा स्वतःला लपवून ठेवूं पाहील तर" असें जेव्हा तो म्हणतो त्या वेळीं त्याबद्दलची शिक्षा त्यालाच भोगावी लागणार आहे हें राजाला स्वतःला माहीत नसलें तरी श्रोत्यांना तें माहीत आहे किंवा त्याचा वास आलेला आहे. पुढे तो जेव्हा म्हणतो की, "हा सगळा शोध आणि ही सगळी शिक्षा मी जणू काय माझ्या स्वतःच्या पित्यासाठीच योजलेली आहे असें समजा" त्याही वेळीं असेंच एक केवढें सुंदर पताकास्थान निर्माण होतें. अशीं मनोहर पताकास्थानें या नाटकांत पदोपदीं आपणाला भेटतील.

परंतु तो आपला विषय नाही. मुद्याची गोष्ट अशी की, लिआसचा खून करणाराला आश्रय देण्याचा, त्याला लपविण्याचा कोणी प्रयत्य करूं नये; जो खुनी म्हणून सापडेल त्याच्यावर सर्वांनी कडक बहिष्कार घातला पाहिजे, त्याच्याशीं कोणी बोलतां उपयोगी नाही, किंवा त्याचे धार्मिक विधि कोणी करतां उपयोगी नाही; असा मनुष्य खुद्द माझ्याच घरांत सांपडला तरी त्याची अशी दशा करायला मी मागेपुढे पाहणार नाही, अशी राजा घोषणा करतो.

परंतु प्रश्न असा होता की, खुनी माणूस सांपडावा कसा? फीबसने संदेश पाठविला खरा, परंतु खुनी माणसाचा कांही पत्ता सांगितला नाही. या गोष्टीला उद्देशून राजा ईडिपस जेव्हा म्हणतो, "खरें आहे; पण देवाच्या मनांत जें करायचें नसतें तें करायला पृथ्वी-वरील मानव देवाला कधीच भाग पाडूं शकणार नाही" तेव्हा आपल्याला हॅम्लेटची आठवण झाल्याशिवाय राहत नाही; म्हणजे या श्रेष्ठ पुरुषालाही सामान्य न्याय सूत्रात्मक रीतीने सांगण्याची लकब आहे तर!

अखेर असा पर्याय निघतो की, थीबिसचा प्रसिद्ध अंतर्ज्ञानी पुरुष वृद्ध तैरेसियास याला बोलवावें. राजाने ही गोष्ट आधीच केलेली केलेली असते. थोड्याच वेळांत हा अंतर्ज्ञानी वृद्ध पुरुष तेथे येतो. त्याच्याविषयी आणि त्याच्याशीं बोलतांना अनेक पताकास्थानें निर्माण होतात; अर्थांतरन्यासही चमकतात. परंतु राजा जेव्हा त्याची

विनवणी करतो की, "तुझा अंतर्ज्ञानाचा जो कांही मार्ग असेल तो अवलंबून, या राज्याला, मला आणि मृत्युमुळे ज्यांना ज्यांना म्हणून अशुद्धता आणि विपत्ति सोसावी लागत आहे त्या सर्वांना तूं संकटांतून सोडीव" त्या वेळीं आपल्यापुढे कोणतें संकट वाढून ठेवलेलें आहे हें न समजून मोठ्या आवेशाने बोलणाऱ्या राजाची आपल्याला दया आल्यावांचून राहत नाही.

राजाच स्वतः आपत्तीचें कारण? —

राजाची ही विनवणी ऐकल्यावर तैरेसियासला तेथे आल्याबद्दल वाईट वाटतें. "मी मोठा ज्ञानी; पण ज्ञान्यालाच आपल्या ज्ञानाचा उपयोग होणार नसेल तर तें ज्ञान केवढें भयंकर" असें म्हणून तो आपली खिन्नता व्यक्त करतो. यापुढचा तो आणि राजा यांच्यामधील सर्वच संवाद मोठाच खटकेबाज आहे. तैरेसियास घरी जाऊं इच्छितो. राजाने आपल्याला कांही सांगायला लावूं नये आणि दोघांनाही दुःखी करूं नये असें तो विनवतो. माझ्यापासून तुला कांही कळणार नाही असेंही निक्षून सांगतो. दोघे एकमेकांवर रागावतात. थीब्सिच्या भवितव्याबद्दल तुला फिकीरच नाही असें राजा त्याला वाक्ताडन करतो. तर 'भविष्यांत जें व्हायचें असेल तें होईल; मीं तें बोलून नाही दाखविलें म्हणून काय झालें?" असें तैरेसियास तात्त्विक उत्तर देतो. त्याच्या तोंडून सत्य गोष्ट ऐकायला राजा अधीर झाला आहे, श्रोतेही अधीर झाले आहेत. राजा त्याला टोला देतो, "जें होणार आहे तें होणारच हें जर तुला ठाऊक आहे तर सांगायला तुला हरकत कोठली?" तरी सुद्धा तो जेव्हा उत्तर देण्याला कां कूं करतो तेव्हा पहिल्या प्रवेशांत राजाला आलेला संशय पुन्हा जागा होतो; आणि तूंच राजाच्या खुनाच्या कटाचा सूत्रधार असला पाहिजेस" असा निर्घृण आरोप राजा तैरेसियासवर करतो. तेव्हा वेभान होऊन तैरेसियास बोलून जातो, "तर मग माझा तुझ्यावर आरोप आहे की, या भूमीवर अपवित्रता आणणारा हा तूंच स्वतः आहेस; आता तुझ्या घोषणेप्रमाणे शिक्षा भोगायला तूं तयार हो."

झगड्याचें स्वरूप: स्वार्थ विरुद्ध सत्यनिष्ठा —

अर्थात राजाला आपल्या हातून कांही पाप घडलें आहे अशी यत्किंचितही जाणीव नाही. तेव्हा, "असा आरोप करून तूं मोकळा सुटशील असें कोणत्या सामर्थ्यामुळे तुला वाटतें?" असें राज़ा त्याला गुरकावून विचारतो. त्यावर तैरेसियासने दिलेलें उत्तर या नाटकांतील झगड्याचें स्वरूप एका वेगळ्या रीतीनें स्पष्ट करते. तो म्हणतो, "मी आधीच मोकळा झालों आहें; माझी सर्व शक्ति सत्यामध्ये आहे."

एक पक्ष सत्याचा व दुसरा सत्तेचा असेंही या झगड्याचें स्वरूप आहे. सत्तेचा वापरही स्वार्थासाठी व्हावयाचा आहे. म्हणजेच स्वार्थ आणि सत्यनिष्ठा यामधील हा झगडा आहे.

•

स्वार्थामुळे, भीतीमुळे राजाचा संशय दुणावतो. तैरेसियासच्या ज्ञानीपणाचा फायदा घेऊन कोणी तरी आपल्या विरुद्ध हें कपटकारस्थान रचलें आहे असें वाटून राजा सत्याला पाठमोरा होतो. जो जो राजा तैरेसियासला लावून टोचून बोलूं लागतो तो तो तैरेसियास अधिकच भडकतो; "तूंच खुनी आहेस, तुझ्या अगदी जवळच्या व्यक्तीशीं, तुला कल्पना होणार नाही इतका लज्ज्जास्पद संबंध तुझा आहे" असे आरोपामागून आरोप तो राजावर करतो. पुन्हा सांगतो की, माझा सर्व आधार सत्य आहे. "तूं तर बहिरा आहेस, आंधळा आहेस आणि बुद्धीच्या सामर्थ्याला मुकलेला आहेस; तेव्हा सत्याचा आणि तुझा संबंधच काय?" असा टोमणा राजा त्याला मारतो. त्या वेळीं, 'असे टोमणे उच्चारतो आहेस तूं, हे दुर्दैवी मनुष्या; पण थोडक्यांतच माणूस न् माणूस तुला हींच विशेषणें बहाल करणार आहे" अशी भविष्यवाणी तैरेसियास घोषित करतो. त्यावर राजा म्हणतो, "आंधळ्या, कशाला ही वटवट? तुझ्या हातून माझें तर नाहीच, पण इतरही कुणाचें काही वाकडें होणार नाही," आणि त्यावर तैरेसियासचें उत्तर येतें, "माझ्या हातून तुझें कांही वाईट कशाला व्हायला हवें? जें करायचें तें अपोलो देवच करणार आहे."

हा बावळा आंधळा माणूस इतक्या नेटाने तोंड वर करून बोलतो तेव्हा त्याच्या पाठीशीं दुसऱ्या कोणाची अक्कल असली पाहिजे हा विचार राजाच्या मनांत चमकून उठतो. सुरुवातीलाच त्याला शंका आली होती की, राजधानींतूनच कांहीं कट शिजून लिआंसचा खून झाला असावा. या खुनाचा फायदा सर्वांत जास्त कुणाला? क्रीऑनला. कारण राजाचा पुत्र मेला होता (अशी सर्वांची समजूत होती). पण मध्येंच तें स्फिंक्सचें कोडें प्रकरण उपटलें. आणि अभावितपणें राजपद क्रीऑनऐवजी आपल्याला मिळालें. तेव्हां क्रीऑनचाच हा नवा कट असला पाहिजे; देशांतील साथीचा फायदा घेण्याचा त्याचा हा प्रयत्न असला पाहिजे; अशा रीतीने त्या मूळ संशयाचें दृढीकरण होऊन राजा तैरेसियासला विचारतो, ".ही अक्कल तुझी की क्रीऑनची?" त्यावरचेंही तैरेसियासचें उत्तर लक्षांत घेण्यासारखें आहे. तो म्हणतो "क्रीऑन कांही तुझा नाशकर्ता नाही. तुझा नाशकर्ता तूंच आहेस."

क्रीऑनचा संशय—

परंतु सत्यापासून पाठ फिरविण्यासाठी क्रीऑनबद्दलचा हा संशय हें राजाला चांगलेंच साधन मिळालें होतें. म्हणून तो तेरेसियासवर क्रीऑनच्या सल्ल्याने त्याने हे सगळे आरोप केले असा आरोप करतो. या वेळी वृंदगायकांचा पुढारी लोकमत बोलून दाखवितो की, तुम्ही दोघे रागाच्या आधीन झाला आहां; अशा रागाच्या भाषणाने आमच्या राज्याचें हित होणार नाही. तेव्हा फीबसने दिलेला आदेश आम्हीं कसा अमलांत आणावा हें तुम्हीं सांगितलें पाहिजे.

परंतु स्वतःच्या आंधळेपणाचा उल्लेख केल्यामुळे संतापलेला तैरेसियास शांत न

होतां राजाला आणखीच कटु शब्दांचा आहेर करतो. तो म्हणतो, " मला तूं आंधळा म्हणतोस. माझे तर डोळे गेले आहेत. परंतु तुझे डोळे उघडे असूनही तूं केवढ्या अनिष्ट अवस्थेंत राहत आहेस, कोठे राहतो आहेस, कोणाबरोबर राहतो आहेस हें तुला दिसत नाही. तूं मुलगा कोणाचा हें तरी तुला ठाऊक आहे? तुझ्या अगदी रक्तामासाच्या माणसाचा तूं शत्रू कसा झालास हें तरी तुला माहीत आहे? आईचा आणि बापाचा असा दुहेरी शाप या राज्यांतून तुझी हकालपट्टी करील आणि तुला पुढचे स्वच्छ दाखविणारे तुझे डोळे आंधळे होणार आहेत हें तरी तुला माहीत आहे काय?"

स्वार्थभावना प्रबळ होते —

यापुढील नाटकाचा विकास कोणत्या दिशेने आणि कोणत्या अखेरीपर्यंत होणार आहे याची या ठिकाणीं नाटककाराने आपणांला संपूर्ण कल्पना दिली आहे. परंतु रागाच्या भरांत राजाला हें सत्यदर्शन होऊं शकलें नाही. स्वार्थाने त्याची दृष्टि आताच अंध झाल्यासारखी झाली. त्यामुळे तैरेसियासशीं तो आणखी तणातणी करतो. त्यामुळे तैरेसियास आपला आशय स्पष्ट शब्दांत नसला तरी अधिकाअधिक उघड करीत जातो. " आजच तुझ्या जन्माची कहाणी उजेडांत येऊन तुझा नाश होईल, " तूं तर कोडीं सोडविणारा माणूस, तेव्हा तुला माझ्या बोलण्याचा अर्थ समजला पाहिजे; हें कोडें तूं सोडविलेंस की त्यांतच तुझा नाश झाला " अशीं ध्वनिपूर्ण, तुटक वाक्यें तो पेरीत जातो. या छोट्या छोट्या भेदक वाक्यांनी राजाच्या अंतःकरणाचें तर पाणी पाणी झालेंच असणार; परंतु आपणा प्रेक्षक-श्रोत्यांच्या अंतःकरणाचाही थरकाप झाल्यावाचून राहत नाही.

आणि तरीही उदार प्रकृति लोपत नाही —

परंतु यांतही राजाच्या स्वभावाची उदार बाजू एका वाक्यांतच व्यक्त होते. "माझ्या नगराचें संरक्षण होत असेल तर माझा नाश खुशाल होऊं दे" हें तें त्याचें वाक्य. परंतु रागांत हें तैरेसियासच्या ध्यानांत येत नाही. आणि तो पुन्हा निक्षून सांगतो, " लिआसचा खुनी येथेच आहे; तो परदेशी पाहुणा नाही; थीब्सचाच रहिवासी आहे; या ठिकाणीं त्याला वैभव प्राप्त झालें आहे. पण त्यापासून त्याला आनंद होणार नाही. आज डोळे आहेत त्याला, पण तो आंधळा होईल; आज श्रीमंत असलेला तो भणंगभिकारी होऊन देशाबाहेर हाकलला जाईल; आपल्या मुलांचा तो बापही आहे आणि भाऊही आहे असें आढळून येईल. एकाच स्त्रीचा तो मुलगा आणि पति आहे; बापाच्या कामशय्येचा तो उपभोक्ता वारस आहे आणि बापाचा खुनी आहे." आणि राजाला शेवटीं तो बजावतो, " आंत जाऊन याचा नीट विचार कर, आणि मग जर तुला आढळलें की, माझें बोलणें खरें नाही, तर मग म्हण की, मी अंतर्ज्ञानी मनुष्य नाही म्हणून."

या ठिकाणीं दुसरा प्रवेश किंवा अंक संपतो. नंतर रीतीप्रमाणे वृंदगायकांचें गायन. त्यामध्ये जनतेतर्फे म्हणून एक मुद्दा पुढे केला आहे. ईडिपसवर दोष चिकटविण्याचा अंतर्ज्ञानी भविष्यवेत्त्याचा प्रयत्न आहे. पण हें खरें कसें मानावें ? पॉलिब्रसचें घराणें आणि लिआसचें घराणें यांच्यामध्ये वैरभाव असल्याचें कोणाच्या ऐकिवांत नाही. अशा स्थितींत पॉलिब्रसच्या पुत्राने – ईडिपसने – लिआसचा खून कां करावा ? तरीपण भविष्यवेत्त्याचें म्हणणें तसें; त्याला आमच्याहून कितीतरी दूरची दृष्टि आहे. परंतु तरीही योग्य पुराव्यावांचून, केवळ त्याच्या मतामुळे आम्ही ईडिपसला दोषी धरणार नाही. त्याने या राज्याला केवढ्या दिव्यांतून वांचविलें आहे; केवढ्या दिव्यांतून तो परीक्षेला उतरला आहे; आमच्या मनाला तरी तो दोषी आहे असें मान्य होणार नाही.

एवढ्या सुमारास क्रीऑन प्रवेश करतो. राजाने त्याच्याबद्दल घेतलेला संशय त्याला कळला आहे, त्याने तो संतप्त झालेला आहे. वृंदगायकांकडून तो राजाचे प्रत्यक्ष शब्द काय होते याची माहिती काढून घेतो. राजाने बुद्धि आणि दृष्टि पूर्ण स्थिर आणि शाबूत असतांना हा आरोप केला ना हें तो खरावून घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु वृंदगायकांचा पुढारी तें सांगण्याची टाळाटाळ करीत असतांनाच ईडिपस प्रवेश करतो.

ईडिपस व क्रीऑन — क्रोधवशता व सत्याधिष्ठान यांच्यामधील वाग्युद्ध —

यानंतर त्या दोघांचा जो संवाद झाला तो सोफोक्लीसने इतक्या सुंदर रीतीने वठविला आहे की मन स्तिमित होतें. भेदिक तमाशांत ज्याप्रमाणें उत्तराला उत्तर, ठोशाला ठोसा, अलंकाराला प्रति अलंकार, कोड्यावर कोडें अशी नुसती झटापट दोन पक्षांमध्ये चालते तशी झटापट या ठिकाणीं इतक्या लयबद्ध रीतीने चालते की, एकदा ईडिपसकडे तर एकदा क्रीऑनकडे झुकत सारे प्रेक्षकश्रोते नुसते दोलायमान राहत असतील आणि इतर आजूबाजूचें कशाचें कांही त्यांना भान राहत नसेल.

ईडिपस हा क्रोधाच्या आहारीं गेलेला आहे ; क्रीऑन धीरगंभीर आणि अविचलित आहे. एका बाजूला स्वार्थाचें बोलणें आहे; दुसऱ्या बाजूला सत्याचा दृढ आधार आहे. स्वार्थ आणि सत्य यांमधील हें द्वंद्व मोठें विलोभनीय आहे. पुढेपुढे क्रीऑनच्या सत्यावर आधारलेल्या गांभीर्यापुढे ईडिपसला थोडें तरी वाकावें लागतें. क्रीऑनचा एक शब्दही ऐकून घ्यायला प्रथम जेथे तो तयार नव्हता तेथे त्याचें एक भलें मोठें भाषण तो अखेरीस ऐकून घेतो. प्रत्यक्ष राजा होऊन लोकांच्या शिव्याशापांचा धनी होण्यापेक्षां राजाचे सर्व अधिकार अप्रत्यक्षपणें हातीं असून लोकप्रिय राहणें हेंच मी अधिक पसंत करतों हें क्रीऑन ईडिपसला मोठ्या मुद्देसूद रीतीने समजावून सांगतो. शिवाय जेथे पुरावा मिळणें शक्य आहे तेथे नुसत्या तर्कावर कां अवलंबून राहावेंस तूं ? असा विनतोड प्रश्न तो ईडिपसला करतो. फीबसच्या देवालयांत जा आणि मीं आणलेला संदेश बरोबर आहे की नाही हें पडताळून पाहा;

एकदम एखाद्या माणसाबद्दल मत बनविणें बरोबर नाही. मनुष्य सच्चा की लुच्चा हें कालांतराने, अनुभवांतीं ठरवायचें असतें. परंतु तुला तर चार प्रहरांमध्ये मनुष्य दुष्ट आहे हें ठरवायची घाई झाली आहे. अशा तऱ्हेचें क्रीऑनचें तें भाषण ऐकून, वृंदगायकांचा पुढारी एकदम स्फूर्तीसरशी म्हणतो.

"अगदी खरें आहे हें म्हणणें; नीट विचार करून न वागणारा पतन पावतो; सहसा विदधीत न क्रियाम् अविवेकः परमापदाम् पदम्!"

ईडिपसच्या अविवेकी वर्तनाचा चित्रपटच —

या त्याच्या शेऱ्यांत, श्रेष्ठ राजा ईडिपसचें वर्तन अविचारीपणाचें होत असून त्यामुळे तो पतन पावण्याची भीति उत्पन्न झाली आहे हें नाटककर्त्याने आपल्याला अगदी स्पष्ट सांगितलेलें आहे. यापुढें सर्व नाटक म्हणजे ईडिपसच्या अविवेकी वर्तनाचाच चित्रपट आहे.

त्याचमुळे क्रीऑनच्या इतक्या स्पष्ट खुलाशानंतरही ईडिपस भानावर यायला तयार नाही. क्रीऑन स्पष्टपणें त्याला बजावतोही की, "राजा तूं, शुद्धीवर नाहीस." तरीही राजा त्याच्यावर आरोप करीत राहतो की, तूं खोटा माणूस आहेस.

त्यावर क्रीऑनने विचारलेला प्रश्न, त्यावर राजाने दिलेलें उत्तर आणि त्यानंतरचें क्रीऑनचें प्रत्युत्तर यांना ईडिपसच्या स्वभावाच्या दृष्टीने जसें महत्त्व आहे तसेंच नाटककाराच्या मनांत एका केवढ्या सार्वकालीन महत्त्वाच्या समस्येने घर केलें होतें हें दाखविण्याच्या दृष्टीनेही त्यांचें महत्त्व आहे. हीं उत्तर-प्रत्युत्तरें अशीं आहेत.

क्रीऑन: पण तुला समजण्याचेंच सामर्थ्य नसलें तर तुझा निर्णय काय कामाचा?

ईडिपस: तसें असलें तरी माझाच हुकुम चालला पाहिजे.

क्रीऑन: मुळीच नाही; तुझी हुकुमत अन्यायी असेल तर ती मुळीच चालणार नाही.

सत्याविरुद्ध, न्यायाविरुद्ध चालणारी सत्ता ही सत्ता म्हणून मान्य करतां कामा नये हा आग्रह या ठिकाणीं क्रीऑनने प्रकट केला आहे. सत्ता सत्ताधीशाची नव्हे, तर न्यायाची पाहिजे, सत्याची पाहिजे. चोवीसशे वर्षांपूर्वी हा प्रश्न सोफोक्लीसला इतका महत्त्वाचा वाटत होता की, आपण पुढे पाहणार आहोंत त्या अँटिगनी नाटकांतही त्याने हाच झगडा त्या नाटकाचा मूलभूत झगडा केला आहे. दैवगति अशी की, या नाटकाच्या वेळीं सत्याच्या बाजूने भांडूं पाहणारा क्रीऑनच त्या नाटकांत राजा झाल्यावर, "बरोबर असो की चुकीचा असो, राजाचा हुकुम पाळला गेलाच पाहिजे" असा आग्रह हटवादीपणाने धरतो आणि त्यापायी स्वतःवर अरिष्ट ओढवून घेतो. पण त्याबद्दल अधिक खुलासेवार चर्चा त्या वेळीं करूं.

ईडिपस आणि क्रीऑन यांच्यामधील हा वाद मिटविण्यासाठी राणी जोकास्ता मुद्दाम बाहेर येते. राणी या दोघांपेक्षाही वयाने अधिक आहे. त्या दोघांना ती शांत

करण्याचा प्रयत्न करते, आणि एवढ्या तेवढ्या गोष्टीचा केवढा हा राईचा पर्वत तुम्ही करतां आहांत असें त्यांना छेडते. याहून केवढ्या मोठ्या संकटांतून तुम्हांला यापुढे जायचें आहे हें ती अभावितपणे सूचित करते. पण रंगभूमीवरच्या त्या तिघांनाही मात्र याची अल्पही जाणीव नाही.

स्वतःच्या समर्थनार्थ क्रीऑन शापवाणी उच्चारतो की, जर मीं राजाचें कांही वाकडें केलें असेल तर माझा सत्यानाश होवो; आणि या शपतेखातर तरी आता तूं क्रीऑनवर विश्वास ठेव असें राणी राजाला विनविते. वृंद-पुढारीही पुन्हा पुन्हा राजाची विनवणी करतो. त्यावर राजा जेव्हा म्हणतो की, "या माणसावर दया करायला सांगून तूं माझा विनाश आणि या राज्यांतून माझी हकालपट्टीच साधीत आहेस" त्या वेळीं आपणच आपल्या तोंडून, क्रीऑनच्या कटामुळे नव्हे, तर स्वतःच्याच पापासाठी स्वतःला ही शिक्षा सुनावीत आहों याचें बिचाऱ्या राजाला स्वप्नही नसतें. श्रोत्यांचा मात्र त्या उद्गारांनी थरकांप होतो.

तथापि माझा सर्वनाश झाला तरी चालेल, पण राणीचा शब्द मानला पाहिजे, यासाठी ईडिपस क्रीऑनला जायला परवानगी देतो. त्यानंतर या सर्व भांडणाचें मूळ समजावून घेण्याचा राणी प्रयत्न करते, त्यामध्ये आणखी कितीएक दुवे राजाच्या पूर्ववृत्तामधले आपल्याला समजून येतात आणि सर्वच कोड्याचा उलगडा झाल्या-सारखें होतें.

ईडिपसच्या अविवेकीपणाचें पुनर्दर्शन—

यापुढील प्रसंगांत राजाचा अविवेकीपणा पुन्हा पुन्हा व्यक्त होतो. वृंदगायक त्याला सांगत आहेत की, या भांडणाची झाली एवढी चर्चा पुरे, पण राजा ऐकत नाही. सर्व लोकांसमोर तो भडाभड सर्व कांही बोलत सुटतो. क्रीऑन स्वतःच्या तोंडाने जरी आरोप करीत नाही की, लिआसचा खून ईडिपसने केला, तरी ती गोष्ट तो त्या भविष्य-वेत्त्याच्या तोंडून वदवतो आहे, हा राजाचा आरोप ऐकल्यावर राणी जोकास्ता "या सगळ्या भविष्यवेत्त्यांवर किंवा दैवी संदेशावर विश्वास ठेवायचेंच कारण नाही" म्हणून प्रतिपादते. ती म्हणते, "लिआसचा खून त्याच्या प्रत्यक्ष मुलाच्या हातून होणार असें तर देववचनच होतें ना? मग कुठे झालें तसें? लिआसचा खून तर तीन राजरस्ते जेथे मिळतात त्या ठिकाणीं झाला; आणि स्वतःच्या मुलाचे घोटे, त्याला जन्मून तीन दिवस होण्यापूर्वीच, खिळ्याने एकत्र ठोकून, त्याला लिआसने जंगलांत टाकून दिलें होतें. तेव्हा या भविष्यवेत्त्यांवर काडीचा विश्वास ठेवण्याच्या लायकीचे नाहीत हे लोक."

पण हें ऐकून राजाला केवढा तरी धक्का बसतो. त्याच्या अंतःकरणांत केवढी तरी खळबळ माजते. "कोठेसे हे तीन राजरस्ते एकत्र मिळतात?" तो साशंकतेने विचारतो. "किती दिवस झाले या घटनेला?" राणी सांगते की, तूं येथे तें कोडें सोड-वायला आलास त्याच्या आधी थोडेच दिवस. या कालनिर्देशाने राजाला आणखी एक धक्का

बसतो. "देवा काय करायचें आहे तुझ्या मनांत" हा त्याचा उत्स्फूर्त उद्गार राणीलाही अस्वस्थ करतो. पण त्याबद्दलच्या राणीच्या प्रश्नांना उत्तरें न देतां राजा तिलाच आणखी प्रश्न विचारीत राहतो. राणी जेव्हा सांगते की, राजा लिआस उंच होता, किंचित कुठे कुठे त्याच्या केसांत पांढरा केस दिसूं लागला होता आणि त्याचा तोंडावळा जवळ जवळ राजा ईडिपससारखाच होता, तेव्हा तर ईडिपसच्या हृदयाचें पाणी पाणी होतें. आपल्याच हातून तें कृत्य घडलें अशी जवळ जवळ त्याची अंतर्यामीं खात्री होते. परंतु आणखी खात्री करून घेण्यासाठी तो विचारतो, "राजा बरोबर शिपाईफाटा घेऊन राजाच्या थाटाने गेला होता?" त्यावर राणी म्हणते की, "तीं फक्त पांचच माणसें होतीं. त्यांच्यांत एक शिंग वाजविणारा होता. एकच रथ होता आणि त्यामध्ये राजा लिआस होता." तेव्हां तर सर्वच तपशील जमला असें मनोमन वाटून राजा पुन्हा विचारतो, "पण मग हें सर्व सांगितलें कोणी?" एका नोकराने, असें राणीने सांगितल्यावर त्या नोकराबद्दल अधिक माहिती राजा विचारतो. त्यावर राणीने सांगितलेली माहिती आणखीच खळबळ उडविणारी होती. कोडें सोडवून ईडिपस थीबिसचा राजा झाला तेव्हा त्या नोकराने – एक चांगला गुलाम होता तो – थीबिसपासून स्वतःला दूर पाठविण्याची विनंति केल्याबद्दल राणीने सांगितल्यावर त्या माणसाला पाहण्याची राजाला विशेषच उत्सुकता वाटली. कारण, आतापर्यंत कदाचित आपण व्यर्थच कांहीतरी क्रीऑनला बोललों; तेव्हा या नोकराकडून सर्व कांही एकंदर ऐकलेंच पाहिजे अशी एक प्रकारें अनुतप्त वृत्ति राजाची झाली.

जें कांही झालें असावें असा राजाच्या मनाने कयास केला होता तें केवढें तरी भयंकर होतें. वास्तविक कॉरिंथचा राजा पॉलिबस याचा तो मुलगा म्हणून सर्वजण म्हणत असतां एका गृहस्थाने त्याला ही गोष्ट खरी नाही असें सांगितलें. पॉलिबस व त्याची पत्नी यांनी त्या माणसाचें म्हणणें खरें नाही असा विश्वास ईडिपसला दिला; परंतु त्याने त्याचें समाधान झालें नाही. म्हणून तो डेल्फीसला फीबसचा संदेश मिळविण्यासाठी गेला. परंतु ज्या माहितीसाठी तो गेला होता ती माहिती फीबसकडून त्याला न मिळतां आणखी एक निराळाच आणि भयप्रद संदेश त्याला मिळाला; असा की, त्याच्या हातून त्याच्या बापाचा वध होणार, त्याच्या आईशींच त्याचा वैषयिक समागम होणार आणि त्याच्या संततीचें तोंड पाह्यला नको असे लोकांना वाटणार.

हें सर्व राणीला सांगून तो म्हणतो, "या सर्व पापांतून वांचावें म्हणून मीं कॉरिंथचा त्याग केला. पण प्रवासांत तूं सांगतेस त्या ठिकाणींच, एका वृद्ध माणसाचा आणि त्याच्या रथावरील सर्वांचा रागाच्या भरांत मीं खून केला.

आपणच खुनी? आपणच मात्रागमनी? —

"तेव्हा जर करता तो वृद्ध मनुष्य आणि राजा लिआस हे एक असतील तर माझ्यासारखा दुर्दैवी मनुष्य कोण? केवढी घोर शिक्षा मला भोगायला हवी. त्याच्या

पत्नीचें शयनासन मीं बाटविलें हें केवढें माझें घोर पाप! असें जर खरेंच असेल तर अशा दुर्दैवाचा शिक्का माझ्यावर बसण्यापूर्वी हा देहच गळून पडो."

राजाला बहुतेक सारें स्वच्छ कळून चुकलेलें आहे. सत्यापासून डोळे फिरवायला तो तयार नाही. तसा तो दुबळा नाही आणि अन्यायीही नाही. म्हणूनच क्रीऑन-बद्दल आपण कांही तरी बोललों असा अनुताप मोकळ्या मनाने त्याने व्यक्तही केला. परंतु त्या चोवीसशे वर्षांच्या जुन्या काळांतच नव्हे, तर आधुनिक काळांत सुद्धा स्वतःची अपकीर्ति, पितृहत्याकारकच म्हणून केवळ नव्हे तर मात्रागमनी म्हणून व्हावी ही कल्पना, सामाजिक नीतिनियम हे केवळ मानवाच्या सोयीसाठी ठरविलेले व्यवहार आहेत, त्यांमध्ये पापपुण्याचा संबंध मानण्याचें कारण नाही असें मानणाराला सुद्धा, केवढी घोर आणि चित्त वेडें करणारी वाटेल. अशा स्थितींत हा डाग आपणाला लागूं नये अशी त्या ग्रीक राजाची तळमळ असणें किती स्वाभाविक आहे. आशेचा एकच तंतु त्याला शिल्लक राहिलेला आहे. त्या चकमकींत जिवंत राहून पळून आलेल्या गुलामाची भेट. कारण त्याचें म्हणणें होतें की, पुष्कळ दरोडेखोरांनी मिळून लिआस राजाला मारलें. हें खरें असेल तर आपण वध केलेला म्हातारा हा लिआस नव्हे असें सहजच सिद्ध होईल. हें सिद्ध व्हावें असें राजाला वाटावें हें स्वाभाविकच होतें. त्याच्या आशेला राणी आणखीच दुजोरा देते. तिचें म्हणणें, एक तर त्या गुलामाने दरोडेखोरांचीच हकीकत सांगितली आहे, तेव्हा आता तो निराळें तरी काय सांगणार? आणि समजा त्याने सांगितलें निराळें तरी दैवी संदेशाशीं तें न जुळतेंच होणार. कारण फीबसचा संदेश तर स्पष्ट होता की, स्वतःच्या पुत्राच्या हातून लिआसचा वध होणार. पण त्या बिचाऱ्याच्या हातून तर तें कृत्य झालेंच नाही; आधी त्याचाच अंत झाला.

राजाच्या आशेला पालवी येते. खरेंच, आपण तर लिआसचा पुत्र नाही. तेव्हा राणीचेंच म्हणणें खरें. तथापि त्या माणसाला—गुलामाला—एकदा भेटून शहानिशा करून घ्यावीच असा निर्णय करून गुलामाची वाट पाहण्यासाठी म्हणून राजा-राणी घरांत जातात आणि येथे तिसरा प्रवेश किंवा अंक संपतो.

वृंदगायकांच्या मनांतसुद्धा थोडी आशा उद्भूत होते. लिआसच्या वधाबद्दलचे देवाचे संदेश आता निरर्थक ठरण्याचा संभव उत्पन्न झाला आहे, तेव्हा उपयोग काय आहे या देवांकडे कौल लावण्यासाठी जाण्यामध्ये, असाही विचार त्यांच्या तोंडून व्यक्त होतो.

राणी जोकास्ताची धडपड —

परंतु इडिपस राजाच्या हृदयांतील काहूर उलट वाढतेंच. त्याची तीक्ष्ण बुद्धि आता त्याला आशेचा आसरा घेऊं देण्याला असमर्थ होते. इतकी की, राणी

जोकास्ताला सुद्धा त्याच्या त्या तळमळीची व भ्रांतपणाची अत्यंत चिंता वाटूं लागते. बाहेर येऊन देवांना हारफुलें वाहावींत, त्यांची अनन्यभावाने प्रार्थना करावी, संकटांतून सोडविण्याबद्दल भाक भाकावी, अशा विचाराने ती बाहेर येते. तेथे चवथा प्रसंग सुरू होतो. राजाची कितीही समजूत घातली तरी त्याची समजूत पटतच नाही – म्हणून आता देवांकडे धाव घेतल्याशिवाय अन्य उपायच नाही असें म्हणून ती देवांपुढे प्रार्थनेला उभी राहते. अशा प्रार्थनेची तिलाच खरोखर केवढी गरज होती. केवढा घोर प्रसंग तिच्यासमोर उभा होता. परंतु राजाने जरी आता धीर सोडल्या-सारखा होता – किंवा अत्यंत धीराने, येईल या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी केली होती असें म्हणूं या - तरी येऊं घातलेल्या अपमानसागरापासून उभयतांना वाचविण्याचा प्रयत्न करण्याला राणी अजून उद्युक्त होती.

अशा वेळीं खरोखरच परमेश्वर साह्याला धावून आला असें वाटावें अशा स्वरूपांत कॉरिंथ राजधानीहून एक दूत येऊन सांगतो की, कॉरिंथचा राजा पॉलिब्रस याचा मृत्यु झाला असून तेथले लोक ईडिपसला राजा करण्याला उत्सुक आहेत. राणीला केवढा हर्ष होतो; पण तो किती भ्रामक असतो! दासीकडून ती राजाला त्वरेने बोलवून घेते आणि त्याला सांगते, "पाहा, तुझ्या पित्याचा मृत्यु वृद्धपणा व आजार यामुळे झाला; कोठे राहिला खरेपणा देवसंदेशाला?"

उदात्ततेची किती नाजुक झलक—

राजालाही क्षणभर देवसंदेश निरर्थक वाटूं लागतात. "परंतु असें नसेल ना?" तो पुन्हा शंका व्यक्त करतो, "की, माझ्या वियोगदुःखामुळे वडील मेले!" येथे कुंचल्याच्या एका किती नाजुक आणि बारीक फटकाऱ्याने ईडिपसच्या स्वभावांतील उदात्तपणा कवीने व्यक्त केला आहे पाहा. हें कवीचें सामर्थ्य. नायकाचें श्रेष्ठत्व श्रोत्यांना आणि प्रेक्षकांना दाखविण्यासाठी त्याला मोठमोठ्या प्रसंगांची रचना करण्याचें कारणच पडत नाही. आपल्या नाटकाच्या साऱ्यांत असे प्रसंग सामावणें शक्य नाही हें त्या कलावंताला चांगलें समजत असतें आणि हातांतील नाट्यवस्तूचा यथायोग्य परिपोष करीत असतां, जातां जातां तो नायकाच्या श्रेष्ठतेचें दर्शन आपणाला घडवितो. या दर्शनाने आपण राजाच्या अधिक जवळ येतो.

परंतु अजून आणखी एक भीति राजाला शिल्लकच होती की, देववाणीप्रमाणें आपल्या हातून आईशीं विषयसंगाचें पाप घडायचें होतें. बापाचा वध आणि हें दुसरें पाप आपल्या हातून होऊं नये म्हणून तर मी कॉरिंथचें राज्य सोडून गेलों, असें तो त्या दूतापाशी सांगूं लागला त्या वेळी चकित होऊन त्या दूताने विचारलें, "म्हणून राजा, तूं कॉरिंथला जाऊं इच्छीत नाहींस काय? तर मग तुझ्या भीतींतून मी तुला मुक्त करतों." त्या वेळीं राजाची किती केविलवाणी अवस्था झाली. कारण क्षणार्धीतच दूताने सांगून टाकलें की, "राजा तूं पॉलिब्रसचा पुत्र नाहींसच मुळी. कारण दुसऱ्याच

एका माणसाने तुला माझ्या हवालीं केलें आणि मीं तुला राजा पॉलिब्रसजवळ दिलें. त्याच्या पोटीं संतान नव्हतें, म्हणून त्याने तुला आपला पुत्र मानलें. तुझ्या पायांच्या घोट्यांकडे पाहा. मीं तुला हातांत घेतलें तेव्हां त्या ठिकाणीं पायांत खिळा मारून ते एकत्र केलेले होते; त्यावरूनच तुझें नांव पडलें. ''

अर्थात एका दमांत कांही दूतानें हें सारें सांगितलें नाही. सुटसुटीत प्रश्नोत्तरांतून तें सर्व बाहेर येते, राजाची समजूत की, आपल्या पायावरील खूण ही जन्मतःच होती. पण हा माणूस तर म्हणत होता की, तेथे खिळा ठोकला होता. कोणी केलें हें कृत्य? आईने की बापाने? पण दूत कांहीच सांगूं शकत नव्हता. तो म्हणे, '' ज्याने तुला माझ्या स्वाधीन केलें त्यालाच सर्व माहिती!' तो मनुष्य जिवंत आहे की नाही हेंही दूताला सांगतां येत नव्हतें. तेव्हां राजा थीब्रिसच्या लोकांकडे वळून विचारतो, '' हा ज्या मेंढपाळाबद्दल बोलतो आहे त्याची तुम्हांला कोणाला माहिती आहे काय?

सत्य संपूर्ण समजतें, पण उमजत नाही—

येथे राजाचा सूर बदलला आहे. त्याच्या हृदयांतली खळबळ थोडी शांत झाली आहे. सर्व कांही त्याने ओळखलें आहे. दृढतेने, धीराने सत्य एकदा शेवटचें पाहून घ्यायचें एवढेंच त्याच्या मनांत त्या मेंढपाळाबद्दल औत्सुक्य आहे. येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याचें त्याचें सामर्थ्य पूर्ण जागृत झालें आहे; परंतु त्यामध्येही आपण मृत लिआस राजाचे पुत्र आहोंत हें घोर सत्य मान्य करायची अजून त्याची तयारी नाही.

राणीचा निष्फळ प्रयत्न—

राणीने मात्र आतां तें पूर्ण जाणलें आहे. म्हणून त्या मेंढपाळाची भेट न घेण्याबद्दल राजाचें मन वळविण्याचा ती निकराने प्रयत्न करते. '' तूं तरी तुझ्या जीविताचा नाश करून घेऊं नकोस, एक माझ्या जिवाचा कोंडमारा होतो आहे तेवढा पुरे '' असें बोलून राणीने हें व्यक्त केलें आहे. या सर्व प्रकरणावर पडदा पडावा; सत्य बाहेर येऊंच नये; आपण तर आतां जिवंत राहूं शकणारच नाही, पण यांत राजाचाही बळी पडूं नये; या प्रकरणाची जाहीर वाच्यता न झाली तर राजाला स्वतःच राज्याबाहेर निर्वासित होऊन राज्यावरचें संकट टाळतां येईल, वगैरे विचार जणू तिच्या मनांत उसळत असावेत. आणि म्हणून राजाशीं ती किती काकुळतीने बोलत आहे. पण राजाला वाटतें, तिचा श्रेष्ठ कुळाचा अभिमान जागृत झाला आहे; म्हणूनच ती आपण एखाद्या मेंढपाळाचा मुलगा आहों हें उघड होऊं देण्याला तयार नाही. भावी भयामुळें, स्वसंरक्षणाच्या भावनेमुळे, सत्यापासून राजाची नजर मागे फिरली आहे. भलत्याच भ्रमाचा आश्रय घेऊन, मेंढपाळाने येऊन सांगावें की राजा लिआसचा आपण पुत्र नाही, या आशातंतूला तो बिलगला आहे. म्हणून '' या राजघराण्याच्या अभिमानी

स्त्रीकडे लक्ष देऊं नका–जा, त्या मेंढपाळाला घेऊन या" असें जेव्हा तो म्हणतो त्या वेळीं राणीची पुरी निराशा होते; आणि "अरेरे, दुर्दैवी माणसा! तुझ्या कानावर पडणारा हाच माझा शेवटचा शब्द–पुन्हा माझा शब्द तुला ऐकूं येणार नाही" असें आवेगाने म्हणून राणी आंत निघून जाते. तरीही भलत्या भरीं भरलेल्या ईडिपसला तिच्या शब्दांतील गूढ अर्थ ध्यानांत येत नाही. तरी वृंदगायकप्रमुख राजाला बजावतो आहे, "राजा, पाहा, राणी दुःखावेगांत अत्यंत बेभान झालेल्या स्थितींत आंत गेली आहे, याचा विचार कर. तिच्या त्या गप्प राहण्यावरून मला तर वाटतें की, मोठें दुःखाचें तुफान उसळणार आहे."

तरीही "काय वाटेल तें होऊं दे" म्हणून राजा आपल्याच भ्रमांत दंग राहतो. आपण भाग्यदेवीचे सुपुत्र आहोंत आणि आपल्या जन्माच्या रहस्याचा शोध आपण लावणारच असा निर्धार करून तो मेंढपाळाची वाट पाहत राहतो.

दारुण भवितव्यांतून सुटण्याची केविलवाणी धडपड—

त्यामुळे आणि जनतेचें मोठें प्रेम राजावर असल्यामुळें वृंदगायकांनाही क्षणभर त्याच्यासारखाच भ्रम वाटतो. त्यांना वाटतें की, कोणी सांगावें, खरेंच ईडिपस हा कोणा वनदेवाच्याकडून एखाद्या धनगर स्त्रीच्या पोटीं जन्माला आला नसेल कशावरून? पण स्वतः ईडिपसला तरी तसें वाटायला खरोखर जागा नव्हती. राणीने पूर्वीच स्वच्छ सांगितलें होतें की, जन्मल्यानंतर तीन दिवसांच्या आंतच घोट्यांत खिळा ठोकून ते एकमेकाशीं जखडून लिआसने आपलें मूल एका सेवकाजवळ माळरानांत टाकण्यासाठीं म्हणून दिलें होतें. तें मूल म्हणजेच तूं असें कॉरिंथचा दूत सरळ सांगत होता. अशा स्थितींत ईडिपसने स्वतःला अशा भ्रमांत पाडून घ्यावें याचे दोनच अर्थ संभावतात. एक म्हणजे त्याचें डोकेंच भयाण संकटामुळे फिरलें असावें; पण त्याचें बोलणें तसें नाही. तेव्हा दुसराच अर्थ खरा की, अगदी शेवटल्या क्षणींही या दारुण भवितव्यापासून सुटण्यासाठी त्याची धडपड आहे; कड्याच्या मध्यावरून क्षणार्धांत आपण खोल दरींत जाऊन पडणार हें उघड दिसत असतांही, हाताला लागलेल्या एका बारीक मुळीला धरून तो त्यापासून स्वतःला वांचविण्याचा प्रयत्न करीत आहे.

कारण, अखेर तो मेंढपाळ येतो. थोड्याशा स्मरणानंतर तो कॉरिंथच्या दूताला ओळखतो. त्यानेच राजाला दूताच्या स्वाधीन केलें होतें. अर्थात स्वतःला माहीत असलेली खरी हकीकत तोंडावाटे बाहेर काढायला मेंढपाळ खूप खळखळ करतो; त्यामुळे दूतांत आणि मेंढपाळांत थोडी बाचाबाचीही होते. परंतु राजाच्या शिक्षेच्या धमकीने शेवटीं मनाविरुद्धच तो सांगतो की, "मींच तुला या दूताच्या स्वाधीन केलें." पण आपण कोणत्या कुळांतले आहोंत हें राजाला हवें आहे. शेवटीं राजा तेंही मेंढपाळाला, स्वतःच्या मनाविरुद्ध सांगायला भाग पाडतो. तरीही मेंढपाळ सांगतो तें अजून अर्धवटच; तो म्हणतो "हें मूल लिआसच्या घरांतलें होतें." पण अपत्य

कुणाचें ? एखाद्या गुलामाचें की, लिआसच्या कुळांतलें ? अखेर अजूनही अडखळतच मेंढपाळ म्हणतो, " म्हगतात, तें मूल लिआसचें होतें; पण खरें खोटें आंत बाईसाहेबच जाणूं शकतील; कारण त्यांनीच तें स्वतः माझ्या हातीं दिलें. कारण त्यांना देववाणीचें भय वाटत होतें. पण मीं मूल टाकून दिलें नाही. मला दया वाटली. आणि तें मीं या दूताच्या स्वाधीन केलें. "

आतां मात्र राजाचा अखेरचा आधार तुटतो, आणि तो आक्रोश करूं लागतो, " सगळें, सगळें जसेंच्या तसें खरें झालें; किती मी दुर्दैवी, विवाहांत दुर्दैवी, रक्त-पात - खून करण्यांत दुर्दैवी. नको नको, या प्रकाशाचा यापुढे मला बिलकूल संपर्क नको." आणि तो धावतच आंतमध्ये जातो. राणीच्या त्या शेवटच्या भाषणाचें गूढ आणि राजाच्या या शेवटच्या भाषणाचें गूढ रसिक श्रोत्यांना सहज कळून येण्यासारखें आहे. परंतु त्याच्या स्पष्ट उलगड्यासाठी नाटककाराला आणखी एक प्रवेश किंवा अंक उभा करावा लागला आहे. नाहीपेक्षां खरें पाहतां नाटक येथे संपलेंच आहे. परंतु करुणमयतेबरोबरच घोर भीषणतेचेंही दर्शन घडविणें हें त्या वेळच्या करुण नाटककारांनी अवलंबिलेलें तंत्र होतें.

ईडिपसच्या चित्तांतल्याप्रमाणें श्रोत्यांच्याही चित्तांत खळबळ माजते. ती थोडी शांत करावी, त्यांना थोडें विचाराच्या पातळीवर आणावें आणि पुढील अत्यंत भीषण प्रसंग पचविण्याइतपत त्यांच्या चित्तांत समता उत्पन्न करावी, यासाठी कवीनें या ठिकाणी वृंदगायकांचा उपयोग करून घेतला आहे. ते म्हणतात, ईडिपसच्या या उदाहरणा-वरून पाहतां या पृथ्वीवरील कोणाही माणसाला सुखी म्हणण्याची सोय नाही; सुखाचा नुसता सगळा देखावा, माया; आणि ही मायाही पार नाहीशीच व्हावयाची. अशी ज्याची अवस्था नाही असा मनुष्यच पृथ्वीवर सांपडणें अशक्य. हाच विचार पुढे तीन कडव्यांत अधिक स्पष्ट केला जातो.

ज्या भीषणतेच्या दर्शनाबद्दल वर लिहिलें तिचें पुष्कळसें वर्णनच आपल्याला ऐकावयास मिळतें. त्या घटनाच प्रत्यक्ष अशा होत्या की, ज्या आधुनिक रंगभूमीवरसुद्धा दाखविणें श्रोत्यांचा विरसच करण्यास कारण व्हावें. मग जेथे पडद्यांची सोय नाही, राजवाड्याच्या आंतील भाग प्रेक्षकांच्यासमोर दाखविण्याची सोय नाही, तेथे एका-मागोमाग एक घडलेल्या या घटना प्रत्यक्ष श्रोत्यांसमोर घडलेल्या दाखविणें हें मुळांत अशक्यच होतें.

राणीची आत्महत्या : ईडिपस डोळे फोडून घेतो —

राणी आंत जी निराशेच्या झटक्यांत गेली ती कांहीं एक निर्वाणीचा निश्चय करून गेली होती. त्या अनुसार गळफास लावून घेऊन तिने आपला जीव घेतला. त्यापूर्वी आपल्या शयनागाराचें दार तिने आंतून घट्ट लावून घेतलें होतें. राजाही अत्यंत

संत्रस्त मनःस्थितींतच राजवाड्याच्या आंत गेला होता. जात्याच तो अतिशय बलवान होता म्हणून म्हणा, किंवा त्या झटक्याच्या अवस्थेंत असामान्य शक्ति त्याच्या ठिकाणीं उद्‌भूत झाली होती म्हणून म्हणा, त्याने बाहेरून दाराचे कोयंडे नुसत्या हातांनी वाकवून राणीच्या खोलींत प्रवेश केला. त्याआधी तो इकडेतिकडे पिसाटासारखा धावत होता आणि मला एक तरवार द्या रे असें ओरडत होता. मग ती तरवार त्याला राणीचा वध करण्यासाठी हवी होती, की आत्मघाताठी हवी होती, सांगतां येणार नाही. आंत गेल्यावर राणी फासाला लटकलेली त्याने पाहिली. त्यानेच तिला खाली उतरून जमिनीवर निजविलें आणि मग जणू एकाएकी निश्चय होऊन त्याने राणीच्या वस्त्राला लावलेला अणकुचीदार आकडा हिसकावून हातांत घेतला आणि कचाकचा आपल्या दोन्ही डोळ्यांचीं बुबुळें फोडून टाकलीं.

सोफोक्लीसचें अथांग शब्दसामर्थ्य —

यापैकी प्रत्यक्ष प्रेक्षकांसमोर घडलें नाही कांहीच. परंतु एका दूताकरवी सोफोक्लीसने या सर्व प्रसंगाचें इतकें यथातथ्य वर्णन केलें आहे की, त्याच्या शब्दसामर्थ्यापुढे कोणाचीही मान आदराने लवावी. हें सर्व वर्णन अत्यंत काव्यमय भाषेंत आहे. एका सामान्य दूताच्या तोंडीं एवढी काव्यमय भाषा कृत्रिम भासते असें कोणी आधुनिक विद्यावंत म्हणतील; परंतु त्या दूतानें तें सारें प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलें होतें. अशा स्थितींत तें सर्व सांगतांना त्याला अनुरूप काव्यमय भाषा न सुचणें हेंच अस्वाभाविक म्हणावें लागलें असतें, इतका तो सारा प्रसंग भावना उचंबळून टाकणारा आहे.

त्या सर्व उद्रेकानंतर ईडिपसचें सर्व बळ स्वाभाविकच संपून गेलें. दूत म्हणतो की, "राजा एकच गोष्ट आता सांगतो आहे की, कोणी तरी राजवाड्याचा दरवाजा उघडा आणि मला या राज्याच्या बाहेर दूर कोठे तरी नेऊन पोचवा. स्वतः आता त्याला कसलीही हालचाल करायची ताकद नाही; हा सारा दुःखभार आता त्याला अगदी सहन होत नाही. तुम्हांला सुद्धा माझ्यासारखेंच वाटेल पाहिल्यावर."

सोफोक्लीसची करुण नायकाबद्दलची कल्पना —

एवढ्यांत मोठ्या दरवाजाचीं दारें उघडूं लागतात – आणि त्यांतून आता ईडिपस बाहेर येणार असतो. अशा वेळीं बाहेरच्या लोकांना उद्देशून दूत म्हणतो, "आतां अशा प्रकारचें दृश्य तुम्ही पाहणार आहांत की, ज्याला तें अगदी डोळ्यांसमोर सुद्धा नको इतकें तें तिरस्करणीय वाटेल अशा माणसाच्या सुद्धा अंतःकरणांत तें पाहून करुणा उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाही.

भीषणता, विषण्णता, तिरस्कार आणि तरीही करुणा अशा भावनासमुच्चयांतच करुण नाटकाच्या नायकाच्या चित्रणाचा गाभा आहे अशी जणू दुताच्या या विधानांतून सोफोक्लीसने आपली स्वतःची कल्पना व्यक्त केली आहे असें म्हटलें पाहिजे.

यानंतरचा प्रसंग मात्र सगळा आपल्यापुढेच घडतो. त्यांत मुख्यतः झाल्या प्रसंगांनंतर आपल्या व आपल्या मुलांच्या जीवनाची ईडिपसने केलेली निरवानिरव हेंच दृश्य आहे. लोकांना अजूनही आपल्याबद्दल सुहृद्भाव आहे हें वृंदगायकांकडून ऐकून ईडिपसचें अंतःकरण पुलकित होतें. "अतिमानुष अशा कोठल्या शक्तींनी तुला स्वतःचे डोळे नाहीसे करायला प्रवृत्त केलें?" असें वृंदगायकांनी विचारल्यावर ईडिपसने दिलेलें उत्तर हें पुन्हा एकदा त्याच्या उदार हृदयाची साक्ष देणारें आहे. तो म्हणतो, "माझ्या दुर्दैवाची सगळी साखळी अपोलो देवाच्या हातून घडली हें खरें आहे. परंतु डोळे फोडून जे मीं घेतले त्याबद्दलची जबाबदारी केवळ माझी आहे." म्हणजे स्वतःच्या दैवहतपणाची जरी त्याला जाणीव आहे तरी स्वतःच्या हातून जाणीवपूर्वक घडणाऱ्या कृत्यांची जबाबदारी तो देवावर किंवा दैवावर टाकून निसटूं पाहत नाही. वृंदगायक म्हणतात, "अशा अवस्थेंत तुला पाहण्याचा प्रसंग येण्यापेक्षा तुझा मृत्यु झाला असता तर अधिक बरें झालें असतें." त्यावरसुद्धा ईडिपसने त्याही कठिण अवस्थेंत दिलेलें विस्तृत उत्तर त्याच्या थोर स्वभावाचेंच निदर्शक आहे. तो म्हणतो, आतां डोळे असून मला पाहण्याजोगें काय राहिलें होतें! एवढेंच नव्हे, ऐकण्याजोगेंही आतां कांही राहिलें आहे असें त्याला वाटत नव्हतें. पण दुर्दैव की, कान कसे फोडून घ्यावे हें त्याला अवगत नव्हतें. तसें असतें तर कान आणि डोळे दोन्ही निकामी करून "जेथे दुःखाचें दर्शन नाही, किंवा दुःखाचें श्रवण नाहीं अशा दुःखरहित गोड विचारक्षेत्रांत राहण्याची व्यवस्था" त्याने केली असती.

ओढवलेल्या घोर परिणामाला तो आता राजी आहे. "माझ्या पापाची जबाबदारी माझी आहे" असा विश्वास बाळगण्याइतका धीर त्याला परत मिळाला आहे. एकच तो मागतो की, मला इतकें दूर नेऊन टाका की जेथे माझें तोंड तुम्हांला दिसायला नको. त्यामध्यें तुम्हांवर कसलाही दोष येणार नाही.

परंतु लोक ही जबाबदारी कोठून घेणार? त्यासाठी क्रीऑनच्या – आतां राज्याचा वारस होऊं घातलेल्या सत्ताधाऱ्याच्या हुकुमाची गरज होती. त्याच वेळीं क्रीऑन प्रवेश करतोही. त्याचप्रमाणे बहुतेक प्रत्येक करुण नाटकांत घडतें त्याप्रमाणे ईडिपसही आपण क्रीऑनशीं दुष्टपणाचें वर्तन केलें असा कबुलीजबाब देतो, आणि मला दूर कोठेंतरी नेऊन पोचीव ही मागणी तो त्याच्याजवळ करतो.

परंतु या बाबतींत देवाचा कौल घेऊनच काय तें करणें योग्य होईल असें क्रीऑन म्हणतो तेव्हां ईडिपस तें मानल्यासारखें करतो आणि दुसऱ्या कांही गोष्टी करण्याबद्दल क्रीऑनला विनवितो. त्यापैकी एक विनवणी राणीचे प्रेतसंस्कार सर्व यथावत् व्हावेत ही आहे. दुसरी मागणी आपल्या मुलांचें संरक्षण क्रीऑनने चांगलें करावें ही होती. स्वतःसाठी तो कांही मागत नाही. "लहानपणीं जेथे टाकला जाऊन मीं मरावें अशी माझ्या मात्यापित्यांची इच्छा होती त्या राज्यापलीकडच्या सिथेरॉन कुरणांत मला नेऊन टाक; तेथेंच मी राहीन आणि तेथेच माझा अंत होईल!" एवढीच त्याची विनंति

असते. परंतु रसिकांच्या हृदयाचें पाणी करील अशी आणखी एक मागणी तो करतो. त्याला दोन मुलगे होते; त्यांची त्याला विशेष काळजी वाटली नाही. पण त्याच्या दोन अजाण मुलींबद्दल मात्र त्याचें अंतःकरण कळवळलें. दिसूं तर शकतच नव्हत्या त्याला त्या; म्हणून त्यांना जवळ आणावें व त्यांच्या अंगावरून हात फिरवायला संधि मिळावी अशी इच्छा त्याने व्यक्त केली.

श्रेष्ठत्व नव्हे हृदयाची माणुसकी—

हा सर्वच प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी आहे. राजाच्या केवढयाही मोठया श्रेष्ठत्वाच्या दर्शनाने आपलें मन राजा ईडिपसशीं इतकें एकरूप झालें नसतें. मुली हुंदके देत जवळ येतात. आपल्या मुलींचाच का हा आवाज? क्रीऑनने एवढी दया केली? त्याला क्षणभर खरेंच वाटत नाही. क्रीऑन म्हणतो, "होय मींच मुद्दाम त्यांना येथे आणवून ठेवलें. प्रथमपासूनच त्यांच्या सहवासांत तुला केवढा आनंद होत आला आहें हें मला चांगलें माहीत आहे!' हें ऐकतांच घोर, भीषण संकटाच्या खोल दरींत फेकल्या गेलेल्या राज्याचें हृदय द्रवतें, आणि नव्या राजाला तो तोंड भरून मोठ्या प्रेमाने आशीर्वाद देतो. ही त्याची हृदयाची माणुसकी—श्रेष्ठ असला तरी तो तुमच्याआमच्यासारखाच एक निर्मळ प्राणी नव्हे का—का त्याच्यावर दैवाने एवढे आघात करावे? अशी करुणामय प्रश्नपरंपरा आपल्या चित्तांत उत्पन्न करण्यासाठी राजाचें शौर्य, धैर्य, चातुर्य, वीरपण, यापैकी काय इतकें चांगलें उपयोगी पडलें असतें?

मुलींच्या दुर्दैवाबद्दल राजाने केलेला विलाप असाच हृदयस्पर्शी आहे. त्यांचा कांही दोष नसतांना त्यांच्याकडे जो तो अशा आईबापांचीं मुलें म्हणून बोट दाखविणार; त्यांचीं लग्नें सुद्धा होणार नाहींत, वगैरे वगैरे त्याने सांगितलेल्या गोष्टी आपल्याही चित्तांत तळमळ उत्पन्न करतात. मुली तर बिचाऱ्या इतक्या अल्पवयी आहेत की, त्यांना उपदेशाच्या गोष्टी सांगून कांही उपयोग नव्हता. म्हणून "क्रीऑन, तूंच एक आता यांचा पिता, बाबा" असें सांगून त्याच्या स्वाधीन त्यांना करणें एवढाच मार्ग काय तो ईडिपसला शिल्लक होता.

हें सगळें झालें तरी राजाच्या मनांतली एक इच्छा अपुरीच होती; आपल्याला राज्याच्या बाहेर नेऊन टाकावें ही. "जें देवांनी ठरवायचें तें तूं मला करायला सांगतो आहेस" असें क्रीऑनने त्याबद्दल म्हटल्यावर ईडिपसने जें उत्तर दिलें तें आपल्याही चित्तांत कायम ठसून जाणारें आहे. तो म्हणतो, "बाबा रे, देवांना सुद्धा मी इतका नकोस झालों आहें की, कशाला आता माझ्यासारख्याच्या भानगडींत ते पडतील."

लहानपणापासून दैवहत अशा या माणसाची देवावर किंवा दैवावर मुळीसुद्धा विसंबून राहतां स्वतःच्याच भरंवशावर विसंबून राहण्याची केवढी ही थोर ऊर्मि.

अनुक्रमांक 24340 दि: 11/6/96
ॲन्टिगनी व क्रीऑन ..... नों: दि: 25/5/96
क्रमांक 12912

यानंतर वास्तविक ईडिपसच्या स्वभावचित्रणासंबंधी थोडीशी सामान्य चर्चा करावयाला हवी. पण त्यापूर्वी या नाटकाचेंच भावंड जें ॲन्टिगनी नाटक त्याची पाहणी करूं. म्हणजे मग ईडिपस, ॲन्टिगनी आणि क्रीऑन या तीनही व्यक्तींबद्दल साकल्याने एकदम चर्चा करणें अधिक उपयुक्त आणि सोयीचें होईल.

● ●

२ : ॲन्टिगनी व क्रीऑन

नाटकाचें नांव आहे नुसतेंच ॲन्टिगनी; परंतु नाटकाची नायक केवळ एकटी अन्टिगनी आहे, तिच्याच जीवनाचा करुण विपाक दाखविण्यावर नाटककाराने आपलें लक्ष केंद्रित केलें आहे, असें या नाटकांत रचनेचें धोरण आढळत नाही. राजा ईडिपस नाटकामध्ये जसें सर्व लक्ष अगदी पहिल्यापासून शेवटपर्यंत ईडिपसवर रोखलेलें राहतें, तसें त्याच नाटककाराच्या या नाटकांत होत नाही. त्यामुळें संदेह निर्माण होण्याला मोठीच जागा निर्माण झाली आहे. कितीएक टीकाकारांनी तर क्रीऑनलाच या नाटकांतील करुण नायक ठरविलें आहे, आणि ॲन्टिगनीचें स्वभावचित्रण करुण नाट्याच्या दृष्टीने करुणा उत्पन्न करण्याला पोषकच नाही असाही सूर काढला आहे. अर्थात टीकाकारांचीं मतें बाजूस ठेवूनच आपण हें नाटक प्रत्यक्ष पाहूं. आणि तसें करतांना ॲन्टिगनी आणि क्रीऑन या दोघांच्याही स्वभावचित्रणाची आपण पाहणी करूं.

सोफोक्लीसच्या नाटकत्रयींतील ॲन्टिगनी हें शेवटचें नाटक आहे. पहिलें राजा ईडिपस; त्याच्याबद्दल आपण चर्चा केली. मधलें नाटक 'कोलोन येथे ईडिपस' या नांवाचें. त्यामध्ये ईडिपसने स्वतःला थीब्सिमधून हद्दपार करून घेतल्यानंतर त्याच्या मृत्यूपर्यंतचें कथानक आहे. त्याला सोसाव्या लागलेल्या दारुण हालअपेष्टा, तशाही अवस्थेंत क्रीऑनने त्याचा आणि त्याच्या मुलींचा, विशेषतः ॲन्टिगनीचा छळ करण्याचा केलेला प्रयत्न आणि ईडिपसचा अत्यंत रोमांचकारी उज्वल अंत यासंबंधीचें कथानक त्यांत आहे; त्यामधील एक गोष्ट आपल्या प्रस्तुत नाटकाच्या दृष्टीने महत्त्वाची. ॲन्टिगनी ही त्याची सर्वांत धाकटी मुलगी त्या लहान वयांतही ईडिपसबरोबर त्याच्या हद्दपारीच्या काळांत हिंडत होती, भिकाऱ्याचें वैराण जीवन कंठीत होती आणि आंधळ्या पित्याची सेवा करीत होती. तिचें पितृप्रेम, हाल सोसण्याचें सामर्थ्य आणि क्रीऑनबद्दल तिच्या मनांत उद्भवलेला अतीव तिरस्कार या दृष्टींनी तें नाटक थोडेंसें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. राजाच्या मृत्यूनंतर ॲन्टिगनी थीब्सि येथे परत आली आणि क्रीऑनजवळ राजवाड्यांतच राहूं लागली.

राजा ईडिपसला दोन मुलगे : ईटिओक्लीस आणि पॉलिनिसीस. पैकी ईटिओक्लीसला ईडिपसनंतर राजपद मिळालें व त्याने पॉलिनिसीसला हद्दपार केलें.

पॉलिनिनीसने आर्गोसच्या राज्याची मदत मिळवून भावाविरुद्ध थीब्सिवर हल्ला केला. युद्धांत थीब्सिची पुष्कळ हानि झाली; परंतु अखेर एका लढाईंत दोघेही भाऊ एकमेकाकडून ठार झाले, थीबिसचा विजय झाला आणि राजपद क्रीऑनला मिळालें. हें युद्ध संपल्याच्या दुसऱ्या दिवशींची हकीकत ॲन्टिगनी नाटकांत चित्रित केलेली आहे. क्रीऑनने हुकुम काढला आहे की, ईटिओक्लीसचे सर्व प्रेतसंस्कार वीराला उचित अशा सन्मानपूर्वक आणि विधिपूर्वक केले जातील, परंतु पॉलिनिसीसला मात्र दफनाची सुद्धा सवलत मिळणार नाही; त्याचें प्रेत उघडें नागडें पशुपक्ष्यांना खाण्यासाठी टाकून दिलें जाईल. या हुकुमाच्या नंतरच्या क्षणापासून या नाटकाची सुरुवात होते.

राजा ईडिपस नाटकांतल्याप्रमाणेच याही नाटकांत प्रथम वृंदवादकांचें गायन नाही. स्थळ आणि रंगभूमीची रचना अगदी त्याच नाटकांतल्याप्रमाणे आहे. वृंदगायक आसपास आहेत. सूर्योदयाचा समय आहे. अशा वेळीं ॲन्टिगनी – नव्हे एक तरुणी, कारण तिचें नांव अजून कवीने आपल्याला सांगितलेलेंच नाही – प्रवेश करून इस्मीनीला हाक मारते आणि ती आल्यावर ती पहिली तरुणी बोलण्याला सुरुवात करते. देवाने आपल्या बाप्याला घालायचें जगांतलें जणू एकही दुःख शिल्लक ठेवलेलें नाही अशी प्रस्तावना करून ती इस्मीनीला विचारते, "परंतु आताच्च आपल्या सेनापतीने काढलेला हुकूम तूं ऐकलास का? आपल्या मित्रांना शत्रूच्या मोलाने वागविण्यांत येणार आहे हें तुझ्या कानांवर आलें का?"

ॲन्टिगनीच्या मनांतली तेढ —

इस्मीनी या तरुणीला अन्टिगनी या नांवाने संबोधते. ॲन्टिगनीने विचारल्यापैकी तिला काहीच माहीत नसतें. येथे एक सूक्ष्म गोष्ट लक्षांत ठेवून पुढे जाऊं. ॲन्टिगनी जो उल्लेख करतो तो 'सेनापतीचा'; हा उल्लेख क्रीऑनबद्दल आहे हें लौकरच आपल्याला कळेल. परंतु अजून त्याचें राजपद मानायला ही तरुणी तयार नाही. तिच्या मनांतली तेढ अशी थोड्याशाच अस्फुट फटकाऱ्याने कवीने दाखविली आहे.

अन्टिगनी क्रीऑनच्या हुकुमाची हकीकत इस्मीनीला सांगते. अजूनही ती त्याला नुसता क्रीऑन असेंच संबोधते, राजा नव्हे. हा हुकूम क्रीऑनने राजवाड्यांत मुद्दाम जाहीर केला; म्हणजे तो आपणा दोघींना – नव्हे, विशेषतः मला – समजावा यासाठी; असें म्हणून ॲन्टिगनी सांगते की, लोकांनाही तो हुकूम सांगण्यासाठी क्रीऑन आतां लौकरच बाहेर येईल. जो कोणी हुकूम मोडील त्याला दगड मारून ठार करण्याची शिक्षा मिळेल; आणि इस्मीनीला ती पुढे विचारते, "कळलं तुला? आता पाहूं तुझ्या ठिकाणीं श्रेष्ठ मानवतेची जोपासना झाली आहे की नाही; का श्रेष्ठ कुळांत जन्म घेऊनही तूं हीनबुद्धीच निघटली आहेस." हा सगळा झपाटा, इस्मीनी बापाबरोबर हद्दपारींत गेली नव्हती, क्रीऑनपाशीच राहिली होती याला उद्देशून आहे हें उघड आहे. परंतु

इस्मीनी आणि अँन्टिगनी यांच्या स्वभावांत मूलतःच फरक आहे. कारण यावरही ती अगदी नरमाईने म्हणते, "गोष्टी या थराला आल्या खऱ्या. पण मी त्यांत बरं किंवा वाईट काय करूं शकणार?"

यामुळे अँन्टिगनीचा क्रोध आणि अहंकार दोन्ही जागृत होतात. शत्रू मानला गेलेल्या आपल्या भावाचें दफन करण्याचा निर्धार ती व्यक्त करते. "थीबिसच्या राज्यांत या गोष्टीला बंदी असतांनाही?" असें तिची बहीण विचारते त्यावर अन्टिगनीने दिलेलें उत्तर लक्षणीय आहे. ती म्हणते,

"भावाच्या बाबतींतलें माझें कर्तव्य मी पार पाडीन. त्याच्याशीं मी बेइमान होणार नाही. तूं आपलें कर्तव्य पार पाडणार नसलीस तर तेंही मीच पार पाडीन." एवढ्यावरच्च ती थांबत नाही. तर "क्रीऑनने बंदी घातली असतांही?" असें इस्मीनी पुन्हा विचारते त्यावर अँन्टिगनीचें उत्तर आहे की, "माझ्या कर्तव्यापासून मला च्युत करण्याचा क्रीऑनला कांही हक्क नाही."

नाटकाचें बीज : कर्तव्य विरुद्ध राजसत्ता—

नाटकाचें बीज सर्व श्रेष्ठ नाटककार नाटकाच्या अगदी पहिल्या भागांतच सूचित करतात हें माहीत असलेल्या रसिक श्रोत्याला या ठिकाणी अँन्टिगनी नाटकाचें बीजच सोफोक्लीसने दिग्दर्शित केलें आहे असें वाटल्यावांचून राहत नाही. या तरुण स्त्रीने स्वतःचें कांही एक कर्तव्य म्हणून मानलें आहे; आणि या कर्तव्याच्या विरुद्ध प्रत्यक्ष राजाचा सुद्धा कोणताही हक्क मानायला ती तयार नाही. कर्तव्य विरुद्ध राजसत्ता असा झगडा हें या नाटकाचें बीज आहे. नाटकाचें नांव अँन्टिगनी व तिच्या कर्तव्य-कल्पनेचा राजसत्तेशीं आलेला विरोध व त्यामधून कांहीसे अपरिहार्यपणें उद्भवलेले परिणाम – या गोष्टी पाहिल्या म्हणजे या नाटकाची प्रमुख व्यक्ति – नायक – म्हणजे अँन्टिगनीच होय असें म्हणावें लागतें.

परंतु एखाद्या व्यक्तीने स्वतःचें अमुक एक कर्तव्य म्हणून मानलें तरी त्या कर्तव्या-पुढे राजाज्ञेने सुद्धा नमलें पाहिजे काय? तसें नसेल तर त्या आपल्या कर्तव्यासाठी राजसत्तेविरुद्ध झगडणाऱ्या व्यक्तीबद्दल आपल्याला आपुलकी वाटणार नाही; त्या व्यक्तीचा तो निव्वळ साहसीपणा आहे, अविचारीपणा आहे, दोषास्पद हट्टीपणा आहे असें म्हणावें लागेल, व त्यामुळे होणारा अशा व्यक्तीचा अंत अत्यंत रास्तच झाला असें वाटून त्या व्यक्तीबद्दल हळहळ किंवा करुणा आपल्या ठिकाणीं उत्पन्न होणार नाही.

किंबहुना तसा आरोप इस्मीनीने अँन्टिगनीवर केलाही आहे. "आधीच दुर्दैव आपल्या कुटुंबाच्या पाठीमागे हात धुवून लागलेलें. त्या आम्हीं कायद्याचा, राजाच्या हुकुमाचा, राजाचा उपमर्द करून स्वतःचा विनाश ओढवून घेण्यांत काय शहाणपणा आहे? त्यांतच आपण स्त्रिया; पुरुषांशीं भांडण करणें हा आपला धर्म नाही. पुरुषांनी याहूनही आपला छळ केला तरी तो सहन करणें हा आपला धर्म आहे. तेव्हा

भावाचें क्रियाकर्म नीट होत नाही म्हणून पाताळस्थ देवांची मी क्षमायाचना करीन, परंतु राज्यकर्त्यांच्या दमनापुढे मी मान तुकवीन, कारण, अव्यापारेषु व्यापार करीत बसणें हें मूर्खपणाचें लक्षण आहे."

परंतु ॲन्टिगनीची भूमिका इस्मीनीच्या या व्यावहारिक शहाणपणाशीं अगदी विरोधी आहे. तिचें म्हणणें, राजाच्या कायद्याप्रमाणे जरी माझ्या हातून गुन्हा होणार असला तरी त्यामध्ये पाप नाही. गुन्ह्यासाठी मी मरण पत्करीन; कारण राजनिष्ठेपेक्षा श्रेष्ठतर अशी निष्ठा माझी मृत भावाच्या कल्याणाबद्दल आहे. देवांनी माननीय म्हणून केलेले नियम पाळून मी आनंदाने त्या मृतांच्यापाशी जाऊन राहीन. तुला वाटेल तर तूं देवांच्या नियमांचा अवमान करून मानवांच्या कायद्यांना मान दे.

देवांनी केलेले नियम आणि मानवाने केलेले नियम यामध्ये देवांचा कायदा केव्हाही श्रेष्ठ; आणि म्हणून ॲन्टिगनीचें कर्तव्यपालन राजसत्तेच्या हुकुमाच्या पालनापेक्षा श्रेष्ठ; म्हणून या झगड्यांत आमची सहानुभूति ॲन्टिगनीकडे जास्त. कारण व्यवहारशास्त्र सांगणाऱ्या इस्मीनीला सुद्धा ॲन्टिगनीचा दृष्टिकोन समजतो, पटतो; फक्त राजसत्तेविरुद्ध बागण्याची शक्ति आपल्याजवळ नाही एवढीच दुबळी कबुली ती देते; आणि भीतीने ती बहिणीला म्हणते, "काय करायचें तें कर, पण त्याचा गाजावाजा तरी करूं नकोस. मी पण कुठे तोंड उघडणार नाही."

कर्तव्यपालनासाठी जिवावर उदार झालेली सामान्य स्त्री —

परंतु ॲन्टिगनी सत्याची पक्षपाती आहे आणि म्हणून धैर्यवती आहे; म्हणूनच ती म्हणते, "गप्प राहणार! त्यामुळे उलट मला तुझा अधिकच तिरस्कार वाटेल."

जें करायचें तें निधडेपणाने, उघडपणाने करावयाचें असा ॲन्टिगनीचा निर्धार आहे. धर्माज्ञांचें पालन हा स्वतःचा श्रेष्ठ धर्म असें ती निश्चयाने मानीत आहे. "पण हा धर्म पाळायला फार मोठी शक्ति अंगीं पाहिजे; स्वतःच्या शक्तीच्या पलीकडचें हें काम तूं अंगावर घेत आहेस, नव्हे काय?" असें तिची बहीण तिला आवेगाने विचारते. त्यावर तिने अगदी शांतपणाने दिलेलें उत्तर असें आहे. "जेव्हा माझी शक्ति संपेल, तेव्हां माझें काम संपेल." "प्राणैः कंठगतैरपि कर्तव्यमेव कर्तव्यम्" या कोटींतील ही स्त्री आहे असा साक्षात्कार आपल्याला या ठिकाणीं झाल्यावांचून राहत नाही. त्यासाठी तिच्या कसल्याही मोठेपणाच्या पूर्व इतिहासाची आपल्याला गरज वाटत नाही; आणि तसा कसलाही मोठेपणाचा इतिहास तिला नव्हताही. एका दैवहत राजाची ती मुलगी होती एवढेंच काय तें. तेव्हा या नाटकापुरतें तरी आपल्याला नायकाच्या श्रेष्ठत्वाच्या प्रदर्शनाचे प्रसंग आवश्यक वाटत नाहींत खास. कर्तव्यपालनासाठी हातांत शिर घेऊन तयार झालेली एक स्त्री एवढीच तिची ओळख आपल्याला पुरेशी आहे. तिच्या नांवगावाची सुद्धा माहिती नसली तरी आपणाला फिकीर नाही. मग तिच्या इतर गुणावगुणांची, श्रेष्ठत्वाची आठवण तरी कशाला आम्ही करतों? आणि नाटककार

तरी कशाला करील ? कारण, कर्तव्यप्रेरित अशा या स्त्रीची सत्ताधीशाशीं गाठ पडल्यानंतर काय अवस्था झाली हें दाखविणें हें त्याचें उद्दिष्ट आहे; तेंच पाहण्यासाठी त्याचे प्रेक्षक उत्सुक आहेत. तेव्हा या स्त्रीच्या पूर्वश्रेष्ठत्वाचे निदर्शक प्रसंग श्रोत्यांच्यापुढे ठेवून त्यांचा विरस तो श्रेष्ठ कलावंत कशाला करील ?

यानंतर ॲन्टिगनी राजवाड्यांत न जातां प्रेक्षकांच्या डाव्या बाजूने बाहेर जाते. ती आपला वेत पार पाडण्याच्या कामाला गेल्याचें यावरून ध्वनित होतें. इस्मीनी मात्र राजवाड्यांत परत जाते. यानंतरचा प्रवेश क्रीऑनचा आहे. परंतु त्यापूर्वी वृंदगायकांचें गायन आहे. त्यामध्ये त्या दोघा भावांमधील लढाई व त्या दोघांचा अंत याचें इतिहासकथन आहे; देवाला माणसाच्या अहंकाराचा दर्प सहन होत नाही, असा न्याय सांगून त्यामुळेच अहंकारी पॉलिनिसीसचा झ्यूसने निःपात केला व त्याच्या हल्ल्यांतून थीब्सिला त्याने वांचविलें अशी मीमांसा सांगितली आहे.

क्रीऑन यानंतर प्रवेश करतो. त्याचें पहिलेंच जें भाषण आहे त्यावरून हॅम्लेटमधील क्लॉडिअस राजाच्या पहिल्या दरबाराच्या प्रवेशाची आठवण होते. त्याच्याप्रमाणेच आपण घेतलेल्या राजपदाची तरफदारी येथे क्रीऑननेही केली आहे. फरक म्हणजे "माझी परीक्षा माझ्या हातून जें कांही राजा म्हणून घडेल त्यावरून करा" असें जें क्रीऑन सांगतो त्यांत आहे. "लोकांपासून मी कांही लपवून ठेवणार नाही; त्यांचा सल्ला घेऊन सर्व कारभार मी करीन" अशीही त्याची घोषणा आहे. परंतु एक गोष्ट मात्र त्याने विशेष निक्षून सांगितली; त्यांतच, क्रीऑनला जर या नाटकाचा नायक मानला तर, त्याच्या जीवनधोरणाचें आणि त्यांतील झगड्याचें बीज आहे. त्याचें म्हणणें, "पितृभूमि ही सर्वश्रेष्ठ; तिच्याहून अधिक जवळचें किंवा अधिक श्रेष्ठ कोणीच मानतां उपयोगी नाही. पितृभूमीचा शत्रु तो आपला शत्रूच. याच न्यायाने आपण वागणार."

अर्थात हीं घोषणा पुढे स्वतःच्या मनांतला जो आकस त्याला व्यक्त करायचा आहे, त्याच्या प्रस्तावनेदाखलच आहे. पॉलिनिसीस हा पितृभूमीचा शत्रू; त्याने भावाचा वध केलेला. राजसत्तेने त्याला बहिष्कृत केलें असतां, हुकूम मोडून तो परत आला आणि राज्यावर त्याने स्वारी केली. तेव्हा त्याचा एवढाही मान केला जाऊं नये ही क्रीऑनची चिंता आहे. त्याचें प्रेत सडत कुजतच राहिलें पाहिजे अशी त्याची सूडाची भावना आहे. "अशा दुष्ट माणसाला मी न्यायी लोकांच्यासारखा मान देणार नाही. थीब्सिचा जो हितकर्ता आणि भक्त त्याचाच मी सन्मान करीन; जिवंतपणीं आणि मृत्यूनंतरही." अशी त्याची घोषणा आहे.

सत्य-न्यायांची प्रतिनिधि ॲन्टिगनी : सत्ता-सूड यांच्या प्रतिनिधि क्रीऑन—

म्हणजे क्रीऑन जर या नाटकाचा नायक मानला तर येथे त्याच्या जीवनांतील संघर्षांचें बीज आहे; म्हणजे या नाटकांत हें आणखी एक बीज नाटककाराने व्यक्त

केलें म्हणावें लागेल. परंतु वस्तुतः पहिलें जें बीज पूर्वी सांगितलें त्याहून हें निराळें नाहीच. ॲन्टिगनीचा भर मानवी प्रेम, धर्म, दैवी नियम यांच्यावर आहे; क्रीऑनचा भर देशभक्ति आणि राजसत्ता व सूडबुद्धि यांच्यावर आहे. म्हणजे न्याय किंवा सत्य आणि सत्ता आणि सूडबुद्धि यांच्यामधील हा झगडा आहे. सत्य–न्यायांची प्रतिनिधि ॲन्टिगनी आहे; सत्ता–सूड यांचा प्रतिनिधि क्रीऑन आहे.

वृंदगायकांच्या पुढाऱ्याचें धोरण मात्र क्रीऑनला अनुकूल नाही. मृत पॉलिनिसीसच्या शवाचे संस्कार कोणी करूं नयेत याबद्दल देखरेख ठेवण्याची जबाबदारी तो स्वतःवर घेत नाही; कोणी अधिक तरुण मनुष्य पाहा असें म्हणून टाळाटाळी करतो. एवढेंच नव्हे तर, "तूं कायदा मोडणारांच्या बाजूने असतां कामा नये" असें क्रीऑनने बजावलें तरीही त्याचे हुकूम न्याय्य आहेत असें तो स्पष्ट म्हणत नाही – मृत्यूची ओढ कुणाला लागली आहे, असा नुसता व्यवहारवाद सांगतो. यावरून थीबिसच्या जनतेला राजाचें धोरण मनापासून मान्य नाहीं हें उघड आहे. म्हणजे सहानुभूतीचा ओघ क्रीऑनपेक्षा अन्टिगनीकडे अधिक आहे.

मृत्यूच्या गळ्यांत मिठी मारण्याइतका मूर्ख कुणी नाही, असें वृंदपुढारी म्हणतो त्यावेळच्या क्रीऑनच्या उत्तरामध्येही त्याच्या स्वभावाचें एक गमक आहे. "खरें आहे" तो म्हणतो; "परंतु पैशाच्या आशेवर माणसें आपला घात करून घेतातही!" म्हणजे हा कांही ध्येयवादी माणूस नाही; निव्वळ पक्का व्यवहारवादी आहे. आठवण येते की, राजा ईडिपसने क्रीऑनवर हाच आरोप केला होता!

इतक्यांत एक रखवालदार येतो. रखवालदाराच्या या प्रवेशावरून हॅम्लेटमधील स्मशानांतल्या बडबड्या थडगीं खणणाराची आठवण येते. वास्तविक त्याला सांगायचें आहे एवढेंच की, पॉलिनिसीसच्या शवाचे कोणीतरी संस्कार केल्याचें आढळून आलें आहे. पण त्यासाठी त्याने जी वेडीवांकडी वटवट चालविली आहे ती विनोदगर्भ आहे. राजा ईडिपस या नाटकांत सोफोक्लीसने केव्हाच विनोदाचा आधार घेतलेला नाही. या नाटकांत मात्र, निदान या प्रवेशांत, विनोदाचा आविष्कार आहे. म्हणजे २४०० वर्षांपूर्वीसुद्धा कवि करुण नाट्यांत विनोद विरस उत्पन्न करतोच असें मानीत नव्हते.

रखवालदाराच्या प्रवेशांतही लोकमतनिदर्शक वृंदनायकाची भूमिका क्रीऑनला पाठिंबा देणारी नाही. "देवानेच तर हे प्रेतसंस्कार केले नाहीत ना" असें तो पुटपुटतो. म्हणजे देवाच्या कायद्यांविरुद्ध वागणें हें लोकमताला मान्य नाही?

नाटक सत्पक्षवादी निग्रही स्त्रीचेंच —

परंतु हा अर्धवट ध्वनितःकेलेला अर्थ क्रीऑन ओळखतो आणि त्याचा तोल सुटतो. वृंदनायकाला तो थेरडा आणि मूर्ख म्हणतो. "तुझें म्हणणें देवांना या प्रेताबद्दल आपुलकी आहे? पण कशाबद्दल त्याला हें बक्षीस? देवांचीं आयतनें उखडून टाकणाराला देव असें बक्षीस देतील? दुष्टाचा देव सन्मान करतील?" असें तो

विचारतो आणि मग क्रीऑनच्या पोटांतली आग बाहेर पडते. "ठाऊक आहे मला" तो म्हणतो, "या राज्यांत पहिल्यापासूनच कांही लोक माझ्याविरुद्ध आहेत. त्यांना माझा हुकूम अमान्य आहे! राजसत्तेच्या जोखडाखाली आपली मान सरळपणें देण्याची त्यांची तयारी नाहीं. त्यांनीच पैसा देऊन कोणाकडून तरी हें कृत्य करविलें असलें पाहिजे." तैरेसियासवर राजा ईडिपसने अगदी हाच आरोप केला होता. ईडिपस-प्रमाणे क्रीऑनलाही आपल्या राजपदाची काळजी लागून राहिली आहे. पॉलिनिसीसचे पक्षपाती लोक राज्यांत आहेत, त्यांना ठेचून काढलें पाहिजे, ही सुत जाणीव त्याच्या सर्व कृत्यांच्या व धोरणाच्या मुळाशीं आहे. क्रीऑन जर नायक मानला तर स्वतःचें राजपद संभाळू पाहणारा एक वीर राजा आणि त्याच्याविरुद्ध कारस्थान करणारे यांच्या-मधील झगड्यांत झालेला क्रीऑनचा नाश असें या नाटकाचें स्वरूप होईल. परंतु खटकणारी गोष्ट ही की, हे जे विरोधी लोक म्हणून म्हणावे, त्यांचा नाटकांतील घटनांशीं कांही संबंध नाही. संबंध आहे फक्त अँन्टिगनीचा. तिचा कांही क्रीऑनशीं व्यक्तिशः विरोध नाही. आणि नाटककार तरी तिचाच सत्पक्ष असल्याचें दाखवीत आहे. अशा स्थितींत सत्पक्षवादी आणि मरणाला तयार असलेल्या एका निग्रही स्त्रीचें हें नाटक— हा करुण अंत आहे असेंच मानण्याकडे कल होतो.

ज्या कोणीं हें नियमबाह्य प्रेतसंस्काराचें काम केलें त्यांना जर आपल्यापुढे आणलें नाही तर रक्षकांना वधाची शिक्षा मिळेल असें म्हणून क्रीऑन राजवाड्यांत निघून गेला. 'सुटलों, आतां येथून पळ काढावा आणि पुन्हा म्हणून राजाला तोंड दाखवूं नये' अशा विचाराने रक्षक बिचारा निघून गेला. त्यानंतर पुन्हा प्रवेश आहे रक्षकाचाच. कालांतर दाखविण्यासाठी वृंदगायकांचें मध्यंतर गायन आहे. त्यामध्ये सर्व विश्वांत मनुष्याइतकें आश्चर्यकारक दुसरें कांहीच नाही या मुद्यासंबंधी काव्यमय व तत्त्वपूर्ण अशी रचना आहे. परंतु करुण नाट्याच्या दृष्टीने याचें तादृश महत्त्व नाही आपल्याला.

रक्षक जो परत येतो तो अँन्टिगनीला पकडून घेऊन. वृंदगायक चकित होतात. हें आणखी काय संकट? अँन्टिगनीनेच प्रेतसंकार केल्याचें रक्षक सांगतो. पुन्हा हॅम्लेटमधील त्या बडबड्या खट्टु खणणाराची आठवण व्हावी अशी रक्षकाची बडबड सुरू होते. पण या वेळी क्रीऑन त्याला लांबण लावूं देत नाही. "आम्ही सगळे रक्षक कोण येतें हें पाहण्यासाठीं दक्षतेने पहारा करीत होतों तोच आम्हांला ही मुलगी दिसली. जखमी झालेल्या पक्ष्यांच्या तोंडून जशी वेदनेची तीव्र किंकाळी बाहेर पडते तशी हिने किंकाळी फोडली." असें रक्षकाने वर्णन केलें. त्यावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते की, रक्षकांच्या दृष्टीने अँन्टिगनीचें दुःख अगदी खरें होतें; तो कांही तिचा नाटकी आवेश नव्हता. क्रीऑनच्या रागावर कांही ती हें कृत्य करायला गेली नव्हती. रक्षक तिच्याकडे धावले तेव्हाही, ती एवढीसुद्धा गडबडली नाही. केलेलें कृत्य तिने बिलकूल नाकारलें नाही. रक्षक म्हणतो, "यामुळे, मी सुटलों म्हणून मला आनंद झाला, पण

हिच्याबद्दल मला वेदनाच वाटली; कारण आपल्या माणसाला दुःखाच्या खाईत लोटायला कोणाला बरें वाटेल? परंतु अखेर स्वसंरक्षणापुढे या सर्व गोष्टी तुच्छच होत," या त्याच्या भाषणांत सामान्य माणसांचें व्यवहारी धोरण आणि ॲन्टिगनीसारख्या असामान्य व्यक्तीचें निष्ठेचें धोरण यांतील फरक किती सुरेख व्यक्त होतो; आणि ॲन्टिगनीची श्रेष्ठता सहजासहजी व्यक्त होऊन जाते.

बढाईखोर नव्हे, सत्यनिष्ठ—

राजालाही ॲन्टिगनी निर्भयपणें सांगते आहे की, मीं हें कृत्य केल्याचें कबूल करतें. या तिच्या बोलण्यांत बढाईखोरपणा आहे हें म्हणणें अन्यायाचें होईल. सत्यनिष्ठेचें आणि आत्मविश्वासाच्या दृढतेचें द्योतक असें तें शांत बोलणें आणि वागणेंही आहे. राजाची आज्ञा स्वतःला माहीत होती आणि तरीही आपण ती मोडली हेंही तितक्याच दृढतेने ती सांगते आणि समर्थन करते की, "हुकूम मीं अवश्य मोडला. पण हा हुकूम मला झ्यूस देवाने का दिला होता? पाताळांतील जी न्याय-देवता आहे ती काही माणसांना असले नियम आंखून देत नाही. आणि तुझ्या हुकुमामध्ये कांही एवढें सामर्थ्य मी मानीत नाही की, ज्यामुळे परमेश्वराच्या अलिखित आणि चिरंतन अशा कायद्याचा अंमल नाहीसा व्हावा. दैवी कायदे मोडण्याइतकी मी अहंकारी नाही. परिणामीं मरण येईल एवढेंच ना? पण केव्हा तरी मी मरणारच आहे. याने जरा अकालीं मरेन. पण या पापमय अवस्थेंत जिवंत राहण्यापेक्षा मरणांतच अधिक लाभ आहे असें मला वाटतें. मरणाचें दुःख हें केवढेंसें दुःख. त्यापेक्षा माझ्या सहोदराचे संस्कार न होणें हें अधिक भयंकर दुःख आहे. तुला कदाचित असें वाटेल की, हा माझा निव्वळ मूर्खपणा आहे. पण असा निर्णय करणारा न्यायाधीशच मूर्ख होय असें मी म्हणेन."

नाटकांतला खरा झगडा —

या तिच्या समर्थनावर क्रीऑनचें जें उत्तर आहे त्यांत या नाटकांतल्या झगड्याचें स्वरूप पुन्हा एकदा स्पष्ट होतें. तो म्हणतो, "अशी हट्टी माणसेंसुद्धा नमवतां येतात. पोलादसुद्धा तुटतें; उन्मत्त झालेले घोडे काबूंत आणले जातात." म्हणून वृंदनायकाला तो सांगतो, "या मुलीला मी खास नमवीन. तिलाच काय, आंतल्या तिच्या बहिणीलाही मी तिच्याच बरोबर धारेवर धरीन. तिचा हट्ट यशस्वी होऊं देणारा मी नामर्द मनुष्य नव्हे!"

म्हणजे एका बाजूला सत्पक्षासाठी प्राण कःपदार्थ मानायला तयार झालेली एक अबला आणि दुसऱ्या बाजूला यांत आपल्या सत्तेचा उपमर्द होतो असें मानून तिला नमवूं पाहणारा राजा यांच्यामधील हा झगडा आहे; म्हणजे हें नाटक ॲंटिगनीचेंच आहे, क्रीऑनचें नव्हे असें येथे पुन्हा स्पष्ट होतें.

ॲन्टिगनीला नमविण्याचा एक उपाय म्हणून इस्मीनीलाही या शिक्षासत्रांत ओढावें असा राजाचा विचार. हा विचार करतांना तो जें बोलतो त्यांत मात्र भविष्यांत काय वाढून ठेवलें आहे याची त्याला कल्पना नसल्यामुळे मोठीच करुणसूचकता सहजी निर्माण होते. "शिक्षेपासून कोणी सुटणार नाही. बहिणीची मुलगीचशी काय, पण त्याहूनही जवळचा कोणी असला तरी त्याची या वेळीं गय केली जाणार नाही," असें म्हणतांना या शिक्षासत्रांत आपल्याच मुलाचा बळी पडणार आहे हें त्याला माहीत नव्हतें. एक सुंदर पताकास्थान या ठिकाणीं साधलें आहे.

प्रेमांत भागीदार होणें ॲन्टिगनीला आवडतें—

इस्मीनाला आपल्याबरोबर शिक्षा भोगावी लागणार या जाणिवेने ॲन्टिगनी क्षणभर व्यथित होते. लगेच ती आपल्या मनाची स्थिरता प्रस्थापित करते. ठीक आहे, तुला काय करायचें आहे तें करून घे, असें क्रीऑनला दृढतेने सांगून ती पुढे म्हणते, "हे जे सगळे लोक येथे आहेत त्यांना तुझें हें करणें मुळीच पसंत नाही. पण भीतीने त्यांचें तोंड बंद झालें आहे. राजांना हाच मोठा फायदा असतो. त्यांना हवें तें बोलतां आणि करतां येतें." तिचा क्रीऑनचा यावर आणखी खटका उडतो. भावाभावामध्ये फरक होता; एक देशाचा वाली होता; दुसरा त्याच देशाची राखरांगोळी करायला आलेला होता; या त्याच्या मुद्यावर ॲन्टिगनीचें उत्तर असें आहे की, पाताळातील यमदरबारचा कायदा दोघांना सारखेंच मानतो. पण तिचा "मरणान्तानि वैराणि" हा निष्कर्ष क्रीऑनला मान्य नाही. तो म्हणतो "एकदा शत्रू म्हणजे नेहमी शत्रू, मेल्यावर सुद्धा!" त्यावरही ॲन्टिगनीने दिलेलें उत्तर तिच्या श्रेष्ठ वृत्तीची साक्ष देणारें आहे. "मला द्वेषांत भागीदार होतां येत नाही; प्रेमांत भागीदार होणें मला आवडतें" हें तिचें भाषण एखाद्या आधुनिक सच्च्या सत्याग्रह्याला शोभणारें आहे.

जो जो ॲंटिगनी शांत आणि दृढ राहते तो तो क्रीऑनच्या रागाचा पारा चढत जातो. इस्मीनी बाहेर आल्यावर त्या रागाच्या भरांत तो तिला शिव्याच मोजूं लागतो. राजा ईडिपसने त्याला स्वतःला एका वेळीं अशाच शिव्या दिल्या होत्या!

इस्मीनी आपणही या गुन्ह्यांत भागीदार असल्याचें सांगते. पण ॲंटिगनी तिला तसें करूं देत नाही. कारण ती गोष्ट न्याय्य नव्हती. स्नेहभावामुळे तिने खोटें बोलूं नये असें ॲंटिगनीचें म्हणणें. शिवाय नुसत्या बोलण्यांतील स्नेहभावाची मातबरी ती काय? ॲंटिगनी जरी सत्याची व न्यायाची पक्षपाती असली तरी ती माणूसच आहे. इस्मीनीला क्रीऑनच्या हुकुमाची तमा अधिक वाटली होती याचा दंश ती विसरलेली नाही; तसा टोमणा तिनें मारला तेव्हा सहजच इस्मीनीला वाईट वाटलें; तें पाहून ॲन्टिगनी तिचें समाधान करते, "मी तुला टोमणा दिला खरा; पण त्यांत मला सुख कां आहे?" यांतही, तीही सामान्य माणूस आहे, तिलाही रागलोभ आहेत हें किती सुंदर व्यक्त होतें. इस्मीनीला एक वेडी आशा असते की, ॲन्टिगनीकरिता आपण

कांही तरी करूं. ॲन्टिगनीने "तुझा जीव तूं वाचीव, माझी काळजी तूं करूं नकोस" असें झिडकारलें असतांही तो प्रयोग इस्मीनी करूं पाहते. राजाला ती विचारते, "तुझ्या मुलाशीं जिचा वाङ्निश्चय झाला आहे तिचा तूं वध करणार?" पण तिला ठाऊक नसतें की, सत्तेला या गोष्टीही कःपदार्थ वाटतात. त्याला आणखी पुष्कळ वधू मिळतील, या राजाच्या विधानावर ती जेव्हा म्हणते कीं, "पण असें प्रेम दुसरीकडे मिळणार नाही," तेव्हा क्रीऑन म्हणतो, अशी दुष्ट पत्नी माझ्या मुलासाठी मला नको आहे! आणि म्हणून ॲन्टिगनीला निराशेचा उद्गार काढावा लागतो, "प्रिय हीमॉन, तुझे वडील तुझ्यावर केवढा अन्याय करीत आहोत!"

नाटकाला नवाच रंग —

येथे मात्र या नाटकाला एक निराळाच रंग चढतो. दुसऱ्याच एका विषयाची जोड त्याला मिळते. "तुझ्या मुलाचा हा प्रेमभंग तूं करणार?" असा स्पष्टच प्रश्न वृंदनायक क्रीऑनला करतो आणि क्रीऑन आपला तसा निर्धारच झाला आहे, असें त्याला सांगतो. मृत्यूच्या भयाने या मुली पळूनही जाण्याचा प्रयत्न करतील म्हणून त्यांना नेऊन बंदिस्त करा असा तो हुकुमही सोडतो. परंतु नाटक जें येथे संपावें तें संपलें नाही. क्रीऑनचा आणि त्याच्या मुलाचा एक नवाच झगडा आपल्यापुढे उभा राहतो. या झगड्यांत क्रीऑन नाटकाचा नायक असल्याचा भास उत्पन्न होतो. ॲन्टिगनीचा या झगड्यांत प्रत्यक्ष संबंध फारच थोडा येतो.

जें जें विशेष विशाल त्याच्या पाठीशीं कांही शाप —

तथापि वृंदगायक मात्र ईडिपसचें घराणें आणि त्याला लागलेला शाप याबद्दलच बोलत राहतात. या घराण्यांतील सर्वच व्यक्ति श्रेष्ठ पदवीच्या, पण त्यांचें "कर्म पापमय, अंतःकरण वेडावलेलें आणि भाषा मूर्खपणाची! त्यामुळे त्यांचें सर्व जीवन दुःखमय." म्हणजे क्रीऑनबद्दल जरी वृंदगायकांना विशेष सहानुभूति नाही तरी त्यांच्याही मतें ॲन्टिगनी अव्यवहारी आणि मूर्ख बडबड करणारी आहे! शिवाय त्यांचा अनुभव त्यांना सांगतो आहे की, मानवाच्या जीवनांत जें जें कांही अति विशाल असें निर्माण होतें त्याच्या पाठीशीं कांहीना कांही शाप लागलेला असतो. हें सर्व बोलणें अर्थात ईडिपसची मुलगी ॲन्टिगनी हिला उद्देशून आहे हें उघड आहे.

मुलींना आंत नेलेलें असतें. क्रीऑन बाहेर रंगभूमीवरच असतो. कांही वेळाने हीमॉन तेथे येतो. तो आल्यावर या पितापुत्रांचा जो झगडा होतो तो या नाटकांतील एक अपूर्व सौंदर्यस्थान आहे. विशेषतः, राजे लोकांच्या प्रणयाच्या कथा रंगविणाऱ्या संस्कृत नाटककारांशीं तुलना करतां ग्रीक नाटककारांचा व्यक्तिविषयक आणि जीवनविषयक दृष्टिकोन किती खोल आणि व्यापक आहे हें पाहून आदराने मान खाली लवते.

राजाला विचारायचेंच होतें मुलाला की, तोही बापाविरुद्ध बोलणार की काय?

सुरुवातीला हीमॉन नम्रपणें जेव्हा म्हणतो की, पित्याच्या समाधानापुढे मला कोणत्याच लग्नाची मातब्बरी नाही तेव्हा क्रीऑनला मोठें धन्य वाटतें. त्या भरांत तो एक भलें मोठें व्याख्यान झोडतो. आज्ञाधारक मुलें हींच खरें घराचें भूषण; तशीं नसणारीं मुलें म्हणजे आपल्या हातानेच आपण शत्रूला साह्य पुरविल्यासारखें. म्हणून तो मुलाला सांगतो, "एखाद्या स्त्रीच्या नादाने तूं आपलें पुत्रकर्तव्य विसरूं नकोस. कांही झालें तरी अॅन्टिगनीचा वध हा मी करणारच. ती आपल्या कौटुंबिक कर्तव्याचें मोठें स्तोम माजवीत आहे. परंतु कौटुंबिक कर्तव्यपालन करणारा माणूस राज्यविषयक कर्तव्याचेंही पालन करतो."

असा हा उपदेश मुलाला करीत असतांना, अॅन्टिगनीचा मोठा गुन्हा म्हणून क्रीऑन सांगतो तो हा की, ती राज्याचा कायदा पाळीत नाही. आणि तत्त्व म्हणून तो घोषित करतो की, "राज्याने एकदा प्रमुख नेमला म्हणजे त्याचा हुकूम मानलाच पाहिजे; सर्व लहानमोठ्या गोष्टींत मानला पाहिजे एवढेंच नव्हे, तर तो हुकूम न्याय्य असो, किंवा अन्याय्य असो, तरीही पाळला पाहिजे."

क्रीऑनची विसंगति —

आणि हाच क्रीऑन ईडिपसला म्हणत होता की, "तूं अन्याय्य राज्य करशील तर तें मानण्याचें बंधन मजवर नाही." तोच आता प्रजेच्या आज्ञापालनाचें केवढें मोठें अवडंबर माजवीत आहे, समाजाच्या स्थैर्याची महती गात आहे आणि स्त्रियांच्या मानाने पुरुषांच्या श्रेष्ठतेवर भर देत आहे.

हीमॉनला बापाची ही भूमिका मान्य नाही. पण गोड बोलून त्याचें मन वळविण्याचा तो प्रयत्न करतो. अॅन्टिगनीने आपल्यावरील दुर्दैव केवळ आपल्या हटवादी आणि कडू जिभेने ओढवून घेतलें असा तिला दोष देणारांनी हीमॉनच्या या विनम्र आणि तरीही विफल प्रयत्नाचें योग्य मूल्यमापन केलें पाहिजे. बापाला हीमॉन म्हणतो, "हा तुमचा विचार झाला. पण याहून वेगळा विचार असणारच नाही का? मी लोकांत हिंडतों, पाहतों. लोकांचा विचार निराळा आहे. लोक अॅन्टिगनीला निर्दोष मानतात, पुण्यशील मानतात, तिचा दैवी सन्मान करावा अशी तिची योग्यता समजतात. तसें पाहिलें तर मला तुमच्या सत्कीर्तीहून अन्य काय प्रिय असणार? पण एकाच भावनेच्या भरीं भरणें बरोबर नाही. आपलाच एक शब्द काय तो खरा असें समजणें योग्य नाही. कारण, जर एखादा मनुष्य म्हणूं लागला की, मीच फक्त एक शहाणा, माझ्या तोडीचें शहाणपण अन्य कोणाला नाही, तर खरोखर त्याच्या ठिकाणीं ज्ञानाचा अभावच आहे असें आढळून येईल. शिवाय मनुष्य कितीही ज्ञानी असला तरी योग्य प्रसंगीं नमण्यांतच खरें शहाणपण आहे. महापुरें झाडें जातीं तेथे लव्हाळे वाचतीं. लहान तोंडीं मोठा घास घेऊन मी म्हणतों की, राग सोडा. मनुष्य सर्वज्ञ असता तर खरोखरच मला फार आनंद झाला असता. परंतु तसें असत नाही; म्हणून दुसऱ्याचेंही ऐकण्यांत केव्हा केव्हा शहाणपण असतें."

हीमॉनचा मृदु अनुनयही व्यर्थच —

हीमॉनचा हा सगळा मृदु अनुनय व्यर्थ ठरतो. लहान पोरें मला शिकविणार काय ? ही क्रीऑनची भावना. गुणिषु न च लिंगं न च वयः हा न्याय मानायला तो तयार नाही. फार कशाला, थीबिसच्या लोकांना स्वतःचें मत मान्य नसलें तरी त्याला त्याची फिकीर नाही. मीं राज्य कसें करावें हें काय लोक मला सांगणार ? अशी त्याची गुर्मीची भाषा आहे. एवढेंच नव्हें तर, " राज्य म्हणजे काय एका व्यक्तीच्या मालकीचें कुरण आहे ? " या हीमॉनच्या प्रश्नाला तो ' हो ' असें उत्तर देतो.

तेव्हा मात्र न राहवून हीमॉन म्हणतो की, " मग मात्र ओसाड गावचे राजे व्हायला तुम्ही खरे लायक आहांत. " " हा पोरटा एका बाईचा पक्षपाती आहे " असा राजा आरोप करतो, त्यावर मुलगा म्हणतो, " म्हणजे तुम्ही बाई आहांत का ? मला तर सगळी काळजी तुमचीच आहे. " " बापाशीं उघड तंटा करतोस, निर्लज्ज " असें बाप म्हणतो, त्यावर मुलगा म्हणतो, " तुम्ही न्यायाला विरोध करीत आहांत म्हणून. " क्रीऑन म्हणतो, " मी माझ्या राजहक्कांचें संरक्षण करतों आहे. " त्यावर मुलगा म्हणतो " देवांच्या हक्कांना पायाखाली तुडवून तुमच्या राजहक्कांचा मान कसा राहणार ! "

अखेर हीमॉनही अन्टिगनीचा पक्षपाती --

अशा रीतीने बापलेकांचा हा जो झगडा होतो त्यांत स्वतः अन्टिगनी हजर नसली तरी हीमॉन तिचाच पक्षपाती म्हणून बोलतो हें उघड आहे. त्यामुळें अजूनही नाटककाराचें प्रमुख लक्ष्य ॲन्टिगनी हेंच आहे. म्हणूनच अखेर चिडून क्रीऑन त्याला म्हणतो, " किती जरी सत्य-न्यायांचा वेदांत तूं उगाळलास तरी तुझी सगळी काळजी त्या पोरीबद्दलच आहे. "

यावर हीमॉनने केलेलें उत्तर भावी अनर्थाचें सूचक आहे. तो म्हणतो, " माझी काळजी तिच्या एकटीसाठी नाही. तुमच्यासाठीही आहे, माझ्यासाठीही आहे. तिच्या मरणांतून आणखी एकाचा मृत्यु ओढवणार आहे. " याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. परंतु रागाने बेभान झालेल्या क्रीऑनला तो उमगत नाही. त्याला हीमॉनचें बोलणें म्हणजे पोकळ धमकी आहे असें वाटतें. आणि " अशा रीतीने उद्दाम धमक्या देणाराच्या डोळ्यांसमोर, त्या मला डोळ्यांसमोर नको असलेल्या मुलीचा – तिच्या या वाग्दत्त वरासमोर मी वध करणार " अशी घोषणा तो करतो. " परंतु हें समाधान तुम्हांला लाभणारच नाही. कारण हा मी निघालों; माझें तोंड पुन्हा तुमच्या दृष्टीस पडणार नाही. तुमच्यासारख्यांचा सहवास ज्यांना सहन होणें शक्य आहे अशांच्याच संगतींत तुम्ही राहा " असें आवेगाने म्हणून हीमॉन तेथून चालता होतो.

राजा ईडिपस नाटकांत " हाच माझा शेवटचा शब्द " असें म्हणून राणी जोकास्ता

निघून जाते त्याची ही अगदी हुबेहूब प्रतिकृति आहे. तेथल्याप्रमाणेच वृंदनायक या घटनेच्या भयाण अर्थाकडे क्रीऑनचें लक्ष वेधूं पाहतो. परंतु क्रीऑनला तें भान राहत नाही. त्याच्या म्हणण्याला थोडा मान देऊन इस्मीनीला सोडून देण्याचें क्रीऑन कबूल करतो. "परंतु अन्टिगनीला मात्र आपण एका अत्यंत निर्जन अशा प्रदेशांत, एका दगडांच्या खड्ड्यांत, बाहेर येतां येणार नाही अशा रीतीने कोंडून ठेवणार; धर्माज्ञेप्रमाणे जरूर तेवढें अन्न तिच्याजवळ ठेवणार; मग तिला तेथे बसून खुशाल यमदेवाची प्रार्थना करीत राहूं दे. नाही तरी तोच देव तिला प्रिय आहे. त्या देवाच्या कृपेने ती जिवंत राहिली तर राहूं दे; नाही तर तिला कळून येऊं दे की, मृतांचा सन्मान करीत राहणें हा अगदीच अव्यापारेषु व्यापार आहे; पण काय उपयोग? हें कळण्यापूर्वीच तिचा अंत झालेला असेल" अशी घोषणा करून तो राजवाड्यांत निघून जातो.

अॅन्टिगनी नाटक खरोखर पाहतां येथे संपलें आहे. अॅन्टिगनी आणि हीमॉन यांचा मृत्यु आतां अटळ आहे. यापुढचे जे दोन प्रसंग आहेत त्यांचा मुख्य उद्देश केवळ निरवानिरवीचा आहे. क्रीऑनने निर्देश केल्याप्रमाणे अॅन्टिगनीला तिच्या त्या अंधाऱ्या बंद निवासस्थानाकडे नेण्याकरिता शिपाई घेऊन येतात तो प्रसंग यांत पहिला आहे. तिची ती दुःखद अवस्था पाहून वृंदगायकही विरघळतात; त्यांची राजनिष्ठा डळमळते. त्या वेळीं अॅन्टिगनीने जणू कांही आपली शेवटची कैफियत मांडली आहे. राजा ईडिपसने असेंच अखेरचें आत्मनिवेदन केलें. हॅम्लेटला तें करायला वेळ मिळाला नाही; परंतु आपला जणू बहिश्चर प्राण असा जो होरेशिओ, त्याला त्याने हें निवेदन करण्यासाठी जिवंत राह्यला सांगितलें. पुढच्याच प्रकरणांत आपण पाहूं की मॅकबेथ आणि ऑथेल्लो हेही असेंच आत्मनिवेदन करतात.

तोच कित्ता येथे अॅन्टिगनीच्या बाबतींतही पाळलेला आहे. आपल्यासारख्याच पूर्वीही कांही स्त्रिया असेंच दिव्य करून मेल्याचें ती सांगते. थीब्सिच्या लोकांना जरी आपलें हें कृत्य थट्टा करण्याजोगं वाटलें तरी थीब्सिच्या पवित्र भूमीला आपलें हें अंतगमन कोणत्या दैवी कायद्यानुसार आहे हें खास समजेल, अशी श्रद्धा ती व्यक्त करते. तिच्या बापाच्या पापाचें हें फळ आहे हा वृंदगायकांनी व्यक्त केलेला विचार तिला दुःसह होतो.

तुमच्या आमच्यासारखीच सामान्य माणूस—

याच वेळीं क्रीऑन प्रवेश करतो. "आम्ही कांही प्रत्यक्ष तिचा वध करीत नाही, तेव्हा आमच्या हाताला कांही पाप चिकटत नाही. पण या पोरीला प्रकाशांत वावरायला कांही यापुढे वाव मिळणार नाही" असें जेव्हा तो म्हणतो तेव्हा अॅन्टिगनीला अक्षरशः भडभडून येतें. आणि पुन्हा एकदा तिच्या ठिकाणचें मानवी दुबळेपण व्यक्त होतें. एक पुण्यकृत्य केल्याबद्दल आपल्याला हा देहदंड भोगावा लागावा, त्याबद्दल दुःख करायलाही कोणी नसावें, याबद्दल तिचा जीव तळमळतो. तथापि आपण जें करतों

आहों व केलें तें न्याय्य आहे याची ती पुन्हा ग्वाही देते. "नवऱ्यासाठी मीं हा त्याग केला नसता. कारण नवरा मेला तर दुसरा करतां येईल. मूल मेलें तर दुसरें होऊं शकेल. परंतु माझे आईबाप गेलेले; अशा स्थितींत दुसरा भाऊ मला कसा मिळणार? म्हणून मीं हे संस्कार केले. परंतु त्यांत क्रीऑनच्या दृष्टीने मीं कायदा मोडला. पण मीं देवाचा कोणताच कायदा मोडलेला नाही. दुर्दैव मात्र असें आहे की, पुण्य करणारी मी पापिणी म्हणून वधयात्रेकडे चाललें आहे!" अशी मनाची तळमळ होऊन ती शापवाणी उच्चारते की, "ज्यांनी माझे हे असे हाल चालविले आहेत त्यांचेही तसेच हाल होतील." आणि मग पुन्हा एकदा आपल्याला पटतें की, मोठ्या धीराने मृत्यूला कवटाळणारी ही बालिका तुमच्या आमच्यासारखीच रागलोभांनी भरलेली सामान्य माणूस आहे.

ॲन्टिगनीला घेऊन गेल्यावर वास्तविक नाटकांतील रस संपावा. पण या निरवा-निरवीच्या प्रसंगींसुद्धा एक नवीनच क्लृप्ति योजून सोफोक्लीसने नाटकांत पुन्हा एकदा औत्सुक्य निर्माण केलें आहे. राजा ईडिपस नाटकांतील आपला गूढ ज्ञानी मित्र तैरेसियास याला त्याने याही नाटकांत आता या प्रसंगाला आणलें आहे. तैरेसियास क्रीऑनला आपणाला आलेला एक भयद अनुभव सांगतो. पक्ष्यांचे अत्यंत विद्ध करणारे कर्कश आवाज ऐकून तो अस्वस्थ झाला होता. त्यांतून त्याला अर्थ उमगेना म्हणून त्याने अग्नि प्रज्वलित करून आहुति देण्याची तयारी केली. म्हणजे त्यामार्गे तरी कांही अर्थ कळावा. परंतु हवनांत विघ्न आलें; अपवित्र मांसाचे तुकडे अग्नी-मध्ये येऊन पडले आणि अग्नि विझून गेला. सर्व नगरभर हीच गोष्ट झाली होती. सर्वत्र भ्रष्टाकार माजला होता. याचें कारण दफन न करतां टाकलेले पॉलिनिसीसचें शव. त्याचे तुकडे टाकून कुत्र्यांनी आणि गिधाडांनी सर्व वेदी अपवित्र करून टाकल्या होत्या. म्हणून तैरेसियासने विनंति केली की, फेरविचार कर आणि हा अपवित्रपणा धुऊन काढ.

सत्तामदाने धुंद झालेल्या क्रीऑनला हा उपदेश कोठून रुचणार? ईडिपसने जी आणि जशी संभावना विचाऱ्या तैरेसियासची केली होती ती आणि अगदी तशीच संभावना त्याची क्रीऑनने केली. शेवटीं तैरेसियासने गंभीर भविष्यवाणी उच्चारली की, "तुझ्याच पोटीं जन्माला आलेलें अपत्य तुझ्या हातून मृतांना अर्पण केलें जाईल. सूर्यप्रकाशांत जीवन घालविणाऱ्या बालकांना तूं क्रूरपणें अंधारांत बद्ध केलें आहेस. अशा रीतीने देवांचा तूं उपमर्द केला आहेस. मी कांही हें कुणाचा भाडोत्री सेवक म्हणून सांगत नाही. पण ध्यानांत ठेव, लौकरच तुझ्या घरांत स्त्रिया आणि पुरुष यांना दुःखाने आकांत करण्याची पाळी येईल."

ही शापवाणी उच्चारून तैरेसियास परत जाऊं लागतो त्या वेळीं तो एक दोन वाक्यांतच क्रीऑनचा स्वभावदोष उघड करतो. आपला हात धरून घेऊन आलेल्या

मुलाला तो म्हणतो, "चल, बाबा. रागाचा हा झपाटा या मनुष्याला कोणा लहान वयाच्या माणसावर काढूं दे. म्हणजे जीभ इतकी सैल सोडून बोलणें हें योग्य नाही हें याला शिकायला सापडेल; आणि सध्याच्यापेक्षा अधिक विवेकीपणा अंतःकरणांत बाळगला पाहिजे हेंही त्याच्या ध्यानांत येईल."

मुळांतच हा सर्व संवाद मोठा सणसणीत आणि रसाळ आहे. परंतु त्यांतून जी घटना तैरेसियास गेल्यावर उद्भवली तिच्यामुळे श्रोत्यांच्या औत्सुक्यांत आणखीच भर पडते. वृंदगायकाची तळमळीची विनंति अखेर क्रीऑन ऐकतो आणि कांही झालें तरी दैवाविरुद्ध आपण माणसांनी व्यर्थ झगडा माजवितां उपयोगाचा नाही हें उमजून तो होता तसाच, केलेलें सर्व पुसून टाकण्याकरिता म्हणून, धाव घेतो; ॲंटिगनीला सोडवून आणण्यासाठी तो जातो.

यामुळे जी काय थोडीफार उत्सुकता निर्माण झाली होती ती लगेचच पार विरून जाते. भयकारक बातमी घेऊन एक दूत येतो. यापुढे येथेही ईडिपसमधल्या-प्रमाणेच वर्णन आहे. परंतु झाल्या प्रसंगाचें अत्यंत यथातथ्य दर्शन केवळ या वर्णनामधून कवीने घडविलें आहे. क्रीऑन त्या अंधारी गुहेंत वेळेवर जाऊन पोचलाच नाही. मध्ये पॉलिनिसीसच्या प्रेताची यथाविधी वाट लावण्यांतच त्याचा कांही वेळ गेला. त्याच्या आधीच हीमॉन परण पावला. कशा रीतीने हें दूत सांगणार तोच नाटककाराने आणखी एक औत्सुक्योत्पादक घटना उभी केली आहे. हीमॉनच्या मृत्यूची हकीकत दूत सांगतो आहे तोच क्रीऑनची पत्नी यूरिडिस तेथे येते. तिने तें दूताचें पहिलें बोलणें ऐकलेलें असतें. तथापि त्याला ती पुन्हा एकदा नीट सगळें सांग असें म्हणते. आणि तिच्या देखत दूत सांगतो की, पॉलिनिसीसच्या प्रेताचे यथाविधि संस्कार करून क्रीऑन गुहेपाशी गेला तोच त्याला हीमॉनची तीव्र किंकाळी ऐकूं आली. धावतच तो गुहेंत घुसला, तो दिसलें काय, तर स्वतःच्या रेशमी वस्त्राचा फास करून टांगून घेऊन ॲन्टिगनीने आत्महत्या केलेली आणि तिच्या कमरेला मिठी मारून हीमॉन आकांत करीत बसलेला.

"अरे वेड्या, काय हें चालवलें आहेस तूं" असें राजाने म्हणतांक्षणीं हीमॉन तरवार उपसून त्वेषाने राजाच्या अंगावर धावला. परंतु राजाने पळून जाण्याचा यत्न केल्यामुळे त्याचा वार चुकला. त्यावर हीमॉनने आपलें पोट तरवारीच्या टोकावर टेकलें आणि तिच्यावर जोराने शरीर दाबून स्वतःचा वध करून घेतला; थोडी धुगधुगी होती तोच धडपडत जाऊन त्याने ॲंटिगनीच्या प्रेताला मिठी मारली आणि तशाच स्थितींत तीं दोन प्रेतें तेथे आहेत आणि मृत्युदेव त्यांच्यातर्फे जणू जगाला बजावून सांगत आहे : अविवेकः परमापदां पदम्!

क्रीऑनच्या जीवनाचा दुर्विलास—

त्यासरशी निःशब्द होऊन राणी आंत जाते. तिच्या त्या जाण्याच्या रीतीने

सगळ्यांच्याच चित्तांत आशंका आणि भीति उत्पन्न होते. राणी विचारी आहे, ती भलतें सलतें कांही कांही करणार नाही, असें दूत म्हणतो. परंतु वृंदनायकाला कांही तसा विश्वास येत नाही. म्हणून दूत वस्तुस्थिति काय आहे हें पाहण्यासाठी आंत जातो; तोच क्रीऑन येतो. येथे त्याच्याही तोंडी नाटककाराने पश्चातापाचें आणि आत्मनिवेदनाचें भाषण घातलें आहे. "केवढा माझा अविवेकी आंधळेपणा. माझा प्रिय मुलगा मीं हरविला तो कांही त्याच्या दोषामुळे नव्हे; तर केवळ माझ्या मूर्खपणामुळे!" असा तो आक्रोश करतो. त्यावर वृंदनायक त्याला, "आता हें शहाणपण सुचून काय उपयोग, बैल गेला नि झोपा केला!" असा टोमणा देतो. येथे करुण रसाचा, दुःखाच्या अपरिहार्यतेचा पुन्हा एकदा उठाव नाटककार करतो आणि क्रीऑन म्हणतो, "केवढा भयंकर धडा मी शिकतों आहें; कोणा तरी दैवी शक्तीने वरून माझ्यावर आघात करून या क्रौर्याच्या मार्गाला मला लावलें असलें पाहिजे. काय हें दैव; मनुष्याचा जीवनाचा केवढा हा दुर्विलास!"

परंतु हा दुर्विलास येथेच संपला नव्हता. दूत आंतून बाहेर येतो आणि राणीच्या आत्महत्येची बातमी आणतो व तिच्या पुत्राच्या मृत्यूला कारण होणाऱ्या तुझें तळपट होवो अशी राणीने प्रार्थना केली असल्याचें क्रीऑनला सांगतो. एवढेंच नव्हे तर ॲन्टिगनीच्याही मृत्यूची जबाबदारी तिने राजावरच टाकल्याचें तो निवेदन करतो. त्या वेळीं राजा मोकळेपणीं कबूल करतो की, हा सर्व गुन्हा खरेंच सर्वस्वी आपला आहे. दुसऱ्या कोणाही मानवावर याची जबाबदारी नाही. "माझा गुन्हा मी कबूल करतों. आता मीही जगून मेल्यासारखाच आहे. तेव्हा सेवकहो, मला येथून कुठेतरी दूर घेऊन जा; आतां मृत्यू हेंच माझें सगळ्यांत ज्येष्ठ सद्भाग्य. न्या रे मला दूर कोठे तरी. मी एक अविचारी मूर्ख माणूस आहे. माझी पत्नीही आधी निघून गेली आहे. आतां मला कोणाचा आधार राहिलेला नाही."

शेवटीं सेवक राजाला राजवाड्यांत नेतात आणि "ज्ञान हा सुखाचा सर्वांत श्रेष्ठ ठेवा; आणि माणसाने देवांचा केव्हाही अपमान करतां कामा नये, त्यांतच कल्याण आहे. अहंकारी माणसें हें विसरून मी मीच्या मोठ्या गप्पा मारतात व याचें त्यांना महान संकटांच्या रूपाने प्रायश्चित्तही भोगावें लागतें," या वृंदनायकाच्या तात्पर्यरूपी भाषणानंतर नाटक संपतें.

क्रीऑनचीं अखेरचीं आत्मनिवेदनें आणि अपराधाची कबुली यांनी त्याच्या मनाची श्रेष्ठता पटते. तेथेच नाटक संपतें, त्यांतूनच वृंदनायकाच्या तोंडून नाटककार तात्पर्य व्यक्त करतो. यामुळे आतापर्यंत जरी हें नाटक ॲन्टिगनीच्या अन्यायाविरुद्धच्या झगड्याचेंच आहे असें वाटत होतें, तरी अखेर तें अहंकारामुळे उत्पन्न झालेल्या क्रीऑनच्या दुःखद विनाशाचें नाटक तर नाही ना, असा अखेरचा शंकेचा ठसा नाटककाराच्या या शेवटच्या प्रसंगामुळे मनावर उमटून जातो. म्हणून राजा ईडिपस,

अॅन्टिगनी आणि क्रीऑन या तीनही व्यक्तींचें करुणात्मक चित्र रेखाटण्याची कवीची रीत तरी कोणती आपण पाहिली हें आपण थोडक्यांत पाहूं या.

राजा ईडिपस नाटकाचें उदाहरण अॅरिस्टॉटलने वारंवार देऊन आपला करुण नाट्याबद्दलचा सिद्धांत मांडलेला आहे. अॅरिस्टॉटलची करुण नाट्याच्या नायकाची व्याख्या अशी आहे. "अत्यंत विख्यात आणि वैभवशाली अशी व्यक्ति; परंतु सर्वगुणसंपन्न नव्हे; अशा व्यक्तीवर दुर्दैव ओढवतें; परंतु तें त्याच्या ठिकाणच्या पापी किंवा दुष्ट वृत्तीमुळे नव्हे; तर त्याच्या हातून निर्णयप्रमाद घडतो म्हणून किंवा त्याच्या ठिकाणीं कोणत्या तरी प्रकारचें दौर्बल्य असतें म्हणून." या दृष्टीने पाहिलें तर राजा ईडिपस हा विख्यात मनुष्य आहे हें नाटककाराचें गृहीतकृत्य आहे. थीबिस राज्यावर आलेलें स्फिंक्सचें संकट ईडिपसने आपल्या चातुर्याने दूर केलें. त्यामुळे थीबिसच्या लोकांची त्याच्यावर भक्ति बसली, त्याला त्यांनी आपला राजा केलें, त्याने राज्यही चांगल्या प्रकारें केलें, लोकांमध्ये त्याच्याबद्दल फार मोठें प्रेम निर्माण झालें. परंतु नाटक पाहिल्यावर किंवा वाचल्यावर दिसून येतें तें हें की, राजाचें हें सर्व श्रेष्ठत्व नाटककाराने फक्त कांही पात्रांच्या तोंडून वर्णनाच्या रूपाने आम्हांला सांगितलें आहे. म्हणजे सोफोक्लीसच्या या नाटकाच्या रचनातंत्रांत तरी राजाच्या मोठेपणाचें प्रत्यक्ष दर्शन घडविण्यासारखे प्रसंग श्रोत्यांपुढे उभे करून दाखविण्याचा प्रकार बसत नाही.

ईडिपसचें दुर्दैव खरें पाहिलें असतां त्याच्यामागे जो दैवी शाप लागला आहे त्यामध्ये आहे. त्या दृष्टीने हें नाटक स्वभावगत दोषांमुळे घडणाऱ्या करुण विपाकाचें नाटक म्हणण्यापेक्षा निव्वळ बाह्य परिस्थितीच्या फटकाऱ्याने विद्ध झालेल्या एका श्रेष्ठ पुरुषाचें नाटक आहे असें म्हणण्याचा मोह होणें स्वाभाविक आहे. परंतु ईडिपसची स्वतःचीच कबुली अखेरीस अशी आहे की, या सर्व दुर्दैवी परिणामाची जबाबदारी माझी स्वतःची आहे. सर्वस्वी दैवाला बोल तो लावीतच नाही.

ईडिपसचा अविवेक —

कारण, त्याला शाप एवढाच होता की, त्याच्या हातून पितृवध घडणार आणि स्वतःच्याच मातेशीं त्याचा वैषयिक संबंध येणार. या दोन घोर पापांपासून दूर राहावें म्हणून त्याने कॉरिंथचें राज्य सोडलें. तथापि ती शापवाणी अखेर खरीच ठरली. तथापि त्यामुळे कांही पुढचे सर्व दुःखद प्रकार घडले नाहीत. आपण पाहिलें आहे की, स्वतःच्या हातून घडलेल्या पापांमुळे थीबिसवर रोगराईचें महासंकट आलें हें मान्य करण्याच्या बाबतींत त्याने अतिशय खळखळ केली; चांगल्या-चांगल्यांना स्वतःच्या विरोधी बनविलें. राज्याबाहेर निर्वासित होऊन थीब्रिसवरचें संकट त्याला नाहीसें करतां आलें असतें. परंतु स्वार्थाच्या आणि सत्तेच्या भरीं पडून त्याने तें केलें नाही. तसें केलें असतें तरी त्याचा आणि त्याच्या पत्नीचा – मातेचा – वियोग हा अपरिहार्यच होता; तें दुःख कांही त्याच्या नशिबींचें टळलें नसतें. परंतु राणी, नको नको म्हणत

असतांही पिसाटल्यासारखा होऊन, आपल्या जन्माची कहाणी आपल्याला समजलीच पाहिजे हा आपला हट्ट त्याने सर्व लोकांसमक्ष पुरा करून घेतला. एका दृष्टीने सत्य कसेंही असलें तरी त्यापुढे माघार घ्यावयाची नाही अशी ही वृत्ति सामान्य माणसाच्या दृष्टीने मोठी उच्च हें तर खरेंच. परंतु ॲन्टिगनीमध्ये वृंदगायकांनी म्हटल्याप्रमाणे जें जें फार मोठें उच्च त्याच्या पाठीशीं कांही तरी शाप असायचाच जणू. या उदात्त वृत्तीच्या जोडीलाच क्षुद्र स्वार्थाची वृत्ति पण ईडिपसला इकडे तिकडे खेचीत होती. आणि तिच्यापायी अखेर त्याला स्वतःची सर्वांसमोर छीः थूः झालेली पाहावी लागली, राणीने घोर आत्महत्या केली आणि त्याला स्वतःचे डोळे फोडून घेऊन धाय मोकलीत राज्याबाहेर देशोधडीला लागावें लागलें. तो थोडा विवेकाने वागता, सत्यच परंतु जरा जास्त सोयीने व नाजूकपणाने समजून घेता, तर एवढा हा सगळा प्रचंड आगीचा डोंब न उसळतांही कदाचित त्याला राज्याबाहेर पडतां आलें असतें.

नाटकाचें साध्य हेंच एकमेव लक्ष्य —

अशा सुध्या रीतीने त्याला या संकटांतून कसें पार पडतां आलें नाही, एकेक पाऊल पुढे पुढे पडत पडत अखेर अपरिहार्यपणे त्याच्या दुर्दैवाचा कळस त्याने कसा गाठला हें दाखविणें हा या नाटकाचा मुख्य विषय; त्यावरच स्वतःचें सर्व सामर्थ्य खर्च करून, इतर कसल्याही फापटपसाऱ्याच्या मोहांत न पडतां सोफोक्लीसने थोडक्या अवकाशांत ईडिपसच्या घोर दुःखाच्या खाईचें मूर्तिमंत दृश्य आपल्यापुढे उभें केलें आहे. नाटकाचें जें साध्य तेंच त्याने आपलें एकमेव लक्ष्य मानलें आहे. जातां जातां, एखादाच कुंचला जरा शोधकपणें मारून ईडिपसबद्दल त्याने आपल्या मनांत सहानुभूति निर्माण केली आहे; परंतु कोणी कोणी अवश्य मानतात त्याप्रमाणे त्याचें श्रेष्ठत्व आमच्या गळीं उतरवण्यासाठी आटापीट करण्याचा उपद्व्याप त्याने केला नाही. आपल्या शब्दावर आपले श्रोते व प्रेक्षक अविश्वास करणार नाहीत ही कलावंताची श्रद्धा त्याच्या ठिकाणीं ओतप्रेत होती आणि तिच्याच जोरावर ईडिपसच्या दुःखावेगाचें नाटक त्याने आपल्याला दाखविलें.

हॅम्लेटप्रमाणे याही नाटकांत नायकाचा पापप्रेरक असा कोणी नाही. कारण खरें म्हणजे, हॅम्लेट काय किंवा ईडिपस काय, कोणीच पापप्रवृत्त नाही. प्राप्त परिस्थितींतून मार्ग काढीत असतांना कोणत्या ना कोणत्या कारणाने दोघेही उणे पडतात; कांही अंशीं त्यांच्या स्वतःच्याच ठिकाणीं दुर्बलता, किंवा कांही उणीव असते म्हणून. हॅम्लेटचा करुण विपाक सर्वस्वी स्वभावगत दोषांमुळे होतो असें वरवर वाटलें तरी तें खरें नाही, त्याच्या पुढची परिस्थितीच अतिशय विनतोड होती हें आपण पाहिलेंच. तथापि न्याय-अन्यायाची विशेष चिकित्सा करीत न बसणारा मनुष्य त्याच्या जागीं असता तर त्याने तडकाफडकी सूड घेतला असता हेंही खरें; त्या दृष्टीने त्याचा तो दुर्बळपणा होता. ईडिपस तर शापग्रस्त होता. मानवी प्रयत्न त्याच्या जीवनांत

व्यर्थ होते. तेव्हा त्याचा करुण विपाक हा केवळ परिस्थितिगत होय असें म्हणणें सोपें व सहजही आहे. परंतु सोफोक्लीस मात्र तरीही असें दाखवून राहिला आहे की, कांहीशा स्वार्थमूलक हटवादीपणामुळे नाही ते दुःखाचे प्रसंग ईडिपसने आपल्यावर ओढवून घेतलेले आहेत.

अरिस्टॉटल करुण नाटकाची भाषा काव्यमय असावी म्हणतो —

या नाटकाच्या काव्यमय भाषेबद्दल त्या त्या वेळीं लिहिलेंच आहे. भावनेचा अतिशय तंगपणा व्यक्त करण्याला त्या त्या ठिकाणीं गद्य रचना निःसंशय थिटी पडली असती. म्हणून तर ईडिपसचेंच उदाहरण घेऊन ॲरिस्टॉलने करुण नाट्याची भाषा अलंकारयुक्त काव्यमय असावी असें प्रतिपादिलें. शिवाय आपलें नाटक पाहायला १०।१५ हजार श्रोते एकदम बसणार हें सोफोक्लीस ओळखून होता. एवढ्या अफाट समुदायाला एकचित्ताने नाटक पाहायला लावण्याच्या दोनच युक्त्या त्याला उपलब्ध होत्या. एक अति वेगवान अशी गतिमानता आणि दुसरी म्हणजे वक्तृत्वाचे झोत टाकणारी भाषासरणी. या दृष्टीने राजा ईडिपस हें नाटक अत्यंत अभ्यसनीय आहे.

नाटकाचा नायक श्रेष्ठ असला पाहिजे हें तत्त्व ॲन्टिगनीला नायक म्हणून मान्यता दिली तर लंगडें पडतें. कारण ॲन्टिगनीच्या अंगीं वर्णनाने श्रोत्यांना कळवावें असलें कसलेंही श्रेष्ठत्व नाही. एक अल्पवयी पोर ती; पण झगडा करायला उभी राहिली आहे नुकताच विजय मिळवून राजा झालेल्या सत्ताधाऱ्याशीं. तिचें म्हणणें, माझा सत्पक्ष आहे; मानवी कायद्यांपेक्षा देवाचे कायदे निरपवाद श्रेष्ठ होत; ते पाळतांना, ठरलेला विवाह मोडला तरी किंवा मरण आलें तरी त्याला मी तयार आहे. या तिच्या असामान्य धैर्याने ती आपल्याला पूज्य वाटूं लागते; तिच्यावरील संकटाबद्दल आपण बेचैन होतो. या मुलीवर हें संकट यायला नको होतें असें आपण करुणायुक्त अंतःकरणाने म्हणतो.

परंतु व्यवहाराच्या पातळीवर तिचें वागणें अप्रयोजकपणाचेंच नव्हतें का? तिच्याबद्दल सहानुभूति वाटत असूनही, तिने सत्तेपुढे मान वाकवावयाला हवी होती असें तिच्याच भोवतालचे लोकही म्हणत होते. देवाचे कायदे पाळण्याची एवढी अथांग जबाबदारी तिच्या एकटीच्यावर कोणी टाकली होती? एवढा मोठा अहंभाव, उन्माद अंगीं बाणविण्याचें तिला काय कारण होतें? एखाद्याच व्यक्तीने केवळ आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा आसरा घेऊन प्रस्थापित सत्तेशीं विद्रोह करणें हें मूर्खपणाचें आणि एका परीने समाजाच्या स्थिरतेचा पाया उखडून टाकणारें काम नव्हे काय? व्यावहारिक पायरीवर असे अत्यंत कठोर आरोप ॲन्टिगनीवर खास करतां येतील; आणि त्या पातळीवर तें खरेंही आहे. कारण व्यवहार सत्यापेक्षा सोयीस्करपणावर अधिक भर देतो.

तत्त्वनिष्ठ व निरपराध मुलीवरील संकटामुळे हळहळ—

हें व्यावहारिक शहाणपण ॲन्टिगनीजवळ नव्हतें. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही हें मानून चालायला ती तयार नव्हती. तेव्हा तिचा अंत हा अटळ होता. तथापि सोफोक्लीसने तिच्याविषयी आपल्या मनांत जी जवळीक निर्माण केली आहे तिच्यामुळे, अपरिहार्य असलेली ही ॲन्टिगनीची दुःखद परिणति, आपणाला तिची अपरिहार्यता मान्य करूनसुद्धा, ॲन्टिगनीची पक्षपाती बनविते. आणि क्रीऑन इतका निर्दयपणे वागला नसता तर किती बरें झालें असतें अशी विव्हळ मनःस्थिति आपली झाल्यावांचून राहत नाही.

ॲन्टिगनीचा प्रस्थापित सत्तेशीं विफल सामना हा या नाटकाचा विषय. म्हणून त्यावरच सारें लक्ष सोफोक्लीसने केंद्रित केलें आहे. हा सामना चालू असतांना ॲन्टिगनीच्या ठिकाणचें व्यक्त होणारें तेज, सत्यनिष्ठा, निर्भयता हे गुण त्यानें स्वाभाविकच दाखविले आहेत. परंतु त्याचबरोबर ती आपल्यासारखी एक रागद्वेषयुक्त माणूस आहे हेंही वेळोवेळी त्याने दाखविलें आहे. म्हणूनच आपल्याला तिच्याबद्दल आपुलकी वाटते. ती कोणी एक महान विभूति आहे म्हणून नव्हे, तर एक सामान्य परंतु तत्त्वनिष्ठ अशा निरपराध मुलीवर अन्यायाने एवढें मोठें संकट येतें म्हणून. मानवाचा हा स्वभावधर्म आहे; आणि तो ओळखून सोफोक्लीसने ॲन्टिगनीचें स्वभावचित्र रेखाटलें आहे.

क्रीऑनचें या नाटकांतील स्थान कोणतें हा मोठा विवाद्य प्रश्न आहे. सोफोक्लीसच्या नाटकत्रयीपैकी राजा ईडिपस या नाटकांत क्रीऑनचें स्थान तर उघड दुय्यम आहे. मधलें नाटक 'कोलोन येथे ईडिपस' या नाटकांतही त्याला दुय्यमच स्थान आहे; आणि तेंही आपल्या व आपल्या राज्याच्या स्वास्थ्यासाठी राजा ईडिपसचा आणि त्याच्या दोघी मुलींचा छळ आणि अपमान करणारा एक खलपुरुष या स्वरूपाचें आहे. ही पार्श्वभूमि लक्षांत घेतां आणि ॲन्टिगनी नाटकाच्या अगदी सुरुवातीलाच सत्य आणि सत्ता यामधील झगडा हें या नाटकाचें बीज म्हणून नाटककाराने स्पष्ट केलेलें पाहिल्यानंतर, या नाटकांतही त्याचें स्थान दुय्यम मानणें हेंच ओघाला येतें. नाटक ॲन्टिगनीच्या झगड्याचें आहे; या झगड्यांत तिचा नाश होतो, तसाच क्रीऑनची पत्नी आणि मुलगा यांचाही नाश होतो. परंतु तेवढ्याने कांही हें नाटक क्रीऑनचें नाटक होऊं शकत नाही.

परंतु विवेचनाच्या ओघांत मागे सूचित केल्याप्रमाणे हीमॉनच्या कथानकाला सोफोक्लीसनें दिलेलें फार मोठें स्थान आणि शेवटीं करुण नाटकाला शोभावें असें त्याच्या तोंडीं घातलेलें आत्मनिवेदन, यामुळें तसा भास होतो हें मान्य केलें पाहिजे.

म्हणून त्याचाही विचार करूं गेलें म्हणजे आपल्याला विशेष नजरेस येतें तें हें की, राजा ईडिपस व ॲन्टिगनी या दोन्ही नाटकांत मिळून आपल्यापुढे जो क्रीऑन

सोफोक्लीसने उभा केला आहे त्याच्या स्वभावांतील दोषच हळूहळू जास्तच गाढ कसे होत गेले हेंच आपण प्रामुख्याने पाहतों. राजाने न्याय्य राज्य केलें तरच त्याचें राज्य मानावें असें म्हणणारा हा गृहस्थ स्वतः राजा होतांच सत्तांध होतो, त्याचा विवेक सुटतो, तोल सुटतो आणि अखेर तो हटवादीपणामुळे मुलगा व पत्नी यांच्या नाशाला कारण होतो. ही परिणति दुःखद तर खरीच. परंतु त्यामुळे क्रीऑनबद्दल आपल्याला करुणा वाटावी असें दोन्ही नाटकांत कांही प्रत्ययाला येत नाही. एक अपवादात्मक गोष्ट म्हणजे, ॲन्टिगनी नाटकाच्या अखेरीस, एकंदर भयाण भवितव्याची कल्पना आल्यावर का होईना, तो आपला हट्ट सोडतो, केलेले अन्याय दूर करूं पाहतो आणि त्यांत विफल झाल्यावर झाल्या प्रकाराची सर्व जबाबदारी स्वतःवर घेतो. हा त्याचा पश्चात्ताप शेवटच्या क्षणीं आपल्या मनांत त्याच्याबद्दल सहानुभूति उत्पन्न करतो आणि आपणही म्हणूं लागतों की, "बिचारा; तसें पाहिलें तर त्याच्या प्रवृत्ति चांगल्या होत्या. राजा ईडिपसने त्याला वाईट वागविलें होतें तरी त्याने त्याच्याविषयी आकस बाळगला नव्हता. स्वतः राजा न होतां, ईडिपसच्या मुलालाच राजा करून त्याला मदत केली होती. पण कसें आणि कोठून त्याच्या डोक्यांत हें वारें शिरलें आणि त्याच्या पायीं तीन माणसांचा नाश करून स्वतःचेंही जीवन त्याने उजाड केलें!" .

या भावनेने पाहिलें तर क्रीऑन हाही करुण नाट्याचा नायक शोभूं शकतो. अर्थात एक निश्चित की, तो कोणी महान पुरुष मुळांतच नाही; आणि त्याचें महानपण प्रत्यक्ष प्रसंगांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्याचें सोफोक्लीसला कारणच पडलें नाही.

ॲन्टिगनी नाटकांतही संवादामधील अत्यंत वेधक खटकेबाजपणा आणि विपुल काव्यमयता यांचा अनुभव एकसारखा येतो. एकाच नाटककाराचीं हीं दोन्ही नाटकें. त्यांची रचनापद्धति, त्यांची भाषा, त्यांचें तंत्रकौशल्य, सर्व एकाच ठशाचीं. घोर प्रसंग, रंगभूमीच्या रचनेमधील अपरिहार्य उणीवांमुळे, वर्णनाच्याच आधाराने व्यक्त करण्याचें तंत्र हेंही दोन्हीकडे एकच आणि सारखेंच प्रभावीपणाने हाताळलेलें. त्यामुळे भाषेच्या बाबतींत ॲन्टिगनीपुरतें निराळें असें कांही सांगण्याचें कारण नाही. एक निश्चित की, ही भाषा घरगुती वळणाची बिलकूल नाही. जिची हेटाळणी कितीएक पंडितबुव कृत्रिम या विशेषणाने करूं पाहतात तशीच ती भाषा आहे.

या दोन्ही नाटकांचा एक समान विशेष फार जाणवतो. ईडिपस नाटकांत राजा ईडिपसचा मृत्यु नाही. तसाच ॲन्टिगनीमध्ये क्रीऑनचा मृत्यु नाही. प्रश्न असा उत्पन्न होतो की, करुण नाट्यांत नायकाचा किंवा तशा प्रमुख व्यक्तीचा मृत्यु नसला तरीही तें करुण नाट्य होऊं शकते असें यावरून होत नाही का? आणखी पुष्कळशीं नाटकें पाहून झाल्यावर या प्रश्नाचा विचार आपल्याला करावा लागेल.

प्रकरण चवथें

मॅकबेथ

पुन्हा एकदा आपण शेक्सपीअरकडे परत येऊं. त्याच्या हॅम्लेटमध्ये आपण पाहिलें की, बापाच्या वधाचा सूड घेण्याचें हॅम्लेटचें ध्येय आणि तें ध्येय पुरें करण्याच्या कामांत आलेला अत्यंत विरोधी अशा परिस्थितीचा अडथळा, यांतून निर्माण झालेल्या झगड्यापायी त्या उदारहृदय, तत्त्वज्ञ आणि न्यायप्रिय तरुणाचा अंत झाला; त्या अंताला जशी परिस्थिति कारण होती तसा कांही अंशीं त्याचा स्वभावही कारण होता. आणि शेक्सपीअरने सबंध नाटकांत त्याच्या या झगड्याचेंच चित्रण आपल्यापुढे केलें. हॅम्लेट जसा कोणतेंही पापकृत्य करायला प्रवृत्त झाला नव्हता तसाच राजा ईडिपसही नव्हता; ॲन्टिगनीही नव्हती. थोड्या फार प्रमाणांत क्रीऑन दुष्कृत्याकडे वळला. परंतु त्यांत त्याला प्रेरक असें अन्य कोणी नव्हतें. राजा ईडिपस आणि ॲन्टिगनी या नाटकांतही नायकांच्या जीवनांतील झगड्याचेंच फक्त चित्रण सोफोक्लीसने केलें आहे. त्यांतील नायकांच्या मोठेंपणाचें दिग्दर्शन मात्र त्याने केलें; त्यासाठी कसलेही प्रत्यक्ष प्रसंग आपल्यापुढे चित्रित केले नाहींत; एवढेंच नव्हे, तर ॲन्टिगनी ही एक सामान्य अल्पवयी मुलगी होती आणि तिच्या ठिकाणचें सामान्यत्व अखेरपावेतो कायमच होतें, असेंच त्याने दाखविलें. या सामान्य स्त्रीची एवढी प्रखर सत्यनिष्ठा व त्यासाठी अपूर्व त्याग करण्याची तयारी याच गोष्टी अखेरपर्यंत आपल्या चित्ताची तिच्याविषयी तळमळ उत्पन्न करण्याला कारणीभूत झाल्या हें आपण पाहिलें.

शेक्सपीअरच्या मॅकबेथचा थाट थोडा निराळा आहे. मॅकबेथ नाटक हें सुरुवातीपासून शेवटपर्यंत महत्त्वाकांक्षेच्या भरी पडून मॅकबेथने केलेल्या दुष्ट कृत्यांचें चित्रण आहे, व त्या दुष्ट कृत्यांमुळेच त्याचा नाश कसा झाला हें अखेर आपण पाहूं. अशा स्थितींत या दुष्ट माणसाबद्दल सुद्धा आपल्याला सहानुभूति कां वाटावी, अरेरे, याही माणसाच्या हातून या गोष्टी घडायला नको होत्या, पण झालें तें अपरिहार्य होतें, असें कां वाटावें, याबद्दल नाटककाराने कांही तरी सांगायला हवें अशी अपेक्षा सहजच श्रोता किंवा प्रेक्षक बाळगील. त्याचें कांही तरी भव्यपण, उदात्तपण नाटककाराने आम्हांला असें दाखवावें की, ज्याच्यामुळे आम्हीं त्याच्याबद्दल हळहळावें, अशी अपेक्षा व्यक्त करणें कांहीसें स्वाभाविक होईल.

परंतु प्रत्यक्ष नाटकांत काय आढळतें पाहा. मॅकबेथ नाटकाच्या दुसऱ्या प्रवेशांत मॅकबेथच्या शौर्याबद्दलची माहिती आपल्याला मिळते. पण ती कांही तो रणांगणावर प्रत्यक्ष लढल्याचें दाखवून नव्हे; तर एका जखमी सैनिकाने एका विशिष्ट लढाईच्या

केलेल्या वर्णनावरून. डंकन राजाच्या विरुद्ध बंडखोरांनी मोठा उठाव केला होता व त्या बंडखोरांना नॉर्वेचें साह्य होतें. लढाईंत प्रथम बंडखोरांचा जय झालासें वाटलें; परंतु अखेर शूर मॅकबेथने – त्याच्याबरोबरच बँकोही होता व त्याचेंही शौर्य तितकेंच होतें असें या सैनिकानेच सांगितलें आहे – जयश्री राजाच्या वाजूला ओढून आणली. याच बातमीचा उत्तरार्ध राजाचा उमराव रॉस याने सांगितला. म्हणजे या प्रवेशांत जर कांही माहिती मॅकबेथबद्दल मिळत असेल तर ती एवढीच की, मॅकबेथ हा एक शूर लढवय्या होता आणि त्याने डंकनच्या राज्यावरील एक मोठें संकट निवारलें. परंतु नाटकाच्या पुढच्या परिणतीच्या दृष्टीने त्यामध्ये रॉसने जी माहिती सांगितली की, कॉडारच्या देनने (देन ही पदवी इंग्लंडमधल्या अर्ल या पदवीच्या जोडीची सन्मान्य पदवी आहे) विश्वासघात करून नॉर्वेला मदत केली, त्या माहितीला मोठें महत्त्व आहे. कारण, या कॉडारच्या देनलाच वधाची शिक्षा डंकन राजाने सांगितली आणि त्याची देन ही पदवी आपण मॅकबेथला त्याचें स्वागत करतेवेळीं देणार असें जाहीर केलें. आणि यांतूनच तर मॅकबेथच्या पुढच्या सगळ्या दुर्भागी घसरगुंडीला सुरुवात झाली.

तें कसें तें पाहण्यापूर्वी या प्रवेशांत मुख्य हेतु मॅकबेथच्या पतनाची सुरुवात ज्यामुळे झाली तें कारण स्पष्ट करण्याचा आहे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. म्हणजे मॅकबेथचें पतन व दुःखद अंत दाखविणें हें नाटककाराचें साध्य आहे व त्यासाठीच दुसऱ्या प्रवेशाची रचना आहे असें मानलें पाहिजे. आणि म्हणून त्यामधील मॅकबेथच्या श्रेष्ठ लढाऊ कौशल्याचा उल्लेख हा आनुषंगिक व दुय्यम महत्त्वाचा मानला पाहिजे.

श्रेष्ठतेचें हें नुसतें वर्णनसुद्धा प्रक्षिप्त मानलें जातें—

याचमुळे असेल कदाचित, पण हा प्रवेश शेक्सपीअरचा नसून प्रक्षिप्त आहे असें मानण्याकडे पुष्कळांचें मन कललें आहे. या प्रवेशाची उथळ भाषा ही पण शेक्सपीअरला शोभण्यासारखी नाही असें या लोकांचें म्हणणें आहे. याचा अर्थ मॅकबेथच्या श्रेष्ठतेचें प्रत्यक्ष दर्शन तर दूरच राहो, पण वर्णनसुद्धा पुष्कळांना या नाटकाच्या सुसंगत चित्रणक्रमाच्या दृष्टीने आवश्यक वाटत नाही, हें लक्षांत ठेवायला हवें.

परंतु शेक्सपीअरनेच हा प्रवेश लिहिला असें मानूनसुद्धा हें शिल्लकच राहतें की, त्यांत मॅकबेथच्या शौर्याचें नुसतें ओझरतें वर्णन आहे. घटना त्याच्या पतनाची घडायची; तीच पुढे साऱ्या नाटकांत दाखविली आहे आणि पतनाच्या घटनेची सुरुवात दाखविण्यापुरता कॉडारच्या देनच्या विश्वासघाताचा, त्याला मिळालेल्या शिक्षेचा आणि त्याची पदवी मॅकबेथला मिळणार असल्याचा उल्लेख करण्यासाठी या प्रवेशाचा उपयोग शेक्सपीअरने केलेला आहे.

कारण, पुढचाच जो चेटक्यांचा प्रवेश आहे त्यामध्ये या चेटक्या – तिघी आहेत

त्या – क्रमाक्रमाने मॅकबेथचें स्वागत करतात तें असें. पहिली म्हणते, "ग्लामिसचा देन, तुझें स्वागत असो!" यांत विशेष कांही नाही. त्याची ती स्वतःचीच पदवी आहे. पण दुसरी म्हणते, "कॉडारचा देन, तुझें स्वागत असो." ही मात्र मॅकबेथच्या ध्यानीं मनीं नसलेली पदवी आहे. त्याला ती पदवी देण्याचें डंकन राजाने ठरविलेलें आपल्याला माहीत आहे; पण मॅकबेथला बिचाऱ्याला तें ठाऊक नाही. अशा तऱ्हेचें एक पताकास्थान येथे नाटकाराने साधलें आहे. त्यानंतर तिसरी चेटकी तर एक पायरी पुढे जाऊन म्हणते, "मॅकबेथ, जो यापुढे राजा होणार आहे, त्याचें स्वागत असो!"

स्वागताची ही त्रिविध तऱ्हा मॅकबेथचें चित्त गुंग करून टाकते. आपण मोठे मानकरी होणार, नव्हे राजा होणार ही भविष्यवाणी त्याला स्तिमित करते. बँकोला त्याचा जणू हेवा वाटतो. मॅकबेथचें हें चकित होण्याचें सारें सोंग आहे असें त्याला वाटतें आणि चेटक्यांनी आपलें स्वतःचेंही भविष्य वर्तवावें असें त्यांना तो म्हणतो. पण त्याला उत्तर मिळतें, "तूं कांही राजा होणार नाहीस, पण तुझ्या वंशांत राजे जन्माला येतील."

मॅकबेथला या सगळ्याचें कोडें पडतें. कॉडारचा देन मी कसा होणार? तो तर जिवंत आहे, जोरांत आहे. आणि राजा? ही गोष्ट तर मुळींच विश्वास ठेवण्याच्या लायकीची नाही. म्हणून तो त्या चेटक्यांना जास्त छेडूं पाहतो; पण त्या नाहीशा होतात.

त्या चेटक्या एकाएकी नाहीशा झाल्यामुळे, आपण जें ऐकलें तें खरें का असा मॅकबेथला संशय येतो. बँकोकडून तो खरावून घेतो की, ज्या क्रमाने त्याने ऐकलें तसेंच चेटक्या बोलल्या होत्या. परंतु या सगळ्याचा अर्थ काय हें स्पष्ट होण्यापूर्वीच डंकन राजाचे दोघे मानकरी मॅकबेथचें अभिनंदन आणि स्वागत करण्यासाठी – राजातर्फे आभार व्यक्त करण्यासाठी त्या ठिकाणीं येतात. त्यांपैकी एकजण म्हणतो, "राजा तुमचा फार मोठा सन्मान करणार आहे. त्याचें पुरस्सर प्रसादचिन्ह म्हणून राजाने तुम्हांला कॉडारचा देन हा किताब बहाल केला आहे."

मॅकबेथचा चेटक्यांवर विश्वास बसून डोकें कां फिरतें? —

या ठिकाणीं मॅकबेथचें डोकें फिरतें. एवढ्यासाठी दुसऱ्या प्रवेशांत कॉडारला वधाची शिक्षा दिल्याची आणि त्याची पदवी मॅकबेथला दिल्याची हकीकत शेक्सपीअरने आपल्याला ऐकविली. अर्थात् हें न ऐकवितांही या प्रवेशांत त्या पदवीचा उल्लेख करून मॅकबेथच्या मनांत चेटक्यांच्या भविष्याविषयीची श्रद्धा उत्पन्न झाल्याचें दाखवितां आलें असतें. परंतु त्यामुळे त्यापूर्वीचें एक चांगलें पातकास्थान वाया गेलें असतें.

मॅकबेथ आणि बँको या दोघांनाही आता वाटूं लागतें की, या भूतयोनींतील व्यक्तींच्या कथनांत कांही तरी सत्यांश असण्याचा संभव आहे, परंतु बँको जास्त

दि. क्र. १०९३२ ता. १०१

सावध आहे. म्हणून तो म्हणतो, "कुणी सांगावें, हें खारें खरें व्हायचेंही असेल. परंतु पुष्कळदा जगांत असेंच घडतें की, आम्हांला सैकटास लोटण्यासाठी पापांचे प्रवर्तक कांही कांही क्षुल्लक अशा सत्य घटना सांगून आम्हांला भुलवितात आणि त्यांतून आम्हांला घोर अशा दुःखाच्या खाईंत लोटतात."

मोहवश होऊन पाप करायला निघालेल्याचा शतमुख विनिपात हें नाटकाचें रहस्य –

बँकोच्या या भाषणांत नाटककाराने आपलें साध्य, या नाटकाचें बीज स्पष्ट सांगून टाकलें आहे. पापवासनांचीं प्रवर्तक साधनें — मग त्या खरोखर कोणी भूतपिशाश्च योनींतील व्यक्ती असोत किंवा स्वतःच्याच मनांतून उभ्या झालेल्या भिन्नभिन्न सूचना असोत — मनुष्याला भुरळ पाडतात; त्या भुरळ पाडण्याच्या क्रियेला समर्थक अशा कांही कांही किरकोळ घटनांनी गहरा रंग चढतो; परंतु शेवटीं त्या भुरळीपायीं मनुष्याचा तीव्र विनाश होतो. फसव्या सत्यदर्शनाने भुरळ पडून महापाप करायला तयार झालेल्या माणसाचा शतमुख विनिपात हेंच मॅकबेथ नाटकाचें रहस्य किंवा साध्य.

परंतु ज्याचा हा असा विनिपात होतो तो मॅकबेथ जात्या दुष्ट किंवा पापबुद्धि नाही. स्वतःशीं विचार करतांना त्याच्या मनाचा खूप गोंधळ उडालेला आपण पाहतों; "चेटक्यांची ही भविष्यवाणी चांगली की वाईट? वाईट म्हणावी तर त्यापैकी एक भविष्य तर हातोहात खरें झालें? यांत वाईट काय झालें? चांगलें म्हणावें तर माझ्या मनांत जी एक कल्पना एकसारखी उभी राहते आहे तिला मी बळी कां पडतों आहे? किती भयानक कल्पना आहे ती. अंगावर नुसते शहारे उभे राहतात; अंतःकरण धडधडून, फासळ्या फोडून बाहेर येईलसें वाटतें! भावी घटनांच्या कल्पनेने भय वाटतें, चित्ताची स्थिरता ढळते, जें नाही तेंच आहेसें वाटतें," अशा मनाच्या खळबळींत तो इतका व्यग्र होऊन जातो की, त्याला आपण कोठे आहोंत, कुणाबरोबर आहोंत याचेंसुद्धा भान राहत नाही; इतकें की, बँको बरोबरीच्यांना दाखवून म्हणतो सुद्धा, "पाहा, पाहा, आमचे जोडीदार किती गुंगून गेले आहेत ते."

आपल्याच चिंतनांत गुंगून जाणारा तरल कल्पनाशक्तीचा माणूस—

हा एक मॅकबेथच्या स्वभावाचा विशेष आहे. स्वतःच्या विचारांत गुंगून जाणारा, दुष्प्रवृत्तीला भिणारा, हातून वाईट घडूं नये असें इच्छिणारा हा माणूस आहे, हें या प्रवेशांत जास्त जास्त स्पष्ट होतें. कारण लगेच तो स्वतःच्या मनाला प्रश्न करतो, "राजा होण्याचें माझ्या नशिबींच असेल तर त्यासाठीं मला धडपड कशाला करायला हवी! घडणार तें घडेलच" या त्याच्या स्वभावांतील विशेषाबरोबरच आणखी एक विशेष असा दिसून येतो की, मॅकबेथ हा एक तरल कल्पनाशक्ति असलेला कवि आहे. कवि म्हणजे एक अव्यवहारी प्राणी म्हणून आपण व्यवहारी लोक त्याला कितीही

हसत असलों तरी अखेर कवि आपल्या कल्पनारम्यतेने आणि चतुर शब्दरचनेमुळे आपलें मन वेधून घेतात यांत शंका नाही. आणि या गोष्टीचा प्रत्यय या प्रवेशापासूनच आपल्याला यायला लागतो.

" चला, आता प्रथम राजेसाहेबांकडे जाऊन निवेदन करूं, आपल्या मनाच्या गोष्टी मग पाहूं आपण " ही साधी गोष्ट सुद्धा मॅकबेथने काव्यरूप शब्दांनी सांगितली आहे. आणि अशीं काव्यमय भाषणें यापुढे आपल्याला पदोपदीं पाहायला सांपडतील.

यानंतर मॅकबेथ व बँको राजाच्या भेटीला जातात. ते पोचण्यापूर्वी राजाला कॉडारच्या देनचा वध केल्याची बातमी मिळते. त्या वेळीं राजा एक सुंदर उद्गार काढतो की, अंतःकरणांत आंत काय चाललें आहे तें वरच्या चेहऱ्याच्या अविर्भावावरून समजण्याची कला माणसाजवळ नाही; कारण याच माणसाला मी केवढी अमोल विश्वास्य व्यक्ति मानीत होतों. बिचारा राजा; आणखीही एका व्यक्तीच्या बाबतींत त्याची हीच फसगत व्हायची होती !

डंकन राजाची केवढी भयाण फसगत—

कारण, मॅकबेथचें त्याने केवढ्या उत्साहाने आणि आपुलकीने स्वागत केलें. मॅकबेथनेही आपली सेवा हें आमचें कर्तव्यच वगैरे केवढ्या निष्ठेच्या गोष्टी त्याला सांगितल्या. परंतु राजाने आपला मोठा मुलगा माल्कम याला युवराजाचे अधिकार देतांक्षणींच मॅकबेथच्या कपाळाची शीर चढली हें राजाच्या भोळ्या डोळ्यांना दिसलें नाही. " युवराज ! म्हणजे ही एक माझ्या मार्गांत धोंडच ! तिला अडखळून मला पडावें तरी लागेल किंवा तिच्या पार व्हावें लागेल. किती काळ्याकुट्ट इच्छा माझ्या अंतःकरणांत खोलवर पिंगा घालताहेत; प्रकाशांत त्या दिसूंसुद्धा नयेत; रात्रीच्या चांदण्याचा किंवा दिवसाचा प्रकाश त्यांच्यावर पडायची सोय नाही. हात काय करील तिकडे डोळ्यांना डोळेझाक करावी लागेल ! पण कांही असो ! जें घडलेलें पाह्यला डोळे भितात तें अखेर घडलेंच पाहिजे. " अशी त्या प्रसंगीं मॅकबेथच्या मनाची जी पुन्हा खळबळ माजली तिचा एवढाही वास डंकन राजाला आला नाही. उलट, " चला, आपण त्याच्या पाठोपाठच जाऊं; कारण, आमच्या स्वागतासाठी आमच्यापुढे धावत गेलेल्या या आमच्या आताला जगांत तोड नाही " या केवढ्या फसव्या विचाराने त्या रात्रीची विश्रांति मॅकबेथच्या किल्ल्यांत घेण्यासाठी राजा मोठ्या उत्सुकतेने जातो.

मॅकबेथच्या स्वभावाची गहिरी बाजू—

मॅकबेथच्या वृत्तीला पाप खरोखर अंगवळणीं पडलेलें नाही याचा प्रत्यय याच्या-पुढच्याच प्रवेशांत येतो. मॅकबेथचें आपल्या पत्नीवर फार प्रेम आहे; फार विश्वास आहे. म्हणून चेटक्यांनी वर्तविलेल्या भविष्याची कल्पना तिला देण्यासाठी तो इतका आतुर झाला होता की, राजाच्या भेटीला जाण्याच्या गडबडींतसुद्धा वेळांत वेळ

काढून ती सगळी हकीकत त्याने लेडी मॅकबेथला स्पष्ट लिहून कळविली आहे. तें पत्र वाचीतच लेडी मॅकबेथ प्रवेश करते. तिला विश्वास आहे की, मॅकबेथ भविष्याप्रमाणे राजा होणारच. परंतु तिला भीति आहे ती त्याच्या स्वभावांतील मृदुतेची. तिला चांगलें माहीत आहे की, मॅकबेथचें अंतःकरण मानवी दयेच्या दुग्धाने ओतप्रोत भरलेलें आहे; त्यामुळे इष्टकामनासिद्धीचा अगदी जवळचा तडकाफडकी मार्ग स्वीकारण्याला त्याचें मन कचरतें. मॅकबेथला श्रेष्ठपद हवें आहे; तो महत्त्वाकांक्षी आहे; पण त्यासाठी कांही वावगें करायला लागूं नये म्हणून खुशाल वाट पाहत राह्यची त्याची वृत्ति आहे. मोठें व्हावें पण शुद्ध मार्गांनी व्हावें; दुसऱ्याचें अपहरण करावें लागलें तरी हरकत नाही, पण तें लबाडीने त्याला करायला नको असतें. जें केल्याशिवाय हेतु साध्य होणार नाही तें करायला त्याला हवें असतें, परंतु तें घडूं नये असें जरी वाटत नसलें तरी तें स्वतः करायला मात्र त्याला भीति वाटते. असें मॅकबेथचें चित्र लेडी मॅकबेथने रेखाटलें आहे. आपलें माणूस तिला चांगलें माहीत आहे. अन्याय्य लाभ हवा असला तरी त्यासाठी अन्याय न करतां तो लाभ अल्लद हाताला लागावा, अशा कांहीशा हळव्या, भित्र्या आणि पापाला डरणाऱ्या वृत्तीचा मॅकबेथ आहे. परंतु त्याची एक नस त्याच्या बायकोनें पकडलेली आहे. म्हणूनच ती म्हणते, "ठीक आहे; येऊं देत स्वारीला आतां घरीं. असें कडक जिव्हास्त्र सोडतें, आणि मग दैव आणि अतिमानुष शक्ति यांनी जो राजमुकुट डोक्यावर ठेवायला आणला आहे त्याच्यापासून यांची जी वृत्ति यांना दूर ठेवूं पाहते ती कशी शिल्लक राहते तें मी पाहतें."

अशी ही आपल्या नवऱ्यावर जिभेच्या कडकपणावर हुकूमत गाजविणारी बाई पण स्वतः कवयित्री आहे, असें आढळून येतें. आपला कठोर निर्धार एवढाही ढळूं नये म्हणून भूतपिशाच्च योनींतील शक्तींना ती आवाहन करते की, "या, आणि माझ्या स्त्री-हृदयांतील हें दूध विषवत् करून टाका." हें आवाहनसुद्धा ती किती कल्पनेचा बहर असलेल्या भाषेने करते. तिच्या त्या अवस्थेंतच मॅकबेथ जवळ येतो. राजा रात्रीं विश्रांतीला येथे येणार आणि जाणार केव्हा? या तिच्या प्रश्नाला मॅकबेथ उत्तर देतो की, "उद्या सकाळीं जाण्याचा त्याचा बेत आहे." त्यावर लेडी मॅकबेथ "तर मग ती उद्याची सकाळ सूर्य कधीच पाहणार नाही" असें म्हणते; आणि या आपल्या धृष्टपणाने बावरलेल्या मॅकबेथला ती जो उपदेश करते की, "तुमच्या मनांत कांही विचित्र विचार चाललेले आहेत हें तुमच्या चेहऱ्यावरून कुणालासुद्धा दिसून येतां उपयोगी नाही," तो सुद्धा किती काव्यमय भाषेंत. "त्याने वर एखाद्या निष्पाप फुलाप्रमाणे असावें, पण आंत मात्र साप दडलेला असावा;" असें म्हणून व आजच्या रात्रीचें बाकीचें सर्व माझ्यावर सोपवा असें सांगून ती त्याला पुन्हा बजावते की, "चेहरा कसा उजळ ठेवा; मुद्रेंत पालट होणें याचा अर्थ भय वाटणें असा आहे. म्हणून भिऊं नका; मग बाकीचें मी पाहतें."

अशी तयारी जेथे झाली आहे तेथे डंकन शुद्ध मनाने प्रवेश करतो, लेडी मॅकबेथ

भेटतांच तिच्या प्रेमळपणाची तोंडभर स्तुति करतो व आमच्या यजमानाकडे आम्हांला घेऊन चला म्हणून तिला निर्भर विनंति करतो.

करूं की नको —

यानंतरचा प्रवेश, हें पाप करूं की नको अशा संशयाच्या आवर्तांत सापडलेल्या मॅकबेथच्या मनाचा निर्धार लेडी मॅकबेथने कसा करविला हें दाखविणारा म्हणून या नाटकांत फार महत्त्वाचा आहे. "डंकनचा खून तर करायला हवा, त्याशिवाय जें हवें त्याची प्राप्ति व्हायची नाही. परंतु या खुनाचे परिणाम ? त्या परिणामांनी युक्त असें जें जीवन त्याच्यावरून अल्लद उडी मारून पलीकडे निर्भय व आनंदमय जीवनांत जाऊन रमावें असें वाटतें. पण हें साधणार कसें ? जे आम्ही दुष्कृत्य करतों त्याच आमची विवेकबुद्धि आम्हांला स्वतःचे दोष पुन्हा पुन्हा दाखविते आणि आमचें चित्त अस्वस्थ करते. कारण, हा डंकन एक तर राजा; त्यांत माझा आप्त; त्याचा खून करणाराला घराबाहेर ठेवणें हें माझें कर्तव्य; त्या मीं त्याचा खून करावा ही केवढी चित्त-विक्षेप करणारी गोष्ट. बरें हा राजा वाईट तरी असावा ? उलट त्याचा अंत झाल्याने त्याच्याविषयीं सहानुभूतीच मोठी जागृत होईल, आणि ज्याच्या त्याच्या डोक्यांत त्याच्या खुनाबद्दल आग पेटलेली पाहावी लागेल." अशा प्रकारच्या विचारचक्रांत सापडून तो जें स्वगत बोलतो त्यांत गडकऱ्यांच्या सुधाकराची छाया भासल्यावाचून राहत नाही.

अशा वेळी लेडी मॅकबेथ येते आणि ठरविलेला विचार पार पाडूं या नको, असें तो तिला सुचवितो. त्यावर उसळून ती त्याला नाना रीतींनी वाक्ताडन करते. करावेंसें वाटलें तेव्हा ही विवेकबुद्धि कोठें लोपली होती ? हें तुमचें माझ्यावरचें प्रेम ! मनांत आहे पण हातांत ताकद नाही हा तुमचा भ्याडपणा. जीवनांतील भूषणभूत अशी गोष्ट तर तुम्हांला हवी, पण जें हवें तें करायला आपलें धाडस होत नाही असे म्हणणारे तुम्ही नुसते दळुबाई; वगैरे वगैरे त्याला ती खूप कडक बोलते. करावेंसें वाटतें खरें, पण करणें योग्य होईल का ? हा त्याच्या मनांतील कर्तव्य आणि अकर्तव्य यांच्यामधील झगडा लेडी मॅकबेथने व्यक्त केला आहे. म्हणूनच मॅकबेथ म्हणतो, "गप्प बैस बुवा, माणसाला शोभेल तें सर्व कांही करायला माझी तयारी आहे. त्याहून वेगळें करणारा तो माणूसच नव्हे."

परंतु लेडी मॅकबेथ त्याला या त्याच्या सद्भावनेला चिकटून राहूं देत नाही. खूप ताणते ती त्याला. वेळ आणि जागा अनुकूल नव्हती त्या वेळी जें करायला त्याचें मन आतुर होतें त्याच त्याच्या मनाने आता या दोन्ही गोष्टी अनुकूल असतांना माघार घ्यावी याबद्दल त्याच्यावर ती त्वेषाने घसरते आणि स्वतःचा आखलेला बेत ती त्याच्या गळीं उतरवते. डंकन निजला आहे. बाहेर फक्त दोघे रक्षक आहेत. त्यांना खूप दारू पाजून झिंगवावयाचें आणि मग काम उरकावयाचें. मॅकबेथ तिच्या या बेताने चकित होतो. स्वतःची भर त्यांत तो घालतो की, त्या दोघांच्या जवळचेच जांबिये वापरावेत ब ते जंबिये आणि त्यांचे चेहरे रक्ताने लडबडलेले असावेत; म्हणजे संशय सहजच

त्यांच्यावर जाईल. असें म्हणून तो त्या दुष्कृत्यास तयार होतो आणि म्हणतो, "चला, आतां चेहऱ्यावर मोठाच गोडवा आणला पाहिजे. कारण अंतःकरणाला जें ठाऊक आहे तें चेहऱ्यावरच्या खोट्या अविर्भावाने पार दडवून टाकलें पाहिजे." या ठिकाणीं पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला सर्वत्र निजानीज झाली असतांही मॅकबेथ एका सेवकाला बरोबर घेऊन किल्ल्याच्या चौकांत प्रवेश करतो. त्याच्या आधीच बँको आणि त्याचा मुलगा फ्लीअॅन्स हे तेथे आलेले असतात. मध्यरात्र उलटून गेलेली आहे. म्हणून मुलाला बँको जाऊन झोपायला सांगतो; परंतु त्याला स्वतःला मात्र डोळे झोपेने भारावून आले असूनही झोपीं जाववत नाही; इतकें कांही नको त्या विचारांनीं त्याचें मस्तक सुन्न करून टाकलेलें आहे. अशा स्थितींत मॅकबेथलाही झोपेविना तेथे भटकतांना पाहून तो चरकतो. "डंकन राजा तर झोपेंत पार चूर झाला आहे, तेव्हा तुम्ही जागे कसे" हें बँको मॅकबेथला विचारतो, परंतु स्वतःलाही झोप येत नाही हें तो विसरतो. "राजा फार खुशींत आहे; लेडी मॅकबेथला देण्यासाठी त्याने हा हिरा दिला आहे" वगैरे तो सांगतो, पण त्याच्या मनांतली रुखरुख अखेर बाहेर पडतेच. तो म्हणतो, "काल रात्रीं माझ्या स्वप्नांत त्या चेटक्या आल्या; तुम्हांला तर त्यांच्या बोलण्याचा प्रत्ययच आला आहे."

बँकोला बहुधा मॅकबेथबद्दल संशय आला आहे. परंतु मॅकबेथने नाटक फार सुंदर केलें. "मी तर चेटक्यांचें सर्व विसरलोंच होतों," असा तो अगदींच साळसूदपणाचा आव आणतो आणि बँकोची इच्छाच असली तर त्याबद्दल आपण पुन्हा केव्हा तरी सवंडीने बोलूं असें म्हणून तो बँकोला विश्रांति घ्यायला सांगतो.

हवेंतच डोळ्यापुढे नाचणाऱ्या खंजीराला उद्देशून भाषण—

बँकोला मॅकबेथने चकविलें तरी त्याच्या स्वतःच्या अंतकरणांत काहूर नव्हतें असें थोडेंच आहे? लेडी मॅकबेथचें आणि त्याचें ठरलेलें असतें की, तिने रक्षकांना दारू पाजून बेहोष केल्याचें दर्शविण्यासाठी घंटा वाजवावी आणि मग मॅकबेथने आपलें काम उरकावें. त्या घंटेची मॅकबेथ वाट पाहत होता. त्या वेळची त्याच्या मनाची अवस्था त्याच्या तोंडी पुन्हा एकदा एक मोठें थोरलें काव्यमय स्वगत भाषण घालून, शेक्सपीअरने व्यक्त केली आहे. हवेंतच त्याच्यासमोर खंजीर नाचतो. त्याला उद्देशून मॅकबेथने लढविलेल्या कल्पना आणि सुधाकराने दारूचा प्याला हातांत पुढे धरून केलेल्या कल्पना यांत रचनासाम्य केवढें तरी आहे.

रात्र अगदी शांत आहे. सर्व लोक झोपेंत आहेत. जागे आहेत ते गुन्हेगार आणि खुनी लोक मात्र. त्यांतलाच मॅकबेथ एक. म्हणून पृथ्वीला तो सांगतो, "माझे पाय कुठे चालले आहेत हें तूं पाहूं नको. नाही तर तुझे हे दगड ओरडत उठायचे.

इतक्यांत लेडी मॅकबेथची घंटा वाजते. "डंकन, तुला ही घंटा ऐकूं न येवो. कारण, ही घंटा म्हणजे स्वर्गाचें म्हण की नरकाचें म्हण, तुला निमंत्रण होय." असें म्हणून मॅकबेथ आंत जातो.

त्यानंतर लेडी मॅकबेथ प्रवेश करते. आंतून "कोण आहे तें" असा मॅकबेथचा आवाज येतो. त्यावर सारीजणें उठलीं आणि सगळा बेत फसला की काय अशी तिला चिंता वाटते. "पण खंजीर तर मीं अगदी तयार ठेवले होते. झोपेंत तो माझ्या अगदी वडलांसारखा दिसला, नाहींतर हें काम मींच केलें असतें" असें ती म्हणते आहे तोच मॅकबेथ बाहेर येऊन काम उरकलें असल्याची तिला वर्दी देतो. कुणी जागें बिगें झालें नाही याची खात्री करून घेऊन आपला रक्ताने माखलेला हात तिला दाखवून तो म्हणतो, "काय घाणेरडें दृश्य आहे हें. रक्षक झोपेंत बडबडत होते; देवाचें नांव घेत होते. पण माझ्या तोंडून कांही देवाचें नांव येईना." परंतु या गोष्टींचा इतका विचार करीत बसणें योग्य नाही; त्यांचा फार विचार करून वेड मात्र लागायचें, असा जणू भविष्यसूचक सल्ला लेडी मॅकबेथ त्याला देते. परंतु मॅकबेथ आपल्या दुष्कृत्यानें घाबरल्यासारखा झाला आहे. त्याला वाटतें, कोणी तरी ओरडलें. त्या वेळचें "आता मॅकबेथची झोप संपली; झोपेचा त्याने खून केला आहे" हेंही त्याचें भाषण काव्यमयच आहे. लेडी मॅकबेथ त्याची भीति घालविण्याचा यत्न करते; हातावरचे डाग धुवून टाकायला सांगते. परंतु मॅकबेथचें चित्त स्थिरावत नाही. "काय हें मीं केलें! मनांत आलें तरी भीतीने थरकांप होतो; या हाताकडे पाहण्याचासुद्धा धीर होत नाही," असें तो भयभीतपणें म्हणतो.

अंतरंगांतील सद्भावनेची चाहूल—

या त्याच्या सत्प्रवृत्तीचा लेडी मॅकबेथ कठोर शब्दांत धिक्कार करते. इतक्यांत बाहेरच्या दरवाजावर ठोठावल्याचा आवाज पडद्याच्या आंतून येतो. पण या वेळीं लेडी मॅकबेथ आंत रक्षकांना रक्ताने माखविण्यासाठी गेलेली असते. दार ठोठावलेलें ऐकून मॅकबेथने जे विचार व्यक्त केले आहेत त्यांमध्ये या नाटकातील एक अत्युच्च काव्यस्थळ आहे. "वरुणाच्या सर्व सागरांतील पाणी आणलें तरी हे माझे हात स्वच्छ होणार नाहींत – नव्हे ते सर्व सागरोपसागर मात्र त्यामुळे गडद् लाल होऊन जातील" हे मॅकबेथचे उद्गार त्याच्या अंतरंगांतील सद्भावनेची चाहूल किती उत्कटपणें व्यक्त करतात. त्यामुळे त्या पापाच्या खाईत रुतत चाललेल्या माणसांबद्दल हुरहुर वाटते.

लेडी मॅकबेथ बाहेर येते. कोणी तरी आलें आहे तेव्हा आपल्या शयनागारांत जाऊन, धुऊन पुसून स्वच्छ होऊन आलें पाहिजे, असें म्हणून ती मॅकबेथला घेऊन जाते. जातांना पुन्हा मॅकबेथ आपली तळमळ व्यक्त करीत म्हणतो, "केवढें भयंकर माझें कृत्य; यांतून माझें जें स्वरूप दिसतें तें किती हिडीस आहे! खरेंच या दार ठोठावण्याने डंकन जागा झाला तर किती चांगलें होईल."

इतक्या या गंभीर क्षणीं शेक्सपीअरने दारुड्या द्वाररक्षकाच्या बडबडीचा प्रवेश घातला आहे. हॅम्लेटमधल्या स्मशानांतल्या खड्डेकऱ्याच्या प्रवेशाचीच ही एक आवृत्ति. श्रोत्यांचा आणि प्रेक्षकांचा ताण थोडा कमी करण्याचें त्याचें तें तंत्र असावें. अर्थात डंकनचे मानकरी सरदार मॅकडफ आणि लेनॉक्स यांच्याबरोबर द्वाररक्षकाची जी बडबड आहे तिच्यांत विनोदाबरोबरच तत्त्वज्ञानाचाही सूक्ष्म धागा आहे.

नाटक की मनःक्षोभ ? —

या बोलण्याच्या आवाजाने जागा झाल्याचा आविर्भाव करून मॅकबेथ त्या ठिकाणीं येतो. राजाच्या सांगण्यावरून त्याला लौकर उठविण्यासाठी आपण आल्याचें मॅकडफ सांगतो. लेनॉक्स बाहेर रात्र किती भयंकर आहे याचें वर्णन करतो. हें वर्णन ऐकून महाभारतांतली आठवण येते. एखादी अत्यंत दुष्ट, दारुण घटना घडण्याच्या वेळी महाभारतकार रात्रीचें आणि वातावरणाचें असेंच भयंकर वर्णन करतात; कर्कश आवाज, मरणाच्या किंकाळ्या, घुबडाचा घूत्कार, पृथ्वी जणू हादरल्यासारखी होणें, वगैरे. इतकें अंगावर शहारे आणण्यासारखें वर्णन लेनॉक्स करतो आहे, परंतु मॅकबेथ अगदी घुम्म आहे. "हं — रात्र क्षुब्ध होती खरी" एवढेंच तो अगदी थंडपणाने म्हणतो. त्याचें हें केवळ नाटक होतें की, भय आणि मनःक्षोभ यामुळे त्याची वाचाच त्याला सोडून गेली होती हें या ठिकाणीं सांगणें फारच कठीण आहे. परंतु खारावलेल्या पाण्याचें तें नाटक होतें असें आपलें मन मात्र मानूं इच्छीत नाही.

राजाला उठवायला गेलेला मॅकडफ "भयंकर, भयंकर" असें ओरडतच बाहेर येतो. एकेक पायरी पायरीने डंकनच्या मृत्यूचा सारा प्रसंग प्रत्यक्ष रंगभूमीवर शेक्सपीअर त्या सर्वजणांना मोठ्या कौशल्याने प्रतीत करतो. त्या वेळी, "काय हा गलबला! झोपलेल्यांची वृथा झोपमोड: बोला." असें म्हणत, मोठी चकित झाल्याचा आविर्भाव करीत लेडी मॅकबेथ प्रवेश करते. या प्रसंगीं मॅकबेथचा नैसर्गिक घुम्मेपणा आणि लेडी मॅकबेथची नाटकी धांदल यांची तुलना किती उद्बोधक वाटते.

डंकनबरोबरच पहारेकऱ्यांचाही वध —

बँको बाहेर आल्यावर मात्र मॅकबेथला कंठ फुटतो. हेंही मोठें सूचक आहे. संशय यावा अशा गोष्टी बँकोला माहीत आहेत. म्हणून त्याच्यापुढे या डंकनच्या मरणाने स्वतःला वाटलेला उद्वेग व्यक्त करणें मॅकबेथला भाग होतें. येथलेंही त्याचें भाषण एक सुंदर काव्य आहे. इतक्यांत डंकनचे दोन्ही मुलगे उठून येतात. त्यांच्या बापाला रक्षकांनी मारलें हें त्यांना सांगितलें जातें; "रक्षकांना विचारण्याचा प्रयत्न केला, पण ते नुसते वेड्यासारखें टवकारून पाहत राहिले," हें ते ऐकतात; तोच मॅकबेथ त्यांना सांगतो, "मला त्यांचा इतका कांही राग आला की, मीं त्यांना ठार केलें." आणि "अशा वेळीं माणसाच्या मनांत इतकें परस्परविरोधी विचारांचें वादळ उठतें

की, माणूस विचार मनांत येण्यापूर्वीच काही तरी करून जातो" असें आपल्या कृत्याचें तो समर्थन करतो.

या सर्व प्रसंगांत लेडी मॅकबेथनें केलेलें नाटक अपूर्व आहे. शेवटीं ती घेरी आल्याचें सोंग करते. त्यासरशी सर्वांचें लक्ष तिच्याकडे जाऊन मॅकबेथने ठार केलेल्या रक्षकांचा विचार तात्पुरता तरी बाजूला पडतो. डंकनचीं मुलें शहाणीं आहेत. दुःखाचा शब्द सुद्धा ते दोघे तोंडांतून बाहेर काढीत नाहीत. या ठिकाणीं आपण सुरक्षित नाही हें त्यांनी चांगलें ओळखलें आहे. बँकोला पहिल्यापासूनच मॅकबेथबद्दल विश्वास नव्हता. अपरात्रीं त्याने त्याला बाहेर पाहिलें होतें. तो मात्र, या प्रकरणाची खोल चौकशी झाली पाहिजे असें त्याच वेळीं धीटपणाने सुचवितो. "नाना प्रकारच्या भीतीने आणि आशंकांनी माझें चित्त थरारतें; आता सारा भार देवावर टाकून, या सगळ्या प्रकरणाच्या पाठीशीं जो अव्यक्त असा राजद्रोही मत्सराचा लंपडाव आहे त्याच्याविरुद्ध मी झगडणार" हे जे त्याचे उद्गार आहेत ते त्याच्या मनस्थितीचे चांगलेच निदर्शक आहेत. बाकीच्यांना त्याच्या मनांतला खोल अर्थ समजणें शक्य नव्हतें. पण ते चौकशीच्या विचाराला संमति देतात. त्यामुळे मॅकबेथला पण होकार द्यावा लागतो.

डंकनच्या पुत्रांची सावधगिरी

ते सर्वजण पुढच्या उद्योगाला जातात. परंतु डंकनचे मुलगे मात्र त्यांच्याबरोबर जात नाहीत. मालकम म्हणतोच मुळी, "यांच्याबरोबर आपलें जमायचें नाही. लबाडांना न वाटलेलें दुःख बाहेर दाखविण्याचें कसब फार सहज साधतें. हा जो खुनी बाण सुटलेला आहे तो भात्यांत अजून परत आलेला नाही. त्यापूर्वी तो आणखी कांही बळी घेतल्यावांचून राहणार नाही."

त्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी मालकम इंग्लंडला जाण्याचें ठरवितो आणि डोनाल्बेन आयर्लंडला.

बँकोचा चौकशीचा डाव कांही यशाला आला नाही. मालकम आणि डोनाल्बेन हे पळून गेल्यामुळे त्यांनीच त्या दोघा रक्षकांकडून डंकनचा खून करविला असा आभास निर्माण करायला मोठी नामी संधि मिळाली; महत्त्वाकांक्षेच्या भरीं पडून आपल्या जन्मदात्याच्या खुनाला मुलांनी प्रवृत्त व्हावें याबद्दल खेद व्यक्त करण्यांत आला. कोणाची महत्त्वाकांक्षा खुनाच्या बुडाशीं होती हें कोणी ओळखलेंच नाही आणि राजाला सर्वांत जवळचा आणि राज्याचा श्रेष्ठ संरक्षक म्हणून मॅकबेथची निवड राजपदीं झाली.

पापमार्गावर अवशतेने घसरगुंडी —

बँकोने यांतील रहस्य चांगलें जाणलें होतें. चेटक्यांचें एक भविष्य खरें झालें,

तसेंच दुसरेंही होईल ही आशा त्याला वाटूं लागली; त्याच आशेंत मॅकबेथचें पारिपत्य करतां येईल ही आशाही अंतर्भूत असावी. परंतु रक्ताची चटक लागलेल्या मॅकबेथचें आता झालें एवढ्यावर समाधान नव्हतें. ज्या पदवीला आपण पोंचलों त्या पदवीवर सुरक्षितपणें राहावयास मिळालें तरच अर्थ आहे असा त्याचा विचार धावूं लागला. बँकोची त्याला भीति वाटूं लागली; त्याच्यापुढे आपण फिक्के पडतो हें त्याला जाणवूं लागलें. शिवाय चेटक्यांचें म्हणणें की, बँको राजवंशाचा उगम होणार. म्हणजे एवढें सगळें जें आपण केलें त्याचें फळ अखेर बँकोच्या संततीने चाखावयाचें हें त्याला दुःसह झालें. पापमार्गाला वळलेलें त्याचें मन आतां त्या मार्गावर वेगाने आणि अवश झाल्यासारखें धावूं लागलें. आणि राजपद मिळाल्याच्या रात्रीच्या मेजवानीला बँकोला त्याने मानभावीपणाने निमंत्रण केलें त्याच वेळीं त्याच्या खुनाची तजवीज त्याने करविली. त्या वेळचें मॅकबेथचें स्वगत भाषण आणि खुनी हस्तकांशीं केलेलें भाषण यामध्ये त्याची काव्यप्रतिभा किती तरल आहे याचें प्रत्यंतर पुन्हा मिळतें.

लेडी मॅकबेथलाही तीच चिंता आहे की, जें मिळविलें त्याचा उपभोग जर भय-भीत राहून घ्यावा लागणार असेल तर तें न मिळविलेलेंच बरें; म्हणून मॅकबेथ जेव्हा म्हणतो की, "माझ्या अंतःकरणाला नुसते विंचू लागून राहिलेले आहेत." तेव्हा ती उद्गारते, "पण बँको आणि त्याचा मुलगा यांना कांही कोणी चिरंजीव केलेलें नाही." अगदी मॅकबेथच्या मनांतलाच विचार होता तो. त्यासाठी त्याने तजवीजही केली होती. पण तो तिला आताच सगळें स्पष्ट सांगत नाही. "पाहा जें काय होतें तें; पापांतच ज्यांची सुरुवात झाली त्या घटना पापानेच अधिक दृढ होत असतात" असें सूचक बोलून त्यांचा हा (अंक ३ प्रवेश २) प्रवेश संपतो. यांतील त्याच्या भाषणां-तही मॅकबेथचें काव्यालंकारयुक्त भाषणाचें वेड दिसून येतेंच.

तो मेजवानीचा विख्यात प्रवेश—

ठरल्याप्रमाणे बँकोचा खून होतो. पण त्याचा मुलगा फ्लीअॅन्स मात्र निसटतो. त्याच रात्रीं मॅकबेथच्या येथे मेजवानीचा थाट आहे. *इंग्रजी वाङ्मयांत हा त्या मेजवानीचा* प्रवेश रसिकांचें अंतःकरण नेहमीच वेधून राहिलेला आहे. बँको तर मेला, पण फ्लीअॅन्स जिवंत आहे या धास्तीच्या मनःस्थितींत मॅकबेथ असतानांच मेजवानीसाठी सर्व मानकरी जमतात व आपापल्या जागांवर बसतात. मॅकबेथचें मन अस्वस्थ आहे हें लेडी मॅकबेथ ओळखते. ती त्याला त्याबद्दल ध्वनित रीतीने सुनावतेही. शेवटीं मॅकबेथला स्वतःच्या जागेवर बसण्याचा आग्रह होतो. परंतु तो म्हणतो, जागा तर सगळ्या भरल्या आहेत. मानकरी चकित होतात. कारण मॅकबेथसाठी राखून ठेवलेली जागा तर रिकामीच असते. परंतु बिचाऱ्या मॅकबेथला त्या जागीं बँकोचें भूत बसलेलें दिसतें. त्यासरशी तो कांहीतरी बिचूक बोलूं लागतो. लेडी मॅकबेथ सारवासारव करण्याचा प्रयत्न करते; मॅकबेथला अशी भोवळ आल्यासारखें होण्याची

सवय आहे वगैरे पुष्कळ सांगते. "खून करून माणसें गाडलीं गेलीं तरी तीं पुन्हा बाहेर येऊन वीसपट खुनी होऊन खून करणाराच्या भोवती नाचूं लागतात आणि त्याच्या स्थानावरून त्याला हुसकून लावतात" हे मॅकबेथचे त्या प्रसंगीं ताणलेल्या मनस्थितींत अभावितपणे निघालेले उद्गार किती सूचक आणि किती करुण आहेत.

क्षणभर मॅकबेथ शांत होतो. परंतु पुन्हा बँकोचें भूत त्याला दिसतें; आणि तो बेभान होतो. त्या भुताला उद्देशून तो गर्जनायुक्त घोषणा करूं लागतो. त्याला जें दिसतें तें अर्थातच मानकऱ्यांना दिसत नाही, यामुळे ते बुचकळ्यांत पडतात. परंतु लेडी मॅकबेथ त्यांना अधिक चौकशी करूं देत नाही. मेजवानीचा बेरंग होऊन सर्वांना निघून जावें लागतें.

केलें काय आणि झालें काय?—

"रक्ताला रक्ताचीच चटक लागते; अशा वेळीं, म्हणतात की, दगडसुद्धा धावूं लागतात आणि झाडें बोलूं लागतात. सात पाताळांत दडलेल्या खुनी माणसाचा पत्ता कोठून ना कोठून तरी लागतोच" अशा अर्थाचें जें भाषण त्यानंतर लगेच मॅकबेथचें आहे त्यामध्ये त्याच्या करुणास्पद अवस्थेचें किती केविलवाणें दृश्य आहे. महत्त्वाकांक्षेच्या भरीं पडून त्याने प्रत्यक्ष राजाचा खून केला. परंतु परिणाम काय? ज्या सुखांच्या, महत्त्वाकांक्षेच्या भरीं पडून त्याने हें कार्य केलें, तीं सुखें, तें श्रेष्ठत्व उपभोगण्याला अनुकूल अशी त्याची मनःस्थितीच राहिली नाही. केलें काय आणि झालें काय, असें त्याचें होऊन गेलें. यांतच त्याच्या जीवनाचा करुण विपाक आहे. जात्या कविहृदयाचा आणि सत्प्रवृत्त असा हा माणूस महत्त्वाकांक्षेच्या चेतनेने या पापकर्मांत न पडता तर त्याला कांही कमी नव्हतें. क्रीऑनने म्हटल्याप्रमाणे राजपदाचे काटे टाळून त्याचे सगळे फायदे त्याला मनमुराद उपभोगतां आले असते. परंतु तसें व्हायचें नव्हतें. हीच तर मॅकबेथची करुण कहाणी. नको होता हा प्रसंग या माणसावर यायला, असेंच आपलें मन आपल्याला सांगतें. पण उपयोग काय? स्वतःच्या पायावर त्याने स्वतःच धोंडा पाडून घेतला होता त्याला कोण काय करणार?

या दृष्टीने हे नाटक येथेच जवळजवळ संपलें आहे. मॅकबेथचें पतन आता पूर्ण झालें आहे. त्याचा स्वतःचा धीर सुटला आहे, मनाची साम्यावस्था ढळली आहे. आता या अवस्थेंतूनही सुटून पुन्हा पूर्ववत होण्यासाठी त्याची होणारी धडपडच फक्त आपणाला पाह्यची आहे. पण या धडपडींत क्षणोक्षणीं तो अपरिहार्यपणें पराभूतच होत जाणार आहे हें आपण चांगलें ओळखलें आहे.

स्वतःवरचा विश्वास ढळल्यामुळे मॅकबेथ पुन्हा त्या चेटक्यांकडे जाऊन पुढचें भविष्य जाणण्याचा प्रयत्न करतो. परंतु चेटक्यांच्या गुरुस्थानीं असलेल्या हेकॅटेने म्हटल्याप्रमाणे, "तेथे त्याला आणखीच गोंधळांत पाडलें जातें. त्याला भुरळ पडून

त्याने दैवाला तुच्छ मानावें; मरण आपल्याला येऊंच शकत नाही, मृत्यूची ती छातीच नाही असें त्याला वाटावें; शहाणपणाने डोळे उघडून पाहण्यापेक्षां आपल्याला जें हवें तेंच होणार अशा भ्रमांत त्याने सापडावें," अशी त्याची अवस्था त्या पिशाच योनींतील जीवांकडून केली जाते. "आपणाला जगांत कोणी विचारता नाही; आपलें कोणी कांही करूं शकत नाही, ही भावना माणसाची सर्वांत मोठी शत्रू होय," असें हेकॅटे म्हणते. आणि नेमकी तीच भावना चेटक्या मॅकबेथच्या मनांत दृढ करतात.

चेटक्यांच्याजवळून मॅकबेथला तीन गोष्टी समजतात. (१) फाइफचा देन मॅकडफ याच्यापासून सावध राहा. (२) स्त्रीच्या उदरांतून जन्म घेतलेल्या कोणाकडून तुला भीति नाही; आणि (३) बर्नामचें प्रचंड जंगल चालून डन्सीनान टेकडीकडे येऊं लागेपर्यंत कोणी किती दांतओठ चावले तरी मॅकबेथचें कांही वाकडें होणार नाही.

मॅकडफकडून तर आतां भिण्याजोगें कांही नाही असें मॅकबेथचें मन त्याला सांगत होतें. कारण तो तर स्त्रीच्या पोटीं जन्मलेला. आणि डंकनचा जेथे काटा काढला तेथे मॅकडफची वासलात लावायला कितीशी अडचण. शिवाय पृथ्वींत गाडलेलें जंगल का कोठे चालू शकतें? अशा रीतीने संपूर्ण सुरक्षिततेची भावना मॅकबेथच्या हृदयांत निर्माण होते. तथापि अजून त्याचें पूर्ण समाधान झालेलें नसतें. बँकोच्या वंशाचें काय होणार हें जाणण्याची त्याला आतुरता असते; आणि आठ किंवा त्याहूनही जास्त पिढ्यांपर्यंत बँकोच्या वंशजांकडे राजपद राहणार, व त्यांतील कांही राजे तर दोन दोन, तीन तीन देशांचे राजमुकुट धारण करणार असें दृश्य चेटक्यांकडून त्याला दिसतें.

स्वाभाविकच त्यामुळे मॅकबेथचें चित्त फारच अस्वस्थ होतें. आजच्यासारखा अशुभ दिवस पंचांगांत केव्हाच नसेल, असें तो आवेगाने उद्गारतो आणि त्याच क्षणीं त्या अशुभाचेंच एक चिन्ह त्याच्यापुढे येऊन उभे राहतें. कारण लेनॉक्स येऊन सांगतो की, मॅकडफ इंग्लंडमध्ये पळून गेला आहे. केवढा तरी धक्का बसतो यामुळे मॅकबेथला. तत्क्षणीं तो निर्धार करतो की, मॅकडफच्या साऱ्या मुलामाणसांचा वध करावयाचा, त्याचा किल्ला ताब्यांत घ्यावयाचा. हें सर्व तो करणार होता; पुढे त्याने तें केलेंही. परंतु इंग्लंडमध्ये पळून जाऊन सुरक्षित असलेल्या मॅकडफला त्यामुळे कोणता आघात होणार होता?

मॅकडफची पत्नी, मुलें वगैरे सर्वांचा मॅकबेथने आपल्या हस्तकांकरवी क्रूरपणें वध करविला. परंतु इंग्लंडमध्ये त्या वेळी मॅकडफ डंकनचा मोठा मुलगा मालकम याच्याकडे जाऊन त्याला मॅकबेथविरुद्ध सैन्य घेऊन जाण्यासाठी आग्रह करीत होता. परंतु कदाचित मॅकडफ हाही मॅकबेथचाच हस्तक नसेल कशावरून, या आशंकेने मालकम आत्मनिंदा करून स्कॉटलंडच्या राजपदाला आपण लायक नाही असें त्याला परोपरीने सांगत असतो, हें दृश्य चवथ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत आहे. मॅकडफ मॅकबेथच्याविरुद्ध जेव्हा म्हणतो की, दुष्ट नरकांतल्या यमदूतांमध्येसुद्धा मॅकबेथच्यावर दुष्टपणांत ज्याची कड़ी होईल असा एकजणही सांपडणार नाही, त्या वेळी मालकमने काढलेले

उद्गार मॅकबेथबद्दल एका पक्षाचें काय मत होतें हें समजण्याला फार उपयोगी आहेत. मालकम म्हणतो, "कबूल करतों मी की, मॅकबेथ रक्तपिसासू आहे, लफंगा – फसव्या आहे. तो केव्हा उसळीसरशी काय करील हें कोणी सांगूं शकणार नाही. तो हेवेखोर आहे, पापांची जेवढी म्हणून लांबलचक यादी आपण करूं शकूं तिच्यांतील सर्व पापें त्याच्या ठिकाणीं आहेत."

मॅकबेथबद्दलचा हा अभिप्राय कटु असला तरी त्यांत अयथार्थ कांही नाही. अशाही माणसाच्या ठिकाणीं कांही चांगुलपणाचा अंश असलाच तर तो पाहण्याची शक्यता मालकमला असणें शक्य नाही. कारण त्याची दृष्टीच अंधकारलेली आहे संतापाने. मॅकबेथने नाना तऱ्हांचीं माणसें पाठवून मालकमला आपल्या पंखाखाली आणण्याचे उद्योग केल्याचें मालकम सांगतो. म्हणजे हाही उद्योग करण्याचें मॅकबेथने शिल्लक ठेवलें नव्हतें. त्यामुळे मॅकडफशीं सुरुवातीला जरी मालकम संशयाने वागला तरी पुढे त्यांची दिलजमाई झाली आणि त्यांच्या कटाचे धागे भराभर घट्ट विणले जाऊं लागले. त्याच वेळी रॉस हाही स्काटलंडमधून त्यांच्याकडे आला. मॅकबेथच्या राजवटींत स्कॉटलंडची झालेली अवस्था त्याने वर्णन केली, तिने कोणाचेंही अंतःकरण संतप्त होईल. "स्कॉटलंडला आमची जन्मभूमि म्हणण्याऐवजी आमचें कबरस्थान म्हटलें पाहिजे. कोणाला आपलें तोंड दाखवूं नये असें त्या भूमीला वाटत असेल. तेथे ज्यांना अक्कल नाही एवढ्याच लोकांच्या चेहऱ्यांवर, दिसलेंच तर, स्मित दिसूं शकतें. उसासे, कण्हणें, गगनभेदी किंकाळ्या कोणी कुणाच्या ऐकायच्या अशी स्थितीच नाही. कारण प्रत्येकाचाच तो उद्योग झाला आहे; त्या ठिकाणीं तीव्र विलाप हीच आधुनिक काळची ब्रह्मानंदाची अवस्था झाली आहे. मृत्यूची निदर्शक अशी चर्चमधली घंटा कोणासाठी वाजते आहे याची चौकशी सुद्धा कोणी करीत नाही. फूल कोमेजायला अधिक काळ लागेल इतक्या अल्प काळांत सज्जनाचें जीवन तेथे करपून जातें." अशा प्रकारच्या वर्णनाने मॅकडफ वगैरेंच्या कटाला पुष्कळ धार आली. मॅकडफच्या बायकामुलांचा पूर्ण निःपात केल्याचें वर्तमानही रॉसनेच सांगितलें; त्यामुळे तर मॅकडफचा क्रोध शिगेला पोचला.

मॅकबेथचें दैव फिरलें —

लेडी मॅकबेथ सुरुवातीला म्हणाली होती की, माझ्या जिभेचा झपाटा मी मॅकबेथला दाखवीन. तो झपाटा आपण पाहिलाही. परंतु डंकन आपल्या बापासारखा दिसतो म्हणून त्याच्यावर खंजीर चालवायला ती कचरली हेंही आपण पाहिलें. आणि आता मॅकबेथवर प्रतिहल्ला होऊन त्याचें वैभव कदाचित पार संपून जाणार अशा वेळीं शेक्सपीअर, लेडी मॅकबेथ ही वेडी झाली, भ्रमली हें दृश्य आपल्यापुढे ठेवतो. उघड उघड प्रत्ययाला येतें की, ती नुसती जिभेचीच मोठी शूर होती; प्रत्यक्ष पापें पचविण्याइतकी ती निडर किंवा हृदयशून्य नव्हती. त्यामुळे या सर्व दुष्कृत्यांच्या

भाराने ती पार भ्रमली आणि ऐन झोपेंतच चालण्याची सवय तिला जडली आणि चालतांना ती आपल्याशींच बडबडायला लागली. अंथरुणांतून उठावें, स्वतःचें कपाट उघडावें, त्यांतून कागदाचा कपटा काढावा, वाचावा, पुन्हा नीट घडी घालून तो बंद करून ठेवावा आणि पुन्हा झोपीं जावें; आणि हें सर्व करीत असतांना ती गाढ निद्रिस्त असावी, असा प्रकार होऊं लागला. या तिच्या झोपेंत चालण्याचा प्रत्यक्ष प्रवेशच आपल्यापुढें घडतो. आपल्या हातावर रक्ताचा तो डाग अजून आहे आणि कांही केल्या तो जात नाही म्हणून ती चिडून जाते. नवऱ्याला उद्देशून म्हणते, "छट्, भ्यायचें कशाला आपण ? आपण आता सत्ताधीश; कोण विचारणार आहे आतां आपल्याला ? पण कांही म्हणा — या म्हाताऱ्या गड्याच्या ठिकाणीं एवढें शौर्य असेल असं कांही कुणी खरं मानलं नसतं." असें ती विचूक बडबडूं लागून त्यांतून बँको वगैरेंच्या खुनाचा धागा सापडावा असे ध्वनि बाहेर पडतात-

मॅकबेथचें दैव फिरलें होतें याची ही एक दारुण साक्ष होती. हळूहळू बंड पसरूं लागलें ही दुसरी साक्ष. स्कॉटलंडमध्येच त्याच्या जुलुमीपणाबद्दल मोठ्याने कुजबूज होऊं लागली आणि त्याची सद्दी संपली असेंही लोक बोलूं लागले. (अंक ५प्रवेश २). थोडक्यांतच इंग्रजांची दहा हजार सेना येऊन ठेपल्याची बातमीही आली. त्या वेळीं पहिल्याप्रथम मॅकबेथच्या मनाने कच खाल्ली. आपल्या जीवननाटकांतील शेवटचा पडदा पडण्याचा काळ जवळ आला याची जाणीव त्याला झाली. याचेंही वर्णन मॅकबेथने सुंदर उत्प्रेक्षांच्या साहाय्याने केलें आहे. "माझें आतां फार उतार वय झालें. परंतु मनुष्याला जीवनाच्या अखेरच्या भागांत जें आपल्याबरोबर असावेंसें वाटतें तें म्हणजे लौकिक, प्रेम, स्नेह, आज्ञाधारक मुलें, स्नेह्यांची दाटी, त्यांतलें कांही कांही माझ्या वाट्याला नाही. त्याऐवजी माझ्या वाट्याला शिव्याशाप, अगदी अंतःकरण पिळवटून निघालेले शिव्यापाप — पण मनांतल्या मनांत, कारण बाहेर बोलण्याचें धारिष्ट नाही — हें आलें आहे." असा तो खेदपूर्वक उसासा टाकतो. लेडी मॅकबेथच्या मानसिक विकारावर कांही उपायच नाही का हें तो डॉक्टरला त्याही अवस्थेंत केवढ्या मोठ्या काव्यमय भाषेंत विचारतो. डॉक्टर म्हणतो "या अवस्थेंत ज्याचा तोच उपाय करूं जाणे !" अगदी हीच अवस्था मॅकबेथचीही झाली होती.

कारण, त्याच्या स्वतःशिवाय त्याला त्राता आता कोणी उरला नव्हता. लढाईची धुमश्चक्री सुरू झाली होती. निष्ठेने लढायला कोणीच नव्हतें. किल्ल्याला वेढा घालून हल्लेखोरांचें सैन्य बसलें तरी त्याला भुकेने उपाशीं मारूं ही मॅकबेथला आशा असते. कसल्याही दुःखाच्या वेदनेने किंवा किंकाळ्यांनी आपल्या हृदयाला ढिम्मसुद्धा होणार होणार नाही इतके आपण दगड बनलों आहोंत असें त्याला वाटत असतें. इतक्यांत लेडी मॅकबेथ वारल्याची वार्ता येते आणि मॅकबेथला मोठा धक्का बसतो. तिने ही चुकीची वेळ काढली मरायला, असें तो म्हणतो. "परंतु आज नको, उद्यां, ही माणसाची रड अगदी शेवटच्या क्षणापर्यंत चाललेली असते, आणि तरी आमचा

प्रत्येक कालचा दिवस हा मूर्खांना मृत्यूच्या अंधाऱ्या गुहेचा रस्ता दाखविणारा प्रकाश असतो." हा गंभीर विचार त्याला स्फुरतो आणि हॅम्लेटची आठवण व्हावी इतक्या तत्त्वज्ञानाच्या जाणीवेने तो, म्हणतो, " जीवन म्हणजे एक किती अल्पजीवी मेणबत्ती आहे; नुसती छाया मात्र आहे. मानव म्हणजे उगीच मान वर काढून या जगाच्या रंगभूमीवर नाचणारा प्राणी आहे; नेमल्या वेळेपुरतें त्याचें हें नाट्य चालायचें आणि मग कुणाला त्याची कसलीच आठवण नाही राह्यची. त्याच्या जीवनाची सगळी कथा म्हणजे वेड्याची कथा; सांगायची मात्र मोठ्या डामडौलाने परंतु अर्थ नसायचा लवभर सुद्धा!"

या धक्क्याच्या मागोमाग दुसरा धक्का मॅकबेथला बसतो तो म्हणजे बर्नामचें जंगल चालत किल्ल्याकडे येत असल्याची सेवकाने आणलेली बातमी. वास्तविक बर्नामच्या जंगलांतील झुडुपें तोडून तीं पुढे धरून, त्यांच्या मागे लपून इंग्लंडचें सैन्य पुढे येत होतें. पण या वार्तेनें मॅकबेथचा धीर सुटतो; तो अविवेकाच्या आहारीं जातो. चेटक्यांच्यावर विश्वास ठेवावा की नाही याचा त्याला भ्रम पडतो. एकीकडे भय वाटतें; दुसरीकडे चेटक्यांच्यावर काय विश्वास ठेवायचा असें होतें. या भयाच्या भरांत तो नवीन निश्चय करतो कीं, किल्ला सोडून बाहेर जायचें लढाईला. त्याचा पहिला बेतच खरा त्याच्या हिताचा होता. पण तें भान या धक्क्यामुळे त्याला राहत नाही. मरायचें तर शूरासारखे लढत मरूं असा रजपुती जोहाराचा मार्ग तो विनाकारण अनुसरतो.

अजूनही मॅकबेथला एक आशा असते की, स्त्रीच्या पोटीं जन्म घेतलेल्या कोणाकडून आपला वध होण्याची शक्यता नाही. परंतु मॅकडफ जेव्हा त्याला सांगतो की, आपला जन्म आईचें पोट फाडून [शस्त्रक्रिया करून] झाला तेव्हा मॅकबेथची शेवटची आशा मावळते. भविष्यें सांगणारे लोक हें असें दुटप्पी बोलतात हें आता त्याला अगदीच उशीरा समजतें. मॅकडफच्या हातून तो मारला जातो.

अर्थात प्रत्यक्ष रणभूमीवर मॅकडफने त्याला मारल्याचा प्रसंग दाखविलेला नाही. मॅकडफ आणि मॅकबेथ लढत लढत पडद्याच्या आंत जातात; आणि मग त्या प्रवेशाच्या अंतीं, लढाईत विजय झाल्यावर सर्व मंडळी एकत्र आली असतां, मॅकडफ मॅकबेथचें कापलेलें डोकें घेऊन येतो आणि " मालकमचा – स्कॉटलंडच्या राजाचा – जयजयकार असो " अशी घोषणा करून तें डोकें त्याच्यापुढे ठेवतो.

संपविण्यापूर्वी एक प्रसंग पुन्हा आठवतो. मॅकडफचा जन्म अस्वाभाविकपण झालेला आहे हें कळून जेव्हा मॅकबेथला भय वाटतें त्या वेळी मॅकडफने म्हटलेलें असतें की, " आतां आमच्या स्वाधीन हो. आम्ही तुझा एक पुतळा रंगवून एका स्तंभावर ठेवूं आणि त्याच्याखाली लिहूं की, येथे लोकांना जुलमी राजा पाहायला मिळेल."

मॅकबेथची आगळी तऱ्हा —

आतापर्यंत आपण जे नायक पाहिले त्यामध्ये मॅकबेथची तऱ्हा अगदी वेगळी

दिसते. हॅम्लेटबद्दल श्रोत्यांना फार मोठा जिव्हाळा वाटतो, एवढेंच नव्हे तर त्याच्याबद्दल नाटकांत कोणीच वाईट उद्गार काढीत नाही. त्याच्या चुलत्याला तो नकोसा आहे, चुलत्याला त्याचें भय वाटतें. पण म्हणून चुलता त्याला वाईट म्हणत नाही. आणि आपण तर त्याला विपरीत परिस्थितींत हतबुद्ध झालेला तत्त्वप्रेमी, उदारहृदयी, न्यायी तरुण मनुष्य म्हणूनच पाहिलें. स्वाभाविकच त्या परिस्थितींत त्याच्यासारख्या व्यावहारिक गुंडगिरी अंगीं नसलेल्या तरुणाचा अंत झाला याबद्दल कोणालाही वाईट वाटतें. तीच अवस्था ॲंटिगनीची. तत्त्वप्रेमापेक्षां तिने बहिणीप्रमाणे व्यवहाराची सोय पाहिली असती, किंवा क्रीऑनसारख्या सत्तांध झालेल्या द्वेषभावनाप्रधान राज्यकर्त्यांशीं तिची गाठ पडली नसती तर तिचा आणि तिच्या प्रियकराचा तो भीषण आणि दुःखद अंत झाला नसता; पण तसें न व्हावेंसें वाटत असूनही, तें होणें अपरिहार्य होतें या जाणिवेने आपलें अंतःकरण विरघळून जातें. क्रीऑन खरोखर करुण नायक आहे की नाही हा वादाचा विषय आहे. परंतु तोही दुष्ट माणूस नाही. राजाच्या अधिकाराबद्दल वृथा अहंकार तो बाळगतो; देशाचा जो शत्रू तो आपला शत्रू ही त्याची भावना तत्त्वदृष्ट्या किंवा ॲंटिगनी म्हणते त्याप्रमाणे दैवी प्रेमाच्या न्यायाने चिंतनीय असली तरी सामान्यतः मनुष्यसमाजांतील ती एक सार्वत्रिक भावना होती. तथापि त्याने इतकें आग्रही वर्तन करायला नको होते; आपल्या सज्जन मुलाचें तरी ऐकायला हवें होतें; अखेर त्याला आपली चूक उमगली, पण त्या वेळीं बाजी त्याच्या हातची गेली होती; आणि म्हणून आपल्याला हळहळ वाटते. राजा ईडिपसचा तर दोष असा फारच थोडा होता. दैवी शापाच्या कचाट्यांत सांपडलेला हा श्रेष्ठ व चतुर राजा, स्वसंरक्षणाच्या विफल प्रयत्नाच्या आणि सत्य हें चार लोकांसमोर उघडें झालेंच पाहिजे या आग्रहाच्या कचाट्यांत सापडून हक ना हक आपल्या पत्नीच्या आणि स्वतःच्याही हानीला कारण झाला !

मॅकबेथची स्थिति तशी नाही. त्याचे शत्रू त्याच्याबद्दल किती कटु बोलत होते हें आपण पाहिलेंच. बँकोलासुद्धा त्याच्याबद्दल अविश्वासच होता. डंकनचे बहुतेक सरदार त्याच्या विरुद्ध उलटले होते. जे त्याच्या बाजूला राहिले होते त्यांचीही त्याच्याविषयी खरी निष्ठा नव्हती. जगांतलें वाईट असें करायचें त्याने कांही बाकी ठेवलें नव्हतें. आपला अमोल हितकर्ता म्हणून त्याच्यावर भोळी श्रद्धा टाकून त्याच्या किल्ल्यांत पाहुणा म्हणून आलेल्या राजाला त्याने स्वतःच्या हाताने ठार केलें. बँकोचा त्याने वध करविला. मॅकडफची पत्नी व मुलें यांचा निःपात केला. सज्जनांना स्कॉटलंडमध्ये राहणें अशक्य व्हावें अशी निर्दय जुलमाची राजवट केली. बरें, स्वतःचें तरी कांही हित केलें का? तेंही नाही. बायको एवढी बोलभांड, पण तीही भ्रमिष्ठ होऊन मेली. आणि पराभूत होऊन शत्रूकडून त्याचेंही डोकें कापलें जाण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवला.

अशा या त्याच्या जीवनांत भीषणता भरपूर आहे. हॅम्लेट, राजा ईडिपस किंवा ॲन्टिगनी या नाटकांतल्यापेक्षाही यामधील भीषणता क्रूरपणाची आहे, निष्ठुरपणाची

आहे. या सर्व भीषण, क्रूर, विश्वासघातकी, जुलमी जीवनांत मॅकबेथबद्दल आपुलकी वाटावी असें कांही तरी आढळतें का? हॅम्लेटची तत्त्वदृष्टि आणि अत्यंत विमल प्रेम यांचा लवलेश तरी त्याच्यापाशी आहे का? अखेर तर त्याची सर्वत्र छी-थूः झाली. जुलमी राजाचा नमुना म्हणून काठीच्या टोकावर घालून फिरवीत प्रदर्शन करण्याचें एक साधन एवढीच त्याची किंमत ठरली.

मग झालें हें ठीकच झालें, मॅकबेथला अशी शिक्षा व्हायलाच हवी होती; व्यावहारिक आणि काव्यांतीलही न्यायाच्या दृष्टीने अगदी योग्य मार त्याला मिळाला; अशा भावनेने आणि तिरस्काराने आपण या नाटकाच्या शेवटीं उठतों का? कां याही माणसाबद्दल आपणाला थोडासा जिव्हाळा वाटतो? त्याची ही अशी गति व्हायला नको होती असें वाटतें?

कांहीं थोडे लोक सोडले तर बहुतेक सर्वांचें उत्तर असेंच येईल की, मॅकबेथच्या हातून हीं जीं अनन्वित दुष्कृत्यें घडलीं तीं घडलीं नसतीं तर आम्हांस अधिक बरें वाटलें असतें. हें असें व्हायला नको होतें. खरोखर किती सुंदर कविहृदय असणारा हा माणूस होता. कसल्याही अवस्थेंत त्याची काव्यदृष्टि त्याला विलगलेलीच आम्हीं पाहिली. तसाच शूर वीर आणि योद्धा होता तो. त्याच्या राजाचा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता. बँकोसारखे महत्त्वाकांक्षी सरदार सोडले तर बाकी सर्व सरदारांनी त्याची साथच केली असती. प्रत्यक्ष राजमुकुट नसला तरी राजाला हातांत धरून राजपदाचे सर्व फायदे त्याला उपभोगतां आले असते. नाही तरी त्याला मूलबाळ नव्हतेंच. कशाला मग राजपदाची हाव त्याला पडली? आणि का उगीच त्याने आपलें आणि आपल्याबरोबर अनेकांचें वाटोळें केलें? ही भावना या दुष्ट माणसाबद्दलही मनांत घर करून राहते.

वास्तविक स्वतःच्या हाताने त्याने आपला नाश करून घेतला. अत्यंत मोठी महत्त्वाकांक्षा त्याने बाळगली. अर्थात् ही महत्त्वाकांक्षा एखाद्या सत्पक्षाचा विजय साधण्याची किंवा जगाच्या कल्याणाची नव्हती; तर केवळ व्यक्तिगत स्वार्थाची होती. परंतु अशी ही महत्त्वाकांक्षा सुद्धा धीमेपणाने फलित करण्यासाठी लागणारा जो शहाणपणा आणि विवेक लागतो तो त्याच्या ठिकाणीं मुळीच नव्हता. अत्यंत उतावीळी त्याला झाली होती. चेटक्यांनी त्याच्या महत्त्वाकांक्षेचा अग्निस्फुलिंग चेतवून धगधगीत केल्यावर राजाचा खून दोन दिवसांत त्याने तडकाफडकी केला. थोडेंसुद्धा त्याच्याच्याने थांबवलें नाही. हीच गोष्ट जर तो मुत्सद्दी असता तर त्याला सावकाशपणें आणि विनबोभाटपणें करतां आली असती, राजा डंकन हा तर उघडउघड निष्प्रभ असा राजा होता. उतावीळपणाच्या भरांत बँकोचाही त्याने असाच घघतां घघतां वध करविला. एवढें करूनही निश्चिंत राहण्याइतका स्वभावांत जो बेडरपणाचा धर्म हवा होता तो त्याच्या ठिकाणीं नव्हता. म्हणून त्याच्या पापाचें भूत एकसारखें त्याच्यापुढे नाचूं लागलें. "To be thus is nothing, But to be safely thus" या भयाने त्याला हैराण केलें. आणि भीतीच्या डोळ्यांना सर्वत्र भुतें दिसूं लागतात. त्यांचा निःपात करण्यासाठी मग त्याला अनन्वित जुलूम करावा लागला. पुनःपुन्हा त्याच्या ठिकाणच्या

सद्भावनेचा कोंब डोकें वर काढूं पाहत होता. पण या भीतीच्या पायीं तो त्याला पुनःपुन्हा खुड्न टाकावा लागला. थोडें जरी जरी राजकारणी चातुर्य – हॅम्लेटच्या चुलत्याजवळ होतें तसें – मॅकबेथजवळ असतें तर कोणी सांगावें, त्याचें जीवन शेवटपर्यंत यशस्वी झालें असतें. परंतु चातुर्याचा अभाव, अत्यंत उतावीळपणा, अंतःकरण दगडासारखें बेडर नाही, सद्भावनांची टोचणी आणि पापामुळें ग्रासून राहिलेली भीति यामुळे मॅकबेथचा हा असा दारुण अंत झाला.

म्हणून स्वभावगत करुण विपाकाचें हें उदाहरण म्हणतां येईल. चेटक्यांनी कांही त्याला दुष्कृत्याला प्रवृत्त केलेलें नाही. ज्या महत्त्वाकांक्षेचा हुंकार युद्धांतील ताज्या यशामुळे त्याच्या अंतःकरणात घुमूं लागला होता तो प्रस्फुट करण्याला मात्र त्या कारण झाल्या. तूं राजा होणार एवढेंच त्यांनी त्याला सांगितलें; त्यासाठी खुनाचा मार्ग कांही त्यांनी त्याच्या डोक्यांत घातला नाही. त्यामुळे चेटक्यांना कांहीं पापप्रवर्तक असा शिक्का आपण देऊं शकणार नाही. शिवाय रंगभूमीवरील परिणामाच्या दृष्टीने हे चेटक्यांचे प्रवेश आवश्यक म्हटले तरी वस्तुतः त्या सर्व मॅकबेथच्या अंतःकरणांतील प्रेरणा होत्या, असाही त्याबद्दल खुलासा करण्याजोगा आहे.

पापाची प्रवर्तक, लेडी मॅकबेथ —

तथापि केवळ स्वभावदोषगत करुण विपाक असा जो हा वाटतो तो घडून येण्याला, थोडीशी कां होईना, पण बाह्य परिस्थितीची मदत होतीच. ही बाह्य परिस्थिति म्हणजे आपल्या जिभेच्या पट्ट्याने घायाळ करून मॅकबेथच्या अंतःकरणांतील सत्प्रवृत्तीचे कोंब तोडून, जाळून टाकणारी त्याची पत्नी – लेडी मॅकबेथ. ही बाई अतिशय क्रूर आणि अविचारी होती; मॅकबेथपेक्षाही तिचा उतावीळपणा अमर्याद होता. अशा या स्त्रीच्या हातचें अवश खेळणें होऊन मॅकबेथच्या हातून ही दुष्ट कृत्यांची परंपरा घडली असें मानण्याला नाटकांत पुष्कळ जागा आहे. आणि ही बाई नसती तर मॅकबेथचा एवढा अधःपात बहुधा झाला नसता अशीही एक झांक त्याच्याबद्दल वाटणाऱ्या आमच्या हुरहुरींत आम्हांला साह्यभूत होते.

परंतु हॅम्लेटचा परम मित्रहोरेशिओ, ही बाई, आणि ऑथेल्लोचा पापप्रवर्तक आयागो या व्यक्ति म्हणजे त्या त्या नायकांच्याच मनाच्या एका भागाचा बाह्य आविष्कार कवीने मूर्त करून दाखविला आहे काय? असाही एक विचार या बाबतींत उद्भवतो. त्याबद्दलची चर्चा इब्सेनच्या 'मास्टर बिल्डर' या नाटकाच्या संबंधांत विशेष करूं. तोपर्यंत मॅकबेथचा करुण विपाक बहुतांशीं स्वभावदोषजन्य असला तरी त्यालाही बाह्य कारण मदतीला होतेंच एवढें पाहून पुढे चालूं.

आत्मसमर्थनाची तळमळ —

मॅकबेथबद्दल थोडासा तरी ओलावा आमच्या मनांत राहतो हें विधान सर्वच्जण

मानतील असें मात्र नाही. ज्यांना गडकऱ्यांचा सुधाकर हा एक निव्वळ अहंकारी, अविवेकी दारुड्या मात्र वाटतो, त्याच्या ठिकाणच्या श्रेष्ठपणाचा, चांगुलपणाचा ज्यांना एवढाही प्रत्यय येत नाही, किंबहुना एक नादान आणि आपल्या देवतातुल्य पत्नीचा मूर्खपणाने नाश करणारा माणूस म्हणून ज्यांना त्याच्याबद्दल घृणा वाटते, अशा वृत्तीच्या माणसांना मॅकबेथबद्दल अशीच घृणा वाटेल आणि म्हणून मॅकबेथ हें करुण नाट्य नाहीच असा घोष ते करूं लागतील. परंतु तसें पाहिलें तर असा कोणताही करुण नायक नाही की, ज्याची नादान म्हणून टिंगल करतां येणार नाही. हीच भीति तर बहुतेक सर्व करुण नायकांना वाटते की, आपल्याबद्दल लोक वृथा वाईट कल्पना करतील. म्हणून हॅम्लेट होरेशिओला सांगतो की, सगळा खरा वृत्तांत तूं लोकांना सांग आणि मी कांही कुणी दुष्ट मनुष्य नव्हतों हें पटवून दे. आपण लोकांच्या टिंगलीला पात्र होऊं नये हीच तळमळ अगदी शेवटी ऑथेल्लोने दाखविली आहे.' मरणाच्या–आत्मघाताच्या–पूर्वी तो आपल्या बरोबरीच्या लोकांना सांगतो आहे, "राज्याकडे तुम्ही पत्रें लिहाल त्या वेळीं या दुर्दारुण घटनेचा सर्व तपशील लिहा. कशाचेंही समर्थन करूं नका; पण कोणतीही खोटी गोष्ट दुर्बुद्धीने लिहूं नका. सद्बुद्धीने जर तुम्हीं लिहिलेंत तर तुम्हांला लिहावेंच लागेल की, या माणसाला प्रेम जरी शहाण्यासारखें करतां आलें नाही, तरी त्याचें प्रेम निर्मळ होतें; स्वभावाने तो कांही सहज संशयाला बळी पडणारा नव्हता. पण त्याच्या मनावर फार ताण पडल्याने तो गोंधळून गेला होता; मूर्ख होता तो; रानटी माणसाप्रमाणे एका रत्नाची अमोल किंमत न उमजून त्यानें तें भिरकावून दिलें; पण तो निर्दय नव्हता; युद्धखोरीमुळे त्याचें अंतःकरण सहज मृदु बनणारें नसलें तरीही या घटनेने त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचा अखंड पूर वाहत होता; हें सगळें सांगा, आणि आपल्या पापाचें प्रायश्चित्त म्हणून त्याने आपला गळा हा असा कापून घेतला हेंही तुम्ही लिहा!"

तेव्हा टिंगल करण्याच्या वृत्तीने पाहिलें तर कोणताच करुण नायक आपल्याला करुण नायक होण्याला पात्र वाटणार नाही. बहुतेक प्रत्येक करुण नायक स्वतःविषयी सहानुभूतीच्या नजरेने पाहिलें जावें अशी हाक देतांना आढळतो, तो याचसाठी. त्या सहानुभूतीच्या रसिक दृष्टीने पाहणारांना मॅकबेथसारख्या दुष्कृत्यांच्या दैत्याबद्दल सुद्धा हळहळ वाटेल. मग ऑथेल्लोसारख्या निर्मळ, भाबड्या वीराबद्दल ती वाटावी यांत कांहीच नवल नाही. म्हणून पुढच्या प्रकरणांत आपण त्याचीच हृदयद्रावक कथा पाहूं.

प्रकरण पांचवें

व्हेनिसचा मूर – ऑथेल्लो

शेक्सपीअरच्या सर्व करुण नाटकांत ऑथेल्लो हें नाटक तंत्रदृष्ट्या सर्वश्रेष्ठ मानणारांचा वर्ग फार मोठा आहे. हॅम्लेटप्रमाणे यामध्ये तत्त्वप्राधान्य नाही आणि नायकाच्या स्वभावांतील बावरून टाकणारें वैविध्य नाही. लिअरमध्ये इतक्या म्हातारपणींही लिअरचा जो एक महाप्रचंड स्वभावविकास झालेला आपण पाहतों तसा येथे नाही. परंतु प्रसंगांची गुंफण, सुटसुटीतपणा आणि घटनांमागील कार्यकारणभावांची अपरिहार्यता या दृष्टीने ऑथेल्लोची रचना खरोखरच अपूर्व आहे. त्यांतील नायिका इतकी हृदयाची पवित्र आहे की, गडकऱ्यांच्या सिंधूशिवाय जगाच्या नाट्यवाङ्मयांत तिला तोड सापडणें कठीण आहे. तसाच यांतील खलनायक आयागो. शेक्सपीअरइतकीं खलस्वभावाचीं विविध चित्रें दुसऱ्या कोणा कवीने क्वचितच रेखाटलीं असतील. परंतु त्या सर्वांत आयागो हा मुकुटमणी आहे. करुण नाटकांतील दोन्ही अंगें, भीषण घटना आणि करुण विपाक हीं शेक्सपीअरच्याही इतर नाटकांत इतक्या ज्वलंत आणि भेदक रीतीने एकत्र आलेलीं आढळणार नाहीत. म्हणूनच वड्स्वर्थने ऑथेल्लो नाटकाचें वर्णन जगांतील तीन सर्वांत जास्त करुणरसप्रधान अशा वाङ्मयकृतींमधील एक* असें केलें; मेकॉलेने "जगांतील बहुधा सर्वश्रेष्ठ ललितकृति" असें म्हणण्याचा पल्ला गांठला; लँडार कवि म्हणाला, "ऑथेल्लो साहित्यविश्वांतील सर्वोच्च शिखर आहे; तेथे गेल्यावर मग पुढे उंच उंच चढायला कांही नाही. जिकडे तिकडे खालीच उतरायचें."

अशा या श्रेष्ठ नाट्यकृतीचा अभ्यास करूं जातांना किती गोष्टींबद्दल लिहावें आणि किती गोष्टींबद्दल लिहूं नये असें कोडेंच पडतें. विशेषतः, आयागोच्या स्वभावचित्रणाचें विश्लेषण करण्याचा मोह टाळणें दुष्कर आहे. निर्हेतुक खलतेचें एक अनुपमेय उदाहरण म्हणून त्याच्याबद्दल इतका दृढ ठसा सर्वत्र उमटून राहिला आहे की, त्याबद्दल पुन्हा एकदा तपास करणें आवश्यक आहे असें वाटूं लागतें आणि तो स्वतः आपल्या वागण्याचीं कारणें पुनःपुन्हा सांगत असतां त्याच्यावर अविश्वास करून, त्याकडे कानाडोळा करून त्याच्या बुद्धीच्या दुष्टताविलासाचें कौतुक करण्याकडेच बहुतेकांचें मन कां वळतें यांचें कांही स्पष्टीकरण सापडल्यास पाहावें असा मोह होतो.

---

* दुसऱ्या दोन कृती म्हणजे सॉक्रेटीसच्या शेवटच्या दिवसांचें प्लेटोने केलेलें वर्णन आणि वाल्टनचें जॉर्ज हर्बर्टचें चरित्र.

सर्व लक्ष एकट्या ऑथेल्लोवरच —

परंतु ज्या उद्देशाने हा विशिष्ट अभ्यासाचा प्रपंच आरंभलेला आहे त्याच्या दृष्टीने आपल्याला आपलें सर्व लक्ष एकट्या ऑथेल्लोवरच केंद्रित करणें आवश्यक आहे. त्याचें चित्रण त्याच्या निर्मात्याने कसें केलें आहे हेंच आपल्याला पाहिलें पाहिजे. या नाटकाचा नायक ऑथेल्लो हा आहे याबद्दल सहसा कोणी शंका घेणार नाही. डेस्डेमोनाबद्दल आपल्याला पुष्कळ वाईट वाटतें हें तर खरें; परंतु कोलरिजने विचारल्याप्रमाणे, नाटकाचा शेवटचा पडदा पडल्यावर आपल्या मनांत या दोघांपैकी करुणा अधिक कोणाबद्दल वाटते ? हा खरा प्रश्न आहे. त्याचें उत्तर जिच्यावर एवढा अन्याय झाला त्या डेस्डेमोनापेक्षा अन्याय करणाऱ्या ऑथेल्लोबद्दल, असें येतें का, आणि तसें येत असल्यास तें तसें कां येतें, हें पाहणें हा आपल्या अभ्यासाचा प्रमुख उद्देश आहे.

अगदी सुरुवातीला पडदा उघडतांक्षणीं आपल्याला दर्शन होतें आयागोचें. पहिल्या प्रवेशाच्या सुरुवातीच्या भागांतच कणिकनीतिप्रवीण अशा या खलपुरुषाचें दुसऱ्याला एवढाही विचार करायला अवसर न देतां चालणारें उलटें पालटें आणि चतुर बोलणें आपण ऐकतों. आणि असा हा माणूस, तो सांगत असलेल्या कारणांसाठी म्हणा, नाहीतर जात्या वाकडेंच करीत राहावें हा त्याच्या बुद्धीचा धर्म आहे म्हणून म्हणा, ऑथेल्लोवर सूड उगविण्यासाठी सज्ज झालेला आहे हें आपण पाहतों. त्याच्याचकडून आपल्याला कळतें की, व्हेनिसच्या राज्याचा मूर वंशाचा सेनापति ऑथेल्लो याने व्हेनिस-मधील एक ज्येष्ठ सरदार ब्रॅबॅन्टिनो याच्या मुलीला पळविलें आहे. हीच तक्रार घेऊन आयागोकडे आला होता, त्याच मुलीवर आपक असलेला एक इटालियन नागरिक रॉडरिगो हा. त्याच्याकडून आरडाओरडा करून आयागोने ब्रॅबॅन्टिनोला उठवलें आणि कांहीशा काव्यमय आणि कांहीशा अश्लील शब्दांत त्याने ब्रॅबॅन्टिनोची मुलगी डेस्डेमोना हिला ऑथेल्लोने घरातून काढून नेल्याचें ब्रॅबॅन्टिनोला सांगितलें. ही गोष्ट इतकी अविश्वास्य वाटण्याजोगी होती की, ब्रॅबॅन्टिनो ती ऐकूनही घेईना. शेवटीं आयागोने आणि त्याहीपेक्षा रॉडरिगोने जास्तच तपशीलवार निवेदन केल्यावर ब्रॅबॅन्टिनो घरामध्ये शोध घेण्यासाठी जातो; त्या वेळी आयागोने रॉडरिगोला जें सांगितलें तें आपल्या दृष्टीने विशेष महत्त्वाचें आहे. मूर सेनापतीच्या विरुद्ध साक्ष देण्याचा प्रसंग आपल्यावर येऊं नये म्हणून तेथून निसटून जात असतांना आयागो म्हणतो, "या प्रकरणामुळें राज्याकडून ऑथेल्लोवर थोडेंसें नियंत्रण घालण्याचा जरी प्रयत्न झाला तरी राज्य त्याला कांही अजीबात दूर फेकून देणार नाही. सायप्रसमध्ये स्वारीवर जाण्याची त्याची सिद्धता झाली आहे. आणि त्याच्यावाचून या संकटांतून राज्याला कोणी वांचवूं शकणार नाही अशी राज्यकर्त्यांची मनोमन खात्री पटलेली आहे. तसेंच माझ्या स्वतःच्या एकंदर योजनेप्रमाणे मला त्याच्या बरोबर जायलाच हवें, आणि तेंही त्याच्याबद्दल आदर आणि प्रेम यांचें नाटक करून."

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. एथलप्त.
अनुक्रम 23 ऑथेल्लो... विभाग निबंध... १२१
क्रमांक 9295... नोंद दि. 2-3-1940

ऑथेल्लोची पहिली ओळख —

ही आपली ऑथेल्लोशीं पहिली ओळख; की, व्हेनिसच्या शत्रूंविरुद्ध ज्याच्या सेनापतित्वाची व्हेनिसला अगदी अपरिहार्य अशी गरज आहे असा तो एक वीर पुरुष आहे; तो गोऱ्या वर्णाचा नसून काळ्या वर्णाचा आहे; तसेंच त्याने डेस्डेमोनाला वश करावी याचें वैषम्य वाटणारा एक तरुण इटालियन नागरिक आहे आणि त्याच्या वतीने आणि साहाय्याने, आपल्या स्वतःचा ऑथेल्लोविषयीच्या असंतोषाचा वचपा काढण्यासाठी सज्ज झालेल्या आयागोने डेस्डेमोनाच्या बाबतींत काळ्यागोऱ्यांमधील संघर्षाची मोठी धमालीची नांदी उडवून दिल्याचा प्रसंग आपल्यासमोर नुकताच घडला आहे आणि घडतो आहे. अशा अवस्थेंत नाटक आपल्यापुढे आहे.

डेस्डेमोना घरांत नाही हें पाहून ब्रॅबॅन्टिनोचा स्वाभाविकच तिळपापड होतो. आपल्या सगळ्या आप्तेष्टांना त्या भल्या रात्रीच्या प्रहरीं उठवून बरोबर सैनिक घेऊन रॉडरिगोच्या मार्गदर्शनाखालीं तो आयागोच्या शोधार्थ निघतो. इकडे अशी आग लावून आयागो तडक ऑथेल्लोकडे तोच प्रयोग करण्यासाठी म्हणून जातो. ब्रॅबॅन्टिनोने ऑथेल्लोला नाही नाही त्या शिव्या दिल्याचें आपल्या पदरचेंच सांगून तो ऑथेल्लोला भडकविण्याचा प्रयत्न करतो आणि एकीकडे त्याला सावधपणाची सूचना देण्याचा आव आणतो; ब्रॅबॅन्टिनो म्हणजे फार बडें प्रस्थ; त्याच्या शब्दाला व्हेनिसमध्ये ड्यूकपेक्षाही जास्त मान; त्याच्यावर व्हेनिसवासियांचें प्रेम फार; तेव्हा लग्न चांगलें नीट रीतसर झालें आहे ना—नाहीतर कायद्याचें कांहीतरी खुसपट निघून भलतेंच लचांड एखादें पाठीला लागायचें, अशी कांहीशी भीति तो ऑथेल्लोला घालतो.

स्वतःच्या चांगुलपणावर श्रद्धा —

परंतु वीर पुरुष म्हणून आपणाला माहीत झालेला हा पुरुष, ऑथेल्लो, धीरगंभीर, स्वतःच्या चांगुलपणावर आणि सामर्थ्यावर संपूर्ण विश्वास असलेला असा आहे याची साक्ष आपल्याला या पहिल्या सलामींतच पटते. व्हेनिसच्या राज्याचें आपण एवढें भलें केलें आहे की, त्यामुळे आपल्याविरुद्ध होणाऱ्या तक्रारी निष्प्रभ होतील असा त्याला आत्मविश्वास आहे. त्याचा वर्ण काळा असला तरी तशीच जाहिरात करायची झाली तर आपला वंश राजांचा आहे हेंही त्याला सांगतां येण्यासारखें आहे. परंतु स्वतःच्या ठिकाणीं कितीही उणीवा असल्या तरी त्या मुळीच न लपवितांसुद्धा त्याला जीवनांत जें अपूर्व भाग्य लाभलें आहे तें त्याच्या ठिकाणच्या श्रेष्ठपणाचें एक मोठेंच निदर्शक आहे. कोणाला वाटेल की, शौर्य किंवा संपत्ति यांच्यांतील यशासंबंधी ऑथेल्लो बोलत आहे. पण तसें नाही. त्याच्या मतें त्याचें सर्वांत मोठें भाग्य म्हणजे डेस्डेमोनाची प्राप्ति हें आहे. अत्यंत स्थिर आणि भावपूर्व विश्वासाने तो हें सांगत

आहे. त्यामध्ये विकाराचें बिलकूल थैमान नाही. कारण तोच आवर्जून आयागोला सांगतो आहे की, " सुशील डेस्डेमोनावर माझें नितांत प्रेम आहे; त्या प्रेमासाठी मी माझें भटकें आणि अनिर्बंध जीवन टाकून द्यायला तयार झालों आहें; केवळ त्या प्रेमासाठी; नाहीतर सगळ्या महासागरांचें स्वमित्व मला कोणी देऊं केलें असतें तरी माझ्या अनिर्बंध भटक्या जीवनापुढे तें मीं कःपदार्थ मानलें असतें; इतकी या प्रेमाची महती आहे."

डेस्डेमोनाच्या प्रेमाने भारलेला—

आणखीही तो पुढे बोलत राहता. परंतु कोणी मंडळी येतातसें दिसलें म्हणून तें बोलणें अर्धवटच राहिलें. पण तो जें बोलला तेवढ्यावरूनही त्याच्या धिम्या आणि आत्मविश्वासपूर्ण चित्ताला डेस्डेमोनाच्या प्रेमाने किती भारलेलें आहे याची साक्ष पटते. वयाने तो पुष्कळ प्रौढ आहे. आजपर्यंत कोणाच्या प्रेमपाशांत सापडून, घर करून त्यांत स्वतःला कोंडून घेण्याचा विचारसुद्धा त्याने मनाला शिवूं दिलेला नाही. परंतु डेस्डेमोनाच्या सुशीलत्वाने, मधुर नम्रतेने त्याला जिंकलें आहे. या प्रेमाने त्याचें डोकें फिरलेलें नाही; पण त्याच्या सर्व वृत्ति, त्याचें सर्व जीवन, त्याने अगदी निर्विशेषपणाने या प्रेमाला समर्पित केलें आहे, याची साक्ष पटविण्याला त्याचें हें लहानसें भाषण पुरेसें आहे. याच प्रेमभरामुळे बाकीच्या कितीएक गोष्टी त्याला विचारांतसुद्धा घेण्याजोग्या वाटत नाहीशा झाल्या आहेत.

जीं कोणी माणसें येतातसें वाटलें तीं ब्रॅबॅन्टिनो वगैरे मंडळी असावी हा आयागोचा अंदाज चुकतो. त्याऐवजी ऑथेल्लोचा दुय्यम अधिकारी कॅशिओ इतर कांही अधिकाऱ्यांबरोबर तेथे येतो आणि ड्यूकने दरबारांत ऑथेल्लोला बोलावलें असल्याचें सांगतो. सायप्रस बेटावर तुर्कांचा हल्ला होण्याचा फार मोठा संभव उपस्थित झाल्यामुळे ऑथेल्लोला ताबडतोब तिकडे पाठविण्याची जरूरी होती. "दरबारांत जाण्यापूर्वी आंत कळवून येतो" असें ऑथेल्लो म्हणतो त्या वेळीं कॅशिओला स्वाभाविकच आश्चर्य वाटतें. आयागो त्याला सांगतो की, स्वारीचें लग्न झालें आहे, तेव्हा तर कॅशिओ अधिकच बुचकळ्यांत पडतो. यांतून घ्यावयाचें आपण एवढेंच की, लग्नाच्या पहिल्या रात्रींच एका बाजूला दरबारांत स्वारीच्या निमित्ताने बोलावणें आणि दुसऱ्या बाजूला ब्रॅबॅन्टिनोची या लग्नाच्या निमित्ताने रागाची हालचाल अशा प्रसंगांत ऑथेल्लो सापडला आहे.

कारण, तो आंत जाऊं पाहत आहे तोच ब्रॅबॅन्टिनो सैनिकांसह त्या ठिकाणीं येऊन उभा राहतो. " हा पाहा तो मूर" असें रॉडरिगोने म्हणतांच ब्रॅबॅन्टिनो, "चोर, दरोडेखोर, हाणा याला " असें म्हणून तरवार उपसतो. दोन्ही बाजूंनी तरवारी उपसल्या जातात.

प्रशांत आणि विनम्र—

पण आश्चर्याची आणि आपल्या मनांत मोठा आदर उत्पन्न करणारी गोष्ट म्हणजे

ज्याच्यावर लग्नाच्या पहिल्या रात्रींच हा दुधारी बिकट प्रसंग गुदरला आहे तो ऑथेल्लो अत्यंत प्रशांत आणि विनम्र असा आपल्यापुढे दिसतो. त्याचें भाषणच किती निर्मळ आहे पाहा. तो म्हणतो,

"छे! छे! आपल्या या तेजस्वी तरवारी म्यान करा. हवेंतील दंवाने त्या गंजतील मात्र. आणि महाराज, आपण वयाच्या अधिकारानेच मला वाटेल ती आज्ञा करूं शकता; त्यासाठी शस्त्रांची काय गरज आहे?"

ऑथेल्लोच्या या विनम्रतेचा परिणाम व्हावा इतकें ब्रॅबॅन्टिनोचें मन ठिकाणावर नाही. रागाने तो वेभान झाला आहे. तो ऑथेल्लोला खूप शिवीगाळ करतो; ऑथेल्लोने डेस्डेमोनावर कांहीतरी जादूटोणा केला असला पाहिजे असा तो आरोप करतो. नाहीतर इतकी नाजूक, इतकी सुंदर आणि इतकी आनंदी मुलगी, स्वतःच्या समाजांतले अभिजात आणि श्रीमंत तरुण सोडून अशा घामट माणसाच्या गळ्यांत पडून सगळ्यांच्या थट्टेचा विषय कधी कधी झाली नसती. कांही तरी मंत्रतंत्र, कांही घातक औषधें यांचा प्रयोग करून तिची बुद्धि तूं भ्रष्ट केली असली पाहिजेस; म्हणून याची चौकशी केल्याशिवाय मी राहणार नाही. मला याचा फैसल्ला करून मिळालाच पाहिजे. आणि म्हणून असले कांही जादूटोणे केल्याच्या आरोपासाठी मी तुला अटक करतों – असें संतापाने बोलून आपल्या माणसांना तो ऑथेल्लोला पकडण्यास सांगतो.

तरीही ऑथेल्लो अगदी शांत आहे. दोन्ही पक्षाच्या लोकांना तो लढण्याचें कारण नाही म्हणून सांगतों. लढण्याची जरूरीच असती तर त्यासाठी मला कांही कोणी सांगा-शिकवायला नको आहे, असें म्हणून "आपल्या आरोपाचा जाब देण्यासाठी मीं कोठें चलावें, महाराज?" असा अगदी नम्र प्रश्न तो ब्रॅबॅन्टिनोला विचारतों. त्यावर "तुरुंगांत" असें उत्तर ब्रॅबॅन्टिनोने दिल्यावर "हा हुकूम पाळला तर ड्यूकसाहेबांना काय वाटेल?" हा प्रश्न ऑथेल्लो उभा करतो. "कारण, हीं पाहा त्यांच्याकडून बोलावण्यासाठी तर हीं माणसें आलीं आहेत."

अशा रात्रीच्या वेळी ड्यूकने दरबार भरविलेला आहे हें ऐकून ब्रॅबॅन्टिनोला मोठाच पेच पडतो. "तसेंच कांही गंभीर कारण असणार. तथापि माझें कामही कांही कमी गंभीर नाही" असें म्हणून तो दरबारांत जायला निघतो, तरी "याला दरबारांतच तडक घेऊन या" असा हुकूम आधी फर्मावून तो जातो. त्याला विश्वास असतो की, दरबारांत ड्यूक आणि इतर मानकरी आपल्याच बाजूने फैसल्ला करतील. कारण हीं अशीं लग्नें होऊं दिलीं तर मग आमच्या राजकारणी धुरंधरांची जागा गुलाम आणि धर्महीन लोक घेऊं लागायचे — ही त्याची मोठी तक्रार आहे. त्या तक्रारीचा आणि या अशा लग्नांचा विचार आपल्याला जरा खोलवर करायचा आहे.

जेथे आपल्याला ऑथेल्लोची अगदी पहिली ओळख पटते असा हा अतिशय प्रभावी, परंतु अगदी साधा आटोपशीर आणि मुद्देसूद प्रवेश आहे. त्यामध्ये ऑथेल्लोच्या

शौर्याचें, लढाईच्या सामर्थ्याचें एवढेंसुद्धा दर्शन नाटककाराने आपल्याला घडवलेलें नाही. उलट एक अत्यंत आत्मविश्वासी, स्वतः कसलाही अपराध केल्याची रेसभर जाणीव नसलेला, वृद्ध वय आणि दरबारी अधिकारपद यांचा मान ठेवणारा, स्वतःवर कितीही गर्ह्य प्रहार आणि आरोप केले गेले तरी शांत राहून चौकशीला तयार होणारा असा धीरवान पुरुष आपणापुढे उभा राहतो.

प्राध्यापकांची गफलत —

अशा स्थितींत याच प्रसंगाला उद्देशून महाराष्ट्रांतील एक प्राध्यापक काय लिहितात पाहा.* ते म्हणतात,

"सासऱ्याचे सैनिक त्याला धरण्यासाठी आले असतां त्याने त्यांना केवढ्या मोठ्या धैर्याने एकट्याने थोपवून धरलें हें सुरुवातीसच आपणांस पाहावयास सापडतें."

या विधानांत किती तरी गफलती आहेत. सासऱ्याचे सैनिक त्याला धरण्यासाठी आले नव्हते. या चोराला हाणा, निजवा, असें ब्रॅबॅन्टिनोने म्हटल्यावर दोन्ही पक्षांनी तरवारी उपसल्या होत्या. (Both sides draw अशी नाट्यसूचना आहे.) म्हणजे तेथे चकमक उडणार होती. शिवाय प्राध्यापकांनी उद्धृत केलेलें त्याचें

Keep up your bright swords, for the dew will rust them,

हें वाक्य दोन्ही बाजूंना उद्देशून आहे. त्यांत धरायला आलेल्या सासऱ्याच्या सैनिकांना थोपवून धरण्याचा प्रश्न नव्हता. त्यामुळे मोठें धैर्य 'एकट्याने' दाखविण्याचा संबंधच येथे आला नाही. एक तर ऑथेल्लो तेथे 'एकटा' नव्हता. शिवाय तुमच्या या तरवारींना या ठिकाणीं कांहीच काम नसल्यामुळे त्या दंवाने गंजतील अशी कांहीशी नाजूक थट्टा मात्र ऑथेल्लोने तेथे केली आहे. याचें कारणही त्याने किती स्पष्ट सांगितलें आहे. तें असें की, वडीलकीच्या नात्याने आज्ञा करण्याचा अधिकार ब्रॅबॅन्टिनोला असतांना त्याने शस्त्रांचा आश्रय घेण्याचें कारणच नव्हतें. आणि या आपल्या भूमिकेला अनुसरून तो सासऱ्याच्या स्वाधीन होण्यालाही तयार होतो हेंही आपण पाहिलें.

परंतु करुण नाट्यांतील नायकाचा श्रेष्ठपणा कांही तरी प्रत्यक्ष प्रसंगाने आपल्याला दाखविलाच पाहिजे हा आपला अवास्तव विचार समर्थित करण्यासाठी मुळाची इतकी

---

*सुधाकर कीं एकच प्याला : प्रा. रा. शं. वाळिंबे; पृ. ७. याच ठिकाणीं, "कर्तव्य-दक्षतेमुळे पत्नीला व्हेनिसमध्येच ठेवून तुर्कांचा पाडाव करण्यासाठी ऑथेल्लो सायप्रस बेटाकडे निघून जातो," असेंही चुकीचें विधान सदर विद्वानांनी केलें आहे. वास्तविक आपल्या मागोमागच डेस्डेमोनाला सुरक्षितपणें सायप्रसला घेऊन येण्याचें काम आयागोला ऑथेल्लोने त्याच वेळीं सांगितलेलें असतें आणि योगायोग असा कीं, डेस्डेमोना ऑथेल्लोच्या आधीच सायप्रसला पोचतेही.

नसती ओढाताण करण्याचा प्रसंग प्राध्यापकांनी स्वतःवर ओढवून घ्यावा यांतच त्यांच्या या भूमिकेचा अशुद्धपणा उघड होतो. असें न म्हणावें तर इतकें सरळ व सोपें इंग्रजी समजण्याची सुद्धा कुवत प्राध्यापक महाशयांच्या अंगीं नाही काय अशी शंका उपस्थित होते !

ब्रॅबॅन्टिनो आणि त्याचीं माणसें येतातसें दिसल्यावर आयागोने खरोखर सल्ला दिला होता की, ऑथेल्लोने आंतमध्ये निघून जावें. परंतु हा भेकडपणा ऑथेल्लोने पत्करला नाही. कारण "माझें आचरण, माझा हुद्दा आणि माझें विशुद्ध अंतःकरण या गोष्टी माझ्याबद्दल कोणाच्या मनांत कसला संशय राहूंच देणार नाहीत" इतकी त्याची स्वतःच्या निर्दोषीपणाबद्दल श्रद्धा आहे. आपण सरळ असतांना इतर कोणी वाकडें करील होईल? इतकी त्याची मानवी चांगुलपणावर निष्ठा आहे. हाच त्याचा गुण पुढे दरबारांत त्याच्या विवाहप्रकरणाची चौकशी होतें तेव्हा पुन्हा आपल्या प्रत्ययाला येतो.

मानवी चांगुलपणावर विश्वास —

हा सगळाच प्रसंग शेक्सपीअरने मोठ्या प्रभावी नाट्यमय रीतीने रेखाटलेला आहे. 'या काळ्या माणसाने आपली मुलगी पळविली' याबद्दल ब्रॅबॅन्टिनो वेभान होऊन बोलत आहे. राजकीय कारणासाठी इतक्या रात्रीं उठून आपण दरबारांत आलों नाही, तर आपल्या मुलीच्या कारणाने, असें जेव्हा तो म्हणतो तेव्हा त्याच्या दुःखावेगाने चमकून सर्वचजण एकदम "काय ती मेली?" असा प्रश्न करतात, तेव्हा एक सुंदर पताकास्थान निर्माण होतें. "हो, मला तरी ती मेलीच" असें म्हणून ब्रॅबॅन्टिनो तिच्यावर मंत्रतंत्र, जादूटोणा करून, तिच्यावर वाईट औषधांचा प्रयोग करून तिला पळवून नेल्याचा आरोप करतो. परंतु अजून त्याने ऑथेल्लोचें नांव सांगितलेलें नसतें. त्यामुळे हें कृत्य करणारा कोणीही आणि केवढ्याही उच्च स्थानावरचा असला तरी त्याचें यथायोग्य शासन होईल असें ड्यूक सांगतो आणि याबद्दल ड्यूकचे आभार मानून ब्रॅबॅन्टिनो "हा तो मूर! ज्याला तुम्हीं मोठ्या दरबारी कामासाठी बोलावून घेतलें आहे तो – तोच हा गुन्हेगार!" असें म्हणतो, त्या वेळीं हताश होऊन ड्यूकसह सर्वजण जेव्हा "हें ऐकून आम्हांला फार खेद होतो" एवढेंच म्हणतात तेव्हा नाटककाराच्या कौशल्याचें केवढें मोठें दर्शन आपल्याला घडतें. त्याच हताशपणाने ड्यूक ऑथेल्लोला त्याचें यावर कांही म्हणणें आहे का म्हणून विचारतो. ब्रॅबॅन्टिनो इतका उतावीळ झालेला आहे की, "आणखी निराळें काय म्हणणार तो" असें तो उद्गारतो. परंतु ऑथेल्लोने आपलें म्हणणें किती शांतपणें, एवढाही रागलोभ न दाखवितां मांडलें आहे पाहा; तो म्हणतो,

"हो, या वृद्ध गृहस्थांची मुलगी मी नेली आहें हें अगदी खरें आहे; मीं तिच्याशीं लग्न केलें आहे हेंही खरें आहे. पण माझा अपराध असला तर एवढाच आहे.

आणखी त्याला आगा पिछा दुसरा कांही नाही. मी शिपाईगडी आहे. सातव्या वर्षापासून अगदी आजपर्यंत – हे गेले नऊ दिवस तेवढे सोडून – माझें सारें जीवन रणांगणावर तंबूंत गेलें आहे; या महान संसाराचा मला दुसरा बिलकूल अनुभव नाही. आणि म्हणून मला माझ्या समर्थनार्थ कलापूर्ण अशा रीतीने कांही सांगतां येणार नाही. आपण मंडळींनी ऐकून घेतलेंत तर कसलें तिखटमीठ न लावतां माझी सगळी हकीकत मी तुम्हांला सांगेन; माझ्या प्रेमाचा सगळा इतिहासही तुमच्यापुढे ठेवीन. मग त्यांतून पाहा तुम्ही की, मी यांची कन्या मिळवितांना कोणत्या औषधीचा किंवा महान जादूटोण्याचा प्रयोग केला तें."

संसारांतील खाचखळग्यांना पारखा शिपाईगडी —

या ठिकाणीं या भाषणाने ज्या श्रोत्याचें मन विरघळणार नाही असा श्रोता विरळा. याच्या आधीच, आपल्या निर्मळ प्रेमाबद्दल तो आपल्याला जाणीव देतो त्या वेळींच, आपला कल त्याच्याकडे झुकलेला असतो. कां कोण जाणे, पण रागावलेल्या आईबापांपेक्षा, निर्मळ प्रेमाच्या बळावर आणि जनरीत झुगारून देऊन एकत्र आलेल्या प्रेमी जोडप्याबद्दल माणसांना नेहमीच अधिक आपुलकी वाटते. ऑथेल्लोचें आपल्या सासऱ्याशीं झालेलें मोकळें, आदरपूर्ण आणि धीरगंभीर वर्तन व स्वतःच्या निर्दोषीपणाबद्दलचा त्याचा विश्वास या गोष्टींनी त्याच्याबद्दल आपणांला अधिकच आपुलकी वाटूं लागते. आणि सासऱ्याने भर दरबारांत त्याच्यावर अति दारुण आरोप केला असतांही जेव्हा शांतपणे तो आपली कहाणी सांगूं पाहतो, त्या वेळीं संसारांतील खांचखळग्यांना पारख्या असलेल्या, सारी उमर रणांगणावर घालविलेल्या आणि आता निर्मळ प्रेमभरांत सापडून संतोषाच्या परिसीमेवर असलेल्या या शिपाईगड्याबद्दल आपल्या मनांत केवढा तरी मोठा उमाळा उत्पन्न होतो. येथपासून आतां आपण त्याचे पक्षपाती होतो.

अर्थात याही त्याच्या वृत्तींत एक प्रकारचा मोठेपणा आहे हें खरेंच आहे. आणि अशा या सरळ अंतःकरणाच्या मनुष्याच्या संसाराची धूळधाण झालेली शेक्सपीअर दाखवतो आहे म्हणून तर हें नाटक पाहण्याची प्रेक्षकाला ओढ वाटते. परंतु सामान्य अर्थाने ज्याला श्रेष्ठ मनुष्य म्हणतात तसला श्रेष्ठपणा कांही त्याचा शेक्सपीअरने आपल्यापुढे दाखविलेला नाही; रणांगणावरील त्याच्या शौर्याचें प्रदर्शन करण्याच्या भानगडींत शेक्सपीअर पडला नाही. त्याला माहीत आहे की, जगामध्ये रसिकांना या बाह्य कर्तृत्वापेक्षा आंतरिक सद्गुणांबद्दलच जास्त जिव्हाळा असतो, आणि तेवढेंच दाखवून त्याचें काम पुरें होतें.

ऑथेल्लोच्या प्रेमाची साधी सरळ कहाणी —

ऑथेल्लोच्या या भाषणानंतर ब्रॅबॅन्टिनो आपला आरोप पुन्हा उच्चारतो. त्याचा

मुद्दा एवढाच की, डेस्डेमोनासारखी सुशील, विनम्र आणि भीरु मुलगी, तिच्या बुद्धीला भ्रम झाला असल्याशिवाय असली भयंकर चूक करणारच्च नाही. त्यानंतर ऑथेल्लोने आपली सारी प्रेमकहाणी अगदी साध्या शब्दांत पण तपशीलवार सांगितली. "अंतःकरणानेच अंतर जाणावें – आंतरः कोऽपि हेतुः । – अशा तऱ्हेच्या अनुनयाने तुम्हा दोघांचें मीलन झालें का ?" असा त्याला प्रश्न केलेला असतो. आणि तेंच तो सांगतो. ब्रॅबॅन्टिनोच्या घरीं कितीएक दिवस, त्याच्याच सांगण्यावरून आपण आपली पूर्व आयुष्यांतली हकीकत कशी सांगत होतों; त्या वेळीं डेस्डेमोना मन लावून ऐकत बसायची; परंतु घरकामामुळे तिला मधून मधून उठून जावें लागे; काम संपवून ती पुन्हा परत येई खरी; परंतु मधले मधले भाग तिचे ऐकायचे राहत. जेव्हा जेव्हा ती ऐकत असे तेव्हा तिचें सगळें औत्सुक्य जणू तिच्या कानांमध्ये सांठविलेलें मला आढळून येई. त्या औत्सुक्याची संपूर्ण पूर्तता व्हावी अशी तिची इच्छा आहे हें एका चांगल्याशा प्रसंगीं आपण तिच्याकडून काढून घेतलें आणि नंतर पुन्हा तिला तो सारा वृत्तांत सांगितला. त्याने ती अतिशय मोहित होऊन गेली. त्या सर्व जीवनांतील भयानकतेबद्दल आणि अद्भुततेबद्दल तिचें चित्त थरारून गेलें. अखेर या शब्दांनी तिने आपलें मनोगत व्यक्त केलें, "तुमच्या मित्रांपैकी कोणाचें मन जर माझ्यावर गेलें तर त्याला तुमची ही सगळी कथा अशाच रीतीने सांगायला शिकवा – म्हणजे त्याला माझें प्रेम संपादन करतां येईल." यावरून तिचा आशय आपण ओळखला. आपल्या जीवनांतील धोक्यांमुळे तिचें मन आपल्यावर जडलें होतें आणि आपल्या या धोक्यांबद्दल तिला सहानुभूति वाटली, म्हणून ती आपल्याला आवडूं लागली होती. जो कांही जादूटोणा आपण केला तो फक्त एवढा. खरें खोटें ही डेस्डेमोना येत आहे तिलाच विचारा.

"या कथेमुळे माझी मुलगीसुद्धा मोहित झाली असती" असें म्हणून ड्यूक ब्रॅबॅन्टिनोला शांत करूं पाहतो. परंतु तो ऐकण्याच्या मनस्थितींत नाही. तो डेस्डेमोनाला कठोरपणें प्रश्न विचारतो "तूं खरोखर कोणाचा शब्द अधिक पाळला पाहिजेस सांग."

डेस्डेमोनानें दिलेलें उत्तर लिअर राजाची मुलगी कॉर्डेलिया हिनें दिलेल्या उत्तराची आठवण करून देतें. "माझें कर्तव्य द्विधा आहे; पित्याची आज्ञा पाळणें आणि नवऱ्याची आज्ञा पाळणें असें. परंतु माझ्या नवऱ्याची आज्ञा मी अधिक पाळतें यांत माझ्या आईच्या पावलावर पाऊल टाकूनच्च मी वागत आहें." हा तिच्या उत्तराचा आशय; मोठ्या तर्कशुद्ध आणि बिनतोड पद्धतीने तिनें तो व्यक्त केला आहे.

डेस्डेमोनाच्या श्रेष्ठ दर्जाची मोठी जाणीव—

यावर बोलण्याला ब्रॅबॅन्टिनोला कांही उरतच ताही. मनाविरुद्ध तो या लग्नाला मान्यता देतो. ड्यूक त्याला शांत करण्याचा पुष्कळ प्रयत्न करतो, पण व्यर्थ. शेवटीं

तो वाद सोडून ड्यूक ऑथेल्लोला तुर्कांच्या सायप्रसवरील संभाव्य स्वारीला तोंड देण्यासाठी तिकडे जाण्याबद्दल सुचवितो. ज्यासाठीं कंकण सदा बांधलेलें आहे असें हें कार्य असल्यामुळे ऑथेल्लो होकार देतो. फक्त आपल्या मागे आपल्या पत्नीची यथायोग्य बडदास्त राहावी याची जबाबदारी ड्यूकने घ्यावी असें तो सुचवितो. ही सूचना करतांना त्याचें जें भाषण आहे त्यांत डेस्डेमोनाच्याबद्दल त्याला केवढा अभिमान आहे, तिच्या श्रेष्ठ दर्जाची त्याला केवढी जाणीव आहे, हें थोडक्या शब्दांत तो स्पष्ट करतो.

तिने बापाच्या घरीं राहावें या सूचनेला डेस्डेमोना मान्यता देत नाही. "रोज आपल्या पित्याच्यासमोर राहून त्याच्या क्रोधाला कारण होणें हें तिला बरें वाटत नाही. हा तिचा विचार, ही तिची उदारता आपल्याला तिच्याविषयीं जवळीक वाटायला लावते. आणि पुढे जेव्हा सीतेप्रमाणे ती आपल्याला रणांगणावरच जायचें आहे अशी इच्छा व्यक्त करते तेव्हा तर आपला तिच्याविषयीचा जिव्हाळा सीमेला पोचतो. ऑथेल्लोच्या जीवनांतील संकटांच्या धामधुमीने तर ती त्याच्यावर आकृष्ट झाली होती. म्हणून तीं संकटें फक्त त्याच्या वाटणीला घालून आपण स्वतः शांततेंत कुजून राह्यला ती तयार नव्हती.

विषारी आणि भेदक इषारा —

ऑथेल्लोपुढे प्रश्न मोठा बिकट होता. स्त्रीसहवासाच्या मोहाने, विषयसुखाच्या ओढीने आपण डेस्डेमोनाला बरोबर घेऊन जातों असें लोकांना वाटावें हें त्याला नको होतें. कारण विषयवासनेने हुरळून जाण्याचें त्याचें आतां वय नव्हतें, आणि कर्तव्यपालनावर त्याची थोर निष्ठा होती. म्हणून दरबारानेच या गोष्टीचा निर्णय करावा असें तो सांगतो. परंतु हें ठरविण्याचें त्या दोघांवरच सोपविण्यांत येतें. त्याबरोबर ऑथेल्लो ताबडतोब कामगिरीवर निघण्याचा निर्णय करतो आणि डेस्डेमोनाला सायप्रस बेटावर आणण्याचें काम आयागोवर सोपवितो. सर्वांचा निरोप घेऊन ऑथेल्लो जाऊं लागतो त्या वेळीं ड्यूक पुन्हा एकदा ब्रॅबॅन्टिनोजवळ त्याच्यासाठी रदबदली करून म्हणतो, "सद्गुणांतच सौंदर्य आहे हें जर खरें असेल तर तुमचा जावई काळा नसून गोराच आहे असें तुम्हांला कबूल केलें पाहिजे." परंतु ब्रॅबॅन्टिनोला अजून हें मान्य नाही; आणि कांही अंशीं एका दरबारी मानकऱ्याला. हा मानकरी ऑथेल्लोला मुद्दाम चिडवून सांगतो की, "शूर वीरा, नमस्कार; आमच्या डेस्डेमोनाला चांगली वागीव." यामध्ये त्याचा जितका सद्भाव आहे तितकीच ही काळा आदमी आपल्या उच्चवर्णीय इटालियन सुसंस्कृत तरुणीला योग्य वागविण्याला समर्थ होईल कां नाही ही आशंकाही आहे. परंतु ब्रॅबॅन्टिनोने जातां जातां ऑथेल्लोला जो एक इषारा दिला तो फारच विषारी आणि भेदक आहे. तो म्हणाला, "अरे मूर! तुला डोळे असले तर तुझ्या या बायकोला नीट पाहून घे; आपल्या बापाला तिने हातोहात फसविलें आहे; आणि उद्या तुलाही असेंच फसवायला ती कमी करणार नाही."

ऑथेल्लोच्या स्वभावाचा नीट विचार करतांना या निरोपाच्या प्रसंगींच्या चकमकींचा जसा विचार केला पाहिजे तसाच आणखी एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. आयागो कोणत्या किंमतीचा मनुष्य आहे हें आपण याआधी पाहिलें आहे. ऑथेल्लोवर अनिष्ट प्रसंग आणण्यासाठी तो बद्धपरिकर आहे. स्वतःला दुय्यम अधिकाऱ्याची जागा न मिळतां ती कॅशिओला मिळाली, याबद्दल तो रुष्ट आहे आणि एकीकडे कॅशिओचा काटा काढून त्याला ऑथेल्लोवर कुरघोडी करायची आहे. तसेंच रॉडरिगोला डेस्डेमोना मिळवून देण्याच्या प्रयत्नांत साधल्यास साथी होऊन, स्वतःच्या पत्नीशीं ऑथेल्लोचा वाईट संबंध आहे अशाबद्दलचा त्याला जो संशय आहे त्याबद्दलही त्याला ऑथेल्लोला गोत्यांत आणावयाचें आहे. परंतु अशा विविध कारस्थानांचा हा सूत्रधार ऑथेल्लोला मात्र प्रामाणिकपणाचा पुतळा वाटतो आहे.

दुर्घटनेचें एक मूळ : नितांत सत्वस्थ वृत्ति—

" हा माझा माणूस प्रामाणिक आहे, विश्वासाचा आहे, त्याच्यावर मी माझ्या पत्नीला आणण्याचें काम सोपवितों, " असें ऑथेल्लो किती निर्भर विश्वासाने म्हणून जातो. कारण स्वतःवरून जगाची तो परीक्षा करतो आहे. त्यामुळे "मधु तिष्ठति जिह्वाग्रे हृदये तु हलाहलम्। या कोटीचीं माणसें जगांत असतात याचा त्याच्या जाणिवेला दुरून सुद्धा स्पर्श नाही.

ऑथेल्लोच्या जीवनांतील दुर्घटनेचें एक मूळ त्याच्या नितांत सत्त्वस्थ प्रवृत्तींत आहे. गांधीजींच्या हत्येविषयी लिहितांना शॉने म्हटलें, It is sometimes dangerous to be too good; अमर्याद चांगुलपणा हा केव्हा केव्हा घातक ठरतो. तशी अवस्था ऑथेल्लोची झाली. अशा रीतीने एका बाजूला एक अत्यंत उदार, सत्वस्थ माणूस तर दुसऱ्या बाजूला त्याच्यावर अनेक बाजूंनी कुरघोडी करून त्याला पेचांत आणूं पाहणारा एक कुटिल बुद्धीचा पाजी माणूस, यांच्यामधील हा सामनाच जणू आपल्यापुढे उभा राहणार असें दिसूं लागतें. किंवा सामना तरी कोठला ? एकतर्फी हल्लाच आहे हा ! आणि तोही अत्यंत सावधपणें आणि गुप्तपणाने केलेला असल्यामुळे अशा हल्ल्याच्या माऱ्यांत साफ कोलमडून पडल्यानंतर मग आपण हल्ल्यांत सापडलों होतों हें फार उशीरा ऑथेल्लोच्या लक्षांत येतें.

प्रभावी असें झगड्याचें सुप्त बीज—

हा एकतर्फी झगडा हें जसें या नाटकाचें बीज आहे तसेंच दुसरेंही एक मोठें प्रभावी परंतु सुप्त असें झगड्याचें बीज याच ठिकाणीं नाटककाराने पेरून ठेवलेलें आहे. त्याची नीट ओळख करून घेऊन मगच या नाटकांतील पुढच्या घटनांकडे वळणें जास्त सोयीचें होईल.

आपल्याला पुन्हाः पुन्हा सांगण्यांत आलेलें आहे की, पाजी आयागोच्या चतुर

हिकमतीमुळे ऑथेल्लोचें मन हें डेस्डेमोनाविषयीच्या संशयाने ग्रासलें आणि अखेर संतापाच्या भरांत त्याने तिचा खून केला. पण आपण आतापर्यंत पाहिलें की, ऑथेल्लो हा अशा उतावीळ वृत्तीचा मनुष्य नाही. शांत, सरळ, प्रसन्न, जगांतल्या कोणाबद्दलही अविश्वास न बाळगणारा असा हा उमदा वीर आयागोच्या कारस्थानाला इतक्या सहजासहजी बळी कसा पडला हें एक मोठें कोडें आहे. आणि हें कोडें नीटपणें सोडविल्याशिवाय ऑथेल्लोच्या स्वभावाचें खरें दर्शन आपणाला झालें असें म्हणतां येणार नाही.

त्या दृष्टीने, "मूर, आमच्या मुलीला नीट वागीव" हा जो इशारा एका दरबारी मानकऱ्याने निरोपाच्या वेळीं ऑथेल्लोला दिला त्याचा अर्थ स्पष्ट समजावून घेतला पाहिजे. डेस्डेमोना ही व्हेनिसच्या सुसंस्कृत समाजांतील अगदी वरच्या थरांतल्या घराण्यामधली आईपोरकी आणि बापाची एकुलती एक मुलगी होती. आणि तिची गाठ पडली होती, व्हेनिसमधील उच्चवर्णीयांच्या दृष्टीने रानवट, संस्कृतिविहीन, अरसिक, प्रौढ वयाच्या, हडेलहप्पी जीवन घालविणाऱ्या शिपाईगड्याशीं. अगदी स्वाभाविक शंका त्यामुळे त्या उच्चभ्र समाजांतल्या लोकांना येण्यासारखी होती की, या अशा माणसाच्या संसारांत आपल्या या नाजुक फुलासारख्या मुलीचें कसें होणार. अशा संस्कारहीन शिपायाची प्रेमाची कल्पना त्यांच्या मतें रासवटच असणार; त्याने किती जरी प्रेमाच्या गप्पा मारल्या असल्या तरी स्त्री ही विषयोपभोगाचें साधन अशीच त्याची समजूत असावयाची, अशी स्वाभाविक त्यांना आशंका वाटणार. शिवाय आपल्या पत्नीला तो नेत होता युद्धाच्या धामधुमीच्या क्षेत्रांत. तेथे तिच्या आजपर्यंतच्या जीवितांतील सुललित आणि सुखासीन आयुष्य तिला कसें उपभोगायला मिळणार? आणि असें झालें म्हणजे हा संसार तिला कसा काय मानवणार? इतकी खोल आशंका, त्या दरबारी पुरुषाच्या चित्तामधली, त्याच्या त्या लहानशा वाक्यांतील इशाऱ्यामध्ये व्यक्त झालेली आहे. मूर लोक हे अतिशय चंचल स्वभावाचे असतात असा आयागोचा विश्वास आहे. त्याबद्दलचीही भीति या आशंकेच्या मुळाशीं असण्याचा मोठा संभव आहे.

ऑथेल्लोलाही फरकाची जाणीव —

स्वतः ऑथेल्लोलाही आपल्या दोघांमधील फरकाची जाणीव आहे. आपली भाषा रांगडी आहे; तिच्यामध्ये शांततेच्या वातावरणांत लोळणारांच्याप्रमाणे लालित्य नाही; सातव्या वर्षापासून आपण तंबूंत आणि रणांगणांत आयुष्य घालविलें, त्यामुळे लढाया आणि झगडे याशिवाय संसाराच्या अन्य अंगांची आपल्याला ओळख नाही, याचा त्याने धारदार उल्लेख केला आहे. किंबहुना डेस्डेमोनाच्या प्रेमाखातरच काय तें संसाराचें बंधन पत्करायला तो तयार झालेला आहे; नाहीपेक्षा अनिर्बंध भटकें जीवन हेंच त्याला अधिक प्रिय, विश्वापेक्षाही अधिक मोलाचें आहे, असें त्यानेच

आयागोला सांगितलें आहे. ब्रॅबॅन्टिनोने त्याच्याविषयी 'गुलाम आणि धर्महीन' अशा लोकांच्यांत समावेश करून त्याचा उल्लेख केलेला आहे व हें सत्यही असल्याची ऑथेल्लोला जाणीव आहे. जीवनांतील कसल्याही नाजूकपणाची त्याला सवय नाही; इतकेंच नव्हे, तर त्याची रणांगणावरील तंबूमधील गारगोटीसारखी गार आणि अत्यंत कठीण अशी पोलादाची शय्या, त्याला परांनी खच्चलेल्या तीन थरांच्या गाद्याइतकी मऊ वाटायला लागलेली आहे नित्याच्या सहवासाने; आणि जीवनांतील कठीण प्रसंगां-बद्दल अत्यंत आतुर आपुलकी वाटावी हा आपला स्वभावधर्मच झालेला आहे हें त्याने मोकळ्या मनाने कबूल केलें आहे. तसेंच डेस्डेमोनाचें जीवन आपल्या जीवनाहून पुष्कळच वेगळ्या थराचें आहे ही आपली जाणीवही ऑथेल्लोने व्यक्त केली आहे. डेस्डेमोनाने व्हेनिसमध्येच मागे राहावें असें ठरवितांना त्याने या गोष्टीचा निर्देश मुद्दाम केला आहे. आपण स्वारीवर असतांना मागे डेस्डेमोनाची व्यवस्था डेस्डेमोनाच्या दर्जाला अनुसरून झाली पाहिजे; तिचें निवासस्थान, तिला मिळणारा तनखा, तिला उपलब्ध होणाऱ्या करमणुकी, खेळ वगैरेंच्या सोयी या सगळ्या गोष्टी आजवर ती ज्या इतमामांत वाढून लहानाची मोठी झाली त्याला साजेशा असल्या पाहिजेत, यावर त्यानें विशेष भर दिला आहे.

ऑथेल्लोला आपल्यामधील या विषमतेची जाणीव खास आहे. अशा विषम विवाहाचा परिणाम सुखावह होणें कठीण आहे, नव्हे अशक्य आहे, अशी जाणीव त्याला अर्थात प्रत्यक्षपणें मुळीच नाही. परंतु जगाच्या ब्ल्याकवाईट स्वरूपाचें संपूर्ण दर्शन होऊन सर्व नाजूक भावनांना मुकलेल्या निव्वळ व्यवहारवादी लोकांना त्याबद्दल मुळीच शंका नाही. त्यांचेंच मत जणू आयागो निःसंकोचपणाने सांगतो आहे की, "डेस्डेमोनाचें ऑथेल्लोवरील प्रेम फार काळपर्यंत टिकणारच नाही. आज जो विषय-वासनेचा झपाटा तिला ग्रासून राहिला आहे त्याचा भर लौकरच कमी झाला, म्हणजे तिला आपल्यामधील आणि ऑथेल्लोमधील अंतर कळून येईल. आणि विकाराच्या ज्या प्रचंड खळबळीने तिचें हें मीलन झालें आहे तितक्याच खळबळीने त्यांचा वियोग होईल. या उतार वयाच्या माणसाचा तिला वीट येऊन ती दुसरा तरुण खास शोधूं लागेल. एका बाजूला भलत्या प्रेमाच्या भरी पडलेला हा गांवढळ मूर आणि दुसऱ्या बाजूला महालाघवी आणि चपळ अशी ही व्हेनिसची तरुणी यांचा संयोग लग्नाच्या वेळच्या शपथेच्या बेगडी सूत्राने का कायम राहणार आहे?"

अंतर्मनांतील न्यूनगंड —

असा हा जो खुला खुला व्यवहार आयागोने रॉडरिगोला सांगितला आहे तो अगदी जसाच्या तसा आणि स्पष्टपणाने ऑथेल्लोच्या मनांत नव्हता; उलट डेस्डेमोनाच्या निष्ठेवर स्वतःची अत्यंत दृढ श्रद्धा असल्याचा त्याचा आत्मप्रत्यय होता. इतका की, हें खोटें ठरलें तर आपलें शिर कापून द्यायला तो तयार होता. असें जरी असलें तरी आपणा

दोघांमधील अंतराचीही ही जी स्पष्ट जाणीव त्याला होती तिच्यामधून त्याच्या अंतर्मनांत त्याला न कळत खास एक प्रकारची न्यूनगंडाची भावना उद्‌भूत होऊन राहिलेली असली पाहिजे; त्याचें अंतर्मन त्यामुळे या प्रश्नाची विचिकित्सा करीतच असलें पाहिजे की, आम्हां उभयतांमधील हें अंतर, आपल्या स्वतःमधील ही अपूर्णता, तुलनेने दिसणारी हीनता या गोष्टी अखेर डेस्डेमोना माझ्यापासून दुरावण्याला कारण तर होणार नाहीत ना ?

न कळतां असा न्यूनगंडाचा नेहमीच परिणाम होत असतो. प्रेमाची पहिली बायको मेल्यावर मनुष्य मोठ्या आशेने दुसरें लग्न करतो. त्याच्या नव्या बायकोचें त्याच्यावर खरें आणि निर्विशेष प्रेमही असतें. आपल्या नवऱ्याला पहिल्या बायकोची आठवण येत असेल असा त्या बिचारीला संशयही नसतो. परंतु नवऱ्याला मात्र न कळतांच चमकल्यासारखें होत असतें की, आपली प्रथम पत्नीबद्दलची गोड स्मृति आपल्या नव्या बायकोच्या लक्षांत तर येणार नाही ना? आणि या सुप्त भीतीपायीं केव्हा तरी एखादी बारीकशीच उघडीक होऊन झगडा एकदम निर्माण होतो. लपवून ठेवण्याचा प्रयत्न केलेलें अन्य स्त्रीबद्दलचें छुपें प्रेम, व्यसन, गुन्हा किंवा पापाचरण या सर्वांमुळे अशाच प्रकारचे न्यूनगंड निर्माण होतात आणि केव्हा तरी त्यांच्यामुळे स्फोटक परिस्थिति निर्माण होते. हळूहळू दारूचें कोठार अगदी परिपूर्ण होत असतें; मग एक लहानशी ठिणगी लागण्याचाच काय तो अवकाश असतो.

डेस्डेमोना आणि ऑथेल्लो यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक परिस्थितींत जें महदंतर आहे त्याचा हा असा आंतरिक परिणाम ऑथेल्लोच्या मनावर झाला असणें अपरिहार्य आहे. आणि जेव्हा डेस्डेमोनाच्या बापानेच खुद्द त्याला इशारा दिला की, संभाळ बाबा, ही पोरगी कांही अशी तशी नाही; माझ्यासारख्या तिच्याच वातावरणांत वाढलेल्या सुसंस्कृत आणि अनुभवी म्हाताऱ्याच्या हातावर तिने हा हा म्हणतां तुरी दिली आहे; तेथे तुझ्यासारख्या हीन संस्कृतीच्या माणसाला ती केव्हाच मामा करील; तेव्हा त्याची ती सूचना जरी ऑथेल्लोने शपथपूर्वक झिडकारून टाकली असली तरी त्याच्या मनाच्या आंतल्या भागांत त्या सूचनेने घर केलेंच असलें पाहिजे आणि आपलें जाळें पसरण्याला सुरुवात केलीच असली पाहिजे. अशा प्रकारच्या सूचना माणसाच्या कानावर पडतात त्या वेळीं बाह्यतः माणसाला त्यांची जाणीव झालीसें वाटत नाही. त्या त्याच्या कानांवर गेल्याच नाहींत अशीच त्याची जाणीव असते. परंतु मनुष्याला न कळत त्या आपलें काम त्याच्या अंतःर्मनांत घुसून करीतच असतात. म्हणून आयागोला आपल्या कपटक्रीडेचा प्रयोग यशस्वीपणाने करण्याजोगी मनोभूमि ऑथेल्लोची तयार होत होती हेंच एकमेव कारण, ऑथेल्लोसारख्या सरळ मनाच्या माणसाने आयागोच्या कुटिल सूचनांवर एवढ्या सहजासहजी विश्वास ठेवावा, डेस्डेमोनाचा संशय घ्यावा आणि तिला स्वतःचें समर्थन करण्याची संधीही देऊं नये या गोष्टींच्या मुळाशीं आहे, असें म्हणावें लागतें.

परिस्थितीही ऑथेल्लोला विरोधीच बनत गेली. डेस्डेमोनाच्या अंतरंगाची, नितांत निर्मळपणाची, लाघवीपणाच्या अभावाची यथार्थ ओळख होण्यापूर्वीच ऑथेल्लोला तिचा सहवास सोडून, लग्नाच्या दुसऱ्याच दिवशीं – नव्हे त्याच रात्री – परदेशीं युद्धाच्या कामावर जाण्याची पाळी आली. त्यामुळेच दोघांच्या परिस्थितीमधील अंतर त्याला केवढें तरी जाणवलें असेल. त्याच्या अंतर्मनांत ही गोष्ट खास जाचली असेल की, बिचाऱ्या डेस्डेमोनावर हा एक प्रकारचा अन्यायच होतो आहे.

ऑथेल्लो तडक जहाजावर गेला आणि आयागोच्या हातीं त्याने डेस्डेमोनाला सायप्रसवर नेण्याचें काम सोपविलें. योगायोग असा की, स्वतः ऑथेल्लोची जरी कल्पना होती की, आपण सायप्रसवर आधी पोचूं, तरी खरोखर डेस्डेमोनाच आधी पोचली; त्याचा दुय्यम अधिकारी स्वतःच्या जहाजांतून आधी पोचतो आणि आथेल्लोचें जहाज कोठे तरी वेपत्ता झालेलें असतें. कॅशिओनंतर डेस्डेमोना आयागोबरोबर सायप्रसवर पोचते त्या वेळीं आणि त्याच्या आधी कॅशिओचें डेस्डेमोनाबद्दल जे उद्गार आहेत त्यावरून डेस्डेमोनाचें सौंदर्य आणि श्रेष्ठत्व जसें आपणाला कळून येतें, तसेंच व्हेनिसमधल्या तरुणांचीं मनें तिच्यामुळे कशीं वेभान होत होतीं हेंही चांगलें प्रत्ययाला येतें. त्याचप्रमाणे आयागोच्या बायकोचें आयागोच्या देखत चुंबन घेण्याचा कॅशिओ जो धृष्टपणा करतो त्यांतून या उच्चवर्णीय लोकांच्या ढिल्या वर्तनाचाही सुगावा आपणाला लागतो. एवढेंच नव्हे तर डेस्डेमोनाशीं हस्तांदोलन करीत असतांना कॅशिओ जो थोडासा वाजवीहून अधिक वेळपर्यंत तिच्या हाताशीं चाळा करीत राहतो त्यावरून तर आयागोला आपल्या पुढच्या नाटकांत हा एक चांगलें साधन होईल याची प्रचीति पटते. ऑथेल्लोने जर हा सर्व प्रकार पाहिला असता तर? हा प्रश्न मनांत येऊन या प्रसंगांत आपलें मन शहारतें. कारण रोमन लोकांच्या या चालीरीती त्याच्या आंगवळणीं पडलेल्या नव्हत्या.

पराचा कावळा करण्याची आयागोला संधि—

ऑथेल्लो सायप्रसमध्ये येतो तो मोठ्या हर्षानंदांत. कारण तुर्कांचें आरमार वादळांत नष्ट होऊन युद्धाचें भय अजीबात नाहीसें झालेलें असतें. परंतु त्याच्या आनंदाचें खरें कारण आपल्या प्रियतमेचा आणि आपला विरह संपला या जाणिवेंत असतें. त्यामुळे तो बेहोष झालेला असतो. इतका की, आपण आपल्या खाजगी सुखाबद्दल अधिक बडबडत आहोंत असें म्हणून त्याला थोडीशी शरम व्यक्त करावी लागते.

अत्यंत सरळ मनानें, आपल्या नगरींतील एक उच्चवर्णीय तरुण आणि आपल्या नवऱ्याचा एक विश्वासू दुय्यम अधिकारी या दृष्टीने, डेस्डेमोना कॅशिओशी थोडी अधिक मोकळेपणाने वागली; व्हेनिसच्या उच्च समाजांतील चालीरीतीला हें धरूनच होतें. परंतु यावरच आयागोला आपली पुढची इमारत रचण्याला संधि मिळाली; यांतूनच पराचा कावळा कसा करतां येईल हें त्याच्या चाणाक्षपणाने हेरलें. आपणा प्रेक्षकांना

जी पुसट शंका होती तिचा स्पष्ट उल्लेखच त्याने केला की, मनांतून कॅशिओचें डेस्डेमोनावर प्रेम असलें पाहिजे. आणि या गोष्टीचा उपयोग करुन आपल्याला ऑथेल्लोच्या मनांत संशयपिशाच्च उत्पन्न करतां येईल अशी खूणगाठ त्याने बांधली. हें कार्य सोपें नाही याची आयागोला परिपूर्ण जाणीव आहे. कारण तोच म्हणतो "मला जरी या मूरबद्दल अत्यंत राग असला तरी हें कबूल केलें पाहिजे की, तो अत्यंत एकनिष्ठ, प्रेमळ आणि उदारहृदयी पुरुष आहे; आणि डेस्डेमोनाला त्यामुळे पति म्हणून तो अत्यंत प्रिय होण्याचा संभव आहे."

त्यामुळे ऑथेल्लोला बनविणें सोपें नाही हें आयागो ओळखून आहे. परंतु कॅशिओचा उपयोग करून त्याला बनवितां येईल ही जी त्याने उमेद बांधली तिला आणखी एक आधार म्हणजे, मनांतून डेस्डेमोनाचें कॅशिओवर प्रेम असलें पाहिजे हा त्याने बांधलेला तर्क. हा तर्क खरा नाही हें आपणाला जसें माहीत आहे तसें तें आयागोला माहीत नव्हतें असें नव्हे. परंतु असा भास उत्पन्न करून ऑथेल्लोला गाढव बनवितां येण्याची शक्यता, झाल्या प्रकारावरून त्याच्या कारस्थानी बुद्धीने अंदाजली होती.

फळ मिळविलें, परंतु त्याचा अजून आस्वाद घ्यायला फुरसत मिळाली नाही, ही एक प्रकारची मनांतील आतुरता आणि बोचणीही, ऑथेल्लो दुसऱ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत एकांतांत डेस्डेमोनाची गाठ पडतांच व्यक्त करतो हें लक्षांत घेण्यासारखें आहे. पण दैवदुर्विलास असा की, याही रात्रीं त्या दोघांचें मीलन निवांतपणें व्हायचें नव्हतें. कारण कॅशिओ ऑथेल्लोच्या मनांतून उतरावा यासाठी कॅशिओला दारू पाजून बेहोष करुन सायप्रसमधील ऑथेल्लोचा स्थायी अधिकारी मॉंटेनो याचा आणि कॅशिओचा झगडा घडवून आणावा हे आयागोचें कारस्थान आयागोच्या अपेक्षेपेक्षांही यशस्वी झालें. पहाऱ्यावर असणाऱ्या त्या दोघांनी एकमेकांशींच झगडा करून एकमेकांना जखमी केलें आणि गलबला कसला हें पाहून निवाडा करण्यासाठी स्वतः ऑथेल्लोलाच बाहेर यावें लागलें.

भडकला तर प्रखर दावाग्नि—

या ठिकाणीं ऑथेल्लोच्या स्वभावांतील आणखी एक विशेष व्यक्त होतो. लढवय्या असला तरी व्यसनांची त्याला मनस्वी चीड आहे. स्वतःच्याच पहाऱ्यावरच्या लोकांनी दारू पिऊन धिंगाणा घालावा याचा त्यामुळे त्याला अतिशय संताप येतो. तोच म्हणतो की, "सामान्यतः जो विवेक मला मार्गदर्शक असतो तो सुटून माझें रक्त गरम होऊन माझ्यावर ताबा गाजवूं पाहत आहे. म्हणून माझा अंत पाहूं नका. खरें काय तें सांगा. कारण मी जर एकदा चेतवला गेलों तर मग तुमची कोणाची धडगत नाही हें लक्षांत घ्या."

सामान्यतः अत्यंत शांत, थंड प्रकृतीचा हा गृहस्थ चिडला, भडकला म्हणजे प्रखर

दावाग्नि आहे याची आपणाला दिसलेली ही पहिलीच चुणूक आहे. आयागो नाना तऱ्हेचीं वेडीवाकडीं वळणें घेऊन अखेर त्याला त्या धिंगाण्याची हकीकत सांगतो आणि एकीकडे कॅशिओविषयी ऑथेल्लोचें मन कलुषित करीत करीत वर मात्र "कांही म्हटलें तरी माणसांचें हें असें चालायचेंच" असें सारवणही घातल्यासारखें करतो.

याच वेळीं डेस्डेमोनाही तंबूच्या बाहेर येते. तिला पाहतांक्षणीं, या सगळ्या भानगडीमुळे आपल्या पत्नीची झोपमोड व्हावी, तिच्या विश्रांतींत बिघाड व्हावा ही गोष्ट ऑथेल्लोच्या मनाला एकदम लागते – तीव्रपणे बोचते. आणि त्यामुळेच भडकून कॅशिओला तो म्हणतो, "याबद्दल सगळ्यांना जरब बसेल अशी शिक्षा मी तुला करीन."

अंतर्मनाची बोचच भडकण्याला कारण —

डेस्डेमोनाला या लढाऊ जीवनामुळे सामान्य विवाहसुखालासुद्धा पारखें व्हावें लागत आहे, ही अंतर्मनांतील टोचणी शांत मनाच्या ऑथेल्लोला एकदम भडकविण्याला कशी कारण होते हें या ठिकाणीं लक्षपूर्वक ध्यानांत घेण्यासारखें आहे. सावरासावर करून तो जेव्हा डेस्डेमोनाचें समाधान करतांना म्हणतो, "चला; शिपायाचें जीवन हें असें आहे डेस्डेमोना; बाहेर झगडे व्हावेत आणि शिपायाची आनंदी आणि सुखाची झोप मोडावी हेंच आमचें जीवन –" त्या वेळींसुद्धा त्याच्या अंतर्मनाची बोचच त्याच्या तोंडून हा कांहीसा खिन्नतेचा उद्गार काढीत आहे, नव्हे काय?

दारुड्या दंगलींत सांपडून ऑथेल्लोच्या गैरमर्जीला पात्र झाल्याबद्दल कॅशिओला मरणाहून जास्त दुःख झालें. "संभावितस्य च अकीर्तिः मरणाद् अतिरिच्यते" या वृत्तीचा कॅशिओ होता. ऑथेल्लोसारख्या सद्भावपूर्ण सेनापतीपुढे आपली बेइज्जत व्हावी याने तो इतका खजील झाला की, पुन्हा ऑथेल्लोला तोंड दाखविण्यालासुद्धा त्याला लाज वाटूं लागली. यांतूनच आयागोने आपल्या पुढच्या बेताला मोठें साधन निर्माण केलें. आपल्या परिचयांतील माणसासाठी जेवढें करतां येईल तेवढें करण्या-साठी उत्सुक, मोकळा, दयाळू, सरळ आणि उदार असा डेस्डेमोनाचा स्वभाव आहे; तेव्हा तिची मीड घालून ऑथेल्लोची मर्जी संपादन करावी, असें त्याने कॅशिओला सुचविलें. आणि ही सूचना, आयागोनेच म्हटल्याप्रमाणे, वरून दिसायला तरी अगदी तर्कशुद्ध आणि सरळ असल्यामुळे, कॅशिओलाही ती पटली. आयागोवर ऑथेल्लो-प्रमाणेच त्याचा पूर्ण विश्वास आहे. तेव्हा यामध्ये आयागोचा कांही कावा आहे अशी शंका त्याला यावी तरी कशी? अशा रीतीने डेस्डेमोनाच्या चांगुलपणांतून तिच्या गळ्याभोवती फास टाकण्याच्या आयोगाच्या डावाची सुरुवात झाली. म्हणूनच शॉचें म्हणणें पुन्हा डोळ्यांसमोर येतें : अमर्याद चांगुलपणा हा केव्हा केव्हा धोकादायक ठरतो.

क्षुल्लक चुकीचा घोर उपयोग —

आयागोच्या या डावाला कॅशिओच्या एका क्षुल्लक चुकीने फार मोठी धार आली.

डेस्डेमोनाकडून त्याने वचन मिळविलें की, हरप्रयत्न करून आपण ऑथेल्लोच्या मनांतील कॅशिओविषयीचें किल्मिष काढून टाकून त्याला त्याच्या जागेवर पुन्हा नेमून घेऊं. इतक्यांत ऑथेल्लो त्या ठिकाणीं येतो. आयागोही त्याच्यापासून थोड्या दूर अंतरावर असतो. सरळ माणसांना लोकांनी आपल्याशीं सरळपणाने, विश्वासाने, निर्भयपणाने वागावें अशी सहजच अपेक्षा असते. परंतु कॅशिओला शरमेने ऑथेल्लोला तोंड दाखवूं नये असें वाटलें आणि त्याच्यासमोर मोकळेपणाने न येतां, जणू कांही ऑथेल्लो आला असतांना आपण डेस्डेमोनाशीं बोलत आहोंत हें ऑथेल्लोला दिसूं नये यासाठी तो निसटून गेला असें पाहणारांना वाटावें, अशा चोरट्या रीतीने तो तेथून निघून गेला. "आपली पत्नी विशेष सुंदर आहे, चांगलें खाणेंपिणें तिला आवडतें, चार माणसांत मिळून मिसळून, हसुन खेळून राहायला तिला आवडतें, बोलाचालायला ती अगदी मोकळी आहे, ती गाते, नाटकांत काम करते, नाचते; या गोष्टींमुळे तिच्याविषयी आपलें मन संशयखोर कधी होणार नाही; उलट जें माणूस सदाचारी आहे त्याच्या ठिकाणीं या साऱ्या गोष्टी विशेषच सदाचाराच्या ठरतात" अशा तऱ्हेची वास्तविक ऑथेल्लोची मोकळी भावना आहे. म्हणून तो जेव्हा आयागोला विचारतो, "आता आमच्या बाईसाहेबांपासून निघून गेला तो कॅशिओच होता ना?" तेव्हा या प्रश्नामध्ये मोठा खोल आणि गंभीर अर्थ आहे. आयागोने चावत चावत बोलून कॅशिओबद्दल ऑथेल्लोचें मन विषदिग्ध करण्याचा प्रयत्न या प्रसंगीं मोठ्या कौशल्याने केलेला आहेच. परंतु काल पहांटेच ज्याला आपण झिंगलेला, शिवीगाळ आणि मारामारी करणारा, अशा अवस्थेंत पाहिला, ज्याच्यावर आपली एकदम गैरमर्जी झाली, त्याच माणसाने दुसऱ्याच दिवशीं, आपल्याकडे क्षमेची याचना करायला न येतां, आपल्या पत्नीकडे यावें आणि आपली चाहूल लागतांच चोरासारखें पळून जावें, यामुळे त्याच्याबद्दल ऑथेल्लोच्या मनांत अधिकच क्रोध उत्पन्न व्हावा हें अगदी स्वाभाविक आहे. डेस्डेमोनाविषयीं अर्थात त्याच्या मनांत अद्यापि कसलाही संशय नाही. परंतु आपल्या खास निवडीचा एक दुय्यम अधिकारी परक्या भूमींत इतका बेजबाबदार व्यसनी निघावा आणि त्यांतच तो इतका भेकड असावा याबद्दल त्याचें शिस्तप्रेमी मन स्वतःवरच चिडणें अपरिहार्य होतें. आयागोसारख्या लायक आणि प्रामाणिक (ऑथेल्लोचा तसा विश्वास जागोजाग व्यक्त झाला आहे) माणसाला बाजूला सारून या व्यक्तीची आपण निवड केली; अशी ही निवड इतकी अयोग्य ठरावी याबद्दल त्याच्या मनाला फारच असमाधान वाटलें असणें स्वाभाविक आहे.

स्वाभाविक असमाधानाचा परिणाम —

आणि अशा या माणसाविषयी रदबदली करायला पुढे आली कोण, तर स्वतः डेस्डेमोना. त्यामुळे या वेळचें ऑथेल्लोचें तिच्याशीं बोलणें आणि चालणें किती तुटक आणि मानावर नसलेल्या माणसासारखें होतें. मोठ्या लाडिकपणाने ती जेव्हा त्याला सांगते

की, "कॅशिओ हा तुझा स्नेही आहे; तुझ्याबद्दल मीं जेव्हा केव्हा नापसंती दर्शविली तेव्हा तुझ्या बाजूने तो माझ्यासीं भांडायला उठत असे. आणि म्हणून फार विलंब न लावतां – तीन दिवसांच्या आंत – तुम्हां दोघांची दिलजमाई व्हायला पाहिजे," तेव्हा ऑथेल्लो तिरसटपणाने म्हणतो.

"हें पाहा, पुरें हें. त्याला जेव्हा यायचें असेल तेव्हा येऊं दे. तुला मी कशाला नाही म्हणूं शकणार नाही."

डेस्डेमोनाला त्याचा हा तुसडपणा तत्क्षणीं जाणवला. म्हणून जवळजवळ उसळूनच ती म्हणाली, "हा कांही एखादा वर म्हणून मी तुझ्याजवळ मागत नाही. तुझ्या हिताचीच एक गोष्ट तूं करावीस एवढेंच फक्त मी तुला सांगतें आहें. माझ्यासाठी वरच मागायची मला इच्छा होईल त्या वेळीं क्षुल्लक वर मी मागणार नाही; असा वर मी मागेन की, त्यामध्ये तुझ्या प्रेमाची कसोटीच लागेल; त्याचा भार तुला एवढा जड वाटेल की, तो देतांना तुझ्या हृदयाचा थरकांपच होईल."

तिचा हा आवेग ऑथेल्लोलाही जाणवतो. म्हणून तो म्हणतो, "छे! छे! तुला कोणतीच गोष्ट नाही म्हणणार नाही मी. पण या क्षणीं माझें ऐक; मला थोडा वेळ एकट्यालाच राहूं दे."

डेस्डेमोना प्रसंगाला उणी पडते —

केवढी मोठी वेदना या साध्या उद्गारांच्या पाठीमागे असली पाहिजे, किती भेदक चक्र ऑथेल्लोच्या मस्तकांत भ्रमण करूं लागलें असलें पाहिजे; की ज्यासंबंधी विचार करण्यासाठी एकलेपणा आणि निवांत वेळ त्याला हवासा वाटावा! त्याची ही अवस्था डेस्डेमोनाच्या लक्षांतून कांही निसटली नाही. आणि म्हणून "जा तूं पुढे; थोड्या वेळांत मी आलोंच" असें जेव्हां तो तिला म्हणतो त्या वेळींही तिने कठोर कटाक्षयुक्तच उत्तर दिलें. ती म्हणाली, "ठीक आहे, तुमच्या मनाला येईल तसं चालूं द्या. तुम्ही कसेही वागा; तुमची आज्ञा पाळणें हें माझें कर्तव्य आहे."

अरेरे, नेमकी ज्या वेळेला या उदारहृदयी पुरुषाला स्निग्ध, निष्कपट आणि सुजाण सल्ल्याची गरज होती, त्याच्या मनांतील क्षोभ शांत करण्याची जी नेमकी वेळ होती, त्याच वेळीं पत्नीधर्माच्या अजाणत्या कल्पनेमुळे डेस्डेमोना त्याच्यापासून दूर झाली आणि तो बिचारा, सावज पकडण्यासाठी टपून बसलेल्या आयागोच्या हातांत, अलद्द सापडला. वास्तविक हट्ट करून या वेळीं डेस्डेमोना त्याला अंतर्गृहांत घेऊन गेली असती आणि मम्मटाने म्हटलेला कांतासंमित उपदेश करून तिने त्याच्या मनांतील वादळ शांत केलें असतें तर किती चांगलें झालें असतें! परंतु तसें झालें असतें तर या सगळ्या विचारप्रपंचाची गरजच काय होती?

नाट्यलेखन आणि स्वभावचित्रण यांचा एक अप्रतिम नमुना या प्रवेशांत आतापर्यंत जसा आहे तसाच, किंबहुना त्याहूनही अधिक असा नमुना प्रवेशाच्या यापुढच्या

भागांत आहे. नाना तऱ्हेच्या चोरट्या सूचना करीत आयागोकरवीं ऑथेल्लोचें चित्त शेक्सपीअरने नितांत कौशल्याने भडकविलें आहे. आपल्याला ऑथेल्लोला कांही तरी विशेष सांगायचें आहे आणि तें सांगायला आपण कचरतों आहोंत असा भास उत्पन्न करीत आयागो ऑथेल्लोची आतुरता सारखी वाढवीत नेतो आणि तरीही "मी सेवक असलों तरी स्वतःच्या मनांतले विचार बोलून दाखविण्याचें स्वातंत्र्य मला आहेच" असें म्हणून तो ऑथेल्लोला अधिकच व्याकुळ करतो. "कृपा करून मला कांही विचारूं नका — माणसाचें मन मोठें वाईट आहे; — मला लोकांच्या अपकृत्यांत चोरटें लक्ष घालण्याची मोठी वाईट खोड आहे; जेथे मुळांत कांही नसेल तेथे मला दोष दिसतातसें वाटतें. तेव्हां ज्यांचा आपल्या हिताशीं किंवा मनःशांतीशीं संबंध नाही अशा गोष्टी मी कशाला बोलूं." असें म्हणून तर ऑथेल्लोच्या कपाळावरची अढी आयागो अधिकच दृढ करतो. कारण ऑथेल्लोने पक्कें जाणलेलें असतें की, डेस्डेमोनाजवळून चोरट्या पावलांनी पळून गेलेल्या कॅशिओबद्दलच आयागोला कांही तरी बोलायचें आहे. इकडे कॅशिओच्या कारणानेच त्याच्या अंतर्मनांतील निखारा प्रज्वलित होऊं लागलेला आहे. म्हणून ऑथेल्लो अखेर चिडून म्हणतो की, "काय वाटेल तें होवो, मी तुझ्या मनांतले विचार समजून घेतल्याशिवाय राहणार नाही."

यावर आयागोने दिलेलें उत्तर दुर्दैवाने किती खरें आहे. "माझें हृदय प्रत्यक्ष तुमच्या हातांत जरी असलें तरी तुम्हांला त्यांत काय चाललें आहे हें समजणें अशक्य आहे. मग माझ्या स्वाधीन तें असतांना ती गोष्टच सोडा."

आयागोचें मन ऑथेल्लो ओळखूं शकत नव्हता, किंबहुना आयागो पेरणार असलेलें विषबीज तात्काळ उगवून तरारून वर येण्याजोगी ऑथेल्लोची मनोभूमी त्याच्या अंतर्मनाने आधीच तयार करून ठेवलेली होती, यांत तर ऑथेल्लोचें सगळें दुर्दैव आहे. ऑथेल्लोच्या मनांत संशयपिशाच्च जागें करण्याच्या हेतूनेच आयागो त्याला संशयखोरपणा किती वाईट आहे हें मोठ्या तन्मयतेने आणि कलात्मक रीतीने सांगतो. "संशयापासून सावध राहा" हा त्याने दिलेला इशारा आणि ऑथेल्लोला आपल्या हृदयाबद्दलचें त्याने दिलेलें वरचें उत्तर या दोन्ही ठिकाणीं शेक्सपीअरने केवढीं मोठीं सुंदर अशीं दोन पताकास्थानें साधलीं आहेत.

आयागो नाजूक मर्माला अचूक हात घालतो —

प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय मी संशय घेणार नाही असें जेव्हा ऑथेल्लो आयागोला सांगतो त्याच वेळी थोड्या वेळापूर्वी उल्लेखिलेलें डेस्डेमोनाचें वर्णन ऑथेल्लो करतो, आणि तिचें सुललित जीवन हें तिच्या सद्वर्तनामुळे अधिकच सद्वर्तनी ठरतें असें म्हणतो. पण त्याच क्षणीं स्वतःमधील उणेपणाची त्याला जाणीव होते. तो म्हणतो, "माझ्या ठिकाणीं पुष्कळ उणीवा आहेत; पण त्यांची मला रेसभरही भीति वाटत नाही. कारण हें सर्व डोळे उघडे ठेवून पाहून डेस्डेमोनाने माझी निवड केली आहे."

दोघांमधील या फरकाची त्याला किती खोल जाणीव आहे हें या ठिकाणीं पुन्हा एकदा स्पष्ट होतें.

"प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय मी संशय घेणार नाही; संशय आला की, प्रत्यक्ष पुराव्याने फैसल्ला करावयाचा आणि संशय व प्रेम यांपैकी एकच कांहीतरी फेकून द्यायचें" असा आपला निर्धार जेव्हा ऑथेल्लोने व्यक्त केला तेव्हा थोडासा धीटपणा पत्करल्यासारखें करून आयागो त्याला आपल्या बायकोच्या जीवनाकडे जरा विचारपूर्वक नजर टाकायला सांगतो. कॅशिओशीं ती कशी वागते तें पाहा, असें सुचवितो. कारण– कारण, "माझ्या समाजांतल्या बायकांना मी चांगलें ओळखतों. आमच्या व्हेनिसमधील या बायका काय हवे ते चाळे देवाला साक्षी ठेवून करतील. पण, एवढी काळजी घेतील की, आपल्या नवऱ्याला त्याचा कांही थांगपत्ता लागणार नाही. करायचें पण कळूं द्यायचें नाही हा यांचा खाक्या आहे. म्हणून म्हणतो नीट नजर ठेवा डेस्डेमोनावर–कारण तुमच्यासारख्या उदार हृदयाच्या माणसाची, केवळ आपल्यासारखींच दुसरीं माणसें सरळ असतील या भावनेने फसगत होऊं नये अशी माझी इच्छा आहे." या त्याच्या भाषणांत, व्हेनिसमधील विषयलोलुप आणि लाघवी अशा उच्चवर्णीय स्त्रीवर्गातील डेस्डेमोना आणि भोळ्या व सरळवृत्तीच्या लढाऊ जीवनाशीं समरस असलेले आपण स्वतः, यांच्यामधील फरकासंबंधी जी एक अबोध बोच, आशंका स्वाभाविकपणेंच ऑथेल्लोच्या मनांत आहे, तीच नेमकी चेतविण्याचा आयागोने केवढा कुशल प्रयत्न केला आहे पाहा. आणि याच संभ्रमांत ऑथेल्लो आहे हें हेरतांच, आयागोने त्याच्या नाजूक मर्माला कसा अचूक हात घातला आहे पाहा. कारण मोजक्या शब्दांत शांतपणे आयागो लगेच पुढे काय म्हणतो पाहा–"आतां, तिने तुमच्याशीं लग्न केलें तेव्हांचें पाहाना. आपल्या बापाला तिने फसविलेंच ना? आणि ज्या वेळीं, तुमचा चेहरा पाहून तिला भय वाटत असावें, तो पाह्यचें टाळावें असें तिला वाटत असावें, असें तिच्या हावभावांवरून तुम्हांला भासत होतें, त्या वेळीं खरोखरच मनापासून ती तुमच्यावर प्रेमच करीत नव्हती काय?" ही गोष्ट खरी असल्याचें ऑथेल्लोला कबूल करावेंच लागतें. त्यासरशी आयागो किती विश्वासाने म्हणतो, "झालें तर मग. अहो, इतक्या लहान वयांत या बाईने किती लपंडाव केला पाहा, आपल्या बापाच्या डोळ्यांत केवढी धूळ चारली पाहा."

आणि मग ब्रॅबॅन्टिनो जें म्हणाला की, "अरे मूर, संभाळ बरं. हिने प्रत्यक्ष आपल्या बापाला फसविलें आहे; ती तुलाही फसवील," त्याची केवढ्या तीव्रतेने ऑथेल्लोला आठवण झाली असेल. "प्रत्यक्ष बाप असें म्हणतो; समाजाचा दर्दी असा प्रामाणिक आयागो पण तसेंच म्हणतो!" हा विचार आतां कॅशिओच्या त्या संशयास्पद रीतीने निघून जाण्याने ऑथेल्लोच्या जागृत मनाला केवढा धक्का देणारा वाटला असेल.

हा धक्का थोडा सुसह्य व्हावा, कॅशिओबद्दलच्या हेव्याने आपण कांही करीत नाही असा थोडा भास उत्पन्न व्हावा, म्हणून आयागो थोडी सारवासारव करूं पाहतो. परंतु

ऑथेल्लोच्या मनांत आतां खूप रण माजलें असल्याचें आयागोच्या नजरेंतून कांही निसटत नाही. आणि "तसें कांही नाही, डेस्डेमोना निष्ठावंत आहे असेंच मला वाटतें. पण माणसाची प्रकृति माणसाला केव्हां कसा दगा देईल —" असें ऑथेल्लो म्हणूं पाहतो, तोच ही संधि साधून त्याचें मन डेस्डेमोनाविषयी अधिकच कलुषित करण्याचा आयागो प्रयत्न करतो. या प्रयत्नांतही आयागोने त्या दोघांमधील प्रचंड फरकाचाच आधार घेतला आहे. कारण तो, दर्शवितो की, परस्परांमध्ये प्रेम निर्माण होण्याला उभयतांचा प्रदेश, वातावरण, वर्ण, दर्जा यांच्यामधील समानता उपयोगी पडते. तशीच माणसाची प्रकृति पण. "पण डेस्डेमोनाची निवड पाहा या प्रवृत्तीशीं किती विसंगत आहे! याचा अर्थ तिच्या मूळ प्रवृत्तींतच काही तरी बिघाड झाला आहे; पण हा तात्पुरता बिघाड नाहीसा होऊन ती जेव्हा आपल्या मूळ प्रकृतीवर येईल तेव्हा तिला या निवडीचा पश्चात्ताप होईल!" असें आयागोचें भेदक भाष्य आहे.

ऑथेल्लोच्या अंतर्मनांत घुमसणारा संशयाचा अग्नि अशा रीतीने चांगलाच प्रज्वलित झाला. आयागो जें कांही सांगत गेला तें सर्व चावत चावत आणि अर्धवट. तेव्हा त्याला आणखी पुष्कळ माहिती असली पाहिजे अशा तर्काला वाव मिळाला. आणि मग नाना तऱ्हेच्या विपरीत कल्पनांचें थैमान त्याच्या मनांत सुरू झालें. संशय जर खरा ठरला तर डेस्डेमोनाचा निकाल लावायचा विचारही त्याच्या मनाला चाटून गेला. "फुकट फुकट आहे हा विवाहसंस्कार. त्यायोगे फक्त या नाजूक नारींचें स्वामित्व आम्हांला मिळतें; पण त्यांची कामवासना कांही त्यामुळे आमच्या स्वाधीन होत नाही; यामुळे विवाहसंस्काराचाच तिटकारा येतो. पण मोठ्या स्थानावर असणाऱ्या व्यक्तींचें आणखीच दुर्दैव असतें. सामान्य माणसांच्याप्रमाणे त्यांना हीं बंधनें घे म्हटल्या तोडूनही टाकतां येत नाहीत." अशा प्रकारच्या संशयावर्तात सापडून हतबुद्ध होणारा ऑथेल्लो आपणाला हॅम्लेटची आठवण करून देतो.

आणि ऑथेल्लोचें दुर्दैव —

या मनःस्थितींत असतांना तो डेस्डेमोनाला येतांना पाहतो. तिला पाहतांक्षणीं त्याचे सर्व संशय नाहीसे झाल्यासारखे होतात. "ही आणि बेइमान! मग स्वर्गानेच – परमेश्वरानेच – आपला स्वभाव सोडला असें म्हटलें पाहिजे. नाही – नाही – याच्यावर माझा विश्वास नाही" असें तो मनांत आणतो. लोकांना जेवायला बोलावून स्वतःच त्यांना तिष्ठत ठेवल्याबद्दल डेस्डेमोना त्याला खेळकरपणे दोष देते. पण तो उत्साहाने बोलत नाही. कारण म्हणून सांगतो की, डोकें दुखत आहे. त्याच्या डोक्याला बांधण्यासाठी डेस्डेमोना तो रुमाल बाहेर काढते की ज्याच्या बळावर आयागोला आपलें कारस्थान आणखी विणायला फार मोठें साधन मिळालें. रुमाल फार लहान असल्यामुळे डोकें बांधण्याला तो पुरत नाही; तिच्या हातून तो खाली पडतो. "जाऊं दे,

आपण आंतच जाऊं'' असें ऑथेल्लो म्हणतो आणि तीं दोघें आंत जातात. हातरुमाल पडून तेथेच राहिला हें दोघांच्याही लक्षांत येत साही.

दुर्दैवाची गोष्ट ही की, डेस्डेमोना बेइमान नाही हें जरी ऑथेल्लोच्या अंतरीं त्याला उमगतें तरी त्याच्या अंतर्मनावरचें तें आशंकेचें जड ओझें कांही नाहीसें होत नाही. आणि आपलें मन उघडें करून तो डेस्डेमोनाजवळ सांगत नाही. त्याच्या वृत्तीमधील बदल आणि त्यांत डोकें दुखण्याचा प्रकार याने डेस्डेमोनाही भांबावून जाते आणि त्याचेंच कपाळ बांधण्यासाठी आपण तो रुमाल बाहेर काढला होता हें सुद्धा तिच्या ध्यानांत राहत नाही.

त्यानंतर थोड्या वेळानेच पुन्हा ऑथेल्लोची आयागोशीं गाठ पडते त्याआधी तो हातरुमाल आयागोच्या हातीं आलेला असतो. आयागोने आपल्या डोक्यांत हें संशयाचें भूत वृथा घालून आपली झोप मात्र नाहीशी केली अशी ऑथेल्लो तक्रार करतो. '' नुकसान प्रत्यक्ष होण्यांत कांही त्रास नाही. तें झालें आहे हें जाणण्यांत त्रास आहे. हें ज्ञान मला देऊन तूं माझें सर्व जीवन दुःखी केलेंस '' अशी तो आयागोपाशीं तक्रार करतो.

याच्यापूर्वीचीं ऑथेल्लोचीं भाषणें जरी मुद्देसूद आणि परिणामकारक असलीं तरी त्यांमध्ये काव्याची झलक क्वचितच होती. परंतु आता मनक्षोभाच्या तुफानांत सापडल्यापासून त्याच्यामध्ये या बाबतींत मोठी क्रांति झाली. त्याचीं भाषणें आता अलंकारमय, बहारदार आणि काव्यपूर्ण होऊं लागलीं; आणि काव्याची वर्डस्वर्थची एक व्याख्या पाहतां हें किती स्वाभाविक आहे.

'' एकदा वाटतें की डेस्डेमोना बेइमान आहे; एकदा वाटतें नाही. या द्विधा मनःस्थितींतून सोडविण्यासाठी तिच्या बेइमानीचा पुरावा ऑथेल्लो आयागोजवळ चिडून मागतो. पण आयागो वस्ताद आहे. कॅशिओ व डेस्डेमोना हीं दोघें एकमेकांच्या मिठींत पाहिल्यावर मगच तुम्ही ही गोष्ट खरी मानणार काय ? असा तो जरा वाकडा प्रश्न करतो. पण ही गोष्ट शक्य नव्हे; तेव्हा आनुमानिक असा आजूबाजूचा पुरावा देण्याची तयारी आयागो दर्शवितो; आणि कॅशिओ व आपण दोघे एका ठिकाणीं निजलों असतां कॅशिओ झोपेंत डेस्डेमोनाबद्दल काय बोलल्याचें आपण ऐकलें हें तो त्याला सांगतो; '' मलाच डेस्डेमोना समजून झोपेंत त्याने माझें चुंबन घेतलें '' असेंही सांगतो. तेवढ्यानेच ऑथेल्लो बेभान होतो. परंतु त्याला शांत राह्यला सांगून आयागो आपला तो हातरुमालाचा बाण बाहेर काढतो. तो म्हणतो, '' तुम्हीं डेस्डेमोनाला दिलेल्या हातरुमालासारख्या रुमालाने कॅशिओ आपली दाढी पुशीत असतांना मीं पाहिलें. तो हातरुमाल आणि तुम्हीं दिलेला हातरूमाल जर एक असेल तर — तर मग हा काय थोडा पुरावा झाला ? ''

झालें. आतां सूड आणि फक्त सूड असें हॅम्लेटप्रमाणे ओरडतच ऑथेल्लो उठतो. आयागो त्याला शांत करण्याचा खोटाच प्रयत्न करतो. '' शांत व्हा, उद्या

तुमचें मन बदलेलही " या त्याच्या वाक्यावर, तसें होणार नाही एवढें सांगण्यासाठी ऑथेल्लो केवढाल्या तरी मोठ्या उत्प्रेक्षांचा अवलंब करतो. आणि एका अत्यंत नाटकी देखाव्यांत, ऑथेल्लोबरोबरच्च आपणही प्रार्थनेच्या पवित्र्यांत गुडघे टेकून आयागो, " ज्याच्यावर अन्याय झाला आहे अशा ऑथेल्लोला " साह्यकारी होण्याची प्रतिज्ञा करतो.

इकडे पुष्कळ शोधूनही तो हातरुमाल सापडत नाही म्हणून डेस्डेमोना बेचैन झालेली असते. परंतु एवढ्याशा कारणावरून ऑथेल्लो त्रागा करील किंवा संशय घेईल असें तिच्या स्वप्नींही नसतें. त्यामुळे यानंतर ऑथेल्लो जेव्हा तिच्याकडे येतो, तेव्हा तो संशयाने पछाडून आला आहे याची तिला कल्पना नसते. ऑफिलियाचा हात हातांत घेऊन तिच्या प्रेमाची परीक्षा पाहणाऱ्या हॅम्लेटप्रमाणेंच तिचा हात हातांत घेऊन ऑथेल्लो तिच्याशीं गोड बोलण्याचें सोंग आणतो. त्याने फसून डेस्डेमोना त्याच्या-जवळ पुन्हा कॅशिओची गोष्ट काढते. त्यासरशी त्याच्या मनांतील खळबळ जागृत होते आणि तो खोटेंच म्हणतो, " माझें नाक वाहतें आहे आणि त्रास होतो आहे; जरा तुझा रुमाल पाहूं." अर्थात डेस्डेमोना जो रुमाल देते तो त्याला हवा असलेला रुमाल नव्हता. तो तर तिच्याजवळ नव्हताच. हा रुमाल हरवला किंवा कोणाला दिला तर देणाराची अकल्पित दुरवस्था होते; तो रुमाल जादूचा होता; वगैरे हकीकत सांगून हा रुमाल फार फार संभाळून ठेव असें जेव्हा ऑथेल्लो तिला सांगतो, त्या वेळीं ती अगदी सहज म्हणून जाते की, असला हा जादूचा रुमाल माझ्या नजरेस पडला नसता तर फार बरें झालें असतें. त्याबरोबर " का? " म्हणून ऑथेल्लो असें कांही विचित्र-पणें ओरडतो की, अशा उतावीळपणाबद्दल डेस्डेमोना त्याला डिवचते. त्याने ऑथेल्लो अधिकच बेभान होतो आणि रुमाल दाखविण्याबद्दल आग्रह करतो. पण कॅशिओचा विषय टाळण्याची ही युक्ति आहे अशा समजुतीने डेस्डेमोना रुमालाबद्दलचें त्याचें मागणें ऐकलें न ऐकलेंसें करून कॅशिओचाच विषय पुन्हा पुन्हा बोलते. अखेर मनाची जणू पूर्ण खात्री होऊन " चल, हो बाजूला " म्हणून ऑथेल्लो तिला दूर करतो आणि संतापाच्या भरांत निघून जातो.

त्याचा हा आवेश पाहून एमिलियाच्या – आयागोची पत्नी – मनांत शंका येते की, हा गृहस्थ संशयाने पछाडलेला असला पाहिजे. पण डेस्डेमोनाचा त्याच्यावर इतका अकृत्रिम विश्वास आहे की, ती तसें मानायला तयार नाही. अशा वेळीं कॅशिओ पुन्हा आयागोसह तिच्याकडे येऊन ऑथेल्लोकडे स्वतःबद्दल रदबदली करण्याबद्दल तिला विनंति करतो. त्या निमित्ताने ऑथेल्लो तेथून रागावून निघून गेल्याचें कळून आयागोला आपला बाण बरोबर लागू पडल्याचें समजून येते आणि या अशा स्थितींतच ऑथेल्लोला गाठून आपलें कारस्थान अधिक पक्कें केलें पाहिजे या भावनेने आयागो तेथून काढता पाय घेतो. कॅशिओ मात्र मागे राहतो. आणि ऑथेल्लोच्या रागाचें कारण

व्हेनिसहून कांहीतरी दरबारी पत्रव्यवहार असावा, किंवा सायप्रसमध्येच कांही कट किंवा कारस्थान असें कांही शिजल्याचें आढळून आलें असावें की, ज्यामुळे आॅथेल्लोचें चित्त गढूळ झालें असावें, वगैरे गोष्टी डेस्डेमोना त्याच्याशी करते, व असें झालें म्हणजे पुरुष एकाचा राग दुसऱ्यावर काढतात, म्हणून मनांतल्या मनांत, आपण आॅथेल्लोला उगीच बोल लावला, त्याचा यांत कांही दोष नाही असें स्वतःचें समाधान करून घेते. "पण तुमच्याबद्दल त्यांच्या मनांत कांही संशय-बिंशय नाही ना?" असें एमिलिया विचारते. त्यावर आत्मश्रद्धापूर्वक डेस्डेमोना म्हणते की, "तसें माझ्या हातून कांही घडलेंच नाही!" यावर एमिलियाने मारलेला शेरा जहरी परंतु खरा आहे. "या पुरुषांना संशयाला कारण लागतच नसतें मुळी. संशय घेण्यांत त्यांना निसर्गतःच बरें वाटतें."

यावर त्या दोघी निघून जातात आणि कॅशिओची रखेली बिआंका - जिला कॅशिओने आपल्याशीं लग्न करावें अशी ओढ लागली आहे - कॅशिओची भेट घेण्यासाठी हजर होते. ती त्याच्याशीं बराच लाडिकपणा करायचा प्रयत्न करते. परंतु अखेर असेल त्यावरच संतुष्ट राह्यलाच हवं मला, असें म्हणून ती निराशेने निघून जाते.

बिआंका आणि कॅशिओ यांच्या त्या संभाषणाचा फायदा आयागो पुढच्याच (अंक ४ प्रवेश १) प्रवेशांत आॅथेल्लोच्यापुढे पुरावा उभा करण्यासाठी म्हणून घेतो. पुन्हा एकदा चावत चावत, अस्पष्ट ध्वनित करीत तो आॅथेल्लोला सांगतो, कॅशिओने स्वतःच्या तोंडाने कबूल केलें आपल्याजवळ की, डेस्डेमोनाशीं त्याने विषयसंग केला. हातरुमाल डेस्डेमोनाने कॅशिओला दिला अशी समजूत आॅथेल्लोची याआधीच झाली होती. त्यांत या सूचनेची भर पडून आॅथेल्लो बेभान होतो. कॅशिओचा हा प्रत्यक्ष कबुलीजबाब - आणि तो हातरुमाल; म्हणजे त्यांचीं शरीरें एक झालीं असणार - पण हें शक्य आहे का? हें प्राकृतिक आणि अशिक्षितपटुत्व असूं शकेल काय? अशा भ्रमांच्या भोवऱ्यांत तो सापडतो आणि बेसावध होऊन खाली पडतो. नेमका त्याच सुमारास कॅशिओ तेथे येतो. त्याआधी आॅथेल्लो गैरसावध असतांना आयागो जें स्वतःशींच बोलतो त्याला आॅथेल्लोच्या स्वभावाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. तो म्हणतो,

> "श्रद्धाळू मूर्ख माणसें अशीं जाळ्यांत सांपडतात. आणि पुष्कळ महान योग्यतेच्या पतिव्रता अगदी अशाच कारणाने दोषाला पात्र होतात."

संशयी नव्हे भोळा —

आतांपर्यंत आयागोने आॅथेल्लोच्या चांगुलपणाबद्दल मोकळ्या मनाने ग्वाही दिलेली आहे. त्याच्या मताने तरी आॅथेल्लोचा स्वभाव जात्या संशयखोर नाही; तो श्रद्धाळू आहे, भोळा आहे किंवा आॅथेल्लोच्या कठोर भाषेंत तो मूर्ख आहे. त्याच्या मूर्खपणाचा फायदा आयागोने घेतला आहे; निदान आयागोची तशी समजूत आहे. जातां जातां

त्याने – त्याच्यासारख्या कोणांतच कांही चांगलें न पाहणाऱ्या खलपुरुषाने – डेस्डेमोनाच्या विशुद्ध पातिव्रत्याची दिलेली ग्वाही पण विशेष लक्षणीय आहे.

कॅशिओशीं अगदी जुजबी बोलून आयागो त्याला तूर्त थोडा वेळ बाजूला होऊन राह्यला सांगतो. ऑथेल्लो सावध झाल्यावर आयागो त्याला सांगतो की, आताच कॅशिओ येथे येऊन गेला; तुमच्या वेरीचें कांही तरी कारण सांगून त्याला मीं घालवून दिला. पण पुन्हा तो इतक्यांतच येणार आहे. तेव्हा जरा बाजूला होऊन राहा आणि नीट कान देऊन ऐका तो माझ्याशीं काय बोलतो तें. त्याच्यावर नीट नजर ठेवा नि पाहा, तो हंसतो कसा; डोळे मिचकावतो कसा; जिभा चाटतो कसा.

कॅशिओशीं भाषण सुरू करतांना मुद्दाम मोठ्याने आयागो म्हणतो "डेस्डेमोनाला वश करून घे की, तुझें काम झालेंच." पण पुढच्याच क्षणीं तो अगदी हळू आवाजांत बिआंकाचें नांव घेऊन तिच्याबद्दल बोलणें सुरू करतो. बिआंकाचें नांव ऑथेल्लोने ऐकलेलेंच नसतें. म्हणून पुढचें सगळें बोलणें त्या दोघांचें जरी बिआंकाबद्दलच चाललें होतें, तरी ऑथेल्लो त्याचा संबंध सगळा डेस्डेमोनाकडे लावीत राहतो. बिआंकाच्या मनांत कॅशिओबद्दल भरलेलें वेड, तिने समुद्रकांठी सर्वांदेखत कॅशिओच्या गळ्यांत घातलेला हात, वगैरे गोष्टी कॅशिओ आयागोला अगदी सहजपणे व बिआंकाची हेटाळणी करण्याकरिता म्हणून सांगत जातो आणि डेस्डेमोनाने स्वतः कॅशिओला गळामिठी घालून शयनागारांत नेलें अशी त्या दोघांच्या बोलण्याचालण्यावरून ऑथेल्लोची समजूत होते. आता या मूर्ख बाईची संगत मला सोडली पाहिजे असें कॅशिओ म्हणतो आहे तोच ती मूर्ख बया तेथे – बहुधा आयागोच्या सूचनेवरून – कॅशिओला भेटायला पुन्हा येते आणि त्या हातरुमालाबद्दल ती त्याच्यावर भडकते. आपल्याला तो कॅशिओच्या शयनागारांत सापडला असल्याचें आयागोने बिआंकाला सांगितलेलें असतें; आणि त्यावरून त्याचें अन्य कोणावर मन गेलें आहे म्हणून ती भडकलेली असते; तसें बडबडतच ती निघून जाऊं लागते तेव्हा तिने सारा रस्ताभर ओरडा करून आपणाला बदनाम करूं नये म्हणून कॅशिओ तिच्यामागे धावतो.

परंतु तो रुमाल आपला आहे हे ऑथेल्लोने ओळखलेलें असतें. डेस्डेमोनाच्या बेइमानीबद्दल आता त्याची खात्री झालेली असते. तथापि डेस्डेमोनाचा चांगुलपणा, तिचा मोठेपणा, त्याला पुन्हा पुन्हा भ्रमांत पाडतो. अशा स्त्रीने असें करावें याबद्दल त्याचें मन अत्यंत विद्ध होतें. आणि म्हणूनच तळमळून तो आयागोला म्हणतो, "खरें आहे! यामुळेच तिचा गुन्हा हजारपट मोठा वाटतो; तरी पण आयागो, किती खेदकारक गोष्ट आहे ही; असें व्हावें तरी कसें? (O, Iago, the pity of it, Iago! ")

जगांत अशा स्त्रिया असतात? —

आपल्या आईने आपल्या बापासारखा श्रेष्ठ पुरुष दूर करून एका माकडाला पति

म्हणून स्वीकारावें याबद्दल हॅम्लेटच्या मनाची अशीच तळमळ झाली होती. पण त्याच्या आईचा गुन्हा तरी खरा होता. येथे मुळांत खरोखर डेस्डेमोनाला दोष देण्याला तिळमात्रही जागा नसतांना तिच्या दोषाच्या संशयाने विद्ध होऊन ऑथेल्लो तळमळत होता. डेस्डेमोनाला बिचारीला स्त्रिया असलें कांही वर्तन करतात ही गोष्ट सुद्धा कल्पनेच्या पलीकडची वाटत होती. कारण मरणापूर्वी थोडाच वेळ डेस्डेमोनाने, ऑथेल्लोने आपल्यावर केलेला आरोप मनांत आणून, एमिलियाला तळमळून विचारलेलें आपण पाहतों की, "खरेंच एमिलिया, अगदी खरें सांग, आपल्या नवऱ्याशीं अशा बेइमान होणाऱ्या कोणी बायका या जगांत असतील का?" त्यानंतरचा त्या दोघींचा संवाद हृदयाला घरें पाडणारा आणि डेस्डेमोनाचें अंतःकरण किती निर्मळ आहे हें दाखविणारा आहे. अशा स्त्रिया असतात आणि त्यानीं असें करण्यांत जगाच्या बाजारांत कांहीच वाईट नाही, असें जरी एमिलिया म्हणते तरी डेस्डेमोनाचें आपलें कायम आहे की, "छट! अशी स्त्री असूंच शकणार नाही." त्यावर, पुरुष जर बेइमानीपणाने वागतात तर स्त्रियांनी तरी तसें कां करूं नये, असा चपखल सवाल एमिलियाने टाकला असतां, डेस्डेमोना म्हणते, "ठीक, ठीक; जा आतां तूं. पण देवाजवळ माझी मात्र अशी प्रार्थना आहे की, त्याने मला वाईटापासून वाईटच घ्यायची रीत शिकवूं नये; वाईट पाहून त्यापासून स्वतः चांगल्याचा धडा घ्यायलाच त्याने मला शिकवावें."

आणि अशा या साध्वीबद्दल संशय घेऊन "अशा स्त्रीने असा दुराचार करावा याबद्दल खेद, कीव, तळमळ ऑथेल्लो व्यक्त करतो आणि तीही आयागोजवळ; तेव्हा सहजच आपल्याही तोंडून उद्गार निघतो, O! the pity of it Othello! अरेरे, काय हा तुझा वेडेपणा, भल्या माणसा!

पण याच क्षणाला व्हेनिसहून लोडोव्हिको दरबारचीं पत्रें व हुकूम घेऊन येतो. त्या वेळीं पुन्हा एकदा डेस्डेमोना कॅशिओच्या वतीने लोडोव्हिकोमार्फत रदबदली करण्याचा प्रयत्न करते. पण त्या वेळीं उत्तरें देतांना ऑथेल्लोचा जो आवेश दिसतो त्याने मात्र डेस्डेमोना दचकते. योगायोग असा घडतो की, ज्या कॅशिओविषयी त्याला नाना रीतींनी संताप आलेला असतो, त्यालाच सायप्रस येथे मुख्याधिकारी नेमून राज्याकडून ऑथेल्लोला परत व्हेनिस येथे येण्याचा हुकूम आलेला असतो. त्याच्या बऱ्यासाठीच ही गोष्ट केलेली असते. कारण या नवदंपतीला या स्वारीवर केवळ कर्तव्यपालनासाठी म्हणून जाण्याची पाळी आलेली असते. परंतु एवढा विवेक करण्याइतका ऑथेल्लो भानावर नाही. "बरें झालें बाई, चांगलें झालें" म्हणून डेस्डेमोना निश्वास टाकते, याचा अर्थ कॅशिओसाठी तिला आनंद झाला असा करून ऑथेल्लोचा तोल सुटतो आणि तो सर्वांसमक्ष तिच्यावर हात टाकतो.

स्वतःच्या पत्नीवर ऑथेल्लोने हात टाकलेला पाहून लोडोव्हिको स्तिमित होतो; संतप्त होतो. ज्याला सर्वगुणसंपन्न म्हणून आमचें राज्य मानतें, तो तो हाच मूर

काय? असें त्याला होतें. त्याच्या मनांतही आयागो ऑथेल्लोविषयी विष कालवतो आणि या माणसाबद्दल आपला अंदाज अगदीच चुकला असें लोडोव्हिकोला होऊन जातें.

खलभुजंगाचें कार्य यशस्वी—

अजूनही ऑथेल्लोला आपण चुकत तर नाही ना अशी शंका आहे. एमिलियाला तो खोदखोदून विचारतो आहे की, तिच्या नजरेला त्यामधला कांही प्रकार आला का! ती डेस्डेमोनाच्या विशुद्धतेबद्दल संपूर्ण ग्वाही देते. परंतु निश्चय न होऊन तो डेस्डेमोनाला बोलावून घेतो आणि एमिलियाला बाहेर जाऊन उभी राह्यला सांगतो. कुणी आलें तर खाकरायला तिला तो सांगतो. आणि मग त्याचे आणि डेस्डेमोनाचें तें निर्णायक संभाषण होतें. "मी तुमची एकनिष्ठ पत्नी आहे" या डेस्डेमोनाच्या शांत उत्तराने तो भडकतो आणि "घे, घे शपथा, बोल खोटें आणि नरकांत जायची तयारी कर" असें ओरडतो; आणि तरीही 'डेस्डेमोना, डेस्डेमोना,' करून त्याच्या डोळ्यांतून अश्रू येतात. तिला त्याचा अर्थच समजत नाही. तिला अजूनही असेंच वाटतें की, ब्रॅबॅन्टिनोने कांही कारस्थान करून ऑथेल्लोला परत बोलावण्याचा हुकूम पाठविला आहे आणि म्हणून तो संतापला आहे. अखेर अत्यंत काव्यमय व अलंकारिक भाषणांतून ऑथेल्लो तिच्यावर, ती दुराचारी, व्यभिचारी स्त्री असल्याचा आरोप करतो. आणखीही तो पुष्कळ बोलला असता; पण तेवढ्यांत एमिलिया आंत आल्याने तो निघून जातो.

या प्रसंगांत डेस्डेमोना खूप रुष्ट होते. तिला ऑथेल्लोबद्दल मनस्वी तिटकारा येतो. तिच्या मनांत कांहीतरी निश्चय झाल्यासारखा होतो; एवढ्यांत आयागो तेथे येतो. ऑथेल्लोने स्वतःविषयी उच्चारलेला तो गर्ह्य शब्द पुन्हा तोंडाबाहेर काढणेंसुद्धा तिला अशक्य होतें. आणि एमिलिया या प्रकरणाचा धिक्कार पुढील शब्दांनी करते, "कुणी तरी नखशिखांत पाजी माणसाने, कुणी तरी लटपट्या आणि दुसऱ्यांच्या कानाचे चावे घेणाऱ्या दुष्ट माणसाने, कुणीतरी लोभी गुलामाने आपल्याला एखादी वरची जागा मिळावी म्हणून हा सगळा आरोपाचा डोलारा उभा केला असला पाहिजे."

परंतु एमिलियाच्या या जळफळाटाचा काय उपयोग होता? कारण त्या खलभुजंगाचें कार्य संपूर्ण यशस्वी झालेलें होतें. ऑथेल्लोने डेस्डेमोनाला रात्रीं शयनागारांत एकटीला राहण्यास सांगितलें होतें. एमिलियासुद्धा त्याला आसपास नको होती. रात्रीं ऑथेल्लो शयनागारांत प्रवेश करतो त्या वेळी एक प्रकारच्या भ्रांत अवस्थेंतच येतो. डेस्डेमोनाचा वध करण्याचा निश्चयच करून तो आलेला असतो. कारण—कारण केवढें तरी त्याच्या अंतरात्म्याला पटलेलें आहे. परंतु आकाशांतील ग्रहगोलांपुढे त्याचा उच्चार करण्याला सुद्धा त्याला शरम वाटतें आहे. डेस्डेमोनाचें शरीर इतकें मुलायम आहे की, तिच्या अंतःकरणांतील दोषांसाठी तें विद्रूप करण्याला त्याचें मन घेत नाही. म्हणून गळा दाबून गुदमरवून टाकून तिचा प्राण घेण्याचें त्याने ठरविलें आहे. कारण तिने

एक त्याला फसविलेंच; पण जिवंत राहिल्याने ती आणखी पुष्कळ पुरुषांना फसवील; आपल्या जात्या पापभीरू वृत्तीला या दुष्कृत्यासाठी अशा परोपकाराच्या साधनाचा टेकू ऑथेल्लोला हवासा वाटतो आहे.

ऑथेल्लो येतो तेव्हा डेस्डेमोनाला झोप लागली आहे. तिच्या सौंदर्यामुळे ऑथेल्लो पुन्हा मोहित होतो; चुंबनें घेऊं लागतो. करूं घातलेल्या कृत्याच्या जाणिवेने त्याच्या डोळ्यांमधून अश्रू पाझरूं लागतात. तोच म्हणतो, "हें पवित्र दुःख आहे; जेथे प्रेम आहे तेथेच घाव घालावा लागत आहे म्हणून हें दुःख आहे."

एवढ्यांत डेस्डेमोना जागी होते. पण गंभीरपणाने ऑथेल्लो तिला शेवटची प्रार्थना करायला सांगतो. हातून पाप घडलें असेल तर अजून परमेश्वराची करुणा भाक असें सुचवितो. कारण तिला मारण्याचें जरी त्याचें ठरलें होतें, तरी तिच्या आत्म्याला सद्गति मिळणार नाहीं असें त्याला कांही करायचें नव्हतें.

त्याचे गरगर फिरणारे डोळे; त्याचें खालचा ओठ चावणें, यांचें डेस्डेमोनाला भय वाटतें. "कां–असें कां ? हा एवढा राग माझ्यावर व्हायला कांही कारण नाहीं !" असें दीनवाणी होऊन ती म्हणते. परंतु तिला गप्प राहायला सांगून तो त्या हातरुमालाची गोष्ट काढतो. मीं तो कॅशिओला कधीच दिला नाही हें तिचें म्हणणें तो खरें मानीत नाही; मरणाच्या दारांत असताना तरी खोटें बोलण्याचें पाप करूं नकोस असें तो तिला बजावतो. किती खोटारडी स्त्री ही ! मीं स्वतः कॅशिओच्या हातांत तो रुमाल पाहिला ! तरी ही खोटें बोलतें; याचा त्याला मनस्वी संताप येतो. तरीही, तो रुमाल आपण दिला नाही, स्वतः कॅशिओला येथे बोलावून विचारा असें ती विनविते. पण ऑथेल्लोच्या मताने त्याने तशी कबुली केव्हाच दिलेली असते; नव्हे, तिचा उपभोग घेतल्याचें त्याने कबूल केलेलें असतें. आणि याबद्दल त्याचा एव्हाना निकालही लागला असेल असें जेव्हा ऑथेल्लो सांगतो तेव्हा डेस्डेमोना कळवळून म्हणते, "अरेरे, कोणी तरी त्याचा विश्वासघात केला असला पाहिजे आणि मला खड्ड्यांत लोटलें असलें पाहिजे."

कॅशिओसाठी तिच्या डोळ्यांत अश्रू ! आता मात्र कळस झाला. म्हणून "कुलटे" असें ऑथेल्लो तिच्यावर खेकसतोः त्या वेळीं वाटल्यास मला हद्दपार करा, पण ठार मारूं नका असें ती विनविते. वास्तविक, त्याची ही भ्रांति तो शांत झाला म्हणजे नाहीशी होईल या आशेने ती वेळ काढूं पाहत असली पाहिजे. पण ऑथेल्लोने तिच्या पापी हृदयाची ही भीति आहे असाच तर्क केला असला पाहिजे. आणि म्हणून, आज नको उद्या मारा–निदान अर्धा तास थांबा–प्रार्थना म्हणेपर्यंत थांबा–यांपैकी एकही तिची विनंति मान्य न करतां ऑथेल्लो तिला गुदमरवून टाकतो.

स्वाभाविकच त्याला वाटलें असणार की, हिला आता वेळ दिला तर ही आरडाओरडा करून माणसें जमवील. पण त्याचा हा केवढा गैरसमज होता. कारण एमिलिया आंत येऊन कॅशिओ मेला नाही, उलट रॉडरिगोलाच त्याने मारलें वगैरे सांगून ऑथेल्लोला

चकित करते त्या वेळीं डेस्डेमोना – खरोखर ती अजून मेलीच नव्हती – "अगदी, अगदी निष्कारण खून –" असें पुटपुटते; तेव्हा एमिलियाचें तिच्याकडे लक्ष जातें. तें दृश्य पाहून तिची केवढी तारांबळ उडते. तेव्हा "मी अगदी निरपराध अशीच मरणाच्या स्वाधीन होत आहें; मला कोणीं मारलें नाही; माझा मींच घात केला; माझ्या प्रेमळ नाथांना माझा निरोप सांग, येतें मी" असें डेस्डेमोना म्हणते आणि मग तिचा प्राण जातो. यावरून ती आरडाओरडा करून माणसें जमवील ही ऑथेल्लोची आशंका किंवा अयथार्थ होती. परंतु तिच्या या बोलण्यानेही ऑथेल्लो भानावर येत नाही. उलट, "पाहा, मरतांनासुद्धा ही खरें म्हणून बोलली नाहीं; वास्तविक मीं तिला मारली. आतां तर ती खासच नरकांत जाणार" असें तो जणू विजयोन्मादाने म्हणतो.

त्यावर "तर मग या खोटें बोलण्यामुळे ती मला अधिकच स्वर्गीय देवता वाटते आणि तुम्ही एक काळेकुट्ट सैतान वाटतां," असें एमिलिया त्याला त्वेषाने बजावते आणि त्यानंतर त्या दोघांची जी वाचाचाची होते त्यांत "तुझ्याच नवऱ्याने तिच्या पापी वर्तनाबद्दल माझी खात्री करून दिली" असें जेव्हा ऑथेल्लो म्हणतो, तेव्हा ती हतबुद्धच होते. या गोष्टीचा छडा लावल्याशिवाय मी सोडणार नाही, असें म्हणून ऑथेल्लोला झिडकारून "खून, खून" म्हणून ती ओरडते.

त्याच वेळीं इतर मंडळी येतात. आयागोच्या तोंडावर त्याचा खोटेपणा एमिलिया सांगूं जाते तेव्हा तो तिचा खून करूं पाहतो. तरीही ती रुमाल आपण आयागोला दिल्याची हकीकत सांगते आणि ऑथेल्लोला अत्यंत टाकून बोलतें. त्यासरशी ऑथेल्लोच्या डोक्यांत सगळा प्रकाश पडतो आणि तो आयागोवर झेप घेतो. परंतु तेवढ्यांत त्याला चुकवून, एमिलियावर वार करून आयागो निघून जातो. मरतां मरतां एमिलिया डेस्डेमोनाच्या पवित्रपणाची ग्वाही देऊन प्राण सोडते.

आतां ऑथेल्लो दुसरें टोक गाठतो. पश्चात्तापाने त्याचा जीव कासावीस होतो. "मला तुम्ही कांही नांवें ठेवा. तुम्हांला वाटलें तर मला खुनी म्हणा; पण प्रामाणिक खुनी म्हणा" असें तो सर्वांना विनवितो. कारण तो म्हणतो, "दुष्ट बुद्धीने मीं कोणतीच गोष्ट केली नाहीं; जें काय केलें तें सद्बुद्धीने केलें." कॅशिओची तर तो मोकळ्या मनाने क्षमा मागतो. परंतु अजून हातरुमालाबद्दलची त्याची बोच बुजलेली नसते. पण "मला तो माझ्या शय्यागारांत सांपडला – आणि आतांच या दुष्ट माणसाने कबूल केलें आहे की, त्यानेच मुद्दाम आपला हेतु साध्य व्हावा म्हणून तो तेथे टाकला होता," असा कॅशिओ खुलासा करतो तेव्हा मात्र ऑथेल्लोला आपल्या मूर्खपणाची पुरेपूर खात्री पटते. क्षणार्धांत त्याचा निश्चय होऊन चुकतो. लोडोव्हिको जेव्हा त्याला अटक करून चौकशीसाठी व्हेनिसला नेणार असल्याबद्दलची गोष्ट काढतो, तेव्हा त्याचा तो निश्चय कायम होतो. त्याच वेळी तो मागच्या-प्रकरणाच्या शेवटीं उल्लेखिलेली विनंति सर्वांना करतो. "तुमच्या वृतांतांत मी जसा आहे तसें माझें वर्णन करा; माझ्या गुन्ह्यावर बिलकुल पांघरूण घालूं नका; पण द्वेषाने कांही लिहूं नका. माझें प्रेम वेडें होतें, पण

तें खरें होतें," वगैरे वगैरे आत्मसमर्थनार्थ तो बोलतो आणि शेवटीं जणूं कांहीं व्हेनिसचा आपल्याला किती अभिमान आहे हें सांगण्याच्या आविर्भावाने तो म्हणतो,

"आणि सांगा की, पूर्वी एकदा अलेप्पोमध्ये जेव्हा एका पागोटेवाल्या तुर्कानें व्हेनिसच्या एका नागरिकाला मारलें आणि व्हेनिसच्या राज्याबद्दल वेडेंवाकडें बोलायला सुरुवात केली तेव्हा त्या सुंता केलेल्या कुत्र्याचा गळा मीं पकडला आणि त्याला असा कापून काढला."

या त्या 'असा' या शब्दाबरोबर ऑथेल्लोने जी हालचाल केली त्याच हालचाली-बरोबर स्वतःवर तो वार करून घेतो व "तुला मारण्यापूर्वी मीं तुझें चुंबन घेतलें होतें; तेव्हां आता मरतांनाही मीं तुझें चुंबन घेतलें पाहिजे" असें म्हणून तो डेस्डेमोनाच्या देहावर कोसळतो.

अशा रीतीने कन्याविरहाने ब्रॅबॅन्टिनो, खून होऊन डेस्डेमोना, एमिलिया आणि रॉडरिगो आणि अखेर आत्मघाताने ऑथेल्लो असे पांचजणांचे मृत्यू होऊन ऑथेल्लोचें नाटक संपतें.

स्वभावदोष की बाह्य विरोधी परिस्थिति ?—

असें हें करुण नाटक घडून आलें याला कारण ऑथेल्लोच्या स्वभावांतील कांही अपरिहार्य दोष कां बाह्य अनुल्लंघनीय परिस्थितीचा विरोध ? हा करुण विपाक फार मोठ्या अंशाने ऑथेल्लोच्या स्वभावदोषामुळे घडून आलेला आहे हें सहसा अमान्य होणार नाही. आणि म्हणून स्वभावगत करुण विपाकाचें एक नमुनेदार उदाहरण या नात्याने ऑथेल्लोच्या चित्राकडे बोट दाखविलें जाणें स्वाभाविक आहे.

ऑथेल्लोच्या स्वभावांतील कांही चांगल्या गोष्टीच त्याच्या विनाशाला कारणीभूत होतात; यामुळे त्याच्या या दुःखाबद्दल मन अधिकच तळमळतें. त्याच्या स्वभावांतील अतिशय सरळपणा, श्रद्धाळूपणा, कोणाहीबद्दल दुर्ग्रह न बाळगतां शांत चित्ताने आणि आत्मविश्वासाने वागण्याची प्रवृत्ति या गोष्टी सुरुवातीपासून अखेरपर्यंत आपण नाटकांत पाहत आलों आहोंत. पण माणसाने इतकें चांगलें असून या अतीव विचित्र संसारांत निभत नाही हें सत्य त्याला कळून येण्यापूर्वी त्याच्यासह आणखी चारजणांना प्राणाला मुकावें लागलें. तो खरोखर मूर्ख नव्हता. कर्तबगार सेनानी म्हणून त्याने यशस्वी जीवन घालविलें होतें. राज्याच्या मोठ्या आदराला तो पात्र झाला होता. परंतु त्याला मूर्ख म्हणून आयागोला विकट हास्य करतां यावें इतका त्याचा प्रांजळपणा आणि श्रद्धाळू-पणा पराकोटीला गेलेला होता.

याच्या जोडीला एक स्वभावदोष त्याच्या नाशाला विशेष कारण होतो. जगांतील व्यवहारवादी विचारी बैठकीचा त्याच्या ठिकाणी संपूर्ण अभाव आहे. ज्या प्रकारच्या परिस्थितींत त्याचें जीवन लहानपणापासून गेलें त्या परिस्थितीचा हा परिणाम होता. अशी तात्त्विक बैठक असलेल्या माणसाची चित्ताची समता लौकर ढळत नाही; सारा-

सार विवेकाच्या सवयीमुळे त्याच्या भावनांत आणि आचरणांत अविवेकी अमर्यादा उद्भवत नाही. ऑथेल्लोचें तसें नव्हतें. त्यामुळे त्याचा आनंद, त्याचा अभिमान, त्याचा दुसऱ्यावरील विश्वास यांना जशी सदाच सीमा ओलांडून ओसंडण्याची सवय आहे. त्याचप्रमाणे दुःख, अविश्वास, तिरस्कार याही भावना त्याच्या ठिकाणी अतिरेकानेच उद्भवतात. त्याची कर्तव्यदक्षता ही सुद्धा याच त्याच्या अनियंत्रित भावनोद्रेकाचेंच एक उदाहरण आहे. एक घाव की दोन तुकडे अशी त्याची रीत आहे हें आपण पाहिलें आहे, त्याच्याच तोंडून ऐकलेंही आहे. कॅशिओ दारुड्या दंगलींत त्याला आढळला, पण या गोष्टीचा आगापीछा पाहून मग शांतपणे निर्णय करावा इतका त्याच्या ठिकाणीं जीवनाविषयीचा तत्त्वनिष्ठ अलिप्तपणा नव्हताच.

यांचेंच एक मोठें उदाहरण म्हणजे त्याचें डेस्डेमोनावरील प्रेम. हें अमर्याद प्रेम, त्याच्या सर्व चित्तवृत्तींना वेढून त्याचा स्वतःवरील कब्जा जवळजवळ सर्वस्वी नाहीसा करणारें प्रेम, हेंच शेवटी त्याच्या नाशाला कारण झालें. काव्यांमधून अशा प्रकारच्या झंझावाती प्रेमाचींच वर्णनें आपण पुष्कळदा वाचतों. त्या प्रकारच्या प्रेमालाच उद्देशून **व्हर्जिनिबस प्युएरिक्स** या निबंधांत स्टीव्हन्सनने म्हटलें आहे की, "असलें हें कवींनी वर्णिलेलें प्रेम तुम्हां आम्हां सामान्य स्त्रीपुरुषांच्या मनांत नसतें, यामुळेच तुमची आमची घडगत आहे. आपलें व्यवहारांतील प्रेम म्हणजे कांहीशी विशेष आवड, 'अ' पेक्षा 'ब' बद्दल अधिक पसंती, इतक्याच स्वरूपाची भावना असते. जेवण झाल्यानंतर फळांची डाली दुसऱ्या टोकाकडून आपल्याकडे येत असावी. त्यांतल्या एखाद्या गहिऱ्या रंगाच्या रसरशीत सफरचंदावर आपली नजर खिळते; आपणाला तें हवेंसें वाटतें. येईल तें आपल्या हाताला – यावें – अशी अपेक्षा असते. पण मध्येच दुसरा कोणी तें उचलतो. थोडासा विरस होतो आपला. पण याहून अधिक तीव्रता आपल्या भावनेला चढत नाही. अशीच रीत आपण खरोखर ज्याला प्रेम - प्रेम म्हणून म्हणतो त्याची असते."

पण कवी ज्या प्रेमाचें वर्णन करतात तशा प्रेमाच्या तडाख्यांत सापडून जर कोणा माणसाने विवाह केलाच तर – कारण स्टीव्हन्सन म्हणतो, असा मनुष्य बहुधा अविवाहितच मरेल, त्याच्या या लोकविलक्षण प्रेमाला साथ देणारी प्रेमिका बहुधा त्याच्या वाट्याला येणारच नाही — तर त्याच्या संसारांत भयंकर वादळ निर्माण झालेलेंच आपणाला दिसेल. "प्रेम रसांचा राजा खरा. पण सिंह हाही पशूंचा राजा असला तरी जसा तो माणसाळत नाही, तसेंच या प्रेमभावनेचें आहे. ही उत्मादकारक भावना संसाराशीं समरस होत नाही. तिच्यामुळे माणसामधील अत्युच्च श्रेष्ठ गुण जसे बाहेर पडतात तसेंच त्याच्यांतील हीनतम आणि अतीव क्षुद्र असें जें जें असेल तें तेंही सर्व प्रकट झाल्याशिवाय राहत नाही. दारू पिऊन माणसें जशीं संशयी बनतात, धर्माभिमानाच्या त्वेषाखाली जशीं तीं भांडायला आणि लढायला तयार होतात, तशींच, मुळांत सडेतोड आणि प्रांजळ हृदयाचीं असलेलीं माणसें प्रेमाच्या भरांत लहरी आणि संशयखोर बनतात."

जणू काय स्टीव्हन्सन ऑथेल्लोबद्दलच लिहीत होता की काय असें त्याचें हें विश्लेषण वाचून वाटतें. समतोलपणा न साधलेल्या ऑथेल्लोचें प्रेम हें अशा प्रकारचें ज्वालाग्राही प्रेम होतें. तिसऱ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत डेस्डेमोना कॅशिओबद्दल पहिल्याप्रथम रदबदली करते त्या वेळीं तिला आंत घालविल्यावर ऑथेल्लो स्वतःच म्हणतो, "परंतु तुझ्यावर माझें प्रेम आहे. आणि हें प्रेम नाहीसें होईल तेव्हा जगबूडच होईल जणू माझ्या जीवनांत." आणि याच उन्मत्त भावनातिरेकाने त्याच प्रवेशांत पुढे, कॅशिओ आणि आयागो यांचें तें संभाषण ऐकल्यावर तो म्हणतो, "माझें तें सगळें नाजूक प्रेम मी हें असें अंतराळांत पार उडवून देतों. झालें, संपलें तें!"

परंतु हे सर्व स्वभावदोष असूनही ऑथेल्लोचें जीवन यशस्वी आणि सुखी झालें नसतेंच असें नाही. स्टीव्हन्सनने म्हटल्याप्रमाणे त्याचें लग्नच झालें नसतें तर हें सगळें नाटक होण्याचा संभव फार कमी होता. यांत या नाटकांत बाह्य परिस्थितीमुळे होणाऱ्या करुण विपाकाचें मूळ आहे. बरें जें लग्न झालें तेंसुद्धा इतकें विचित्र आणि विचित्र पद्धतीने की, त्यामधून बाह्य परिस्थितींत त्याच्याविरुद्ध नाना बाजूंनी वादळच उठलें. त्याच्या प्रेअसीचा बाप आणि तो व्हेनिसच्या ज्या वर्गांतला होता तो सुसंस्कृत सत्ताधारी वर्ग ऑथेल्लोचा शत्रू, विरोधक, निदान त्याच्याविषयी सहानुभूतिशून्य बनला. रॉडरिगोसारखा डेस्डेमोनावर प्रेम करणारा तिच्या थरांतलाच एक तरुण आयागोला कटामध्ये साधन म्हणून या लग्नामुळेच मिळाला. रॉडरिगो या अशा निराशाग्रस्त व्हेनिशिअन तरुणांचा एक प्रतिनिधि मात्र आहे. बरें ऑथेल्लोने जी पत्नी पसंत केली तिच्यांत आणि त्याच्यांत केवढें महदंतर; स्वभावांत, अभिरुचींत रीतीभातींत, संस्कृतीमध्ये, पेहरावांत, शरीरसौष्ठवांत, आवडीनिवडींत, करमणुकीच्या विषयांत, कशाकशांत त्या दोघांमध्ये साम्य नव्हतें. तुलनेने या सर्व बाबतींत डेस्डेमोनापेक्षा तो कितीतरी खालच्या पातळीवर होता. या अंतरामुळे त्याच्या मनांत न्यूनगंड निर्माण होऊन आयागोच्या कारस्थानाला किती सुपीक भूमि त्याच्या चित्तांत निर्माण झाली हें यापूर्वी विस्ताराने सांगितलेंच आहे. आणि असा अत्यंत विषम विवाह बापाला न विचारतां, त्याच्या संमतीशिवाय, नव्हे, त्याची संमति मिळण्याचा संभव नव्हता म्हणून पळून जाऊन केलेला होता.

कै. प्रा. श्री. नी. चाफेकर म्हणत की, अशा तऱ्हेने वडिलांना डावलून केलेला हा विवाह नीतिबाह्य होय आणि नीतीला डावलून आणि आईबापांचा तळतळाट होऊन केलेले हे विवाह अयशस्वी आणि दुःखकारकच होणार, असेंच या नाटकांत शेक्स्पीअरला दाखवायचें होतें. कौटुंबिक नीतिनियमांचें उल्लंघन केल्यामुळे असे घातक परिणाम होतात ही श्रद्धान्वित आणि अतींद्रिय परिणामवादी दृष्टि क्षणभर बाजूला ठेवली तरी, अशा प्रकारचा विषम विवाह यशस्वी आणि सुखावह होणें हें व्यवहाराच्या दृष्टीने फार दुर्घट आहे असें कोणालाही मान्य करावें लागेल. तसें झालें तर तो एक अपवादच मानला पाहिजे.

शिवाय अशा या अनियंत्रित भावनाधीन असलेल्या माणसाचें नियंत्रण करून त्याला नीट वळणावर ठेवण्यासाठी लागणारें चातुर्य आणि धैर्य दोन्ही जिच्या अंगीं नव्हती अशी ऑथेल्लोची बायको होती हें आणखी एक त्याचें दुर्दैव होतें. तिच्या ठिकाणीं थोडेंसें जरी धैर्य असतें, त्याच्याशीं त्याचा मान राखूनच, पण स्वतःच्या स्वाभिमानरक्षणार्थ, तेजस्वीपणे झगडा करण्याची थोडी जरी चतुराई तिच्या अंगीं असती, पतिव्रतेचा एकमेव श्रेष्ठ गुण म्हणजे पतीची आज्ञा निमूटपणे मान्य करणें अशी तिची वेडी भावना नसती, तर ऑथेल्लोचा संशयावेग तिला आवरता आला असता. पण आईपोरक्या त्या मुलीला घरांतच कोंडून राहिल्यामुळे बाह्य जगाचा कांही कांही खरा अनुभव नव्हता. म्हणूनच ऑथेल्लोच्या भयानक कहाणीने तिचें चित्त थरारलें आणि ती त्याच्या अंकित झाली. पण म्हणूनच अशाही माणसावर जरब ठेवून कसें राहावें याची शिकवण तिच्या बुद्धीला मिळाली नाही. दीन बकरीने खाटकाच्या हातीं अवश होऊन मान द्यावी तशी ती ऑथेल्लोच्या हातून मरायला तयार झाली. आपल्याला थोडा तरी वेळ ऑथेल्लोचा भ्रम नाहीसा करण्यासाठी मिळावा याची जाणीव तिला अगदी अखेरच्या क्षणीं झाली. पण ती मागणीसुद्धा तिने इतक्या घाबरटपणाने आणि दीनपणाने केली की, ऑथेल्लोसारख्या शूर माणसाला तिच्या त्या भेदरटपणाची किळस तरी यावी किंवा तिचा त्यांत कांही तरी डाव आहे असें वाटून तिला जगांतून नाहीशी करण्याची त्याला तांतडी व्हावी. आईच्या अभावीं बापाच्या देखरेखीखाली वाढलेली ऑफिलिया आणि डेस्डेमोना या दोघींची अवस्था एकच. त्यांचा अंत वेगवेगळ्या प्रकाराने झाला असेल. पण त्याचें कारण स्त्री म्हणून आपलाही कांही अधिकार आहे व तो आपण बजावला पाहिजे या जाणिवेचा संपूर्ण अभाव आणि स्त्रियांचें कर्तव्य आज्ञा-पालन करण्याचेंच काय तें आहे ही वेडी व घातकी समजूत.

या दुर्दैवाच्या भरीला आयागोचा पाताळयंत्री दुष्टपणा ठेवला म्हणजे ऑथेल्लोच्या बाह्य दुर्दैवी परिस्थितीचें माप भरलें. आयागोवर विश्वास नव्हता कोणाचा? कॅशिओचा होता. डेस्डेमोनाचा होता. खुद्द त्याच्या लग्नाच्या बायकोलासुद्धा तो इतका खलपुरुष असेल अशी शंका नव्हती. तेव्हा ऑथेल्लोने त्याच्यावर विश्वास टाकला यांत काही त्याचा वेडेपणा झाला असें मुळीच नव्हे. त्याचप्रमाणे आयागोचा पाताळयंत्री कार-स्थानीपणा होता म्हणूनच केवळ झाला हा सर्व प्रकार झाला हेंही म्हणणें मुळीच योग्य नव्हे. व्यवहारचतुर आयागो आणि व्यवहारांतील खाचाखोचा न ओळखणारा ऑथेल्लो यांच्या सामन्यांत ऑथेल्लोचा पराभव व्हावा हें स्वाभाविकच होतें. परंतु आयागोच्या कारस्थानाला अनुकूल भूमि निर्माण झालेली होती ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवली पाहिजे.

अशा रीतीने हें करुण नाटक स्वभावगत करुण विपाकाचें जसें उदाहरण आहे तसें तें परिस्थितिगत विपाकाचेंही आहे. म्हणूनच ऑथेल्लोच्या स्वभावांतील धीरगंभीरपणा-बरोबरच त्याच्या अमर्याद चांगुलपणाचें नाटककाराने आपल्याला सुरुवातीला दर्शन

करविलें. आणि संशयखोरपणाचें पीक उभारून वर यायला अनुकूल अशी भूमि कशी तयार झाली होती हें ध्वनित करून पुढें हें संशयाचें भूत हळूहळू कसें प्रभावी झालें हें क्रमाक्रमाने आणि किती कौशल्याने शेक्सपीअरने दाखविलें हें आपण पाहिलें. ऑथेल्लोच्या दोषभूत झालेल्या गुणांचें, दोषांचें आणि न्यूनगंडाचें दर्शन करविणें आणि त्याच्यापायीं त्याचा झालेला नाश दाखविणें हें या नाटकाचें मुख्य उद्दिष्ट होतें व तेंच नाटककाराने साधलें आहे. त्यामुळे त्याच्या मोठेपणाचे किंवा रणधीरपणाचे नमुने तो दाखवीत बसला नाही. त्यासंबंधी फक्त थोड्याशा छटांचे ओझरते रंग दाखवून कवि आपल्या मुख्य उद्देशाकडेच वळला आहे.

ऑथेल्लो हा रांगडा शिपाई आहे. मॅकबेथसारखी किंवा हॅम्लेटसारखीही त्याची काव्यप्रतिभा जागृत नाही. तरी तोही त्याच्या भावना ताणल्या जाऊं लागल्यावर काव्यमय भाषणें करूं लागतो हें आपण पाहिलें. त्याचीं कांही भाषणें रसप्रकटनाचीं फार हृद्य उदाहरणें आहेत. A Spontaneous overflow of powerful feelings या वर्डस्वर्थच्या व्याख्येशीं हीं भाषणें तंतोतंत जुळणारीं आहेत. काव्यस्फूर्तीविषयीच्या सामान्य विचारांशीं हें असें होणें हें अत्यंत सुसंगत आहे. आणि म्हणूनच हीं भाषणें कृत्रिम ठरविण्याचा अरसिकपणा कोणी करील असें प्रस्तुत लेखकाला वाटत नाही.

प्रकरण सहावें

डॉक्टर स्टॉकमन

आतांपर्यंत सोफोक्लीस आणि शेक्सपीअर अशा दोघां श्रेष्ठ करुण नाटककारांच्या कांही नाटकांचा आपण विचार केला. आता आपल्या काळाला, पुष्कळच जवळच्या अशा कांही नाटककारांचीं नाटकें पाहूं. एकोणिसाव्या शतकांतील इब्सेन हा प्रसिद्ध नॉर्वेजिअन नाटककार मराठी वाचकांना आता नांवाने तरी बराच परिचित झाला आहे. प्रत्यक्ष त्याच्या नाटकांचा परिचय मात्र अजून तितकासा झालेला नाही. जो काय झाला आहे तो त्याच्या डॉल्स हाऊस या नाटकामुळें. डॉल्स हॉऊस या नाटकाच्या भाषांतरानेच इंग्लंडमध्ये प्रथम इब्सेनबद्दल खूप विरोधी टीका झाली; आणि, तिच्यांतूनच इब्सेनचा अधिक अभ्यास होऊन आज इंग्लंड आणि अमेरिका या दोन्ही इंग्रजीभाषी देशांत त्याला फार मोठी मान्यता मिळाली आहे.

परंतु साहित्यदृष्ट्या डॉल्स हाऊस हें कांही इब्सेनचें उत्कृष्ट नाटक नाही. मास्टर बिल्डर आणि एनिमी ऑफ दि पीपल हीं त्याचीं श्रेष्ठ नाटकें म्हणून मान्यता पावलेलीं असून हेडा गाब्लर हेंही नाटक जवळ जवळ या दोन नाटकांच्याच तोडीचें मानलें जातें. या तिन्ही नाटकांचा विचार या ग्रंथांत करावयाचा आहे. या प्रकरणांत त्यांपैकी एनिमी ऑफ दि पीपल – जनतेचा वैरी – या नाटकांतील नायक डॉक्टर स्टॉकमन याचा आतांपर्यंतच्या आपल्या पद्धतीने विचार करूं.

थोडक्यांत कथानक—

या नाटकाचें कथानक अगदी बिन गुंतागुंतीचें आणि साधें आहे. नॉर्वेमधल्या एका लहानशा शहरांत नवीनच मोठीं स्नानगृहें बांधण्यांत आलीं आहेत. या ठिकाणच्या हवेचें आणि स्नानगृहांतील पाण्याचें – विशेषतः रोगनिवारक म्हणून – आजूबाजूच्या आणि दूरदूरच्या देशांतील लोकांना मोठें आकर्षण वाटूं लागलें होतें. त्या निमित्ताने तेथे प्रवासी पुष्कळ येऊं लागून शहरांतील व्यापार वाढत होता व संपत्तींत भर पडण्याला हें एक मोठें साधन निर्माण झालें होतें. शहरांतील धनिक लोकांच्या हातीं हीं स्नानगृहें असून त्यांची व्यवस्था ज्या संघटनेकडे होती तिचा अध्यक्ष पीटर स्टॉकमन, याचा सख्खा भाऊ डॉक्टर स्टॉकमन (टॉमस) हा त्या ठिकाणीं वैद्यकीय अधिकारी म्हणून होता.

पहिल्या वर्षाच्या अनुभवावरून डॉक्टर स्टॉकमनला शंका आली होती की, स्नानगृहांच्या पाण्यामध्ये कांहीतरी बिघाड आहे. प्रयोगांतीं आणि तज्ञांच्या अभिप्रायावरून त्याची ही शंका यथार्थ ठरली. स्वाभाविकच आतां याबद्दल सुधारणा–दुरुस्ती – करणें आवश्यक होतें. स्नानगृहांच्या वरच्या बाजूला कांही कारखाने होते.

त्यामधून घाण पाझरत स्नानगृहांच्या पाण्यांत मिसळत होती. त्यामुळे तें पाणी पिऊन किंवा त्यांत नुसतें स्नान करूनसुद्धा आरोग्याला मोठीच बाधा उत्पन्न होण्यासारखी होती.

परंतु ज्यांनी भांडवल घालून स्नानगृहें बांधलीं त्यांना ही दुरुस्तीची गोष्ट मान्य होण्यासारखी नव्हती. एकतर सुरुवातीलाच याबद्दल त्यांना नीट कल्पना डॉ. स्टॉकमन याने दिलेली असूनही ती न मानतां त्यांनी जेथून नको तेथून पाणी घेतलें होतें. म्हणून आतां दुरुस्ती करावी लागण्यांत या लोकांच्या प्रतिष्ठेला हानी पोचणार होती. शिवाय दुरुस्तीपायीं दहा ते वीस हजार डॉलर खर्च करावे लागणार होते. आणि स्नानगृहाच्या पाण्यामध्यें विषार आहे ही गोष्ट एकदा जाहीर झाली असती की, मग पुन्हा स्नानगृहांबद्दल बाहेरच्या देशांतील लोकांची अनुकूलता निर्माण होणें दुरापास्त होतें; आणि अशी अनुकूलता उत्पन्न होईल असें म्हटलें तरीही दुरुस्ती वगैरे होऊन दोन तीन वर्षांचा तरी काळ लागणार होता.

शहरांत एका बाजूला धनिक वर्गाची सत्ता आणि दुसऱ्या बाजूला, सामान्य जनतेची, पुरोगामी मतांच्या लोकांची सत्ता व्हावी असें वाटणारा बहुसंख्य समाज, असे तट होतेच. या पुरोगामी गटाची कांही मंडळी प्रथम डॉ. स्टॉकमनला उचलून धरतात. त्याचा पक्ष सत्याचा असल्यामुळे, त्या निमित्ताने धनिक सत्ताधारी वर्गावर चांगलें हत्यार धरतां येईल आणि कदाचित प्रतिपक्षाच्या हातून स्थानिक सत्ता जनता पक्षाच्या हातीं घेतां येईल या आशेने ही मंडळी हुरळलेली असते. आणि पीटर स्टॉकमन स्नान-गृहांची दुरुस्ती करण्याची स्टॉकमनची सूचना मान्य करीत नाही असें समजल्यावर डॉक्टर स्टॉकमनचा रिपोर्ट स्थानिक दैनिकांत छापावयाचा व त्याचे लेखही छापावयाचे आणि स्नानगृह मंडळाच्या विरुद्ध मोठी आघाडी उघडायची असें ठरतें.

परंतु डॉक्टर स्टॉकमनचा हा रिपोर्ट–स्नानगृहांचें पाणी विषारी आहे असें दाखविणारा–छापून त्याला प्रसिद्धि देण्यांत शहराचें केवढें नुकसान आहे हें पीटर स्टॉकमन त्या मंडळीला सहज पटवून देऊं शकतो; त्या नुकसानीच्या भयामुळे ही मंडळी डॉक्टर स्टॉकमनला पाठिंबा देण्यास नकार देतात; वर्तमानपत्राचा तर उपयोग त्याला ते करून देतच नाहींत; पण स्वतःच्या खर्चाने तो रिपोर्ट छापून घ्यायला डॉक्टर स्टॉकमनला छापखाना मिळूं देत नाहींत; सभेसाठी जागा मिळूं देत नाहींत.

शेवटीं डॉक्टर स्टॉकमनबद्दल विशेष आदर असणाऱ्या एका गृहस्थाच्या घरापुढील अंगणांत सभा होते. परंतु पीटर स्टॉकमन त्या सभेचीं सूत्रें आपल्या हातीं घेतो. स्नानगृहांबद्दल बोलायचें नाही, अशी सभाध्यक्ष म्हणून त्याची आज्ञा होते. डॉक्टर स्टॉकमनला स्नानगृहांबद्दल बोलायचेंच नसतें. समाजांतील "जनतेच्या" बद्दल त्याला खूप चिडीने बोलायचें होतें. थोडेंफार त्याने तसें बोलून घेतलेंही. परंतु ऐकणारी तरी ती "जनताच" होती. त्यामुळे अखेर गडबड माजली आणि त्याला भाषण आटोपतें घ्यावें लागलें; आणि सभेंत विरुद्ध मताच्या मंडळींनी मांडलेला ठराव पसार झाला की, डॉक्टर स्टॉकमन हा 'जनतेचा वैरी' आहे.

सभा मोडली; स्टॉकमन कुटुंबाची मंडळी कशीबशी घरीं आली. पुढे त्यांच्या घरावर दगडांचा मारा झाला; घरमालकाने घर सोडण्याबद्दल नोटीस दिली; घरांतले नोकर काम सोडून गेले. मुलीला शाळेंत नोकरी होती तिला नोटीस मिळाली. दोघे लहान मुलगे शाळेंत होते त्यांना शाळेंतून काढून टाकण्यांत आलें. स्वतः डॉक्टर स्टॉकमन याची नोकरी गेली. ज्या मित्राच्या घरीं सभा झाली तो एका जहाजाचा कप्तान होता; जहाजाच्या मालकाने त्याला नोकरीवरून दूर केलें; त्याच्या जहाजावरून नॉर्वे सोडून अमेरिकेंत निघून जाण्याचा डॉ. स्टॉकमनचा बेत त्यामुळे संपला. गांवांत त्याने स्वतंत्र दवाखाना काढला तर त्याच्याकडे कोणी जाऊं नये म्हणून सह्या घेण्याची मोठी मोहीम सुरू झाली.

डॉक्टर स्टॉकमनच्या पत्नीचा आजा चांगला श्रीमंत होता. त्याने मृत्युपत्राने पुष्कळशी संपत्ति आपल्या नातीला आणि तिच्या मुलांना देण्याचें ठरविलें होतें. स्नानगृहांबद्दल ही वार्ता समजतांच नुकसानीच्या भयाने पुष्कळशा घायकुत्या भागीदारांनी स्नानगृह कंपनीचे शेअर्स विकण्याची सुरुवात केली. चतुर आणि दूरदृष्टीच्या त्या म्हाताऱ्याने भराभर ते शेअर्स खरेदी केले आणि जावयापुढे प्रश्न टाकला की, त्याला जर आजेसासऱ्याची भली मोठी संपत्ति बायको व मुलें यांना (डॉक्टर स्टॉकमनला हयाती-अखेरपर्यंत तिचा लाभ मिळाल्यानंतर) मिळावी असें वाटत असेल तर त्याने आपला तो रिपोर्ट परत घ्यावा आणि स्नानगृहमंडळाच्या मताप्रमाणे स्नानगृहांच्या पाण्यांत धोका नाही असें जाहीर करावें; नाही तर ती संपत्ति सगळी धर्मदायाकडे दिली जाईल.

यांतून एक नवेंच प्रकरण उद्भवलें. ज्या उदारमतवादी जनतापक्षाच्या म्हणविणाऱ्या लोकांनी प्रथम पाठिंबा देऊन नंतर स्टॉकमनला तोंडघशी पडलें होतें त्यांना आतां असें वाटलें की, स्टॉकमन आणि त्याचा सासरा यांनी बाजारांत स्नानगृहांचे शेअर्स पडावे आणि ते कमी किंमतीला विकत घेतां यावेत यासाठी हा मुद्दाम सगळा कटच रचला होता. म्हणून ते पुन्हा डॉक्टर स्टॉकमनकडे येतात आणि आपणालाही त्या कटांत सामील करून घ्यावें अशी बोलणीं करूं लागतात; वर्तमानपत्र, घरमालक-संघ, ' जनता ' यांचा पाठिंबा त्याला देऊं करतात.

परंतु यामुळे या सर्व मंडळीची स्टॉकमनला अधिकच किळस येते. त्या सर्वांना तो घरांतून हाकलून लावतो; आणि अशा मंडळीमुळे अवनत झालेल्या या समाजांतच राहून त्याच समाजाला उन्नत करणें हें आपलें कर्तव्य आहे असा मनाशीं निर्धार करून परदेशीं जाण्याचा विचार तो सोडून देतो; आणि द्रव्यहीनतेच्या अगदी तळाच्या पायरीला पोचलेल्या त्या स्थितींत सुद्धा " सारें जग एका बाजूला आणि सत्याचा पक्षपाती मी एकटा एका बाजूला " राहणार अशा निर्धाराने तो एक नवें तत्त्व घोषित करतो की, " तोच मनुष्य सर्वांत अधिक सामर्थ्यवान की जो सगळ्या जगाविरुद्ध एकटा दंड थोपटून उभा राहतो. "

वरवर पाहतां साध्या वाटणाऱ्या या कथानकांतून इब्सेनने एक केवढें रसपरिपूर्ण आणि अत्यंत प्रमाणबद्ध अशा रचनेचें नाटक उभें केलें आहे, त्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावाचें किती अंतःकरणाला भिडविणारें चित्र रंगविलें आहे आणि नायकाच्या रूपाने एक केवढी भव्य व्यक्ति आपल्यापुढे उभी केली आहे, हें पाहिलें म्हणजे इब्सेनच्या कलेबद्दल केवढा तरी आदर वाटूं लागतो.

नाटकाच्या सुरुवातीला नायक डॉक्टर स्टॉकमन घरीं नाही. संध्याकाळचें जेवण चार मित्रमंडळीबरोबर करून दोघां मुलांसह तो जरा बाहेर फेरफटका करून येण्यासाठी गेला आहे. तो नसतांनाही त्याचा एक तरुण घरोब्याचा गृहस्थ अगदी निःसंकोचपणें येऊन तेथे भोजनाच्या पदार्थांवर ताव मारीत आहे आणि कॅथरीन स्टॉकमन पण त्याला प्रोत्साहनच देत आहे. डॉ. स्टॉकमनच्या मोकळ्या आणि चार माणसांमध्ये हसून खेळून राहण्याच्या वृत्तीची अशी थोडीशी ओळख करून देणाऱ्या या प्रसंगीं त्याचा भाऊ पीटर स्टॉकमन हा तेथे येतो. तेथला तो भोजनाचा प्रबंध पाहून त्याला थोडें गोधळांतच पडल्यासारखें होतें. आणि मग दीरभावजयीचें जें बोलणें होतें त्यावरून पीटरच्या मताने डॉक्टर स्टॉकमन उधळ्या आहे ही एक गोष्ट आपल्या ध्यानांत येते. निदान पीटर स्टॉकमनचें आपल्या भावाविषयी तसें मत आहे आणि भावजयीवर त्याचा अधिक विश्वास आहे.

नाटकांतील पहिली ठिणगी —

एवढ्यांत आणखी एक गृहस्थ – स्थानिक पीपल्स मेसेंजरचे संपादक होवस्ताद, हे पण त्या ठिकाणी भोजनासाठीच, पण थोडे उशिरा येतात. पीटर स्टॉकमनला ही गोष्ट रुचणारी नाही. त्याच्या आणि होवस्ताद्च्या संभाषणांत आपल्याला स्नानगृहांबद्दलची पहिली ओळख करून दिली जाते. त्या स्नानगृहांमुळे शहराचा केवढा फायदा झाला आहे याबद्दल पीटर स्टॉकमन मोठ्या उत्साहाने वर्णन करतो; पण त्यामध्यें धनिक लोकांवरील, करांच्या रूपाने गरीबांप्रीत्यर्थ पडणारें, ओझें कमी होतें याबद्दलचा आपल्या वर्गाच्या लाभाच्या जाणिवेचा त्याचा कटाक्ष विशेष लक्षांत येतो. त्यांतूनच डॉ. स्टॉकमन याने स्नानगृहांच्या सोयींच्या वर्णनात्मक लिहिलेला लेख छापण्याबद्दलची गोष्ट निघते. त्यांत होवस्ताद जेव्हा म्हणतो की, "डॉ. स्टॉकमनला या स्नानगृहांबद्दल आत्मीयता वाटणें स्वाभाविकच आहे, कारण त्याच्याचमुळे तर स्नानगृहें अस्तित्वांत आलीं" त्या वेळीं या नाटकांतील पहिली ठिणगी पडते. कारण हें श्रेय आपल्या भावाला एकट्याला मिळावें हें पीटर स्टॉकमनला कबूल नाही. "आपल्या भावाजवळ कल्पना पुष्कळ असतील, पण त्या प्रत्यक्षांत आणण्यासाठी निराळ्या प्रकारच्या माणसाची जरूरी आहे; आणि या गोष्टीची जाणीव निदान या घरांत तरी –" असें तो म्हणूं जातो तोच त्याची भावजय त्याला थांबवते. कारण या दोघां भावांमधला हा विरोध, ही एक प्रकारची स्पर्धा, या इतर मंडळीबरोबर अशी चर्चेचा विषय होणें हें स्वाभाविक तिला पसंत

नाही. दिराला बाजूला घेऊन ती म्हणते, "तुम्ही दोघे भाऊ भाऊ! या श्रेयांत दोघांचा तुमचा हिस्सा तुम्हीं कां मानूं नये?"

त्यावर लोक तसें मानीत नाहीत; कारण या शेतकऱ्यांच्या पोरांना साधा व्यवहार म्हणून कांही माहीत नाही, असें पीटर आपलें असमाधान व आपली खालच्या वर्गाबद्दलची तुच्छता व्यक्त करतो.

मोठ्या भावाहून धाकट्याचा थाटच निराळा —

एवढ्या अवधींत डॉ. स्टॉकमन फिरून परत येतो. त्याचा तो उत्साह, धांदल, घरीं आलेल्या मंडळीशीं मोठ्या आवेशाने आणि खेळीमेळीने वागणें – हा त्याचा थाट भावाच्यापेक्षा अगदीच वेगळा असतो. लोकांनी खावें, प्यावें, मजेंत असावें, ही त्याची आनंदी वृत्ति आपल्याला उत्साहित करते. तरुण मंडळी खाण्यांत अतिरेक करतात हा भावाचा शेरा त्याला पटत नाही. तरुणांच्यावर भावी जीवनाची जबाबदारी आहे; जगांत पुढे पुष्कळ खळबळ माजणार आहे; अगदी एक नवेंच जग त्यांच्याभोवती निर्माण होगार आहे. यासाठी त्यांनी खाऊन पिऊन धष्टपुष्ट बनलेंच पाहिजे असा विचार तो मांडतो. त्यांतच, आपण स्वतः आतापर्यंत देशापासून दूर आणि कष्टांत दिवस काढले, त्यामुळे सध्याचें हें आनंदी आणि सुरक्षितपणाचें जीवन उपभोगीत असतांना, आपल्याला कोणाला असें खातांपितांना, मौज करतांना पाहून आनंद वाटतो, हें तो किती मोकळ्या मनाने भावाला सांगतो.

या सर्व प्रकारांत बेहिशेबी खर्च होत असला पाहिजे या भावाच्या शंकेची तो फिकीरच करीत नाही. जमा आणि खर्च यांचा मेळ पाहणारी ही व्यक्तीच नाही. म्हणतोच मुळी तो की, "कॅथरीन सांगते की, खर्चाइतकी जवळ जवळ आपली प्राप्ति आहे." म्हणजे ती सगळी जबाबदारी पत्नीवर आहे. "परंतु तें कांहीं असलें तरी मित्रमंडळीची सरबराई केल्याने जो आनंद होतो तो डावलण्याची कांही आपली तयारी नाही बुवा" हें जें तो अखेर सांगतो, त्यांतूनच त्याच्या कांहीशा चंडोल, आनंदी आणि समाजप्रिय स्वभावाची किती चांगली ओळख पटते.

परंतु हा विषय बदलून पीटर स्टॉकमन मघांशीच त्याच्या कानांवर आलेल्या लेखाचा विषय काढतो; खरें म्हणजें, आता प्रवासी येण्याचा हंगाम सुरू होत असल्यामुळे लेख छापायला ही वेळ नामी आहे असें तो सुचवितो. त्यासरशी फुलपाखरी वृत्तीच्या डॉ. स्टॉकमनचा आविर्भाव एकदम गोंधळून गेल्यासारखा होतो. स्नानगृहांच्या बाबतींत विलक्षण असें कांही असेलही किंवा नसेलही, सगळाच माझ्या कल्पनेचा खेळ असेल, असें कांही तो चावत चावत बोलूं लागतो. आपल्याला, स्नानगृह मंडळाच्या अध्यक्षाला, न कळवितां, डॉ. स्टॉकमनने कांही विचार चालविला असावा ही गोष्ट पीटर स्टॉकमनला दुःसह होते. दोवे भाऊ थोडेसे हमरीतुमरीवर येतात. पण स्वतःला आवरून पीटर डॉक्टर स्टॉकमनला बजावतो की, कोणतीही गोष्ट अधिकारी मंडळाला

कळविल्याशिवाय, त्यांच्या पाठीमागे केली जातां कामा नये. कारण, तो म्हणतो,

"कांही झालें तरी आपलाच हेका चालवायचा ही वृत्ति तुझ्या जणू रक्तांतच भिनली आहे. पण सुव्यवस्थित अशा समाजांत ही गोष्ट स्वाभाविकच कोणी चालूं देणार नाही. व्यक्तीने केव्हाही समाजाशींच जुळतें करून राह्यला हवें – किंवा जास्त खरें बोलायचें म्हणजे समाजाचें हित करण्याचें काम ज्यांच्याकडे सोपविलेलें आहे. अशा अधिकारी मंडळीशीं जुळतें घेऊनच व्यक्तीने राह्यला हवें."

तत्त्व आणि व्यवहार; समाज आणि व्यक्तिनिष्ठा यांमधील झगडा—

व्यवहार आणि तत्त्वनिष्ठा; समाज आणि व्यक्तिनिष्ठा, यांमधील हा झगडा आहे याची येथपर्यंत बरीचशी जाणीव होते. या भिन्न तत्त्वांचे किंवा वृत्तींचे प्रतिनिधि यांच्यामधील एक प्रकारचा वैयक्तिक झगडा असेंही त्याला स्वरूप येगार याची अंधुकशी कल्पनाही त्यांत येऊन जाते. पीटर निघून गेल्यावर स्टॉकमन व त्याचें मित्रमंडळ यांचें खाणेंपिणें मोठ्या जोरांत सुरू राहतें. या वेळीं कॅप्टन हॉर्स्टर या नवीन व्यक्तीचा आपला परिचय होतो. या मंडळीच्या संभाषणांतही डॉ. स्टॉकमनचा लेख छापण्याचा विषय निघतो. त्याबरोबर स्टॉकमन पुन्हा जरा गंभीर होतो व लेख छापण्याची गोष्ट एवढ्यांतच ठरवितां येणार नाहीं, एवढेंच मोघम सांगतो.

उत्साही परंतु उतावीळ—

या सगळ्याचें कारण एकच असतें की, स्नानगृहांबद्दलच एका पत्राची तो वाट पाहत असतो. त्या पत्रावर त्याची पुढची सगळी हालचाल अवलंबून असते. तें पत्र न आल्यामुळे मनांतून वास्तविक तो अस्वस्थ असतो. त्याची मुलगी पेत्रा शाळेंत कामावर जात असतांना वाटेंत पोस्टमनने तिला तें पत्र दिलेलें असतें; आणि आता परत आल्यावर त्याला तें ती देते. त्याबरोबर स्टॉकमनची जी पुन्हा धांदल तिरपीट उडते ती त्याच्या उत्साही परंतु कांहीशा उतावीळ स्वभावाची आपल्याला ओळख करून देते. त्याच वेळी ड्रिंकवाटरच्या नाटकामधील लिंकनच्या आरडाओरडीचें व स्टॉकमनच्या पत्नीप्रमाणे लिंकनच्याही पत्नीच्या त्याच्या सर्व गरजांबद्दल जातीने दक्ष राहण्याच्या वृत्तीचें आपल्याला स्मरण होतें.

स्टॉकमन आपल्या लिहिण्यावाचण्याच्या खोलींत तें पत्र वाचीत असतां एवढें काय त्या पत्रांत आहे याबद्दल बाहेर सर्वचजण आतुर असतात; पण वेळ घालविण्यासाठी कांहीतरी गप्पा करीत असतात. त्यामध्ये बिलिंग हा नास्तिकवादाचा, धर्महीन समाज-व्यवस्थेचा पुरस्कार करतांना आपल्याला आढळतो. या माणसाचें स्वरूप पुढे आपल्याला अगदी निराळें दिसायचें आहे; त्यासाठी ही पार्श्वभूमी तयार झालेली आहे. डॉ. स्टॉकमनची पत्नी कॅथरीन हिला त्याचें विधान आवडत नाही, ती मुलांना तेथून

घालवून देते. त्या वेळी होवस्ताद्सुद्धा बिलिंगच्या विचारांना आपला पाठिंबा असल्याचें दर्शवितो. पेत्राचीं मतें तशींच असल्याची जाणीव असल्याने होवस्ताद्ची ही धडपड असावी अशी शंका येण्याइतकी तो तिच्या मतांविषयीं आतुरता दाखवितो.

स्टॉकमन बाहेर येतांच त्यांचें तें संभाषण बंद होतें. हातामध्ये तें पत्र उंच धरून "मी एक मोठा शोध लावला आहे असें ओरडतच जणू स्टॉकमन येतो. कॅथरीनला आपल्या पतीच्या शोधांबद्दल यथार्थ कल्पना आहे. म्हणून ती कांहीशा अश्रद्धेने आणि कांहीशा भीतीने "तुमचा शोध?" असा उद्गार काढते. डॉक्टर स्टॉकमनलाही माहीत असतें की, लोक आपल्या शोधांना वेड्या माणसाच्या नुसत्या कल्पना किंवा कांहीतरी बेफाट स्वप्नें म्हणतात. पीटरचेंही तसेंच मत होतें. म्हणून डॉक्टर विजयोत्साहाने म्हणतो, "पण या वेळीं या मंडळींना जपून बोलावें लागेल."

कारण कांहीशा नाटकी संवादानंतर डॉ. स्टॉकमन तेथील मंडळींना सांगतो की, लोक जीं स्नानगृहें आपल्या शहराचें एक महान भूषण व वैभव मानीत होते, तीं स्नानगृहें म्हणजे केवळ सांथीच्या रोगांचें माहेरघर आहेत! ऐकणारांचा या गोष्टीवर विश्वास बसत नाही, तेव्हा संशोधकाच्या तळमळीने डॉक्टर स्टॉकमन म्हणतो, "हीं स्नानगृहें म्हणजे बाहेरून रंगरंगोटी करून आकर्षक केलेला विषदिग्ध यमदरबार आहे— त्यांच्यापासून सार्वजनिक आरोग्याला जास्तींत जास्त धोका आहे. वरच्या बाजूच्या मॉलेडॉल विभागांतील सर्व घाण, नरक, स्नानगृहांच्या पाण्याच्या खजिन्यांत पाणी आणणाऱ्या नळांत शिरून पाण्यांत वाहून येत आहे; तीच घाण, तोच नरक जमिनींतून झिरपत किनाऱ्यावरही येत आहे."

गेल्या वर्षांच्या हंगामांत विषमज्वराच्या कांही लागणी झाल्यापासून आपणाला ही शंका येऊन आपण निव्वळ चिकित्सक बुद्धीने या बाबतींत शोध केला. येथे पुरेशीं प्रयोगसाधनें नसल्यामुळे विश्वविद्यालयांत पिण्याच्या पाण्याचे आणि स्नानगृहांतील समुद्राच्या पाण्याचेही नमुने आपण पाठविले. आणि आता विश्वविद्यालयांतून प्रयोगांचें निवेदन आलें आहे त्यावरून आपला तर्क अगदी बरोबर असून, कांही सेंद्रिय घाण कुजून या पाण्यांत घातक जंतु निर्माण झाल्याचें आणि स्नानगृहांजवळचें पाणी पिण्याला किंवा अंगावर घेण्यालाही घातक आहे हें सिद्ध झाल्याचें डॉक्टर स्टॉकमन सांगतो.

शक्य आणि अवश्य यांतील झगडा —

यावर उपाय काय हा मग स्वाभाविक प्रश्न होवस्ताद उपस्थित करतो. "उपाय स्वाभाविक एकच; हें सगळें दुरुस्त केलें पाहिजे." स्टॉकमनचें मत.

"अशी ही दुरुस्ती करणें शक्य होईल का?" होवस्ताद्चा प्रश्न.

"अशी ही दुरुस्ती झालीच पाहिजे." स्टॉकमनचें उत्तर.

शक्य आणि अवश्य यामधील झगडा हें या नाटकाचें बीज आहे हें या ठिकाणीं किती लख्ख दिसून येतें. व्यवहारवादी मंडळी शक्याचाच विचार करणार.

समाजधुरीणही शक्याचाच विचार करणार ! सत्यनिष्ठ, तत्वनिष्ठ संशोधक विद्वान शक्य काय याचा विचार करीत नाही. अवश्य काय, सत्य काय हेंच तो पाहणार ! शक्यतेचा वाली एक भाऊ पीटर आहे. अवश्याचा वाली दुसरा भाऊ डॉ. टॉमस स्टॉकमन आहे. या दोघांमधील झगडा म्हणजे हें नाटक आहे.

आणि त्यांत वैयक्तिक अहंकाराची भेसळ —

परंतु त्याचबरोबर वैयक्तिक अहंकाराचीही भेसळ या तत्त्वनिष्ठेंत झालेली कांही लपून राहत नाही. " हे लोक मला वेडे म्हणत होते नाही ! आतां समजेल यांना. साऱ्या गावांत केवढी खळबळ माजेल. कारण, पाणी आणणारे सारे नळ नवीन घालावे लागतील. प्रथमपासून मी हें सांगत होतों. पण माझें ऐकतो कोण ! घ्या म्हणावें आतां !"

अशी एक दंशित स्वाभिमानाची लकेरही डॉ. स्टॉकमनच्या त्या तत्त्वाभिनिवेशांत आहे. तसें तो बोलूनच दाखवितो. आणि अभिनिवेशाने म्हणतो की, या सर्व गोष्टींबद्दल मीं एक निवेदन कधीच तयार करून ठेवलें आहे. पण विश्वविद्यालयाकडील मत हातीं येईपर्यंत थांबणें भाग होतें. आतां हें निवेदन पाठवून देतों. चारपांच पानें खच्चून टाईप केलेलीं आहेत. आणि हें पत्रही देतों पाठवून बरोबर ! "

भोळा शेखमहंमद —

परंतु व्यवहाराच्या बाबतींत डॉक्टर स्टॉकमन किती भोळा आहे याचाही याच वेळीं प्रत्यय कसा येतो पाहा. पेत्रा त्याला विचारते, " पीटरकाका काय म्हणतील या बाबतींत ? " त्यावर स्टॉकमनचें उत्तर, " काय म्हणणार ? एवढी मोठी महत्त्वाची आणि सत्य गोष्ट उजेडांत आली याबद्दल त्यालाही आनंदच वाटायला हवा असें मला वाटतें ? "

त्याचप्रमाणे डॉ. स्टॉकमन हा कल्पनांमध्ये रमणारा जणू शेख महंमदही कसा आहे हेंही याच वेळीं व्यक्त होतें. वर्तमानपत्रांत ही बातमी द्यावी, जनतेलाही याची कल्पना असावी या गोष्टीला तर तो लगेच मान्यता देतोच; परंतु बिलिंग आणि होवस्ताद त्याची स्तुति करूं लागतात आणि शहरांत त्याला मानपत्र वगैरे देण्याबद्दल भाषा काढतात, तेव्हा डॉ. स्टॉकमन किती हुरळून जातो. विनयाने, तो असलें कांही होतां कामा नये असें म्हणतो खरें; पण त्याच्या मनांतलें बाहेर येतेंच. " एवढेंच नव्हे, " तो म्हणतो, " या कामासाठी स्नानगृह मंडळाने माझा पगार वाढविण्याचें ठरविलें तरी ती वाढ मी मान्य करणार नाही. "

आणि अशा रीतीने कर्तव्य केल्याच्या जणू आनंदांत गुंग झाल्यासारखा तो होतो. या ठिकाणीं पहिला अंक संपतो.

डॉ. स्टॉकमनने पाठविलेलें पत्र व संशोधनाबद्दलचें निवेदन पीटरकडून दुसऱ्या

दिवशीं परत आलें आणि मी समक्षच याबद्दल बोलायला येईन असा निरोप आला. त्यासंबंधी पत्नीशीं बोलणें होतांना स्टॉकमन भावाबद्दल तक्रार करतो की, त्याला शहराचें हित आपल्याशिवाय कोणीं केलेलें आवडत नाही. त्या वेळीं कॅथरीन त्याला अजीजीने सांगते की, दोघां भावांत हा झगडा कशाला ? संशोधनाचें कामही पीटरच्याच सूचनेवरून केलें असें म्हणावें झालें. त्यावरचें स्टॉकमनचें उत्तर त्याच्या स्वभावाचें उत्तम निदर्शक आहे. तो म्हणतो, " माझी तशी तयारी आहे. मला काय पाण्यांतला दोष नाहीसा झाला म्हणजे झालें. " म्हणजे एकापरी अहंभाव आहे तर एकापरी कार्याची तळमळ आहे.

दोघां नवरानायकांच्या बोलण्यांत कॅथरीनचा आजा आल्यामुळे खंड पडतो. स्नानगृहांमधील पाण्याच्या दोषाबद्दलचें संशोधन खरेंच झालें आहे याची खात्री पटल्यावर तो म्हातारा म्हणतो, " पण आपल्या भावाचे पाय मागे ओढणारा तूं असशील अशी मला कल्पना नव्हती. " अर्थात ही गोष्ट त्या म्हाताऱ्याला आवडलेली होती. स्नानगृह मंडळांतून बहुमताच्या जोरावर त्याची हकालपट्टी झालेली होती याचा त्याच्या मनांत राग होता. तेव्हा आपल्या जावयाने शहरांत चांगली धमाल माजवावी आणि स्नानगृह मंडळाचें चांगलें नाक कापावें असें डॉ. स्टॉकमनला तो प्रोत्साहनच देतो. त्या मंडळीचा नक्षा चांगला उतरला तर आपण पांच पौंड धर्मादाय करूं असेंसुद्धा तो जाहीर करतो. एवढ्यांत होवस्ताद तेथे आल्यावर त्याला अधिकच हर्ष होतो. हा संपादकही या भानगडींत आहे आणि आपल्या जावयाला वर्तमानपत्री प्रचाराची चांगली हौस आहे; तेव्हा हें प्रकरण आतां चांगलें रंगणार आणि पीटरआदि आपल्या प्रतिस्पर्ध्यांची चांगली हुर्रेवडी होणार या आनंदाच्या भरांत – " ठीक, ठीक, चालूं ठेवा हा तुमचा डाव " असें म्हणून म्हातारा निघून जातो.

स्नानगृहाच्या प्रश्नावर सत्ताधारी वर्गांशीं भांडण करण्याचा घाट —

स्नानगृहांच्या या प्रश्नाकडे प्रस्थापित सत्ताधाऱ्यांना फजीत करण्याच्या दृष्टीने पाहण्याची ही दृष्टि होवस्तादची पण आहे. " स्नानगृहांचा हा प्रश्न असा एकाकी लक्षांत घेऊन चालणार नाही. स्नानगृहांच्या वर जो नरक मॉलेडॉलपाशी आहे तेवढाच नरक डोळ्यापुढे आणून थांबतां उपयोगी नाही; तर सगळेंच जीवन ज्या दुसऱ्याच एका नरकांत सांपडून कुजून घाण होत आहे त्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे " अशी नवीच्च भूमिका होवस्ताद मांडतो. ही घाण – हा नरक म्हणजे शहरांतल्या कांही थोड्या धनिक कुटुंबाच्या हातीं केंद्रित झालेली सर्व सत्ता. डॉ. स्टॉकमन यावर जेव्हा म्हणतो की, " या लोकांजवळ ज्ञान आहे, कर्तृत्व आहे, " त्या वेळीं होवस्तादने त्याला मोठ्या चातुर्याने जाळ्यांत पकडलें. " या लोकांचें हें कर्तृत्व स्नानगृहें बांधण्याच्या वेळीं कोठें गेलें होतें ? " या आपल्या प्रश्नाने स्टॉकमनच्या मनांतील अनुकूल संवेदनेची एक तार तो छेडतो. या सर्व बुद्धया प्रतिगामी मंडळींना हुसकून लावण्यासाठी आपण आपल्या

वर्तमानपत्राचा उपयोग करणार असें तो आग्रहाने प्रतिपादतो. वर्तमानपत्रकाराने दरिद्री, दलित यांच्या उद्धारासाठीच कार्य करणें हें त्याचें कर्तव्य कसें आहे यावर तो प्रवचन करतो आणि या श्रीमंत लोकांच्या ठिकाणीं सगळें कर्तृत्व आहे ही भोळी श्रद्धा पार उखडून टाकली पाहिजे, असें म्हणून स्टॉकमनच्या बुद्धिवादी मनाची तो पकड घेतो.

अजून स्टॉकमनच्या मनाचा निश्चय झालेला नसतो. स्नानगृहांच्या निमित्ताने शहराचा अलौकिक फायदा सत्ताधारी मंडळींनी करून दिलेला असल्याने त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहणें योग्य आहे हा विचार त्याला अजून सोडीत नव्हता. इतक्यांत होवस्तादच्या पत्राचा छापणारा आणि भांडवल पुरविणारा अस्लाक्सेन आल्यावर डॉ. स्टॉकमनचें मन या उठावाला अधिक अनुकूल होतें. स्नानगृहांच्या दुरुस्तीबद्दल चळवळ डॉक्टरांनी केली तर तिला आपला स्वतःचा संपूर्ण पाठिंबा अस्लाक्सेन जाहीर करतो. लहान व्यापाऱ्यांचा तो म्होरक्या आहे. त्यामुळे 'जनतेचें' हुकमी संघटित बहुमत आपल्या पाठीशीं असल्याचा त्याला विश्वास आहे. कोणत्याही कामांत पडतांना असें हुकुमी बहुमत पाठीशीं असणें चांगलें असा तो अनुभवाचा सल्ला स्टॉकमनला देतो.

हें सगळें मान्य करूनसुद्धा स्टॉकमनचा प्रश्न असा की, एवढी सगळी ही मुलखावेगळी कडेकोट तयारी हवीच कशाला? कारण जी गोष्ट करायची ती किती साधी व सरळ आहे —

तरीपण थोडीं निदर्शनें करावींत असें अस्लाक्सेनचें मत कायमच. फक्त जरा बेताबाताने – नेमस्तपणें जें काय करायचें तें करावें एवढीच त्याची सावधगिरी; निदर्शनांचा एक भाग म्हणून डॉ. स्टॉकमनला लोकांकडून एक प्रशस्तिपत्र, मानपत्रच म्हणा, देण्याची व्यवस्था करावी; अर्थात अधिकारीवर्गाला न दुखवितां हें सर्व करावें असें सुचवून, नेमस्तपणाचा मूर्तिमंत अवतार असा हा मुरब्बी गृहस्थ शहरांत यासंबंधी वाटाघाटी करण्यासाठी म्हणून जायला निघतो. अजूनही डॉ. स्टॉकमनला एवढ्या या साध्या गोष्टीसाठी इतकी धडपड कशासाठी करायची याचा उलगडा होत नाही. शहराच्या हिताला निर्विवादपणें आवश्यक अशी एक गोष्ट; शहाणी आणि विचारीं माणसें ताबडतोब ती कबूलच करतील अशी त्याची भोळी भावना आहे.

परंतु होवस्तादला तसें वाटत नाही. कदाचित – नव्हें बहुतेक – पीटर स्टॉकमन डॉक्टर स्टॉकमनच्या सूचनेचा स्वीकार करणार नाही अशीच त्याची जाणीव आहे. आणि त्याला तर पीटर ज्याचा प्रमुख आहे त्या धनिक सत्ताधारी वर्गावर हल्ला करण्याची ऊर्मि आली आहे. तेव्हा आपण अग्रलेख तर लिहून तयार ठेवतों आणि डॉक्टरांनी आपल्या निवेदनाची नक्कलही आपल्याजवळ देऊन ठेवावी असें तो सुचवितो; हेतु की, पीटर स्टॉकमनचा विरोध समजला की, तें निवेदनही वर्तमानपत्रांत छापायला बरें.

सामान्य जनतेच्या प्रगतीबद्दलची सहानुभूति, स्वतःच्या संशोधनाबद्दलची श्रद्धा, यावरोबरच जनतेंत प्रसिद्धि – लौकिक व्हावा हीही प्रवृत्ति, स्टॉकमनच्या ठिकाणच्या या सगळ्याचा होवस्तादने चांगला फायदा घेतला. आणि जें निवेदन डॉ. स्टॉकमनने

आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच फक्त द्यायला हवें होतें त्याची प्रत त्याने छापण्यासाठी म्हणून स्टॉकमनकडून मिळविली. नोकर या नात्याने डॉ. स्टॉकमनच्या हातून हा एक मोठाच प्रमाद घडला, परंतु तें निवेदन छापण्याची वेळच येणार जाहीं; सरळ जी गोष्ट आहे ती पीटर तेव्हाच मान्य करील; मग होवस्ताद्ने तें निवेदन नुसतें वाचलें म्हणून काय बिघडतें आहे? असा त्याचा साधा सरळ विचार होता हें खरें; परंतु म्हणून कांही त्याने योग्य कार्यपद्धतीला सोडून वागणें योग्य नव्हतें.

परंतु आपल्या उत्साहाच्या भरांत स्टॉकमनला याची जाणीवही नसते. स्वतःच्या शहराच्या नागरिकांत आणि आपल्यांत बंधुभाव निर्माण झालेला असणें, लोकोपयोगी असें कांही तरी कार्य आणि तेंही आपल्या स्वतःच्या जन्मग्रामासाठी करायला मिळणें, अशा प्रकारच्या मनोराज्यांतच तो गर्क असतो. जनतेच्या हुकुमी बहुमताच्या पाठिंब्यावर विसंबून राहणें सोयीचें होईल की नाही याबद्दल कॅथरीनला पुष्कळ शंका असते. पण तिच्याकडेही लक्ष देण्याइतका तो भानावरच नसतो.

थोड्याच वेळांत स्नानगृहमंडळाचा अध्यक्ष, त्याचा भाऊ पीटर स्टॉकमन येऊन त्यांचें बोलणें होतें. त्यांत मात्र डॉक्टर स्टॉकमनला पुष्कळच अनपेक्षित धक्के बसतात. पहिली तक्रार पीटरची ही असते की, आपल्याला कळविल्याशिवाय हें असल्या रीतीचें संशोधन करणें हेंच मुळी गैर झालें; स्नानगृह मंडळासमोर डॉक्टरचें संशोधनविषयक निवेदन मांडण्यायोग्य पीटरला वाटत नाही. कारण तो म्हणतो, "तुझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे तूं कडक भाषा वापरली आहेस; स्नानगृहाकडे येणाऱ्या प्रवाशांना आम्हीं कायमचें विष पुरविण्याची सोय केली आहे, असें तुझें विधान आहे."

"अर्थात हें पूर्ण सत्य आहे" असें स्टॉकमन आवर्जून सांगत असतां, तिकडे थोडें दुर्लक्ष करून पीटर पुढे म्हणतो, "आणि तुझा निष्कर्ष असा आहे की, मॉलेडॉलपासून जी घाण पाण्यांत पाझरते असें तुझें म्हणणें, ती घाण काढून टाकण्यासाठी वेगळें गटार बांधलें पाहिजे."

स्वप्नाळू अव्यवहारीपणा —

ही गोष्ट किती मोठ्या खर्चाची होईल आणि तिला काळ किती लागेल याची डॉ. स्टॉकमनला बिलकूल कल्पना नसावी हें जेव्हा आपण ऐकतों, तेव्हां त्याच्या स्वप्नाळू अव्यवहारीपणाची थोडीशी कीव वाटल्यावांचून राहत नाही. कारण खर्चाचा वीस हजार पौंडांचा आकडा आणि बांधकामाची मुदत दोन वर्षें हें ऐकून तो चकितच होतो. दरम्यान मग स्नानगृहांची व्यवस्था काय? एकदा तेथलें पाणी विषारी आहे असा बभ्रा झाला म्हणजे मग कोणी प्रवासी येतील काय? आताच तर हंगाम सुरू होण्याची वेळ आहे; इतर ठिकाणच्या लोकांना प्रवासी आपल्याकडे वळवून घ्यायला ही नामी संधि आहे; आपल्या शहराला कांही अस्तित्व असेल तर तें या स्नानगृहांमुळे; तींच निकामी करून शहराचा संपूर्ण नाश करण्याचें पाप डॉ. स्टॉकमन जणू करीत आहे – असा निखळ

व्यावहारिक पेच पीटरच्यापुढे उभा करतो. शिवाय आधी आपली या बाबतींत पूर्ण खात्री पटलेली नाही, आणि जर कांही थोडाबहुत दोष उत्पन्न झालाच असला तर एका कर्तबगार डॉक्टरला त्यावर कांही प्रतिबंधक उपाय योजतां आलेच पाहिजेत, असें म्हणून मोठ्या दरबारी थाटांत पीटर स्टॉकमन डॉक्टर स्टॉकमनला सांगतो की, "योग्य अशा खर्चांत स्नानगृहांत काय सुधारणा करतां येतील यांचा विचार करण्याला कांही स्नानगृह मंडळ नाही म्हणणार नाही."

हें सर्व पीटरचें सांगणें डॉ. स्टॉकमनने पुष्कळच शांतपणें ऐकून घेतलेलें असतें. पण या दरबारी मिस्किलपणापुढे त्याला शांत राहवत नाही. आणि "या असल्या लुच्चेगिरीशीं मी एवढा तरी संबंध ठेवीन असें तुला वाटलें?" असें तो त्वेषाने पीटरला विचारतो; आणि "हो – हो, ही सगळी लुच्चेगिरी आहे, दगलबाजी आहे, खोटेपणा आहे; समाजाविरुद्ध, सर्व लोकांविरुद्ध हा धडधडीत गुन्हा आहे" असें निर्धाराने प्रतिपादतो. एवढेंच नव्हे तर, सुरुवातीलाच माझें न ऐकतां हल्लीच्या ठिकाणीं नळ घातल्याचा हा सगळा परिणाम आहे – तुझ्याच घोडचुकीचा हा परिणाम आहे – असेंही बजावण्याला तो कमी करीत नाही.

"परंतु हें खरें आहे असें मानलें तरी मला माझ्या इभ्रतीचा विचार केला पाहिजे; इभ्रत राहिली तरच मला शहराचें हित करतां येईल; यासाठी" आणि दुसऱ्याही कांही कारणांसाठी तें निवेदन मंडळापुढे ठेवूंच नये असें पीटर सुचवितो व आपण खाजगी रीतीने, योग्य वेळीं हा प्रश्न उपस्थित करूं असें तो म्हणतो; पण तोपर्यंत लोकांच्या कानीं यांतला एक शब्दही जातां कामा नये असें तो निग्रहपूर्वक बजावतो.

डॉक्टरबद्दल पीटरचें मत—

परंतु आधीच ही गोष्ट पुष्कळांना समजली आहे, स्थानिक वर्तमानपत्राच्या मंडळींनाही ती समजली आहे हें समजून आल्यावर पीटर डॉक्टरच्या बेलगामीपणाबद्दल हतबुद्ध होऊन विचारतो, "याचा परिणाम काय याची तुला थोडी तरी कल्पना आहे का? तुझ्या स्वतःवर आणि तुझ्या माणसांवर याचे दुर्धर परिणाम होतील. तुला पुष्कळ मदत करण्याचा माझा प्रयत्न आहे. तुझ्या वागणुकीमुळे मला शहरांत कमीपणा येऊं नये यासाठी हें करावेंच लागतें. पण अत्यंत अस्थिर, भांडकुदळ आणि बंडखोर तुझी वृत्ति; शक्याशक्यतेचा कसलाही विचार न करतां डोळ्यापुढे दिसेल त्या विषयावर वर्तमानपत्रांत लिहायला धावण्याची तुझी घातकी खोड! याच्यामुळे तुझ्यापुढे हद्द आहे. पण अशामुळे तूं स्वतःचा केवढा नाश करून घेतोस याची तुला कल्पना नाही. तुझे उपकारकर्ते कोण याचीसुद्धा तुला ओळख नाही. येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली ती केवळ माझ्यामुळे –" असा नाना प्रकारें पीटर डॉक्टरला समजवण्याचा प्रयत्न करतो.

ही शेवटची गोष्ट डॉ. स्टॉकमनला मान्य नाही. कारण स्नानगृहाची कल्पना

आपली; त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्याची जागा आपली हक्काचीच होती, असें त्याचें म्हणणें. परंतु नुसत्या कल्पनेचा काय उपयोग ? योग्य वेळीं मी होतों म्हणूनच ती कल्पना प्रत्यक्षांत आणली, असें पीटरने म्हणतांच "हो; आणि तिचा हा असा सगळा खेळ-खंडोबा करून ठेवलास" असा टोला त्याला डॉ. स्टॉकमन देतो.

त्याबरोबर डॉ. स्टॉकमनची ही भांडखोरपणाची लहर आहे असें वाटून पीटर कांहीशा रागाने त्याला "आता या प्रकरणांत आणखी कांही गोष्टी कराव्याच लागतील; त्यांत काडीमात्र दयामाया होणार नाही" असें अधिकारवाणीने बजावतो. काय करायचें डॉक्टरने ? तर मूर्खासारखी ही गोष्ट घटकर्णी केली या चुकीच्या परिमार्जनार्थ आता त्याने स्वतःच जाहीर करावयाचें की, अधिक शोधानंतर परिस्थिति कांही इतक्या धोक्याची किंवा आणीबाणीची नाही असें आपल्याला आढळून आलें आहे आणि स्नानगृहांच्या व्यवस्थापक मंडळाकडून जरूर ती सर्व उपाययोजना केली जाईल अशी आपली पुरी श्रद्धा आहे.

नोकर या नात्याने डॉक्टरला स्वतंत्र मताचा हक्क नाही—

डॉ. स्टॉकमनला हें करणें सर्वथा अशक्य होतें. कारण त्याचें असें ठाम मत होतें की, अशा रीतीने कोणत्याही तात्पुरत्या उपायांनी हा दोष दूर होण्यासारखा नव्हता. परंतु पीटर जेव्हा सांगतो की, स्नानगृह मंडळाचा एक नोकर या नात्याने डॉ. स्टॉकमनला वैयक्तिक स्वतंत्र मत धारण करण्याचा अधिकार नाही, तेव्हा मात्र डॉक्टरला प्रचंड धक्का बसतो. एक डॉक्टर म्हणून, एक शास्त्रीय संशोधक म्हणून सत्य सांगण्याचा आपल्याला अधिकार असूं शकत नाही हा विचार त्याला समजूंच शकत नाही. आणि "या पृथ्वीतलावरील कोणत्याही विषयासंबंधी माझें मत व्यक्त करायला मी स्वतंत्र आहें" असा निर्धार तो व्यक्त करतो. पण "स्नानगृहांच्या बाबतींत कोणतेंही मत व्यक्त करण्याची समितीची तुला मनाई आहे, तसा माझा – समितीच्या अध्यक्षाचा बंदीहुकूम आहे," असें जेव्हा पीटर बजावतो त्या वेळीं स्टॉकमनला तें सगळें असह्य होऊन "तूं माझा भाऊ नसतास तर" असा उद्गार काढून तो पीटरला जणू मारायला उभा राहतो. परंतु थोडासा शांत होऊन "आणि नाही हा हुकूम पाळला तर ?" असें तो पीटरला विचारतो; व "तुम्हीं जर कांही पत्रक काढलेंत तर मी वर्तमानपत्रांत त्याबद्दल लिहून तुमची चूक उघड करीन" असें म्हणतो. तेव्हा पीटर त्याला बजावतो की, "तर मग तुला कामावरून काढून टाकण्याचें ठरल्यास माझा कांही इलाज चालणार नाही." आणि अशा रीतीने त्याने आपला, आपल्या कुटुंबाचा आणि आपल्या शहराचा नाश करूं नये यासाठी तूं तरी याला आवरून धर, असें आपल्या भावजयीला कांहीशा तळमळीने तो सांगतो.

विषाने भरलेला कल्याणाचा झरा—

आपण आपल्या शहराचा नाश करणार हा आरोप डॉ. स्टॉकमनला सहन होत

नाही. "तूं आपल्या हटवादीपणाने शहराच्या कल्याणाचा महत्त्वाचा मुख्य झराच बंद करून टाकीत आहेस" असें जेव्हा पीटर डॉक्टरला सांगतो, त्या वेळीं केवढ्या तरी पोटतिडीकेने डॉक्टर उद्गारतो, "अरे पण हा झरा विषाने भरलेला आहे बाबा! वेड तर लागलें नाही तुला!"

"दारूचें उत्पन्न गमावून देशाच्या आर्थिक दृढतेला बाध आणूं नका" असा सल्ला देणारांना महात्मा गांधीनी अगदी नेमकी हीच गोष्ट सांगितली असती नव्हे, की "बाबांनो, वेड तर लागलें नाही तुम्हांला? दारूचा पैसा हा पापाचा पैसा आहे."

"नरक विकून स्वतःचें पोट जाळण्याचा हा प्रकार आहे" असा डॉ. स्टॉकमनने केलेला आरोप पीटरला सहन होत नाही व असा आरोप करणारे जनतेचे वैरी होत, असें तो म्हणतो. त्यावर पुन्हा डॉ. स्टॉकमनचा तोल सुटतो आणि "शरम नाही वाटत?" असें ओरडून तो या वेळीं पीटरच्या अंगावर खरोखरच धावतो. पेत्रा आणि कॅथरीन त्याला कसेंबसें आवरून धरतात आणि "तुला धोक्याची सूचना मीं दिली आहे; तेव्हा आता स्वतःच्या आणि कुटुंबाच्या हिताचें काय आहे, काय नाही, याचा नीट विचार कर" असें म्हणून पीटर निघून जातो.

न्याय आणि सत्ता यांच्यामधील झगडा—

पीटरने आपल्याला जनतेचा वैरी म्हणावें याबद्दल डॉ. स्टॉकमनला भयंकर संताप आलेला असतो. आणि हें मी केव्हाच सहन करणार नाही, असें जेव्हा तो उसळून म्हणतो, तेव्हा त्याला शांत करण्यासाठी कॅथरीन म्हणते, "पण त्याच्या बाजूला सत्ता आहे ना?" त्यावर माझ्या बाजूला 'न्याय' आहे असें डॉ. स्टॉकमन तिला बजावतो.

अशा रीतीने हा झगडा न्याय आणि सत्ता यांच्यामधला आहे हें नाटककार पुन्हा एकदा व्यक्त करतो. पण सत्तेचें पाठबळ नसेल तर न्यायाचा कांही उपयोग आहे, असें कॅथरीनला वाटत नाही. स्वतःच्या भावाशीं विरोध करायला डॉ. स्टॉकमनने उभें ठाकावें हेंही तिला पटत नाही. सत्य आणि न्याय यांच्यासाठी त्याने झगडण्यांत कांही अर्थ आहे असें तिला वाटत नाही. कारण सत्ताधारी मंडळींनी एकदा नाही म्हटलें म्हणजे नाही, असा या जगाचा तिचा अनुभव आहे. म्हणून स्वतःसाठी, मुलांसाठी, आपल्या प्रिय कॅथरीनसाठी, त्याने हा विचार सोडावा असें ती त्याला तळमळून सांगते. त्यावर असें केल्याने सारा जन्मभर माझी मनःशांति पार नाहीशी होईल, असें जेव्हा तो म्हणतो त्या वेळीं, यापूर्वीचे तिचे ते दारिद्र्यांतील अत्यंत अडचणीचे दिवस तिच्या डोळ्यापुढे उभे राहून तिच्या जिवाचा थरकांप होतो आणि आमच्या मनःशांतीचें काय होईल याचा विचार करा, असें ती त्याला विनविते.

संतापाचा भडका कसाबसा तरी आवरून आणि मुठी वळून डॉ. स्टॉकमन उद्गारतो, "या नोकरीच्या गुलामगिरीने स्वाभिमानी आणि स्वतंत्र विचाराच्या माणसाची ही अशी दशा होते! कॅथरीन, किती भयंकर प्रकार आहे नव्हे हा!"

भयंकर आहे आणि करुणास्पदही आहे. म्हणूनच हा प्रसंग या करुण नाटकांतील एक प्रेक्षकांचें मन विकल करणारा प्रसंग आहे. स्टॉकमनवर होत असलेल्या अन्यायाची कल्पना कॅथरीनला नाही असें नाही. पण दोन लहान मुलांचें पुढें कसें होईल या विचाराने ती भयभीत होते. त्या वेळीं त्यांचे दोन्ही मुलगे बाहेरून येतात. त्यांना पाहतांच डॉ. स्टॉकमनचा निश्चय होतो आणि तो म्हणतो,

"नाही — मी या जोखडाखाली मान तुकवणार नाही. माझे मुलगे मोठे होतील तेव्हा त्यांच्यापुढे मान ताठ ठेवून उभे राहण्याचा अधिकार मला असायला हवा."

डेली मेसेंजरचा संपादक होवस्ताद आणि दुय्यम संपादक बिलिंग यांना पीटर स्टॉकमन प्रभृति वरिष्ठ वर्गीय लोकांचा नक्षा उतरण्याची मोठी खुमखुम. म्हणून डॉ. स्टॉकमनच्या या संशोधनाचें निमित्त त्यांना चांगलें वाटलें. छापखानेवाला अस्लाक्सेन याने कांही लेख वाचलेला नाही. परंतु संपादकांचें जेव्हा म्हणणें पडलें की, लेख – म्हणजे डॉ. स्टॉकमनचें संशोधनविषयक निवेदन – अत्यंत मुद्देसूद आहे आणि शहरांतील विचारी लोकांना सुद्धा तो मान्य होईल, तेव्हा तो छापावा असें अस्लाक्सेनही म्हणतो. स्टॉकमनच्या उतावीळ उत्साहाला त्यामुळें भरतें येतें. लेख अगदी बिनचूक छापावा; नाही तरी आपल्याला खूप धमकी देण्यांत आली आहे, तेव्हा या मंडळींना एकदा आपलें पाणी दाखविलेंच पाहिजे, वगैरे मनोराज्य त्याचें चालू होतें. झगडा करावा याला अस्लाक्सेनही तयार होतो. परंतु जरा बेताने, सावधगिरीने घ्यावें असा त्याचा सारा कटाक्ष आहे. कारण कसल्या धोक्यांत त्याला पडायला नको आहे. त्यावर डॉ. स्टॉकमनचें उत्तर, त्याच्या या नाटकांतील भूमिकेचें फार चांगलें उदाहरण आहे. तो म्हणतो, "इथे धोक्याबिक्याची फिकीर आहे कोणाला? मी जें कांही करतों आहे तें सत्यासाठी आणि माझ्या सदसद्विवेकबुद्धीसाठी करतों आहे!"

त्याच्या या ध्येयवादित्वाचा थोडासा परिणाम अस्लाक्सेनवरही होतो. लोकांचा साथी, 'लोकमित्र' अशी एखादी पदवी डॉ. स्टॉकमनला देण्याची भाषाही तो काढतो.

निव्वळ द्रव्यार्थी संपादक —

परंतु डॉक्टर निघून गेल्यावर संपादकद्वय आणि अस्लाक्सेन यांच्यामध्ये, आपण करतों तें ठीक आहे की नाही याबद्दल घरगुती चर्चा होते. त्यामध्ये तत्त्वनिष्ठेचा आव आणणारा बिलिंग, पीटर गटाच्या पुष्ठ्यांतील एक नोकरी मिळविण्याच्या खटपटींत आहे हें उघडकीला येतें. अस्लाक्सेनही कबूल करतो की, स्थानिक अधिकाऱ्यांबद्दल आपण जरा नरमाईनेच वागतो आणि वागणार. अशा माणसावर अवलंबून न राहण्यासाठी डॉ. स्टॉकमनकडून कांही पैशाचा लग्गा साधला तर पाहावा असा विचार अस्लाक्सेनच्या पाठीमागे संपायकद्वयामध्ये होतो. परंतु स्टॉकमन तर कर्माचा दरिद्री. तथापि बिलिंगला आशा असते की, डॉ. स्टॉकमनला आजेसासऱ्याकडून चांगलें घबाड मिळणार आहे. आणि

अशा रीतीने ही मंडळी डॉ. स्टॉकमनच्याभोवती पिंगा घालायला कां तयार झाली आहे, याचें मोठें चपखल निदर्शन करून झाल्यावर, स्टॉकमनची मुलगी पेत्रा हिच्याकडे दिलेल्या एका गोष्टीच्या भाषांतराच्या बाबतींत त्यानंतर लगेच जो संवाद होतो त्यावरूनही संपादकांची दृष्टि कशी निव्वळ द्रव्यार्थी आहे हें आणखी चांगलें स्पष्ट होतें. आणि किती भुसभुशीत पायावर डॉ. स्टॉकमनच्या मनोराज्यांची आणि सत्यासाठी करावयाच्या झगड्याची इमारत उभारली जात होती हेंही उघड होतें. द्रव्यार्थीपणाबरोबरच होवस्तादची डॉक्टरबद्दलची अनुकूलता, तो पेत्राचा, म्हणजे जिच्यावर त्याचें प्रेम होतें तिचा बाप आहे यासाठी कशी होती, हेंही पेत्राच्या त्या मुलाखतींत उघड व्यक्त होतें.

अशा या बिनबुडाच्या मंडळीवर आधारलेला डॉ. स्टॉकमनचा झगड्याचा व्यूह, पीटर स्टॉकमनसारखा चतुर व्यवहारी गृहस्थ संपादकांच्या कचेरींत येऊन त्याची संपादकांशीं बोलणींचालणीं झाल्यावर, पत्त्यांच्या बंगल्यासारखा उडून जातो तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटण्याऐवजी तत्त्वनिष्ठेच्या बाता मारणाऱ्या ढोंगी लोकांची चीड येते आणि डॉ. स्टॉकमनच्या भोळेपणाबद्दल कीव वाटते.

पीटर स्टॉकमन आल्यावर पहिल्याच पावलीं अस्लाक्सेन वर्तमापत्रांतल्या लेखनाशीं आपला कांही संबंध नाही असें सांगून हात झाडून मोकळा होतो. पीटर शहरांतील कनिष्ठ मध्यम वर्गीय लोकांच्या त्यागबुद्धीची मोठी स्तुति करून अस्लाक्सेन वगैरेंना हरबऱ्याच्या झाडावर चढवितो. आणि स्नानगृहांची दुरुस्ती करण्यासाठी लागणाऱ्या वीस हजार पौंडांचें ओझें कररूपाने स्वीकारावयाला व बांधकाम पुरें होईपर्यंत जाणारा जो दोन वर्षांचा काळ, तेवढ्यामध्ये होणारें नुकसान सोसायला ही त्यागशील मंडळी सहज तयार होतील, असें मिस्किलपणाने सुचवितो. तेव्हा अस्काक्सेन आणि त्याचे सहकारी यांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडतो आणि सगळाच पवित्रा एकदम बदलून डॉ. स्टॉकमनचें निवेदन तर छापावयाचें नाहीच; पण उलट स्नानगृह मंडळाचा अध्यक्ष या नात्याने पीटर स्टॉकमनचें एक छोटेसें निवेदन छापावयाचें असा बेत हा हा म्हणतां मुक्रर होतो.

सत्तेचा विजय : न्यायाचें घर उन्हांत—

यानंतरचा या अंकांतील प्रसंग अत्यंत नाट्यपूर्ण आहे. वरील बनाव बनत असतांनाच डॉक्टर स्टॉकमनचें आगमन होतें. त्यामुळे सर्वांचीच घांदल उडते. या कारणासाठी आपण वर्तमानपत्राच्या कचेरींत आलों हें डॉक्टरला कळावें हें पीटरला नको होतें. त्यामुळे त्याला कसेंतरी पलीकडल्या खोलींत ढकललें जातें. परंतु तिकडे जातेवेळीं त्याचें नगराध्यक्षाचें शिरस्त्राण आणि दंड या वस्तु तेथेच राहतात. डॉक्टर स्टॉकमन आपल्या लेखाच्या कल्पनेनेच भारून गेलेला आहे; त्याची ठशांत जुळणी झालेली पाहण्यास तो उतावीळ झालेला आहे. लेख छापून आल्यावर उद्या आपल्याबद्दल लोकांची अत्यंत अनुकूल प्रवृत्ति निर्माण होणार या जाणिवेने तो हुरळून गेला

आहे. लोकांचें आपल्यावर केवढें मोठें प्रेम आहे अशाच भ्रमांत तो आहे. त्याच्या या भोळेपणाची होवस्ताद्‌ला सुद्धा कीव येते आणि तो त्याला खरी स्थिति काय आहे हें सांगण्याचा प्रयत्न करूं पाहतो. पण डॉक्टर त्याला बोलूंच देत नाही. डॉक्टरला वाटतें की, आपल्याला मानपत्र द्यावयाचें, आपल्यासाठी थैली जमा करावयाची, आपल्या सन्मानार्थ मेजवानी करावयाची, या किंवा असल्या कांही बेतांबद्दल होवस्ताद बोलूं पाहत आहे! "डॉक्टर, केव्हा तरी खरा प्रकार तुम्हांला सांगायलाच हवा–" असें तो म्हणतो. तोच कॅथरीन तेथें येते. आपल्या मुलाबाळांच्या कल्याणासाठी डॉक्टरचें तें निवेदन छापलें जाऊं नये, अशी विनंति करायला ती गृहिणी घर सोडून तेथे आली होती! परंतु "एखाद्याला बायको आहे, मुलें आहेत एवढ्यासाठी सत्याची घोषणा करण्याला त्याला प्रतिबंध व्हावा? लोकहितकर असें नागरिकाचें जीवन त्याला जगतां येऊं नये! तुला वेड तर नाही लागलें?" असा डॉक्टर तिचा अधिक्षेप करतो.

कॅथरीन होवस्ताद्‌लाच दोष देते की, "तुम्ही मंडळी माझ्या भोळ्या नवऱ्याला नादीं लावून त्याच्या मुलाबाळांच्या तोंडचा घास हिरावून घेत आहांत. कारण त्याचें निवेदन प्रसिद्ध होणें म्हणजे त्याची बडतर्फी नक्कीच!" परंतु डॉक्टरला आत्मविश्वासाचा एवढा मोठा झटका आलेला आहे की, कोणाची आपल्याला बडतर्फ करण्याची छाती नाही, असें त्याला वाटतें. एवढा मोठा उदारमतवादी समाजाचा, संघटित बहुमताचा पाठिंबा आपल्याला असल्यावर, सत्य आणि जनता यांचाच झगड्यांत जय होणार, याच जणू नशेंत तो आहे – एवढ्यांत पलीकडे नगराध्यक्षाचें शिरस्त्राण आणि दंड पाहून तो एकदम चमकतो. पण अजून त्याची उत्साहाची नशा उतरण्याजोगें कांही झालेलें त्याला ठाऊक नसतें. नगराध्यक्षाचें शिरस्त्राण चढवून, दंड हातांत घेऊन नगराध्यक्षाच्या आविर्भावाने तो इकडेतिकडे फेऱ्या घालूं लागतो. यामुळे संताप अनावर होऊन पीटर त्या ठिकाणीं प्रवेश करतो आणि "या माकडचेष्टा बंद कर" असें भावाला बजावतो. पण डॉक्टर त्याची थट्टाच उडवूं पाहतो. लोकमताचा आता मला पाठिंबा आहे. तुझीं सगळीं अधिकारस्थानें मीं आता पार वाऱ्यावर उडवून टाकणार; होवस्ताद आणि ब्रिलिंग आता रोज माझ्या आघाडीचा भडिमार सुरू करणार, अस्लाक्सेनची घरमालक समिति चळवळीचा झेंडा उभारणार – असें तो पीटरला बजावूं लागतो.

परंतु अरेरे! त्याचा एकेक आधारस्तंभ पटापट कोसळून पडतो. अस्लाक्सेन नाही, होवस्ताद नाही, ब्रिलिंग नाही — वर्तमानपत्रांत डॉक्टरच्या बाजूने एक शब्द छापण्याची कोणाची छाती नाही, उदारमतवादी लोकमतही डॉक्टरच्या बाजूला नाही, हें दहापांच क्षणांतच, एकामागून एक घण डोक्यावर मारावा, अशा रीतीने डॉक्टर स्टॉकमनच्या प्रत्ययाला येतें.

सर्व कांही डॉक्टरच्या लक्षांत येतें. तो गडबडत नाही. परंतु एकदम गंभीर

होतो. पीटरचें शिरस्त्राण आणि दंड अगदी शांतपणें त्याला परत देतो. पीटर म्हणतो, "तुझें नगराध्यक्षपद जरा जास्तच लौकर संपलें, नव्हे?" त्याला तो उत्तर देतो, "अजून तरी कांही सारेंच संपलें असें समजूं नकोस." संतापाने तो गुदमरत असतो. पीटरचें निवेदन छापलें जाणार; पण आपलें नाही; आणि तेंही आपल्या कुटुंबाच्या रक्षणासाठी या सबबीवर, हें त्याला असह्य होतें. तथापि तो गंभीरपणा सोडीत नाही. स्वतःच्या निवेदनाच्या चारपांचशे प्रती छापून वाटाव्या असा तो विचार करतो. पण प्रती छापून मिळण्यासही नकार मिळतो. अस्लाक्सेन सांगतो की, भारंभार सोनें दिलें तरी आपण तें छापणार नाही आणि गांवांतही कोणी छापणार नाही.

डॉक्टर सांगतो, सभेमध्ये जनतेला हें मी वाचून दाखवीन. परंतु सभेला जागाही मिळणार नाही, असें अस्लाक्सेन आणि बिलिंग मोठ्या ईर्ष्येने उद्गारतात.

या प्रसंगीं कॅथरीनच्या ठिकाणीं अन्यायाबद्दलच्या चिडीचा जो उद्रेक नाटककाराने व्यक्त केला आहे तो कोणाच्याही अंतःकरणाला चटका लावील. ती जेव्हा म्हणते की, या सगळ्या लोकांनी एकदम तुमच्याशीं असा विरोध कां मांडावा? त्यावर डॉक्टर चिडीच्या स्वरांत म्हणतो, "या शहरांतले सगळे हे पुरुष तुझ्यासारख्या म्हाताऱ्या बाया झाले आहेत म्हणून." त्यासरशी उसळून कॅथरीन म्हणते, "माझ्यासारखी बाई सुद्धां प्रसंगीं किती मर्द बनते हेंच तर मग तुम्ही पाहा. या झगड्यांत मी तुमच्या बरोबरीनें राहून झगडणार आहें."

डॉक्टरला केवढा आनंद होतो. बेहत्तर आहे सभेला जागा नाही मिळाली तर; ढोलकें घेऊन तिठ्यातिठ्यावर हिंडून वाचून दाखवीन मी निवेदन माझें, या त्याच्या म्हणण्याला कॅथरीन पाठिंबा देते. पीटर त्याला मूर्ख म्हणतो तिकडे ती लक्ष देत नाही. मुलांनाही पण तुमच्याबरोबर पाठवीन असें उलट ती डॉक्टरला म्हणते. डॉक्टर म्हणतो "हो – पेत्रा पण येईल; आणि तूंही ये."

परंतु कशी झाली तरी ती जुन्या जमान्यांतली घरवाली स्त्री होती. ती म्हणते, "नाही, मी रस्त्यावर नाही येणार. घराच्या खिडकींत बसून तुमचा हा प्रचार बघत राहीन मात्र मी!"

आपल्या कुटुंबियांचा आपल्याला पाठिंबा आहे या आनंदांत "समाजसुधारणेच्या या देशभक्ताच्या मोहिमेंत कोण कोण भेकड माणसें आड येतात तें पाहतोंच मी" असें म्हणून कॅथरीनला घेऊन डॉक्टर निघून जातो; "आता या वेड्याने हिचेंही डोकें फिरविलें!" असें म्हणून पीटर विषण्णतेने असंमतिदर्शक मान हलवितो.

चवथ्या अंकामध्यें सर्व प्रसंग सभेचा आहे. अस्लाक्सेन, होवस्ताद, बिलिंग, पीटर यांनी जी गोष्ट तिसऱ्या अंकांत सांगितली तिचा प्रत्यक्ष अनुभव या सभेंत आला. म्हणजे त्यांचा आणि त्यांच्या अनुयायांपैकी कोणाचाही पाठिंबा डॉक्टर स्टॉकमनला मिळाला नाही; उलट प्रत्यक्ष विरोधच सर्वांनी केला. हा सभेचा सर्वच अंक मुळांत

वाचला पाहिजे; त्यापेक्षांही चांगल्या नटांनी प्रत्यक्ष रंगभूमीवर तो करून दाखविलेलाच पाहायला पाहिजे. म्हणजे सर्वसामान्य जनतेच्या प्रवृत्ति, सभेला येणारांची बघेपणाची वृत्ति, खरें काय आणि खोटें काय याबद्दलची संपूर्ण बेफिकिरी, मेंढराप्रमाणे कोणाच्या तरी मागून जाण्याचा स्वभाव आणि मनुष्य खरा-खोटा किंवा चांगला-वाईट हें मुळींच न पाहतां, नुसती टिंगल करून मजा लुटण्याकडचा कल, या सर्व प्रकारांचें केवढें प्रभावी दर्शन होण्याचा संभव आहे. भांग पिऊन 'आत्मा अमर आहे' असा मंत्र म्हणत गोंधळ घालणाऱ्या नोकरमंडळीच्या त्या प्रसिद्ध देखाव्यापेक्षा अशा प्रकारच्या मनोवृत्तीचें दर्शन या नाटकाच्या सभेच्या प्रवेशांत कितीतरी पटीने अधिक होईल.

सभेंत स्टॉकमनविरोधी कट यशस्वी —

अशा या सभेंत वक्त्याला अध्यक्षाची गरज नसतांना अध्यक्ष लादण्यांत येतो; आणि तो मान अस्लाक्सेनला मिळतो. स्टॉकमनच्या विरुद्ध रचलेला हा कट असा प्रारंभापासूनच यशस्वी होतो. अध्यक्ष म्हणून अस्लाक्सेनच स्वतः मोठें भाषण करून डॉक्टर स्टॉकमनने सभेंत नेमस्तपणाच्या मर्यादा न ओलांडतां भाषण करावें असें मुद्दाम खोचकपणाने सुचवितों. नंतर तो बोलण्याची संधि पीटर स्टॉकमनला आधी देतो. या संधीचा फायदा घेऊन पीटर डॉ. स्टॉकमनच्या स्नानगृहांविषयीच्या सूचनेमुळे लोकांवर कराचें ओझें कसें वाढेल हें दाखवून डॉक्टरच्या भाषणाला प्रतिकूल भूमि निर्माण करून ठेवतो. त्यानंतर होवस्तादला बोलण्याची संधि दिली जाते. डॉ. स्टॉकमनच्या विरुद्ध उभे राहण्यांत आपल्याला फार कष्ट पडले, परंतु सत्यासाठी व लोककल्याणासाठी आपल्याला तसें करणें भागच होतें वगैरे सांगून, चतुराईने स्टॉकमनबद्दल लोकमत आणखी प्रतिकूल करण्याला तो मदत करतो. अखेर डॉक्टर स्टॉकमनला स्नानगृहांसंबंधी बोलायला प्रतिबंध करावा हा पीटरचा ठराव सभेपुढे मांडण्याचा प्रश्न उत्पन्न होतो, तेव्हा त्या विषयावर आपणाला बोलायचेंच नाही असें म्हणून डॉ. स्टॉकमन लोकांना स्तिमित करतो. परंतु त्याचें भाषण, किंवा भाषणाचा प्रयत्न अत्यंत अव्यवहारीपणाचा आणि लोकक्षोभ काढविण्याला कारणीभूत होतो. कारण, सगळ्या भाषणांत त्याने सामान्य जनतेचा घोर उपहास करण्याचा, त्या समाजाला शिव्या देण्याचा प्रयत्न मोठ्या अट्टाहासाने केला. सत्य आणि स्वातंत्र्य यांचा सर्वांत भयंकर शत्रू म्हणजे बहुमतवाली सामान्य जनता, हें मुख्य सूत्र त्याने आपल्या भाषणासाठी घेतलें; हा म्हणे त्याचा मोठा नवा शोध होता. बहुसंख्य जनता म्हणजे अडाणी लोकांचा समुदाय; त्यांच्या हातीं सत्ता म्हणजे मूर्ख लोकांच्या हातीं सत्ता; सत्ता फक्त थोड्या शहाण्यांच्या हातीं असली पाहिजे, सामान्य जनता म्हणजेच मानवी समाजांतील खरा गाभा ही एक केवळ वर्तमानपत्री थाप आहे, संस्कारयुक्त मानव हा खरा समाजाचा प्रतिनिधि समजला पाहिजे, वगैरे सिद्धांत सांगतांना, खायला प्यायला न मिळणारें, गटारांत लोळणारें कुत्रें आणि चांगल्या घरीं व्यवस्थित वाढविलें जाणारें कुत्रें यामधील

फरक उदाहरणादाखल सांगण्यास त्याने सुरुवात केली. त्यामुळे श्रोतृसमाज स्वाभाविक चिडला. डॉ. स्टॉकमन पुष्कळ शांत चित्ताने आपलें विवेचन करण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु त्याला अडथळे फार होऊं लागले. तो तो त्याचा तोल सुटत गेला; आणि असत्याच्या पायावर शहर जगविण्यापेक्षा शहर जाळून टाकणें चांगलें असें तो सांगूं लागला. त्यासरशी हा गृहस्थ लोकांचा – जनतेचा – वैरी आहे असा श्रोतृवर्गांमधून ओरडा होऊं लागला. या गोष्टीचा फायदा घेऊन "ही सभा जाहीर करते की, स्नान-गृहांतील वैद्यकीय अधिकारी हा जनतेचा वैरी आहे" असा ठरावच अस्लाक्सेन मांडतो. स्वाभाविकच तो पासही होतो. लोक डॉ. स्टॉकमनला दारुड्याही म्हणतात; दंगल होते; आणि त्या क्षणीं जरी नाही तरी पुढें घरीं गेल्यावर आढळून येतें की कुणीं तरी त्याची विजारही फाडली होती.

डॉ. स्टॉकमनने स्वतःच बोलविलेल्या सभेचा असा सर्वस्वी फजीतवाडा झाला. त्याचा आजेसासराही रागावून त्याला बजावून सभेंतून निघून गेला की, "माझ्या चामड्याच्या कारखान्यांतील घाण पाण्यांत मिसळून येते ही गोष्ट तूं वर्तमानपत्रांत जाहीर केलीस तर तूं आपल्याच पायावर फार मोठा धोंडा पाडून घेशील. अशा रीतीने ज्याने या सभेसाठी जागा दिली होती तो कॅप्टन हॉर्स्टर, त्याचीं स्वतःचीं मुलें आणि त्याची बायको यांखेरीज त्याला भला म्हणायला कोणी कोणी शिल्लक राहत नाही. त्याच्या घरीं नेहमी पुरव्या झोडणारा बिलिंगसुद्धा नरो वा कुंजरो वा करून त्याच्या दारुबाजीबद्दलच्या संशयाला चिथावणीच देतो. आणि शेवटीं नगराध्यक्षाच्या जयजयकारांत सभा संपवून लोक जातात.

डॉ. स्टॉकमन मागल्या वाटेने घरीं जायला तयार होत नाही. उलट ख्रिस्ताचें वाक्य "तुम्ही काय करीत आहांत हें तुम्हांला समजत नाही; तुम्हांला मी क्षमा करतों" हें बोलून जातां जातां लोकांना तो आणखीच चिडवतो. त्यामुळे बिथरून लोक "चला याच्या घरावर दगडफेक करूं" असें म्हणत "जनतेचा वैरी – लोकांचा वैरी" अशा घोषणा करीत त्याच्या घराकडे जातात. जिकडे तिकडे या घोषणेचाच ध्वनि दुमदुमत राहतो.

या सगळ्याचा परिणाम काय झाला याचें धावतें दिग्दर्शन सुरुवातीला केलेंच आहे. घरावर दगड आले; तावदानें आणि फर्निचर यांची मोडतोड झाली. घरांतील सर्व नोकर मंडळी काम सोडून गेली. लहानग्या मुलांची शाळेंतून हकालपट्टी झाली. व्याख्यानासाठी आपल्या घराची जागा देणारा कॅप्टन हॉर्स्टर याची कसानाची नोकरी गेली. त्यामुळे स्टॉकमन कुटुंबाचा अमेरिकेला जाण्याचा बेतही फिसकटला. शहरांत राहून वैद्यकीचा व्यवसाय करावा तर घरमालक आणि वाणी उद्‌मी यांच्यामध्ये डॉक्टरवर बहिष्कार घालण्याची चळवळ सुरू झाली. वैद्यकीय अधिकारीपद तर सुटलेंच आणि आजेसासऱ्याकडून कांही वर्षांसन मिळण्याची आशा होती तीही नाहीशी झाली.

लोकांचा वैरी होणें डॉक्टरच्या स्वभावांतच नाही—

अमेरिकेला जाण्याचा बेत कॅथरीनला कांही मनापासून मान्य नव्हता. कारण, आपल्या मुलांचें पुढें काय होईल ही तिला खरी काळजी असते. परंतु ज्यांचीं डोकीं ठिकाणावर नाहींत, आणि जे लोक माणसाला कुजवून कुजवून मारण्याच्या प्रवृत्तीचे आहेत अशा लोकांत राहून आपल्या मुलांचें कल्याण तरी काय होणार, असा डॉ. स्टॉकमनचा प्रश्न असतो. याच वादविवादांत डॉक्टर जेव्हा म्हणतो की, "नाही तरी हे लोक मला लोकांचा वैरी म्हणतात ना? मग मी लोकांचा वैरीच होणार आतां," त्या वेळीं तुमच्या "स्वभावांतच ही गोष्ट नाही" हा कॅथरीनने मारलेला शेरा किती समर्पकपणें डॉ. स्टॉकमनच्या स्वभावाचें दिग्दर्शन करतो!

प्रत्येकजण, आमचें कांही तसें मत नाही, परंतु लोकमतापुढे आमचा इलाज नाही, असें म्हणूनच डॉ. स्टॉकमनपासून दूर होत होता, किंवा त्याला आणि त्याच्या मुलांमाणसांना दूर करीत होता. पीटर स्टॉकमननेही त्याच्या हातीं बडतर्फीचा हुकूम देतांनाही हेंच सांगितलें की, स्नानगृह मंडळाचा नाइलाज आहे. सध्या डॉ. स्टॉकमनने शहर सोडून जावें; मग त्यानें आपलें मत जर बदललें – थोडी माघार घेतली तर त्याची नोकरी परत मिळूं शकेल असें मधाचें बोटही पीटरने लावून पाहिलें. "पण मग लोकमताच्या भीतीचें काय?" असा त्यावर डॉ. स्टॉकमनने खोडा घातला असतां, पीटरने स्वच्छच सांगितलें की, लोकमत हें केव्हांच स्थिर नसतें आणि स्नानगृह मंडळाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने डॉ. स्टॉकमनने अशी कांही तरी चुकीची कबूली देणें हें आवश्यकच आहे.

परंतु ज्यामुळे स्वतःला स्वतःचीच शरम वाटेल असें कृत्य करण्याची डॉ. स्टॉकमनची तयारी नव्हती. त्याचा पक्ष व्यवहारी नसला तरी सत्याचा होता. आणि तात्कालीन माथेफिरूपणाचा जोर ओसरल्यावर जनमनांत डॉ. स्टॉकमनवर अन्याय झाल्याची जाणीव निर्माण होऊन कायमची घर करून राहील हें पीटर ओळखून होता. यासाठी डॉ. स्टॉकमनने आपली भूमिका चुकीची आहे हें कबूल करावें, असें त्याला फार व्हायला हवें होतें. म्हणून मग आणखी एका बाजूने तो डॉक्टरवर हल्ला चढवितो. आपल्या सासऱ्याच्या पैशांवर विसंबून तूं हा हटवादीपणा करीत असशील तर तुझी फार फसगत होते आहे असें डॉक्टरला पीटर बजावतो. "तुझ्या सासऱ्याजवळ पुष्कळच माया आहे. त्याने मृत्युपत्र करून ती सगळी तुम्हां पतिपत्नीसाठी आणि नंतर तुमच्या मुलांसाठी ठेवलेली आहे, हें खरें आहे." हें पीटरचें विधान ऐकून डॉक्टरला मोठाच भार शिरावरला उतरल्यासारखें होत आहे, तोच पुढे पीटर म्हणतो, "पण हें मृत्यु सर्व पत्राअन्वयें आहे. आणि सासरा मृत्युपत्र बदलण्याची शक्यता आहे हें तूं विसरूं नकोस."

डॉक्टरच्या विरुद्ध पीटरच्या हातीं शस्त्र!—

त्यावर डॉ. स्टॉकमन भोळेपणाने म्हणून जातो की, "हें अशक्य आहे. तूं आणि

तुझे शहाणे साथीदार यांच्यावर मी हल्ला करायला निघालों हें पाहून तर मार्टेन किलला अत्यंत हर्षच झाला आहे.'' हें ऐकल्यावर पीटरला स्वर्गच हाताशीं आल्यासारखें होतें. जनतेला डॉ. स्टॉकमनच्या विरुद्ध सांगायला त्याला एक मोठेंच साधन सापडतें. '' म्हणजे हे सगळे हल्ले तूं शहरांतल्या सज्जन मंडळीवर वेछूटपणें केलेस त्याचें कारण या म्हाताऱ्याचें हें मृत्यूपत्र काय? मृत्युपत्राच्या मोबदल्यांत हे हल्ले काय?'' असें म्हणून व '' आतां तुझी बडतर्फी म्हणजे काळ्या चिऱ्यावरची रेघ झाली; तुझ्या आमच्या-मधील सगळा संबंध आता संपला. आता आमच्या हातीं तुझ्याविरुद्ध वापरायला एक शस्त्र मिळालें'' असें बजावून अंतःकरणावरील एक मोठें ओझें दूर झाल्यासारखें होऊन पीटर निघून जातो.

प्रामाणिक माणसाची सगळी पुण्याई म्हणजे त्याचा प्रामाणिकपणा. तोच शंकित करण्याजोगें साधन – खरें असो वा नसो – पीटरला, म्हणजेच डॉ. स्टॉकमनच्या प्रतिपक्षीयांना अशा रीतीने मिळालें. पण प्रत्यक्षांत हें उष्ट्यांतील तूंपसुद्धा डॉ. स्टॉकमनच्या पदरांत पडायचें नव्हतें. कारण लगेचच त्याचा सासरा मार्टेन किल त्याच्याकडे येऊन बोलणें करूं लागला की, डॉ. स्टॉकमनने हें जें जंतूंचें सगळें प्रकरण काढलें होतें तें त्याने पार दडपून टाकावें. '' तूं अगदीच साफ वेडा झाला आहेस की काय तेंच मला पाह्यचें आहे. कारण स्वस्त झाल्यामुळे (लोकांमधील घबराटामुळे) स्नानगृहांचे बरेचसे शेअर मीं खरेदी केले आहेत. त्यांमध्ये तुम्हांला मिळावयाची सर्वच्या सर्व रक्कम मीं गुंतवून टाकली आहे. थोडा जरी शहाणपणा तुझ्याजवळ असेल तर तूं हें सारें प्रकरण संपवशील आणि तुमचा केवढा तरी फायदा होईल. नाहीतर माझें मृत्युपत्र रद्द करून हे सगळे शेअर मी धर्मादायाला देऊन टाकणार आहे'' असें तो डॉक्टरला बजावतो.

हा पेच तत्त्वनिष्ठ डॉक्टरलासुद्धा फार कठीण होता. त्याला स्वतःबद्दल तिळभर चिंता नव्हती. परंतु कॅथरीन आणि मुलें यांना मग मृत्युपत्राअन्वयें एक पैही मिळणार नाही ही कल्पना त्याला फारच भयंकर वाटली. क्षणभर तो डळमळला. सासऱ्याला त्याने पुष्कळ शिव्या दिल्या; परंतु कॅथरीनचा सल्ला घेतल्याशिवाय या बाबतींत शेवटचें उत्तर देणें कठीण आहे एवढा गुळमुळीतपणा त्याच्या बोलण्यांत अखेर आलाच. दोन वाजेपर्यंतचा वेळ त्याला हो किंवा नाही म्हणायला देऊन सासरा निघून गेला.

श्रेष्ठ असला तरी माणूसच —

त्याच वेळी होवस्ताद आणि अस्लाक्सेन हे दोघे डॉक्टरकडे अगदीच अनपेक्षितपणें आले. श्रेष्ठ माणसाचें मनही आपल्यावरील बिकट प्रसंगांत कसें डळमळतें हें या प्रसंगी इब्सेनने किती कलात्मक रीतीने दाखविलें आहे. कारण श्रेष्ठ झाला तरी तो अखेर माणूसच असतो. आणि म्हणूनच तो आपल्याला जवळचा वाटतो. परंतु डॉ. स्टॉकमनच्या डोळ्यावर आलेली झांपड, जे हे दोघे आपल्या घरीं येऊं सुद्धा नयेत

असें डॉक्टरला वाटत होतें त्यांच्याच येण्याने आणि बोलण्याने एकदम दूर झाली. कारण त्या दोघांनी त्याच्यावर हा सगळा झगडा त्याने बाजारांत घबराट उत्पन्न होऊन स्नानगृहांचे शेअर खूप घटलेल्या किंमतींत खरेदी करण्याची सोय आपल्या सासऱ्याला उपलब्ध व्हावी यासाठी केला असा आरोप केला. प्रथम डॉक्टरला त्यांच्या बोलण्यांतील ध्वनि समजलाच नाही. परंतु क्षणभराने तो ध्यानांत आल्यावर स्तिमित चित्ताने त्याने प्रश्न केला, "काय अशा गोष्टी घडूं शकतात? कल्पनेंत तरी त्या शक्य असतात?"

निःसीम निरागसता —

स्टॉकमनचा हा प्रश्न ऐकतांच डेस्डेमोनाच्या निःसीम निरागसतेची आठवण होते. कारण तिनेही एमिलियाला अगदी हाच प्रश्न विचारला होता की, "काय अशा व्यभिचार करणाऱ्या स्त्रिया खरोखरच असतात?" खंडीभर प्रसंगांनी डॉक्टर स्टॉकमनबद्दल जेवढी सहानुभूति आपल्या मनांत जागी झाली नसती तेवढी त्याच्या या एका छोट्या, साध्या प्रश्नाने जागी होते. आणि मग व म्हणूनच, त्याच्यावर आलेल्या भयानक आपत्तींबद्दल, त्या अपरिहार्य होत्या हें कळत असूनही आपणाला हळहळ वाटते.

त्या दोघांचा कावा लक्षांत आल्यावर, डॉ. स्टॉकमन हॅम्लेटप्रमाणे थोडा वेळ त्यांना खुलवल्यासारखें करून त्यांच्या स्वार्थीपणाची संपूर्ण उघडीक करतो आणि त्यांना हकलून देतो; दांडकें घेऊन तो त्यांना दटावतो आणि खिडकींतून उड्या टाकायला लावतो. आणि मग क्षणाचाही विलंब न लावतां मोठ्या अक्षरांत तीनदा No असा नकार लिहून एक कार्ड तो सासऱ्याकडे पाठवून देतो.

डॉक्टरचा आणखी एक शोध!—

त्या क्षणीं त्याला जाणीव होते की येथून पळून जाणें हें आपलें कर्तव्य नव्हें. येथेंच राहिलें पाहिजे; येथेच लढा दिला पाहिजे; येथेच सुधारणा आणि क्रांति केली पाहिजे. क्षणिक आलेली त्याच्या चित्तावरची काजळी अशा रीतीने दूर होते आणि कशाही परिस्थितींत आपला **साधा, स्वच्छ आणि धोपट** कर्तव्याचा मार्ग चोखाळायला तो तयार होतो. दुःखांत मनाला थोडासा विरंगुळा देणारी गोष्ट एवढी होती कीं, त्याची पत्नी आणि मुलें त्याच्याबरोबर सगळ्या दिव्यांतून जायला तयार असतात; आणि कॅप्टन हॉर्स्टरसारखा एकतरी कां होईना, जिवाभावाचा साथीदार त्याला असतो. शेवटीं जेव्हा डॉक्टर सांगतो की, मीं आणखी एक नवा शोध लावला आहे की, तोच मनुष्य सर्वशक्तिमान, जो सगळ्या जगाविरुद्ध एकटा लढायला तयार होतो, तेव्हा त्याची पत्नी हसते आणि म्हणते "आतां काय म्हणावं तुम्हांला!" या तिच्या हंसण्यांत व शेऱ्यांत केवढा तरी अर्थ भरला आहे. त्याच्याबद्दलची नाजूक कीव आणि आदर या दोहोंचा त्यामध्ये केवढा संयुक्त आविष्कार झाला आहे.

असा आहे इबसेनचा डॉ. टॉमस स्टॉकमन. उदार, खेळकर, आतिथ्यशील, मुला-बाळांवर प्रेम करणारा, बुद्धिमान आणि संशोधनशील; प्रखर कल्पनाशक्ति असलेला; स्नानगृहें वाढण्याची कल्पना त्याची; मोकळ्या स्वभावाचा, कांहीसा खर्चिक व चैनी; समाजांत क्रांतिकारक बदल झाला पाहिजे असें मानणारा, असा बदल होईल अशी श्रद्धा ठेवणारा; कष्ट सोसलेला आणि सोसण्याची तयारी असलेला; भावनाशील, सत्यप्रेमी आणि तत्त्वनिष्ठ. अशा या माणसाची अवघ्या चार-पांच दिवसांत एवढी परवड व्हावी, लोकांनी चोहो बाजूंनी त्याला झिडकारावें; त्याचा संसार उध्वस्त व्हावा, असें कां व्हावें ?

या करुणास्पद घटनेचें प्रमुख कारण बिकट विरोधी परिस्थिति हें उघडच आहे. मुख्य म्हणजे ज्या समाजांत तो राहत होता तो समाज अत्यंत स्थितिप्रिय लोकांचा आहे; किंबहुना असाच समाज सर्वत्र असतो. जोपर्यंत आपल्या स्वार्थाला धका लागत नाही तोपर्यंत सत्यनिष्ठ व तत्त्वनिष्ठ माणसाची बूज असा समाज राखील. पण स्वार्थाला धक्का लागण्याची वेळ आली की, अशा माणसाला तो समाज सरळ खड्ड्यांत फेकून देईल.

अशा समाजाचे पुढारीही स्वतःच्या हितसंबंधाला व सत्तेला जपणारेच असावयाचे. तसे ते येथेही होते. त्यांचा म्होरक्या प्रत्यक्ष डॉ. स्टॉकमनचा भाऊ होता. कांही एका विशिष्ट मर्यादेपर्यंत भावाच्या कुटुंबाचें हित पाहण्याची त्याची वृत्ति होती. परंतु स्वतःच्या प्रतिष्ठेवर येऊन बेतल्यावर त्याने आपल्या भावाचा काटा किती निर्दयपणें दूर केला आणि भावाच्या प्रामाणिकपणाविषयी संशय उत्पन्न करण्याजोगें एक साधन गवसतासक्षणीं "जितं मया" म्हणून किती मुर्दाडपणें तो समाधान पावला हें आपण पाहिलेंच.

हितसंबंधी लोकांचा सत्तालोभ आणि स्वार्थ यांच्याशीं झगडा करण्याचा डॉ. स्टॉकमनसारख्याचा एकाकी प्रयत्न अयशस्वी न झाला तरच नवल. सर्वच समाजाची प्रवृत्ति बदलण्याचा, म्हणजे समाजक्रांतीचा हा प्रश्न आहे. आणि तो सोडविला जात असतांना कितीएक व्यक्तींच्या कपाळीं असा खडतर अनुभव येणें अपरिहार्य आहे; कितीकांचे प्राणही त्यासाठी खर्ची पडणें शक्य आहे.

या दृष्टीने पाहिलें तर हें करुण नाट्य परिस्थितिगत करुण विपाकाचें उदाहरण आहे असें म्हणावेंसें वाटणें स्वाभाविक आहे; आणि कांही एका मर्यादेपर्यंत तें उचितच आहे. परंतु समाजाबद्दलच्या नैतिक चिडीच्या पोटीं हें नाटक जन्माला आलें असलें तरी, जातिवंत कलावंत एकांगी होऊं शकत नाही, हें या नाटकावरून किती उत्तम तऱ्हेने दिसून येतें. कारण डॉ. स्टॉकमन हा संपूर्णपणें निर्दोष होता असें त्याने दाखविलें नाही. त्याच्या ठिकाणचे कितीएक दोष त्याने जागोजाग दाखविले आहेत. भोळेपणा आणि चांगुलपणा हे स्वभावविशेष डॉ. स्टॉकमनच्या ठिकाणीं इतक्या अतिरिक्त प्रमाणाला पोचलेले आहेत की, त्यांनाच थोडेसें दोषत्व प्राप्त होतें. परंतु अत्यंत उतावीळ-

पणा, अत्यंत आग्रहीपणा, कांहीसा अहंकार, स्वतःच्याच कल्पनांत रंगून जाऊन व्यवहारावरील पकड सुटणारी वृत्ति आणि परिस्थितीचें योग्य आकलन नसणें हे तर प्रत्यक्ष दोषच त्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणांत होते; आणि त्यामुळे त्याचें अपयश ओढवण्याला पुष्कळ कारण झालें असें खास म्हणतां येतें. समोर दगडांची भिंत दिसत असतांना तिच्यावर उन्मेखून जाऊन डोकें फोडून घ्यायला कोणी निघाला तर त्याचें तें कृत्य न्यायाच्या दृष्टीनें कितीही समर्थनीय वाटल्यासारखें असलें तरी त्याचा परिणाम त्या व्यक्तीपुरता अनिष्ट होणें हें अपरिहार्यच आहे.

शिवाय डॉ. स्टॉकमनने जो पेंच उत्पन्न केला होता तो खराच मोठा विकट होता. एका बाजूला स्नागृहांमध्ये दुरुस्ती न करावयाची म्हणजे निरपराधी लोकांच्या जीवनाशींच क्रूर खेळ खेळण्याचा प्रकार; तर दुसऱ्या बाजूला दुरुस्त्यांची गोष्ट काढायची – आणि तीही विघ्नबाधेच्या कारणासाठी – म्हणजे स्नानगृहांची कायमची वाट लावायची आणि ज्याच्या आधारावर शहराने उमेद बाळगावी तें जीवनमूलच गमावून बसावयाचें; असा हा विनतोड प्रश्न होता. त्यामध्ये सत्याचा पक्ष डॉ. स्टॉकमनचा होता हें खरें; पण सत्यासाठी सारें शहर जाळायला मला मुळीच संकोच वाटायचा नाही ही जी त्याची भावना, तितक्या उंचीवर आपल्या आजुबाजूची मंडळी चढूं शकतील या कल्पनेच्या आहारीं त्याने जावें यांत मनुष्यस्वभावाचें मोठें अज्ञान डॉ. स्टॉकमनने प्रकट केलें असें होतें. हें सगळें जाणून सवरून, सत्यासाटी स्वतःचा बळी द्यायचा, अशा वृत्तीने तो वागता तर मात्र ही करुण घटना निव्वळ परिस्थितिजन्य अशी म्हणतां आली असती. आहे या स्थितींत स्वभावगत दोषांनीही त्या घटनेला हातभार लावला आहे असें म्हटलें पाहिजे.

अर्थात डॉ. स्टॉकमनला आलेलें अपयश अत्यंत प्रचंड आणि विदारक आहे. त्याला कारण कांही अंशीं त्याचे स्वभावदोष होते हें खरें असलें तरी त्यामुळे डॉक्टर स्टॉकमन आपली सहानुभूति गमावीत नाही; आपला त्याच्याविषयीचा जिव्हाळा कमी तर होतच नाही; पण उलट तो वाढतच जातो. मार्टेन किलच्या पैशाच्या लोभाने त्याचें चित्त थोडेंसें डळमळतें, तेव्हाही आपण त्याची कीवच करतो आणि श्रेष्ठ असला तरी तो माणूसच आहे या जाणीवेने तो आपल्याला अधिकच जवळचा वाटूं लागतो. पण पुन्हा जेव्हा त्याचा दृढ निर्धार होतो आणि आपलें कर्तव्यक्षेत्र म्हणजे आपला स्वतःचा समाजच आहे या भूमिकेला तो येतो, तेव्हा तर त्याला आपल्या हृदयांत फार मोलाचें स्थान मिळतें.

आपल्याच कशाला? खुद्द त्याची पत्नीसुद्धा त्यालाच चिकटून राहते. मुलाबाळांच्या कल्याणासाठी ती किती आतुर आहे हें आपण पाहिलें आहे. त्या दृष्टीने तिला नवऱ्याचें कोणतेंही वागणें खरें मनापासून मान्य नाही. परंतु त्याच्या बाजूला न्याय आहे, सत्य आहे, त्यासाठी झगडणें आणि कष्ट सोसणें हाच त्याचा धर्म आहे हें तिला चांगलें समजलें आहे. आणि म्हणूनच Oh Thomas, Thomas, काय म्हणावें आतां तुम्हांला असें म्हणून ती एकाच निःश्वासांत त्याच्या अव्यवहारीपणाबद्दल कीव आणि त्याच्या

कर्तृत्वाबद्दल आदर व्यक्त करते; त्याच वेळीं त्याची मुलगी पेत्राही उत्साहाच्या भरांत बापाचा हात घट्ट पकडून त्याला प्रोत्साहनच देते.

वयाच्या फरकामुळे हा जो वेगवेगळा ठसा उमटला तसाच वयाच्या व अनुभवाच्या मानाने आपल्याही मनावर वेगवेगळा ठसा उमटण्याचा संभव आहे. परंतु रसिकांची वृत्ति पुष्कळच अंशीं कॅथरीनसारखी करुणामय आदराची आणि भयाचीच होण्याचा अधिक संभव आहे.

डॉ. स्टॉकमनच्या आदरणीय श्रेष्ठपणाचें पायरीपायरीने वाढतें चित्रच या नाटककाराने दाखविलें आहे हें उघड आहे. आणि नाटककाराच्या साध्याच्या दृष्टीने तें स्वाभाविक आणि आवश्यकच होतें. येथे प्रामुख्याने बाह्य परिस्थितीमुळे झालेला एका श्रेष्ठ माणसाचा अनुकंपनीय कोंडमारा नाटककाराला दाखवावयाचा आहे. म्हणून त्याने, नायकाच्या मोठेपणाचें प्रत्यक्ष दर्शन करवीत शेवटीं तो सत्यनिष्ठेच्या श्रेष्ठ कसोटीला कसा उतरला हें दाखवावें तर्कशुद्धच आहे. परंतु हें दर्शन घडवितांना मोठमोठे प्रसंग निर्मिण्याची त्याला मुळीच जरूर पडलेली नाही; सहज सूक्ष्म छटांनी त्याने ही गोष्ट साधली आहे.

हें नाटक आधुनिक आणि गद्य. त्यामुळे त्यामध्ये काव्यमय भाषेचा पसारा फारच क्वचित आढळेल. परंतु त्यांतील संवादांत रेखीवपणा आहे; खटके आहेत; नेमका अर्थ व्यक्त करणारीं खोंचक वाक्यें आहेत. हा सारा प्रकार कांही नेहमीच्या रोजच्या जीवनांत घडतो तसा स्वाभाविक नाही. त्यामध्ये कलावंताची कुसर – म्हणजेच कृत्रिमपणा जागोजाग दिसून येतो. उदाहरणादाखल, ज्यांना शक्य असेल त्यांनी तिसऱ्या अंकांतील दोघा भावांमधील संवाद अवश्य लक्षपूर्वक पाहावा.

एनिमी ऑफ दि पीपल या नाटकाचा विचार करीत असतांना कोरिओलेनस या नाटकाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. परंतु त्या नाटकाचा विचार करूं त्याच वेळीं या दोन नायकांमधील साम्य आणि विरोध यासंबंधी चर्चा करणें उचित होईल.

प्रकरण सातवें

स्टीफन मूर

तत्त्वनिष्ठेसाठी वाटेल तें दिव्य करायला तयार असलेल्या आणखी एका करुण नायकाची ओळख आता आपण करून घेऊं. डॉ. स्टॉकमनचा अगदी सरळ्या भाऊ शोभेल असा, परंतु त्याच्यापेक्षाही अधिक अनर्थपरंपरा स्वतःवर कोसळत असतां बिलकुल न डगमगणारा, जवळजवळ हसत हसत सर्व निकटवर्ती आप्त व मित्र, प्रत्यक्ष मुलगी आणि पत्नी यांचा वियोग धैर्याने सहन करणारा आणि हसतमुखाने मृत्यूला कवटाळून शेवटपर्यंत आपला तत्त्वनिष्ठेचा झेंडा उभा ठेवणारा हा नायक, सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकार, नोबेल प्राइझ मिळविणारा जॉन गाल्सवर्दी याच्या मॉब* या नाटकांतील नायक स्टीफन मूर हा होय. इब्सेनच्या स्टॉकमनपेक्षाही अत्यंत रेखीव असें याचें चित्रण गाल्सवर्दीने केलें आहे; हें नाटकही अधिक सुटसुटीत, प्रमाणबद्ध आणि स्वतःच्या उद्दिष्टाशीं अधिक एकरूप आहे.

नाटकांतील बीज – झगड्याचें मूळ —

नाटकाच्या अगदी सुरुवातीच्याच भागांत, नव्हे जणू सुरुवातीच्या वाक्यापासून या नाटकांतील बीज, झगड्याचें मूळ, नाटककाराने अगदी ठसठशीतपणाने, निःसंदिग्धपणाने आपल्यापुढे ठेवलें आहे. पहिलींच दोन भाषणें पाहा :

डीन— मला हें तुझं म्हणणं अगदी कबूल नाही स्टीफन. बिलकूल कबूल नाही, तिळभरसुद्धा नाही.

स्टीफन— त्याला मी काय करूं ?

एका बाजूला नायकाची भूमिका अजीबात मान्य नसलेला एक आग्रही पक्ष आणि त्याच्याविरुद्ध तितकाच आग्रही परंतु मृदु स्वभावाचा स्टीफन असा हा विरोध पहिल्याच फेकीला श्रोत्यांपुढे नाटककाराने खडा केला आहे. ज्या बैठकींत हें संभाषण आहे तिजमध्ये स्टीफनच्याविरुद्ध त्याचा सासरा, त्याचा चुलतसासरा डीन, त्याची पत्नी, त्याचा त्याच्याहून थोडा प्रौढ असलेला मित्र, त्याची मेहुणी अशी मंडळी आहे. हे सर्व लोक त्याला त्याच्या कांही एका निर्धारापासून परावृत्त करण्याचा नाना

---

* मॉब या शब्दांत एक तिरस्काराचा ध्वनि अंतर्भूत आहे, तो मराठींतील 'जनता' या शब्दाने नीट व्यक्त होत नाही. म्हणून त्याचा पर्याय या नात्याने प्रस्तुत लेखकाने आपल्या एका पुस्तकांत जनता-वेताळ असा शब्द वापरला आहे.

रीतींनी प्रयत्न करीत आहेत. आणि त्या सर्वांना निर्धाराने परंतु सौम्यपणें तोंड देऊन तो आपल्या निश्चयाला चिकटून राहत आहे.

स्टीफन हा इंग्लिश मंत्रिमंडळांत एक दुय्यम सेक्रेटरी आहे. इंग्लंड एका लहानशा दूरस्थ बिगरखिस्ती राष्ट्राविरुद्ध लढाई पुकारण्याच्या बेतांत आहे. त्या देशांत स्वतःच्या कांही वैयक्तिक लाभासाठी गेलेल्या इंग्रजी नागरिकांचा खून तेथील नागरिकांनी केल्याचें निमित्त करून, तेथे इंग्लंडची ही स्वारी होऊं घातलेली आहे; नव्हे या संभाषणाच्या प्रसंगाच्या वेळींच लढाईचें शिंग फुंकलें गेलें असल्याचाही संभव आहे.

स्टीफनला ही लढाई मान्य नाही. तद्देशीय लोकांनी स्वसंरक्षणार्थ कोणावर हल्ला केला यासाठी त्यांच्या देशावर हल्ला करून त्यांचें स्वातंत्र्य धोक्यांत आणणें न्यायाचें नाही; अशा युद्धांचा परिणाम लहान राष्ट्रांचें स्वातंत्र्य नष्ट होण्यांतच नेहमी होत आलेला आहे; तेंच या प्रसंगीं होणार; मोठ्या राष्ट्रांनी आपली इच्छा लहान राष्ट्रांवर लादूं नये; लहान राष्ट्रांना आपल्या इच्छेनुरूप प्रगति करूं द्यावी, अशी त्याची भूमिका आहे व ही भूमिका त्याच रात्रीं पार्लमेंटमध्ये मांडणाऱ्या त्याचा निर्धार झाला आहे. तो कांहीं आता साधासुधा सभासद नव्हता. अधिकारपदावरचा एक मनुष्य होता. म्हणून त्याने अधिक जबाबदारीने वागावें – स्वतःच्या, स्वतःच्या कुटुंबाच्या आणि स्वतःच्या देशाच्या हितासाठी,– असें बाकीच्यांचें म्हणणें होतें. त्याचा सासरा, ज्याने पन्नास वर्षें देशाच्या सैन्याचा अधिपती म्हणून काम केलें होतें, त्याची निष्ठा अशी होती की, आपल्या देशाच्या हातून एवढीही चूक घडलेली नाही. त्यावर जावयाचें उत्तर असें आहे की, "मला अजून देशाची सेवा पुढे पन्नास वर्षें करण्याची उमेद आहे; परंतु माझें असें ठाम मत आहे की, देशाचें चुकतें आहे."

राष्ट्रनिष्ठा की सत्यनिष्ठा —

नाना रीतींनी बाकीच्यांकडून त्याच्यावर हल्ला होतो. तुला जाहिरातबाजीची खोड आहे असें डॉ. स्टॉकमनला त्याचा भाऊ म्हणाला होता; तोच आरोप मेंडिपनें– मित्राने – स्टीफनवर येथे केला. तरीपण हा आरोप पत्करूनही प्रसंगीं सत्य बोललेंच पाहिजे असें स्टीफनचें उत्तर आहे. वादासाठी क्षणभर गृहीत धरलें की, स्टीफनचा पक्ष सत्याचा आहे, तरी राष्ट्राच्या स्वाभिमानाचा, प्रतिष्ठेचा प्रश्न उभा राहिला असतांना स्टीफनने आपल्या वैयक्तिक श्रद्धेला (Conscience) मुरड घातली पाहिजे असें चुलतसासरा त्याला म्हणतो. पण स्वतःची प्रतिष्ठा कशांत आहे हें राष्ट्रांना नीट समजत नाही असें स्टीफनचें त्यावर उत्तर आहे. त्यावर "तूं आतां कांही माथेफिरू लोकांचा पुढारी बनून आपला सगळा जीवनक्रम धोक्यांत आणण्याचें ठरविलेलें दिसतें आहे," असें जेव्हा स्टीफनचा सासरा म्हणतो, त्यावर स्टीफनने दिलेलें उत्तर ध्यानांत राहण्यासारखें आहे. तो म्हणतो,

"निनधोक्याच्या असतील तेवढ्याच निष्ठा माणसाने धारण कराव्यात असें कां

तुम्हांला म्हणावयाचें आहे ? प्राणपणाने छातीवर गोळी झेलायला तुम्ही कधी कचरला नाहीत, सर जॉर्ज !"

त्या मंडळीचा जो दृष्टिकोन आहे की, माझा देश हेंच माझें सर्वस्व – मग तो चुकत असला तरी – हें स्टीफनला मान्य नाही. त्याची ही वृत्ति देशद्रोही आहे असें सासरा म्हणतो; त्यावर जेव्हा स्टीफन उत्तर देतो की, " जुलमी कारभाराला मी दुरून सुद्धा कधी मान्यता देणार नाही," तेव्हा आतापर्यंत आतुर पण स्तब्ध बसलेली त्याची पत्नीही सौम्य पण निर्धाराने उत्तर देते, " पण देश कोणावर जुलूम करतो आहे हेंच मुळी बाबांना मान्य नाही – आमच्यापैकी कुणा एकालाही तें कबूल नाही."

अशा रीतीने त्याच्या अत्यंत प्रेमळ पत्नीचाही त्याच्या भूमिकेला विरोध आहे.

त्याचा मित्र मेंडिप त्याला, असल्या कधीही यशाला न येणाऱ्या कार्यक्रमाच्या नादीं न लागण्याचा व्यवहारी सल्ला देतो. देशभक्तीच्या पुकाऱ्याने जनता आता बेहोष होऊन जाईल; तेव्हा या जनता–बेताळापासून सावध राहा असा इशाराही तो देतो. त्या वेळीं स्टीफनने आपली भूमिका पुन्हा एकदा किती निःसंदिग्धपणाने व्यक्त केली आहे. तो म्हणतो,

" लोकांच्या भावना माझ्याविरुद्ध आहेत यासाठी माझ्या अंतःकरणांतील निष्ठा मीं दूर लोटावी असा तुमचा सल्ला आहे ? या ठिकाणीं माझा विचार बरोबर कीं चूक हा खरा प्रश्न नाही, मेंडिप. पण, माझी निष्ठा लोकप्रिय नाही यासाठी ती सोडून मीं स्वतःची कातडी बचावावी की काय ? हा खरा तत्त्वाचा प्रश्न आहे यांत. "

या सुमारास स्टीफनचा मेहुणा ह्यूबर्ट तेथे येतो. या माथेफिरू माणसाच्या नादीं लागण्यांत अर्थ नाही हें पाहून दोन्ही सासरे आणि त्याचा मित्र या वेळीं निघून गेलेले असतात. त्याचा मेहुणा त्याला, " तोंड उघडूं नकोस, घरांत कोंडून घेऊन राहा " म्हणून परोपरीने सांगतो. स्वतःच्या पत्नीचा कांही विचार कर असें जेव्हा तो सुचवितो, त्या वेळीं,

" तूं स्वतःच्या पत्नीसाठी स्वतःच्या कर्तव्यापासून च्युत होत नाही आहेस. "

असा भेदक जबाब स्टीफन त्याला देतो. त्यावर ह्यूबर्टही निराशेने तेथून दूर होतो; त्याची आशा की, स्टीफनची पत्नी – डॉ. स्टॉकमनच्या पत्नीप्रमाणें स्टीफनच्या पत्नीचें नांवही कॅथरीन आहे हा एक मोठाच विलक्षण योगायोग आहे — तरी त्याला या वेडापासून परावृत्त करील.

सत्यनिष्ठेपासून पत्नीप्रेमही ढळवूं शकत नाही —

पण ही गोष्ट सोपी नव्हती. कॅथरीनने त्याला परावृत्त करण्याचा केलेला प्रयत्न डॉ. स्टॉकमनच्या पत्नीच्या प्रयत्नाहून वेगळा होता. तिने आपल्या संसारांतील अडचणींचें रडगाणें स्टीफनपुढे गायलें नाही. आणि तसें पाहिलें तर संसारांत अडचणी तिच्यापुढे नव्हत्याही. प्रश्न होता दोघांच्या निष्ठेचा आणि स्टीफनची मंत्री होण्याची

संधि जाईल हा. त्याच्या या विरोधाचा कांही उपयोग होणार होता का ? तथापि देशाच्या अन्यायाविरुद्ध कुणीं एकाने ब्र काढला नाही असें त्याला व्हायला नको होतें; हा विरोधी सूर कोणी तरी जबाबदार राजकारणी व्यक्तीने काढणें त्याला आवश्यक वाटत होतें. देशावर त्याचें प्रेम होतें हें कॅथरीनला मान्य होतें; तसेंच त्याचें तिच्यावरही प्रेम होतें. तिच्या प्रेमासाठी, तिचे तिघे भाऊ रणांगणावर मृत्यूच्या जबड्यांत सापडलेले असतांना तिच्या मनाची किती कठीण अवस्था होईल हें ध्यानांत घेऊन, स्टीफनने या युद्धविरोधापासून परावृत्त व्हावें असा तिने मोठ्या विनयाने आग्रह धरला. तो उडवाउडवी करूं लागला — थोड्याच दिवसांत हें वादळ सर्व शांत होईल असेंही त्यानें सांगून पाहिलें. पण आपल्या नवऱ्याचा स्वभाव कॅथरीनला चांगला माहीत होता. एकदा एखादी गोष्ट करायला घातल्यावर तिचा शेवटपर्यंत पाठपुरावा केल्याशिवाय तो राहणार नाही हें तिला चांगलें माहीत होतें.

परंतु कॅथरीनच्या प्रयत्नाला यश आलें नाही. शेवटीं तिचा तोल सुटून ती त्याला अपशब्द बोलते. त्याने हा मार्ग स्वीकारूं नये असें त्वेषाने बजावते. पण तो कांहीच उत्तर देत नाही हें पाहून ती निराशेने व संतापाने निघून जाते.

क्षणिक दोलायमानताही विरून जाते—

तिने वापरलेला 'कुतरडा' हा शब्द स्टीफनच्या जिव्हारीं लागतो. त्याच्या मनांत मोठा गोंधळ माजतो. आपण तयार केलेल्या भाषणाची प्रत चाळून आपण त्या शिक्षेला पात्र आहों काय याचा तो विचार करतो. भाषणाचा शेवटचा भाग स्वतःशींच मोठ्याने वाचतो. आपल्या देशाचें हें कृत्य भावी पिढ्यांना किळसवाणें वाटेल— भविष्यकाळीं न्यायदेवतेच्या आसनापुढे आम्हांला उभे राहावें लागेल आणि संस्कृतीच्या दृष्टीने गुन्हेगार म्हणून आपल्या कपाळावर शिक्का मारून घ्यावा लागेल, अशा आशयाचा त्याच्या भाषणाचा शेवटचा भाग असतो. याच वेळीं त्याची लहानगी मुलगी पाय न वाजवितां तेथे आलेली असते. त्याच्या भावनेचा भर इतका मोठा असतो की, भाषण वाचतांना सहज हातांत धरून ठेवलेलें पाण्याचें ग्लास तो विलक्षण जोराने दाबतो आणि तें फुटून त्याचे तुकडे खळकन खाली पडतात. बिचारी मुलगी या सर्वच प्रकाराने चकित होते. "कुणाशीं बोलत होता तुम्ही" या तिच्या प्रश्नाला "वाऱ्याशीं" असें स्टीफन उत्तर देतो. अगदी थोड्याशाच वेळाच्या त्या प्रसंगांत स्टीफनचें आपल्या मुलीवर किती प्रेम आहे हें केवढें स्पष्ट होतें. एवढ्यांत त्याचा खासगी चिटणीस स्टील पार्लमेंटांत सुरू झालेल्या वादविवादाची हकीकत सांगूं लागतो. त्याच वेळीं स्टीफनच्या सासऱ्याकडून चिठी घेऊन एक माणूस येतो. 'तांडव नृत्याला सुरुवात झाली' एवढीच चिठी ! "बरें झालें आपण तें भाषण केलें नाही" असें स्टीलही त्यावर स्टीफनला म्हणतो. आपल्यावर अतीव निष्ठा असणारा तो सेवकसुद्धा हेंच मत व्यक्त करतांना पाहून स्टीफनला धक्काच बसतो. पार्लमेंटांत युद्धाच्या बाजूने

बोलणाऱ्या सभासदांच्या भाषणांतील कांहीं मुद्दे स्टील सांगत असतां, स्टीफनचा मनाचा निर्णय होतो आणि स्टीलला कांही पत्रांचीं उत्तरें लिहिण्याच्या कामांत गुंतवून, त्याच्या लक्षांत न येतां, स्टीफन आपली भाषणाचीं प्रत घेऊन पार्लमेंटांत जाण्यासाठी तेथून पसार होतो.

क्षणभरांत स्टील भानावर येतो. स्टीफन जाग्यावर नाही हें पाहून तो कावराबावरा होतो. त्याच्या लगेच सर्व कांही लक्षांत येऊन स्टीफनच्या मागोमाग तो धाव घेतो. तो जातो न जातो तोच कॅथरीन तेथे येते. तिची मुलगी पडद्याआड दडलेलीच असते. कॅथरीन खिडकीशीं जाऊन विमनस्कपणे उभी असतां ऑलिव्ह – मुलगी – हळूच तिच्याजवळ येते; त्यामुळे कॅथरीन दचकतेच. आपले वडील कसे हळूच निघून गेले आणि त्यांच्या मागोमाग स्टीलही कसा उंदरासारखा गेला हें ती आईला सांगते. कॅथरीनच्या मनावर विषादाचें केवढें मोठें ओझें आहे. पण ऑलिव्हला काय त्याची कल्पना! बाळ-स्वभावानुरूप तिचें लक्ष खेळांत आहे, खाली रस्त्यावर भिकारी गात होते त्यांच्या गाण्या-कडे आहे. मध्येच ती नाचायलाही सुरुवात करते. एवढ्यांत तिचा मामा ह्यूबर्ट येतो. तरी ती नाचण्याची थांबत नाही. उलट तुला कुठे माझ्यासारखं नाचतां येतंय्, असें त्याच्याशीं लाडिकपणाने बोलूं लागते. इकडे लष्करी बँन्ड रस्त्यावर वाजलेले ऐकूं येतात. कॅथरीन व ह्यूबर्ट, दोघांचीं अंतःकरणें भारावलेलीं असतात. ऑलिव्हला झोपायला नेण्यासाठी तिची म्हातारी दाई येते. तिलाही युद्ध सुरू झाल्याची जाणीव होते आणि ह्यूबर्टप्रमाणे आपलाही मुलगा आघाडीवर जाणार या विचाराने तीही भारावते.

ह्यूबर्टची पलटण दोनच दिवसांत बोटीवर चढणार होती, हें ऐकून कॅथरीनच्या हृदयाचें पाणी पाणी पाणी पाणी झालें. आणि ती आक्रंदूनच म्हणाली, "स्त्रियांना लढाईवर जायला मिळालें असतें तर किती बरें झालें असतें? एवढ्यांत तिचे वडील येतात. आपली चिठ्ठी स्टीफनला पोचली हें कळून 'बरें झालें आपण त्याचें भाषण थांबवलें' अशा समाधानाचा ते निश्वास टाकतात. पण चिठ्ठीचा उपयोग झाला नाही हें लगेचच कळतें. आणि मग "इतका गाढव हा माणूस असेल असें मला वाटलें नव्हतें" असें तिरस्काराने ते म्हणतात. एवढ्यांत स्टील घाबऱ्या घाबऱ्या परत येतो; स्टीफनने भाषण केलें आणि युद्धाच्या विरोधीच केलें हें त्याच्याकडून कळल्यावर कॅथरीन भावाला, वडिलांना तेथून घेऊन जायला खुणावितें. मग स्टीलकडून पार्लमेंटमधील प्रसंगाची जास्त तपशीलवार हकीकत काढून घेते. स्टील तर स्टीफनच्या भाषणाच्या तेजस्वीपणामुळे, आणि विशेषतः पार्लमेंटमध्ये त्याच्याविरुद्ध वातावरण तापलें असतांही. स्टीफनने दाखविलेल्या धीरगंभीर वृत्तीने नुसता भारूनच गेलेला असतो. कॅथरीनच्या हृदयाचें काय होत असेल याचें त्याला भानही नसतें. "केवढा महान प्रसंग तो; ज्याला तो पाहायला मिळाला तो भाग्यवान" असें स्टील बोलत असतो; तोच स्टीफन परत येऊन पोचतो. त्याला पाहून स्टील निघून जातो. आणि कॅथरीन खूप तीव्रपणे बोलून, इतका वेळ कसाबसा दाबून ठेवलेला आपला संताप त्याच्यावर जणू फेकते.

झालें – फासा पडला —

" झालें ! बेतलेंत एकदा आपल्या सदसद्विवेकबुद्धीचें समाधान करून. इतका माझा पाणउतारा कराल तुम्ही असें नव्हतें वाटलें मला ! "

स्टीफन अजून पार्लमेंटमधील त्या प्रसंगाच्या गुंगीतच असतो. म्हणून त्याच्या-जवळ जाऊन ती उद्वेगाने त्याला सांगते, " पण आतां अगदी साफ साफ सांगून ठेवतें तुम्हांला की, या प्रकरणांत माझें मन, माझी सर्व विवेकशक्ति माझ्या देशाच्या बाजूला आहे. "

तरीही स्टीफन बोलत नाही. इतक्यांत स्टीफनच्या अगदी कट्टया दोस्तांच्या चिट्ठया पार्लमेंट गृहांतून येतात. " हं. ही पाहा झाली सुरुवात तुमच्या या करणीच्या परिणामाची " असें कॅथरीन म्हणते. परंतु " जनता–वेताळापासून सावध राहा " असें म्हणून स्टीफन उलट हंसतो आणि कॅथरीनलाच आपल्या राजीनाम्याचा मसुदा उतरून घ्यायला सांगतो की, " माझी ही भूमिका – माझी ही श्रद्धा कदाचित चुकीचीही असण्याची शक्यता आहे. पण माझी जी निष्ठा आहे तिचाच झेंडा मी फडकवीत आहें. " असा हा आपला राजीनामा मुख्य प्रधानांकडे पाठवून देण्यासाठी तो तयार करतो.

युद्धाचा प्रारंभ ब्रिटिशांच्या दृष्टीने घोर हानिकारक झाला. एका खिंडींत त्यांच्या सैन्याला गाठून शत्रुदेशाने जवळजवळ तें सारें सैन्य कापून काढलें. अशा ठिकाणीं आतां ह्यूबर्टला, स्टीफनच्या मेहुण्याला जायचें आहे. म्हणून त्याच्याशीं बोलतांना त्याची पत्नी अत्यंत काळजींत आहे. अशाच वेळीं कॅथरीनच्या नर्सचा मुलगा – यालाही ह्यूबर्टबरोबरच लढाईवर जायचें होतें – आपल्या वाग्दत्त वधूला घेऊन तेथे येतो. ही एक भोळीभाबडी मुलगी आहे. त्यांचा वाङ्निश्चय होऊन अवघे सहा महिने झालेले आहेत. आणि स्टीफनच्या घरच्या स्त्रिया जसा आपल्या मनांतील आवेग थोडा तरी आवरून धरूं शकत होत्या तसें तिला मुळीच जमत नाही. ती उघडच मुसमुसूं लागते – हुंदके देऊं लागते. त्यामुळे रेफर्डही – नर्सचा मुलगा – भावनाविवश झाल्यावाचून राहत नाही; या कारणाने त्याच्या मनांत शत्रुदेशाविषयी किती त्वेष उत्पन्न होतो हें आपल्याला दिसून येतें. हेलन – स्टीफनची मेहुणी – व ह्यूबर्ट यांना हें सहन होऊं शकत नाही. स्वतःचा भावनावेग लपविण्यासाठी तीं दोघें बाहेरच्या गच्चीवर जातात.

त्या भोळ्या पोरीला कॅथरीनच्या विश्वासावर सोपविण्यासाठी तेथे आणलेलें असतें. आणि स्वतःचे डोळे देशांतील तरुणांच्या चिंतेमुळे आणि स्टीफनच्या तिला मान्य नसलेल्या देशद्रोही वर्तनामुळे तापलेले असले तरीही कॅथरीन स्वतःचा तोल सावरून त्या मुलीकडे लक्ष ठेवण्याचें वचन देते.

पतिपत्नी दोन विरुद्ध निष्ठांच्या टोकाला—

अशा तापलेल्या मनःस्थितींतच ती असतांना बाळस्वभावानुरूप तिच्या मुलीची –ऑलिव्हची – बडबड सुरूच असते. तिच्या कानांवर तिच्या वडिलांविषयी कांही कांही आलेलें असतें. त्यामुळे देशद्रोही म्हणजे काय? आपले बाबा तसे आहेत का? असले प्रश्न ती कॅथरीनला विचारूं लागते. यामुळे आईच्या हृदयाचें किती पाणी पाणी होत असेल याची त्या बिचारीला काय कल्पना! युद्धाची तिची कल्पना अगदी साधी आहे. आपला देश जिंकणार; तो मोठा आहे, आणि त्यामुळे लहान देश त्यांतील लोकांकडून आपण काढून घेणार; असा तिचा सीधा न्याय आहे. यामुळे तिचे बाबा या लढाईला विरोधी कां हें तिला कळतच नाही. आईला ती विचारते "तूं कुणाच्या बाजूला? आमच्या (म्हणजे आमच्या देशाच्या) की त्यांच्या?" आणि आईने आमच्या म्हणून उत्तर दिल्यावर ती म्हणते "मग मलाही आमच्याच बाजूने राहिलें पाहिजे"

कॅथरीनची दारुण व्यथा—

तरी पण बाबांच्या बाजूला आपण नाही याची तिच्या बाळमनाला खंतच वाटते. तिचासुद्धा हा विचार कॅथरीनला अत्यंत विकल करतो. एकदम ऑलिव्हला कांही तरी वाटून ती विचारते,

"बाबा आपल्या बाजूला नाहीत म्हणून लोक त्यांना मारतील बिरतील?" आणि जेव्हा हें शक्य आहे असें खिन्नपणाने कॅथरीन म्हणते तेव्हा "तर मग आपण बाबांशीं जास्तच चांगलं वागायला हवं" असा त्या निरागस मुलीचा निर्णय बाहेर पडतो. "हो, पण तसें आपण करूं शकलों तर!" या त्यावर दिलेल्या कॅथरीनच्या त्रोटक उत्तरांत तिच्या मनांतील दारुण व्यथेचें केवढें विदारक दर्शन आपणाला होतें. अशा स्थितींत स्टील येऊन वर्तमानपत्रांतील कांही कात्रणें कॅथरीनला दाखवितो. नाना रीतींनी त्यांमध्ये देशघातकी म्हणून स्टीफनवर हल्ला केलेला असतो. परंतु अजून स्टीफनला इतका वाईट मानायला कॅथरीन तयार नाही. आणि म्हणून, एकदम त्याला आपला नेता करून स्वतःच्या देशावर चिखलफेक करणाऱ्या माथेफिरू चळवळ्या लोकांवरच ती आपला राग व्यक्त करते. व्याकुळ चित्ताने ती स्टीलला विचारते — "यांच्या मनांत काय आहे, कांही ठाऊक आहे तुम्हांला?" त्यावर स्टीफनविषयी अतीव भक्ति मनांत बाळगीत असल्यामुळेच स्टील म्हणतो, "त्यांच्या डोक्यांत युद्धविरोधी व्याख्यानें देत हिंडायचें जें आलें आहे तें पार मोडून काढलें पाहिजे, तुम्हीं त्यांना ही गोष्ट मुळीच करूं देतां उपयोगी नाही."

अजून पतीचें समर्थन करण्याचा यत्न—

कॅथरीनच्या मनांतील तळमळही हीच आहे. पण हें व्हायचें कसें हाच तिचा घोर

पेच आहे. अशा मनस्थितींत ती असतांनाच स्टीफनच्या मतदार संघांतील चार प्रमुख व्यक्तींचें एक शिष्टमंडळ स्टीफनला भेटण्यासाठी आगाऊ ठरविल्याप्रमाणे येऊन दाखल होतें. हे लोक स्टीफनला चार गोष्टी सुनावण्यासाठी आलेले आहेत हें तिला चांगलेंच ठाऊक आहे. तरीही तिला गोड चेहरा करून त्यांचें स्वागत करावेंच लागतें. वस्तुतः त्यांचीं जीं मतें आहेत तीच कॅथरीनचींही आहेत. परंतु तरीही त्यांनी स्टीफवर आग पाखडावी हें तिला सहन न होण्याजोग्या मनःस्थितींत ती अजून आहे. मतदारसंघाच्या या बाबतींत नुकत्याच झालेल्या दुसऱ्या बैठकींत स्टीफनबद्दल किती कठोर भाषा वापरण्यांत आली याची तिची आठवण अगदी ताजी आहे. लोकांचा मुख्य मुद्दा हा होता की, युद्ध सुरू झाल्यानंतर स्टीफनने तें भाषण करायला नको होतें. असें करणें म्हणजे पाठींत खंजीर खुपसण्यासारखें आहे, कमरेखाली वार करण्यासारखें आहे असा त्यांचा दावा. ही गोष्ट कॅथरीनलाही मान्य नाही असें नाही. तरीही, " लढाई सुरू झाल्यावर यांचें तें भाषण झालें हा एक निव्वळ योगायोग. भाषण करायचें त्यांचें आधीच ठरलें होतें आणि भाषण झाल्यावरच त्यांना लढाई सुरू झाली हें कळलें " असें धडधडीत खोटें ती त्या मंडळींना सांगते. इतका अजून स्टीफनविषयी तिच्या मनांत जिव्हाळा आहे. त्याच्या मतदार संघांतील त्याचें वजन कमी होऊं नये अशी तिला तळमळ आहे. आणि या मंडळींनी थोडेंसें गोडीगुलाबीने वागून स्टीफनला त्याच्या भाषणसत्राच्या कल्पनेपासून परावृत्त केलें तर तेंही तिला हवेंच आहे.

कॅथरीनच्या त्या विधानाचा इष्ट तो परिणाम थोडा तरी झालाच. आतां पुन्हा स्टीफनने असलीं भाषणें करूं नयेत म्हणजे झालें; त्याचे विचार मुळांत फार फार उच्च; आमच्या मनांत स्टीफनविषयी अत्यंत स्नेहभावच आहे; वगैरे उद्गारांच्या रूपाने हें दिसूं लागतें की, शिष्टमंडळांतील विरोधाची धार कांहीजणांपुरती तरी थोडी कमी झाली आहे.

तत्त्वनिष्ठाची प्रशांत वृत्ति

या सुमारास स्टीफन तेथे येतो. एक शिष्ट धसमुसळेपणानेच, स्टीफनला त्याने फार मोठी चूक केल्याचें बजावतो. पुन्हा अशी चूक झाली तर—विशेषतः नुकतीच जी इंग्रजी सैन्याला माघार घ्यावी लागली तशी पुन्हा माघार लागली तर—लोक कांही स्टीफनची एवढीसुद्धा गय करणार नाहीत आणि त्यांत त्यांचा कांही दोषही नाही; कसें झालें तरी स्वतःच्या रक्तामांसाच्या माणसांचा हा प्रश्न आहे, असेंही त्याने बजावलें. स्टीफन शांत आहे. मलाही या येथे रक्तमांसच आहे, असें म्हणून तो छातीला हात लावतो. भाषण करण्याचा निर्णय कांही आपण सहजासहजी घेतला नाही; तीन आठवडेपर्यंत स्वतःच्या मनाशीं केवढा मोठा तरी झगडा करावा लागला त्यासाठी, असें तो स्वतःचें नम्रपणें समर्थन करूं पाहतो. शिष्टमंडळांतील वकील शेल्डर याचा स्टीफनला जास्त कडवा विरोध आहे. तो स्टीफनच्या सदसद्विवेकबुद्धीची हेटाळणी करतो. कॅथरीनला केवढी तरी भीति वाटतें की, स्टीफन भडकणार. पण स्टीफन शांतच राहतो हें पाहून तिला

धीर येतो. मतदारसंघांत स्टीफनच्या विरुद्ध केवढें काहूर माजलें आहे याची कल्पना शिष्टमंडळांतील सभासद देतात. परंतु अजूनही वेळ गेली नाही; पुन्हा असें भाषण केलें जाणार नाही, एवढें सांगण्याची मुभा शिष्टमंडळाला दिली म्हणजे झालें, असें वकीलसाहेब मोठ्या धोरणीपणाने सुचवितात.

याचा सरळ अर्थ स्टीफनच्या तोंडाला कुलूप घालणें हा होता. पार्लमेंटमधील जागेसाठी स्वतःच्या तत्त्वावर पाणी सोडायला सांगण्याचा हा प्रकार होता. वर्तमानपत्रांच्या ढिगाकडे बोट दाखवून स्टीफन म्हणतो, "आतांच हे सगळे मला भ्रष्ट म्हणून दोष देत आहेत. आणि तुम्ही म्हणतां तसें केलें म्हणजे मला भ्रष्ट म्हणायला मीं त्यांना सज्जड पुरावाच दिला म्हणायचा." पुन्हा एकदा कॅथरीनला भय वाटतें. परंतु स्वतःला सावरून ती गप्प राहते. या प्रसंगींच्या कॅथरीनच्या मूक हालचालींना नाटकांत केवढा तरी मोठा अर्थ आहे.

तत्त्वनिष्ठाची कीर्तिलालसा —

"मनांतलें खरें बोलायचें नाही; आणि देशांतल्या वर्तमानपत्रांना भिऊन हें केलें, असें म्हणायला लोकांना आयती संधि द्यायची!" असें स्टीफन त्वेषाने बोलून जातो. अर्थात यामध्ये तत्त्वप्रेमापेक्षा लोकांनी केलेल्या टीकेमुळे होणाऱ्या अपमानाच्या जाणिवेचा स्पर्श अधिक प्रत्ययाला येतो; बोलावें की नाही हें ठरवितांना, बोलणें योग्य की अयोग्य एवढेंच पाहायला पाहिजे; त्यांत लोक कोणता आरोप करतील आणि त्या आरोपाला अवसर द्यायचा की नाही, या प्रश्नांची भेसळ तत्त्वनिष्ठेच्या दृष्टीने गौणच. अशा रीतीने या तत्त्वनिष्ठ पुरुषाच्या ठिकाणींही आत्मनिष्ठा, कीर्तिलालसा बळावून त्याने तत्त्वनिष्ठा सोडली असें लोकांनी म्हणूं नये यावद्दलची ओढ, म्हणजेच एक प्रकारची प्रसिद्धीची अपेक्षा, हा दोष या ठिकाणीं थोडक्या शब्दांत नाटककाराने किती चपखलपणाने दाखविला आहे. आणि त्याचा फायदा ताबडतोब वकीलसाहेबांनी घेतल्याचेंही त्याने दाखविलें आहे. कारण वकील लगेच ठसकलाच की, "स्टीफन, यांत तूं जरा खालच्या पायरीवर उतरत आहेस असें नाही तुला वाटत? तुझ्या या इतक्या उच्च तत्त्वांपुढे, लोक काय म्हणतील याला तूं काडीचीसुद्धा किंमत देतां कामा नये!" इंग्लंडमधील एक सार्वजनिक कार्यकर्ता जनता–वेताळाच्या मताला भिऊन आपल्या तत्त्वापासून भ्रष्ट झाला असें म्हणण्याची संधिसुद्धा कोणाला मिळूं नये असें मला जरूर वाटतें, असा त्यावर स्टीफनने केलेला खुलासा सरळपणाचा द्योतक असला तरी पुरेसा समाधानकारक नाही. तथापि हा माणूस तुमच्याआमच्यासारखाच स्खलनशील व्यक्ति आहे हें यावरून दिसून, आपल्या व त्याच्यामध्ये त्यामुळे अधिक जवळपणा निर्माण होण्याला मात्र त्याचा चांगला उपयोग होतो.

जवळपणा वाटतो आणि दृढ होतो —

आणि त्यानंतर लगेच घडणाऱ्या प्रसंगाने तर हा जवळपणा अधिकच दृढ होतो.

मतदारांच्या मनाचाही कांही विचार स्टीफनने केला पाहिजे की नाही, असा जेव्हा त्याच्यापुढे पेच टाकला जातो, त्या वेळी शांतपणे तो आपला राजीनामा पुढे करतो. "परंतु राजीनामा घ्यायला आम्ही आलों नाही, तूंच आम्हांला हवा आहेस" असें सांगून त्याच्याकडून भाषणें न करण्याचें वचनच गळेपडूपणाने मागितलें जातें; त्याचीं तत्त्वें कमी लेखण्याचा यांत हेतु नाही, असें सांगितलें जातें. परंतु स्टीफन आपल्या निश्चयाला चिकटून राहतो. अखेर हुकुमाचा एक्का म्हणून "आम्हा मंडळीच्या मनाची कांही किंमत आहे की नाही? निदान आपल्या पत्नीचा तरी विचार कर" असा आग्रह शिष्टमंडळातर्फे केला जातो.

हा विचार पुढे येतांच स्टीफनची थोडीशी डळमळीत वृत्ति होते हें शिष्टमंडळाच्या चतुर सभासदांच्या नजरेंतून सुटत नाही. आणि ते त्याला भाषणदौऱ्यापासून परावृत्त करण्यासाठी आणखी नेटाने पण नाजूकपणाने प्रयत्न करतात. शिष्टमंडळांतील सभासदांनी व त्याच्या मतदारांनी गेलीं सतत नऊ वर्षें त्याला मनापासून दिलेला पाठिंबा त्याला आठवेलसें करतात. आपणालाही महत्त्वाकांक्षा आहे, चाळीस वर्षांच्या वयाला संन्यास घेऊन भटकें जीवन घालविण्याची आपल्याला इच्छा नाही, या त्याच्या बोलण्याचा फायदा घेऊन, त्याने थोडें लोकांच्या कलाने घ्यावें आणि आपली जीभ आवरावी असें त्याला पटविण्याचा पुष्कळ प्रयत्न होतो. युद्धाचा परिणाम एका लहान राष्ट्राचें स्वातंत्र्य हिसकविण्यांत होईल हें शिष्टमंडळापैकी पुष्कळांना खरेंच वाटत नाही. पण हें कसें अपरिहार्य आहे हें स्टीफनने त्यांच्या गळ्यांत बांधल्यावर, जगांतील जगण्याच्या शर्यतींत मोठा मासा लहान माशाला खाणारच्च असें वकीलसाहेबांकडून प्रतिपादन झालें; त्या क्षणीं स्टीफनला आपली दृढ भूमिका व्यक्त करण्याला पुन्हा साधन मिळून "इथे तुमचा माझा मतभेद आहे. परंतु तुमचें खरें की माझें खरें असा प्रश्न नसून, ज्याच्या मनांत एखाद्या विषयासंबंधी दृढ निष्ठा बाणली आहे त्याने काय करावें हा प्रश्न आहे. तेव्हा तुम्हीच सांगा—" असें स्टीफन पुन्हा आपल्या वर्तनाचें स्पष्टीकरण करतो. त्यामुळे शिष्टमंडळ पुन्हा हतबुद्ध झाल्यासारखें होतें.

सात्विक आवेशाची पकड—

अशा वेळीं रणांगणावर लढत असलेल्या गरीब बिचाऱ्या तरुण वीरांकडे स्टीफनचें लक्ष वेधण्यांत येतें. त्यासरशी स्टीफनचा सात्विक राग उफाळून येतो. "तुमच्यावर हा प्रसंग आला असता, परकी लोकांनी येऊन तुमच्यावर हल्ला करून, तुम्हांला खिंडींत गाठून तुमच्या स्वातंत्र्यावर हल्ला केला असता तर तुम्हीं काय केलें असतेत? मग तेथल्या त्या शत्रुराष्ट्राच्या गरीब बिचाऱ्या तरुणांची तुम्हीं कीव केली असतीत काय? स्वातंत्र्यावर हल्ला करणारे कुतरडें म्हणूनच तुम्ही त्यांना कापून काढलें असतेत. तुम्हींचसें काय, मीं सुद्धा हेंच केलें असतें!" या त्याच्या सात्विक आवेशाने सारें शिष्टमंडळ चकित होतें. क्षणभर त्यांना वादाला कांही मुद्दा राहत नाही.

त्यांच्यावर मिळालेली ही पकड स्टीफन आणखीनच दृढ करतो. तो म्हणतो, "तेव्हा, त्या लोकांनी जें केलें तें याहून कांही वेगळें नाही. तथापि खिंडींत झालेल्या या अपयशाची भरपाई होऊं नये असें वाटण्याइतका कांही मी सैतान नाही. मीही माणूसच आहे. पण एवढी भरपाई झाली म्हणजे मग मात्र युद्धविरोधी आवाज उठविण्याला मला स्वातंत्र्य असायला हवेंच. मग मी त्यासाठी माझ्या महत्त्वाकांक्षांची – आणि त्या कांही थोड्या नाहीत – फिकीर करणार नाही; तुमचें माझ्यावरचें प्रेम त्या आड येऊं शकणार नाही. आणि (हे तो अगदी संथ आणि मंद स्वरांत बोलतो) "माझ्या पत्नीची भावनाही मी त्याआड येऊं देऊं शकणार नाही."

हें झाल्यावर शिष्टमंडळ आपला हट्ट सोडतें. मतदारसंघांत जाऊन सांगू कांही तरी, करूं कशी तरी समजावणी, पण तुमचा आमचा संबंध तुटतां कामा नये या भूमिकेवर विरोधी वकीलसाहेबही येतात. एवढ्यांत खालून रस्त्यावरून सैनिकांची एक तुकडी बॅगपाईपच्या तालावर जात असल्याचें ऐकूं येतें. सगळ्यांच्याच चित्तांत कांही तरी थरारल्यासारखें होतें. सर्वांत प्रथम उडी मारून ऑलिव्ह गच्चीवर पळते. तिच्यामागे जाण्याच्या आविर्भावाने, परंतु खरें म्हणजे शिपायांची दौड पाहण्यासाठीच, कॅथरीनही गच्चीवर जाते. शिष्टमंडळाचे सभासदही एकामागे एक गच्चीवर जातात. स्टीफन खोलींतल्याच खिडकीशीं जाऊन पाहत उभा राहतो. स्वतःच्या देशाच्या शूर शिपायांच्या दर्शनाने आणि ते ज्या कामगिरीवर मृत्यूशीं झुंज देण्याच्या तयारीने निघालेले आहेत, तिच्या जाणिवेने त्याच्या अंतःकरणांत भिन्न भावनांचें काहूर माजतें आणि त्याचा चेहरा विकृत होऊन जातो. भावनावेग असह्य होऊन स्टीफन खोलींतच येरझारा करतो. हळूहळू बॅगपाइपचा आवाज ऐकूं येईनासा होतो. स्टीफन टेबलापाशी डोळे हातांनी झाकून त्रस्त अवस्थेंत उभा राहतो. शिष्टमंडळाचे सदस्य आंत येतात. आता त्यांचे चेहरे मघाचे राहिलेले नाहींत. ते गच्चीच्या खिडकीच्या आंत येऊन थांबतात. कॅथरीन त्यांच्या मागोमागच असते. आणि मग शिष्टमंडळापैकी एकजण कांहीशा चमत्कारिक आणि दटावणाऱ्या आवाजांत म्हणतो,

"तें कांही नाही मि. मूर. तोंड बंद ठेवण्याचें आश्वासन द्यायलाच हवें तुम्हीं."

युद्धखोरीच्या दर्शनानें निर्धार —

बाकीचे सदस्यही त्यालाच पाठिंबा देतात. स्टीफनच्याही मनावर कांही विलक्षण परिणाम झालेला असतो. आश्वासन देण्याचा विचार त्याच्या मनांत येतो. तसे शब्द अर्धवट चावत त्याच्या तोंडून बाहेर पडायलाही सुरुवात होते. एवढ्यांत खाली गर्दी उसळते आणि तिच्यामधून घोषणा ऐकूं येतात – "सैनिकांनो, त्या करंट्यांना चांगला इंगा दाखवा," "त्यांचा घाणेरडा देश तुमच्या पायांखाली तुडवून टाका" "एक एकर सुद्धा जागा त्यांच्या ताब्यांत राहूं देऊं नका," इत्यादि.

तत्क्षणीं सैनिकांविषयीच्या आदरामुळे आपण या युद्धाचें खरें स्वरूप विसरून जात

होतों याची स्टीफनला जाणीव होते आणि तो म्हणतो "हो, ही गोष्ट खरी आहे. नाही, मी वचन देणार नाही."

कॅथरीनच्या सगळ्या आशेचा चक्काचूर होतो. शिष्टमंडळांतील सदस्यांना त्याच्याबद्दल तिरस्काराचा झटका येऊन त्याला शिव्या देत देत "बरी झाली, कटकट मिटली," या भावनेने ते चालते होतात. ऑलिव्हला मात्र या कशाचीच कल्पना नसते. शिपायांच्या दौडीच्या गंमतींतच ती दंग आहे. पण लौकरच तिला उमगतें की, कांही तरी विचित्र घडलें आहे. मामा तर निघून घेलाय; मामी रडते आहे आणि आईही. त्यासरशी ती बापाजवळ जाऊन म्हणते, "बाबा, पाहा तरी जरा! आई रडते आहे." स्टीफन स्तब्धपणें नुसतें बघतच राहतो. याचें कारण ऑलिव्हच्या बाळमनालासुद्धा उमगल्याशिवाय राहत नाही. आणि वडिलांच्या गालाला आपला गाल घासून ती म्हणते, "बाबा, खरंच तुम्ही आमच्या बाजूचे व्हा की हो!" आणि येथे दुसरा अंक संपतो.

स्वतःच्या देशाचे शूर सैनिक राष्ट्राच्या कामगिरीवर हातांत शिर घेऊन निघालेले पाहून स्टीफनच्या मनाचा क्षणभर कां होईना गोंधळ झाला. परदेशांत खिंडींत मेलेल्या हजारो शूर सैनिकांचें मनापुढील दृश्य आणि कदाचित त्याच प्रकारच्या भवितव्याकडे चाललेल्या बहादर हायलंडर सैनिकांचें तें प्रत्यक्ष दृश्य, यांच्या योगाने आपली तत्त्वनिष्ठा बाजूला ठेवावी असा त्याचा ओझरता कल झाला. परंतु जनतेच्या – जनतावेताळाच्या – उत्साहाचें खरें स्वरूप ध्यानांत येतांच तो स्तब्ध झाला. डॉ. स्टॉकमनचीही मनाची अशीच हेलकाव्याची अवस्था आपण पाहिली. प्रत्यक्ष तपशीलाचा जरी फरक असला तरी दोन्ही प्रसंगांतील आशय किती एकरूप आहे. मोठीं माणसें हीहीं अखेर माणसेंच असतात, आणि त्यामुळेच आपणाला त्यांचेबद्दल एवढा जिव्हाळा वाटतो, हें यावरून किती उघड होतें. त्याचप्रमाणे अशा मोहाला अशीं माणसें बळी पडत नाहींत, यामुळे त्यांच्याविषयीच्या आदरांत जशी भर पडते तसेंच प्रेमही अधिक वाटूं लागतें.

तत्त्वनिष्ठेची परीक्षा —

युद्धविरोधी भाषणांचा आपला दौरा स्टीफनने धडाक्याने सुरू करून नेटाने पुढे चालू ठेवला होता. देशांत त्याच्या या प्रयत्नाला सर्वत्र विरोध होत होता. त्याच्यावर विरोधी टीकेचा अगदी खालच्या पातळीकरून वर्षाव होत होता. कांही थोड्या – हाताच्या बोटावर मोजतां येण्याइतक्या – लोकांचा त्याला पाठिंबा होता. त्या बळावरच्च तो इंग्लंडमध्ये हिंडून सभा घेत होता. अथवा घेण्याचा यत्न करीत होता हें म्हणणें अधिक शोभेल. कारण त्याच्या सभांना श्रोते आधी मिळत नव्हते; किंवा कोठे मिळालेच तर ते सभेंत दंगल माजवीत होते व सभा उधळल्या जात होत्या. दीड

महिन्याच्या अखेरीला अशाच एका सभेंत दंगल झाल्यावर, सभास्थानीं स्वतःला कोंडून घेऊन, दंगल शांत झाल्यावर तेथून निसटण्याचा तो प्रयत्न करीत असतां, जनतेंतील बेजबाबदार, हुच्च लोकांचें एक टोळकें त्याला घेरतें. त्याची अनिर्वाच्य थट्टा करण्यांत येते; त्याला नाही नाही ते अपशब्द बोलले जातात. त्याने भाषण करावें असा हट्ट धरण्यांत येतो. तो चिडून परंतु अत्यंत शांत निर्धाराने आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्याच्या प्रत्येक विधानाचा उपहास करून हुर्यो उडविण्यांत येते. एवढ्यावर हा प्रकार थांबत नाही, तर एकजण गर्दीतून पुढे घुसून स्टीफनच्या पायावर कातडी पट्ट्याने मार देतो. या ठिकाणीं स्टीफनची परीक्षा होते. त्याचा खाजगी चिटणीस स्टील त्याच्याबरोबर आहे. तो झटकन गर्दीवर – मुख्यतः त्या गुंडावर हल्ला करण्यासाठी पुढे होतो. परंतु स्वतःला लागलेलें असूनही दोन्ही हात वर करून स्टीलला मागे राहण्यास स्टीफन सांगतो आणि स्वतः अगदी ताठ आणि स्तब्ध उभा राहतो. या वेळचा हा प्रसंग शब्दांनी व्यक्त करण्यापलीकडचा आहे. त्यासाठी कुशल नटांनी रंगभूमीवर प्रत्यक्ष करून दाखविलेलाच तो पाहायला हवा. त्याच्या त्या बेडर उभे राहण्याने गर्दीला अधिकच चेव चढतो. "बोल तरी, नाहीतर येथून तोंड काळें तरी कर" अशा घोषणा होतात. परंतु अक्षर न बोलतां, गर्दीकडे रोखून पाहत, स्टीफन तसाच ताठ उभा राहतो. त्यासरशी एक तरुण माणूस चिडून त्याच्या अंगावर धावून येऊन त्याच्या हातावर थुंकतो. हें पाहून थोडासा हास्याचा चीत्कार होतो खरा; परंतु या घाणेरड्या प्रकारामुळें किळस वाटून, अंगावर शहारे येऊन गर्दीत एकदम स्तब्धताच पसरते. तरीही स्टीफन जागेवरून एवढाही हलत नाही. आणि कांहीजण दगडफेकीला सुरुवात करतात. दोन दगड स्टीफनला लागतात; तो डळमळतो, जवळ जवळ जमिनीवर पडतोच; परंतु लगेच सावरून पुन्हा स्तब्धपणें उभा राहतो.

गर्दीत थोडासा लज्जेचा शिरकाव होतो; दगडफेकीबद्दल धिक्कार व्यक्त करण्यांत येतो; तथापि कांहीजण दगडफेकीचें स्वागतही करणारे निघतात. परंतु गर्दीत 'निव्वळ गंमत म्हणून बघे लोक आले होते त्यांना हा प्रकार आता जरा मर्यादेच्या बाहेर जाऊं लागला आहे हें ध्यानांत येतांच त्यांनी तेथून पळता पाय काढायला सुरुवात केली. तितक्यांत आरमारांतील एका सैनिकाने येऊन "चला रे – उगीच कां त्याला छळता" असें जरा दटावून म्हणतांच, कोणी झाल्या प्रकाराबद्दल थोडी लाज वाटून, तर कोणी आता अधिक दंगा करण्यास अवसर नाही हें ओळखून निघून जातात. रस्ता मोकळा झाल्यावर स्टीफन स्टीलला म्हणतो, "हं, चला आता," आणि ते दोघे सभागृहाच्या पायऱ्या उतरून येऊन निघून जाऊं लागतात. त्यानंतर मग दोन पोलिस शिपाई तेथून पाहत पाहत जातात; सभागृहाच्या फुटलेल्या काचांकडे पाहतात; त्यांच्यापैकी एकजण आपल्या जवळच्या वहींत कांही नोंद करतो. सत्ताधारी पक्षाच्या धोरणाला पाठिंबा देणाऱ्या गर्दीखोर जमावाशीं वागण्याची ही पद्धति इंग्लंडसारख्या देशांतही आहे एकूण!

आमच्या देशांत – मुंबईत – कांही ती नवीन नाहीं, याची या दृष्टीने केवढी तरी विषादपूर्ण जाणीव होते.

दीड महिन्यानंतरची पतिपत्नींची भेट—

वरची ही सभा आटोपून स्टीफनला वास्तविक आज घरीं परतायचें होतें. तसें त्याने कॅथरीनला लिहिलेंही होतें. सहा आठवड्यानंतर त्या दोघांची भेट व्हायची होती. दरम्यान लढाईचा क्रम चालूच होता. लढाईवर असलेल्या आपल्या तिघा भावांच्या काळजीने कॅथरीन त्रस्तच होती. त्यांतच स्टीफनचा हा युद्धविरोधी प्रचार. या कात्रीमध्ये तिला जीव नकोसा झाला होता. तिच्या घरचे बहुतेक सर्व नोकर अशा राष्ट्रद्रोही व्यक्तीच्या घरीं राह्यचें नाही म्हणून नोकरी सोडून गेले होते. एक नर्स तेवढी अजून गेलेली नव्हती. परंतु तिच्याही मनांत पुष्कळ राग धुमसत होता, याची कॅथरीनला जाणीव होतीच.

अशा स्थितींत आज ती स्टीफनची किती आतुरतेने वाट पाहत होती. सहा आठवड्यांच्या अनुभवानंतर, आतां तरी निदान तो थोडा फेरविचार करील अशी वेडी आशा तिला वाटत होती. त्याच्या युद्धविरोधी दौऱ्याचे वृत्तांत ती वर्तमानपत्रांतून वाचीतच होती. म्हणून हा निष्फळ प्रयत्न त्याने सोडून द्यावा, तसें करायला अजून आपण त्याला प्रवृत्त करूं, अशा कांहीशा वृत्तीने ती आज कितीक दिवसांनंतर मोठेंच सौंदर्यप्रसाधन करून स्टीफनच्या स्वागतार्थ सज्ज झाली होती. आज आपलें सौंदर्य आणि शृंगारसाज या दोन्ही आकर्षणांचा उपयोग केल्याशिवाय राह्यचें नाही असा तिने निर्धार केला होता. तिने आपल्या केसांची रचना आज विशेषच सुंदर केली आहे हें छोट्या ऑलिव्हच्यासुद्धा नजरेंतून निसटत नाही.

ऑलिव्ह पण मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहे बापाची. पोरस्वभावानुरूप आणि झोप येत नसल्यामुळे ती नाना रीतींचे प्रश्न विचारून कॅथरीनला सतावून सोडीत आहे. तिला कॅथरीनने दिलेल्या तुटक उत्तरातून कॅथरीनला नवऱ्याबद्दल किती काळजी वाटते आहे, सहानुभूति वाटते आहे हें आपल्या मनावर गाढ प्रतिबिंबित होतें. ऑलिव्हच्या लहानग्या चित्तांतसुद्धा, ही लढाई एकदाची संपावी, आपला ह्यूबर्ट मामा परत यावा, याची ओढ लागलेली आहे. त्यावरून कॅथरीनच्या मनाची किती विकल अवस्था झाली असेल याची चांगली कल्पना येते.

कॅथरीनच्या मनावरील असह्य ताण —

सभेमधील आणि सभेबाहेरील त्या गोंधळामुळे स्टीफनला घरीं येण्यास खूपच उशीर होतो. अखेर ऑलिव्हला सक्तीनेच नेऊन निजवावें लागतें. पण कॅथरीनला विश्रांति कोठून मिळणार? कांहीशा अधिऱ्या वृत्तीने ती तशीच स्टीफनची वाट पाहत राहते; तेवढ्यांत तिची नर्स येऊन आपणही नोकरी सोडून जाणार असल्याबद्दल तिला सांगते.

आज धनी घरीं येणार; पण त्या वेळीं आपण या घरांत राहणार नाही, त्याआधीच जाणार असें ती मोठ्या रागाने आणि त्वेषाने म्हणते. स्टीफनला ती खूप खूप दोष देते; त्याच्याबद्दल फार वाईट बोलते. आपण येथे राहणें म्हणजे अप्रत्यक्षपणें पापाला, स्टीफनच्या देशद्रोहाला प्रोत्साहनच देण्यासारखें आहे असा तिचा दावा आहे. कॅथरीनला तिचें बोलणें कडू वाटलें तरी अन्यायाचें वाटणें शक्य नव्हतें. तथापि ती स्टीफनचें समर्थन करण्याचाच प्रयत्न करते. पण त्यामुळे नर्स जास्तच उसळते आणि तिच्या तिच्या भावांच्या शत्रूच्या बाजूला कॅथरीन असलेली पाहून कॅथरीनच्या आईच्या जिवाला काय वाटलें असतें याचा ती कॅथरीनला विचार करायला बजावते. तिचें तें बोलणें अखेर कॅथरीनला इतकें असह्य होतें की, ती तिला गप्प राह्यला सांगते आणि हें असलें एक अक्षरसुद्धा मी ऐकणार नाही म्हणून म्हणते. पण तिचें मन तिला जिने वाढविलें त्या नर्सला चांगलें माहीत आहे. तिचा तो सारा साजश्रृंगार आता कोठे नर्सच्या नजरेस येतो. तेव्हा तिला विश्वास वाटूं लागतो की, धनी परत आल्यावर त्याला त्याच्या कुकर्मापासून कॅथरीन परावृत्त करील. म्हणून लगेच घर सोडून जाण्याचा विचार नर्स रद्द करते. तरीपण " असं तूं केलं नाहीस तर मात्र मी या घरांत राहणार नाही" असें बजावल्याशिवाय ती राहत नाही. परंतु जाण्याचा हा विचार तिला किती असह्य असला पाहिजे याचें प्रत्यंतर ऑलिव्हच्या खोलींत जातांच " माझं कोकरूं तें " असें म्हणून नर्स जी ऑलिव्हला कवटाळूं जाते त्यावरून तेव्हाच येते.

नर्सच्या बोलण्याने संत्रस्त झालेल्या कॅथरीनला आणखी एक धक्का बसायचा होता. तिची भावजय, ह्यूबर्टची पत्नी त्याच वेळीं तेथें येऊन तिला पडलेलें एक विचित्र आणि भयानक स्वप्न सांगूं लागते. स्वप्नामध्यें आपला नवरा मेलेला तिने पाहिला व त्याने ती घाबरून गेली होती. रणभूमीवर प्रेतांचा चालता नाचच जणू तिने स्वप्नांत पाहिला होता. स्वतःचा सगळा मनस्ताप व चिंता आवरून कॅथरीनला त्या भेदरट तरुण मुलीचें सांत्वन करण्याचा उद्योग आणखी करावा लागत होता. असें तिचें सांत्वन करण्याचा यत्न ती करीत आहे तोच स्टीफन येत असल्याची त्या दोघींनाही जाणीव होते; आणि उगीच आपण येऊन कॅथरीनला या क्षणीं त्रस्त केलें असें वाटून हेलन – कॅथरीनची भावजय – आपल्या खोलींत जाते.

स्टीफनचे आशेचे विफल मनोरे —

या सगळ्यामुळे कॅथरीनचें चित्त फार भावनाविवश झालेलें असतें. स्वतःचें मन स्थिर केल्याशिवाय स्टीफनपुढे उभे राहणें तिला अशक्य झालेलें असतें. म्हणून तो येत आहे हें समजलें असूनही ती खिडकीशीं जाते, खिडकी उघडते आणि बाहेर डोकावून पाहत राहते. स्टीफन आंत येतो. कॅथरीनला 'किट' अशी हाक मारतो. पण ती त्यांच्या संमुख येत नाही. ती खिडकींत आहे हें दिसतांच तिकडे मोठ्या आतुरतेने जाऊन, " जरा बघूं तरी " असें म्हणून प्रेमभराने तो तिला दिव्याच्या उजेडांत

ओढतो आणि किती तरी वेळ टक लावून तिच्याकडे पाहतच राहतो. तिच्या केशरचनेने तो मोहित होऊन जातो. केस हातांत घेऊन ते कुरवाळतो, आपलें तोंड त्यांच्यामध्ये झाकून घेतो. "शेवटीं एकदा भेटलों म्हणायचें तर" असें मोठ्या आवेगाने म्हणतो. मुलीची चौकशी करतो. तिच्या स्वतःबद्दल जेव्हा तो विचारतो तेव्हा कॅथरीन असमाधानदर्शक खांदे हालविते. त्यावर "बरोबर आहे, सहा आठवडे झाले" असें तो तळमळीनेच म्हणतो.

पण त्यामुळेच की काय कॅथरीनचा आवेश जागा होतो आणि ती त्याला जरा रुष्ट स्वरांतच विचारते, "पण आतां तरी तुम्ही आलांतच कशाला? कारण एक दिवस येऊन कांही बदल व्हायचा आहे थोडाच? रात्रभर राहणार; उद्या पुन्हा बाहेर. फुकट नाही का उगीच हेलपाटा? उलट मधल्या या येण्याने माझे पुढचे दिवस मला अधिकच कठीण होतात.

बायकोच्या या पवित्र्याचा अर्थच स्टीफनला कळत नाही. हा रुसवा त्या रात्रीपुरता तरी तिने विसरावा अशासाठी तो तिला जवळ घेऊं पाहतो; गोड बोलूं पाहतो. तिला तेवढ्यांत त्याच्या कपाळावरची जखम दिसते. पण त्या जखमेकडेसुद्धा तिला तो लक्ष देऊं देत नाही; ती धुण्याचा त्रास घेऊं देत नाही. इतका तिच्या सहवासासाठी तो आतुर आहे.

पण ती त्याच्यापासून दूर होते. हेलनची आणि आपली किती कठीण अवस्था झाली आहे हें त्याला सांगते. हेलनच्या स्वप्नाचा उल्लेख करते. स्टीफनमुळे तिला घराच्या बाहेर तोंड दाखवितां येत नाही याचा तिच्या तुटक बोलण्यावरून स्टीफनला उमज पडल्यावर त्यालाही कसेंसेंच होतें. तिच्या पत्रावरून तिचा आपल्यावरील राग कमी झाला आहे असें त्याला वाटूं लागलें होतें. पण ती चूक होती हें त्याला कळून येतें. तो तिच्या सौंदर्याची तारीफ करूं पाहतो, एवढ्यांत तिच्या डोळ्यांतून अश्रुपात होत आहे हें त्याला उमगतें आणि जवळ जाऊन तिला तो म्हणतो;

"हें पाहा, अशी रडूं नको. तुला जिणें अवघड करावें असें माझ्या मुळीच मनांत नाही. माझें घरीं येणें तुला अवघड होत असेल तर मी आतांच निघून जातों."

कॅथरीन पुन्हा त्याच्यापासून दूर होते; तिच्याकडे थोडा वेळ तो तसाच पाहत राहतो; शेवटीं टेबलाशीं बसतो आणि काय बोलावें हें न सुचून ब्रश, पावडरचा डबा यांच्याशीं थोडावेळ चाळा करतो. शेवटीं अडखळतच तो बोलतो, "माणसाने आशेचे मनोरे बांधूं नयेत हेंच खरें. किती दिवस, कशा बिकट परिस्थितींत मी काढले. वाटलें आज रात्री वसंतागम होईल; तूं माझी लाडकी मला लाभशील आणि सगळें कसें आनंदमय होईल —"

स्टीफनला भुलविण्याचा यत्न? —

हें तो बोलत असतां कॅथरीन हळूच त्याच्याजवळ येऊन एकदम त्याच्याजवळ

गुडघे टेकून बसते; तो खाली वाकून तिला गाढ आलिंगन देतो. हाच क्षण जणूं तिला हवा होता. आणि ती आवेगाने बोलूं लागते,

"हो! सगळें खरें. पण – उद्या पुन्हा तुमचें येरे माझ्या मागल्या सुरू होणारच" खरेंच -- किती काळ, किती काळ माझ्या मनाची ही अशी गुदमरवून टाकणारी द्विधा अवस्था होत राहणार! मला हें अगदी -- अगदी सहन होत नाही ... सोडून द्यायचा ना हा वेडा रस्ता -- माझ्यासाठी -- द्यायचाच सोडून --" असें म्हणून ती त्याला अधिकच घट्ट बिलगते आणि पुढे म्हणते "एवढें हो म्हणा, मग — मी तुमचीच आहे – सगळें कांही तुमचेंच आहे —"

स्टीफन यामुळे स्तिमित होतो; व्यथित होतो; आणि "परमेश्वरा!" असा निराशेचा उद्गार काढतो. परंतु कॅथरीनच्या हें लक्षांत येत नाही. ती आणखीनच लगट करून "हो सगळें कांही तुम्हांला हवें तसें होईल. पण -- पण -- तुम्ही तेवढें कबूल – करा ना कबूल –"

आणि मग मात्र स्टीफन स्वतःचा संताप, चीड आवरून धरू शकत नाही. विषयवासना जागृत करून ती आपल्याला भुलवूं पाहत आहे असा त्याचा ग्रह होतो आणि तो एकदम ओरडतो, "म्हणजे तुला माझ्याशीं सौदा करायचा आहे, बाजार मांडायचा आहे! तूं -- तूं हें करायला तयार व्हावेस कॅथरीन!" आणि दूर होऊन तो उभा राहतो. थोड्या वेळाने तो निघूनही जातो आणि कॅथरीन तशीच गुडघ्यावर पडून राहते.

खरा परंतु फार कठोर आरोप—

स्टीफनने कॅथरीनवर केलेला आरोप फार कठोर होता. त्याला विषयसुखाच्या मोहाने जिंकायला ती निघाली होती हा त्याचा दावा कांही सर्वस्वी खोटा नव्हता. परंतु त्यामध्येही तिचा हेतु वावगा नव्हता हें त्याने ध्यानांत घ्यावयाला पाहिजे होतें. गेले दोन महिने तिच्या मनाचा किती कोंडमारा होत होता हें त्याने ओळखायला पाहिजे होतें. तिला आपल्या पर्तीपासून दूर व्हायला नको होतें. पण त्याने तिच्या दृष्टीने हा जो सगळा देशाच्या भावनेविरुद्ध लढा मांडला होता तो तिला असह्य झालेला होता. तिचा बाप, भाऊ, सगेसोयरे, देशांतील सारी मंडळी स्टीफनच्या विरुद्ध होती. आणि त्याच देशावर तिचें नितांत प्रेम होतें. त्या देशाच्याच बाजूला आपल्या नवऱ्याने राहावें, आपल्या प्रतिष्ठेला त्याने धोका आणूं नये, तिला समाजांत तोंड दाखविणेंसुद्धा कठीण व्हावें असें कांही करूं नये, असें तिला वाटणें किती स्वाभाविक होतें. पण स्टीफनला आपल्या तत्त्वनिष्ठेपुढे सारें जग तुच्छ होऊन गेलें होतें. त्यापायी त्याने आपल्या प्रिय पत्नीचा कठोर अपमान केला. याचा अखेर व्हायचा तोच परिणाम झाला.

अर्थात याही परिणामासाठी त्याने आपलें मन अगदी निर्धारपूर्वक तयार करून ठेवलें होतें. त्याचमुळे रात्रीच्या त्या प्रसंगानंतर दुसऱ्याच दिवशीं त्याने आपला विश्वासू

खासगी चिटणीस स्टील याला निग्रहपूर्वक रजा दिली. जरी स्टील स्टीफनच्या व्याख्यानांच्या दौऱ्यांत त्याच्याबरोबर सर्व कांही सोशीत निष्ठेने राहिला होता, तरी तो जेव्हा अगदी मोकळ्या वृत्तीने सहज म्हणून गेला की, घरांतील सर्वच नोकर मंडळींनी घर सोडलें याचें कारण जशी त्यांना वाटणारी लोकांची भीति होती तशीच त्यांची देशप्रेमाची भावनाही होती, तेंव्हा हा मनुष्यही आपल्या निष्ठेचा नव्हे हें स्टीफनने ओळखलें. त्यासाठी आणि आपल्या नादीं लागून कोणाचें नुकसान होऊं नये या सद्बुद्धीने त्याने स्टीलच्या इच्छेविरुद्ध हट्टाने स्टीलला नोकरीवरून रजा घेऊन घरीं जायला सांगितलें. स्टीलने त्याला हा वेडा हट्ट सोडून द्यायला सांगितलें. परंतु "आपला पराभव होणार अशी खात्री असतांनासुद्धा, पाय मागे न घेतां, अखेरच्या क्षणापर्यंत झुंजत राहण्यासारखें जगांत श्रेष्ठ कांही नाही" या श्रद्धेने त्याने स्टीलचें म्हणणें अमान्य केलें.

आपल्या संसर्गाने दुसऱ्यांना त्रास होण्याचा फार मोठा संभव आहे हें स्टीफनने चांगलें ओळखलें होतें. स्टील गेल्यावर त्याचा प्रौढ मित्र, तत्त्वज्ञानी मेंडिप येऊन जें कांही बोलला त्यावरून याबद्दल त्याची अधिकच खात्री झाली. मेंडिपने त्याला युद्धांत ब्रिटनचा जय झाल्याची बातमी सांगितली, तेव्हा स्टीफनलाही हायसें वाटलें. कारण त्यानेच कबूल केल्याप्रमाणें तोही एक माणूसच होता. परंतु मेंडिपचा पुढचा उपदेश त्याने मान्य केला नाही. हुतात्म्याचीं वस्त्रें स्टीफनने आतां ठेवून द्यावींत, असा पुष्कळच आग्रह मेंडिपने, मनुष्यस्वभावाविषयी बरेंचसें तत्त्वज्ञान सांगून केला. परंतु, "केवळ जनता–वेताळ जागृत झाला म्हणून त्याच्यापुढे दोन हात करायला उभे राहूंच नये माणसाने" या अर्थाच्या मेंडिपच्या या विचाराचा स्टीफनने धिक्कार केला. त्यावर मेंडिपने त्याला व्यावहारिक सल्ला म्हणून सांगितलें की, युद्धांतील विजयाची बातमी कळतांच लोक बेभान होतील. तेव्हा स्वसंरक्षणासाठी म्हणून कांही काळ स्टीफनने देशाच्या – निदान लंडनच्या बाहेर जावें.

आपल्याच माणसांवर अन्याय —

यावरून आपल्यापुढे काय वाढून ठेवलें आहे याची स्टीफनला चांगली कल्पना आली. परंतु कॅथरीनला आणि ऑलिव्हला मी बाहेर पाठवितो, एवढेंच त्याने उत्तर दिलें. यांत एका बाजूला आपल्यामुळे इतर कोणाला कांही सोसायला लागूं नये ही सदिच्छा अवश्य होती. परंतु त्यांतच आपल्या जिवलग माणसांवर तो अन्यायही करीत होता. त्यांना तो इतर, परके समजत होता. त्यांच्यासह आपण एकत्र राहून दुःख भोगावें या कौटुंबिक उच्च भावनेला तो योग्य मान देऊं शकला नाही; आणि आपल्याविना तीं माणसें सुखी राहूं शकतील अशी वृथा अन्यायाची कल्पना त्याने केली.

मेंडिपने त्याला हा मूर्खपणा करूं नको म्हणून पुष्कळ सांगितलें. पण स्टीफनने आपला हट्ट सोडला नाही; आणि मेंडिप हताश होऊन निघून गेला. त्यानंतर स्टीफनवर

लगेचच दुसरा हल्ला झाला तो नर्सकडून. त्याने तिला शांतपणेंच सांगितलें की, "तूं आमचें घर सोडून जात आहेस हें शहाणपणाचें आहे." पण तेवढ्यावर ती बाई थांबली नाही. तिने स्टीफनला जळजळीतपणें फार कडक बोलून घेतलें. स्वतःच्या पत्नीला फार वाईट वागविल्याबद्दल, तिच्या अंतःकरणाची कदर न केल्याबद्दल तिने त्याला इतक्या जळजळीत शब्दांत सुनावलें की, तिच्या बोलण्यांत तथ्य आहे असें पटत असूनही, कॅथरीनलासुद्धा तिचें तें कटु बोलणें सहन झालें नाही आणि तीच नर्सला गप्प राह्यला सांगते. हा प्रकार स्टीफनलाही असह्य झालेला असतो. परंतु कॅथरीनच्या नर्सशीं वागण्यांत आपल्याबद्दलचें प्रेम किती उत्कटतेने व्यक्त होत होतें याचा कांही साक्षात्कार स्टीफनला झाला नाही. "युद्धांत जय झाल्याची बातमी आली आहे" एवढेंच रुक्षपणें बोलून तो कॅथरीनपुढून निघून जातो.

कॅथरीनच्या सहनशीलतेचा अंत —

पण, आतापर्यंत कसेंबसें सावरून धरलेलें कॅथरीनचें मन पुढच्याच क्षणीं बेभान होतें. कारण तिचे वडील तिला येऊन सांगतात की जय झाला; पण त्याच वेळीं त्यांना हेंही सांगावें लागतें की, लढाईत त्यांचा मुलगा—कॅथरीनचा अत्यंत लाडका धाकटा भाऊ ह्यूबर्ट—हा मारला गेला होता. वडील कांहीतरी बोलून तिचें समाधान करण्याचा प्रयत्न करतात; परंतु व्यर्थ. कॅथरीनच्या हृदयाची व्याकुलता इतकी पराकोटीला पोचली होती की, तिला तेथें थांबणेंसुद्धा अशक्य झालें, आणि "मला हेलनकडे गेलें पाहिजे" असें म्हणून ती निघून गेली. ह्यूबर्टच्या मृत्यूची वार्ता ऐकल्यानंतर स्टीफनशीं बोलण्याची सुद्धा तिला इच्छा राहिली नाही. तिच्या निरोपावरून स्टीफन मात्र सासऱ्याकडे येतो.

त्यानंतर सासरा आणि जावई यांच्यामध्ये जो संवाद होतो तो नाट्यमयतेच्या दृष्टीने आणि स्टीफनच्या निष्ठेच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी आणि सुंदर आहे. "कोणत्याही स्त्रीला सहन करणें अशक्य आहे इतका गेल्या दोन महिन्यांत पत्नीच्या सहनशीलतेचा तुम्हीं अगदी अंत पाहिला आहे" असें सासरा त्याला संतापाने परंतु त्याच्याविषयीच्या जिव्हाळ्याने सांगतो. स्टीफनने कॅथरीनच्या एकूण एक भावनेशीं विरोध मांडला होता; पण आता तरी स्टीफनने थांबावें असें अगदी तळमळून सासऱ्याने त्याला विनविलें. "कोणत्या जगांतला हा अत्यंत सैतानी अहंकार तुझा?" असेंही त्याने जावयाला अत्यंत विद्ध अंतःकरणाने विचारलें.

पण स्टीफनचीं उत्तरें इतकीं मृदु शब्दांत आणि दुसऱ्याच्या अंतःकरणाला हात घालणारीं होतीं की, सासऱ्याला त्याच्या मनाचा थांग लागेना. म्हणून तो म्हणाला,

"मला तुझ्या वागण्याचा अर्थच समजत नाही. तुझें आपल्या बायकोवर मनापासून प्रेम आहे असेंच मी मानीत होतों." त्यावर जीं उत्तर प्रत्युत्तरें झालीं तीं अशीं —

"बायकांमुलांपेक्षा देशाचा आपल्यावर अधिक हक्क आहे असें तुम्ही मानतां ना?" स्टीफनचा प्रश्न.

"हो." सासऱ्याचें उत्तर.

"मग मीही तसेंच मानतों" हें सासऱ्याला निरूत्तर करणारें स्टीफनचें उत्तर.

त्यामुळे सासरा बिचारा गोंधळून जातो. "देशाच्या बऱ्यावाईट वागण्याचा न्याय करण्याचा व्यक्तीला अधिकार नाही" या सासऱ्याच्या श्रद्धेचा भोळी श्रद्धा म्हणून स्टीफन अत्यंत नाजूक उपहास करतो. परंतु स्टीफनचें हें सगळें वागणें मृगजळामागे धावण्यासारखें आहे असें सासऱ्याला वाटतें; तर आजचें हें मृगजळ भविष्यकाळीं खरेंखुरें प्रत्यक्ष निर्मळ जळ होणार आहे अशी श्रद्धा स्टीफनकडून व्यक्त होते.

स्वतःच्या महान देशाच्या शूर शिपायांच्या त्यागाची स्टीफनला जाणीव का असूं नये असा सासऱ्याला प्रश्न पडतो. त्यावर स्टीफनने दिलेलें उत्तर त्याच्या पोटतिडकेंतून बाहेर पडलेलें आहे. तो म्हणतो,

"गेले दोन महिने मीही कांही थोडें सोसलें नाही. रस्त्यावर मला पाहिलें की, जो तो तोंड फिरवितो. लहानपणापासूनचे माझे स्नेही – पण मला पाहूनही पुढे कोणी दिसलेंच नाही अशा थाटाने ते निघून जातात. टपाल फोडायचें म्हणजे धडकी भरते. रात्रीं अंथरुणावर आंग टाकावें – पण कानांत लोकांच्या धिक्काराच्या आरोळ्या घुमत राहाव्यात. मनाला जाणीव असावी की, देशांत कुठेही माझ्या नावाचा उच्चार होतांच लोक तिरस्काराने तोंड आंबट करतात.—तुमच्या त्या लढाया म्हणजे यापुढे निव्वळ पोरखेळ आहे!"

स्वतःची निष्ठा आणि लोकांची निष्ठा —

त्यानंतर देशांतील लोकांची निष्ठा आणि स्वतःची निष्ठा यांमधील भेद स्टीफन स्पष्ट करतो. "लोकांच्या निष्ठेसाठी लोक त्याग करतात; प्राण देतात. तेंच स्वतःच्या निष्ठेसाठी मी करतों. माझ्यामागे थोडे लोक असतील. पण त्यांची निष्ठा मी डावलूं शकत नाही. माझी निष्ठा मी उच्चतर मानतों; आणि मी जो अग्नि पेटवूं पाहत आहें तो केवळ इंग्लंडच्याच कल्याणाचा आहे असें नव्हे, तर अखिल जगाच्या तो कल्याणाचा आहे; आणि म्हणून तो विझूं नये यासाठी सर्व प्रयत्न करण्याचा माझा निर्धार आहे." हें तो इतक्या आवेशाने बोलतो की, त्याचा सासरा स्तिमित होऊन त्याच्याकडे थोडा वेळ पाहतच राहतो; पण नंतर मात्र त्याच्या रागाचा एकदम स्फोट होतो. स्टीफनचें बोलणें श्रद्धेचें आहे हें त्याला मान्य आहे. पण या नव्या अग्नीचें प्रकरण त्याच्या जुन्या जमान्यांतल्या मनाला उमगतच नाही. एक मात्र तो स्टीफनला बजावतो, "पण दुसरा एक अग्नि आहे; तुमच्या बायकोचें प्रेम हा तो अग्नि. तो मात्र विझवायला तुम्ही निघाला आहांत. साऱ्या जगाच्या अखेरीस शिल्लक राहिलेला एकटा एक माणूसच होऊन राह्यचें तुमचें नशीब दिसतें आहे. घ्या आपला सर्वनाश करून घ्यायचा तर – पण मला मात्र तुमच्याबद्दल एवढी एवढी सुद्धा कीव

वाटायची नाही.” असें मडकून बोलून सासरा ताडताड पावलें टाकीत तेथून निघून जातो.

कॅथरीनच्या प्रेमाची राख —

आणि जो अग्नि स्टीफन विझवायला निघाला असल्याचें सासऱ्याने जीव तळमळून म्हटलें होतें तो अग्नि – कॅथरीनचें प्रेम – विझून त्याची पार राख झाल्याचें दृश्य पुढच्याच क्षणीं जेव्हा आपल्यापुढे उभे राहतें तेव्हा आपणही चकित होऊन जातों. सासरा तावातावाने निघून गेल्यावर रोजच्या सवयीप्रमाणे नोकरासाठी स्टीफन घंटा वाजवितो. पण घरांतले सगळेच नोकर घर सोडून गेलेले असतात. घराला आग लावली जाईल अशी त्यांना भीति वाटते, असें कॅथरीननेच स्वतः येऊन सांगितलें आणि स्वतःही घर सोडून जाण्याचें ठरविल्याबद्दलही त्याच वेळी सांगितलें. स्टीफनला वाटलें की, ती तात्पुरती संरक्षणाच्या दृष्टीने जात असावी. परंतु आपण घर कायमचेंच सोडून जाणार असून केव्हाच परत येणार नाही हेंही तिने स्पष्ट केलें. दहा वर्षांच्या एकत्र सहवासानंतर–दोघांचें एकमेकांवर इतकें प्रेम असतांना–तिने हा निर्णय करावा याचा अर्थच स्टीफनला समजेना. परंतु त्याच्या प्रेम या शब्दाने कॅथरीन भडकली आणि मनांतला सारा संताप तिने बाहेर ओकून टाकला. “ माझ्यासारख्या वीरवृत्तीला पारखी असणाऱ्या स्त्रीवर तुमचें प्रेम असूं तरी कसें शकेल ?” असा तिने त्याला खोचदार प्रश्न केला, आणि ती पुढे म्हणाली, “ काल रात्रीं मी तुमची व्हायला तयार होतें. पण तें तुम्हांला मानवलें नाही. तेव्हा जर तें मानवलें नाही, तर तें तुम्हांला केव्हाच मानवणार नाही. तुमची पायरी फार फार उंच आहे. ज्यांच्या पायरीला मी पोचूं शकत नाही, त्यांच्याबरोबर राहावें असें नाही वाटत मला.”

स्टीफन तिला जवळ घेण्याचा आणि तिला समजावण्याचा प्रयत्न करतो. परंतु आदल्या रात्रीं त्यानें वापरलेला ‘सौदा’ हा शब्द तिच्या जिव्हारीं लागलेला असतो. म्हणून ती म्हणते, “ मनाने मी तुमची होऊं शकत नाही. आणि तुमची निव्वळ रखेली होऊन राह्यची माझी इच्छा नाही, माझी स्वतःचीही मला कांहीएक निष्ठा आहे. या घरांत गळा दाबून प्राण जाण्याच्या अवस्थेंत राह्यची माझी इच्छा नाही.”

स्टीफनला सगळ्या गोष्टीचा स्वच्छ उलगडा होतो. त्यासरशी त्याची तडफड सगळी शांत होते. मुलीला घेऊन जायलाही तो तिला यत्किंचित विरोध करीत नाही. कॅथरीन जायला निघते खरी. परंतु तिचें प्रेम तिला पुन्हा मागे ओढतें, आणि अगदी तळमळून ती त्याला विनविते, “ खरेंच, द्या ना हा एवढा हट्ट सोडून. माझ्या पातळीवर केव्हांच का तुम्ही येऊं शकणार नाही ?”

परंतु तसें करायचें म्हणजे खाली रस्त्यावर जो लोकांचा विजयोत्साहाचा भावनोद्रेक चालू होता त्यांत सामील व्हायचें; त्या गोष्टीला स्टीफनची तयारी नव्हती. म्हणून अखेर तो तिला निरोप देतो. धाकट्या मुलीला त्याला सोडून जायचें जिवावर येतें. पण अखेर स्वतःचें मन आवरून तो तिलाही निरोप देतो.

संसार संपला; फक्त कुडीचा अंत व्हायचा राहिला—

झालें; येथेच त्याच्या संसाराचा अंत झाला. आता फक्त त्याची कुडी राहिली होती, तिचाच तेवढा अंत व्हायचा होता; आणि तोही अटळ होता. कारण, खालून दंगेखोरांच्या जमावांतून कांही लोक जबरदस्तीने त्याच्या घरांत घुसून आले. त्यांनी त्याच्यावर बोरांच्या बिया, बारीक कांदे, लिंबोऱ्या वगैरेंचा वर्षाव केला. देशद्रोही वगैरे शेलक्या शिव्या त्याला दिल्या. बाहेरून खिडक्यांच्या काचा फोडून दगडही आंत आले. आंत गच्चीवर आलेले विद्यार्थी जबरदस्तीने त्याला उचलून भिंतीपाशी सरकविलेल्या एला टेबलावर सक्तीनेच बसवितात, आणि विद्यार्थ्यांचा म्होरक्या त्याला हुकूम करतो, "हं, करा आता व्याख्यानाला सुरुवात." स्टीफन अगदी शांत असतो. तो बोलतो तेव्हा त्याच्या आवाजांत उत्कट दृढता असते. "तुम्ही लोक माझ्या शरीरावर फक्त जबरदस्ती करूं शकता; तो प्रयोग तुम्ही करा. पण त्यापूर्वी तुम्हांला एक गोष्ट मी सांगतों." असें म्हणून तो अत्यंत कठोरपणाने "तुमच्या या जनता–वेताळासारखी घाणेरडी गोष्ट पृथ्वीतलावर साऱ्या सृष्टीमध्ये नाही; या वेताळाचें पाऊल वाजलें की, तेथून परमेश्वर तात्काळ पळून जाऊन अदृश्य होतो" असा त्यांना आहेर करतो. त्या वेळीं डॉ. स्टॉकमनच्या त्या उधळलेल्या सभेंतील भाषणाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्याच्याइतक्याच त्वेषाने या गर्दीच्या ओंगळ स्वरूपाचें दर्शन स्टीफन त्यांना करवितो.

अर्थात त्याचें तें भेदक बोलणें त्या जमावाला सहन होणें अशक्यच असतें. "मी एकटा असलों आणि तुम्ही लाखो लोकांनी हल्ला जरी केलात तरी माझी निष्ठा रेसभरसुद्धा ढळणार नाही असें जेव्हा तो म्हणतो, त्या वेळीं एक तरुण मुलगी हातांत सुरा घेऊन पुढे सरसावते आणि सुरा स्टीफनवर रागानें उगारते. तिचा प्रियकर रणांगणावर मारला गेला होता. अशा शिपायांचा अवमान करणारा हा आपला शत्रू म्हणून ती स्टीफनवर चिडली होती. तथापि सुरा उगारला तरी प्रत्यक्षांत तो चालविण्याइतकें धैर्य त्या बिचारीच्या हातांत नव्हतें. पण तिला जें साधलें नाही तें विद्यार्थ्यांच्या रेटारेटींत साधलें. तिने सुरा रोखला असतांनाच स्टीफनच्या मागून दट्टया येऊन तो पुढे सुऱ्यावरच वाकला आणि सुरा पोटांत घुसून गतप्राण होऊन पडला. विद्यार्थ्यांची या बनावाला कांही खरी तयारी नव्हती. म्हणून थोडेंसें घाबरूनच त्यांनी काढता पाय घेतला. येथे नाटकाचा चवथा अंक संपला.

परंतु त्याहीपुढे नाटककाराने एक मूक प्रवेश नाटकांत घातला आहे. त्यामध्ये रंगभूमीवर स्टीफनचा पुतळा उभारलेला दिसतो आणि त्याखाली पुढील मजकूर असतो.

स्वतःच्या निष्ठेशीं प्रामाणिक असणारा

स्टीफन मूर

याच्या स्मरणार्थ

रेखीव आणि काव्यमय भाषा —

एका तत्त्वप्रेमी आणि निष्ठावान वीरपुरुषाची ही अशी मोठी वेधक आणि प्रभावीपणें नाट्यान्वित केलेली कहाणी आहे. कोणाही कुशल नटाला वठवून दाखविण्याचा मोह पडावा अशीच ही नाट्यपूर्ण भूमिका आहे. आणि त्या भूमिकेला अनुरूप अशीच नाटकाची भाषाही आहे. जसे प्रसंग मोजके, नेटके आणि तासून पुसून जशास तसे केलेले, तशीच त्या प्रसंगांची भाषा आहे. तिला भावनेची धारही मोठी आहे. अगदी स्वाभाविक भासणारी ही भाषा तसें पाहिलें तर किती तरी मोठ्या प्रमाणांत कृत्रिमच आहे. इतकी चपखल भाषा सर्वसामान्य माणसांच्या बोलण्यांत क्वचितच अनुभवाला येईल. गद्य भाषणांतही या नाटकांत, केवळ नायकाच्याच नव्हे तर त्यांच्या सासऱ्यासारख्या सारा जन्म लष्करी हालचालींत घालविलेल्या वृद्ध माणसाच्या सुद्धा, एक प्रकारची काव्यमयता जाणवल्याशिवाय राहत नाही. विशेषतः चवथ्या अंकांत सासरा आणि जावई, दोघांच्याही भावना खूप ताणलेल्या असतात तेव्हा.

असें हें नाटक खरोखरच करुणरसप्रधान नाटक आहे का, असा वाद घातला जाणें शक्य आहे. कारण नाटककाराने आणखी एक पांचवा अंक – मूक प्रवेश – घालून नायकाचा विजयच झाल्याचें दाखविलें आहे. परंतु हा प्रवेश पाहिल्यानंतरही प्रेक्षक कोणत्या मनःस्थितींत उठतो याला खरें महत्त्व आहे.

त्या दृष्टीने नाटक संपल्यावर आपल्या मनांत खेदाची, करुणेचीच गडद छाया दाटलेली राहते हें निःसंशय. स्टीफन हा कांही कोणी माथेफिरू माणूस नाही. त्याच्या ठिकाणीं देशप्रेम आहे, मानव्याचें उत्कट प्रेम आहे. तो बुद्धिमान आहे, चतुर आहे. त्याची वादपद्धति विनम्र आहे. घेतलेल्या भूमिकेचा हिरीरीने प्रचार करण्याइतका निष्ठावान व तेजस्वी त्याचा स्वभाव आहे. "एखाद्या गोष्टीबद्दल तळमळ वाटून तुम्ही बोलूं लागतांत की तुमचा सगळा खाक्या निव्वळ आगीसारखा" असें त्याच्या भावनाशील वक्तृत्वाचें वर्णन त्याच्या मेहुण्यानेच केलें आहे. त्याच्या ठिकाणीं केवढी मोठी तरी त्यागशीलता आहे. कष्ट, संकटें, प्रसंगीं मृत्यूही स्वीकारायची त्याची तयारी आहे.

आणि अशा या माणसावर जी एकामागून एक अनर्थांची परंपरा कोसळली ती कांही त्याने एखादा भलताच, अनर्थकारक मार्ग स्वीकारला होता म्हणून का? त्याची निष्ठा तत्त्वतः पाहतां कोठे चुकीची होती? त्याचें म्हणणें एवढेंच होतें कीं, स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्याविषयीं निष्ठा बाळगणाऱ्या ब्रिटनसारख्या प्रभावी राष्ट्राने आपल्या पाशवी सामर्थ्याच्या जोरावर लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा बळी घेऊं नये. कोणाही सहृदय माणसाला अमान्य न व्हावी अशीच त्याची ही भूमिका आहे. एका स्वतंत्रताप्रिय राष्ट्रांत या भूमिकेचा प्रसार करण्याचें स्वातंत्र्य फक्त त्याला हवें होतें. या स्वातंत्र्याची त्याच्या मनांतली किंमत एवढी मोठी होती की, त्यासाठी आपलें उपमंत्रीपद तो सोडायला तयार होता; आपली पार्लमेंटातली जागा सोडायला तयार होता. जिवा-

भावाचे सखेसोयरे दुरावले तरी तें दुःख सोसण्याची त्याची तयारी होती. तो अहिंसावादी नव्हता; केव्हाच युद्ध करूं नये अशीं त्याचीं मतें नव्हतीं. परंतु युद्धें करायचींच झालीं तर तीं समान प्रतिस्पर्ध्यांशीं करावीं; गरीब, दुबळ्या लहान राष्ट्रांना मोठ्या राष्ट्रांनी नाडूं नये एवढी अगदी साधी त्याची मागणी होती. या भूमिकेचा प्रचार देशांत यशस्वी होणार नाही हें त्याला समजत नव्हतें असें नाही. परंतु त्यानेच म्हटल्याप्रमाणे, " असें हें सारें होत असतांना देशांतील एकाही सार्वजनिक कार्यकर्त्याने निषेधाचा एक ब्रसुद्धा काढला नाही असें इतिहासाने म्हणूं नये " एवढ्यासाठी देशांत आपली भूमिका भांडण्याचें त्याला स्वातंत्र्य हवें होतें.

पण हें स्वातंत्र्य त्याला मिळालें नाही. एका बाजूला त्याची ही तत्त्वनिष्ठा आणि दुसऱ्या बाजूला कांही झालें तरी आपला देशच बरोबर अशी आंधळी भावना उराशीं बाळगणारें देशप्रेम यांच्यामधला झगडा दाखविणें हें या नाटकाचें मुख्य कार्य आहे. या झगड्यांत अखेर स्टीफनच्या बाजूला कोणी राहत नाही. त्याचे आप्त, सखे, सोयरे, नोकरचाकर, सगळे सगळे त्याला सोडून जातात. अगदी शेवटीं त्याची पत्नीही सोडून जाते. तिने स्वतःच्या भावनांशीं कांही थोडा झगडा केला नाही. परंतु देशप्रेम, पाठच्या भावाचा रणांगणावरील मृत्यु, देशांत तोंड वर न काढतां येण्याची अवस्था, या सर्व गोष्टींनी तिचाही धीर अखेर सुटला. त्याला अत्यंत प्रिय असलेली त्याची एकुलती एक मुलगीही त्याला अंतरली. आणि जगांतला अखेरचा एकटा एक माणूस अशी त्याची जीवनांत अवस्था होऊन गेली.

याला जबाबदार तो कितीसा होता ? परिस्थिति कितीशी होती ? त्याच्याचप्रमाणे जंगाच्या अखेरीस एकटा राहिलेल्या स्टॉकमनच्या ठिकाणीं उतावीळपणा, अहंकार, महत्त्वाकांक्षा, अव्यवहारीपणा वगैरे जे दोष होते त्यांपैकी एकाचाही आढळ स्टीफनच्या ठिकाणीं असा कांही आपणाला होत नाही की, ज्यामुळे त्याची ही अशी अखेर होण्याला थोडेंतरी साह्य व्हावें. आपल्याला महत्त्वाकांक्षा आहे हें त्याने कबूल केलें आहे. परंतु युद्धाला विरोध करून कोणी एक अलौकिक समाजकल्याणकर्ता म्हणून मिरवण्याची त्याची ती महत्त्वाकांक्षा नव्हती. आपण पत्करलेलें कार्य हें अयशस्वी होणारें कार्य आहे याची त्याला पूर्ण खातरजमा होती. त्या बाबतींत स्वार्थाचा दोष त्याला दुरूनसुद्धा कोणी चिकटवूं शकत नव्हता.

बिनतोड परिस्थितीशीं झगडा —

अशा स्थितींत हा झगडा एक निष्ठावान व्यक्ति आणि त्याच्यापुढे उभी ठाकलेली बिनतोड विरोधी परिस्थिति यांच्याचमधला होता हें उघड आहे. आपल्या देशाच्या शूर शिपायांच्या त्यागामुळे, आणि अवघड परिस्थितींत सांपडून त्यांच्या जिवावर बेतल्याचें पाहून, क्षणभर हा निष्ठावान पुरुष आपल्या ध्येयाशीं तात्पुरती का होईना पण प्रतारणा करण्याच्या बेतांत होता हें दाखवून नाटककाराने त्यांच्या ठिकाणचें मानव्यच

आपणाला प्रतीत केलें आहे. आणि म्हणूनच आपल्याला त्याच्याविषयी विशेष जिव्हाळा कसा वाटतो हें आपण पाहिलें आहे. त्या प्रसंगीं ही प्रतारणा त्याने केली असती तर त्याचा दारुण अंत झाला नसता. व्यावहारिक सुख व समाधान त्याला लाभलें असतें. पण त्याने ही प्रतारणा करूं नये हीच आपली भावना असते. निष्ठावंतपणामुळे त्याचा करुण अंत होणार हें आपल्याला ठाऊक असतें. तरीही आणि असें होणार यामुळे आपल्याला खेद होणार असें असूनही, तसें होण्यांतच आपण त्याचें श्रेष्ठत्व पाहतों.

एक दोष व्यवहारवादी माणसें त्याला चिकटवूं शकतील. तो म्हणजे हटवादीपणाचा. पार्लमेंटांत त्याने आपलें मत स्पष्टपणें मांडलें आणि त्याचा परिणाम म्हणून आपली दुय्यम मंत्र्याची जागा आणि आपलें पार्लमेंटचें सभासदत्व त्याने गमावलें, एवढ्यावर थांबायला त्याला कांही हरकत नव्हती. एवढ्या स्वातंत्र्यप्रिय देशांत त्या देशाच्या हातून घडत असलेल्या मानवताविरोधी वर्तनाबद्दल नापसंती दर्शविण्याला एकही माणूस निघूं नये असें न घडावें ही त्याची इच्छा एवढ्यावर पुरी झाली होती.

हटवादीपणा की अहंकार ?—

त्यानंतर मग त्याने जो युद्धविरोधी प्रचार चालविला त्याचें प्रयोजन काय होतें ? जी जनता हा नवा विचार एवढाही ऐकून घ्यायला तयार नव्हती त्याच जनतेपुढे ही गीता वाचीत जाण्यापासून त्याला काय साध्य होणार होतें ? या प्रचाराचा परिणाम कांही होत नाही हें अनुभवाने समजूनही आलें. सभाव्याख्यानांमधला विरोध आणि बाहेरची गुंडगिरी यांचाही प्रसाद चाखायला मिळाला. त्यानंतर घरीं परत आल्यावर या सर्व प्रकारामुळे, आपल्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या पत्नीच्या जिवाची कशी आग होते हेंही त्याने अनुभवलें. तरीही त्याचें चित्त विरघळलें नाही हें कितीसें समर्थनीय ? जगांतील मानव्याबद्दल तळमळणाऱ्या त्याला आपली पत्नी व कन्या यांची थोडीशी तरी कीव वाटायला नको होती का ? पत्नीची निष्ठा त्याच्याहून भिन्न होती; पण ज्या समाजाच्या गुंडगिरीने तो विटून गेला होता त्या गुंडगिरीचें समर्थन करणारी कांही ती स्त्री नव्हती. तिच्या भावनांची त्याने बिलकूल कदर करूं नये हें त्याचें तत्त्वप्रेम म्हणायचें की हटवादीपणा, अहंकार म्हणावयाचा ?

बरें, सगळें कांही झाल्यावरही पुन्हा भिंतीवर डोकें फोडून घेण्यांत कोणता शहाणपणा होता ? युद्ध संपलें होतें. व्हायचें तें होऊन गेलें होतें. आतां कोणताही प्रचार करण्याने तें परत येणार नव्हतें. अशा वेळीं स्वतःचा प्रौढ मित्र मेंडिप याचा सल्ला मानून, पत्नी व मुलगी यांना घेऊन चार आठवडे देशाबाहेर, किंवा देशांतल्या देशांतच जरा शांतशा दूर ठिकाणीं जाऊन राहण्याने निष्ठाभंग कोठेसा होणार होता ? थोडा काळ गेला असता म्हणजे जनतेंतील भावनाभर थोडा, नव्हे बहुतेक सारा, कमी झाला असता. पुढे तरी तो कमी झालाच ना ? त्याचा पुतळा लोकांनी उभारलाच ना ? अशा स्थितींत थोडीशी सावधगिरी घेऊन वागण्याने कार्यहानि होण्याऐवजी स्वमतप्रसाराला अधिक

अनुकूल आणि यशदायक संधि मिळाली असती. ती हातची घालवून स्टीफनने काय मिळविलें? त्याऐवजी अगदी जणू कांही अग्निकाष्ठें भक्षण करायला निघाल्याच्या आवेशाने, त्याने भडकलेल्या लोकसमाजाच्या अग्नींत स्वतःचा होम कशासाठी केला? यांत त्याचा तोल सुटला असेंच नाही का झालें? बेफाम झालेल्या जमावापुढे त्यांच्याविषयीचा स्वतःचा तिरस्कार जळजळीत शब्दांनी व्यक्त करतांना, त्यामुळे त्या जमावावर कांही परिणाम होणार नाही हें काय त्याला ठाऊक नव्हतें? मग जाणून बुजून त्या संकटांत स्वतःला सापडवून घेण्यांत शौर्य, वीर्य किंवा शहाणपणा यांच्याऐवजी निराशेचा बेहोशपणा आणि अप्रमाण उतावीळपणाच त्याने दाखविला असें म्हणावयास नको काय?

निकोप आशावादित्वाचा अभाव —

हा जो हल्ला स्टीफनवर, विशेषतः त्याच्या शेवटच्या १६।१७ तासांतल्या वर्तनावरून करतां येतो त्याला संपूर्ण समाधानकारक उत्तर देणें खरोखरच कठीण आहे. दोन महिन्यांच्या युद्धविरोधी प्रचारामध्ये त्याला झालेलें जनतेचें दर्शन कितीही हिडीस असलें तरी तेवढ्यावरून त्याने आपला तोल गमवावा हें त्याच्यामधलें मोठें बोचक उणेपण आहे असें वाटल्यावाचून राहत नाही.

स्वतःच्या पत्नीशीं त्या रात्रीं त्याने जें अन्यायाचें वर्तन केलें त्यामध्येच त्याचा तोल सुटल्याचें पहिलें दर्शन झालें. तिच्यावर स्वतःच्या शरीराचा बाजार मांडल्याचा जो निर्घृण आरोप त्याने केला त्यांत सत्य मुळीच नव्हतें. आणि म्हणूनच पराजय पचवितां न आलेल्या निराशेचें आणि चिडीचें त्यामध्ये दुबळें प्रदर्शन झालें. हाच दुबळेपणा अखेरच्या प्रसंगांत जाणून बुजून एकट्याने लोकक्षोभाला बळी पडण्यांतही दिसून आला. स्टीफन तत्वनिष्ठ होता; तत्त्वासाठी हवा तो त्याग करायला तयार होता. परंतु माणसें कितीएकदा चुकूं शकतात. त्यासाठी त्यांच्यावर चिडण्यापेक्षा त्यांची समजूत घालण्याचाच यत्न करायला हवा. चिडून, लोकच गाढव आहेत म्हणून, सर्वच समाजाचा अधिक्षेप करून, स्वतःलाच श्रेष्ठ समजण्याचा अहंकार स्टीफनच्या ठिकाणीं जागृत झाला होता; परंतु अशा अहंकारी माणसाची दुसरी जी एक प्रवृत्ति कांही वेळां आढळते ती त्याच्या ठिकाणीं नव्हती. या सर्व वेड्या समाजाला तुच्छ मानून स्वतःच्याच ठिकाणीं मशगुल होऊन गिरिगव्हरांत भटकत राहण्याची त्याची तयारी नव्हती; किंवा डॉक्टर स्टॉकमनप्रमाणे, आज समाज जरी चुकत असला तरी भविष्यकाळीं तो सुधारणार आहे व त्यासाठी आपण, एकटे पडलों असलों तरी खटपटतच राहूं, अशा प्रकारचा निकोप आशावादही त्याच्या ठिकाणीं नव्हता.

म्हणूनच, एका प्रकारें हतबल झालेल्या माणसाप्रमाणे त्याने स्वतःला लोकक्षोभांत जाळून घेतलें, असा आरोप करतां यावा, असेंच त्याचें शेवटच्या कांही तासांतलें चरित्र आहे. त्यांत त्याचा त्याग निःसीम आहे; पण विपरीत परिस्थितींतही सुजाणपणें व आशावादीपणाने झगडण्यासाठी लागणारी निकोप लोकनिष्ठा त्याच्या ठिकाणीं आढळली नाही.

आणि म्हणून विरोधी परिस्थितीच्या कचाट्यांत सापडून एका तत्त्वनिष्ठ माणसाचा झालेला हा अंत थोड्या अंशीं तरी अखेर त्याने आपल्या हतबल नैराश्याने स्वतःवर ओढवून घेतला असें म्हणण्याइतकी सामग्री नाटककाराने आपल्याला पुरविली आहे असें म्हटलें पाहिजे.

स्वभावगत करुण विपाकाचेंही मिश्रण —

तेव्हा बाह्य परिस्थितिगत करुण विपाक असें ज्या नाटकाचें संपूर्णतया वर्णन करतां येण्यासारखें आहे अशा या नाटकांतसुद्धा थोडेंसें स्वभावगत करुण विपाकाचें मिश्रण आढळतें, हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. तथापि नाटककाराचें मुख्य साध्य एका श्रेष्ठ माणसावर कोसळलेली अन्याय्य अनर्थपरंपरा दाखविण्याचें आहे. म्हणून त्याने सुरुवातीपासून नायकाच्या श्रेष्ठत्वाचें दर्शन करणारे प्रसंग उभे करणें हें स्वाभाविकच होतें. परंतु त्यामध्येसुद्धा त्याचें शौर्य, वीर्य, अशा प्रकारचे गुण दाखविणारे कसलेही प्रसंग दाखविण्याची त्याला गरज वाटलेली नाही. तर सामान्यतः त्याचा दृढनिश्चयी-पणा, नम्रता, दुसऱ्याच्या मताचा उपहास न करण्याची वृत्ति, उदारता अशा त्याच्या वृत्तीच, आणि त्याही संभाषणाच्या ओघांतच त्याने दाखविल्या आहेत. तसेंच त्याच्या ठिकाणच्या कांही उणीवाही नाटककाराने अगदी हळू हाताने कां होईना पण दाखविलेल्या आहेत. स्टीफन हा कोणी महान श्रेष्ठ पुरुष वाटावा असले कसलेही प्रसंग न दाख-वितां एका तुमच्याआमच्यासारख्याच रागलोभान्वित परंतु आपल्या तत्वाशीं एकनिष्ठ राहणाऱ्या पुरुषाचें चित्रच नाटककाराने रेखाटलें आहे; व अशा पुरुषाला बाह्य परिस्थितीशीं झगडतांना अपरिहार्यपणे सोसावे लागणारे अनर्थ दाखविण्यासाठीच नाटकाचा बहुतेक भाग त्याने खर्ची घातला आहे.

अशा या करुण नाटकाची पकड मनावर किती गाढ बसून राहते हें तें नाटक मननपूर्वक वाचल्याशिवाय संपूर्णपणें समजणें कठीण आहे. अशी ही जी पकड आपल्या मनावर बसते याचें प्रमुख कारण स्टीफनला नाटककाराने आपल्यापेक्षा फार उंच अशा शिखरावर चढविला नाही हें आहे. म्हणूनच त्याच्याविषयी आपल्याला जिव्हाळा-आपलेपणा वाटतो आणि त्याच्यावर ओढवलेल्या अनर्थपरंपरेबद्दल आपल्याला करुणा वाटते. त्याने अखेर जो मृत्यु पतकरला त्यांत त्याची हतबलता जरी दिसली तरी त्याचा निर्धार व प्रशांत तत्त्वनिष्ठा या गोष्टीही फार उजळून दिसतात. इतक्या की, "मेला खरा बिचारा; परंतु बेट्याने अखेरपर्यंत आपला झेंडा उंच फडकावीत ठेवला" असे उद्गार विरोधी जमावाच्या म्होरक्याच्या तोंडून बाहेर पडले. त्यांतच स्टीफनच्या उदात्ततेचें अखेरचें विदारक दृश्य नाटककाराने उभें केलें आणि म्हणूनच, "अरेरे! कांही झालें तरी याची ही दशा व्हायला नको होती. पण उपाय काय"—असा खेदाचा उद्गार काढूनच आपण नाटक संपवितों.

प्रकरण आठवें

अब्राहाम लिंकन

दोन तत्त्वनिष्ठ श्रेष्ठ पुरुषांचा स्वभावपरिपोष नाटककारांनी कसा केला हें गेल्या दोन प्रकरणांमध्ये आपण पाहिलें. त्या दोघांनाही विरोधी बाह्य परिस्थितीपुढे हार खावी लागली. एक मेला; दुसरा मेला नाही, परंतु आजपर्यंत मिळविलेलें सर्व यश, कीर्ति, संपत्ति, सुरक्षितता यांना वंचित झाला. दोन्ही नाटकें करुणरसप्रधानच आढळून आलीं. स्वाभाविकच त्यांमध्ये नायकाच्या श्रेष्ठत्वाचें दर्शन करविण्यावर नाटककारांचा भर अधिक होता.

आता ज्या करुण (?) नायकाबद्दल विचार करावयाचा आहे तोही असाच एक तत्त्वनिष्ठ श्रेष्ठ पुरुष होऊन गेला. त्यालाही बाह्य परिस्थितीशीं फार मोठा झगडा करावा लागला. परंतु त्याचें श्रेष्ठत्व उणें पडलें नाही. बाह्य विरोधी परिस्थितीवर त्याने मात केली. परिस्थितीचा दबाव स्वतःच्या कर्तृत्वावर पडूं देण्याऐवजी त्याने स्वतःचाच ठसा परिस्थितीवर उमटवला. आणि असें असूनही आकस्मिकपणे त्याचा अत्यंत दुःखद असा खून झाला; नायक मृत झाला; आणि तरीसुद्धा त्याचें चित्रण खेदकारक, करुणोत्पादक झालें काय? निदान नाटककाराने तसें तें रेखाटलें आहे काय? असा एक मोठा विचारणीय प्रश्न उत्पन्न झाला.

असा हा नायक म्हणजे अमेरिकेच्या इतिहासांत चिरंजीव झालेला अध्यक्ष अब्राहाम लिंकन हा होय. त्याचें फार मोठें प्रभावी चित्र इंग्रजी नाटककार जॉन ड्रिंकवॉटर याने नाट्यरूपाने रेखाटलें आहे. लहान राष्ट्रांवर अन्यायी चढाई करून लादलेल्या युद्धाच्या विरोधी झगडणारा स्टीफन याचें काल्पनिक चित्र ज्यामध्ये आपण पाहिलें तें मॉब नाटक गाल्सवर्दीने पहिल्या महायुद्धाच्या थोडें आधी लिहिलें; ऑगस्ट १९१४ मध्ये तें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी चार महिने, ३० मार्च, १९१४ या दिवशीं त्या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. आणि तें महायुद्ध संपण्यापूर्वी थोडेच दिवस – १२ ऑक्टोबर १९१८ या दिवशी ड्रिंकवॉटरच्या या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. याही नाटकाचा नायक जात्या युद्धविरोधी होता; पण एका सत्पक्षाच्या समर्थनार्थ अपरिहार्य वाटणारें युद्ध मनाविरुद्धही खेळून त्याने त्यांत विजय मिळविला होता. एक नायक काल्पनिक, तर दुसरा प्रत्यक्ष जीवनांत महत्कार्य करणारा. दोघांच्याही चित्रणांत तात्त्विक दृष्ट्या केवढें साम्य; तथापि व्यावहारिक चतुराई आणि निकोप आशावादीपणा यांच्या दृष्टीने केवढें तरी वैधर्म्य! अशा या दोन नायकांच्या स्वभावांची व चरित्रांची घाटणी नाटककारांनी कशी रेखाटली आहे हें पाहणें खरोखरच उद्बोधक आणि मनोरंजक आहे.

इतिहास नव्हे, नाटकच – व्यक्तिदर्शन—

ड्रिंकवॉटरने स्वतःच इषारा देऊन ठेवला आहे कीं, आपण इतिहास लिहीत नाही, राजकीय चर्चेचा प्रबंध लिहीत नाही, तर फक्त नाटक लिहीत आहोंत. नाटककार या नात्याने आपलें काम कोणत्याही एका तत्त्वाचें खंडन किंवा मंडन करण्याचें नाही. गुलामगिरीचा नाश करणें हें त्या काळीं योग्य आणि आवश्यक होतें की नाही; त्या मुद्यावर दक्षिणेकडील संस्थानें संघराज्यांतून फुटून निघून जाऊं पाहत असतांना, त्यांना सक्तीने संघांतच ठेवून घेणें ही गोष्ट न्यायाची, स्वातंत्र्यनिष्ठेची, लोकशाहीची झाली की नाही; याच्याशीं ड्रिंकवॉटरला कांही एक कर्तव्य नाही. त्याचें एकमेव कर्तव्य, त्याने मानल्याप्रमाणें " लिंकनच्या स्वभावांतील अत्यंत गाढ नाट्यमयता, आणि युद्ध करतांनाही तें उदारबुद्धीने आणि सहृदय अंतःकरणाने करण्यांत त्यानें व्यक्त केलेलें स्फूर्तिदायक व्यक्तिमत्व " यांचें चित्रण करणें हें होतें. एका श्रेष्ठ नाटककाराने आपलें हें कर्तव्य अशा तऱ्हेने पार पाडलें आहे हें पाहणें उद्बोधक ठरेल.

ग्रीक नाट्याचें तंत्र—

नाटकासाठी ड्रिंकवॉटरने तंत्र अगदी वेगळें, म्हणजे दोन अडीच हजार वर्षांपूर्वीचें ग्रीक नाट्यभूमीवरचें तंत्र वापरलें आहे. या नाटकांत अंक नाहीत; प्रवेश नाहीत. सरळधोपट एकापुढे एक वेचक असे फक्त सहा प्रसंग आहेत. अध्यक्षीय उमेदवारीच्या सुरुवातीच्या पहिल्या प्रसंगापासून तो अखेर नाट्यगृहांत बूथकडून खून होईपर्यंतच्या शेवटच्या प्रसंगापर्यंत एकंदर चारपांच वर्षांतले मोजके सहाच प्रसंग; आणि त्यांना जोडणारे ग्रीक वृंदगायकांच्या धर्तीवर, प्रत्येक प्रसंगाच्या सुरुवातीला आणि शेवटीं, चरित्रनायकाचें गुणवर्णन करणारे जणू दरबारी बखरकारांचे प्रवेश. फरक एक आणि महत्वाचा आहे. ग्रीक रंगभूमीवर पडदा नव्हता; स्थळ आणि रंगभूमीवरील रचना यांमध्यें फरक होत नव्हता. आधुनिक रंगभूमीवरील पडद्याची व रचनेची ड्रिंकवॉटरने मदत घेतली आहे. परंतु तीही अगदी जुजबी; तिच्यावर त्याचा भर नाही; तिच्या साहाय्याने कसला परिणाम घडविण्याचा प्रयत्न नाही. सर्व लक्ष लिंकनचें चारित्र्य, कर्तृत्व आणि तत्त्वनिष्ठा दर्शित करण्याकडे नाटककाराने केंद्रित केलें आहे.

परंतु त्यामध्येही एक झगडा नाटककाराने आपल्यापुढे मांडलाच आहे. आपण जीं ग्रीक नाटकें पाहिलीं त्यांमध्येही असा झगडा आपण पाहिला; तसा तो येथेही आहे. एका व्यक्तीची कथा या ठिकाणीं नाही, तर त्या व्यक्तीच्या आयुष्यांतील एका कालखंडांत जो एक झगडा घडला त्यावरच सगळ्या नाटकाची उभारणी केली आहे.

लोकशाही विरुद्ध पाशवी बळ यांचा झगडा —

एका बाजूला गुलामगिरीबद्दल मनांतील घृणा असणारी अशी एक व्यक्ति आहे

ग्रंथ ... ठा. ऐश्वमत.
२६३८० निबंध.....
अ... अब्राहाम लिंकन वि. २०९
क्रमांक १२१५ नों: दि: २३/३/६८.

परंतु गुलामगिरीचासुद्धां नाश करायचा तो न्यायाने, लोकशाही मार्गाने करावा अशी त्या व्यक्तीची निष्ठा आहे. सत्य गोष्टीसाठी मार्गही सत्य असला पाहिजे अशीही त्याची निष्ठा आहे. परंतु लोकशाहीचा, न्यायाचा, सत्याचा मार्ग लाथाडून पाशवी बळाच्या जोरावर आणि गुलामगिरीसारखी एक अत्यंत अन्याय्य प्रथा कायम करण्यासाठी म्हणून अमेरिकन संस्थानांची संघटनासुद्धा पार झुगारून द्यायला तयार झालेला दक्षिणेकडील संस्थानांचा एक मोठा गट अमेरिकन संघराज्याशीं झगडायला तयार झालेला आहे; आणि त्याच संघराज्याची धुरा वाहण्याचें कार्य त्या व्यक्तीवर नेमकें याच संधीला येऊन पडलें आहे. हा तो संस्थानांचा संघ आणि बंडखोर संस्थानें यांच्यामधील झगडा हें या नाटकांतील मध्यवर्ती झगड्याचें बीज आहे.

परिस्थितीवर हुकुमत गाजविणारी व्यक्ति —

पहिल्या प्रसंगामध्ये अब्राहाम लिंककनें अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठीं उमेदवार म्हणून उभे राहण्यास मान्यता दिली एवढीच घटना आपल्यापुढे ठेवण्यांत आलेली आहे. आपण एका धीरगंभीर पुरुषाचें सामर्थ्ययुक्त चरित्र पाहायला बसलों आहोंत याची जाणीव बखरकारांच्या गायनाच्या निमित्ताने नाटककार सुरुवातीला आपणाला करून देतों हें खरें. पण त्यांत केवळ कथनाचा आणि भविष्यसूचनाचाच भाग आहे. नित्य बदलणाऱ्या या जगामध्ये क्षणोक्षणीं होणाऱ्या घडामोडी या क्षणभंगुर आहेत, नाशवंत आहेत. त्या क्षणभंगुर घटनांना कवळून धरणारी मानवाची इच्छाशक्ति, मानवाचें सामर्थ्य यांना खरोखर महत्त्व आहे, चिरंतनत्व आहे; त्यांमध्ये वागणाऱ्या माणसाची वृत्ति व वागणूक यांनाच खरें महत्त्व आहे. तेव्हा अशा या नित्य बदलत्या संसारामध्ये बदलत्या परिस्थितीवर क्रॉमवेलने जशी एकदा हुकूमत गाजविली तशी हुकूमत गाजवून नव्या जगामध्ये स्वातंत्र्य आणि कायदा यांचें रक्षण करणाऱ्या एका प्रभावी व्यक्तीची कथा आम्ही आपल्यापुढे दाखविणार आहोंत; त्यांतील बारीकसारीक घटना विसरल्याही जातील; परंतु चिरस्मरणांत राहतील तीं त्या व्यक्तीच्या प्रकृतिधर्माचीं दुर्दम्य आणि ओजस्वी आंदोलनेंच फक्त – असें गाऊन ते बखरकार आपल्यापुढे प्रत्यक्ष प्रसंग उभा करतात तो असा.

इलिनॉइस संस्थानांतील स्प्रिंगफील्ड या लहानशा शहरीं, ज्या ठिकाणीं लिंकन त्या वेळीं म्हणजे १८६० सालीं, वकिलीचा उद्योग करीत होता त्या गांवीं, लिंकनच्या घरीं, तो बाहेरून घरीं परत येण्याची वाट पाहत त्याचे दोघे स्नेही, एक शेतकरी व एक दुकानदार, असे बसले आहेत. लिंकनला रिपब्लिकन पक्षातर्फे अध्यक्षाच्या जागेसाठी उभे राहण्याला सुचविण्याकरिता त्या पक्षाचें शिष्टमंडळ येणार असल्याची वार्ता समजून त्याबद्दलचा आपला आनंद व्यक्त करण्यासाठी ते दोघे आलेले असतात. आपला मित्र या मानाला लायक आहे, चाळीस वर्षांच्या त्यांच्या ओळखीच्या काळांत एकदाही कधी तो वाकड्या मार्गाने वागलेला नाही, अशी त्यांच्याकडून लिंकनची आपल्याला पहिली

ओळख होते. क्षणभरांत लिंकनच्या घरची मोलकरीण सुसान तेथे येते. नोकर असूनही तिची त्या घरांतील समरसता आणि तिची लिंकनविषयीची श्रद्धा या गोष्टी लिंकनबद्दल आपल्या मनांत कांही मधुर अपेक्षा उत्पन्न करतात. लिंकनच्या पत्नीला आपल्या घरांत धूम्रपान केलेलें आवडत नाही आणि लिंकन तिचा तो हट्ट चालूं देतो, यांत सुसानला त्याचा थोडासा दुबळेपणा वाटतो ही आणखी एक माहिती आपणाला मिळते. आणि त्याबद्दलचा प्रत्यक्ष प्रत्यय थोडक्यांतच आपल्याला यावयाचाच आहे.

थोड्याच काळापूर्वी जॉन ब्राऊन नांवाच्या ध्येयवादी माणसाने गुलामगिरीविरोधी अत्याचारी चळवळ करून फासावरचें मरण पतकरलें होतें. लिंकन स्वतः गुलामगिरीचा द्वेष करणारा असूनही गुलामगिरीचा नायनाट करण्यासाठी जबरदस्तीचा, तरवारीचा मार्ग त्याला नापसंत होता. लिंकनच्या त्या दोघां मित्रांना, लिंकन अध्यक्ष झाल्यावर शांततेच्या, हृदयपालटाच्या मार्गानेच गुलामगिरीविरुद्ध झगडा करील हें समजत होतें आणि योग्यही वाटत होतें. परंतु तरीही जॉन ब्राऊनच्या ध्येयवादित्वाबद्दल आणि गुलामगिरीचा अंत हा होणारच या त्याच्या खोल निष्ठेबद्दल व त्यासाठी त्याने केलेल्या त्यागाबद्दल सामान्य माणसाला वाटणारा स्वाभाविक जिव्हाळा त्या दोघांच्या ठिकाणीं प्रज्वलित होता. त्यामुळे भोळ्या भावानें त्या संबंधांतील एक लोकप्रिय गीत ते तेथे गाऊं लागतात. गुलामगिरीच्या प्रश्नाकडे पाहण्याचा त्यांना मनापासून पटलेला लिंकनचा तात्त्विक मार्ग आणि त्यांच्या ठिकाणीं असलेली हुतात्म्याबद्दलची भाबडी निष्ठा या परस्परविरोधी वृत्तींचें मोठें सुंदर दर्शन या ठिकाणीं आपल्याला होतें.

गरीब बिचारा लिंकन —

गाणें गाण्याच्या भरांत ते असतांना मिसेस लिंकन तेथे येते. दिवाणखान्यांत त्यांनी धूम्रपान केल्याचें आढळून ती आपल्या स्वभावतःच कठोर आणि करड्या आवाजांत नापसंती व्यक्त करते. अध्यक्षपदाच्यासाठी उमेदवार म्हणून लिंकनने उभे राह्यचें की नाही, याचा निर्णय तिने स्वतः केव्हाच अस्तिपक्षीं घेतलेला असतो; आणि आपण तसें लिंकनला सांगितलें आहे हें ती मोठ्या अभिमानाने सांगते. आपली वाणी फार कडू आहे; लिंकनच्या उच्च वागणुकीशीं ही वाणी थोडीशी न जुळणारी आहे हें तिला ठाऊक आहे. त्यामुळे सहानुभूति वाटून लोक लिंकनला "गरीब बिचारा लिंकन" असें म्हणतात याची पण तिला जाणीव आहे. परंतु लिंकनविषयी तिला अभिमान आहे, श्रद्धा आहे; त्याने वरची पायरी गाठावी अशी तिला महत्त्वाकांक्षा आहे; आणि त्या दृष्टीने आपण दक्ष आहोंत असाही तिला अभिमान आहे. पक्षाच्या राजकारणांत मुरलेल्या सिवार्डला डावलून अब्राहामला ही श्रेष्ठ जागा मिळावयाची होती; पण आपला नवरा त्या महत्त्वाकांक्षी माणसालाही नीट वागवून घेईल असा तिला भरवसा आहे.

त्याच्या मित्रांना अब्राहामसारखा आपला दोस्त एवढ्या मोठ्या पदवीला जाणार हें क्षणभर खरेंच वाटत नाही. त्याचा साधेपणा, गबाळेपणा, पक्षकारांनी सहजासहजी

फसवून त्याचा फायदा घ्यावा इतका त्याच्या ठिकाणचा भोळा चांगुलपणा, पोशाखाबद्दलची अनवस्था या सगळ्या गोष्टींचा विचार करतां, राजधानीमध्ये मोठमोठ्यांचा नजरा त्याच्यावर खिळल्यावर त्याचें कसें होईल याबद्दल ते साशंक आहेत. अर्थात आपुलकीच्या पोटीं जन्म पावलेली ही साशंकता आहे.

लिंकनचें पहिलें दर्शन --

तेवढ्यांत तेथे लिंकन येतो. त्याचें हें पहिलें दर्शन आपल्याला. तो येतो तोच त्या दोघांनी जॉन ब्राऊनचें नांव उच्चारल्याचें त्याच्या कानावर येतें. त्यासरशी अगदी निश्चयाने पण सहज त्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडतात ते असे,

"काय, जॉन ब्राऊन म्हणालांत तुम्ही? पण ही गोष्ट घडवून आणण्याचा हा मार्ग नव्हे. कोणतीही न्याय्य गोष्ट तुम्हांला अन्याय्य मार्गाने घडवून आणतां येणार नाही. जी गोष्ट तुम्ही नाहीशी करूं इच्छिता ती जितकी वाईट तितकाच हा मार्गही वाईट. अशाने राज्याची एकता राहणार नाही."

सामान्याहून वेगळेपणाची साक्ष —

पहिल्याच सलामीला, या साध्याभोळ्या, बाह्यतः कुरूप दिसणाऱ्या माणसाच्या तोंडचें हें निग्रही तत्त्वज्ञान हा माणूस सामान्याहून कांही तरी वेगळा आहे याची साक्ष आपल्याला पटवितें. साधनशुचितेचा सिद्धांत त्या काळांत उच्चारणारी ही महान व्यक्ति! आम्हां भारतीयांना या व्यक्तीची ओळख फार चटकन पटेल. आणि ऐशी वर्षांनतर याच व्यक्तीप्रमाणे साधनशुचितेचा प्रचार आणि आचार करतां करतां मारेकऱ्याच्या गोळीने त्याच्याचप्रमाणे बळी पडलेल्या तशाच दुसऱ्या एका महान व्यक्तीचें त्याबरोबर स्मरण होईल व आपलें अंतःकरण थरारेल, अंगावर रोमांच उभे राहतील.

झगड्याचें बीज —

लिंकनचे मित्र मनापासून त्याचें अभिनंदन करतात. पण आपणावर येऊन पडूं पाहणारी जबाबदारी केवढी मोठी आहे याची जाणीव लिंकन त्यांच्यापाशी किती मोजक्या आणि मोकळ्या शब्दांत व्यक्त करतो. तो म्हणतो.

"अशी ही निवड होतांना, गडे हो, माणसाची वृत्ति अत्यंत विनम्र होऊन जाते... अशा या महान जनतेचा अध्यक्ष व्हायचें. आणि इकडे ठिकठिकाणीं माणसांच्या अंतःकरणांत प्रक्षोभ माजलेला असायचा. अंतःकरणाचें पाणी पाणी करणारी ही स्थिति आहे. कडवटपणा, तिरस्कार, ज्यांच्याविषयी अखेर मनांत मी विटून जाईन अशा माणसांशीं झगडा करणें आणि अखेर प्रत्यक्ष खरोखर म्हणण्यासारखें हातून कांही घडायचेंही नाही...हें सगळें डोळ्यांपुढे उभें राहतें, आणि नाही म्हणावेसें वाटतें...पण शब्द तोंडांतून बाहेर काढवत नाही."

कोणत्या झगड्यांतून नायकाला जायचें आहे याचें हें बीज या ठिकाणीं नाटककाराने सुरुवातीलाच किती चपखलपणे आपल्यापुढे ठेवलें आहे.

यानंतर ती मंडळी सरवत पिऊन – कारण लिंकनच्या घरीं मद्याला प्रतिबंध होता – जातात. सरबताच्या वेळीं लिंकनच्या गडबड्या आणि उतावीळ स्वभावाचें, नोकरां-विषयीच्या गोडीवेचें जातां जातां आपणाला दर्शन होतें आणि तेथे त्याच्याविषयीं आपल्या मनांत खरी जवळीक निर्माण होते.

निरभिमान दृढ विश्वास —

मित्र गेल्यानंतर दोघां नवराबायकोंत शिष्टमंडळ येण्यापूर्वी थोडें संभाषण होतें. "अध्यक्षपद तुम्ही स्वीकारणार नाही काय?" या पत्नीच्या प्रश्नावर लिंकन उत्तर देतो,

"आमच्या मनांतून गुलामगिरीवर निर्बंध घालायचे आहेत. दक्षिणेंतील संस्थानें विरोध करतील. संघराज्यांतून फुटून जायचा प्रयत्न करतील. हें चालूं देतां येणार नाही. संघराज्य मोडलें म्हणजे अमेरिका संपली. अमेरिकेला वाचवावें म्हटलें तर रक्तपात पतकरावा लागेल."

यावर मिसेस लिंकन त्याला विचारते "पण हें सगळें नीटपणें घडवून आणायला आज तुमच्यावाचून दुसरें कोणी आहे का?"

त्यावर लिंकनने निरभिमानपणें परंतु निश्चयानें उत्तर दिलें, "नाही, कोणी नाही. मला तें चांगलें ठाऊक आहे."

आणि म्हणूनच पत्नीने निर्धाराने सांगितलें "तर मग जा तें करायला."

किती दृढ विश्वास, किती एकमेकाबद्दलची श्रद्धा! आणि तरीही दोघांच्या आवडी-निवडी किती भिन्न! त्याच्या गबाळेपणाबद्दल, धांदरटपणाबद्दल तिला किती राग, आईचा मुलावर असावा तसा, आहे याचें केवढें खोचक दृश्य, त्याने नवी हॅट घ्यावी याबद्दल याच क्षणीं त्या दोघांचें जें बोलणें होतें त्यांतून आपल्याला दिसतें. त्या विषयीच्या तिच्या बोलण्याकडे लिंकन किती सहज दुर्लक्ष करीत असतो. तिला तें जाणवतें आणि ती तळमळून म्हणते, "खरेंच, तुमच्या या वागण्यामुळे मला किती सोशीकपणा अंगीं ठेवावा लागतो याची कुणालाच कल्पना यायची नाही." आणि तरीही लिंकनच्या ठिकाणच्या श्रेष्ठ गुणांबद्दलची तिची श्रद्धा रेसभरही कमी होत नाही.

शिष्टमंडळ येतें. एकमेकांच्या ओळखी होतात. आपल्या पक्षाचा उमेदवार निवडून येणार याची त्यांना पुरी खात्री असते. अशाही वेळीं लिंकन चटकन त्यांना हो म्हणत नाही. "माझ्या ठिकाणीं पुष्कळ उणीवा आहेत हें नीट ध्यानांत घेतलेलें आहे ना? शहरी वातावरणांतील जी एक झकपक असते ती माझ्याजवळ नाही; शारीरिक कुरूपताच माझ्या ठिकाणीं अधिक आहे." या गोष्टी तो अगदी मोकळेपणाने त्यांच्या नजरेला आणून देतो. खेरीज आपण या राजकारणाला अगदी नवीन. पक्षा-

मध्ये हुक आणि सिवार्ड यांच्यासारखीं मातबर माणसें या जबाबदारीच्या जागेवर हक्क सांगण्यासारखीं असतांना त्यांना डावलणें कसें शक्य हेंही तो विचारतो.

हुकला पक्षांत पाठिंबा नव्हता आणि सिवार्डच्या विवेकीपणाबद्दल पक्षांत भरंवसा नव्हता. त्यावर लिंकनने शिष्टमंडळाला मुद्दाम बजावलें की, "माझ्या विवेकीपणाला किंवा शांतपणालाही मर्यादा आहेत. शक्य तेवढें नेमस्तपणाने वागण्याचा माझा प्रयत्न असतो. परंतु मी मोठा ताठ, हट्टी माणूस आहे. दक्षिणेकडील संस्थानांनी फुटून जायचें ठरविलें तर मी त्यांच्याशीं झगडा करीन – प्रसंगीं रक्तपातही होईल हें सगळें साफीसाफ ओळखून काय तो निर्णय घेतला पाहिजे."

स्फटिकासारखें निर्मळ मन—

त्याने आणखीही एका मुद्यावर त्यांना स्पष्ट इशारा दिला. गुलामांचा प्रश्न; तत्त्व म्हणून पक्ष आपल्याला या बाबतींत पाठिंबा देणार का? या गुलामांच्या छळाचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यापासून त्याबद्दलची चीड जणू आपल्या रक्तांतच भिनून राहिली आहे. आणि संधि मिळाली तर या "गुलामीचा विच्छेद केल्याशिवाय मी राहणार नाही. तसा माझा निर्धार झालेला आहे." त्याच्या या भावनावेशाने सगळीजणें निःस्तब्ध होतात. परंतु त्याच्या तोंडावर तरी ते "या प्रश्नाबाबत आम्ही कांहीं बंधनें घालणार नाही" अशी कबुली देतात.

लिंकनचें मन किती स्फटिकासारखें निर्मळ आहे हें या मुलाखतीमध्ये स्पष्ट दिसतें. त्याचप्रमाणे मनुष्यस्वभावाचें त्याचें ज्ञानही किती खोल आहे आणि तो किती न्यायी आहे हेंही त्याच वेळी चांगलें दिसतें. कारण शिष्टमंडळांतील स्तब्धपणावरून तो ओळखतों कीं आपल्यामागे त्या मंडळींना कांही आपसांत बोलावयाचें असावें. आणि तसें सुचवूनच तो आंतल्या भागांत निघून जातो. त्याच्या या उदार वृत्तीने ते सर्वजण लोभावून आणि भारून जातात; आणि आपल्या त्या खासगी चर्चेंत – लिंकनबद्दल या उमेदवारीच्या प्रकरणांत कोणाच्याही मनांत कसलाही किंतु नाही असें ते परस्पराशीं अगदी मोकळेपणीं मान्य करतात.

आंतून परत आल्यावर पुन्हा एकदा लिंकनच्या ठिकाणचें चातुर्य आणि नम्रता यांचा प्रत्यय येतो. आपण त्या मंडळीवर अविश्वास दाखविला असें होऊं नये म्हणून, त्यांच्या प्रश्नाला आपण ताबडतोब होकार दिला नाही या आपल्या आडमुठीपणाबद्दल तो स्वतःलाच दोष लावून घेतो. "पण या होकारावर या देशाचें भलें किंवा बुरें अवलंबून असतांना वीस वेळां प्रश्न पडतो माणसाला कांही उत्तर देण्याचा" असें म्हणून तो पुन्हा त्यांना विचारतो, "तेव्हा तुम्हा कोणाच्या मनांत कसला आडपडदा नाही ना?"

लिंकन ज्ञानवानाचा कठीण एकाकी मार्ग स्वीकारतो —

अशा रीतीने लिंकनची उमेदवारी निश्चित होते. आपलें धोरण आणि आपली

श्रद्धा त्याने त्यांच्यापुढे उघड मांडलेली असते; तसेच आपले दोषही. अर्थात हा प्रसंग संपताच कथकांनी म्हटल्याप्रमाणें या होकारांत लिंकनने केवढी तरी मोठी जबाबदारी आपल्या आंगावर घेतलेली होती. आपलें साधेंसुधें जीवन सोडून तो फार मोठ्या दाट पर्वतराजींतून जणू एकाकी नवीं शिखरें शोधण्याच्या कठीण कार्याला प्रवृत्त झाला होता. अशा कार्यांत आणि विशेषतः जो ज्ञानवान असतो त्याचा मार्ग नेहमीच्च अगदी एकाकी असतो. त्याला जें दिसतें तें इतरांना दिसत नसतें. तो देत असलेला सल्ला सामान्यांना मानवत नसतो. मोठ्या धैर्याने आणि सावधपणाने मार्ग आक्रमावा लागतो. पदोपदीं मोह आणि लोभ असतात. अशी मोठी पदवी स्वीकारतांना तात्कालिक आर्थिक लाभ असतो; कांही काळ सुरक्षितता लाभते; लोकांमध्ये बोलबाला होतो; या गोष्टींचा लाभ घेऊन संतोष मानण्याऐवजी जो माणूस भविष्यकाळच्या सामाजिक कल्याणाच्या कल्पनेवर दृष्टि लावून तात्कालिक समाधानाचें जीवन लाथाडण्याला तयार होतो, अशा माणसाचा कितीएक लोक उपहास करतील. अशा उपहासास पात्र होणाऱ्या कार्याला लिंकन प्रवृत्त झाला होता; आणि याचें फळ फार दूरच्या काळांत तरी स्मारकरूपानेच काय तें त्याला मिळणार होतें.

अध्यक्षपद स्वीकारून एक वर्ष झाल्यानंतरचा पुढचा प्रसंग आहे. या प्रसंगीं एकाच दिवशीं, एकाच प्रहरांत झालेल्या अशा ज्या घटना दाखविल्या आहेत त्या वस्तुतः आगे मागे अशा कांही महिनेपर्यंत घडत होत्या. परंतु नाटकाच्या दृष्टीने प्रभावी होण्यासाठी नाटककाराने त्या एका प्रवेशांत मोठ्या कुशलतेने खेचून आणल्या आहेत.

सेक्रेटरी ऑफ स्टेट सिवार्ड आहे. त्याच्या कचेरींत हा प्रसंग घडतो. पार्श्वभूमि अशी आहे कीं, दक्षिणेकडील सहा फुटीर संस्थानांनी स्वतःचा एक वेगळा संघ बनविलेला असून लिंकनच्या गुलामविमोचनाच्या धोरणाला विरोध करण्यासाठी चंग बांधला आहे. त्यासाठी अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या संघांतून फुटून निघण्याची त्यांची तयारी झाली आहे. सुरुवात म्हणून दक्षिण कॅरोलिना संस्थानांतील सुम्टर किल्ल्यांतून संघराज्याची फौज जरूर तर हल्ला करून हुसकून लावावी आणि त्या किल्ल्याचा ताबा स्वतंत्र होऊं पाहणाऱ्या फुटीर संस्थानांकडे द्यावा असा प्रयत्न सुरू आहे. यांतून दक्षिणेकडील संस्थानें आणि उत्तरेकडील संस्थानें अशा फळ्या पडून युद्ध उद्भवणें अपरिहार्य होतें. हें युद्ध टळलें तर पाहावें आणि दक्षिणेकडील संस्थानांचा संघराज्यांतून फुटून निघण्याचा हक्क कायदेशीरपणें मान्य करून घेतां आला तर पाहावा या उद्देशाने फुटीर संस्थानांच्या कार्यकारिणीचे दोन प्रतिनिधी सिवार्डकडे मुद्दाम आलेले आहेत. त्यांच्या संभाषणांतून या प्रसंगाची सुरुवात होते.

सिवार्डला वश करून लिंकनला शह देण्याची खटपट —

त्या प्रतिनिधींची माहिती अशी आहे की, सिवार्ड युद्धाला अनुकूल नाही. लिंकनचें

धोरण त्याला मान्य नाही. तेव्हा सिवार्डला आपल्या बाजूला वळवावा आणि आंतून लिंकनच्या धोरणाला शह द्यावा अशी त्यांची खटपट आहे. या त्यांच्या खटपटीला यशही आल्यासारखें होतें. सिवार्डच्या विवेकीपणाची स्तुति करून ते त्याच्या पोटांत शिरतात आणि आपली बाजू मोठी न्याय्य वाटावी अशा रीतीने रंगवितात. फुटीर संस्थानांच्या मनांत कांही खरोखर फुटून जाण्याची इच्छा नाही; परंतु केव्हांही फुटून जाण्याचा आपला हक्क आहे एवढें प्रस्थापित व्हावें एवढाच त्यांचा हेतु आहे असें ते त्याला भासवितात. हा हक्क प्रस्थापित व्हावा म्हणून संघराज्याने सुम्टर किल्ला खाली करून दक्षिण कॅरोलिना संस्थानच्या स्वाधीन करावा; तो लढवून स्वतःच्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करूं नये. असें झालें म्हणजे फुटण्याचा घटनात्मक हक्क मान्य केल्या-सारखें होईल आणि युद्धावर प्रकरण येणार नाही. संघराज्याशीं मनांतून सर्व एकनिष्ठच आहेत. हा आपला युक्तिवाद ते सिवार्डच्या गळीं उतरवितात आणि लिंकनकडून हें घडवून आणण्याची खटपट करण्याचें आश्वासन ते त्याच्याकडून मिळवितात.

या खटपटीचा मामला सगळा गुप्त रीतीने चालवयाचा असतो. परंतु अगदी याच वेळीं लिंकन सिवार्डच्या कचेरींत आल्यामुळे सगळाच गोंधळ उडतो. सिवार्डच्या सांगण्यावरून कांही न बोलतां दक्षिणेचे प्रतिनिधी तेथून निसटून जाऊं पाहतात. परंतु त्यांना तें जमत नाही, आणि लिंकनच्या म्हणण्यावरून "पांच मिनिटें" तरी त्यांना तेथें थांबावें लागतें.

यानंतरच्या संवादांत लिंकनच्या चातुर्यामुळे ते प्रतिनिधी किती हतप्रभ होतात हें पाहण्यासारखें आहे. लिंकनला डावलून परस्पर सिवार्डमार्फत त्यांच्या कांही कारवाया चालल्या होत्या हें त्यांना मान्य करणें भाग पडतें; सिवार्ड त्यांच्या मदतीला धावून जाऊन म्हणतो, "म्हणजे त्यांचा हेतु एवढाच होता की, शांतता बिघडूं नये यासाठी त्यांच्या कांही सूचना कानावर घालायला योग्य मध्यस्थ कोणी मिळतो का पाहावें." त्यावर लिंकनच्या प्रश्नाने सिवार्डचें तोंडही गप्प होतें. "कोणाच्या कानावर घालावयाचें?" या लिंकनच्या प्रश्नावर "सरकारच्या" हें सिवार्डचें स्वाभाविक उत्तर होतें. "मग सरकारचा प्रमुख प्रतिनिधी तर हा मी येथें समक्ष हजर आहे" असें म्हणून लिंकन त्या प्रतिनिधींना आणखी छेडूं लागतो. प्रतिनिधी आपल्याकडून दक्षिणेकडील संस्थानांना फक्त फुटून जाण्याचा आपला घटनात्मक हक्क प्रस्थापित करावयाचा आहे हें लिंकनला पटविण्याचा प्रयत्न करतात. आणि "आमचा दृष्टिकोन तुमच्या लक्षांतच येत नाही" असें ते त्याला म्हणतात. त्यावर "सिवार्डला समजला आहे का तो?" असें खोदून विचारून लिंकन सिवार्डशीं झालेल्या त्यांच्या कटाचा भोपळा फोडल्या-सारखें करतो.

लिंकन फुटीर संस्थानांचें स्वरूप उघडें करतो —

आणि मग, "पण सिवार्डला खरी गोष्ट तुम्हीं सांगितलेलीच नाही" असें म्हणून

दक्षिणेकडील संस्थानांचें धोरण लिंकन स्वतःच्या शब्दांत पुढीलप्रमाणे नागवें–उघडें करून सांगतो. " तुमचा सगळा उद्देश गुलामी कायम ठेवण्याचा आहे. पण सर्वांना हें समजून चुकलें आहे की, गुलामीचा अंत अटळ आहे. पण ही गोष्ट दक्षिणेकडच्या संस्थानांना टाळायची आहे; त्यासाठी त्यांना संघराज्यांतून फुटून निघायचें आहे. आज एकदा जर आम्हीं कच खाल्ली आणि तुमचा फुटून निघण्याचा हक्क मान्य केला तर हा हक्क मान्य न करावा असें आज आमच्या पाठीशीं असलेलें जनमत बदलेल आणि तुम्हीं फुटून जाण्याची कालांतराने पुन्हा धमकी दिलीत तर त्या वेळीं तुमच्याशीं युद्ध करण्याला तें आमच्या पाठीशीं राहणार नाही, असें तुम्हांला व्हायला हवें आहे. म्हणजे निव्वळ धमकीच्या जोरावर तुम्हांला गुलामांचा व्यापार चालू ठेवतां यावा. हें तुम्हीं स्वच्छपणें सिवार्डला सांगितलेलें नाही."

अशा रीतीने त्यांना कोंडींत पकडून लिंकनने त्यांना बजावलें की, सुम्टर किल्ला न सोडण्याचा निर्धार आम्हीं पूर्वीच जाहीर केलेला आहे. आम्हीं कांही कोणावर हल्ला केलेला नाही. हल्ला करतां आहांत तुम्ही. का ? तर फुटून निघण्याचा हक्क तुम्हांला प्रस्थापित करायचा आहे. कशासाठी ? तर गुलामांचा व्यापार आम्ही यापुढे वाढूं देणार नाही, आणि आहे तोही बंद करणार आहोंत म्हणून."

यावर प्रतिनिधींनी दिलेलें उत्तर त्यांची भावना उत्कृष्ट व्यक्त करतें. " म्हणजे गुलामांना स्वातंत्र्य लाभावें यासाठी जबरदस्ती करण्याचा तुम्हांला अधिकार आहे; परंतु गुलामी लादण्यासाठी आम्ही जबरदस्ती करूं म्हटलें तर मात्र आमची कंबक्ती ओढवेल!"

यांतून दक्षिणेकडच्या संस्थानांचा सगळा रोख गुलामी कायम ठेवण्याकडे आहे हें किती उघड झालें. लिंकनच्या मुद्देसूद आणि परखड बोलण्यामुळे स्वतःचें खरें रूप त्यांना उघड करावेंच लागलें. परंतु लिंकनने त्यांना आणखी बजावलें की, " उत्तर व दक्षिण यांच्यामध्ये गुलामीच्या प्रश्नावर आम्ही युद्ध करणार नाही. दक्षिणेने संघराज्यांशीं एकनिष्ठ राहावें आणि घटनात्मक मार्गाने गुलामगिरीच्या बाबतींत बहुमत आपल्या बाजूला मिळवावें. पण दक्षिणेकडचीं संस्थाने फुटूं पाहतील तर युद्ध हाच एक मार्ग राहील. आम्हांला संघराज्याचे तुकडे होऊं द्यायचे नाहीत. आणि तुम्हांला ते आम्ही करूं देणार नाही. तेव्हा युद्ध व्हायचें की नाही हें तुमच्या हातीं आहे. तुम्हांला अतिक्रामक व्हावें लागेल."

आणि ही गोष्ट स्पष्टपणे फुटीर संस्थानांच्या कार्यकारिणीला ताबडतोब कळविण्यासाठी म्हणून त्या प्रतिनिधींना तार करण्याच्या निमित्ताने लिंकन तेथून दुसरीकडे पाठवितो.

सिवार्डशीं दिलजमाई —

त्यानंतर सिवार्डशीं एकट्याशीं लिंकनचा जो संवाद होतो तो कुशल नटांकडून रंगभूमीवरच झालेला ऐकला पाहिजे. सिवार्डबद्दल आपल्या मनांत संशय नाही;

त्याच्यावर विश्वास आहे; पण विश्वासाला विश्वासाचा प्रतिसाद मिळाला पाहिजे; असें तळमळीने बोलून लिंकन सिवार्डच्या अंतःकरणाला हात घालतो. युद्धाच्या कल्पनेने आपला थरकाप होतो असें जेव्हा सिवार्ड म्हणतो तेव्हा लिंकनने स्वतःची भूमिका किती चांगली स्पष्ट केली. युद्धें बंद व्हावींत हें मान्य. पण युद्धाचीं कारणें बंद झाल्याशिवाय युद्धें बंद होणार नाहींत. सुम्टर किल्ल्यांतून माघार घेतल्याने युद्धाचें कारण संपत नाही. संघराज्यावर जर विश्वास असेल तर प्रत्येकाने फुटून जाण्याचें धोरण हें युद्धाचें खरें कारण आहे हें आपण मानलें पाहिजे. आणि फुटून जाणें म्हणजे इतिहासांत आपण जें एक न्यायतत्त्व म्हणून मान्य केलें त्याच्याशीं बेइमान होणें आहे हें पटवून देणें, हेंच एक तें युद्धाचें कारण नाहीसें करण्याचें साधन आहे.

पण ही भूमिका लोकांपुढे स्पष्टपणे मांडतांना आम्ही जरा कच खाल्ल्यासारखें करतों, या सिवार्डच्या मुद्याचा लिंकनने फारच खरमरीत समाचार घेतला. त्याच्या एकदा एक आणि एक सल्ला देण्याच्या धोरणाची त्याने निर्भत्सना केली. आणि त्याला बजावलें की, "मला भोळसट समजण्याची चूक तूं करूं नकोस. तुझ्या अंतःकरणाचा सर्व ठाव मला लागलेला आहे. तेव्हा मला भोळा समजून तूं देशाला स्वतःच्या कर्तृत्वापासून वंचित करूं नकोस."

यावर सिवार्ड आपली चूक कबूल करतो. लिंकनच्या धोरणाविरुद्ध स्वतःचें मत प्रदर्शित करणारें एक टिपण सिवार्डने लिंकनकडे दिलेलें असतें. तें नेमकें या वेळीं खिशांतून काढून लिंकन सिवार्डजवळ देतो. क्षणभर विचार करून सिवार्ड त्या टिपणाचे फाडून तुकडे करतो आणि लिंकनची क्षमा मागतो. त्या दोघांची दिलजमाई होते. लिंकनची तत्त्वनिष्ठा, सरळपणा, औदार्य यांचा विजय होतो आणि सिवार्ड त्याचा मित्र होतो.

सुम्टर किल्ल्याचा प्रश्न लढाईवर येणार अशी भीति लिंकनला वाटत असते तोच किल्ल्याच्या प्रमुखाकडून दूत येऊन वर्दी देतो की, दाणागोटा व सैनिक यांचा ताजा पुरवठा झाला नाही तर किल्ला तीन दिवसांहून अधिक टिकाव धरूं शकणार नाही. दूताच्या मताने ही मुदतही फार मोठी. एक दिवसापुरतीसुद्धा सामुग्री किल्ल्यावर शिल्लक नव्हती.

अशा स्थितींत लिंकन मंत्रिमंडळाची तांतडीची बैठक तेथेच सिवार्डच्या कचेरींतच घेतो. मंत्रिमंडळ सदस्य येऊन पोचण्यापूर्वी सिवार्ड किल्ला सोडण्याचा प्रश्न पुन्हा उपस्थित करतो; लष्करी गरज म्हणून सोडावाच लागेल आतां किल्ला, असें सुचवितों. एवढ्यांत तार करायला गेलेले प्रतिनिधी येऊन सांगतात की, फुटीर संस्थानांचे पुढारी माघार घेण्याला मुळीच तयार नाहीत. वाटाघाटीला एवढासुद्धा वाव ते देऊं इच्छीत नाहीत.

लिंकनचें शेक्स्पीअरप्रेम—

"फार गंभीर निर्णय आहे हा त्यांचा; भयंकर, भयंकर गंभीर!" एवढेंच विषण्णतेने

म्हणून लिंकन त्यांना निरोप देतो. मंत्रिमंडळाचे सदस्य येऊं लागतात. त्या वेळीं लिंकनच्या स्वभावांतील एक नवाच पैलू नाटककार आपल्या निदर्शनास आणतो. तो म्हणजे शेक्स्पीअरबद्दलचें त्याचें प्रेम. या प्रसंगीं त्याला एकदम शेक्स्पीअरच्या ज्यूलिअस सीझर नाटकांतील चवथ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशामधील ब्रूटसच्या भाषणाची आठवण होते. ताबडतोब हल्ला करावा असा पक्ष ब्रूटस मांडीत असतो. त्या वेळीं आपल्या तत्त्वशील वृत्तीला अनुसरून तो म्हणतो, "मानवी व्यवहाररूपी समुद्रांत भरतीची अशी एक लाट येते की तिच्यावर स्वार झाला तर माणूस यशाच्या किनाऱ्याला लागतो; पण ती संधि जर त्याने चुकविली तर मग त्याचा सारा प्रवास उथळ पाण्यांत आणि दुःखांत होतो." हें भाषण आठवून तो सिवार्डला तूं शेक्स्पीअर वाचतोस का म्हणून विचारतो; आणि शेक्स्पीअर वाचणें म्हणजे एक विचित्रच गोष्ट असा सिवार्डचा नूर पाहून तो चकित झाला.

सत्याच्या पक्षाला लिंकन एकटा एक —

अशा एका भरतीच्या लाटेवर आरूढ होण्याची संधि लिंकनला साधायची होती. परंतु त्याच्या सहकाऱ्यांचा पाठिंबा त्याला मिळत नाही. देशाच्या जीवनांतील एक जीवनमरणाचा प्रश्न म्हणून सुम्टर किल्ल्याची परिस्थिति तो त्यांचेपुढे मांडतो. परंतु किल्ला सोडून दिला तर दक्षिणेंतील लोक तडजोडीला तयार होतील आणि इकडे लष्करी गरजेसाठी तो सोडावा लागला असें सांगून लोकमताला तोंड देतां येईल अशी हुकची भूमिका असते. असें करणें म्हणजे दक्षिणेंतील संस्थानांचा फुटून जाण्याचा हक्क मान्य करणें होय; आज तो प्रश्न टाळल्यासारखें होईल; परंतु उद्या तो पुन्हा उद्भवेलच; असें लिंकनचें स्वच्छ मत असतें. किल्ला सोडल्याने आज युद्ध लांबणीवर पडेल, परंतु अखेर युद्ध अपरिहार्यच होईल, या त्याच्या मताला खुला पाठिंबा मिळूं शकत नाही. आपण दक्षिणेशीं विरोध मांडला म्हणजे युद्ध अपरिहार्य होणारच असा एक सूर असतो. लिंकनला हें मान्य आहे. पण आज माघार न घेतां झगडा मान्य केला तर निदान तत्त्व न सोडतां आणि स्वच्छ हातांनी तरी अशा युद्धांत पडतां येईल ही त्याची भूमिका मान्य होत नाही. अखेर मतावर प्रश्न येतो. लिंकनसुद्धा तीन मतें दक्षिणेकडच्या संस्थानांना विरोध करण्याच्या बाजूचीं; आणि सिवार्डसुद्धा पांच विरुद्ध. परंतु खरें म्हणजे लिंकनचे दोघे पाठिराखे हे त्याच्याविषयीच्या आदरानेच फक्त त्याच्या बाजूने मत देणारे होते! मतदान होण्यापूर्वी लिंकनने आपली भूमिका पुन्हा एकदा खणखणीतपणें मांडली होती. "किल्ल्याकडे पाठवायला सैन्य नाही; फक्त दाणागोटा व हत्यारें-पात्यारें पाठवितां येतील. परंतु आतां हातपाय गाळून युद्ध आपण थांबवूं शकणार नाही. कांही असलें तरी संघराज्य फुटूं द्यायचें नाही हा आपला निर्धार कायम ठेवला तर निदान आपला पक्ष सत्याचा तरी असेल. मला लढाई नको. पण आम्ही कोणावर हल्ला करीत नाही. आमच्यावर हल्ला होतो आहे. अशा स्थितींत युद्ध हा एकच मार्ग आहे."

या त्याच्या भूमिकेवर वरीलप्रमाणे मतविभागणी होऊन तो अगदी एकटा पडला होता.

जीवनांतील अत्यंत आणीबाणीचा व कसोटीचा क्षण —

अमेरिकेच्या आणि लिंकनच्या जीवनांत हा एक अत्यंत आणीबाणीचा व कसोटीचा क्षण होता. लिंकनने धैर्याने तत्त्वनिष्ठेचा पक्ष स्वीकारला आणि सगळ्याची जबाबदारी एकट्यावर पतकरली. त्याने पतकरलेल्या जबाबदारींतून सुटून जाण्याची कोणाची तयारी नव्हती. परंतु यापुढचा त्याचा राज्यकार्यांतील सारा प्रवास जवळजवळ एकाकी व्हायचा होता. हें ओळखूनच तो पुढच्या पावलांची आखणी करण्यासाठी म्हणून जनरल स्कॉटला निमंत्रण देऊन त्याची वाट पाहत राहतो. त्याआधी 'आज सामग्री रवाना होईल, सैन्याची वाट पाहूं नका" असा त्याने सुम्टर किल्ल्यावरील जनरल ॲन्डरसनला निरोपही पाठविलेला असतो. आणि पुढच्या कार्यक्रमाची रचना करण्याच्या विचारांत तो असतांना हा दुसरा प्रसंग संपतो.

यानंतर सुमारें दोन वर्षांनी पुढील प्रसंग घडतो असें दाखविलें आहे. अमेरिकेच्या अध्यक्षाच्या अभ्यागतगृहांत या प्रसंगांतील घटना घडतात. मिसेस लिंकनला या नव्या अधिकारपदाचें किती कौतुक वाटत आहे, परंतु सुसान अजून घरगुती वातावरण कसें विसरूं शकत नाही आणि लिंकनलाही तें कसें विसरवत नाही हें सुरुवातीलाच थोडक्यांत त्या दोघींच्या संभाषणांत नाटककाराने दाखविलें आहे. लिंकनला सुसान मि. लिंकन असें संबोधते. अध्यक्षसाहेब असें तिच्या तोंडांत येतच नाही; एवढेंच नव्हे तर लिंकनला सामान्य लोक लिंकनबाबा म्हणतात असें सांगून लोकांना त्याच्याबद्दल किती घरगुती आपलेपणा निर्माण झाला हें ती दर्शविते.

त्यानंतरचा भाग दोघी प्रातिनिधिक स्त्रियांच्या बाबतींत आहे. एक श्रीमंत व्यापाऱ्याची पत्नी आहे. दुसरी एक मध्यम स्थितींतील स्त्री आहे. या दुसरीचा मुलगा लढाईवर गेलेला होता. तो मेल्याची वार्ता तिला नुकतीच समजली आहे. श्रीमंत बाईचें मत कांही झालें तरी युद्ध चालूच ठेवलें पाहिजे आणि दक्षिणेकडील लोकांना चांगला धडा शिकविला पाहिजे असें आहे. ही बाई दक्षिणेकडच्या लोकांना नरराक्षस म्हणते. आणखी तीन वर्षें तरी लढाई चालू राहणार असा आपल्या नव-ऱ्याचा अंदाज असल्याचें ती सांगते. म्हणजे तशी या थरांतील लोकांची इच्छा आहे. दुसरी जी मध्यम वर्गाची बाई आहे ती जेव्हा म्हणते की, दक्षिणेंतही सज्जन लोक आहेत तेव्हा श्रीमंत बाई, तें त्यांचें निव्वळ ढोंग आहे असा शेरा देते आणि या युद्धामुळे प्रत्येकाला मोठा त्याग करावा लागत आहे या गोष्टीचें उदाहरण म्हणून ती देते की, आपल्याला कितीएक देणग्या देणें बंद करावें लागलें आहे.

अशी ही बाई लिंकन येतांच त्याला विचारते, "अध्यक्षमहाराज, लढाईची कांही चित्तथरारक बातमी ?"

त्यावर लिंकनने दिलेलें उत्तर त्याच्या मनस्थितीचें केवढें तरी द्योतक आहे. "बाई, रोज सकाळीं उठलों म्हणजे आज माझ्या देशबांधवांपैकीं शंभर, दोनशे, हजार माणसें मारलीं जाणार हा विचार प्रथम माझ्या मनांत येतो; त्यामुळे माझें चित्त थरारतें."

पण एवढ्यावर, युद्धस्य वार्ता रम्याः, अशा वृत्तीच्या त्या बाईचें समाधान होत नाही. ती विचारते, "तसें नव्हे हो. कांही शुभ बातमी आहे का?" त्यावर लिंकन तळमळून म्हणतो, "हो, आहे तर. जयाची बातमी. त्यांचे सत्तावीसशे लोक मारले गेले; आमचे आठशे." त्यावर ती युद्धखोर बाई जेव्हा "वा! वा! किती छान!" असें उद्गारते तेव्हा लिंकनच्या अंतःकरणाला घरें पडून तो म्हणतो, "हो, म्हणजे पसतीसशे माणसें मेलीं!"

अपरिहार्य म्हणूनच युद्धाच्या मार्गाचा स्वीकार —

त्यावर ती दुसरी बाई प्रश्न उपस्थित करते की, लिंकन हें युद्ध थांबवूं शकणार नाही का? देशांत त्यामुळे किती लोकांना हालअपेष्टा सोसाव्या लागतात; त्यामुळे तिचा तो प्रश्न असतो. "असा प्रश्न माझ्या बाई कधी डोक्यांत आला नाही," असा ती श्रीमंत बाई तिचा उपहास करते. परंतु लिंकन तिचा प्रश्न तसा डावलीत नाही; तिचें समाधान करूं पाहतो. संघराज्याची एकता टिकविणें हा युद्धाचा उद्देश. सुरुवातीला जर तो योग्य होता तर आता दोन वर्षांनी तो बावगा कसा ठरेल? असा युक्तिवाद तो करतो. परंतु त्या बाईने मुद्यालाच जेव्हा हात घातला की, कोणत्याही परिस्थितींत युद्ध हें वाईटच, त्यावर लिंकनने आपली जी भूमिका मांडली ती त्याच्या स्वभावाच्या आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने विशेष लक्षणीय आहे. त्यालाही युद्ध हें पापच वाटतें. परंतु दुबळेपणा, हेवेदावे आणि मूर्खपणा यांच्या पोटीं युद्धें जन्म घेतात. सर्वच माणसांच्या ठिकाणीं हे दोष आहेत. जग हें असें आहे. आणि जगाला घेऊनच माणसाला चाललें पाहिजे. आक्रमणाला विरोध करणें ही सहज प्रवृत्ति आहे; श्रेष्ठ माणसांच्या अंतःकरणांत सुद्धा. त्यामुळें किती नको वाटलें तरी आक्रमकांमुळे युद्ध करावें लागणार. हृदयपरिवर्तनाचा मार्ग श्रेष्ठ खरा. पण जेव्हा तो यशस्वी होत नाही तेव्हा बळाचा वापर करणें हें अपूर्ण जगांत अपरिहार्य आहे. याचा अर्थ हृदयपरिवर्तनावरील श्रद्धा सोडून द्यायची असा नाही. पण अपरिहार्य प्रसंगीं धैर्याने बळाचा वापर करावयाचा. हा प्रसंग शेवटचाच ठरो अशी प्रार्थना करावयाची. आणि पुन्हा, पुन्हा, पुन्हा हृदयपरिवर्तनाच्याच मागे राहावयाचें. जग सुधारेल; पण हळूहळू; तोपर्यंत हें रहाटगाडगें असेंच चालावयाचें.

स्वार्थी युद्धखोरांबद्दलची चीड —

हा लिंकनचा दृष्टिकोन अर्थातच श्रीमंत बाईला पटत नाही. आपल्या नवऱ्याचें मत म्हणून ती सांगते की, या दक्षिणेकडच्या लोकांचा पूर्ण निःपात करणें हाच एक मार्ग

आहे. त्यावर लिंकनने त्या बाईची जी तीव्र निर्भर्त्सना चातुर्याने केली ती सदैव – आणि विशेषतः आजच्या काळी आपल्या देशांत – लक्षणीय आहे. लिंकनने तिला विचारलें, "तुमचा नवरा वयस्कर झाला असेल नाही?" त्यावर ती फणकारून म्हणते, "छे! छे! अवघें एकुणचाळीस वर्षांचें तर वय आहे." तेव्हा वरून अगदी शांतपणें लिंकन म्हणतो, "तर मग अधिकारी म्हणून त्याला लढाईवर पाठवितां येईल म्हणायचें." त्यासरशी त्या बाईचें आणि ती ज्या वर्गाची प्रतिनिधी आहे त्या वर्गाचें अंतरंग उघडें पडतें. ती म्हणते, "छे! छे! असें कसें होईल? माझे यजमान तर युद्धांतलीं कंत्राटें घेऊन सरकारचीं केवढीं कामें करीत आहेत! युद्धच आहे हें! त्याग हा सर्वांनाच करावा लागणार!"

मध्यमवर्गीय बाईचेंही लिंकनच्या तत्त्वज्ञानानें समाधान होत नाही. परंतु आपला मुलगा मरण पावल्याबद्दलचें पत्र फक्त ती लिंकनला दाखविते. त्याला गहिवरून येतें. ती गेल्यावर श्रीमंत बाई तिच्याबद्दल नाटकी सहानुभूति दाखवून जेव्हा म्हणते की, "हीं माणसें आपल्या दुःखाचा विचित्र बाऊ करतात. पण असल्या दुबळ्या लोकांकडे लक्ष देतां कामा नये. आणि पुन्हा डोकें वर काढतां येऊं नये इतका कायमचा बंदोबस्त दक्षिणेकडच्या लोकांचा केला पाहिजे," तेव्हा मात्र आतापर्यंत दडपून ठेवलेला लिंकनचा राग उसळून बाहेर येतो, त्या बाईशीं हस्तांदोलन करण्याचें तो नाकारतो व जिचा मुलगा मेला तिचें मत आपणाला पटलें नाही तरी तिच्याबद्दल आपल्याला आदर वाटतो; "पण तुमच्यासारख्या मंडळीबद्दल मला शरम वाटते. तुम्ही स्वतः कसलाही त्याग करीत नाही आणि दक्षिणेकडील लोकांचा निःपात करण्याच्या गोष्टी बडबडता. हें युद्ध कांही मी गंमत म्हणून पतकरलें नाही. मानवी मूल्यें उंचावण्यासाठी मी यांत पडलों. पण तुम्ही त्यामध्ये सूड, निःपात, द्वेष आणि चिरंतन चीड यांची हीन भेसळ करूं पाहता." असें म्हणून त्या बाईला तिरस्कारपूर्वक लिंकन घालवून देतो. एवढेंच नव्हे तर सुसानला बजावतो की, या बाईला पुन्हा आपल्या येथे येऊं देऊं नकोस; नाही तर तिचा हातपाय मोडेल एखाद्या वेळीं.

या तत्त्वनिष्ठ माणसाच्या हृदयांतली ही खळबळ त्याच्या श्रेष्ठ मानवतेची केवढी तरी खूण वाटते. अशा एखाद्या मानवसुलभ छटेनेच श्रेष्ठ पुरुषांबद्दल आपल्याला आपुलकी उत्पन्न होते.

थोड्याच क्षणांनी तेथे नीग्रोंमधील एक धार्मिक नेता येतो. लिंकन आंतून बाहेर येईपर्यंत तेथें सुसानचें आणि त्या गृहस्थाचें बोलणें होतें. त्यामध्ये नोकर असूनही 'स्वतंत्र' असलेल्या, गुलाम नसलेल्या सुसानबद्दल त्या नीग्रोला केवढा आदर वाटतो, आपल्या स्वतःच्या आणि आपल्या वर्गातील लोकांच्या अभागी जीवनाबद्दल किती हळहळ वाटते, हें आपण पाहतों. त्यानंतर लिंकन येऊन त्या दोघांचें संभाषण होतें. सुरुवातीला लिंकन त्याला–फ्रेडरिक डग्लस त्याचें नांव–बसायला सांगतो. "परंतु काळा आदमी तो काळा आदमी; गोरा तो गोरा" या भेदाची पकड त्याच्यावरची सुटलेली

नव्हती. म्हणून तो बसायला संकोचतो. पण आपल्या मनाला या भेदभावनेचा स्पर्श नाही अशी त्याची खात्री करून लिंकन त्याला बसायला लावतो : ही लहानशी गोष्टसुद्धा लिंकनच्या स्वभावाची केवढी मोठी द्योतक आहे.

डग्लसला लिंकनने मुद्दाम बोलावलेलें असतें. आपला एक निर्णय डग्लसला कळवायचा असतो त्याला. तो म्हणतो, "गुलामी जागार. गुलामगिरीवर नियंत्रणें घालायचीं असा आमचा पहिल्यापासूनचा विचार होता. आतां तिचा पूर्ण नाटनाट करायचें आम्हीं ठरविलें आहे."

हें ऐकून डग्लस भारावून जातो. उठून, खूप वाकून तो लिंकनला अभिवादन करतो. "जन्मतः प्रत्येकजण स्वतंत्र असणार या कल्पनेने केवढा आनंद होतो हें गुलाम असणारांखेरीज कुणाला समजणार नाही," असें तो आनंदाच्या भरांत म्हणतो.

एकाच्या गुन्ह्यासाठी दुसऱ्याला शिक्षा हा अधर्म आहे —

परंतु डग्लसच्या या मुलाखतीचा उपयोग नाटककाराला निराळ्याच एका हेतूसाठी करायचा आहे. लिंकनच्या सद्भावनेबद्दल पूर्ण विश्वास पटल्यानंतर डग्लस आपल्या खोल मनांतील एक गोष्ट लिंकनजवळ काढतो. काळीं माणसें संघराज्याचा गणवेश घालून लढाईला जातात, त्यांना पकडल्यावर गोळ्या घालून त्यांना ठार केलें जातें. याचा बदला म्हणून दक्षिणेकडील युद्धकैद्यांनाही ठार केलें जावें अशी त्याची सूचना असते. त्यावर लिंकन विचारतो,

"म्हणजे सूड घ्यावा म्हणतां ?"

त्यावर डग्लस म्हणतो, "हो, सूड. डोळ्याला डोळा, दाताला दात." हें तूं कांही तरी म्हणतो आहेस, नीट विचार कर. असें लिंकन त्याला सांगूं पाहतो. "पण माझ्या मनांत ठार केलेल्या काळ्या लोकांचाच फक्त विचार येतो," अशा रीतीने डग्लस आपली तप्त भावना व्यक्त करतो. "पण याचा अर्थ मी पण खून करूं ?" असें जेव्हा लिंकन विचारतो तेव्हा "खून नव्हे, शिक्षा" असें डग्लस आपल्या विचाराचें समर्थन करतो. यावर लिंकनने दिलेलें उत्तर सर्वकाळीं मनन करण्यासारखें आहे. तो आवेगानें म्हणतो,

"नव्हे, नव्हे; खूनच. दुसऱ्या लोकांनी कांही गुन्हा केला म्हणून तिसऱ्याच माणसांचा खून – धडधडीत खून मला कसा करतां येईल ? याचा परिणाम काय होईल याचा विचार कर. वाईट उदाहरणांचें अनुकरण करणें हा आपला धर्म नाही. लोकांना चांगलें उदाहरण घालून देणें हा आपला धर्म आहे. तुझीही धार्मिक श्रद्धा हीच आहे ना ?"

श्रद्धेचा प्रश्न निघतांच डग्लसला "लोकांच्या मार्गांत तुझा प्रकाश दिसू दे" हें बायबलमधलें वाक्य आठवतें आणि तो म्हणतो "माझें चुकलें. माझ्या बांधवांच्या दुःखामुळें मी भांबावलों होतों. तुमच्यावर माझी श्रद्धा आहे."

याच प्रवेशांत जातां जातां भावी अनर्थसूचक अशीं दोन पताकास्थानें आहेत. त्या दोघांच्या संभाषणांत वयाचा प्रश्न निघतो तेव्हा डग्लस आपलें वय बहात्तर सांगतो. त्यावर लिंकन म्हणतो, "मी बहात्तर वर्षांचा होईन त्या वेळीं तुझ्याइतका तरुण दिसेनशी आशा करतों." त्याला कोठे ठाऊक होतें की, आपला अंतकाळ कांही महिन्यावर आला आहे,

युद्धाच्या काळजीने खंगत जाणारा लिंकन—

त्यांचें भाषण संपल्यावर लिंकन दुसरीकडचा निरोप येऊन तिकडे जातो. त्या समयीं निरोप घेतांना डग्लसचें आणि सुसानचें बोलणें होतें. तेव्हां सुसान त्याला आपल्या पोटांतलें म्हणून सांगते "पण खरें सांगू तुला? त्यांचें हृदय इतकें नाजूक आहे की, या युद्धाच्या काळजीने त्यांचे प्राण कांही जाग्यावर राह्यचे नाहीत अखेर."

युद्धाच्या काळजीऐवजी अन्यच कारणाने पण लौकरच लिंकनचा मृत्यु ओढवणार आहे, याची त्या बिचारीला कल्पना तरी कोठून असणार?

नाटकांतील यापुढचा म्हणजे चवथा प्रसंग लिंकनच्या सहकाऱ्यांपैकी एकाने ऐन यशाच्या वेळीं उभारलेल्या विरोधाचा, किंबहुना अंतर्गत बंडाचा आहे. या प्रसंगांत लिंकनचे आणखी कांही स्वभावविशेष व त्याच्या कांही श्रद्धा दिसून येतात.

मंत्रिमंडळांत हुकचें बंड—

लढाई सुरू होऊन तीनचार वर्षं लोटलीं आहेत. मंत्रिमंडळाची खास बैठक लिंकनने बोलाविली आहे. सर्व मंत्री जमले आहेत. लिंकनला यायला थोडा अवकाश आहे. नुकतीच बातमी आली आहे की, संघराज्याच्या सेनापतीने फुटीर संस्थानांचा सेनापति ली याचा मोठा पराभव केला असून आता फुटीर संस्थानांना यशाची आशा नाहीं. अशा स्थितींत लिंकन येण्यापूर्वी हुक हा आपल्या पोटांतली मळमळ बाहेर टाकतो की, अध्यक्ष आता पुन्हा गुलामगिरी नष्ट करण्याच्या जाहीरनाम्याचा विषय काढणार. पण असें करणें अवेळीं होईल; देशांत या गोष्टीला सर्वत्र विरोध आहे; शिवाय आपल्याला लिंकनच्या धोरणाचा अर्थच समजत नाही. कारण एकदा तो म्हणतो, संघराज्याची एकता ठेवणें हें आपलें ध्येय, गुलामगिरीचा प्रश्न कायद्याने योग्य वेळीं सोडवितां येईल; मग असें म्हणूं लागतो की, गुलामगिरी नष्ट करण्याशिवाय दुसरा आपला कार्यक्रमच नाही; आणि पुढच्याच क्षणीं म्हणूं लागतो की, शांतता आणि एकता यासाठी आपण ही कल्पना फेकूनही देऊं; तेव्हा आपलें धोरण म्हणून कांही आहे की नाही?

मंत्रिमंडळांत त्याला साथ द्यायला कोणी नाही. सिवार्डने तर लिंकनची बाजूच निःसंदिग्धपणे स्पष्ट केली. मुख्य प्रश्न संघराज्याच्या एकतेचा. गुलामगिरीचा प्रश्न त्या संबंधांत सोडवायचा हें लिंकनचें धोरण. पण संधि मिळाली की गुलामगिरीचा

नाश तो करणारच. "पण दुसऱ्या कोणी याहून निराळा मार्ग स्वीकारला असता" असें यांवर हुक म्हणतो तेव्हा "पण दुसऱ्या कोणाचा मार्ग इतका शहाणपणाचा ठरला नसता" असें सिवार्डच त्याला तोडून उत्तर देतो. कोणाकोणाला आशा असते की, लिंकन गुलामगिरीचा हा प्रश्न आजच्या सभेंत काढणारच नाही; पण हुकला तो काढणार ही खात्री असते.

एवढ्यांत लिंकन येतो. युद्धांतील जयाची वार्ता ऐकून स्वाभाविकच त्याच्या वृत्ति थरारलेल्या असतात; मनाची शांतता थोडी नाहीशी झालेली असते. अशा वेळीं त्याची नेहमीची प्रवृत्ति म्हणजे आपल्या आवडत्या ग्रंथकाराचें वाचन करणें. आणि त्याप्रमाणे, त्या काळचा आर्टेमिस वॉर्ड या नांवाने लिहिणारा एक अत्याधुनिक विनोदी लेखक याच्या एका ताज्या लेखांतील एक उतारा लिंकन वाचून दाखवितो. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, हा उतारा वाचण्याचा प्रकार खरोखरच त्या दिवशींच्या मंत्रिमंडळाच्या बैठकींत घडला असल्याची सरकारी कागदांत नोंद आहे.

अर्थात राज्यकारभारांत ही काव्य-नाटकांची लुडबूड कांहीशी अप्रयोजक होती हें तर खरेंच. म्हणून एका मंत्र्याने थोडेसें वक्रोक्तीनेच म्हटलें, "आता राज्याच्या कारभाराकडे वळायला हरकत नाही ना?" त्या वेळीं लिंकनच्या आधीच हुकच म्हणतो, "हो, करूं या सुरवात." लिंकनच्या नजरेंतून ही गोष्ट सुटत नाही, आणि तो म्हणतो, "हो, हुकसाहेबांची परवानगी आहे." त्यावर तो पहिला मंत्री जेव्हा "आभारी" असें म्हणतो तेव्हा पुन्हा लिंकन कांहीशा कटाक्षाने म्हणतो, "छे! छे! आभार हुक-साहेबांचे मानायला हवेत!" यांत लिंकनच्या सूक्ष्म नजरेचा जसा प्रत्यय येतो तसाच हुकचें सारें धोरण लिंकनने ओळखलेलें होतें हें जें पुढे लिंकन स्पष्ट करतो त्याचीही चुणूक येथे लागते.

हुकने अपेक्षिल्याप्रमाणे, १ जानेवारी १८६३ पासून गुलामगिरीची प्रथा नष्ट कर-ण्याबद्दलचा आपला संकल्पित जाहीरनामा लिंकन वाचून दाखवितो. "माझा या गोष्टीला विरोध आहे; यामुळे, ज्या वेळीं ऐक्याची अत्यंत गरज आहे अशा वेळींच मतभेद माजतील" असें हुक तात्काळ कठोरपणें बजावतो. वेल्स नांवाच्या मंत्र्यालाही ही गोष्ट अवेळीं होते आहे असें वाटतें. सहा महिन्यांपूर्वी न्यू यॉर्क ट्रिब्यूनलने असा जाहीरनामा काढण्याची मागणी केली त्या वेळीं लिंकननेच त्या पत्राचा निषेध केला होता याची आठवण हुक करून देतो.

लिंकनच्या स्वभावाचे आणि तत्त्वनिष्ठेचें उदाहरण —

त्यावर लिंकनने दिलेलें उत्तर तर्कदृष्ट्या पूर्ण समाधानकारक नसलें तरी त्याच्या स्वभावाचें आणि तत्त्वनिष्ठेचें तें उत्तम द्योतक आहे. "सहा महिन्यापूर्वी योग्य समय आला नाही असें आपणाला वाटलें. जेव्हा युद्धांत यशाची खात्री नव्हती अशा वेळीं नुसते फतवे काढणें निरर्थक होतें. ते मानणार कोण? अयोग्य वेळीं कोणत्याही गोष्टीची

घोषणा करणें यांत मुत्सद्देगिरी नाही. बंडखोरांचा पराभव निश्चित झाला की, हा जाहीरनामा काढावयाचा; संघराज्याची एकता निश्चित झाली की, गुलामगिरी नष्ट करावयाची हें आपलें वेळापत्रक ठरलेलें होतें. तशी आपली हृदयाची धारणा होती. परमेश्वरापाशी तशी आपण प्रतिज्ञा केली होती, असें सांगून लिंकन म्हणतो, "हा माझा एकट्याचा निर्णय आहे. अनादराने मी बोलत नाही. पण या बाबतींत मंत्रिमंडळाचा सल्ला मी अपेक्षीत नाही. मात्र तुमचा पाठिंबा मला हवा आहे."

"माझ्या निर्णयाची जबाबदारी माझी एकट्याची" —

हा अत्यंत उतावीळपणा आणि मनस्वीपणा होतो आहे या हुकच्या टीकेला लिंकनने चपखल उत्तर दिलें. "देशांत माझ्यापेक्षा अन्य कोणावर जनतेचा अधिक विश्वास आहे अशी जर माझी खात्री असती आणि अशा व्यक्तीला अध्यक्षपदीं बसविण्यासाठी घटनात्मक मार्ग उपलब्ध असता तर मीं हें स्थान आनंदाने त्याला दिलें असतें. परंतु सर्वच लोक माझ्या मताचे नसले तरी माझ्याइतका अन्य कोणावर जनतेचा विश्वास नाही हें मला माहीत आहे; आणि माझ्या जागीं दुसऱ्या कोणाला नेमून घेण्याची घटनात्मक सोय नाही. तेव्हा हा मी येथे आहें. मला जें योग्य वाटेल तेंच मी करूं शकणार. आणि त्या सगळ्याची जबाबदारी माझी एकट्याचीच राहणार."

यानंतर, आपण एक ऐतिहासिक महत्त्वाचें कार्य करीत आहोंत अशी श्रद्धा व्यक्त करून लिंकन त्या जाहीरनाम्यावर सही करतो. हुकशिवाय बाकीचे मंत्री लिंकनला अभिवादन करून तेथून जातात. हुक मात्र हा साधा शिष्टाचारही पाळीत नाही; तसाच जाऊं लागतो. परंतु लिंकन त्याला थांबवितो. त्यानंतर त्या दोघांमध्ये जें भाषण होतें त्यांत लिंकनचें मनुष्यस्वभावाच्या तारा सूक्ष्मपणानें छेडण्याचें कौशल्य उत्कटपणें दिसून येतें. "माझ्याविरुद्ध मंत्रिमंडळांत कारस्थानें चालू आहेत" असें तो हुकला बजावतो. "कारस्थान नव्हे, टीका" असें जेव्हा हुक म्हणतो तेव्हा "टीका माझ्या मागे कां?" हा लिंकनचा प्रश्न जाचक असतो. "थोडा संकोच वाटतो" या हुकच्या दुबळ्या प्रत्युत्तरावर लिंकन त्याला प्रश्न टाकतो, "कां महत्वाकांक्षेच्या पायीं असें होतें?" आणि हुक गोंधळल्यासारखा होतो हें पाहून लिंकन पुढे स्पष्टच त्याला सांगतो "तुला अध्यक्षपदाची आस आहे! तेव्हा हें खरें असल्याचें हुकला कबूल करावें लागतें. "लोकांना हुक अध्यक्षपदीं कां नको आहे याचें कारण स्वतः हुकलाच चांगलें माहीत आहे" हें लिंकनचें म्हणणें हुक मान्य करीत नाही. तेव्हा हुक सत्य दडवीत आहे असें लिंकन ध्वनित करतो आणि त्यासरशी हुक आपला राजीनामा सादर करतो.

त्यावर लिंकन हुकच्या धोरणांतील अयोग्यपणाची अगदी निर्दयपणाने उघडीक करतो. देशामध्ये सत्प्रवृत्त अशा सर्वांचें मत गुलामगिरी नष्ट करण्याच्या बाजूचें असून कांही अनुदार वृत्तीचे लोक विरोधी दंगा माजवितात; त्यांच्याकडे लक्ष देऊक हुक आपलें

धोरण ठरवितो हें तो दाखवून देतो. त्यावर पवित्रा बदलून हुक लिंकनवरच दुर्बळपणाचा दोष चिकटवूं पाहतो. कारण काय, तर बंडखोरांचें कडक शासन केलें जाईल अशी घोषणा लिंकन करीत नाही. त्यावर आपलें हें धोरण दुबळेपणाचें नसून मानवी दयाबुद्धीचें आहे ही गोष्ट लिंकन मोठ्या तळमळीने स्पष्ट करतो. अंतर्गत विरोधच सारखा करीत राहून हुकने आपल्याला मनस्वी त्रास दिल्याचें सांगून, स्वतःच्या मंत्रिमंडळांत सर्वांनी एकनिष्ठेने काम करावें ही आपली इच्छा सफल न केल्याबद्दल तो हुकला तीव्र दोष देतो आणि त्याचा राजीनामा मान्य करतो.

त्याच वेळीं जातांजातां तो म्हणतो, "एकाकीपणें मी स्वतःवर केवढी मोठी जबाबदारी घेतली आहे. त्यामुळे अंतःकरणांत मी नेहमी भारावलेला आहे. परमेश्वरी संकेताप्रमाणे माझ्यावर केवढें मोठें कार्य पडलें आहे; आणि माझें आयुष्य किती तोकडें आहे." कांही महिन्यांनीच ही वाणी खरी ठरणार होती याची बिचाऱ्या लिंकनला पुसट तरी कल्पना असेल का?

या सर्व प्रकरणांत लिंकनच्या चित्ताचा स्वाभाविकच पुष्कळ क्षोभ होतो. त्यावरच त्याचा नेहमीचा उपाय म्हणजे आवडत्या शेक्सपीअरचें वाचन. आपल्या चिटणीसाला तो टेम्पेस्टमधील एक उतारा वाचून दाखवितो आणि "आमचीं जीवितें म्हणजे जणू स्वप्नांचा संसार आणि चांगली झोप लागली म्हणजे तीं लहानगीं स्वप्नें संपायचीं" या प्रॉस्पेरोच्या भाषणांतील ओळी तो गुणगुणत असतांना पडदा पडून हा प्रसंग संपतो.

यशाच्या क्षणीं निर्मळ सदयता—

यानंतर या नाटकांतलें फक्त दोन प्रसंग राहतात. ते एक दोन दिवसांच्या अंतराने घडल्याचें नाटककाराने सूचित केलेलें आहे. पैकी पहिला प्रसंग रणांगणावरचा आहे. फुटीर संस्थानांचा शूर आणि प्रबळ सेनापति रॉबर्ट ली याला चोहो बाजूंनी घेरण्याचें काम ग्रँटच्या मार्गदर्शखाली जनरल मीडने चालविलें होतें, तें पुरें होत आलेलें आहे. आतां फक्त दोन मैलांचा टापू व्यापायचा राहिलेला होता; तो व्यापला गेल्याची वार्ता कळण्याच्या उत्सुकतेने ग्रँट आपल्या तंबूमध्ये बसलेला आहे. हा वेढा संपूर्ण झाला म्हणजे 'ली'ला शरण येण्यावांचून दुसरा मार्गच नाही. म्हणजे लढाईचा मुख्य आणि जवळ जवळ अखेरचा भाग संपण्याला आता फक्त कांही तासांचाच अवधि होता. त्याबद्दलच ग्रँट आणि त्याचा दुय्यम अधिकारी बोलत होते. आता घरीं जायला मिळणार या भावनेने त्यांचीं अंतःकरणें पुलकित झालीं होतीं. अशा वेळीं लिंकन स्वतः तेथे येतो. या लढाईच्या वृत्तावद्दल उत्सुकता त्याला तर विशेषच असल्यामुळे "आपण राजधानींत राहूंच शकलों नाही" असें तो आपल्या येण्याचें कारण देतो. आजच्या रात्रीच्या पलीकडे आता 'ली'च्या पराभवाला वेळ लागणार नाही असा अंदाज ग्रँट लिंकनला सांगतो आहे तोच जनरल मीडकडून संदेश येतो की, वेढा पूर्ण झाला आहे आणि हत्यारें खाली ठेवून शरण येण्याला 'ली'ला फक्त दहा तासांचा अवधि

दिलेला आहे. त्याबरोबर लिंकनच्या तोंडून जे सहजस्फूर्त उद्गार निघाले की, "आपण सदयपणें वागलें पाहिजे; ली हा मोठा उमदा वीर आहे," त्यांवरून त्याच्या निर्मळ आणि उदार हृदयाची किती चांगली ओळख पटते. द्वेषाचा, आकसाचा स्पर्शसुद्धा त्या थोर माणसाच्या चित्ताला नव्हता.

रोजच्या कामांपैकी एक भाग म्हणून मग लिंकनने स्वतःच्या सैन्यांतील गुन्हेगार सैनिकांच्या शिक्षांच्या यादीबद्दल चौकशी केली. त्यांत कोर्ट मार्शल होऊन गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा दिल्याचें एक प्रकरण होतें. त्यासरशी तात्काळ, ही गोळी घालून ठार मारण्याचीं प्रकरणें स्वतःला अगदी अमान्य असल्याचें लिंकन त्वेषाने म्हणतो; परंतु सैनिकांच्या शिस्तीच्या दृष्टीने ती गोष्ट अपरिहार्य असल्याचें लगेच ध्यानांत येऊन तो आपलें विधान परत घेतो.

ज्याला शिक्षा देण्यांत आली होती तो एक तरुण सैनिक होता. पहाऱ्यावर असतांना त्याला झोप लागली होती. स्वतःचें काम संभाळून आणखी आपल्या एका मित्राचें जादा काम त्याने आपण होऊन स्वतःवर घेतलें होतें. कारण तो मित्र आजारी होता. पण अतिश्रमांमुळे या तरुण सैनिकाला झोप लागली. ग्रँटचेंही मत ही शिक्षा न दिली तर बरें असें होतें. पण ज्या जागीं तो पहारा करीत होता त्या जागेचें मोक्याचें महत्त्व आणि युद्धांतील अखेरचा आणीबाणीचा क्षण यामुळे शिक्षा देणें अपरिहार्य होतें.

जातीचें कनवाळू अंतःकरण —

पण लिंकनच्या कनवाळू मनाचें याने समाधान झालें नाही. त्याने त्या तरुणाला – स्कॉट त्याचें नांव – स्वतःसमोर आणविलें आणि इतर सर्वजणांना बाहेर घालवून त्याची एकट्याने गाठ घेतली. त्या मुलाच्या सांगण्यांत लपवालपवी कांही नाही याची त्याने खात्री करून घेतली. घरीं त्या बिचाऱ्याची एक आईच फक्त होती. तिला आपल्या मृत्यूची वार्ता कळून तिची काय अवस्था होईल या काळजीने तो थरथरत होता. शेवटीं लिंकन त्याला मारण्याचा हुकूम रद्द करतो. क्षणभर त्या तरुणाला ती गोष्ट खरीच वाटत नाही. पण हें सगळें खरें आहे हें ध्यानीं आल्यावर, "मग मी पलटणींत परत केव्हा जाऊं" असें तो विचारतो आणि आपली पलटण आघाडीवर आहे आणि लढाई अजून संपलेली नाही असें कळतांच अत्यंत उत्सुकतेने तो विनंति करतो की, "आताच्या आता मला लढाईवर – आघाडीवर पाठवा."

लीच्या शरणागतीला उजाडेपर्यंत अवकाश होता. म्हणून लिंकन आणि त्याचा चिटणीस स्लॅने तेथे तंबूंतच झोपून रात्र काढतात. सकाळी सहा वाजतां, हवी असलेली बातमी घेऊन जनरल ग्रँट येतो. लीने युद्धतहकुबीची याचना केलेली असते. अंतःकरणावरचें केवढें तरी ओझें उतरल्यासारखें होऊन लिंकन क्षणभर स्तब्ध होतो आणि मग म्हणतो,

"चार वर्षें केवळ केवळ या क्षणाच्या आशेवर मी जगत होतों. पण आतां तो क्षण आल्यावर विशेष कांही झालेंच नाही असें वाटतें, हें किती विचित्र आहे, नाही?"

विचित्र हें नव्हतें. तर एवढा मोठा विजय मिळाला असतांही लिंकनचें मन शांत, नम्र राहतें, तो फुगून जात नाही, हें विचित्र होतें, अलौकिक होतें. "तुझ्यामुळे हा दिवस उगवला" अशी तो ग्रँटला मनमोकळेपणाने शाबासकी देतो. स्वतःची फुशारकी मारण्याचा विचार त्याच्या मनाला शिवतही नाही.

आतां ली आल्यावर युद्धतहकुबीच्या अटी ठरविण्याचें काम तो ग्रँटवरच सोपवितो. त्या कामांत स्वतः मिरविण्याची त्याला एवढीही हौस नव्हती. फक्त विरोधकांशीं वागतांना उदार अंतःकरणाने वागावें एवढीच त्याने सूचना दिली.

"संसार किती विचित्र आहे, ग्रँट!"—

एवढ्यांत जनरल मीड येऊन ली लौकरच भेटीला येत असल्याबद्दल त्याने सांगितलें. लिंकन तरुण स्कॉटला विसरला नव्हता. मीडजवळ तत्क्षणीं त्याची चौकशी लिंकनने केली. परंतु इतक्या उताविळीने रणांगणावर आपलें कर्तव्य बजावण्याच्या तळमळीने गेलेला तो तरुण तेवढ्या थोड्याशा अवकाशांत गोळी लागून ठार झाल्याचें समजतांच, दैवाच्या या फटकाऱ्याने अत्यंत विद्ध होऊन लिंकनच्या तोंडून दुःखोद्गार बाहेर पडला, "मारला गेला! संसार किती विचित्र आहे, ग्रँट!" शंकराचार्यांचे शब्दही संसारोऽयमतीव विचित्रः, असेच आहेत.

बंडखोरांपैकी पकडलेले पुष्कळसे कैदी ग्रँटच्या तळावर होते. शिवाय आता आणखीही बंडखोर स्वाधीन होणार होते. त्यांच्या बाबतींत काय घोषणा करावयाची असा प्रश्न निघाला. नियमाप्रमाणे त्यांना कैदेंत ठेवणें आणि कांहीना गोळ्या घालून ठार मारणें हें रास्तच ठरलें असतें. परंतु लिंकनला त्यापैकी कांही व्हायला नको होतें. बंडखोरांपैकी अगदी वाइटांतल्या वाईट माणसाच्यासुद्धा केसाला धक्का लावायचा नाही असें त्याने सुचविलें. "तळाचीं सगळीं कवाडें उघडा सताड. आणि त्यांना सगळ्यांना म्हणावें, पळा...शू..." असें म्हणून दोन्ही हात वर करून मेंढ्यांना पिटाळावें तसा आविर्भाव त्याने केला.

लिंकन तेथून गेल्यावर ली आला. ग्रँटच्या आणि त्याच्या युद्धतहकुबीच्या वाटाघाटी झाल्या. ग्रँटने सुचविलेल्या अटी अत्यंत उदार आहेत अशी लीने मोकळेपणाने कबुली दिली. फक्त अधिकाऱ्यांच्या घोड्यांप्रमाणे साध्या सैनिकांचेही घोडे त्यांना परत द्यावेत एवढीच मागणी लीने केली. तीही ग्रँटनने तात्काळ मान्य केली. "या तुमच्या उदारपणामुळे आमच्या लोकांचीं मनें शांत होण्याला फार उपयोग होईल" असे उत्स्फूर्त उद्गार लीच्या तोंडून बाहेर पडले.

परंतु फुटीर संस्थानांविषयी सहानुभूति असणारांत कांही व्यक्ति तरी अशा होत्या

की, त्यांच्या मनांतील आकस कशानेच नाहीसा होणार नव्हता. आणि याचें प्रत्यंतर एकदोन दिवसांतच आलें. मनावरचा ताण थोडा कमी होऊन लिंकन नाटक पाहण्यासाठी गेला होता. आलेल्या प्रेक्षकांमध्ये, आज लिंकनला किती धन्यता वाटत असेल अशा प्रकारचीं बोलणीं चालू होतीं. स्वतः लिंकन तेथे आलेला आहे हें दिसतांच लोकांमध्यें उत्साहाचें भरतें आलें आणि त्याने भाषण करावें अशी प्रेमाची मागणी झाली. त्या प्रसंगीं एक छोटेंसें भाषण नाटककाराने लिंकनच्या तोंडीं घातलें आहे. हें भाषण प्रत्यक्ष इतिहासांत त्या ठिकाणीं कांही लिंकनने केलेलें नव्हतें. त्यापूर्वी दोन तीन प्रसंगीं त्याने दुसरीकडे जीं भाषणें केलीं होतीं त्यांतलीं कांही वाक्यें घेऊन ड्रिंकवॉटरने हें भाषण बनविलेलें आहे. म्हणजे त्यांतील उद्गार सर्व लिंकनचेच प्रत्यक्ष आहेत, त्याच्याच शब्दांतले आहेत. आणि प्रस्तुत प्रसंगाला अत्यंत अनुरूप अशीच त्यांची सुसंगत जुळणी ड्रिंकवॉटरने या ठिकाणीं केली आहे.

लोकशाही पृथ्वीवर चिरकाल राहावी ही प्रतिज्ञा —

लोकांच्या आपल्याविषयीच्या सद्भावनेमुळे आपणाला अत्यंत गहिवरून आल्याचें प्रथम लिंकन सांगतो. चार वर्षांच्या अत्यंत कठीण आणि निराशाग्रस्त अशा काळानंतर आपलें उद्दिष्ट सिद्ध झालें आहे हें सांगून नम्रपणाने तो घोषित करतो की, "हें कांही माझें कर्तृत्व नव्हे; तर हा काळाचा प्रभाव आहे. त्याने माझ्या हातून हें घडविलें. आपण दोन गोष्टी केल्या. एक म्हणजे संघराज्याचें अखंडत्व टिकविलें. आणि दुसरें म्हणजे एक महान अन्याय नष्ट केला. आतां यापुढे पुष्कळ कार्य राहिलें आहे. विरोधकांचा विरोध जिंकायचा आहे, गोंधळ माजला आहे तेथे सुव्यवस्थितपणा आणायचा आहे, आणि फुटायला आलेले संघराज्याचे दोन भाग एकरूप करून त्यांची शक्ति, सत्प्रवृत्ति आणि उदारता यांकडे वळवावयाची आहे. हें घडवून आणण्यासाठी आमच्या ठिकाणीं मोठी दूरदृष्टि, विवेक आणि निष्ठा यांची आवश्यकता आहे. या महान कार्यांत मला भाग घ्यायला मिळण्याची आशा आहे ही माझ्या आयुष्यांतली मोठी धन्यतेची गोष्ट मी समजतों. हें भाग्य मला लाधो वा न लाधो; पण आतापर्यंत मला देशाने जी आपुलकी, जें प्रेम आणि उदारता दिली आहे त्यापुढे या धन्यतेची किंमत कांही नाही. कोणाविषयीही आकस न बाळगतां, सर्वांविषयीं सद्भाव बाळगून, परमेश्वरावर निष्ठा ठेवून आपण प्रतिज्ञा केली पाहिजे की, या राष्ट्रांत एक नवीन स्वातंत्र्य आपण जन्माला घालूं आणि लोकांचें राज्य, लोकांनी चालविलेलें राज्य आणि लोकांसाठी चाललेलें राज्य पृथ्वीतलावर चिरकाल राहील असें करूं."

दुर्दैव असें की, ही प्रतिज्ञा शेवटास नेण्यासाठी कार्य करण्याचें भाग्य लिंकनचें नव्हतें. ही घोषणा तो करतो न करतो तोच बूथने गोळी घालून लिंकनला ठार केलें आणि स्टॉन्टननें म्हटल्याप्रमाणें लिंकन केवळ एका त्याच देशाच्या मालकीचा न राहतां चिरकालाच्या मालकीचा झाला.

तरुण स्कॉट मारला गेल्यावर लिंकन आवेगाने म्हणाला होता "संसार किती विचित्र आहे!" परंतु एक दोन दिवसांतच, स्वतःच्या ऐन धन्यतेच्या क्षणीं आपली आयुष्याची दोरी अकस्मात तुटेल आणि साऱ्या जगाला उद्गार काढावे लागतील की, "खरोखरच संसार किती विचित्र आहे," असें त्या वेळीं स्वतः लिंकनच्या किंवा इतर कोणाच्या ध्यानीं मनीं तरी असेल काय?

अशा रीतीने ज्या या नाटकाच्या अखेरीस नायकाचा मृत्यु झालेला आहे तें नाटक करुण नाट्य म्हणतां येईल का हा प्रश्न आहे. आणि यांत करुण विपाक असला तरी तो कोणाच्या जीवनाचा आहे, लिंकनच्या आहे का? असाही प्रश्न आहे. आतापर्यंत आपण जीं नाटकें पाहिलीं त्यामध्ये ज्यांत नायकाचा अंत झाला नाही अशींही नाटकें पाहिलीं. तरीही तीं चांगलीं करुण नाटकें आहेत हेंही आपण पाहिलें. परंतु हें नाटक मात्र असें आहे की, ज्यांत नायकाचा अंत झालेला असूनही त्यामुळे त्याच्याविषयीं करुणेची भावना आपल्या चित्तांत उद्भवत नाही.

लिंकनच्या अंताचें बीज नाटकांत दाखविलें नाही —

आतापर्यंत पाहिलेल्या नाटकांत आणि या नाटकांत एक लक्षांत येण्याजोगा फरक हा आहे की, या नाटकांतील नायकाचा झालेला शेवट हा इतर नाटकांतल्याप्रमाणे स्वाभाविक आणि अपरिहार्य वाटत नाही. लिंकनने एका मोठ्या गटाच्या स्वार्थांवर बंधन घातलें होतें. त्यामुळे त्या वर्गाची त्याच्यावर नाराजी व्हावी आणि त्या नाराजीच्या पायीं एखाद्या माथेफिरूच्या हल्ल्याला त्याला बळी पडावें लागावें ही गोष्ट असंभवनीय नव्हती असें आपण म्हणूं शकूं. परंतु तें सुद्धा आपणाला जें सामान्यतः इतिहासाचें ज्ञान आहे त्यावरून. प्रत्यक्ष नाटकांत ही संभाव्यता कोठेही, दुरूनसुद्धा सूचित केलेली नाही. लिंकनच्या कार्याचे व स्वभावाचे जे पैलू नाटककाराने आमच्यापुढे निरनिराळे प्रसंग उभे करून स्पष्ट केले त्यांमध्ये पुढे लिंकनचा अशा तऱ्हेचा अंत होण्याजोगें एकही बीज नाटककाराने ध्वनित सुद्धा केलें नाही.

हळहळ – अनुकंपा वाटावी असें जीवन नाही —

तसेंच लिंकनचा आकस्मिक मृत्यु ही घटना कितीही खेदकारक वाटली तरी त्या खेदांत करुणेचा अंश येऊं शकत नाही. त्याच्या जीवनयात्रेंत त्याच्याबद्दल अनुकंपा वाटावी असें काय आहे? त्याची पत्नी त्याच्याशीं सद्भावनेने सहकार्य करणारी आहे. मोलकरिणीच्या रूपाने आणि नीग्रो धर्मोपदेशक डग्लस याच्या रूपाने सामान्य जनांची त्याच्यावर केवढीतरी श्रद्धा आहे हें आपण पाहतों. त्याच्या पक्षाने अनाहूतपणें त्याच्यावर विश्वास टाकला आणि त्या विश्वासाला तो शंभर टक्के उतरला. एक गोष्ट खरी. सामान्य विचारवंतापेक्षा त्याच्या नजरेची धाव आणि झेप फार मोठी आणि

तत्त्वस्पर्शी होती. त्यामुळे प्रथमप्रथम सिवार्डसारख्यांचा त्याला विरोध झाला. परंतु आपल्या उदार वागणुकीने लिंकनने अशांच्याही मनांत आपल्याबद्दल मोठा आदर आणि सद्भाव निर्माण केला. ग्रँटला तर लोक लिंकनविरुद्ध अध्यक्षपदासाठी उभे राह्यला सांगत होते, असें ग्रँटनेच पाचव्या प्रसंगाच्या सुरुवातीला सांगितलें आहे. परंतु त्याचेंसुद्धा लिंकनला केवढें भक्तिपूर्ण आणि अनन्यभावाचें सहकार्य मिळालें. लिंकनचीं दोन्ही उद्दिष्टें – संघराज्य अखंड राहून घटनेची दृढता साधावी आणि गुलामगिरीचें पाप नष्ट व्हावें हीं – सिद्ध झालीं. विजयाचा उन्माद त्याला चढला नाही. क्षमाशीलतेने वागून विरोधी फुटीर संस्थानांतही कटुता राहूं नये हें त्याने साधलें. अमेरिकेचा अध्यक्ष तर तो आधीच झाला होता. व्यावहारिक दृष्ट्या आणखी मोठा त्याचा उत्कर्ष तो काय व्हायचा राहिला होता? मुख्य म्हणजे आपल्या तत्त्वाशीं इमान बाळगल्याबद्दल केवढें तरी मोठें समाधान त्याला लाभलें होतें. म्हणूनच त्याला धन्यता वाटावी – लोकांनीही तसें म्हणावें हें किती स्वाभाविक होतें. म्हणून त्याच्या जीवनौघाविषयी किंवा जीवनौघांतून निर्माण झालेल्या एखाद्या दुःखद घटनेविषयी त्याच्या बाबतींत हळहळ वाटावी, अनुकंपा वाटावी असें खरोखर कांही आढळत नाही.

अशा स्थितींत त्याचा अकस्मात खून व्हावा, अंत व्हावा ही गोष्ट दुःखद असली तरी करुणास्पद नाही. तरुण शिपाई स्कॉट याचाही अंतच्च झाला. किती उत्साहाने लढाईत सामील होण्यासाठी तो गेला. शिक्षा म्हणून गोळी घालून ठार होण्याच्या संकटांतून तो वाचतो काय आणि उमेदीने रणक्षेत्रावर गेला असतांना दोनचार तासांच्या अवधींत तेथे मारला जातो काय! घटना केवढी दुःख देणारी, अंतकरण विषण्ण करणारी, भयभीत करणारी आहे. पण म्हणून तिच्यामुळे, नाट्यगत करुणेची जी भावना आतापर्यंतच्या नायकांच्या बाबतींत आपण अनुभवली तिच्याशीं सदृश अशी भानवा कांही आपल्या मनांत जागृत होत नाही. तशीच स्थिति लिंकनच्या मृत्यूबद्दलची आहे.

हळहळ आणि दुःख आपण अनुभवलें तें त्या व्यक्तीबद्दल नाही. तर समाजाच्या अपूर्णतेबद्दल, संसाराच्या विचित्रतेबद्दल. स्कॉटच्याबद्दल लिंकनचा उत्स्फूर्त उद्गार, 'ग्रँट, संसार किती विचित्र आहे!' असा जो आहे तोच विचार, तीच भावना लिंकनच्या मृत्यूनंतर आपल्या मनांत येते.

यांत दोष, उणेपणा कोठे असेल तर जगांत, समाजांत आहे. चांगल्यालाही जगांत विरोध होतो. हितसंबंधी लोकांचें सत्याने, अहिंसेने, न्यायाने शासन होत नाही. स्वार्थबुद्धीने ते दुष्ट कृत्यें करायला तयार होतात, ही समाजांतील एक दुःखद आणि कदाचित मनुष्यस्वभाव हा असा आहे तोंपर्यंत जिचा पुनःपुन्हा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही अशी उणीव आहे. ही दुष्टबुद्धि अमक्याच वेळी उफाळून वर येईल किंवा अमुकच कृत्य करील असा अंदाज आगाऊ बांधणें अशक्य आहे. म्हणून लिंकनचा मृत्यु म्हणजे या उणीवेची जाणीव करून देणारा एक आकस्मिक योगायोग, समाजांतल्या अपूर्ण मानवतेचें दर्शन होय.

शिवाय लिंकनला महान यश लाभलें आणि त्यामुळे हितसंबंधी लोकांमधील माथेफिरू लोकांची चीड अनावर झाली हाही एक योगायोगच होय. जीवनांत अशा योगायोगाचा, अज्ञाताचा भाग फार मोठा आहे. त्याच्या प्रभावाने चांगल्या चांगल्या कार्यांचाही केव्हा आणि कसा बिघाड होऊं शकेल हें सांगणें अशक्य असतें. याच दृष्टीने गीतेंत म्हटलें आहे, 'दैवं च एव अत्र पंचमम्'! या दैवाचा अर्थ विरोधी विधिलिखित असा करण्याचें कारण नाही. तर कर्ता, साधनें, विविध क्रिया आणि जिच्या बाबतींत कार्य घडवून आणावयाचें ती वस्तु किंवा परिस्थिति या सर्व गोष्टी सिद्ध असूनही, ज्ञात असूनहि, त्यांच्या मेळाव्यांत सुद्धा कार्यसिद्धि होणें किंवा न होणें हें ज्या माणसाला ज्ञात नसलेल्या कांही गोष्टींवर अवलंबून राहते त्या म्हणजे दैव. असा त्याचा पूर्ण शास्त्रीय अर्थ करतां येईल.

हा अज्ञात भाग जीवनांत आहे; म्हणून जीवन अपूर्ण आहे. म्हणून लिंकनच्या वधाबद्दल वाटणारी हळहळ ही समाजाच्या आणि एकंदर संसाराच्या या अपूर्णतेबद्दल वाटणारी हळहळ आहे. पण म्हणून तेवढ्यासाठी कांही अब्राहाम लिंकन हें नाटक संसाराच्या करुण विपाकाचें नाटक आहे असें म्हणतां येणार नाही. ऑफिलिया, डेस्डेमोना यांच्या मृत्यूमुळेही आपल्याला अत्यंत दुःख होतें; पण म्हणून त्यांना आपण करुण नायिका म्हणत नाही. कारण त्यांचें करुण चित्र वठविणें हा नाटककर्त्यांचा मुख्य हेतूच नाही.

त्या दृष्टीने ड्रिंकवाटरला मानवसमाज हा नायक म्हणून आपल्यापुढे उभा करावयाचा नाही. त्याच्या नाटकाचा नायक अब्राहाम लिंकन ही व्यक्तीच आहे. पण या लिंकनबद्दल कसलीही कीव त्याला आपल्या मनांत निर्माण करावयाची नाही. तर आपल्या प्रभावाने काळाला एक वेगळें वळण देणाऱ्या महान पुरुषाचें व्यक्तिचित्र त्याला आपल्यापुढे उभें करावयाचें आहे. हें त्याचें साध्य असल्याने तदनुसार तंत्र त्याने मुद्दाम वापरलें आहे. वेचक प्रसंग उभारून नायकाच्या ठिकाणचे विविध गुण त्याने आपल्याला प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखविले आहेत. आतापर्यंत जीं नाटकें आपण पाहिलीं त्यामध्ये नाटककारांनी नायकाच्या गुणवत्तेचें कथन करण्यावर मदार ठेवली आहे असें आपण पाहिलें. कारण त्या गुणांपेक्षा नायकाचें पतन किंवा नायकाचें दुर्दैव चित्रित करणें हें त्यांचें साध्य होतें. येथे साध्य भिन्न झाल्याबरोबर तंत्र बदललें आहे.

या नाटकाची भाषा गद्य आहे. परंतु येथेही नाटककाराने श्रोत्या-प्रेक्षकांची काव्याबद्दलची अपेक्षा कथकांच्या काव्यगायनाने पुरी केलीच आहे. त्याचप्रमाणे लिंकनचीं जीं ठिकठिकाणचीं भाषणें आहेत तींही पुष्कळशीं काव्यात्मक आहेत. स्वतः लिंकन तर शेक्स्पीअरच्या काव्याशीं समरस झालेला एक काव्यात्म रसिक असल्याचेंच नाटककाराने वारंवार दाखविलें आहे. शिवाय सोफोक्लीसच्या राजा ईडिपसप्रमाणे या नाटकांतील सर्वच संभाषणें इतकीं चपखल आणि नेटकीं आहेत की, तीं सामान्य व्यवहारांत होणाऱ्या संभाषणाहून कितीतरी निराळीं वाटतात.

प्रकरण नववें

कोरिओलेनस

आता थोडी मागे उडी मारून पुन्हा एकदा आपण शेक्स्पीअरकडे जाऊं. या प्रकरणांत कोरिओलेनस या त्याच्या नाटकाचा विचार करावयाचा आहे. त्यापूर्वी कांही गोष्टी ध्यानांत घेतल्या पाहिजेत. कोरिओलेनस हें नाटक शेक्स्पीअरच्या श्रेष्ठ नाटकां-पैकी मानलेलें नाही. करुण नायकांचें चित्रण करण्याची शेक्स्पीअरची म्हणून जी हातोटी किंवा जें तंत्र पाहावयाचें तें पाहतांना प्रामुख्याने हॅम्लेट, ऑथेल्लो, मॅकबेथ आणि लिअर या त्याच्या चार श्रेष्ठ नायकांचाच विचार केला जातो.

दुसरी गोष्ट म्हणजे कोरिओलेनस हें नाटक शेक्स्पीअरच्या करुण नाटकांत सर्वांत मोठें नाटक आहे. लिअरपेक्षांही तें जास्त मोठें आहे. भले मोठे पांच अंक आणि त्यांतील तीन अंकांमध्ये प्रवेशामागून प्रवेश असे कितीतरी प्रवेश अशी त्याची रचना कांहीशी सैल वाटण्यासारखी आहे. ज्यूलिअस सीझरमध्येही एका मागोमाग एक असे बरेचसे प्रसंग एका अंकांत शेक्स्पीअरनें घातले आहेत. परंतु त्या नाटकाच्या जवळ जवळ दीडपट मोठें कोरिओलेनस हें नाटक आहे.

मुख्यतः ऐतिहासिक नाटक —

तसेंच मुख्यतः ऐतिहासिक नाटक म्हणून तें लिहिलें गेल्यामुळे इतिहासांतील घटनांचें दर्शन घडविण्याची ओढ नाटककाराला सुटलेली नाही. या नाटकाची लांबी आणि त्याच्या रचनेंतील सैलपणा यांना कारण ही ओढ पुष्कळशी झालेली आहे.

आणि कोरिओलेनसची जी संहिता उपलब्ध आहे ती जितकी असावी तितकी समाधानकारक नाही.

अर्थात हें सगळें असूनही शेक्स्पीअरची कलावृत्ति याही नाटकांत प्रभावी आहे हें कोणालाही मान्य करावें लागेल. परंतु ऐतिहासिक भूमिकेचें दडपणही त्याच्या मनावरचें सुटलेलें नाही हेंही तितकेंच खरें आहे. यामुळे आपल्या करुण नायकाच्या चित्रणा-मध्ये इतर नायकांच्या वेळीं ज्या तंत्राचा उपयोग त्याने केला त्याहून थोड्या निराळ्या तंत्राचा अवलंब या नाटकांत त्याने केलेला आढळतो; तसा तो त्याला करावा लागला आहे. तें कसें तें आतां पाहूं.

नाटकाच्या पहिल्या प्रवेशांत रोममधील पॅट्रिशिअन म्हणजे सरदारांचा वर्ग आणि प्लीबिअन म्हणजे सामान्य जनतेचा – कारागिरांचा वर्ग – यांच्यामधील विरोधाच्या

दर्शनापासून सुरुवात झाली आहे. रोममध्ये अन्नाची टंचाई उत्पन्न झाली आहे आणि दोन नागरिक त्यांचें खापर सरदार वर्गावर फोडीत आहेत. काम करावें लोकांनी आणि अन्नाचे साठे करावे सरदार वर्गाने; त्यांनी सुखांत असावें, खावें, प्यावें, आणि लोकांनी इकडे मुकेने भरावें, या परिस्थितीबद्दल त्यांची मोठी तक्रार आहे. याचा सूड घेतला पाहिजे असाही विचार त्यांच्या भाषणांत व्यक्त होत आहे.

गव्हाणींतला दुष्टांतला दुष्ट कुत्रा? —

या सूडाच्या भावनेचा जास्तींत जास्त रोख कायस मार्सियस याच्यावर आहे. कारण लोकमत असें आहे की सामान्य जनतेला सुखाने चार घास खाऊं न देणारा गव्हाणींतला दुष्टांतला दुष्ट कुत्रा हा कायस आहे. देशाच्या लढाया जिंकून त्याने देशाचें केलेलें हित लोकांना मान्य आहे, पण याचा वचपा तो आपल्या अहंकाराने भरून काढतो ही लोकांची तक्रार आहे. ही आपली या नाटकाच्या नायकाशीं होणारी पहिली ओळख. अर्थात लोकांत कांहीजण त्याच्या गुणांची कदर करणारे आहेत. तो स्वार्थी नाही. आणि त्याचें तोंड खराब असलें तरी तो त्याचा एक स्वभावधर्म आहे, पण त्याच्या अंतःकरणांत कसला आकस आहे असें म्हणण्यासारखें नाही, असेंही कांहीजणांचें मत आहे. परंतु दुसऱ्या मोठ्या गटाला हें मत मान्य नाही; त्यांच्या मतें कायस हा सर्व दोषांचें आगरच आहे.

नागरिकांच्या या संभाषणांत तेवड्यांतच मेनेनिअस हा सरदारवर्गांतला एक वृद्ध गृहस्थ सामील होतो. सामान्य जनतेला सरदारवर्गापैकी त्यांतल्या त्यांत जवळचा आणि बोलण्यायोग्य वाटणारा असा हा एक मोठा बडबड्या, हिकमती, कोटिबाज आणि कायस मार्सिअस (जो पुढे कोरिओलेनस व्हायचा आहे) याच्यावर अगदी पुत्रवत प्रेम करणारा म्हातारा आहे. त्याने ती पोट आणि अवयव यांच्यामधील भांडणाची लोकप्रसिद्ध गोष्ट सांगून सामान्य लोकांचा राग शांत करण्याचा प्रयत्न केला. वरिष्ठवर्गीय रोमन सेनेटर (राज्यसभेचे सभासद) म्हणजे पोट आणि सामान्य लोक म्हणजे इतर अवयव. पोटांत अन्न जातें खरें; पण तेथें तें पचवून त्याचें रूपांतर करून साऱ्या शरीराला सत्त्व पुरविणें हें काम पोट करतें; वगैरे त्याचा युक्तिवाद लोकांना तसा पटण्यासारखा होता असें नव्हे. त्यांची सांगण्याची पद्धति सुद्धा लोकांच्या ठिकाणची बुद्धिहीनता आणि संस्कृतिहीनता यांचा अधिक्षेप करणारी होती. पण त्याचे हे अधिक्षेप हसत केलेले, विनोदगर्भ आणि त्यामुळे कांहीसे कमी बोचक वाटणारे होते.

कायसचा वेगळा खाक्या —

त्यानंतर कायस मार्सिअस तेथे येतो. त्याचा सारा खाक्या निराळा आहे असें आपल्या अनुभवास येते. लोक त्याला नम्रतेने अभिवादन करतात. परंतु त्याचें उत्तर काय आहे, तर "काय रे ए तंटेबाज, लुच्चे लोकांनो, खवडे खाजविल्यासारखीं

आपलीं मनें चिवडीत येथे काय करीत बसलां आहांत ?" आणि याच सुरांत तो लोकांवर नाही नाही तें तोंडसुख घेतो. त्यांना कुतरडीं म्हणतो. "तुम्हांला शांतताही नको, युद्धही नको. तुम्ही भेदरट आहांत. श्रेष्ठत्वाला लायक असणाऱ्या व्यक्तीचा तुम्ही द्वेष करणारे आहांत. तुमच्यावर विसंबून राह्यची सोय नाही. दर मिनिटाला रंग बदलणारे तुम्ही लोक. या क्षणाला ज्याला श्रेष्ठ म्हणून गौरवाल त्यालाच दुसऱ्याच क्षणीं नाहीं नाही त्या शिव्या द्याल." वगैरे प्रकारांनी लोकांना ताडण करुन मग मोठ्या उद्दामपणाने तो विचारतो, "काय हा आरडाओरडा चालविला आहे तुम्हीं लोकांनी साऱ्या रोमभर. तुमच्या डोक्यावर राज्यसभेचा दंडुका आहे म्हणून ठीक; नाहींतर तुम्ही आपसांत डोकीं फोडलीं असतीत. काय, पाहिजे आहे काय तुम्हांला?"

लोकहितशत्रू कायस —

लोक म्हणतात आम्हांला अन्न पाहिजे आणि त्यांच्या मतें शहरांत धान्याचा साठा पुष्कळ आहे. लगेच लोकमताची कठोर हेटाळणी करण्याला कायसला संधि मिळते. "सरदार लोक जर नरमाईने वागायचें सोडून देतील आणि माझ्याकडे सत्ता देतील तर या मतवाल्या लोकांना मी तेव्हाच कसा सरळ करतो पाहा" अशी तो आपली भूमिका मांडतो आणि त्याच वेळीं शहराच्या दुसऱ्या भागांत चळवळ्या लोकांची समजूत कशी काढली गेली हें तो सांगतो. तेथें लोकांना धान्य देण्यांत आलें असें नाही; तर त्यांची एक मागणी मान्य करण्यांत आली. ती ही की, लोकांचे पांच प्रतिनिधी – ट्रिब्यून – राज्यसभेमध्ये लोकांचें गाऱ्हाणें मांडण्यासाठी घेण्यांत यावे!

कायसला हेंही मान्य नाही. या बुद्धिहीन लोकांचे प्रतिनिधी राज्यसभेंत बसूं देण्याऐवजी रोमचें घर न् घर मीं मोडून काढलें असतें असें तो म्हणतो. या सगळ्या प्रसंगाला पुढे घडणाऱ्या घटनांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. जर माझ्या हातीं राज्यसभेने सत्ता दिली असती तर – असें तो म्हणतो; आणि कांही दिवसांतच त्याच्या हातीं अशी सत्ता देण्याचा प्रयत्न होणार असतो; व त्यांतूनच पुढचें सारें नाटक उभें राह्यचें असतें. अशा स्थितींत कायस हा लोकहितशत्रू आहे असें लोकांना वाटावें यांत आश्चर्य कांहीच नाही एवढें दिसण्याजोगी येथे ही भूमिका पुरेशी तयार झालेली आहे.

पण लोकांना शिव्या देण्याचा हा कार्यक्रम कायसला आवरता घ्यावा लागतो. कारण व्होल्स लोकांनी सैन्य जमवून रोमच्या राज्याविरुद्ध चढाई करण्याचा बेत आखल्याचें वृत्त येऊन तिकडेच कायसचें लक्ष वेधतें. रोमचा सरसेनापति तेथे येतो आणि कायसने या संकटाविरुद्ध तोंड द्यावें असें सुचवितो; तेव्हा तेथून ते सारेजण राज्यसभेकडे अधिक विचाराकरिता जाऊं लागतात. त्या वेळी एकूण सर्वच वरिष्ठ वर्गीयांमध्ये सामान्य-जनांबद्दल किती हेटाळणीची भावना आहे हें, एक सभासद लोकांना, 'चला, निघारे येथून घरीं' असें किती उद्दामपणें म्हणतो त्यावरून उघड होतेंच; परंतु त्याच वेळीं कायस जें म्हणतो आणि तेंही लोकांच्या तोंडावर, त्यांतून त्याच्या मनांत सामान्य जनते-

बद्दल किती हीन भावना भरून राहिलेली आहे हें पुन्हा एकदा व्यक्त होतें. तो म्हणतो, "नाही, नाही. येऊं देत त्यांना राज्यसभेकडे. व्होल्स लोकांजवळ पुष्कळ धान्य आहे; या उंदरांना जाऊं देत तेथे, कुरतडूं देत त्यांचीं कोठारें!"

शिगेला पोचलेला अहंकार —

सरसेनापतीबरोबर, नवीनच निवडलेले लोकप्रतिनिधी ब्रूटस आणि सिसीनिअस हेही आलेले[1] असतात. सर्व लोक निघून जातात तेव्हा हे दोघे मागे राहतात. ते कायसच्या अहंकाराने स्तिमित होऊन गेलेले आहेत. साऱ्या पृथ्वींत इतका अहंकारी माणूस सापडणार नाही असें त्यांचें मत आहे. आपली लोकप्रतिनिधी म्हणून निवड झाली त्या वेळीं त्याने तोंड किती वाईट केलें, किती वाईट टोमणे दिले याची त्यांची आठवण ताजी आहे. त्याचा अहंभाव तसा जागृत झाला तर प्रत्यक्ष देवांनासुद्धा गुंडाळून ठेवायचा तो प्रयत्न करील; वगैरे ते दोघे बोलत असतांना त्यांनी केलेलीं विधानें पुढच्या अरिष्टांची सूचक होतात. ब्रूटस म्हणतो, त्याचा अहंकार एवढ्या परीला पोचला आहे की, त्या पायींच त्याचें शौर्य व्यर्थ ठरणार आहे. आणि सिसिनिअस म्हणतो की, "कीर्तीची त्याची हाव इतकी वाढली आहे की, स्वतःच्या पायाखालची मध्यान्हाच्या वेळची सावलीसुद्धा स्वतःची प्रतिस्पर्धी म्हणून त्याला डोळ्यांसमोर नकोशी झाली आहे."

कोरिओलेनस व्होल्स लोकांचा हल्ला होण्याची वाट पाहत नाही. तोच सैन्याची जमवाजमव करून व्होल्स लोकांवर चाल करून जाण्याची तयारी करतो. याची वार्ता व्होल्स लोकांचा नेता ऑफिडियस याला रोममधूनच आलेल्या एका पत्रांतून कळते. त्यामध्ये "तुझा जितका रोमचे लोक द्वेष करीत नसतील इतका ज्याचा ते द्वेष करतात, त्या मार्सिअसच्या नेतृत्वाखाली व्होल्स लोकांवर हल्ला करण्याचा रोमचा विचार आहे" अशी वार्ता असते. या रीतीने ऑफिडियसचा बेत रोममध्ये कळला असल्याची गोष्ट जशी दिग्दर्शित होते तशीच रोममध्ये आपल्या नायकाबद्दल कोणती भावना असते हीही गोष्ट ध्वनित होते. आपल्या दृष्टीने त्या गोष्टीला फार महत्त्व आहे.

लहानपणापासून लढाऊ पेशाचा फक्त आदर्श —

हा झाला दुसरा प्रवेश. नाटकाच्या कथानकाला त्याने गति अशी फारच थोडी मिळते. तिसऱ्या प्रवेशाचीही अवस्था तीच आहे. कोरिओलेनसच्या घरीं त्याची माता व्हॉल्युमिना, त्याची पत्नी व्हर्जिलिया आणि तिची मैत्रीण व्हॅलेरिया यांच्यामधील हा प्रसंग आहे. कोरिओलेनस लढाईवर गेला आहे या विचाराने त्याची पत्नी अत्यंत दुःखी आहे. काळजींत आहे. त्याचें युद्धांत कसें होईल, तो जखमी होऊनच घरीं येईल या विचाराने ती भारावलेली आहे. इतकी की, तिची मैत्रीण तिला मन मोकळें

ठेवून बाहेर फिरायला चलण्याचा किती जरी आग्रह करते तरी ती त्या गोष्टीला कबूल होत नाही. या चिंतेच्या अवस्थेंतच बाहेर जाऊन फिरण्याचा विचारसुद्धा तिला सहन होत नाही. कोरिओलेनसच्या जखमा आणि त्याचें रक्त या गोष्टीचा उच्चारही तिला सहन होत नाही. परंतु तिच्या सासूची गोष्ट वेगळी आहे. तिला आपल्या मुलाच्या शौर्याबद्दल अतिशय अभिमान आहे. त्याच्या जखमा हें तिला त्याचें वैभवच वाटतें. आपणच त्याला असा वीरपुरुष बनविला असा तिला अभिमान आहे. एकुलता एक मुलगा असूनही आपण त्याला रणधुमाळीच्या क्षेत्रांत पाठविला याची कथा ती मोठ्या गर्वाने सांगते आहे. पुढे या दोन्ही स्त्रियांचा प्रवेश पांचव्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत मोठा बहारीचा असा आपल्याला पाहायला मिळणार आहे. त्या प्रवेशाची किंचितशी पायाभरणी या दृष्टीनेच केवळ या प्रवेशाला महत्त्व आहे; तसेंच अगदी लहानपणापासून लढाऊ पेशा हाच एक मोठा उच्च आदर्श म्हणून कोरिओलेनसपुढे कसा ठेवला गेला होता हें जाणण्यासाठीही त्याचा उपयोग आहे.

चवथ्या प्रवेशांत मात्र नायकाच्या शौर्याचा एक प्रसंग शेक्स्पीअर आपल्यापुढे उभा करतो. व्होल्स लोकांच्या कोरिओली या नगरासमोर कोरिओलेनस येऊन पोचलेला आहे. त्या वेळीं व्होल्स योद्धे मोठ्या आवेशाने बाहेर येऊन रोमन सैन्यावर हल्ला करतात. तेव्हा आपल्या सैन्याची पीछेहाट होत आहे हें पाहून त्यांना चेव आणण्यासाठी, त्यांनी त्वेषाने लढावें म्हणून कोरिओलेनस जी भाषा वापरतो ती त्याच्या स्वभावाच्या दृष्टीने लक्षणीय आहे. शिव्यांचा नुसता वर्षाव तो आपल्या सैनिकांवर करतो; आरडाओरडा करतो; नाही नाही ते अपशब्द बोलतो; शत्रूला सोडून आता तुमच्याशींच मी लढाई करतों अशा त्यांना धमक्या देतो. त्याच्या सेनापतिपदाचा हा देखावा लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

या चेतवणीच्या परिणामाने रोमन सैनिक जोर करून व्होल्स लोकांचा हल्ला परतवतात. आणि व्होल्स लोक उघड्या वेशींतून नगराच्या आंत प्रवेश करतात. त्या वेळीं युद्धाच्या आवेशांत कोरिओलेनस एकटाच त्यांच्या मागोमाग वेशीच्या आंत जातो आणि वेशीचीं दारें बंद होतात.

शौर्य की आततायीपणा ?—

या त्याच्या शौर्याच्या दर्शनाने मराठींतील एक प्राध्यापक मोठे प्रभावित झाले आहेत आणि "पाहा, शेक्स्पीअरने आपल्या या करुण नाटकाच्या नायकाचें मोठेपण कसें प्रत्यक्ष दाखविलें आहे" असा दावा त्यांनी मांडला आहे. त्यासंबंधांत पुढे आपण जास्त चर्चा करूंच. या प्रसंगीं एक गोष्ट लक्षांत घ्यावयाची म्हणजे प्रत्यक्ष लढणाऱ्या सैनिकांना मात्र त्याचें हें कृत्य आततायीपणाचें वाटलें; आणि त्याचा दुय्यम लार्शिअस याला जरी या धाडशीपणाचें कौतुक वाटलें तरी त्याचा परिणाम म्हणजे जवळ जवळ कोरिओलेनसचा अंतच असें तो धरून चालला होता. इतक्यांत चमत्कार असा

की, आंतमध्ये सगळ्या व्होल्स सैनिकांशीं एकटा एक लढून कोरिओलेनस बाहेर येतो; अर्थात पुष्कळ जखमा झालेल्या अवस्थेंत; व्होल्स सैनिक त्याच्या पाठीवरच असतात; त्या वेळीं रोमन सैनिक त्यांच्यावर हल्ला करून त्यांना आंत पिटाळतात आणि स्वतःही आंत प्रवेश करतात, कायससह.

हिरवट माणूसघाणेपणा दाखविण्याचाच हेतु—

कोरिओली नगराचा संपूर्ण ताबा घेऊन आणि आपल्या हाताखालच्या लार्शिअसला तेथे ठेवून तशा जखमी अवस्थेंत, विश्रांति न घेतांच कोरिओलेनस पुन्हा नगराबाहेर येतो. इकडे बाहेर कांही अंतरावर ऑफिडियसच्या नेतृत्वाखालील व्होल्स लोकांच्या सैन्याशीं कॉमिनिअस हा रोमचा ज्येष्ठ सेनापति सामना देत होता. त्यांत कॉमिनिअसच्या सैन्याला माघार घ्यावी लागली. मागे येऊन विश्रांति घेत असतांना कॉमिनिअसचें आपल्या सैन्याशीं झालेलें बोलणें या ठिकाणीं – अंक १ प्रवेश ६ – शेक्सपीअरने मुद्दाम दिलें आहे. तो सैनिकांना वेड्यावाकड्या शिव्या देत नाही; त्यांच्या अंगावर ओरडत नाही. उलट " भले बहादूर, शर्थ केलीत लढण्याची तुम्ही. रोमन लोक आहोंत आपण. हल्ला करतांना आपण अविचाराने वागत नाही. माघार घ्यावी लागली तरी मेंकडासारखे आपण पळत नाही, " असें म्हणतो. अशा रीतीने त्याचें आपल्या सैन्याशीं वर्तन आणि थोड्याच वेळापूर्वी कोरिओलीच्या वेशीसमोर सैनिकांना उद्देशून केलेल्या भाषणांत कोरिओलेनसने आपल्या सैनिकांची अपशब्दांनी बांधलेली पूजा या गोष्टी नाटककाराने या ठिकाणीं मुद्दाम तुलनेसाठी घातल्या आहेत असें वाटल्यावांचून राहत नाही. या एक दोन प्रवेशांत कोरिओलेनसचें शौर्य दाखविण्याचा त्याचा हेतु असण्यापेक्षा त्याच्या स्वभावांतील हिरवटपणा, माणुसघाणेपणा, अहंकार आणि आततायी साहसीपणा यांचेंच बहुधा नाटककाराला अधिक प्रदर्शन करावयाचें आहे.

कारण त्याच वेळीं कोरिओलेनस कॉमिनिअसकडे येतो तेव्हाही आपल्या सैनिकांबद्दल — ज्यांचा पेशा जन्मजात लढवय्यांचा नव्हता अशा तात्पुरत्या लढाईवर आलेल्या 'सद्गृहस्थांबद्दल' – अत्यंत हीन असेच उद्गार काढतांना आपल्याला आढळतो. कॉमिनिअसच्याच लोकांपैकी कांही लोक निवडून मग तो तशाच जखमी स्थितींत ऑफिडियसवर हल्ला करायला निघतो; यांत तो सच्चा शिपाई आहे हें दिसतेंच; परंतु या सच्चा शिपायाच्या अंगीं माणुसकीचे गुण कमी आहेत हेंही तेथेच दिसल्यावाचून राहत नाही.

त्यानंतरच्या अगदी लहानशा आठव्या प्रवेशांत ऑफिडियस व कोरिओलेनस यांचें युद्ध झाल्याचें दाखविलें आहे. ऑफिडियसच्या साहाय्यार्थ इतरही कांही सैनिक येतात. परंतु त्या सर्वांना पिटाळून लावीत रेटीत कोरिओलेनस जातो अशा स्थितीत तो प्रवेश नाटककाराने संपविला आहे.

नवव्या प्रवेशामध्ये रोमन सैन्याच्या मुख्य तळावर, व्होल्स लोकावरील विजया-

नंतर सर्व मंडळी जमा झालेली आहे. त्यामध्ये कोरिओलेनस एक हात बांधून घातलेला अशा स्थितींत आलेला आहे. त्या वेळीं सर्वांना उद्देशून कॉमिनिअस "तुमचा विश्वास बसणार नाही अशीं महान शौर्याचीं कृत्यें आज घडलीं आहेत अशी सुरुवात करून कोरिओलेनसच्या त्या लढाईंतल्या शौर्याची अत्यंत मनमोकळेपणाने आणि काव्यमय रीतीने स्तुति करतो.

या ठिकाणीं मॅकबेथ नाटकाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्या नाटकांही मॅकबेथ असाच खूप शौर्याने लढून विजय मिळवून परत आलेला असतो. त्या ठिकाणींही डंकन राजा मॅकबेथची अशीच स्तुति करीत असतो. आणि तेवढ्यावर आपणा श्रोत्या–प्रेक्षकांचें मॅकबेथच्या वीरत्वाबद्दल पुरेंसें समाधान होतें. त्यासाठी मॅकबेथच्या प्रत्यक्ष लढाईंचे प्रसंग पाहण्याची गरज होती असें कांही तेथे आपल्याला वाटत नाही.

कथानकाला मुळीच गति न देणारे सहा प्रवेश कशाला ? —

त्याचप्रमाणे – या नाटकांतही कॉमिनिअसच्या या भाषणानेच खरोखर कोरिओलेनसच्या श्रेष्ठ युद्धकौशल्याचें आणि शौर्याचें पुरेसें दर्शन आपल्याला शेक्स्पीअर करू शकला असता; असें असतांना तसें न करतां त्याने यापूर्वीचे सहा प्रवेश एकामागून एक येथे घालावे याचें प्रयोजन काय असा प्रश्न पडतो. कारण प्रत्यक्ष कथानकाला गति अशी या प्रवेशांमुळे एवढीसुद्धा मिळत नाही. शेक्स्पीअरची इतर करुण नाटकें– विशेषतः श्रेष्ठ चार नाटकें – पाहिलीं असतां त्यांमध्ये नाटकाला सुरुवात होतां होतांच एकदम करुण घटना दाखविण्याच्या कामाला तो हात घालतो असें दिसतें. मग या नाटकांत त्याने वेगळें तंत्र कां अवलंबावें ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

याचा खुलासा एकाच दृष्टीने होऊं शकतो. इतर नाटकांतल्याप्रमाणे निव्वळ करुण नायकाच्या चित्रणापेक्षा आपण एक ऐतिहासिक कथा नाट्यरूपाने चित्रित करीत आहोंत ही कल्पना या नाटकांत शेक्स्पीअरच्या तंत्राचें नियमन करून राहिली आहे. म्हणूनच त्याच्या इतर ऐतिहासिक नाटकांत वापरलेलें आणि अशा नाटकांत लोकांना आवडलेलें तंत्र त्याने याही नाटकांत वापरलें आहे. म्हणूनच त्या लष्करी छावण्या, त्या चकमकी, तीं युद्धें, ते रणभेरींचे निनाद, वैयक्तिक द्वंद्वयुद्धें यांचा पसारा त्याने येथे मांडला आहे. म्हणूनच करुण नाटकाचें एक नमुनेदार उदाहरण म्हणून या नाटकाकडे न पाहतां प्रामुख्याने एक ऐतिहासिक नाटक म्हणूनच त्याच्याकडे पाहणें योग्य होईल. त्याशिवाय सबंध पहिला अंक आणि दुसराही बहुतेक अंक यामध्ये रेंगाळत ठेवलेल्या शेक्स्पीअरच्या या नाटकाच्या तंत्राचा नीट उलगडा होणार नाही.

कोरिओलेनसच्याही अंगीं उच्च माणुसकी आहे —

अर्थात याही प्रवेशांत शेक्स्पीअरने कोरिओलेनसच्या आंगचे, माणुसकीचा उच्च

आदर्श दाखविणारे दोन गुण आपल्यापुढे मांडण्याची संधि साधली आहेच. लढाईंत मिळविलेल्या लुटीचा दहावा हिस्सा कॉमिनिअस त्याला बक्षीस म्हणून देऊं करतो त्या वेळीं कोरिओलेनस आपल्या तरवारीला हा लाच आपण घेणार नाही, असें म्हणून हा लाभ दृढतेने नाकारतो. हा त्याचा मनाचा मोठेपणा त्याच्या त्या धांगडधिंग्याच्या युद्धकौशल्यापेक्षा मनाला अधिक जाऊन भिडणारा आहे. त्यापेक्षाही आणखी एका गोष्टीने आपण त्याच्याविषयी अधिक जिव्हाळा बाळगूं लागतो. हा धनलाभ स्वीकारला नाही तरी एक मागणें मात्र तो सेनापतीजवळ मागतो; तें म्हणजे पूर्वी एकदा कोरिओलेनस कोरिओलीमध्ये एका गरीब माणसाच्या घरीं राहिला होता व त्या माणसाने त्याचा पाहुणचार चांगला केलेला होता; म्हणून त्या गरीब माणसाला व्होल्स लोकांपैकी पकडलेल्या कैद्यांतून मुक्त करावें, अशी त्याची तळमळीची प्रार्थना असते. हा त्याच्या चित्ताचा हळुवारपणा हाच त्याच्या अंगच्या मोठेपणाचा अधिक गोड निदर्शक आहे.

परंतु क्वचितच आढळणारा हा त्याचा मोठेपणा त्याच्या अहंकारामध्ये व प्रौढीच्या भाषणांमध्ये आणि परनिंदेमध्ये किती खोल गाडून गेलेला आहे यांचें प्रत्यंतर त्याच प्रवेशांत मिळल्यामुळे मन विपण्ण झाल्यावाचून राहत नाही.

कोरिओलेनसच्या हातून पुनःपुन्हा होणाऱ्या पराभवामुळे इकडे ऑफिडियस अगदी संतप्त होऊन गेलेला आहे. त्यामुळे आपल्या नगरांत परत जायचेंसुद्धा तो नाकारतो. आणि भल्या किंवा बुऱ्या, कोणत्याही मार्गाने कोरिओलेनसचा निःपात करणें हेंच आपल्या जीविताचें एकमेव कार्य अशी तो प्रतिज्ञा करतो. अशा दहाव्या प्रवेशानंतर हा रेंगाळत चाललेला अंक संपतो.

दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत पुन्हा एकदा मेनेनिअस व लोकप्रतिनिधी ब्रूटस आणि सिसिनिअस यांच्यामधील संवाद आहे. पहिल्या अंकातल्याप्रमाणेच बोलण्याचा विषय कोरिओलेनसबद्दलच आहे. हें नांव पहिल्या अंकाच्या नवव्या प्रवेशांत सेनापति कॉमिनिअस त्याच्या लढाईतील शौर्याबद्दल प्रसंसा करतांना आणि त्याने कोरिओली नगर जिंकलें या कारणास्तव देतो. ब्रूटस आणि सिसिनियस कोरिओलेनसबद्दलचा आपला राग स्पष्ट शब्दांत सांगतात. लोकांना तो आपला मित्र वाटत नाही, शत्रू वाटतो. कारण प्रथम म्हणजे तो फार गर्विष्ठ आहे, आणि या गर्वाचें प्रदर्शन अंहभावनेने तो पुन्हाः पुन्हा करीत असतो; असे ते दोघे सांगतात. त्यावर लोक कोणाबद्दलच्च पाठीमागे चांगला शब्द बोलत नाहींत असा प्रतिवाद करून मॅजिस्ट्रेट – दंडाधिकारी – या नात्याने तुम्हां दोघांनाही लोक महामूर्खच म्हणतात असें मेनेनिअस त्यांना सुनावतो. आणि कोरिओलेनस जरी अहंकारी असला तरी तुमच्या बेचाळीस पिढ्या त्याच्यावरून ओवाळून टाकाव्या एवढी त्याची श्रेष्ठता आहे असेंही तो त्यांच्या तोंडावर बेधडक सांगतो; आणि तुमच्याशीं मी जास्त बोलत बसलों तर तुमच्या डोक्यांतील मडपणा माझ्या मेंदूंत शिरेल; कारण तुम्ही पडलांत या पशुस्वरूप जनतेचे गुराखी! अशी त्यांची

क्रूर थट्टा करून तो, पलीकडून व्हॉल्युमिना, व्हर्जिलिया आणि व्हलेरिया येत असतात त्यांना सामोरा जातो.

व्हॉल्युमिनाचीं मुलाबद्दलचीं मनोराज्यें —

व्हॉल्युमिनाकडून त्याला कोरिओलेनसच्या विजयाबद्दल आणि तो आजच परत येत असल्याबद्दल आनंददायक वर्तमान कळतें. याही प्रसंगांत आपल्या मुलाबद्दलचा व्हॉल्युमिनाचा ओसंडून चाललेला अभिमान आपल्या निदर्शनास येतो. त्याच्या जखमा त्याला कॉन्सलपदासाठी,–कारभारीपदासाठी–जेव्हा तो निवडणुकीला उभा राहील तेव्हा लोकांना दाखविण्यासाठी उपयोगी पडतील हीं पुढच्या घटनेचीं मनोराज्यें ती महत्त्वाकांक्षी बाई साऱ्यांच्या आधी करीत असते.

एवढ्यांत शिंगें वगैरे वाजतात आणि रणक्षेत्रावरून कोरिओलेनस परत येतो. तेथेंही या आईचें हृदय अभिमानाने किती फुलून गेलेलें आहे हें पुन्हा एकदा दिसतें. त्याची पत्नी मात्र या सगळ्या गडबडींत शांत आहे. त्याबद्दल कोरिओलेनस तिला थोडेंसें विनोदी पण कठोर असें बोलतोही. परंतु कोरिओलेनसच्या विजयाबद्दलचा खरा-खरा अभिमान फक्त त्याच्या आईलाच झाला आहे. आपण जें जें मनांत ठेवलें होतें तें तें सर्व घडत आहे हें पाहून तिला मोठा संतोष वाटत होता. आतां फक्त तिच्या इच्छेनुसार एकच गोष्ट व्हायची राहिली होती. ती म्हणजे रोमच्या कारभारीपदावर त्याची स्थापना होणें. खुद्द कोरिओलेनसला मात्र अजून तरी या महत्त्वाकांक्षेचा स्पर्श झालेला नव्हता. तो सहज नम्रपणाने – आईपुढे तो नेहमीच नम्र आहे – म्हणतो, "नाही; मी ज्या पद्धतीने सध्या रोमची सेवा करतों आहें तेवढीच मला पुरे. लोकांच्यावर अधिकारी होण्यापेक्षा त्यांचा सेवक होणेंच मला जास्त बरें वाटेल."

दारुण घटनांचें बीज —

हा त्याचा विचार टिकला नाही; यांतच पुढच्या सगळ्या दारुण घटनांचें बीज आहे. जात्या तो शूर शिपाई होता आणि तसेंच त्याने राहावयास हवें होतें. मग लोक कुरकुरले असते तरी त्यांच्या क्षोभाच्या तावडींत तो सांपडला नसता. परंतु लहानपणापासून त्याला महान करण्यासाठी धडपडत असलेल्या आईची ही महत्त्वाकांक्षी इच्छा फलद्रूप व्हायची होती आणि यांतच त्याचा अधःपात व्हायचा होता.

त्याचें जें हें स्तोम माजविलें जात होतें तें लोकप्रतिनिधी आणि दंडाधिकारी ब्रूटस आणि सिसिनिअस यांना अर्थातच मानवलें नाही. बाजूला राहून त्यांनी सर्व कांही ऐकलें होतें; व त्यावरून त्यांचा सरळच तर्क झाला की, आता लगेच व्हावयाच्या राज्यमंडळाच्या सभेंत, कॉन्सल – कारभारी – म्हणून कोरिओलेनसच्या निवडीचा प्रश्न निघणार आणि तो कारभारी होणार. तो कारभारी झाला की, लोकप्रतिनिधी आणि दंडाधिकारी म्हणून आपला अधिकार संपुष्टांत येणार याचेंही त्यांना स्वप्न पडतें. पण सिसिनिअसने

केलेला तर्क त्याहून अधिक चतुराईचा आणि भविष्यसूचक आहे. तो म्हणतो,

"आलेला श्रेष्ठपणा नेमस्तपणाने उपभोगणें हें त्याच्या स्वभावांतच नाही. कोठे सुरुवात करावी आणि कोठें थांबावें हें समजण्याचें शहाणपणच त्याच्या ठिकाणीं नाही. त्यामुळे, मिळालेला श्रेष्ठपणा टिकविण्याऐवजी घालवीलच तो."

या विचारांतच त्या दोघांना समाधान आहे. कारण विजयाचें वैभव कोरिओलेनसने मिळविलें तरी आतापर्यंत लोकांना त्याने ज्या तिरस्काराने वागविलें होतें त्याची बोच लोक विसरणार नाहीत अशी त्यांची श्रद्धा आहे. कारभारी म्हणून निवड कायम होण्यापूर्वी उमेदवाराने लोकांपुढे जाऊन त्यांच्या होकाराची याचना करावयाची अशी पूर्वापार रीत होती. परंतु ही रीत आपण पाळणार नाही, लोकांपुढे जाऊन आपण वाकणार नाही असें तो मोठ्या दिमाखाने म्हणत असल्याबद्दलचें त्यांच्या ऐकिवांत होतें. याच गोष्टीचा फायदा घ्यावयाचा आणि कोरिओलेनसच्या हातीं कारभारीपद पडूं द्यावयाचें नाही असा त्या दोघांचा कट पक्का होतो. ओझ्याच्या गाढवापेक्षा जनतेची त्याला अधिक किंमत नाही; आणि त्याच्या कारभारीपणांत ओझ्याखालीं दडपून मरायचें आणि वर त्याचे रट्टे खायचे याहून लोकांच्या कपाळीं अन्य कांही येणार नाही ही गोष्ट लोकांच्या मनावर बिंबवून लोकांना भडकवतां येईल असा त्यांना स्वाभाविक भरवसा असतो.

एवढ्यांतच त्यांना सेनेटच्या सभेचें बोलावणें येतें. कारण, कोरिओलेनसची कारभारी म्हणून निवड करण्याचें ठरलेलें असतें.

लोकांच्या द्वेषाची फिकीर नाही —

सभास्थानाची तयारी करणाऱ्या दोन सेवकांच्या संभाषणाने दुसऱ्या प्रवेशाची सुरुवात होते. कोरिओलेनस लोकांची खुशामत करूं शकत नाही; लोक आपल्यावर प्रेम करतात कीं आपला द्वेष करतात याची तो फिकीर करीत नाही. यामध्ये लोकांच्या स्वभावाची पारख त्याची रास्त आहे हें खरें आहे; आणि हें सगळें उघड उघड लोकांना दिसलें तरी त्याला त्याची फिकीर नाही; असा एका सेवकाचा अभिप्राय. त्यावर दुसऱ्याचें म्हणणें की, लोकांवर प्रेम असो की नसो, पण त्यांचा द्वेषच जागृत होईल असें मुद्दाम होउन वागण्यांत शहाणपण नाही.

सेनेटची सभा सुरू होते. युद्ध संपून रोमच्या दृष्टीने हितकारक असा तह झाल्याबद्दल सर्वांनाच आनंद झाला आहे. पण तो व्यक्त करतांना लोकप्रतिनिधी ब्रूटस याने आपल्या मनांतली बोच व्यक्त केलीच. "आजपर्यंत सामान्य जनतेशीं कोरिओलेनस वागला त्यापेक्षा जास्त कृपाळूपणाने तो वागला तर आम्हांला अधिक आनंद होईल" असें तो म्हणाला. ही गोष्ट या प्रसंगीं निघावी हें मेनेनिअसला सोईचें वाटत नाहीं. कोरिओलेनसला हें सहन न होऊन तो तेथून निघून जाऊं लागतो. त्यामध्ये स्वतःचें स्तुतिस्तोत्र ऐकत बसण्याचा प्रसंगही त्याला टाळावयाचा असतो. परंतु "माझ्या बोलण्याने तुम्हांला कसेंसेंच वाटलें काय?" असें ब्रूटस त्याला टोचल्यावांचून राहत

नाही. यावर कोरिओलेनस स्तब्ध राहिला तर तो कोरिओलेनस कसला? "तुम्हां लोकांची मला कवडीइतकी किंमत नाही" असें तो ताडकन ठणकावतो आणि तिरस्काराने तेथून निघून जातो.

पुढे कॉमिनिअस सभेला कोरिओलेनसच्या शौर्याची कहाणी सांगतो. हीच कहाणी रणांगणावर याआधी सांगितलेलीच असते. हा प्रवेश पाहत असतांना पुन्हा एकदा मॅकबेथ नाटकाची आठवण होते. पण तेथे शेक्स्पीअरने एकाच प्रवेशांत हें गुणगान संपविलें आहे. या नाटकांत मात्र पुन्हा एकदा या प्रवेशांत तेंच तें गुणगान करविलें आहे. आणि शिवाय आधी लढाईतील प्रत्यक्ष चकमकींचे प्रसंगही आपल्यापुढे दाखविले आहेत. तंत्रामधील हा फरक लक्षांत घेण्यासारखा आहे.

नंतर कोरिओलेनस सभेंत परत येतो तेव्हा त्याला कारभारी नियुक्त करण्याचें ठरलें असल्याबद्दल त्याला सांगण्यांत येतें. आता त्याने लोकांकडे जाऊन त्यांचा होकार रीतीप्रमाणे मागणें एवढेंच शिल्लक राहिलेलें असतें.

अहंकार आणि संकोचही —

परंतु होकार मागण्याच्या त्या सर्व नाटकामधून – म्हणजे लोकांपुढे नुसता पोकळ झगा घालून जायचें, अंग उघडें करून त्यांना शरीरावरील जखमा दाखवावयाच्या, आपल्या कामगिरीचें आपल्याच तोंडाने वर्णन करावयाचें आणि लोकांच्या होकाराची याचना करावयाची या परंपरागत पद्धतींतून – आपल्याला सुटका मिळावी अशी मागणी कोरिओलेनस करतो. यांत त्याच्या अहंभावनेचा जसा आविष्कार आहे तसाच त्याच्या संकोची स्वभावाचाही आहे. परंतु ब्रूटस आणि सिसिनियस यांची मदार कोरिओलेनसच्या या अनिच्छेंतूनच स्वतःचा हेतु साधण्यावर असते. आणि म्हणून परंपरागत रीत पाळलीच गेली पाहिजे, असा ते अर्थातच आग्रह धरतात. हा आग्रह मानावा असें कोरिओलेनसला पटविण्याचा प्रयत्न मेनेनिअस करतो. त्या वेळीं कोरिओलेनस पुन्हा एकदा लोकांबद्दलची अत्यंत हीनपणाची भावना कडक शब्दांत व्यक्त करतो. त्यावरून कारभारी झाल्यावर तो लोकांशीं कशा रीतीने वागणार याची यथायोग्य कल्पना देऊन लोकांना भडकविण्याच्या कामाला ब्रूटस आणि सिसिनिअस हे दोघे, सेनेटची सभा संपतांच प्रवृत्त होतात.

अखेर मेनेनिअसच्या अत्याग्रहाला बळी पडून कोरिओलेनस लोकांच्या होकाराच्या याचनेसाठी त्यांच्यापुढे येतो. जमलेल्या लोकांमध्ये एक गट हा होकार त्याला देऊं नये असें म्हणणारा असतो. परंतु बहुमत या गटाच्या विरूद्ध असतें. रीतीप्रमाणे कोरिओलेनसने नम्रतानिदर्शक झगा घातलेला असतो. सगळ्यांनी एकदम त्याच्यापुढे जायचें नाही; एकाएकानें, किंवा दोघादोघांचे गट करून जायचें, असें ठरून लोक पांगतात.

लोकांच्यापुढे काय म्हणावयाचें याची दीक्षा कोरिओलेनस घेतो. 'लोकहो,

माझी तुम्हांला प्रार्थना आहे,' 'ह्या माझ्या जखमा पाहा,' हे शब्द उच्चारण्याचें त्याच्या किती जिवावर येतें. या लोकांना धड तोंड धुऊन दांत स्वच्छ कसे ठेवायचे हें सुद्धा माहीत नाही आणि अशांच्यापुढे याचना करायची हें त्याला केवढें अपमानास्पद वाटतें.

लोकांची अपेक्षा प्रेमळपणाची—

मेनेसिसिअस त्याला तेथे एकटा सोडून गेल्यावर पहिला लोकांचा गट कोरिओलेनसच्यापुढे येतो तेव्हा या त्रस्त मनःस्थितींतच तो असतो. म्हणून आपण तेथे आलों तें स्वेच्छेने नव्हे, तर आपली या पदाला पात्रता आहे असें पाहून आलों असें उद्धट उत्तर तो लोकांच्या प्रश्नाला देतो. एक नागरिक जेव्हा म्हणतो की, "आम्ही तुम्हांला होकार दिला तर तुम्हीं आमचा कांही फायदा करून दिला पाहिजे," त्यावर "काय किंमत आहे तुमची ही कारभारीपदाची जागा देण्याबद्दल!" असें उलट गुर्मीचेंच उत्तर त्याचें येतें. त्यावर त्या नागरिकाने दिलेलें छोटें उत्तर लोकांच्या भावनेचें, न्यायाचें आणि त्याच्या कोरिओलेनसपासूनच्या अपेक्षेचें केवढें तरी निदर्शक आहे. तो म्हणतो "किंमत हीच की, होकाराची मागणी जरा प्रेमळपणाने केली जावी." लोकांना हवा असलेला हा प्रेमळपणा नेमका कोरिओलेनसच्या अंगीं नव्हता. म्हणून तो शब्द त्याला चांगलाच झोंबतो. अखेर तो होकाराची याचना थोड्या मृदु शब्दांत करतो.

दुसऱ्या गटाच्या वेळींही असा थोडासा प्रकार होतोच. एक नागरिक जेव्हा थोडेंसें कोडें घातल्यासारखें बोलतो, तेव्हा कोरिओलेनस त्याला अर्थ विचारतो. त्यावर तो नागरिक म्हणतो, "देशाच्या शत्रूंचा तूं निःपात करतोस म्हणून देशाच्या दृष्टीने तूं धन्य आहेस. परंतु सामान्य माणसांविषयी तुझ्या मनांत प्रेम नाही म्हणून तुला धन्यवाद देतां येत नाहींत." यावरही कोरिओलेनसचें उत्तर वाकडेंच असतें. "हो, हो; करीन मी तसें ढोंग प्रेमाचें, कांहीजण करतात तसें" असें उपहासपूर्वक बोलूनच त्या गटाकडे तो होकाराची याचना करतो.

अधिकारीपदाबद्दल क्षणभर उबग —

या सर्व प्रकाराचा कोरिओलेनसला जणूं उबग येतो. या रूढीबद्दल तो तीव्र नापसंती व्यक्त करतो. या रूढीमुळे सत्तेवर गंज चढतो ही त्याची टीका खरोखरच रास्त आहे. ज्यांना ही रूढी पाळायची त्यांनी या अधिकारीपदाच्या मागे लागावें, आपल्याला तें पद नकोच, असाही विचार त्याच्या मनांत येतो. परंतु अर्धाअधिक कार्यक्रम पुरा झालेला असल्याने तो शेवटपर्यंत पुरा करायला तो तयार होतो.

शेवटीं एकदा तेथलें तें कार्य संपतें. त्याने तो नम्रतादर्शक पोशाख आता उतरावा याला दोघे दंडाधिकारी संमति देतात. आता फक्त राज्यमंडळाच्या सभेंत जायचें आणि तेथे सर्व लोक एकत्र होतील तेव्हा त्या सर्वांची एकाच वेळीं एकदा संमति घ्यायची,

म्हणजे सगळें तंत्र संपायचें होतें. आणि कपडे बदलून तिकडे जाण्यासाठी म्हणून कोरिओलेनस मेनेनिअसबरोबर निघून जातो.

झाला हा प्रकार ब्रूटस आाणि सिसिनिअस यांच्या अपेक्षेहून अगदीच वेगळा झालेला असतो. कोरिओलेनस या प्रार्थनातंत्राचा स्वीकार करणार नाही असें त्यांना वाटत होतें. त्या तंत्रांतून जायला तो तयार झालाच तर त्याला चिडवावें आणि त्यामुळे लोकांशीं त्याचें वर्तन उद्धटपणाचें होऊन लोकांनी त्याला होकार देऊं नये अशी त्यांनी जी रचना केली होती, ती तरी फळाला येईल असें त्यांना वाटत होतें. पण यापैकी कांहीच झालें नाही. कोरिओलेनस थोडासा उद्धटपणाने वागला तरीही लोकांनी त्याच्या अंगभूत मोठेपणापुढे नमून होकार दिलाच. याबद्दल ब्रूटस आणि सिसिनिअस यांनी लोकांना खूप दोष दिला. होकाराची याचना करतांना कोरिओलेनसने लोकांचा उपहास केला हें कांहीं लोकांनी मान्य केलें; तर त्याचा तसा हेतु नव्हता, त्याची बोलण्याची रीतच तशी असें कांहीचें म्हणणें पडलें.

ब्रूटस–सिसिनिअस लोकांना भडकावतात—

लोकांनी त्यांना शिकविल्याप्रमाणे कोरिओलेनसला काय म्हणायला हवें होतें याचा ब्रूटसने पुनरुच्चार केला. त्याने आपला उद्दामपणा सोडून लोकांबद्दल मनांत प्रेम धारण करावें अशी शर्त लोकांनी त्याला घालायला हवी होती. तसें झालें असतें म्हणजे तो चिडला असता, अशी सिसिनिअसने पुस्ती जोडली. आणि तुम्ही लोक हे असेच; कुणी होकार मागायला आला आणि तुम्ही त्याला नकार देण्याचें धाडस केलें आहे असें कधी तरी घडलें आहे काय? असा लोकांचा त्याने उपहास केला. त्यावर 'पण अजून या होकारावर शेवटचें शिक्कामोर्तब व्हायचें आहे, अजून आम्ही नकार देऊं" असा आवाज लोकांच्याकडून येतो. त्याचा फायदा घेऊन ब्रूटस आणि सिसिनिअस लोकांना पुन्हा भडकवतात. आणि राज्यमंडळाच्या बैठकींत जाऊन "आमची चूक झाली, आमच्या प्रतिनिधींनी, दंडाधिकाऱ्यांनी आमची दिशाभूल केली असें म्हणा; सगळा दोष आमच्यावर लादा आणि आपला होकार परत घ्या. आमच्यावर दोष लादतांना वाटेल तें बोला. आम्हींच कोरिओलेनसची किती आणि काय काय स्तुति केली व त्यामुळे तुमच्या मनावर कसा परिणाम झाला हें अगदी भडकपणाने सांगा. परंतु आता पूर्ण विचार करतां दंडाधिकाऱ्यांचें हें सांगणें व्यर्थ आहे आणि कोरिओलेनस हा जनतेचा शत्रू आहे अशी आमची खात्री पटली आहे, अशी घोषणा करा," अशी चिथावणी लोकांना देऊन आणि सगळ्या लोकांना जमवून राज्यमंडळाकडे घेऊन येण्याला सांगून त्या दोघांनी लोकांना तेथून जायला सांगितलें. आपण जरी हा कट रचला असला तरी लोकांनी वरच्याप्रमाणे सांगितल्यावर हें कृत्य सारें लोकांचेंच आहे असें भासेल व आपण त्यांतून नामानिराळे राहूं या समाधानाने ते दोघे दंडाधिकारी राज्यमंडळगृहाकडे जायला निघतात.

दोषाचा वाटा कोरिओलेनसकडेच अधिक—

यामध्ये सामान्य जनतेचा अत्यंत चंचलपणा आणि लोकांना भडकवून आपले हेतु साध्य करून घेण्याचा लोकांच्या पुढाऱ्यांचा कावेबाजपणा दिसून येतों हें तर खरेंच. परंतु पुढे तिसऱ्या अंकांत जो कांही प्रकार घडतो तो पाहिला म्हणजे लोकांच्यापेक्षा दोषाचा वाटा फार मोठ्या प्रमाणांत कोरिओलेनसकडे जातो असें वाटल्यावांचून राहवत नाही.

कारण, त्या अंकाच्या सुरुवातीसच सेनेटर लोकांमध्ये एकंदर परिस्थितीवर बोलणें चालू असतांना व्होल्स लोकांचा पुढारी ऑफिडियस पराभवानंतर स्वस्थ बसला नसून पुन्हा उठावणी करण्याचा त्याचा प्रयत्न चालू आहे याची वाच्यता होते. विशेष म्हणजे कोरिओलेनसचा दुय्यम सेनापति लार्शिअस वार्ता सादर करतो की, ऑफिडियस हा कोरिओलेनसवर खासें संतप्त असून कोणत्याही मार्गाने कोरिओलेनसचा निःपात करण्यासाठी आपलें सर्वस्व पणाला लावण्याचा त्याने निश्चय केला आहे.

अशी ही संकटाची चाहूल असूनसुद्धा कोरिओलेनसला सामान्य लोकांशीं जुळवून घेऊन वागण्याची आवश्यकता उमगत नाही. आणि लोकप्रतिनिधी ब्रूटस व सिसिनिअस सभागृहाकडे जाण्यासाठी त्याच रस्त्यावर येतांच "हे आले पाहा लोकांचे प्रतिनिधी; लोकांच्या विचारांचें मुख. यांचा हा अधिकाराचा आव आम्हां वरिष्ठवर्गीय लोकांना इतका असह्य झाला आहे की मी यांचा तिरस्कार करतों" अशी कोरिओलेनस त्या दोघांची उद्धटपणें संभावना करतो. हा प्रकार ही सर्व मंडळी सभागृहाकडे जात असतांना होतो. परंतु कोरिओलेनसच्या या उद्दाम वर्तनाचा फायदा घेऊन सिसिनिअस म्हणतो, "बस्स, यापुढे एकही पाऊल टाकूं नका?" "पुढें जाल तर धोका आहे" असें ब्रूटस बजावतो. सरदार लोक आणि सामान्य जनता यांची संमति मिळाली असतांना या प्रतिबंधाचा अर्थ काय हा प्रश्न कॉमिनिअस करतो. त्यावर लोक कोरिओलेनसवर चिडले असून ते आपली मान्यता परत घेत आहेत. तेव्हा त्यांच्यापुढे आधी बाजारच्या चौकांत गेलें पाहिजे, असें जेव्हा ते दोघे सांगतात, तेव्हा कोरिओलेनस भडकून लोकांच्या चंचलपणाबद्दल अद्वातद्वा बोलूं लागतो. त्याला शांत राहण्याचा इशारा मेनेनिअस देतो. परंतु त्याचा उपयोग होत नाही. "या, या लोकांचा हा सारा कट आहे; आम्हां सरदार लोकांच्या सत्तेला वेसण घालण्याचा हा सारा कट आहे" असा तो कठोर आरोप करतो. त्यावर ब्रूटस म्हणतो की, हा कट नसून कोरिओलेनस लोकांना किती कःपदार्थ मानतो तें उमजल्यामुळे लोक पालटले आहेत. त्यावरही "मग माझें हें मत लोकांना काय आज प्रथमच समजलेलें नाही" असें कोरिओलेनस अव्यवहारीपणाने उद्गारतो. "पण सर्व लोकांना हें माहीत नव्हतें. तथापि पुन्हा, पुन्हा हें तुमचें मत लोकांना ऐकवून तुम्हीच त्यांचीं मतें बिथरवतां. मोठ्या पदाचा मार्ग याहून जास्त विचारपूर्वक चोखाळायला पाहिजे; जास्त नम्रतापूर्वक वागायला पाहिजे."

असा मानभावी उपदेश सिसिनिअस करतो. मेनेनिअसला दिसत असतें की, कोरिओलेनसच्या रागाचा पारा यामुळे चढला आहे. आपण सारे शांत राहूं या, असें तो आपल्याकडून सुचवितो. पण व्यर्थ. दुसरे सेनेटरही कोरिओलेनसला शांत राहण्याचा सल्ला देतात. पण तो कोणाचेंही ऐकत नाही. लोकांच्या चंचलपणाबद्दल, घाणेरड्या सवयीबद्दल तो पुन्हा धिक्कार व्यक्त करतो. हेंच माझें मत आहे आणि तेंच मी पुन्हा पुन्हा सांगणार, असें म्हणतो. लोकांपुढे जाऊन मी नम्रतेने बोलणार नाही किंवा मी त्यांची क्षमा मागणार नाही. असा नम्र भाव धारण करण्याने व लोकांना आमच्यामध्ये मिसळून देण्याने आम्ही बंड, उन्मत्तपणा आणि राजद्रोह यांचीं बीजें मात्र लावलीं आहेत; वगैरे लोकविरोधी उद्गार तो काढूं लागतो. सेनेटर त्याला थांबविण्याचा यत्न करतात. पण तो ऐकत नाही. उलट "बाहेरच्या शत्रूंची एवढीही कदर न करतां देशासाठी मीं माझें रक्त सांडलें आहे. त्याच निर्भयपणाने या जनतारूपी घाणेरड्या चर्मरोगावर सारखा प्रहार करणारे शब्द मी शोधून काढीन" असें आणखीच प्रक्षोभक विधान तो करतो.

या त्याच्या भूमिकेचें ब्रूटसने खरोखरच मोठें यथार्थ वर्णन केलें. "तुमची ही सगळी भाषा अशी आहे की, लोकांना शिक्षा करण्यासाठी कुणीतरी देव जणू तुम्ही खाली उतरला आहांत; या गरीब दुबळ्या लोकांच्यापैकी कांही तुम्ही कोणी नाही." "हें त्याचें वर्णन लोकांच्या नीट लक्षांत आणून द्यायला पाहिजे" असें यावर सिसिनिअस म्हणतो, तेव्हा मेनेनिअसची गाळण उडते. कारण याने लोक अधिकच भडकणार. म्हणून "छे! छे! हें सगळें याचें रागांतलें बोलणें आहे, तें काय मनावर घ्यायचें" अशी सारवासारव तो करूं पाहतो. परंतु तेंही कोरिओलेनस साधूं देत नाही. "राग बीग कांही नाही. अगदी मध्यरात्रीच्या शांत झोपेंत असतांनासुद्धा माझें लोकांविषयीचें हेंच मत कायम राहील" असें तो मोठ्या आढ्यतेने म्हणतो.

त्यावर सिसिनिअस म्हणतो, "तर मग तें मत आहे तेथेच राहावें. तेथेच त्या विषाचा काय परिणाम व्हायचा असेल तो होऊं दे. त्या विषाचा प्रसार आणखी पुढे होतां कामा नये."

कोरिओलेनसचा तोल सुटतो —

सिसिनिअसच्या या अधिकारयुक्त निषेधाने मोठी थोरली आग पेटते. "हें विष पसरतां कामा नये" यांतील कामा नये या आदेशवाचक शब्दांनी कोरिओलेनसचा तोल सुटतो. या दरिद्री लोकांना सत्तेंत भाग दिल्यामुळे समाजांतील श्रेष्ठवर्गाच्या लोकांना हा अपमान सहन करावा लागतो, असें म्हणून सेनेटच्या लोकांना जनतेशीं मूर्खपणाने वागल्याबद्दल तो कठोर वाक्ताडन करतो. सत्तेचा लाभ होऊन हे लोक असले मॅजिस्ट्रेट–दंडाधिकारी-नेमतात आणि मग ते हें असें आमच्यासारख्या श्रेष्ठांना हुकूम करण्याचें धाडस करूं लागतात. यांना तुम्ही सेनेटर होऊं देतां, म्हणजे तुम्हीच आपलें उंच स्थान सोडून

गटारांत लोळल्यासारखें होतें, असेंही म्हणायला तो कमी करीत नाही. "राज्यामध्ये अशा रीतीने सत्ता दोन वर्गांमध्ये विभागली की, दोघांच्यामध्ये जो भेद स्वभावतःच आहे त्यापायी कारभारांत सगळा गोंधळ माजणार आणि एकमेक एकमेकांवर कुरघोडी करूं लागणारच. यामुळे माझ्या अंतःकरणाला तीव्र वेदना होतात; आणि काय किंमत आहे या कारभारीपदाची तरी, असें वाटतें." अशा रीतीने तो मोठी कडवट भाषा वापरूं लागतो.

यापासून त्याला परावृत करण्याचा कॉमिनिअसचाही नाजूक यत्न सिद्धीस जात नाही. "राज्याच्या कोठारांतून या लोकांना फुकट धान्य दिल्याची घोडचूक केल्यामुळेच या थराला गोष्टी आल्या; या लोकांच्या हातीं थोडी जरी सत्ता दिली की, यांच्यामध्ये बंड-खोरी निर्माण व्हायचीच आणि त्यांतून राज्याचा नाश व्हायचा!" असें उलट कोरिओलेनस म्हणतो. लोकांबद्दल असें बोलणाराला लोकांनी तरी कारभारीपदासाठी होकार कां द्यावा, असा प्रश्न ब्रूटस उपस्थित करतो त्या वेळीं धान्य देण्यांत घोडचूकच कशी झाली हें दाखविण्यासाठी कोरिओलेनस कारणें देऊं लागतो. राज्यावर लढाईचें संकट आलें असतां या भ्याडांपैकी एकजण वेशीच्या बाहेर पडला नाही. अशा लोकांना फुकट धान्य देण्याइतकी त्यांची लायकीच नव्हती. बरें सेनेटने एवढा त्यांच्याबद्दल सद्भाव दाखविला तरी त्याची या मुर्दाडांना काडीची तरी किंमत आहे? त्याबद्दलचें श्रेयही तें स्वतःकडेच घेणार. कां, तर म्हणे आम्ही बहुमतांत आहोंत, आणि आमचें मागणें हें बहुमताचें मागणें होतें; यांत कोणाचे कसले उपकार! याचा व्हायचा तोच परिणाम होणार. सेनेटचे सगळें गंभीरपण आणि श्रेष्ठपण रसातळाला जाणार आणि कावळ्यांनी गरुडांना चोचा माराव्यात असें होणार.

अधिकाधिकच हटवादी—

मेनेनिअस जो जो त्याला असल्या बोलण्याच्या उद्रेकापासून परावृत्त करूं पाहतो तो तो कोरिओलेनस अधिकच हटवादीपणाने बोलूं लागतो. अखेर तो सुचवितो की, अडचणींत सापडल्यामुळे आपण लोकांना कांही अधिकार दिले खरे. पण चांगलें करण्याची तर यांना अक्कल नाहीच. तेव्हा ते दुसरें काय करणार? नुसती घाणच माजवणार!

आता त्याचें भाषण अशा थराला आलेलें असतें की, मतदार बहुसंख्येच्या अधिकाराचा अवमान त्याच्याकडून होऊं लागतो. ब्रूटस यावर याची बडबड ऐकणें पुरें एवढेंच म्हणून थांबतो. परंतु सिसिनिअस अधिक भेदक शेरा मारतो; त्यांत त्याच्या दंडाधिकारित्वाचा उग्र दर्प असतो. कोरिओलेनसवर तो लोकद्रोहाचा – जनताद्रोहाचा आरोपच करतो, आणि या लोकद्रोहाबद्दल त्याला जबाब द्यावा लागेल असेंही बजावतो.

एवढ्यानेही कोरिओलेनस उमजत नाही, "या लोकांनी बंड केलें होतें. राज्य अडचणींत होतें. म्हणून तेव्हा योग्य काय हें पाहण्याऐवजी प्रसंगाला आवश्यक काय म्हणून एखादी गोष्ट केली; म्हणून आतां ती तशीच चालू ठेवण्याचें कारण नाही.

आता काळ सुधारला आहे; तेव्हा जें योग्य आहे तेंच आपण करावें. त्या अडचणीच्या वेळीं यांना अधिकारावर निवडलें असलें तरी आता त्यांचा अधिकार धुळींत फेकून द्यावा," असें सुचविण्यापर्यंत त्याची मजल जाते. आणि कायद्याप्रमाणे तो दंडाधिकाऱ्यांच्या कचाट्यांत सापडतो. त्याला पकडण्यासाठी म्हणून बोलावलेल्या चोपदाराला लोकांना जमा करण्यासाठी पाठवून देऊन सिसिनिअस त्याला " एक राज्यद्रोही, धडाचा बिघड करणारा आणि लोकहिताचा शत्रू म्हणून मी माझ्याच अधिकारांत तुला येथे अटक करतों" असें सांगतो व माझा हुकूम मानून बाजारचौकांत चल, असा त्याला हुकूम करतो.

लोकहितशत्रु असूनही लोकांची सहानुभूति--

अर्थातच कोरिओलेनसला हें सहन होणें शक्यच नव्हतें. तो शिवीगाळ तर करतोच; परंतु सिसिनिअसच्या अंगावर धावून जातो. धावा, धावा म्हणून सिसिनिअसने पुकार करतांच चोपदार, इतर शिपाई व लोकांचा जमाव तेथे येतो. त्यांची व कोरिओलेनसची चांगलीच जुंपणार अशी भीति उत्पन्न होते. मेनेनिअसच्या मनाचा थरकांप होऊन जातो. यांतून आता मोठें अरिष्ट उत्पन्न होणार, अशी भविष्यसूचक भीति त्याला पडते. म्हणून तो सगळ्यांना शांत करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी सिसिनिअसला दादाबाबा करून तो लोकांना शांत करायला सांगतो. परंतु हा तुमचा नवा निवडलेला कारभारी तुमचें स्वातंत्र्य नष्ट करायला निघालेला आहे, असें बोलून सिसिनिअस लोकांना उलट भडकवण्याचाच प्रयत्न करतो. " या प्रयत्नाने शहर जमीनदोस्त होईल" या सेनेटरांच्या धोक्याच्या सूचनेची तो " शहर म्हणजे शहरांतली जनताच ना ?" अशी हेटाळणी करतो. कॉमिनिअसच्या इशाऱ्यांचाही सिसिनिअसवर कांही परिणाम होत नाही. या लोकद्रोहाच्या गुन्ह्याला देहांताशिवाय शासन नाही, असें उलट तो जाहीर करतो. 'आमचा अधिकार एक राहील तरी किंवा जाईल तरी, या निर्धाराने ब्रूटसही त्याला पाठिंबा देतो; दोघेही कोरिओलेनसला पकडण्याचा हुकूम देतात. कोरिओलेनस प्रतिकार करण्याच्या पवित्र्यांत असलेला पाहून लोक त्याला हा हट्ट सोडण्याची विनंति करतात; लहानसाच उद्गार आहे तो लोकांचा; परंतु त्यांतूनही लोकांना कोरिओलेनसबद्दल सहानुभूतीच होती व त्याच्यावर हा दुर्धर प्रसंग येऊं नये असें त्यांनाही वाटत होतें हें केवढें सुंदर दिसून येतें.

मेनेनिअस लोकांच्या प्रतिनिधींना विनंति करतो की, त्यांनी या प्रकरणांत सबुरीने आणि शांतपणाने निर्णय करावा. परंतु, तीव्र विकारावर उपायही तीव्रच करावा लागतो, असें म्हणून ब्रूटस ती विनंति धुडकावून लावतो. आणि कोरिओलेनसला पकडून टार्पीझच्या कडयावर कडेलोटासाठी नेण्याचा हुकूम पुन्हा देतो.

कोरिओलेनसचा अधःपात निश्चित होतो —

या क्षणीं या नाटकांतील अत्यंत आणीबाणीचा प्रसंग घडतो आणि कोरिओलेनसचें

भविष्य – अधःपात – निश्चित होतें. तो एकदम तरवार उपसतो आणि मी लढून मरेन पण स्वाधीन होणार नाही, असा निर्धार व्यक्त करतो आणि लोकांवर हल्ला करतो. दंगा माजतो. मेनेनिअसचे प्रयत्न व्यर्थ होतात. पण लोक निःशस्त्र असल्याने त्यांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना कोरिओलेनस पिटाळून लावतो.

एवढें झाल्यावर तरी मेनेनिअसचा सल्ला मानून त्याने घरीं जावें! परंतु जसे कांही लोक विरुद्ध आहेत तसे कांही आपल्याला अनुकूलही आहेत; तेव्हा लढावें असा पवित्राच कोरिओलेनस घेतो. याद्वीच्या कल्पनेने सर्वचजण भयभीत होतात. पोटांत कितीही राग आला असला तरी तो जिभेवाटें बाहेर काढण्याची ही वेळ नव्हती. कॉमिनिअसने म्हटल्याप्रमाणे प्रतिपक्षाचें सामर्थ्य गणना करण्याच्या पलीकडे इतकें फार मोठें होतें. कोसळत्या कड्याच्याविरुद्ध झगडण्याला उभे राहणें याला शौर्य म्हणतां आलें नसतें. म्हणून अखेर मोठ्या प्रयत्नाने सर्वजण कोरिओलेनसला त्याच्या घरीं घेऊन जातात.

लोक पुन्हा जमाव करून परत येणार याची मेनेनिअसला कल्पना असते. म्हणून तो आणि एक सरदार मागे राहिलेले असतात. त्या वेळीं त्या दोघांचें जें थोडेंसेंच संभाषण आहे तें मोठें उद्‌बोधक आहे. आपला सगळा उज्वल भविष्यकाळ याने मातींत मिळविला आहे असें जेव्हा तो सरदार म्हणतो त्या वेळी मेनेनिअससने कोरिओलेनसच्या स्वभावाचें केवढ्या तरी आपुलकीन विश्लेषण करून सांगितलें की, "हा माणूस जें अंतःकरणांत तेंच जिभेवर ठेवणारा निर्भय माणूस आहे; मग त्यामध्ये मरणाचीही तो पर्वा बाळगणार नाही."

मेनेनिअसची चतुर मध्यस्थी —

हें सगळें खरें असलें तरी आलेलें अरिष्ट कांही या असल्या बेडर वृत्तीने टळणार नव्हतें. म्हणून लोक फिरून आवेशाने परत आल्यावर मेनेनिअस त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करतो. ज्युलिअस सीझर नाटकांतील तो ॲन्टनीने लोकांना ब्रूटसच्या विरुद्ध केल्याचा जो प्रसिद्ध प्रसंग आहे त्याचीच येथे थोडीशी आवृत्ति होते. निरनिराळ्या रीतीने बोलून मेनेनिअस लोकांना थोडें तरी वळवूं शकतो. कोरिओलेनस शिपाईगडी आहे, त्याला व्यवहारांतले डावपेच समजत नाहींत, असें म्हणून लोकप्रतिनिधींनी त्याच्याकडे निराळ्या आणि जिव्हाळ्याच्या बुद्धीने पाहावें असें तो सुचवितो. याचा अखेर परिणाम होतो आणि शस्त्रें खाली ठेवण्याचा निर्णय करून लोक बाजारचौकांत जाऊन तेथे कोरिओलेनसची वाट पाहण्याचें कबूल करतात. अट ही की, मेनेनिअसने त्याला तेथें घेऊन यावें; त्या ठिकाणीं त्याचा सर्वांच्या समक्ष कायद्याप्रमाणे निवाडा व्हावा. लोक कितीही बेफाट झाले असले आणि त्यांचे पुढारी कितीही मत्सरग्रस्त असले तरी थोड्याशा शहाणपणाने त्यांना वागविलें तर त्यांनाही योग्य मार्गावर ठेवणें कसें शक्य होतें हें दाखविणारा हा प्रवेश आहे. कारण थोड्याच वेळांत

मेनेनिअसने सिसिनिअससारख्या मत्सरी आणि द्वेष्टया माणसाच्या तोंडून पुढील उद्गार काढविल्याचें आपण पाहतों,

" ठीक, ठीक. उदार मेनेनिअस, तर मग तूंच आता आमचा या कामीं अधिकारी. ठेवा रे शस्त्रें खाली. "

पण कोरिओलेनसला बाजारचौकांत लोकांसन्मुख घेऊन जाणें ही काय सोपी गोष्ट होती ! त्याच्या बरोबरीच्या सरदारांची ती सूचना मान्य करायला तो मुळीच तयार नव्हता. कारण, तसें करणें अनुचित आहे असें आपली आईसुद्धां म्हणेल अशी त्याच्या मनाची भावना होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणे तिनेच तर त्याला ही सामान्य जनता म्हणजे श्रेष्ठांनी खरेदीविक्री करावा असा बिनकिंमती माल, अशी शिकवण दिलेली होती. म्हणून आपल्या आईची इच्छा असल्या लोकांपुढे आपण नमून वागावें अशी असेल हें तो मान्य करीत नाही. एवढ्यांत व्हॉल्युमिनाच स्वतः येते आणि तिलाच तो खडसावून विचारतो की, " माझ्या स्वभावाला सोडून मीं वागावें असें तुझें म्हणणें आहे ? "

व्हॉल्युमिनाच्या बुद्धीची चमक —

या ठिकाणीं त्या तेजस्वी स्त्रीच्या बुद्धीची चमक दिसून येते. लोकांचें बळ जागृत होऊन एकत्र होण्यापूर्वी, त्यांनी तुला प्रतिरोध करण्याला समर्थ होण्यापूर्वी, तूं त्यांचा निःपात केला असतास तरच तुला मीं खरा शूर वीर म्हटलें असतें, असें म्हणून, आता लोकांचें सामर्थ्य जागृत झाल्यावर क्रोधाने नुसती आदळआपट करण्याच्या त्याच्या वृत्तीचें वैफल्य ती किती खोचदारपणें दाखविते.

लोकांचा संपूर्ण निःपात झाला तरी तिला फिकीर नसते. पण काळ ओळखून वागलें पाहिजे हें शहाणपण तिच्यापाशी होतें. म्हणूनच ती म्हणते,

" बाबा रे यांचें (मेनेनिअस वगैरेंचें) ऐक. माझेंही हृदय तुझ्यासारखेंच खणखणीत आहे. पण माझ्या हृदयांतील क्रोधाग्नीचा यथायोग्य रीतीने उपयोग करून घेऊन स्वतःचें अधिक हित करून घेण्याजोगी बुद्धि मजजवळ आहे. "

शेक्स्पीअरचें साध्य —

नाटकांतील या अत्यंत आणीबाणीच्या क्षणीं नायकाच्या आईच्या तोंडचे हे उद्गारच नायकाच्या स्वभावाचें कोणतें मर्म नाटकाराला नेमकें दाखवायचें आहे हें किती उत्कृष्टपणाने दाखवितात. या सगळ्या नाटकांत शेक्स्पीअरचें हें साध्य आहे. एक निधड्या छातीचा माणूस सारासारबुद्धीची जोड नसल्यामुळे कसा विपत्तींत सापडतो हें त्याला दाखवावयाचें आहे. या त्याच्या साध्याच्या दृष्टीनेच नाटकांतील साऱ्या प्रसंगांच्या जुळणीची संगति वाचकप्रेक्षकांनी लावली पाहिजे, असेंच जणू तो या ठिकाणीं सुचवीत आहे.

स्वतः कोरिओलेनसलाही या उणीवेची केव्हा केव्हा जाणीव होत असावी; विशेषतः

आपल्या अत्यंत बुद्धिमान आईच्यापुढे आल्यावर. त्याचमुळे त्याने, तर मग मीं काय करावें म्हणतेस, असा अगदी दीनवाणा प्रश्न तिला, या तिच्या भाषणानंतर विचारला आहे. मग व्हॉल्युमिना त्याला, मनांत नाही तें जनांत बाहेर दाखविणें हें कांही प्रसंगीं कसें आवश्यक आणि शहाणपणाचें असतें हें पटवून देते. लढाईतसुद्धा असें दुटप्पी वर्तन शत्रूला हुलकावणी दाखविण्यासाठी करावें लागतें, हें स्वतः कोरिओलेनसचें मत होतें. शांततेच्या काळांतही असेंच वागावें लागतें हें त्याच्या ध्यानांत आणून देण्याचा ती प्रयत्न करते. युद्धांतही जर प्रत्यक्ष शस्त्रास्त्रांचा उपयोग न करतां एखादें शहर गोड बोलून काबीज करणें हें शहाणपणाचें असतें, तर इतर व्यवहारांतही तें तसेंच योग्य मानावें. म्हणून लोकांपुढे जाऊन त्यांची क्षमा मागण्याचें नाटक त्याने करावें. ती स्वतः, त्याची पत्नी, सेनेटर लोक, त्याचा मुलगा, सर्वांचाच हा विचार आहे. असें म्हणून ती त्याला लोकांच्यासमोर जाऊन हें नाटक करायला सांगते.

शेक्सपीअरमधला नट या प्रवेशांत न कळत व्यक्त झाला आहे. कारण व्हॉल्युमिना मुद्दाम कोरिओलेनसला सांगते की, साधारण समाजापुढे नुसत्या वक्तृत्वापेक्षाही आंगिक अभिनयाला अधिक महत्त्व आहे. आणि शेवटी कोरिओलेनस मोठ्या अनिच्छेने तिच्या म्हणण्याला होकार देतो त्या वेळींही तो, "मला उभ्या जन्मांत जी भूमिका वठवितां येणें शक्य नाही ती वठवायला तूं मला सांगते आहेस" अशी रंगभूमीवरील प्रयोगाची आठवण देणारें वाक्य बोलत आहे. एवढेंच नव्हे, तर त्यावर स्वतः कॉमिनिअस म्हणतो आहे, "कांही हरकत नाही, आम्ही तुला मागून 'प्रॉम्ट' करूं. नेमका रंगभूमीच्या तंत्रांतला शब्द त्याच्याही तोंडीं शेक्सपीअरनें घातला आहे.

लढवय्या कोरिओलेनसही काव्यमय बोलतो—

पण हें थोडें विषयांतर झालें. अखेर आईच्या सांगण्याप्रमाणे वागण्याला होकार देतांना कोरिओलेनसच्या भावनांची खळबळ होऊन त्याने जें भाषण केलें आहे तें आपल्या दृष्टीने महत्त्वाचें आहे. कारण हा अगदी रांगडा लढवय्याही या ठिकाणीं काव्यमय भाषण करतांना आढळतो. इतकें काव्यमय कीं, स्वतःच काव्यप्रकृति असणारा हॅम्लेट किंवा मॅकबेथ किंवा गडकऱ्यांचा सुधाकर यांनाही कांहीसा उणेपणा यावा.

त्याचा अजूनही निश्चय होत नाही हें पाहून व्हॉल्युमिना शेवटचें कोपाचें अस्त्र काढते आणि त्याच्यावर कठोर प्रहार करून म्हणते, "तुझ्या अंगचें शौर्य तूं माझ्यापासून घेतलें आहेस; माझ्या दुधांतून तें तुला मिळालें आहे. पण हा तुझा अहंकार मात्र निव्वळ तुझी स्वतःची पैदास आहे!"

कोरिओलेनस नाटक हें एका डुक्करमुंसडी स्वभावाच्या अहंकारी माणसाचें नाटक आहे हें याच्यापेक्षा नाटककाराने आणखी किती स्पष्टपणाने सांगावें! आणि स्वाभाविकच मग सर्व नाटकभर त्याच्या या अहंकाराचें दर्शन घडविणें हेंच त्याचें साध्य होऊन बसावें हें ओघालाच आलें. बाकीच्या गोष्टी या केव्हांही दुय्यम होत.

शेवटीं मेनेनिअस व कॉमिनिअस वगैरेंच्याबरोबर कोरिओलेनस बाजारचौकांत येतो. सिसिनिअस व ब्रूटस तेथे त्याची वाट पाहतच असतात. तो आल्यावर त्याच्या अपराधांची यादी वाचून दाखविण्यासाठी त्यांनी तयारी ठेवलेली असते. लोकांनाही त्यांनी यथास्थित संधा दिलेली असते. ते दोघे जें म्हणतील त्याचीच घोषणा लोकांनी करावयाची आणि ओरडायचें, थांबायचें म्हणून नाही. त्यांनी जर म्हटलें की देहांत शिक्षा, तर तेंच लोकांनी ओरडत राह्यचें. कोरिओलेनसला कोणी विरोध केलेला सहन होत नाही; तेव्हा त्याच्याशीं वाद घातला की, तो चिडणार आणि पोटांतलें सर्व धडाक्याने ओकून टाकणार. या त्याच्या स्वभावाची उजळणी ब्रूटस पुन्हा एकदा करतो. अशी त्याच्या स्वागताची परिपूर्ण तयारी असतांना कोरिओलेनस वगैरे मंडळी तेथे प्रवेश करतात. रोमच्या रस्त्यांत यादवी युद्धाने रक्त वाहूं नये ही गोष्ट त्या वेळीं कोरिओलेनसला पटलेली असते. म्हणूनच मेनेनिअसच्या शांततेच्या आणि सावधपणाच्या सूचनेकडे तो मनःपूर्वक लक्षही देत असतो.

लोकांचा वैरी म्हणून हद्दपार —

सुरुवातीला त्याचा प्रश्न नम्रतेचा नसला तरी न्यायाचा असतो. प्रथम मला कारभारी म्हणून निवडून मग तो निर्णय बदलायला आता कारण काय झालें, एवढेंच तो विचारतो. परंतु पहिल्याच उत्तरांत सिसिनिअस त्याच्यावर "लोकांचा विश्वासघात करून स्वतः हुकुमशहा बनण्याचा प्रयत्न केल्याचा" आरोप करतो. विश्वासघातकी हा शब्द ऐकतांच कोरिओलेनस उसळून उठतो. मेनेनिअसचा त्याला शांत करण्याचा प्रयत्न यशस्वी होत नाही. आणि कोरिओलेनस सिसिनिअसवर खोटें बोलण्याचा प्रत्यारोप करतो. त्यासरशी हें पाहा यांचें वर्तन असें म्हणून सिसिनिअस जाहीर करतो की, या ठिकाणींही हा गृहस्थ आपल्या पूर्वीच्या कृत्याबद्दल खेद व्यक्त न करतां अधिकारी जनाचा उपमर्दच करीत आहे. तेव्हा त्याला एवढ्यासाठी सुद्धा देहांताशिवाय इतर शिक्षा नाही.

त्यानंतर तर मेनेनिअसचे सर्वच प्रयत्न फुकट जातात. कोरिओलेनस मूळपदावर येऊन लोकांचा अधिक्षेप करूं लागतो. या बडबडीचा फायदा घेऊन प्रथमपासूनच त्याच्या अंतःकरणांत सामान्य जनतेबद्दल किती विद्वेष आहे हें पुन्हा एकदा स्पष्ट करून सिसिनिअस म्हणतो, "तरीही आम्ही याला देहांताची शिक्षा देत नाही, तर लोकांच्या वतीने आम्ही त्याला हद्दपारीची शिक्षा फर्मावतों." कॉमिनिअस रदबदली करूं पाहतो. परंतु ब्रूटस मोठा हुषार माणूस आहे. तो त्याचें बोलणें मध्येच अटकावतो आणि "आता आणखी बोलण्यासारखें कांही राहिलेंच नाही; शिक्षा सांगून झाली आहे आणि लोकांचा वैरी म्हणून कोरिओलेनसला हद्दपार केलें आहे" असे निर्वाणीचे उद्गार काढून पुढची सर्व चर्चा बंद करतो.

त्याही वेळीं कोरिओलेनस परिस्थितीचा गंभीरपणा ओळखत नाही. त्याचा

दुखावलेला अहंकार त्याला बेभान करतो. शत्रूंच्या तावडींत सापडून तुम्हां लोकांचें तळपट होईल, तुम्ही गुलाम होऊन राहाल, अशी प्रखर शापवाणी उच्चारून व रोम म्हणजेच कांही सारें जग नाही - इतरत्रही जग आहे (विपुला-च पृथ्वी !), तेव्हा तुमचा धिक्कार करून, तुम्हांला विटून मी हें नगर सोडून जातों" असे निर्वाणीचे उद्गार काढून तो निघून जातो.

परंतु अजूनही त्याचा विचार कदाचित पालटेल म्हणून सिसिनिअस लोकांना सांगतो की, त्याच्या पाठीमागे लागा आणि त्याला आणखी चिडवा. नाटकांतील हा पुढच्या सर्व घटनांना करुण वळण देणारा अंक आणि प्रवेश येथे संपतो.

आईचा, पत्नीचा आणि मित्रांचा निरोप घेऊन कोरिओलेनस रोमचा त्याग करतो. आईला तो धीर देतो. मित्रांना आश्वासन देतो की, माझ्या पूर्व इतिहासाशीं विसंगत असें माझ्याबद्दल तुमच्या कानांवर कांही येणार नाही. जातांना कॉमिनिअसने त्याला चांगली सूचना दिलेली असते की, आपण मंडळी त्याच्याशीं दुरून का होईना संबंध ठेवूं. म्हणून त्याने जवळपासच राहावें. महिनाभरांत लोकांची लहर फिरेल. अशा वेळी कोरिओलेनसला शोधायला पृथ्वी पालथी घालावी लागूं नये.

वेडावलेली व्हॉल्युमिना विवेक सोडीत नाही —

कोरिओलेनसवरील या आपत्तीने त्याची आई जणू वेडी झाली होती. म्हणून सिसिनिअस वगैरे तिला टाळायला पाहतात. परंतु ती त्यांना रोखून धरते आणि आपल्या संतापाचा त्यांच्यावर भडिमार करते. रोममधल्या लोकांचा प्रश्न आहे म्हणून; एखाद्या परकी प्रदेशांत कोरिओलेनसवर हा प्रसंग येता तर आपण तेथल्या लोकांचा निर्वंश करविला असता त्याच्याकडून, असें ती म्हणते. तेव्हा तिच्या वेडावलेल्या मनानेही विवेकाची ओळख सोडलेली नाही, हें या प्रवेशांत मुख्यतः आढळून येतें.

यानंतरचा तिसरा प्रवेश पुढच्या घटनांचा सूचक आहे. एक फुटीर रोमन नागरिक एका व्होल्स नागरिकाला रोममधील वरिष्ठवर्ग व कनिष्ठवर्ग यांच्यामधील अलीकडच्या तंट्याची कल्पना देतो आहे. त्यांतूनच कोरिओलेनसला हद्दपार केल्याचीही वार्ता तो सांगतो. तो रोमन त्याला आणखीही गुह्य गोष्टी सांगण्याचें आश्वासन देतो. स्वार्थासाठी आपल्या देशाचा घात करायला निघालेल्या या हीन रोमन नागरिकाची ही कथा या ठिकाणीं शेक्स्पीअरने कांही उगाच रंगविलेली नाही.

पण कोरिओलेनसला विवेक राहत नाही —

कारण, पुढच्याच प्रवेशांत स्वतः कोरिओलेनस त्याच मार्गाचें अवलंबन करायला निघालेला आपण पाहतों. कोरिओलेनसवर अन्याय झाला होता हें खरें आहे. त्यामुळे तो रागाने भडकला होता हेंही खरें आहे. परंतु आईच्या ठिकाणचा विवेक त्याच्यापाशी शिल्लक नव्हता. किंवा खरें म्हणजे ही विवेकशीलता त्याच्या ठिकाणीं

मुळांतच नव्हती. म्हणून तो व्होल्स लोकांच्या नगरांत प्रवेश करूं जातो. जाणीव आहे त्याला की, व्होल्स पुढारी ऑफिडियस आपला वधही करील. परंतु तसें त्याने न केलें तर आपण त्याच्या राज्याचें फार मोठें हित करूं. म्हणजे यांत रोमशीं विरोध आलाच. स्वार्थाने शत्रूला मदत करणारा तो लहान रोमन नागरिक आणि रागाच्या भरांत तेंच करूं जाणारा हा श्रेष्ठ आणि शूर वीर याचे हेतु भिन्न असले तरी कार्य सारखेंच दोषार्ह आहे, हें या लागोपाठच्या तिसऱ्या आणि चवथ्या प्रवेशांनी शेक्स्पीअरने किती नाजूकपणाने सूचित केलें आहे पाहा.

स्टॉकमन व स्टीफन यांच्या तुलनेने हिणकस —

वृत्तींतील या हिणकसपणामुळे कोरिओलेनस श्रेष्ठ करुण नायकांच्या पातळीशीं जाऊन भिडूं शकत नाही. त्याच्याविषयीं आदर, जिव्हाळा आणि म्हणून हळहळ वाटायला ही हीनता आड येते. यापूर्वी आपण स्टीफन आणि डॉक्टर स्टॉकमन या दोन नायकांच्या चित्रणाचा विचार केला. त्या दोघांना लोकांनी जनतेचे शत्रू म्हटलें. त्या दोघांना त्या त्या जनतेच्या नादानपणाबद्दल खूप चीड आली. स्टीफनचा तर लोकांच्या हातून वध झाला. डॉ. स्टॉकमनवर स्वतःचा देश सोडून जावें असें वाटण्याइतका कडक बहिष्कार जनतेने टाकला. परंतु एका बाजूला कोरिओलेनस आणि दुसऱ्या बाजूला ते दुसरे दोघे जनतेचे शत्रू असे ठेवून तुलना केली तर केवढा तरी मोठा भेद दृष्टीस पडतो. स्टीफन आणि डॉक्टर स्टॉकमन या दोघांना त्यांच्या जनतेने शत्रू मानले असले व त्यांचा त्या जनतेवर राग असला तरी त्या जनतेचा द्वेष करणारे ते दोघेही नव्हते; जनतेचें वाटोळें व्हावें आणि आपण ज्या वर्गातले आहोंत त्या वर्गाचेंच फक्त कल्याण व्हावें किंवा वर्चस्व असावें अशी त्यांची वृत्ति नव्हती. डॉ. स्टॉकमन तर स्वतः जनता म्हणून संबोधल्या जाणाऱ्या वर्गातलाच होता. स्टीफन आणि डॉ. स्टॉकमन यांच्या चित्ताला जनतेचें हित व्हावें हीच ओढ होती. आणि त्या जनतेने कितीही अन्याय केला तरी तिच्याविरुद्ध प्रत्यक्ष तर राहोच पण अप्रत्यक्ष सुद्धा लढा पुकारून त्या जनतेचा निःपात करण्याची कल्पना त्यांचा चित्ताला क्षणभरसुद्धा स्पर्श करूं शकली नसती. या त्यांच्या उदार हृदयामुळें, त्यांच्यावर जनतेने केलेल्या अन्यायाबद्दल आपल्याला अत्यंत हळहळ वाटते. अशी हळहळ वाटावी असें या दृष्टीने कोरिओलेनसच्या वृत्तींत कांहीच नाही. उलट शत्रूला मिळून स्वतःच्या लोकावर शस्त्र उचलण्याला उद्युक्त झालेल्या त्याच्याबद्दल कांहीशी घृणाच वाटते. म्हणूनच करुण नायक या दृष्टीने कोरिओलेनसची पायरी फार खालच्या दर्जाची ठरते; म्हणूनच हें नाटक शेक्स्पीअरच्या श्रेष्ठ करुण नाटकांत मोडत नाही.

अखेर ऑफिडियस व कोरिओलेनस यांची गाठ पडते. कोरिओलेनस आपली सर्व कहाणी ऑफिडियसजवळ सांगतो. अपमान सांगूं नये जनांत हा विवेक त्याला राहत नाही. रोममधील निर्दय आणि मत्सरग्रस्त लोक आणि त्यांना वाटेल तें करूं देणारे रोमचे सरदारलोक – ज्यांना तो नामर्द अशी शिवी द्यायलाही कमी करीत नाही –

यांनी आपल्याला कसें हाकलून दिलें हें सांगून "मी तुझ्याकडे केवळ सूडाच्या भावनेने कसा आलों आहे" हें तो ऑफिडियसला सांगतो. मरणाचें भय आपल्याला नाही. तसें असतें तर आपण असें एकट्याने त्याच्याकडे येण्याचें धाडस केलेंच नसतें हेंही तो त्याला स्पष्ट करतो. "तेव्हा माझ्या या संकटाचा तूं उपयोग करून घे. यांत माझा सूड मिळविण्याला मला साधन मिळेल आणि तुझ्या राज्याचाही मोठा फायदा होईल." ही त्याची मुख्य भूमिका या संभाषणामध्ये असते.

ऑफिडियस धूर्त माणूस आहे. आलेल्या संधीचा फायदा घेण्याचा तो तत्काळ निर्णय करतो. कोरिओलेनसच्या या भूमिकेमुळें आपल्या मनांतील पूर्वीचा सगळा रागद्वेष नाहीसा झाल्याची तो आणभाक करतो आणि "तूं अनुभवी; रोमची तुला सगळी माहिती; कोठे हल्ला करावा, कोठे दुर्बळता आहे हें सगळें तुला माहीत; तेव्हा मोहिमेचीं सगळीं सूत्रें तुझ्या स्वाधीन, असें म्हणून त्याला तो हरब-याच्या झाडावर चढविल्यासारखें करतो.

व्होल्स लोकांना रोमबद्दल न्याय्य तिरस्कार —

ऑफिडियसलाच नव्हे, तर साऱ्या व्होल्स जनतेला या नव्या घटनेने केवढा मोठा आनंद झाला, होऊं घातलेल्या युद्धाच्या कल्पनेने ते किती बेहोष झाले हें या पांचव्या प्रवेशाच्या उत्तरार्धांत शेक्स्पीअरने मुद्दाम दाखविलें आहे. त्यामध्ये एका व्होल्स सेवकाचा एक उद्गार या घटनेचें सत्स्वरूप दाखविण्याला किती समर्थ आहे; कारण, "काय वाटेल तें झालें तरी आपण रोमन कांही होणार नाही" असें तो मोठ्या तिरस्काराने म्हणतो. रोममधील फाटाफूट, यादवी आणि कोरिओलेनससारख्या श्रेष्ठ वीराची आपल्याच राज्याचा नाश करायला निघालेली ती सूडबुद्धि यांवर ही केवढी विदारक टीका आहे.

जी गोष्ट व्होल्स लोकांना महान आनंदाची पर्वणी तीच रोममध्ये भयसूचक आघाताची ठरावी हें स्वाभाविकच होतें. पुढच्या सहाव्या प्रवेशांत त्याचेंच दर्शन आहे.

कोरिओलेनसला घालवून दिल्याने रोमचें कांही तसें मोठें म्हणण्यासारखें नुकसान झालें नाही; या धक्क्यांतून आपण चांगले निभावलों अशा भावनेने मेनेनिअसजवळ आपणाला वाटणारी मोठी धन्यता सिसिनिअस आणि ब्रूटस व्यक्त करीत आहेत; कोरिओलेनस एक चांगला लष्करी अधिकारी असला तरी उद्धट होता; अहंकाराने चढून गेलेला होता; कल्पनातीत महत्त्वाकांक्षी होता, स्वतःवाचून दुसरें जगच त्याला दिसत नव्हतें; इतर कोणालाही एवढाही हिस्सा न देतां सर्व सत्ता आपण एकट्यानेच उपभोगण्याची त्याची इच्छा होती; वगैरे गोष्टी सांगून, आपण केलें तें योग्यच केलें असें स्वतःचें आणि मेनेनिअसचें समाधान करण्यांत ते दोघे दंग आहेत; तोच त्यांच्या कानावर बातमी येते की, कोरिओलेनसच्या साहाय्याने व्होल्स लोकांनी रोमवर हल्ला करण्याची सर्व जय्यत तयारी केली आहे.

आग आणि पाणी एकत्र ? —

यावर त्यांचा प्रथमदर्शनीं विश्वास बसत नाही. आपण कोरिओलेनसला परत बोलावून घ्यावें यासाठी हा एक डाव आहे असें ब्रूटसला वाटतें; ऑफिडियस आणि कोरिओलेनस म्हणजे आग आणि पाणी – हे दोन विरुद्ध धर्मांचे पुरुष एकत्र येऊंच शकणार नाहींत असा भरवसा स्वतः मेनेनिअस व्यक्त करतो. एवढ्यांत हल्ला सुरू झाल्याची बातमी येते. कॉमिनिअस स्वतःच येऊन लोकप्रतिनिधींना, हें तुमच्या कृत्याचें फळ, असा दोष देतो; कोरिओलेनसची किंमत तुम्हांला समजली नाही. तुमच्या शत्रूंनी ती चांगली ओळखली असा टोमणा तो देतो.

मग या संकटाची कल्पना त्यांना येते. यावर उपाय म्हणजे कोरिओलेनसनेच रोमन लोकांना क्षमा केली तर, असें मेनेनिअस म्हणतो. पण त्याला ही विनंति करायची कोणी हा मोठाच बिकट प्रश्न असतो. लोक तर भीतीने गांगरून जातात. कॉमिनिअस त्यांना त्यांच्या मूर्खपणाबद्दल तडाखे देतो ते त्यांना मुकाट्याने सहन करावे लागतात. पण यांतून मार्ग थोडाच निघणार होता. तूर्तातूर्त लोकांना घरोघर जायला सांगून सिसिनिअस व ब्रूटस थोडीशी शांतता निर्माण करतात, पण त्यांच्याही हृदयाचा थरकांप झालेला असतो. ही वार्ता खोटी ठरली तर आपण आपली अर्धी संपत्ति देऊन टाकूं अशी खोटी आशा ब्रूटस व्यक्त करतो. पण ही बातमी फार भयंकर आहे या जाणिवेने ते दोघे भयभीत झालेले असतात.

चवथ्या अंकांतील यानंतरचा सातवा आणि शेवटचा प्रवेश कोरिओलेनसच्या पुढच्या दुर्धर भवितव्याची कल्पना देण्यासाठीच केवळ लिहिला आहे. त्यांतच पुन्हा एकदा त्याचे स्वभावविशेष त्याच्या शत्रूच्या दृष्टिकोनांतून स्पष्ट केले आहेत. व्होल्सांचा सेनापति ऑफिडियस व याचा दुय्यम अधिकारी यांच्यांतलें हें संभाषण आहे. कोरिओलेनसवर व्होल्स सैनिक भाळले असून सैन्यांत त्याचेंच प्रस्थ वाढत आहे व ऑफिडियसचें महत्त्व कमी होत आहे, या बाबतींत त्या दोघांचें बोलणें चाललेलें आहे. वाटलें त्याच्यापेक्षा तो अधिक गर्वाने वागतो आहे, याची जाणीव ऑफिडियसलाही झालेली आहे. पण त्याचा तो स्वभावधर्म आहे असें म्हणून तो थोडेंसें आपलें समाधान करून घेत आहे. पण खरें म्हणजे, जरूरी आहे तेथपर्यंत त्याचा उपयोग करून घ्यायचा; आज लोकांना त्याच्या व्होल्सांविषयीच्या आपुलकीबद्दल कितीही कौतुक वाटत असलें तरी त्यांचें मत पालटविण्याची गुरुकिल्ली आपल्या हातीं आहे; त्याचें असें एक वर्म ठाऊक असल्याबद्दल ऑफिडिअसला खात्री आहे की, तें पकडून कोरिओलेनसचा गळा कापण्याची त्याला पूर्ण उमेद आहे. म्हणूनच आजच्या त्याच्या दिमाखाकडे ऑफिडियस विशेष लक्ष देत नाही.

ऑफिडियसने कोरिओलेनसला चांगलें ओळखलें आहे —

ही गुरुकिल्ली म्हणजे कोरिओलेनसच्या स्वभावांतील ऑफिडिअसने हेरलेल्या

उणीवा. कोरिओलेनस अत्यंत शूर लढवय्या असल्यामुळे आणि खुद्द रोममध्येच, सामान्य लोक आणि आणि त्यांचे प्रतिनिधी तेवढे सोडून, बाकीचा सर्व लढाऊ वर्ग कोरिओलेनसचा पक्षपाती असल्यामुळे रोमचा पाडाव त्याच्या हातून होईल याबद्दल ऑफिडियसला मुळीच संशय नाही. परंतु मिळालेलें यश तो पचवूं शकणार नाही हें ऑफिडियसने चांगलें ओळखलेलें आहे. याचीं तीन कारणें तो देतो. (१) सदैव यशच मिळत गेल्याने त्याचा अहंकार फारच अतिरेकाला पोचला आहे. (२) हातीं आलेल्या अनुकूल संधीचा फायदा घेतां येऊंच नये अशा प्रकारचा त्याच्या बुद्धींत कांही तरी दोष आहे, उणीव आहे. आणि (३) एकच एक प्रकारचें जीवनाचें धोरण सर्व ठिकाणीं चालूं ठेवावयाचें, वागण्यांत बदल करावयाचा नाही अशी त्याची प्रवृत्ति आहे. लढवय्याच्याच हुकुमशाही वृत्तीने तो शांततेच्या कारभारांतही वागूं जातो. अशा तऱ्हेचे दोष असल्यामुळे तो स्वतःला अप्रिय करून घेतो. प्रथम लोक त्याला भितात; त्यांतून त्याचा ते तिरस्कार करूं लागतात; आणि यांतूनच हद्दपारीचा प्रसंग त्याच्यावर आला. सत्ता मिळाली असतां तिच्या विनाशाला स्तुतिस्तोत्रासारखें दुसरें साधनच नाही. या गोष्टीला तो बळी पडेल अशी ऑफिडियसची मनोमन खात्री आहे. म्हणून तो म्हणतो, ठीक आहे कायस; रोम ज्या क्षणीं तुझ्या हातांत पडेल त्याच वेळीं तुझे सगळें वैभव संपलेलें असेल आणि थोड्याच वेळांत तूं माझ्या हातांत सापडशील.

अशा रीतीने रंगभूमीवर जवळजवळ कांही न घडतांच हा अंक आणि त्याचे ते सात प्रवेश संपतात. चवथा अंक रेंगाळत लिहिणें ही शेक्स्पीअरची नेहमीची रीत नव्हे. ज्या क्षणीं नाटकाच्या चढत्या कमानीची उच्चतम पातळी गाठली जाते तेथून पुढे नाटकाचा ओघ झपाट्याने अखेरीकडे न्यावयाचा असा त्याचा इतर नाटकांत येणारा अनुभव या ठिकाणीं येत नाही. आणि कांहीसा अपेक्षाभंग करणारा हा अंक शेक्स्पीअरने लिहिलेला पाहून या नाटकाची शेक्स्पीअरच्या श्रेष्ठ नाटकांत गणना होत नाही याचें आश्चर्य वाटत नाही.

पांचव्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत मात्र शेक्स्पीअरचें नाट्यरचनातंत्र अत्यंत श्रेष्ठ व उंच पायरी गाठते आणि चवथ्या अंकांत झालेला विरस पार वितळून जातो. पण त्या प्रवेशाआधीच्या दोन प्रवेशांकडे अगोदर थोडें लक्ष पुरविलें पाहिजे.

रोमवर हल्ला करण्याच्या पवित्र्यांत कोरिओलेनस रोमच्या तटाबाहेर जय्यत तयारी करून उभा आहे. रोमचा पाडाव हा आता निश्चित आहे. हें टाळण्याचा मार्ग फक्त एकच शिल्लक होता; कोरिओलेनसचें मन वळविणें हा. पण मन वळवायला जाणार कोण ? ज्या लोकप्रतिनिधींनी त्याला रोममधून हाकलून लावलें त्यांची तर छातीच नव्हती त्याच्यासमोर उभे राहण्याची. आणि म्हणूनच त्यांच्यासह सर्वांनी आता मेनेनिअसची विनवणी चालविली आहे की, त्याने कोरिओलेनसकडे जाऊन रदबदली करावी.

त्यापूर्वी स्वतः कॉमिनिअसने जाऊन हा प्रयत्न केला होता आणि तो हताश होऊन परत आला होता. त्यामुळे हें काम अंगावर घ्यायला मेनेनिअसला उत्साह वाटत नव्हता. कॉमिनिअसनेच कोरिओलेनसला एवढ्या वैभवाला चढविण्याला मदत केली होती. पण कोरिओलेनसने त्याच्याशीं बोलण्याचेंसुद्धा नाकारलें. रोमच्या जनतेबद्दल तर कोरिओलेनसला जिव्हाळा वाटणें शक्यच कव्हतें. परंतु सरदार वर्गातील आप्त, इष्ट, मित्र यांचा सुद्धा "क्षुद्र जीव" असा उल्लेख करून त्याने धिक्कारच दर्शविला, असें स्वतः कॉमिनिअसच सांगतो. त्यामुळे मेनेनिअस या कामगिरीवर जाण्याचें नाकारीत असतो.

मेनेनिअसची विफल शिष्टाई —

परंतु अखेर त्याच्या उदार बुद्धीचा विजय होतो. रोमबद्दलची त्याची अनुकंपा अधिक प्रभावी ठरते. आणि कोरिओलेनस खुशींत असण्याची संधि पाहून त्याच्याशीं बोलणें केल्यास त्याला आपण वळवूं शकूं असाही त्याला विश्वास वाटतो. म्हणून तो जायला कबूल होतो. येथे पहिला प्रवेश संपला.

दुसऱ्या प्रवेशांत मेनेनिअस कोरिओलेनसच्या तळावर गेलेला आहे. शिपाई-लोक त्याला ओळखत नाहींत; कोरिओलेनसकडे त्याला जाऊं देत नाहींत. कोणाही रोमन माणसाशीं आपला सेनापति अक्षरसुद्धा बोलणार नाही ही आपली भावना शिपाई व्यक्त करतात. परंतु मेनेनिअसला तें खरें वाटत नाही. त्याचें कोरिओलेनसवर मुलाप्रमाणेच प्रेम होतें. या प्रेमाचा तो अव्हेर करणार नाही अशी मेनेनिअसला मोठी आशा असते. त्याला शिपाई आंत जाऊं देतच नाहींत. परंतु त्याच वेळीं कोरि-ओलेनस आणि ऑफिडियस दोघे बाहेर येतात. मोठ्या विश्वासाने आणि आशेने मेनेनिअस कोरिओलेनसला सामोरा होऊन आपल्या येण्याचें कारण मोठ्या गोड आणि अजीजीच्या स्वरांत त्याला सांगतो. परंतु कोरिओलेनस त्याचें कांहीं ऐकून घेत नाही; जसा तो आला तसेंच तेथून त्यानें निघून जावें असें निर्धाराने फर्मावतो आणि तिर-स्काराने निघून जातो. त्याचें हें धोरण ऑफिडियसला स्वाभाविकच उपयोगाचें अस-ल्यामुळे तो जातां जाता कोरिओलेनसची दृढ वृत्तीबद्दल प्रशंसा करतो. अशा रीतीने अत्यंत निरुत्साह आणि अपमानित होऊन मेनेनिअसला तेथून निघून यावें लागतें.

नाटकांतील अत्यंत प्रभावी प्रवेश —

यानंतर या नाटकांतील अत्यंत भावनाप्रधान आणि नाट्यमय असा पांचव्या अंकाचा तिसरा प्रवेश. ऑफिडियस व कोरिओलेनस छावणींतील तंबूंत आहेत. उद्यांचा दिवस रोमवरील हल्ल्याचा म्हणून कोरिओलेनसने ठरविलेला आहे. त्यापूर्वी त्याने रोमला शरणागतीच्या कांही शर्ती कळविल्या होत्या, त्या मानल्या गेल्या नव्हत्या. नंतर मेनेनिअस त्याचें मन वळविण्यासाठी आला. वास्तविक आता पुन्हा त्या शर्ती

पाठविण्याचें प्रयोजन नव्हतें. परंतु मेनेनिअसचें आपल्यावरील प्रेम आठवून कोरिओलेनसने त्याच्याजवळ पुन्हा तो शर्तींचा कागद दिला होता. "परंतु ही गोष्ट आता शेवटची. यापुढे आता रोममधून कोणी कसलीही सूचना किंवा याचना करायला आलें तरी – मी कोणाचा एक शब्दसुद्धा ऐकणार नाहीं, अशी घोर प्रतिज्ञा कोरिओलेनस ऑफिडियसपाशी करतो. कारण पुन्हापुन्हा येणाऱ्या या शांतिदूतांच्यामुळे ऑफिडियसच्या मनांत आशंका निर्माण होणें शक्य होतें. या आशंकेला एवढाही अवसर मिळून देणें हें कोरिओलेनसला इष्ट व उचित वाटत नव्हतें.

परंतु त्याची ही प्रतिज्ञा बोलून होतें न होतें तोच आणखी एक शांतिदूतांचा संच त्याच्या तंबूकडे येतांना त्याला दिसतो आणि एकदम त्याचें मन चरकतेंच. मी प्रतिज्ञा करतों न करतों तोच ती मोडण्याचा मोह मला पाडण्याचा प्रयत्न होणार काय? पण या मोहाला मी बळी पडणार नाही, असा निर्धार थरकत्या हृदयानेच तो करतो.

अपूर्व शांतिदूत —

कारण तो पाहतो की, या वेळीं येणारी मंडळी अगदीच निराळी आहे. सगळ्यांच्या पुढे त्याची पत्नी व्हर्जिलिया आहे. तिच्यामागून व्हॉल्युमिना, तिचा हात धरून त्याचा लहानगा मुलगा आणि त्याच्यामागे जिच्या पावित्र्याविषयी कोरिओलेनसला अत्यंत आदर होता अशी त्या कुटुंबाची आणि त्याचीही सखी व्हॅलेरिया, अशीं तीं माणसें व तीही सुतकी पोशाखांत येतांना पाहून क्षणभर त्याचें हृदय हलून गेलें यांत नवल कांहीच नाही. त्यांचें चालणें, पाहणें, मुलाची केविलवाणी मुद्रा या सगळ्याचा कोरिओलेनसच्या चित्तावर एवढा विलक्षण परिणाम होतो की, पुन्हा एकदा त्याच्या भावना उचंबळून येऊन तो काव्य बोलूं लागतो. आपल्या अंगच्या श्रेष्ठ प्रवृत्ती आपल्याला ओरडून सांगत आहेत की, इतक्या तळमळीने विनंति करायला आलेल्या या मंडळींना 'नाही' म्हणूं नकोस, याची त्याला तीव्र जाणीव होते. आणि म्हणून हें आपल्या हातून घडतां उपयोगी नाही यासाठी स्वतःला आणि ऑफिडियसलाही भरवसा वाटावा म्हणून तो म्हणतो.

"व्होल्स लोकांनी रोमवर आणि साऱ्या इटलीवर नांगर फिरविला तरी मला फिकीर नाही. दुर्बळ स्वाभाविक प्रवृत्तींना बळी पडण्याचा भेकडपणा मी कधी करणार नाही. मी कोणाचें कांही लागत नाही; मला नात्यागोत्याचें कोणी नाही; माझा मी माझ्यापुरता; माझ्यावर कोणाचा कांही हक्क नाही, अशा दृढ निर्धाराने मी निश्चल राहीन."

अखेर कोमल भावनांचाच विजय —

परंतु त्याचा हा निर्धार व्यर्थ ठरावयाचा होता. अखेर त्याच्या कोमल भावनांचाच विजय व्हायचा होता. प्रथम त्याची नजर समोरच असलेल्या पत्नीवर खिळते. तिच्या

डोळ्यांतला तो आजपर्यंत कधी न पाहिलेला भाव पाहून तो चमकून जातो. कधी तोंड न उघडणारी ती मूर्तिमंत विनम्रता जेव्हा निधडेपणाने बोलते, तेव्हा त्याच्या हृदयाचें पाणीच होतें. आपलें तिच्यावर किती निश्चळ प्रेम आहे हें तो सांगतो आणि तरीही रोमन लोकांना क्षमा करण्याची गोष्ट तिने काढूं नये असें तो जवळजवळ काकुळती येऊन तिला म्हणतो.

एवढ्यांत आपण आईला विसरलों हें ध्यानांत येऊन थोडासा शरमूनच तो तिच्या-पुढे गुडघे टेकतो. परंतु मनाचा कांहीएक निर्धार करून आलेली ती स्त्री स्वतःच त्याच्यापुढे टेकून वाकते आणि त्याला केवढा तरी धक्का देते. "ऊठ बाबा; काळ फिरला आहे. मूल आणि मातापिता यांच्यांतलीं नातीं आणि कर्तव्याच्या कल्पना उलट्यापालट्या करायची वेळ आली आहे आणि म्हणून आजपर्यंत गाद्यागिरद्यांशिवाय कोठे पाय न ठेवलेली मी तुझी आईच या दगडाधोंड्यांत तुझ्यापुढे गुडघे टेकीत आहें" असा फटकारा ती त्याला मारते तेव्हा तर तो अतीव विद्ध होतो. त्याच्या तोंडून काव्य खवूं लागतें. व्हॉल्युमिना, "माझ्याबरोबर ही आणखी कोण आली आहे पाहिलीस का" असें म्हणून व्हॅलेरियाकडे बोट दाखविते त्या वेळी तर त्याचें हृदय विरघळून जाऊन तो व्हॅलेरियाच्या काव्यमय वर्णनांत मग्न होऊन जातो.

त्यानंतर व्हॉल्युमिना नातवाला पुढे करते; त्याला बापापुढे गुडघे टेकून वंदन करायला लावते. आणि अशीं हीं आम्ही चौघेजण तुझ्याकडे "प्रार्थना" करायला आलों आहोंत असें पुन्हा एकदा कटाक्षाने म्हणते.

परंतु त्यांची प्रार्थना काय आहे हें त्यांच्या तोंडून ऐकण्यापूर्वीच कोरिओलेनस, मला जी सूडाची भावना सोडतां येणार नाही ती सोडायला तुम्ही सांगणार आहां आणि हें तुमचें म्हणणें मी मुळीच मान्य करणार नाही, असें कठोर निर्धाराने सांगून टाकतो. व्हॉल्युमिना त्याला पुढे बोलूं देत नाही. "आम्हीं मागण्यापूर्वीच तूं आम्हांला नाही म्हणत असलास तरीही आम्हांला जें बोलायचें आहे तें आम्ही बोलून घेतों. आणि तरीही तुझ्या हृदयाला पाझर फुटला नाही तर त्याचा सारा दोष तुझ्या दगडाच्या हृदया-वर राहील. तेव्हा आमचें ऐकून घे" असें म्हणून आपल्या मनांतलें सर्व ओकून टाकायला ती सज्ज होते.

हा प्रसंग मोठा बांका असतो. यामध्ये ऑफिडियसला शंका काढायला पुष्कळ अवसर मिळण्यासारखा असतो. म्हणून मुद्दाम कोरिओलेनस त्याचें आणि व्होल्स लोकांचें या संभाषणाकडे लक्ष वेधतो आणि म्हणतो, "कारण, रोममधून आलेल्या कोणाचें कांही, एकीकडे, गुप्तपणें आम्हांला ऐकायचें नाही. हं, काय आहे तुमची मागणी?" आणि व्हॉल्युमिनाचें बोलणें ऐकण्याची तो तयारी दर्शवितो.

व्हॉल्युमिनाचा आधार प्रखर युक्तिवाद —

आपण प्रार्थना करायला आलों आहों असें जरी व्हाल्युमिना म्हणाली असली तरी

प्रत्यक्ष तिच्या बोलण्यांत प्रार्थनावृत्तीचा भाग जवळजवळ नव्हता. तिचा आधार प्रखर अशा युक्तिवादावर होता. सुरुवातीलाच तिने आपल्या पोशाखाचा निर्देश करून, न बोलतांही आम्ही स्त्रियांनी कोरिओलेनसच्या हद्दपारीपासून कोणत्या अवस्थेंत जीवन व्यतीत केलें आहे हें नुसत्या आमच्या या पोशाखावरून कळून येण्यासारखें आहे असें म्हणून, स्वतःच्या अंतःकरणांतील अतीव जड दुःखभार विशेष लांबण न लावतां तिने व्यक्त केला. "आतासुद्धा, ज्या तुझें दर्शन झाल्यामुळे आमच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंचे ओघ वाहावे आणि हृदयें आनंदाने नाचावीं, त्या तुझ्या दर्शनाने उलट आमच्या डोळ्यांतून दुःखाश्रू ओघळत आहेत आणि हृदयांचा दुःखाने आणि भीतीने थरकांप होत आहे; अशा स्थितींत आमच्याइतक्या दुर्दैवी स्त्रिया दुसऱ्या कोणी असूं शकतील का, याचा तुझा तूंच विचार कर" असें नंतर तिने त्याला आवाहन केलें. कां व्हावी आईची, पत्नीची आणि मुलाची अशी ही अवस्था? तर आपला मुलगा, आपला पति, आणि आपला पिता स्वतःच्याच देशाचीं आंतडीं तोडून बाहेर काढायला निघालेला पाहण्याचें दुर्भाग्य त्यांच्यावर ओढवलें आहे म्हणून. बरें, हें दुर्भाग्य मोठें विचित्र आहे, असें म्हणून एखाद्या अत्यंत कुशल वकिलाप्रमाणे ती पुढे बोलूं लागते. "तुझ्यासारख्या माणसापुढे प्रार्थना करायला येण्याऐवजी आम्हांला परमेश्वराची प्रार्थना करणें कदाचित अधिक सोपें गेलें असतें." परंतु परमेश्वरप्रार्थनेचाही मार्ग त्यांना मोकळा नव्हता ही त्यांची सगळ्यांत मोठी दुरवस्था होती. इकडे आड आणि तिकडे विहीर असा बिकट पेच त्यांच्यापुढे होता. रोमचें रक्षण कर म्हणून परमेश्वराला विनवावें तर परिणाम, मुलगा, पति व पिता यांचा नाश होणार; आणि त्याला यश दे म्हणावें तर स्वजनघात होणार. रोमचा विजय म्हणजे कोरिओलेनसला बेड्या घालून गुलाम म्हणून रोमच्या रस्त्यांतून त्याची धिंड काढलेली पाहावी लागणार. नाही तर आई, पत्नी आणि मुलगा यांच्या आणि असंख्य स्वजनांच्या रक्तपाताचा धनी कोरिओलेनस होणार.

असा हा पेच पुढे असल्यामुळे, आणि कोरिओलेनसने आपला विचार मानला नाही तर, आपण काय करावयाचा निर्धार केला आहे हें त्यानंतर ती त्याला मोठ्या गंभीरपणाने बजावते. "या लढाईचा शेवट होऊन या प्रकारच्या पेचांत सापडण्याची पाळी येईपर्यंत मी जिवंत राहणार नाही. तूं स्वतःचा अपमान करून घ्यावास असें कांहीं सांगायला मी आलें नाही. माझें म्हणणें लढणाऱ्या दोन्ही पक्षांचें तूं उदार हृदयाने कल्याण साधावेंस. पण हें जर मी तुला पटवून देऊं शकलें नाही, आणि रोमवर चाल करून शहराचा विध्वंस करावयाचाच तुझा निर्धार कायम राहिला तर ज्या या उदरांतून तुझा जन्म झाला त्या आईच्या उदराला तुडवूनच तुला रोममध्ये प्रवेश करावा लागेल."

याच तिच्या निर्धाराचा कोरिओलेनसच्या पत्नीनेही दृढपणें उच्चार केला. मुलगा पडला बापाची प्रतिकृति. तो म्हणतो की, "मी असा कोणाला मला तुडवूं देणार नाही. मी पळून जाईन आणि मोठा झाल्यावर लढेन."

आणखीच कुशल युक्तिवाद —

या सगळ्याचा परिणाम होतो आहे हें व्हॉल्युमिनाने ओळखलें असलें पाहिजे. म्हणूनच आपली प्रतिज्ञा उच्चारीत असतांना तिने दृढ श्रद्धा प्रकट केली की, "पण, तुला अशा रीतीने रोममध्ये प्रवेश करवणारच नाही." आपल्या अंतःकरणाची गडबड उडते आहे याची जाणीव कोरिओलेनसलाही झाली असली पाहिजे. म्हणून या असल्या बायकी दुबळेपणाच्या गोष्टी ऐकायची माझी इच्छा नाही, असें पुटपुटून तो तेथून उठून निघून जाऊं लागतो. परंतु अत्यंत चतुर अशी व्हॉल्युमिना ही आपण त्याच्या मनावर केलेला परिणाम असा सुखासुखी व्यर्थ जाऊं देणारी कच्ची स्त्री नव्हती. तिने त्याला रोखून धरलें आणि पहिल्यापेक्षाही कठोर आणि कुशल युक्तिवादाचा हल्ला तिने त्याच्यावर चढविला.

"आमची प्रार्थना तूं मान्य केलीस म्हणजे रोमन लोकांचें हित होतें हें खरें. पण त्यामुळे जर व्होल्स लोकांचें – ज्यांची सेवा तूं सध्या पतकरली आहेस त्यांचें – अकल्याण होण्याचा संभव असता तर मग तूं आम्हांला दोष देणें न्यायाचें म्हटलें असतें; त्यांत तुझ्या प्रतिष्ठेला बाध आला असता. पण आमचें तसें मागणेंच नाही. आमचें म्हणणें दोन्ही पक्षांत तूं समजोता घडवून आणावास, दोघांमधील शत्रुत्व नष्ट व्हावें आणि असा तह घडवून आणल्याबद्दल दोन्ही पक्षांनी तुला धन्यवाद द्यावेत." हें आपलें मागणें आहे असें पुन्हा एकदा स्पष्ट करून ती पुढे तात्त्विक भूमिकेवरून त्याला डिवचते. ती म्हणते,

"शिवाय, माझ्या श्रेष्ठ मुला, तुला काय ठाऊक नाही की, लढाईचा अंत हा नेहमीच अनिश्चित असतो. यश येईल किंवा न ही येईल. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे. समजा रोम जिंकण्यांत तुला यश आलें तर त्यामधून तुला लाभ काय होईल? फक्त एकच. अपकीर्ति आणि शिव्याशाप. पुढचे बखरकार लिहितील, "मोठा उदार आणि श्रेष्ठ पुरुष होता हा. परंतु आपल्या शेवटच्या प्रयत्नाने त्याने आपला सर्व श्रेष्ठपणा धुळीला मिळविला; स्वतःच्याच देशाचा नाश केला आणि पुढच्या पिढ्यांच्या मनांत त्याच्या नांवाबद्दल तीव्र घृणा आणि तिरस्कार उत्पन्न होऊन राहिला."

कोरिओलेनसबद्दलची शेक्स्पीअरची मध्यवर्ती कल्पना —

हा शेरा निव्वळ व्हॉल्युमिनाचाच आहे असें मानण्याचें कारण नाही. अनेकांच्या तोंडून या नाटकांत शेक्स्पीअरने कोरिओलेनसच्या मूल्यमापनाचे शेरे वदविल्याचें आपण पाहिलें आहे. त्या सर्वांत हा शेरा अत्यंत चपखल आणि न्याय्य आहे. जणू स्वतःचेंच मत व्हॉल्युमिनाच्या तोंडून शेक्स्पीअर त्यांत व्यक्त करीत आहे असा भास होतो. आणि आपल्या नायकाचें चित्र रेखाटतांना कोणती मध्यवर्ती कल्पना त्याच्यापुढे असावी याचाच जणू आपल्याला प्रत्यय येतो.

आपल्या या हल्ल्यानें कोरिओलेनस हतबुद्ध झालासें आढळून आणि तो तरीही कांही उत्तर देत नाहीं असें पाहून व्हॉल्युमिना आपल्या हल्ल्याचा वेग आणि प्रखरता अधिकच वाढविते. "बोल ना, बोल" असें त्याला डिवचून ती त्याच्या अहंकाराची थट्टा करते. आत्मप्रतिष्ठेचा मोठा गर्व बाळगून देवांच्या वैभवाची बरोबरी करूं पाहणाऱ्या आणि जणू दशदिशा आपल्या झपाट्याने विच्छिन्न करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या त्याचें सामर्थ्य किती क्षुद्र आहे आणि एखाद्या दुर्बळ पानाचा चोळामोळा करण्यापेक्षा त्याची महत्ता कशी मोठी नाही हें ती त्याला कठोरपणें बजावते आणि "उदार पुरुषाने लोकांनी आपल्यावर केलेले अन्यायच सदैव उगाळीत राहावें हें श्रेष्ठपणाचें लक्षण तुला वाटतें काय? नीट विचार कर" असें म्हणून पुन्हा त्याला ती तोंड उघडण्याला आवाहन करते.

तरीही कोरिओलेनस स्तब्धच राहतो असें पाहून आणखी एक शस्त्र व्हॉल्युमिना बाहेर काढते. सुनेला ती म्हणते. "तूं, तूं बोल. तुझ्या डोळ्यांतील नुसत्या अश्रूंनी त्याचें हृदय विरघळणार नाही. पण तुझ्या बोलण्याने तो थोडा तरी हलेल. कारण आपलें पुत्रकर्तव्य तो विसरला आहे. आईचें एवढें मोठें ऋण कोणाही पुत्रावर नसेल. असें असून आईबद्दलचें आपलें पुत्रकर्तव्य हा विसरला आहे. अशी ही मी त्यांची आई हात जोडून त्याच्यापुढे भीक मागत आहे, या गोष्टीची त्याला शरम वाटत नाही."

मातेचा तळतळाट —

परंतु अजूनही कोरिओलेनस स्तब्धच. तें पाहून व्हॉल्युमिना आपला आवाज आणखी चढविते. ती म्हणते "माझें मागणें अन्यायाचें आहे असें मला पटव आणि मग खुशाल मला डावलून तूं पुढे जा. पण तसें जर नसेल तर मात्र माझें म्हणणें न मानणें अप्रमाणिक वृत्तीचें आहे असें मी म्हणेन आणि त्याबद्दल मातेचे तळतळाट तुला भोवतील."

या ठिकाणीं कोरिओलेनस तोंड फिरवितो. व्हॉल्युमिनाने आपल्या मुलाला नीट ओळखलें आहे. म्हणून लगेच ती सुनेला, नातवाला आणि व्हॅलेरियालाही म्हणते, "पाहा, शरमेने हा तोंड फिरवतो आहे. आपण त्याला आणखी लाज आणूं. त्याचा अहंकार उघडा पाडूं." आणि म्हणून तिच्या आदेशावरून सर्वजण गुडघे टेकून कोरिओलेनसपुढे उभे राहतात. ती कोरिओलेनसला बजावते, "हा आमचा शेवटचा प्रयत्न आहे. या लहान मुलाला शब्दांनी आपलें मनोगत सांगतां येत नाही. परंतु त्याला काय हवें आहे हें त्याने प्रार्थनेसाठी गुडघे टेकून आभाळाकडे दोन्ही हात दीनवाणीपणाने वर केले आहेत, त्यावरूनही तुला कळेल. एवढ्यानेही आमच्या मागण्यांतील न्याय तुझ्या ध्यानांत येत नसेल तर मग तूं आमची मागणी नाकारणार हें निश्चित."

असें म्हणून ती उठते, बाकीच्यांना उठविते आणि म्हणते, "चला, जाऊं या आपण. हा चांडाळ खास माझ्या पोटचा नाही. कोणी व्होल्स स्त्रीच याची आई असली पाहिजे. चला. आपण यांचीं कोणी नाही. आता यापुढे रोमला आग लागेपर्यंत माझी वाचा बंद. त्या वेळींच मग शब्द जे बोलायचे ते मी बोलेन."

स्तब्धताच अधिक बोलकी --

झणकाऱ्याने ती जाऊं लागते. परंतु तिचा हात धरून कोरिओलेनस तिला थांबवतो आणि कांही क्षण न बोलतां नुसता स्तब्ध राहतो. त्याच्या अंतःकरणांतील अत्यंत प्रबळ खळबळ या स्तब्धतेशिवाय इतक्या सुंदर रीतीने इतर कशानेही व्यक्त झाली नसती. अखेर दाबून ठेवलेलें तें तुफान सगळे बांध फोडून बाहेर पडतें; "आई, आई, काय हा प्रसंग मांडला आहेस तूं. पाहा, पाहा, आभाळांत देव या अस्वाभाविकतेला तिरस्काराने हसत असतील" असा तळमळीचा आवेग त्याच्या तोंडून बाहेर पडतो.

कोरिओलेनसचा चांगुलपणा जागा होतो —

येथे या करुण नाट्याचा सर्वांत करुण प्रसंग आहे. कोरिओलेनसच्या श्रेष्ठतेचेंही येथे खरें दर्शन आहे. त्याचे सर्व सात्त्विक भाव या क्षणीं पूर्ण जागृत झाले आहेत. क्षणभर त्याच्या अंतःकरणांतील अहंकारादि सर्व दोष पार विरघळून, लोपून गेले आहेत. त्याच्या आईने आपल्या अमोघ युक्तिवादाने आणि अपूर्व चातुर्याने त्याला नुसता पराभूतच केला आहे असें नव्हे; तर त्याच्या ठिकाणचा चांगुलपणा जागविला आहे. पण या चांगुलपणाला आता अधिक चांगलीं फळें येण्याचा संभव मुळीच उरलेला नाही. रोमचें रक्षण व्हॉल्युमिनाने केलें खरें. पण कोरिओलेनसला वांचविण्याला ती समर्थ झाली नाही. कोरिओलेनसलाही याची जाणीव आहे. आता यांत आपला अंतच बहुतांशीं निश्चित आहे हें त्याने चांगलें ओळखलें आहे. आणि तरीही जागृत झालेली सद्भावना त्याने डावलली नाही. आईच्या म्हणण्याला मान्यता देऊन लेखी हुकूमच देऊन त्याने तिची रवानगी केली आणि सत्कृत्य केल्याच्या समाधानाने त्याने पुढे येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची सिद्धता केली. त्याच्या मनांतील सर्व किल्मिष नाहीसें होऊन तें किती विशुद्ध झालें होतें याचा प्रत्यय त्याच्या या प्रवेशांतील शेवटच्या उद्गारावरून येतो. तो म्हणतो, "बायांनो, लोकांनी देवळें बांधून तुमची पूजा केली पाहिजे. साऱ्या इटलींतील आणि इटलीच्या सर्व मित्र प्रदेशांतील तरवारी एकत्र आल्या असत्या तरी त्यांच्यामध्ये हा असा तह घडवून आणण्याचें सामर्थ्य नव्हतें."

करुणेचाच उद्भव—

म्हणून कोरिओलेनस जरी म्हणाला की, देव आईच्या या प्रार्थनाप्रसंगाला

तिरस्काराने हसतील, तरी तें खरें नाही. देवांच्या आणि आपल्याही डोळ्यांत करुणेचे अश्रूच उभे राहतील. आतापर्यंतच्या कोरिओलेनसच्या उद्दाम आणि अविवेकी वर्तनाचा क्षणभर आपल्याला विसर पडेल. आणि त्या त्याच्या वृत्तीमुळे एकंदर होणारी परिस्थिति अपरिहार्यच होती अशी जाणीव असूनही, याहून कांही निराळें झालें असतें तर, अशी हळहळच आपल्याला वाटेल व हा संसार किती विचित्र आहे अशीच भावना जागृत होईल. सहानुभूतिपूर्ण करुणाच त्याच्याबद्दल गाढपणें आपल्या ठिकाणीं उद्भूत होईल.

कारण, त्याच्या सत्कृत्यांचें फळ त्याला मिळणें अशक्य होतें. त्यानें रोम जिंकलें असतें तरी त्याचें वैभव संपणारच होतें. ऑफिडियसनें हें चांगलें ओळखलें होतें. कारण रोमची जनता त्याची कायमची शत्रू झाली असती; आणि व्होल्स लोक तर जात्याच त्याचे शत्रू होते. तेव्हा जगांत त्याला कोणी मित्र न उरून तो असहायच होणार होता. झाल्या बनावाने रोमची थोडी सहानुभूति त्याला मिळण्यासारखी असली तरी ती प्रत्यक्षांत उतरण्यापूर्वीच त्याचा काटा काढण्याला ऑफिडियस तयार होता. रोमचा कब्जा मिळत असतांना चार बाया बापड्यांच्या डोळ्यांतील आसवांना लोभावून त्याने व्होल्स लोकांचा विश्वासघात केला असा आरोप ठेवायला ऑफिडियसला अवसर मिळाला होता; आणि तडकाफडकी, लोकांचा थोडाफार विरोध होत असतांनाही, त्याचा वध करून टाकण्याइतकी सिद्धता आणि हिंमत दोन्ही ऑफिडियसजवळ होतीं.

तसा त्याने कोरिओलेनसचा वध केला हें कोरिओलींतील श्रेष्ठींना सर्वांनाच रुचलें असें नाही. तो मेल्यावर इतक्या श्रेष्ठ माणसाचें शव क्वचितच पाह्यला मिळेल असेंच सर्वसाधारण मत पडलें. परंतु गोष्ट घडून गेल्यानंतर ऑफिडियसशीं विरोध मांडण्याची सहजच त्यांची इच्छा नव्हती. म्हणून, "ऑफिडियसचा दोष असला तरी कोरिओलेनसच्या उतावीळपणाच्या व उद्धटपणाच्या वागणुकीमुळे हा ऑफिडियसचा दोष पुष्कळ क्षम्य ठरतो" असें म्हणून श्रेष्ठी त्या अपरिहार्य घटनेवर पडदा टाकतात. कारण या शेवटच्या प्रसंगींही दरबारांत कोरिओलेनसचा मूळचा उद्दाम स्वभाव इतक्या तीव्रतेने व्यक्त झालेला असतो की, त्याच्याविषयी नुकताच जिव्हाळा उत्पन्न झालेल्या आपणाला सुद्धा वाटल्यावांचून राहत नाही की, "काय म्हणावें आता या गृहस्थाच्या अविचारीपणाला ! इतकें होऊनही याचे डोळे उघडत नाहींत आणि प्रसंग समजून कौशल्याने त्यांतून स्वतःला सोडवून घेण्याची बुद्धि याला सुचत नाही."

प्रकरण दहावें

राजा लिअर

शेक्स्पीअरच्या चार श्रेष्ठ करुण नाटकांपैकी राजा लिअर हें नाटक श्रेष्ठतम आहे कीं नाही याबद्दल दुमत होणें शक्य आहे. परंतु या नाटकांत भीषणतेचें जें दर्शन घडतें तसें आणि तितक्या प्रमाणांत त्याच्या दुसऱ्या कोणत्याही नाटकांत घडत नाही असें मात्र निःसंदेह म्हणतां येईल. अखेरपर्यंत या नाटकांत मेलेल्या माणसांची संख्याच आठ एवढी मोठी आहे. त्याशिवाय एकजण मरत नसला तरी संसारत्याग करून निघून जातो. हे जे मृत्यू होतात तेही अत्यंत भीषण पद्धतीने. परंतु नाटकांतील भीषणता नुसत्या मृत्यूमध्येच आढळत नाही; तर प्रत्यक्ष जीवनामध्ये लिअर आणि ग्लॉस्टर यांना ज्या भयाण यातनांच्या खाईतून जावें लागतें त्यांतील भयाणपणा चित्ताचा थरकांप करणारा आहे.

तितकीच भीषणता या नाटकांत शेक्स्पीअरने आपणापुढे उभ्या केलेल्या लिअरच्या दोन वडील मुलींच्या स्वभावचित्रणामध्ये आहे. वास्तविक शेक्स्पीअरचीं बाकीचीं सर्व नाटकें – नुसतीं करुण नाटकेंच नव्हे तर सर्वच नाटकें – पाहतां शेक्स्पीअर हा स्त्रियांबद्दल पक्षपाती आहे, स्त्रियांचे दोष दाखवितांनासुद्धा तो हळुवार बनतो असें आढळून येतें. हा स्त्रियांबद्दल पक्षपाती नाटककार गॉनेरिल आणि रेगन यांच्यासारख्या दोन पाषाणहृदयी हडळी आपल्यापुढे उभ्या करतो, त्या वेळीं मन स्तिमित होऊन जातें आणि कोठे एवढा तीव्र आघात त्याच्या हृदयावर कोणा स्त्रीने केला असेल अशी विचारणा मन विषण्ण करून टाकते.

उपकथानकाची जोड —

अशा या भीषण नाटकाचा आपण आता विचार करणार आहों. आणखीही एक फरक या नाटकांत विशेष जाणवतो. हॅम्लेट, मॅकबेथ आणि ऑथेल्लो या नाटकांत नाही अशी गोष्ट शेक्स्पीअरने राजा लिअरमध्ये निराळी केली आहे; ती म्हणजे लिअरच्या कथेशीं एकरूप मानतां न येण्यासारखें एक उपकथानक. करुण नाट्याचा नायक लिअर याच्या करुण विपाकाला कारण त्याचा अविचारी वेडेपणा होता; त्याच्या कृतघ्न आणि निर्घृण मुलींनी त्याला त्या वेडेपणाचें फार विदारक प्रायश्चित भोगायला लावलें; प्रत्यक्ष जीवनांत आणि मृत्यूच्या रूपानेही; या एवढ्या एकसूत्र कथेवर नाटककार थांबत नाही; तर डयूक ऑफ ग्लॉस्टर, त्याचा लग्नाच्या पत्नीपासून झालेला सत्प्रवृत्त मुलगा एडगर आणि कुमारी मातेपासून झालेला त्याचाच दुष्ट मुलगा एडमंड यांचें एक, पुष्कळसें

लिअरच्या कथेशीं सदृश असलेलें परंतु त्या कथेशीं एका सूत्रांत बांधण्याचें मुळीच प्रयोजन नसलेलें, मुख्य कथानकाच्या जोडीजोडीने, समान अंतरावरून चालणारें, परंतु, किंवा त्यामुळेंच, मुख्य कथानकाशीं केव्हाच एकरूप न होणारें कथानक या नाटकांत त्याने उपयोजिलें आहे.

हें नाटक तरीही लिअरचेंच —

त्यामुळेच बहुधा हें नाटक लिअर या व्यक्तीच्या करुण विपाकाचें चित्र आहे की, कन्यापुत्रांच्या अनैसर्गिक कर्तव्यच्युतीचे आणि कृतघ्नपणाचे घोर परिणाम दाखविणारें हें नाटक आहे असा मतभेद रसिकांमध्ये झाला आहे. शेक्स्पीअरचा फ्रेंच भाषांतरकार ह्यूगो याने हा दुसरा पक्ष – की कृतघ्न कन्यापुत्रांमुळे झालेल्या कुटुंबविनाशाचें हें नाटक आहे – मोठ्या हिरीरीने पुरस्कारिला आहे. उलट त्याचा पिता, प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्यूगो याच्या मनावर कॉर्डेलियाच्या मुग्ध परंतु अत्यंत स्निग्ध अशा उदारवृत्तीचा एवढा मोठा परिणाम झाला आहे की, हें सर्व नाटक कॉर्डेलियाची यथायोग्य ओळख श्रोत्या–वाचकांना करून देण्यासाठीच केवळ लिहिलेलें आहे असा आग्रह त्याने धरलेला आहे.

गडकऱ्यांच्या एकच प्याल्याबद्दल तें दारूचें नाटक आहे असा आग्रह धरला जातो; तर तें सिंधूच्या करुण परिपाकाचें नाटक आहे असाही पक्ष मांडला जातो; आणि स्वतः नाटककार "प्रत्येक मोहाचा पहिला प्रसंग टाळला पाहिजे" या तत्त्वाचा आविष्कार करण्यासाठी आपण लिहीत आहों या भावनेने भारलेला आहे. परंतु अखेर तेथेंही तें नाटक उपकथानकाचे अनुबंध तोडूनही सुधाकराचेंच नाटक निर्विवादपणें होतें, तसेंच हें नाटकही राजा लिअरचेंच नाटक आहे याबद्दल एकूण सर्व नाटक पाहिल्यावर एवढीही शंका राहत नाही. मध्यबिंदू तो आहे. आणि अखेर जर कोणाबद्दल अतिशय हळुवार करुणा आपल्या हृदयांत उचंबळत असेल आणि डोळ्यांत अश्रू झरझर वाहत असतील तर लिअरबद्दलच. शेक्स्पीअरला याबद्दलची जाणीव निःसंशय आहे; शेवटच्या प्रवेशांत कॉर्डेलियाचें प्रेत स्वतःच्या हातावर घेऊन लिअर आल्बनीच्या तंबूत आला असतांना एक दूत वार्ता येऊन येतो की, एडमंड – ग्लॉस्टरचा अनौरस पुत्र – मेला; त्या वेळीं आल्बनीच्या तोंडीं त्याने उद्गार घातला आहे की, "इथें जें घडलें आहे त्यापुढे या वार्तेची किंमत कस्पटासारखी आहे!" आणि अखेर या प्रकरणाचा त्यांतल्या त्यांत बरा शेवट करावा या बुद्धीने लिअरच्या ह्यातीअखेरपावेतों राज्य लिअरच्या स्वाधीन करायची तयारी आल्बनी दर्शवितो.

परंतु दैवाची निर्घृणता – अथवा सृष्टींतील घटनांची अपरिहार्य पण करुण परिणति अशी की, आल्बनीच्या या भाषणानंतर लिअर क्षणभरांतच इहलोक सोडतो, आणि जगांतील त्रिविध तापांतून कायमचा मुक्त होतो, आपल्या मनावर हा शेवटचा दुर्धर, भीषण ठसा ठेवूनच नाटककार नाटक संपवितो; एवढेंच नव्हे तर "या सर्व घटनां-

तील जास्तींत जास्त दुःखभार सर्वांत वृद्ध माणसानें म्हणजेच लिअरने – सोसलेला आहे; आम्हां तरुण माणसांना इतका प्रचंड दुःखभार सहन करवणारही नाही आणि तो सहन करीत इतका दीर्घकाल जगण्याचीही आम्हांला ताकद नाही " या आल्बनीच्या शेवटच्या वाक्यानंतरच शेवटचा पडदा त्यांने पाडला आहे.

पण हें आपण नाटकाच्या अखेरचें बोलूं लागलों. त्यापूर्वी सुरुवातीपासून राजा लिअरचें या नाटकांतील चरित्र खरोखर आपणांस पाहावयाचें आहे. त्या आपल्या कामाला आता आपण लागूं या.

या नाटकांत शेक्स्पीअर अगदी सुरुवातीपासूनच कथानकाला एकदम वेगाची गति देतो; नाटकाचें साध्य लगोलग स्पष्ट करतो, रेंगाळत राहत नाही. कोरिओलेनसमध्ये नाट्यसंघर्षाची ही पकड लगोलग स्पष्ट झाली नाही. लिअरमध्ये मात्र त्याचें हें नेहमीचें गतिमान तंत्र सुंदर व्यक्त होतें.

अनर्थपरंपरेची ठिणगी—

लिअरचा विचार आपल्या राज्याची वाटणी करण्याचा आहे हें ओझरतेंच आपल्याला केंट आणि ग्लॉस्टरचा डयूक यांच्या संभाषणांत कळतें न कळतें तोच, त्या वाटणीचा प्रवेश शेक्स्पीअर आपल्यापुढे उभा करतो आणि त्या प्रवेशांतच जणू अनर्थपरंपरेची ठिणगी पडते. फक्त त्यापूर्वी अगदी थोडक्यांत, ग्लॉस्टरच्या डयूकचे दोन मुलगे आहेत, त्यांत मोठा लग्नाच्या पतीपासून झालेला व दुसरा कुमारी मातेपासून त्यालाच झालेला, त्यांपैकीं मनापासून लक्ष ग्लॉस्टरचें या दुसऱ्या मुलावर अधिक आहे, ही उपकथानकांतील संघर्षाची सूचना तेवढी आपणाला मिळालेली असते आणि आपण लिअरच्या दरबारांत हजर होतों.

लिअरबरोबर तेथे त्याच्या तिघी मुली, गॉनेरिल, रेगन व कॉर्डेलिया या असतात. कॉर्नवॉल आणि आल्बनीचे डयूकही असतात. त्यांमध्ये आल्बनीवर लिअरचें लक्ष अधिक असलें तरी न्यायाप्रमाणे त्या दोघांत कमीजास्त करणें लिअरला कठीण आहे, असें ग्लॉस्टरने आपल्याला आधीच सांगितलेलें असतें. कां कोण जाणें, लिअरला आपल्या मनांतलें ग्लॉस्टरच्या देखत बोलायचें नसतें; म्हणून पलीकडे फ्रान्स आणि बर्गंडी यांचे राजे असतात त्यांच्या सरबराईसाठी म्हणून लिअर त्याची रवानगी करतो आणि मग आपल्या विश्वासांतल्या मंडळीशीं आपल्या मनांतला बेत स्पष्ट करतो.

लिअरने आपल्या राज्याचे तीन सारखे भाग केलेले असतात; त्यांतला कोणाला कोणता भाग द्यायचा एवढेंच आता त्याला ठरवायचें असतें. आपल्या जावयांना हुंडा म्हणून तो हे भाग ठरवून देणार होता. हेतु असा की, मागाहून तंटे न व्हावेत. शिवाय आजच्च या गोष्टीची निकड अशी होती की, कॉर्डेलियाला मागणी घालण्यासाठी फ्रान्सचा राजा आणि बर्गंडीचा डयूक हे अलीकडे वारंवार खेपा घालीत होते आणि

आज आता त्यांपैकी कोणाची तरी निवड करणें निकडीचें झालें होतें. म्हणून या प्रसंगाने आपलें सर्व राज्य, सर्व अधिकार आणि जबाबदाऱ्या संपवून टाकण्याचें लिअरच्या मनांत आलें होतें.

सहज केलेली गंमत घातक ठरते —

अर्थात इतकें वय झालें असतांना लिअरने निवृत्त व्हावें यामध्ये अस्वाभाविक कांहीच नव्हतें. पण त्याने हें करतांना म्हातारपणची लहर म्हणून एक सहज थोडी गंमत म्हणून जी केली ती मात्र, कदाचित अगदीच अभावितपणें, घातक ठरली. तिघी मुली; त्यांमध्ये धाकट्या कॉर्डेलियावर त्याचें सर्वांत अधिक प्रेम. म्हणून त्याने मोठ्या खेळीमेळीने आणि विश्वासानेच विचारायला सुरुवात केली की, कोणत्या मुलीचें आपणावर किती प्रेम आहे. या प्रेमाचें आश्वासन घेऊन मग तो त्या त्या मुलीला तिचा तिचा हिस्सा देणार होता.

क्रमाप्रमाणे मोठ्या मुलीला त्याने प्रथम प्रश्न विचारला. गॉनेरिलने आपल्या प्रेमाचें इतक्या अतिशयोक्तीनें वर्णन केलें की, धाकटी कॉर्डेलिया मनांतल्या मनांत भारावून गेली. आपल्याला कांही आपल्या प्रेमाचें अशा शब्दांत वर्णन करण्याचें सामर्थ्य नाही हें तिला ठाऊक होतें आणि म्हणून मनांतून प्रेम करावें आणि स्वस्थ बसावें याहून आपल्याला मार्ग नाही हें तिला जाणवत होतें.

गॉनेरिलनंतर रेगनची पाळी. तिने आपल्या प्रेमप्रदर्शनांत थोरल्या बहिणीवर ताण केली. तिच्या भाषणामुळे पुन्हा एकदा कॉर्डेलियाचें हृदय थरकलें. यापुढे आपल्या प्रेमाला कोण विचारतो, अशी आशंका तिला भासली. परंतु या बहिणींची माया नुसती तोंडदेखली आहे; आपली माया अंतःकरणापासूनची आहे, या जाणिवेने तिने आपल्या मनाचें समाधान करून घेतलें.

लिअर पहिल्या दोघी मुलींवर खूप झाला. त्याने त्यांचे मनांत योजलेले वाटे त्यांना, आपल्या दोघी मुलींना आणि त्यांच्या नवऱ्यांना, आल्बनी व कॉर्नवालच्या ड्यूकना देऊन टाकले. आतां राहिली कॉर्डेलिया. तिला लिअरने विचारलें, 'बोल; आता तुला काय म्हणायचें आहे?"

त्यावर "मला कांही सांगायचें नाही" हें कॉर्डेलियाचें त्रोटक आणि लिअरला तुटक वाटलेलें उत्तर ऐकून लिअर हतबुद्धच झाला. "तुझ्या या 'कांही नाही'ला माझेंही 'कांही नाही' हें उत्तर येईल असें त्याने तिला बजावलें.

अर्ध्या प्रेमावर पतीचा अधिकार —

त्यावर कॉर्डेलियाने मोजक्या शब्दांत त्याला सांगितलें, माझ्या अंतःकरणांत जें आहे त्याचा शब्दांत मला बकवा करतां येत नाही हें माझें दुर्दैव होय. पण कन्या या नात्याने माझें जेवढें प्रेम तुमच्यावर असावें तेवढें माझें तुमच्यावर आहे. जास्त नाही

किंवा कमी नाही.” अशा त्रोटक बोलण्याने तुझा हिस्सा तुला मिळणार नाही हें लिअरने बजावलें असतां, अल्पभाषी कॉर्डेलियाच्याही तोंडून अत्यंत न्याय्य अशी थोडीशी विस्तृत वाणी बाहेर उमटली. कन्या या नात्यापेक्षा मी तुमच्यावर अधिक प्रेम कसें करूं शकेन हा प्रश्न तिने केला. माझ्या बहिणी म्हणतात तें खरें असेल तर मग त्यांनी लग्नें कशीं केलीं? हा चपखल प्रश्न करून त्या बहिणींप्रमाणे बतावणी आपण करूं शकत नाही हें तिने स्पष्ट केलें. लग्न झाल्यावर माझ्या अर्ध्या प्रेमावर माझ्या पतीचा अधिकार असून बाकीच्यावरच पित्याचा अधिकार आहे हें तिने निक्षून सांगितलें. एवढेंच नव्हे तर त्यावर “इतकी अजाण आणि तरी इतकी निर्दय तूं कशी?” असा तिचा अधिक्षेप लिअरने केला त्या वेळींही “अजाण खरी, परंतु खरें बोलणारी” असें तिने दिलेलें निर्धारानें उत्तर लिअरच्या संतापाला कारण झालें व “तर मग हुंडा म्हणून तुझ्या सत्यवादित्वावरच तूं समाधान मान” असा त्याने निर्णय केला.

विवेकभ्रष्ट लिअर —

अर्धा प्रवेश सुद्धा झाला नाही तोच या सर्व बीजभूत घटना शेक्स्पीअरने केवढ्या झपाट्याने रंगभूमीवर उभ्या केल्या आहेत. त्याचें हें सामर्थ्य पाहून मन चकित आणि विनम्र होतें. वास्तविक लिअरने एवढ्यावरून इतकें भडकून जायचें कारण नव्हतें. परंतु म्हतारपणामुळे असो, किंवा पुढे आपणाला दिसून येगार आहे त्याप्रमाणे आज-पर्यंतच्या ऐशी वर्षांच्या आयुष्यांत त्याच्या होला हो आणि नाहीला नाही असें कोणी न म्हणण्याचा प्रसंग हा अगदी पहिल्या प्रथमच आणि तोही त्याच्या सर्वांत लाडक्या मुली-कडून घडल्यामुळे असो, त्याचा तोल सुटला, तो विवेकभ्रष्ट झाला.

त्या भरांत कॉर्डेलियाला तो हवें तें वेडेंवाकडें बोलूं लागला. केंटच्या अर्लने त्याला भानावर आणण्याचा प्रयत्न केला. रांजा लिअरविषयी सर्वांत जास्त जिव्हाळा बाळग-णारा असा हा त्याचा सहकारी उमराव होता. लिअरला सावरून धरण्याचा त्याने जो जो प्रयत्न केला तो तो लिअरचा तोल अधिकच सुटला आणि अखेर त्याने केंटला हद्द-पारीची शिक्षा सुनाविली. त्यावर जातांना केंटने जे उद्गार काढले की, “ठीक आहे, जातों मी; पण मी हद्दपार झालों असें मी समजत नाही; स्वतंत्र झालों मी, असेंच मी म्हणतों; हद्दपारी खरी या राज्यांत राहणारांच्याच नशिबीं आहे,” त्यामध्ये पुढच्या दारुण भवितव्याची केवढी घोर सूचकता आहे. त्याचप्रमाणे दोघां वडील मुलींना जेव्हा जातां जातां तो तळमळीने “तुमचे शब्द – तुमचें प्रेमदर्शन खरें करा” असें बजावतो, त्या वेळी त्याच्या हृदयांत उत्पन्न झालेली पुढच्या प्रसंगांची आशंका आप-ल्याही हृदयाला जाणवल्यावांचून राहत नाही.

अहंकाराने बेभान झालेला लिअर —

पण या सगळ्याचा अर्थ समजण्याइतकी, आपल्या एकमेव सच्च्या सहकाऱ्याला

मुकून आपण स्वतःला किती दुर्बल करून घेत आहोंत याची समज येण्याइतकी लिअरची वृत्ति कोठे भानावर होती ! त्याने फ्रान्सचा राजा आणि बर्गंडीचा डयूक यांना बोलावून घेऊन सर्व परिस्थिति त्यांच्यापुढे मांडली. लिअर हुंडा म्हणून संकल्पिलेला राज्याचा तिसरा हिस्सा देणार नाही याची खात्री झाल्यावर बर्गंडीच्या डयूकने कार्डेलियाचा स्वीकार करण्याला नकार दिला. सहसा न बोलणाऱ्या कॉर्डेलियाने त्याला चपकारण्याला मात्र कमी केलें नाही. " ज्याचें द्रव्यावर अधिक प्रेम आहे अशा माणसाची पत्नी व्हायची माझीही तयारी नाही " हे शब्द तिच्या सात्त्विक निर्धाराच्या वृतीचे द्योतकच होते.

फ्रान्सच्या राजाला तिची ही वृत्ति अत्यंत विलोभनीय वाटली; म्हणून त्याने मोठ्या आनंदाने आणि प्रेमभराने तिचा स्वीकार केला. " शंभर बर्गंडीचे डयूक आले तरी त्यांच्या हातीं, जिचें मूल्य या लोकांना कळूं शकत नाही अशी माझी होणारी ही बहुमोल कुमारी मी पडूं देणार नाही " असें म्हणून तो तिला त्या कृतघ्न मंडळीचाही सद्भावनेने निरोप घ्यायला सांगतो. आणि " माझी ही मुलगीच नव्हे, तिचा माझा कांही संबंध नाही " असें लिअरने सांगितल्यावर लिअर, सर्व उमराव आणि नोकरचाकर निघून जातात.

मागे राहतात तिघी बहिणी आणि फ्रान्सचा राजा. कॉर्डेलिया खिन्नतापूर्वक बहिणींचा निरोप घेऊं पाहते. वडिलांना मी तुमच्या स्वाधीन करीत आहें; त्यांचा नीट सांभाळ करा, असें ती त्यांना सांगूं जाते. परंतु आमचें कर्तव्य तूं नकोस आम्हांला शिकवायला असा त्या तिचा अधिक्षेप करतात आणि तिने कृतघ्नपणाने स्वतःवर ओढवून घेतलेल्या या राज्यहीनतेबद्दल तिचा धिःकार करतात. कृतघ्न कोण हें काळच दाखवील, असें म्हणून कॉर्डेलिया त्यांचा निरोप घेऊन फ्रान्सच्या राजाबरोबर जाते.

कृतघ्न कोण हें ठरायला क्षणही लागत नाही—

कृतघ्न कोण याचा निवाडा करायला यापुढे एक क्षणभरसुद्धा थांबायला शेक्स्पीअरने आपल्या वाचकांना लावलें नाही. कारण दोघी बहिणी मागे राहतात त्यांची लगेच पुढचीं खलबतें सुरू होतात. शेक्स्पीअरने केवढा मोठा प्रचंड धक्का या ठिकाणीं आपल्या श्रोत्यावाचकांना दिला आहे. प्रेमाचें गोड प्रदर्शन करतांना ओली झालेली जीभ वाळलीसुद्धा नसेल तोच आणि कॉर्डेलियावर कृतघ्नतेचा आरोप करून निमिषही लोटलें नाही तोच या दोघी मुली बापाची अडचण कशी संभाळावी किंवा दूर करावी याचा विचार करूं लागतात – कट रचूं लागतात. एकेक महिना तो एकेकीकडे राहणार होता. परंतु तो प्रत्यक्ष तसा राहूं लागण्यापूर्वीच त्याच्या त्या राहण्याची नुसती कल्पनाही त्यांना जड होऊं लागली होती. म्हातारपणामुळे आलेला चिडचिडेपणा आणि चंचलता या गोष्टी त्यांना जाणवूं लागल्या होत्या. लहरीमध्ये आणि रागामध्ये केंटशीं त्याने जसें वर्तन केलें तसें आपल्याशींही तो करील ही भीति त्यांना दचकावूं लागली

होती. म्हणून आपल्या बापाला आपला अधिकार अशा रीतीने वापरतां येऊं नये आणि आपणा बहिणींचा अधिक्षेप करतां येऊं नये, यासाठीं काय केलें पाहिजे याचा त्या, लिअरची पाठ वळते न वळते तोच विचार करूं लागल्या होत्या.

त्यांच्या या अघोरी वृत्तीमुळे आपलें मन अतीव स्तिमित होतें. त्याचप्रमाणे एका एवढ्याशा प्रवेशांत नाटकाचीं सर्व सूत्रें स्पष्ट करून कथानकाला एवढी मोठी कलाटणी देण्याच्या शेक्स्पीअरच्या या सामर्थ्याचें आपल्याला कौतुक वाटतें.

उपकथानकावर ओझरती नजर —

मुख्य कथानकाशीं समांतर चालणारें पितृद्रोहाचें दुसरें एक कथानक शेक्स्पीअरने या नाटकांत उपयोजिल्याचें सांगितलें, त्याचें दर्शन लगोलग दुसऱ्याच प्रवेशांत होतें. आपल्याला मुख्यतः लिअर राजाच्या स्वभावपरिणतीशीं कर्तव्य असल्यामुळे दुसऱ्या प्रवेशांतील त्या उपकथानकाच्या प्रसंगावर अगदीच ओझरती नजर टाकून आपण पुढे जाऊं. वेकायदेशीर संबंधापासून झालेला ग्लॉस्टरचा मुलगा एडमंड हा ग्लॉस्टरच्या कायदेशीर मुलाविरुद्ध, त्याच्या हातचें म्हणून बनावट पत्र तयार करून व दाखवून बापाला चिथावीत आहे असा हा प्रसंग आहे. "या म्हाताऱ्या माणसांच्या बंधनांत आपण तरुण लोक राहतों म्हणून त्यांची सत्ता आपल्यावर चालते; नाहीपेक्षा हा अधिकार गाजविण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं मुळीच नसतें" या तत्त्वज्ञानाच्या पायावर आपल्या पित्याचा नाश करून आपण स्वतःला संसारांत प्रतिष्ठेचें स्थान मिळविलें पाहिजे, अशी त्या भावाची म्हणून भूमिका त्या बनावट पत्रांत मांडलेली असते. त्या भावाशीं – म्हणजे एडगरशीं – प्रत्यक्ष बोलून त्याचे हे विचार त्याच्या तोंडून, आडजागीं उभ्या राहिलेल्या आपल्या बापाला ऐकविण्याचें कार्य एडमंड आपल्या अंगावर घेतो; एवढा कथाभाग या प्रवेशाच्या पूर्वार्धांत आहे. तर उत्तरार्धांत खुद्द एडगरला एडमंड भ्रमांत पाडतो आहे. वडील तुझ्यावर फार संतप्त आहेत, तेव्हा कांही काळ तूं वडिलांसन्मुख जाऊंच नये, त्यांना टाळावें असा सल्ला तो त्याला मोठ्या साळसूदपणाने देतो. "कोणातरी दुष्ट माणसाने वडिलांचे कान चावलेले असले पाहिजेत," हें एडगरचें निदान अगदी यथार्थच असतें. पण त्याच दुष्ट माणसाच्या काव्यांत तो फसत असतो. वडिलांसमोर त्याने जाऊं नये; त्याला पाहतांच ते त्याचा घात करतील हें तर त्याला एडमंड सांगतोच. परंतु बिगरहत्यारी अगदी मुळीच हिंडूं नकोस असेंही एडमंड त्याला बजावतो; तुझ्याबद्दल सर्वच लोक बिथरलेले दिसतात, धोका आहे, अशी भीति एडगरच्या मनांत तो उभी करतो.

अशा रीतीने एडमंडच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे, "भोळा बाप आणि उदार भाऊ! एक कोणाबद्दलही बावगा संशय न घेणारा आणि एक वेडगळ प्रामाणिकपणा-मुळेच दुष्ट भावाच्या कारस्थानाला बळी पडलेला" अशा दोघांनाही एडमंड आपल्या जाळ्यांत घेरून पुढचीं पावलें टाकायला सिद्ध होतो.

एडमंडने या कटाच्या मार्गाला लागावें याला कांही तरी कारण आहे असें म्हणायला तरी जागा होती. शूर, सुंदर आणि बुद्धिमान असूनही, अविवाहित मातेचा मुलगा म्हणून त्याला समाजांत मान्यतेचें स्थान मिळण्यासारखें नव्हतें; बापाच्या मिळकतीचा वारसा मिळण्यासारखा नव्हता. म्हणून कोणत्याही उपायाने या गोष्टी मिळवाव्या अशी दुर्दम्य इच्छा त्याला व्हावी हें सहज होतें. लिअरच्या मुलीची –गॉनेरिलची – कांही ही स्थिति नव्हती. तिचें उच्च कुळांत लग्न झालें होतें. राज्याचा अर्धा हिस्सा तिला लिअरने आनंदाने दिला होता. तिच्या नवऱ्यावर लिअरचें अधिक प्रेम होतें. लिअर पुष्कळ म्हातारा होता आणि तो व त्याचे शेसवाशे सेवक यांना सांभाळण्याचा भार असह्य व्हावा अशी कांही गॉनेरिलची परिस्थिति नव्हती.

परंतु ज्या क्षणीं लिअरने तिला राज्याचा अर्धा हिस्सा दिला त्याच क्षणीं लिअर तिला किती नकोसा झाला होता, त्याच्या अधिकाराला पायबंद घालण्याचे तिचे वेत कसे सुरू झाले होते आणि आपल्या बहिणीलाही तिने या कटांत कसें ओढलें हें आपण पहिल्या प्रवेशाच्या शेवटीं पाहिलें आहे. त्याच्यापुढचें तिचें पाऊल आता तिसऱ्या प्रवेशांत आपण पाहतों.

म्हाताऱ्या माणसांचे लाड चालूं देतां कामा नये !

तिच्याकडे एक महिना लिअरने राह्यचें असतें. त्यापैकीं अजून पंधरा दिवसही पुरे झालेले नव्हते. तोच लिअरचें तिच्याकडे राहणें तिला असह्य झालें होतें. लिअरचा विदूषक दरबारी शिरस्त्याप्रमाणे कोणालाही कांहीही बोलण्याचा अधिकार असलेला. त्याबद्दल त्याच्यावर रागावल्यामुळे तिच्या कोणा सेवकाला लिअरने मारलें, हें तात्कालिक कारण गॉनेरिल सांगते. परंतु रात्रंदिवस त्याने आपल्यावर अन्याय चालविला आहे, अशी तिची मुख्य तक्रार आहे. त्याचे सेवक वीर घरांत दंगा माजवितात आणि लहानसहान गोष्टींवरून तो वर्दळीवर येतो; हें आता यापुढे चालू द्यावयाचें नाही असा तिने निर्धार केला आहे. त्यासाठी ती आपल्या नवऱ्याला विश्वासांत घेत नाही. तर स्वतःच्या विश्वासाच्या एका सेवकावर ती या कामीं जास्त भरवसा टाकते. ऑस्वल्ड त्याचें नांव. एडमंडने बनावट पत्रांत एडगरचें म्हणून जें मत मांडलें होतें त्याचाच उच्चार ती ऑस्वल्डजवळ करते. "हा म्हातारा, याला नाही उद्योग; स्वतःचा अधिकार त्याने आम्हांला देऊन टाकला असूनसुद्धा तो बजावण्याचा त्याचा सोस अजून संपत नाही. हीं म्हातारीं माणसें म्हणजे जणू लहान मुलें. त्यांचे हे असे लाड चालूं देतां उपयोगी नाही" असें म्हणून ती ऑस्वल्डला जाणूनबुजून लिअरकडे दुर्लक्ष करायला सांगते व तसाच आदेश त्याच्या हाताखालच्या सेवकांना द्यायला सांगते. मी स्वतः आता तो शिकारीहून आला म्हणजे त्याला भेटणारच नाही; आणि तूंही पहिल्यासारखा त्याच्यापुढे नाचूं नकोस. तुझ्यावर गुन्हा आला तर त्याची जबाबदारी माझी" असें ती त्याला चिथावते आणि अशाच तऱ्हेचें धोरण ठेवण्याबद्दल बहिणीलाही आपण ताबडतोब लिहिणार असें म्हणून तोऱ्याने जाते.

अनु 2430 नं. 1194
क्रमांक 92 राजा लिअर दि. 23.1.1964 ३५

चवथ्या प्रवेशांत लिअर शिकारीहून या प्रकारच्या स्वागताची चव चाखण्यासाठी परत येतो. तो येतो तोच केंट तेथे वेष व भाषा पालटून आलेला असतो. या एकनिष्ठ वीराने लिअरच्या संरक्षणार्थ हा हलका वेष पत्करलेला असतो. लिअर भुकेलेला असतो आणि जेवण होईपर्यंत केंटबद्दल आपल्याला राग आला नाही तर त्याला आपल्या नोकरींत ठेवून घेण्याचें तो ठरवितो.

आल्याबरोबर भोजनाची तजवीज नसल्यामुळे लिअर उतावीळ होतो; आरडाओरडा करूं लागतो. ऑस्वल्ड येतांच त्याच्या अंगावर वसकन जाऊन "माझी मुलगी कोठे आहे" असें विचारतो. परंतु ऑस्वल्ड, 'हो – हो' असें कांहीतरी पुटपुटून लिअरकडे लक्ष न देतांच निघून जातो. त्याने अधिकच संतापून, विदूषकाला आणि या 'बथ्थड' डोक्याच्या ऑस्वल्डला घेऊन येण्यासाठी आपल्या वीरांपैकी एकाला लिअर पाठवितो.

परंतु तो वीर निरोप घेऊन परत येतो की, ऑस्वल्डचें म्हणणें आपली येण्याची इच्छा नाही.

लिअरला समजलें आहे —

याचा अर्थ न समजण्याइतका कांही वेडा नाही लिअर. पण अनिष्ट हें नाहीच असें मानण्याकडे, तशी मनाची समजूत करून घेण्याकडे प्रत्येकाची प्रवृत्ति असते. त्या दृष्टीने ऑस्वल्डच्या या निरोपाबद्दल तो विस्मय प्रकट करतो. त्या वेळीं तो वीर आपल्या मनांतली कल्पना लिअरला स्पष्ट सांगतो की, अलीकडे या घरीं आपुलकीला फार मोठी ओहोटी लागली आहे.

तेव्हा लिअरही मान्य करतो की, तो आपल्या मनांतली आशंकाच स्पष्ट बोलतो आहे. तो आपल्या मनाची मात्र समजूत करून घेत होता की, हा केवळ आपल्या मनाचा संशयखोरपणा आहे म्हणून. अशा वेळीं लिअरला विदूषकाची आठवण मोठ्या तीव्रतेने होते. गेले दोन दिवस त्यांची गाठ पडलेली नसते. त्यावर केंट मुद्दामच नाजूकपणे कॉर्डेलियाचा प्रश्न काढावा या हेतूने म्हणतो,

"आमच्या ताईसाहेब फ्रान्सला गेल्यापासून विदूषकाने मनाला फार लावून घेतलें आहे."

पण उमजलें नाही – पीळ कायमच आहे —

परंतु त्या बाबतींतला लिअरचा पीळ या आठपंधरा दिवसांतल्या नव्या अनुभवानेही अजून कमी झालेला नाही. हें पाहून केंट तो विषय सोडून देतो. कॉर्डेलियाच्या नांवाच्या उल्लेखसुद्धा ऐकून घ्यायला अजून लिअर तयार नसतो. आणि विदूषकाला बोलवायला तो माणूस पाठवितो.

अशा वेळीं ऑस्वल्ड पुन्हा प्रवेश करतो. त्याला पाहतांच लिअर खवळून उठतो आणि विचारतो, "मी कोण आहे म्हणून समजतोस तूं?"

"आमच्या बाईसाहेबांचे वडील" हें त्यानें दिलेलें छद्मी उत्तर ऐकून लिअर अधिकच भडकतो आणि त्याला शिव्या देऊं लागतो. त्यावर त्याच्याकडे रोखून पाहत ऑस्वल्ड म्हणतो, "या असल्या शिव्या मी ऐकून घेणार नाही." तेव्हा त्याचा तो उद्धटपणा राजा लिअरला सहन होत नाही आणि तो त्याला मारतो; आणि ऑस्वल्डच्या तोंडून आणखी कांही शब्द बाहेर पडण्यापूर्वीच केंट त्याला ढुंगणावर लाथ मारीत मारीत तेथून हाकलून लावतो.

जन्मजात खुळेपणाशिवाय लिअरचे इतर सर्व किताब गेले! —

हें होतांनाच विदूषक तेथे येतो. आताच्या व आजपर्यंतच्या घटनांबद्दल त्या वेळीं त्याने उपरोधिकपणे लिअरची जी सुंदर हजेरी घेतली आहे ती रमणीय साहित्याचा एक नमुना म्हणून वाङ्मयांत चिरंतन राहील. केंटला तो आपली विदूषकाची टोपी देऊं करतो. कारण काय, तर ज्याच्यावर श्रेष्ठींची अवकृपा झाली आहे अशा माणसाचा पक्ष घेऊन भांडल्याबद्दल. शहाणीं माणसें असें करीत नसतात. त्याचें बोलणें लिअरच्या जिव्हारीं झोंबत असते; पण दरबारी शिरस्त्याप्रमाणे वाटेल तें बोलण्याचा विदूषकाला अधिकार होता. व्यंजनेने तो खुद्द लिअरलाच विदूषकाच्या – म्हणजे खुळ्या माणसाच्या स्थानीं बसवितो. "मला तूं खुळा म्हणतोस?" असें लिअरने विचारल्यावर तो जें उत्तर देतो तें किती समर्पक आहे पाहा. तो म्हणतो,

"तुझे इतर सर्व किताब तूं देऊन टाकले आहेस. हा किताब तेवढा जन्मापासून घेऊन आलास. तो तेवढा राहिला आहे आता तुझ्याजवळ."

वाटाणे काढून टाकलेलें फोलकट —

अशा रीतीने, आपला सर्वाधिकार देऊन टाकल्याबद्दल नाना रीतींनी विदूषक लिअरला छेडीत असतांनाच गॉनेरिल लाल होऊन तेथे येते. तिच्या कपाळावरचें आठ्यांचें दाट जाळें लिअरच्या नजरेंतून सुटत नाही. "अलीकडे तुझ्या कपाळावर आठ्या फारच जमा होऊं लागल्या आहेत" असें तो तिला पित्याच्या तोऱ्यांत टोचतोही. त्यावरही विदूषकाचा शेरा समर्पक आहे. तो म्हणतो, "एक वेळ अशी होती की, तुला हिच्या आठ्यांची तमा करायची गरज नव्हती. परंतु आता अन्य आकड्यांचा आश्रय नसलेलें तूं एक मोठें शून्य झाला आहेस. तुझ्यापेक्षा मी बरा. मी निदान विदूषक आहे. तूं येथे कोणीच नाहीस." परंतु गॉनेरिलच्या भयाने विदूषकही बोलणें बंद करतो आणि लिअरकडे बोट दाखवून म्हणतो, "हें पाहा वाटाणे काढून टाकलेलें फोलकट!"

हा वेळपर्यंत गॉनेरिलला बोलायला अवसरच मिळालेला नव्हता. आता ती आपला सगळा राग उसळून व्यक्त करते. विदूषकच केवळ नव्हे तर बाकीचे लिअरचे सेवकसुद्धा घरांत नुसता रात्रंदिवस धुमाकूळ घालतात; लिअरला हें सांगून उपयोग

होईल अशी कल्पना होती. पण आज तीही विफल झाली. कारण राजाचाच या सगळ्या धुमाकुळाला आणि बेशिस्तपणाला पाठिंबा आहे हें दिसून आलें. परंतु राजाने या दोषांकडे दुर्लक्ष केलें म्हणून त्याकडे सर्वचजण दुर्लक्ष करतील असें नाही. मग त्यामुळे जें करूं नये तें, म्हणजे राजाचा अपमान, करण्याचाही प्रसंग अपरिहार्य होईल; हें ती त्याला बजावते. तेव्हा त्याने जरा शहाण्यासारखें वागावें आणि अलीकडे अलीकडे आपला नेहमीचा सुस्वभावीपणा विसरून त्याच्या हातून जीं लहरी कृत्यें होतात तीं त्यानें थांबवावींत, असेंही ती स्पष्टच सुचविते.

लिअर नव्हे, लिरअची सावली —

या प्रकाराने लिअरचें डोकें जणू गरगर फिरूं लागतें. "राजा लिअर तो मीच का? या राजाशींच का ही मुलगी बोलते आहे?" अशी भ्रांति त्याला पडते. "अरे मी कोण आहे हें कुणीतरी मला सांगेल का?" असें तो भ्रांतपणाने विचारतो. त्यावर विदूषकाने तात्काळ त्याला टोला-दिला की, "लिअरची सावली!"

"हो, हें मला समजून घ्यायला पाहिजे. मी खुळ्यासारखा समजत होतों की, मला मुली आहेत म्हणून" असा भेदक उद्गार लिअरच्या तोंडून बाहेर पडतो. त्याच संतप्त अवस्थेंत तो गॉनेरिलशीं कृतक आदराने बोलूं लागतो. "आपलें नांव काय बाईसाहेब?" असा प्रश्न तो गॉनेरिलला करतो.

गॉनेरिलची धमकावणी —

हें नाटकी आदरप्रदर्शन म्हणजेही लिअरच्या अलीकडच्या लहरीपणाचेंच एक रूप आहे असें म्हणून गॉनेरिल त्याला आपल्या म्हणण्याचा नीट विचार करायला सांगते. त्याच्या सेवकांनी आधाशीपणाने आणि वैपयिकतेने घराला नुसतें खाणावळीचें आणि कुंटणखान्याचें स्वरूप आणलें होतें, याचा त्याने शहाणपणाने नीट विचार करावा आणि एवढी मोठी सेवकांची सेना ठेवण्याचें कांही कारण नाही हें ओळखून त्यांची संख्या कमी करावी. "आज मी माझी इच्छा मान्य करावी म्हणून तुम्हांला विनंति करीत आहे. पण तसें न झालें तर स्वतःच मला ती गोष्ट करावी लागेल" असें ती त्याला कांहीशा धमकावणीच्या स्वरांतच बजावते आणि जीं कांही थोडीं माणसें ठेवायचीं तींही सभ्य आणि तुमच्या म्हातारपणाला साजणारीं व तुमच्या परिस्थितीची नीट समजूत असणारीं असावींत, असेंही बंधन ती घालते.

संतापाचा असह्य आवेग —

लिअरला स्वाभाविकच हें सहन होत नाही. "ठीक आहे, मी तुला त्रास देऊं इच्छीत नाही; माझी आणखी एक मुलगी अहे; तिच्याकडे मी जाईन" असें म्हणून "वेळेवर उमज न पडणाऱ्या माणसाची दुर्दशाच व्हायची" या विचाराने आपण

लौकरच उमजलों अशी समजूत करून घेतो. तोच त्याचा जावई येतो. त्याला खरोखरच या प्रकाराची कांही कल्पना नसते. त्यामुळे "तुमचीही याला संमति आहे काय?" या लिअरच्या प्रश्नाला तो चटकन कांहीच उत्तर देऊं शकत नाही. त्यामुळे अधिकच संतप्त होऊन लिअर आपले घोडे तयार करायला सांगून गॉनेरिलला तिच्या कृतघ्नपणाबद्दल शिव्या देऊं लागतो. याचा अर्थ काय, या जावयाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून तो गॉनेरिललाच वाक्ताडन करतो. तिच्या मानाने कॉर्डेलियाचा दोष किती क्षुल्लक होता. परंतु तेवढ्याने आपण आपल्या साऱ्या प्रेमाला तिलांजली दिली याची तीव्र जाणीव त्याला होते आणि या डोक्याने हा मूर्खपणा माझ्या चित्तांत शिरविला, म्हणून संतापाने तो आपल्याच डोक्यावर आवेगाने मारून घेऊं लागतो.

माझा यांत कांही संबंध नाही, मला कांही माहितीही नाही, असें जावई म्हणत होता. परंतु संतापाच्या आवेगांत लिअर तिकडे नीट लक्ष देत नाही; आणि गॉनेरिलच्या पोटीं मूलच न जन्मो आणि जन्मलेंच तर तें तिच्यासारखेंच मातृपितृद्रोही जन्मो असा प्रखर शाप उच्चारून तो तावातावाने निघून जातो.

परंतु हा सारा प्रकार काय आहे हें गॉनेरिलकडून समजून घेण्याला आल्बनीला – जावयाला – अवसर मिळण्यापूर्वीच लिअर पुन्हा आणखीच भडकून तेथे परत येतो. कारण, त्याला न विचारतांच त्याच्या शंभर सेवकांपैकीं निम्म्यांना गॉनेरिलने रजा दिल्याचें समजून त्यासाठी गॉनेरिलची खरडपट्टी काढायची असते त्याला. त्याच्या डोळ्यांतून रागाने अश्रू वाहत असतात. परंतु अशा दुष्ट आणि निर्घृण मुलीच्या निमित्ताने डोळ्यांत अश्रू आणण्याची लाज वाटते असें म्हणून, डोळे पुसून तो पुन्हा तिला बापाच्या शापवाणीचें भय घालतो. आणि पुन्हा, "तूंच कांही माझी एकटी मुलगी नाहीस; दुसरीकडे मला याहून अधिक चांगली वागणूक मिळेल आणि माझा गेलेला अधिकार मीं पुन्हा परत मिळविलेला लौकरच तुला आढळेल" असें बजावून तो सेवकांसह पुन्हा निघून जातो.

लिअरबरोबरच नवऱ्याचाही अधिक्षेप —

लिअरच्या या शिवीगाळीकडे गॉनेरिल नवऱ्याचें लक्ष वेधूं पाहते. परंतु माझें तुझ्यावर कितीही प्रेम असलें तरी तुझ्याबद्दल लिअरच्याविरुद्ध मी पक्षपात दाखवूं शकत नाही असें तो दृढपणें तिला बजावतो. पण नवऱ्याचें बोलणें ती मनावर घेत नाही. आपल्या पुढच्या बेताच्या सिद्धयर्थ ती ऑस्वल्डला हाक मारते. तो येईपर्यंतच्या अवधींत ती नवऱ्याला लिअरचे शंभर सेवक आपलेकडे ठेवून घेण्यांत आपलेंच जीवित धोक्यांत येण्याचा संभव आहे हें पटवून देण्याचा यत्न करूं जाते. "तुझी भीति अतिरेकी आहे" या त्याच्या उत्तरावर "अतिरेकी विश्वास टाकण्यापेक्षा अतिरेकी भीति बाळगणें जास्त सुरक्षितपणाचें आहे" असें उत्तर देऊन, लिअरपासून वाटत असलेली ही भीति आपण नाहीशी करणारच आणि आपल्या बहिणीनेही त्याला थारा देऊं नये असें घडवून

आणणार, असा निर्धार ती व्यक्त करते. त्यासाठी लिहिलेलें पत्र घेऊन रेगनकडे त्वरेने जाण्याला ती ऑस्वल्डला आज्ञा करते आणि जलदीने परतून येण्याला सांगते. आणि " तुमच्या या भोळ्या मृदुतेचा या ठिकाणीं उपयोग नाही. तुमच्या या घातकी मृदुतेबद्दल तुमची स्तुति करण्यापेक्षा तुमच्या शहाणपणाच्या अभावाबद्दल तुम्हांला अधिक दोष दिला पाहिजे " असा नवऱ्याचाही अधिक्षेप ती करते. तिच्या या दुष्ट झंझावातापुढे आल्बनीचेंही कांही चालत नाही; आणि होईल तें पाहूं या अशा दुर्बळ वृत्तीने तो स्तब्धता स्वीकारतो.

लिअरला वेडा होण्याची भीति वाटते —

यापुढचा पहिल्या अंकांतला पांचवा प्रवेश लिअरच्या दुसऱ्या मुलीकडे जाण्याच्या धांदलीचा आहे. दुसऱ्या मुलीबद्दलचा त्याचा विश्वास असाच फोल ठरणार आहे हें यापूर्वी राज्यवाटणीनंतर लगेचच झालेल्या दोघी बहिणींच्या संवादावरून आपल्याला माहीत आहे. विदूषकही राजाला तसेंच अत्यंत उपरोधिकपणें बजावतो आहे. राजाला ही भीति अगदीच नाही असें नाही. आपण इतके प्रेमळ वडील असतांना मुलींनी असें वागावें या कल्पनेने तो विद्ध आहे. आपली सरळ बुद्धि या प्रकारांत पार जळून जाईल अशीही भीति त्याला वाटत आहे. विदूषक त्याला पुन्हा डिवचून म्हणतो, "काका, तुम्ही जरा अवेळी म्हातारे झालांत. म्हणजे असें की, आधी तुम्हांला शहाणपण यायला पाहिजे होते आणि मग तुम्ही म्हातारे व्हायला हवें होतें." या त्याच्या डिवचण्याने लिअरचें चित्त थरारून जातें आणि "देवा, मला वेडा करूं नकोस; माझी बुद्धि शाबूत राहूं दे, मला भ्रम होऊं देऊं नकोस" असें तो कळवळून म्हणतो. भावी अनर्थाची ही पूर्वसूचनाच असते.

प्रवेशाच्या सुरुवातीलाच पत्र घेऊन रेगनकडे तातडीने जाण्याची आज्ञा लिअरने केंटला केलेली असते. आणि लिअर वरच्याप्रमाणे भयसूचक मनाच्या अवस्थेंत असतांना पाहिला अंक संपतो. किती थोडक्या अवकाशांत शेक्स्पीअरच्या नाटकाने केवढा तरी मोठा पल्ला मोठ्या वेगाने अशा रीतीने गांठलेला असतो.

एडमंडचें एडगरविरुद्ध कारस्थान —

पहिल्या अंकांतल्याप्रमाणेच दुसऱ्या अंकांतही कथानकाची प्रचंड गति शेक्स्पीअरने चालू ठेवली आहे; फक्त एक प्रवेश खेरीज करून. या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत पुन्हा एडमंड आणि एडगर यांच्या कथानकाचा धागा त्याने हातीं घेतला आहे. कॉर्नवॉलचा ड्यूक आणि त्याची पत्नी रेगन हीं पाहुणीं म्हणून आपल्या बापाकडे रात्रींच येणार आहेत ही बातमी एका दरबारी माणसाकडून कळल्यावर या गोष्टीचा फायदा आपल्या कारस्थानाला चांगला मिळेल असें ताबडतोब हेरून एडमंड एडगरला किल्ल्यावरून खाली हाका मारतो. तो आल्यावर त्याला तेथून शक्य तितक्या लवकर पळून जाऊन कोठेतरी

लपून राह्यला सुचवितो. कॉर्नवाल आणि आल्बनी यांच्यामध्ये चुरस उत्पन्न झालेली आहे या स्वतःला कळलेल्या बातमीचा फायदा घेऊन तो एडगरला भासवितो की, एडगरने आल्बनीची बाजू घेऊन कॉर्नवॉलच्याविरुद्ध पक्ष मांडल्यामुळे बापाला एडगरचा राग आला आहे. म्हणून एडगरने येथे राहणें सुरक्षितपणाचें नाही. "जा, जा" म्हणून त्याला सांगतांना एडमंड तरवार उपसतो आणि तूंही उपस म्हणून एडगरला सांगतो; असा देखावा केल्यावाचून गत्यंतर नाही असें एडमंड त्याला भासवितो.

या कारस्थानाला बळी पडून तरवार उपसून एडगर निघून जातो आणि स्वतःवर जणू कोणी तरी हल्ला केला आहे अशा रीतीने एडमंड इकडे आरडाओरडा सुरू करतो. एवढेंच नव्हे तर एडगरने आपल्याला दुखापत केली असें भासावें म्हणून स्वतःच आपल्या तरवारीने हाताला जखम करून घेतो.

त्याच्या आरडाओरड्याने ग्लॉस्टर आणि सेवक लोक तेथे येतात. एडगर मला वडिलांचा खून करायला साह्य व्हायला सांगत होता; मी कबूल झालों नाही म्हणून त्याने माझ्यावर तरवार उपसली; पण मीही तरवार उपसून होतों; त्याची भीति वाटून म्हणा किंवा माझ्या आरडाओरड्याने माणसें जमा होतील या भीतीने म्हणा तो पळून गेला; अशी खोटीच कहाणी बापाला त्याने सांगितली. एवढेंच नव्हें तर, आगींत तेल ओतण्यासाठी त्याने अशीही भर घातली की, "मीं जेव्हा त्याला म्हटलें की, या कटाचा मी स्फोट करीन," त्यावर "तुझ्यासारख्या अक्करमाशाच्या शब्दावर कोण विश्वास ठेवील", असा त्याने माझा पाणउतारा केला. त्यामुळे एडगरला पकडून आणावयाचें आणि कॉर्नवॉलच्या ड्यूकच्या हुकुमाने त्याचा वध करावयाचा हा ग्लॉस्टरचा निश्चय चांगलाच दृढ झाला.

पुढच्या विदारक घटनांची पूर्वसूचनाच —

एवढ्यांत तुताऱ्या वाजूं लागून कॉर्नवाल व रेगन येत असल्याची सूचना मिळते आणि क्षणभरांत तीं दोघें प्रवेशही करतात. आम्ही येतों न येतों तोच ही काय बातमी ऐकली असा कॉर्नवॉल एडगरच्या बाबतींत प्रश्न करतो. त्यावर माझें हें म्हाताऱ्याचें हृदय या प्रकाराने दुभंग होण्याच्या वेतांत आहे असें ग्लॉस्टर जेव्हा म्हणतो तेव्हा पुढच्या घटनांची एक प्रकारें विदारक सूचनाच आपल्याला मिळाल्यासारखी होते. एडगर हा गॉनेरिलच्या घरीं लिअरबरोबरच्या शंभर माणसांत गेला असला पाहिजे या रेगनच्या कल्पनेला एडमंड पाठिंबा देतो आणि मग, त्याने हें असें वागावें हें स्वाभाविकच आहे, लिअरच्या गुंड सेवकांनीच ग्लॉस्टरचा खून करायला एडगरला शिकविलें असलें पाहिजे असा आरोप रेगन करते. त्या वेळी गॉनेरिलने रेगनला लिहिलेल्या पत्राचा परिणाम किती त्वरित आणि मोठ्या प्रमाणांत झालेला होता याचा प्रत्यय येतो.

ग्लॉस्टरचा वध करण्याचा एडगरचा प्रयत्न एडमंडने मोठ्या कुशलतेने निष्फळ केला या गोष्टीवर रेगन व कॉर्नवॉल यांचा लगेच विश्वास बसतो आणि कॉर्नवॉल एडमंडला

आपल्या तैनातींत ठेवून घेतो व एडगरला शोधून काढून शिक्षा करण्याचा निश्चय प्रकट करतो.

रेगनला बापापेक्षा बहीण अधिक —

रेगनच्या मनांत गॉनेरिलने चांगलेंच विषबीज पेरलें होतें, एवढेंच आकस्मिकपणें ग्लॉस्टरच्या किल्ल्यांत आलेल्या या दंपतीच्या या प्रवेशावरून आपल्याला मुख्य विषयाच्या दृष्टीने समजतें. त्याच गोष्टीचा थोडा अधिक प्रत्यय याच्या पुढच्या प्रवेशांत येतो. ऑस्वल्ड व केंट हे दोघेही दूतकार्यासाठी आलेले असतात. केंटचा विशेष आदर होत नाही. उलट ऑस्वल्डला मोठ्या जिव्हाळ्याने वागविलें जातें. गॉनोरिलच्या पत्राचा परिणाम म्हणून रेगन नवऱ्यासह ग्लॉस्टरकडे एकाएक निघून येते. लिअर येणार हें माहीत असून—नव्हे तें माहीत असल्यामुळेच, त्याला टाळण्यासाठीच ती घर सोडून निघून जाते आणि लिअरच्या पत्राचें उत्तर घेण्यासाठी ती केंटला ग्लॉस्टरकडे यायला सांगते. याने तर केंटच्या अंगाचा भडका झालेला असतोच. त्यांतच लिअरचा अपमान करणाऱ्या अगदी खालच्या वर्गांतल्या ऑस्वल्डचा विशेष मान केला जातो याची भर पडते. आणि ऑस्वल्डशीं केंट मोठेंच भांडण किल्ल्याबाहेरच्या भागांत उकरून काढतो. इंग्रजी भाषेंतल्या जणू सर्व शिव्या जमा करून त्यांचा वर्षाव तो ऑस्वल्डवर करतो. त्याला द्वंद्वयुद्धाला आव्हान देतो. कॉर्नवॉल व रेगन हे ऑस्वल्डचे पक्षपाती असल्याने या दंगलीसाठी कॉर्नवॉल केंटला खोड्यांत घालून उघड्यावरच बसवून ठेवण्याची शिक्षा देतो. "मी राजाचा सेवक आहें, त्याच्या कामगिरीवर मी आलों आहें, मला खोड्यांत घालणें म्हणजे राजाचा अवमान करण्यासारखें आहे" या त्याच्या म्हणण्याकडे कोणी लक्ष देत नाही. उलट संध्याकाळपर्यंत तेथे केंटला खोड्यांत घालून ठेवावें एवढ्याने रेगनचें समाधान न होऊन रात्रभर त्याला तसाच बाहेर उघड्यावर ठेवावें असा सल्ला रेगन देते. ग्लॉस्टर यांतील अनुचिततेची कल्पना आणून देण्याचा यत्न करतो. राजाचा केंट नोकर; त्याचा कांही अपराध झालाच असला तर राजाने त्याला शासन करणें योग्य हें त्याचें म्हणणें कॉर्नवॉल मान्य करीत नाहीच; पण रेगन तर "माझ्या बहिणीच्या माणसावर या माणसाने हल्ला करावा याचें बहिणीला काय वाटेल" असा पक्ष उपस्थित करते आणि बापापेक्षा तिला बहिणीचीच काळजी अधिक आहे हें दिसून येतें.

शेवटीं केंटला रात्र तेथेच खोड्यांत राहून बाहेर काढण्याची पाळी येते. त्याही स्थितींत एक पत्र वाचण्याचा तो प्रयत्न करतो. हें पत्राचें प्रकरण या ठिकाणीं शेक्स-पीअरने अगदीच अनपेक्षितपणें आणि संदर्भ सोडून उपस्थित केलें आहे. पत्र कॉर्डेलिया-कडचें असून इकडची लिअरच्या दुरवस्थेची हकीकत तिला कळविण्यांत केंटला यश आल्याचें त्यावरून समजतें. परंतु शेक्स्पीअरसारख्या श्रेष्ठ नाटककाराने इतक्या रसहीन पद्धतीने या गोष्टीचा उपन्यास करावा याचें आश्चर्य वाटतें; सौभद्र नाटकांत कृष्णाच्या "रचिला ज्याचा पाया त्याची उभारणी बरि झाली" या पदाच्या वेळीं वाटतें तसें.

तिसऱ्या प्रवेशाची जवळ जवळ हीच अवस्था आहे. त्यामध्ये एडगरच्या स्वगतामधून आपल्याला एवढीच माहिती देण्यांत येते की, किती लपून राह्यचें म्हटलें तरी ती गोष्ट जवळ जवळ अशक्य वाटल्यामुळें वेष अजीबात पालटून आणि वेड्याचें सोंग घेऊन, नाना प्रकारच्या आत्मछळाने लोकांना दया किंवा किळस वाटायला लावणाऱ्या भिक्षेकऱ्याच्या रूपाने इकडे तिकडे वावरत राहून आपले प्राण वाचविण्याचा निर्णय एडगरने केला होता. जो वेष आणि जें धोरण एडगर स्वीकारणार होता, त्याचें वर्णन अत्यंत रेखीव असें या ठिकाणीं केलेलें आहे; त्यांत शेक्सपीअरच्या कल्पनाशक्तीचा फार मोठा प्रत्यय येतो; हें खरें असलें तरी हा प्रवेश अगदीच सपाट आणि कथानकाच्या गतीला मुळीच मदत न करणारा असा वाटल्यावांचून राहत नाही. परंतु या सगळ्याची भरपाई पुढच्याच चवथ्या प्रवेशांत शेक्सपीअर करून देतो.

मुलगी बापाला भेटूं इच्छीत नाही !—

केंटच्या पाठोपाठच लिअर रेगनकडे पोचतो. तूं जलद गेला नाहीस तर मीच कदाचित तेथे आधी पोचेन असे तो केंटला म्हणालाच होता. परंतु रेगन व कॉर्नवॉल यांनी एकाएकी घर सोडून ग्लॉस्टरकडे प्रयाण केल्याचें कळून व आपला दूत केंट परत न आल्याचें पाहून तो स्वाभाविकच अस्वस्थ चिताने ग्लॉस्टरच्या निवासस्थानाकडे आलेला असतो. तेथे खोड्यांत पडलेला केंट पाहून त्याची अस्वस्थता अधिकच वाढते. आपल्या विश्वासाच्या सेवकाची ही (एया) अॅपॅल्या मुलीने आणि जावयाने करावी या गोष्टीवर क्षणभर त्याचा विश्वासही बसत नाही. आणि तें खरेंच आहे असें समजल्यावर तो क्रोधाविष्ट होतो. या क्रोधाग्नींत तेल पडतें, ग्लॉस्टर बाहेर येऊन जेव्हा सांगतो की, रेगन आणि कॉर्नवॉल हीं प्रवासामुळे थकलेलीं आहेत, प्रकृति किंचित बरी नाही, यासाठी लगेच बाहेर येऊन कोणाशीं बोलण्याची त्यांची तयारी नाही, तेव्हा. मुलगी बापाला भेटूं इच्छीत नाही; प्रत्यक्ष राजाला भेटूं शकत नाही; यांत तिच्याही बंडखोरीचें दर्शन लिअरला स्वाभाविकच होतें. राजाचा अधिकार आणि बापाचा अधिकार, दोहोंचा अधिक्षेप झालेला पाहून ग्लॉस्टरबरोबर कॉर्नवॉलला कांही तरी निर्वाणीचा संदेश पाठविण्याच्या अगदी बेतांत लिअर असतो. तथापि आपल्या क्रोधाला आवर घालून थोडें वेताने घ्यावें असा विचार तो करतो. पण तेवढ्यांत खोड्यांत पडलेला केंट त्याच्या दृष्टीस पडतो आणि पुन्हा लिअर उसळतो. श्रम किंवा प्रकृति बरी नसणें या निव्वळ खोट्या सबबी आहेत हें पुन्हा एकदा त्याला पटतें आणि तो ग्लॉस्टरला सांगतो की, " मुलीला आणि जावयाला बाहेर यायचा माझा हुकूम म्हणून सांग. नाही तर त्यांच्या दरवाजापाशीं कानठळ्या बसेपर्यंत मी ढोल बडवीन राहीन. "

आगींतून फुफाट्यांत —

अखेर आंत जाऊन ग्लॉस्टर रेगन आणि कॉर्नवॉल यांना घेऊन येतो. रेगन

बापाला नमस्कार करून तुम्ही आल्याचा मला आनंद वाटतो असें तोंडदेखलें म्हणते. त्यावर, मीं तुझ्यासाठी एवढें केलें आहे की, तुला आनंद वाटणें सहज आहे असें म्हणून लिअर, तिच्या बहिणीच्या ठिकाणीं मात्र ही कृतज्ञता कशी नाही, तिने कृतघ्नपणाने आपल्या हृदयांत जणू गिधाडाच्या पायाचीं नखें खुपसावींत इतकें क्रूर आणि दुष्टपणाचें वर्तन कसें केलें आहे हें तिला सांगूं पाहतो. पण त्यावर रेगन जेव्हा म्हणते,

" उगीच इतके भडकूं नका तुम्ही. तिला आपल्या कर्तव्याचा विसर पडेल हें मला खरें वाटत नाही. तुम्हांलाच तिच्या स्वभावाची नीट पारख झालेली नाही असें त्यापेक्षा मला म्हणावें लागेल. "

त्या वेळीं मात्र लिअर एकदम चमकतोच. तेव्हा त्याला पुढे रेगन आणखी सांगते की, " माझी बहीण आपल्या कर्तव्यांत कधी चुकणार नाही. पण तुमच्या पुंड सेवकांना तिने थोडें सरळ करायचा प्रयत्न केला असला तर त्यासाठी तसेंच योग्य कारण घडलेलें असलें पाहिजे. " एवढ्यावरच ती थांबत नाही. तर एडमंडने एडगरचें म्हणून जें बनावट पत्र तयार केलें होतें, त्यामधल्यासारखेच स्फोटक विचार ती आणखी व्यक्त करते. तुम्ही आतां म्हातारे झालांत. तुमच्या स्वाभाविक प्रवृत्ति आता मर्यादेंत राहिलेल्या नाहींत. तेव्हा तुमची खरी अवस्था काय आहे हें ज्याला चांगल्या रीतीने समजत असेल अशा कोणा माणसाच्या देखरेखीखालीच तुम्ही यापुढे राहणें तुमच्या हिताचें आहे, असें म्हणून ती जेव्हा पुढे लिअरला म्हणते, " म्हणून तुम्ही ताईकडेच जा आणि तिला सांगा की, " माझें चुकलें, " तेव्हा लिअरचा सगळा जीव गोळा होतो आणि तो गुडघे टेकून वाकून नाट्याभिनयपूर्वक म्हणतो, " अशा रीतीने तिची क्षमा मागूं म्हणतेस हात जोडून ? "

रेगन लिअरला गॉनेरिलकडेच जायला सांगते ! —

पण त्याच्या विकल हृदयाची फिकीर करण्याची रेगनची मुळीच तयारी नव्हती. त्यामुळे " पुरे, पुरे; हीं असलीं नाटकें नको आहेत मला. तुम्ही सरळ ताईकडे जा " असें ती अगदी तोडून म्हणते. तेव्हा गॉनेरिलच्या दुष्टपणाची आणि कृतघ्नपणाची आठवण त्याच्या अंतःकरणांत उसळते व तो तिला नाना तऱ्हेचीं दूषणें देऊं लागतो; शिव्याशाप देऊं लागतो.

त्यावर रेगन जें उत्तर देते की, " बाबा, उद्या कदाचित तुम्ही मलाही असेंच म्हणूं लागाल, तुमची लहर फिरली म्हणजे ! " तें पुढे घडूं घातलेल्या परिणतीची पूर्वसूचनाच आहे. लिअरला याची जाणीव नव्हती असें नाही. पण अनिष्ट गोष्टीचें दर्शन टाळण्याचा प्रयत्नच मनुष्य करीत असतो. म्हणून रेगनविषयी आपल्याला असें वागण्याबोलण्याचा प्रसंग येणार नाही, कारण ती फार चांगली आहे, मुलांचीं कर्तव्यें ती जाणते, वगैरे लांबलचक भाषण तो करूं लागतो.

पण रेगन कच्च्या गुरूची शिष्या नव्हती. कठोरपणे ती त्याला चमकारते, "ही लांबण पुरे, मुद्दा बोला." तेव्हा सारें धोरण लक्षांत येऊन, मऊपणा सोडून तिला छेडण्यासाठीच लिअर विचारतो, "माझ्या या सेवकाला खोडा कोणीं घातला?" रेगनने उत्तर देण्यापूर्वीच तुतारी वाजते. गॉनेरिल आल्याची ती वर्दी असते. पत्रापाठोपाठ उतावीळपणाने ती, आपली बहीण आपली सूचना मानते की नाही याची खात्री करून घेण्यासाठी स्वतःच तडक तिकडे आलेली असते. तिच्यापुढेच ऑस्वल्ड येतो. त्याला पाहतांच राग अनावर होऊन लिअर म्हणतो, "या पाजी माणसानेच माझ्या सेवकाला खोडा घातला असला पाहिजे – पोरी, यांतलें तुला कांही ठाऊकही नसेल."

लिअर अविवेकी आणि म्हातारचळ लागलेला! – इति गॉनेरिल —

त्याची ही भोळी समजूत खोटी आहे हें समजण्यापूर्वीच गॉनेरिल तेथें हजर होते. तिच्याशीं रेगन प्रेमभराने हस्तांदोलन करतांना पाहून लिअर रेगनला जेव्हा दोष देतो तेव्हा गॉनेरिल त्याला रोखून तडकते, "काय चुकलें तिचें? अविवेकी माणसाने किंवा म्हातारचळामुळे कोणी एखादी गोष्ट चुकीची म्हटली म्हणजे तशी ती असते असें नाही."

वस्तुतः हा गॉनेरिलचा अभिप्राय लिअरचें कॉर्डेलियाशीं जें वर्तन झालें होतें त्या दृष्टीने किती खरा होता. पण तसाच तो क्रूरही होता. त्यामुळे आपलें हृदय अजून फाटून दुभंगत नाही याचा दुःखद विस्मय लिअरला वाटला हें साहजिकच झालें. परंतु कॉर्नवॉलने जेव्हा सांगितलें की, आपण स्वतःच केंटला खोड्यांत घालण्याचा हुकूम दिला तेव्हा तर लिअरच्या हतबुद्धतेला परिसीमाच राहिली नाही.

एकीला एक दोघी बहिणी --

आता एकीला एक दोघी बहिणी लिअरच्या उरलासुरला सगळा शांतपणा आणि धीर उधळून टाकायला बद्धपरिकर झाल्या होत्या. रेगनने साळसूदपणाचा आव आणला; "हा महिना तुमचा गॉनरिल्लकडचा आहे. तुमची माझ्याकडची राह्यची व्यवस्था करायला अजून मला सवड मिळालेली नाही. शिवाय आज मी परक्या ठिकाणीं आहे. तेव्हा तुम्ही ताईकडे जावें हें रास्त."

अर्थात हा साळसूदपणाचा सल्ला लिअरला मानवणें अशक्य होतें. त्यापेक्षा फ्रान्सच्या राजाकडे – ज्याचा मीं अधिक्षेप केला त्याच्याकडे जाऊन त्याच्या पदरीं सेवक म्हणून राहण्याची प्रार्थना करणें मी अधिक पसंत करीन असे तो उद्वेगाने म्हणतो. पण त्यावर "जशी तुमची मर्जी" असें गॉनेरिल जेव्हा अगदी थंडपणाने आणि जणू लिअरचें आपलें कांही नातें नाही अशा थाटाने म्हणते तेव्हा लिअरला खरोखरच वेड लागण्याची पाळी येते. पोरी, मला तूं वेड लावूं नकोस, असें तळमळून म्हणून गॉनरिलला पुन्हा एकदा वेड्यावाकड्या शिव्या तो देऊं लागतो. परंतु थोडक्यांतच आपल्या

भावनावेगाला आवर घालून तो म्हणतो, "मी तुला अधिक बोलत नाही. नशीब असेल तर तुझें वर्तन सुधारेल. मी आपला माझे शंभर सेवक घेऊन रेगनकडेच जाईन म्हणजे झालें.

लिअरला इतक्या सेवकांची गरजच काय ? —

पण "ही गोष्ट शक्य नाही; तुम्हीं ताईचेंच ऐकलें पाहिजे" असें रेगन त्याला निक्षून सांगते आणि त्याला इतक्या सेवकांची गरजच काय असा नवाच भेदक प्रश्न उपस्थित करते. एवढेंच नव्हे तर, एकाच छपराखाली इतकीं पुष्कळ माणसें आणि तींही भिन्न मालकांचा अधिकार मानणारीं असलीं म्हणजे घरांत शांतता राहणें अशक्य आहे असाही गंभीर प्रश्न ती पुढे मांडते.

यांत तिला गॉनेरिलचा ताबडतोब पाठिंबा मिळतो. आमच्या घरची सेवकमंडळी असतांना आगखी निराळे सेवक लिअरला हवेतच कशाला, असा ती अगदी मुळालाच हात घालते.

तिला अनुमोदन देऊन रेगन म्हणते की, "म्हणून जेव्हा तुम्ही माझ्या महिन्याच्या वेळीं माझ्याकडे याल त्या वेळी फक्त पंचवीस माणसें घेऊन या." लिअर हें ऐकून चकित होतो तेव्हा तीच गोष्ट ती पुन्हा निर्धाराने सांगते.

लिअरमधला माणूस जागा होतो —

लिअर गोंधळून जातो. सारा अपमान गिळून आणि वेड्यासारखा होऊन तो म्हणतो, "त्यापेक्षा गॉनेरिअलकडेच जाणें बरें. ती निदान पन्नास माणसें ठेवून घ्यायला तयार आहे." पण गॉनेरिलने त्याला स्तंभितच केलें. "पंचवीस नव्हे, दहा नव्हे, पांच तरी सेवक कशाला हवेत ? माझ्या पदरचे सेवक आहेत ते तुम्हांला पुरेसे आहेतच की!" या तिच्या नव्या पवित्र्यामुळे मात्र लिअरच्या डोळ्यांवरची भ्रमाची झापड पार दूर झाली. एक वेडा राजा तो राहिला नाही. जीवनाचें तत्त्वज्ञान त्याच्या तोंडून स्रवूं लागलें. त्याच्यांतला माणूस जागा झाला. "कोणाला काय लागतें यांचीं मापें कांही सृष्टीने ठरविलेलीं नाहीत. निव्वळ जगायला कोणाला कशाचीच खरोखर जरूर नसते. आणि तरीही तुमच्यासारख्या स्त्रिया हे बडे पोशाख आणि दागदागिने अत्यावश्यक मानतातच की नाही ? या कांही माणसाच्या खऱ्या गरजा नाहीत;" असें तो गॉनेरिलला बजावतो. यांतूनच, स्वतःलाही आपल्या सर्व अनवश्यक गरजांचा त्याग करून राहतां येईल आणि या कृतघ्न मुलींच्या घरीं गुलामाच्या वृत्तीने राहण्याची आपल्याला गरज नाही याचा त्याच्या हृदयाला प्रत्यय पटतो. "तुमचा हा अन्याय मी असा दुबळेपणाने सहन करणार नाही, रडत बसणार नाही. तुमचें पारिपत्य केल्याशिवाय मी राहणार नाही" असें म्हणून तो केंट आणि विदूषक यांना बरोबर घेऊन वाट फुटेल तिकडे जाण्यासाठी निघून जातो.

एवढ्यांत वादळाचीं चिन्हें दिसूं लागतात. तेव्हा घरांत जावें अशी जेव्हा कॉर्नवॉल सूचना करतो तेव्हा रेगनचें चित्त थोडें गडबडल्यासारखें होते. म्हणूनच ती स्वतःचें समाधान करूं जाते की, "बाबा एकटे असते तर त्यांची घरांत सोय केली असती मीं, पण इतक्या सेवकांची सोय कशी मी इथें करणार!" परंतु गॉनेरिलला एवढीही मृदुता नाही. बापाने आपल्याच मूर्खपणाने आपल्यावर हा प्रसंग आणला आहे, त्याला लोकांनी काय करावें, असें अगदी निर्दय वेफिकिरीचें धोरण ती व्यक्त करते.

वेड्याचें घर उन्हांत? की प्रचंड वादळांत?—

आणि राजाच्या मागोमाग जाण्याचा प्रयत्न करूनही पाहुण्यांच्यासाठी म्हणून ग्लॉस्टर जेव्हा परत येतो तेव्हा रेगनही आपलें हृदय कठोर करून लिअरच्या मूर्खपणाला दोष देऊं लागलेली असते. आपल्या मूर्खपणाच्या परिणामांतूनच अशा मंडळींना अक्कल यायला हवी असें ती म्हणते आणि येऊं घातलेल्या प्रचंड तुफानामध्ये ऐशी वर्षांच्या त्या म्हाताऱ्या राजाला, आपल्या बापाला निराधारपणे सोडून ती आंत जाते. कॉर्नवॉल दरवाजा घट्ट लावून घ्यायला ग्लॉस्टरला बजावतो. कारण, बाहेर रात्रीचा होऊं घातलेला प्रसंग फारच भयाण होणार अशी त्याला भीति वाटत असते. अशा रीतीने हीं माणसें किल्ल्याच्या आंत निवाऱ्याला जातात. आणि बिचारा लिअर बाहेर कित्येक मैलपर्यंत ज्याच्याखाली आसरा घ्यावा असें एक लहानसें झुडूपसुद्धा ज्या प्रदेशांत नव्हतें अशा त्या वैराण प्रदेशांत एका महाप्रचंड वादळांत सापडणार आहे याची तीं काडीचीही फिकीर करीत नाहीत. अशा या अत्यंत नाट्यमय आणि भेदक प्रसंगांत दुसरा अंक संपतो.

म्हातारा आणि वेडसर अशा लिअरचें हें नवेंच स्वाभिमानीपणाचें आणि करारीपणाचें स्वरूप आपल्याला अधिक आकर्षून घेतें. स्वभावतः कोणावर अन्याय होत असतांना आपण त्या माणसाचे पक्षपाती होत असतो. परंतु त्या अन्यायापुढे मान न तुकविणाराबद्दल आपल्या मनांत अधिक जिव्हाळा उत्पन्न होत असतो. म्हणून या वेळेपासून लिअरच्या जीवनौघाकडे आपण अधिक आस्थेने आणि उत्सुकतेने पाहूं लागतों.

वादळांत झंझावाती वृत्तीने वावरणारा लिअर—

अपेक्षा केल्याप्रमाणे प्रचंड वादळ आणि पाऊस सुरू झालाच. त्यांतच लिअर झपाट्याने पुढे जात होता. अंधारामध्ये केंट आणि तो हे एकमेकाबरोबर राहिले नाहीत. केंटचा व त्याचा मार्ग चुकला. एवढ्यांत तशाही अंधारांत आणि वादळाच्या झपाट्यांत आणखी एक सद्गृहस्थ वावरतांना केंटला आढळला, त्याच्या बोलण्यावरून केंटने त्याला ओळखलें. वेषपालटामुळे केंटची मात्र त्या गृहस्थाला ओळख पटणें शक्य नव्हतें. लिअर तुफानाची पर्वा न करतां, उसळत, स्वतःचे केस ओढीत, ओरडत, तुफानापेक्षाही जास्त झंझावाती वृत्तीने त्या वादळांत वावरत असतांना पाहिल्याचें

त्या गृहस्थाने सांगितलें. त्या वेळीं विदूषक तेवढा लिअरबरोबर होता. त्याने लिअरची पाठ सोडली नव्हती. मग केंट व तो गृहस्थ या दोघांनी दोन दिशांनी जाऊन लिअरचा माग काढावा असें केंटने ठरविलें. पण त्यापूर्वी त्या गृहस्थाच्या जरा पोटांत शिरून त्याच्यावर केंटने एक जबाबदारी सोपविली. देशामध्ये आल्बनी व कॉर्नवॉल यांच्यामधील चुरशीमुळे फ्रेंच हेरांचा सुळसुळाट झाला आहे. यामुळे तर फ्रेंच सैन्य किनाऱ्यावर उतरलें आहेच. पण त्यापेक्षाही राजाला कशा रीतीने वागविलें जात आहे हें कळल्यामुळे त्या सैन्याचें आगमन होण्याला जास्त कारण मिळालें आहे. यासाठी त्या गृहस्थाने डोव्हरला जाऊन तेथे कॉर्डेलिया भेटेल, तिला राजाची सर्व हकीकत सांगावी, असें म्हणून ओळखीसाठी स्वतःची अंगठी केंटने त्याच्याजवळ दिली आणि लिअरचा माग काढण्यासाठी ते दोघे दोन दिशांना गेले.

यानंतरच्या प्रवेशांत राजा आणि विदूषक यांची आपल्याला त्या तुफानांत गाठ पडते. निसर्गाच्या त्या महाप्रचंड आणि रौद्र स्वरूपाचें शेक्स्पीअरने या, त्याच्यापूर्वीच्या आणि त्याच्यापुढच्या प्रवेशांत केलेलें वर्णन कोणाही महाकवीला शोभावें इतकें प्रभावी आहे. परंतु सारांशामध्ये त्यांतील रम्यतेचा प्रत्यय आणून देणें हें अशक्यही आहे आणि आपल्या शोधाच्या दृष्टीने तें अनवश्यकही आहे.

लिअरच्या अंतःकरणांतील महाप्रचंड वादळ —

वादळ केवळ सृष्टींतच नाही. लिअरच्या अंतःकरणांतील वादळ त्याहीपेक्षा महाप्रचंड आहे. सृष्टीतींल वादळ जसें या वाटोळ्या पृथ्वीला सपाट करून टाकण्याइतक्या जोराचें आहे तितक्याच आवेगाने लिअरच्या पंचप्राणांची गळचेपी त्याच्या अंतःकरणांतील वादळाने चालविलेली आहे. बिचारा विदूषक अशाही स्थितींत, थट्टा-विनोद करून त्याच्या मनाचा आणि बुद्धीचा तोल थोडा तरी सावरून धरण्याचा प्रयत्न करीत आहे.

लिअर एकवेळ त्या मोकाट सुटलेल्या सृष्टिशक्तींना म्हणतो की, तुमच्या या निर्घृणपणाबद्दल मी तुम्हांला दोष कसा देऊं? तुम्ही कांही माझ्या मुली नाहींत; किंवा तुमच्यावर मीं कसला उपकार केलेला नाही. पण दुसऱ्याच क्षणीं तो म्हणतो, तरीपण माझ्या दुष्ट मुलींनी मला घराबाहेर घालविल्यावर या दुर्धर सृष्टिप्रकोपामध्ये मला तुम्ही पकडतां यांत एक प्रकारें तुम्ही माझ्या मुलींनाच साह्य करतां; म्हणून मला तुमचा राग येतो.

अजून चुकीचा उमज नाही —

अशा मनाच्या आंदोलनांत, विदूषकाच्या सोबतीने, उघड्या बोडक्या डोक्याने, वादळ व पाऊस यांचे चपेटे खात, आणि कोठे जायचें याची कांहीच कल्पना नाही अशा वृत्तीने, लिअर ठेचकाळत, धडपडत वाट चालत असतो. परंतु अजूनही व्यवहारांत आपण चुकलों असें त्याला वाटत नाही, मीं कोणावर अन्याय केला असें म्हणण्यापेक्षा माझ्यावरच अधिक अन्याय झाला आहे अशीच त्याची भावना असते.

अशा स्थितींत केंट त्या दोघांना गाठतो आणि कशी तरी लिअरची समजूत घालून त्याला जवळच्याच एका गवताच्या खोपटाचा आश्रय घ्यायला लावतो. खरोखर असा आश्रय घ्यायचीसुद्धा लिअरची इच्छा नव्हती. पण त्या भ्रांत अवस्थेंतही बिचाऱ्या विदूषकाबद्दल त्याला कीव वाटली आणि त्यासाठी कांही वेळ खोपटांत जायला तो कबूल झाला. त्याच वेळीं त्याच्या बोलण्यावरून त्याची बुद्धि चळूं लागली होती याची जाणीव होऊं लागते.

अंतर्मुख दृष्टीला प्रकाश दिसूं लागतो —

आणि चवथ्या प्रवेशांत त्या खोपटांत शिरतांना "अरेरे असा हा मी भडकून विचार करतों आहें; याचा शेवट वेड लागण्यांत व्हायचा" अशी जाणीव स्वतः लिअरच बोलून दाखवीत आहे. अंतःकरणांतल्या वादळापुढे या बाहेरच्या वादळाची लिअरला एवढीसुद्धा मातबरी वाटूं शकत नाही. म्हणून विदूषकाने प्रथम आंत जावें आणि झोपण्याचा प्रयत्न करावा असा लिअर आग्रह धरतो. त्याच क्षणीं त्याच्या अंतर्मुख झालेल्या दृष्टीला आणखी एका नव्या सत्याचा प्रत्यय येतो. "सृष्टींतल्या या भयानकतेची मला कधी जाणीवच झाली नाही. वैभवाच्या धुंदींत, गरीब बिचाऱ्या लोकांना काय सोसावें लागतें हें कधी कळतच नाही. म्हणून वैभवांत लोळणाऱ्या सगळ्या लोकांनी आजच्यासारखा हा अनुभव घ्यावा आणि मग वाजवीहून जास्त असलेलें आपणाजवळचें सगळें ते लोकांना देऊन टाकतील आणि संसारांतील विषमतेचा अन्याय दूर होईल."

ऐशी वर्षेंपर्यंत निव्वळ वैभवांत लोळत आलेल्या एका म्हाताऱ्याचा प्रचंड दुःखांत आणि सृष्टिकोपांत सापडल्यानंतरचा हा विचार हा त्याची बुद्धि निर्मळ होत असल्याबद्दलचा केवढा मोठा पुरावा आहे. पण बुद्धीच्या निर्मळपणाचे हे किरण अजून तरी तुरळकच होते. कारण क्षणाभरांतच त्याच्याचसारख्या दुसऱ्या एका भ्रांतिष्टाची गाठ पडल्यानंतर लिअरची बुद्धि किती भ्रांत झाली आहे याचें केवढें विदारक दर्शन आपणाला घडतें.

खरें वेड आणि खोटें वेड —

हा दुसरा वेडा म्हणजे एडगर. त्याने त्या वादळांत त्या खोपटामध्ये आसरा घेतलेला होता. वास्तविक तो कांही वेडा नव्हता. वेडाचें त्याचें केवळ सोंग होतें. वेडाचें हें नाटक आणि लिअरचें खरोखरीचें वेड यांचें एकाच ठिकाणीं उभें केलेलें हें द्वंद्व शेक्स्पीअरच्या अथांग सामर्थ्याचें दर्शन आपल्याला घडवितें. एडगर मुद्दामच कांहीतरी गैरलागू बोलत असतो; भूतपिशाच्चांच्या गोष्टी सांगत असतो. त्या गोष्टींमधील पोकळपणा क्षणोक्षणीं आपल्याला जाणवत असतो. परंतु "अरे, किर्ता वेडा तूं; तुझ्या मुलींना तूं सर्व कांही देऊन टाकलेंस आणि आतां अशा दैन्यावस्थेंत येऊन पडला आहेस" हे त्याला उद्देशून बोललेले लिअरचे शब्द कानावर पडले म्हणजे विदीर्ण

झालेल्या लिअरच्या हृदयाचें केवढें भयानक दर्शन होऊन आपला थरकांप होतो. याही ठिकाणीं नव्या जाणिवेचा एक किरण लिअरच्या बुद्धींत चमकतो. मनुष्य म्हणजे हा केवळ नागवा उघडा प्राणी. बाकी त्याचे हे पोशाख वगैरे सर्व निव्वळ उसना कारभार, याची त्याला खरीखुरी, तत्त्वज्ञाच्या दृष्टीला शोभेलशी जाणीव होते आणि काढून टाका माझा सगळा हा थाटमाट, असें म्हणून तो आपले सगळे कपडे फाडूं तोडूं लागतो.

अशा वेळेला तेथे ग्लॉस्टर उपस्थित होतांना आपण पाहतों. त्यासाठी थोडीशी यापूर्वीच्या तिसऱ्या प्रवेशाकडे नजर वळविली पाहिजे. तेथे ग्लॉस्टरच्या किल्ल्यामध्ये एडमंडला ग्लॉस्टर आपला विचार बोलून दाखवीत असतो. मुलगी आणि जावई यांनी लिअरला दिलेली अस्वाभाविक वागणूक त्याला मुळीच पसंत नसते. त्यांतच आल्बनी आणि कॉर्नवॉल यांमध्ये वैर निर्माण झालेलें त्याला कळलेलें असतें. त्यावरून आता स्तब्ध न राहतां राजाच्या बाजूला होऊन हालचाल करण्याची वेळ आलेली आहे असा ग्लॉस्टरने निर्णय केलेला असतो. त्यासाठी राजाला शोधून काढण्याकरिता बाहेर पडलेला ग्लॉस्टर त्या खोपटीपाशी येतो. एडमंडवर आपण टाकीत असलेल्या गैरविश्वासाचे केवढे घोर परिणाम होणार आहेत हें त्या बिचाऱ्याच्या गावींही नसतें. लिअरच्याइतकाच त्याचा हा भोळेपणा प्रचंड असतो.

ग्लॉस्टर लिअरला स्वतःबरोबर एका घरांत येण्याची विनंति करतो; तेथे निवारा आणि अन्न यांची सोय होईल म्हणतो. परंतु लिअर तिकडे लक्षच देत नाही. वेड्याचें सोंग घेतलेल्या आणि जगाबद्दल अगदीच निराळ्या आणि रोकड्या वृत्तीने बडबडणाऱ्या तत्त्वज्ञानी टॉमरूपी एडगरची संगति लिअरला अधिक आवडीची वाटते. लिअरचें डोकें ठिकाणावर नाही, त्याला आग्रहाने घेऊन जायला हवें असें केंट सुचवितो. त्या वेळी ग्लॉस्टरने केलेलें भाषण किती करुणाजनक आहे! "वेडा न होईल तर काय? मी स्वतःही मुलाच्या पितृद्रोही वृत्तीने वेडा होण्याच्या बेताला आलों आहें" असें तो जेव्हा हृदयाला घरे पाडणाऱ्या तळमळीने म्हणतो, आणि तेंही स्वतः एडगर ऐकत असताना, त्या वेळीं केवढें मोठें नाट्यमय पताकास्थान आपल्यापुढे उपस्थित होतें.

ग्लॉस्टर टॉमला – एडगरला – गप्प राहून खोपटांत जायला सांगतो आणि लिअरला स्वतःबरोबर घेऊन जाऊं पाहतो. परंतु टॉमशिवाय न जाण्याचा लिअरचा निश्चय लिअरच्या नव्या जाणिवेचें आणखी एक हृद्य आणि करुण रूप आपल्याला दाखवितो. शेवटीं टॉमला बरोबर घेण्याचें ठरून ती सर्व मंडळी निवारा मिळेल अशा ठिकाणाकडे जाण्यासाठी निघतात.

दरम्यान इकडे ग्लॉस्टरचा विचार कॉर्नवालला सांगून एडमंडने चांगलीच आग पेटविलेली असते. ग्लॉस्टर सापडला की त्याचा वध करायची शिक्षा ठरविली जाते आणि कॉर्नवाल आधीच एडमंडला ड्यूक ऑफ ग्लॉस्टर ही पदवीही देऊन टाकतो. आणि एडमंड स्वतः ग्लॉस्टरच्या शोधार्थ बाहेर पडलेला असतो.

भ्रमिष्टपणांतही नवी जाणीव —

इकडे शेतावरच्या एका लहानशा निवाऱ्याच्या घरांत लिअर, केंट आणि विदूषक यांना पोचवून ग्लॉस्टर निघून जातो. एव्हाना लिअरची स्मृति आणि बुद्धि दोन्ही जवळजवळ नष्ट झालेल्या असतात. परंतु आंतरिक जाणीव त्याला सोडून गेलेली नाही याचाही अधूनमधून प्रत्यय येतो. वेड्या माणसाला सभ्य गृहस्थ म्हणावें की खेडवळ शेतकरी म्हणावें, असें विदूषक थट्टेने विचारतो, तेव्हा लिअर एकदम उत्तरतो, "राजा, राजा म्हणावें त्याला." परंतु भ्रमिष्टपणाची त्याची लाटच अधिक जोराची असते. त्या ठिकाणीं एक दरबारी न्यायासन भरविल्याचें सोंग करून लिअर त्यांत आपल्या मुलींचा न्यायनिवाडा करूं पाहतो. हा साराच प्रसंग हृदयाचें पाणी पाणी करणारा आहे. प्रत्यक्ष तुफानांतला देखावा हा चार्लस लँबच्या मताप्रमाणे रंगभूमीवर दाखविणें अशक्य असलें तरी भ्रमिष्टपणाचा हा निवाऱ्याच्या जागीं चाललेला प्रकार श्रेष्ठ अभिनयाला फार मोठा वाव देणारा आहे आणि त्यामधून लिअरच्या घर सुटलेल्या चित्तवृत्तींचा करुण आविष्कार फार मोठ्या प्रभावीपणाने करतां येण्यासारखा आहे.

दरबारी न्यायालयाचें हें विडंबक नाटक संपल्यावर लिअर आणि विदूषक यांचीं विसंगत अशीं एकदोन भाषणें चालू असतांनाच ग्लॉस्टर पुन्हा परत येतो आणि केंटला विनवितो की, लिअरला समजत असो वा नसो, तूं त्याला ताबडतोब डोव्हरला घेऊन जा. कारण त्याचा जीव घेण्याचा कट शिजलेला आहे. आणि म्हणून भ्रांत अवस्थेंतच झोपीं गेलेल्या लिअरला उचलून घेऊन केंट, ग्लॉस्टर आणि विदूषक जातात.

एकटा एडगर तेवढा जात नाही. परंतु आतांपर्यंतच्या सगळ्या प्रसंगाने एडगरच्या वृत्तीही ढवळून निघालेल्या असतात. भीतीने दडून राहण्यांतलें वैय्यर्थ त्याच्या लक्षांत येतें. आणि टॉमचा वेष टाकून आपलें योग्य कर्तव्य निर्भयपणें करायला प्रवृत्त होणें आवश्यक आहे हें त्याला पटतें. आता रात्रीं राजा तेवढा सुरक्षितपणें निसटो एवढीच फक्त त्याला पहिली चिंता असते. मग उजाडल्यावर त्याचा मार्ग त्याच्यापुढे स्वच्छ होता.

ग्लॉस्टरचा क्रूर छळ —

याच्या पुढचा सातवा प्रवेश या वादळाच्या दुसऱ्याच दिवशीं ग्लॉस्टरच्या किल्ल्यांतच घडला असें दिसतें. फ्रान्सचें सैन्य इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरलेलें कळल्यामुळे तेथे मोठी गडबड उडाली होती. गॉनेरिल आदल्याच रात्रीं तेथे आलेली होती ती त्यामुळे आपला एक दूत पाठवून आल्बनीला ती बातमी तातडीने देते, आणि ग्लॉस्टरला पकडण्यासाठी माणसें पाठवून देते. कारण ग्लॉस्टरचा संबंध फ्रेंच सैन्याशीं पोचला आहे आणि राजाला घेऊन तो तिकडेच जाण्याचा संभव आहे या बातमीने त्या बहिणींना भय वाटूं लागलें आहे. ग्लॉस्टर सापडतांच त्याला ठार करावें असें रेगन म्हणते.

त्याचे डोळे फोडावेत ही गॉनेरिलची सूचना. परंतु हें काम आपणावर सोपवावें, बायकांनी या क्रूर शिक्षा बजावल्या जात असतांना पाहूं नयेत असें कॉर्नवाल त्यांना सांगून गॉनेरिलला निरोप देऊं पाहत आहे. एवढ्यांत ऑस्वल्ड बातमी घेऊन येतो की, ग्लॉस्टरने तीस चाळीस लढवय्ये बरोबर देउन लिअरला डोव्हरकडे पाठविलें आहे. त्यामुळे अधिकच भय उत्पन्न होतें. चोहोकडे माणसें पिटाळलीं जातात.' थोड्याच वेळांत ग्लॉस्टरला पकडून आणलेंही जातें. प्रथम त्याचे हात बांधतात. नंतर त्याला खुर्चीशीं जखडून टाकतात. रेगन त्याची दाढी उपटते. ग्लॉस्टरच्या रागाकडे कोणी लक्ष देत नाही. आपल्याला एक पत्र जें आलें आहे तें तटस्थाकडून आलें आहे अशी आपली समजूत आहे, या त्याच्या खुलाशाकडेही कोणी लक्ष देत नाही. फक्त त्याने लिअरला डोव्हरला कां पाठविलें याच प्रश्नाचा पाठपुरावा केला जातो. त्यावर, राजाचा छळ मला सहन झाला नाही म्हणून, असें ग्लॉस्टर उत्तर देतो आणि या दुष्ट कर्मांचीं फळें या बहिणींना लौकरच पाहावीं लागतील अशी शापवाणी उच्चारतो. परंतु हीं फळें पाहायला तुला दृष्टि असणार नाही असें म्हणून ग्लॉस्टरचा एक डोळा फोडण्यांत येतो. दुसराही डोळा फोडा असें रेगन उल्हासाने म्हणते. परंतु कॉर्नवॉलचा एक सेवक मध्ये पडतो, त्याची व कॉर्नवालची चकमक होते. त्यामध्ये कॉर्नवॉलला जखम होते. परंतु तेवढ्यांत त्याची पडलेली तरवार उचलून रेगन त्या सेवकावर पाठीमागून वार करते; आणि जखमी झालेला कॉर्नवॉलच ग्लॉस्टरचा दुसराही डोळा फोडतो.

ग्लॉस्टर एडमंडच्या नांवाने हाका मारून "पाहा बाबा, ही तुझ्या बापाची अवस्था" असें म्हणूं लागतो. "परंतु त्यानेच तर आम्हांला तुझ्या या सगळ्या कृत्यांची माहिती दिली, तो तर तुझा उभा दावा करतो" असें रेगनने सांगितल्यावर एडगरवर आपण केवढा घोर अन्याय केला याची जाणीव ग्लॉस्टरला होते; पण फार उशीरा. ग्लॉस्टरला एका सेवकाबरोबर बाहेर हाकलून देऊन निर्घृण रेगन आणि कॉर्नवॉल निघून जातात. त्यांचें तें घोर कृत्य बाकीच्या सेवकांना सुद्धा पापी वाटतें. आणि अंड्याचा बलक वगैरे आणून ग्लॉस्टरच्या डोळ्यांत घालावा व त्याच्या डोळ्यांना थोडी शांतता आणावी असें त्यांच्या मनांत येतें. येथे हा प्रवेश आणि तिसरा अंक संपतो.

चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत ग्लॉस्टरला एक वृद्ध गृहस्थ घेऊन जात असतांना पुन्हा एडगरशीं त्याची गाठ पडते. टॉम म्हणूनच ग्लॉस्टर त्याला ओळखतो. या प्रवेशांत कांही अत्यंत काव्यमय आणि खोल तत्त्वदर्शक अशा ओळी आहेत. परंतु त्यांच्याशीं थांबण्याचें आपल्या चर्चेच्या दृष्टीने प्रयोजन नाही. कथेच्या गतीच्या दृष्टीने आपण यांत एवढेंच पाहतों की, एडगर आपलें पुत्रकर्तव्य करायला मिळावें या दृष्टीने आंधळ्या ग्लॉस्टरला डोव्हर येथे पोचविण्याची कामगिरी स्वतः पतकरतो आणि ते दोघे तिकडे जातात. ग्लॉस्टरच्या मनांत डोव्हरच्या समुद्रालगतच्या उंच कड्याच्या टोकाला जाऊन उडी मारून आत्महत्या करावी असा विचार स्फुरलेला आहे हें एडगरच्या ध्यानांत येतें. कारण त्या टोकावर नेऊन मला उभा कर असें ग्लॉस्टर कटाक्षाने त्याला सांगत असतो.

गॉनेरिलची एक नवीनच हीन छटा —

दुसऱ्या प्रवेशांत आल्बनीच्या प्रासादांत गॉनेरिल व एडमंड आपल्याला भेटतात. सुरुवातीलाच गॉनेरिल जेव्हा म्हणतांना आपण ऐकतों की, "आमचे शेळपट नवरोबा आपल्याला मध्येच भेटले नाहीत तें ठीक झालें" त्या वेळीं तिच्या राक्षसी स्वभावांतील ही नवी हीन छटा प्रत्ययाला येऊन आपण स्तिमित होऊन जातो. परंतु तेवढ्यांत ऑस्वल्ड तेथे आल्याने या नव्या ओघाचा अविष्कार थोडा अटकतो. मात्र, आल्बनीचें चित्त ठिकाणावर नाही, त्याचें कशांतच लक्ष लागत नाही, ग्लॉस्टरच्या हकीकतीने तो फारच चिडला आहे, ही वार्ता ऑस्वल्डने सांगितल्यावर गॉनेरिलचें अंतःकरण उलटें एडमंडकडे अधिकच आकृष्ट झालेलें आपण पाहतों. अर्थात नवऱ्याच्या या अवस्थेंत एडमंडने त्याच्या नजरेस पड्रूं नये म्हणून एडमंडला ती तेथूनच रजा देते आणि मेहुणा कॉर्नवॉल याच्याकडे जाऊन त्याच्या सैन्याचें आधिपत्य त्याला करायला सांगते. ऑस्वल्ड आपल्या दोघांमध्ये सतत दुवा राहील असें आश्वासन देऊन ती म्हणते की, "जर तूं थोडें धाडस केलेंस तर लौकरच तुझ्या मालकिणीचा (पत्नी या अर्थी) हुकूम तुझ्या कानीं पडेल." एवढ्यानेच त्याची समज पडणार नाहीसें वाटून की काय, ती त्याला आठवणीसाठी म्हणून एक मंतरलेली वस्तु अंगावर धारण करण्यासाठी देते आणि त्याची मान खाली वाकवून त्याचें चुंबन घेते. "या मुक्याला जर कांही वाचा असेल तर तो तुझा उत्साह अस्मानाला भिडवील – नीट विचार कर आणि आपलें कल्याण करून घे" अशा अर्थपूर्ण शब्दांनी त्याला ती रजा देते.

आल्बनीचे डोळे उघडतात —

यानंतर आल्बनी येतो. तो किती बदललेला आहे याचें प्रत्यंतर तो तिच्याशीं अगदी तेढें आणि टाकून बोलूं लागतो तेव्हा समक्षच आपणाला येतो. त्याच्या तेढ्या बोलण्याला तीही तेढेंच उत्तर देते, त्याने तो खूपच चिडतो आणि माझ्या हातांनी माझ्या उसळणाऱ्या रक्ताचा आदेश मानला असता तर तुझीं हाडें मी मांसापासून वेगळीं केलीं असतीं असें उद्वेगाने म्हणतो. परंतु तूं स्त्री असल्याने मला हात आवरावा लागतो, अशी असहायता तो व्यक्त करतो. त्यावर "तुमचें पौरुष पाहूनच घ्यावें" असा अत्यंत कठीण झपाटा मारून गॉनेरिल आपला त्याच्याविषयीचा दाटलेला तिरस्कार अगदी स्वच्छपणे व्यक्त करते.

परंतु यापुढे आणखी कांही बोलणें होण्यापूर्वीच कॉर्नवॉलकडील एक दूत येऊन जखमी झालेल्या कॉर्नवॉलचा मृत्यु झाल्याची बातमी सांगतो. त्याचबरोबर एक पत्रही तो गॉनेरिलला देतो. या बातमीने गॉनेरिलच्या चित्ताची फार विकल अवस्था होते. एडमंडच्या प्रेमांत आपल्याला प्रतिस्पर्धी आपली बहीण होण्याची तिला भीति वाटूं लागली, हें पुढें लौकरच आपल्याला समजायचें आहे. त्या भयभीत मनस्थितींतच

पत्र वाचण्यासाठी ती आंत निघून जाते. इकडे आल्बनीला सर्व वृत्त कळून येतें त्या वेळीं, लिअरसाठी ग्लॉस्टरने केलेल्या त्यागाबद्दल आल्बनीला फार आदर वाटतो आणि त्याचे डोळे काढल्याबद्दलचा सूड घेण्याची तो प्रतिज्ञा करतो. एडमंडच्या कारस्थानाची आणखी माहिती घेण्यासाठी तो त्या दूताला आंत घेऊन जातो.

कॉर्डेलिया प्रवेश करते —

यापुढच्या तिसऱ्या प्रवेशांत कॉर्डेलिया रंगभूमीवर येणार याची प्रस्तावना आहे. फ्रान्सचा राजाच तिच्यासह आला होता. परंतु फ्रान्समध्ये कांही भानगड उपस्थित झाल्यामुळे त्याला परत जावें लागलेलें असतें. ही गोष्ट कॉर्डेलियाच्या तैनातींतील एका गृहस्थाकडून केंटला कळते. लिअरची सर्व करुण कहाणी ऐकतानां अल्पभाषी कॉर्डेलिया बोलली जरी नाही तरी तिची अवस्था किती विकल झाली यांचें वर्णन त्या गृहस्थाच्या तोंडून शेक्स्पीअरने किती प्रभावीपणे काव्यमय आणि अत्यंत हृदयद्रावक असें केलें आहे. अगदी थोड्या शब्दांत तें दुःखावेगाचें त्याने रेखाटलेलें चित्र पाहून शेक्स्पीअरच्या प्रतिभासामर्थ्याबद्दल आपण नतमस्तक होतो. केंटलाही त्या वर्णनांतला झपाटा जाणवला, आणि तो म्हणाला, "आपण माणसें म्हणजे दैवाच्या हातचीं नुसतीं खेळणीं. नाहींतर एकाच उदरांतून इतक्या भिन्न स्वभावाचीं माणसें कशीं निर्माण झालीं असतीं?" केंटकडूनच त्या गृहस्थाला आणि आपणाला समजतें की, लिअर राजा डोव्हरमध्ये दाखल झालेला आहे. परंतु अजून त्याची बुद्धि भ्रमलेलीच आहे. विशेषतः आपल्या मुलीला भेटण्याची त्याला अत्यंत मोठी शरम वाटते आहे. त्या गृहस्थाला केंट लिअरच्या सेवेंत ठेवतो. कारण त्याला स्वतःला अजून प्रकट व्हायचें नव्हतें.

यानंतर कॉर्डेलिया, डॉक्टर आणि कांहीं शिपाई प्रवेश करतात. लिअरच्या वेडाची तुलना कॉर्डेलिया खवळलेल्या समुद्राशीं करते आणि आपलें सर्व कौशल्य खर्च करून लिअरच्या वृत्ती शांत करण्याची व त्याला भानावर आणण्याची अत्यंत प्रेमळ विनंति ती डॉक्टरला करते. एवढ्यांत, ब्रिटिश सैन्य कूच करूं लागल्याची बातमी घेऊन एक दूत येतो. त्या वृत्ताने कॉर्डेलिया मुळीच गडबडत नाही. "त्यांना तोंड देण्याची आमची पूर्ण तयारी आहे" या तिच्या आत्मविश्वासाचें कौतुक वाटतें.

गॉनेरिलप्रमाणेच रेगनही दुर्वर्तनी—

यानंतर कॉर्डेलिया आणि लिअर यांची प्रत्यक्ष भेट व्हायची आहे. परंतु त्यापूर्वी रेगनही कांही आपल्या बहिणीपेक्षा दुर्वर्तनांत एक रेसभर कमी नाही याचें दर्शन पांचव्या प्रवेशांत नाटककार घडवितो. ऑस्वल्ड गॉनेरिलकडून एडमंडसाठी पत्र घेऊन आलेला असतो. आल्बनीनें सैन्याची हालचाल सुरू केली असून त्याचें आधिपत्य त्याने स्वतःकडेच घेतलें आहे; पुष्कळ गाजावाजा त्याने चालविला असला तरी खरी शूर लढवय्यी आपली

मालकीणच, वगैरे गोष्टी ऑस्वल्ड सांगतो, त्याकडे रेगनचें खरें लक्ष नसतें. आपल्या बहिणीने एंडमंडला एवढें खास पत्र काय लिहिलें असावें याबद्दल तिला तीव्र उत्कंठा असतें. एडमंड आपल्या आंधळ्या बापाचा निकाल लावण्यासाठी दूर कोठें भटकतो आहे, त्याच्यामागे तूं किती धावशील, असें म्हणून ऑस्वल्डला ती आपल्या घरींच रात्रीं विश्रांतीला राहायला सांगते. पण पत्र तावडतोब घाईने दिलें पाहिजे ही त्याची घाई पाहून, एवढें आमच्या बहिणीने लिहिलें आहे तरी काय, तुला माहीत असलेंच पाहिजे, असें म्हणून रेगन त्याच्या पोटांत शिरूं पाहते. अगदी मनांतलें म्हणून ती त्याला सांगते, " तुझ्या मालकिणीचें आपल्या नवऱ्यावर प्रेम नाही. अलीकडे आमच्या येथे ती आली होती तेव्हा एडमंडकडे ती अशा तऱ्हेने पाहत होती की, त्याच्यावर तिचें प्रेम गेलें आहे हें कुणाच्याही ध्यानांत यावें. तूं तर तिच्या अगदी उरालगतचा!"

यांतील ध्वनि किती स्पष्ट आहे. ऑस्वल्ड आपल्या बहिणीच्या अगदी विश्वासांतला याचा अर्थ रेगनच्या दृष्टीने किती खोल आणि क्षोभक आहे. ऑस्वल्डच्या मनांत मत्सर जागृत करून आपला हेतु साध्य करण्याचा हा एक केवढा धाडशी प्रयत्न आहे. माझा कांही तसा वाईट बोलण्याचा हेतु नाही अशी रेगन संपादणी करते. आणि तरीहि, 'तिच्या मनांतलें तुला सगळें ठाऊक' अशी पुन्हा द्व्यर्थी मखलाशी करून त्याला ती स्पष्टच सांगते की, तुझ्या मालकिणीच्या मनांत कांही असलें तरी एडमंडचा खरा जीव माझ्यावरच आहे. अशा रीतीने ऑस्वल्डला आपल्या विश्वासांत घेऊन ती त्याला ग्लॉस्टरचा तो दिसेल तेथे वध करण्याची चेतवणी देते.

ग्लॉस्टरचा आत्महत्येचा प्रयत्न फसतो—

इकडे ग्लॉस्टर आणि टॉमच्या वेषांत एडगर डोव्हरच्या कड्याच्या टोकाशीं आलेले असतात. त्या कड्याच्या खालील त्या अथांग दरीचें वर्णन करतांना शेक्सपीअरच्या अंगचा कवि केवढ्या मोठ्या प्रबळपणे जागा झाला आहे. ग्लॉस्टरला त्या दरींत उडी मारायची असते. दिसत तर कांही नाही. अशा स्थितींत एडगर त्याला उडी मारायला सांगतो. उडी मारल्यासारखें करून ग्लॉस्टर धडपडून खाली जमिनीवर पडतो. आपण खोल उडी मारली असावी असा सहजच त्याला विश्वास पटत नाही. परंतु त्याने उडी मारली, आपण खालीं तळांत होतो तेथून आपण समक्ष पाहिलें आणि टॉम वरच राहिला असून ग्लॉस्टर तळाशीं आपल्याजवळ म्हणजे दुसऱ्याच्च कोणाजवळ उभा आहे असा आभास एडगर ग्लॉस्टरच्या मनांत उत्पन्न करतो. हा सगळाच प्रकार अत्यंत नाट्यमय आहे. ग्लॉस्टरच्या आंधळेपणामुळे त्यामध्ये विश्वास्यता निर्माण करण्याचें यश नाटककाराला चांगलें साधलें आहे. " वर ज्याच्या संगतीने तुम्ही आला होता ते एक भूत होतें आणि त्यानेच तुम्हांला या विपरीत कृत्याला प्रवृत्त केलें; पण आतां तुम्ही त्याच्या कचाट्यांतून सुटला " अशी ग्लॉस्टरची समजूत एडगर करतो व त्याला शांत करूं पाहतो.

लिअरचें करुण दर्शन —

या क्षणीं फुलांच्या विचित्र माळा धारण केलेला लिअर त्या ठिकाणीं प्रवेश करतो. आफिलियाच्या त्या अशाच रीतीने फुलें घातलेल्या शेवटच्या वेषाची क्षणभर आठवण होते. लिअरच्या या वेड्या अवस्थेंतही कांही अचूक शहाणपणाचे विचार व्यक्त होतात. कोणी आधुनिक शास्त्रज्ञ म्हणूं शकेल की, त्याचें अंतर्मन जागृत होऊन बोलत होते. "राजा म्हणून लोक मला काय काय सांगत होते. मला काडीची सुद्धा अक्कल आली नव्हती तेव्हाच माझे केस पांढरे झाले आहेत – म्हणजे मी मोठा ज्ञानी झालों आहें असें हे लोक म्हणत होते. मी हो म्हणेन त्याला हो, नाही म्हणेन त्याला नाही; अशी साथ देत होते. पण त्या पावसाने जेव्हा चिंब भिजवलें, वाऱ्याने दांतखिळी थडथडायला लावली आणि वीज माझें ऐकून लखमखायची थांबली नाही तेव्हा या सगळ्या मंडळींचा खोटेपणा माझ्यापुढे किती लख्खपणे उभा राहिला" या त्याच्या भ्रांतिष्ठ आणि तरीही खऱ्या भाषणाने कळमळून "हे कोण, राजेसाहेबच ना!" असें ग्लॉस्टर विचारतो. त्यावर 'हो, राजाच तो मी' असें म्हणून लिअर तसाच बडबडत राहतो. त्या बोलण्यांत वेडाची झांक तर परिपूर्ण आहेच. परंतु सुसंगत अशीं चिरकालीन सत्येंही त्यांत किती सहज त्याने बोललेलीं आहेत. "माणूस अधिकारावर असतो तोपर्यंतच त्याच्या शब्दाला किंमत" हें विदारक सत्य लिअर सहज फेकून देतो जणू. "दिसत नाही तर काचेचीं बुबुळें लावून, राजकारणी पुरुषांप्रमाणे दिसत नाही तें दिसल्याचें ढोंग कर" असाही भेदक सल्ला तो ग्लॉस्टरला देतो.

वेडांतही विवेक —

या सगळ्या सुसंगत आणि विसंगत भाषणांच्या खिचडीने एडगर स्तिमित होऊन जातो. "वेडांतही विवेक" असें त्याचें तो वर्णन करतो. "याच्या वेडांतही कांही सुसंगतपणा आहे" असेंच नेमकें पोलोनिअस हॅम्लेटबद्दल म्हणाला होता. पण हॅम्लेटचें तें वेड खोटेंच पांघरलेलें होतें. येथे हा ऐशी वर्षांचा म्हातारा वेडाने खराच भांबावून गेलेला होता.

अंत:करणाचें पाणी करणारा छोटासाच प्रसंग —

एवढ्यांत काही सेवक येऊन लिअरला घेऊन जाऊं पाहतात. लिअर त्यांना वृथाच विरोध करतो. मी राजा आहे, माहीत नाही तुम्हांला? म्हणून त्यांना दरडावतो. आहांतच तुम्ही राजे असें त्यांनी म्हटल्यावर तो क्षणभर खुश्शार्लल्यासारखा होतो. परंतु एकदम मनांत कांही तरी लहर असल्यासारखें होऊन पळून जाऊं लागतो. हा अगदी छोटासाच प्रसंग; परंतु कोणाही सहृदय माणसाच्या हृदयाचें पाणी पाणी करून टाकावें इतकें अभिनयकौशल्य दाखविण्याची केवढी मोठी संधि, या ठिकाणीं नाटककाराने कोणत्याही चांगल्या नटाला उपलब्ध करून ठेवलेली आहे.

दुःखानुभवांतून दयामय वृत्ति —

लिअरच्या शोधार्थ आलेल्या गृहस्थाकडून एडगरला कळतें की, फ्रान्सच्या सैन्याने लढाईसाठी आगेकूच केलेलें आहे. राणी जरी डोव्हरला कांही खास कारणाने आलेली असली तरी तिचें पितृप्रेम जागृत आहे. आणि फ्रेंच सैन्याच्या साहाय्याने ती लिअरचें रक्षण करील. त्यानंतर ग्लॉस्टरकडे लक्ष द्यायला एडगरला थोडा निवांत वेळ मिळतो. तो अगदी सहज, "मग कसें काय पिताजी?" असें म्हणून जातो. त्यासरशी चमकूनच "कोण गृहस्था तूं?" असें ग्लॉस्टर विचारतो. परंतु स्वतःला सावरून घेऊन एडगर, "असाच एक दुःख अनुभवून दयामय वृत्ति झालेला गरीब माणूस" असें म्हणून आपलें सत्य स्वरूप उघड करीत नाही.

एवढ्यांत ग्लॉस्टरच्या तपासांत असलेला ऑस्वल्ड तेथे येतो. ग्लॉस्टरवर तो हल्ला करण्याचा यत्न करतो. परंतु एडगर त्याला पुरून उरतो. तुझ्या मालकिणीच्या पापांचा सार्थीदार म्हणून मी तुला चांगलें ओळखतों अशी एडगर त्याला जाणीव देतो. मरतां मरतां ऑस्वल्ड एडगरला आपल्याजवळचीं पत्रें एडमंडला नेऊन देण्यास सांगतो. कारण त्याने एडगरला ओळखलेलेंच नसतें. त्या पत्रांमध्ये गॉनेरिलने एडमंडला लिहिलेलें प्रेमपत्र एडगरला सापडतें. स्वतःच्या नवऱ्याचा वध करण्याची चिथावणी एडमंडला तिने त्या पत्रांत दिलेली असते. हा प्रकार पाहून, नव्हे ऐकून ग्लॉस्टरचें हृदय शतधा विदीर्ण होतें. तो म्हणतो, "राजा लिअरचें वेडेपण चांगलें. त्याला हें सर्व कळत तरी नाही. माझी बुद्धि शाबूत असल्यामुळे माझ्या दुःखाचें दुःखपण अधिकच वाढतें."

एवढ्यांत सैन्यांतले पडघम दुरून ऐकूं येतात. तेव्हा त्या सैन्यांतील कोणा स्नेह्याच्या हातीं ग्लॉस्टरला सोपविण्यासाठी एडगर त्याला घेऊन जातो.

करुणामयतेंतून कॉर्डेलियाही काव्य बोलूं लागते —

कॉर्डेलियाच्या सांगीप्रमाणे डॉक्टरच्या देखरेखीखाली लिअरला ठेवलेलें होतें. बरीचशी शांत झोप त्याला लागली होती. आतां त्याला उठविण्यास हरकत नाही, बहुधा तो आता चांगला सावध झाला असेल, असें डॉक्टरचें मत होतें. आणि म्हणून लिअरला उठवून त्याच्याशीं बोलण्याच्या उद्देशाने त्याच्या तंबूंत कॉर्डेलिया केंटसह आली होती. अत्यंत मितभाषी अशी कॉर्डेलियासुद्धा लिअरच्या त्या अतीव करुण अवस्थेमुळे या प्रवेशांत (अंक ४ प्रवेश ७) केवढी तरी बोलकी झाली आहे; तीही काव्य बोलूं लागली आहे. त्याच्या भडकलेल्या वृत्ती शांत व्हाव्या, त्याच्या जाणिवेंतील विसंवादी आणि कर्कश सूर नाहीसे होऊन तेथे स्वरमेळ निर्माण व्हावा, दुसऱ्या बाळपणांत प्रवेश केलेल्या आपल्या पित्याला शांतता लाभावी, अशी ती मनोभावाने परमेश्वराची प्रार्थना करते. त्याचें चुंबन घेऊन त्याला जागे करण्याचा प्रयत्न करतांना त्या चुंबनांच्या ठिकाणीं आपल्या बहिणींनी वडिलांवर केलेल्या अन्यायांची स्मृति पुसून टाकण्याचें

सामर्थ्य येवो अशी आशा ती व्यक्त करते. बहिणींच्या त्या वर्तनाची आठवण होऊन तिचें हृदय पिळवटून जातें. त्या दिवशींच्या त्या तुफानांत शत्रूच्या कुत्र्यालासुद्धा मीं घराबाहेर लोटलें नसतें; जरी तो मला चावला असता तरीही; आणि आपल्या बहिणींनी आपल्या बापाला तशा वादळांत लोटून द्यावें, यानें तिचें अंतःकरण इतकें विद्ध झालें की, "बाबा, तुमची बुद्धि ज्या क्षणीं गेली त्याच क्षणीं त्या वादळांत तुमचा जीवही कसा गेला नाही, याचेंच महदाश्चर्य वाटतें" असे उद्गार ती काढते.

लिअरच्या वृत्तींतील महान परिवर्तन —

लिअर हळुहळू जागा होतो. यमलोकांतून मला कां उगाच ओढून आणतां, असें कांहीसें असंबद्धच तो सुरुवातीला बोलतो. कॉर्डेलियाला नीट ओळखीतही नाही. आपल्या अत्यंत करुणास्पद अवस्थेच्या जाणीवेने तो अगदी भारावलेला असतो. इतका की, "दुसऱ्या कोणाला या अवस्थेंत पाहून करुणेने आकळून माझे प्राण गेले असते!" असें तो अंतःकरण पिळवटून म्हणतो. पण त्याचे स्वतःचे प्राण मात्र अजून चांगले घट्टपणें शाबूत होते. हळुहळू लिअरला कॉर्डेलियाची ओळख पटूं लागते. आणि बोलतां बोलतां एकदम तो कॉर्डेलियापुढे गुडघे टेकून वाकून बसतो. "असे माझ्यापुढे नका हो गुडघे टेकूं" या कॉर्डेलियाच्या आर्त उद्गारावर लिअरने दिलेलें उत्तर गेल्या दोनच दिवसांत त्याच्या वृत्तीमध्ये झालेल्या महान परिवर्तनाचें केवढें मोठें निदर्शक आहे. तो म्हणतो,

"नका हो, माझी थट्टा करूं. मी एक साधाभोळा, वेडा, मूर्ख म्हातारा माणूस आहे. पुरीं ऐशी वर्षें झालीं आहेत मला. आणि खरें म्हणाल तर माझें डोकें कांही ताळ्यावर नाही. एकदा मला वाटतें, तुला आणि या माणसाला (केंट) मी ओळखतों. पण पुन्हा मला भ्रम पडतो. कारण मी हा येथे कोठे आहे आणि हे कपडे माझ्या अंगावर कोठून आले याचा कांही केल्या मला उलगडा होत नाही. रात्रीं मी कोठे झोपलों होतों हेंही मला आठवत नाही. हंसाल तुम्ही कदाचित मला. कारण मला आपलें वाटतें आहे की ही श्रेष्ठ स्त्री माझी मुलगी कॉर्डेलिया आहे."

मुलीवर आपण केलेल्या अन्यायाच्या जाणिवेमुळे कांही लिअर कॉर्डेलियापुढे वाकलेला नव्हता. तर आपल्या मोठेपणाची आठवण नसल्यामुळे आणि कॉर्डेलियाच्या श्रेष्ठ दर्जाची जाणीव होऊन त्याने तसें केलें होतें. ती कॉर्डेलिया असावी - आपली मुलगी असावी असें त्याचें एक मन त्याला सांगत होतें. पण आपला हा मूर्खपणा तर नाही; लोक आपल्याला वेडा म्हणून हसतील ही भीतीही त्याला वाटत होती.

तरी पण पीळ कायम —

ती कॉर्डेलियाच आहे आणि तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहत आहेत याची खात्री पटल्यावर पुन्हा एकदा लिअरच्या मनांतील पीळ जागा झालाच. "बाई, तूं कशाला

रडतेस; तुझ्यावर तर मीं अन्याय केला आहे. तेव्हा तूं मला विष प्यायला दिलेंस तरी तें मी पिईन. असें विष तूं मला द्यावेंस याला तुला कारण आहे." असें तो बोलतो.

अजून मोकळ्या मनाने तो कॉर्डेलियाला स्वतःजवळ घ्यायला तयार नाही. "कोठे आहे मी, फ्रान्समध्ये?" या त्याच्या प्रश्नाला केंट जेव्हा उत्तर देतो की, "आपल्या राज्यांत" त्या वेळी लिअरला विंचू डसल्यासारखें होतें. "आणि माझ्याबरोबर चलणार ना आता" असें अत्यंत प्रेमाने कॉर्डेलिया म्हणते त्या वेळींही त्याचें मन पूर्ण मोकळें होत नाही. "माफ करा आं मला. मी म्हातारा आहें, वेडा आहें" असें म्हणतच तो कॉर्डेलियाबरोबर जातो. अजूनही कॉर्डेलियाशीं त्याची पूर्ण दिलजमाई झालेली नसते. बदललेल्या परिस्थितीची यथार्थ कल्पना त्याला आलेली नसते.

लिअरची आणि कॉर्डेलियाची भेट झाली; आता त्याचे दुर्दिन संपले; अशी आशा आपल्या ठिकाणीं उत्पन्न होते. पण विधिघटना वेगळी होती. कै. औंधकरांच्या संभाजीने म्हटल्याप्रमाणे, "कालचक्राला क्षमा मंजूर नाही." लिअरच्या चुकीचें प्रायश्चित्त त्याच्या पदरांत पुरेपूर बांधल्याशिवाय कालचक्राचें समाधान होणार नव्हतें. म्हणून युद्धामध्ये फ्रान्सचा पराभव होऊन लिअर आणि कॉर्डेलिया दोघेही एडमंडच्या तावडींत सापडतात. एडमंड त्यांची रवानगी कैदखान्यांत करतो. त्या वेळीं कॉर्डेलिया हा पराभव मोठ्या धैर्याने सहन करते. हेतु उत्तम असूनही यश येतेंच असें नाही, याची तिला चांगली जाणीव असते. तिला वाईट वाटतें तें फक्त आपल्या पित्यासाठी. त्याचा पुढचा निर्णय आता कॉर्डेलियाच्या दोघी बहिणींच्या हातीं होता. तेव्हा त्यांची गाठ घ्यावी का असा प्रश्न कॉर्डेलिया लिअरला विचारते. परंतु लिअरला त्या बहिणींचें दर्शनसुद्धा नको असतें. त्यापेक्षा आपण तुरुंगांतच, पिंजऱ्यांतल्या पक्ष्याप्रमाणे आनंदाने आपल्याच स्वतःच्या जीवनांत दंग होऊन राहूं असें त्याला वाटतें. "येथे तुला मी—तूं मला. बाहेरच्या गोष्टी आपल्या कानांवर येतील त्या आपण ऐकूं. जणूं देवाचे चारचक्षू म्हणून आपण घडेल तें सर्व नुसतें पाहत राहूं. त्यासंबंधी बोलत राहूं."

लिअरचें मोठेपण—

लिअरच्या या नव्या वृत्तीचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. आतां जीवनाबद्दलची त्याची आसक्ति पूर्ण नाहींशी झाली आहे. जीवनांतील सुखाने किंवा दुःखाने विचलित होण्याजोगी त्याच्या मनाची अवस्था शिल्लक राहिलेली नाही. कसल्याही परिस्थितींत तो आता, निर्लेप वृत्तीने, जगावें लागेल तितका काळ जगायला तयार आहे. केवळ एक कैदी म्हणून जगावें लागलें तरी त्याच्या मनाला आता वेदना होणार नाहीत. इतकी गेल्या पंधरावीस दिवसांतील घडामोडींनी त्याच्या मनांतील रागलोभादि विकारांची त्याच्यावरील सत्ता नाहीशी झाली आहे. इतकें त्याचें चित्त निरहंकार आणि विशुद्ध झालेलें आहे.

यांतच लिअरचें खरें मोठेपण आहे. ऐशी वर्षांचा सर्वसत्ताधीश राजा–ज्याचा शब्द म्हणजेच सत्य आणि कायदा होता एवढा अनिरुद्ध सत्ताधारी–उदार बुद्धीने आपलें सर्व राज्य देऊन टाकतो काय आणि पंधरा दिवस झाले न झाले न झाले तोच तो, नुसत्या वैभवालाच काय, पण साध्या निवाऱ्यालाही पारखा होतो काय; हा सगळाच प्रकार कोणाही माणसाला वेड लावील, नव्हे प्राणघात करून घ्यायला लावील असाच होता. लिअरच्याच समांतर रेषेंत ग्लॉस्टरवरही जवळजवळ असाच प्रसंग गुदरला. परंतु लिअरप्रमाणे त्याच्या चित्ताला समता प्राप्त झाली नाही, विशुद्धता लाधली नाही. एडगरवर त्याने केलेल्या अन्यायाचें स्वरूप कळून त्याला दुःख झालें; एडगर सुखांत आहे हें समजून त्याला सुख झालें. पण या दोन्ही गोष्टी पचवून त्याला निकोप मनाने जिवंत राहतां आलें नाही. सुख आणि दुःख यांच्या अतिरेकाच्या माऱ्यांत त्याने जीव टाकला. त्या मानाने म्हाताऱ्या लिअरच्या शरीराचा, मनाचा आणि बुद्धीचा चिवटपणा आपल्याला त्याच्याविषयी मोठा आदर वाटवितो. पण त्याच वेळीं, त्याने केलेल्या अक्षम्य अव्यवहारीपणाचें आणि आपल्या प्रेमळ मुलीवर केलेल्या त्याच्या अन्यायाचें प्रायश्चित्त भोगल्यावाचून त्याला सुटका नाही या जाणिवेने आपलें चित्त त्याच्याविषयी फार हळहळतें.

अजूनही भ्रमनिरास पुरा नाही —

परंतु यांतही एक खटकणारी गोष्ट म्हणजे मन इतकें विशुद्ध झालें असूनही कॉर्डेलियावर त्याच्या हातून अन्याय होतच राहतो. ती म्हणत असते की, पराजय झाला तरी हरकत नाही; आपण आपल्या बहिणींना भेटूं. वृथाच का होईना, पण बहिणींकडून आपणाला आपली सुटका करून घेतां येईल अशी तिला आशा वाटत होती. परंतु लिअरचें त्यावर उत्तर काय? तर त्याच्याप्रमाणेच कॉर्डेलियानेही जीवनावरची आसक्ति सोडावी आणि तिने व त्याने, दोघांनीच, एकमेकांच्या सहवासांत राहावें व एकमेकांना साथ द्यावी. यांत अजूनही राज्याची वाटणी करतांवेळची लिअरची वृत्ति जशीच्या तशी कायम असल्याचें पाहून लिअरच्या अविचारीपणाविषयी कीव वाटल्यावांचून राहत नाही. कॉर्डेलियाला स्वतःचें बापापासून वेगळें असें जीवन आहे याची अजूनही त्याला जाणीव नाही. याच चुकीचें प्रायश्चित तो आतापर्यंत भोगीत आला. आलेल्या अनुभवाने त्याची जीवनाविषयीची दृष्टि बदलली, निवळली आणि विशुद्धही झाली. परंतु दुर्दैव असें की सर्व जीवन आपल्यासाठी आहे हा भ्रम कांही अजून त्याचा दूर झाला नाही.

परंतु आता कॉर्डेलियाच्या इच्छेमुळे नव्हे, तर निर्घृण सृष्टीच्या–कालचक्राच्या–ओघामुळे कॉर्डेलियाचा सहवास त्याला लाभावयाचा नव्हता. कारण वरवर जरी एडमंडने त्यांची कैदेंत म्हणून रवानगी केली तरी त्याच वेळीं त्याने त्यांच्यापैकी कॉर्डेलियाचा वध व्हावा अशी योजना केली. पुढे थोड्याच वेळांत एडमंडच्या सगळ्या

कारस्थानाचा स्फोट झाला, एडगरचें व त्याचें द्वंद्वयुद्ध झालें, त्यांत त्याचा पाडाव झाला; गॉनेरिलने केलेल्या विषप्रयोगामुळे रेगनचा मृत्यु झाला; गॉनेरिलचा स्वतःच्या नवऱ्याचा जीव घेण्याचा कट उघडकीस आल्यामुळे तिने स्वतःचा जीव घेतला; या सगळ्या झंझावातांत गुंतल्यामुळे लिअर आणि कॉर्डेलिया यांचें स्मरणच जणू कोणाला राहिलें नाही. आणि मरतां मरतां, पश्चात्ताप होऊन एडमंडने जेव्हा आपण कॉर्डेलियाचा वध करण्याचा कट केला होता हें सांगून त्वरा करून तिचे प्राण वाचविण्याची विनंति केली, तेव्हा त्या विनंतीचा कांही उपयोग झाला नाही. कारण कोणी कैदखान्यांत जाऊन, जें घडूं घातलें होतें तें थांबविण्यापूर्वीच कॉर्डेलियाचा वध होऊन गेला होता आणि लिअर कॉर्डेलियाचें प्रेत स्वतःच्या हातावर घेऊन आल्बनीच्या तंबूपुढे हजर झाला होता.

लिअरच्या आकांताचें केवढें प्रभावी दर्शन —

हा शेवटचा प्रवेश दगडाच्या सुद्धा हृदयाचें पाणी करील. लिअरच्या हृदयाचा या वेळचा आकांत अगदी थोड्या शब्दांत शेक्स्पीअरने केवढ्या प्रभावी सामर्थ्याने आपल्यापुढे उभा केला आहे. एक क्षण कॉर्डेलिया मेली आहे याची त्याला खात्री वाटते आणि तरीही ही सारी मंडळी ओरडून आभाळ फोडून टाकीत नाहीत याबद्दल त्याला क्रोध येतो; तर दुसऱ्याच क्षणीं तिच्या नाकाशीं धरलेलें पीस हलतें आहे असा भास होऊन ती जिवंत आहे असें त्याला वाटतें आणि हें जर खरें असेल, एवढा जर योगायोग असेल तर माझीं सारीं दुःखें मी पार विसरून जाईन असें केवढ्या वात्सल्य-भराने तो उद्गारतो. तेवढ्यांत केंट त्याच्यापुढे गुडघे टेकून बोलूं लागतो. त्यासरशी आणि त्या सगळ्यांनी सभोंवार कोंडाळें केल्यामुळे कॉर्डेलियाचा अखेरचा श्वास निघून गेला, तिला वांचविण्याचा आपला प्रयत्न वृथा गेला, असें वाटून लिअर त्या सगळ्यां-च्यावर भडकून उटतो. आजूबाजूच्या लोकांची धड ओळखही त्याला पटत नाही. इतकी त्याच्या डोळ्यांवर झापड आल्यासारखी होते. केंटला एकदा तो ओळखल्या-सारखें करतो; आणि दुसऱ्याच क्षणीं कांहीतरी विचूक बोलूं लागतो.

हा सगळा प्रकार इतका कारुण्यपूर्ण असतो की दूताने एडमंडच्या मृत्यूची वार्ता त्याच वेळीं आणली असतां आल्बनी अगदी सहज आणि खरें तेंच बोलतो की, "हें पुढे पाहा काय आहे तें. त्यापुढे एडमंडच्या मृत्यूची किंमत किती क्षुद्र!" झाल्या प्रकाराची भरपाई म्हणून आल्बनी राज्याधिकार लिअरच्या हयातीपर्यंत सोडण्याची इच्छा प्रदर्शित करतो. परंतु त्याच क्षणीं लिअर कसेंसेंच करतो आहे असें पाहून तो "हो, पण इकडे पाहा" असें घाबऱ्या घाबऱ्या म्हणतो; तोच लिअर कांही तरी बोलूं लागतो. विदूषकाचा वध झाल्याची आठवण होऊन त्याला शेवटचें अत्यंत मोठें दुःख होतें; आणि कॉर्डेलियाचा मृतदेह पाहून प्राण्यांनी जगावेंच तरी कां हें त्याला कळत नाहीसें होतें. "आता यांचा पुन्हा सहवास होणार नाही" — असा निराशेचा उद्गार तो काढतो आणि गुदमरल्यासारखें होऊन हें बटन जरा काढा पाहूं असें तो म्हणतो आहे

तोच त्याचा अंत होतो. एडगर हाक मारून त्याला उठवूं पाहतो. त्या वेळीं एकाच वाक्यांत त्याच्या अवस्थेचें केंटने किती यथार्थ वर्णन केलें; तो म्हणतो,

" नका त्यांना त्रास देऊं; जाऊं द्या त्यांना; कठोर संसाराच्या या काटेरी मार्गावर त्यांना आणखी आता कुणी लांबवर फरफरटवलेलें त्यांना मुळीच आवडणार नाही. "

अवघ्या पंधरावीस दिवसांत केवढाल्या प्रचंड घडामोडी होऊन राजा लिअरचें सारें विश्व जणू ढवळून निघालें आणि त्याने स्वतःला प्रिय मानलेल्या कृतघ्न मुलींबरोबरच त्याचा स्वतःचा आणि त्याच्यावर अंतकरणापासून प्रेम करणाऱ्या निरागस कॉर्डेलियाचाही अंत झाला. या सगळ्याची सुरुवात लिअरच्या खुळेपणाने झाली हें उघड आहे. जरी त्याला राज्य वाटून टाकायचें होतें तरी स्वतःला यथायोग्य राहतां येईल अशी निश्चित व्यवस्था करून त्याला तसें करतां आलें असतें. तें तर त्याने केलें नाहीच. पण सर्वसामान्यपणे माणसांच्या स्वभावाची जी पारख प्रत्येकाच्या ठिकाणीं असावी तेवढीसुद्धा त्याच्या ठिकाणीं नव्हती. आपल्या दोघी वडील मुलींचें प्रेमप्रदर्शन त्याने खरें मानलें आणि जी मुलगी अंतःकरणापासून खरें आणि न्यायाचें बोलत होती तिला त्याने झिडकारलें. केंटसारखा त्याचा निःसीम हितकर्ता उमराव यामधील चूक त्याच्या नजरेस आणून देत असतांना उलट त्यालाच त्याने हद्दपार केलें. हुंडा मिळणार नाही असें दिसतांच कॉर्डेलियाला नाकारणारा बर्गंडीचा ड्यूक आणि त्याच कार्डेलियावर तिच्या गुणांसाठी लुब्ध होणारा फ्रान्सचा राजा यांच्यामधील फरक समजण्याइतकेंसुद्धा शहाणपण त्याच्या ठिकाणीं नव्हतें. आपण म्हणतों तेंच योग्य, समजतों तेंच खरें; सर्वजण आपणासाठी आहेत; ज्याचें त्याला म्हणून कांही एक स्वतंत्र जीवन असतें ही ओळखही नाही, अशी त्याची सर्वथा आत्मकेंद्रित, अहंकारी आणि वेडी वृत्ति आहे.

अशा लिअरचें चित्र अगदी सुरुवातीलाच नाटककाराने स्पष्टपणाने आपल्यापुढे उभें केलें आहे. यामध्ये लिअर एक राजा होता याशिवाय त्याच्या मोठेपणाचें दर्शन आपल्यापुढें एवढेंही नाही. आणि राजा असला म्हणून त्याचा हा खुळेपणा पाहत असतांनाही तो कोणी मोठा आदरणीय पुरुष वाटावा अशी नाटककाराचीही अपेक्षा असणें शक्य नाही. अशाही माणसावर झंझावाती वेगाने ज्या आपत्तींचा पूर कोसळला त्यांचें चित्र रेखाटणें हेंच एकमेव कार्य नाटककारापुढे होतें. तें त्याने किती प्रभावीपणें बजावलें आहे हें आपण पाहिलेंच आहे.

ही सर्व अनर्थपरंपरा लिअरवर कोसळली ती प्रामुख्याने लिअरच्या या हटवादी आत्मकेंद्रित वृत्तीमुळे. म्हणून हें नाटक स्वभावगत करुणविपाकाचें नाटक आहे असें म्हणतां येईल. परंतु परिस्थितीचा वाटाही या घटना घडण्याचा कारणांत कांही थोडाथोडका नाही. म्हाताऱ्या लिअरने आपल्या दोघी मुलींवर इतका विश्वास टाकावा हा खुळेपणा झाला असला तरी त्याच्या पोटच्या मुली इतक्या दुष्टपणाने त्याच्याशीं वागूं लागाव्या ही घटना कांही त्याच्या स्वभावाचा परिणाम खास नव्हे. आणि अखेरच्या युद्धांत फ्रान्सचा जय न होतां आल्बनी व एडमंड यांचाच विजय व्हावा व

कॉर्डेलियाचा वध थांबविण्याची संधि आल्बनीला मिळूं नये यांतही सर्वथा विरोधी परिस्थितीचा म्हणजे दैवाचाच फटकारा लिअरला सोसावा लागला आहे.

लिअरबद्दल सुरुवातीपासून आदर किंवा आपुलकी वाटायला एवढेंही कारण नसतांना, त्याच्यावर ओढवलेल्या संकटपरंपरेमुळे त्याच्याबद्दल आपल्याला हळहळ वाटत जाते याला कारण ही विकट विरोधी परिस्थिति आहे. तो खुळेपणाने वागला म्हणून त्याला एवढी ही भयंकर शिक्षा व्हावी यांतील न्याय्यता आपल्या मनाला पटत नाही. आणि म्हणून ज्याच्यावर अन्याय झालासें वाटतें त्याच्याविषयी नेहमीच आपणास वाटते त्याचप्रमाणे सहानुभूति लिअरबद्दल आपणाला वाटूं लागते. ही सहानुभूति, हा ओलावा, लिअरच्या अंगच्या माणुसकीचे, तेजस्वीपणाचे, लहान लहान, परंतु मोठे वेचक प्रसंग आपणापुढे येऊं लागतात तसतसा वाढत जातो. इतर पुष्कळ करुण नाटकांपेक्षा लिअर नाटकाचें हें एक मोठें वैशिष्ट्य आहे की यामध्ये नायकाच्या चित्त-वृत्ती संकटें जसजशीं येत जातात तसतशा अधिकाधिक विशुद्ध होत जातात; सुप्त गुण अधिकाधिक प्रगट होतात; स्वभावविकासाची विशेष गतिमानता त्यामध्ये आपल्या प्रत्ययाला येऊन आपण लिअरच्या अधिकाधिक जवळ जाऊं लागतो. शेक्स्पीअरच्याच इतर नाटकांमधील नायकाच्या एकदा निश्चित झालेल्या स्वभावाचें नुसतें विविध दर्शन घडविण्याची पद्धति आणि लिअर नाटकांतील लिअरच्या स्वभावांत होत गेलेली उत्क्रांति आणि क्रांति यांचें गतिमान चित्रण करण्याची पद्धति यांचा तुलनात्मक अभ्यास नाट्य-तंत्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने मोठाच बोधपर होईल. पण तो या ग्रंथाचा विषय नव्हे.

अशा या अत्यंत उशीरा शहाणा झालेल्या म्हाताऱ्या राजाचा शेवटाचाही आशातंतु-निदान कॉर्डेलिया जिवंत राहील हा — तुटतो त्या वेळीं आपल्याला त्याच्याविषयीच्या-करुणेचें भरतें येतें, आणि अखेर निराधार असा तो वृक्ष जेव्हा असहायपणे परंतु जगां-विषयीची कसलीही तक्रारीची भावना मनांत बोचत न राहतां उन्मळून पडतो त्या वेळीं आपण स्तिमित होऊन जातो; कालचक्राच्या न्यायी क्रूरतेबद्दल आपण एक प्रकारें भय-भीत होतों आणि भोळ्या, वेड्या परंतु प्रेमळ, तेजस्वी लिअरचें सर्व चरित्र एकदम आपल्या अंतःकरणाचा संपूर्ण ताबा घेऊन कांही काळ दुसऱ्या कशाचेंही भान आपल्या सर्व इंद्रियसंस्थेला राहत नाही.

अशा रीतीने शृंगाराखेरीज (शृंगाराचाही एक अगदी ओझरता कोपरा यांत आहे-पण तो सोडून) सर्व रसांचा रंगदार खेळ दाखवून अखेर अथांग कारुण्यमिश्रित शांत रसांत परिणत होणारें हें नाटक, नाट्यतंत्राच्या दृष्टीने कोणाला त्यांत कितीही दोष वाटले तरी एक महान करुण नाटक म्हणूनच जगाच्या वाङ्मयांत चिरंतन राहणार आहे, ही गोष्ट कोणी नाकारूं शकेल असें वाटत नाही.

प्रकरण अकरावें

हेडा गाब्लर

हेडा गाब्लर ही इब्सेनच्या त्याच नांवाच्या नाटकाची नायिका. एका सकाळीं सूर्य उगवल्यानंतर थोड्याच वेळाने या नाटकांतील घटना घडूं लागतात आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशीं रात्र पडतांना, म्हणजे अवघ्या ३६।३७ तासांच्या अवधींत, हेडा गाब्लरने पिस्तुलाची गोळी आपल्या कपाळांत मारून घेऊन आत्महत्या करून घेतल्याच्या प्रसंगाने हें नाटक संपतें. एवढ्या अल्प अवकाशांत हेडाचें सर्व स्वभावचित्र रेखाटायचें असल्याने पूर्वींच्या प्रसंगाचें कथन करण्यावर नाटककाराला फार मोठा भर द्यावा लागला आहे. परंतु इब्सेनचें असामान्य कौशल्य असें की, हें प्राक्कथन संवादाच्या रूपाने चालू असतांना निव्वळ जुन्या हकीकती आपण ऐकतों आहोंत असा भाव उमटत नाही. तर प्राक्कथनपर अशा त्या संवादांतच सद्यःस्थितींतील घटना आणि हालचाली निश्चितपणें आणि वेगाने चालू असलेल्या आपल्या अनुभवाला येतात. एवढेंच नव्हे तर पुढच्या – भविष्यकालीन परिणामांचें पूर्वसूचनही त्याच वेळीं होऊन जातें.

मनोवृत्तींतील बदलांचें चित्रण —

याचें एक प्रमुख कारण हें की, हेडा गाब्लरच्या मनोवृत्तींत होत जाणाऱ्या बदलांचें चित्रणच नाटककाराला करावयाचें आहे. प्रत्यक्ष शारीरिक हालचाली या नाटकांत फार थोड्या आहेत. त्यामुळे कथानक पुढे पुढे सरकावयाचें म्हणजेच हेडाच्या मानसिक बदलत्या हालचालींचें गतिमानत्व अनुभवावयाचें, असें असल्यामुळे प्राक्कथनांतून सुद्धा हा परिणाम इब्सेनला फार प्रभावीपणाने व्यक्त करतां आला आहे.

नाटकांतील सर्व घटना – किंवा संवाद – आपल्यापुढे घडतात एकाच स्थळीं. त्या स्थळांतील रचनाही पहिल्यापासून शेवटपर्यंत एकच एक आहे. तेथे वावरणाऱ्या आणि बोलणाऱ्यांच्या हालचाली नीट ध्यानांत येण्याच्या दृष्टीने त्या स्थळांची आणि त्यांतील सामानाच्या रचनेची स्पष्ट कल्पना डोळ्यांपुढे असणें फारच आवश्यक आहे; विशेषतः प्रत्यक्ष नाटकाचा प्रयोग पाहण्याचा योग न येणाऱ्या वाचकांच्या दृष्टीने त्याची जरूरी फार मोठी आहे.

आपल्यापुढे समोर प्रमुख अशी दिसणारी जागा म्हणजे एक प्रशस्त, सुंदर आणि मनोहर अभिरुचीने सजविलेला असा दिवाणखाना असतो. त्याच्या अगदी पाठीमागच्या बाजूला खूप रुंद दरवाजा आहे; त्याचे पडदे दूर सारलेले असतात. या दरवाजांतून आंतल्या खोलींत प्रवेश मिळतो. ही खोलीही अशीच सुरेख सजविलेली

आहे. उजव्या भिंतींत दार आहे, त्यांतून मध्यघरांत जातां येतें. डाव्या बाजूला काचेच्या तावदानाचा दरवाजा आहे; त्याचेही पडदे दूर झालेले आहेत. काचेंतून बाहेरच्या पडवीचा थोडा भाग दिसतो व पडवीच्या पलीकडील झाडें व शरद्तूंतील त्यांची पालवी यांचें दर्शन होतें, समोरच्या दिवाणखान्यांत बऱ्याच पुढच्या भागांत एक बदामी आकाराचें टेबल आहे. आणि त्याच्याभोवती खुर्च्या आहेत. उजव्या बाजूच्या भिंतीच्या अगदी पुढच्या भागांत चांगली रुंद शेगडी आहे; तिच्या शेजारीं भल्या उंच पाठीची एक हातांची खुर्ची आहे आणि तिच्यापुढे पाय टेकण्यासाठी स्टूल आहे; आणि त्याशिवाय दुसरीं दोन लहान स्टुलें आहेत. त्याच बाजूला पलीकडे कोपऱ्यांत दोन तीन माणसांना एकत्र बसून गुजगोष्टी करतां येतील अशा तऱ्हेचा सोफा-वजा बाक असून त्याच्यापुढे लहानसें वाटोळें टेबल आहे. डाव्या बाजूला पुढच्या अंगाला भिंतीपासून थोडा दूर असा सोफा आहे. काचेच्या दारापलीकडे पिआनो आहे. पाठीमागच्या आंतल्या खोलींतील सजावटही दिसण्यासारखी आहे. तेथेही अगदी पाठीमागच्या भिंतीला लागून सोफा आहे व एक टेबल आणि दोन तीन खुर्च्या आहेत. टेबलावर टांगलेल्या दिव्याचा प्रकाश आहे. धातूच्या पुष्पपात्रांत आणि ग्लासामध्ये बरेच पुष्पगुच्छ खोवून ठेवलेले आहेत; तर कांही गुच्छ तसेच टेबलावर टाकलेले आहेत. दोन्ही खोल्यांत जमिनीवर जाड सतरंजी अंथरलेली आहे. आणि काचेच्या दरवाजांतून सूर्यप्रकाश आंत आलेला आहे.

अशी सुरुवातीची ही रचना आहे. दिवस जसजसा पुढे सरकेल किंवा रात्र पडेल तसतशी प्रकाशाची ही अवस्था अर्थातच बदलेल. तसेंच पुढच्या अंकांत पिआनो तेथून आंतल्या खोलींत गेलेला आढळेल. पण याशिवाय कोणताच फरक झालेला असणार नाही.

अशा ठिकाणीं पहिल्या अंकाच्या सुरुवातीला उजव्या बाजूने माजघरांतून बाहेर येतात ज्यूलियाना आणि घरची मोलकरीण बर्टा. घरमालक आणि त्याची पत्नी हीं अजून उठलेलीं आढळत नाहीत. स्वाभाविकच होतें तें. रात्रीं खूप उशीरा तर ती मंडळी आली; सामानाची कितीतरी सोडासोड करावी लागली; तेव्हा त्यानी व्यावीच विश्रांति; असा म्हाताऱ्या ज्यूलियानाचा अभिप्राय आहे. बर्टा ही खरी मूळची ज्यूलियानाकडची मोलकरीण. तिला आता नव्या मालकिणीकडे काम करायचें होतें. जुनें घर सोडून इकडे येणें तिला अवघड झालें होतें. परंतु काय करणार? तरुण मालक – जॉर्ज – याचें या जुन्या मोलकरिणीवांचून चालण्यासारखें नव्हतें. अर्थात तिकडे ज्युलियानाच्या घरीं तिची बहीण फार आजारी होती. तिची काळजी घ्यायला कुणी दुसरं माणूस नाही म्हणून बर्टाला थोडीशी रुखरुख होती. परंतु बर्टाची खरी काळजी होती की या नव्या मालकिणीशीं कांही आपलें जुळणार नाही.

बाईसाहेब फार बडेजावीने वागणार —

येथे हेडाची – या नाटकाच्या नायिकेची – पहिली ओळख आपल्याला होते. कारण

बर्टाचा अभिप्राय आहे की नव्या बाईसाहेब एकंदर फारच बडेजावीने वागणार म्हणून. आणि ज्यूलियाना बर्टाला – म्हणजे आपल्यालाच – सांगते की यांत आश्चर्य नाहीच. कारण नव्या मालकिणीच्या माहेरची राहणीच तशी होती ना. एका श्रेष्ठ सेनापतीची ती एकुलती एक मुलगी. त्याच्याच एकट्याजवळ वैभवांत वाढलेली. मोठा ऐटदार पोशाख करून, घोड्यावर बसून रपेटीला जाणारी ही मुलगी – ती बडेजावीने वागणार हें स्वाभाविकच होतें.

बर्टाला हें ठाऊक आहे. आणि म्हणूनच तिला मोठें कोडें पडलें आहे कीं आपला छोटा मालक जॉर्ज याचें या बाईशीं लग्न कसें काय झालें! बर्टालाच हें कोडें आहे असें नाही. तर ज्यूलियानालाही तें आहे. पण या असमाधानकारक विषयाला बगल देऊन ज्यूलियाना बर्टाचें लक्ष दुसरीकडे वेधते. जॉर्जला परदेशांत सन्मानदर्शक पदवी मिळाली असून त्याला यापुढे डॉक्टर जार्ज म्हटलें पाहिजे, आणि यापेक्षाही त्याला अधिक सन्मानाचे योग येणार आहेत, वगैरे निराळ्याच गोष्टी ज्यूलियाना बोलूं लागते. आपल्या प्रिय मृत भावाचा या वेळीं ती प्रथमच उल्लेख करते. आणि त्याच्या मुलाच्या वैभवाच्या दर्शनाने त्याला केवढा आनंद झाला असता या विचाराने तिचें हृदय भरून येतें.

नाटकांतील झगड्याचें सूतोवाच —

श्रीमंत आणि वैभवसंपन्न बापाची एकुलती एक आणि आईच्या अभावीं बापाजवळ वाढलेली, धट्ट व ऐषआरामी राजस प्रवृत्तीची ही मुलगी – तरुणी – आणि बापाच्या पाठीमागे आपल्या गरीब आत्याबाईच्या प्रेमळ, सात्विक छत्राखाली वाढून स्वतःच्या ज्ञानसाधनेच्या जोरावर प्रतिष्ठा – पण फक्त शैक्षणिक जगांत – पावलेला तरुण जॉर्ज, यांच्या जीवनपद्धतींतील व कदाचित जीवननिष्ठेमधील विरोधाचें हें नाटक आहे; त्यांचा संगम पतिपत्नी म्हणून व्हावा ही गोष्ट, त्याला लहानपणापासून जोपासणारी त्याची मोलकरीण आणि आत्या यांना कोड्यासारखी वाटावी व यांतून सुख कसें निर्माण व्हावें अशी आशंका त्यांना निर्माण व्हावी, असा हा विरोध आहे; अशी ही सूचना त्या दोघींच्या संवादांत इब्सेनने किती नाजूकपणें आपल्याला दिली आहे. आणि ही सूचना थोडी गडद करण्यासाठीच जणू त्याने, ज्यूलियानाने मोठ्या आवडीने खुर्च्यांटेबलावर घातलेलीं चिटाचीं आच्छादनें नव्या मालकिणीने आल्या रात्रींच, स्वतःला आवडत नाहींत म्हणून मोलकरिणीकडून काढून टाकल्याची लहानशीच गोष्ट जातांजातां निदर्शित केली आहे.

अशा आशंकित वृत्तींत आपणाला ठेवून मग इब्सेन जॉर्ज टेसमनला आपल्यापुढे आणतो. रात्रीं जॉर्जप्रमाणेच ज्यूलियाना आत्याही खूप उशीराच घरीं पोचली होती. तरीही भाच्याचा समाचार घ्यायला ती इतक्या लौकर उठून त्याच्या नव्या घरीं आली होती. यामुळे भाच्याला परम हर्ष झाला हें स्वाभाविक. परंतु त्याच वेळी, हा भाचा बंदरावरून आपल्या पत्नीला घेऊन आत्याशिवायच आपल्या नव्या घरीं आला होता, आत्याला त्याने आपल्या एका मित्राबरोबरच तिच्या घरीं पाठवून दिलें होतें, कारण

नववधूच्या सामानाच्या पेट्या फार असल्यामुळे त्याच्या गाडींत म्हाताऱ्या प्रेमळ आत्याला जागा नव्हती, हें लगेच दाखवून त्या नववधूमुळे आत्या आणि भाचा यांच्या प्रेमळ संबंधाला एव्हाच तडा जाण्याला कशी सुरुवात झाली होती हें पाहून आपल्या मनांतील आशंका अधिकच दृढ होते.

नवदंपतीमधील भिन्नतेचें दर्शन —

नंतर भाचा आणि आत्या यांचें जें भाषण होतें त्यामध्ये या नवदंपतींमधील भिन्नतेचें दर्शन आणखी स्पष्टपणें होऊं लागतें. जॉर्ज हा लग्नानंतर यूरपच्या यात्रेला गेला होता. पण तेथे त्याने, आत्याने म्हटल्याप्रमाणे, एकही क्षण फुकट घालविला नव्हता. पूर्वकालीन इतिहास व संस्कृति यांच्या संशोधनाचा त्याचा जो विषय त्यांतच तो गढून गेला होता. आपल्या पत्नीबरोबर ऐषआराम करण्याचें त्याला जणू भानच नव्हतें.

याच संभाषणाच्या वेळीं ज्यूलियनाच्या नव्या टोपीकडे जॉर्जचें लक्ष जातें. ही नवी किंमतवान टोपी तिने मुद्दाम घेतली होती. म्हणजे भाचा आणि त्याची पत्नी यांच्याबरोबर केव्हा बाहेर जावें लागलें तर शोभून दिसावें. अशी तिची ती टोपी मोठ्या कौतुकाने पाहून स्वतः जॉर्ज टेसमनच जवळच्याच खुर्चीवर ठेवतो. तीं दोघें एकमेकाजवळ सोफावर बसतात; ज्यूलियाना आपली छत्री सोफाला टेकूनच ठेवते.

सहा महिन्यानंतर आणि मानसन्मान मिळवून परत आलेला भाचा. मग आत्याबाईच्या प्रेमाला भरतें यावें यांत नवल काय ? स्वाभाविकच त्याची दुसरी आत्या रीना – जी अत्यंत आजारी होती – तिच्याबद्दल बोलणें निघतें. वास्तविक प्रवासाहून आल्यांवर जॉर्जने सर्वांत आधी या आजारी आत्याच्या भेटीला जायला हवें होतें. हा विचार आपल्याला थोडासा बोचून जातो तोच ज्यूलियाना त्याच्या लग्नाबद्दलचा विषय काढते. एवढी मोठी सुंदरी – जिच्यावर अनेक तरुणांचें लक्ष होतें – हेडा आपल्या भाच्याने जिंकून आपलीशी करावी, याबद्दलचें मोठें कौतुक ज्यूलियाना व्यक्त करते. त्यानंतर नववधूसह हा एवढा मोठा पांचसहा महिन्यांचा प्रवास त्याने करावा याबद्दलही तिला आनंदाचें भरतें येतें. येथे जार्ज टेसमनची वृत्ति पुन्हा एकदा प्रकट होते. नवपरिणीत वधूबरोबरचा हा मौजेसाठी करावयाचा प्रवास त्याला संशोधनकार्यासाठी उपयोगी पडलेला प्रवासच वाटत होता. नाना ठिकाणीं जुने कागदपत्र चिवडणें आणि अनंत ग्रंथ वाचणें यांतच त्याचा वेळ गेला होता हें तो एक प्रकारच्या अभिमानाने सांगत असतो.

आत्याबाईला या सगळ्या विषयांत रस नाही. पांचसहा महिने हें तरुण जोडपें एकत्र आणि निष्काळजीपणाने प्रवास करीत होतें. तेव्हा त्यांतून आपल्या दृष्टीने खरी महत्त्वाची अशी निसर्गकरणी निर्माण झाली होती की नाही याची त्या वृद्धेला अधिक जिज्ञासा होती. पण त्या पुस्तकी पंडिताला तिच्या त्या जिज्ञासेचें स्वरूपही कळत नाही. तो आपल्या ज्ञानसंपादनाच्या क्षेत्राशीं सर्वथा एकरूप झालेला आहे, यापुढे आपल्याला

विश्वविद्यालयांत प्रोफेसराचें स्थान मिळणार आहे याच अपेक्षेंत तो दंग आहे.

पुस्तकी पंडित – व्यावहारिक जगापासून दूर —

भावी नातवंडाविषयीची आपली उत्सुकता भाच्याच्या डोक्यांत शिरत नाही हें पाहून आत्याबाई निराळ्या विषयाकडे वळते. प्रवास करण्याचा आनंद साधला खरा; परंतु हा प्रवास हेडासारख्या एका श्रीमंत घरच्या तरुणीबरोबर. तेव्हा तो फार खर्चाचा झाला असणार ही आपली कल्पना थोड्याशा काळजीनेच ती उल्लेखिते. पण हेडाच्यासाठी तो खर्च करणें आवश्यकच होतें हें भाच्याचें त्याबद्दलचें समर्थन ती मान्य करते. तिला खरोखर हें कळायला हवें होतें की, आपण भाच्यासाठी सजवून तयार करून ठेवलेलें हें नवें घर त्याला आवडलें होतें की नाही. शेवटीं तो प्रश्न ती त्याला उघडच विचारते. घर उत्कृष्ट असल्याबद्दलचा आनंद जॉर्ज उत्साहाने व्यक्त करतो. पण माजघर आणि हेडाचें शयनागार यांच्यामध्ये दोन खोल्या मोकळ्या होत्या त्यांचें काय करायचें, एवढाच प्रश्न त्याला सुटलेला नव्हता. त्यावर, होईल, त्यांचाही लौकरच उपयोग होईल असें ज्यूलियाना सूचक रीतीने म्हणते. परंतु अजूनही त्या पंडिताला तिच्या मनांतलें ओळखूं येत नाही. आता आपला ग्रंथसंग्रह वाढणार, तेव्हा त्यासाठी त्या खोल्या उपयोगी पडतील असें आत्याला वाटतें आहे अशीच त्याची समजूत होते.

वास्तविक एवढें मोठें घर घेण्याइतकी त्याची सांपत्तिक स्थिती चांगली नव्हती. लग्न झाल्यावर या सुंदर मोठ्या घराशिवाय आपण दुसरीकडे कोठे राहणारच नाही, असें हेडाने त्याला भासविलें होतें, यासाठीच तें घेतलें होतें. त्याची सजावट करण्यासाठी म्हणून जास्त रक्कम उभी करावी लागली होती. तिला तारण त्याच्या दोघी आत्यांचें वर्षासन लावून दिलें होतें. हें ऐकून जॉर्ज टेसमन खरेंच व्यथित झाला. म्हातारपणची त्या दोघींची तेवढीच एक खर्चाची सोय होती. तीही या कामीं गुंतावी ही गोष्ट त्याला असह्य झाली. पण भाच्यासाठी कोणताही त्याग केला तरी तो त्या आत्याला कमीच वाटत होता. जें कांही तिने केलें होतें त्याचें आता फळही मिळालें होतें. टेसमननेच म्हटल्याप्रमाणे योजिलें तें सर्व घडून आलें होतें. त्याच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना हार खावी लागलेली होती. त्याचा सर्वांत मोठा प्रतिस्पर्धी स्वतःच्या दुराचारामुळे मातीसपाट झाला होता.

धूमकेतूची – लव्हबर्गची ओझरती ओळख —

ज्या एका व्यक्तीमुळें पुढच्या दीड दिवसांत भयंकर घडामोड व्हायची होती ती ही व्यक्ति; नांव ईलर्ट लव्हबर्ग. गेल्या सहा महिन्यांतली कांहीच वार्ता त्याच्याविषयी टेसमनला नव्हती. आत्याकडून त्याला आता कळतें की, लव्हबर्गचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. पण आपल्या भाच्याच्या प्रसिद्ध होणार असलेल्या पुस्तकापुढे आत्याला लव्हबर्गच्या या पुस्तकाची मुळीच महती नव्हती. अर्थात भाच्याच्या या पुस्तकाची

अजून पुरेशी तयारीही झालेली नव्हती. कितीतरी कागदपत्र पाहून त्यांची अजून जुळणी व्हायची होती. या बाबतींत आत्याबाई जें म्हणाली की, "खरेंच कागदपत्रें जमा करायचीं, त्यांची वर्गवारी करायची, जुळणी करायची, यांत तुझा हात कुणी धरणार नाही; बापाचाच मुलगा तूं" यांत तिचें कौतुक व्यक्त झालें असलें तरी लव्हर्गाच्या तुलनेने टेसमनचें यांत वैगुण्यच कसें तें योग्य प्रसंगीं पाहूंच आपण.

नववधूला नवें वातावरण सगळेंच खटकतें —

सगळें कांही मनासारखें झालें. सर्वांत कळस म्हणजे हेडासारखी पत्नी मिळाली. या हर्षभरांत तीं दोघें आहेत तोच रंगभूमीवर नववधूचा प्रवेश होतो. पोलादाच्या रंगाचे तिचे धूसर डोळे तिच्या दृढ, निश्चल वृत्तीचे निदर्शक होते अशी नाटककाराची सूचना आहे. हेडाला पाहून ज्यूलियानाचा थोडासा गोंधळच होतो. कांही तरी विचारायचें म्हणून ती हेडाला, झोपबीप ठीक लागली होती ना म्हणून विचारते. पण त्यावर सुद्धा सूनबाई फटकारते, "बरी लागली होती. नव्या वातावरणाशीं हळू हळू जमवून घ्यायला हवेंच ना माणसाला!" म्हणजे ती ज्या वातावरणांतून आली त्याहून हें वातावरण निराळें आणि असुखकर आहे हें तिला भासवायचें होतें. दुसऱ्याच क्षणीं मोलकरिणीने डाव्या बाजूचें पडवीचें दार सताड उघडें टाकल्याबद्दल उखडून एवढीही रीत या लोकांना नाही असें ती सुचविते. उघडें दार टेसमन लावूं म्हणतो; तर नाही–पडदे टाक असें तिचें म्हणणें. म्हणजे यांतही अभिरुचीचा फरक. पडदे टाकल्यावर आतां प्रकाशही येईल आणि मोकळी हवाही येईल असें टेसमन म्हणतो; तर त्या ठिकाणीं पुष्पगुच्छांच्या ज्या राशी जमा झाल्या होत्या त्यांच्यामुळे मोकळ्या हवेची गरज आहेच मुळी, असें ठसकून त्याही गांवढळपणाबद्दल आपली नापसंती ती व्यक्त करते.

नव गर्भवतीची अस्वस्थता ? —

यांतला अर्थ न समजण्याइतकी कांही ज्यूलियाना भोळी नाही. म्हणून ती तेथून जायलाच निघते. आजारी रीनासाठी गेलें पाहिजे अशी ती सबब करते. परंतु जातां जातां तिला आठवण होते. टेसमन आपले आवडते स्लिपर प्रवासांत न्यायला विसरला होता. त्यांची त्याला पुनः पुन्हा आठवण होत असे. तेच स्लिपर म्हातारीने मोठ्या आठवणीने गुंडाळून आणले होते. या प्रेमदर्शनाने टेसमन विरघळूनच गेला. "किती वेळां तरी या स्लिपरांबद्दल मी प्रवासांत बोललों होतों; आता प्रत्यक्षच ते तूं पाहा" असें मोठ्या उत्सुकतेने तो हेडाला म्हणतो. परंतु "मला नाही त्याचं एवढं कांही वाटत" असें म्हणून हेडा त्याच्या उत्साहावर थंड पाणी ओतते. त्या स्लिपरांवरचें भरतकाम रीना आल्याने आजारीपणांतही केलें होतें. टेसमनच्या अशा किती तरी आठवणी त्यांच्याशीं निगडित होत्या. परंतु त्या आठवणींचें मला महत्त्व नाही, असें हेडा तुटकपणे बोलून जाते आणि जणू तो विषय बदलण्यासाठीच की काय पुन्हा

मोलकरिणीवर ती उखडते; कां तर तिने स्वतःची जुनी टोपी तेथे बसायच्या खर्चीवर ठेवण्याचा गांवढळपणा केला म्हणून. ज्यूलियानाला ही गोष्ट खरोखर फार लागली. "हेडा बाईसाहेब" असें थोडेंसें दूरपणाच्या आणि रागाच्या बुद्धीने संबोधून ती टोपी मोलकरिणीची नाही आणि जुनीही नाही असें तिने हेडाला बजावलें आणि जातां जातां छत्री हातांत घेऊन ती पुन्हा म्हणाली, "आणि ही छत्री सुद्धा माझीच आहे बरें का; बटार्चची नव्हे." जातांना हेडाकडे नीट पाहून घ्यायचें सुद्धा तिने नाकारलें "ओ, हो, हेडा किती सुंदर दिसते आहे, पाहा" असें टेसमन म्हणाला तरी, "त्यांत नवीन काय आहे, ती काय आज नवीन सुंदर दिसायला लागली आहे?" असें म्हणून ज्यूलियाना जाऊं लागते. तरीही "तिच्या एकंदर अंगलटींत फरक किती झाला आहे, प्रवासांत ती कशी भरली आहे, तें पाहा तरी" असा आग्रह टेसमन करतोच. "भरली आहे" या शब्दांनी ज्यूलियाना चमकून उभी राहते. त्या गोष्टीचा उल्लेख सुद्धा व्हायला नको असतो हेडाला. "तसें कांही नाही, तुम्हांला कांही समजत नाही" असें उतावीळपणें म्हणून ती काचेच्या दरवाजाशीं दूर जाऊन उभी राहते. तरीही टायरोल प्रांताची हवा तिला मानवली असली पाहिजे असें आणखी टेसमन म्हणतोच. त्यावर मात्र "जातांना मी जशी होतें तशीच आज आहे" असें तोडून बोलून ती टेसमनला गप्प करते.

ती भरली आहे याचा अर्थ म्हाताऱ्या ज्यूलियनाला वेगळाच कळला. त्यासरशी तिचा राग मावळला. जवळ येऊन तिने हेडाला दोन्ही हातांनी आपल्यापुढे ओढून घेतलें, तिच्या केसांचें चुंबन घेतलें आणि "देव तुला सुखांत ठेवो – माझ्या जॉर्जसाठी" असा अत्यंत प्रेमाने आशीर्वाद दिला. या प्रेमळपणाचा परिणाम हेडावरही झाल्याशिवाय राहिला नाही. ज्यूलियानाने रोज तिला भेटून जाण्याचें वचन दिलें आणि ती गेली. टेसमन तिला पोचवायला बरोबर गेला.

हेडाच्या निराशेचें ओझरतें दर्शन —

इकडे हेडा कांही बोलत नाही. पण तिची हालचाल मोठी सूचक आहे. अस्वस्थपणे हात वर उंच करून आणि अत्यंत निराश झाल्यासारखी, मुठी वळून ती दिवाणखाण्यांत येरझारा करते; एकदम दारांचे पडदे झटकन वर करते आणि बाहेर पाहत पाहत उभी राहते. इतकें अस्वस्थ होण्याचें कारण नाटककाराने स्पष्ट सांगितलेलें नाही. परंतु "भरली असल्याचा" अर्थ ध्यानांत येऊन ती भयंकर अस्वस्थ झाली हें व्यक्त करण्याइतकी सूचकता त्या तिच्या हालचालींत असायला हवी.

जीवनावरील कृष्ण छायेची पुन्हा सूचना —

टेसमन आल्यावर हेडाच्या या अस्वस्थतेची थोडीशी कल्पना त्याला आल्यावांचून राहत नाही. परंतु ज्यूलियाना आत्या आज इतकी एकदम भावनेच्या भरीं कां गेली

याचा उलगडा त्याला होत नाही. म्हणून हेडाला तो त्याचें कारण विचारतो. पण हेडाला तें कसें सांगतां यावें? तिचा तर ज्यूलियानाशीं नीटसा परिचयही नव्हता. पण ती नेहमीं इतकी गंभीर नसते असें टेसमनकडून कळल्यावर हेडाला वाटतें की टोपीच्या प्रकरणामुळे असें झालें असावें. किंवा तिच्या मनांतून मूळ विषयाला कलाटणी द्यायची होती म्हणून तिने अशी भूमिका मांडली असावी. दिवाणखाण्यांत आणि खुर्चीवर माणसें टोप्या ठेवीत नाहीत, म्हणून आपण तसें बोललों असें ती मोकळ्या मनाने म्हणते. एवढेंच नव्हे तर संध्याकाळी टेसमन तिला भेटायला जाईल तेव्हा तिला खास आमंत्रण आपल्या घरीं यायचें त्याने द्यावें असें ती आग्रहाने सुचविते. हेडाने आतां आपण या घरची झालों हें समजायला पाहिजे, असें थोडें नाजूकपणानेच टेसमनने या प्रसंगाने तिला सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे अस्वस्थ होऊन पुन्हा ती दूर जाऊन दारांत उभी राहिली. स्वतःच्या मनाचा थांग न लागावा म्हणून, हा जुना पिआनो आंतल्या खोलींत ठेवावा आणि त्याच्या जागीं एक नवीन आणून ठेवावा असा निराळाच विषय ती काढते. एवढ्यांत काल ती आली त्या वेळीं तेथे नसलेल्या एका पुष्पगुच्छाकडे लक्ष जाऊन ती जरा लक्षपूर्वक पाहूं लागते; तो तिला त्यांत नांवाचें एक कार्ड आढळतें. नांव होतें **मिसेस एल्व्हस्टेड**; आणि "मग पुन्हा केव्हां तरी येईन आज" असा मजकूर त्याच्या पाठीवर होता. टेसमन ओळखतो; शेरीफ एल्व्हस्टेडची ही बायको; म्हणजे लग्नापूर्वीची मिस रायझिंग. म्हणजे जिच्यावर टेसमनचें प्रेम होतें अशी ती आपल्या केशभाराचा मोठा दिमाख बाळगणारी मुलगी, असें हेडा थोडेंसें टोचून बोलते. तिने आपल्याकडे कां यावें याचा मात्र त्या दोघांना उलगडा होत नाही. पण थोड्या वेळाने एकदम हेडाच्या डोक्यांत कांही एक प्रकाश पडून ती म्हणते, "म्हणजे तिकडेच जवळपास ईलर्ट राहत असतो नाही?"

नाटकाला एकदम वेगाची गति —

अशा रीतीने त्यांच्या जीवनावर येऊं घातलेली ही कृष्णछाया पुन्हा एकदा आपल्याला ध्वनित होत आहे तोच मिसेस एल्व्हस्टेड स्वतःच तेथे येऊन दाखल होते. आणि नाटकाला एकदम नवी वेगाची गति मिळते.

ही बाई मोठ्याच गोंधळलेल्या अवस्थेंत असते. आपल्या गांवाहून ती शहरांत आली होती. टेसमनच्या घरीं यायचा तिचा विचार होता. कारण उघड होतें. शहरांत तिचें दुसरें कोणी ओळखीचें नव्हतें अन् खरें म्हणजे टेसमनचें एका वेळीं तिच्यावर प्रेम होतें याचीही तिला जाणीव होती. पण आपण एकाएकी आणि एकाकी अशी शहरांत कां आलों हें सांगायला ती फार संकोचत होती.

दुसऱ्याच्या मनांतलें काढून घेण्याचें हेडाचें कौशल्य —

त्या वेळीं तिचा संकोच पार नाहीसा करून आणि तिच्या पोटांत शिरून सर्व कांही

तिच्या मनांतलें काढून घेण्याच्या बाबतींत जें चातुर्य, जें कौशल्य, जो नितांत जिव्हाळ्याचा अभिनय हेडाने दाखविलेला आपण पाहतों त्याने आपण थक्क होऊन जातों. एखाद्या साध्या भोळ्या माणसाला हातोहात कबजांत घेऊन त्याच्यावर आपलें प्रभुत्व गाजविण्याचें तिचें यामध्ये व्यक्त झालेलें सामर्थ्य विस्मयजनक व विलोभनीय वाटतें.

जणू एक फार जुनी जिवाभावाची मैत्रीण म्हणून तिला ओढूनच हेडा स्वतःजवळ सोफावर बसवून घेते आणि तिच्या पोटांत शिरूं लागते. ईलर्ट लव्हबर्ग हा शहरांत आला होता व त्यासाठी एल्व्हस्टेडबाई इकडे आली होती हें लगेचच उघड होतें. एवढेंच नव्हे तर शहरांत आपल्याशिवाय लव्हबर्गने राह्यचें म्हणजे मोठी धोक्याची गोष्ट, शहरांत प्रलोभनें फार, यामुळे ही बाई अत्यंत अस्वस्थचित्त होती; हें कळून घेतल्यावर हिचा आणि लव्हबर्गचा एवढा संबंध तरी काय याची केवढी मोठी जिज्ञासा हेडाच्या मनांत निर्माण होते. एल्व्हस्टेडबाई प्रथम यांतली मख्खी सांगण्याची टाळाटाळ करते. तिच्या घरच्या मुलांचा तो शिक्षक – तेथे त्याची वागणुक अत्यंत निर्दोष होती. अलीकडे त्याचा एक ग्रंथ प्रसिद्ध झाला होता. पूर्वीच्या त्याच्या अभ्यासांतून निर्माण झालेला तो ग्रंथ नसून तो त्याने एल्व्हस्टेडच्या घरीं राह्यला लागल्यापासून गेल्या वर्षांतच लिहिला होता; एवढेंच ती चावत चावत सांगते. परंतु शहरांत आणि एकट्याने त्याने यावें या गोष्टीची तिला सर्वांत जास्त काळजी वाटलेली दिसत होती; म्हणून त्याच्याच मागावर ती आली होती; पण अजून तिची त्याची भेट होऊं शकली नव्हती; मात्र आजच सकाळीं त्याचा पत्ता तिला एकदाचा मिळाला होता.

ईलर्टबद्दलची हेडाची भावना उसळून बाहेर येते—

यांतून तर हेडाची जिज्ञासा फारच जास्त जागृत झाली. मुद्दामच जास्त खोल पाण्यांत शिरून ती, नवऱ्याशिवाय एल्व्हटेड बाईने एकटीनेच या कामासाठी शहरांत यावें याबद्दल मोठेंच आश्चर्य व्यक्त करते. परंतु एल्व्हस्टेडबाई तिला अजून नीट थांग लागूं देत नाही. मात्र टेसमनने लव्हबर्गला तोडून टाकूं नये तो भेटायला आला तर – आणि तो येणारच अशी खात्री असते तिची हें विशेष – त्याच्यावर टेसमनने लक्ष ठेवावें, असें मोठ्या कळकळीने ती विनवितें आणि टेसमन तें कबूल करतो तेव्हा तिला एवढा मोठा आनंद होतो की, भान न राहून त्याचे हात धरून ती जणू नाचूंच लागते. आणि मग आपल्या या अत्युत्साहाचें भय वाटून ती आपल्या नवऱ्याचा लव्हबर्गवर फार मोठा लोभ आहे असें कांहीं तरी बोलून स्वतःचें समर्थन करण्याचा अयशस्वी प्रयत्न करते.

क्षणांत हेडाने एक योजना आखली. टेसमनच्या उदार हृदयाची तिला पूर्ण पारख आहे. तिने त्याला लव्हबर्गला निमंत्रणाचें एक पत्र लिहायला प्रवृत्त केलें आणि चांगलें भलें मोठें गोड पत्र लिहायचा आग्रह करून त्याला आंतल्या खोलींत जायला सांगितलें. आणि तो भोळा पंडित आपल्या जुन्या मित्राला पत्र लिहिण्यासाठी मोकळ्या मनाने आंत गेलाही.

लव्हबर्गचा आणि एल्व्हस्टेडचा संबंध काय ?

हेडानेच म्हटल्याप्रमाणे एका दगडाने तिने दोन पक्षी मारले. लव्हबर्गला पत्रही जाणार. आणि तिला एकटीला एल्व्हस्टेड बाईशीं मोकळेपणीं बोलायला मिळणार. ही दुसरी गोष्ट मुद्दाम सांगून तिने एल्व्हस्टेडबाईचा विश्वास संपादन केला. अर्थात, एकटीलाच निराळें असें कांही विशेष सांगण्यासारखें नाहीच हा आविर्भाव त्या बाईने चालू ठेवलाच होता. परंतु, आपण शाळेंतल्या मैत्रिणी, एकमेकीशीं आपला किती जिव्हाळा, एकमेकींना आपण अरेतुरे म्हणत होतो, वगैरे साखर मोठ्या कौशल्याने पेरून आणि तिचें घरचें नांव नीटसें माहीत नव्हतें तरीही अनमानधपक्याने एक कांही तरी नांव घेऊन, आणि तसें नाही, मला " ताया " म्हणतात असें तिच्या तोंडून वदवून, त्याचाच अर्थ तो असें हेडा म्हणते, आणि " ताया " या लाडक्या नांवाने तिला संबोधूं लागून ती तिच्या आणखीच पोटांत शिरते. "म्हणजे ताया, तुझ्याशीं इतकें कोणी जिव्हाळ्याने वागत नाही का ? तुझ्या स्वतःच्या घरीं सुद्धा ?" असा प्रश्न ती तायाला डोळ्यांत करुणेचा पूर आणून विचारते. आणि ती भोळी बाई त्यामुळे विरघळून जाऊन आपल्या घरीं आपल्याला सुख कसें मुळीच नाही, घर म्हणजे खरें घरच कसें तिला वाटत नव्हतें, हें भडाभड ओकून टाकते. यांतून हेडा तिला मुद्यावर आणते. कारण लव्हबर्गबद्दल तिला खरी माहिती हवी होती आणि त्याचा व या बाईचा संबंध कोणत्या प्रकारचा हें तिला विशेष जाणून घ्यायचें होतें.

ती बाई घर सोडून आली होती —

तायाचा आणि लव्हबर्गच्या पूर्वपरिचय नव्हता. अलीकडे तिच्या नवऱ्याच्या घरीं मुलांना शिकवायला येऊं लागल्यापासून तिचा व त्याचा परिचय झाला हीच हकीकत पुन्हा ऐकून हेडाचें समाधान होण्यासारखें नव्हतें. म्हणून पुन्हा हेडा तिच्या नाजूक मर्माला हात घालते. तिची नवऱ्यासंबंधीच्या असमाधानाची भावना ती अधिक फुलविते. नवऱ्याबद्दल तिला बिलकूल प्रेम नाही, तो अत्यंत स्वार्थी आहे, स्वतःशिवाय कोणावरही त्याचें प्रेम नाही हें हेडा तिच्याकडून काढून घेते. आणि 'लव्हबर्गवर सुद्धा शेरीफचें प्रेम नाही का ? असलें पाहिजे; नाहीतर त्याने एवढ्या लांब शहरांत तुला केवळ त्याचा शोध करण्यासाठी कशाला पाठविलें असते " असा खोचक प्रश्न करून ती एल्व्हस्टेडच्या – ताथाच्या – हृदयाचा ठाव घेते आणि ताया कबूल करून जाते की, नवऱ्याला न विचारतां, न सांगतांच आपण लव्हबर्गसाठी शहरांत आलों आहों. या गोष्टीबद्दल नवरा काय म्हणेल याची आपण फिकीर करीत नाही, कारण नवऱ्याकडे आपण परत जाणारच नाही, हाही तिचा विचार हेडा काढून घेते. लोक काय म्हणतील याचीही तिला फिकीर नाही. कारण " जें करण्यावांचून गत्यंतरच नव्हतें, जें माझें कर्तव्यच होतें – तें मीं केलें आहे." असें ती आपल्या गृहत्यागाचें समर्थन करते.

तिचें लव्हबर्गशीं एवढें सूत काय?—

अर्थात एवढें तिचें लव्हबर्गशीं सूत का आणि तें कोणत्या मर्यादेपर्यंत गेलें होतें याचा कांही अजून पत्ता लागलाच नव्हता. त्या दोघांचें कांहीतरी बोलणें, बेत, होऊन ती इकडे आली असावी असा संशय हेडाला येणें अपरिहार्य होतें. या विचाराने थोडा वेळ स्तंभित होऊन हेडा गप्प राहते. परंतु पुन्हा आपला चौकशीचा भेदक मारा सुरू करते. त्यांतून ती काढून घेते की, लव्हबर्गला त्याच्या दुराचारी वर्तनापासून आपण सोडविलें आणि त्याला सुधारलें हा या बाईला खास अभिमान आहे. अर्थात लव्हबर्गमध्ये अशी ही सुधारणा होईल किंवा त्याच्यावर खरोखरीच कोणी व्यक्ति असा प्रभाव गाजवील हें हेडाला खरें वाटत नव्हतें. म्हणून थोडीशी हसतहसतच ती या प्रकरणाचा मागोवा घेत होती. परंतु लव्हबर्गला सुधारायला आपण कारण झालों की नाही हें बाजूला ठेवलें तरी लव्हबर्गने आपल्या स्वतःच्या जीवनांत फार मोठी क्रांति केली, आपल्याला माणूस बनविलें; प्रत्यक्ष शिकवीत असें तो तिला कांहीच नव्हता; पण तिची प्रगति त्याच्या संभाषण–संगतींत एवढी झाली होती की, आता त्याच्या लेखनांत त्याला ती साह्य करूं लागली होती; हें जेव्हा एल्व्हस्टेडबाई हेडाला सांगूं लागली, तेव्हा कांहीतरी पूर्वस्मृति जागृत होऊन हेडा तिला विचारते,

"म्हणजे तुम्ही दोघे आता खरेखुरे साथी झालां आहांत एकमेकांचे?"

लव्हबर्ग हेडासाठी शहरांत आला?—

स्वाभाविक एल्व्हस्टेड या प्रश्नाने चमकते. कारण तिच्याशीं बोलण्यांत लव्हबर्गने नेमका हाच शब्द वापरलेला असतो. हेडाने नेमका तो शब्द वापरावा यांतला अर्थ त्या बिचारीच्या ध्यानांत येणें शक्य नव्हतें. हेडाशीं बोलतांना पूर्वी लव्हबर्गने हीच भूमिका घेतलेली असली पाहिजे. पण एल्व्हस्टेडबाईला हें ठाऊक नव्हतें. कारण साथी जरी झालों असलों तरी एकमेकाच्या अगदी जवळ आम्ही अजून येऊं शकत नाही; कारण आमच्यामध्ये अजून दुसऱ्या एका स्त्रीचा पडदा उभा आहे, हें ती स्वतःच पुढें सांगते. त्या स्त्रीचा आणि त्याचा परिचय पूर्वी होता; तिला तो अजून विसरूं शकत नव्हता; स्पष्ट कांही त्याने सगळें तिला सांगितलेलें नसतें; नांवगावही सांगितलेलें नसतें. परंतु त्या दोघांचा संबंध तुटला. त्या बाईने त्याला पिस्तुलाची धमकी दिलेली होती हें मात्र त्याने एल्व्हस्टेडला सांगितलेलें होतें. पण ही स्त्री स्वतः हेडा असेल अशी तिला दुरूनसुद्धा कल्पना नव्हती. उलट लाल केसांची कोणी एक गायिका होती, ती पिस्तुल घेऊन वावरत असे आणि तिचेंच हें कृत्य असावें अशीच एल्व्हस्टेडची समजूत होती. आणि एल्व्हस्टेडच्या अस्वस्थतेचें फार मोठें कारण हें होतें की, हीच गायिका अलीकडे शहरांत आली होती आणि म्हणूनच लव्हबर्ग इकडे निघून आला होता अशी तिला भीति वाटत होती. परंतु ज्या स्त्रीचा यांत खराखुरा संबंध होता ती

स्त्रीच शहरांत आज पांच सहा महिन्यानंतर परत आली होती आणि तिच्याच कारणाने लव्हबर्ग खरोखर शहरांत निघून आला होता याची त्या बिचारीला लवमात्रसुद्धा आशंका नव्हती.

टेसमनने ईलर्टला आमंत्रणाचें लिहिलेलें पत्र टाकण्यासाठी बर्टाजवळ दिलें जातें तोच सकाळीच इतक्या लौकर ब्रॅक हा सुमारे पंचेचाळीस वर्षांचा प्रौढ गृहस्थ टेसमनच्याकडे येतो. त्याचा टेसमन कुटुंबाशीं तर स्नेह आहेच. पण नवीनच तेथे आलेल्या एल्व्हस्टेडबाईंशींही त्याचा पूर्वीपासूनचा परिचय आहे. कारण तिची ओळख टेसमन त्याला मिस रायझिंग अशी करून देतो. हेडाच्या लक्षांतून तें निसटत नाही. आणि म्हणूनच रात्रीपेक्षा आता दिवसाच्या प्रकाशांत पाहिलें म्हणजे तुम्ही अधिक तरुण दिसतां असा हेडा ब्रॅकला टोमणा देते. त्यावरून हेडाचे आणि ब्रॅकचे चांगले घनिष्ठ संबंध असले पाहिजेत हें उघड होतें. त्यांचा संबंध किती जवळचा होता याची कल्पना पुढच्याच अंकांत आपल्याला अधिक स्पष्टपणें यावयाची आहे.

येऊं घातलेल्या ग्रहणाची धोक्याची सूचना --

एल्व्हस्टेडला पोचविण्यासाठी म्हणून हेडा जाते तेवढ्यांत ब्रॅक आणि टेसमन यांना बोलण्याला संधि मिळते. त्यापूर्वी पुन्हा एकदा हेडाच्या भरलेल्या अवस्थेचा निर्देश टेसमनने केला होता व तो तिला दुःसह झाला होता हें आपण पाहतों. हे दोघे पुरुष एकत्र आल्यावर सहजच व्यवहाराच्या गोष्टी निघतात. खर्चावर थोडा आळा घालून बागण्याची आवश्यकता ब्रॅक सूचित करतो. कारण टेसमनच्या आर्थिक व्यवहाराची व्यवस्था, टेसमन प्रवासांत असतांना ब्रॅककडे होती; ज्यूलियानाबद्दल विशेष जिव्हाळा वाटणारा त्याचा प्रौढ मित्र या नात्याने, हेडाला गरीबी थाटांत राह्यला सांगणें हें योग्य होणार नाही हा टेसमनचा विचार मान्य करूनही, ब्रॅक त्याला सावधपणाचा इषारा देतो. कारण ईलर्ट लव्हबर्गचें नवीन पुस्तक प्रसिद्ध होणें ही गोष्ट टेसमनच्या दृष्टीने दुर्लक्ष करण्यासारखी नव्हती. टेसमनला कल्पनाही नसते की, असें एक पुस्तक लिहून ईलर्ट लव्हबर्ग स्वतःचा संसार कसा चालविणार; तशी काळजी तो व्यक्त करतो. त्या वेळीच हेडा परत येऊन "टेसमनला नेहमी एकच काळजी असते की, माणसाचा संसार नीट कसा चालणार" असा हसत हसत त्याला टोला देते.

परंतु त्यांच्या स्वतःच्याच बाबतींत तो प्रश्न किती जवळ येऊन भिडला होता याची कल्पना त्यांना ब्रॅककडून लौकरच मिळते. लव्हबर्ग दुराचारी म्हणून आपल्या प्रतिष्ठित वजनदार नातेवाइकांपासून जरी दुरावला होता तरी आता एवढा लोकप्रिय ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतर, आपल्या घराण्याचें हा नांव काढील अशी प्रथमपासून त्याच्याबद्दल अपेक्षा असणाऱ्या या नातेवाईकांच्या वजनाचा उपयोग होण्याचा संभव आतां निर्माण झाला होता. त्याचमुळे विद्यापीठांतील प्राध्यापकाची जी जागा टेसमनला मिळण्याची निश्चिती वाटत होती तिच्यांत थोडा संशय निर्माण झाला होता. या नेमणुकीच्या बाबतींत स्पर्धा

होणार आणि प्रतिस्पर्धी लव्हबर्गच असणार हें कळतांच टेसमनचा धीरच सुटल्यासारखा होतो. आपल्यासारख्या वैवाहिक जबाबदारी पत्करलेल्या माणसाचा या नोकरीवर अधिक न्याय्य हक्क आहे याची जाणीव लोकांना नसावी याबद्दल तो विस्मय प्रकट करतो. शिवाय त्याला ही नेमणुक द्यायची असें जवळजवळ कबूल केलें होतें अधिकारी मंडळींनी.

हेडाचें निश्चिंतपणाचें नाटक —

हेडा त्याच्या या अधीर चिंतातुरपणाने मुळीच विचलित होत नाही. या गंभीर प्रसंगाचें तिला कांही वाटूं नये याबद्दल टेसमनला आश्चर्य वाटते. पण ती म्हणते, "कांही कसें वाटत नाही ? उलट या स्पर्धेत कोण जिंकतें हें पाह्यची मला उत्सुकता वाटून राहिली आहे." या विषयाकडे इतक्या खेळकर वृत्तीने पाहणें योग्य नाही हें ब्रॅक तिला पटवून देण्याचा प्रयत्न करतो. खरी स्थिति तिने लक्ष्यांत घ्यावी; नवीन खरेदी करण्याचे बेत तिने आखले होते – उदाहरणार्थ नवा पिआनो – ते जरा आवरावे लागतील, असें तो तिला सुचवितो. परंतु त्यामुळे कशांतच कांही फरक होणार नाही असें अगदीच अविचलित चित्ताने बजावून ब्रॅकने या भानगडींत पडण्याचेंच जणूं कारण नाही असें सुचविल्यासारखें ती करते. हें उमगून ब्रॅक जायला निघतो. तो जातांना टेसमन त्याला म्हणतो की. तुम्ही सांगितलेल्या या बातमीने माझ्या मनाची फारच धांदल उडाली आहे. परंतु हेडा तरीही संपूर्ण निष्काळजी आहे. खुर्चीतच मागे रेलून जणू कांहीच झालें नाही अशा आविर्भावाने ती ब्रॅकला म्हणते, "हो, पण जज्जसाहेब, कबूल केल्याप्रमाणे संध्याकाळीं यायला विसरूं नका आं !"

परंतु ब्रॅक गेल्यावर मात्र तिचा हा निश्चिंतपणा टिकत नाही. तीं एकदम थकल्या-सारखी आणि कंटाळून गेल्यासारखी होते. टेसमनने जीवनांत हा एक प्रकारचा जुगारी धाडसीपणा केला होता याची गंभीर जाणीव तिला होते. त्याचें तिचें ठरलें होतें की, आपलें सुशोभित घर चांगलें गाजतें ठेवायचें, वरिष्ठ प्रकारच्या समाजांत ये जा ठेवायची, सारखी भेटीला येणाऱ्या माणसांची घरीं गर्दी राह्यची. परंतु आतां एक ज्यूलियाना आल्याशिवाय आणखी कोणाला फारसें बोलावण्याचें जमणार नाही याची तिला कल्पना येते. थाटाचा शिपाई जवळ बाळगण्याची कल्पनासुद्धा कांही काळ तरी मनांत सुद्धा आणतां येणार नाही हें समजतें; स्वारीच्या घोड्याचा विचार तर मग दूरच.

रम्य स्वप्न भंगल्याने व्यथित—

अशा तऱ्हेने तिने आपल्यापुढे रचलेल्या ऐषआरामी रम्य जीवनाचें स्वप्न एका एकी भंगतें. जॉर्ज टेसमन यापैकी तिला कांही देऊं शकणार नाही. आणि याला कारण स्वेच्छेने असो की नसो, पण ईलर्ट लव्हबर्ग होणार ही कल्पना तिच्या अंतःकर-णांत केवढी तरी ढवळाढवळ होते. हेडा जेव्हा म्हणते की, "कांही हरकत नाही. वेळ घालविण्याला मला एक तरी साधन आहेच की" तेव्हां त्यांतून उद्भवलेल्या

संभाषणांतून पुन्हा दिसतें की, टेसमन कांही झालें तरी अव्यवहारी पंडितच. काय तिचें ते साधन असें तो मोठ्या उत्सुकतेने विचारतो. पण ती त्याच्याकडे आंतल्या आंत दडपलेल्या तिरस्काराच्या दृष्टीने पाहून म्हणते "माझीं पिस्तुलें." – म्हणजे जनरल गाब्लरचीं, तिच्या पित्याचीं पिस्तुलें. या तिच्या तिरस्कारपूर्ण आणि तुटक उद्गारांनी टेसमन स्वाभाविकच व्यथित होतो. त्या पिस्तुलांना हात सुद्धा लावूं नकोस असें तो तिला मोठ्या काळजीने आणि प्रेमभराने विनवितो. पण त्याची विनंति ऐकायला ती तेथे उभी राहत नाही.

बापाचीं पिस्तुलें – सुटकेचा अखेरच्या मार्ग?—

पिस्तुलांच्या या उल्लेखाने नाटककाराने पुढच्या गंभीर घटनांची स्पष्ट कल्पना दिली आहे. लव्हबर्गला स्वतःपासून दूर करतांना हेडाने पिस्तुलाचाच उपयोग केला होता हें याआधी त्याने ध्वनित केलेलेंच आहे. आईपोरक्या आणि लष्करी वातावरणांतील बापाबरोबर वाढलेल्या या तरुण स्त्रीला अखेरचा आधार नेहमी पिस्तुलाचा वाटावा अशी त्या पिस्तुलांच्या सतत साहचर्याने तिची विकृत मनोवृत्ति निर्माण झाली आहे. जीवनांत दुःख आणि धोके सहन करतांना लागणाऱ्या धीरवृत्तीच्या चातुर्याऐवजी तिचें लक्ष पिस्तुलापासून होणाऱ्या सुटकेने अधिक वेधलेलें आहे हें जरी खरें असलें, तरी जीवनांतील संघर्षांशीं झगडण्याचीही कुवत तिच्या ठिकाणीं आहे, ईर्षा आहे, त्यासाठी वाटेल तो निधडा क्रूरपणा करायला ती मागेपुढे पाहणार नाही, अशीही तिची वृत्ति आहे. या तिच्या वृत्तीने तिने आलेल्या परिस्थितींतून सुटका करून घेण्यासाठी केलेला अपेशी झगडा म्हणजेच एवढ्या प्रस्तावनेनंतर पुढे घडलेलें नाटक आहे. तें कसें तें आता क्रमाने आपण पाहूं.

अंक दुसरा. रंगभूमीच्या रचनेंत थोडा फरक झाला आहे. पिआनो आंतल्या खोलींत गेला आहे. त्याच्या जागीं एक लहान सुंदरसें लिहायला बसायचें टेबल आणि पुस्तकाच्या शिड्या आल्या आहेत. त्याचप्रमाणे पलीकडच्या सोफाजवळ आणखी एक लहान टेबल आलें आहे. दुपार उलटून गेली आहे. सकाळीं तिने म्हटल्याप्रमाणे हेडाचा पिस्तुलांशीं खेळ चालू आहे. त्यामध्ये ती गोळ्या भरीत आहे. भेटायला कोणी आलें तर त्याच्या स्वागताला योग्य असा तिने पोशाख केलेला आहे. अर्थातच सकाळींच टेसमनचें पत्र लव्हबर्गकडे गेलेलें आहे. त्याप्रमाणे तो येईल – यावा – अशा अपेक्षेने ही तयारी आहे.

परंतु येतो मात्र जज्ज ब्रॅक. तोही पुढच्या दरवाजाने न येतां मागच्या बागेकडील फाटकांतून येतो. त्याबरोबर हेडा जाणूनबुजूनच एक गोळी झाडते. आणि मागच्या वाटेने येणारांना हेंच बक्षीस योग्य असें हसतहसत बजावते. परंतु ब्रॅक पिस्तूल तिच्या हातून काढून घेतो; मला चांगलें माहीत आहे हें पिस्तूल, असें म्हणून तें पिशवींत

नीट ठेवून देतो आणि आज आता हा पिस्तुलाचा खेळ पुरे असें म्हणतो. आपण हा खेळ करायचा नाही, असे त्याचे शब्द आहेत. म्हणजे लव्हबर्गप्रमाणेच ब्रॅकलाही पिस्तुलाची भीति हेडाने दाखविलेली असावी.

बंधने नको असलेली भोगासक्त स्त्री —

टेसमन जेवण होतांच आत्याबाईकडे गेला होता. "किती मूर्ख मी – एवढी – साधी गोष्ट माझ्या लक्षांत आली नाही. नाहीतर मी आधीच आलों असतों" असें म्हणून ब्रॅक हेडाबद्दलची आपली भावना उघडउघड व्यक्त करतो. पण आधी येऊन कांही उपयोग नव्हता, कारण मी आंतल्या बाजूला सारा वेळ पोशाख बदलीत होतें या हेडाच्या बोलण्यावर ब्रॅकचें उत्तर आहे की, दाराच्या फटींतून मी पाहत व बोलत राहिलों असतों. "परंतु तशी फट ठेवण्याची तुम्ही काळजी घेतली आहे कोठें?" या हेडाच्या उत्तरावरून कितीतरी गोष्टींवर प्रकाश पडण्यासारखा आहे. तिचें टेसमनशीं आता अगदी पक्कें लग्न लागलें असल्यामुळे अशा आडपडद्याच्या संबंधाला अवसरच शिल्लक राहिलेला नाही हा तिच्या बोलण्यांतला स्पष्ट ध्वनि आहे. आणि इतक्या पक्क्या बंधनांत न सापडतां थोडेसे मोकळे आणि निराळे संबंध आणखी कोणाशीं ठेवण्यास मिळाले तर ते तिला नको आहेत असें नव्हे, या प्रकाराची भोगासक्त वृत्तिही त्यामध्ये उघड होतें.

याचा प्रत्यय थोडक्यांतच येतो. लग्न होऊन तीं दोघें प्रवासाला गेलीं त्याच्या आधी ब्रॅकचें आणि आपलें मनमोकळें बोलणें झालें होतें त्याला जणू युग लोटल्यासारखें वाटतें असें म्हणून हेडा आपल्या मनांतला ब्रॅकविषयीचा नाजुक भाव व्यक्त करते; एवढेंच नव्हे तर रोज मला इकडे येण्याची सारखी ओढ लागली होती असेंही वर म्हणते. अर्थात याचें प्रमुख कारण ती म्हणते तें खरेंच होतें. प्रवासांत टेसमनचें लक्ष सगळें जुन्या कागदांच्या नकला करून घेण्यावर. त्याचा तो जीवनाचा उद्योग होता हें खरें. पण त्यामुळे तिचा सगळा वेळ अत्यंत कंटाळवाणा जात होता. त्यांतही ज्या प्रकारच्या सामाजिक थरांत ती वाढली होती त्या थरांतले आणि आपल्या 'गटांतलें' माणूस एकसुद्धा बोलायला कोणी नव्हतें याची बोच मोठी होती. अर्थात या गटांत आता उद्देश्य म्हणून जज्ज ब्रॅक होता हें उघडच आहे.

एकाच एक माणसाच्या सहवासांत सकाळपासून दुसऱ्या सकाळपर्यंत वेळ काढायचा हें हेडाच्या फुलपाखरी वृत्तीला बिलकूल सहन होत नव्हतें. आणि तो माणूस तरी कोण तर टेसमन; एका खास विषयाचा अभ्यासक; म्हणजे त्याशिवाय अन्य कशाचेंही ज्ञान किंवा आकर्षण नसलेला स्पेशालिस्ट – पंडित – आणि म्हणूनच अरसिक!

परंतु अशा पंडितावर जर माणसाचें प्रेम असलें तर मग त्याचा सहवास सुखद व्हायला हरकत नसावी असें ब्रॅक मुद्दामच खवचटपणाने, तिच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याच्या उद्देशानेच बोलतो. आणि त्याचा उद्देश सफल होतोही. कारण टेसमनवर

आपलें प्रेम केव्हाच नव्हतें, नव्हे या काव्यमय शब्दाचा आपल्याला अगदी तिटकारा वाटतो हें ती उघडच सांगते. शिवाय रात्रंदिवस जुने कागद चिवडीत बसणाऱ्या माणसाबरोबर राहण्याचा अनुभव घेऊन मग प्रेम कसें काय उत्पन्न होईल याचा विचार स्वतः ब्रॅकनेच करावा असेंही ती चिडून म्हणते.

लग्न प्रेमासाठी केलें नाही —

मग तिने या पंडिताशीं लग्न कां केलें ? याला तिचें उत्तरही अगदी साफ साफ आहे. लग्नाच्या बाजारांत नृत्यप्रसंगांच्या रूपाने स्वतःचें प्रदर्शन करीत राहण्याचा तिला अगदी कंटाळा आला होता. वय अधिक झालें, सौंदर्याला उतार लागला असें वाटूं लागलें होतें. ही स्वतःला अप्रिय वाटणारी गोष्टही ती चावत चावत सांगते. आणि तिच्या आसपास आलेल्या सर्व माणसांत जॉर्ज टेसमनचें वर्तन सर्वांत विशुद्ध आणि शिष्ट-संमत होतें; इतरांच्या मानाने दिसायलाही त्याच्यांत हसण्यासारखें कांही नव्हतें. शिवाय संशोधनकार्यांत त्याची परिश्रमशक्ति अमाप होती. आणि त्यामुळे केन्हा ना केव्हा तरी तो समाजांत अगदी पुढच्या रांकेंत येण्याचा संभव होता. शिवाय कितीही कष्ट पडले तरी तिच्या सगळ्या हौशी पुऱ्या करायचा आपला निर्धार तो व्यक्त करीत होता. तेव्हा त्याची निवड तिने करावी यांत आश्चर्य करण्यासारखें काय होतें ? तिच्याकडे आकृष्ट झालेल्या इतर कोणाची एवढें करण्याची तयारी नव्हती.

त्रिकोण पुरा करायला हेडाची संमति —

इतरांबद्दल ब्रॅक कांही सांगूं शकत नव्हता. परंतु आपण स्वतः विवाहबंधनाचें पावित्र्य राखलें असतें असें तो ध्वनित करतो त्या वेळीं तुमच्याबद्दल असा विचार माझ्या मनांत केव्हा आलाच नाही असें म्हणून हेडा त्याला उडवून लावण्याचा प्रयत्न करते. परंतु लग्न नाही तरी त्याखेरीजच अंतरंगांत थोडीशी विश्वासाची जागा, मोकळेपणाने एक मित्र म्हणून, घर मालकाचा मित्र म्हणून नव्हे तर मालकिणीचा म्हणून घरीं यायला जायला सवड मिळाली तरी तेवढ्यावर आपलें समाधान आहे असें म्हणून ब्रॅक आपलें अंतरंग उघड करतो, आणि तिच्या अंतःकरणाचा आणखी खोल ठाव घेऊं पाहतो. त्यांत त्याला यश येतें आणि अशा प्रकारचें स्थान त्याला द्यायला आणि रसिक संभाषणाची आपली भूक भागविण्यासाठी त्याचा स्वीकार करायला, त्याच्यासह एक त्रिकोण पुरा करायला तिची संमति तो मिळवूं शकतो.

एवढ्यांत टेसमन येतो. प्रवासांतून परत आल्याच्या पहिल्याच दिवशीं आणि आजारी आत्याकडून परत येतेवेळींही हा पंडित पुस्तकांचा भला मोठा गठ्ठा घेऊन येतो आणि त्या पुस्तकांतच गर्क असतो. इतकी त्याची पंडितगिरी त्याची नजर पत्नी-विषयीच्या नाजुक भावनांपासून त्याला दूर ठेवीत आहे. या पुस्तकांत त्याने लव्हबर्गाचाही ग्रंथ आणला होता. त्याचीं पानें फाडून त्या पुस्तकावर थोडी नजर फिरविण्याची त्याला

अनु. 24340 दि 10/6/14
क्रमां. हेडा गाब्लर 2972 नों: दि: 23/3/40 ३१९

घाई झाली होती म्हणून आणि कपडे बदलण्यासाठीही तो त्या दोघांना तेथेच ठेवून आंत जाऊं लागतो. जातांजातां, रीना आल्याची प्रकृति आज जास्तच बिघडली असल्यामुळे ज्यूलियाना संध्याकाळीं येऊं शकणार नाही; तथापि प्रवासांतून हेडा भरलेली परत आल्याचें पाहून आल्याबाईला फारच आनंद झाल्याचें हेडाला सांगून तो आंत जातो. परंतु त्या अप्रिय गोष्टीचा उल्लेख हेडाला बिलकुल आवडत नाही.

ज्यूलियाना टोपी प्रकरणामुळे येणार नाही की काय, असा प्रश्न हेडाने केलेला असल्यामुळे ब्रॅक तिच्याकडे विचारणा करतो. त्या वेळीं ती टोपी मोलकरिणीची असल्याबद्दल आणि तिनेंच ती खुर्चीवर ठेवली असल्याबद्दल आपण जाणून बुजून खोटें सांगितल्याचें हेडा सांगते; परंतु असें केल्याबद्दल स्वतःच्या मनाला असमाधान वाटल्याचेंही म्हणते; तेव्हा तिच्या वृत्तींतील परस्परविरोधी संघर्षाचें आपल्याला विशेष दर्शन होतें. अशा रीतीने आपण अधूनमधून एकदम लहरीच्या आधीन होतों, पण असें कां व्हावें हें कळत नाही, असें तीच विकलपणाने म्हणते. परंतु हें तरी ती खरें बोलते आहे की नाही याची शंकाच वाटते.

खरें काय आणि खोटें काय?—

तिच्या मनाच्या या अस्वस्थतेला कारण तिला पूर्ण समाधान नाही असा ब्रॅकचा कयास असतो. स्वतःच्या मनाप्रमाणे हवें असलेलें घर तिला मिळालें असतांना असें आतां असमधान कां असा प्रश्न तो उपस्थित करतो. परंतु हें घर आपल्याला हवें होतें हा निव्वळ भ्रम आहे; पंडित टेसमनला बोलायला कांही विषय नसायचा – विवाहपूर्व परिचयाच्या वेळीं – म्हणून त्याच्याबद्दल दया वाटून, बोलायला कांहीतरी एक विषय म्हणून हा निव्वळ भ्रम आपण त्याच्या मनांत उत्पन्न केला होता, असें जेव्हा ती ब्रॅकला सांगते तेव्हा या धृष्ट तरुणीचें कोणतें बोलणें खोटें आणि कोणते खोटें असा पुन्हा मोठा प्रश्न आपल्यापुढे उभा होतो. परंतु ब्रॅकजवळ ती विशेष मोकळेपणाने बोलत आहे हें ध्यानांत घेतां टेसमनला आणि इतरांनाही सहजासहजी फसविण्याच्या तिच्या सामर्थ्याबद्दल आपण चकित होतो. परंतु त्या वेळीं, त्या घरांत एक प्रकारची स्मशानछाया आपल्याला भासमान होते आणि त्यांत आपलें जीवन किती भयंकर कंटाळवाणें होणार आहे हें जेव्हा हेडा सांगते तेव्हा मात्र तिच्याबद्दल आपल्याला थोडीशी हळहळ उत्पन्न झाल्यावाचून राहत नाही.

भूतकाळांतील भीतीचें भूत—

कारण इतक्या सुंदर, बुद्धिमान आणि रसिक अशा या स्त्रीने आजपर्यंतचा काळ नुसत्या खेळण्यांत आणि नाना पुरुषांना खेळविण्यांत घालविला होता. ज्या एका पुरुषाशीं, तो आपल्या सर्व हौशी पुरवील म्हणून आणि जो समाजांत खूप वरच्या पदवीला पोचल्यामुळे आपल्याही स्वतःला खूप मिरवायला सापडेल म्हणून तिने लग्न केलें

होतें, तो पुरुष अरसिक आहे हें जरी तिला माहीत होतें तरी आपल्या तरुण आणि सुंदर पत्नीला अजीबात विसरून जाण्याइतकें त्याचें ज्ञानार्जनाचें वेड असेल अशी तिचीही समजूत नव्हती. आता विशेष म्हणजे त्याची सांपत्तिक स्थिति ऐषआरामीला तर दूरच, परंतु सामान्य जीवनालाही पुरेशी होईल की नाही याची भ्रांति तिच्यापुढे उत्पन्न होण्याला कारण ज्या एका प्रतिभावन पुरुषाला तिने क्रूरपणाने झिडकारलें होतें त्याच्यामुळें उत्पन्न होऊं पाहत होती. लग्न झाल्यानंतर पांच सहा महिने बाहेरदेशांत काढले म्हणजे आपलें पूर्वींचें खेळकर आणि खोडकर जीवन पार विरून आणि विसरून जाईल, भूतकाळांतील भानगडी पुन्हा आपला पाठपुरावा करणार नाहींत ही तिची अपेक्षा पार खोटी ठरली होती. त्या भूतकाळाचें भूत एकसारखी आपली पाठ धरून आपल्याला भेडसावीत राहणार – आपल्या संसारांत विघ्नें निर्माण करणार अशी भीतीची जाणीव तिला मोठ्या आवेगाने उत्पन्न झाली होती.

छंदाच्या अभावीं पोकळ जीवन—

या सगळ्यांत तिला स्वतःच्या संसारांत रममाण होऊन राहतां येईल असा कोणताही उद्योग किंवा छंद नव्हता. त्या दृष्टीने तिचें जीव अगदी पोकळ होतें. हें तिचें सर्वांत मोठें दुःख होतें. सर्व जन्मभर पुरुषांना झुलहीत, नाचत खेळत राहतां येणार नाही हें तिला फार उशीरा कळलें होतें आणि त्याच वेळीं हें पूर्वायुष्य सुटल्यावर अन्य कोणत्या उद्योगांत व्यापृत व्हावें असा भयंकर पेच तिच्यापुढे उभा राहिला होता. आपल्या भावी आयुष्याची तिने कांहींच योजना करून ठेवली नव्हती.

आपल्या नवऱ्याने – टेसमनने – राजकारणांत शिरावें, मंत्रीपद प्राप्त करून घ्यावें म्हणजे आपल्याला पुष्कळ वावरायला आणि मिरवायला सापडेल अशी एक तिची समजूत होती. पण ती शक्यता टेसमनच्या गरीबीमुळे विचारांतही घेण्याजोगी राहिली नव्हती. आणि या, साधी राहणी आणि उच्च विचारसरणीवाल्या, सामान्य मध्यमवर्गीय, सदाचारी, सभ्य माणसाच्या 'दारिद्र्यामुळे' च हेडाला अगदी उबग आल्यासारखें झालें होतें. स्वतः होऊनच तिनें आपल्याला या दारिद्र्यांत अडकवून घेण्याचा वेडेपणा केला होता. परंतु आता तो वेडेपणाच आपली स्थिति किती करुणास्पद, किती हास्यास्पद करून टाकीत आहे याची मोठी भेदक जाणीव तिला झाली होती. पण किती उशीरा!

मातृपदाची जबाबदारी नको होती—

अशाच स्थितींत लौकरच तिला मातृपद प्राप्त होणें हें निसर्गसिद्ध होतें. आणि ती मातृपदाची जबाबदारी स्वीकारून स्वतःच्या जीवनांत पुष्कळ रस, विरंगुळा आणि पुरेंसें काम तिला उत्पन्न करणें शक्य होतें. परंतु नेमकी तीच तर गोष्ट तिला नको होती. "मला या गोष्टीची मुळीच आवड नाही. असल्या कसल्याच जबाबदाऱ्या मला नको आहेत" असें जज्ज ब्रॅकला ती निक्षून सांगून टाकते आहे! एवढेंच नव्हे

तर भोगासक्तीबरोबरच तिच्या स्वभावामध्ये जी एक विकृत संवेदनशीलता आहे त्यामुळे अशा या अवस्थेंत कंटाळून मरण कवटाळणें एवढा एकच मार्ग आपल्यापुढे शिल्लक आहे या विचाराला ती शरण गेली आहे.

हेडाचें चकित करणारें द्विविध दर्शन —

एका बाजूला अशी ही असहाय निराशाग्रस्तता तर दुसऱ्या बाजूला त्याही अवस्थेंतून स्वतःला सोडवून परिस्थितीच्या झपाट्यांतून मुक्त होण्याची निर्धाराची, क्रूरपणाची धडपड असें या स्त्रीचें द्विविध दर्शन आपल्याला चकित करून टाकतें.

टेसमनने ज्यूलियाना आल्याकडून वार्ता आणलेली असते की, लव्हबर्ग कांही टेसमनशीं स्पर्धा करणार नाही. आणि म्हणून तो लौकरच आपल्या घरीं आल्यावर त्याच्याशीं मोकळ्या मनाने वागायची तयारी टेसमनच्या मनाची झाली होती; म्हणून त्याची वाट पाहत बसावें असें ब्रॅक आणि टेसमन ठरवितात. परंतु ब्रॅककडे संध्याकाळींच अविवाहित लोकांच्या क्लबतर्फे टेसमनला मेजवानी होती. तिकडे जायला निघेपर्यंत लव्हबर्ग आला नाही तर काय करायचें असा त्यांना प्रश्न पडला होता. त्या वेळीं "जास्तींत जास्त वाईट काय होईल? लव्हबर्गला इथे माझ्यासमवेत राहावं लागेल एवढंच ना?" असें जेव्हा हेडा विचारते त्या वेळीं 'जास्तींत जास्त वाईट' म्हणजे काय असें ब्रॅक कटाक्षाने हेडाला टोकून विचारतो. एवढेंच नव्हें तर हेडाबरोबर लव्हबर्गने एकट्याने असावें हें सोयीचें नाही असें टेसमन उघडच सुचवितो. परंतु मिसेस एल्व्हस्टेड यायची असल्यामुळे तिघांना रात्रीं घरीं राह्यला हरकत नाही या विचारावर तीं सर्वजण येतात.

संशयित चारित्र्याचा स्वतंत्र निर्मितिक्षम प्रतिभावंत —

अशा रीतीने ज्याचें साहचर्य एकट्यादुकट्या स्त्रीबरोबर धोक्याचें आहे असें अजूनही पुष्कळांना वाटतें, परंतु जो पापाचरण सोडून सदाचारी बनला आहे अशीही माहिती लागलेली आहे असा लव्हबर्ग त्या तिसऱ्या प्रहराच्या सुमारास टेसमनच्या घरीं येऊन दाखल होतो. त्याची आपल्याशीं स्पर्धा होणार नाही या जाणिवेमुळे आणि जात्याच टेसमनचा स्वभाव उदार आहे यामुळे टेसमन त्याचें अत्यंत हर्षभराने स्वागत करतो. लव्हबर्गच्या ग्रंथाबद्दलच त्यांच्या गोष्टी स्वाभाविकपणें होऊं लागतात. त्यामध्ये, आपलें सध्या प्रसिद्ध झालेलें पुस्तक तसें महत्त्वाचें नाहीं; त्यांत आपण सर्वसामान्य माणसांना रुचतील आणि प्रिय होतील एवढ्याच गोष्टी लिहिल्या आहेत, असें जेव्हा लव्हबर्ग सांगतो तेव्हा टेसमनला आश्चर्याचा मोठाच धक्का बसतो. त्याच्या दृष्टीने मानवसमाजाची कथा लव्हबर्गने अगदी आजच्या क्षणापर्यंत आणून भिडविलेली असते. तेव्हा आता आणखी लिहायला विषयच काय, हा त्याच्या पंडित मनाला मोठाच प्रश्न पडतो. आणि लव्हबर्ग जेव्हा सांगतो की, "हें पाहा माझ्या नव्या पुस्तकाचें हस्तलिखित.

याचे दोन भाग आहेत. पहिल्यांत मानवाच्या भावी सांस्कृतिक विकासांत कोणकोणत्या शक्तींचा प्रभाव पडणें शक्य आहे याचा विचार केला आहे; आणि दुसऱ्यांत हा भावी विकास कोणत्या दिशेने होत जाण्याचा संभव आहे यांचें विवेचन केलें आहे," तेव्हा तर टेसमनच्या आश्चर्याला पारावारच राहत नाही. असलें कांही लिहायचा विचार माझ्या मनांत कांही आला नसता, असें तो आदराने आणि थोड्याशा साशंकतेनेही म्हणतो. परंतु त्या दोघांच्या बुद्धिसामर्थ्यांतील फरकाबद्दलची कल्पना हेडाला अचूकपणे येते आणि म्हणूनच ती निराशेने म्हणते, "बरोबरच आहे; कुठून येणार ती कल्पना तुम्हांला!" टेसमनच्या बुद्धींत स्वतंत्र निर्मितिक्षम प्रतिभेचा लवलेशही नाही आणि त्याच प्रतिभेचें केवढें मोठें देणें आपण झिडकारलेल्या या माणसाला मिळालेलें आहे याची ही जाणीव या वेळीं तिचें मन कितीतरी अस्वस्थ करून टाकते.

लव्हबर्गच्या स्वाभिमानी मौदार्याने विद्ध हेडा —

त्याच वेळीं कांहीतरी एक नवाच विचार हेडाच्या चित्तांत जणू स्फुरतो. त्याला कारण लव्हबर्गने ब्रॅककडे मेजवानीला जाण्याला नकार देतांना तेथल्या वातावरणाबद्दल दाखविलेला तिरस्कार हें होतें. मग त्या तिघांना ती तेथेच ठेवून मोलकरिणीला सूचना देण्यासाठी म्हणून थोडी दूर जाते. त्याच वेळीं लव्हबर्ग टेसमनला सांगतो की, आपण विद्यापीठांत या नव्या ग्रंथांतील विषयावर व्याख्यानें देणार असलों तरी आपल्यामुळे टेसमनच्या योजनांत कोणतीही अडचण आपण येऊं देणार नाही; आणि म्हणून टेसमनची नेमणूक होऊन जाईपर्यंत आपण व्याख्यानें देणार नाही हें तो स्पष्ट करतो. म्हणजे लव्हबर्ग आपल्याशीं स्पर्धा करणार नाही तर! या विचाराने टेसमनचें चित्त एकदम उत्साहित होतें. लव्हबर्गची टेसमनच्या संसारांत विघ्न येऊं नये म्हणून जपण्याची वृत्ति आणि आपल्यावर अडचण येणार नाही याच विचाराने आनंदित होण्याची टेसमनची स्वार्थी वृत्ति यामधील फरक निदान हेडाला तरी किती बोचक वाटला. कारण या सुमारास त्यांच्यामध्ये ती परत आली होती. त्याहूनही तिच्या हृदयाला जास्त बोचला लव्हबर्गचा स्वाभिमान. कारण बालिश स्वार्थी वृत्तीने टेसमनने जेव्हा अधीरपणाने लव्हबर्गला विचारलें,

"म्हणजे – म्हणजे तुम्ही माझ्याशीं स्पर्धा करणार नाही?" तेव्हा लव्हबर्गने जें उत्तर दिलें की, "नाही; असल्या स्पर्धेंतल्या विजयाची मला फिकीर नाही. मला फक्त नैतिक विजय हवा आहे." तेव्हा त्यांतील "नैतिक विजय" या शब्दामागील कल्पनेची नीटशी ओळख पटण्याजोगी बुद्धीची चमक व स्वाभिमान टेसमनजवळ नसला तरी या दोन्ही गोष्टी तर हेडाच्या ठिकाणीं होत्याच; आणि शिवाय तिच्या पूर्व अनुभवांतून या कल्पनेच्या अर्थाला आणखी एक निराळीच धार आलेली तिच्या जाणिवेंत स्फुरत होती. आणि म्हणूनच टेसमन जेव्हा,

"एकलंस हेडा, ज्यूलिआना आत्या म्हणत होती तें खरेंच; ईलर्ट कांही आपल्या

मार्गांत आडवा येणार नाही," असें पुन्हा स्वार्थी उत्साहाच्या भरांत म्हणतो, त्या वेळीं अत्यंत तिरस्काराने झटकून हेडा बोलते,

"आपल्या मार्गांत? कृपा करून यामध्यें मला मुळीच ओढूं नका."

लव्हबर्गच्या नैतिक विजयाने हेडाच्या स्वाभिमानाला धक्का--

केवढा मोठा तरी अर्थ या तिच्या उद्गारांत सामावलेला होता. लव्हबर्गने आपलें वर्तन सुधारलें होतें; एक लोकप्रिय ग्रंथ प्रसिद्ध केला होता; एक प्रतिभासंपन्न ग्रंथ नवा लिहिला होता. आणि आता या सगळ्याचें प्रदर्शन हेडापुढे करून, तिने त्याला दिलेल्या नकाराचा सूड घेण्यासाठीच जणू तेथे तो आज आला होता. नैतिक विजय या शब्दांचा अर्थ हेडाच्या बरोबर लक्षांत आला होता. हेडाने मनांत आणलें असतें तर तिलाही नरांतून असा नारायण निर्माण करतां आला असता. पण तिने त्याची हेटाळणी केली होती. आणि तिला आज त्याचें हें एवढें मोठें यश पाहावें लागत होतें. एवढेंच नव्हे तर, ती आणि तिने पसंत केलेला पति, दोघेंही त्याच्यापुढे किती फिक्कीं पडत होतीं. संसारांतील आर्थिक यश आणि वैभव यांना कःपदार्थ मानून ज्ञानसंपादनांतील यशांत आणि वैभवांत समाधान मानणारा त्याचा मानी आणि उदार स्वभाव – त्याच्यापुढे टेसमनची स्वार्थी भयभीतपणाची लटपट; तिच्यांत त्याच्या बुद्धीचा कोतेपणा आणि उथळपणा किती हीन दिसत होता. "तुमच्या संसारसुखाच्या आड येण्याचा माझा मुळीच विचार नाही" या लव्हबर्गच्या शब्दांमागे, ज्या स्त्रीवर आपण प्रेम केलें होतें तिने आपल्याशीं कशीही वागणूक केली असली तरीही तिला संसारांत दुःखी होण्याची पाळी आपल्यामुळें येऊं नये ही जी, अहंकारजन्य खरीच, परंतु निःसीम प्रेमाची झाक आढळून आली, तिने तर हेडाच्या स्वाभिमानाला प्रचंड धक्का बसला. थोड्याच वेळापूर्वीचे टेसमनचे शब्द तिच्या डोळ्यांपुढून चमकून गेले असले पाहिजेत. तो म्हणाला होता, लव्हबर्गच्या पुस्तकांतील निर्णयशक्ति फारच लक्षणीय आहे; पूर्वी कधीही त्याने असें लिहिलें नव्हतें. पूर्वी म्हणजे एल्व्हस्टेड बाईशीं त्याचा संबंध येण्यापूर्वी. म्हुणजे एल्व्हस्टेडजवळ जी शक्ति होती ती आपल्याजवळ नाहीं याचा विषादकारक साक्षात्कारच त्या क्षणीं तिला झाला. आणि क्षणांतच तिच्या अंतःकरणांत केवढी मोठी तरी तुफानी खळबळ उडून राहिली. म्हणूनच ईलर्ट लव्हबर्गची कृपा व्हायची असेल तर ती तुम्हां मंडळीवर होऊं दे; माझा त्यांत कांही संबंध नको, असें म्हणून ती अत्यंत अप्रिय गोष्ट जणूं विंचवाप्रमाणे झटकून दूर करण्याचा तिने प्रयत्न केला.

हेडा गाब्लर लग्न करून स्वातंत्र्य गमावणार नव्हती?—

एवढें मनांत माजलेलें तुफान, फक्त थोड्या अंशाने ब्रॅकचा अपवाद करतां, हेडाने कोणालाही विशेष समजून येऊं दिलें नाही. बर्टाने आणलेलें 'पंच' चें पेय घेण्याबद्दल अत्यंत स्थिर चित्ताने तिने त्या मंडळींना सुचविलें. एवढेंच नव्हे, तर लव्हबर्गने

हीं व्यसनें सोडलेलीं आहेत हें माहीत असून सुद्धा "तुम्ही पण प्या ना" म्हणून तिने त्यालाही सुचवायला कमी केलें नाही. अर्थात त्याने नकार दिला आणि टेसमन व ब्रॅक असे दोघेच आंतल्या खोलींत ती मसाल्याची दारू पिण्यासाठी गेले.

ही संधि साधून हेडाने लव्हबर्गशीं थोडेंसें एकीकडे बोलण्याचें काम साधून घेतलें. जणूं कांही प्रवासांत घेतलेल्या फोटोंचें आल्बमच आपण दोघे पाहत आहोंत अशी बतावणी करून तिने लव्हबर्गशीं बोलणें सुरू केलें. ती सोफाच्या एका कोपऱ्यांत बसली होती. आणि तिच्या बोलण्यांत मोहक सूचकता अशी होती की, लव्हबर्गला त्या सोफावरच जाऊन बसावेंसें वाटावें. परंतु मन आवरून तो एक खुर्ची सरकवून आणि आंतल्या खोलीकडे पाठ करून तें आल्बम दिसेल अशा बेताने बसला. परंतु हेडाची नजरच अशी होती की, त्याचा संयम फार वेळ टिकूं शकला नाही आणि अगदी हळू आवाजांत त्याने तिला कुमारिकावस्थेंतील हेडा या नांवाने मोठ्या प्रेमभराने हाक मारली. पण त्याने असें करतां कामा नये, हेडा गाब्लर हें नांव विसरायला आता त्याने शक्य तितक्या लौकर शिकलेंच पाहिजे, हें तिनें दृढपणाने सुचविलें. हेडा गाब्लरने लग्न करावें – आणि तेंही जॉर्ज टेसमनशीं – याबद्दलचें स्वतःचें महान आश्चर्य व खेद मग लव्हबर्ग व्यक्त करतो. यांत पूर्वेतिहासांतून आणि हेडाच्या व त्याच्यामधील संभाषणांमधून त्याच्या मनावर उमटलेल्या त्या ठशाचें केवढें स्पष्ट चित्र आहे की, हेडा गाब्लर लग्न करून आपलें स्वातंत्र्य सहसा गमावणार नाही !

पण हेडाने त्याला गंभीरपणे सांगितलें. "हो; संसार हा असा आहे खरा !"

भोगासक्त पण कर्तव्य पाळूं इच्छिणारी हेडा—

परंतु लव्हबर्ग पुन्हा तिला एकेरी संबोधून स्वतःला तूं अगदीच कसें इतकें उकिरड्यावर फेकून दिलेंस असें म्हणूं लागतो. त्या वेळीं ती त्याच्याकडे अत्यंत भेदकपणें पाहून "हें बोलणें मी चालूं देणार नाही" असें बजावते; त्यांत त्याच्या कचाट्यांतून सुटण्याची आणि स्वतः पत्करलेल्या नव्या जबाबदाऱ्या संभाळणें हें आपलें कर्तव्य आहे याची तिला चांगली जाणीव आहे, हें पाहून तिच्याबद्दल आपल्याला कांहीसें कौतुक आणि आदर वाटूं लागतो.

एवढ्यांत टेसमन आल्याने त्यांच्या बोलण्याला किंचित खंड पडतो. हेडाला पंच आणून देण्याची त्याची सूचना हेडा मोठ्या उत्सुकतेने मान्य करते. आणि त्यासाठी तो आंत गेल्यावर लव्हबर्ग पुन्हा आपलें पहिलेंच भाषण पुढे चालवितो. आपल्याला एकेरी "तूं" असें न संबोधायला ती त्याला पुन्हा एकदा कटाक्षाने बजावते. त्यावर "असें केल्याने टेसमनवरील तुझ्या प्रेमाचा अधिक्षेप केल्यासारखें होतें काय ?" असें लव्हबर्ग विचारतो, त्यावेळीं, "प्रेम ! काय कल्पना तरी !" असा एकाएकी हेडाच्या तोंडून उद्गार जातो व टेसमनवर तिचें प्रेम नाही हें लव्हबर्गच्या ध्यानांत येतें. परंतु "तसें असलें तरी त्याच्याशी प्रतारणा करण्यासारखा विचार मी कोणाला बोलूं देणार नाही–

सांगून ठेवतें " असें जेव्हा हेडा निक्षून म्हणते तेव्हा या भोगासक्त तरुणीनेही कर्तव्याचें विस्मरण होऊन दिलेलें नाही याचा पुन्हा एकवार आपल्याला प्रत्यय येतो. आणि त्याच वेळीं हेडाला बरें वाटावें म्हणून टेसमन स्वतःच पंचच्या ग्लासांचें तबक घेऊन येतो त्यावरून त्याच्या निर्मळ प्रेमाचें आणि सात्त्विक विश्वासाचें दर्शन होऊन त्याचा हेडाच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाही.

प्रेम नव्हें निव्वळ जिज्ञासा ? —

परंतु लव्हबर्ग आपला विषय एवढाच सोडायला तयार नव्हता. टेसमनवर हेडाचें प्रेम नव्हतें, तसेंच आपल्यावरही आपल्या दोघांच्या स्नेहसंबंधाच्या वेळीं हेडाचें प्रेम नव्हतें काय, या त्याच्या प्रश्नाला हेडा सरळ उत्तर देत नाही. आपण केवळ दोन अगदी जिवाभावाचे साथी होतो एवढाच तिच्या मनावरचा ठसा असतो. यापुढच्या त्यांच्या संभाषणामध्ये, हेडा लव्हबर्गशीं किती जवळ येऊन वागत होती, स्त्रीपुरुषांच्या संबंधांतील, विलासांतील, विषयभरांतील निषिद्ध समजल्या जाणाऱ्या भागांविषयी सुद्धा त्या दोघांमध्ये किती मोकळेपणाने बोलणें होत होतें, हें सगळें स्पष्ट होत जातें. इतका स्नेह – इतकी गुप्त सलगी – दोस्ती की, हेडानेच म्हटल्याप्रमाणे जिच्यांत काहीएक साहस असें होतें की, ज्याचा अनुभव दुसऱ्या कोणा माणसाला क्वचितच आला असेल; अशी सलगी तिने लव्हबर्गशीं का ठेवावी ? याला हेडाचें उत्तर होतें की, स्त्रीपुरुषांच्या परस्परसंबंधांतील हें विश्व काय असतें हें जाणण्याची तर आपल्याला तीव्र इच्छा होती; पण एका सभ्य घरांतील मुलगी म्हणून त्या विश्वांत डोकावण्याची तिला मनाई होती; म्हणून– म्हणून अशा गुप्तपणाने आपली ही इच्छा पुरी करावी लागली होती तिला.

सरळ प्रश्नाला उत्तर देतांना गडबड —

" एवढाच अर्थ होता मग तुझ्या त्या वागण्याचा ? " या लव्हबर्गच्या शेवटच्या प्रश्नाला उत्तर देतांना मात्र हेडा गडबडल्याशिवाय राहिली नाही. आणि, " हो– निदान कांही अंशीं तरी –" असें संशयास्पद उत्तर तिच्या तोंडून निघून गेलें; तिच्या मनांत प्रेम नव्हतेंच असें नाही हें तिच्याच शब्दांतून ध्वनित होऊन गेलें.

करून सवरून नामानिराळे राहण्याची वृत्ति —

पण मग असाच हा आपला संबंध पुढे का नाही चालू राहूं दिलास तूं, या प्रश्नाला मात्र हेडाने दिलेलें उत्तर तिच्या पुरुषांच्या हृदयाचा निव्वळ खेळ मांडण्याच्या वृत्तीचें आणि नेहमीच पुरुषाला भ्रांत आक्रमक ठरवून स्वतः निसटून जाण्याच्या भोगासक्त स्त्रियांच्या निसर्गसिद्ध कसबाचें द्योतक आहे. ती म्हणते, " कारण आपला स्नेह असाच निर्मळ (?) राहून द्यायची तुमची तयारी नव्हती. त्यांतून आणखी कांही निराळेंच अपेक्षूं लागला तुम्ही. पण अशी अपेक्षा केल्याने तुम्ही, जिने तुमच्यावर एवढा

निर्भ्रांत व निरागस विश्वास टाकला होता अशा तुमच्या सखीवर केवढा मोठा अन्याय करीत होतां. शरम वाटली पाहिजे होती तुम्हांला!"

पण या पवित्र्याने डगमगणारा लव्हबर्ग नव्हता. त्याने सरळच प्रश्न केला की, "हो, मी लगट जास्त करूं पाहत होतों; पण मग तुझी गोळी घालण्याची धमकी तूं खरी कां केली नाहीस?" याला हेडाने दिलेलें उत्तर मात्र अगदी सरळ सरळ खरें आहे. ती म्हणते "मला लोकापवादाची भयंकर भीति वाटते!" म्हणजे करून सवरून नामानिराळे राह्यला मिळावें ही तिची प्रवृत्ति होती. आणि पिस्तुलाच्या भयाने कां होईना त्या प्रतिभावंत पुरुषाला आपल्याभोवती नुसत्या गिरक्या घ्यायला लावायचें – त्याला एकट्यालाच नव्हे तर आणखी इतरांनाही – हा खेळ मात्र तिला नुसता खेळायचा होता.

मत्सर लपून राहत नाही—

या तिच्या वृत्तीबद्दल तिरस्कार व्यक्त करून लव्हबर्ग तिला नेभळट म्हणून दोष देतो तेव्हा बाणाने विद्ध झाल्यासारखी होऊन ती विषय बदलते आणि "त्यांत तुमचें वाईट काय झालें? उलट हितच झालें तुमचें. तुम्हांला शेरीफ एल्व्हस्टेडच्या घरीं मनाचें पूर्ण समाधान लाभलेंच की अखेरीस?" असें म्हणून एकाच फटकाऱ्यांत ती त्याचें आपल्याविषयीचें प्रेम चंचल होतें, ती नाकारीत असतांही तिच्याच नादांत राहण्याइतकें तें दृढ नव्हतें हें व्यक्त करते; त्याचप्रमाणे, त्याने असेंच तिच्या नादीं राहायला हवें होतें, ही आपली अपेक्षा आणि वृत्ति व्यक्त करते आणि एल्व्हस्टेडबाईबद्दलचा तिच्या मनांतील सुप्त मत्सरही त्यांत स्पष्ट होतो.

म्हणजे तायाने त्या दोघांमधील सगळें कांही हेडाला सांगितलें होतें हें लव्हबर्ग समजतो. परंतु आपण मात्र हेडाच्या व आपल्या सलगीबद्दल अवाक्षरही तायाला सांगितलें नाही. कारण त्याचा अर्थ तिला समजणें शक्य नव्हतें. कारण ती तशी खुळी आहे! असें लव्हबर्ग म्हणतो.

आणि तिरस्कारही—

म्हणजे एक खुळी आणि दुसरी नेभळट. स्त्रियांच्या भावनांचा खरा अर्थ न समजण्याच्या त्याच्या या पुरुषी मठ्ठपणाचें तिला हसूं येतें आणि वाईटही वाटतें. म्हणून आपण त्या दिवशीं त्याला गोळी घातली नाही ती नेभळटपणामुळे नव्हे, तर दुसऱ्याच एका कारणामुळे, असें म्हणून तें कारण अगदी त्याच्या कानांत सांगण्यासाठी म्हणून ती त्याच्याकडे वाकते. बिचारा लव्हबर्ग! त्याला वाटतें – तसें तो म्हणतोही – की, म्हणजे एकूण हेडाच्या मनांत त्याच्याविषयीं कांही तरी विशेष होतें तर. पण तिला जें कांही सांगायचें होतें तें सांगण्यापूर्वीच ताया एल्व्हस्टेड तेथे येते आणि "असलें भलतेंच कांही समजूं नका मात्र!" एवढेंच तोडून बजावून हेडाला आपला मोर्चा एल्व्हस्टेडकडे

वळवावा लागतो. " किती किती वेळ मी तुझी वाट पाहत होतें " असें खोटेंच म्हणून हेडा तिच्याबद्दल आपुलकीचें केवढें मोठें नाटक करते. आज आपण तिथेच येथे राहणार, कारण लव्हबर्ग कांहीं ब्रॅककडच्या मेजवानीला जाणार नाही, हें हेडाने सांगितल्यावर तर ताया फारच खुशींत येते आणि खुर्ची सरकवून लव्हबर्गाच्या शेजारीं बसूं पाहते. परंतु हेडा तिला तसें करूं देत नाही. " छे, छे ! तिथे नाही. मी बसणार आहे तुमच्या दोघामध्यें या इथे " असें म्हणून ती तायाला सोफावर आपल्या उजव्या हाताला बसविते. आणि लव्हबर्ग पलीकडे तिच्या डाव्या बाजूला खुर्चीवर असतो.

हेडाच्या दृष्टीने सर्वचजण भेकड—

तुमच्या दोघांमध्ये मी बसणार आहें, हे हेडाचे शब्द सहेतुक होते की नाही कोण जाणें. तिचा जो बेत यथायोग्य रीतीने तिने घडवून आणला त्यावरून तसें वाटल्याबांचून राहत नाही, हेडाशीं ज्या प्रकारचीं प्रेमभाषणें लव्हबर्गने केलीं होतीं त्यांचीच पुनरावृत्ति त्याने तायाशीं केली होती हें त्यांच्या संभाषणांत दिसून येतें. एवढेंच नव्हे तर, " माझ्याशीं संबंध ठेवण्याच्या बाबतींत ती धीट आहे " असें आणखी जवळजवळ हेडाला टोचूनच लव्हबर्ग म्हणतो, त्या वेळीं मात्र " हो, खरेंच धीटपणा—तेवढा माणसांजवळ असता तर काय बहार झाली असती " या हेडाच्या कांहीशा तुटक व कांहीशा विमनस्क उत्तराने लव्हबर्ग चमकून जातो. या लहानशा उद्गारांत कोणाजवळच हा धीटपणा—हें धैर्य—नव्हता हें विविध अर्थांनी हेडाने व्यक्त केलेलें असतें. त्यांतील एकेक अर्थ आपल्यासमोर व्यक्त होत जाणार आहे.

लव्हबर्गला निश्चयापासून ढळविण्याचा प्रयत्न —

त्यानंतर लव्हबर्गला पंच पिण्याचा आग्रह हेडा मुद्दामच करते. माझ्या आग्रहासाठी सुद्धा घेणार नाही म्हणतां, तर मग माझा तुमच्यावर एवढाही ताबा नाही म्हणायचा, असें म्हणून ती त्याला डिवचते. परंतु त्याचा निर्धार सुटत नाही. त्यावर माझ्यासाठी राहूं द्या, पण लोकांसाठी तरी थोडीशी पंच तुम्हीं घ्यायलाच हवी, असा तो दुसरा पवित्रा घेते. कारण, नाही तर लोक म्हणतील की, तुमचा तुमच्या स्वतःवर विश्वास नाही; आपण एवढ्या तेवढ्या व्यसनांत सापडूं अशी तुम्हांला भीति वाटते; असें म्हणून यांत त्याचा एक प्रकारें नेभळटपणाच आहे हें ती सूचित करते. तरीही लव्हबर्गचा निर्धार ढळत नाही. असें पाहून " तो बघा ब्रॅक कसा मिस्किलपणाने पाहतो आहे तुमच्याकडे; तुम्हाला त्याचें मेजवानीचें आमंत्रण स्वीकारण्याचें धाडस झालें नाही ना म्हणांशी, त्या वेळींही तो असाच गालांतल्या गालांत हंसून पाहत होता. असें म्हणून हेडा त्याला आणखीच डिवचते. " धाडस झालें नाही म्हणतेस ? " असें जेव्हा विद्ध होऊन तो विचारतो, तेव्हा " मी कशाला तसें म्हणूं—पण त्याच्या पाहण्याचा आणि हसण्याचा अर्थ मला तसा वाटला " असें खोचून बोलून,

"तर मग नाहीच जाणार ना तुम्ही त्या मेजवानीला ?' असें विचारून त्याला त्याच्या निश्चयापासून ढळविण्याचा आपला प्रयत्न फसला या जाणिवेने ती स्तब्ध होते.

परंतु क्षणभरच. दुसऱ्या क्षणींच आणखी एक पवित्रा ती टाकते. "खरेंच, किती एखाद्या महामेरूपर्वताप्रमाणे निश्चल आहांत तुम्ही. निरंतर आपल्या तत्त्वाशीं अगदी एकनिष्ठ ! माणसानें अगदी असेंच असायला हवें." असें त्याला म्हणून ती एल्व्हस्टेडकडे वळून पुढे म्हणते, "आणि म्हणूनच ताया, सकाळीं तूं जी एवढी घाबरगुंडी उडून विमनस्क होऊन आली होतीस तेव्हाच मीं तुला सांगत नव्हतें कां की, एवढें अगदी मरण जवळ आल्यासारखें भिऊन जायला तुला कांहीच कारण नव्हतें म्हणून !"

गोळी नेमकी लागली —

आणि या वेळची गोळी सावजाला अगदी नेमकी लागली. तायाला आपल्याबद्दल संशय वाटला – आपण व्यसनाच्या तावडींत सापडणार नाही असा तिला विश्वास वाटला नाही या जाणिवेने विद्ध होऊन लव्हबर्ग बेभान होतो आणि त्याने जें करावें म्हणून हेडाच्या मनांत होतें तेंच नेमकें तो करतो. पंचचा एक ग्लास घेऊन तो पिऊन टाकतो. तायाच्या कोणत्याही विनंतीकडे तो लक्ष देत नाही. उलट ताया आपल्या नवऱ्याच्या सांगण्यावरून शहरांत त्याच्यावर पाळत ठेवायला आली असली पाहिजे असा अगदी अन्याय्य आणि अयथार्थ समज त्या वेदनाजनित संशयाच्या भरांत तो करून घेतो आणि पुन्हा एक ग्लास पितो. नंतर तळमळून म्हणतो, "ताया, किती खुळी तूं ? की, असा संशय तूं माझ्याबद्दल घ्यावास. पण मी तुम्हांला सगळ्यांना दाखवून देणार आहें की जरी मी व्यसनांचा दास झालेला असलों तरी त्या दास्यांतून मीं आता पूर्ण सुटका करून घेतलेली आहे. आणि याबद्दल मी तुझा ऋणी आहे ताया !"

आपल्याबद्दलच्या त्याच्या भावनेच्या आनंदांत ती खुळी ताया याही वेळीं गर्क होऊं शकते; पण तेवढ्यांत तिला आणखी एक धक्का बसतो. कारण लव्हबर्गही टेसमनबरोबर ब्रॅकच्या घरीं मेजवानीला जायला निघतो. या त्याच्या विचाराने ताया तर जणू किंकाळीच मारण्याच्या बेतांत येते, आणि एवढ्या मोठ्याने लव्हबर्गला हा वेडा विचार करूं नका म्हणून सांगूं लागते की, "ताया, वेडी तर नाहीस तूं – मंडळी ऐकतील ना तिकडे" असें तिला हेडा सुचविते.

हेडाचा खरा हेतु ? लव्हबर्गचा नैतिक विजय कीं विनाश ? —

याने तर लव्हबर्गचा मेजवानीला जाण्याचा विचार पक्का होतो आणि तो जातोही. त्यांची रात्रीं जी मौजमजा चालणार ती अदृश्य राहून पाह्यला मिळाली तर किती छान होईल असें त्याही वेळीं हेडा खवचटपणाने म्हणते. पण या सगळ्याचा परिणाम कांही

तरी विपरीत होईल अशी भीति एल्व्हस्टेडला मात्र वाटत असते. तसें कांही होणार नाही, आज त्या मंडळीच्या अतिरेकी वातावरणांत सापडूनही लव्हबर्ग निर्मळ राहून परत येईल आणि आणि अशा रीतीने स्वतःवरचा ताबा राखतां येतो हें कळल्यामुळे तो कायमचा स्वतंत्र–भयनिर्मुक्त होईल, असा विश्वास हेडा तिला देऊं पाहते. परंतु एल्व्हस्टेडचा यावर विश्वास बसत नाही. ती म्हणतेच मुळी की, "यांत तुझा कांहीतरी वेगळाच हेतु आहे, हेडा." त्यावर हेडाच्या भावनेचा जो आविष्कार आहे तो तिच्या विरोधी भावनांच्या तावडींत सापडलेल्या विकल अंतःकरणाचा केवढा तरी निदर्शक आहे.

आयुष्यांत एकदा तरी कोणा माणसाच्या जीविताला वळण द्यायची संधि तिला हवी आहे. अशी शक्ति आपणाजवळ कधीच नव्हती या जाणिवेने ती विद्ध झाली आहे. नवऱ्याच्या जीवनाला असें वळण लावण्याचा प्रयत्न करण्यांत तर कांहीच अर्थ नाही या जाणिवेने तर या क्षणीं ती जणू वेडी होते व उद्रेकाने म्हणते, "ताया, या बाबतींत तूं केवढी भाग्यवान आणि श्रीमंत आहेस. मला खरोखर तुझा हेवा वाटतो आणि तुझा हा केशभार पार जाळून टाकावासा वाटतो."

केवढा निराशेचा आणि मत्सराचा झटका होता हा, ज्या एका प्रतिभावंत पुरुषाच्या जीवनाला आपण वळण देऊं शकलों नाही त्याच्या जीवनाला वळण या एका खुळ्या आणि भोळ्या स्त्रीने द्यावें हें तिला असह्य होतें. आणि म्हणूनच हा एक शेवटचा प्रयत्न करून त्या टवाळ सोळभोकांच्या अड्ड्यांत लव्हबर्गला पाठवून तेथे त्याने आपल्या सुधारलेल्या चारित्र्याचा आणि प्रतिभेचा प्रभाव सगळ्यांना दाखवून त्यांना लज्जित करावें यासाठी तिने त्याला तेथे पाठविलें होतें काय? म्हणूनच तो विजयी वीराप्रमाणे डोक्यांत द्राक्षवेलीचीं पानें घालून रात्रीं दहा वाजतां तायाला निवासस्थानीं घेऊन जाण्यासाठी येईल असें तिला वाटत होतें काय? म्हणूनच, काय होतें तें अदृश्यपणें पाह्यची संधि तिला हवी होती काय? का अशा या किंवा कोणत्याच नैतिक विजयाच्या सूडाची संधि त्याला मिळूं नये या सुप्त हेतूने आणि त्याच्या सुधारलेल्या वर्तनाचा भोपळा पार फुटून जाऊन तो खातेऱ्यांत लोळूं लागावा, अशा रीतीने एल्व्हस्टेडबाईवरही सूड मिळावा आणि पुन्हा पुन्हा आपल्या जीवनांत त्याच्या गतसंबंधाचें भूत कृष्ण छाया टाकायला उभें राहूं नये या विचाराने आणि विश्वासाने तिने त्याला त्या मेजवानीला पाठविलें होतें काय? का कोणतीही एक गोष्ट साधली असती तरी ती तिला हवीच होती?

हेडाच्या उद्देशाचा छडा लावणें हें कठीण काम असलें तरी खरोखर काय घडलें हें आपणांस पाहतां येईल. आणि तें पाहण्यासारखेंही आहे. कारण त्यांतच आता हेडाने त्या संध्याकाळीं सोडलेल्या जादूच्या पोतडीचा खरा खेळ आपल्याला पाहायला मिळणार आहे.

आत्मप्रेमी हेडा आणि आत्मनिरपेक्ष एल्व्हटेड —

रात्रभर त्या दोघींनी लव्हबर्ग परत येईल म्हणून वाट पाहिली. पोशाख उतरून

त्या अंतर्गृहांत निजायला गेल्या नव्हत्या. पुढच्या दिवाणखाल्यांत बसून राहिल्या होत्या. तेथेच अखेर हेडाला पहाटे चार वाजतां गाढ झोप लागली. एल्व्हस्टेडला मात्र. एक क्षणही झोप आली नाही. कांही झालें तरी स्वतःच्या चित्ताची समता ढळूं द्यायची नाही हा आत्मप्रेमाचा हेडाचा आविष्कार आणि स्वतःपेक्षाही लव्हबर्गचें काय होणार या काळजींत चूर झालेल्या एल्व्हस्टेडचा आत्मनिरपेक्ष प्रेमाविष्कार यांतील हा फरक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. किंवहुना आपण फेकलेले जादूचे खडे यथायोग्यच कार्य करणार याबद्दलचा हेडाचा विश्वास जितका कौतुकास्पद तितकाच आपल्या चित्ताचा थरकाप करणारा आहे.

सकाळ होऊन चांगलीं उन्हें पडलीं असल्याकारणाने आपणच आतां स्वतः बाहेर पडून लव्हबर्गचा शोध करावा असें एल्व्हस्टेडला वाटतें. पण हेडा तिला तसें करूं देत नाही. केवढा तरी मायेचा अविर्भाव करून तिच्यावर प्रभाव पाडून तिला ती आंतल्या खोलींत जाऊन थोडा वेळ विश्रांति घ्यायला प्रवृत्त करते आणि त्या भोळ्या जीवाला हेडाच्यावरील विश्वासामुळें म्हणा किंवा सारी रात्र जागून थकवा अपरिमित आला होता म्हणून म्हणा, आंत अंथरुणावर पडल्यावर इतकी झोप लागते की, नंतर जॉर्ज टेसमन परत येऊन त्याच ठिकाणीं काय घोर घटना घडतात याची तिला पुसट-सुद्धा कल्पना येत नाही.

टेसमन परत आल्यावर रात्रीची हकीकत हेडा त्याच्याकडून काढून घेते. त्यांत लव्हबर्गबद्दलचें सगळें वर्तमान कळण्याचीच तिला सगळ्यांत अधिक उत्सुकता असते.

आपल्या पुस्तकांतला बराचसा भाग लव्हबर्गने टेसमनला वाचून दाखविला होता. त्या ग्रंथाची योग्यता इतकी मोठी आणि वैशिष्ट्यपूर्ण होती की "लव्हबर्गला इतका श्रेष्ठ दर्जाचा ग्रंथ लिहितां यावा याबद्दल क्षणभर मला त्याचा मत्सर वाटला" अशी आपल्या मनाची मोठी भयंकर अवस्था झाल्याचें टेसमन कांहीशा आदराने आणि कांहीशा स्वतःच्या मनाच्या कमकुवतपणाच्या जाणिवेने हेडाला सांगतो. पण यांत हेडाला तितकासा रस नसतो.

लव्हबर्गचें स्फूर्तिदात्या स्त्रीचें गुणगान —

पुढे टेसमनने जें सांगितलें त्यांत तिला रस असतो. इतका श्रेष्ठ प्रतिभावान असा हा मनुष्य व्यसनमुक्त होण्याची आशा एवढीसुद्धा नव्हती याबद्दल स्वतःला मनापासून वाटलेला खेद टेसमन व्यक्त करतो. त्या रात्रीं दारू घेण्याच्या बाबतींत लव्हबर्गने अत्यंत अतिरेक केला. मर्यादा हा शब्दच जणू त्याला माहीत नव्हता. त्या दंगलीच्या भरांत त्याने एक लांबलचक भाषण करून आपल्याला स्फूर्ति देणाऱ्या कोणा एका स्त्रीचें खूप गुणगान केलें.

तिचें नांव त्यानें सांगितलें का, याची काळजी हेडाला होती. पण त्याने नांव कोणाचेंच सांगितलेलें नव्हतें. टेसमनचा मात्र कयास होता की, ती स्त्री एल्व्हस्टेडच

असणार! अर्थात यावर हेडाचा विश्वास नव्हता – निदान तसें नसावें अशी तिची आंतरिक ओढ होती.

यापुढची हकीकत जास्त विलक्षण होती; अधिक खेदकारक होती. ब्रॅकच्या घरून निघून शहराच्या जवळ जवळ जेव्हा ही मंडळी आली तेव्हा टेसमन इतरांच्या थोडा मागे पडला. आणि चमत्कारिक गोष्ट अशी की रस्त्याच्या कडेला त्याला लव्हबर्गच्या नव्या ग्रंथाच्या हस्तलिखिताचें पाकीट सापडलें. तें हेडाला दाखवून या गोष्टीची कुणालासुद्धा एका चकार शब्दानेही कल्पना न देण्याबद्दल टेसमन हेडाला अगदी हळू आवाजांत बजावतो. हें हस्तलिखित असें होतें की त्याची कोठे नक्कल केलेली नव्हती; आणि पुन्हा कोणाला तें जसेंच्या तसें लिहून निर्माण करण्याची शक्यता नव्हती. लव्हबर्गला हस्तलिखित पडल्याची बिलकुल कल्पना नव्हती. तो तसाच पुढे आपल्या दुसऱ्या कोणा मित्रांबरोबर निघून गेला होता. टेसमनची व त्याची गाठच मग झाली नाही. त्यामुळे हस्तलिखित टेसमनला सापडलें आहे याची त्याला किंवा इतर कोणालाच कल्पना नव्हती. या सर्व गोष्टी हेडाने टेसमनकडून मोठ्या नेटाने प्रश्न विचारून काढून घेऊन स्वतःची पूर्ण खात्री करून कशी घेतली हें प्रत्यक्ष रंगभूमीवरच पाहणें उद्बोधक होईल.

हरवलेलें हस्तलिखित – हेडाच्या कटाला नवाच धागा —

या नव्या माहितींतून हेडाला स्वतःच्या कटाचा एक जणू निराळाच धागा हातीं सापडल्यासारखें होऊन तें हस्तलिखित टेसमनकडून काढून घेण्यासाठी ती हात पुढे करते आणि लव्हबर्गला तें परत देण्याच्या विचारापासून टेसमनला परावृत्त करण्यासाठी आतुरतेने म्हणते, "छे! छे! तें त्याला मुळींच देऊं नका." परंतु याचा कांही विपरीत अर्थ होईल असें वाटून लगेच ती पुढे म्हणते, "म्हणजे त्याचें असें की, हस्तलिखित अगदी आजच सकाळीं नेऊन परत द्यायची घाई करायचें कारण नाही. मी आधी एकदा वाचून पाहीन म्हणतें." तरीही हस्तलिखित परत देण्याची टेसमनची आतुरता कायमच राहते हें पाहून, "का? तुम्हांला काळजी वाटते की, हस्तलिखित स्वतः-जवळ नाही असें समजतांच लव्हबर्ग बेभान होईल म्हणून?" असें ती त्याला विचारते. "हें हस्तलिखित नाहीसें झालें तर पुन्हा हा ग्रंथ लिहिणें अशक्य आहे – कारण त्यांत स्फूर्तीचा प्रश्न आहे –" ही गोष्ट हेडा उन्मेखून टेसमनकडून खराबून घेते.

आणीबाणीच्या क्षणाबद्दल ब्रॅकची गूढ सूचना —

एवढें झाल्यावर त्याच्या नांवें ज्यूलियाना आत्याकडून आलेल्या पत्राची तिला आठवण होते. रीना आत्या अगदी मरणाच्या दारीं असल्याबद्दलचें तें पत्र होतें. स्वाभाविकच टेसमनच्या अंतःकरणाचा अत्यंत गोंधळ होतो. त्याला तर जायचेंच असतें. पण हेडानेही अशा प्रसंगीं आपल्याबरोबर यावें अशी त्याला इच्छा असते.

परंतु हें तिला सुचवावें कसें या विचाराने तो गडबडून जातो. अखेर स्पष्ट सुचवूनही "मला नका यायला सांगूं. आजार आणि मृत्यू या दोन्ही गोष्टी मला पाहवत नाहींत. संसारांतल्या सगळ्याच विरूपतेचा मला तिटकारा आहे" असें म्हणून हेडा नकार देते; त्यामुळे तर टेसमनला जास्तच गोंधळल्यासारखें होतें. स्वतःचा कोट-टोपी वगैरे कोठे ठेवली याचें सुद्धा नीट स्मरण राहत नाही. शेवटीं एकदाचा कसा तरी तो बाहेर जायला निघतो. परंतु त्याच क्षणीं जज्ज ब्रॅक आल्याची वर्दी येते. त्या-सरशी टेबलावर ठेवलेलें लव्हबर्गच्या हस्तलिखिताचें पुडकें हेडा झटकन उचलून स्वतःजवळ घेते आणि तें कांही केल्या टेसमनला परत देत नाही. टेसमन का जातो आहे हें कळल्यावर "मग कांही मी तुला थांबवीत नाही; निदान अशा आणी-बाणीच्या वेळीं तरी" असें ब्रॅक म्हणतो. त्या वेळीं या त्याच्या बोलण्यांत गूढ ध्वनितार्थ आहे याची कल्पना हेडाला किंवा आपणा प्रेक्षक-वाचक-श्रोत्यांना मुळीच नसते. परंतु टेसमन गेल्यावर त्याबद्दलची कल्पना जेव्हा आपल्याला येते तेव्हा रीना आत्याच्या मृत्यूपेक्षा फार निराळा आणि हेडा व टेसमन यांच्या जीवितौघाला एकदम कलाटणी देणारा आणीबाणीचा क्षण हाच या नाटकांत त्या वेळीं कसा येऊन ठेपला होता याची ओळख पटते.

पुरुष तत्त्वाशीं चिकटून राहूं शकत नाही —

ब्रॅकच्या म्हणण्याप्रमाणे टेसमन फार चतुर गृहस्थ. कारण लव्हबर्गच्या मित्रांचा कांही निराळाच बेत असल्याचें त्याने ब्रॅकच्या घरीं मेजवानीच्या वेळीं ताडलें होतें; म्हणून त्यांना टाळून तो दुसरीकडे कॉफी घेण्यासाठी गेला. ब्रॅक मात्र लव्हबर्ग आणि त्याचे मित्र कोठे जातात हें पाहण्यासाठी त्यांच्या पाळतीवर राहिला. कारण त्याच्या-कडच्या मेजवानीनंतर लव्हबर्गला आणखी एका ठिकाणीं खाद्यपेयासाठी निमंत्रण होतें हें ब्रॅकच्या लक्षांत आलेलें होतें. लव्हबर्गने हें आमंत्रण प्रथम नाकारलें; परंतु शेरीफ एल्व्हस्टेडच्या घरीं जो संयम तो दाखवूं शकत होता तो त्याचा या ठिकाणीं राहिला नाही; दारूच्या तो फार आहारीं गेला आणि आपला बेत बदलून तो जायला तयार झाला. "असे आम्ही पुरुष असतों. जितकें पाहिजे तितकें आम्ही तत्त्वाशीं दृढ चिकटून राहूं शकत नाही, सदा सर्वकाळ!"

लव्हबर्गबद्दल हेडाच्या मनांत अप्रीति उत्पन्न करावी हा ब्रॅकचा अगदी उघडउघड उद्देश होता. म्हणून त्यानंतर तो कोठे गेला आणि काय झालें हें तो मुद्दाम चुरचुरीत-पणाने सांगतो. त्या लाल केसांच्या गायिकेबद्दल हेडाला एल्व्हस्टेडने कल्पना दिलीच होती. त्या ठिकाणीं तो या पार्टीला गेला होता. या बाईचें एका काळीं लव्हबर्गला फारच मोठें आकर्षण होतें आणि पुरुषांची शिकार करणारी ती एक धूर्त बाई आहे हें ब्रॅक मुद्दाम सजवून सांगतो. पण त्या पार्टीच्या वेळीं लव्हबर्गची आणि त्या बाईची व त्याच्या मित्रांची झटापट झाली. त्या बाईने आणि त्या मित्रांनी आपलें पैशाचें पाकीट

चोरल्याचा आरोप करून त्याने तेथे खूप धमाल उडविली. इतकी की, शेवटीं पोलिसांना तेथे यावें लागलें. लव्हबर्ग जात्याच माथेफिरू माणूस. त्याने पोलिसांशींही धिंगामस्ती केली आणि आतां तो पोलिसांच्या ताब्यांत होता; हें प्रकरण त्याला एकंदरींत बरेंच जड जाणार.

हेडाचा अपेक्षाभंग ?—

हें सांगण्यासाठी ब्रॅक सकाळच्या प्रहरीं, रात्रीचे मेजवानीच्या वेळचे कपडेसुद्धा न बदलतां हेडाकडे आला होता. आपल्या अपेक्षेप्रमाणे वीरपुरुषासारखीं डोक्यांत द्राक्षवेलीचीं पानें घालून लव्हबर्गने त्या सर्व दारूबहाद्दरांवर मात केली नव्हती हें समजून हेडाला खेद झाला; तिचा अपेक्षाभंग झाला.

पण लगेच त्या चतुर स्त्रीला कोडें पडलें की, ब्रॅकने लव्हबर्गच्या पाठीशीं इतकें गुप्त हेरासारखें कां राहावें ? किंवा कोडें पडलें म्हणण्यापेक्षा त्याच्या कुटिल हेतूची तिला यथार्थ कल्पना आली. म्हणून तिने आपल्या स्वभावगत चातुर्याने ब्रॅककडून त्याच्या मनांतलें काढून घेतलें.

ब्रॅकने आपली शंका सांगितली. एल्व्हस्टेड बाई ही नवऱ्याचें घर सोडून कायमची निघून आलेली आहे. तिला आणि लव्हबर्गला एकमेकांच्या सहवासांत राह्यचें आहे. त्यासाठी दोघांना एकत्र येण्यासाठी किंवा लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठी त्यांना – विशेषतः लव्हबर्गला कोणाच्या तरी चांगल्या घराचा आसरा पाहिजे .आहे. आधीच लव्हबर्गबद्दल फारसा आदर सभ्य समाजांत नव्हता. आता या पहाटेच्या प्रकारानंतर तर त्याला घराची पायरी कोणी चढून देणार नाहीत.

त्यावर हेडा ब्रॅकला खोचून विचारते " म्हणजे मींही तसेंच करावें असा तुमचा उद्देश ? " यासाठी ब्रॅकची ही सारी खटपट असेंच तिला म्हणायचें होतें. ब्रॅकने ती गोष्ट उघड उघड कबूल केली आणि हेडाच्या घरांत त्यांच्या त्या त्रिकोणामध्ये लव्हबर्गला प्रवेश मिळाल्यास आपली फार निराशा होईल, आपलें स्वतःचें हक्काचें घरच नाहीसें झाल्यासारखें होईल, हें त्यानें स्पष्ट केलें.

ब्रॅकचा हेतु हेडा संपूर्ण ओळखते—

" म्हणजे खुराड्यांतील एकटा एक कोंबडा तुम्हांला व्हायचें आहे असें म्हणाना !" असें हेडा त्याला रोखठोक विचारते. आणि तसाच आपला उद्देश असल्याबद्दल ब्रॅकही तितकेंच रोखठोकपणें सांगतो. इतका आता एक प्रकारें ब्रॅकचा धीर चेपलेला असतो. तशी सोयिस्कर परिस्थिति उत्पन्न झाली आहे असें त्याला वाटत असतें. म्हणजे आपण कल्पना केली त्यापेक्षा हा माणूस फार धोकादायक आहे याची या वेळीं हेडाला तीव्र जाणीव होते. आणि आपण त्याच्या कचाट्यांत सांपडण्याजोग्या परिस्थितींत नाही याबद्दल तिला कांहीसें समाधान वाटतें. तसें ती उघड बोलूनही दाखविते.

ब्रॅकही आता बुरखा पार झुगारून देतो. "तशी जर तूं माझ्या कचाट्यांत सापडलेली असतीस तर मीं काय केलें असतें याचा नेम नाही" असें एक प्रकारच्या दबकावणीच्या स्वरांतच तो हेडाला बजावतो. ही एक प्रकारची धमकीच आहे, असें हेडा म्हणते तेव्हा "तसेंच नव्हे कांही; आपला हा त्रिकोण परस्परांच्या संमतीनेच शक्य तो उभा ठेवला जावा" असा आपला उद्देश स्पष्ट करून ब्रॅक, एवढेंच माझें काम होतें असें म्हणून मागच्या दारानेच जाऊं लागतो. हेडाच्या निषेधाला "मागचे मार्गच मला पुष्कळदा पसंत असतात, अर्थात कांही वेळां त्यांत जोखीमही असते" असें जेव्हा ब्रॅक उत्तर देतो त्या वेळीं, "म्हणजे दुसरें माणूस पिस्तूल चालविण्याचा खेळ करीत असेल तर ना!" असें हेडा खवचटपणाने म्हणते. त्यावर "छट्! पाळलेल्या कोंबड्याला कुणी गोळी घालीत नसतें" अशा शब्दांत आपला उद्देश स्पष्ट करून ब्रॅक निघून जातो. दोघांनाही परस्परांच्या बोलण्यांतील आशय पूर्णपणें ध्यानांत आलेला असतो.

अत्यंत गंभीर होऊन लव्हबर्गचें हस्तलिखित उघडून हेडा आता त्याच्यावर नजर टाकणार, त्याच क्षणीं बर्टाला न जुमानतां लव्हबर्ग आत येण्याची गडबड करीत असल्याचें ऐकायला येते. त्यासरशी टेबलाच्या खणांत हस्तलिखित ठेवून हेडा कुलूप लावते आणि किल्ली दौतीपाशीं ठेवते. इतक्यांत बर्टाला दूर सारून लव्हबर्ग धाडदिशी आंत प्रवेश करतो. हेडाला पाहतांच संयम धारण करून तो तिला नमस्कार करतो. एल्व्हस्टेडला न्यायला फारच लौकर आलांत म्हणायचे, असें ती त्याला टोंचते. तुझ्यासाठी म्हणून मी आलों या त्याच्या उत्तराकडे दुर्लक्ष करून, हेडा त्याला ताया येथे आहे हें कसें समजलें हेंच विचारीत राहते. तिच्या उतरण्याच्या जागीं ती आलेली नाहीं असें कळलें असें त्यानें सांगितलें, तेव्हा "तेथली मंडळी तुमच्याशीं कांही निराळीं वागलीं नाहीत?" असा तिने प्रश्न केला. त्याच्या पहाटेच्या मारामारीची वार्ता कितपत पसरली आहे हें तिला हवें होतें. तसेंच त्या दोघांच्या संबंधाबद्दल लोकांना काय वाटतें हेंही तिला काढून घ्यायचें असतें. पण तो त्याबद्दल फारसें कांही बोलत नाही. टेसमनने घरीं येऊन हेडाला काय सांगितलें हें त्याला समजायला हवें असतें. परंतु हेडा पक्की आहे. "तुमची मेजवानी फार रंगली होती असें म्हणत होते ते" एवढेंच सांगून ती त्याला कशाचाच थांग लागूं देत नाही.

एवढ्यांत ताया जागी होऊन बाहेर येते. तिला पाहतांच पुन्हा एकदा लव्हबर्गचा संयम सुटतो. तो आवेगाने बोलूं लागतो. आपल्या आयुष्यांतील साऱ्या आशांची राखरांगोळी झाली आणि आपण दोघांनी यापुढे एकमेकाला विसरून चाललें पाहिजे – एकमेकापासून दूर राहिलें पाहिजे असें तो मोठ्या तळमळीने तिला सांगूं लागतो. त्यासरशी हेडाला भान न राहून ती म्हणते, "मला ठाऊक होतें हें असें होणार म्हणून!"

हेडाचा एका दगडाने दोन पक्षी मारायचा हेतु होता? —

म्हणजे हा तिचा हेतु होता! तायापासून लव्हबर्गला दूर करायचें होतें तिला! का

लव्हबर्गच्या व्यसन सोडल्याच्या सगळ्या गप्पा असून हा मनुष्य सुधारणार नाही – कोणाशींही एकनिष्ठ राहणार नाही – व्यसनांच्या खातेऱ्यांत लोळत राहणार; प्रतिभावान असला तरी आत्मसंयमी नसल्यामुळे त्याच्या जीवनाचें असेंच मातेरें होणार अशी तिची खात्री होती? का या दोन्ही विकारविचारांचें मिश्रण तिच्या चित्तांत होतें?

मत्सराचा प्रादुर्भाव तिच्या ठिकाणीं झाला होता हें निश्चित आहे. परंतु लव्हबर्गला तायाच्या प्रेमाचें आणि सहवासाचें सुख मिळूं नये हें इच्छीत असतांना आणि त्यासाठी चतुराईने धडपड करीत असतांना त्याचा सहवास आपल्याला पुन्हा मिळावा अशी तिची इच्छा होती की नाही? कां एका दगडाने दोन पक्षी मारण्याचा तिचा हेतु होता? तायावर मात करावी हें तर खास तिला हवेंच होतें; परंतु त्याच प्रयत्नांत लव्हबर्गच्या घनदाट कृष्णमेघाची छायाही आपल्या जीवनांतून नाहीशी करावी यासाठीही बहुधा तिचा प्रयत्न होता.

एक हेतु साधतो —

तुझा आता यापुढे माझ्या जीवनांत कांही उपयोग नाही, असें तायाला लव्हबर्ग कटाक्षपूर्वक सांगूं लागतो. तिने आपल्या घरीं जायला हवें या त्याच्या सूचनेचा ताया धिक्कार करते. आपण लव्हबर्गजवळ राहणार; त्याचा ग्रंथ प्रसिद्ध होणार; त्यांचा दोघांचा मिळून तो ग्रंथ होता; त्याच्या प्रकाशनानंतर लव्हबर्गला यश आणि कीर्ति यांचा लाभ होणार; आणि या सगळ्या आनंदांत भागीदार होण्याचा आपल्याला अधिकार आहे; असा निर्धार ती व्यक्त करते. परंतु ग्रंथ प्रसिद्ध होणारच नाही असें तो सांगतो. त्याच्या हस्त-लिखिताचें काय झालें याचा तायाला मोठा विस्मय वाटतो. त्याचप्रमाणे त्या हस्त-लिखिताचें रहस्य आपल्याला जें माहीत आहे तें लव्हबर्गला माहीत नाही ना, या विचाराने हेडाचा थरकांप होतो. परंतु आपण तें हस्तलिखित फाडून त्याचे तुकडे तुकडे केले असें लव्हबर्ग जेव्हा सांगतो तेव्हा "अशक्य आहे – खोटें आहे हें" असे शब्द हेडाच्या तोंडून एकाएकी निघून जातात. लव्हबर्गला केवढी मोठी आशा उत्पन्न होते की, हेडा इतक्या निर्धाराने बोलते आहे, तेव्हा कदाचित तिला हस्तलिखिताबद्दल कांही माहिती असावी. परंतु क्षणार्धांतच भानावर येऊन जेव्हा हेडा म्हणते, "तुम्ही सांगतां आहां, तेव्हा नाही कसें म्हणूं? पण ही गोष्ट मला इतकी असंभवनीय वाटली की –" आणि पुढचें बोलणें ती अर्धवट सोडून देते. मग लव्हबर्गची आणि तायाची संपूर्ण निराशा होते. लव्हबर्गने हस्तलिखित फाडणें म्हणजे आपल्या दोघांच्या अपत्याचा खून करणें होय; त्यामुळे आपल्या जिवाचा जन्मभर तळतळाट होईल, असें एल्व्हस्टेड अत्यंत क्रोधाने म्हणते. ज्यामुळे तिचा आणि लव्हबर्गचा संबंध जुळला होता तो बंध पार तुटून नाहीसा झाला होता. आणि जीवनांतील हा शेवटचा अंकच जणू संपला अशा आवेशाने ताया तेथून निघून जाते.

तायाचें लव्हबर्गवरील आकर्षण तर दूर झालें. आता लव्हबर्गला सुमार्गावर आण-

ण्याचा प्रयत्न आपण केला तर यश मिळतें का पाहावें म्हणून हेडाने यत्न करून पाहिला.

परंतु आता याचा उपयोग नाही. तायाने माझें सारें धैर्य, संसाराशीं झगडण्याचें सामर्थ्य नाहीसें करून टाकलें आहे. आता काल रात्रीच्या पतनानंतर पुन्हा प्रयत्न करण्याची आपल्याला मुळीच उमेद नाही, असें लव्हबर्ग निराशेने म्हणतो. तायाकडून असें कांही घडलें म्हटलें तरी तें हस्तलिखित नष्ट करणें म्हणजे निर्दयपणा झाला अगदी, असें जेव्हा हेडा म्हणते तेव्हा तिच्या अपेक्षेप्रमाणे खरी हकीकत लव्हबर्गच्या तोंडून बाहेर पडते. पुन्हा एकदा, दुसऱ्याच्या अंतःकरणांतली अगदी खोल दडलेली गोष्ट बाहेर काढण्याचें हेडाचें सामर्थ्य आपल्या प्रत्ययाला येतें. निर्दयपणा म्हणून नव्हे तर, तायाविषयी कीव वाटून आपण हस्तलिखित फाडल्याची गोष्ट खोटीच सांगितली, हें तो हेडाला सांगतो आणि ही गोष्ट तायाला कधीच सांगणार नाही असें हेडाकडून वचन घेतो. हा ग्रंथ म्हणजे तायाच्या दृष्टीने तिचें अपत्य. आपलें मूल त्याच्याच पित्याने स्वतःबरोबर फिरायला म्हणून न्यावें आणि स्वतः दारू आणि व्यसनांच्या तावडींत सापडून त्या मुलाचें काय झालें याचीसुद्धा त्या बापाला स्मृति राहूं नये आणि अशा रीतीने तें मूल हरवून जावें; तशी आपल्या हस्तलिखिताची स्थिति झाली आहे. आणि ही गोष्ट तायाला सांगून तिच्या अंतःकरणाला होणाऱ्या वेदना पाहण्याची आपल्याला ताकद नाही – कारण या ग्रंथांत तायाने आपलें जीवनसर्वस्व ओतलेलें आहे. असेंही तो जेव्हा सांगतो तेव्हा मात्र हेडाचा क्रूर भ्रमनिरास होतो.

लव्हबर्गचा तायाविषयीचा जिव्हाळा दुःसह —

लव्हबर्ग सन्मार्गावर न येतांच स्वतःचा प्रेमिक राहिला असता तरी तें तिला चाललें असतें. परंतु ताया आणि तो हे दोघे निराळे राहिले तरी लव्हबर्गचें अंतःकरण तायाविषयीच्या अपूर्व जिव्हाळ्याने भरलेलेंच राहणार हा विचार हेडाला दुःसह होता. पवित्र आत्मा असा तायाबद्दल त्याने केलेला उल्लेख म्हणजे आपल्याला एक प्रकारची चपराकच होय याची तिला होणारी जाणीव दुःखद होती. म्हणून तायाच्याच नव्हे, तिच्या स्वतःच्याच नव्हे तर या सर्व जगाच्या संसारांतूनच लव्हबर्ग नाहीसा झाला तर फार चांगलें होईल या तीव्र आवेगानेच हेडा त्याला "तुम्ही दोघे एकत्र राहूं शकणार नाही, तर मग पुढे तुम्ही काय करणार?" असा जवळजवळ सूचक प्रश्न विचारते. त्यावर तो म्हणतो, "आयुष्य संपविणें एवढा एकच मार्ग आता शिल्लक आहे; आणि जितक्या लौकर तसें होईल तितकें बरें." त्या वेळीं त्याला त्या विचारापासून परावृत्त करण्याऐवजी हेडा त्याला प्रोत्साहनच देतें. आत्मनाश करायचा तो सुद्धा मोठ्या सुंदर रीतीने करावा असें त्याच्या रसिकतेला आणखी वर आवाहन करते. आणि मग कठोरपणें त्याला "आता जा तुम्ही आणि पुन्हा या घरीं येऊं नका" असें बजावते. पण तेवढ्यावरही तिचें समाधान होत नाही. जातांना त्याला अटकावून आपल्याजवळच्या दोन पिस्तुलांपैकी एक ती त्याला देते. "तुझी आठवण म्हणून तूं मला हें देते

आहेस ?" असें लव्हबर्ग तिला विकल होऊन विचारतो. परंतु हेडाच्या मनाचा निर्धार झालेला असतो. "एकदा हें पिस्तूल मीं तुमच्यावर रोखलें होतें. त्या वेळीं गोळी झाडली नाही मीं. पण आता तुम्ही स्वतःच त्याचा तुमच्यावर प्रयोग करा. आत्महत्या करायची ती शूरासारखी, सुंदर रीतीने करणार असें वचन द्या मला," असें त्याला म्हणते.

तायाचें बालक – लव्हबर्गचें हस्तलिखित जाळून भस्म —

स्तिमित होऊन तें पिस्तुल घेऊन लव्हबर्ग निघून जातो. आपला एक बेत सिद्धीला जाणार असा भरवसा येऊन, हेडा कोणी पाहत नाही ना याचा कानोसा घेते; हस्तलिखित टेबलाच्या खणांतून बाहेर काढते; कांही पानें दुमडून पाह्यल्यासारखें करतें. पण नंतर शेगडीजवळच्या हातांच्या खुर्चीवर हस्तलिखित मांडीवर घेऊन बसते; शेगडीचें झाकण उघडते; हस्तलिखिताचें पुडकें सोडते; आणि त्यांतील एकेक गड्डी शेगडींत टाकते; आणि पुटपुटते, "ताया, तुझें बालक – तुझें आणि लव्हबर्गचें बालक हें मी जाळून भस्म करून टाकतें आहें पाहा!"

प्रेमभंग आणि मत्सर यांनी जळणाऱ्या हेडाचा केवढा हा अंतःकरणाचें पाणी पाणी करून टाकणारा घोर यत्न – लव्हबर्ग आणि त्याचा ग्रंथ यांचा संपूर्ण नाश करून ताया‌च्या आणि आपल्याही जीवनांतून त्याची हकालपट्टी करण्यासाठी, आपला संसाराचा मार्ग|| ३
निष्कंटक करण्यासाठी केवढी ही धडपड! परंतु एवढ्या घोर अंतःकरणाने केलेला हा निर्दय प्रयत्न अखेर यशस्वी होणार नाही याची त्या बिचारीला थोडीतरी कल्पना असती तर!

त्यानंतरचा शेवटचा आणि चवथा अंक त्याच दिवशीं संध्याकाळीं घडतो. सकाळच्या त्या प्रसंगानंतर हेडा घरांत एकटीच आहे आणि अत्यंत अस्वस्थ आहे. लव्हबर्गचें काय झालें हें तिला अजून समजलेलें नाही; त्याचा ग्रंथ जाळल्याचें समजल्यावर टेसमनची प्रतिक्रिया काय होईल याचा अंदाज तिला अजून आलेला नाही. कारण, टेसमन अजून ज्यूलियाना आत्याकडून परत आलेलाच नाही. रीना आत्याचा मृत्यु झाल्यामुळे तो तिकडेच आहे अजून. कार्ड पाठवून ती वार्ता तेवढी त्याने हेडाला कळविली आहे.

हेडाच्या मनोवृत्तींत फरक ?—

अशा या अस्वस्थ मनस्थितींत कांही न सुचून हेडा या खोलींतून त्या खोलींत अशा येरझारा करते आहे. अगदी एकाकी आणि विमनस्क अशा तिला, बर्टा हळूच येऊन दिवा ठेवून जाते याची सुद्धा जाणीव होत नाही. अशा वेळीं सुतकाचा निदर्शक पोशाख केलेली ज्यूलियाना तेथे येते. रीनाच्या मृत्यूची वार्ता स्वतःच हेडाला सांगावी हा तिचा हेतु असतो. हेडाच्या मनोवृत्तींत पडलेला फरक आपल्याला ती ज्यूलियानाशीं हस्तांदोलन करायला भावभराने हात पुढे करते तेव्हा जाणवतो. पुढचें तिचें

संभाषणही भावनाभराचेंच असतें. आपण रीनाच्या प्रेतसंस्काराच्या बाबतींत कांही काम करूं शकतों का, हेंही ती नाजूकपणाने विचारते. परंतु हेडाच्या आताच्या अवस्थेंत –म्हणजे तिला दिवस गेलेले असतांना– तिने या खेदकारक गोष्टींपासून दूर राहावें असेंच ज्यूलियाना तिला सुचविते.

एवढ्यांत टेसमन परत येतो. त्याला सांगितलेल्या गोष्टी करायच्यें तो विसरलाच होता. याचें कारण रीनाचा मृत्यु असें ज्यूलियानाला वाटत होतें; त्याबद्दल ती त्याचें समाधान करूं पाहते. मला इतकें एकाकी वाटणार नाही – कोणी तरी माझ्याजवळ राहीलच. या घरांत असें कांही घडणार आहे की, या म्हाताऱ्या आत्याबाईला भरपूर काम होईल, वगैरे गोष्टी त्याला सांगून त्याच्या मनावरचा ताण ती कमी करूं पाहते. क्षणभर हेडा, आपण स्वतः आणि आत्याबाई, तिघे एकत्र राहूं शकलों तर किती बहार होईल असें त्यालाही वाटतें; म्हणजे प्रोफेसरची जागा न मिळाली तरी व त्याला हें नवें घर सोडावें लागलेंच तर – पण ही कल्पनासुद्धा हेडाला असह्य होते; त्याबद्दलच तिला टेसमनला कांही तरी सांगायचें असतें. आणि खरोखर रीनाआत्याच्या मृत्यूपेक्षा या गोष्टीचीच काळजी टेसमनला अधिक वाटत असते; विशेषतः लव्हबर्ग प्रकरणाची.

कारण तो सकाळीं आपल्या घरीं येऊन गेला आणि आपण हस्तलिखित फाडून टाकल्याचें त्याने खोटेंच तायाला सांगितल्याचें त्याला समजलें होतें. म्हणजे त्याचें डोकें ताळ्यावर नसलें पाहिजे आणि हेडाने त्याला तें हस्तलिखित दिलेलें असलें तर तो कांहीच्या बाहीच करून बसेल या कल्पनेने तो फार अस्वस्थ झालेला होता.

हस्तलिखित आपल्याजवळ आहे हें सांगून हेडाने आपलें मन निष्काळंजी करायला हवें होतें असें इकडे त्याला वाटत असतें, तर उलट या गृहस्थाने ही सारी हकीकत तायाला सांगितली की काय ही नवीच चिंता हेडाला वाटूं लागते. परंतु टेसमनने तायाला कांही सांगितलेलें नाही हें कळल्यावर हेडा शांतपणे आपण तें हस्तलिखित जाळून टाकल्याचें टेसमनला सांगते. त्याचा यावर विश्वास बसत नाही. मोठमोठ्याने तो तिच्यावर ओरडूं लागतो. हा फौजदारी गुन्हा आहे, जज्ज ब्रॅकला विचार, म्हणतो. तुझ्या अंगांत संचार तरी कसला झाला होता; काय, काय म्हणून हें तूं सारें केलेंस ! असें तिच्यावर तो खेकसतो.

अपत्यसंभवाच्या कल्पनेनें टेसमन हर्षभरित —

परंतु हेडा चतुर होती. आपल्या नवऱ्याचा स्वार्थीपणा तिला चांगला माहीत होता. आतांही या कृत्याच्या पापात्मकतेपेक्षा त्याच्या परिणामाची त्याला अधिक भीति वाटत होती हें तिला उघड दिसत होतें. आणि म्हणून, आलेलें हसें दाबीतच तिने त्याला आपला विचार सांगितला की, तुमच्यासाठीच मीं हें सगळें केलें. लव्हबर्गच्या ग्रंथामुळे आपल्याला त्याचा हेवा वाटला हें टेसमनने कबूल केलें होतें. दुसऱ्या कोणामुळे त्याला मागे राह्यची पाळी यावी हें हेडाला मुळीच सहन होण्याजोगं नव्हतें.

आणि आता अशी एक नवी परिस्थिति उत्पन्न झाली होती की, - एवढें म्हणून स्वतः कांही स्पष्ट सांगण्याऐवजी "तें आपलें तुम्ही तुमच्या ज्यूलियाना आत्याबाईलाच विचारा" असें आपलें गर्भारपण ती नुसतें ध्वनित करते. आता कोठे टेसमनच्या डोक्यांत प्रकाश पडतो. आपल्यासाठी, आपल्या बालकासाठी हेडाने हें केलें या कल्पनेने तो बेहोष होतो; हेडाला आनंदतिशयाने मिठी मारून टेसमन मोठमोठ्याने तिचें कौतुक करूं लागतो. त्या वेळीं मात्र हेडाचें खरें मनोगत बाहेर पडतें. कारण निराशेने स्वतःचे दोन्ही हात एकमेकांत घट्ट पकडून धरून ती म्हणते "ह्या, ह्या गोष्टीने जणू कांही माझा जीव नकोसा झाला आहे मला!" आणि कशाने म्हणून टेसमन आश्चर्याने विचारतो त्याला ती पुन्हा उत्तर देते, "हें, हें भलतेंच कांही उभें राहिलें आहे त्यामुळे."

वास्तविक अपत्यसंभवाला उद्देशून तिची ही निराशावृत्ति होती. परंतु टेसमनला तें कळतच नाही. आपल्या परिस्थितींत या विचित्र घटनेने केवढा फरक झालेला आहे, आणि त्या फरकाला उद्देशून हेडा बोलत आहे अशीच तो आपली समजूत करून घेतो. ती आपल्याला उद्देशून जॉर्ज असें एकेरी संबोधूं लागली या आनंदांतच तो गर्क होतो. केव्हा एकदा ज्यूलियाना आत्याला हें सगळें सांगूं अशी त्याला घाई होते. पण हस्तलिखित जाळल्याचें मात्र टेसमनने तिला आणि कोणालाही सांगतां उपयोगी नाही हें हेडा कुशलपणें त्याच्या गळीं उतरवतें. तसें कबूल करून "सर्वच, नव्या विवाहित स्त्रियांना गर्भारपणाचा असाच अनुभव येतो काय आणि त्यांच्यांत असाच भावनेचा बदल होतो काय," असा प्रश्न टेसमन हेडाला करतो. पण त्या प्रश्नाला सरळ उत्तर देण्याऐवजी "तें पण तुमच्या ज्यूलियाना आत्याला विचारा" असें म्हणून ती त्याच्या मनांतील आणखी एक नाजूक धागा छेडते.

लव्हबर्गच्या नाकाशीं सूत? —

एवढ्यांत ताया तेथे येते. लव्हबर्गची कांहीच हकीकत न कळल्यामुळे ती अत्यंत अस्वस्थ असते. त्याचें कांहीतरी ब्रेरेंवाईट झालें असावें या आशंकेने ती गोंधळली असते. त्याच्या निवासस्थानीं ती धृष्टपणाने चौकशी करायला गेली होती; परंतु लोक तेथे स्पष्ट कांहीच सांगेनात. चावत चावत कांहीतरी बोलत. त्यावरून तिला भलभलती शंका वाटूं लागली होती. मीच जाऊन चौकशी करून येतों असें टेसमन म्हणतो. परंतु "तुम्ही या भानगडींत मुळीच पडूं नका" असें म्हणून हेडा त्याला त्या विचारापासून परावृत्त करते. तेवढ्यांत जज्ज ब्रॅक त्या ठिकाणीं येतो. स्वाभाविकच अगदी पहिला विषय रीना आत्याच्या मृत्यूबद्दल निघून किती ही दुःखकारक घटना असें टेसमन म्हणतो. त्यावर "ज्या दृष्टीने आपण कोणत्याही घटनेकडे पाहूं त्यावर हें अवलंबून आहे" असें जरासें चमत्कारिक उत्तर ब्रॅक देतो. कांहीतरी विशेष खेदकारक घटना झाली असली पाहिजे अशी यामुळे सगळ्यांनाच शंका येते. थोडा वेळ

थांबून अखेर हेडाच स्वतःच विचारते "कांही विशेष खेदाची बातमी, ब्रॅक?" तेव्हा तिलाही "तेंही तुम्ही ज्या दृष्टीने पाहाल त्यावर अवलंबून आहे" असें द्व्यर्थी खोचक उत्तर ब्रॅक देतो. त्यावरून जज्ज ब्रॅक कांही वेगळ्याच मनोवृत्तींत आहे हें उघड होतें. परंतु कोणालाच, आपल्याला आणि हेडाला सुद्धा, त्यामागच्या कारणाची कल्पना नसते.

हेडाचे कांही सूचक उद्गार —

ऐकणारांची उत्सुकता आणखी थोडी वाढवून अखेर ब्रॅक सांगतो की, लव्हबर्ग हॉस्पिटलांत असून त्याच्या नाकाशीं सूत धरलें आहे. हें ऐकतांच पुन्हा एकदा स्वतःवरचा ताबा सुटून हेडाच्या तोंडून शब्द निघून जातात "म्हणजे इतक्या ताबडतोब!" लव्हबर्गने स्वतःवर गोळीबिळी घालून घेतली की काय, अशी शंका टेसमनने व्यक्त करतांच पुन्हा तशाच बेभानपणाने हेडा, "मला तशी खात्रीच होती" असें उद्गारते. तिचे हे उद्गार साध्या भोळ्या टेसमनच्या सुद्धा लक्षांत आल्यावाचून राहत नाहीत. तेथे ते ब्रॅकच्या नजरेंतून सुटतील हें अशक्य होतें. आणि म्हणून ब्रॅक तिच्यावर नजर रोखून धरून म्हणतो, "दुर्दैवाने तुमचा तर्क अगदी बरोबर आहे."

कोठें घडला हा प्रकार, या प्रश्नाला मात्र ब्रॅक चावतचावतच उत्तर देतो, "त्याच्या निवासस्थानींच असेल." परंतु तें शक्य नव्हतें. कारण ताया स्वतः संध्याकाळींच तिकडे जाऊन आली होती. तेव्हा मग, दुसरीकडे कोठे असेल असें म्हणून, ब्रॅक तो प्रश्न तसाच उडवून लागतो. मात्र त्याने छातींत गोळी घालून स्वतःचा घात केला ही गोष्ट ब्रॅक निश्चयाने सांगतो. "छातींतच गोळी मारली? कपाळावर नाही?" असें उन्मेखून हेडा विचारून घेते आणि शेवटीं "कांही हरकत नाही, छाती ही सुद्धा कांही तशी बाईट जागा नव्हे" असा उद्गार काढते. ब्रॅकला त्याबद्दल मोठाच विस्मय वाटतो. पण अधिक खुलासा आपल्या विधानाचा हेडा करीत नाही. उलट यांतून लव्हबर्ग वाचण्याचा बिलकूल संभव नाही या विचाराने इतर मंडळी हळहळत असतांना ती अगदी न अडखळतां स्पष्टपणें म्हणते, "शेवटीं तरी एक पुरुषार्थाचें कृत्य घडलें म्हणायचें!" आणि वर लव्हबर्गाचें हें कृत्य फार सुंदर वाटतें आपल्याला असा अभिप्रायही व्यक्त करते. तायाला या तिच्या बोलण्याचा विषाद वाटतो – आश्चर्य वाटतें. परंतु हेडा उलट म्हणते, "संसारामधला आपला हिशेब लव्हबर्गने स्वतःच्या हाताने चुकता करून टाकला आहे. हें करण्याचें – निश्चितपणें बिनचूक अशी ही एकच गोष्ट करण्याचें – धैर्य लव्हबर्गच्या ठिकाणीं होतें" आणि आपल्या विधानाचें समर्थनच करते. "हें करतांना लव्हबर्गचें डोकें ताळ्यावर नसलें पाहिजे" हा टेसमनचा किंवा तायाचा विचार ती धुडकावून लावते.

हेडाला ध्येयवादी टेसमनचें नवेंच दर्शन —

त्याने आपलें हस्तलिखित फाडून टाकलें तेव्हाच त्याचें डोकें ताळ्यावर नसलें

पाहिजे या तायाच्या विधानामुळे मात्र ब्रॅक चमकतो. हस्तलिखितावरून बोलणें निघून ताया म्हणते, "पुन्हा जर तें हस्तलिखित जसेंच्या तसें उभें करतां आलें तर किती बहार होईल." त्याबरोबर उत्साहाने टेसमन म्हणतो, "हें शक्य असतें तर मला महान आनंद झाला असता." आणि या ग्रंथाची – हस्तलिखिताच्या आधीचीं – सारीं टिपणें आपल्या-जवळ आहेत – त्या टिपणांवरूनच लव्हबर्गने तो ग्रंथ सांगितला होता – असें तायाने म्हणतांच "जरूर, जरूर आपण त्या टिपणावरून ग्रंथ तयार करूं; त्यासाठी मी माझें जीवनसर्वस्व अर्पण करायला तयार आहे" असें टेसमन घोषित करतो.

हेडाला तर मोठाच विस्मय वाटतो. एखाद्या ध्येयासाठी आणि जॉर्ज टेसमन जीवनसर्वस्व अर्पण करणार हा अनुभव तिला अगदीच नवा आणि खरा न वाटण्याइतका अनपेक्षित असतो. पण "ईलर्टच्या स्मरणार्थ हें करणें माझें कर्तव्यच आहे, हें तुला समजूं शकेल" असें जेव्हा तो उत्तर देतो त्या वेळी अनिच्छेनेच, "असेलही तसें" एवढेंच ती विमनस्कपणें म्हणते.

तात्काळ टेसमन आणि ताया आंतल्या खोलींत त्या टिपणांतून कांही करतां येण्या-सारखें आहे का हें पाहण्यासाठी जातात. ब्रॅक आणि हेडा दोघेच बाहेर राहतात. हेडाला जणू आपल्या हृदयावरचें मोठें ओझें उतरून अगदी मोकळें झाल्याचा आनंद झालेला असतो. तसें ती ब्रॅकला स्पष्टपणे सांगतेही. पण याचा अर्थ मात्र ती अन-पेक्षितपणे वेगळाच सांगते. या जगांत सध्याच्या काळींही धैर्याने उचित गोष्ट करणें अशक्य नाही – स्वयंस्फूर्त, निर्विवाद आणि निखालस सुंदर अशीं कृत्यें आजही माण-साच्या हातून घडणें शक्य आहे – हा विचार लव्हबर्गच्या आत्महत्येपासून मला उमगला आणि म्हणून मला, स्वतःची माझी मी मालकीण आहे, स्वतंत्र आहे, या जाणिवेने हलकें वाटत आहे, असा हेडाचा खुलासा असतो.

हेडाचा भ्रमनिरास —

पण तिचा हा निव्वळ भ्रम असतो. उलट ती केवढ्या मोठ्या बंधनांत सापडलेली असते याचा बोध तिला केवढ्या आकस्मिकपणें होतो. लव्हबर्ग कोणाची पर्वा न बाळ-गतां आपल्या मनाला रुचेल तसें वागला आणि संसाराच्या जणू ऐन मेजवानीसारख्या संसारंभांतून निर्लोभपणे स्वतःला दूर करण्याची केवढी मोठी आदरणीय इच्छाशक्ति व सामर्थ्य त्याने दाखविलें या विचाराने हेडा जणू वेहोश होती. ती कबूल करीत नसली तरी लव्हबर्गबद्दल हेडाला कांही विशेष आत्मीयता वाटत होती हें ब्रॅकने ओळखलें होतें. तेंच तर नेमकें त्याला नको होतें. आणि म्हणून लव्हबर्गविषयीच्या तिच्या आदरपूर्ण पण भ्रांतिमय कल्पनेचा तो चक्काचूर करतो. लव्हबर्गने आत्मघात मुळीच केला नव्हता; आतां तो जिवंत नव्हता; आणि ज्यांतून त्याचा मृत्यु घडून आला तें त्याच्या निवास-स्थानीं मुळीच घडलें नव्हतें. त्याला गोळी लागली होती गायिका डायानाच्या घरीं. निदान त्या दिवशीं तरी लव्हबर्ग त्या बयेच्या घरीं गेला नसेल हा हेडाचा विश्वाससुद्धा

ब्रॅक खोटा ठरवितो. त्या बाईकडे स्वतःची चोरीला गेलेली वस्तु मागण्यासाठी म्हणून तो गेला होता. भ्रमिष्ठासारखें कोठल्या तरी बालकाबद्दल बोलत होता. तेथेच गोळी लागलेल्या स्थितींत तो सापडला. ही गोळी छातींत लागली नव्हती, तर पोटांत लागली होती.

हें सगळें ऐकून हेडाच्या हृदयाची निराशेच्या धक्क्याने विकल अवस्था होते. आणि "असा कोणता शाप लागला आहे मला की, ज्याला मीं हात लावावा तें कवडीमोल आणि हिणकस व्हावें!" असा अत्यंत तळमळीचा उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडतो.

लव्हबर्गच्या खिशांतलें पिस्तूल हेडाचें —

पण ब्रॅकची हकीकत अजून संपलेली नव्हती. हेडाचा ज्या मुद्याच्या गोष्टीशीं निकटचा संबंध होता ती गोष्ट अजून त्याने सांगितलेलीच नव्हती. ही गोष्ट म्हणजे लव्हबर्गच्या खिशांत सापडलेलें पिस्तूल. ब्रॅकला एव्हांना खऱ्या गोष्टीची कल्पना आलेलीच असते. परंतु त्याबद्दल त्याला शहानिशा करून घ्यायची होती. म्हणून तो म्हणतो, "लव्हबर्गने हें पिस्तूल कोठून तरी चोरलें असलें पाहिजे." त्याबरोबर एकदम, "चोरलें! हें खरें नाहीं. मुळीच चोरलें नाही" असें उसळून हेडा जेव्हा म्हणते, तेव्हा आपली कल्पना यथायोग्य असल्याची खात्री पटूनही, लव्हबर्गने तें पिस्तूल चोरलेंच असलें पाहिजे; त्यावाचून इतर कोणता खुलासा करणें शक्यच नाही – म्हणजे इष्ट नाही – हें ब्रॅक हेडाला पटवून देऊं लागतो.

पण तेवढ्यांत टेसमन टिपणांचे ते कागद दोन्ही हातांत घेऊन बाहेर येतो. त्याला आंतल्या खोलींत नीट दिसत नव्हतें. म्हणून तो हेडाच्या टेबलापाशी बसावें म्हणतो. तेव्हा त्या संत्रस्त मनःस्थितींतही प्रसंगावधान राखून हेडा टेबलावरील नोटेशनच्या कागदाखालची ती पिस्तुलाची पिशवी आंतल्या बाजूस घेऊन जाते व मग ताया आणि टेसमन टेबलाशीं बसून टिपणें तपासूं लागतात. हेडा बाहेर येऊन तायाच्या पाठीमागे उभी राहते; तिच्या केसांतून मोठ्या ममताळूपणाने हात फिरवते आणि विचारते, "काय ताया, ईलर्ट लव्हबर्गच्या स्मारकाचें तुमचें काम कसें काय चाललें आहे?"

तीं दोघें त्या कामांत चांगलीं गर्क आहेत याची खात्री करून घेऊन हेडा पलीकडच्या बाजूला ब्रॅकजवळ शेगडीपाशी जाऊन बसतें आणि ब्रॅक पिस्तुलाबाबत काय बोलत होता याची विचारणा सुरू करते. त्यावर ब्रॅक जणू तिची उलटतपासणीच सुरू करतो. तिच्याच तोंडून तो निश्चित करून घेतो की, लव्हबर्ग सकाळीं या घरीं आला होता. तो आणि हेडा याशिवाय तेथे दुसरें कोणी नव्हतें. लव्हबर्ग तेथे असतांना एक क्षणभर ती बाहेर दिवाणखान्यांत गेली होती. तेवढाच वेळ लव्हबर्ग आंत एकटा होता. पण त्या वेळीं त्याने पिस्तूल चोरणें शक्य नव्हतें. कारण पिस्तुलाची पिशवी

दिवाणखान्यांत टेबलावरच्च होती. आणि लव्हबर्गजवळ सापडलेलें पिस्तूल हें हेडाजवळच्या द़ोन पिस्तुलांपैकी एक असल्याबद्दल तें पाहून ब्रॅकने स्वतःची खात्री घेतलेली होती. हेडाला हें ऐकून आशा उत्पन्न झाली की, ब्रॅकने तें पिस्तूल परत आणलें असेल. पण पिस्तूल होतें पोलिसांच्या हातीं. तें परत कसें मिळणार! शिवाय पिस्तुलाच्या मालकाचा शोध लावण्यासाठी पोलिस आपली शिकस्त करणार!

हेडा भयंकर सापळ्यांत सापडते—

या विचाराने मात्र हेडा आता खरीखुरी अस्वस्थ झाली. "पोलिसांना मालकाचा शोध लागेलसें तुम्हांला वाटतें?" असें भयभीतपणे ती ब्रॅकला विचारते. त्यासरशी तिच्या कानाशीं वाकून मंद आवाजांत ब्रॅक मिस्किलपणाने म्हणतो, "मी तोंड उघडणार नाही, तोंपर्यंत पोलिसांना यश येणार नाही." त्यासरशी भीतीने हेडाचा थरकाप उडतो आणि "तुम्हीं गप्प राह्यचें नाही असें ठरविलेंत तर?" असें घाबरून जाऊन ती विचारते. "मग तें पिस्तूल चोरलें असेंच गृहीत करावें लागेल!" "असें ठरण्यापूर्वी जीव देईन मी" असें हेडा ब्रॅकच्या त्या उत्तरावर आवेशाने म्हणते. परंतु "लोक असें बोलतात, पण तसें कुणी करीत नाही कधी" असें तुच्छतापूर्वक हसून ब्रॅक म्हणतो, तेव्हा त्याच्या या शेऱ्याकडे दुर्लक्ष करून हेडा विचारते कीं, "समजा, पिस्तूल चोरलेलें नाही हें खरें असलें आणि पिस्तुलाच्या मालकाचा शोध लागला—तर मग काय होईल?"

यावर ब्रॅकने दिलेल्या उत्तरांतून हेडाला आपण कोणत्या सापळ्यांत सापडलों आहों याची स्वच्छ कल्पना येते. कारण ब्रॅक तिच्या अंतकरणांतली खोल मळमळच जणू बाहेर काढतो. तो म्हणतो "त्यामुळे वाच्यता होईल—बेअब्रू होईल. आणि तुला सगळ्यांत कशाची भीति वाटत असेल तर लोकापवादाची, वाच्यतेची!"

पाप केलेलें चालेल, वाच्यता नको—

म्हणजे हेडाला पाप करण्याचें भय वाटत नव्हतें, पण त्याबद्दल लोकांत तिला वाच्यता व्हायला नको होती. हें तिच्या स्वभावांतलें मर्म ब्रॅकच्या तोंडून इब्सेनने येथे किती स्पष्टपणें आपल्याला सांगितलें आहे.

या वाच्यतेबद्दल ब्रॅक आणखी स्पष्टीकरण करतो. त्यामध्ये प्रथम हेडाचा संबंध तो मुळीच आणीत नाही. गायिका डायानाच्या येथे लव्हबर्ग गेला होता; तेथे त्यानें भांडण केलें; त्यांत गोळी कशी लागली हें एक गूढ राहील. डायानाबाई चांगली मजबूत आहे. तेव्हा तिनेच गोळी घातली असली पाहिजे असें लोक मानतील; वगैरे रीतीने लव्हबर्गची नाचक्की होईल असें ब्रॅक भासवूं पाहतो. हेतु हा की लव्हबर्गवरील हेडाच्या प्रेमाला धक्का बसावा. पण लव्हबर्ग तर आता मेला होता आणि

स्वसंरक्षणाचा प्रश्न पुढे असतांना लव्हबर्गबद्दल काळजी करीत बसावें असा हलुवार स्वभाव हेडाचा मुळीच नव्हता. म्हणून मला या घाणेरड्या गोष्टीशीं काय करायचें आहे? असें म्हणून ती स्वतःला त्यांतून झटकून टाकूं पाहते.

पण ब्रॅक ती गोष्ट एवढ्यावर थोडीच सोडणार होता? तो पुढे म्हणतो, "पण तें पिस्तूल तूं लव्हबर्गला कां दिलेंस हें तुला सांगावेंच लागेल, आणि मग यांतून लोक काय हवे ते तर्ककुतर्क करतील."

आता मात्र हेडाच्या डोक्यांत स्वच्छ प्रकाश पडतो आणि तिची मान निराशेने खाली होते. त्या वेळीं ब्रॅक तिला म्हणतो,

"पण मी जोपर्यंत तोंड उघडीत नाही तोपर्यंत तुला कशाचेंच भय बाळगण्याचें कारण नाही सुदैवानें!"

हेडा जज ब्रॅकच्या तावडींत—

याचा अर्थ न समजण्याइतकी हेडा खुळी नव्हती. म्हणून ती खडखडीतपणेंच ब्रॅकला म्हणते, "म्हणजे आतां मी तुमच्या पूर्ण तावडींत सापडलें म्हणायची, जज्ज ब्रॅक. आजपासून तुमच्या बोटाच्या तालावर मला नाचायला पाहिजे." त्यावर "मला मिळालेल्या या अनुकूलतेचा मी मुळींच गैरफायदा घेणार नाहीं, हेडा प्रियतमे—" असें मोठ्या प्रेमावेशाने जरी ब्रॅक सांगूं जातो तरी हेडाला आपल्या परिस्थितीची पूर्ण कल्पना आलेली होती. आणि म्हणूनच ती पुन्हा म्हणते, "तरी पण याचा अर्थ यापुढे मला तुमच्या म्हणण्याप्रमाणें वागलें पाहिजे. म्हणजे मी गुलाम—नुसती गुलाम झालें यापुढे!" आणि हें संभाषण संपविण्याच्या इराद्याने त्वेषाने उठून उभी राहून ती उद्गारते, "नाही—नाही, ही कल्पनासुद्धा मला सहन व्हायची नाही—कधीच नाहीं."

प्रौढ आणि मुरब्बी ब्रॅक अशाने दबकणारा गृहस्थ नाही. तो हेडाकडे अर्धवट हेटाळणीच्या दृष्टीने पाहून म्हणतो. "सवयीने सगळें कांही अंगवळणीं पडतें माणसाच्या." परंतु, त्याच्याकडे तितक्याच हेटाळणीच्या दृष्टीने पाहून हेडा उद्गारते, "हं—कुणी सांगावें!" आणि एकदम तें संभाषण संपवून ती, टेसमन आणि ताया तिच्या लिहिण्याच्या टेबलाशीं बसलीं होतीं तेथे मनाचा कांही तरी निश्चय केल्यासारखी होऊन आणि स्मित करीतच जाते.

हेडाचा गंभीर निर्णय—

हेडाच्या त्या स्मितामध्ये केवढा मोठा गंभीर अर्थ भरलेला होता. अति झालें आणि हसूं आलें अशा अवस्थेंत ती सापडली होती. सारें तारुण्य तिने हसण्या-खेळण्यांत आणि नाना प्रकारच्या पुरुषांना नुसतें झुलविण्यांत घालविलें होतें. संसार म्हणजे नुसता खेळ नाही; त्यामध्ये व्यक्तीला केव्हा ना केव्हा तरी जबाबदाऱ्या स्वीकाराव्याच लागतात, या सत्याची ओळख नीटशी तिला कधीच पटली नव्हती. आणि म्हणून पुरुषांच्या

शिकारीचा तारुण्यसुलभ खेळ संपला तर – आणि केव्हां तरी तो संपणें अपरिहार्य होतें – जीवनामध्ये आपलें चित्त गुंतवितां येईल असा कोणताच उद्योग किंवा छंद तिला निर्माण करतां आला नव्हता; अशा उद्योगांत आणि छंदांत रमून जाण्याचा वृत्तीही तिने निर्माण केली नव्हती. जज्ज ब्रॅकने म्हटल्याप्रमाणें संततिसंगोपनाचा उद्योग तिला प्राप्त होण्यासारखा होता; तसा निकटचा संभवही निर्माण झाला होता. पण या प्रकारची जबाबदारी – बांधीलपणा तर तिला मुळीच नको होता!

अशा या चंडोल स्त्रीला शेवटीं एकदा साक्षात्कार झाला की, आपलें तारुण्य कांही चिरकाल टिकणारी वस्तु नाही, आणि नाचांत दंग होऊन कांही सारें आयुष्य आपल्याला काढायला मिळणार नाही. तिच्यावर लुब्ध होणारे तिच्या बरोबरीचे पुष्कळसे तरुण हळूहळू विवाहबद्ध होऊन संसारांत स्थिर होऊन जातांना तिने पाहिले असतील. तिच्याहून अल्पवयीन पिढी स्वाभाविक प्रौढपणाकडे झुकूं लागलेल्या तिच्याकडे आकृष्ट होण्याचा संभव सहजच कमी होता.

ब्रॅकशीं लग्न करण्याचें कारण नव्हतें —

ही जाणीव झाल्यावर हेडाने लग्न करायचें ठरविलें. तिचा पुरुषांशीं तिचा विशेष जिव्हाळ्याचा संबंध आलेला आपण पाहतों. त्यामध्ये ब्रॅक हा त्या मानाने संपन्न व रसिक होता, परंतु त्याचें वय पुष्कळच अधिक होतें. शिवाय एकटा एकच हेडाचा स्वामी आपण व्हावें अशी ब्रॅकची भूमिका नसल्यामुळे, हेडाला दुसऱ्या कोणाशीं लग्न करून सुद्धा त्याचा स्नेह आणि सहवासही लाभण्यासारखा होता. म्हणून त्याच्याशीं लग्न करण्याचा विचार तिने मनांत आणला नाही.

लव्हबर्गच्या पूर्ण आधीन व्हायचें नव्हतें —

दुसरा ईलर्ट लव्हबर्ग. लव्हबर्गवर हेडाचें खरोखरच प्रेम जडलें होतें. परंतु प्रेमाच्या आहारीं जाऊन स्वतःला लव्हबर्गच्या व्यसनी आणि उन्मार्गगामी जीवनांत अडकवून घेण्याची तिची तयारी नव्हती. त्याचप्रमाणे त्याचा आणि कुणाचाही वरचष्मा – दासपणा – पतकरायचीही तिची तयारी नव्हती. लव्हबर्ग पूर्णपणे स्वतःच्या भावनांच्या आधीन. त्यामुळे त्याच्याशीं लग्न झालें असतें तर हेडाला त्याच्याच संपूर्ण आधीन व्हावें लागलें असतें. तसेंच ज्या एका गोष्टीचें तिला मनस्वी भय होतें तिच्या म्हणजे बेअब्रूच्या तडाख्यांत तिला असहायपणें सापडावें लागलें असतें; इतकें लव्हबर्गचें जीवन बेताल आणि वृत्ति असंयमी होती. त्या माणसाने तिला लग्नबंधनांत न पाडतां, तिच्यावर स्वामित्व गाजविण्याची अभिलाषा न बाळगतां, तिच्याशीं स्नेहसहवास – ठेवला असता तर तिला हवें होतें. परंतु हें शक्य नाहीं हें ओळखण्याइतकें चातुर्य आणि स्वहिततत्परता तिच्या ठिकाणीं विपुल असल्याने पिस्तुलाची धमकी दाखवून तिने त्याला स्वतःपासून दूर केलें.

टेसमनशीं लग्न करून स्वातंत्र्य टिकणार होतें —

आणि विवाहासाठी पसंत केलें जॉज टेसमनला. टेसमन बुद्धिमान होता; परंतु लव्हबर्गसारखा प्रतिभासंपन्न नव्हता. तो निव्वळ पुस्तकी पंडित होता. सांसारिक आणि विलासोपभोगांच्या क्षेत्रांत तो अगदी अनभिज्ञ, अरसिक आणि उदास होता हें तिला पूर्णपणें ठाऊक होतें. परंतु त्याचा स्वभाव अत्यंत सरळ आणि निष्कपट होता. त्याच्या वर्तनांत तिळभरही कोणाला नांव ठेवायला कसली जागा नव्हती. प्रतिभेची उणीव प्रयत्नशीलतेने भरून काढण्याइतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें. तिच्या मानाने तो गरीब कुटुंबांतला, हलक्या सामाजिक थरांतला होता. परंतु त्याच्या बुद्धिसामर्थ्याच्या बळावर, आणि आपल्या पूर्व आयुष्यांतील आपल्याविषयीं आकर्षण वाटलेल्या उच्च सामाजिक थरांतील कांही व्यक्तींच्यावर आपली मोहिनी टाकून त्यांचें साहाय्य आपण मिळवूं त्याच्या जोरावर, टेसमनला पुष्कळ मोठा सामाजिक दर्जा मिळण्याचा निश्चित संभव तिला दिसत होता. तिच्या सगळ्या हौशी आणि चैनी पुरविण्याचें त्याने तिला वचन दिलें होतें. आणि मुख्य म्हणजे त्याची पत्नी होण्याने तिचें स्वातंत्र्य नष्ट होणार नव्हतें; ती कोणाची गुलाम होणार नव्हती. उलट त्याच्या भोळसरपणाचा फायदा घेऊन जज्ज ब्रॅकशीं ती ठेवूं पाहत होती तसा स्नेहसंबंध कोणाशीं ठेवायला ती मोकळी राहणार होती.

परंतु नियति निराळी होती. आपल्या पूर्वाश्रमीच्या चैनबाजींतील कितीएक पुरुषांचा भुंगा आपल्या पाठचा नाहीसा व्हावा याच हेतूने पांचसहा महिने टेसमनला घेऊन खूप दूरवर ती फिरायला गेली. विचार असा की, सारेजण या दरम्यान तिला आणि तिच्या पूर्वजीवनाला विसरतील; आणि त्या जीवनांतील कितीएक गोष्टींचे कृष्णमेघ स्वतःच्या जीवनांत न येतां तिला उजळ माथ्याने उच्च समाजांत ख्यालीखुशालीने राहतां येईल.

पण हेडाचे सारे अंदाज चुकले —

परंतु तिचे सारेच अंदाज चुकले. ती परत आली ती जाणत्यांना चांगलें ओळखूं यावें इतक्या महिन्यांची गर्भवती होऊन आली. या बंधनाच्या काळजींत ती होती तोच, टेसमन आणि ती परदेशीं प्रवासांत असतां इकडे ईलर्ट लव्हबर्गचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें. आणि त्या पुस्तकाला लोकप्रियता इतकी मिळाली की, विद्यापीठांतील आचार्यपद टेसमनलाच मिळणार ही जी एक त्याची आणि तिचीही खात्री होती ती डळमळींत झाली. आधीच घर विकत घेण्यांत आणि तें सजविण्यांत पुष्कळ खर्च होऊन कर्ज झालें होतें. त्यांतच उपजीविकेचें चांगलें अपेक्षित साधन संशयित झालें. म्हणजे गरीबींत दिवस काढावे लागण्याचा संभव – नव्हे जवळजवळ खात्रीच निर्माण झाली.

मरींत मर लव्हबर्ग व्यसनांतून मुक्त झाल्याचें तिच्या निदर्शनास आलें. म्हणजे

त्याला आचार्यपद मिळण्यांत येणारा हा अडथळाही उरला नाही. टेसमनसारख्याला सुद्धा हेवा वाटावा एवढी प्रतिभा लव्हबर्गने दाखविली. तेव्हां स्पर्धेंत लव्हबर्गच विजयी होणार हें निश्चित झालें.

एवढ्यानेच झालें नाही. तर लव्हबर्गची ही सगळी सुधारणा आणि हें एवढें प्रतिभासाधन झालें तें जिच्याबद्दल आपली स्फूर्तिदात्री म्हणून तो प्रेमभावना बाळगीत होता तिच्या साहाय्याने – म्हणजे हेडाच्या साहाय्याने झालें नव्हतें. तर त्याचें श्रेय एका साध्या भोळ्या स्त्रीकडे, मिसेस एल्व्हस्टेडकडे होतें.

यांतून हेडाचा जसा मत्सर जागृत झाला तसाच कोणाच्याही जीविताला वळण लावण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नाही याचा नवाच आणि प्रक्षोभकारक अनुभव तिला आला.

अडचणींतून सुटण्याचा मार्ग, लव्हबर्गचा सत्यानाश —

या सगळ्यांतून सुटण्याचा एकमेव मार्ग होता. तो म्हणजे लव्हबर्गचा सत्यानाश करण्याचा. मोठ्या क्रूरपणें त्याबद्दलचा घाट तिनें जमवून आणला. त्यांत तिला यशही मिळालें. परंतु पिस्तुलाच्या बाबतींत आपण केवढी चूक करीत आहों हें तिच्या ध्यानीं आलें नाही. त्यामुळे अखेर आपण पूर्णपणें ब्रॅकच्या कचाट्यांत सापडलों याची जाणीव होऊन ती दबकून गेली.

तथापि अशी कोणाच्या कचाट्यांत सापडणारी ती स्त्री नव्हती. पिस्तुलाशीं खेळ करीत बसणें एवढाच आता मला उद्योग उरला आहे असें जें ती टेसमनला म्हणाली होती ती कांही निव्वळ वाफ नव्हती. माणसाने मरणाला भितां कामा नये आणि प्रसंग येतांच भरल्या ताटावरून स्वतःला उठवून जीविताचा त्याग हिंमतबाजपणाने केला पाहिजे हें तिचें लव्हबर्गच्या बाबतींतील बोलणें नुसतें लोका सांगें ब्रह्मज्ञान या कोटींतलें नव्हतें. आणि म्हणून तिला आपोआप हसूं आलें, जेव्हा ब्रॅक म्हणाला की, "सवयीने सगळें कांही अंगवळणीं पडतें माणसाच्या."

अशा रीतीने नको असलेल्या गोष्टी अंगवळणीं पाडून घेणारी दुबळी स्त्री मी नाहीं या विश्वासानेच मनाचा कांहीएक निर्धार करून आणि ब्रॅकच्या भलत्याच आशेबद्दल सहजी हंसूं येऊन जणू टेसमनकडे ती मुद्दाम गेली.

परंतु तेथे तिला आणखी एक धक्का बसला; त्यायोगे तिचा निश्चय पक्का झाला. ईलर्ट लव्हबर्गचा जणू पूर्ण विसर पडून आणि पूर्वी जशी ती त्याच्याबरोबर निर्भरपणें कामांत पूर्ण समरस होत असे तशी आणि त्याच निर्भरपणे ताया टेसमनशीं समरस झालेली पाहून नवाच एक प्रत्यय तिला आला. लव्हबर्गप्रमाणेच ताया आपल्या नवऱ्यालाही स्फूर्ति हळूहळू देऊं शकणार; असें कांहीतरी जें आपल्यामध्ये नाही तें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं आहे याची तिला जाणीव झाली. आपल्या नवऱ्यालाही तें एवढ्यांतच जाणवलें आहे आणि म्हणून त्याला आपली जवळजवळ अडचण होत आहे हेंही तिला

आढळून आलें. कारण, "तूं दूर तिकडे ब्रॅकबरोबर गप्पा मारीत बैस जा म्हणून टेसमन तिला निर्मळपणें सांगतो. "म्हणजे माझा तुम्हां दोघांना कांहीच का उपयोग होणार नाही?" असा तिने सरळच मग प्रश्न विचारला. त्या वेळीं "छट्, कांहीसुद्धा नाही" असें अगदी खरें आणि निरागस वृत्तीने टेसमनने तिला उत्तर दिलें.

टेसमनला हेडाची अडगळच —

केवढी विदारक जाणीव होती ही त्या अभिमानी, चतुर, बुद्धिमान आणि भोगासक्त परंतु विकृतधारणाशक्तीच्या स्त्रीला ! पण तिचा संयम अजब होता. ब्रॅक जणू जिभल्या चाटीत टेसमनला सांगत असतो "मोठ्या खुशीने मी हेडाला सोबत करतों." परंतु केवढ्या निर्धाराने आणि तुच्छतेने ती त्याला "नको; मला तितकेंसें बरें वाटत नाही" असें सांगून आंतल्या बाजूला जाते आणि पडदे ओढून घेते. आंतमध्ये आपलें मन स्थिरावण्यासाठी म्हणा किंवा आत्मघात करतांना माणसाने तो आनंदाने करावा या तिच्या विकृत तत्त्वज्ञानामुळे म्हणा ती पिआनोवर एक विचित्र नृत्यानुकूल अशी गत वाजवूं लागते. परंतु टेसमनच्या उद्गारावरून आज रीना आणि लव्हबर्ग यांच्या मृत्यूच्या दिवशीं हें अनुचित आहे हें पटून तें वादन ती थांबविते.

बिचाऱ्या टेसमनला वाटतें की, कागद चिवडण्याचें हें किचकट काम आपण करीत बसलेले पाहून हेडाला कांही ठीक वाटायचें नाही. म्हणून तो तायाला सुचवितो की, या घरांत हें काम नकोच मुळी. ज्यूलियाना आत्याच्या घरीं रीना आत्याची खोली रिकामी होईल, तेथेच आपण हें काम करीत बसत जाऊं.

हेडाला हें ऐकूं येत असतें. पण मग मीं माझा संध्याकाळचा वेळ कसा घालवावा, असें ती आंतूनच विचारते. त्यावर टेसमन "ब्रॅक येत जाईल तुझी सोबत करायला" असें म्हणतो आणि "जरूर, जरूर अगदी बिनचूक मी येत जाईन" असें म्हणून ब्रॅक त्याला लोभातुर वृत्तीने साथ देतो.

माणसें असें करीत नसतात ! —

आपण कोणत्या दुर्बळ, निराधार, निरुपयोगी अवस्थेंत सापडलों आहोंत याची हेडाला आता अगदी स्पष्ट स्पष्ट जाणीव होते आणि "व्यर्थ जिभल्या चाटीत बसूं नका जज्जसाहेब. तुम्हांला मार वाटतें आहे की खुराड्यांत आता आपण एकटाच कोंबडा राहिलों आहों —" असें त्याला ती ठसक्यांत बजावते आणि त्याच क्षणीं पिस्तुलाच्या बाराचा आवाज येतो.

आत जाऊन पाहतात तो हेडाने आपल्या थेट कपाळांत गोळी मारून घेतल्याचें आढळून येतें. जॉर्ज टेसमन स्तिमित होऊन जातो; तर जज्ज ब्रॅक "बाप रे ! माणसें असें करीत नसतात" असा या नाटकाच्या नायिकेबद्दल अगदी चपखल वर्णन ज्यांतून होईल असा उद्गार काढतो.

विलक्षण निर्धाराची स्त्री—

एका दृष्टीने असामान्य अशा या स्त्रीचा हा असा अवघ्या चाळीस तासांच्या आंत इतका करुणास्पद अंत झालेला आपण पाहतों. हेडा कांही कोणी मोठी पंडिता किंवा वीररमणी किंवा महान कार्यकर्ती स्त्री नव्हती. ती खूप सुंदर होती आणि श्रेष्ठ कुळांत जन्माला येऊन आईविरहित जीवन राह्यला मिळाल्यामुळे ती धट्ट आणि मोकळेपणीं वागूं शकत होती. या गोष्टी सामान्याहून निराळ्या खऱ्या, परंतु त्यांचें श्रेय तिला नव्हतें. तो एक परिस्थितिजन्य लाभ होता. तिच्याजवळ होती, आणि जी तिने कमावली होती, ती म्हणजे निर्भयता; जीवनाबद्दलच्या आसक्तीबरोबरच आणि भोगासक्तीबरोबरच त्या जीवनाचा आणि भोगाचा मोह क्षणार्धांत तोडून टाकण्याजोगा तिने कमावलेला निर्धार. आणि तिच्याबद्दल जिव्हाळा वाटतो तो या तिच्या निर्भय आणि एका अर्थी निर्लोभ वृत्तीबद्दल. म्हणूनच वाटतें कीं, आपल्या जीवनाचा नवा आणि सत्प्रवृत्त मार्ग स्वीकारण्याची तिची धडपड यशस्वी व्हायला हवी होती.

परंतु नेमकी हीच गोष्ट शक्य नव्हती. तिची धारणाशक्ति जशी अत्यंत चपल होती तशीच ती विकृत होती. तिला कोणी क्षणभरही फसवूं शकत नव्हतें; आपण कोठे उभी आहोंत हें तिला प्रत्येक क्षणीं निःसीम स्पष्टपणें समजत होतें. आपलें चातुर्य आणि बुद्धिबल वापरून प्रत्येक कठीण प्रसंगांतून स्वतःला सोडवून घेण्यासाठी ती कुशलपणें प्रयत्न करीत होती. परंतु पूर्वायुष्यांतील बाकीच्या गोष्टी शरदऋतूंतील मेघांप्रमाणें जरी विरून गेल्या असल्या तरी त्यांतील तिचें एक पाप - तिने लव्हबर्गची केलेली निर्घृण प्रतारणा - तिच्या मानगुटीचें सुटलें नाही. त्या कृष्णमेघाने तिचा एक-सारखा शेवटच्या क्षणापर्यंत पिच्छा पुरविला. त्यांतून तिच्या जीवनांत दीड दिवसाचें भीषण वादळ निर्माण झालें; आणि त्यांतच तिने आपला अंत करून घेतला.

परंतु तितकीच कातर—

कारण ती एका दृष्टीने निर्भय होती तरी दुसऱ्या दृष्टीने तितकीच कातर - भेकड होती. लव्हबर्गने आणि जज्ज ब्रॅकने तिच्या या स्वभावदोषावर नेमकें बोट ठेवलेलें आहे. आपल्या पूर्वायुष्याला ती भीत होती. त्याचमुळे टेसमनवर पूर्ण विश्वास टाकून, त्याला विश्वासांत घेऊन, त्या पूर्वायुष्याशीं ती सरळ आणि उघडा सामना द्यायला समर्थ नव्हती. त्या जीवनांतून निसटण्यासाटी ती, म्हणूनच पळपुटेपणाचा, निसट-ण्याचा मार्ग शोधीत होती, अवलंबीत होती. तिच्यामध्ये जीवनाचा त्याग करण्याचें धाडस होतें; पण प्राप्त परिस्थितींत सत्याची कास धरून निधडेपणाने त्या जीवनांतील धक्क्याना तोंड देण्याचें सामर्थ्य नव्हतें.

आणि यामुळे तिच्याबद्दल सहानुभूति वाटली तरी तिची अखेर जी झाली ती अपरिहार्य होती. म्हणूनच अनुल्लंघ्य अशा कोंडींत सापडल्याबरोबर निधडेपणाने

स्वतःचा अंत करून घेण्याच्या तिच्या निर्धाराबद्दल कांहीसें कौतुक वाटतें; तसेंच अशा या स्त्रीच्या ठिकाणीं असणाऱ्या नैतिक दुबळेपणामुळे अखेर अल्प वयांत तिला आत्म-घाताशिवाय अन्य मार्गच राहूं नये याबद्दल मन विषण्ण होतें. असें झालें नसतें तर किती बरें झालें असतें असें वाटून आपलें मन करुणाविष्ट होतें.

या आणि इब्सेनच्या दुसऱ्याही नाटकांतील भाषेबद्दल पुढच्या प्रकरणाच्या शेवटीं लिहूं.

प्रकरण बारावें

हालवर्ड सोलनेस
[बांधकामाचा ठेकेदार]

हालवर्ड सोलनेस हा इब्रसेनच्या मास्टर बिल्डर या नाटकाचा नायक. मास्टर बिल्डर हें इबसेनचें सर्वश्रेष्ठ नाटक आहे असें पुष्कळजण मानतात. नाट्यतंत्र आणि मानवी पातळी या दृष्टींनी हेडा गाब्लर हें नाटक पुष्कळांना या नाटकाहून अधिक मोलाचें वाटण्याचा संभव आहे. परंतु एकमेकाच्याच तोडीचीं हीं दोन्ही नाटके इबसेनच्या प्रतिभेचे उत्कृष्ट विलास आहेत याबद्दल सहसा दुमत होणार नाही.

हेडा गाब्लरमध्ये रंगभूमीवर प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांचा काळ छत्तीस ते चाळीस तासांच्या दरम्यान आहे. मास्टर बिल्डरमध्ये हा काळ अठ्ठावीस तासांहून अधिक नाही. त्यामुळे याही नाटकांत प्राक्कथनावर फार मोठा भर नाटककाराला ठेवावा लागला आहे. तरी सुद्धा कथनांतूनच नाटकाचें कथानक पुढे पुढे धाव घेतांना त्याने तितक्याच कुशलतेने दाखविलें आहे.

सप्टेंबर महिन्याच्या एकोणिसाव्या तारखेच्या एका तिसऱ्या प्रहरीं हालवर्ड सोलनेसच्या बांधकाम धंद्याच्या कार्यालयांत आपण डोकावतों. पुढच्या बाजूला हालवर्डची स्वतःची कामाची खोली आहे. त्या खोलींत एका उंच डेस्कवरच्या हिशेबाच्या वहींत उभ्यानेच काया फासली या नांवाची, वीस ते पंचवीस वर्षांच्या वयाची, जराशी किडकिडीत आणि मोठा झक्क पोशाख केलेली तरुण स्त्री कांही नोंदी करीत आहे. पलीकडे आंतल्या बाजूला तिचा मामा क्नूट ब्रोव्हिक आणि त्याचा मुलगा राग्नार हे दोघे नकाशे काढण्याच्या खोलींत बसून काम करीत आहेत. क्नूट हा कशाने तरी अत्यंत संत्रस्त आहे; थकलेला आहे. परंतु घरीं जाऊन झोप किंवा विश्रांति घेण्याची कल्पना सुद्धा त्याला सहन होत नाही. आज आता आपण शेवटचें बोलून टाकणार साहेबापाशी, असें तो मोठ्याच कडवटपणाने म्हणतो आहे. त्याच्या मनांतून आपल्या साहेबाचा उल्लेख कांही तरी अपशब्दासह करायचा होता. पण त्याची छाती होत नाही.

हालवर्ड व काया फासली —

आजच त्याने आपल्या मनांतला विषय काढूं नये असें त्याचा मुलगा आणि भाची त्याला सांगूं पाहतात; इतक्यांत त्याचा साहेब, हालवर्ड सोलनेस येतो. उतार वयाचा परंतु प्रकृतीने अजून चांगला दणकट आणि ताजातवाना असलेला हा गृहस्थ येतावेळेपासूनच काया फासलीशीं जरा लगट करण्याच्या वृत्तीने वागतो. त्याची समजूत

की, आपलेक कचेरीचें काम संपवून गेले असतील. पण ते आहेत असें समजून तो जरा सावधपणें वागूं लागतो. तथापि कायाच्या पाठीशीं जाऊन तो उभा राहतो, मृदु-मधुर बोलतो, प्रेमाविर्भावाने कायाच्या केसांत बोटें फिरवितो. परंतु जास्त कांही होण्यापूर्वीच "आंत ऐकतील ना" या तिच्या सूचनेवरून उमगून तो आंतल्या खोलीच्या दाराशीं जाऊन, आपल्याकडे कोणी आलें होतें का याची चौकशी करतो.

तें लव्हस्ट्रँडकडचें नवें तरुण जोडपें येऊन गेलें होतें. त्यांना आपलें घर शक्य तितक्या लौकर बांधून पाहिजे होतें. पण हालवर्डच्या डोक्यांत त्या घराच्या योजनेबद्दलचें चित्र अजून नीटपणें जमलें नव्हतें. लोकांना घर म्हणजे डोक्यावर कसलें तरी छप्पर आणि स्वतःच्या नांवाची पाटी लावायाला जागा असली की मिळालें सर्वस्व, असें वाटतें; पण असलीं घरें बांधणारा हालवर्ड नाही. तेव्हा त्या जोडप्याला घाई असली तर त्यांनी दुसऱ्याकडून घर बांधून घ्यावें, असें जरा तुसडपणेंच हालवर्ड राग्नारला सांगतो.

पण कमिशन हातचें सोडणार का? असा प्रश्न क्नूट जरा भीतभीतच विचारतो. त्यावर उगीच कांही तरी बांधण्यापेक्षा कमिशन गेलें तरी पतकरलें; त्यांनी खुशाल दुसरीकडे जावें; शिवाय त्यांची माझी अजून तशी नीट ओळखसुद्धा झाली नाही; असें जेव्हा हालवर्ड म्हणतो त्या वेळीं, तीं माणसें चांगलीं आहेत, आपल्या स्वतःच्या घरो-ब्याचीं आहेत, असें क्नूट म्हणतो. पण तरीही त्यांना दुसऱ्या कोणाकडे जायला सांगा, असें जेव्हा हालवर्ड म्हणतो तेव्हा मनांत कांही तरी विचार पक्का होऊन क्नूट हालवर्डशीं जरा एकीकडे बोलण्याची इच्छा व्यक्त करतो. कायाला तो आंत जाऊन दार लावून घ्यायला सांगतो. ती गेल्यावर आपल्या मनांतली गोष्ट तो हालवर्डला सांगतो. आपण आता थकलों; पण राग्नारबद्दल काळजी वाटते; त्याचें काय होणार या विचाराने कांही सुचत नाही; असें सांगतो. हालवर्ड त्याच्याशीं अगदी मोठ्या गोडव्याने वागत असतो. राग्नारला काळजी कसली? त्याला माझ्याकडे कांही कमी नाही; जास्त पगार हवा असला तरी देतां येईल; वगैरे सुचवितो. परंतु राग्नारला हें नको असतें. आतां आपला आपण स्वतंत्र धंदा सुरू करावा असें त्याच्या मनांत असतें.

परंतु हालवर्ड जरा जपूनच म्हणतो की, त्याची ताकद आहे का ही? इतक्या दिवसांत तो कांहीच शिकला नाही असें नव्हे. पण घरांचे नकाशे काढण्यापलीकडे कांही नाही. हें ऐकून क्नूटचा चेहरा तिरस्काराने काळवंडतो. आणि चमत्कारिक घोगऱ्या आवाजांत तो म्हणतो,

"माझ्या हाताखाली तुम्ही काम करीत होता त्या वेळीं तुम्हालाही कांहीं याहून जास्त माहिती नव्हती. तरी पण तुम्हीं स्वतंत्र धंदा सुरू केलात; आणि मला – आणि इतरही पुष्कळांना – पार दूर मागे टाकलेंतच की नाही?"

राग्नारच्या लग्नाच्या कल्पनेने हालवर्ड अस्वस्थ —

त्यावर, परिस्थिति मला अनुकूल लाभली असें हालवर्ड म्हणतो. तें खरें असलें

तरी राग्नारच्या ठिकाणीं कांही तरी सामर्थ्य आहे याचा एकदा प्रत्यय मला मरण्यापूर्वी येऊं द्या, अशी तो हालवर्डला विनंति करतो. शिवाय त्या दोघांचें एकदा लग्नही व्हायला हवें. म्हणून त्याला कांही तरी काम मिळवून द्या, असेंही तो अजीजीने म्हणतो. पण हालवर्डचें लक्ष तिकडे नसतेंच. कारण कायाचें लग्न होणार की काय, याच विचाराने त्याला अस्वस्थ केलेलें असतें. म्हणून "ऐकतां आहां ना तुम्ही?" असें जेव्हा क्नूट त्याला म्हणतो, त्या वेळीं चिडूनच हालवर्ड, "पण कुठनं आकाशांतून त्याला काम आणि कमिशन आणून देऊं काय?" असें खेकसूनच विचारतो.

ही संधि बरी आहे असें वाटून "तर मग, त्या नव्या जोडप्याच्या घराचें काम त्याला द्यावें; तीं माणसें ओळखीचीं, घरोब्याचीं आहेत; राग्नारने त्यांच्यासाठी काढलेले नकाशे त्यांना आवडलेही आहेत; त्यांतली कल्पना त्यांना फारच आवडली आहे; त्यांत अगदी नवीन आणि स्वतंत्र कांहीतरी आहे असें त्यांना वाटतें" असें क्नूट म्हणतो. तेव्हा पुन्हा एकदा हालवर्ड उसळतो, "हं, नवीन म्हणजे आम्ही करतों तें आता जुनाट झालें म्हणायचें? म्हणून राग्नारला भेटायला ती मंडळी आली होती?"

परंतु, दोघांनाही भेटायचें होतें त्यांना; आणि विशेषतः घर बांधण्याचें जें बोलणें झालें होतें त्यामधून हालवर्डने अंग काढून घ्यावें आणि घराचें काम राग्नारला पुरें करून द्यावें, असें त्यांच्या मनांतून सुचवायचें होतें; असें जेव्हा क्नूट थोडें जपूनच म्हणतो, तेव्हा हालवर्ड खराखुरान्न उसळतो आणि म्हणतो,

"एकूण त्याचा अर्थ तोच! म्हणजे आतां हालवर्ड सोलनेसने निवृत्त व्हायला हवें! तरुण माणसांना संधि द्यायला हवी! सगळ्यांत तरुण असेल त्याला सगळ्यांत आधी संधि द्यायला हवी – लोकांना जागा मोकळी करून द्यायला हवी! – मोकळी जागा – मोकळी जागा अं!"

हालवर्डच्या अंतःकरणांतलें खरें शल्य —

हें खरें हालवर्ड सोलनेसच्या अंतःकरणांतलें शल्य आहे. उगवती तरुण पिढी आपल्या स्वाभाविक उफाळ्याने हालवर्डला मागे टाकणार; स्वतः हालवर्डच्या हातून आता दिवसेंदिवस वृद्धपणामुळे पहिल्यासारखें प्रतिभायुक्त काम होणार नाही; त्याला माग पडाव लागणार, एक प्रकारें पराभव स्वीकारावा लागणार; ही त्याची व्यथा आहे. हा पराभव स्वीकारून राहण्याची त्याची तयारी नाही; असा पराभव पतकरायला लागूं नये म्हणून सर्व सामर्थ्य एकवटून झगडण्याची त्याची तयारी आहे. हा झगडा म्हणजे इब्सेनचें हें नाटक. अशा रीतीने या नाटकांतील बीजाचा प्रत्यय त्याने नाटक सुरू होतें न होतें तोंच आपल्याला आणून दिला आहे.

बांधकामाच्या जगांत हालवर्डखेरीज आणखी एका कर्तृत्ववान माणसाला जागा सहज होण्यासारखी आहे, हा ब्रोव्हिकचा मुद्दा म्हणूनच हालवर्डला मान्य होत नाही. म्हणून राग्नारसाठी या नव्या कामांतून अंग काढून घ्यायला तो तयार होत नाही. राग्नारच्या

हातून एकही स्वतंत्र काम पार पडलेलें पाहण्याचें भाग्य न अनुभवतांच मी मरूं काय, हा ब्रोव्हिकचा प्रश्न हालवर्डच्या अंतकरणाला भिडतो, बोचतो. दारिद्र्यांतच मीं मरावें काय, हाही त्याचा प्रश्न हालवर्डचें मन गोंधळांत टाकतो. पण स्वतःच्या यशाच्या अभिमानासाठी तो अखेर उत्तरें देण्याची टाळाटाळ करतो आणि "मी आहे हा असा आहे, माझ्या स्वभावाला मी काय करूं?" असें अगदी तुटक उत्तर हालवर्ड ब्रोव्हिकला देतो, त्या वेळीं आपण अन्याय करीत आहोंत याची जाणीव त्याच्या अंतःकरणांत खोल बोचत असते.

राग्नारला बोलावून बापाला घेऊन जायला हालवर्ड सांगतो. ब्रोव्हिक इतका म्लान झालेला असतो की, राग्नारला त्याचा अर्थच समजत नाही. कायानेही बरोबर घरीं यावें असें राग्नार सुचवितो. परंतु एक पत्र लिहायचें आहे या सबबीवर हालवर्ड तिला जाऊं देत नाही.

पत्र तर खरोखर लिहायचेंच नव्हतें. कायाने राग्नारच्या डोक्यांत हें स्वतंत्रपणें काम करण्याचें 'वेड' भरविलें नाही ना याची हालवर्डला शहानिशा करायची असते. म्हणून तिला स्वतःपुढे उभी करून त्याबद्दल खोदून चौकशी तो करूं लागतो. मामा आणि राग्नार आतां थांबायला तयार नाहींत; म्हणून आपल्याला लग्न राग्नारशीं केलेंच पाहिजे; असें जरी असलें तरी आपल्या मनांत राग्नारविषयी आतां प्रेम नाही, आपलें सारें अंतःकरण आता फक्त एका – एकाच व्यक्तीने व्यापलेलें आहे – म्हणजे हालवर्डने, हें कायाच्या तोंडून तो वदवून घेतो. "आणि तरीही तूं सोडून जाणार, येथें हें सगळें एकट्या माझ्यावर टाकून?" या त्याच्या प्रश्नाला जेव्हा काया उत्तर देते की, "राग्नार जरी येथून दुसरीकडे गेला (आणि त्याचें माझें लग्न झालें तरीही?) मला येथे राह्यला काय हरकत आहे?" तेव्हा, "ही गोष्ट शक्य नाही, कारण राग्नारलाच तुझी मदत लागेल" असें हालवर्ड म्हणतो.

काया राग्नारसाठी हवी? —

पण कांही झालें तरी हालवर्डला सोडून आपल्याला एक दिवससुद्धा घालवितां येणार नाही, असें काया अगदी विकल असहायतेने म्हणते, तेव्हा त्या तिच्या वृत्तीचा फायदा घेऊन हालवर्ड तिला सुचवितो की, तिने राग्नारशीं खुशाल लग्न करावें, पण राग्नार हालवर्डच्या कचेरींतच काम करीत राहील अशासाठी राग्नारचें मन वळवावें. या सूचनेने काया हर्षनिर्भर होते. तिचा तो, राग्नारशीं लग्न करूनही आपल्याला हालवर्डच्या प्रेमांत आणि सहवासांत राहण्याची संधि मिळेल हा आनंदभर कायम ठेवण्यासाठी तो कायाशीं प्रेमचाळे करूं लागतो. भोळ्या कायाला हें सारें खरेंच वाटत असतें. आणि हालवर्डच्या पायाशीं जणू लोळण घेऊन ती "तुम्ही कित्ती कित्ती चांगले आहांत" असें म्हणून त्याचे पाय जणू कवटाळूं जाते.

या प्रसंगांतून अधिक कांही घडण्यापूर्वीच हालवर्डची पत्नी ॲलीन तेथे येते.

तिची चाहूल लागतांच हालवर्डने कायाला वर उठविलेलें असतें. त्यामुळे प्रत्यक्ष कांही वेडावाकडा प्रसंग ॲलीनच्या नजरेला येत नाही. परंतु स्त्रीस्वभावसहज अशा तिच्या तीक्ष्ण बुद्धीला आजचा हा प्रसंग कांही न्याराच आहे 'याची जाणीव झाल्यावांचून राहत नाही. त्याबद्दल ती कटाक्षाने हालवर्डला टोचतेही. परंतु अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याची जणू तिला सवयच झाली आहे अशा आविर्भावाने ती त्याला आंत डॉ. हर्डाल आला आहे, त्याच्याशीं थोडा वेळ बोलण्यासाठी म्हणून बोलावून आंत निघून जाते.

कायाच्या लक्षांत येतेंच की, मालकिणीच्या मनांत आपल्याबद्दल कांही तरी पाप खास आलें आहे. पण तिकडे दुर्लक्ष करून वरीं जायला तिला हालवर्ड सांगतो व राग्नारने हालवर्डकडेच राहिलें पाहिजे ही गोष्ट घडवून आणण्याबद्दल, उद्याच्या उद्या घडवून आणण्याबद्दल तिला तो बजावतो. त्यावर, " प्रयत्न करीन ,मी; पण नाहीच जमलें तर लग्नाचा विचारच मी टाकून देईन; कारण तुमच्यावांचून मला राहणें शक्य नाही " असें उत्तर जेव्हा काया देते त्या वेळीं हालवर्डच्या अंतःकरणांतली खरी तळमळ बाहेर येते आणि " राग्नारसाठी तर मी हें सगळें --" असें उसळून अर्धवट तो बोलून जातो. आणि मग " म्हणजे एकूण राग्नारची तुम्हांला खरी गरज आहे, त्याच्यासाठी म्हणून मी हवी " असा आर्त भाव काया सहजच व्यक्त करते; तेव्हा " तसें नाही – खरी तूं मला पाहिजेस; पण राग्नार नाही राहिला तर तूं कशी मिळणार " अशी कांहीतरी तिची समजूत करण्याचा दुबळा प्रयत्न करून तो तिला घालवून देतो. मात्र त्याआधी, राग्नारने काढलेले त्या नव्या जोडप्याच्या घराचे नकाशे स्वतःपुढे आणून ठेवायला सांगतो.

त्याच वेळी ॲलीन, हालवर्डची बायको, तेथे पुन्हा येते. तिच्या मनांत संशय चांगलाच बळावला आहे हें हालवर्डच्या ध्यानांत येतें. म्हणून " झालें का पत्र ? " असें मुद्दामच तो कायाला विचारतो. परंतु बिचारी काया; ती इतकी बिलंदर नाही. ती गोंधळूनच जाते. आणि ॲलीनचा संशय अधिकच दृढ होण्याला मदत मात्र होते. परंतु आपणा प्रेक्षकांना अगदी स्वच्छ कळून चुकलेलें असतें की, हालवर्डला कायाबद्दल वैषयिक आकर्षण मुळीच नसून राग्नारसारखा तरुण कार्यकर्ता आपणाला सोडून जाऊन आपला प्रतिस्पर्धी बनूं नये एवढ्यासाठी साधन म्हणून तिचा हालवर्डला उपयोग करावयाचा आहे. याचमुळे काया गेल्यावर तिच्या बाबतींत ॲलीन आणखीच कटाक्षयुक्त बोलून जेव्हा हालवर्डला कचाट्यांत पकडल्यासारखें दाखविते तेव्हा एक सुंदर पताकास्थान निर्माण होतें.

हालवर्डचा विलक्षण अनुभव : इच्छा करावी तें होतें —

कायाबद्दल ॲलीन हालवर्डला टोचून बोलत होती त्या वेळीं त्यांचा कुटुंबमित्र डाक्टर हर्डाल हा तेथेच होता. तेव्हा ॲलीन निघून गेल्यावर हालवर्डने डॉक्टरशीं

ॲलीनच्या त्या संशयाबद्दल मुद्दाम बोलणें काढलें. त्या वेळीं डॉक्टर हर्डाल साफसाफ प्रश्न करतो की, ॲलीनच्या संशयाला जागा आहे असें नव्हे का? त्यावर हालवर्डने स्वच्छ नकार दिला. आतापर्यंत इतर कांही स्त्रियांबद्दल आपल्याला आकर्षण अधून मधून वाटलेलें असलें तरी काया फासलीच्या बाबतींत असा कांही संबंध नाही असें हालवर्ड निर्धाराने आणि अगदी तोडून सांगतो. राग्नार आणि त्याचा बाप क्नूट या दोघांचीही हालवर्डला गरज होती. परंतु राग्नारने तर लग्न करून स्वतंत्र धंदा मांडण्याचें बेड मनांत घेतलें होतें. हालवर्डच्या बेताशीं हें जुळण्यासारखें नव्हतें. पण राग्नार कांही केल्या आपलें बेड सोडायला तयार नव्हता.

म्हणून यांत कायाचा संबंध येत होता. काया हालवर्डच्या कचेरींत राहिली तर राग्नार तेथेच चिकटून राहणें शक्य होतें असें हालवर्डला विशेष तीव्रतेने वाटलें. म्हणून काया फासली आपल्यापाशी राहावी अशी त्याच्या मनांत प्रबल इच्छा उत्पन्न झाली. अर्थात याबद्दल एक शब्द सुद्धा हालवर्ड कोणाशीं बोलला नव्हता. आणि झालें मात्र असें की, याच्या दुसऱ्याच दिवशीं ब्रोव्हिक आणि राग्नार कचेरींतून गेल्यावर काळोख पडल्यावर काया हालवर्डकडे आली आणि हालवर्डने मनांत योजलेल्या योजनेला आपली संमति असल्याचें सांगूं लागली.

राग्नारवर कायाचें प्रेम; त्याच्याजवळ असायला मिळावें म्हणून ती आपल्याच कचेरींत काम करूं लागली असेल असें हालवर्डला प्रथम वाटलें. पण पुढे अनुभव निराळाच आला. हळू हळू राग्नारपासून ती दुरावूं लागली. तिचें मन हालवर्डकडे अधिकाधिक ओढूं लागलें. "आता तर, मी नुसता जवळ असलों तरी तिच्या हृदयाचा भावनाभराने थरकाप होतो" असें हालवर्ड डॉक्टरला सांगतो आणि आश्चर्याची गोष्ट म्हणून पुढे म्हणतो, "मी तर तिच्याशीं कांहीच बोललों नव्हतों. फक्त तिनें माझ्या कचेरींत येऊन काम करावें अशी तीव्र इच्छा मनांत केली होती. परंतु काया तर म्हणते की, मी तें सारें प्रत्यक्ष तिच्याजवळ बोललों. याचा खुलासा कसा काय करणार तुम्ही डॉक्टर?"

ॲलीनवरील अन्यायाची बोचणी —

अर्थात डॉक्टर याचा कांहीच खुलासा करूं शकत नव्हता. "याचा खुलासा कांही होत नाही म्हणून तर आपण त्याबद्दल कुणाशीं एक चकारशब्द बोललों नाही. परंतु असें हें सोंग करीत राहून त्या बिचाऱ्या गरीब मुलीची फसवणूक करीत राहण्याने आपल्याला फार मनस्ताप सोसावा लागतो; पण त्यावांचून दुसरा उपायच नाही – नाही तर राग्नार जाईल –" असें मोठ्या आवेगाने हालवर्ड डॉक्टर हर्डालला सांगतो. मग त्याने हें स्वच्छपणें आपल्या पत्नीला का सांगून टाकूं नये? त्यावर त्याचें जें उत्तर आहे तें या क्षणीं तरी सगळ्यांनाच गोंधळांत टाकण्यासारखें आहे. आपल्या हातून ॲलीनवर कांही एक अन्याय घडलेला आहे; त्या अन्यायाची भरपाई म्हणून ॲलीनला आपल्यावर

अन्याय करायला संधि मिळावी, म्हणून आपण याबद्दल कांही बोलत नाही, असें जें हालवर्ड सांगतो, तें अर्थातच डॉ. हर्डालला पटत नाही. तसें तो म्हणतोही. त्या वेळीं कांहीसा अस्वस्थ होऊन हालवर्ड कचेरींत येरझारा करतो आणि मग किंचित हसून डॉक्टरला विचारतो, "कसें पकडलें बेट्याला, असें वाटतें आहे नव्हे तुम्हांला डॉक्टर?" डॉक्टर याने अधिकच बुचकळ्यांत पडतो. तेव्हा अखेर कांहीशा आडवळणाने हालवर्ड त्याला सांगतो, "ॲलीनला वाटतें की, माझें डोकें ठिकाणावर नाही.—आणि तुम्हांलाही तसेंच वाटतें. म्हणून तुम्ही दोघे माझ्या जणू पाळतीवर असतां."

हें ऐकून डॉ. हर्डाल आश्चर्यमूढ होतो. आपल्या किंवा ॲलीनच्या मनांत अशी कल्पना केव्हाच आली नव्हती असें तो हालवर्डला निक्षून सांगतो. त्यावर विषयाला जरा निराळें वळण देऊन हालवर्ड डॉक्टरला विचारतो, "पण मग, तुम्ही मला मोठा सुखी आणि भाग्यवान समजत असाल नाही?"

नवी पिढी आपला अवतार संपविणार!—

यावर हर्डाल जें सांगतो त्यावरून प्रथम आपल्याला समजतें की, हालवर्डच्या सासऱ्याचें एक एक जुनें मोठें घर जळालें होतें. त्यामुळे व त्यानंतर घडलेल्या कांही घटनांमुळे ॲलीनला पुष्कळच मनस्ताप होण्याला कारण घडलेलें असलें, तरी त्या आगीपासूनच हालवर्डचें भाग्य उदयाला आलें. खेडेगांवांतला एक साधा कामगाराचा पोर असा तो आता त्या भागांत बांधकाम करणारांत अग्रगण्य झाला होता. प्रतिक्षणीं दैव त्याला अनुकूलच होत राहिलें. "परंतु दैवाच्या या अनुकूलतेमुळेच मला अतिशय भ्याल्यासारखें वाटतें," असें जेव्हा त्यावर हालवर्ड म्हणतो त्या वेळीं पुन्हा हर्डाल चकित होतो. कारण म्हणून हालवर्ड सांगतो, "दैव अनुकूल आहे तोपर्यंत ठीक. पण तें केव्हा फिरेल याचा कुणी काय नेम सांगावा?" आणि असें हें दैव फिरेल असें वाटायला कारण नवी तरुण पिढी. हालवर्ड अजून कांही तसा म्हातारा झाला नव्हता. त्याची कार्यशक्ति शाबूत होती. तरी त्याला एकसारखें वाटूं लागलें होतें की, दैव पाठ फिरविणार. नव्या पिढींत कोणीतरी एक दिवस म्हणणार, "आता तुम्ही दूर व्हा आणि मला संधि द्या. आणि मग बाकीचे सगळे त्याच्या मागोमाग येऊन ओरडत उठणार, "दूर व्हा—आम्हांला मोकळी जागा द्या—मोकळी जागा द्या. ही भीति नको आहे मला डॉक्टर, की नवी पिढी येऊन माझें दार ठोठावणार आणि मला बाहेर व्हायला सांगणार— "

डॉक्टर हर्डाल विचारतो, "पण मग यांत भिण्यासारखें काय आहे?" त्यावर हालवर्ड पिळवटून उत्तर करतो "भिण्यासारखें काय आहे? तसें झालें म्हणजे हालवर्ड सोलनेसचा अवतारच संपला!"

आणि नेमकी याच क्षणाला कचेरीच्या बाहेरच्या दारावर थाप पडते. हालवर्ड डोळे तारवटून म्हणतो "काय वाजलें?" आणि हर्डाल उत्तर देतो "कोणी तरी दार ठोठावतें आहे."

हालवर्डचा खरा झगडा कोणाशीं? —

हालवर्डचा झगडा कशाशीं आहे याचा पुन्हा एकदा अधिकच ठसठशीतपणें उल्लेख होतो. दार उघडल्यावर आंत येते एक तेवीस चोवीस वर्षांची तरुण स्त्री; शेलाटी आणि थोडीशी किडकिडीत. पोशाख संपूर्णपणें आधुनिक प्रवासी करतात तसा. हालवर्डला ती अभिवादन करते, पण त्याला कांही तिची ओळख पटत नाही. डॉ. हर्डाल मात्र तिला ओळखतो. पर्वतराजींमध्ये उन्हाळ्याच्या दिवसांत कोठें तरी त्यांची गाठ पडलेली असते. त्या ठिकाणीं ती पुष्कळ पुरुषांशीं शृंगारचेष्टांचा खेळ खेळत असल्याचें हर्डाल सांगतो. त्या वेळीं त्याबद्दल बिलकूल न शरमतां ती, "हो; त्या म्हाताऱ्या बायांप्रमाणे कांही तरी विणकाम हातीं घेऊन बसण्यापेक्षा तें पुष्कळ चांगलें" असें धट्टपणाने म्हणून आपल्या स्वभावाची चुणुक दाखविते.

ती तेथे एकटीच आणि त्याच क्षणीं आली होती. नांव कु. वांगेल असें जेव्हा ती सांगते तेव्हा लिसांगरच्या डॉक्टरची ती मुलगी असावी आणि त्या जिल्ह्याच्या गांवीं जुन्या चर्चवर आपण जेव्हा तें उंच शिखर बांधीत होतों त्या वेळीं या मुलीची व आपली भेट झाली असली पाहिजे याची अंधुक आठवण हालवर्डला येते. त्याला हेंही नीट आठवूं नये याबद्दल हिल्डा – त्या तरुणीचें नांव – थोडें आश्चर्य व्यक्त करते. तेव्हा आता त्या गोष्टीला दहा वर्षें झालीं, आणि ही मुलगी त्या वेळीं फार तर बारा तेरा वर्षांची असणार असा अर्धवट खुलासा हालवर्ड करतो.

पहिल्याप्रथमच शहरांत आलेली ही तरुणी. तेथे तिचें कोणी ओळखीचें नव्हतें. फक्त एका आरोग्यालयांत ॲलीनची आणि तिची गाठ झालेली होती आणि ॲलीनने तिला आपल्या घरीं येण्याचें आमंत्रणही दिलेलें होतें. पण त्या आमंत्रणाची तिला मोठी गरज वाटत होती असें नव्हे. हालवर्डला या सगळ्याचेंच आश्चर्य वाटत असतें. तिचें तो स्वागत करीत नाही; तिला राहण्याबद्दलही सांगत नाही. तिची तीच एक रात्र त्याच्याकडे राहण्याबद्दलची अपेक्षा व्यक्त करते. तरीही पत्नीला बोलावतों मी, ए वढेंच हालवर्ड म्हणूं शकतो.

या तरुणीच्या व्यवस्थेंत आता हालवर्ड व त्याची पत्नी गुंतणार हें पाहून हर्डाल डॉक्टर तेथून जातो. पण जातांना मात्र तो कांहीशा मिस्किलपणाने हालवर्डला म्हणतो, "तुमचें भविष्य अगदी खरें झालें बरें का! तरुण पिढी खरीच ठोठावीत आली तुमचें दार." त्यावर हालवर्डने दिलेलें उत्तर त्याच्या मनाच्या अवस्थेची चांगली कल्पना देतें. तो म्हणतो, "हो, पण मला भीति वाटत होती त्याहून फार वेगळ्या स्वरूपाचें हें दार ठोठावणें आहे." हर्डालला त्याचा रोख समजत नाही. एका सुंदर तरुण स्त्रीच्या आकर्षणानेच तो बोलत आहे अशा समजुतीने तो पुन्हा मिस्किलपणेंच "तें तर निःसंशय" असें म्हणून निघून जातो. ही तरुण पिढीची प्रतिनिधि आपल्याला आपल्या कार्यांतून हुसकून लावण्यासाठी आलेली नाही हा हालवर्डचा भाव

त्याच्या लक्षांत येणेंच शक्य नसतें. कारण हालवर्ड आणि हर्डाल यांच्या जीवनदृष्टींमध्येच केवढा तरी फरक आहे.

ॲलीनला बोलावून घेऊन हालवर्ड तिला कु. वांगेलची राहण्याची व्यवस्था करायला सांगतो. तिच्याजवळ नीट कपडेही नव्हते. एकदोन दिवस तिची सोय पाहिली पाहिजे असें तो म्हणतो त्या वेळीं ॲलीन अगदी थंडपणाने म्हणते, "अवश्य; मला करतां येईल तें सारें करीन मी. माझें कर्तव्यच आहे तें.

"तुमची स्मरणशक्ति चांगली नाही कां हो?—"

या तिच्या कर्तव्य शब्दामागचें रहस्य कांही वेळानंतर आपल्या चांगलें लक्षांत यावयाचें आहे. त्यापूर्वी चालू प्रसंगापुरतेंच आपण पाहूं. हालवर्डच्या घरच्या लहान मुलांसाठी खास तयार ठेवलेल्या एका शय्यागृहांत हिल्डाची व्यवस्था करावी असें ठरून ॲलीन ती व्यवस्था करण्यासाठी आंत जाते, तेव्हा हालवर्डकडून कु. वांगेलला कळतें की, अशीं तीन शय्यागृहें जरी हालवर्डच्या घरांत होतीं तरी त्याला मूल एकही नव्हतें. "तूंच आज आमची मुलगी होऊन त्यामध्ये नीज" असें थोड्या आपुलकीनें हालवर्ड तिला म्हणतो. "हो—निजेन आणि जागेपणींच स्वप्नें पाहत राहीन" असें ती उत्तर देते. त्यावर, कसलीं स्वप्नें नाचत असतात तुझ्या डोळ्यांसमोर, असें हालवर्ड तिला विचारतो. परंतु पुन्हा केव्हा सांगेन असें म्हणून हिल्डा त्याच्या कचेरीचें निरीक्षण करीत फिरूं लागते. हिशेबाची वही लिहिणारी एक तरुण आणि अविवाहित स्त्री आहे हें समजल्यावर "मग तिचें लौकरच लग्न होणार असेल" असें ती म्हणते. आणि होणार आहे असें समजल्यावर "ठीकच होईल तें" असें जेव्हा ती म्हणते तेव्हा हालवर्डचें असमाधान पुन्हा उसळून बाहेर येते. कारण काया गेल्यावर त्याचें काम कोण करणार? स्वतः हिल्डाला नाही का तें काम करतां येणार? असेंही तो सुचवितो. परंतु हे हिशेब लिहीत बसण्याचें काम तिला मुळीच आवडत नाही. त्याशिवाय दुसरीं आणखी पुष्कळ करण्याजोगीं कामें असतीलच की, असें ती थोडेंसें खिजावूनच म्हणते. त्यावर हालवर्ड म्हणतो, "हो, खरेद्या करीत हिंडायचें, नव्यानव्या फॅशन्स शोधायच्या." पण त्याच्या या उपरोधिक बोलण्याचा कांही उपयोग नव्हता. हिल्डाला नव्या फॅशन्सचें वेड नव्हतें. आणि तिच्याजवळ पैसेही मुळीच शिल्लक नव्हते. पण आता हालवर्डच्या घरीं ती होती तोपर्यंत, त्या क्षणीं तरी कसली काळजी करायचें कारण नव्हतें. या तिच्या बिनघोर वृत्तीमुळे ती आपल्याला फार आवडते, असें जेव्हा हालवर्ड म्हणतो त्या वेळीं, "फक्त एवढ्यासाठीच?" असा हिल्डाचा प्रश्न येऊन हालवर्ड बावरून जातो. पण तसें न दर्शवून तो तिच्याशीं इतर गोष्टी बोलूं लागतो; निरनिराळे प्रश्न विचारीत जातो. तेव्हा अखेर थोड्याश्या निराशायुक्त चिडीने आणि गंभीरपणें हिल्डा त्याला विचारते, "मि. सोलनेस, तुमची स्मरणशक्ति चांगली नाही का हो? आमच्या गांवीं तुम्ही आला

होतां त्या वेळचें तुम्हांला कांहीच आठवत नाही? तुमचें तें शिखर बांधून झालें तेव्हा आमच्या गांवीं केवढा आनंदोत्सव झाला. चर्चच्या प्रांगणांत वाद्यांचा गजर चालूं होता. हजारो लोक तिथे जमा झाले होते. स्वच्छ पांढऱ्या पोशाखांत आम्ही मुली तेथे जमलों होतों आणि आमच्या हातांत झेंडे फडकत होते."

हालवर्डला त्रस्त करणारी स्मृति —

हें सगळें ती केवढ्या तन्मयतेनें सांगत होती. परंतु हालवर्डला अजूनही हें सगळें नीटपणें आठवत नव्हतें; तिला एवढ्या स्मरणीय वाटणाऱ्या या प्रसंगाबद्दलच्या त्याच्या या विस्मरणाचें तिला आश्चर्य वाटत होतें; राग येत होता. ती पुढे सांगूं लागली. "शिखराशीं काम करण्यासाठी बांधलेलीं पायाडें अजून शिल्लक होतीं. त्यावर चढून तुम्ही थेट वर गेलात. तुमच्या हातांत हार होता. वर जाऊन थेट टोकावरच्या क्रूसवर स्वतःच्या हातांनी तो हार तुम्हीं घातलात."

ही स्मृति हालवर्डला कांहीशी त्रस्त करते. आणि त्या वेळीं नेहमीच मी असा हार स्वतः घालण्यासाठी वर चढत असें – असें कांहीसें तोडून तो म्हणतो. परंतु हिल्डा अजून आपल्या स्वप्नमय स्मृतीमध्ये दंग होती. "खाली उभे राहून वर तुम्हांला पाहतांना आमच्या हृदयाचा केवढा थरकाप होत होता. वाटे, हे – हे बांधकामांतील अग्रणी तिथून खाली तर पडणार नाहींत!"

हालवर्डला हा विषय प्रिय नव्हता. म्हणून तिचें लक्ष दुसरीकडे खेचावें यासाठी तो म्हणतो, "हो, हो, आणि पडलोंही असतों कदाचित त्या दिवशीं मीं. कारण खाली एक पांढऱ्या पोशाखांतील सैतानी मुलगी अशी नाचत होती – अशी किंचाळत होती –"

"बांधकाम–अग्रणीचा विजय असो, असें ती ओरडत होती ना?" असें त्याला मध्येच थांबवून हिल्डा विचारते. त्यावर, "हो – आणि झेंडा इतक्या आवेशाने फडकावीत होती की, मला तिच्याकडे पाहून डोळे फिरल्यासारखें झालें."

त्या वेळची ती सैतानी मुलगी —

हिल्डा पुढे म्हणते, "ती सैतानी मुलगी मीच स्वतः होतें. केवढा अभिमान वाटत होता त्या वेळीं मला तुमचा! तुमच्यासारखा बांधकामतज्ञ त्रिभुवनांत कुणी नसेल असें मला वाटलें. केवढें उंच तें शिखर! त्यावर तुम्ही निर्भयतेने अगदी टोकाला उभे राहिलेले; आणि एवढीसुद्धा तुम्हांला भीति वाटत नव्हती; तुमचे डोळे एवढेसुद्धा फिरत नव्हते. पाहणाराचेच डोळे उलट फिरत होते, मस्तक गरगरत होतें, तुमचा तो स्थिरपणा पाहून."

दहा वर्षांनी राणी करण्याचें हालवर्डचें वचन —

"आणि तुम्ही तेथे नुसते स्थिर उभेच नव्हतात तर गात होतात." हें ऐकून

मात्र हालवर्ड चकित होतो. साऱ्या जन्मांत आपण गाण्याची एक ओळसुद्धा गुणगुणल्याचें आपल्याला आठवत नाही असें तो म्हणतो. तरीही, "पण त्या वेळीं तुम्ही गात होतात; तिथे आभाळांत जणू कुणी सारंगी छेडीत आहे असा भास होत होता. पण खरीखरी गोष्ट घडली ती आणखीनच आहे – ती नंतर घडली" – असें हिल्डा भावनाभरानें म्हणते. अजूनही हालवर्डला यापैकी कांहीच आठवत नाही. त्यानंतर गावच्या क्लबमध्ये मोठा मेजवानीचा बेत होता आणि तेथून रात्रीं फराळासाठी त्याला हिल्डाच्या घरीं मुद्दाम बोलावलेलें होतें हेंही त्याला आठवत नाही. इतक्या लहान लहान गोष्टी हिल्डाच्या मनावर एवढ्या ठसून राहिल्या असल्याबद्दल उलट हालवर्ड तिचें कौतुक करूं जातो. लहान लहान गोष्टी या शब्दांनी तिला राग येतो; ती म्हणते,

"तुम्ही आलांत घरीं आमच्या दिवाणखान्यांत, तेव्हा तेथे मी एकटीच होतें, हीही त्यांतलीच एक लहानसहान गोष्ट असेल नाही ? तिथे कांही तुम्ही मला आजच्याप्रमाणे छोटी सैतान म्हटलें नाहीत. उलट तुम्ही म्हणालांत, त्या पांढऱ्या पोशाखांत मी फार संदर दिसत होतें, जणू एखाद्या लहानशा राजकुमारीसारखी – एवढेंच नव्हे तर मोठी झाल्यावर तुला मी माझी राजगृहिणी करीन असेंही वचन तुम्हीं मला दिलेंत." हें ऐकून अविश्वासाने हालवर्ड हसूं लागतो. तरीही हिल्डाचा उत्साह कमी न होतां ती पुढे सांगत राहते. "असें व्हायला किती वेळ लागेल, असें मी विचारलें, तेव्हा दहा वर्षांनी आदिमानवाप्रमाणें येऊन मी तुला पळवून घेऊन जाईन आणि स्पेनमध्ये किंवा आणखी कुठेतरी नेऊन तेथे, तुझ्यासाठी एक राज्य पैदा करून तुला त्याची राणी करीन असें आणखी वचन तुम्हीं मला दिलेंत."

अजूनही हालवर्डला हें सगळें अविश्वसनीयच वाटत होतें. म्हणून तो तिला कांही थट्टेचे प्रश्न विचारूं लागतो. परंतु मग ती गंभीर होऊन म्हणते, "तुमच्या त्या राज्याचें कांहीतरी विचित्रच नांव सांगूं लागलांत तुम्ही, तेव्हा क्षणभर मला वाटलें तुम्ही माझी निव्वळ गंमत करतां आहांत. पण पुढे जें कांहीं तुम्हीं केलेंत तें पाहून माझा तो संशय नाहीसा झाला."

त्या प्रसंगांतील ती गोष्ट तिच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची होती. तरीही ती हालवर्डला आठवत नव्हती – याने हिल्डा अत्यंत नाखूष होते. शेवटीं एकेक शब्द जणू मोजून ती म्हणते, "तुम्ही माझ्याजवळ आलांत आणि माझें चुंबन घेतलेंत; एकदाच नव्हे; चांगली दोन्ही हातांनी तुम्हीं मला जवळ घेतलीत आणि माझें चुंबन घेतलेंत; माझें मस्तक असें पाठीमागे वळवलेंत आणि अनेक वेळा माझें दृढ चुंबन घेतलेंत. आतां हेंही झालें नाही असें म्हणायचें आहे तुम्हांला !"

पण हालवर्डला यांतलें कांही आठवत नव्हतें. तसेंच असें हें वर्तन आपल्या हातून घडलें हें मान्य करणें अशिष्टपणाचें होतें. म्हणून "जरूर, असें कांहीच घडलें नाही असें मी म्हणतों." असें तो अगदी निर्धाराने म्हणतो.

हिल्डा वायदा पुरा करून घेण्यासाठी आली होती—

त्याच्या या नकाराची तिला मनस्वी चीड येते. झालेली गोष्ट इतकी हातोहात त्याने नाकारावी याबद्दल त्याचा तिला तिरस्कार वाटतो आणि ती रागावून बोलेनाशी होते. बोलायला लावण्याचे त्याचे प्रयत्न यशस्वी होत नाहीत. मग त्याच्या डोक्यांत एक कल्पना येते. कायाच्या वेळीं घडलें तसेंच कदाचित या प्रसंगीं घडलें असेल; त्याच्या मनांत या साऱ्या कल्पना – इच्छा – तीव्रपणें आल्या असतील आणि त्या विचारीला त्या प्रत्यक्षांत बोलल्या गेल्या असें वाटत असेल. पण हीही त्याची कल्पना हिल्डाला मानवत नाही. अखेरीस स्वतःचा त्या गोष्टीवर काडीचा विश्वास नसतांही, "खरें तर मग कबूल की, हें सगळें मीं केलें" असें तो अनिर्वाहपणाने म्हणतो. मग अगदी पोरकटपणाने हिल्डा त्याला आपण सांगितलेल्या हकीकतीमधील प्रत्येक तपशील अगदी वेगवेगळा विचारून त्याचा कबुलीजबाब घेते. आणि "पाहा, लावलंच की नाही अखेर मी तुम्हांला कबूल करायला" असें विजयानंदाने म्हणते. अजूनही या सगळ्या गोष्टींचा आपल्याला विसर तरी कसा पडला याबद्दल हालवर्ड आश्चर्य व्यक्त करीतच असतो. परंतु "विसर नाही पडला – लाज वाटते आहे आता तुम्हांला याची" असें त्याला फटकारायला हिल्डा कमी करीत नाही. त्या दिवसाची तारीखही त्याला आठवत नाही. तेव्हा ती तारीख १९ सप्टेंबर होती, – दहा वर्षांपूर्वीची – आज आता तीच तारीख आहे, आणि म्हणून केलेला वायदा पुरा करून घेण्यासाठी मी आलें आहें, हें हिल्डा त्याला पुन्हा बजावते. "त्या वेळीं तूं एक चिमुरडी पोर होतीस – तेव्हा तुझी कांही तरी मीं थट्टा केली असेल" असें म्हणून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न हालवर्ड करतो. परंतु "तशी कांही मी लहान मुलगी नव्हतें. मला सगळें नीट समजत होतें आणि त्यांत थट्टाबिट्टा कांही नसून तुमचें तें दिलेलें वचन खरेंखुरें असून तें मी पुरें करून घेणारच्च आहे; माझें तें राज्य तुम्हीं मला दिलेंच पाहिजे" असाही ती आग्रह धरते,

अर्थात व्यावहारिक जगांत ज्याला आपण राज्य म्हणतों तसलें तें राज्य नसणार हें तिला मान्य होतें. पण हालवर्डला जर इतकीं उंच शिखरें बांधतां येतात तर असें एखादें राज्यही त्याला निर्माण करतां आलेंच पाहिजे आणि त्या राज्याची आपण स्वामिनी होणार अशी तिची श्रद्धा होती. हिल्डा आपली ही सारी गंमत तर करीत नाही ना, अशी शंका मनांत चमकून हालवर्ड तिला म्हणतो, "पण माझें तर लग्न झालेलें आहे हें तुला केव्हापासून तरी माहीत आहे ना?" परंतु त्याच्या या प्रश्नाचा अर्थच तिला समजत नाही. त्याच्या लग्नाचा आपल्या आणि त्याच्या संबंधांत संदर्भ काय हेंच हिल्डा समजूं शकत नाही. त्यामुळे या विचित्र पोरीच्या मनांत तरी काय आहे याचा थांग न लागून आणि तिला तिचें राज्य हवें आहे म्हणजे काय हवें आहें याची कल्पना न येऊन हालवर्ड थोडेसें चिडून तिला विचारतो, "तुला करायचंय तरी काय इथे येऊन?"

हिल्डाला कसलें राज्य हवें होतें ? —

प्रथम तिला त्याने केलेलीं सर्व बांधकामें पाह्यचीं होतीं. पण इतकीं पुष्कळ बांधकामें त्याने गेल्या दहा वर्षांत केलीं होतीं तरी त्यांमध्ये परमेश्वरासाठी कांहीच त्याने बांधलें नव्हतें. नुसतीं माणसांचीं निवासस्थानें बांधलीं होतीं. आणि पाहिल्यासारखें एखादें सुंदर शिखर बांधण्याचा प्रयत्न केला नव्हता, याने ती थोडी नाराज झाली.

उंच उंच शिखर बांधावें – इतकें उंच की त्याच्या टोकाच्या क्रूसावर नजर जातांच डोळे फिरावे, असें बांधकाम करावें ही त्याच्या मनांतली कल्पना तिने बोलून दाखविली, याचें हालवर्डला नवल वाटलें; लोकांना असलीं बांधकामें हल्लीं आवडत नाहीत असें तो खिन्नपणाने म्हणतो; त्या वेळीं लोकांच्या या अभिरुचीची तिला कीव येते. एवढ्यांत, पलीकडे एक बांधकाम चाललें होतें त्याकडे हिल्डाची नजर जाते आणि त्याच्यावर शिखरवजा मनोरा बांधलेला पाहून ती चकित होते. हालवर्ड तें घर स्वतःसाठी बांधीत असून त्याच्यावरच त्याने तो मनोरा योजलेला आहे हें समजून तिला मोठा आनंद वाटतो. आणि उद्या सकाळीं उठल्यावर पहिली गोष्ट म्हणजे आपण तो मनोरा जाऊन पाहणार असा निर्धार ती हर्षभराने व्यक्त करते.

आपल्या बांधकामांतील आपल्याला मनापासून प्रिय असलेल्या भागाबद्दलची तिची ती उत्सुकता पाहून हालवर्ड संतोषतो आणि तिच्याबद्दल त्याला जिव्हाळा वाटूं लागतो. तिचें पाळण्यांतलें नांव विचारून घेऊन तो कु. हिल्डा असें तिला आवाहन करूं लागतो. परंतु तिला तें रुचत नाही. शेवटीं तिच्या हट्टामुळें तो तिला हिल्डाराणी म्हणूं लागतो, आणि तुझ्या या राज्याचें नांव तरी काय, असें तो तिला विचारतो. त्यावर एकदम गंभीर होऊन ती म्हणते, "छट्! लहानपणच्या त्या राज्याची कल्पना मीं केव्हाच सोडून दिली आहे. आतां मला हवें असलेलें राज्य अगदीच निराळ्या प्रकारचें आहे."

न परि हरवलें तें गवसें —

या तिच्या उद्गारांनी हालवर्डच्या हृदयांतील एक अगदी खोल असलेली तारच जणू छेडली जाते. आणि तो म्हणतो,

"कांही म्हण तूं – पण मला आता असें वाटतें आहे की, या सगळ्या दहा बारा वर्षेंभर माझा स्वतःशींच कांही तरी तीव्र वेदनाकारक झगडा चाललेला आहे; माझें कांही तरी हरवलें आहें, कांही एक अनुभव माझ्या हातांतून निसटला आहे आणि तो पुन्हा पकडण्यासाठी माझी धडपड चालली आहे. परंतु कांही केल्या तो मौल्यवान अनुभव कोणता याची मला कांही पुसटसुद्धा कल्पना येत नाही."

'त्रिखंड हिंडुनि धुंडितसें । न परि हरपलें तें गवसें' या केशवसुतांच्या ओळींची या ठिकाणीं किती सहज आठवण होते. प्रतिभावंताच्या जीवनांत सर्वच क्षण कांही प्रचंड प्रतिभेच्या उन्मेषाचे क्षण नसतात. केव्हा तरी असा एखादा क्षण त्याला

न समजतांही येऊन गेलेला असतो. त्या वेळीं त्याच्या हातून कांही तरी दिव्य कृति होऊन जाते. आणि मग पुन्हा तो क्षण यावा – कसा येईल – या चिंतेंत आणि झगड्यांत त्याचा सारा काळ जणू जातो. तें हरपलें श्रेय मिळत नाही. मानवी प्रयत्न तोकडे पडतात. त्या अनुभवाने तो व्यथित होतो. त्यांतच वृद्धावस्था बळावून शरीराचें आणि कांही अंशीं मनाचेंही स्वाभाविक सामर्थ्य उताराला लागतें. सामान्य माणसाला सुद्धा वृद्धावस्थेमुळे पूर्वीच्या तारुण्यांतील सामान्य शक्तिमत्तेच्या गोष्टी स्वतःच्या हातून घडत नाहींशा झालेल्या पाहून केवढा तरी विषाद वाटत असतो. मग जवळ जवळ प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या प्रतिभावंताच्या हृदयाला या निसटल्या श्रेयामुळे आणि सामर्थ्याभावामुळे केवढ्या वेदना होत असतील. प्रतिभेची निर्मितीची टोचणी तर कमी होत नाही; परंतु उज्वल निर्मितीचा क्षण निर्माण करण्याचें सामर्थ्य मानवी प्रयत्नापलीकडचें आहे याची विदारक जाणीव व्हावी आणि तसें जें कांही थोडें फार सामर्थ्य असेल त्याचाही वापर करण्यावर कौटुंबिक आणि सामाजिक जीवनांतील मर्यादा आणि वार्धक्यामुळे येणाऱ्या मर्यादा पडाव्या, यामुळे प्रतिभावंताचा जीव गुदमरून जावा हें किती स्वाभाविक आहे.

हिल्डाच्या आगमनाने नवा प्रयत्न करण्याचा हुरूप —

अशा गुदमरून गेलेल्या एक प्रतिभावंताच्या करुण जीवनाची ही कहाणी आहे. यांत या नाटकांतील करुणामयता सगळी साठविलेली आहे. म्हणूनच आपल्या त्या हरपलेल्या श्रेयाची अंधुकशी कां होईना आठवण करून द्यायला हिल्डा आलेली पाहून हालवर्डला नवा प्रयत्न करण्याचा हुरूप वाटतो आणि आनंद होतो. आतांपर्यंत हालवर्डला आजूबाजूच्या समाजांत कोणी साथीदार नव्हता. भरलेल्या जीवनांत एकाकी राहणें हेंच कोणाही प्रतिभावंताच्या वाट्याला येणारें भाग्य (?) त्याच्याही वाट्याला आलेलें होतें. त्या एकाकीपणांत ही नवीन साथीदार आल्याने त्याला उत्साह येतो. आतापर्यंत आपण असहायपणें जीवनाच्या या पसाऱ्याकडे पाहत उभे होतों; उगवत्या पिंढीची आपल्याला भयंकर भीति वाटत होती. एक दिवस ही नवी पिढी येऊन माझें दार फोडून आंत शिरणार या भयाने मी दडपून गेलों होतों, हें आपलें पोटांतलें तीव्र दुःख हालवर्ड हिल्डाला सांगतो. त्यावर हिल्डा म्हणते, "त्यांत भिण्यासारखें काय आहे? मी तर म्हणेन, उलट तुम्ही स्वतः पुढे होऊन दार उघडावें आणि दोन्ही हातांनीं त्या तरुण पिढीचें स्वागत करावें."

संन्यस्त वृत्तीची कल्पना मात्र मानवत नाही—

नव्या पिढीच्या हातीं आपला संसार, आपलें कार्य सोपवून आपण संन्यस्त वृत्ति स्वीकारावी ही हिल्डाची कल्पना हालवर्डला मुळीच मानवत नाही. तरुण पिढी नवीच निशाणें घेऊन येते आणि आपण उभारलेलें सर्व उध्वस्त करून टाकते हें त्याला सहन

होत नाही. पण हिल्डाने आणलेलें निशाण मात्र त्याला निराळें भासतें. त्याच्या साहाय्याने आपल्याला आपलें हरवलेलें श्रेय पुन्हा प्राप्त करून घेतां येईल अशी उमेद त्याला वाटूं लागते. आणि म्हणून या नव्या पिढीच्या प्रतिनिधीचें तो मनापासून स्वागत करीत असतो. म्हणूनच नंतर घरांत जेवायला आणि विश्रांतीला जातांना जेव्हा हिल्डा त्याला पुन्हा विचारते की, "मग माझा उपयोग होईल तुम्हांला थोडा?" तेव्हा हालवर्ड तिला म्हणतो "तुझीच तर आज मला सर्वांत अधिक आवश्यकता होती!" त्यासरशी "मग माझें राज्य मला मिळणार तर" असें त्याच्याकडे केवढ्या आश्चर्यभरी नजरेने पाहून आपलेच हात घट्ट दाबून हिल्डा उद्गारते. येथे अंक संपतो. या तिच्या उत्साहाचें आणि आदराचें रहस्य समजण्यासाठी पुढचें नाटक पाहायला हवें.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच दुसऱ्या अंकाची सुरुवात आहे. हालवर्ड सोलनेस आपल्या घराच्या बैठकीच्या खोलींत बसून ॲलीनला न दिसतांच, ती आपल्या लहानशा झारींतून फुलझाडांना पाणी घालीत, पाय न वाजवितां इकडे तिकडे करीत आहे, तिच्याकडे अधुनमधून पाहत आहे. परंतु त्याचें मुख्य लक्ष त्याच्यापुढे पसरलेल्या राग्नारच्या नव्या घराच्या नकाशांकडे आहे. अशा वेळीं काया फासली डाव्या हातच्या दाराने हळूच प्रवेश करते. हालवर्ड तिला सोत्सुक विचारतो, राग्नार आला की नाही. राग्नार आला नव्हता; परंतु थोड्याच वेळाने आपल्या नकाशांबद्दलचें हालवर्डचें मत विचारण्यासाठी येणार होता. क्नूट ब्रोव्हिक मात्र आजारी होऊन अंथरुणाला खिळला होता. त्यामुळे तो येणार नव्हता. एवढेंच सांगून काया आंतल्या बाजूला कचेरींत जाते.

संसारांतील केवढा मोठा झगडा—

ॲलीन जरी बोलत नव्हती, तरी हें सर्व ती पाहत होती व ऐकत होती. काया जातांच ती म्हणते, "हा पण माणूस असाच मरणार!" तिच्या म्हणण्यांतील खोच ही की, हालवर्डच्या सहवासांत आलेली प्रत्येक व्यक्ति मरणार. ही खोच हालवर्डच्या लक्षांत आल्यावाचून राहत नाही. म्हणून विषय बदलण्यासाठी तो तिला हिल्डा उठली का असें विचारतो. त्यांतून बालकगृहांचा शेवटीं एकदा कांही तरी उपयोग करायची संधि मिळाली याबद्दल बोलणें निघतें. आता यापुढे आपल्या जीवनांतील पोकळी नाहीशी होईल, असें हालवर्ड म्हणतो. त्यांत, हिल्डा आल्यामुळे जीवन आनंदी होईल हें म्हणण्याचा हालवर्डचा हेतु असतो हें कांही ॲलीनच्या लक्षांतून निसटत नाही. परंतु उघड मात्र तो आपलें नवें घर पुरें होऊन त्यांत आपण राहायला गेल्यानंतर असें होईल असें प्रतिपादन करतो. परंतु त्या घराबद्दल आपल्याला एवढासुद्धा जिव्हाळा नाही, असें ॲलीन जेव्हा स्पष्टच सांगते तेव्हा व्यथित होऊन हालवर्ड म्हणतो, "तुझ्यासाठी तर तें मीं बांधलें खरोखर!" त्यावर ॲलीनने दिलेला टोला विशेष लक्षणीय आहे. ती म्हणते, "खरें म्हणजे माझ्यासाठी तुम्ही उगीच इतके अतिरिक्त

श्रम घेतां. " आपल्यासाठी हालवर्ड कांही करतो यावर तिचा विश्वासच नाही. आणि नवें घर बांधल्यामुळे किंवा आणखी कांही केल्यामुळेही जीवनांत तिला आतां समाधान होणार नाही, हें या वेळीं ती उघड करते. नव्या घरांत तिच्या जुन्या (जळून गेलेल्या) घरामधील कितीएक गोष्टींचें स्मरण होण्यासारखें पुष्कळ असेल, हा विचार तिला मुळीच मानवत नाही. " जगांत लोकासांठी पुष्कळ घरें बांधाल तुम्ही; पण माझ्यासाठी खरें-खुरें घर तुमच्या हातून कधीच बांधून होणार नाही " असें जेव्हा ती अंतःकरण पिळवटून म्हणते तेव्हा हालवर्ड सोलनेसच्या संसारांतील आणखी एक केवढा मोठा झगडा आपल्या निदर्शनाला येतो. ॲलीनच्या आईवडिलांचें घर जळालें. मागोमाग तिचीं मुलें मेलीं. या गोष्टींना उद्देशून तर ती बोलत होतीच. पण त्याहूनही कांही अधिक तिच्या अंतःकरणाला बोचत होतें याची कल्पना हालवर्डला नव्हती; आपल्यालाही अजून ती नाही. पण ती स्पष्ट उल्लेख करते त्या दुर्दैवी घटनांमुळे ॲलीन दुबळी झाली; आपण आपलें दुहेरी कर्तव्य – नवऱ्याबद्दलचें आणि मुलांबद्दलचें – नीट करूं शकत नाही; नवऱ्याकडे आपलें दुर्लक्ष होतें या जाणिवेने ती सदैव व्यथित होऊन राहिली. या विषयाचा विचारच तिने मनांतून काढून टाकावा हें हालवर्डचें म्हणणें तिला बोलायला सोपें परंतु करायला दुर्घट असें झालें. याने अत्यंत त्रस्त होऊन आणि मुठी घट्ट वळून हालवर्ड दिवाणखान्यांत येरझारा करूं लागतो. आणि तळमळून उद्गारतो, " सूर्यप्रकाशाचा एक किरणसुद्धा नाही; आमच्या घरांत प्रकाशाचा एवढासा कवडसा सुद्धा नाही."

हालवर्डच्या दुर्दैवी जीवनामुळे जिव्हाळा —

एका प्रतिभावंताच्या या दुर्दैवी जीवनाच्या दर्शनामुळे आपण एकाएकीं हालवर्डच्या अतिशय जवळ येतो. त्या त्याच्या दुःखामुळे आपल्याला त्याच्याबद्दल जिव्हाळा वाटूं लागतो. नव्या घरांतही येथल्यासारखेंच भकास आणि पोकळ आपल्याला वाटेल असें आणखीच स्पष्टपणे ॲलीन म्हणते तेव्हा हालवर्डच्या अंतःकरणाचें पाणी पाणी होतें. मग एवढें हें नवें घर आपण बांधलें तरी कशाला, असा हालवर्डला प्रश्न पडतो. त्यावर " त्याचें उत्तर तुमचें तुम्हींच द्यायला हवें " असें उत्तर ॲलीन अशा कांही विचित्र स्वरांत देते की, पुन्हा एकदा, आपली बायको, आपलें डोकें ताळ्यावर नाही अशा विचाराने आपल्याशीं वागत असावी ही जाणीव हालवर्डला तीव्रतेने होते. पण हा तिचा आणि डॉक्टर हर्डालचा संशय अजीबात निराधार असल्याचें हालवर्ड जेव्हा निक्षून सांगतो, तेव्हा मग त्याने असें कां वागावें, या ॲलीनच्या प्रश्नाला त्याला तोंड द्यावें लागतें. आपल्या हातून ॲलीनचा कांही एक प्रमाद घडला आहे, त्याचें ओझें सतत आपल्या चित्तावर असतें, त्याच्याखाली सतत दडपून गेल्यासारखें आपल्याला वाटतें, असा जेव्हा त्या प्रश्नावर हालवर्ड खुलासा करूं लागतो तेव्हा मात्र ॲलीन म्हणते, " हें असें तुम्ही बोलूं लागलात, म्हणजे मात्र खरेंच तुमचें डोकें ताळ्यावर नाही असें वाटूं लागतें."

असा होता – आहे – हालवर्डचा चित्त गुदमरवून टाकणारा संसार. याच क्षणाला

हिल्डा दार उघडून आंत येते. तिला पाहतांच आतां थोडा उजेड आंत आला असा उद्गार हालवर्डच्या तोंडून सहजी बाहेर पडतो. हिल्डा आपल्याला पडलेलें एक स्वप्न सांगूं लागतें. खूप उंचावरून, एका कड्यावरून पडल्याचा आपल्याला भास झाला, आणि पडतांना मनाला मोठा उल्हास वाटला असें होतें स्वप्न. यामध्ये पुढच्या दारुण घटनेची पूर्वसूचना आहे याची या वेळीं कोणाला—प्रेक्षकांना सुद्धा कल्पना नसते. परंतु तरीही हिल्डाच्या बोलण्यानें ॲलीनला विशेष उल्हास वाटत नाही आणि म्हणून तिच्या-करिता कांही खरेदी करण्याची सबब करून ॲलीन तेथून जाऊं लागते. कदाचित हालवर्ड आणि हिल्डा यांच्यामध्ये आपली अडगळ नको असाही तिच्या मनांतला भाव असावा. परंतु आपल्यासाठी ॲलीनने एवढे श्रम घ्यावेत याबद्दल आपल्याला किती आदर वाटतो हें जेव्हा हिल्डा सांगूं लागते तेव्हा ॲलीनने दिलेलें उत्तर हिल्डाला खोल जाऊन बोचते. कारण, "त्यांत काय विशेष आहे? माझें कर्तव्यच आहे तें!" असें ॲलीनचें भावनाशून्य उत्तर असतें तें.

हालवर्डला वेड लागलें होतें?—

आपला पोशाख इतका कांही लोकांनी आपल्याकडे टवकारून पाहण्यासारखा नाही, तेव्हा नवीन कांही खरेदी करायला नको, असें जेव्हा हिल्डा पुढे म्हणते तेव्हा "तरीपण इथले लोक टवकारून पाहतीलच" असा विचार ॲलीन व्यक्त करते. आणि कांहीशा कडवटपणाने तिला साथ देऊन हालवर्ड म्हणतो, "लोक म्हणतील तुला वेड लागलें आहे!"

"म्हणजे इतके वेडे लोक पैशापासरी आहेत या गांवांत?" असें जेव्हा त्यावर हिल्डा विचारते तेव्हा, "हा एक वेडा तरी आता तुझ्यापुढे उभा आहे" असें हालवर्ड उत्तर देतो. त्यामुळे हिल्डा मोटेंच आश्चर्य व्यक्त करते आणि 'अखेर एका गोष्टींत मात्र तुम्ही वेडे आहांत असें मलाही वाटतें" असें कबूल करते. हें ऐकून ॲलीनची जिज्ञासा जागृत होते. पण आत्ताच त्याबद्दल मी कांही सांगणार नाही असें निर्धाराने जेव्हा हिल्डा म्हणते त्या वेळीं नाइलाज होऊन, "तुम्ही दोघेंच बोलत बसलांत म्हणजे सांगशील तूं" असें निराशेनें म्हणून ॲलीन निघून जाते. या वेळीं तर आपण या दोघांत अडगळ आहोंत हा ॲलीनचा भाव जास्तच स्पष्ट होतो.

हिल्डाला जाणीव होते की, ॲलीनला आपण मुळीच आवडत नाही. तिचें सर्व कांही केवळ कर्तव्यबुद्धीने करणें हिल्डाला भावनाशून्य, बोचक आणि कटु वाटतें. तिने याहून खरोखर प्रेमळपणाने, अंतःकरणाच्या ओढेनें वागावें हें हिल्डाला अधिक बरें वाटलें असतें. पत्नीपासून ही ऊब आणि प्रेमळपणा हालवर्डला मिळत नव्हता ही त्याच्या जीवनाची एक करुण कहाणी होती.

हालवर्डला प्रतिस्पर्धी सहन होत नाही —

अस्वस्थ चित्तानेच हिल्डा तेथे इकडेतिकडे फेऱ्या घालीत असतांना राग्नारच्या त्या

नकाशांकडे तिचें लक्ष जातें. हालवर्डच्या हाताखाली शिकून तयार होण्याची संधि ज्याला मिळते तो मोठा हुषार माणूस असला पाहिजे असा तिचा सरळ तर्क असतो. पण हालवर्डला हें मुळीच मान्य नाही. आजपर्यंत पुष्कळ लोक माझ्या हाताखालून शिकून गेले; पण कोणालाच कांही विशेष कला साध्य झालेली नाही असें उलट तो म्हणतो. त्या वेळी हिल्डा स्पष्टच म्हणते की, " तर मग तुम्ही अगदीच मट्ठ असलं पाहिजेत." कारण, असल्या निर्बुद्ध लोकांना शिकवीत बसण्यांत त्याने आपले श्रम वृथा का खर्च करावेत ? खरें म्हणजे उत्तम बांधकाम करण्याचा मक्ता एकट्या त्याच्याकडे असावा. "

हाच एक विचार हालवर्डच्या मनांत रात्रंदिवस घोळत असतो. नेमका तोच विचार हिल्डाने बोलून दाखविलेला पाहून त्याला आश्चर्य वाटतें. याचमुळे तर एक-प्रकारें आपलें डोकें फिरायला आलेलें आहे याची त्याला जाणीव असते. मघाशी एका बाबतींत मात्र तुमचें डोकें ताळ्यावर नाही असें हिल्डाने म्हटलें होतें. ती रुख-रुख हालवर्डच्या मनांत होती. प्रतिस्पर्धी सहन न होणाऱ्या आपल्या भावनेला उद्देशून तर ती तसें बोलली नसेल ना अशी शंका येऊन तो तिला खोदून विचारूं पाहतो. पण ती कांही दाद लागूं देत नाही.

तेव्हा विषय बदलण्यासाठी हालवर्ड पलीकडे बांधीत असलेल्या स्वतःच्या नव्या घराची गोष्ट काढतो. त्या घरांतही तीन बालकगृहें बांधलीं होतीं. आणि तरीही त्यांच्या घरांत बालक नव्हतें किंवा होणार नव्हतें. अशा तऱ्हेने मोकळीं बालकगृहें ठेवून संसार सुफल केल्याचें समाधान कसें लाभणार ? तेव्हा या बाबतींत हालवर्डचें डोकें खरेंच फिरलेलें असलें पाहिजे असें हिल्डा ध्वनित करते आणि त्यावरून हालवर्ड आपल्या मनांत कितीएक वर्षें लपवून ठेवलेलें दुःख हिल्डापुढे व्यक्त करूं पाहतो. हिल्डा आल्याने त्याला खूप मोकळें वाटत होतें. आजपर्यंत ज्याच्याशीं मोकळेपणाने बोलावें असें कोणी माणूसच नव्हतें, त्याच्या आसपास. खुद्द ॲलीनशीं सुद्धा बोलणें त्याला शक्य नव्हतें. तें सगळें आज तो या नव्या पाहुणीशीं बोलूं शकत होता.

हालवर्डची परमेश्वरावरील श्रद्धा उडाली—

ॲलीनच्या वडिलांचें तें जुनें घर पार जळून गेलें. कोणी दगावलें नाही. पण ॲलीनला ताप येऊं लागून तिचें दूध बिघडलें. तरी मुलांना पाजण्याचें ती बंद करीना. तिचें तें 'कर्तव्य' होतें ही तिची भावना. त्यामुळे तिच्या जुळ्या आणि कोवळ्या वयाच्या मुलांचा अंत झाला. हालवर्डला याचें दुःख तर झालेंच. पण स्वतः ॲलीनला तो दुःखावेग त्याच्याहून कितीतरी पटीने जाणवला. असें हालवर्ड म्हणतो खरा. परंतु वास्तविक त्याच्या अंतःकरणांतच या घटनेने केवढा कल्लोळ माजला हें जें तो पुढे सांगतो त्यावरून चांगलें व्यक्त होतें.

संसारांत या अशा गोष्टी घडाव्यात यामुळे त्याची जगाच्या चांगुलपणावरची श्रद्धा मावळली; परमेश्वरावरचा विश्वास उडाला. आणि त्यापुढे त्याने प्रार्थनामंदिरें-

चर्चे–बांधण्याचें सोडून दिलें; त्यामध्यें त्याला कांहीच अर्थ वाटत नाहीसा झाला.

संभाषणाला लागलेलें हें गंभीर वळण कांहीसें असह्य होऊन हालवर्ड पुन्हा आपल्या घरगुती गोष्टींकडे वळतो. आगीमुळें मानसिक धक्का बसला हें खरें असलें तरी त्यामुळेच बांधकामक्षेत्रांत यश मिळवायला हालवर्डला मोठी संधि मिळाली. जळून मोकळ्या झालेल्या त्या जागेंत आणि बागेंत नवीन बांधकाम आणि तेंही आपल्या मनाला रुचेल त्याप्रमाणे करण्याची संधि हालवर्डला मिळाली. कारण चर्चेच्या ठराविक नमुन्याचें बंधन आता त्याच्यावर राहिलें नव्हतें. आणि मग हालवर्ड एकदम बांधकाम करणारांच्या अग्रभागीं येऊन तळपूं लागला.

सुखासाठी द्यावी लागलेली फार अवघड किंमत —

अर्थात इतरांप्रमाणेच हिल्डाचाही कयास असा की, तर मग हालवर्ड मोठा सुखी माणूस असला पाहिजे. तो स्वतःच म्हणतो त्याप्रमाणे, मुलें गेलीं खरी, पण त्या आगीमुळेच त्याला माणसांना राहण्यासाठी सुटसुटीत, सुखसोयींनी युक्त, आनंदी घरें बांधण्याची संधि मिळाली; ज्या घरांत आईबाप व त्यांची मुलांची फौज, आनंदांत आणि निर्वेध वृत्तीने राहूं शकतील अशीं घरें; जेथे राहत असतांना त्यांत राहणारांना आपल्यासाठीं किती सोयींचें सुखसर्वस्व भरलेलें आहे याची प्रतिक्षणीं जाणीव करून देणारीं घरें–अशीं घरें बांधण्याची संधि त्याला मिळाली. तथापि हालवर्डला मनांतून सुख नव्हतें. कारण–कारण त्यासाठी त्याला द्यावी लागलेली किंमत फार मोठी होती. हें साध्य करण्यासाठी त्याला स्वतःच्या घराचा–त्याच्या संसारांतील सुखस्वप्नांचा–बळी द्यावा लागला होता. आईबाप, मुलांची सेना, त्यांचा तो मधुर सहवास या सगळ्याला त्याला स्वतःला पारखें व्हावें लागलें होतें. "माझें सुख, सुख म्हणून जें लोक म्हणतात त्याची ही किंमत मला द्यावी लागलेली आहे." असें तो अंतःकरण पिळवटून म्हणतो. विशेष म्हणजे हें त्याचें जें सुखस्वप्न त्याने गमावलें होतें तें परत मिळवणें ही सर्वथा अशक्य गोष्ट होती. तरीही तो बालकगृहें नव्या घरामध्येही बांधीत होताच, याचा हिल्डाला विस्मय वाटतो. त्यावेळीं या दुःखित माणसाच्या तोंडून एक केवढा खडा तात्त्विक बोल काव्यमय शब्दांत बाहेर पडतो. तो म्हणतो,

असाध्य तें साध्य करितां सायास —

"तुला नाही आढळून आलेलें की, जें अशक्य असतें त्याचीच माणसाच्या मनाला सदैव ओढ लागलेली असतें, तेंच त्याला एकसारखें खुणावून स्वतःकडे बोलावीत असतें?"

हा अनुभव सामान्य माणसाचा खास नाही. प्रतिभावंताच्या मनालाच असाध्य तें साध्य करतांना पडणाऱ्या सायासांचें दुःख सोसायचें असतें. म्हणूनच इतकीं सुंदर, आनंदी, सुरक्षित घरें बांधूनही 'न परि हरपलें तें गवसे' अशीच हालवर्डची अवस्था झालेली असते. हें सारें कर्तृत्व फुलविण्यासाठी त्याला स्वतःच्या आणि इतरांच्याही

संसारसुखाचा प्रचंड होम करावा लागलेला होता. आणि ही किंमत त्याला पुन्हा पुन्हा, रोजच्या रोज प्रतिक्षणीं द्यावी लागत होती हें त्यांत फार मोठें दुःख होतें.

त्याहूनही विशेष म्हणजे यतच्या यशामुळे आणि संसार-ध्वंसनामुळे ॲलीनला उद्योग नाहीसा झाला होता. संसारांत कांही एक बांधकाम करण्याची तिचीही इच्छा होती – तिचेंही सामर्थ्य होतें. दगडामातीचीं घरें ती बांधूं शकत नव्हती. परंतु लहान मुलांचीं मनें बांधून वाढविण्याचें सामर्थ्य तिच्याजवळ होतें. तिच्या या सामर्थ्यालाही त्याच्या संसारांत गुदमरून अडगळींत पडून राहावें लागलें होतें.

भिन्न भावनांच्या रस्सीखेचींत —

अर्थात यांत त्याचा काय दोष या प्रश्नाला उत्तर देण्याचें हालवर्ड टाळतो. आग लागण्यांत सगळा दोष स्वतःचा असें तो एकदा म्हणतो; पण दुसऱ्याच क्षणीं आणि "तसें नसेलही" हें विधान इतक्या चमत्कारिक स्वरांत करतो की, हिल्डाला सुद्धा त्याचें डोकें ताळ्यावर नसावें अशी शंका त्या क्षणीं यावी.

त्यासंबंधी हालवर्डकडून अधिक खुलासा करून घेतां येण्यापूर्वीच राग्नार त्या ठिकाणीं येऊन स्वतः काढलेल्या नकाशाबद्दल चौकशी करतो. बाप मरणाच्या दारीं आहे. त्याला अखेरचें समाधान लाभावें यासाठी त्या नकाशांवर पसंतीचा शेरा हालवर्डने लिहून द्यावा अशी तो हालवर्डची विनवणी करतो. परंतु चिडक्या स्वरांत हालवर्ड तें नाकारतो, "बापाला काय वाटेल तें सांग" असें म्हणून त्याला धुडकावून लावतो आणि नकाशे घेऊन जायला सांगतो. पण हिल्डा त्याला ते नकाशे नेऊं देत नाही, आपल्याला पाह्यचे आहेत ते या सबबीवर. आपण करतों हें बरोबर नाही याची जाणीव हालवर्डलाही आहे. म्हणून राग्नारला जातांना तो निराळ्या स्वरांत म्हणतो "जें माझ्या हातून होणें शक्य नाही तें तूं मला करायला कां सांगतोस बाबा!"

अस्वस्थ होऊन राग्नार कसाबसा निघून जातो. त्याच क्षणीं हिल्डा फटकारते, "ही तुम्हीं फार घाणेरडी गोष्ट केलीत."

हिल्डा ही प्रत्यक्ष स्त्री की प्रतिमा —

या ठिकाणीं हिल्डा ही खरोखरीची एक व्यक्ति आहे कीं हालवर्डचीच प्रतिभा आणि सद्बुद्धि या दोहोंची एक प्रतिमा म्हणून नाटकाकाराने कल्पित मूर्ति उभी केली आहे हा दाट संशय मनांत आल्यावांचून राहत नाही. पण त्याबद्दल प्रकरणाच्या अखेरीस चर्चा करूं. तूर्त एका प्रत्यक्ष स्त्रीशींच हालवर्डचें बोलणें चाललें आहे हेंच गृहीत करून पुढे चालूं.

हिल्डाने सुद्धा असें म्हणावें याबद्दल आश्चर्य आणि व्यथा हालवर्ड व्यक्त करतो. आपण राग्नारच्या म्हणण्याप्रमाणे केल्यास आपलें केवढें नुकसान होईल याची तिला कल्पना नाही असें तो म्हणतो. थोड्याच वेळापूर्वी तीच म्हणाली होती की बांधकाम-

श्रेष्ठी म्हणून एकट्या हालवर्डनेच असावें, त्याची तिला तो आठवण देतो. पण हिल्डाचें उत्तर आहे की, कोणी कांही म्हणो, ती स्वतः कांही म्हणाली असो, हालवर्डला हें असें वागणें शोभत नाही.

पण हालवर्डला हें पटत नाही. मिळविलेलें सर्व यश असें उधळून टाकायला तो तयार नाही. त्यासाठी केवढी मोठी किंमत आपण दिली होती हें नुकतेंच त्याने हिल्डाला सांगितलेलें होतें. त्याच विषयाकडे तो पुन्हा वळतो. ॲलीनच्या घराला केव्हा तरी आग लागणार याची त्याला कल्पना आली होती. घराच्या धुराड्यांत एक चीर पडलेली होती. ती हालवर्डने पाहिलेली होती; आग लागण्याच्या पूर्वीच पुष्कळ दिवस. पण ती चीर दुरुस्त न करतां त्याने तशीच ठेवली होती. या चिरेमधून केव्हा तरी घरांत आग पेटेल ही त्याला कल्पना होती; नव्हे तशी त्याची इच्छाच होती. फक्त हिवाळ्यांत एक दिवशीं दुपारीं, आपण मुलामाणसांसह दूर गेलों असतांना, मालक घरीं येईल त्या वेळीं त्याच्यासाठी म्हणून नोकरांनी शेगड्या चांगल्या जळजळीत पेटवून ठेवलेल्या असाव्यात आणि आपण बाहेरून येतो तोच घरांतून आगीचा धूर बाहेर पडत असावा आणि घराची जळून राख व्हावी; असा विचार, अशी इच्छा हालवर्डची होती.

दैवाने खास निवडलेला माणूस ? —

पण तसें घडलें मात्र नाही. सर्व माणसें घरांत असतांना, घरांत कपड्यांच्या खोलींत आग लागली. असें खरोखर असतांना, धुराड्यांतील ती चीर आणि त्यामुळे हालवर्डच्या मनाला होत असलेल्या वेदना याचा अर्थच हिल्डाला समजत नाही. हालवर्ड आणखी पुढे बोलूं पाहतो. त्या वेळीं ती त्याला बजावते सुद्धा की, "बोला तुम्ही; पण थोडें शहाण्यासारखें बोला."

त्या वेळीं, आपल्या मनांत सदैव घर करून राहिलेलें एक गुह्य हालवर्ड हिल्डाला सांगतो. "जगांत दैवाने खास निवडलेलीं अशीं माणसें असतात कांही; एखादी गोष्ट घडावी अशी तीव्र इच्छा करण्याचें अपार सामर्थ्य आणि बळ त्यांच्या ठिकाणीं असतें; त्या गोष्टीचा त्यांना प्रबळ निदिध्यास लागतो; इतका की, त्यांच्या मनाप्रमाणें प्रत्यक्षांत घडून येतें." असें म्हणून तो हिल्डाला विचारतो, "तुला नाही असें वाटत ?" त्याला हिल्डाने दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. "तर मग एक दिवस मीही या अशा निवडक माणसांपैकी एक होणार असें मला वाटतें."

प्रतिभासंपन्नाची विचित्र शक्ति आणि जबाबदारी —

प्रतिभासंपन्नाची ही शक्ति फार विचित्र असते; ती केवळ त्याच्या स्वतःच्या हातून जेवढें घडणें शक्य असेल तेवढ्यावरच मर्यादित राहत नाही, असें त्यावर हालवर्ड तिला मुद्दाम उत्तर देतो. त्याचें म्हणणें की, प्रतिभावंताच्या या शक्तीच्या प्रभावाने त्याच्या

मनांतली इच्छा पूर्ण करण्यासाठी साधनीभूत व्यक्ती किंवा शक्ती त्याच्याभोवतीं जमा होतात. आपोआप नव्हे – तर तसा अविरत ध्यास त्याने घेतल्यामुळे. हीं साधनें किंवा या शक्ति कश्या प्रकारच्या असतात या प्रश्नाकडे तूर्त दुर्लक्ष करून हालवर्ड आपल्या मनांतील प्रत्यक्ष बोच व्यक्त करण्याकडेच अधिक लक्ष देतो. त्याचें म्हणणें की, आपल्या मनांत तसा ध्यास लागला होता म्हणूनच तें घर जळालें. क्नूट ब्रोव्हिकचें तें घर असतें तर तें असें त्याच्या सोईने जळालें नसतें. म्हणून घर जळाल्याची आणि त्यामधून झालेल्या स्वतःच्या दोन मुलांच्या मृत्यूची सर्व जबाबदारी व्यक्तिशः आपली आहे या विचाराने हालवर्डचें मन एकसारखें व्यथित होत आलें होतें. अर्थात त्याने स्वतःच्या हाताने आग लावली नव्हती हें खरें; पण तशा प्रकारचीं साधनें किंवा शक्ती निर्माण व्हाव्या अशी प्रबळ इच्छा – प्रबळ ध्यास त्याने घेतला होता ना? "हीं साधनें व या शक्ती मला अनुकूल झाल्या. यालाच सामान्य लोक माझें सुदैव – भाग्य – म्हणतात. या विचाराने माझ्या अंतःकरणांत केवढी आग पेटून राहिलेली आहे. आणि ती शमविण्यासाठी, ही जखम बोचूं नये म्हणून, साधनीभूत झालेल्या याच शक्ती नित्य दुसऱ्यांच्या अंगची कातडी आणि मांस सोलून मला साहाय्य करीत आहेत."

हालवर्डची सदसद्विवेकबुद्धि आजारी —

या त्याच्या निवेदनानंतर हिल्डा म्हणते की, "तुमचें डोकें ताळ्यावर नाही – तुम्ही आजारी आहांत – असें आता मात्र मला निश्चित वाटतें आहे. तुमचा आजार मेंदूचा नाही. तुमच्या सदसद्विवेकबुद्धीला आजार झालेला आहे. ती दुबळी झाली आहे. जीवनांतील अवजड – भारी वजनाच्या गोष्टी पकडून उचलून धरण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं राहिलेलें नाही. माणसाची सदसद्विवेकबुद्धि कशी खणखणीत धट्टीकट्टी पाहिजे."

"बोलणें सोपें आहे. पण तुझी स्वतःची सदसद्विवेकबुद्धि तरी अशी धट्टीकट्टी आहे की नाही हें प्रसंग येईल तेव्हाच ठरेल" असें हालवर्ड स्वतःच्या समर्थनार्थ म्हणतो. परंतु "माझी सदसद्विवेकबुद्धि धट्टीकट्टी नसती तर वडिलांना सोडून येण्याचें धाडस माझ्या हातून झालेंच नसतें" असें म्हणून हिल्डा त्याला गप्प करते. बापाचें घर आता आपण कायमचें सोडलें. कशासाठी? हालवर्डने दहा वर्षांपूर्वी दिलेल्या वचनाची पूर्तता करून घेण्यासाठी! आपल्या चित्ताला कशाची तरी अनिवार ओढ लागली आहे आणि त्या ओढीने आपण हें करतों, असें जेव्हा ती आणखी म्हणते तेव्हा आपल्याला जें हवें असेल तें, इतर कसल्या विचारांची फिकीर न करतां, हिसकावून घेण्याच्या आदिमानवाच्या प्रवृत्तीसारखीच ही प्रवृत्ति आपल्याप्रमाणेच हिल्डाच्याही ठिकाणीं आहे याची हालवर्डला जाणीव होते. परंतु यांत अडचणीचा प्रकार असा आहे की, ज्या बाह्य विश्वशक्ती अशा प्रतिभाशाली व्यक्तीच्या प्रबळ इच्छेच्या पूर्तीला साह्यकारी होतात त्या नेहमीच मंगल असतात असें नाही. आणि आपण कोणा अमंगल विश्वशक्तींच्या कचाट्यांत केव्हा सापडतो आहों हें माणसाला सांगता येत नाही. तसें असतें तर मग

जीवन कसें सरळ आणि सोपें झालें असतें; असा आपल्या मनाचा निरुत्साह हालवर्ड व्यक्त करतो.

असुधारलेला आदिमानव आणि अलीकडचा सुसंस्कृत मानव —

पण यांतच असुधारलेला आदिमानव आणि अलीकडचा सुसंस्कृत मानव यांच्यामधील खरा फरक आहे असें हिल्डा प्रतिपादन करते. त्या आदिमानवाच्या मनाला या अशा चांगल्यावाइटाच्या भ्रामक कल्पनांनी कधी व्यथित केलें नाही. त्याला जें हवें तें बळाच्या जोरावर हस्तगत करतांना तो कधी आशंकित होत नव्हता. स्त्रियांना पळवून न्यायलासुद्धा ते कमी करीत नव्हते. बायकांना पळवून आणून घरीं परतल्यावर त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला एवढाही कंप होत नव्हता. खुशाल गप्पा मारीत, खातपीत ते चैनीने राहूं शकत होते. विशेष म्हणजे त्या पळवून आणलेल्या स्त्रियांनासुद्धा त्यांत कसली हुरहुर वाटत नव्हती; नव्हे, आपल्याला पळवून आणणारांना सोडून जायलाही त्या तयार नसत.

हालवर्डच्या आधुनिक सुसंस्कृत मनाला हा प्रकार रुचत नाही. परंतु हिल्डाला त्यांत अरुचिकर असें कांही वाटत नाही. अशा आडदांड माणसावर आपलें प्रेम बसलें तर – आणि प्रेम केव्हा आणि कोणावर बसेल माणसाचें ही गोष्ट तर्कातीत आहे – तर आपण त्या बायकांप्रमाणेच वागूं असें ती निःशंकपणे मान्य करते. हालवर्डला तिच्या या प्रवृत्तीचें भय वाटून तो म्हणतो " विश्वशक्तीकडून तुला कोठें भलत्या मार्गांत खेचण्यांत येऊं नये असा माझा अंतःकरणापासून तुला आशीर्वाद आहे. "

पण हिल्डा म्हणते की विश्वशक्तीने तिच्यासाठी करायची निवड केव्हाच करून टाकलेली होती. ती म्हणते, " मला काय हवें आहे तें ठरलें आहे; आणि तें मी पकडणारच. कारण मला अनिवार ओढ लागली आहे ती तुमची. खरेंच मीं तुमच्याकडे यावें अशी तुम्हीं मनाशीं खूप तीव्र इच्छा केली की नाही ? "

नव्या पिढीची भीतीही आणि ओढही —

हालवर्ड निश्चित सांगूं शकत नाही. पण थोड्याशा विचाराअंतीं तो म्हणतो की, मला सुद्धा आता वाटतें की अशी इच्छा मीं केली असली पाहिजे. " कां ? तर मला नव्या पिढीची ओढ लागली होती. हो याच नव्या पिढीची मला भयंकर भीति वाटते. आणि तरीही माझें मन त्याच पिढीकडे ओढते ! "

त्याच्या या व्यथित आत्मनिवेदनाने हिल्डाला चांगलीच संधि मिळते आणि राग्नारचे नकाशे त्याच्यापुढे ठेवून त्यावर पसंतीचा शेरा करण्याचा आग्रह ती त्याला करते. तो पुष्कळ नाही म्हणून पाहतो; असा शेरा सत्याला सोडून होईल असेंही ध्वनित करतो. परंतु राग्नारच्या बापाला मरतेवेळीं जर मानसिक समाधान त्यामुळे मिळणार असेल आणि राग्नारला त्याचें कमिशन मिळणार असेल तर एक वेळ थोडेंसें खोटें

लिहायला काय हरकत आहे, असा युक्तिवाद हिल्डा करते. त्या वेळीं आपणच ब्रोव्हिकला, राग्नारच्या बापाला पार धुळीस मिळविला याची तीव्र जाणीव हालवर्डला होते. आणि आता राग्नारला ही संधि आपण दिली तर आपल्यालाही राग्नार असेंच धुळीला मिळवील हें भय त्याला व्याकुळ करतें. तो म्हणतो, "हीच ती नवी पिढी, जिचें मला भय वाटतें. माझें दार ती ठोठावीत आहे आणि आंत येऊन तिला हालवर्ड सोलनेसचा अंत करावयाचा आहे."

पण हिल्डा याबद्दलच हालवर्डचा धिक्कार करते. स्वतःचा नाश होणार या भयाने त्याने नव्या पिढीचा मार्ग अटकवून धरावा हें हालवर्डसारख्या प्रतिभावंताला मुळीच शोभत नाही असें ती त्याला व्यथित अंतःकरणाने बजावते.

हालवर्डने ध्येय अत्यंत उंच ठेवावें ही हिल्डाची इच्छा—

आता आपला चालता काळ जणू संपला; विश्वशक्तीचे हलकारे आता आपलें ऐकत नाहींत; आपली शक्ति संपुष्टांत आली; केल्या कर्मांचें घोर प्रायश्चित आपल्याला मिळणार; अशी आपल्याला भीति वाटते असें त्यावर अत्यंत व्याकुळपणाने हालवर्ड म्हणूं लागतो तेव्हा हिल्डा त्याला सांगतें,

"हें असलें माझ्यासमोर मी तुम्हांला बोलूं देणार नाही. माझ्या चित्तांत मला प्राणांहून प्रिय अशी जी एकच गोष्ट आहे ती तुम्हांला हिरावून घेऊं देणार नाही. ती म्हणजे तुम्ही श्रेष्ठतम पुरुष झालेले पाहावें ही दुर्दम्य इच्छा. हातांत माळ घेऊन तुम्हीं चर्चच्या मनोऱ्याच्या टोकाला उंच उंच चढून जावें—हीच एकमेव माझी इच्छा!"

म्हणजे त्याने आपलें ध्येय अत्यंत उंच ठेवावें. निरहंकार व्हावें आणि सगळें कर्तृत्व परमेश्वरचरणीं अर्पण करावें. याच भावनेच्या भरांत त्याच्या हातीं पेनसिल देऊन ती नकाशांवर संमतीचा शेरा लिहिण्याचा त्याला पुन्हा आग्रह करते. चारदोन वाक्यें तिच्या या दडपणाखालीच लिहून हालवर्ड तिच्याकडे वळतो आणि मोठ्या आतुरतेने तिला विचारतो,

"खरेंच हिल्डा, तुला माझ्यापासून पाहिजे तरी आहे काय?"

"मला माझें राज्य पाहिजे आहे" असें उत्तर हिल्डा देते. पण याचा अधिक खुलासा तिने करण्यापूर्वीच ॲलीन तेथें येते. त्यासरशी नकाशांवर लिहिलेला शेरा वाचून ते कागद आता राग्नारकडे पाठवावेत अशा विचाराने हालवर्ड आंत कायाकडे जाऊं पाहतो. परंतु हिल्डाच स्वतः मोठ्या उत्साहभराने आरडाओरड करून कायाला बोलावून घेते आणि तिला ते कागद घेऊन लौकर घरीं जायला सांगते. राग्नार इकडे येऊन आपले आभार मानील, असें काया म्हणते त्या वेळीं काहीएक निश्चय करून हालवर्ड म्हणतो, "आभार बिभार कांही नको आहेत मला आणि यापुढे राग्नारने माझ्या येथे नोकरी करण्याचें कारण नाही; आणि तूंही नाही. तुझी त्यालाच अधिक गरज आहे,"

हालवर्डच्या उत्साहाला भरतें —

हीच गोष्ट ॲलीनला हालवर्डच्या हातून घडवितां आली असती. पण हिल्डाप्रमाणें तसें करविण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं नव्हतें. एवढेंच नव्हे तर, आतां हिल्डा नवीन आली आहे, एवढ्यासाठीच हालवर्डने कायाला दूर केली असा वाकडा संशय व्यक्त करण्याइतकी तिची वृत्ति दुबळी आणि अनुदार आहे. पण त्या टेबलाशीं उभी राहून आकडेमोड करीत बसण्यासाठी माझा जन्म नाही, असें त्वेषाने हिल्डा तिला फटकारते. याने हालवर्डच्या उत्साहाला अधिकच भरतें येतें. अंतःकरणावरचा फार मोठा भार उतरल्यासारखें होऊन अगदी हलकें झाल्यासारखें त्याला होतें आणि तो म्हणतो, "आजच संध्याकाळी मनोऱ्याच्या अगदी टोकावर जाऊन आपण तो हार घालूं या; तुझें काय म्हणणें हिल्डा?"

"वा! वा! तुम्ही त्या तिथें वर चढून गेल्याचें दृश्य किती सुंदर दिसेल" असें हर्षभराने हिल्डा म्हणते. आपण तिथे जाऊं शकूं या हिल्डाच्या कल्पनेने स्वतः हालवर्डलाही थोडासा धक्काच बसल्यासारखा होतो. आणि ॲलीन तर तेथे त्याचे डोळे फिरतील म्हणून फारच भयभीत होते. कारण नेहमीच त्याला घेरी येण्याची सवय होती.

पण हिल्डा यावर विश्वास ठेवीत नाही. हालवर्डला केव्हाच घेरी येत नाही; त्याला असें उंच चढतांना आपण स्वतः पाहिलेलें आहे, असें ती म्हणते. त्यावर ॲलीन म्हणते, "हो, लोकही तसें म्हणतांना मीं ऐकलें आहे. पण मला ठाऊक आहे की, ही गोष्ट अगदी अशक्य —"

परंतु तिला पुरें बोलूं देण्यापूर्वीच हालवर्ड आवेशाने म्हणतो "अशक्य – अशक्य – हो, तरी पण त्या उंच ठिकाणीं प्रत्यक्ष जाऊन मी उभा राहिलेलों आहें!"

पण सध्या तर दुसऱ्या मजल्यावरच्या सज्जांत गेल्यावर सुद्धा हालवर्डचे डोळे फिरतात हा ॲलीनचा अनुभव होता. त्यावर "आज तुम्हांला निराळेंच कांही पाह्यला मिळेल" असें जेव्हा हालवर्ड म्हणतो तेव्हा मात्र या गृहस्थाचें डोकें खरेंच फिरलें असलें पाहिजे या विचाराने ॲलीनची धांदल उडते आणि या प्रकाराला प्रतिबंध करण्यासाठी कांहीतरी केलें पाहिजे या गडबडीने ती आंत निघून जाते.

ॲलीन गेल्यावर हिल्डा हालवर्डला रोखठोकच विचारते, "हें खरें आहे की खोटें?" म्हणजे आपल्याला उंच चढतांना घेरी येते की नाही असा तिच्या प्रश्नाचा अर्थ हालवर्ड करतो. परंतु हिल्डाचा रोख निराळा आहे. तो ती अशा शब्दांत व्यक्त करते – म्हणजे माझा बांधकामश्रेष्ठी स्वतः जितकें उंच बांधकाम करतो तितक्या उंचीवर तो चढूं शकत नाही हें खरें आहे काय?

हालवर्डने कातरता सोडली पाहिजे —

आता हिल्डाचा अर्थ हालवर्डच्या ध्यानांत येतो. आणि आपल्या अंतःकरणांतला

कोणताही कोपरा तिच्यापासून लपून राहणें शक्य नाही याची त्याला जाणीव होते. म्हणून तर मग ही अंतःकरणाची कातरता सोडून देऊन हालवर्डने तेथे तितक्या उंचीपर्यंत चढावें असा त्याला ती आग्रह करते. तिच्या भावनात्मक पातळीवर आता हालवर्डही पोचलेला असतो. आणि म्हणून तो म्हणतो, "होय हिल्डा. त्या तिथें, मनोऱ्याच्या अगदी टोकाला जाऊन तेथल्या सर्वांत वरच्या खोलींत तुला जागा देऊं, तेथे तूं राणी-प्रमाणे राहशील."

"नेमकें हेंच वचन तुम्हीं मला दिलें होतें." असें जेव्हा यावर हिल्डा म्हणते तेव्हा हालवर्ड पुन्हा साशंक होतो. ती जें बोलते तें सर्व भ्रमात्मक – निव्वळ स्वप्नांतलें तर नाही, असें त्याला वाटतें. परंतु त्या शंकेला त्याला ती चिकटून राहूं देत नाही आणि आपण हें वचन खरोखरच दिलें होतें व पुन्हा कधी उंच चढतांना घेरी येते असें आपण म्हणणार नाही असें त्याच्याकडून ती कबूल करून घेते. आजच संध्याकाळीं मनोऱ्यावर चढून मी हार घालीन असें तो निर्धाराने म्हणतो. त्याचा तो निर्धार ऐकून हिल्डा जराशी आशंकेने ओठ चावून म्हणते – "म्हणजे वर तिथे तुमच्या घरावर तो मनोरा आहे तेथे ना?" त्यावर हालवर्ड निराशेने म्हणतो, "हो त्या नव्या इमारतीवर – जी इमारत 'माझें घर' कधीच होऊं शकणार नाही तिच्या मनोऱ्यावर."

येथे दुसरा अंक संपतो. त्या वेळीं हिल्डा पुढे होऊं घातलेल्या घटनेने अत्यंत उत्साहित झालेली असते आणि दूर कोठे दृष्टि लागली आहे अशा अवस्थेंत कांही पुटपुटते. त्यापैकी "किती थरारक गोष्ट!" एवढेच शब्द ऐकूं येतात.

तिसऱ्या अंकांत हिल्डाला नवीनच एक दर्शन होतें. कलावंतावरही कांही कौटुंबिक जबाबदाऱ्या अशा येऊन पडतात की, त्यांमधून त्याने निसटण्याचा प्रयत्न करणें निष्फळ होतें; एवढेंच नव्हे तर असें त्यामधून निसटणें हें त्याच्याही दृष्टीने योग्य नसतें. ज्या दिवशीं सकाळीं हालवर्डने प्रतिज्ञा केली की, आज मी स्वतः मनोऱ्याच्या शिखरावर जाऊन क्रूसाला हार घालणार त्याच दिवशीं सूर्य मावळायला आल्या वेळीं हिल्डाची ॲलीनशीं घराच्या दर्शनी व्हरांड्यांत गाठ पडते. अनपेक्षितपणे त्यांच्या बोलण्याला असें वळण लागतें की, ज्यामध्ये ॲलीन आपलें अंतःकरण हिल्डापुढे फार मोठ्या प्रमाणांत उघडें करते. घराच्या बागेंतून हिल्डाने पुष्कळ फुलें गोळा करून आणलेलीं असतात. याच बागेंतून हीं फुलें आणलीं असें जेव्हा ती म्हणते त्या वेळीं ॲलीन आश्चर्यचकित झाल्यासारखी होऊन विचारते, अजून या बागेंत फुलें आहेत? कारण तिच्या डोळ्यांपुढे बापाच्या घराभोवतीची ती अत्यंत प्रफुल्लित अशी बाग होती. आता ती बाग शिल्लक राहिलीच होती कुठे? हालवर्डने तिच्या मातापित्यांच्या बागेचा सत्या-नाश करून टाकलेला होता. ही तक्रार ॲलीन इतक्या वेदनायुक्त अंतःकरणाने करते की, तिचेंही कांहीतरी हरपलें आहे याची हिल्डाला अतिशय तीव्र जाणीव होते आणि मग आपण तिच्याजवळ बसावें आणि तिच्याशीं बोलून तिला कांही दिलासा देतां आला तर

पाहावा अशा हेतूने ती "आपण थोडा वेळ इथे बसून बोलूं या का ?" असें ॲलीनला सुचविते. याचेंही ॲलीनला आश्चर्यच वाटतें. ती म्हणतेही, "माझ्याजवळ बोलत बसणार म्हणतेस तूं ? मोठी गोड स्वभावाची मुलगी दिसतेस तूं. मला वाटलें तूं आमच्या ह्यांच्याशीं जाऊन बोलत बसणार असशील." आणि असें म्हणून भावनाभराने ती हिल्डाच्या मानेवर हळूच हात ठेवते.

कलावंताच्या साध्यासुध्या गृहिणीची करुण कहाणी —

एका प्रतिभासंपन्न कलावंताच्या साध्यासुध्या गृहिणीची ही अत्यंत स्वाभाविक अशी केवढी करुण कहाणी आहे. आपल्या आईबापांच्या घरीं ती मोठ्या प्रेमळ वातावरणांत आणि सुखासमाधानांत वाढली होती. प्रचंड मोठें घर आणि त्याभोवतालची प्रसन्न बाग यांत तिचें चित्त रमून गेलें होतें. परंतु ती आग लागली आणि जें कांहीं मन गुंतवून ठेवणारें होतें तें सर्व गेलें. त्या उद्यानाच्या विस्तीर्ण भूमीचे तुकडे तुकडे केले गेले आणि त्यावर परक्या लोकांचीं घरें उभीं राहिलीं. तिचें सर्वस्व गेलें. त्या तिच्या भूमीवर तिला स्वतःचें असें एकांत जीवन राहिलें नाही. नवीन बांधलेल्या त्या बहुविध घरांतील परक्या व्यक्तींचे डोळे तिच्या जीवनांत डोकावून पाहूं लागले. स्वतःच्या भूमीवर मन मानेल त्याप्रमाणे राहण्यावागण्याचेंही स्वातंत्र्य तिला राहिलें नाही.

याच्या मोबदल्यांत दुसरें तिला कांही मिळालें तें काय? तर एका श्रेष्ठ कलावंताबरोबरचें तिला असह्य असें जिणें. कारण, त्याच्या त्या जीवनांत ती प्रवेश करूं शकत नव्हती. विशेष म्हणजे त्याचें तें जीवन इतकें प्रभावी आणि आकर्षक होतें की, जो कोणी त्यांच्या घरीं येईल तो त्यानेच भारला जात होता. ज्याचें त्याचें लक्ष हालवर्डकडे. ती म्हणजे त्या घरांतील कोणी आहे याची तमाच कोणाला वाटत नव्हती. यामुळे त्या जगांत असून नसल्यासारखें तिला झालें होतें. म्हणूनच ती तळमळून म्हणाली, "मला वाटलें, तुला आमच्या यांच्याकडे जाऊन बोलत बसायचें असेल !"

प्रतिभेची आविष्कारपूर्व तळमळ —

"त्यांच्याशीं माझें कुठे काय काम आहे?" असा त्यावर हिल्डा प्रश्न करते. कारण एक तर हालवर्ड घरामध्ये नव्हताच; तो तिकडे नव्या घराच्या कामावर कामगार लोकांजवळ होता, आणि त्याचा चेहरा इतका उग्र झालेला होता की, त्याच्याशीं भाषण करण्याची "माझी छातीच झाली नाही" असें हिल्डा तिला सांगते. हालवर्डचा चेहरा इतका उग्र व्हावा अशीच त्याच्या अंतकरणाची अवस्था झालेली होती. सृजनशील प्रतिभेची अविष्कारापूर्वीची ती तळमळ होती. जगाला अशक्य वाटणारें असें कांहीतरी त्याला पुन्हा एकदा करून दाखवायचें होतें. त्याबद्दलचा निश्चय त्याच्या मनांत खडा होत होता. प्रतिभावंताच्या हृदयांतली ती सृजनपूर्ण कोलाहल, तळमळ होती. एका लहानशा वाक्याने इबसेनने हें केवढें महान सत्य आपणापुढें सहज उभें केलें आहे.

मग हिल्डा थोडीशी ॲलीनच्या पोटांत शिरूं पाहते. आतां नवें घर पुरें झालें. तिथे जाऊन राह्यला तुम्हांला मोठा आनंद होईल ना, या प्रश्नाने ती सुरुवात करते. परंतु ॲलीन पुन्हा एकदा 'कर्तव्य' पुराणावर येते. हालवर्डची जी इच्छा तीच माझी इच्छा. त्याने सांगायचें आणि मीं ऐकायचें हें माझें कर्तव्य. हा आपला पवित्रा ती पुन्हा एकदा स्पष्ट करते. परंतु तिचा तो नित्याचा निर्विकारपणा हिल्डापुढे शिल्लक राहिलेला नसतो. आणि म्हणून, "परंतु कांही कांही वेळा हालवर्ड म्हणेल तसें वागणें फार कठीण होऊन जातें," असें ती बोलून जाते.

आता थोडीशी ती मन मोकळें करण्याच्या वृत्तींत आली होती. त्याचा हिल्डा बरोबर फायदा घेते. स्वाभाविकच घराला लागलेल्या आगीचा विषय निघतो. त्यांतून तिचीं दोन मुलें मृत्युमुखीं पडलीं, यामुळे ॲलीनच्या हृदयावर मोठा आघात झाला असणार असें हिल्डा कांहीशी सहानुभूतीने म्हणूं जाते. परंतु तिला आढळून येतें तें कांही वेगळेंच. कारण ॲलीन उलट म्हणते, "हो, तें तर दुःख आहेच. पण परमेश्वराचीच तशी इच्छा होती; तिच्यापुढे आपण नमलेंच पाहिजे. त्यांच्या त्या अंताने माझें मन तळमळतें; पण तसें तें तळमळूं देणें हा ईश्वराचा अपमान आहे, त्याच्या घरीं गुन्हा आहे. प्रयत्न करतें मी, पण केव्हा केव्हा मनावर ताबा राहत नाही. तथापि देवाघरीं तीं मुलें सुखांत आहेत. पण कांही गोष्टी अशा आहेत की त्याबद्दलचें माझें दुःख मी कांही केल्या विसरूं शकत नाही. अगदी क्षुल्लक गोष्टी आहेत त्या. लोकांच्या दृष्टीने तर त्यांना कवडीची किंमत नाही. आणि तरीही मला त्यांचा नाश मला बिलकुल विसरतां येत नाही."

अशा या गोष्टी होत्या कोणत्या ? तिच्या आईवडिलांच्या घरचीं छायाचित्रें, पिढ्यान् पिढ्या तिच्या माहेरच्या घरीं चालत आलेलीं जरीचीं व रेशमी वस्त्रें, दागदागिने, हें सारें कांहीं जळून गेलें. विशेष म्हणजे ॲलीनच्या बाहुल्यांचाही त्यांतच स्वाहाकार झाला. थोड्याथोडक्या नव्हे, चांगल्या नऊ बाहुल्या होत्या त्या. लहानपणापासून ॲलीनला त्यांचा सहवास होता. जणू कांही तिचें आणि त्या बाहुल्यांचें जीवन एकरूप झालें होतें. ॲलीन मोठी झाली, कर्तीसवरती झाली, आई झाली; तरी तिचा त्यांच्याबद्दलचा लळा कमी झाला नव्हता. लग्नानंतरसुद्धा तिचें सगळें जीवन, सारे विचार, सारा जिव्हाळा माहेरच्या या लहानसहान वस्तूंमध्येच गुंतून गेलेला होता. घराच्या त्या आगीमध्ये तिच्या बाहुल्यांना आगींतून वाचविण्यासाठी कोणी कांही खटपट केली नाही. या गोष्टीने तिच्या अंतकरणांत एक प्रकारची चीड निर्माण झाली होती.

ॲलीनचा पतीच्या जीवनाशीं जिव्हाळा नाही —

हा तिचा सगळा वृत्तांत जसा थोडासा हास्यास्पद होता तसाच त्यांत फार मोठा गंभीर अर्थ भरलेला होता. याचा स्पष्ट अर्थ असा होता की, आपल्या पतीच्या जीवनाशीं तिचा कसलाही जिव्हाळा जमला नव्हता. नवऱ्याची अशी ती कधी झालीच

नव्हती. उलट आपलें जीवनाधार असें जें माहेर तें सारेंच उध्वस्त झाल्याच्या विषादाच्या भराने तिचें सारें मन आणि जीवन आक्रांत झालेलें होतें. त्यांतील हास्यास्पदता तिलाही कळत नव्हती असें नव्हे; म्हणून हें सगळें ऐकून हिल्डा आपल्याला हसते आहे अशी शंका तिला आल्याशिवाय राहिली नाही. म्हणूनच स्वतःच्या समर्थनार्थ ती सांगूं लागली की, त्या बाहुल्यांमध्ये सुद्धा एक प्रकारचा जीव होता. पोटामध्ये, जणू गर्भामध्ये धारण केलेल्या असाव्या इतक्या आपुलकीने त्या बाहुल्या तिच्या शरीराशीं एकजीव झाल्या होत्या.

इतकें स्वतःचें हास्यास्पद आणि करुणास्पदही चित्र उघडें केल्यानंतर ॲलीनने हालवर्डला त्याच्या मनोऱ्यावर चढून जाण्यापासून परावृत्त करण्याची कामगिरी हिल्डावर सोपविली. हालवर्ड त्याच बाजूकडे येतांना पाहून तिच्या हृदयाचा जणू थरकाप झाला. त्याच्या नजरेला नजर भिडविण्याचें सामर्थ्य तिला राहिलें नाही; किंबहुना तसें तें केव्हांच नव्हतें. हालवर्ड तेथे पोचतो न पोंचतो तोच डॉ. हर्डालच्याबरोबर ॲलीन घरांत निघून गेली हें हालंवर्डच्या नजरेंतून निसटलें नाही. तो हिल्डाला म्हणालाही,

" पाहिलेंस हिल्डा, मी आलों रे आलों की ही अशी दूर निघून जाते ! "

परंतु हिल्डाने त्यांच्यामधील संबंधाचें निदान चांगलें केलें आहे. म्हणून ती त्याला उत्तर देते, " माझ्या हें ध्यानांत आलें आहे की, तुम्ही येतांक्षणीं तिने दूर गेलेंच पाहिजे अशी तुमची जणू जरबच असते ! "

हिल्डापुढे भयंकर पेच—

हालवर्डलाही हें मान्य आहे. परंतु त्यासंबंधी तो अधिक बोलत नाहीं. कारण हिल्डाच्या चेहऱ्यावर त्याला कांही विचित्र कळा आलेली दिसून तो चमकतो. खुलासा म्हणून हिल्डा जेव्हां त्याला सांगते की, आपल्याला एखाद्या थडग्यामध्ये जाऊन आल्यासारखें वाटतें आणि झालेल्या प्रसंगाने आपली शीर न् शीर जणू गोठून गार झाल्यासारखी वाटते आहे, तेव्हा हालवर्डच्या डोक्यांत थोडासा प्रकाश पडतो. त्या दोघींचे विशेष कांही संभाषण चाललेलें नव्या घरापासून पाहूनच तो तेथे आलेला असतो. हिल्डाशीं बोलण्यासाठीच तो येतो; आपण येतांच ॲलीन आंत जाईल याची त्याला खात्रीच असते. तिने असें त्याच्याशीं वागावें याने त्याला खेद होत नव्हता असें नव्हे, परंतु त्यामुळे त्याला काहीसें बरेंही वाटत असें. मेलेल्या मुलांच्या दुःखाने एकसारखी विकल होऊन राहिलेल्या अवस्थेंत ती डोळ्यापुढे येणें तुम्हांला सहन होत नाही का ? असें त्या बाबतींत हिल्डा त्याला विचारते. परंतु हालवर्ड निश्चित उत्तर देत नाही. पुष्कळ अंशीं तसें खरें तो अधुरें बोलतो. म्हणजे आणखीही कांही कारण ती आपल्यासमोर नसावी असें वाटण्याला हालवर्डला होतें तर ! आतापर्यंत ॲलीनने सांगितलेल्या हकीकतीमधून स्वतःच्या मुलांच्या मृत्यूमुळेच ॲलीनची अवस्था विकल झालेली होती असें नव्हे, हें हिल्डाच्या ध्यानांत आलेंच होतें. त्यांत हालवर्डचें हें उत्तर. त्यामुळेच

ॲलीनचें आणि तिचें एवढें काय बोलणें झालें याबद्दल हाल्वर्ड पुन्हा पुन्हा प्रश्न करीत असतांनाही तिचें त्याच्या बोलण्याकडे लक्षच जात नाही. ती एखाद्या पुतळ्यासारखी निस्तब्ध राहते. इतका तिच्यापुढे कांहीतरी भयंकर पेच उभा राहिलेला असतो. अखेर तिचा कांही तरी निर्णय होऊन ती म्हणते.

"मी इथून निघून जायचें ठरविलें आहे."

प्रथम हालवर्डचा यावर विश्वासच बसत नाही. तिच्या निर्धाराची खात्री झाल्यावर तो निग्रहाने म्हणतो, "मी तुला जाऊं देणारच नाही." पण आपण येथे राहून करणार काय, असा तिच्यापुढे प्रश्न असतो. नुसतें त्याच्या सहवासांत–त्याच्या घरीं राहावें, असें जरी हालवर्ड म्हणतो, तरी तेवढ्यावर हें प्रकरण थांबणार नाही याची तिला पक्की खात्री असते, तसें कांही झालें तर बरेंच असें हालवर्डला वाटतें. परंतु आता या गोष्टीला हिल्डाच्या मनाची तयारी होत नाही. न्यायाने जें ॲलीनचें आहे तें तिच्यापासून हिरावून घ्यायची तिच्या मनाची तयारी होत नाही. ॲलीनची तिची ओळखदेख नसती तर एक गोष्ट निराळी. पण ॲलीनचा व तिचा आता इतका जिव्हाळ्याचा परिचय झाल्यानंतर तसें करणें तिला अवघड झालें होतें. आणि म्हणून मला जायलाच हवें असें ती त्याला पुन्हा निक्षून सांगते.

हालवर्डने सांसारिक कर्तव्यांत समाधान मानावें ? —

तिच्यापुरतें हें ठीक झालें. परंतु हिल्डा गेल्यावर आपण कशाच्या जोरावर जीवन घालविणार हा प्रश्न हालवर्डपुढे असतो. तुम्हांला तुमची पत्नी आहे, घरसंसार आहे, त्याबाबतचीं तुमचीं कर्तव्यें आहेत. तीं कर्तव्यें करीत राहून तुम्हांला जगतां येईल, असें हिल्डा त्याला सांगू पाहते. ॲलीनचा जवळून परिचय होण्यापूर्वी इतर कोणत्या गोष्टींनी आपलें चित्त विचलित न होऊं देतां, कातरता सोडून देऊन, आपल्याला जें हवें तें कलावंताचें श्रेयस प्राप्त करून घेण्याइतपत चित्ताची दृढता स्वीकारण्याबद्दल सकाळींच त्याला सल्ला देणारी हिल्डा आता हळुवार बनून, स्वतःचें श्रेयःसाधन सोडून त्याने सांसारिक कर्तव्यांत समाधान मानावें, नव्हे तसें समाधान मानणें त्याला शक्य आहे असें म्हणूं लागली होती !

परंतु हालवर्डला ही गोष्ट सर्वथा अशक्य झालेली आहे. त्याच्या ठिकाणीं जी भटक्या आदिमानवाची सुखोपभोगलालसा आहे तिच्यापायी त्याने ॲलीनचें जीवन जणू पार शोषून टाकलें आहे. परमेश्वरी हस्तकांनी सदैव त्याला त्याच्या इच्छापूर्तींमध्ये साहाय्य केलें. त्याचा परिणाम म्हणजे ॲलीन ही त्याच्या संसारापुरती तरी मृत माणसाप्रमाणे होऊन राहिली. पुढील सारें आयुष्य अशा एका मृतवत् स्त्रीबरोबर कंठण्याचा त्याच्यावर प्रसंग आला; त्याच्यावर की ज्या त्याला सदैव सुखोपभोगांत दंग होण्याची सारखी ओढ आहे !

एक साधावें तर दुसरें सुटतें —

येथून पुढे तिसऱ्या अंकाचा जो बाकीचा भाग आहे त्यामध्ये हालवर्ड आणि हिल्डा

यांची मोठीं तत्त्वगर्भ आणि काव्यमय भाषणें आहेत. त्यांचा भाषणाचा साराच विषय पुष्कळसा कल्पनामय, आभासमय, स्वप्नरंजनमय आहे. आणि त्यामुळेच या नाटकांतील काया आणि हिल्डा हीं पात्रें प्रत्यक्ष व्यक्ति आहेत की निव्वळ हालवर्डच्या ठिकाणच्या कांही शक्तींचीं, ऊर्मींची वा आसक्तींचीं तीं प्रतीकें आहेत अशी गाढ आशंका मनांत उत्पन्न झाल्यावांचून राहत नाही. संसारामध्ये हालवर्डला जोडीदारीण अशी मिळते की, जिच्या ठिकाणीं त्याच्या प्रतिभेच्या सोसाट्यांत उंच भरारी मारण्याचें सामर्थ्य नाही. ती बिचारी संत तुकारामाच्या जिजाईप्रमाणे आपला घरसंसार आणि खेळबाहुल्या यामध्ये दंग होऊन राहणारी, साधीसुधी, प्रेमळ पण कर्तृत्वशून्य स्त्री आहे. हालवर्ड प्रतिभावान कलावंत आहे. नवनिर्मितीची शक्ति त्याच्या ठिकाणीं नुसती उसळत आहे. या उसळणाऱ्या शक्तीचा आवेश एवढा जोराचा आहे की त्याच्यापुढे हालवर्डला जगांतल्या कोणा व्यक्तीची कसली पर्वा नाही. त्याने जें मनांत घ्यावें तें पूर्ण करावें, आड येईल तें आणि व्यक्ति कापून काढून दूर करावी, असा त्याचा खाक्या आहे, मनस्वी कलावंताला साजेशीच ही गोष्ट आहे. त्याला सारें कांही स्वतःच्या मनाप्रमाणे व्हायला हवें आहे. प्रतिभेचा विलासही हवा आहे; सांसारिक रमणीय जीवनही हवें; विषयपरिपूर्तीचीही त्याची लालसा कमी नाही. प्रतिभाविलासाठी संसार आणि विषयवासनापूर्ति यांना दूर ठेवायला तो तयार नाही. पण यांतच त्याच्या साऱ्या जीवनांतील खेळखंडोबाचें बीज आहे. एक साधावें तर दुसरें सुटतें अशी त्याची अवस्था होत आली आहे.

प्रतिभेची उंच भरारी—

एकदा त्याच्या प्रतिभेने खूप उंच भरारी मारली. उंच चर्चचा मनोरा हें एक केवळ प्रतीक आहे. प्रतिभेच्या भरारीसरशी लोकाना जें अशक्य तें त्याने शक्य करून दाखविलें. त्यासाठी सासऱ्याचें घर जळून खाक झालें, त्याच्या पत्नीच्या हृदयावर तीव्र आघात झाला, कितीएक हाताखालच्या, बरोबरीच्या किंवा वरिष्ठ कारागिरांना नेस्तनाबूद करावें लागलें, तरी आपल्या यशःसिद्धीसाठी त्याने त्या कशाबद्दल खंत बाळगली नाही. या धसक्यांत त्याची पत्नी त्याला दुरावली; इतकी की, त्याच्या संसारांत ती जणू त्याला मेली. पण विषयावासना कांही मेली नाही. त्यासाठी त्याने आणखीही स्त्रियांचा शोध केला. दुर्दैव त्याचें की, जिची इच्छा करावी ती जणू त्याला स्वतः चालून येऊन वश व्हावी.

पण आधुनिक सुसंस्कृत काळांतील कलावंत होता हालवर्ड. संस्कृतीच्या वाढीबरोबर चांगलेंवाईट, पापपुण्य इत्यादि गोष्टींचे संस्कार त्याच्या चित्तावर झाले होते. आपण जें केलें तें सर्व बरोबर केलें का? ॲलीन आपल्यामुळे साऱ्या जीवनांतून उठली हें पाप नव्हे काय? इतर स्त्रियांचा सहवास आपण स्वीकारणें हें ॲलीनवर अन्यायाचें नाही काय? हे सर्व विचार सोडून, कशाची पर्वा न करतां निव्वळ प्रतिभाविलासाकडेच सर्व लक्ष

पुरवावें म्हटलें तरी तशी आपल्या स्वभावाची, वृत्तीची, प्रकृतीची ओढ नाही; आणि जिला जन्माची सोबतीण मानली तिच्यावर असा अन्याय करणें नीतिविरोधी नाही काय ?

हेंही नाही आणि तेंही नाही—

अशा तऱ्हेच्या पेचांत सांपडून हेंही नाही आणि तेंही नाही अशी हालवर्डची अवस्था झाली आहे. पुष्कळ बांधकाम त्याने केलें; त्यासाठी इतरांना खाली दडपून स्वतः बांधकामक्षेत्रांत अनिरुद्ध प्रथमस्थान मिळविलें. तरीही दहा वर्षांपूर्वी त्याने जें उत्तुंग यश मिळविलें त्या मानाने हें जगाच्या दृष्टीने अतुलनीय वाटणारें यश त्याच्या दृष्टीने कांहीच महत्त्वाचें नव्हतें. आपल्या प्रतिभेचें सामर्थ्य खरें कसास लागत नाही, खरें मोलाचें असें आपल्या हातून कांही निर्माण होत नाही, या जाणिवेने तो असमाधानी होता. आणि इकडे संसारसुखही त्याने सर्व गमावलें होतें. त्यांतच वार्धक्याची छाया पडून प्रतिभेचें सामर्थ्य – शक्ति – कमी होतें अशी शंका त्याला यायला लागली होती. या उतरत जाणाऱ्या सामर्थ्यामुळे आपण त्या मनाशीं दृढ बाळगलेल्या यशाच्या उंच शिखरापर्यंत पुन्हा कधी पोचणार तर नाहीच, उलट वृद्धापकाळामुळे सामान्य बांधकामाच्या क्षेत्रांतही आपण हळूहळू मागे पडणार, नव्या पिढीकडून आपली हकालपट्टी होणार या भयाने त्याचें चित्त नुसतें व्याकुळ झालें आहे; आणि याच कारणाने सुखोपभोगाचें त्याचें सामर्थ्यही लोप पावत चाललें आहे.

नाटकांतील पात्रें म्हणजे हालवर्डच्या प्रवृत्तीचीं प्रतीकें ?—

कमजोर होत चाललेल्या आणि अंगिक दुर्बळतेमुळे, (एक मजला वर चढून गेला तरी हालवर्ड कापूं लागे, त्याला घेरी येई) वार्धक्यामुळे व संस्कृतिविषयक संस्कारांनी फार नाजूक बनलेल्या, सदसद्विवेकबुद्धीमुळे कातर बनलेल्या आणि आपल्या प्रतिभेच्या यशापासून दुरावत चाललेल्या या प्रतिभावंताच्या एका शेवटच्या महाप्रयासाचा क्षण, की ज्या क्षणीं त्याच्या हातून पुन्हा एकदा, आणि कदाचित शेवटचाच झाला तरी बेहत्तर, परंतु कोणाला कधी शक्य वाटलें नाही इतकें निर्मितीच्या यशाचें उत्तुंग शिखर गाठण्याचा प्रयत्न व्हावयाचा होता, असा तो क्षण आणि तो प्रयत्न यांचें हें नाटक आहे असें तिसऱ्या अंकांत, आता ज्या ठिकाणीं आपण येऊन पोचलों आहों तेथून सारखें वाटूं लागतें. आणि मग नाटकांतील इतर पात्रें म्हणजे हालवर्डच्या ठिकाणच्या परस्परांशीं झगडणाऱ्या भिन्नभिन्न प्रवृत्तींचीं निव्वळ प्रतीकें आहेत असें वाटल्यावांचून राहत नाही.

हिल्डा म्हणजे प्रतिभाशक्ति ?—

दहा वर्षांपूर्वी हालवर्डने तें आपलें प्रतिभेचें अत्युच्च कार्य यशस्वी केलें त्या वेळीं तेरा चौदा वर्षांची एक उत्साही मुलगी त्याला त्याच्या यजमानाच्या घरीं आढळली, तिने त्याच्या कर्तृत्वाचें कौतुक केलें, त्याने तिचे खूप लाड केले, नव्हे तिचें चुंबनही घेतलें

आणि आणखी दहा वर्षांनी असा एक मनोराच काय, पण त्याहूनही उत्तुंग असा राजवाडाच आपण बांधूं आणि त्या ठिकाणीं त्या मुलीची राणी म्हणून स्थापना करूं असें तिला वचन दिलें, ही इब्सेनने सांगितलेली हकीकत अशक्य कोटींतली जरी नसली तरी, हिल्डा म्हणजे हालवर्डची प्रतिभाशक्ति होय; बांधकाम व्यवसायांत यशस्वी रीतीने चौदा-पंधरा वर्षें घालविल्यावर आणि पुष्कळ प्रार्थमंदिरें – चर्चे – बांधून झाल्यावर एक सर्वोच्च मनोऱ्याचें चर्च त्याने बांधलें आणि फार उंच चढून जाण्याबद्दल म्हणजेच जगाला अशक्य वाटावें असें कांहीतरी करून दाखविण्याच्या बाबतींत प्रतिभावंताच्या ठिकाणीं सहजपणेंच वसत असलेल्या कातरतेवर त्याने विजय मिळविला. त्या वेळीं त्या प्रतिभेच्या सामर्थ्याची त्याला जाणीव झाली, त्या वेळीं आपल्या प्रतिभाशक्तीची ओळख पटली, तिच्याबद्दल त्याला आनंद, अभिमान, औत्सुक्य वाटलें; आणि झालें एवढ्याने काय झालें, याच प्रतिभाशक्तीच्या बळावर आपण याहूनही उच्चतर निर्मिति करूं आणि शेवटीं परमेश्वरालाही हेवा वाटावा असा उत्तुंग राजवाडा – म्हणजेच उत्तमोत्तम कलेचें यश आपण संपादूं असा भरवसा त्याला वाटला असावा. अशा तऱ्हेने हें हिल्डा प्रकरण प्रतीकात्मक मानल्याने या नाटकाचें रहस्य कळण्याला अधिक मदत होते असें वाटल्यावांचून राहत नाही.

काया : वैषयिक सुखाची आसक्ति ? —

त्याचप्रमाणे काया ही सुद्धा, हालवर्डच्या ठिकाणीं जी भौतिक – वैषयिक – सुखाबद्दलची आसक्ति आहे तिचें प्रतीक म्हणून समजणें हें अधिक सुसंगत वाटतें. अर्थात या आसक्तीवर त्याच्या सुसंस्कृत मनाचीं पुष्कळ बंधनें पडलेलीं आहेत. या आसक्तीची तृप्ति तो उजळ माथ्याने करून घेऊं शकत नाही. त्यांत पत्नीला आपण अन्याय करतो याची जाणीव सदैव त्याला बोचत राहते; त्याचप्रमाणे लौकिक दृष्ट्याही आपण अपवादाला पात्र होऊं नये अशीही त्याची धडपड आहे; एवढेंच नव्हे तर स्वतःच्या मनाचीही वंचना करण्याची त्याची खटपट आहे. काया फासलीच्या शारीरिक आकर्षणामुळे ती आपल्याला नको आहे, तर राग्नार ब्रोव्हिकने आपल्यापासून दूर होऊन स्वतःचें निराळें कर्तृत्व दाखवूं नये, त्याच्याच साहाय्याने परंतु त्याला दडपूनच ठेवून आपण आपल्याच यशाची साधना करावी आणि आपलें प्रथमस्थान टिकवून धरावें, यासाठी कायाने आपल्यापाशी राहावें, म्हणजे तिच्या प्रेमापायी राग्नार आपोआपच आपल्यापाशी राहील अशा प्रकारची एक फसवणूक त्याने स्वतःची चालविली आहे – आपण नीतिदृष्ट्या ढळत नाही असें खोटेंच समाधान स्वतःचें करून घेण्यासाठी – असें मानणें आणि त्या दृष्टीने काया फासली हीही एक त्याच्याच वृत्तीचें प्रतीक समजणें अधिक बरें वाटतें.

राग्नार ब्रोव्हिक : तरुण पिढीच्या भीतीचें प्रतीक ? —

अर्थात राग्नार ब्रोव्हिकसारखा कर्तृत्ववान तरुण आपला बांधलेला सहकारी राहावा

ही हालवर्डची वृत्तीही कांही अयथार्थ नाही. आणि म्हणून त्यासाठी, आपण काया फासलीने आपणाकडे राहावें अशी इच्छा करतो हें त्याचें म्हणणें संपूर्णतया असत्यही नाही. ज्या तरुण पिढीचें हालवर्डला एवढें भय वाटूं लागलें होतें त्या तरुण पिढीच्या आवडीनिवडी हालवर्डहून वेगळ्या झालेल्या होत्या. त्या पिढींतल्या कारागिरांना त्याने दडपून ठेवलेलें होतें. त्यामुळें हालवर्डबद्दल त्यांना उपहास आणि मत्सर वाटत होता. अशा त्या तरुण पिढीचें एक प्रतीक, हालवर्डची त्या पिढीबद्दलची भीति व्यक्त करण्यासाठी म्हणून राग्नार ब्रोव्हिकच्या रूपाने नाटककाराने आपल्यापुढे उभें केलें आहे असें मग मानावें लागतें.

ॲलीनबद्दल, हालवर्डच्या पत्नीबद्दल मात्र इतक्या निश्चयाने तसें म्हणणें कठीण आहे. कारण तिची व्यक्तिरेखा जास्त सुसंगत, स्वाभाविक आणि जिवंत आहे. त्यामुळे निव्वळ मुलाबाळांचा सुखी संसार साधून द्यावा अशी जिच्याबद्दलची अपेक्षा अशी एक सहचारिणी संपादन करण्याच्या आशेपायीं हालवर्डच्या गळ्यांत पडलेली ती एक धोंड होती हें मानणेंच अधिक तर्कशुद्ध वाटतें. म्हणजे एका बाजूला त्याची प्रतिभाशक्ति आणि तिच्या विकासाची ओढ; दुसऱ्या बाजूला त्याची महत्त्वाकांक्षा आणि तिच्यापायी इतरांना दडपून ठेवण्याची वृत्ति; तिसऱ्या बाजूला त्याची विषयोपभोगतृप्तीची लालसा आणि या सर्वांविरुद्ध त्याला जखडून राहिलेली, निष्प्रेम बनलेली, जवळजवळ मृतवत् झालेली त्याची पत्नी अशा कात्रींत हालवर्ड सापडलेला आहे हें मानतांना बाकीच्या व्यक्तिरेखा प्रतीकात्मक मानल्या तरी ॲलीन ही एक खरीखुरी जिवंत व्यक्तिरेखा आहे असेंच मानण्याकडे कल वळतो.

हिल्डावांचून – म्हणजेच आपल्या प्रतिभाशक्तीची कास सोडून आपण जगणार कसे हा प्रश्न हालवर्डला पडला होता. परंतु आपल्या प्रतिभाशक्तीचा जो आविष्कार आजवर तो करीत आला होता त्यानेही त्याचें समाधान होत नव्हतें. आईबाप आणि मुलें याना राहण्यासाठी सुटसुटीत, सोयीस्कर आणि सुंदर घरें बांधण्यांत त्याने गेलीं दहा वर्षें व्यतीत केलीं होतीं; याचाही प्रतीकात्मक अर्थ घेतां येईल; सामान्य व्यवहारांतील तात्कालीन गरजा पुऱ्या करण्याच्याच कामीं त्याने आपली सर्व शक्ति खर्ची घातली होती. परंतु यामुळे त्याला समाधान कसें प्राप्त होणार? कारण या गरजा नेहमी बदलत्या आहेत. त्यामुळे जें केलें तें व्यर्थ ठरण्याचा संभव. म्हणूनच हिल्डाच्या रूपाने त्याची प्रतिभाशक्ति त्याला बजावते की, तुम्ही बांधकाम करणारे सर्व लोक अगदी मूर्ख आहांत. दैनंदिन गरजा भागविण्याच्या कामीं आपली श्रेष्ठ सृजनशक्ति व्यर्थ घालविण्याऐवजी दुसरें केवढें तरी मोठें आणि श्रेष्ठ कार्य तुम्हांला करतां येणें शक्य आहे आणि तेंच तुम्हीं केलें पाहिजे. हें कार्य म्हणजे हिल्डाने म्हटल्याप्रमाणें "आकाशांतील राजवाडे बांधणें. म्हणजेच नित्यनव्या उत्तुंग आदर्शांची चिंतना आणि प्रस्थापना करणें. हिल्डाचे शब्द असे आहेत : "माझा तो हवेंतला राजवाडा उंचावर, फार फार उंचावर असेल. तेथून चारी बाजूकडे अप्रतिहत नजर टाकतां येईल; सगळी-

कडचें नीट न्याहाळतां येईल. त्या राजवाड्यालाही अत्यंत प्रचंड उंचीचा एक मनोरा असेल. त्या मनोऱ्याच्या अगदी टोकावर एक सज्जा असेल. त्या सज्जांत उभी राहून मी खाली जीं इतर माणसें चर्चे बांधीत असतील किंवा मुलाबाळांच्या संसारासाठी घरें बांधीत असतील त्यांच्यावर नजर टाकीन."

प्रतिभावंताचा आकाशांतील राजवाडा —

याचा अर्थ उघड आहे. प्रतिभेचें कार्य जगांतील सामान्य व्यवहाराची बांधणी करीत राहणें हें नव्हे. तें काम इतरेजनांचें आहे. त्यांनी धर्म आणि समाजबंधनें निर्माण करावीं; त्यांच्या गुंत्यांत स्वतःला अडकवून घ्यावें. गीतेंत म्हटल्याप्रमाणे कर्मसंगी लोकांचा तो प्रांत आहे. प्रतिभावंताने या सगळ्याहून उंच गेलें पाहिजे. तेथून या सगळ्या संसाराचें सहानुभूतिपूर्वक निरीक्षण केलें पाहिजे. हालवर्डने म्हटल्याप्रमाणे प्रतिभावंतांचा हा आकाशांतला राजवाडा संसाराशीं अगदीच सर्व संबंध सोडून गेलेला असणार नाही. त्याचा पाया खाली दृढपणे संसारांतच असेल. परंतु त्याची भरारी तो सारा संसार सोडून उंच उंच जाण्याची असेल. प्रतिभेचें सामर्थ्य यासाठी वापरलें पाहिजे; सामान्य व्यवहारोपयोगी वस्तु वा साधनें निर्माण करण्यासाठी नव्हे.

असें कांही तरी करण्याचें सामर्थ्य हालवर्डच्या अंगीं आहे. तशी त्याच्या प्रतिभाशक्तीची ओढ आहे. हिल्डा आणि राग्नार यांच्या यानंतरच्या संभाषणांत ही गोष्ट पुन्हा व्यक्त झाली आहे. नव्या घराच्या मनोऱ्यावर स्वतः जाऊन हालवर्ड माळ क्रूसावर चढविणार अशी हिल्डाची श्रद्धा आहे. पण राग्नारचा या गोष्टीवर विश्वास नाही. "पूर्वी केव्हा तरी एकदा ही गोष्ट त्यांनी केल्याची दंतकथा आम्ही ऐकतों. तें खरेंही असेल. पण पुन्हा त्यांच्या हातून असलें कांही होणें शक्य नाही." असा त्याचा अभिप्राय आहे. पण हिल्डाला तो मंजूर नाही. "हालवर्डला माझ्याइतकें दुसऱ्या कोणीच ओळखलेलें नाही; आणि म्हणून जगाला अशक्य वाटणारी गोष्ट तो केल्याशिवाय राहणार नाही" असा विश्वास ती व्यक्त करते. हालवर्डच्या हिल्डारूपी प्रतिभेचाच हा हुंकार आहे.

हालवर्डला अशक्य कांही नाही —

या हुंकाराला ॲलीनकडूनही केवढा दुजोरा मिळालेला आपण पाहतों. मनोऱ्यावर स्वतःच जाऊन हालवर्ड माळ अडकवील ही तिला भीति वाटत असते. हिल्डा तिला विचारते "ही भलती गोष्ट हालवर्ड करीलसें वाटतें तुम्हांला?"

"त्यांच्या डोक्यांत केव्हा काय येईल, कोणी सांगूं शकणार नाही. मला तर वाटतें की, जगांत अमूक एक गोष्ट करण्याचा प्रयत्न तो करणार नाहीच अशी गोष्टच नाही."

हालवर्डबरोबर पंचवीसतीस वर्षें घालविलेल्या त्याच्या पत्नीला त्याच्या सामर्थ्याची कल्पना आहे. पण त्या सामर्थ्याची योग्य कदर करण्याची मात्र तिची तयारी नाही.

इकडे हालवर्ड पुन्हा एकवार मनोऱ्यावर उंच चढून टोकाच्या क्रूसावर माळ घालणार होता. त्याच्या केवढ्या यशाची परिसीमा होती ती. पण त्यापेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट तिला त्याच वेळीं तिच्याकडे बसायला आलेल्या गांवातल्या स्त्रियांची वाटली. आत्ता त्यांना परत जायला सांगा हें हिल्डाचें म्हणणें तिला मानवलें नाही. उलट हालवर्डचा हा वेडेपणा आहे असेंच तिने मानलें; पण त्यापासून त्याला परावृत्त करायला सुद्धा ती थांबली नाही. हिल्डानेच तें काम करावें, आपण त्या बायकांकडून बाहेर परत येईपर्यंत कांही-तरी बोलून हालवर्डला तिनेच गुंतवून ठेवावें असें म्हणून ती घरांत निघून जाते.

याच वेळीं हालवर्ड येतो. त्याला बोलावणें पाठविलेलें असतें ॲलीनने. पण मीं तुम्हाला बोलावलें असें हिल्डा त्याला बळेंच सांगते. हिल्डाच्या मनाचा कांही तरी निश्चय झालेला असतो. [अथवा खरें म्हणजे हालवर्डच्या मनांत शहानिशा होऊन कांही तरी पक्कें ठरलेलें असतें आणि हिल्डाच्या रूपाने नाटककार त्याचा आविष्कार करीत असतो.] लोक आपल्याला मित्रा मानतात हें त्याला माहीत असतें. परंतु पायाडावरून मनोऱ्यावर चढून जाणें ही कांही साधीसुधी गोष्ट नव्हती. म्हणजे आपण पडूं आणि प्राणाला मुकूं असें भयच त्याला वाटत असलें पाहिजे, या हिल्डाच्या विधा-नाला मात्र तो हरकत घेतो. भीति मरणाची वाटत नाही, एका चमत्कारिक गुन्ह्याबद्दल आपल्याला दंड सोसावा लागेल, अशी त्याला भीति वाटत असते. त्याबद्दल एक लहानशी कहाणीच तो सांगतो.

धर्मश्रद्धेने समाधान नाही—

त्याचें लहानपण एका श्रद्धाळू धार्मिक कुटुंबांत गेलेलें होतें. तेव्हा प्रार्थनामंदिरें—चर्चे—बांधलीं म्हणजे आपल्या हातून मोठें पुण्यकृत्य घडेल अशा मोठ्या दृढ श्रद्धेनें तो मंदिरें बांधीत सुटला. परमेश्वर त्यामुळे आपल्यावर फार प्रसन्न झाला असणार अशी त्याची भावना होती, पण प्रत्यक्षांत अनुभव त्याला वेगळा आला. कारण, हालवर्ड म्हणतो की, " तसें असतें तर मला स्वतःला जसें वाटेल तसें करून घेण्याची भटक्या आदिमानवाची प्रवृत्ति त्याने माझ्या ठिकाणीं कशाला निर्माण केली असती? माझी इच्छापूर्ति व्हावी यासाठी साह्यभूत अशा शक्तींची, ऋद्धिसिद्धींची जोड त्याने मला. कशाला दिली असती? त्यामुळेच तर माझ्या विनिपाताची सुरुवात झाली. परमेश्वर आपल्या भक्तीने प्रसन्न होत नाही अशीच जाणीव सतत मला होत राहिली. याचाच मला प्रत्यय यावा यासाठीच तर त्याने माझें घर जळावें अशी योजना केली. माझ्या हातून त्याला आणखी सेवा हवी होती; केल्या सेवेने त्याचा संतोष झाला नव्हता. बांधकामाच्या उद्योगांत मीं श्रेष्ठ प्रावीण्य मिळवावें आणि अधिकाधिक शानदार मंदिरें - चर्चे - मीं त्याचीं बांधीत राहावें, त्यावांचून मीं दुसरें कांही करूंच नये, दुसऱ्या कशाकडे माझें लक्ष लागूंच नये, अशी परमेश्वराची इच्छा आहे, ही भयंकर गोष्ट त्या

दिवशीं तुमच्या गांवीं त्या मनोऱ्याच्या टोकावर मी चढलों त्या वेळीं माझ्या चित्ताला एकदम स्पष्टपणे भासली. त्यासाठीच त्याने माझीं मुलें माझ्यापासून हिरावून घेतलीं; माझें सारें जीवन त्याने निष्प्रेम केलें. हेतु काय, तर साऱ्या जन्मभर मी चर्चे बांधण्याशिवाय दुसरा कांही उद्योग करूंच नये !

मानवकल्याण-धर्मानेही समाधान नाही —

"आणि मग मीं मनाशीं खूप विचार केला. त्यापूर्वी पायाडावरून मनोऱ्यावर मी कधी चढलों नव्हतों. पण पूर्वी अशक्य वाटणारी ती गोष्ट या वेळीं करायचें मीं ठरविलें. त्या उंच जागीं, जिना वगैरे नसतांना, सरळसोट मी चढलों. आणि क्रूसावर माळ घालतांना मीं परमेश्वराला म्हटलें, "सर्वसमर्थ परमेश्वरा, आज मी तुला हें बजावून सांगतों. यापुढे मी स्वतंत्रपणें बांधकाम करणार; तुझा बंदिवान कारागीर मी राहणार नाही. तूं सृष्टिनिर्माता आहेस; त्या क्षेत्रांत जसा तुझा तूं धनी तसा माझ्या बांधकामाच्या क्षेत्रांत माझा मी धनी होणार. तुझीं मंदिरें यापुढे मी बांधणार नाही. यापुढे माणसांसाठी निवासस्थानें मी बांधीन."

हिल्डाजवळ एका दमांत कांही हें सारें भाषण हालवर्डने केलें नाही. हिल्डाच्या आणि त्याच्या संभाषणांत पायरीपायरीने त्याने हें व्यक्त केलें. त्यावर हिल्डा त्याला म्हणते, "त्या वेळीं तुम्हीं एक गाणें गायलेलें ऐकलें म्हणतें ना मी? तेंच तें गाणें असलें पाहिजे."

या ठिकाणीं तर स्वच्छ वाटतें की त्याची प्रतिभाच जागी होऊन जणूं आपल्या कार्याचा आढावा घेत आहे. त्या वेळीं एक क्षण हालवर्डच्या जीवनांत असा आला की, निव्वळ देवाचीं मंदिरें बांधीत बसण्यांत पुरुषार्थ नाही, त्यांत आपल्या प्रतिभेचें चीज नाही, असें त्याला वाटलें. बांधावें तें माणसांसाठी, माणसांच्या सुखासाठी, हा नवाच मानवकल्याणाचा आवेश—धर्म म्हणा—त्याच्या ठिकाणीं स्फुरला. परंतु या प्रतिभाविष्कारानेंही त्याचें समाधान झालें नाही. ज्या हरपल्या श्रेयासाठी त्याच्या चित्ताची तळमळ चालली होती तें त्याला गवसलें नाही. ज्या घरामध्ये सुखासमाधानाने राहतां येईल अशीं घरेंच माणसांना नको आहेत असा त्याला अत्यंत कटु अनुभव आला. माणसाच्या हिताचें म्हणून जें सांगावें तें माणसाला आपल्या हिताचें आणि कल्याणाचें वाटूंच नये असाच जणू दारुण अनुभव त्याला आला. "ऊर्ध्वबाहू विरोम्येष न च कश्चित् शृणोति माम्" असें व्यास महर्षि म्हणाले ना; तशी मानवाची आपल्या कल्याणाच्या मार्गावर न चालण्याची प्रवृत्ति पाहून त्याची जणू अवस्था झाली.

इतर माणसांचेंच कशाला ? स्वतःसाठी असें एखादें घर बांधून तरी काय उपयोग होता त्याला ? कारण त्या घरांत त्याला कोठलें सुख मिळावयाचें होतें ? कोणतें कल्याण त्याचें साधणार होतें ? आणि या साऱ्याचा इत्यर्थ म्हणून विकट हास्य करून तो म्हणतो,

"इतकें बांध बांध बांधलें, पण सारें व्यर्थ. खरोखर बांधून असें कांही झालेंच

नाही. असें कांहीतरी खरेंखुरें मोलाचें बांधावें यासाठी कशाचाही त्याग करण्याचें मला जमलें नाही. सारें कांही शून्य, उजाड, असें माझें जीवनक्षेत्र झालें. मला वाटतें, परमेश्वरापाशी मी वितंडवाद घातला, पण त्याचाच अशा रीतीने जय झाला!"

व्यवहारापलीकडचें कांहीतरी अलौकिक बांधण्याची उमेद —

परंतु हालवर्ड खराखुरा निराश झाला नव्हता. मानवी व्यवहारापलीकडे, प्रवृत्तींच्या पलीकडे कांही तरी आगळें बांधण्याची शक्यता आहे आणि त्याच बांधकामांत खरा आनंद सापडण्याजोगा आहे असा त्याला नवीनच साक्षात्कार झालेला आहे. कायाच्या रूपाने आपल्याला प्रतीत झालेली त्याची विषयतृप्तिलालसासुद्धा दडपून टाकण्याचा त्याचा निर्णय झालेला आहे. हिल्डाने त्या प्रकरणाचें स्मरण करून दिलें असतां त्या गोष्टीचा विचार करण्याची आपली इच्छा नाही असें अगदी तुटकपणें हालवर्ड म्हणतो आणि पुन्हा एकदा आपल्या घराच्या मनोऱ्याच्या टोकावर चढून परमेश्वराच्या समोर उभे राहून आपण त्याला बजावणार की, "परमेश्वरा तूं मला शहाणा म्हण की वेडा म्हण, पण मीं आतां अखेरचा निर्णय केला आहे की, या जगांत जें सर्वांत सुंदर असें कांही असेल तें मी बांधणार आहे. एकटा नाही. माझ्याबरोबर एक राणी असणार आहे. मी एक हवेंतील उंच राजवाडा बांधणार आहे, तो माझ्या राणीला देणार आहे, तेथे आम्ही दोघे राहणार आहोंत." असें हिल्डाला सांगतो.

सर्वांत जें सुंदर त्याची साधना —

या सगळ्या काव्यामध्ये हिल्डा ही खरोखर कोणी मानवी व्यक्ति आहे आणि तिच्या समवेत हालवर्ड अवकाशांत किंवा आकाशाच्या पोकळींत एक राजवाडा बांधून राहणार आहे हें सगळें प्रत्यक्षगत सत्य कसें मानावें? मानायचें म्हटलें तर हालवर्डचें चित्त भ्रमलें आहे आणि एका तरुणीच्या आकर्षणाने तो वेडा होऊन वरळतो आहे असें म्हणावें लागेल. परंतु खरोखर कांही तशी स्थिति नाही. जीवनांतील आजपर्यंतच्या अनुभवाने व्यवहारांतील यश हें कुचकामाचें, क्षणभंगुर यश आहे याचें ज्ञान त्याला झालें आहे. आणि त्यासाठी करावयाच्या धडपडीमध्ये भिन्न भिन्न परस्परविरोधी आशा-निराशांच्या कैचींत सापडून माणसाचा, निदानपक्षीं असामान्य प्रतिभावंत माणसाचा कसा कोंडमारा होतो याचा त्याला प्रत्यय आलेला आहे. आणि म्हणून या प्रवृत्तिमार्गांचा त्याग करून, आपल्या आंतरिक प्रतिभेच्या जोरावर आणि तिच्या संगतींत जगांत सर्वांत सुंदर असें जें कांही – हिंदी परंपरेंत ब्रह्म म्हणा – त्याच्या चिंतनांत आणि साधनेंत रममाण होण्याचा त्याने अखेर निर्णय केला आहे. त्यासाठी विषयलालसा, प्रवृत्तीची ओढ, एवढेंच नव्हे तर हृदयाची कातरता या सर्वांचा त्याने त्याग केला आहे. असा प्रतीकात्मच खुलासाच त्याच्या जीवनाशीं व विचारांशीं सुसंगत आहे.

आणि याचें जणू प्रतीक म्हणूनच सामान्यांना असामान्य – अशक्य – कोटींतील

वाटणारी गोष्ट तो करायला प्रवृत्त झाला आहे; जीवनाच्या वर, आकाशांतील पोकळींत उंच चढून जाण्याचा त्याने निर्धार केला आहे. त्या कामीं परावृत्त करणारी त्याची पत्नी, त्याच्याकडून हें घडणेंच शक्य नाही असा त्याचा उपहास करणारा तरुण पिढीचा प्रतिनिधी राग्नार ब्रोव्हिक, आपण बांधविलेल्या घराच्या टोकावर स्वतः त्यालाच पायाडावरून कसें चढतां येत नाही याची हेटाळणी करण्यासाठी तेथे जमा झालेले गावांतले लोक, या सर्वांची अपेक्षा चुकीची ठरवून हालवर्ड घरावर पायाडामार्गे चढूं लागतो. असें तो करणार, तें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं आहे, तसें त्याने करण्यांतच पुरुषार्थ आहे असें म्हणणारी फक्त हिल्डा काय ती एकटी एक आहे. आणि याचमुळे त्याची ती प्रतिभा-शक्तीच आहे, असें पुन्हा म्हणावेंसें वाटतें. तिच्याच तोंडून उद्गार बाहेर पडतो,

"पाहा, पाहा, कसे ते वर, आणखी वर, आणखी वर चालले आहेत."

त्याच्या प्रतिभाशक्तीशिवाय त्याच्या या यशस्वी प्रयत्नाने अन्य कोणाचेंही समाधान तेथे होण्यासारखें नव्हतें. त्याची पत्नी तर त्याला खाली हाक मारण्यासाठी जिवाची तडफड करीत होती!

शेवटीं हालवर्ड अगदी टोकाच्या फळीवर पोचतो. राग्नार म्हणतो, "जें कांही घडतें आहे तें सर्वथा अशक्य आहे; माझा माझ्या डोळ्यांवरच्च विश्वासच बसत नाही."

यावरही हिल्डारूपी प्रतिभाशक्तीच उत्तर देते, "हो! सामान्यांना जें अशक्य तेंच तो या क्षणीं करतों आहे. आणखी कोणी नाही तुम्हांला तेथे जोडीला दिसत?"

यश आणि अंतही —

राग्नार कोणी नाही म्हणतो. पण हिल्डाला तेथे आणखी कोणाचा तरी साक्षात्कार होतो. त्या ठिकाणीं हालवर्डची आणखी कोणाशीं तरी झटापट चालली आहे असें तिच्या दृष्टीला दिसतें. आणि अवकाशांतून सुस्वर गीतध्वनि पण तिला ऐकूं येतात. त्या महाप्रभावी गीताने ती बेभान होते; आनंदभराने ओरडूं लागते – "पाहा, पाहा, आपली टोपी काढून ते तुमच्या – आमच्यासाठी हवेंत फिरवताहेत. हं – फिरवा – फिरवा – कारण या क्षणीं आता तुमचा खरा कार्यभाग झाला आहे – तुमची सारी घड-पड – रुखरुख संपली आहे!"

परंतु हिल्डाच्या या शब्दांचा प्रत्यक्षांत अगदी निराळाच प्रत्यय येतो. हालवर्डची जीवनांतील सारी धडपड निराळ्याच रीतीने संपते. आपल्या यशाच्या परिसीमेच्या टोकावर पोचलेला असतांनाच त्याचे डोळे फिरतात आणि तो खाली कोसळतो. दगडांच्या राशीवर आपटून त्याचा देह छिन्नविच्छिन्न होतो. त्याचें खरोखरच सारें कांही संपतें!

हालवर्ड सोलनेसचा अशा रीतीने झालेला अंत जसा भीषण आहे तसाच तो आपल्या मनाची कालवाकालव करणाराही आहे, त्याच्याबद्दल आपल्याला हळहळ वाट-विणारा आहे. परंतु ही हळहळ त्याच्यापेक्षा आपलें स्वतःचें कांहीतरी गमावलें

सृष्टींतील किती एक अनाकलनीय शक्तींच्या परिणामीं असें झालें याबद्दलची आहे. लिंकनचाही अंत असाच झाला. गाल्सवर्दीच्या स्टीफनचाही अंत असाच झाला. एनिमी ऑफ् दि पीपल या नाटकांतील इब्सेननेच रेखाटलेला नायक डॉ. स्टॉकमन याचाही जरी अंत झाला नाही तरी जीवनांत तो पराभूत झाला तोही असाच.

श्रेष्ठ प्रतिभावंत परंतु श्रेयसाधनाला पारखा --

या नाटकांतील इब्सेनचा नायक, हालवर्ड सोल्नेस हा या कोटीच्या नायकांतला आहे. आपण पाहिलेंच आहे की, त्याच्या चित्ताला समाधान लाभलेलें नव्हतें. कर्तृत्ववान आणि प्रतिभावंत असूनही आपण जें कांही केलें तें विनाकिमतीचें, व्यर्थ, सगळा फाफटपसारा, अशा करुण जाणिवेप्रत तो पोचला होता. इब्सेनची सगळी गोष्ट जशीच्या तशी खरी माना किंवा त्यांतला गर्भित प्रतीकात्मक अर्थ स्वीकारा – दोन्ही पक्षीं हालवर्डची ही निराशा आपल्याला जाणवेल. प्रथम त्याने धर्मश्रद्धेच्या खोल भावनेने देवाचीं मंदिरें उभारलीं; म्हणजेच तो धर्मविषयक संघटना करीत राहिला. अनुभवांतीं त्यांतून माणसाचें कल्याण होत नाही या कल्पनेने त्याला घेरलें; कारण त्याचा स्वतःचा अनुभव तसा होता. इतका तो धर्मनिष्ठ, परंतु त्या धर्माने – परमेश्वराने त्याचें ऐहिक हित काय केलें ? त्याचें घर जळालें, मुलें मेलीं, त्याची पत्नी जिवंत असून मेल्यासारखी झाली. तिच्या सहवासाची उणीव भरून काढण्यासाठी आणि आपली विषयलालसा पुरी करण्यासाठी त्याने अन्य स्त्रियांकडे दृष्टि वळविली; परंतु यांतही त्याच्या धर्मकल्पनांनी आणि तज्जन्य नीतिकल्पनांनी त्याला खरेंखुरें सुख मिळूं दिलें नाही. जें कांही करावयाचें तें भयभीतपणें, चोरून, ॲलीनला संशय येऊं नये अशा रीतीने आणि स्वतःचें मनच आपण पाप करीत आहोंत अशी टोचणी लावीत असतांना; त्यामुळे त्या विषयोपभोगांतील रमणीयता सर्व नष्ट झाली.

अखेर धर्माची कास सोडून मानवाच्या सुखाची संपादना करण्याचा त्याने मार्ग स्वीकारला. परंतु मानवाच्या कल्याणाचा मार्ग मानवालाच मानवत नाही असा अनुभव येऊन त्याचा तो मार्गही निरर्थक ठरूं लागला.

हेंही नाही आणि तेंही नाहीं अशा अवघड परिस्थितीमध्ये तो सापडला. आणि याच वेळीं वार्धक्यामुळे आपली प्रतिभाशक्ति कमजोर होते की काय अशा शंकेने त्याला पछाडलें. त्याचमुळे उगवत्या पिढीचें त्याला भय वाटूं लागलें.

श्रेयसाधन गवसलें —

अशा मानसिक वादळाच्या अवस्थेमध्ये असतांना महाप्रयासानें, दीर्घ विचाराने त्याची प्रतिभा जागृत झाली. त्याच्या ठिकाणीं तिने जणू नवीन स्फूर्ति जागृत केली; त्याच्या विचारांतील गोंधळ नाहीसा केला. भीतीमुळे त्याच्या ठिकाणीं आलेली अनुदारता त्यामुळे लोपून नव्या पिढीला पुढे येण्याला वाव आपण मोकळेपणाने दिला

पाहिजे हें कटु असलें तरी सत्य तत्त्व त्याने जाणलें. आणि मग अखेरीला कसलीही कातरता मनाला शिवूं न देतां, आपल्या प्रतिभासामर्थ्यानुरूप, निर्मम वृत्तीनें – हिंदी तत्त्वज्ञानाच्या भाषेंत फलाकांक्षा न बाळगतां – अतीव सुंदरम् असें कांहीतरी साध्य करण्याचा निर्धार केला.

पण फार उशीरा —

लिअरप्रमाणेच त्याच्या ठिकाणचीं सर्व किल्मिषें जळून गेलीं. परंतु लिअरप्रमाणेच त्याची आयुष्याची मर्यादा संपली होती. त्यामुळे आपल्या प्रतिभेचा नवा प्रचंड आविष्कार साधण्याच्या अंतिम क्षणींच त्याचा अंत झाला. एका अर्थी असा अंत होणें, उच्चतम कार्य करीत असल्याच्या क्षणींच, पराभवाची छाया न पडतां मरण येणें ही केवढी भाग्याची गोष्ट आहे. परंतु तशीच ती किती भीषण आणि करुणास्पद गोष्ट आहे.

इब्सेनचा हा नायक जात्याच कलावंत आहे. त्यामुळे त्याचें प्रत्येक भाषण अत्यंत रेखीव आहे, ताशीव आहे. सामान्य व्यवहारांत माणसें इतकें रेखीव, ताशीव फारच क्वचित बोलतात. परंतु नाट्यसृष्टींत नाटककाराचीं पात्रें अशीं बोललीं तरच नाटककाराचें ईप्सित नीटनेटकेपणें पार पडणें शक्य आहे. हिल्डाची हालवर्डवर जस-जशी अधिकाधिक छाप पडूं लागते, त्याची प्रतिभाशक्ति जागृत होऊन त्याला नवीन तत्व-दर्शनाचा प्रकाश जसा दिसूं लागतो तशी त्याची भाषा नुसती रेखीव आणि ताशीवच राहत नाही, तर तिच्यामध्ये अपूर्व लयबद्ध असा झणत्कार आपल्याला जाणवूं लागतो. आणि तिसऱ्या अंकाच्या अखेरीस त्याच्या आणि हिल्डाच्या संभाषणांत मधुर काव्याचा अनुभव आल्याशिवाय राहत नाहीं. भावनेचा आविष्कार काव्यांतच व्हावयाचा याचा हा असा प्रत्यय आपण पाहिलेल्या इब्सेनच्या दुसऱ्या दोन नाटकांतही आपल्याला आला. हेडा गाब्लरमध्ये टेसमनसारखा रुक्ष पंडितही अखेर काव्यमय भाषण करूं लागल्याचें आपण पाहिलें. डॉक्टर स्टॉकमनचें त्या फसलेल्या सभेंतील भाषणही काव्यमयच होतें; पण त्याची पत्नीही कांही प्रसंगीं काव्यांत बोलूं लागलेली आपण पाहिली. याचा अधिक उत्कट प्रत्यय या नाटकांत यावा हें स्वाभाविकच आहे; कारण हालवर्ड सोलनेस हा मुळी काव्यात्मच माणूस आहे; शिवाय त्याच्या भावनांवर पडलेला ताणही जास्त खळबळ उडविणारा आहे. त्यामुळे आपल्या जीवनांतील वैफल्याची आणि अखेर हरपलेलें श्रेय गवसल्याची कथा हालवर्ड हिल्डाला केवढ्या तरी भावनाभरानें सांगतो. प्रत्यक्ष रंगभूमीवर हा प्रवेश वठविणारा कुशल नट असेल तर रसिक श्रोत्यांचीं अंतःकरणें तो केवढीं तरी पुलकित करील. पण रसिक श्रोत्यांना मुग्ध करणारीं हीं संभाषणें एखाद्या अभ्यासजड शिक्षकाला कदाचित विनाकारण पाल्हाळाचीं वाटण्याचा संभव आहे, अस्वाभाविक आणि निव्वळ प्राक्कथनपर वाटण्याचा संभव आहे. परंतु म्हणूनच भरतमुनीने सांगितलें आहे की, नाट्यगृहांत अशा अभ्यासजडांचें कांही काम नाही.

प्रकरण तेरावें

इलेक्ट्रा – लॅव्हिनिया

आतापर्यंत चोविसशे वर्षांपूर्वीच्या ग्रीक नाटककारांपासून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीच्या नॉर्वेतील इब्सेनपर्यंतच्या निरनिराळ्या नाटककारांच्या कांही करुण नायकांचा विचार आपण केला; विसाव्या शतकांतले गाल्सवर्दी आणि ड्रिंकवॉटर यांच्याही नायकांची ओळख आपण करून घेतली. आता विसाव्या शतकांतलाच परंतु आपल्याकडे अलीअलीकडेच विशेष प्रसिद्धि आणि कांहीशी मान्यता पावलेला अमेरिकन नाटककार युजीन ओनील या नाटककाराच्या एका करुण नायकाच्या चित्रणाचा – वस्तुतः ही स्त्री आहे – आपण थोडासा मागोवा घेऊं या.

युजीन ओनील हा अमेरिकेंत मोठा आदराचा आणि कौतुकाचा विषय होऊन गेलेला आहे. रंगभूमीच्या आधुनिकतम तंत्राचा तो एक प्रवर्तक मानला जातो. देखाव्यांचें यांत्रिकीकरण, प्रकाशवितरणाचा अत्यंत कुशल उपयोग, मुखवटे वापरून एकाच व्यक्तीच्या अंतरंगांतील भावना आणि बाहेर जगाला दाखविण्याच्या भावना यांचें एकाच क्षणीं दर्शन करविणें आणि पूर्वीच्या धार्मिक किंवा नैतिक मूल्यांच्या अधिक्षेपासह कांही नवीनच आगळें जीवनदर्शन ध्वनित करणें – ज्यामध्ये अनिर्बंध उपभोगस्वातंत्र्य आणि विश्वामध्ये कांही एका – ब्रह्मासारख्या – सर्वव्यापी तत्त्वाचा आविष्कार आणि प्रभाव आहे, अशी पुसट ओळख जणू मोठ्या प्रयासानंतर पहिल्यांदाच झाल्याचें ध्वनित्व करणें, इत्यादि गोष्टींमुळे अमेरिकेंत त्याचें फार मोठें कौतुक झालेलें आहे.

अलीकडे आपल्या सर्वच मालाची – यांत अमेरिकन म्हणून म्हटली जाणारी सुधारणा आणि संस्कृति यांचा समावेश झालाच – खूप प्रसिद्धि करण्याचा चंग बांधून अमेरिकेने आपल्या देशांत वार्ताप्रसृतीचें एक मोठें संस्थानच जणू थाटलें आहे व त्याच्यातर्फे – परंतु प्रत्यक्षांत तसें उद्घोषित मात्र न करतां – आपल्या राष्ट्राच्या गुणी पुरुषांबद्दल खूप माहिती प्रसृत करण्याची खटपट चालविली आहे. तिचाच एक भाग म्हणजे आपल्यापुढील प्रस्तुत नाटककार युजीन ओनील याच्या प्रसिद्धीची गोष्ट आहे.

अर्थात या नाटककाराच्या ठिकाणीं गुणवत्ता पुष्कळच आहे. त्याचें नाट्यतंत्र, प्रत्यक्ष त्याच्या रंगभूमीचें दर्शन होण्याची सोय व सवड नसणाऱ्या वाचकांना प्रथमदर्शनीं कांहीसें दुर्बोध वाटण्यासारखें असलें, तरी तो एक श्रेष्ट नाटककार आहे हें त्याच्या नाटकांचा परिश्रमपूर्वक अभ्यास केल्यानंतर मान्य करावें लागेल; मात्र जगांतील सर्वश्रेष्ठ नाटककारांच्या मालिकेंत त्याला बसवितां येईलच असें नाही हें ध्यानांत ठेवून.

ग्रीक नाट्याची फार मोठी छाया —

अशा या नाटककाराच्या Mourning becomes Electra 'इलेक्ट्राने सुतकी – दुःखी – राहणेंच शोभून दिसतें,' या नांवाच्या नाटकाची नायिका लॅव्हिनिया हिच्या चरित्र-चित्रणाची चर्चा या प्रकरणांत करावयाची आहे. १९२९–३१ च्या दरम्यान आणि आधुनिक तंत्राचा वापर करण्यासाठी जीव टाकणाऱ्या एका प्रभावी नाटककाराने लिहिलेल्या या नाटकावर ग्रीक नाट्यवाङ्मयाची फार मोठी छाया पडलेली आहे; नव्हे तीन श्रेष्ठ ग्रीक नाटककारांनी विशेष आत्मीयतेने आणि हिरीरीने हाताळलेली, इलेक्ट्रा या स्त्रीची कथाच, तितक्याच हिरीरीने आणि त्या ग्रीक नाटककारांना जें करतां आलें नाही तें करून दाखविण्याच्या ईर्ष्येने ओनीलने आपल्या या नाटकांत हाताळली आहे. त्यासंबंधी थोडेंसें तुलनात्मक पुढे लिहावयाचें आहे. तूर्त येथे एवढेंच पाहूं या की, ग्रीक नाट्यवस्तूच्या रूढीप्रमाणे या करुण नाट्याची उभारणीही तीन पोटनाटकांच्या संचाने करण्यांत आली आहे. तसेंच ग्रीक नाटकांमध्ये व्यक्ति आणि प्रसंग यांची ओळख करून देण्यासाठी व कथावस्तूच्या परिणतीचे टप्पे दाखविण्यासाठी जसा कोरस – गायकवृंद – वापरला जात असे तशाच पद्धतीचा, कथावस्तूशीं अर्थाअर्थी फारसा कांही संबंध नसलेल्या व्यक्तींचा उपयोग या नाटकाच्या तिन्ही अंतर्गत पोटनाटकांत युजीन ओनीलनेही केला आहे.

पहिलेंच पोटनाटक गृहागमन या नांवाचें आहे. त्याच्या पहिल्या प्रवेशांत पार्श्वभूमीला मॅनन घराण्याचा मोठा किल्लेवजा वाडा, ग्रीक नाटकांतल्या प्रासादाच्या भिंतीप्रमाणें, परंतु पडद्यावर चित्रित केलेला दिसत असतो. आणि त्याच्या पुढच्या परिसरांत आपल्यापुढे मॅनन कुटुंबाचा म्हातारा, सत्तरीला आलेला, विश्वासू नोकर सेठ व त्याच्याकडे मॅननवाडा पाहण्यासाठी आलेली कांही खेडवळ मंडळी येतात. त्यांच्या संभाषणांतून आपल्याला कळतें कीं, अमेरिकन यादवी युद्धामध्ये त्या वाड्याचा मालक एझरा मॅनन हा गेलेला आहे; लिंकनचा जनरल ग्रँट याच्या सैन्यांतला तो एक मोठा शूर सेनानायक आहे; त्याचा स्वभाव गर्विष्ठ, भावनाशून्य आणि कठोर असा आहे; पण मॅनन घराण्याच्या स्वभावाचीच ती एक ठेवण आहे; आज गेलीं दोनशे वर्षेपर्यंत मॅनन घराण्याने त्या परिसरांत अप्रतिहत श्रेष्ठता उपभोगली आहे, त्याचा तो परिणाम आहे. नुसता सेनानीच तो नाही. कायद्याचा अभ्यास करून न्यायासनावरही त्याने काम केलेलें आहे. सेठला त्याच्याबद्दल फार अभिमान आहे; विशेषतः त्याच्या कर्तृत्वाबद्दल.

एझराच्या कर्तृत्वाचें नुसतें कथन मात्र —

झालें; पहिल्या पोटनाटकांत ज्याचा करुण आणि भीषण अंत नाटककार दाखविणार आहे त्याची एवढीच पूर्व हकीकत आपणाला नाटककाराने आपल्या अन्य दुय्यम पात्राकरवी सांगितलेली आहे. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या चतुर्थांमध्ये, गडकऱ्यांच्या

मृत्यूनंतर दहा वर्षांनी पुऱ्या झालेल्या या नाटकांत या अत्याधुनिक नाटककाराला आपल्या नायकाच्या कर्तृत्वाचा अधिक भरीव आणि प्रत्यक्ष प्रसंगांनी दाखविलेला पुरावा देण्याचें प्रयोजन वाटलें नाही, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

सेठकडे आलेल्या एका पाहुणीकडून आपल्याला कळतें की, एझरा मॅननची बायको कांही मॅनन घराण्याला शोभेशी नाही; ती अस्सल अमेरिकन नाही; ती फारशा सधन कुटुंबांतून आलेली नाही. त्याच्या पाहुणेमंडळीकडून आपल्याला आणखी असेंही कळतें की, सेठचें आपल्या मालकिणीशीं कांही बरें नाही; तिचा त्याला रागच आहे.

परंतु ही मालकीण असामान्य सुंदर स्त्री आहे हें या पाहुण्यांपैकी स्त्रियांनासुद्धा मान्य करावेंच लागतें, ती त्यांच्या नजरेला थोड्याच वेळाने पडते तेव्हा. परंतु तिच्यावरही मॅनन घराण्याची छाप पडलेलीच आहे; तिचा चेहरा चमत्कारिक तुसड आहे. जणू आपल्या गुह्य गोष्टींचा कांही केल्या कोणाला थांगपत्तासुद्धा लागूं द्यायचा नाही अशा सावधतेने, हा तिरसटपणाचा मुखवटाच या मंडळींनी परिधान केलेला असावा; असा अभिप्राय पाहुण्यांमधील एक प्रौढ स्त्री व्यक्त करते; आणि यांतून गोष्टी निघून मॅनन घराण्याच्या लोकांमध्येही कांही भानगडी आहेत हें उघड होतें. आपणाला प्रस्तुत अशी त्यांतली एक भानगड म्हणजे एझरा मॅननचा चुलता डेव्हिड म्हणून एक होता, आणि त्याने घरच्या कुणबिणीच्या पोरीशीं श्रृंगारचाळे केले होते व त्या मुलीवर बाईट प्रसंग आणलेला होता.

लॅव्हिनियाचें पहिलें दर्शन : चिंताग्रस्त —

सेठ त्या मंडळीला वाडा दाखवूं पाहत होता खरा; परंतु त्याला खरोखर शोधायचें होतें एझरा मॅननची मुलगी लॅव्हिनिया हिला. तिला घरची सर्व मंडळी व्हिनी अशी लाडकी हाक मारीत असतात. थोड्याच वेळांत व्हिनी या मंडळीला दिसते. ती आपल्या आईसारखीच चमत्कारिक ठशाच्या चेहऱ्याची असली तरी आईसारखी ती कांही सुंदर नाही. लॅव्हिनिया पुढे दिसतांच सेठ आपल्या पाहुण्यामंडळीला बाजूला जाण्यास सांगतो आणि लॅव्हिनियाशीं बोलण्यासाठी पुढे सरसावतो. कारण, आपल्या लाडक्या व्हिनीला त्याला तार ऑफिसांतून कळलेली बातमी सांगायची असते की, आघाडीवरून एझरा मॅनन परत येणार आहे; कारण यादवी युद्धाची आता अगदी अखेरची घटका आली असल्याची बातमी होती.

पण ही आनंदाची बातमी ऐकूनही व्हिनी गंभीर राहते याचें सेठला फार नवल वाटतें. गेले दोन दिवस व्हिनी घरीं नव्हती; आणि आता परत येते ती अशी गंभीर होऊन, याचा अर्थ सेठला समजत नाही. आपण आपला मित्र पीटर आणि त्याची बहीण हेझेल यांच्याकडे गेलों होतों या तिच्या सांगण्यावर सेठचा विश्वास बसणें शक्य नव्हतें. कारण पीटरलाच मुळी लॅव्हिनिया कोठे गेली होती हें माहीत नव्हतें. आपण न्यूयॉर्कला गेलों होतों हें तिला कबूल करावें लागतें. परंतु तिला कशाची तरी चिंता

लागून राहिलेली आहे हें सेठला उघड दिसत होतें; तथापि त्याबद्दलच्या खुलासा त्याला मिळूं शकत नव्हता.

अखेर लॅव्हिनिया मोकळेपणाने कांही बोलणार नाही हें पाहून सेठच तिला एक धोक्याची सूचना देऊन ठेवूं पाहतो. या ठिकाणीं कॅप्टन ब्रँट या व्यक्तीचें नांव प्रथम आपल्या कानांवर येतें. सेठला आणि व्हिनीला ही व्यक्ति चांगली परिचित असली पाहिजे. या ब्रँटच्या चेहऱ्यांत आणि मॅनन घराण्यांतील पुरुषांच्या चेहऱ्यांत फार मोठें साम्य आहे ही एक विशेष गोष्ट सेठ व्हिनीच्या नजरेला आणून देऊं पाहत असतो.

परंतु त्या गोष्टीची अधिक परिस्फुटता होण्यापूर्वीच पीटर आणि हेझेल तेथे येतात. हेझेल विशेषतः ओरिनची – लॅव्हिनियाच्या भावाची चौकशी करण्यासाठी आलेली असते. तिला कितीएक महिन्यांत ओरिनकडून पत्र नव्हतें. त्यामुळे तो जखमी वगैरे झाला असावा असें तिला भय वाटत होतें. परंतु लॅव्हिनियाच्या वडिलांकडूनही त्याबद्दल कांहीच कळलेलें नसल्याने हेझेल परत जाऊं लागते. जातां जातां हेझेल लॅव्हिनियाची थोडी थट्टा करते त्यावरून पीटर लॅव्हिनियाला लग्नाची मागणी घालायला आतुर झालेला असतो हें आपल्या ध्यानांत येतें.

लॅव्हिनियाला प्रेमाचा तिटकारा वाटतो ! —

हेझेलला ओरिनची एवढी काळजी वाटते याचें कारण तिचें ओरिनवर प्रेम होतें. परंतु ओरिनचें प्रेम हेझेलवर आहे का असा प्रश्न पीटर लॅव्हिनियाला करतो. परंतु हा प्रेमाचा विषय निघतांक्षणीं लॅव्हिनिया एकदम ताठल्यासारखी होते आणि तोडून म्हणते, "प्रेमबीम मला कांही समजत नाही; आणि समजण्याची मला इच्छाही नाही : प्रेमाचा मला तिटकारा वाटतो."

तिचा हा आवेश पाहून पीटर दचकतो; असें असेल तर माझी मागणी मी करायलाच नको असें तो म्हणतोही. ही मागणी पूर्वी त्यानें केलेली होती. तिने लढाई संपेपर्यंत त्याला थांबायला सांगितलें होतें. आता तो तिला पुन्हा विचारूं इच्छीत होता ? कारण आता लढाई संपली होती. परंतु लॅव्हिनिया उत्तर देते, "मी कुणाशीं केव्हाच लग्न करूं शकत नाही. मला माझ्या घरींच राहिलें पाहिजे. माझ्या वडिलांना माझी खरी गरज आहे." "त्यांना त्यांची बायको नाही का ?" या प्रश्नावर लॅव्हिनियाचें उत्तर आहे, "पण तिच्यापेक्षा माझी गरज त्यांना अधिक आहे."

नाटकांतील भयानक घटनांचें मुख्य बीज—

या नाटकांतील सर्व भयानक घटनांचें बीज मुख्यतः लॅव्हिनियाच्या या बदललेल्या मनोवृत्तीमध्ये आहे. इतक्या लहान वयांत तिला (तिचें वय अवघें एकोणीस आहे) प्रेमाचा तिटकारा आला आहे आणि कर्तव्याचा, पित्याच्या रक्षणाच्या कर्तव्याचा उमाळा आलेला आहे. प्रेम आणि कर्तव्य या बाबतींतील तिच्या मनांतील झगडा, त्यांतही

वस्तुतः मन प्रेमानुकूल असूनही तें दडपून टाकून कठोर कर्तव्याच्या भ्रामक (नाटककाराच्या दृष्टीने) कल्पनेच्या मागें लागलेल्या लॅव्हिनियाच्या जीवनांतील झगडा हें या नाटकाचें साध्य आहे, आणि त्याचें दर्शन घडविण्याच्या दृष्टीनेच नाटकांतील सर्व घटना आहेत.

लॅव्हिनियाला प्रेमाचा जर इतका तिटकारा वाटूं लागला होता, तर मग हा कॅप्टन ब्रँट त्यांच्या घरीं भेटीला येणार होता तो कशासाठी असा पीटरचा जरा खोचकच प्रश्न आहे. परंतु मला तर त्याचें तोंडसुद्धा पाह्यची इच्छा नाही असा लॅव्हिनिया त्याबद्दलच्या खटकाच तोडून टाकते. त्याच्यावर तिने एवढें क्रुद्ध कां व्हावें हें पीटरला समजत नाही. त्याच्या दृष्टीने ब्रँट चांगला मोहक तरुण होता, सगळ्या तरुणी त्याच्यावर फिदा होत असत, तो मोठा रोमॅन्टिक आहे, वगैरे जेव्हा पीटर सांगतो, तेव्हा " रोमॅन्टिकपणाचा त्याचा धंदाच आहे " असें कडवटपणाने बोलून लॅव्हिनिया तो विषयच अटकावते.

ती दोघें आणखी पुढे कांही बोलणार तोच लॅव्हिनियाची आई क्रिस्टाईन त्या ठिकाणीं येते. तिला वास्तविक लॅव्हिनियाशीं बोलावयाचें आहे. म्हणून पीटरला ती जास्त वेळ थांबायला सांगत नाही. तो जातो म्हणतो, त्यासरशी ती त्याला निरोप देते.

आई आणि मुलगी यांमधील पहिली चकमक—

मायलेकींच्या बोलण्यांत प्रेम तर दूरच, पण पेचपाचच फार आहेत. मुलगी आपल्याशीं बोलण्याबसण्याचें टाळते असा आईचा आरोप आहे. आपण जिवंत असतांना मुलीने घरांत स्वतःचा अधिकार गाजवूं पाहावा या गोष्टीचें तिला वैषम्य आहे. आणि ज्या ज्या वेळीं ती न्यूयॉर्कहून परत घरीं येते त्या त्या वेळीं आपलें हें घर तिला एखाद्या दफनभूमीसारखें वाटूं लागतें, अशी आपली अंतःकरणाची भावना ती बोलून जात आहे. पण स्वतःला सावरून क्रिस्टाईन मग कॅप्टन ब्रँटचा विषय काढते. ब्रँटची तिची न्यूयॉर्कमध्ये गाठ पडली होती व आज त्याने मॅनन वाड्यांत पाडुणा म्हणून येण्याचें कबूल केलें होतें. तिची अपेक्षा – इच्छा – लॅव्हिनियाला यामुळे आनंदच व्हावा; त्याच्याकडे तिचें मन आकर्षिलें जावें. " कां, तुझा आपला एकटा एक प्रेमवीर पीटरच ? " असें कांहीसें खवचटपणानेच ती लॅव्हिनियाला विचारते.

क्रिस्टाईनने खूपशीं फुलें गोळा करून आणलेलीं असतात. तीं या पाहुण्याच्या निमित्तानेच असलीं पाहिजेत, असा टोमणा लॅव्हिनिया आईला देते. आणि जवळजवळ धमकीच्या स्वरांत विचारते " पिताजी लौकरच घरीं येतील ठाऊक आहे ना ! "

पण याचा आईवर कांही परिणाम होत नाही. कारण येणार येणार अशा बातम्या पुष्कळदा येऊन त्या कधी खऱ्या झाल्याच नव्हत्या. पण या वेळीं वडील खास येणार या लॅव्हिनियाच्या म्हणण्यावर, " करूं या तशी आशा " असें अश्रद्धेने ती म्हणते. म्हणजे आता नवरा परत येणें अशक्य असाच तिचा जणू विचार ध्वनित होतो. त्यावर लॅव्हिनिया चिडते. पण, या इथे भांडण नको, घरांत जाऊन बोलूं, असें म्हणून कांहीशी

भेदरलेल्या अवस्थेंतच क्रिस्टाईन वरांत जाते. कारण, मला तुझ्याशीं चांगलेंच बोलायचें आहे, असें कांहीसें भेदकपणें लॅव्हिनियाने तिला बजावलेलें असतें.

कॅप्टन ब्रँटची कुळकथा —

यानंतर सेठ ब्रँटबद्दल कांही सांगणार होता तें ऐकायला लॅव्हिनियाला संधि मिळते. सेठचें म्हणणें, कॅप्टन ब्रँट हुबेहुब एझरा मॅननसारखा दिसतो; एवढेंच नव्हे तर तो ओरिनसारखाही दिसतो; साऱ्या मॅनन पुरुषांचा आणि त्याचा तोंडावळा सारखा आहे. विशेष म्हणजे लॅव्हिनियाचा चुलत आजोबासारखा. या डेव्हिडचें नांवसुद्धा मॅनन कुटुंबांत घ्यायला बंदी होती. लॅव्हिनियाच्या जन्मापूर्वीच त्याला घरनिकाल व्हावें लागलें होतें. त्याचा आणि घरच्या तरुण मोलकरिणीचा संबंध आला. ती गर्भवती झाली. त्यासाठी घर सोडून जावें लागल्यावर त्या दोघांनी लग्न केलें. त्यांना एक मुलगा झाला, तोच हा ब्रँट असावा असा सेठचा तर्क. त्या मुलाचें वयही ब्रँटइतकेंच म्हणजे छत्तीस वर्षांचें असतें. शिवाय नांवाचें साम्य. त्या कुणबिणीचें नांव होतें मेरी ब्रँटोम. त्यावरूनच हें नांव पडलें असावें. कारण मॅनन घराण्याचें नांव लावून येथे येण्याची त्याची छाती नाही व्हायची. सेठचें हें बोलणें ऐकून लॅव्हिनिया त्याच्यावर चिडते. परंतु सेठ तिला चांगली ओळखीत होता. म्हणून ब्रँट आल्यावर या गोष्टीची शहानिशा करून घ्यायला तो तिला बजावतो. एकदम तूं असा असा आहेस असें बोल, म्हणजे येईल सगळें बिंग बाहेर, अशी युक्तीही तो तिला सांगतो.

लॅव्हिनिया ब्रँटला भडकावते —

एवढ्यांत ब्रँट येतो. आई कामासाठी घरांत गेली आहे अशी लॅव्हिनिया बतावणी करते. मग आपण मोठे भाग्यवान आहोंत असें म्हणून ब्रँट तिच्याशीं प्रेमलगट करू पाहतो. परंतु ती अशा कांही चमत्कारिक आवाजाने लढाई संपत आल्याची गोष्ट काढते की, ब्रँट दचकतोच. लढाईवरून तिचे वडील परत येण्याची गोष्ट निघते. आपलें बापावर फार फार प्रेम असल्याचें जेव्हा लॅव्हिनिया सांगते तेव्हा मुलाचें आईवर आणि मुलीचें बापावर प्रेम नैसर्गिकपणेंच असतें हा फ्रॉइडचा सिद्धांत नाटककार ब्रँटच्या तोंडून वदवितो. न्यूयॉर्कमध्ये क्रिस्टाईनच्या परवानगीने आपण दोघांनी ती चांदणी रात्र किती गमतीची घालविली याचें रसभरित वर्णन तो करीत असतां, "तर मग त्या रात्रीं माझें तुम्हीं चुंबन घेतलेंत त्यासाठीही आईची परवानगी घेतलेली असेल!" असें लॅव्हिनिया त्याला आकस्मिकपणें चमकावते. बोलण्यावरून बोलणें निघतांना साउथ सी आयलंडमधील ब्रँटच्या रोमँटिक जीवनाचा उल्लेख येतो. त्या वेळीं "तेथल्या त्या नग्न स्त्रिया तुम्हांला फार फार आवडत असत असें तुम्ही म्हणालात नव्हे?" असें लॅव्हिनिया त्याला पुन्हा एकदा चमकावते.

"परंतु आतां तुझी भेट झाल्यानंतर तें रोमँटिक भटकें जीवन, तीं स्वप्नें संपलीं

आहेत, आतां माझ्यापुढे त्या रात्रीं आपण दोघेंच चांदण्यांत फिरलों ही एकच गोष्ट नाचत राहील" असें लघळपणाने म्हणून तो तिचा हात हातांत घेऊं पाहतो. त्या वेळीं लॅव्हिनिया एकदम उसळते आणि "मला हात लावूं नका. तुमची ती लायकी नाही. थापाडे आहांत तुम्ही. बाकी एका हलकट कामकरी बाईच्या मुलाकडून खोट्या रोमँटिक बातांशिवाय दुसरें काय ऐकायला मिळणार म्हणा!" असें ठणकावते.

ब्रँटच्या मनांतील सूडाची जाणीव —

त्यासरशी ब्रँट बेभान होतो. आपल्या आईचा अपमान त्याला सहन होत नाही. सारे मॅनन लोक भ्याड, असा तो आरोप करतो. आपल्या बापाला – डेव्हिडला – मोठा नीतीचा आव आणून बाहेर घालविणारा अब्राहाम मॅनन तरी काय पुण्याचा पुतळा होता? त्याचेंही आपल्या आईवर प्रेम होतें. तें साधलें नाही म्हणून सूडबुद्धीने डेव्हिडला त्याने घराबाहेर हाकललें. दारिद्र्याने होरपळत असतां डेव्हिड दारुडा बनला. नशेंत एक दिवस त्याने आपल्या आईवर हात टाकला. तेव्हा चिडून जाऊन आपण शेगडीच्या झाऱ्याने बापाच्या मस्तकावर प्रहार केला. त्याचा डेव्हिडच्या मनावर फार परिणाम झाला. तो मुखस्तंभ बनला आणि अखेर मुलाची क्षमा मागून त्याने आत्महत्या करून घेतली. त्यानंतर आईची दशा फार कठीण झाली. एझरा मॅननकडे तिने मदतीची याचना केली. पण त्याने उत्तरच दिलें नाही आणि मेरी ब्रँटोमचा अंत झाला. एझरा मॅननने जणूं तिचा खूनच केला. आणि त्या क्षणीं आपण एझराचा सूड घ्यायचा असें ठरविलें.

ही सर्व हकिकत मोठ्या आवेशाने आणि तळमळीने ब्रँट लॅव्हिनियाला सांगतो. पण त्यामुळे त्याच्याविषयी सहानुभूति वाटण्याऐवजी, "म्हणून या सूडाचें साधन या नात्याने तुम्ही आमच्या आईचा उपयोग करतां आहांत काय?" असा उलट चिडून ती प्रश्न करते. आपल्या आणि क्रिस्टाईनच्या संबंधाबद्दल लॅव्हिनियाला कल्पना असेल अशी शंकाही ब्रँटला नव्हती. म्हणून तो गोंधळून जातो. "परंतु मला सर्व कांही ठाऊक आहे; त्याबद्दलच मी ताबडतोब जाऊन तिच्याशीं बोलणार आहें. तोपर्यंत तुम्ही आंत येऊं नका, इथेच बाहेर थांबा" असा जणू त्याला हुकूम करून लॅव्हिनिया घरांत निघून जाते. जातांना ती त्याच्याकडे इतक्या प्रचंड तिटकाऱ्याच्या भावनेने रोखून पाहते की, तो अवाक् होतो.

आईचा मत्सर जागा होतो—

ब्रँटबद्दलचा सेठचा तर्क खरा असल्याचें कळून लॅव्हिनिया अत्यंत संत्रस्त झालेली असते. त्याशिवायही संत्रस्त होण्याला तिला आणखी फार मोठें कारण असतें. त्यामुळे मॅनन घराण्याच्या वाड्यामधील त्या बैठकीच्या दिवाणखान्यांतील आपल्या पित्याची मोठी तसबीर पाहून तिला त्याच्याबद्दल फार हळहळ वाटते. त्यासाठीच आपल्या आईला बोलावून आणून ती सांगते की, आपण न्यूयॉर्कला जाऊन आईच्या

दुर्वर्तनाबद्दलचा सर्व तलास लावलेला आहे. न्यूयॉर्कला क्रिस्टाईन आपल्या वडिलांना भेटण्याच्या निमित्ताने जात असली तरी तिचा खरा हेतु आपला प्रियकर झालेला ॲडाम ब्रँट याला भेटण्याचा असतो, हा लॅव्हिनियाने निर्धाराने केलेला आरोप अखेर क्रिस्टाईनला मान्य करावा लागतो. आपलें आपल्या नवऱ्यावर मुळीच प्रेम नाही, त्याचा आपल्याला तिटकारा वाटतो हें सत्य क्रिस्टाईन मुलीला कांहीं आडपडदा न ठेवतां सांगते. तिचें त्याच्यावर कधीच प्रेम नव्हतें असें नाही. पण अनुभवाने त्या प्रेमाचें रूपांतर किळस वाटण्यांत झालें होतें. पति-पत्नी हें नातें त्यांच्यामध्ये मानणें हा निव्वळ भ्रम होता. एझरा क्रिस्टाईनच्या शरीराचा मालक होता, मनाचा नव्हे. तिला हाच तिरस्कार मुलीबद्दलही वाटत होता. ती आपल्या रक्ताची नव्हेच, शंभर टक्के नवऱ्याच्या रक्ताची आहे असें वाटून ती तिचा तिटकारा करीत होती. ओरिन मात्र तिला स्वतःचा वाटत होता. आणि याच गोष्टीचा हेवा वाटून लॅव्हिनियाने मुद्दाम त्याला लढाईवर जायला प्रवृत्त केलें असा तिचा आरोप होता व त्यामुळे तिचा व्हिनीवर अधिकच राग झाला होता. आता तिला ॲडाम ब्रँटच्या निमित्ताने पुन्हा खरें प्रेम गवसलें असें वाटत होतें. पण हाही तिचा भ्रम होता. केवळ सूडभावनेने ब्रँट तिला भ्रष्ट करूं पाहात होता हें लॅव्हिनियाने सांगितल्यावर मात्र क्रिस्टाईनचा गोंधळ उडतो. लॅव्हिनिया बापाला हा प्रकार सांगणार या भीतीने ती पछाडते. परंतु बापाला अलीकडे आजारपण जडलें असतांना त्याच्या मनाला वेदना व्हाव्यात असें लॅव्हिनियाला कांही करायचें नसतें. आणि म्हणून "ब्रँटला तूं सोडणार असशील तर मी तोंड मिटून घेईन" असें ती आईला म्हणते. परंतु यामुळे क्रिस्टाईनचा मत्सर जणू पेट घेतो. "ब्रँट खरोखर तुलाच हवा आहे. पण त्याचें तर प्रेम आहे माझ्यावर. तो कांही तुला प्राप्त होत नाही. या चिडीने आमच्या दोघांच्या प्रेमामध्ये बिब्बा घालायला तूं प्रवृत्त झाली आहेस" असा घोर आरोप क्रिस्टाईन लॅव्हिनियावर करते. परंतु अखेर, मी सांगतें त्याप्रमाणे ब्रँटचा तूं त्याग करणार की नाही, असा खडा सवाल लॅव्हिनियाने तिच्यापुढे टाकल्यावर "आणि नाही त्याग केला तर?" असें उलटून क्रिस्टाईन तिला विचारते. परंतु त्याचा उपयोग नव्हता. ती ब्रँटबरोबर पळून गेली तर ब्रँटला कोठेही नोकरी मिळणें एझरा मॅनन अशक्य करील. घटस्फोट न मिळाल्याने ब्रॅटशीं तिला लग्नही करतां येणार नाही. लौकरच ती म्हातारी होईल. आणि ब्रँट मग तिचा तिरस्कार करूं लागेल. वगैरे परिणाम जे लॅव्हिनियाने सांगितले त्यांतील अर्थ तिला पटतो. आणि म्हणून मोठ्या प्रयासाने, आपण आज फक्त एकवारच ब्रँटला भेटूं; मग पुन्हा त्याचें नांव काढणार नाही हें ती मान्य करते; परंतु तुलाही त्याचा लाभ होऊं देणार नाही असें त्याच वेळी ती लॅव्हिनियाला बजावते.

भावी अनर्थाची सूचना —

आपलें त्याच्यावर प्रेमच नाही मुळी हा लॅव्हिनियाचा दावा ती मुळीच मान्य

करीत नाही. लॅव्हिनिया पुन्हा तिला निक्षून सांगते की, "पहिल्या क्षणापासून मीं त्याचा तिटकारा केला. फक्त खरें काय तें समजून घेण्यासाठी थोडें नरमाईने मी त्याच्याशीं वागलें." पण क्रिस्टाईन अविश्वासाने स्मित करते. तेव्हा "मनांत मांडे खाऊं नकोस. तुझा संशय येण्यापुरतें वडिलांना आणि ओरिनला मीं आधीच कळवून ठेवलें आहे" असें जेव्हा लॅव्हिनिया तिला सांगते, तेव्हा स्वतःवरचा ताबा सुटून ती "याचा परिणाम कांही निराळाच झाला तर त्याबद्दल सर्वथा तूं जबाबदार आहेस" असें लॅव्हिनियाला बजावण्यासाठी अर्धवट बोलायला सुरुवात करते आणि लगेच जीभ चावते. लॅव्हिनियाला संशय येतो. क्रिस्टाईन सारवासारव करूं पाहते खरी; परंतु तिचा हेतु कांहीतरी निराळा आणि भयाण असावा अशी शंका तिच्या एकंदर आविर्भावावरून आपल्याही मनांत चमकून गेल्याशिवाय राहत नाही.

लॅव्हिनिया निघून गेल्यावर क्रिस्टाईनचें आणि ब्रँटचें संभाषण होतें तेव्हा ही शंका किती खरी आहे हें स्पष्ट होतें. लॅव्हिनियाला सर्व कांही समजलें आहे; आपली दोघांची ताटातूट होण्याची शक्यता आहे; अशा वेळीं ब्रँट आपल्याला सोडणार नाही याची क्रिस्टाइन खातरजमा करून घेते. आणि मग आपला बेत मोठ्या लुकेपणाने त्याच्या गळीं उतरविते.

एझरा मेननच्या वधाचा कट —

या लढाईत एझरा मारला जाईल आणि तो घरीं परत येण्याची भीति राहणार नाही या कल्पनेनें तिने ब्रँटला घरीं बोलावलें; पण ती चूक ठरली. "माझी प्रार्थना ऐकून देवाने या लढाईत त्याचा काटा काढला असता तर!" असें ती हताशपणें म्हणते. त्यावर ब्रँट सहजच म्हणतो, "तो संभव आता संपला." त्यावर "हो, त्या मार्गाने तो संभव संपला!" अशी आपली भूमिका क्रिस्टाईन ध्वनित करते. तिच्या या धाडसाने ब्रँट चकितच होतो. त्याला हा दुसरा मार्ग मान्य नव्हता. त्याऐवजी उघडउघड एझराच्या समोरून आपण तिला घेऊन जाऊं आणि त्याने प्रतिकार केला तर मग त्याला ठार करूं अशी कल्पना तो मांडतो. आणखीही कांही पर्याय तो सुचवितो. परंतु त्या प्रत्येकाचें वैय्यर्थ्य क्रिस्टाईन त्याला पटवून देते. आणि आता एझराचा मृत्यु झालाच पाहिजे आणि तोही इतक्या आकस्मिक झाला पाहिजे की, त्याचें हृदयाचें दुखणें बळावून त्याला मरण आलें असेंच सर्वांना वाटलें पाहिजे, हें त्याच्या मनावर ती ठसविते. आपल्या डॉक्टर बापाच्या घरचें वास्तव्य क्रिस्टाईनने व्यर्थ घालविलें नव्हतें. त्याच्या ग्रंथसंग्रहालयांतील एक ग्रंथ वाचून असें आकस्मिक मरण येण्याजोगें औषधही तिने मनाशीं योजून ठेवलेलें होतें. त्याचें नांव एका चिठोऱ्यावर लिहूनच तिने तयार ठेवलें होतें. तें ब्रँटजवळ देऊन ती त्याला बोस्टनला गेल्यावर कांहीना कांही करून तें औषध मिळवून पाठवायला सांगते. अशा भ्याड मार्गाने एझराचा नाश करूं नये असें अजूनही ब्रँटचें मन सांगत असतें. पण क्रिस्टाईन त्याला इतकें खोचून आणि टोचून बोलते,

त्याचें प्रेम आणि त्याची सूडाची भावना हिणकस असल्याबद्दल इतकें हिणवते की, शेवटीं तो तिच्या म्हणण्याला रुकार देतो. त्याच क्षणीं गांवांतील तोफेचा आवाज होतो. एझरा मॅनन आल्याची निदर्शक ती तोफ असली पाहिजे असें क्रिस्टाईनचें पापी मन तिला सांगतें आणि ब्रॅटला ती तत्क्षणीं निघून जायला सांगते. तो निघून गेल्यावर कांहीशा सैतानी आनंदाने ती जेव्हा उद्गारते, "ॲडाम, आता मात्र तूं माझ्या पक्का तावडींत सापडलास. आता मी म्हातारी झालें आणि माझें सौंदर्य लोपलें तरी मला सोडून देण्याचें धाडस तुझ्या हातून होणार नाही" तेव्हा या स्त्रीच्या स्वार्थी चापल्याची खरी कल्पना येऊन आपलें चित्त थरारतें.

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीला लॅव्हिनिया एझरा मॅनन येणार म्हणून वाट पाहत बसलेली असते. तेथे येऊन तिची आई तिला थोडेंफार छेडण्याचा प्रयत्न करीत असते. तिच्या कांहीशा निष्काळजी भाषणावरून तिच्या मनांत कांहीतरी डाव आहे एवढा संशय लॅव्हिनियाच्या मनांत येतो. पण क्रिस्टाईन तिला दाद लागूं देत नाही. मात्र ब्रॅटला वश करून माझ्यापुढे नाक खाजविण्याची संधि मी तुला मिळूं देणार नाही हें तिला बजावायला ती चुकत नाही. एवढ्यांत अपेक्षेनुसार एझरा मॅनन घरीं येऊन पोचतो. तो येतांक्षणीं लॅव्हिनियाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात. परंतु असें डोळ्यांतून पाणी काढायचें नाही या आपल्या घरच्या शिकवणुकीची एझरा तिला आठवण करून देतो! बापलेकीच्या भेटीनंतर क्रिस्टाईन शांतपणें पुढे होते आणि याही प्रसंगीं "आम्हीं तर तुमच्या येण्याची आज आशाच सोडली होती" असें मुद्दाम ताणलेल्या अवस्थेंत म्हणते. क्रिस्टाईनमध्ये कांहीतरी विशेष बदल झाला आहे; पहिल्यापेक्षा ती अधिक सुंदर – पूर्वीची ती सुंदर असूनही – दिसूं लागली आहे हें एझराच्या ध्यानांत येतें.

परंतु लॅव्हिनियाला एझरा बाजूला होऊन एकटा भेटावयाला हवा होता. त्यासाठी, त्याने व आपण चांदण्यांतच बसून गप्पा माराव्यात ही क्रिस्टाईनची कल्पना बाजूस सारून लॅव्हिनिया त्याला आंत चलून कांहीतरी खाण्याचा आग्रह करते. परंतु एझरा तिचें न ऐकतां तेथेच बसतो. लिंकनच्या मृत्यूमुळे त्याला यादवी युद्धांतील विजयाबद्दल उत्साह वाटत नसतो. तो म्हणतो,

"माणसाला ठार करण्यांत यशस्वी झाल्याने माणसाचा विजय कुचकामाचा करतां येईल. पण ठार मारण्यांत यश मिळविल्याने माणसाचा झालेला पराभव नाहीसा करतां येईल काय!"

लिंकनच्या वधाच्या उल्लेखाने मायलेकी दोघी अस्वस्थ —

वास्तविक लढाईमध्ये दक्षिणेकडील संस्थानांचा झालेला पराभव लिंकनला ठार मारून थोडाच धुऊन निघणार आहे एवढेंच एझराला म्हणायचें होतें. परंतु ठार करण्याबद्दलच्या त्या उल्लेखामुळे त्या दोघींची मात्र चलबिचल होते; लॅव्हिनियाची आश्चर्याने आणि क्रिस्टाईनची, यांना आपल्या मनांतला कांही सुगावा तर लागला नाही ना या शंकेमुळे वाटलेल्या अस्वस्थतेमुळे.

त्यांतून ओरिनचा विषय निघतो. ओरिन जखमी झाला होता. त्याच्या मेंदूला विकार होऊन पुष्कळ महिने तो इस्पितळामध्ये होता. त्याच्याबद्दल आता काही काळजी राहिली नव्हती; परंतु स्वतःचा हृदयविकार मात्र एझराला फार अस्वस्थ करीत होता. डॉक्टरांनी त्याला सक्त ताकीद दिली होती की, कसली काळजी करतां कामा नये आणि अति श्रम किंवा अति भावनाधीनता टाळली पाहिजे.

याचा फायदा घेऊन क्रिस्टाईन त्याला आंत जाऊन झोपीं जायला सुचविते. एझरालाही ती सूचना पसंत पडते. पण याने लॅव्हिनियाचा साराच व्यूह ढासळूं पाहत होता. म्हणून ती त्याला झोपीं जायला जाऊं द्यायला तयार नाही. आपल्याला तर अजून किती किती बोलायचें आहे, किती तरी सांगायचें आहे, असें ती लाडिकपणें म्हणूं लागते आणि "कॅप्टन ब्रँटबद्दल तर सगळेंच सांगायचें राहिलें आहे" ती आईच्या देखत घट्टपणें म्हणते.

ब्रँटबद्दल आरोप, प्रत्यारोप —

पण तिचा डाव क्रिस्टाईन तिच्यावरच उलटवते. हा ब्रँट आपल्या येथे कशाला आला होता या एझराच्या प्रश्नाला, "तें व्हिनीलाच विचारा; तिचाच तर तो आजकालचा प्रणयबिंदु आहे; चांदण्यामध्ये तीं दोघेंच फिरायलासुद्धा जात असतात." या क्रिस्टाईनच्या मिस्किल बोलण्याने एझरा थोडासा बुचकळ्यांत पडतो खरा. परंतु एकदाच आपण त्याच्याबरोबर चांदण्यांत फिरायला गेलों; पण तो माणूस वाईट नजरेचा आहे, ज्या त्या स्त्रीच्या मागे लागणारा आहे, हें ध्यानांत येतांच आपण त्याला चार हात दूर ठेवलें. पण त्या माणसाची हद्द एवढी की, आईचेंच स्वतःवर प्रेम बसलें आहे, असें सध्या त्याच्या मानाने घेतलें आहे, असें म्हणून लॅव्हिनिया डाव आईवर उलटवूं पाहते.

परंतु या गोष्टीची चर्चा या वेळीं अशा ठिकाणीं करायला आपण तयार नाही; माणूस दमून भागून आलें असतांना त्याला काय सांगावें, काय नाही याची या पोरीला काडीची अक्कल नाही, असा आव आणून क्रिस्टाईन लॅव्हिनियाला हतप्रभ करते; त्यांच्यामध्ये बाचाबाची होऊं लागते. तेव्हा एझरा मध्ये पडतो आणि त्याच्या आदेशामुळे शेवटीं लॅव्हिनियाला तेथून निघून जावें लागतें. परंतु जातां जातां, "हरकत नाही बाबा! पण कांही झालें तरी तुमच्याबद्दल मी सदैव दक्ष राहीन." असें म्हणतच लॅव्हिनिया निघून जाते.

क्रिस्टाईनची साखरपेरणी —

अशा रीतीने एझराशीं एकट्याशीं बोलण्याची संधि क्रिस्टाईनला मिळते. याचा फायदा घेऊन त्याच्या मनांतील संशयाचें वारें दूर करण्याचा ती बराचसा यशस्वी प्रयत्न करते. न्यूयॉर्कमध्ये वडिलांच्या घरीं ब्रँटची आपली भेट झाली. व्हिनीला मागणी घालण्यासाठी मॅनन वाड्यांत येण्याची त्याने इच्छा दर्शविली. मग नाही कसें म्हणावयाचें? गावांत तरी लोक हेंच म्हणतात. शिवाय न्यूयॉर्कहून तो यायचा, म्हणजे

तितकेंच बाबांची वार्ता समजायला साधन. तुमची आणि ओरिनची काळजी; त्यांतच बाबांच्या आजाराची काळजी भरीला. त्यामुळें आला तर येईना का एखाद दुसरी वेळ हा गृहस्थ आपल्या घरीं, असें वाटलें. अशा तऱ्हेची साखर ती इतक्या कसबीपणाने आणि आपला डाव यशस्वी होत आहे या समाधानाने पेरते की, अखेर तिचा संशय घेतल्याबद्दल तिची क्षमा मागण्याइतका एझरा विरघळतो. एव्हढेंच नव्हे, तर त्याच्या मनांत कधी नव्हे तें प्रेम तिच्याबद्दलचें उसळून जागें होतें. यादवी युद्धांत सदैव हाणामारीच्या वातावरणांत राहिल्यामुळे त्याचें मन हळवें झालेलें असतें. आपण आपल्या पत्नीशीं तुटकपणें वागलों; तिचें प्रेम आपल्यावर नाही या भावनेने आपण युद्धावर गेलों. आशा की, त्यांत तरी मरण येईल. अशा या प्रेमशून्य जीवनाचा आता त्याला कंटाळा आला होता. म्हणून क्रिस्टाईनचें प्रेम पुन्हा मिळवावयाचें असा निर्धार करून तो घरीं परत आला होता. वगैरे गोष्टी मोठ्या भावनाभराने तो क्रिस्टाईनला सांगू लागला. तिच्या त्या वेळच्या वृत्तींत या गोष्टी ऐकण्याची तिला मुळीच उत्सुकता नव्हती. म्हणून "पुरे की हें पुराण" असें तिने म्हणावें; परंतु विनयाने ती तसें म्हणते असें मानून एझराने आपली कहाणी पुढे चालूच ठेवावी, असें थोडा वेळ होत राहिलें.

एझराचीं जीवनानंद भोगण्याचीं भोळीं स्वप्नें —

स्वतःच्या हुमेपणाच्या, मोकळेपणाने प्रेम व्यक्त न करण्याच्या स्वभावदोषाची तो कबुली देतो. पण आता आपल्यांत बदल झाला आहे असें सांगून तो म्हणतो, "तुझ्या सुद्धा आता ध्यानांत येईल की, मला मेल्या जिण्याचा, मृत्यूचा वीट आला आहे. मला जगायचें आहे, जीवनाचा आनंद उपभोगायचा आहे. असा मला बदललेला पाहून तुझें पुन्हा माझ्यावर प्रेम बसेलही!"

अरेरे, भोळा जीव! जगून जीवनानंद भोगण्याचीं स्वप्नें तो अशा स्त्रीजवळ बोलत होता की, जी त्याचा जीव कशा रीतीने संपवितां येईल याच्या योजना आखण्यांत गढून गेलेली होती. म्हणून ती त्याला पुन्हा पुन्हा गप्प राह्यला सांगत होती. आपण गप्प गप्प राहतो म्हणून नेहमी रुष्ट होणारी ही स्त्री, आज आपण मोकळेपणाने बोलत असतां आपल्याला गप्प राहा म्हणते याचें त्याला मोठें नवल वाटत होतें. शेवटीं त्याला गप्प करण्यासाठी "तुमच्या माझ्यामध्ये कसलाही पडदा नाही, माझें तुमच्यावर खरें-खुरें प्रेम आहे" असें क्रिस्टाईन मानभावीपणाने सांगते. त्यासरशी "हें खरें असेल तर त्यासाठी मी तुझ्यावरून माझे पंचप्राण ओवाळून टाकीन" असें भावनाभराने म्हणून तो तिला गाढ मिठीमध्ये घेतो. आणि याच वेळीं लॅव्हिनिया निजायच्या तयारीच्या पोशाखांत, पायांत कांही न घालतां तेथे येते.

लॅव्हिनियाचा चित्ताचा भडका —

बापाच्या सांगण्यावरून मघांशीं आंत परत जात असतांना लॅव्हिनियाच्या अंगाचा

नुसता तिळपापड होतो. तिला बापाला जें सांगायचें होतें तें तर साधलेंच नाही. उलट क्रिस्टाईननेंच त्याला पूर्ण आपलासा केला होता. जन्मापासून आईच्या प्रेमाला ती वंचित होती. बापाचें प्रेम तिच्यावर होतें तेंही आतां क्रिस्टाईनने हिरावून घेतलें होतें. यामुळे आईबद्दलच्या द्वेषाने तिच्या अंगाचा भडका उडतो. तिच्यासारख्या निर्लज्ज व्यभिचारी स्त्रीवर बापाने प्रेम करावें याचा तिला विस्मय वाटतो, संताप येतो. म्हणून, कांही झालें तरी बापाला सर्व कांही आपण सांगून टाकणारच अशा आविर्भावानें ती बाबा, बाबा, म्हणून हाका मारते. परंतु त्याने जवळ येऊन, काय म्हणून विचारतांच तिचें अवसान संपून, "कांही नाही, जाता जातां तुमचा निरोप घ्यायचा राहिला," असें कांही तरी म्हणून ती झोपायला म्हणून निघून जाते.

आईने तिचें बापाचेंच प्रेम नाहीसें केलें होतें असें नव्हे. आणखीही एका प्रेमाला ती आईमुळे वंचित झाली होती. त्याबद्दलचा स्फोट आपल्याला पुढे पाह्यला मिळायचा आहे.

एझराच्या डोक्यांत लख्ख प्रकाश —

यानंतर या पोटनाटकांतला चवथा आणि शेवटचा अंक. क्रिस्टाईनची समजूत की, एझरा मेनन शांत झोपला आहे. त्याच्या शेजारीं आणखी निजून राहण्याची तिची तयारी नव्हती. म्हणून ती काळोखांतच अंथरुणांतून उठून पलीकडच्या दालनांत जाऊं लागते. पण एझरा जागा असतो. क्रिस्टाईन चोराटपणें आपल्यापासून निघून चाललेली पाहून, तिला आपली संगति नको हें तो उमजतो आणि अस्वस्थ होतो. तिला तो दिवा लावायला सांगतो आणि "आपला नवरा म्हातारा झालेला पाह्यला नको म्हणून तुला काळोख आवडतो काय, असें तिला विचारतो. त्यावरून त्यांचें थोडें खारटतुरट बोलणें होतें. इतक्यांत एझराला कसेंसेंच होऊं लागतें. त्यासरशी जणू आपल्याला हवें तेंच घडतें आहे अशा उत्साहाने क्रिस्टाईन उद्गारते, "म्हणजे – तुमच्या हृदयाचा झटका तर नाही ना – म्हणजे तुम्ही आता – अं – अंथरुण धरणार तर!"

क्रिस्टाईनची ब्रँटवरील प्रेमाची कबुली —

तिच्या त्या बोलण्याने एझराच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडतो. श्रमाने आपल्याला हृदयाचा झटका यावा यासाठीच ती त्या दिवशीं आपला देह त्याला द्यायला तयार झाली असली पाहिजे, हा आरोप तो तिच्यावर करतो. "माझ्या मरणाचीच तूं वाट पाहत आहेस – म्हणजे मोकळी झालीस तूं" असेंही तीव्रपणाने म्हणतो. ती चिडखोरपणाने काही उत्तर देते. तेव्हा "देहदान म्हणजे कांही प्रेम नव्हे; प्रेम नसतांना तुझा उपभोग घेण्याऐवजी एखाद्या कुंटणखान्यांत मी गेलों असतों तर बरें झालें असतें, येथपर्यंत बोलण्याची त्याची मजल गेल्यावर भान न राहून "तुमच्यावर प्रेम करावें असें तुम्ही कधी वागलाच नाहीत, वीट; अगदी वीट येऊन गेला आहे मला तुमचा" असें म्हणून, "मेरी ब्रँटोमचा मुलगा कॅप्टन ब्रँट याच्याबद्दल सगळें मी

खोटें तुम्हांला सांगितलें; त्याच्यावरच्च माझें प्रेम आहे, म्हणून मींच त्याला इथे बोलावलें होतें " असें ती त्याला साफीसाफ सांगून टाकते.

याचा व्हायचा तोच परिणाम होतो. त्याला फार मोठी कळ येते. औषध मागतो तो. त्यापूर्वी तिला मारण्यासाठी तो हात उगारतो त्या वेळीं त्याला झटकून क्रिस्टाईन आपल्या खोलींत गेलेली असते. तेथून परत येतांना ती आपली विषाच्या गोळ्यांची वाटली घेऊन आलेली असते. त्याचें औषध शोधल्याचें सोंग ती करते, त्याला संशय येऊं नये म्हणून. आणि त्याला ती आपल्याजवळच्या गोळ्या देते. त्या घेतां घेतांच एझरा मॅननची घालमेल होऊं लागते. आपल्याला नेहमीचें आपलें औषध दिलेलें नाही हें तो ओळखतो आणि " व्हिनी, धाव " असें तो ओरडतो.

विषप्रयोग : अंत—

त्याची हाक प्रत्यक्ष ऐकून नव्हे, तर स्वप्नांत त्याची भयंकर हाक आपण ऐकली असें वाटून लॅव्हिनिया याच क्षणीं तेथें येते. एझराची नाडी पाहते. " ही अपराधी-औषध नव्हे " असें अर्धवट बोलून एझरा क्रिस्टाईनकडे बोट दाखवितो आणि त्याचा अंत होतो.

त्याने क्रिस्टाईनकडे बोट दाखवून असें कां म्हटलें हें लॅव्हिनिया क्रुद्ध होऊन आईला विचारते. मीं सांगितलें त्यांना, ॲडाम माझ्या प्रेमाचा आहे म्हणून, हें तिचें उत्तर ऐकून " तर मग तूंच त्यांचा खून केलास " असें लॅव्हिनिया म्हणते. तथापि औषध नाही असें तो कां म्हणाला याचा खुलासा तिला झालेला नसतो. इतक्यांत आता-पर्यंतचा ताण सहन न होऊन, घेरी आल्यासारखें होऊन क्रिस्टाईन आपल्या खोलींत धडपडत जाऊं लागते. परंतु तिकडे पोचण्यापूर्वीच ती संपूर्ण मूर्च्छित होऊन पडते. त्या वेळीं तिच्या हातून विषाच्या गोळ्यांची कुपी खाली पडते. क्षणभराने ती कुपी लॅव्हिनियाच्या नजरेला पडते आणि तिला सर्व उलगडा होतो. आपल्या आईला याबद्दल शिक्षा कशी करावी याबद्दल ती किंकर्तव्यमूढ होऊन जाते !

तीन नाटकांच्या संचांतील यानंतरचें दुसरें नाटक " पारध," या नांवाचें आहे. ग्रीक नाटकांच्या पद्धतीप्रमाणें याच्याही सुरुवातीला त्या गांवांतील कांही माणसें एझरा मॅननच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त करण्यासाठी आलेलीं, परत जात असतांना बोलत असलेलीं दाखविलीं आहेत. त्यांच्यामध्ये मॅननच्या मृत्यूनंतरच्या प्रसंगांत क्रिस्टाईन-बद्दल दोन अनुकूलप्रतिकूल प्रवाह आढळून येतात. आपल्या नवऱ्याशीं ती मोठी एकरूप नव्हती आणि तिला तसें विशेष दुःख वाटलेलेंही दिसत नाही असा एक प्रवाह असतो. तर या मॅनन लोकांचें वर कांही दिसायचें नाही, असें म्हणून तिचें थोडें-फार समर्थन करणारा एक प्रवाह असतो. खुद्द एझरा मॅननबद्दल मात्र सर्वांनाच आदर वाटतोसें दिसतें. एक बाई तेवढी त्याच्या अहंकारीपणाबद्दल थोडासा उल्लेख करूं

पाहते. परंतु तिला सर्वजण खुळी ठरवल्यासारखें करतात. गांवाच्या डॉक्टरने मॅननला कधीच तपासलेलें नसतें. तथापि त्याला हृदयाचा विकार झालेला आहे असें, त्याला जें कांही वर्णन सांगण्यांत आलेलें असतें तेवढ्यावरून त्याने निदान केलेलें असतें; आणि त्या मंडळींपैकी आपल्या एका मित्राला आपली अगदी खास कल्पना म्हणून तो सांगतो की, रात्रीं स्त्रीसेवन एझराने केलें असलें पाहिजे आणि परिणामीं हृदयविकार बळावून त्याला मरण आलें असलें पाहिजे. अर्थात कोणी कांही म्हटलें तरी क्रिस्टाईन ही फार सुंदर स्त्री होती. आणि इतक्या दीर्घ कालानंतर एझरा घरीं आलेला. तेव्हा त्याला तरी दोष कसा देणार, याबद्दल त्या उभयता मुरब्बी प्रौढांचें एकमत होतें आणि अशा रीतीने निदान आजूबाजूच्या त्रयस्थांमध्ये तरी या आकस्मिक घटनेबद्दल कांही वाकडा संशय आलेला नाही एवढें दिद्दर्शित होतें.

ही मंडळी जातात त्याच वेळीं क्रिस्टाईन त्या ठिकाणीं येते. देखाव्याची जागा पूर्वीप्रमाणे वाड्यासमोरचें पटांगण हीच आहे. त्या तिऱ्हाईत माणसांप्रमाणे क्रिस्टाईनची अवस्था स्वाभाविक नाही. चेहऱ्यावर शांतता ठेवण्याचा प्रयत्न असला तरी डोळे लालभडक झालेले आहेत, गालावर खोल रेषा उमटल्या आहेत आणि अत्यंत ताण-लेल्या मनःस्थितींत ती आहे.

अशा वेळीं हेझेल तेथे येते. घरांत शोधूनही क्रिस्टाईन तिला सापडत नाही म्हणून ती बाहेर येऊन येणाऱ्या गाडीची वाट बसते. लॅव्हिनिया ओरिनला आणण्या-साठी पीटरला घेऊन गेलेली असते ती याच गाडीने येणार असते; याच गाडीने दोन दिवसांपूर्वीच त्यांचा पिता आला होता.

हेझेलचें मत कलुषित करण्याचा प्रयत्न —

हेझेलचें ओरिनवर प्रेम असल्याचें क्रिस्टाईनला माहीत असतें. लॅव्हिनियाच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन तिच्याविरुद्ध हेझेलचें मन कलुषित करायचें आणि तिला आपल्या बाजूला ओढून घ्यावयाचें असा प्रयत्न क्रिस्टाईन सुरू करते. लॅव्हिनिया इतकी कांही चमत्कारिक वागूं लागली आहे की, तिच्या वजनाखाली ओरिनला जाऊं देतां क्रामा नये हें ती हेझेलच्या गळीं उतरवूं पाहते. परंतु तिच्या पोटांत शिरून जास्त-कमी बोलण्याला अवसर मिळण्यापूर्वी ओरिन आणि लॅव्हिनिया पीटरसह तेथे येतात; परंतु तोंपर्यंत क्रिस्टाईन व हेझेल आंत गेलेलीं असतात. कारण स्त्रियांच्या पाविऱ्या-बद्दल कांहीतरी अनाहूत आणि असंबद्ध वाक्य क्रिस्टाईच्या तोंडून बाहेर पडलेलें असतें आणि म्हणून स्वतःला सावरून घेण्यासाठी ती हेझेलला घेऊन घरांत जाण्याच्या मिषाने वेळ काढीत असते.

ओरिनशीं एकट्याशीं बोलण्याचा लॅव्हिनियाचा प्रयत्न फसतो —

आपण आलों असतां आपल्या स्वागताला घराबाहेर कोणी नाही याचें ओरिनल

नवल वाटतें. या गोष्टीचा फायदा घेऊन ओरिनशीं थोडें एकीकडे बोलावें म्हणून लॅव्हिनिया पीटरला जरा पुढे व्हायला सांगते. बहिणीशीं एकीकडे बोलायला मिळाल्याने ओरिनला जरा बरें वाटतें. बापाच्या मृत्यूमुळे लॅव्हिनियाला फार मोठा धक्का बसला असणार हें त्याला समजूं शकतें. परंतु लढाईत रोज मृत्यूशीं गाठ असल्यामुळे मृत्यूमुळे विशेष कांही वाटूंच नये अशी जणू आम्हां शिपाई लोकांच्या मनाची घडणच बनविली जात असते, त्यामुळे पित्याच्या मृत्यूमुळे कांही विशेष फरक पडलासें भासतच नाही, अशी तो आपली बाजू मांडीत असतो. परंतु तो विषय सोडून मुद्यावर येऊन तो कॅप्टन ब्रँटची गोष्ट काढतो; पुन्हा हा गृहस्थ इथे आला तर त्याला मी चांगली अद्दल घडवीन असें तो म्हणतो.

परंतु आई त्याला लाडे लाडे करून फसवील ही भीति लॅव्हिनियाला वाटत असते. त्यावर तिचा आईशीं वृथा विरोध आहे असा आपला अनुभव सांगून ओरिन कॅप्टन ब्रँटबद्दल अधिक खोल चौकशी करूं लागतो, तोच क्रिस्टाईन बाहेर येते. ओरिनला एकट्याला बाहेर ठेवल्याबद्दल ती लॅव्हिनियाला दोष देते आणि ओरिनला जवळ ओढून त्याचें चुंबन घेते, त्याचे लाड करूं लागते आणि त्याला आंत घेऊन जाऊं लागते. त्या वेळीं लॅव्हिनिया "ओरिन, विसरूं नकोस" असा इषारा देते. क्रिस्टाईन कांही न बोलतां, "चला, इथे गारठा फार आहे" असें म्हणून ओरिनला घेऊन आंत जाते आणि क्षणाभरांतच धाडकन दार उघडून ती बाहेर येते.

आईविषयींच्या क्रोधाने ताठलेली लॅव्हिनिया —

बाहेर येऊन लॅव्हिनियाला ती तोडून बोलते. बाप मेल्याचें दुःख तिला व्हावें हें तिला सहज वाटतें; पण ती आपल्या दुखाचें फार बंड माजवीत आहे हें ती तिला बजावते. लॅव्हिनिया अगदी निश्चळ राहते. तोंडावाटे चकार शब्द काढीत नाही. क्रिस्टाईनची सरबत्ती चालूच असते. अजून लॅव्हिनियाचा मनांतला संशय कायम राहिलेला दिसावा याबद्दल नापसंती ती तीव्रपणें व्यक्त करते. आणि त्या दिवशीं रात्रीं आपल्या हातून झोपेच्या औषधाची बाटली खाली पडली, ती तिला सांपडली असली पाहिजे आणि त्याचा कशास कांहीतरी संबंध लावून तिने कांहीतरी संशयाचें जाळें उभें केलें असलें पाहिजे, अशी संपादणी ती करूं पाहते. तरीही लॅव्हिनिया तोंडांतून एक शब्द काढीत नाही. त्यामुळे उसळून क्रिस्टाईन म्हणते, "मला ठाऊक आहे सगळें. ओरिनला एकट्याला गाठायचें आणि त्याचे कान भरायचे, असा तुझा डाव आहे. आहे कां नाही; बोल," आणि ती लॅव्हिनियाचे खांदे धरून गदगदा हलविते. तरीपण लॅव्हिनिया शरीर लाकडासारखें ताठ ठेवून तिच्याकडे इतक्या निश्चळपणें डोळे रोखून पाहते की, क्रिस्टाईन दबून मागे घेते. आणि लॅव्हिनिया ताठ काठीसारखी, न बोलतांच निघून जाते. एवढ्यांत "आई तूं आहेस तरी कुठे" अशी ओरिनची हाक ऐकूं आल्यामुळे "आलें आं बाळ!" असें म्हणून क्रिस्टाईन आंत जाते.

आईमधील फरकाची ओरिनला जाणीव —

यापुढचा प्रवेश मॅननवाड्यांतील भोजनगृहांत घडतो. हेझेल आणि पीटर त्या ठिकाणीं लॅव्हिनिया व क्रिस्टाईन यांच्या दुःखामुळे आलेल्या अस्वस्थतेंत बसलेलीं असतात. ओरिन आई कोठे गेली म्हणून हुडकायला गेलेला असतो. त्याची हाक ऐकून बाहेर येऊन क्रिस्टाईन त्याला आंत घेऊन येते. अशीं तीं चौघे पहिल्या प्रवेशानंतर लगेचच त्या ठिकाणीं एकत्र येतात. आईने आपल्याला घरांत पोचविल्याबरोबर बाहेर पळून गेल्यासारखें करावें याचें ओरिनला मोठें नवल वाटतें. पुन्हा तुला डोळे भरून पाहिल्याबरोबर मला भरून आलें अशी ती संपादणी करते.

आपल्या आईच्यामध्ये कांही विशेष फरक पडला आहे ही गोष्ट ओरिनच्यासुद्धा लक्षांत आल्यावांचून राहत नाही. होती त्यापेक्षा ती कमी वयाची दिसूं लागली होती आणि सुंदर तर फारच दिसत होती. तसें तो म्हणतोही. त्यावर ओरिन लढाईवर जाऊन स्त्रियांच्याकडे लक्ष द्यायला शिकलाय असें जेव्हा क्रिस्टाईन म्हणते, तेव्हा एकदम गंभीर होऊन "युद्धाच्या वातावरणाबद्दल बायकांच्या मनांत वृथा रमणीय कल्पना असतात; त्यांना कांही काळ आघाडीवर पाठवून आणलें पाहिजे; म्हणजे युद्धांतल्या वीरपुरुषांबद्दलच्या त्यांच्या भ्रामक कल्पनांचा पूर्ण निरास होईल असें तो खोचून आणि कांहीसें हेझेलला टोचून म्हणतो. पण तिला हें बोलणें लागलें असेल या शंकेने तो फिरून थोडें गोड गोड बोलूं लागतो. परंतु पुन्हा युद्ध आणि त्यांतील हत्या आणि मृत्यु यावरच त्याची गाडी येते. हें चालू असतांना लॅव्हिनिया येऊन दारांत स्तब्ध उभी राहिलेली असते. युद्धांतील मृत्यूच्या गोष्टी ओरिनने काढतांच क्रिस्टाईन त्याला "पुरे बाबा, तुझ्या मरणाच्या गोष्टी" असें किळस आल्यासारखी होऊन म्हणते. नेमकी त्याच वेळीं लॅव्हिनिया त्याला "ओरिन, इकडे येऊन बाबांला एकवार पाहा पाहूं" असें म्हणून आपण मृताच्या घरांतच बोलत आहोंत याची बोचक आठवण त्या सर्वांना करून देते. तिचा आवाज म्हणजे जणू एझराचा हुकुमाचा आवाज आहे असा ओरिनला भास होतो. इतक्या करड्या आवाजांत लॅव्हिनिया बोललेली असते.

क्रिस्टाईन ओरिनला एझराच्या प्रेताकडे जाऊं देत नाही —

पण आई त्याला तिकडे जायला प्रतिबंध करते. "आल्यापासून अजून धडपणें तुझ्याशीं एक शब्दसुद्धा बोलायला मला संधि मिळाली नाही; म्हणून थांब थोडा" या आईच्या मायावी प्रेमळपणाला तो बळी पडतो आणि "आधी तूं – मग सगळें कांही" असें भावनाभराने म्हणून जातो. त्यावर उलट कडू बोलण्याची ऊर्मी कष्टाने दाबून "ठीक, पण मीं सांगितलेलें ध्यानांत ठेव," एवढेंच ओरिनला पुन्हा बजावून "आणि कोठे निघाली आहेस तूं?" या आईच्या प्रश्नाला एका शब्दानेही उत्तर न देतां लॅव्हिनिया निघून जाते. या विचित्र प्रसंगानंतर पीटर आणि हेझेल यांना पण तेथे

राहणें अडचणीचें होतें. म्हणून तीं दोघें कांही तरी सबब काढून निघून जातात. अशा रीतीने आतां ओरिनशीं एकट्याशीं बोलण्याची संधि क्रिस्टाईनला मिळते. अर्थात हें एक दिव्य आहे हें ती ओळखून असते आणि म्हणून कांही वेळ त्याच्याकडे ती नुसती टक लावून पाहतच राहते.

हेझेलबद्दल आईला नवीनच वाटूं लागलेल्या आपुलकीसंबंधी ओरिन थोडीशी तक्रार करतो. तिच्याशीं आपलें लग्न लावून टाकून आपली कटकट एकदाची दूर करण्याचा आईचा विचार असावा अशी शंका तो व्यक्त करतो. याच्या आधी आईला आपली आठवणसुद्धा होत नव्हती; सहा महिन्यांत फक्त दोनच पत्रें आपल्याला पाठवायला तिला सवड मिळाली, असेंही नाराजीपूर्वक म्हणून जवळजवळ त्यांतूनच उद्भूत असा, "हें कॅप्टन ब्रँट प्रकरण काय आहे" हा सरळ सरळ प्रश्नच तो आईला करतो.

लॅव्हिनियाविषयी ओरिनचें मत कुलुषित करण्याचा प्रयत्न —

क्रिस्टाईनची या प्रश्नाला तयारीच होती. लॅव्हिनियाचें आणि आईचें भांडण असलें तरी ती खोटें–जाणून बुजून खोटें–लिहील हें शक्य नाही, असें ओरिन म्हणत असतांनाही लॅव्हिनियानेच हें सारें कुभांड रचलें आहे असा दृढ दावा ती मांडीत राहते. मुलाला आपल्या बहिणीच्या स्वभावाची कल्पना नाही; तिने वडिलांना पत्रांत लिहिलें त्याहूनही नाही नाही ते भलते आरोपसुद्धा आपल्यावर करायला ती चुकायची नाही, इतकी ती नीच स्वभावाची आहे, हें त्याला सांगून "तुझें माझें खरें प्रेम–तूं खराखुरा माझ्या रक्ताचा; तिच्यामध्ये फक्त तुझ्या वडिलांचें रक्त" असें म्हणून त्याच्या मनांतील बापाविषयीचा विरोध त्याला न कळतां ती जागृत करते. त्याने तो खुलतो. आपणतुपण एक अशा पोरकट गोष्टी करूं लागतो. त्यावर आपलें हें मेतकूट सहन न होऊन लॅव्हिनिया आणि त्याचे वडीलसुद्धा त्यांचा हेवा करीत, तिटकारा करीत हेंही ती हळूहळू ओरिनच्या गळीं उतरवते. आणि "आपल्या या प्रेमांत बिब्बा घालण्यासाठी घाणेरडें कुभांड रचून तुझ्या मनांत विष कालवण्याचा व्हिनीचा डाव आहे" असा लॅव्हिनियावर ती आरोप करते.

एवढ्यावरच ती थांबत नाही. ओरिन युद्धावर गेल्यापासून लॅव्हिनिया पार बदलून गेली आहे; आधीचीच ती लहरी; त्यांत आता आणखीच भर पडली आहे आणि कोणाबद्दलही बोलायचें व्रत तिने घेतलें आहे; वडिलांच्या मृत्यूनंतर तर मला वाटतें खास खास तिचें डोकेंच फिरलें आहे असें सांगून त्याच्यावरही त्याचा विश्वास बसेल असें क्रिस्टाईन करते.

आणि मग कॅप्टन ब्रँटबद्दलची आपली बाजू ती त्याला सांगते. आपली त्याची माहेरीं सहज गाठ पडली. मूर्ख माणूस तो; न बोलावतांच चार वेळा तो आपल्या घरीं आला. लॅव्हिनियाला वाटायचें की तो आपलीच प्रेमयाचना करायला येतो आहे.

पण तिच्याकडे त्याचें लक्ष नाही हें तिला लौकरच कळून आलें. तो खरोखर येत होता आपल्या कुटुंबाशीं जमविलेल्या जोरावर अधिक चांगल्या जहाजावर नोकरी मिळावी म्हणून. एवढी काय ती खरी गोष्ट. पण या पोरीने त्यांतून नाही नाही तें कुभांड रचलें आहे. तिचा संशयखोर स्वभावच पाहा. या माणसाचें नांव ब्रँट;, झालें, तेवढ्याचा संबंध मेरी ब्रॅन्टोमशीं लावून, तो तिचा मुलगा असें ठरवून ही मुलगी मोकळी झाली. आणि शेवटीं मी त्याला भेटायला त्याच्या खोलीवर न्यूयॉर्कला जात होतें असा आरोप करण्यापर्यंत तिची मजल गेली. असें सांगून "म्हणजे याचा अर्थ मी, तुझी आई, एक केवळ बाजारबसवी, असें तुझ्या बहिणीचें म्हणणें" असा कांगावा क्रिस्टाईनने मांडला.

चोराची उलटी बोंब —

आपली बहीण इतकें नीचपणाचें काम करणार नाही हा ओरिनचा आक्षेप क्रिस्टाईन निर्धाराने खोडून टाकते. ती काय वाटेल तें करायला मागेपुढे पाहणार नाही. काय काय आपण सहन केलें आहे तिच्यापासून याची कुणाला कल्पना यायची नाही, असें म्हणून तिने या भलत्या भलत्या गोष्टी सांगितल्यामुळेच त्याच्या वडिलांना धक्का बसून त्यांचा मृत्यु झाला असावा असाही त्याचा तर्क व्हावा एवढी त्याच्या मनाची बैठक घडविण्यांत क्रिस्टाईनला यश येतें.

तथापि "मग न्यूयॉर्कमध्ये तुला भेटला म्हणून लॅव्हिनियाने लिहिलें तो कोण?" असा संशयाचा प्रश्न अजून ओरिनचा उरलेला असतोच. परंतु आपल्यावर प्रेम नाही त्याचें, म्हणूनच ओरिन असा संशयखोरपणाने बोलतो असा पुन्हा ती कांगावा करते. आणि अखेर "एवढ्यानेच संपलें नाही. तुझ्या वडिलांना विष देऊन मीं ठार केलें असाही आरोप करण्यापर्यंत व्हिनीची मजल गेलेली आहे," अशी चोराची उलटी बोंब क्रिस्टाईन धूर्तपणे आधीच ठोकते. "तिला माझी झोपेच्या गोळ्यांची बाटली सापडली तेवढ्यावरून तिचा हा भ्रमिष्ठ तर्क! त्यामुळे ही पोरगी काय करील अन काय नाही अशी भीति पडली आहे मला. पोलिसमध्येसुद्धा जाऊन वर्दी द्यायला ती कमी करायची नाही. तिचें ऐकून तूं तरी माझ्याविरुद्ध जाऊ नको बाबा. तुझाच काय तो मला आधार; दुसरें या जगांत मला आता काय उरलें आहे?" अशी ती त्याची प्रेमळ आळवणी करते.

तथापि क्रिस्टाईनचा धीर सुटतो—

आणि मग ओरिन तिच्या पूर्णपणे कह्यांत जातो. आपलें तिच्यावरच कसें प्रेम आहे, सदैव तिच्याशिवाय आपल्याला दुसरें कांही दिसतच कसें नसें वगैरे वगैरे खुळचट गोष्टी तो करूं लागतो. बापाच्या मृत्यूच्या प्रसंगाची सुद्धा त्याला आठवण न राहिल्यासारखी होते. "हेझेलसुद्धा आता मला नको, तूं आणि मी दोघेच एकमेकांला राहूं"

वगैरे बोलून आईच्या सौंदर्याबद्दल तो प्रशंसोद्गार काढीत असतांनाच लॅव्हिनिया पुन्हा दारांत येऊन बापाच्या शवाचें दर्शन अजून ओरिनने घेतलेंच नाही याची त्याला आठवण देते. आपलें हें कटु कर्तव्य करायचें राहिलेंच, कसें तरी तें पार पाडलेंच पाहिजे, अशा संत्रस्त आविर्भावाने ओरिन लॅव्हिनियाजवळूनच आंतल्या बाजूला जातो. लॅव्हिनिया पण त्याच्या मागोमाग जाऊं लागते. परंतु तिला थांबवून क्रिस्टाईन मुद्दाम वजावून सागते, "जा आता आणि ओरिनला काय वाटेल तें सांग. मीं त्याला तुझ्याआधीच सगळें कांही सांगून तयार केला आहे. त्याचें पक्कें मत बनवलें आहे मीं कीं, तुझें डोकें ताळ्यावर नाही. ॲडाम ब्रँटवर तुझें प्रेम होतें, तें साधलें नाही म्हणून सूडबुद्धीने तूं हें सारें कुभांड रचलें आहेस, हें त्याच्या मनावर मीं चांगलें बिंबवलें आहे. तेव्हा आता तुला काय वाटेल तें कर. गेलेंच प्रकरण कोर्टात, तर आपल्या आईचा प्रियकर हिरावूं पाहणारी तूं एक सूडबुद्धीची मुलगी आहेस असें तिथेसुद्धा सांगायला मी कमी करणार नाही. म्हणून तुला ओरिनला जें कांही सांगायचें असेल तें आता तूं खुशाल सांग."

असें बेफिकीरपणाने ती लॅव्हिनियाला सांगते खरी; परंतु त्याच वेळीं "ओरिनला तूं यांत गोवूं नको. आधीच तो आजारी आहे; त्याचा मेंदू हलका झालेला आहे. तो काय वाटेल तें करील. तसें झालें तर मला जगणें अशक्य होईल; मला जीव द्यावा लागेल" अशी क्रिस्टाईन तिची विनवणीही करते. इतकी ती परस्परविरोधी भावनांच्या झंझावातांत भांबावून गेलेली आहे. तरीही लॅव्हिनिया अवाक्षर बोलत नाही. तेव्हा क्रिस्टाईनचा धीर सुटतो आणि "तर मग मला ॲडामला भेटलेंच पाहिजे, त्याला सावध केलेंच पाहिजे" असें म्हणून थकून ती खुर्चीत आंग टाकून पडते.

लॅव्हिनयावर ओरिनचा माथेफिरूपणाचा आरोप —

तिसऱ्या अंकांत ओरिनचा आणि लॅव्हिनियाचा संवाद आहे. सुरुवातीला लॅव्हिनिया जरा आडवळणानेच बोलते. ओरिनला जो अपघात झाला होता त्यासंबंधी ती बोलणें काढते. परंतु त्या अपघाताची आणि त्याने मोठें शौर्य गाजविल्याबद्दल पसरलेल्या वार्तेची तो नुसती थट्टाच उडवितो. सगळी लढाई म्हणजेच एक नुसती थट्टा आहे असें त्याचें मत झालेलें असतें. सहज डोकें फिरल्यासारखें आम्हीं कांहीतरी केलें; आणि आम्हांला वीरपुरुष ठरविण्यांत आलें; अशी थट्टा उडवून, आणि उगीच दुरून दुरून कशाला, मुद्यावर ये की, असें म्हणून तोच स्वतः ब्रँटचा विषय काढतो. स्पष्टच तिला तो विचारतो, आईविषयीं तुझ्या मनांत भलतें सलतें येतें तरी कसें? तुझ्या डोक्यांत कांही पिशाच्च तर नाही शिरलें? पण जाऊं द्या झालें! या बाबांच्या मृत्यूमुळे तुझें डोकें नाही दिसत थाऱ्यावर. तेव्हा आज नकोच हें. तूं जरा शांत झालीस म्हणजेच बोलूं झालें —"

परंतु लॅव्हिनिया त्याला अशी सुटून जाऊं द्यायला तयार नाही. आजवर तुझ्याशीं मी कधी खोटें बोलण्याचा तुला अनुभव आहे का? या प्रश्नाला ओरिनकडून नकारात्मक

उत्तर घेतल्यावर ती त्याला बजावते की तर मग त्याने आपण जें सांगतों तें खरें मानलें पाहिजे.

परंतु मला आता सगळें कांही समजलें आहे. तूं प्रत्यक्ष बिनतोड पुरावा म्हणतेस त्यांतला सगळा अर्थ माझ्या ध्यानांत आला आहे. तेव्हा तुला आईबद्दल उगाच माथेफिरूपणाने मी बोलूं देणार नाही, असें जेव्हा ओरिन म्हणतो तेव्हा लॅव्हिनिया म्हणते की, तर मग मला पोलिसांत वर्दी द्यावी लागेल. याचे वाईट परिणाम होतील; घराण्याची अब्रू जाईल, हें तिला चांगलें कळत होतें. परंतु खुनी माणसाला शिक्षा व्हायलाच पाहिजे हा तिचा हट्ट असतो. परंतु लॅव्हिनियाने दाखविलेली औषधाची बाटली त्याचें मत पालटूं शकत नाहीं. कारण आईचेंच तें झोपेचें औषध होतें हें आईनेच त्याला सांगितलें होतें. वडील मरण्यापूर्वी आई अपराधी असल्याचें बोलल्याचें तिचें सांगणें हा केवळ तिच्या भ्रमलेल्या मनाचा खेळ आहे असें तो उडवून लावतो. आणि "तूं पोलिसांत जाण्याऐवजी डॉ. ब्लॅककडून तुला वेडी ठरवून मीच तुला इस्पितळांत डांबतों." अशी तो तिला धमकी देतो. एवढेंच नव्हे, तर तिच्याकडून ती औषधाची बाटली हिसकून घेतो. आईबद्दल भलतेंसलतें बोलशील तर खबरदार अशी धमकीही तो तिला देतो. पण लॅव्हिनिया विचारते, "पण आताच .क्षणापूर्वी आई प्रत्यक्ष म्हणाली की, तुला वडिलांबद्दल इतका तिटकारा वाटत होता कीं त्यांच्या खुनाबद्दल तुला आनंदच वाटेल असें तूं स्वतःच तिच्याजवळ म्हणालास, तर हें खरें आहे का?"

लॅव्हिनियाला पुरावा देण्याचीच संधि हवी —

याने थोडासा नरमून ओरिन त्या विषयाबद्दल तिला बोलूं द्यायला पुन्हा तयार होतो. हें औषध ब्रँटशिवाय आईला दुसऱ्या कोणाकडून मिळणेंच शक्य नाही हें ती सांगते. आई भेटली लामारला, पण तुला तो वाटला ब्रँट, या आईच्या खुलाशाची लॅव्हिनिया हसून रेवडी उडविते. इतकी कांही मी खुळी नाही. मीं प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहिलें आहे, कानांनी ऐकलें आहे – ब्रँटने आईचें चुंबन घेतांना आणि तिच्यावर आपलें प्रेम आहे हें सांगतांना, असें ती म्हणते.

यावर मात्र ओरिन फार उसळतो, चिडतो. लॅव्हिनिया भ्रमांत बोलत नाही हें त्याला आता स्वच्छ दिसत होतें. ती खोटें बोलणारी नाही याची त्याला जाणीव आहे. परंतु तिने सांगितलेली हकीकत खरी मानायला त्याचें अंतःकरण तयार नाही, म्हणून तो तिला म्हणतो, "तूं इतका गंभीर आरोप करते आहेस; पण तो खरा आहे हें तुला पुराव्यानिशी सिद्ध करावें लागेल." "पण पुराव्यानें हें सिद्ध करण्याची संधीच तर मी मागतें आहे. त्यासाठी मला वेळ द्या. मी हें सिद्ध करीन आणि मग मात्र तूं खुनी माणसाला शिक्षा करायला मला साह्य केलें पाहिजे" अशी मागणी लॅव्हिनिया करते. आणि तुझ्या शब्दांवर माझा विश्वास नाही असें तरीही ओरिन जेव्हा तिला

उत्तर देतो, तेव्हा " आई आणि ब्रँट लौकरच एकांतांत एकत्र मीं तुला दाखवूं शकलें तर मग तूं माझ्यावर विश्वास ठेवशील ना ?" असा लॅव्हिनियाने चपखल प्रश्न टाकल्यावर ओरिनला अत्यंत मनाविरुद्ध होकार देणें भाग पडतें.

औषधाच्या बाटलीचें कुशल नाटक —

इतका वेळ बहीणभावांचें एकमेकांशीं गुज चाललेलें पाहून इकडे क्रिस्टाईन मात्र फार अस्वस्थ होते. ती दार खडखडवून ओरिनला आंत बोलावूं लागते. लॅव्हिनिया त्याला जा म्हणते, पण त्यापूर्वी लॅव्हिनिया त्याच्या हातून ती औषधाची बाटली मात्र काढून घेते आणि ती एझराच्या शवावर कोणालाही सहज दिसेल अशा रीतीने ठेवते आणि ओरिनला " हें दृश्य दिसल्यावर आईची नजर कशी होते तें नीट निरखून पाहा " असें बजावून सांगते. त्यापूर्वी, " आईचें सगळें तूं खरेंच मानतो आहेस असेंच धोरण ठेवून कांही काळ तूं वाग " असा गुरुमंत्रही तिने त्याला दिलेला असतो.

क्रिस्टाईन दारावर धडक्या देत राहते. अखेर ओरिन धाडकन दार उघडतो आणि जरा बाजूला उभा राहतो. क्रिस्टाईन इतकी घाबरलेली असते की, तिला धड उभेसुद्धा राहवत नव्हतें. एकदम धावून ओरिनच्या गळ्यांत मिठी घालून " दाराला आंतून कडी आहेसें पाहून मात्र माझा जीव किती घाबरा झाला " असें जेव्हा ती म्हणते तेव्हा एक प्रकारें तिची घृणा आल्यासारखें होऊन " एवढें घाबरण्याजोगें काय होतें त्यांत ? " असा उलट प्रश्न तो आईला करतो. पण लॅव्हिनियाचा इशारा मिळतांच सावध होऊन तो वेगळ्या धोरणाने बोलूं लागतो. व्हिनीचें डोकें ताळ्यावर नाही हें आपल्या ध्यानांत आल्याचें तो आईला सांगतो. त्यासरशी थोडीशी खुलून, " सांगत नव्हतें मी तुला ? हिच्या मनांत कांहीतरी कट शिजतो आहे; पोलिसकडे जाईल ही; लोक तिला वेडी मानतीलच असें नाहीं. तेव्हा तूं हिला असें कांही करूं देऊं नको " असें क्रिस्टाईन त्याला विनविते. " तुझ्या वडिलांना सुद्धा घराण्याच्या अब्रूचे असे धिंडवडे झालेले आवडणार नाहींत. मेल्यावर त्यांना आतां शांतता लाभूं द्या ! " असें म्हणून नवऱ्याला उद्देशून बोलण्यासाठी ती त्याच्या शवाकडे पाहते तो तिच्या नजरेला ती बाटली पडते आणि त्यासरशी किंचाळी फोडून अपराधी नजरेने त्या बाटलीकडे ती रोखून पाहत राहते.

ओरिनला आईच्या भेदरटपणाने उबग —

या योगाने संत्रस्त होऊन, " घरीं मी आलों कशासाठी, तर मनाला थोडी शांति मिळेल म्हणून; आणि अनुभव हा की, या एक प्रकारच्या खाईतच पडलों मी, " असें म्हणून ओरिन विकट हास्य करू लागतो. इतका त्याला आईच्या भेदरलेल्या वृत्तीचा उबग येतो आणि धडपडतच तो खोलींतून निघून जाते. इकडे लॅव्हिनिया शांतपणें ती बाटली उचलून घेते आणि कठोर, गंभीर व थंड आवाजांत आईला विचारते, " तुझ्या

झोपेचें हें औषध ब्रँटनेच तुला मिळवून दिलें ना ?" त्यावर भांबावल्यासारखी होऊन क्रिस्टाईन, " नाही, नाही " म्हणून ओरडते. लॅव्हिनिया मात्र पुन्हा शांतपणेंच तूंच तर मला तसें सांगितलेंस. मला ठाऊक होतेंच – पण म्हटलें एकदा पक्कें विचारून घ्यावें." असें म्हणून बाटली ती आपल्या छातीवरच्या कपड्याआड परत ठेवून देते आणि एखाद्या लाकडी पुतळ्यासारखी तेथून निघून जाते.

याचा अर्थ क्रिस्टाईनच्या ध्यानांत संपूर्णपणें येतो. यांत आता ॲडामची धडगत नाही हें तिला दिसतें. म्हणूनच " त्याचा यांत कांही दोष नाही, खरी अपराधी मी आहें. यांत ओरिनचें आणखी कांही न होवो " असा तळमळीचा उद्गार तिच्या तोंडून निघतो आणि आपल्याला त्या प्रेताकडून कांहीतरी प्रतिसाद मिळतो आहे असा भास होऊन ती मागल्या पावलींच भेदरून दार गाठते आणि बाहेर धूम ठोकते.

क्रिस्टाईनच्या भीतींतूनच लॅव्हिनियाला पुरावा उपलब्ध —

या भीतीपायींच तर यापुढचा प्रसंग घडून ओरिनला लॅव्हिनिया पुरावा दाखवूं शकली आणि त्याच्या हातून ॲडाम ब्रँटचा वध झाला. हा प्रसंग ब्रँटचें अत्यंत आवडतें जहाज 'फ्लाइंग ट्रेडस' याच्यावर घडला. या जहाजावर रात्रीं तो प्रसंग घडतो; ओरिनचा आणि क्रिस्टाईनचा तो औषधाच्या बाटलीचा नाटकाचा प्रसंग झाल्यावर दोन दिवसांनी; त्या संवादाच्या दुसऱ्या दिवशीं एझरा मॅननचे प्रेतसंस्कार झाले, त्याच्या दुसऱ्या दिवशीं; एझरा मॅनन आल्यावर ब्रँट तेथें राहूं शकला नव्हता. बोस्टनला जाऊन क्रिस्टाईनला हवें असलेलें औषध त्याने पाठवून दिलें होतें. दरम्यान एझराचा खून झाला. तेव्हा अमेरिकेंतून कोठे तरी जावें अशी तळमळ ब्रँटला लागली होती. परंतु व्यापारी माल नसल्यामुळे त्याचें जहाज बोस्टन बंदरांतच नांगरून पडलें होतें. काम नसल्यामुळे जहाजावर कोणी खलाशी नसत. भीतीमुळे ब्रँट मात्र स्वत:ला जहाजावर जणू कोंडून घेऊन राहिला होता. त्याच्याशिवाय एक रखवालदार तेवढा जहाजावर असे. त्यालाही ब्रँटने आज किनाऱ्यावर रजेवर पाठवून दिलें होतें. कारण ब्रँट जहाजावर कोणी तरी येण्याची वाट पाहत होता आणि त्या व्यक्तीबरोबर त्याला पूर्ण एकांत पाहिजे होता.

या चोरट्या जीवनाचा ब्रँटला अगदी कंटाळा आलेला होता. गुन्ह्याची सगळी जवाबदारी एका स्त्रीवर टाकून आपण इकडे छपून राहतो याची त्याला खंत वाटत होती. अशा रीतीचें भेकड जीवन सागराला मंजूर नाही. तेव्हा हें जहाजाचें काम आता आपल्याला शोभत नाही, असें कांहीसें भविष्यसूचक उद्गार त्या एकाकीपणाचा उबग येऊन त्याच्या तोंडून बाहेर पडतात. त्याच वेळीं काळोखांतून ठरल्याप्रमाणे क्रिस्टाईन त्याच्यापाशी येऊन दाखल होते.

क्रिस्टाईनच्या पाळतीवर ओरिन व लॅव्हिनिया —

अत्यंत नाटकी असा हा प्रसंग उभारलेला आहे, कारण क्रिस्टाईचा पाठलाग

करीत ओरिन आणि लॅव्हिनिया हीं दोघे नेमकीं त्या वेळी तेथे आलेलीं असतात. ब्रँट आणि क्रिस्टाईन एकमेकांच्या मिठींत असतात आणि आपलीं अंतःकरणें खुलीं करून बोलत असतात; हें सर्व पाहण्याची व ऐकण्याची संधि त्या दोघांनी मिळविलेली असते. आपण विष दिल्याची गोष्ट एझराने लॅव्हिनियाला सांगितल्याची भयंकर हकीकत क्रिस्टाईन ब्रँटला सांगते. असें असून तिला चुकवून क्रिस्टाईन इकडे येऊं शकली याचा ब्रँटला अचंबा पडतो. पण त्या दोघांनी आपण आपल्या आप्तांकडे जाणार आहोंत असें सांगून क्रिस्टाईनला चांगलेंच चकविलेलें असतें. शिवाय लॅव्हिनियाने कांही सांगितलें तरी ओरिनचा त्याच्यावर विश्वास बसणें शक्य नाही हाही भरंवसा क्रिस्टाईनला वाटत होता.

लॅव्हिनियाला विषाची बाटली सापडली याबद्दल क्रिस्टाईनला ब्रँट दोष देतो. पण घेरी आल्यामुळे आपला नाइलाज झाला; सर्व कांही मीं चांगली आखणी केली होती, पण आयत्या वेळीं हा घोटाळा झाला. कसें कोण जाणें, पण एझराचें बोलणें आपल्याला सहन झालें नाही आणि ब्रँट कोण याची आणि आपल्या दोघांच्या संबंधाची परिस्फुटताही आपण केली हें सांगून ती ब्रँटला शांत करण्याचा प्रयत्न करते.

"हें स्वप्न मला पडलेंच होतें. वास्तविक असा चोरटा सूड मला नको होता. परंतु मला वाटतें माझ्या वडिलांचा भेकडपणा माझ्याही रक्तांत भिनलेला आहे" असें म्हणून ब्रँट हताश झाल्यासारखा बसतो.

क्रिस्टाईन व ब्रँटचा पळून जाण्याचा बेत —

आता यांतून सुटका म्हणजे पळून जाणें; त्यावांचून उपाय नव्हता. त्याचें जहाज तर आणखी महिना दीड महिना जाणार नव्हतें. शेवटीं या प्रेमासाठी ब्रँट आपलें त्या जहाजावरचें गाढ प्रेम सोडून द्यायला तयार होतो. दुसऱ्या एका जहाजावर नोकरी पतकरायची, म्हणजे फ्लाइंग ट्रेडसला कायमचा रामराम ठोकावयाचा! तें करायची तो तयारी दर्शवितो. कारण तो म्हणतो, जहाजें काय पुष्कळ मिळतील. पण जगांत क्रिस्टाईन काय ती तूं एकच आहेस!" आणि त्या तिकडे साऊथ सी आयलंडमध्ये जाऊन आपण सुखाने आणि शांतपणें जीवन घालवूं या स्वप्नांतच तो क्षणभर दंग झाल्यासारखा होतो.

तरी पण हें सगळें पार पडणार ना, ही शंकाही त्याला सोडीत नाही. कदाचित ही उभयतांची शेवटचीच भेट ठरण्याचा संभव आहे अशीही अंतःसूचना त्याच्या मनांत उभी राहते. परंतु याशिवाय दुसरा मार्ग नाही असें ठरवून पळून जाण्याची तयारी करण्यासाठी म्हणून क्रिस्टाईन घराकडे परत जाण्यासाठी निघते.

ओरिनचा मत्सराने तडफडाट—

ओरिनच्या अंतःकरणाचा हें सर्व पाहून व ऐकून नुसता तडफडाट झाला होता. साऊथ सी आयलंडमध्ये आईबरोबर जाऊन राह्यचें हें त्याचें मनोरम स्वप्न होतें,

आईने त्या गोष्टीला केवढ्या प्रेमाने संमति दिल्याचें नाटक केलें होतें. आणि आता तीच या ब्रँटबरोबर तेथे जाऊन सुखाने राहण्याचें बेत आखीत होती. त्यामुळे मत्सराने तो नुसता जळू लागला आणि ब्रँटचा जीव घ्यायला भयंकर उतावीळ झाला. परंतु लॅव्हिनिया शांत होती. तिचें सावज तिला पक्कें सापडलें होतें; आणि तें पक्केपणीं नाहीसें करण्याचा तिला निर्धार होता, त्यामुळे ओरिनला त्याच्या उतावीळपणापासून ती परावृत्त करते.

लॅव्हिनियाचा निर्धार आणि योजकपणा—

क्रिस्टाईनला पोचवून ब्रँट परत आपल्या खोलींत शिरत असतांना ओरिन अंधारांतून त्याच्यावर अगदी पिस्तूल टेकून वार काढतो. पुन्हा पिस्तूल झाडण्याचेंही कारण पडत नाही. मग त्याच्या खोलींतील कपाटें वगैरे छिनीने फोडून तीं दोघेंजण उघडतात. त्यांतल्या वस्तु अस्ताव्यस्त जिकडे तिकडे पसरून टाकतात. मोल्यवान वस्तु सगळ्या बरोबर घेतात; परत जातांना त्या समुद्रांत बुडवून टाकण्याचा त्यांचा विचार असतो. अशा रीतीने चोरट्यांनी येऊन ब्रँटचा खून केला असें भासावें याबद्दलची बेमालूम व्यवस्था करून तीं दोघें परततात. या सगळ्या प्रसंगांत लॅव्हिनियाचा निर्धार, शांतपणा आणि योजकता यांचें दर्शन विस्मयकारक असतें.

पारध या मधल्या नाटकाच्या पाचव्या आणि शेवटच्या प्रवेशाच्या सुरुवातीला बोस्टनहून क्रिस्टाईन परत आलेली आहे. परंतु आतांकडे गेलेलीं दोन्ही मुलें परत न आलेलीं पाहून ती अस्वस्थचित्त झालेली आहे. एक दिवसापूर्वीच एझरा मॅननचें दफन झालें असतांना त्या दोन्ही मुलांनी परगावीं जावें आणि क्रिस्टाईननेही घरून दूर जावें ही गोष्ट कोणालाही विचित्रच वाटण्याजोगी होती. म्हणून मुलांना मींच ब्रॅडफर्ड मंडळीकडे जायला सांगितलें आणि त्यामुळेच मला वडील आजारी आहेत तिकडे न्यूयॉर्कला जायला मिळालें अशी क्रिस्टाईन संपादणी करते. परंतु आपल्या आधीच मुलें परत यायला हवीं होतीं, तीं न आल्यामुळे तिचें पापी मन आंतून भेदरल्यासारखें झालेलें होतें. या घरांत एकटीला राह्यला मन धजावत नाही असें ती हेझेल तिच्या समाचारासाठी आलेली असते तिला सांगते. त्यावर मी घरीं जाऊन आईला सांगून येते म्हणजे रात्रीं मलाच तुमच्या सोबतीला राहतां येईल असें म्हणून हेझेल निघून जाते. जात असतांना ओरिन आणि लॅव्हिनिया येत असलेलीं तिला भेटतात व त्यांना त्यांच्या आईला वाटत असलेल्या काळजीबद्दलची कल्पना ती देते.

ओरिन गौप्यस्फोट करतो —

इतकी प्रस्तावना झाल्यावर ओरिन आणि लॅव्हिनिया आईपाशीं येतात. आतां जें बोलायचें तें आपण बोलणार असा पवित्रा ओरिनने घेतलेला असतो. सारा वेळ तुम्ही ब्रॅडफर्ड मंडळीकडेच होतां का? असें क्रिस्टाईनने विचारल्यावर आम्ही ब्लॅकरिज गावाला

गेलों नव्हतोंच मुळी असें म्हणून ओरिन तिच्या मनांत धसकाच उत्पन्न करतो. आणि मग क्रमाक्रमाने, तुझ्या प्रणयवीराजवळ तूं गुजगोष्टी करीत असतांना मी बोटीवरून सर्व कांही पाहत आणि ऐकत होतों असें जेव्हा ओरिन तीव्र स्वराने सांगतो तेव्हा ती गोंधळते, "आणि हें मुळीच खरें नाही, केवळ मला छळण्यासाठी तूं हें सारें बनावट सांगतो आहेस" असें, अप्रिय गोष्ट खरी नसावी या हेतुगर्भ भावनेने ती बरळूं लागते. परंतु कॅप्टन ब्रॅंटच्या मृत्यूच्या वार्तेंचा वर्तमानपत्रांतील तुकडा ओरिन तिला दाखवून म्हणतो, "आता तर तुझा विश्वास बसतो ना? तुला तो मोठा वीरपुरुष वाटत होता. पण जगाच्या दृष्टीने चार ओळींच्या बातमीइतकीच त्याची किंमत. लोकांची जी समजूत व्हावी म्हणून आम्ही योजना केली होती तशीच ती झाली आहे. त्याच्या मृत्यूशीं आमचा कोणी कांही संबंध जोडूं शकणार नाही."

आई ब्रॅंटच्या मृत्यूने शोकविव्हळ होते आणि मोठे हुंदके देऊं लागते याने मात्र ओरिन चकित होतो. आईला दुःख व्हावें ही गोष्ट त्याला दुःखी करते. म्हणून तो तिला म्हणतो, "तूं दुःख करूं नको. मी तुझ्याबरोबर राहीन आणि त्याचा तुला विसर पडेल असें करीन..व्हिनीला आपण इथे ठेवूं आणि आपण दूर प्रवासाला जाऊं– दक्षिण समुद्रांतील आपल्या बेटांत जाऊं."

आईचें प्रेम आणि लॅव्हिनियाची भीति ––

लॅव्हिनियाला त्याचा हा भोळा गोडवा बिलकुल आवडत नाही. म्हणून ती त्याला दटावते. परंतु तिच्याकडे दुर्लक्ष करून तो आईचें सांत्वन करण्याचा प्रयत्न चालूच ठेवतो; तिची क्षमा मागतो. तेव्हा मात्र लॅव्हिनिया त्याच्यावर हुकुमत गाजवते आणि आणि म्हणते "इतकें सगळें होऊनसुद्धा तूं पुन्हा तिचें कुकुलें बाळ होऊन राहणार काय? पण तें शक्य नाहीं. बसूं दे हिला इथे. तूं सरळ घरांत चल पाहूं! ऐकतो आहेस ना! मार्च!"

क्रिस्टाईनची आत्महत्या––

त्यासरशी लष्करी हुकूम कानीं पडल्यासारखा ओरिन तोंड फिरवून अनिच्छेनेच पण घरांत प्रवेश करतो. तो गेल्यावर क्रिस्टाईन लॅव्हिनियाकडे अशा कांही भयंकर जळत्या नजरेने पाहते की, लॅव्हिनिया क्षणभर भयचकितच होते. आईशीं कांही न बोलण्याचा तिचा कठोर निर्धार टिकत नाही आणि तिच्या तोंडून पुढील उद्गार कोणी तरी चाबूक मारून बाहेर पडल्यासारखे बाहेर पडतात, "आई तुझा काय करायचा बेत आहे? तुला जगतां येईल." त्यावर "मी जगेन!" एवढेंच क्रिस्टाईन तिरस्काराने म्हणते आणि आपल्या व लॅव्हिनियाच्यामध्ये दृष्टीसमोर हात धरून लॅव्हिनियाला आपल्या दृष्टीपुढून आपण कायमची दूर केली असा अविर्भाव ती करते आणि तडक घरामध्ये घूम ठोकते.

तिच्या पाठीमागून जाऊन अजून तिच्याशीं कांही बोलावें अशी मनांत येणारी

ऊर्मि लॅव्हिनिया कशीबशी दाबून टाकते. इकडे रस्त्यांतून दुरून म्हातारा गडी सेठ याचा आपलें नेहमीचें रडवें गाणें गुणगुणतांना आवाज ऐकून येतो. त्याच क्षणीं एकदम पिस्तुलाचा बारही ऐकूं येतो; ओरिन किंकाळी फोडीतच आंतून बाहेर येतो. स्वतःचा फार अपराध झाला या जाणिवेने ओरिनच्या हृदयाची कालवाकालव होते आणि "मीं तिला हें करायला भाग पाडलें. तिला छळायचा माझा हेतु होता! मला क्षमा करावी असें तिला वाटणेंच मीं अशक्य केलें! ब्रँटला मींच ठार केलें अशी फुशारकी मारण्यावांचून काय माझें एवढें नडलें होतें?—" असा तो विव्हळूं लागतो. गप्प राहायला लॅव्हिनिया सांगत होती तिकडे तो मुळीच लक्ष देईना. "त्याला चोरट्यांनी मारलें असेंच मीं सांगायला पाहिजे होतें. म्हणजे माझा तिने तिटकारा केला नसता. माझ्यावर ती प्रेम करूं शकली असती. खरोखर मींच तिचा खून केला." असें तो वेड्यासारखा होऊन ओरडूं लागतो; लॅव्हिनियाचें कांही ऐकत नाहीं. "आंत जातों आणि तिची क्षमा मागतों; पण छे! ती आहेच कोठे? ती तर गेली; आता तिची क्षमा मी कुठून मिळविणार!" अशा रीतीने निराश होऊन त्याला रडें अनावर होतें.

ओरिन अपराधाच्या जाणीवेने झपाटतो—

त्याला हा जो आपल्या अपराधाच्या जाणीवेचा झटका येतो त्याने ओरिनचें सारें जीवन झपाटल्यासारखें होतें. याच गोष्टीला उद्देशून या नाटक-त्रयींतील तिसऱ्या नाटकाला ओनीलने "भुताटकी" असें नांव दिलें आहे; त्या तिसऱ्या नाटकाकडे आतां आपण वळूं.

तिसऱ्या नाटकाच्या पहिल्या अंकाचा अर्धा अधिक भाग गावांतील चार जणांच्या वृंदगायकांच्या पद्धतीच्या संभाषणांनी व्यापला आहे. त्या संभाषणांचा आणि त्या चौघांमधील एका व्यक्तीने मॅनन वाड्यांत भुतें नाहींत याबद्दल मारलेल्या पैजेचा उपयोग प्रामुख्याने, क्रिस्टाईनच्या आत्महत्येनंतर सुमारे एक वर्षाने या अंकांतील मुख्य घटना घडते, तेथपर्यंत दरम्यानच्या काळांत घडलेल्या गोष्टींचें दिग्दर्शन करणें हा आहे. मॅनन कुटुंबाच्या वाड्यांत भुतें नांदतात हा प्रवाद या दरम्यानच्या अवधींत प्रसृत झाला होता. या दरम्यानच्या काळांत वाडा बंदच होता. क्रिस्टाईनचें दफन झाल्यावर लॅव्हिनिया ओरिनला घेऊन गेलें वर्षभर दूरवर समुद्रप्रवासाला गेली होती. आजच ती न्यूयॉर्कला परत उतरणार होती आणि दुसऱ्याच दिवशीं तीं दोघेजण घरीं येतील असा अंदाज होता.

झपाटलेलें घर —

तशा तऱ्हेची तारच पीटरला आली होती. आणि म्हणून वाडा उघडून, झाडून सवरून, साफसूफ करून घेण्याच्या उद्देशाने पीटर व हेझेल हीं दोघें आलीं होतीं. त्या वेळीं त्यांच्याच देखत त्या पैजवाल्या गृहस्थाची भीतीने गाळण झाल्याचा प्रसंग पुरा

झाल. अशा रीतीने आपल्या घरांत भूत नाही हें आपल्याला लोकांना पटवून द्यायचें होतें असें जरी सेठ सांगतो तरी हें घर कशाने तरी झपाटलेलें आहे अशी सेठचीसुद्धा श्रद्धा होती. पीटरला तो सांगतो, "अगदी भुतेंच इथे नाच घालीत असतील असें नाही मी म्हणत; परंतु या घरावर कोणातरी दुष्ट पिशाच्चाची नजर आहे खास; अलीकडेच नव्हे तर अगदी सुरुवातीच्या द्वेषाच्या भरांत तें बांधलें गेलें तेव्हापासून. दिवसानुदिवस ही दुष्ट नजर अधिकाधिकच बाधाकारी होत गेली. म्हणून यापुढे आता ओरिन आणि लॅव्हिनिया यांना या भुताटकीच्या वाड्यांत राहूं देऊं नका." ही विनंति मनापासून करून, घर उघडून साफसूफ करतांना उजेडासाठी कंदील आणण्याकरिता म्हणून तो तेथून काढता पाय घेतो. कारण, आता रात्र पडूं लागण्याच्या वेळीं घरांत प्रवेश करायला त्याला खरोखर भीति वाटत असते.

ओरिनचें डोकें फिरतें?—

हेझेलचेंही मत सेठप्रमाणेच असतें. एझरा मॅननचा मृत्यु आणि क्रिस्टाईनची आत्महत्या या प्रकरणांच्या आधीपासून या घरांत कांहीतरी अमानुषपणाचा भाग असल्याचें आपल्याला वाटत आलें असल्याचें ती पीटरला सागते. आपल्यालासुद्धा क्रिस्टाईन त्या दिवशीच्या संध्याकाळसारखीच या ठिकाणीं बसली आहे असा भास होतो, असेंही ती म्हणते. ओरिनला घेऊन लॅव्हिनिया आली म्हणजे क्रिस्टाईनला बरें वाटेल अशी हेझेलला त्या दिवशीं आशा वाटत होती. परंतु उलट तिने आत्महत्याच केली. त्याचा परिणाम म्हणून ओरिनवर इतकी कांही विचित्र कळा आली की, दफनाच्या दिवशीं हा ओरिनच का, असा आपल्याला संशय पडला, असें हेझेल म्हणते. एवढेंच नव्हे, एखाद्या तंद्री लागलेल्या माणसासारखें त्याचें सगळें वागणें होत होतें. आणि नंतर लगोलग लॅव्हिनिया त्याला घेऊन प्रवासाला गेली तेव्हा आपणाला कोठे नेत आहेत आणि कशासाठी याची त्या बिचाऱ्याला कांही शुद्ध नसावी.

लॅव्हिनिया अंगाने भरली आहे —

तिकडे तीं दोघें आज वर्षभर भटकत राहिलीं. पण दोघांचें कसें काय आहे याबद्दल पत्रांत अवाक्षर नाही अशीही हेझेलची तक्रार आहे. हें बोलतबोलतच तीं दोघें बहीणभावंडें घरांत जातात. आंत त्यांची कांही साफसुफी चाललेली असते त्याचे बाहेर आवाज येत असतात. थोड्या वेळाने दुसऱ्या दिवसाच्याऐवजी त्याच रात्रीच्या सुरुवातीला लॅव्हिनिया तेथे येते. तिला पाहून प्रेक्षकांना नवल वाटावें इतका या वर्षांत तिच्यामध्ये विलक्षण फरक पडलेला असतो. किरकोळ असें तिचें शरीर आतां चांगलें भरदार दिसूं लागलेलें असतें. हालचालींतला ताठपणा जाऊन थोडी गोलाई आणि नरमाई आलेली असते. सर्व बाबतींत ती हुबेहुब आपल्या आईसारखी दिसूं लागलेली असते; पोशाखही आईसारखाच रंगीत – हिरवा – असतो.

ओरिनची करुणास्पद कबाईत —

ती झटकन घराशीं येऊन उभी राहते. ओरिन मागेच रेंगाळत असतो. "अरे कशाची भीति वाटते तुला ?" असें लॅव्हिनिया त्याला विचारते त्यावरून आणि त्या पुढच्या संभाषणावरून ओरिनच्या मानसिक अवस्थतेची नीट कल्पना आपल्याला येते. "आता तुला धीट व्हायला पाहिजे. आताच तर खरी कसोटी आहे. वाटतें ना तुला आता की, घरांत जायला आता हरकत नाही ? मग घराकडे कां तूं पाहत नाहीस ? प्रकाश दिसतो आहे घरांत; म्हणजे पीटर आणि हेझेल आंत आलेलीं असलीं पाहिजेत."

हें ऐकूनसुद्धा ओरिनची भीति नाहीशी होत नाही. तेव्हा, "पाहा पाहूं घराकडे नीट समोर" असा ती त्याला कठोरपणाने हुकूम करते. हो म्हणून दुबळेपणाने ओरिन तिचा हुकूम मानतो, वर डोळे करून घराकडे पाहतो; पण भेदरून केवढा तरी दीर्घ श्वास पोटांत घेतो.

"पाहिलेंस ! आहेत का भुतें ? नाहीत ना ? सांग" – लॅव्हिनिया.

"नाहींत." ओरिन.

"बरोबरच आहे. कारण इथें भुतें नाहींतच मुळी. मग आता पुन्हा सांग, तुझीही खात्री झाली ना आता की, इथे भुतें नाहीत म्हणून ?" इति लॅव्हिनिया.

"हो." इति पूर्वीप्रमाणेच आज्ञाधारकपणें ओरिन.

अशा यांत्रिक कबायतीच्या स्वरूपांत ओरिनकडून पाठ केलेल्या धड्यासारखें लॅव्हिनिया आपल्याला हवें तें वदवून घेते खरी. परंतु घराकडे जातांजातां, दुसऱ्या नाटकाच्या पाचव्या अंकांत त्याची क्रिस्टाईनशीं ज्या ठिकाणीं गाठ पडली होती त्या ठिकाणीं येतांच ओरिन जीभ अडखळतच म्हणतो "इथेच – याच ठिकाणीं – मीं तिला शेवटची जिवंत अशी पाहिली."

त्यावर "आता तें सारें संपलें; मरणारीं मेलीं आणि आपल्याला विसरलीं. आणि आपण त्यांना विसरलों. चल आंत" असें हुकुमी आवाजांत म्हणून लॅव्हिनिया त्याला आंत घेऊन जाते. या सगळ्या प्रकारावरून, आईच्या मृत्यूमुळे ओरिन किती दुबळा झाला आहे, घडलेल्या घटना अजून त्याच्यापुढे किती भेदकपणाने नाचताहेत, त्यांची त्याला किती भीति वाटत असते, या गोष्टी स्पष्ट होतात. परंतु ओरिनच्या मनाला याहूनही अगदी वेगळ्या कारणाच्या योगाने फार मोठी व्यथा होत होती. त्याबद्दलचें दर्शन या अंकाच्या पुढच्याच प्रवेशांत होतें.

लॅव्हिनिया : जणू मूर्तिमंत क्रिस्टाईन —

या दुसऱ्या प्रवेशांत, लगेचच लॅव्हिनिया आणि ओरिन मॅनन वाड्याच्या बैठकीच्या दिवाणखान्यांत प्रवेश करतात. पीटरने तेथे दोन मेणबत्त्या लावून ठेवलेल्या असतात.

त्यांच्या मंद प्रकाशांत, लॅव्हिनियामध्ये पडलेलाफरक अधिकच उठावदार दिसतो; कोणाला वाटावें मूर्तिमंत क्रिस्टाईनच आपल्यापुढे उभी आहे. अशी ती त्या दिवाण-खान्यांत मॅनन स्त्रीपुरुषांच्या मोठ्या तसबिरींसमोर उभी राहते तेव्हा त्या तसबिरी आपल्याकडे टवकारून पाहताहेत असा भास तिलासुद्धा झाल्यावांचून राहत नाही. आपल्याशींच ती बडबडतेसुद्धा – "कां असे चमत्कारिकपणे तुम्ही माझ्याकडे पाहतां? तुमचें सगळ्यांचें सगळें कांही मीं ठीकपणाने केलें आहे. तेव्हा आता मागचें सर्व संपलें. त्याची आठवणसुद्धा नको."

या अवस्थेंतच ओरिन आपल्याबरोबर नाही असें वाटून भेदरूनच ती त्याला हाक मारते. इतकी त्याला ती एकट्याला अजून सोडायला तयार नाही. तिच्या हाकेला ओरिनकडून ओ आंतल्या काळोखाच्या दिवाणखान्यांतून येते. "आई अझून तिथे आपली वाट पाहत बसली असेल, या अपेक्षेने आपण इकडे गेलों" असें तो म्हणतो. "पण सगळीकडे ही मॅनन पुरुषमंडळीच आढळतात. आई कुठे नाही. ती हें घर सोडून कायमची गेली!"

ही बडबड थांबवण्याचा त्याला लॅव्हिनिया कठोरपणें हुकूम करते. परंतु तेवढ्या वेळेपुरतें तरी तिचें न ऐकण्याइतका तो धीट झाल्यासारखा होतो. पण लगेच ही रागावली तर नाही ना अशी त्याला भीति वाटते. तुझ्यावांचून या जगांत मला कोणी नाही, असें तो दुबळेपणाच्या जाणिवेने म्हणतो. त्यावर पीटर आणि हेझेलच्या सह-वासांत आता त्याने नवीन प्रेमाचें जीवन घालवायची मनाची तयारी केली पाहिजे हें लॅव्हिनिया त्याच्या मनावर बिंबवूं पाहते. भूतकाळ विसरला पाहिजे असें ती म्हणते.

ओरिनला भूतकाळ विसरणें अशक्य! —

पण यामुळे ओरिन पुन्हा एकदा बिथरतो. भूतकाळ विसरणें अशक्य! स्वतः ती सुद्धा तो विसरूं शकली नव्हती असा तो तिच्यावर आरोप करतो; आणि प्रेम करण्याचा आता आपल्याला दोघांनाही हक्क नाही असें तो तिला बजावतो. कारण हा प्रेम करण्याचा हक्कच त्यांनी आपल्या आईला नाकारलेला असतो. आईच्या आठवणीने तिच्याकडे विचित्रपणें रोखून पाहून तो पुढे म्हणतो, "मला तर वाटतें, आईच तुझ्या ठिकाणीं तंतोतंत अवतरली आहे जणू." लॅव्हिनियाला वाटतें, तो आपल्या शरीरांतील बदलाला अनुलक्षून हें बोलतो आहे. त्यामुळे तिला थोड्याशा सुखद गुदगुल्याही होतात. परंतु त्याचा रोख वेगळा होता. आईच्या ठिकाणची विषयलालसा बहिणीच्या ठिकाणीं उतरली असल्याचें तो म्हणतो. "अशा रीतीने मेलेली मेनन मंडळी तुला आपल्यासारखी बनविणार हेंच खरें. विचार वाटलें तर या मंडळींना!"

ओरिनला लॅव्हिनियाच्या विषयासक्तीची भीति —

वास्तविक भूतकाळच्या या गलिच्छ गोष्टीची पुन्हा आठवण करायची नाही, असें

बेभान व्हायचें नाही, अशी प्रतिज्ञा ओरिनने केली होती. "म्हणून तर मी तुला घरीं घेऊन यायला तयार झालें" अशी त्याची आठवण लॅव्हिनिया त्याला गंभीरपणे करून देते. तेव्हा ओरिन चमत्कारिकपणे, दातओठ चावल्यासारख्या वृत्तीने म्हणतो, "पण मला त्या बेटावरून हलायलाच हवें होतें. म्हणून मीं इकडे येण्याचें ठरविलें. भाऊ म्हणून माझें तें कर्तव्यच होतें. आणखी जर मीं तुला तेथे राहूं दिलें असतें तर —" असें अर्धवटच बोलून तो अस्वस्थपणें तोंडांतल्या तोंडांत हसतो.

त्यामुळे लॅव्हिनियाचा गोंधळ उडतो. वेटावर लॅव्हिनिया सुरुवातीला कोणत्याही विषयलालसेने गेली नव्हती हें तो मान्य करतो. पण तिथे गेल्यावर आणि प्रवासांतही तें सारें पालटलें. हें जेव्हा ओरिन बोलायला लागतो तेव्हा ती त्याची कानउघाडणी करायचा प्रयत्न करते. समुद्रावर महिनो न् महिने आपण जहाजावर काढले ते केवळ ओरिनसाठीच. त्याला तर कशाची शुद्धबुद्ध नव्हती. ती परत आली तीसुद्धा ओरिनची इच्छा होती म्हणून. त्याच्या मनाने उभ्या केलेल्या भुतांशीं समोरासमोर घरींच सामना केल्याखेरीज भूतकाळांतील अपराधांच्या जाणिवेची पकड आपल्या मानेवरची दूर होणार नाही यासाठी त्यालाच स्वतःला घरीं येण्याची ओढ लागली होती. अशा स्थितींत बहिणीसाठी भावाचें कर्तव्य म्हणून आपण आलों असें त्याने म्हणावें आणि पुन्हा मॅनन लोकांनी तिला आपल्यासारखी बनविण्याचा घाट घातला आहे असें मनांत आणावें ही गोष्ट लॅव्हिनियाला धोक्याची वाटते. आणि म्हणून आईच्या मृत्यूला आपण कारणीभूत झालों हा त्याचा ग्रह नाहीसा करण्यासाठी पुन्हा एकदा यांत्रिकी उत्तर प्रत्युत्तर ती त्याच्याशीं पुढीलप्रमाणे करते.

"वडिलांचा खून कोणी केला?"

"ब्रँटने – सूडाच्या भावनेने —" अडखळत ओरिन.

"वडिलांचा खून कोणी केला? मझ्या प्रश्नाचें उत्तर दे."

"आई ब्रँटच्या दडणाखाली होती"

"हें खोटें आहे. ब्रँटच तिच्या दडपणाखाली होता. हें सत्य तुला माहीत आहे!"

"होय!"

"ती व्यभिचारी होती आणि खुनी होती!"

"होय."

"आपण जर कायद्याप्रमाणे आपलें कर्तव्य केलें असतें तर ती फाशीं गेली असती ना?"

"होय."

"पण आम्हीं तिला वांचविण्याचा यत्न केला. जगायचें असतें तर तिला जगतां आलें असतें. खरें ना? पण स्वतःच्या दोषाचें प्रायश्चित म्हणून तिने आत्महत्येचा मार्ग पतकरला; स्वतः होऊन. न्यायाचीच गोष्ट होती ती. तुझा त्यांत कांही संबंध नव्हता! आलें ना तुझ्या ध्यानांत?"

तरीही ओरिन उत्तर देत नाही. तेव्हा त्याचा दंड जोराने पकडून ती विचारते, "बोल, उत्तर दे मला!"

ओरिन "हो" म्हणतो पण त्याचा आवाज तोंडाच्या बाहेरसुद्धा फुटत नाही.

लॅव्हिनियाचें नैतिक तर्कशास्त्र लंगडें पडतें?—

"आपण तिच्या मृत्यूला कारणीभूत आहों ही केवळ तुझ्या विकृत मनाची कल्पना आहे. आता तुला तसें वाटायचें नाही. पुन्हा आता तुझ्या मनांत तसें येणार नाही."

भूमितीच्या सिद्धांताप्रमाणे आपलें हें नैतिक तर्कशास्त्र ओरिनच्या गळीं उतरवण्याचा प्रयत्न लॅव्हिनिया करते. परंतु हें सगळें व्यर्थ असतें. आपण आपल्या आईच्या मृत्यूला जबाबदार आहोंत या विचाराने ओरिनच्या मनाची एवढी जबरदस्त पकड घेतलेली असते की इतक्या सहज तिच्यांतून तो सुटणें अशक्य असतें. ही पकड ढिली व्हावी म्हणून लॅव्हिनियाने त्याला घेऊन घर सोडलें; दूरचा प्रवास केला; आजूबाजूच्या वातावरणांत फेरबदल केला आणि वरच्यासारखे नीतिशास्त्राचे धडे त्याला वारंवार दिले. त्याची बुद्धि आपल्या हुकमतीखाली दुबळी करून टाकली. परंतु कशाचाही उपयोग झाला नाही. आणि घरीं परत आल्यावर वरच्याप्रमाणे धडा पाठ म्हणून झाल्यावर सुद्धा तो विमनस्क होऊन रडायला लागतो.

तेव्हा आता कामाला लागून त्याचें मन कोठें तरी गुंतविलें पाहिजे या उद्देशाने लॅव्हिनिया दारें खिडक्या उघडायला लागते. एका खिडकीतून तिला पीटर दिसतो. क्षणभर तिला आईचें भूत दिसलेंसा भास होतो व ती किंचित दचकतेही. तो पीटर आहे हें लगेच उमगून त्याला अत्यंत गोड आवाजांत ती हाक मारते आणि म्हणते,

"पीटर, मला ओळखलें नाहीस?"

पीटरची लालसा आणि संकोच—

पीटरही तिचें आईशीं दिसून येणारें साम्य पाहून चकित होतो. पीटरकडे निरखून पाहून ती म्हणते, "तुझ्यांत मात्र कांहीच बदल झालेला नाही. नाहीतर मला भयच वाटत होतें. ध्वनि असा की, त्याचें लॅव्हिनियाविषयीं मत बदललें असेल; तिच्या पापी मनाची ही आशंका होती. "तुझ्या बाबतींत तरी मी कधी बदलणें शक्य नाही" असें तो बोलून जातो आणि तिच्या वागण्यांतील फरक त्याच्या ठिकाणीं लालसा उत्पन्न केल्यावाचून राहत नाही; पण त्याचा जातीचा संकोचीपणाही त्याला सोडीत नाही. तो तिच्या अगदी जवळ येतो, प्रेमाचें बोलूं लागतो, पण पुन्हा माघार घेतो. शेवटीं संकोचाचाच विजय होऊन तो ओरिनचा विषय काढतो. आणि ओरिनला तिकडे हाक मारणें लॅव्हिनियाला भागच पडतें. लॅव्हिनियाने ओरिनवर असें ओरडूं नये, त्याचें त्याला थोडें स्वातंत्र्य द्यावें या पीटरच्या म्हणण्यामुळे आणि कांहीसा जुना मित्र भेटल्यामुळे ओरिन थोडें मोकळेपणीं बोलूं लागतो आणि "व्हिनीचा हा पहिल्यापासूनचा जोहुकुमी

खाक्या आहे, सदा न् कदा ती मला चांगलें कसें वागावें यांचें धडे देत असते " असें म्हणण्यापर्यंत त्याची मजल जाते.

लॅव्हिनियाच्या शृंगारचाळ्यांची वाच्यता —

तेवढ्यांत एकाएकी लॅव्हिनियावरची त्याची चीड जागी होते आणि कांही वेळापूर्वीच ज्या विषयाचा त्याने अंधुक उपन्यास केला होता त्याच विषयाकडे ओरिन थोडासा दात ओठ चावीतच वळतों. आपण तर मॅनन कुटुंबाचे वारसदारच आहोंत. "पण समुद्रावर आणि वेटावर व्हिनीच्यामध्ये सुद्धा किती फरक झाला होता हें पाह्यला तूं हवाच होतास पीटर" असें म्हणून " आणखी जर एक महिनाभर आम्ही त्या बेटावर राहिलों असतों तर तेथल्या तेथेच त्या स्त्रियांप्रमाणे नागव्या अवस्थेंत नाचायला व्हिनीने कमी केलें नसतें. इतकी तेथल्या वातावरणांत ती नुसती भारली होती" अशीही खवचट पुस्ती तो जोडतो.

कांहीतरी करून या विषयाला निराळें वळण द्यावें हा ओरिनचा प्रयत्न ओरिन साधूं देत नाही. तिला सूचकतेने तो ब्रँटची आठवण करून देतो आणि "तूं त्या बेटावरच्या अवाहन्नीवर इतकी फिदा झाली होतीस की त्याला पाहून तुला ब्रँटची आठवण झाली असेल बहुधा" असेंही बोचकपणें म्हणतो.

शेवटीं हेझेल तिकडे एकटी आहे, तिला काय वाटेल असें म्हणून लॅव्हिनिया ओरिनला जवळजवळ ढकलूनच तिकडे पाठविते. "याचें डोकें हें असें भडकून गेलें आहे. आईच्या आत्महत्येला आपण कारण झालों असें वेड त्याच्या मनाने घेतलें आहे" असें म्हणून हेझेलने त्याला सांभाळून घेतलें पाहिजे असें बोलणें तो गेल्यावर लॅव्हिनिया पीटरपाशीं काढते. कारण हेझेलशीं संसार करतांना तो असें कांही तरी बोलेल आणि हेझेलच्या मनावर त्याचा कांहीतरी वाईट परिणाम होईल ही तिला भीति होती.

लॅव्हिनियाची धट्ट प्रणयाराधना —

परंतु खरी भीति त्यामुळे आणि आताच्या बेटावरच्या तिच्या वागणुकीबद्दलच्या ओरिनच्या बोलण्यामुळें पीटरच आपल्या हातचा गमावेल की काय ही तिला होती. म्हणून ती धट्टपणें त्याचें प्रणयाराधन करूं लागते आणि "तो अवाहन्नी माझ्याकडे पाहून स्मित करायचा आणि मीही हसायची. परंतु याचें कारण वेगळें होतें. तो हसला की मला तुझी आठवण व्हायची. माझ्यापुढे तुझ्या माझ्या लग्नाचें चित्र उभें राह्यचें, आणि दुसऱ्याही पुढच्या गोष्टी मनांत यायच्या" अशी साखरपेरणी करते. त्या वेळीं त्या बेटावरच्या जीवनाबद्दल तिच्या तोंडीं जें भाषण नाटककाराने घातलें आहे तें गद्यकाव्याचा एक प्रभावी नमुना आहे. आणि त्याचमुळे, पीटरच्या मनांत जर कांही संशयाचीं जळमटें उत्पन्न झालींच असलीं तर तीं पार नाहीशीं होऊन जातात.

तेवढ्यावरच्च ती थांबत नाही. बेभान होऊन ती त्याला मिठी घालते आणि "आज-पर्यंत मी खुळी होतें पीटर! प्रेम हें सर्व बाजूंनी सुंदर आहे याची ओळख आता मला पटली आहे" असें म्हणून आपलें लग्न झाल्यावर आपण काय काय करूं याचें ती पुन्हा एकदा काव्यमय चित्र रेखाटूं लागते. पण पुन्हा तिला ओरिनच्या भ्रांतिष्टपणाची आठवण होते. आणि त्या भ्रांतिष्टपणाचा बंदोबस्त केल्याशिवाय लग्नाचा विचार अडचणीचा आहे हें ती सांगते. त्यावर या गोष्टीचा बंदोबस्त आपण कोणत्या ना कोणत्या मार्गाने करूं असें पीटरने आश्वासन दिल्यावर तिला हलकें वाटून ती पीटरचें चुंबन घेते आणि त्याच्या मिठींत लीन होते.

ओरिनला मत्सराचा झटका —

एवढ्यांत ओरिन तिकडून परत येतो. तेथलें तें दृश्य पाहून त्याच्या मनांत मत्सराचा झटका निर्माण होतो आणि क्षणभर मोठे डोळे करून तो त्यांच्याकडे पाहतच राहतो. त्याच्या येण्याची जाणीव होऊन तीं दोघें एकमेकापासून दूर होतात, त्या वेळीं ओरिन कांहीसा धमकावणीच्या स्वरांत अर्धवट पुटपुटतो, "हें असें आहे काय?— देवाशपथ— "

लॅव्हिनिया भयभीत होते. त्याने आणखी कांही बोलूं नये म्हणून ती त्याला "ओरिन" म्हणून दटावते. तेवढ्याने तो भानावर येऊन "छट् छट्; मी नुसती थट्टा करीत होतों. पण अभिनंदन करायचा हक्क तर आम्हांला खास आहे ना?" असें म्हणतो. परंतु लॅव्हिनियाच्या चेहऱ्यावर भीतीचे दाट ढग उत्पन्न होऊन राहतात आणि येथे पहिल्या अंकांतला दुसरा प्रवेश आणि पहिला अंक संपतो.

शेवटच्या नाटकांतील दुसऱ्या अंकामधील प्रसंग पहिल्या अंकानंतर एक महिन्याच्या अंतराने घडतो. सुरुवातीला एझरा मॅननच्या कचेरीच्या खोलींत दारें लावून ओरिन कांहीतरी लिहीत बसला आहे. लिहून झालेला परिच्छेद वाचून क्षणभर तो थांबतो, "संपूर्ण सत्य तुम्हांला हवें आहे! पण सर्व कांही समजल्यावर शेजारीपाजारी तुमची काय किंमत करतील? मोठा अवघड आहे हा निर्णय!"

अपराध्याने अंधारांत तोंड लपवून राह्यला हवें! —

आत्मगताच्या स्वरूपाचें हें भाषण संपण्याच्या सुमारास लॅव्हिनिया दारावर थाप टाकते. आपले लिहिलेले कागद लपवून ठेवून ओरिन तिला दार उघडतो आणि वाचण्याचें सोंग करून बसतो; कायद्याचीं पुस्तकें वाचायचीं टरविलीं आहेत, म्हणतो. त्याने बाहेर फिरायला जावें ही लॅव्हिनियाची सूचना ओरिनला पसंत पडत नाही. प्रकाश गुन्हेगार म्हणून सारखा आपल्याकडे बोट दाखवितो अशी त्याला भीति वाटते. अपराधी माणसाने कायमचें अंधारांतच तोंड लपवून राह्यला पाहिजे असें त्याचें मत. "या शिक्षेंतून सुटतां येईल असें तुला वाटत असेल. पण मला तें शक्य वाटत नाही"

असें तो म्हणतो. माझ्या कामासाठी कृत्रिम प्रकाशच मला बरा वाटतो असेंही तो सांगतो; काम म्हणजे कायद्याचा अभ्यास असें ढोंग करतो.

खोलींत गुदमरल्यासारखें होत होतें म्हणून लॅव्हिनिया खिडकी उघडते. परंतु बाहेर काळोख मिट्ट; तारासुद्धा कोठें दिसत नव्हता. त्याबद्दलच्या लॅव्हिनियाच्या बोलण्याचा संबंध आपल्या जीवनाशीं ओरिन जोडतो! हसून तो म्हणतो, "अशा या अंधारांतूनही आपण मार्ग काढूं असें तुला वाटतें आहे. पण संभाळ—वाटेंत पाय घसरायचा एखाद्या वेळी."

अशा त्याच्या बोलण्याने लॅव्हिनियाचा धीर सुटतो. त्याच्या प्रकृतीबद्दल तिची चिंता वाढते. परंतु तिच्या चिंतेचा विपर्यास करून ओरिन म्हणतो, " माझ्या प्रकृतीबद्दलची तुझी चिंता व्यर्थ ठरणार. मी इतका ठणठणीत बरा आहे की, तुझ्या मनासारखें व्हायचा कांही संभव नाही."

त्याच्या या विपर्यासाने ती खिन्न होते. त्याची प्रकृति सुधारते आहे याबद्दल आपल्याला आनंदच होतो; आज सकाळीं हेझेलच्या सोबतीने त्याने पुष्कळ चाल केली यामुळे त्याला चांगली भूक लागलेली पाहून आपल्याला किती बरें वाटलें, असें ती सांगूं जाते. परंतु त्यांतूनच लॅव्हिनिया आपल्याला हेझेलबरोबर एकट्याला बाहेर जाऊं देत नाही याबद्दलची तक्रार ओरिन निर्माण करतो. आणि आपणच म्हणतो, " हेझेलच्या सहवासांत राह्यची माझी पात्रतच नाही. हेझेलच्या मार्गाने माझी अडगळ दूर करण्याचा तुझा प्रयत्न सफळ व्हायचा नाही. हेझेलला दूर ठेवण्यांतच हित आहे. कारण तिच्यासारखी शुद्ध मनाची स्त्री माझ्यासारख्या खुनी माणसावर प्रेम करतांना पाहिली म्हणजे माझा गुन्हा सगळा पोटांतून ढवळून बर येतो आणि सगळें कांही ओकून टाकावें असें मला होतें."

आपण खुनी या ओरिनच्या कल्पनेची भीति—

आणि याच तर भीतीने लॅव्हिनियाचा जीव तळमळत होता; कुणाच्या मनांत तिळमात्र सुद्धा संशय नसतांना एखादे वेळीं अशीच लहर फिरून ओरिन सगळाच मामला बिघडून टाकणार ही सदैव तिला जाणवणारी भीति होती.

पण ओरिन तिच्या या भीतिदर्शनाने अधिकच कठोर होतो आणि " कृतकर्मांचें प्रायश्चित चुकवितां येईल असें वाटतें तुला ?" असा प्रश्न विचारून, " पण हें शक्य नाही. आपल्या आईच्या मृत्यूच्या रक्ताचा जो डाग आपल्या चित्ताला चिकटलेला आहे तो साफ धुवून जाण्याचा फक्त एकच मार्ग आहे. तो म्हणजे गुन्हा कबूल करून प्रायश्चित भोगायचें हा." असा आपला विश्वास ओरिन व्यक्त करतो.

परपुरुषाशीं लग्न करून ओरिनला जगांत निराधार सोडण्याच्या आईच्या इच्छेची माहिती असतांना तिच्यावरील प्रेमाचा विसर त्याला पडूं नये याबद्दल लॅव्हिनिया संताप आणि तिरस्कार व्यक्त करते. त्यावर, " तुझा तरी तोच विचार आहे की. पीटरशीं लग्न

करून तूंही मला तशीच निराधार सोडूं पाहतेसच आहेस " असें तो तिला टोचून बोलतो आणि पुढे सांगतो, " पण मी जें काय लिहितों आहें त्याची तुला कल्पना आली म्हणजे तुझे हे सगळे चाळे एकदम बंद पडतील. "

ओरिनचा शोध : लव्हिनिया सगळ्यांत मोठा गुन्हेगार—

यांतून त्याला आपण काय लिहीत आहोंत हें उघड करावेंच लागतें. मॅनन घराण्याच्या अपकृत्यांचा इतिहास तो लिहीत होता. त्यामध्ये सगळ्यांत मोठा गुन्हेगार लॅव्हिनिया असल्याबद्दलचा शोध त्याने लावला होता. उघड उघड त्याने तिच्या तोंडावर तिच्याविरुद्ध असा आरोप करावा याने लॅव्हिनिया चिडते. परंतु तिच्या दुष्कृत्यांचे तो पाढेच वाचूं लागतो. पहिलें उदाहरण प्रवासांत जहाजावरच्या दुय्यम अधिकाऱ्यांशीं तिने चालविलेले चाळे. लॅव्हिनियाला वाटत होतें की ओरिन आपल्या दुःखांत चूर होता. परंतु तो म्हणतो, " मी डोळे उघडे ठेवून सगळें नीट पाहत होतों ! "

ब्रँटच्या लालसेने आईविषयी मत्सर — गुन्हा नं. १

अखेर आईने केलेला आरोपच तो तिच्यावर करतो. तिलाच ब्रँटचा सहवास हवा होता; आणि म्हणून आईविरुद्ध ती मत्सराने पेटली होती. आईवरच ब्रँटचें प्रेम आहे हें पाहून मग त्याचा तिला तिटकारा वाटूं लागला. हें झाल्यावर लॅव्हिनियाच्या त्या बेटावरील शृंगारचाळ्यांचें वर्णन ओरिन करूं लागतो. सगळ्यांना ती हवी हवी वाटे – सगळ्या पुरुषांना ! आणि याने तिचा अहंकार वाढेच ! अवाहन्नी तर तिच्याकडे असे कांही डोळे फाडून पाही की, जणू तिच्या पोशाखाच्या आंतील नागवें उघडें रूपच तो तिचें न्याहाळतो आहे.

अवाहन्नीबरोबर विषयोपभोग — गुन्हा नं. २

हें जेव्हा लॅव्हिनिया नाकारते तेव्हा अवाहन्ननीवरोबर विषयोपभोगाचा आस्वाद घेतल्याचा आरोप ओरिन तिच्यावर करतो. त्या वेळीं नवऱ्याला विष देण्याच्या आधी त्याला वचनशरांनी विद्ध करण्याच्या उद्देशाने लॅव्हिनियाची आई जशी टोमण्याच्या भाषेंत बोलली तशाच रीतीने लॅव्हिनियाही उलटून म्हणते " समजा, नुसत्या चुंबनावरच भागलें नसलें म्हणून काय झालें ? मी कांही तुझी मालमत्ता नाही. मला विषयसुख उपभोगण्याचें स्वातंत्र्य आहे ! "

त्यावर या पोरीने खरेंच आपलें शरीर त्या अवाहन्नीला दिलें की काय असें वाटून ओरिन अत्यंत विद्ध होतो. " हें खरें नाही – खरेंच हें खरें नाही ना, हें सांग " असें तो कळवळून तिला विनवायला लागतो. कारण हा धक्का सोसण्याला त्याच्या मनाची तयारी नव्हती. त्यावर धट्टपणाचें सारें सोंग लॅव्हिनियाचें लटपटतें आणि ती अडखळतच म्हणते " हो, तें सारें खोटें. कसें कोण जाणें. पण एक मन असें बोलूं

नये हें सांगत असतांना, काय माझ्या डोक्यांत चक्र फिरलें आणि मी तें तसें बोलून गेलें."

हें ऐकून ओरिन बेफाट हसतो आणि उद्गारतो "अग हेंच तें भूत बरं! हें बोलत असतांना तूं किती म्हणून अगदी थेट आईसारखी दिसूं लागली होतीस; एवढासुद्धा फरक नाही."

प्रत्यक्ष नसली तरी मनाने श्रेष्ठच —

लॅव्हिनिया त्याला हा सारा प्रसंग विसरून जायला विनवून सांगते. पण "या भुतांनी मला विसरूं दिलें तर!" असें म्हणून "अवाहन्नीबद्दल तुझें म्हणणें खरें धरतों मी. मला जर संशय वाटला असता तर मीं त्याला आणि तुलाही ठार केलें असतें" असें उद्गारतो. परंतु शेवटीं "म्हणजे पण मनांत तूं गुन्हेगार झालीसच" असें त्वेषाने म्हटल्यावाचून ओरिनला राहवत नाही.

लॅव्हिनियाची धमकावणी —

त्यावर लॅव्हिनिया "हीं तुझीं असलीं बोलणीं यापुढे मी मुळीच ऐकून घेणार नाही; आपला नीट विचार पाहा" असें ओरिनला धमकावते. तेव्हा "तर मग माझा खून कर, फार आभारी होईन मी तुझा; कसलाही संशय न येतां माझा काटा ब्रॅटप्रमाणे काढतां येईलच तुला" या ओरिनच्या उत्तराने ती अवाक् होते. ओरिन पुढे असेंही म्हणतो, "तुला एवढेंसुद्धा ध्यानांत कसें येत नाही की, आपल्या या मॅनन कुटुंबांत आता वडिलांच्या जागीं मी स्वतः आणि आईच्या जागीं तूं अशीं एकमेकांचीं सहचर झालों आहोंत." त्यावर "पुन्हा जर असलें कांही बोललास तर—" हें तिचें उत्तर ओरिन पुरें होऊं न देतांच विचारतो, "तर काय? आकस्मिकपणे आणि गूढ रीतीने हृदयाचा झटका येऊन मी मरेन?"

आपला काटा काढण्याचा कट : ओरिनचा आरोप —

"पण आपण तर तुझी प्रकृति ठाकठीक व्हावी म्हणून प्राण पणाला लावून धडपडतों आहोंत" असें लॅव्हिनिया म्हणते तेव्हा "माझा विश्वास नाही. तुझा कांही तरी कट चालला आहे असा मला संशय येतो आहे. माझें हस्तलिखित मी कुणाच्या तरी नीट हातांत देणार आहे. तूं पीटरबरोबर लग्नाचा घाट जमविलास तर त्या वेळीं किंवा मी मरेन त्या वेळीं तें वाचलें जाईल आणि तुझा कट फुकट जाईल" असें ओरिन कटवटपणाने ठणकावून बोलतो.

तेव्हा डोकें फिरल्याप्रमाणे त्याचा दंड पकडून "नको रे असें बोलून भलभलतें कांही माझ्या मनांत भरवून देऊं! एक अक्षर तुझें ऐकायची माझी तयारी नाही." असें म्हणून लॅव्हिनिया स्फुंदून रडूं लागते.

अनुक्र 2430 लॅव्हिनिया शिर्षक
क्रमांक 1272 नों. दि. 25/12/50

ओरिनच्या मृत्यूविषयक विचारांनी भयभीत —

हा प्रसंग संपतांक्षणींच पुढच्या अंकाची सुरुवात होते. ओरिनने जवळ जवळ लिहायच्या खोलींतून हकलून दिल्यानंतर लॅव्हिनिया तडक चमॅनन वाड्यांतल्या बैठकीच्या दिवाणखान्यांत येते आणि तेथल्या मॅनन कुटुंबियांच्या तसबिरींकडे पाहून "ओरिनच्या मृत्यूबद्दलचे विचार माझ्या मनांत येऊं देऊं नका" अशी त्यांना प्रार्थना करते. "माझें ओरिनवर खरेंखुरें प्रेम आहे. आणि आता आणखी एक मृत्यु मला नको आहे." असें ती तळमळीने म्हणते आणि ओरिनच्या मरणाबद्दल इच्छा आणल्याला व्हावी याबद्दल स्वतःची निर्भर्त्सना करते. हें सगळें भाषण आत्मगत आहे.

पुढे कांही घडण्यापूर्वी सेठच्या सांगण्यावरून तिला घराच्या आंतल्या बाजूला मोलकरिणीची समजूत घालण्याकरिता जावें लागतें. ती तेथें नसतांना फीटर व हेझेल तेथे येतात. केवळ ओरिनसाठी म्हणूनच हेझेल तेथे येण्याला तयार झालेली असते. लॅव्हिनिया त्याला घरांत अशी डांबून ठेवते, बाहेर जाऊं दिलेंच तर त्याची पाठ सोडीत नाही याबद्दल हेझेलला तिचा संताप आलेला असतो. एवढेंच नव्हे तर लॅव्हिनियांत कांही तरी बदल झालेला आहे, ती फाजील धट्ट झाली आहे असेंही ती म्हणते; आणि लॅव्हिनियाच्या तावडींतून कांही दिवस तरी ओरिनची सुटका करण्यासाठी आपण ओरिनला आपल्या घरीं नेणार असेंही ती पीटरला म्हणते. परंतु प्रश्न होता, लॅव्हिनिया हें घडूं देणार का? तथापि ओरिनपासून लॅव्हिनियालाही चार दिवस मोकळीक मिळाली तर बरेंच होईल असें म्हणून तिचें मन वळविण्याचें काम पीटर स्वतःवर घेतो. अशा रीतीने ओरिनला बरें वाटलें तर त्यांत पीटरचा स्वार्थच होता; त्याच्या लग्नाच्या मार्गातली अडचण दूर झाली असती. परंतु पीटरने आता "लॅव्हिनियाशीं लग्न करावें ही गोष्ट हेझेलला मान्य नसते. पण 'आता' चा अर्थ स्पष्ट करण्याची संधि तिला मिळत नाही. तेवढ्यांत ओरिन तेथे येतो.

ओरिनच्या मतें लॅव्हिनियाचें लग्न होतांच कामा नये—

पीटरने सांगितलेले असतें की आपल्याला अर्धा तास तरी नगरसभेच्या बैठकीला जायचें आहे. त्याप्रमाणे तो जातो आणि हेझेल व ओरिन यांना एकत्र बोलायची संधि मिळते. ओरिन या संधीची वाटच पाहत होता. घाईघाईने आंतून तो आपलें हस्तलिखितांचें बंद केलेलें मोठें पाकीट घेऊन येतो आणि तें हेझेलच्या हातीं देऊन तिला तें जपून ठेवायला सांगतो. आपलें जर कांही बरेंवाईट झालें – म्हणजे आपल्या मृत्यूनंतर हेझेलने तें उघडून वाचावें. पण त्यापूर्वीच लॅव्हिनियाचें लग्न पीटरशीं होण्याचें घाटलें तर लग्नाच्या आदल्या दिवशीं पीटरला तिने तें वाचायला द्यावें, अशी विनवणी करतो.

याचा अर्थ पीटरचें लॅव्हिनियाशीं लग्न होऊं नये अशी तिची इच्छा होती हें उघड होतें. तो म्हणतोच मुळी की, "तिला सुख मिळावें अशी तिची पात्रताच नाही,

तिला शिक्षाच झाली पाहिजे.” त्याचप्रमाणे आपल्यालाही आता गुन्ह्याची संगत करून गुन्हेगारीच्या खोल गर्तेंत गेलें पाहिजे, म्हणून आपल्याशीं लग्न करण्याचा विचार हेझेलने सोडून द्यावा असेंही तो तिला गंभीरपणें सुचवितो.

ओरिनची दूर कुठे तरी जाण्याची ओढ —

त्यावर “ तुझ्या मनांत कसल्या तरी कल्पनेचें अवघड दडपण पडलेलें दिसतें. मोकळेपणीं तूं बोलून कां टाकीत नाहीस ? ” असें हेझेल त्याला विचारतें. मनांतलें सर्व कांही तिला सांगून टाकावें असें क्षणभर त्याला वाटतें. परंतु तो सांगत नाही. व्हिनीवरच्या प्रेमामुळे आपण तसें करूं शकत नाही, असें म्हणतो. पण हेझेलच्या कानावर व्हिनीने सांगितलेली हकीकत गेलेली असते की, ओरिनचें भांडण झालें आणि त्यामुळे तिच्या मृत्यूची जबाबदारी आपल्यावर आहे या विचाराने ओरिन आपलें मन खात होता. अर्थात आपण कांही बोललों तरी त्याचा बंदोबस्त केलेला असावा हा यामध्ये जो लॅव्हिनियाचा प्रयत्न त्याला दिसला त्याचा उबग येऊन तो हेझेलला म्हणतो “ कांही कर, पण हिच्यापासून मला कुठे तरी घेऊन जा – नाहींतर भयंकर कांहीतरी घडेल.” हेंच तर हेझेलने ठरविलें होतें. परंतु लॅव्हिनिया त्याला जाऊं देईल हें शक्य नव्हतें. त्यासाठी आपण चोरून निसटून जाऊं आणि मग हेझेलने आपल्याला लपवून ठेवावें असा बेत ओरिन करतो. पण आपण असें खोटें बोलणार नाही, असें म्हणून हेझेल तो बेत मोडून काढते. पुढे कांही बोलणें होण्यापूर्वीच लॅव्हिनिया आंतून तेथे येऊन पोचते. त्या दोघांकडे ती संशयित नजरेने पाहत राहते. त्यांना बराच वेळ एकमेकाशीं बोलायला तर मिळालें नसेल ना, या आशंकेने ती भयभीत होते. त्या दोघांच्या नजरेवरून त्यांचा कांही तरी लपविण्याचा प्रयत्न चालला आहे हें तिच्या ध्यानांत येऊन ती स्पष्टच विचारते “ माझ्यापासून लपवून ठेवायचा तुमचा विचार आहे कांही ? ”

लॅव्हिनियाचें व हेझेलचें भांडण —

त्यावर आपल्याला लपवायचें कांही नाही; ओरिनने हेझेलकडे चार दिवस जाऊन राहावें असा आमचा विचार ठरला आहे असें तीं दोघेंजण सांगतात. त्यावरून हेझेल आणि लॅव्हिनिया यांचें चांगलेंच भांडण होतें. ओरिनला स्वातंत्र्य दिल्यानेच त्याला बरें वाटेल, असें म्हणते तेव्हा “ माझ्या कामांत तूं लुडबूड करूं नकोस ” असें तिच्यावर लॅव्हिनिया ठसवूं पाहते. त्यावर “ हें खरें माझें काम आहे. तुझ्यापेक्षा माझेंच ओरिनवर जास्त प्रेम आहे. तूं ज्या पद्धतीने त्याच्याशीं वागते आहेस त्यावरून पाहतां त्याच्याविषयी तुझ्या मनांत कांहीसुद्धा प्रेम नाही ” असें हेझेल आगींत तेल ओतते.

हें भांडण लांबूं नये असें मनांत आणून ओरिन हेझेलला घरीं जायला सांगतो. तीही त्याचा विचार समजून जाऊं लागते. जातां जातां लॅव्हिनियाला ती बजावते, “ माझा तूं जो हा आज अपमान केला आहेस त्यामुळे तुझी माझी मैत्री यापुढे संपली. ”

हेझेलला ओरिनचें हस्तलिखित न्यायला मिळत नाही —

परंतु लॅव्हिनिया तिला जाऊं देत नाही. पाठीमागे हातांत ती कांहीतरी लपवून नेते आहे हें ध्यानांत येऊन हात धरून लॅव्हिनिया तिला थांबविते. खोटें बोलायचें नाही यासाठी हातांत काय आहे तें हेझेल कांहीच सांगत नाही, पण तें पाकिटही लॅव्हिनियाला देत नाही. स्वतः कुटुंबाचा लिहिलेला इतिहास ओरिनने तिच्या हातीं दिला आहे हें ओळखून ती त्याला "विश्वासघातकी, भेकड" अशीं दूषणें देते आणि मॅनन कुटुंबियांना हें शोभत नाही असें म्हणते. "मी मॅनन आहे म्हणून तर हें करतों आहे" असें उलट उत्तर ओरिन देतो. शेवटीं निरुपाय होऊन लॅव्हिनिया त्याला विनवून म्हणते "ओरिन, हें हस्तलिखित परत दिलेंस तर मी तूं म्हणशील तें करीन."

ओरिन म्हणेल तें करण्याचें वचन ! —

"मी म्हणेन तें ! अगदी खरें म्हणतेस !" असें ओरिन उन्मेखून तिला विचारतो. तिने हो म्हटल्यावर आपण कांहीतरी एक अपूर्व विजय मिळविला अशा भावनेने तो बेतालपणें हसतो आणि हेझेलकडून तें पाकीट घेतो.

याचा जो समजायचा तो अर्थ हेझेल समजते आणि म्हणते "मी आतां घरीं जातें. यानंतर आता तुझी वाट आम्हीं आमच्याकडे पाहायचें कारणच नाही."

रागाच्या भरांत ती जें हें झणकारली त्याचा केवढा भीषण प्रत्यय तिला येणार होता लौकरच, याचें तिला स्वप्न तरी पडलें असेल काय ? ती गेल्यावर ओरिन लॅव्हिनियाकडे वळून म्हणतो "तुझ्या वचनाचा अर्थ नीट ध्यानीं आला ना ? आता तुला पीटरला पार विसरलें पाहिजे; पुन्हा त्याला भेटतां कामा नये."

ती हो म्हणते. पण तेवढ्याने ओरिनचें समाधान होत नाही. आपलें वचन मोडण्यासाठी कांही ना कांही क्लृप्त्या ती लढवणारच, ही त्याला भीति असते. म्हणून तो पुन्हा म्हणतो "मला कांही तूं अगदीच खुळा समजूं नकोस व्हिनी ! तुझें वचन काही एवढ्यावरच संपणार नाही. ध्यानांत आहे ना ! मी जें म्हणेन तें – काय हवें तें करायचें तूं कबूल केलेलें आहेस !"

ओरिनचा भयंकर विचार —

त्याचें तें बोलणें आणि भ्रांतिष्टासारखें पाहणें यामुळे लॅव्हिनियाच्या अंतःकरणाचा थरकाप होतो. त्याच्या मनांत कांहीतरी भयंकर विचार नाहीना अशी तिला शंका येते. त्यावर तो लॅव्हिनियाला म्हणतो "तुझ्याबद्दल माझ्या मनांत कोणते विचार घोळत असतात आईचा तूं खून केल्यापासून, याची तुला कल्पना नाही व्हिनी ! मला तूं आतां बहिणीसारखी किंवा आईसारखीही वाटत नाहीस, सुंदर केस असलेली कोणीतरी

तिच्याईत स्त्री आहेस असें वाटतें मला." असें म्हणून ओरिन तिच्या केसांत हात फिरवूं लागतो. ती त्याचा हात हिसडून टाकते. तेव्हा खदखदून हसून "मला तर वाटतें की, तूं म्हणजे मेरी ब्रँटोमच आहेस–आणि तरीही तूं म्हणतेस भुतें नसतात म्हणून!"

तरीपण गुन्हा कबूल करून मनस्तापापासून सुटण्याची इच्छा —

आता त्याचा हीन हेतु लक्षांत येऊन लॅव्हिनिया भयभीत होते. तो स्पष्टच म्हणतो "यावाचून मार्गच नाही. त्यानंतर मला जशा अपराधीपणाच्या इंगळ्या लागल्या आहेत तशा तुलाही लागून राहतील" आणि मग रागाने लाल होऊन पुढे तो म्हणतो, "असें कांहीतरी करून जीवनांत मला निश्चितता मिळाली पाहिजे. नाहीतर मला वेड लागेल. आणि मला वेड तर लागूं नये अशी तुझी इच्छा आहे. कां की, नाही तर मी काहीतरी बरळत सुटेन आणि सगळें कांही कबूल करून टाकीन. या विचारासरशी त्याची वृत्ति पालटते आणि तो तळमळून लॅव्हिनियाला म्हणतो, "खरेंच व्हिनी, चल ना, आपण सगळें सगळें कबूल करून टाकूं आणि आईच्या खुनाबद्दलची शिक्षा भोगून दोघेजण सुखाने एकत्र राहूंया ना!"

पण लॅव्हिनियाला हें मंजूर नाही. कबूल करायला घडलाच आहे कोठे अपराध? जें काय घडलें तें न्यायाचेंच झालें अशी तिची दृढ समजूत आहे.

त्यावर निराश होऊन तसबिरींकडे डोळे लावून ओरिन म्हणतो "ऐकलेत! माझा तुम्हीं चक्काचूर केला आहे. पण हें लॅव्हिनिया प्रकरण फार मजबूत आहे. तुम्हांला तिला सारा जन्मभर झपाट्न राहावें लागेल.

लॅव्हिनियाचा तोल सुटतो —

हें ऐकून लॅव्हिनियाचा तोल सुटतो आणि ती किंचाळते "मला तुझी किळस येते. मरून जावेंस तूं असें वाटतें. तूं इतका क्षुद्र आहेस की जगायची तुझी पात्रताच नाही. भेकड आहेस तूं. नाहीतर केव्हाच आत्महत्या करून तूं मोकळा झाला असतास! अगदी खरें बोलतें आहें मी." आणि ती आचके आणि हुंदके देऊं लागते.

"माझ्याकडून आत्महत्या हवी आहे तुला! आणखी एक न्याय्य गोष्ट साधायची आहे तुला? खरें आहे, आईच शिरली आहे तुझ्या अंगात. तीच मला ही शिक्षा सांगते आहे. जातो, जातों मी आणि मरून तिला भेटलों म्हणजे मी तिची क्षमा मागेन." असें म्हणून व त्याला थांबविण्यासाठी लॅव्हिनियाने घातलेला विळखा हिसडून टाकून ओरिन लिहिण्याच्या खोलींत जाऊं लागतो. त्याच वेळीं पीटर तेथे येतो. परंतु आंत मला पिस्तूल साफ करायचें आहे, असें म्हणून त्याच्यासाठीही ना थांबतां ओरिन आंत निघून जातो.

भावी वैवाहिक सौख्याचीं लॅव्हिनियाचीं स्वप्नें —

क्षणभर त्याला थांबवण्याचा प्रयत्न करण्यासाठी लॅव्हिनिया त्याच्या मागे जाते. परंतु लगेच थांबून ती पीटरच्या हातांमध्ये झेपावते आणि वेड्यासारखी बरळूं लागते; "जगांत प्रेमाला, विषयोपभोगालाच, काय ती खरी किंमत आहे. त्याच्यासाठी काय वाटेल ती किंमत द्यावी लागली तरी हरकत नाही; प्रेमासाठी नाहीतर शांतीसाठी; कांही झालें तरी माणसाला शांति मिळाली पाहिजे."

पण ही कांही तिची खरी वेडाची बडबड नव्हती. ओरिनची किंमत देऊन आपण शांति मिळविली आहे आणि प्रेमही मिळविलें आहे, या एकाच विचाराने ती भारून गेली होती. या भारलेल्या अवस्थेंत आपल्या वैवाहिक - भावी - जीवनाचें जें चित्र ती रेखाटते तें केवढें काव्यमय आहे !

पण या काव्याचा दुसऱ्याच क्षणीं केवढा तीव्र विध्वंस होतो. ओरिनच्या खोलींतून पिस्तुलाचा दडपलेला आवाज येतो. पीटर तत्क्षणीं तिकडे धाव घेतो. काय झालें असलें पाहिजे याची लॅव्हिनियाला पूर्ण कल्पना आहे. त्या तसबिरी त्यामुळेच आपल्याकडे डोळे वटारून पाहत आहेत असा तिला भास होतो. पण ती म्हणते, "पण मी तरी काय करणार ! तुमचें रहस्य घटकणीं न होऊं देण्याला याहून दुसरा इलाजच नव्हता ! पण इथे आता माझी सारी धडपड संपली. मी माझ्या आईची मुलगी आहे. तुमच्यासारखी मी हिरमुसली होऊन बसणार नाही. जीवनाचा उपभोग घेईन !"

लॅव्हिनियाची व्यर्थ आशा —

परंतु लॅव्हिनियाची ही आशा व्यर्थ होती. तिनेच उठविलेलें भूत तिला असें सुखासुखी सोडणार नव्हतें. तिसऱ्या नाटकाच्या शेवटच्या अंकांत हीच करुणास्पद घटना आता आपल्याला पाह्यची आहे. ओरिनच्या मृत्यूनंतर तीन दिवसानंतरच्या दिवशींचा हा प्रसंग आहे. ब्रँट येण्याच्या दिवशीं आईने ज्याप्रमाणे जिकडे तिकडे फुलांची पखरण करण्याची शिकस्त केली होती त्याप्रमाणे आज लॅव्हिनियाने केलें होतें. पण अशा रीतीने एका पाठोपाठ एक मृत्यु घडून आल्यानंतर - त्यांतही विशेषतः ओरिन सारख्या शिपाईगड्याचा मृत्यु अशा रीतीने स्वतःच्याच पिस्तुलाने झाल्यानंतर - मॅनन कुटुंबांतला माणूस म्हणजे मरण असें लोकांना वाटायला लागलें असल्याचें सेठ म्हणतो; त्यामुळे लोक आता लॅव्हिनियाला टाळणार असें त्याचें मत असतें. आणि या फुलांच्या पखरणीने तो चकित होतो. परंतु "ही मुलगी सर्वांना पुरून उरेल, ती अगदी पक्की मॅनन आहे, असा तिच्याबद्दलचा अभिमान सेठच्या स्वगतांत व्यक्त होतो. या वेळीं लॅव्हिनिया प्रवेश करते. मॅनन कुटुंबाच्या स्वभावाची छटा आता तिच्या ठिकाणीं अधिकच दाट झालेली असते. ती सेठला सांगते की, हॅनाकडून घरभर फुलें पसरून ठेव. पण सेठ म्हणतो, "आज तीन दिवस एकसारखी तुला इथे घराच्या पायरीवर

बसून राहिलेली मी पाहतों आहें. तुला झोप नाही का येत? इथे झोपण्यासाठी सोफा आणून ठेवूं का? थोडी डुलकी लागेल तेवढीच."

तीन दिवस सारखी पीटरची वाट पाहत बसलेली —

पण लॅव्हिनिया नको म्हणते. कारण ती पीटरची वाट पाहत होती. यावरून तिच्या मनःस्थितीची, पीटरबद्दलच्या तिच्या आतुर ओढीची, जीवनांत त्याच्या सहवासांत मिळूं शकेल अशा सुखाच्या आर्त इच्छेची आणि तीन दिवस झाले तरी पीटरने येऊं नये या घटनेंतील अवघडपणाची आपल्याला चांगली कल्पना येते. लॅव्हिनिया सेठला आणखी म्हणते, "आंत जाऊन झोपायला कांही तूं मला सांगत नाहीस. कारण तुला चांगलें ठाऊक आहे की, आजोबांनी द्वेष आणि मृत्यु यांचेंच जणू हें मंदिर बांधलेलें आहे आणि त्यांत कोणाला सरळ विश्रांति मिळावयाची नाही. म्हणून आता पीटरशीं लग्न करून, हें घर मोडून नाश पावावें यासाठी मी उन्हापावसांत टाकून जाणार आहें. एकदा मी सौ. पीटर नाईल्स झालें म्हणजे मॅनन कुटुंब संपलें!" पण एवढ्यांत हेझेल येते. ही कशाला आली या वेळीं, अशी लॅव्हिनियाच्या कपाळाला आढी पडते. तसें ती हेझेलला विचारते आणि मला दुसरीं कामें आहेत असें म्हणून तिला टाळूं पाहते.

पीटरशीं लॅव्हिनियाचें लग्न न व्हावें म्हणून हेझेलचा प्रयत्न —

परंतु हेझेल अशी सुखासुखीं परत जायला आलेली नव्हती. ओरिनचा मृत्यु अपघाताने झालेला नाही; त्याने जाणूनबुजून आत्महत्या केली. कारण कांही असो, पण त्याला आत्महत्येला प्रवृत्त करण्याची सगळी जबाबदारी लॅव्हिनियाची, हें खडसावायला हेझेल आली होती. तथापि लॅव्हिनियाच्या मनःस्थितीकडे लक्ष देऊन तो विषय ती तेवढाच सोडते. पण तिच्या मनांतला दुसरा विषय अधिक महत्त्वाचा होता. पीटरशीं लग्न करण्याच्या विचारापासून लॅव्हिनियाला परावृत्त करण्याचा तिचा हेतु होता. पीटरला तिच्या सहवासांत आनंद मिळणार नाही हें तिने ओळखावें; कारण तिच्या जीवनांत कांही तरी भयंकर गोष्ट घडलेली असली पाहिजे आणि लग्न झाल्यावर ही गोष्ट लपवून ठेवण्याचें जमणार नाही. मग त्या गोष्टीमुळे दोघांमध्ये पडदा उभा होऊन त्यांना दोघांनाही सुख होणार नाहीं. म्हणून "तुझें जर प्रेम असेल त्याच्यावर, तर त्याच्या सुखासाठीच तूं त्याच्याशीं लग्न करूं नकोस" अशी लॅव्हिनियाला ती विनंती करते.

लॅव्हिनियाची कृष्णछाया पीटरच्या जीवनावर लग्नाआधीच —

लॅव्हिनियाच्या जीवनाची ही कृष्णछाया लग्नाआधीच पीटरच्या जीवितावर पडूं लागल्याचें ती सांगते. तिच्यावरून त्याचें आपल्या आईशीं भांडण झालें. तो खाणा-वळींत जाऊन राहिला. इतका चांगला मुलगा, इतका चांगला भाऊ. पण एवढ्यांतच

त्याची ही अवस्था. ओरिनच्या मार्गाला त्याला ढकलण्याची तिची इच्छा होती काय? त्याला जर सारें खरें समजलें तर त्याचीही तीच अवस्था व्हायची.

यावर "काय खरें?" म्हणून लॅव्हिनिया तिच्यावर खेकसते. त्यावर हेझेल म्हणते, "तें मला ठाऊक नाही. पण तुला तें चांगलें ठाऊक आहे. म्हणून देवाला साक्षी ठेवून आपल्या सदसद्विवेकबुद्धीला विचार की, तूं पीटरशीं लग्न करणें योग्य आहे काय?" हें ऐकून लॅव्हिनिया चिडते. पिस्तूल असतें आता माझ्या हातांत तर याबद्दल मीं तुला ठार केलें असतें, असें म्हणते. तेव्हा हेझेल म्हणतो, "करशील, चुकायची नाहीस; तशी तूं दुष्ट आहेस. खरेंच व्हिनी, कशाने तूं ही इतकी दुष्ट झालीस?"

यावर लॅव्हिनिया तिला तेथून निघून जायला सांगते. पण जातांजातां हेझेल म्हणते, "ठीक आहे, जातें मी. पण तुझ्यावरच विश्वास टाकून जातें मी. कशी झालीस तरी तूं मॅनन आहेस. न्याय आणि सदाचार यांना तूं अगदीच पारखी व्हायची नाहीस. निदान एवढें तरी कर. ओरिन म्हणाला होता त्याप्रमाणे त्याचें तें लिखाण तरी लग्नाआधी पीटरला वाचायला दे."

लॅव्हिनियाची सदबुद्धि जागृत —

हें ऐकून लॅव्हिनिया डोळे मिटते आणि चमत्कारिकपणे स्वतःशींच पुटपुटते "हीं मेलेलीं माणसें! हीं पुरीं पुरीं का मरत नाहीत!"

तिच्या ठिकाणची सत्प्रवृत्ति जागी झाल्याचा साक्षात्कार यावरून हेझेलला पटतो. म्हणून जातांना ती पुन्हा म्हणते, "तुला कशाचें तरी दुःख होतें आहे व्हिनी. तुझी सदद्विवेकबुद्धि तुझ्या हातून चांगलें तेंच घडवील आणि जें कांही झालें असेल त्याबद्दल परमेश्वर तुला क्षमा करील," आणि येणाऱ्या पीटरला आपण तेथे आल्याचें दिसूं नये म्हणून ती चटकन निघून जाते.

परमेश्वराकडून किंवा आणखी कोणाकडून लॅव्हिनियाला क्षमा नको होती. "मी खरोखर स्वतःविरुद्धच अपराध केला आहे. म्हणून क्षमा माझी मींच केली पाहिजे. जें केलें तें सगळें मीं सद्भावनेने केलें. पण परिणाम झाला असा. तेव्हा या पापाबद्दल नरक वाट्याला यायचाच असला तर तेथे आमच्यासारख्या सद्बुद्धीने पापाचे धनी होणारासाठी एखादा निराळा तुरुंग असेल काय?" असा उद्गार काढून ती खिन्न होते.

परिस्थितीची जाणीव झाल्याचें पहिलें चिन्ह —

आपल्या परिस्थितीची खरी जाणीव तिला झाल्याचें हें पहिलें चिन्ह आहे. तीन दिवस तिला झोप नाही आणि त्यांत मनाची ही अवस्था. त्यामुळे ती अगदीच ओढलेली दिसूं लागते; आणि म्हणून पीटर तिच्याबद्दल सहानुभूति व्यक्त करतो. अशा कोणाच्या तरी आसऱ्याची या क्षणीं तिला फार मोठी आवश्यकता होती. कारण त्या

घरांत खरीच भुताटकी आहे असें आता तिलाही वाटूं लागलें होतें. पीटरवर सारा भार टाकावा आणि दूर कोठेंतरी निघून जावें असें मनोराज्य ती रचीत असते. त्या वेळीं, "मला पण जितकें दूर जातां येईल तितकें दूर जायचें आहे; या गांवाचें आणि त्यांतल्या माणसांचें नांवसुद्धा नकोसें झालें आहे मला" असें पीटर अशा कांही कर्कश आवाजाने म्हणतो की, त्याचें आपल्या आईशीं भांडण झालेलें असून त्याच्या त्रस्त अंतःकरणाचा हा परिणाम आहे हें लॅव्हिनिया लगेच उमगते. पण सध्या जरी आईच्या आणि हेझेलच्या मनांत लॅव्हिनियाबद्दल वेडेवाकडे विचार आले असले तरी ते जातील लौकरच अशी पीटर संपादणी करतो. पण "पण नाही गेले तर?" या लॅव्हिनियाच्या प्रश्नाला तो उत्तर देतो "नाही गेले तर माझा त्यांचा संबंध संपला!"

आणि मग सारा चांगुलपणा जागा—

त्यासरशी लॅव्हिनियाचा सारा चांगुलपणा जागा होतो. क्षणभर ती स्तब्ध राहते. नंतर त्याचें तोंड आपल्या दोन्ही हातांत घेऊन आपल्या सन्मुख वळविते आणि म्हणते "तुझें तोंड नीट पाहूं दे मला! तुला कांही तरी फार लागून राहिलेलें आहे! तुझ्या डोळ्यांत आपल्यावर कोणी तरी अन्याय केल्याची जळजळीत जाणीव आहे. तुझे डोळे शंकाकुल दिसताहेत. आणि संसाराबद्दलची भीति त्यांच्यांत उमटली आहे. पीटर, माझ्यामुळे एवढ्यांतच तुझी ही अवस्था व्हावी! माझा तुला कांही संशय आला आहे का? ओरिनने माझ्याबद्दल काय लिहिलें असावें याचें तुला कोडें पडलें आहे काय?"

आंतरिक ऋजुता व श्रेष्ठता—

या तिच्या भाषणांत आपल्या परिस्थितीची जाणीव, तिचें पीटरवरील गाढ प्रेम, आपल्या हिताची होळी करावी लागली तरी बेहत्तर, पण पीटरला दुःख होतां कामा नये अशी उत्कंठा, या सर्व गोष्टी किती जळजळीतपणे आपल्या प्रत्ययाला येतात आणि आपलें मन एकदम हळवें होतें, लॅव्हिनियाच्या आंतरिक ऋजुतेची आणि श्रेष्ठतेची आपल्याला ओळख पटते आणि एकदम आपण आणि ती एकमेकांच्या किती तरी जवळ येतो.

पहिल्यापासून तिन्ही नाटकांत ती करते तें न्यायाचें असलें तरी असा जिव्हाळा आपल्याला वाटला नाही. आईबद्दलचा तिचा द्वेष, बापाबद्दलचा पक्षपात, मानवी विकारांच्या शक्तीबद्दलचें अज्ञान, ब्रँटवरील प्रेम किंवा लालसा, त्याचमुळे आईविषयी उसळून आलेला मत्सर, आपल्या न्यायअन्यायाच्या कल्पनेच्या समाधानासाठी कोणाचाही बळी द्यावा लागला तरी बेफिकीरी, अखेर न्यायासाठीं म्हणून नव्हे तर आपल्या भविष्यकालीन संसाराच्या सुखाच्या आड तो येऊं नये म्हणून ओरिनचा अंत चिंतण्याची आणि प्रत्यक्ष सूचित करण्याची तिची मनाची तयारी, या सर्व गोष्टी तिच्याबद्दल आपलें मन अस्वस्थच करीत आल्या होत्या. परंतु हेझेलने आपल्या निर्व्याज भ्रातृप्रेमाने तिची सदसद्विवेकबुद्धि जागृत केली. लॅव्हिनियाच्या चांगुलपणाचें हें नवें आणि पहिलेंच

दर्शन आपल्याला तिच्याकडे आकर्षित करतें. या अनुकूलतेच्या भावनेने तिचे आजपर्यंतचे अपराध आणि कठोरता आपण विसरतों आणि विशुद्ध झालेल्या या चुकलेल्या तरुण मुलीचें जीवन यापुढे तरी सुखी होवो अशी ओढ आपल्या मनांत लागते.

लॅव्हिनियाचें एक मन आपण पीटरशीं लग्न करणें पीटरच्या हिताचें नाही असें तिला बजावीत असतांही, तिचें दुसरें मन जें होणार नाही, होऊं नये, तें व्हावें अशासाठी अजूनही धडपडते. पीटरच्या मनांत आपल्याबद्दल कसलाही संशय येऊं नये म्हणून आणि एका अर्थी त्याच्या मनाची पुरती परीक्षा करण्यासाठी ती त्याला म्हणते, "आत्ताच्या आत्ता आपण लग्न उरकून घेऊं. एका क्षणांत मी कपडे बदलतें. आणि कुणी तरी भिक्षुक आपण गाठूं या!"

परंतु मानेवर बसलेला भूतकाळ—

पण पीटर परीक्षेला उतरत नाही. तो कचरतो. तिला इतकी घाई सुटली आहे त्या अर्थी थांबायची तिला भीति वाटावी असें कांहीं ओरिनने लिहिलें नव्हतें ना, असा संशय तो व्यक्त करतो. आणि मग मात्र लॅव्हिनियाचा निर्धार होतो. आता आपल्या जीवनांत एकाकी भकास जिणेंच आपल्याला कंठायचें आहे हें तिला उमगतें. परंतु त्यापूर्वी, एकदाच धीर धरून, पापपुण्याच्या कल्पना मनांत न आणतां पीटरने आपल्याला शरीरभोगाचें सुख द्यावें म्हणजे त्या एका क्षणाभराच्या सुखाने आपण कृतार्थ होऊं, अशा मनाला लागलेल्या ओढीने ती त्याला अगदी लाज सोडून स्वतःला जवळ घ्यायला आणि विषयसुखाचा उपभोग घ्यायला विनविते. परंतु मानेवर बसलेला भूतकाळ तिला येथेही पुरून उरतो. त्याला तसें ती विनवीत असतां "ऐक रे माझें, घे ना मला जवळ, घेतोस ना रे ॲडाम" असे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडतात. ॲडाम ब्रँटची पकड आपल्या चित्तावर किती बळकट बसली आहे हें क्षणार्धांत तिला उमगतें. आणि ती खोल आवाजांत म्हणते,

"नाही पीटर, तुझें माझे लग्न होणें शक्य नाही. तूं मला पुन्हा भेटूं नकोस. घरीं जा आणि आईशीं व हेझेलशीं समजोता कर. दुसऱ्या कोणाशीं तरी लग्न कर. प्रेम करणें माझ्या नशिबीं नाही. मेलेल्यांनी मला अनिवार झपाटलें आहे."

लॅव्हिनिया निःस्वार्थीपणाच्या एवढ्या उंचीवर चढते. पण तिला पीटरकडून साथ मिळत नाही. त्याच्या मनांत संशय घर करतो. ओरिनने लॅव्हिनियाच्या आणि त्या बेटावरच्या अवाहन्नीच्या वाईट संबंधाबद्दल कांही तरी लिहिलेलें असलें पाहिजे असें त्याला वाटतें.

खोटें सांगून पीटरला दूर करते—

यांत तो आपला क्रूर अपमान करतो आहे, असें पहिल्या प्रथम लॅव्हिनियाला वाटतें. पण दुसऱ्याच क्षणीं पीटरला आपल्यापासून दूर करण्याचा यामध्ये तिला मार्ग सापडतो. आणि "होय, तुला तें समजायलाच हवें. ओरिनचा संशय होता की, त्या माणसाला मीं माझा उपभोग घेऊं दिला. तो संशय खरा आहे!"

पीटरला तिच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटलीच नाही. आई व बहीण म्हणत होत्या तेंच खरें असें त्याला वाटतें. आणि "ओरिनने आत्महत्या केली तेंच बरोबर! तुला याबद्दल चांगली शिक्षा झाली पाहिजे" असें म्हणून तो तिचा त्याग करून निघून जातो.

किती हृदयविदारक आणि मर्मभेदक प्रसंग होता हा! कारण तो गेल्यावर लॅव्हिनिया अंतःकरण पिळवटून उद्गारते, "पीटर, नाही रे नाही. निव्वळ खोटें सांगितलें मी तुला!"

लॅव्हिनियाच्या करुण जीवनाची परिसीमा —

आणि येथे त्या बिचारीच्या करुण जीवनाची परिसीमा होते. वर्षभरांत जें जें ती करायला गेली त्यांतून विपरीतच कांहीतरी घडत गेलें आणि अखेर ज्या आरोपासाठी तिने आपल्या आईवर आग पाखडली तोच आरोप आणि तोही खोटाच, स्वतः होऊन आपल्यावर ओढवून घेण्याचें दिव्य करून आपल्या प्रियकराला तिने वाचविलें आणि आपल्या स्वतःच्या जीवनांत नामुष्की पतकरली.

पण तिने हें रडत केलें नाही. आलेला दुर्धर प्रसंग तिने महान धैर्याने स्वीकारला. घराच्या सर्व खिडक्या बंद करून त्यामध्येच स्वतःला कोंडून घेऊन राहण्याचें तिने ठरविलें. आपल्या कुटुंबावरचा शाप आपण मरूं तेव्हाच संपणार आणि आपण अशी लौकर मरणार नाही. दीर्घकाळ दुःख भोगून पिचल्याशिवाय साऱ्या क्रुद्ध मॅनन लोकांचे आत्मे शांत होणार नाहींत. "मॅनन म्हणून जन्मल्याबद्दल आमचें आम्हांलाच प्रायश्चित घ्यायला हवें. आणि तें मी घेणार आहें. आई आणि ओरिन यांच्याप्रमाणे मी आत्मनाश करणार नाही. तसें करणें म्हणजे प्रायश्चित्ताला मिऊन पळणें आहे."

आणि अशा रीतीने जें दुःख "सोशीत राहणें हेंच इलेक्ट्राला (लॅव्हिनियाला) शोभतें" हें नांवच नाटककाराने आपल्या नाटकाला दिलें, त्या दुःखाचा धीराने स्वीकार करून लॅव्हिनियाने स्वतःला कोंडून घेतल्यावर हें त्रिकांड नाटक संपतें.

आपल्या नायिकेचें नांव लॅव्हिनिया असतांना नाटकाच्या नावांत मात्र ओनीलने 'इलेक्ट्रा' हें नांव उपयोगांत आणलेलें आहे याला खास अर्थ आहे. ॲगॅमेम्नॉन, त्याची मुलगी इलेक्ट्रा आणि मुलगा ओरिस्टीस यांची दंतकथा ग्रीक समाजांत फार मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. त्या दंतकथेची मोहिनी एवढी जबरदस्त की, ग्रीक वाङ्मयांतील तीन महान नाटककारांनी त्या कथेवर आधारून नाटकें लिहिलीं आहेत. शोकांत नाटक म्हणजे तीन नाटकांचा संच अशी ग्रीक वाङ्मयांतील प्रथा होती. त्या दृष्टीने इस्किलस यांचीं या कथावस्तूवर आधारलेलीं तीन नाटकें संपूर्ण उपलब्ध आहेत. ॲगॅमेम्नॉन, क्रोफोरो आणि यूमेनिडीज हीं तीं तीन नाटकें. त्या सर्वांना मिळून ओरिस्टेइया असें नांव त्यानें दिलें आहे. या नांवाला अनुरूपच त्याची रचना आहे; म्हणजे त्याने ॲगॅमेम्नॉनचा मुलगा ओरिस्टीस याला महत्त्व अधिक दिलें

आहे. त्या मानाने यूरिपिडीस व सोफोक्लीस यांचें लक्ष अॅगॅमेम्नॉनची मुलगी इलेक्ट्रा हिच्यावर अधिक खिळलेलें आहे. त्या नांवाचीं नाटकें त्यांचीं दोघांचींही उपलब्ध आहेत. परंतु त्याशिवाय आणखी दोन दोन नाटकें या कथावस्तूचा संपूर्ण आविष्कार करण्यासाठी त्यांनी लिहिलीं होतीं की नाही हें समजण्यास आज साधन नाहीं. तरीं तीं त्यांनी लिहिलेलीं असावींत असें मानण्याला पुष्कळ जागा आहे. कारण यूरिपिडीसचें इलेक्ट्राशिवाय ओरिस्टीस नावाचें त्यापुढच्या कथाभागाचें नाटक उपलब्ध आहेच. मात्र त्यांतही इलेक्ट्राला त्यानें खूपच प्राधान्य दिलेलें आहे.

ग्रीक नाटकांचें ऋण —

ग्रीक दंतकथेंतील जो आराखडा ईस्किलसने रेखाटला आहे तो जसाच्या तसा ओनीलने आपल्या नाटकांत उचलला आहे. ट्रॉयची लढाई जिंकून अॅगॅमेम्नॉन परत येतो त्याच रात्रीं त्याची पत्नी क्लायटेम्नेस्ट्रा कुऱ्हाडीने त्याचा वध करते; त्याचप्रमाणे यादवी युद्धांत जनरल लीचा पराभव झाल्यानंतर एझरा मॅनन परत येतो आणि त्याच रात्रीं त्याचा वध त्याची पत्नी क्रिस्टाईन करते; फक्त आधुनिक काळाला अनुसरून ती त्याला विष देते. ईस्किलसच्या दुसऱ्या नाटकांत ओरिस्टीस परराज्यांतून परत येतो आणि त्याला आपल्या आईचा आणि तिचा यार एजिस्थीस याचा वध करायला त्याची बहीण इलेक्ट्रा प्रवृत्त करते. ओनीलच्या नाटकांत हीच गोष्ट लॅव्हिनियाने केली आहे. फक्त वधक्रम बदलला आहे. आईचा यार अॅडाम याचा वध तिने आधी करविला आणि त्याचा परिणाम म्हणून आईची आत्महत्या झाली. परंतु त्या आत्महत्येलासुद्धा अगदी निकटचें कारण ओरिनने आईची केलेली निर्भर्त्सना हें आहेच. त्याचाच परिणाम ओरिनच्या मनांत आपण आईच्या वधाला कारण झालों, म्हणजे आईचा आपण खून केला या ग्रहाचें भूत थैमान घालूं लागलें. ओरिस्टीसने तर प्रत्यक्षच मातृहत्या केली होती. पित्याच्या मृत्यूचा सूड घेण्याचें पुत्रकर्तव्य त्याने केलें खरें, परंतु मातृहत्येचें पातक त्यांतून त्याच्या शिरीं बसलें होतें. त्याची आई भूत होऊन त्याच्या राशीस लागली होती. तिनेच डाकिणींना त्याच्याविरुद्ध उठवून त्याला भणभण फिरायला लावलें होतें. ओरिनलाही आईचें भूत – त्याच्या मनांतलें – छळीत होतें आणि त्या संतापांतच त्याने स्वतःचा अंत करून घेतला. अॅगमेम्नॉनबद्दल चीड येण्याला कारण क्लायटेम्नेस्ट्राला होतें तें हें की, ट्रॉयच्या लढाईवर जातांना समुद्राचें वादळ शांत करण्यासाठी त्याने आपल्या मुलीला बळी दिलें होतें. आपला तरुण आणि स्वतःला जीव की प्राण असणारा मुलगा ओरिन याला युद्धावर पाठवून आपलेंही जीवन असेंच एकाकी आणि असह्य केलें गेलें होतें ही या नाटकांत क्रिस्टाईनची तक्रार होतीच. त्याचप्रमाणे या दोघींचा चोरटा प्रेमव्यवहार होता आणि तोही आपापल्या नवऱ्यांच्या चुलतभावाशींच होता. अॅगॅमेम्नॉनचा चुलत भाऊ एजिस्थीस याला आपल्या बापाच्या मृत्यूचा सूड उगवायचा होता; तर या नाटकांत अॅडाम ब्रॅंटला आपला बाप डेव्हिड आणि आई मेरी

बँटोम या दोघांच्याही मृत्यूचा सूड उगवावयाचा होता. एवढेंच नव्हे तर क्लायटेम्नेस्ट्राला ज्याप्रमाणें ॲगॅमेम्नॉनचें प्रौढ वय आणि कठोर वृत्ति यांचा तिटकारा आलेला होता तसाच क्रिस्टाईनलाही एझरा मॅननबद्दल आलेला होता.

ओनीलने केलेला मोठा फरक —

ओनीलने एक मात्र मोठा फरक केला. ईस्किलसचा ओरिस्टीस याला अखेर अपोलोच्या न्यायासनापुढे दोषमुक्त करण्यांत येतें तर ओनीलचा ओरिन पश्चात्तापाने होरपळून आत्महत्या करून घेतो. * परंतु याहून मोठा फरक म्हणजे लॅव्हिनियाच्या स्वभावपरिपोषांतला आहे. ईस्किलसने तर इलेक्ट्राकडे विशेष लक्षच दिलेलें नाही. ॲगमेम्नॉनचा खून झाल्यानंतरच दुसऱ्या नाटकांत आपल्याला तिचें दर्शन होतें; त्या नाटकांतही बापाच्या खुनाचा बदला घेण्याचें काम ओरिनवर सोपविणें एवढेंच तिचें कार्य. हें करण्यालाही तिला विशेष परिश्रम पडत नाहींत. ओरिस्टीसच्या मनाची जवळजवळ आधीच तयारी असते. आणि एकदा एवढें कार्य झाल्यावर इलेक्ट्रा ईस्किलसच्या नाटकांत आपल्याला पुन्हा भेटतच नाही.

याच्या उलट यूरिपिडीस आणि सोफोक्लीस या दोघांनीही इलेक्ट्राला प्रमुख कल्पून दोन मोठीं नाटकें लिहिलीं आहेत. परंतु इलेक्ट्राचें जीवन दुःखी होतें असें यूरिपिडीसने दाखविलेलें नाही. एजिस्थीसने तिचें लग्न एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाशीं लावून देऊन तिला दुःखी करण्याचा प्रयत्न केला हें आपण त्याच्या ओरिस्टीस या नाटकांत पाहतों. पण त्या नवऱ्याने तिला पत्नी म्हणून वागविलें नाही आणि पुढे ओरिस्टीसच्या पश्चात्तापजन्य आजारांत त्याच्याबरोबर राहून तिनें त्याला मोठें साह्य केलें व अखेर त्या पहिल्या अस्वाभाविक लग्नांतून तिची मुक्तता होऊन अपोलोच्या आदेशानुसार तिचें लग्न ओरिस्टीसचा परममित्र प्लीएडस याच्याशीं होतें.

याच्या उलट सोफोक्लीसने मात्र इलेक्ट्राचें चित्र जणू आपली सर्व प्रतिभा खर्च करून रेखाटलें आहे. तिचा आपल्या आईबद्दलचा तिटकारा आणि संताप; सभ्यता आणि न्याय यांबद्दलची तिची तीव्र जाणीव, तिचें आईबरोबरचें कडाकडी भांडण, बापाच्या मृत्यूचा सूड घेण्याची तिला लागलेली तळमळ, स्वतःच्या सांसारिक जीवनाचा होम करून न्यायप्रस्थापनेसाठी धडपड करण्याची तिची हिंमत, आपल्याला दुःखांत आणि

---

* यूरिपिडीसचा ओरिस्टीसही पश्चात्तापाने होरपळून निघून इतका आजारी होतो की, कांही काळ जणू त्याच्या नाकाशीं सूतच धरलें होतें. त्याच्यावर डाकिणींचा हल्ला होण्याऐवजी क्लायटेम्नेस्ट्राच्या बापाने हल्ला केला होता, आणि त्याला साह्य नागरिकांचें होतें. शेवटीं अपोलोची आकाशवाणी होऊन त्याला त्याच्या दोषापासून मुक्त करण्यांत येतें; तथापि त्यापूर्वी त्याला एक वर्ष दूर जाऊन राहण्याची शिक्षा भोगावी लागते व त्यानंतर त्याचा न्याय होऊन त्याची शुद्धि व्हायची होती. या नाटकांतही लॅव्हिनियाने ओरिनला एक वर्षभरच दूर नेलें होतें.

लग्नाशिवायच राहावें लागणार हें माहीत असूनही, बहिणीच्या सावधपणाच्या सल्ल्याचा अनादर करून, " पुढच्या पिढ्या आम्हीं न्यायाची बूज राखली यासाठी आमची पूजा करतील " या भावनेने आपलें कर्तव्य करीत राहण्याची तिची निष्ठा, या सगळ्या गोष्टी सोफोक्लीसने किती प्रभावीपणें दाखविल्या आहेत. शेक्सपीअरच्या सामर्थ्याची पदोपदीं आठवण करून देणारें हें त्याचें नाटक शेक्सपीअरच्यापुढे हॅम्लेट लिहितांना होतें की काय असें वाटावें इतकें या दोन नाटकांत कांही कांही बाबतींत साम्य आहे.

ओनीलपुढे सोफोक्लीसच्या इलेक्ट्राचा आदर्श —

इलेक्ट्राच्या जीवनाचा अखेरचा भाग दाखविणारें असें सोफोक्लीसचें नाटक उपलब्ध नाही. त्यामुळे तिच्या जीवनाची अखेरची परिणति तो कशी दाखविणार होता याबद्दल सांगायला कांही साधन नाही. परंतु अँटिगनीप्रमाणेंच तिचें जीवन दुःखी झालेलें दाखविण्यापुरेशी तयारी त्याने आपल्या इलेक्ट्रा या नाटकांत अवश्य केलेली आहे. या नाटकांतही इलेक्ट्राची बहीण तिला साहसापासून परावृत्त करण्याचा यत्न करते, सत्ताधीशाशीं झगडा करून स्वतःचें जीवन उध्वस्त करण्याशिवाय अन्य फळ नाही हें बजावते. आणि आपल्याला विवाहाशिवाय एकाकी, कष्टी जीवन घालवावें लागणार याची जाणीव स्वतः इलेक्ट्रालाही असल्याचें आपल्या निदर्शनाला येतें.

ओनीलची भर : फ्रॉईडचें तत्त्वज्ञान —

त्यामुळे कथेचा आराखडा ईस्किलसवरून घेतला असला तरी ओनीलने सोफोक्लीसच्याच इलेक्ट्राचा आदर्श पुढे ठेवून आपली इलेक्ट्रा – लॅव्हिनिया – चित्रित केली आहे, असें वाटल्यावांचून राहत नाही. यांत त्याची स्वतःची अशी भर म्हणजे फ्रॉइडच्या तत्त्वज्ञानाची; मुलीला बापाबद्दल आणि मुलाला आईबद्दल वैषयिक प्रेम वाटतें, त्यांतून आईच्या मनांत मुलीबद्दल आणि मुलीच्या मनांत आईबद्दल [मुलाच्या आणि बापाच्या बाबतींतही हाच न्याय] मत्सर निर्माण होतो; माणसाच्या अज्ञात मनांत पुष्कळ भावनांचे उद्रेक चालू असतात आणि त्यांचा परिणाम त्याच्या हातून घडणारीं कांही अनपेक्षित वाटणारीं कृत्यें घडण्यांत होतो – हें सारें तत्त्वज्ञान लॅव्हिनियाच्या स्वभावपरिपोषांतून व्यक्त करण्याचा मोठाच यशस्वी प्रयत्न ओनीलने केला आहे.

श्रेष्ठ म्हणून कांही आदर नव्हे —

अशा तऱ्हेने अतृप्त विषयलालसेच्या झपाट्यांत सापडून आपलें सारें जीवन उध्वस्त करण्याला कारण झालेली ओनीलची लॅव्हिनिया कोणी श्रेष्ठ स्त्री नाही. तिच्या श्रेष्ठपणाचा पुरावा तर दूरच, पण उल्लेखसुद्धा करण्याचें प्रयोजन ओनीलला पडलेलें नाही. ग्रीक नाटकांतील इलेक्ट्रा आणि ओरिस्टीस हीं सुद्धा सामान्य माणसेंच आहेत. या सामान्य स्त्रीची करुण कहाणी आपल्यापुढे रंगभूमीवर घडत असतांना तिच्याविषयीं

आपल्याला अगदी प्रथमपासूनच जिव्हाळा वाटतो असेंही नव्हे. केव्हा कौतुक, केव्हा आश्चर्य, केव्हा किळस, अशाच आंदोलनांतून आपण जात असतो. विशेषतः आपल्या भावी सुखासाठी आपल्या प्रत्यक्ष भावाला, त्याचें मन दुबळें झालेलें आहे हें पूर्णपणें माहीत असूनही, जाणूनबुजून आत्महत्येची चेतवणी देतांना तिला आपण पाहतों, त्या वेळीं तिच्या त्या राक्षसीपणाने अंगावर शहारेच येतात.

परंतु तिला वाटत असलेल्या अन्यायाविरुद्ध चाललेली तिची धडपड आणि न्याय-प्रस्थापना करतांना कराव्या लागणाऱ्या हत्या व भीषण गोष्टी यापासून आपल्या स्वतःची सुटका करून घेऊन आपल्यापुरतें तरी सुख मिळवितां यावें या आशेने तिचा चाललेला अट्टाहास याबद्दल आपल्याला थोडेंफार कौतुकही वाटतें.

तिच्या करुण अवस्थेने चित्त विरघळतें—

पण तिला हवें असलेलें हें कांही होणार नाही हें आपल्याला ठाऊक असतें. सृष्टिचक्राला क्षमा मंजूर नाही हें कै. औंधकरांचें वाक्य सारखें आपल्यापुढे नाचत असतें. बिचाऱ्या लॅव्हिनियाला याची जाणीव फार उशीरा झाली. आणि त्या वेळीं ज्याच्या प्रेमासाठी आपण तडफडत होतों त्याचीही आपल्याविषयीं निष्ठा राहत नाही ही स्वतःची अतीव करुणास्पद अवस्था तिच्या ध्यानांत आली. त्याबरोबर तिने दाखविलेलें धैर्य, केलेला त्याग, पत्करलेला नामुष्कीचा आरोप व एकाकी आणि आत्महत्या न करतां दुःखांतच कढत राहण्याचा तिने केलेला निश्चय या गोष्टी पाहून आपलें अंतःकरण विरघळतें, तिचे सगळे गुन्हे आपण माफ करतो आणि "अरेरे, बिचारी!" असा अंतःकरण पिळवटून उद्गार आपल्या तोंडून बाहेर उमटतो.

नाट्यवस्तूचा परिपोष हें नाटककाराचें एकमेव साध्य—

नाटकांत अशी ही भावनेची झलक जसजशी चढत गेली तसतशीं लॅव्हिनियाचीं सुटसुटीत भाषणेंही काव्याच्या पायरीला पोचलीं हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. तिचे आणि तिच्या आईंचे संवाद कोणाही अभ्यासजड व्यक्तीने कृत्रिम म्हणून बोट दाखवावे इतके रेखीव आहेत. परंतु नाटकांत हें अपरिहार्य आहे याची जाणीव हे संवाद वाचतांना रसिकाला झाल्यावांचून राहत नाही. एवढेंच नव्हे तर अनेक प्रवेशात्मक अंक, नाटकाचा काळ वर्षभराहूनही अधिक मोठा, आत्मगत भाषणें वगैरे आधुनिकांच्या दृष्टीने अस्वाभाविक ठरलेल्या गोष्टी या नाटकांत ओनीलसारखा एक अत्याधुनिक नाट्यतंत्र अवलंबिणारा श्रेष्ठ कलाकार वावग्या मानीत नाही. यावरून एवढेंच म्हणणें प्राप्त आहे की, नाट्यवस्तूचा परिपोष हें नाटककाराचें प्रमुख साध्य आहे. आणि त्याला उपयोगी आणि अनुरूप अशी रचना नाटककार उजळ माथ्याने आणि निःसंकोचपणाने करीत असतो. मग पुस्तकी पंडित त्याला कितीहि दोष देवोत!

प्रकरण चौदावें

एबेन

यूजीन ओनीलचेंच आणखी एक नाटक आपण पाहूं या. ग्रीक नाटकांच्या पद्धतीवर लिहिलेलें, तीन पोटनाटकांचें मिळून झालेलें हें भलें मोठें नाटक नाही. तर एक सुटसुटीत आणि ज्यांत विशेष गुंतागुंती नाहीत असें हें नाटक आहे. त्याचें नांव आहे " एल्म वृक्षाखालील वासनादाह. " नाटकाचे तीन भाग कल्पिले आहेत. त्यांना अंक असें नांव दिलेलें नाहीं. प्रत्येक भागांत चार चार प्रवेश आहेत. याही नाटकांत स्वगत भाषणांना मज्जाव नाही. आणि घडणाऱ्या घटनांचा काळ वर्षाहून जास्त अवधीचा आहे.

दडपलेल्या विकारांचा स्फोट —

नाटकामध्ये, दडपलेल्या विकारांचा दाह व त्यांतून उद्भवलेला स्फोट हें दाखविण्याचा मुख्य उद्देश आहे. ज्या शेतकऱ्याच्या शेतावरील घरांत या घटना घडतात त्या घराच्या दोन्ही बाजूंना दोन जुने एल्म वृक्ष आहेत अशी कल्पना केली आहे; या वृक्षांच्या फांद्या दोन्हीकडून घराच्या कौलारावर ओळंबलेल्या आहेत. त्यायोगे दोन म्हाताऱ्या आत्यांच्या हातांच्या सावलीखाली तें घर आहे असा जसा भास होतो तसाच त्यांच्या भयाण दडपणाखाली तें घर अक्षरशः दडपून गेलेलें आहे असाही भास होतो. हें सर्व निव्वळ प्रतीकात्मक आहे हें उघड आहे. कारण, सृष्टीच्या उत्पत्तीपासून मानवाला पछाडून राहिलेल्या, द्रव्यलाभ आणि कामवासना या दोन वासनांखाली मानवाच्या चांगुलपणाचा चुराडा होत आलेला आहे हें या प्रतीकांतून व्यक्त करायचें आहे. या दोन वासनांचें थैमान म्हणजे हें नाटक.

नाटकाची कथा फक्त पांच माणसांभोवती विणलेली आहे. एक म्हातारा बाप – वय वर्षें पंचाहत्तर – नाव इफ्राइम कॅबट. त्याचे तिचे मुलगे; सायमिऑन, वय वर्षें एकुणचाळीस आणि पीटर वय वर्षें सदतीस, हे दोघे पहिल्या बायकोपासून झालेले; आणि तिसरा एबेन, वय वर्षें पंचवीस, हा दुसऱ्या बायकोपासून झालेला. पांचवी इफ्राइमची नवीन लग्न होऊन घरांत येणारी तिसरी बायको ॲबी, वय पसतीस वर्षें. यापैकी पहिल्या भागाच्या अखेरीस पहिले दोन मुलगे घर सोडून जातात आणि नवी बायको घरीं येते. त्यानंतरच्या दोन भागांत सगळी कथा बाप, मुलगा आणि नवी बायको यांच्याभोवती किंवा खरें म्हटलें म्हणजे एबेन आणि ॲबी यांच्याभोवतीच घडत राहते.

दोघे मुलगे निघून जातात आणि ॲबी येते हा पहिल्या भागांतला कथाभाग असा घडतो.

दोघे मुलगे निघून जातात —

म्हातारा कॅब्रट कधी नव्हे तो घर सोडून कुठे तरी परगावीं गेल्याला दोन महिने झालेले आहेत. घरीं तिघे मुलगे आहेत. एका संध्याकाळीं त्यांपैकी एबेन घरांतून बाहेर येतो आणि हातांतली घंटा कानठळ्या बसतील एवढ्या मोठ्याने वाजवितो. दिसायला तो सुरेख आहे; बळकट आहे; पण चेहऱ्यावर चिडल्याची आणि संरक्षक वृत्तीची छटा आहे. जाडेभरडे खेडवळ कपडे त्याने घातलेले आहेत. घंटा वाजविल्यावर तो दूर क्षितिजापर्यंत दृष्टि टाकतो आणि "सुंदर" असा उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडतो. परंतु तत्क्षणीं कशाची तरी किळस आल्यासारखी होऊन तो थुंकतो व घरांत जातो.

त्यानंतर सायमिऑन आणि पीटर हे दोघे घंटा ऐकून तेथे येतात. वातावरणांतील सौदर्य त्या दोघांनाही जाणवतें. पण त्या सुंदर वातावरणांतच अठरा वर्षांपूर्वी मृत झालेल्या आपल्या पत्नीची आठवण होऊन एकाला खेद होतो. तर दुसऱ्याला, पीटरला, कॅलिफोर्नियामध्ये सुवर्ण किनाऱ्यावर सोन्याची लयलूट चालली आहे याची आठवण होऊन तो जिभल्या चाटूं लागतो. त्या सोन्याच्या कल्पनेने, त्यांचें तें दगडावर दगड रचून उभारलेलें घर म्हणजे स्वतःच्या हातांनी उभारलेल्या तुरुंगासारखें त्यांना वाटायला लागतें. इतकीं सारीं वर्षें फुकट येथें दगड वेचीत, धान्य पिकवीत, आपण घालविलीं; त्यापेक्षा कॅलिफोर्नियांत नांगर हतांत धरला असतां तर तासातासाला सोनें जमा केलें असतें अशी हळहळ त्यांना वाटतें; आणि जाऊं या हें सारें सोडून कॅलिफोर्नियांत, असाही विचार त्यांना स्फुरतो. परंतु ज्याच्यासाठी एवढा घाम गाळला तें सारें असें वाऱ्यावर सोडून द्यायचें; शिवाय म्हातारा काय, आता असा किती दिवसांचा सोबती, दोन महिने त्याची वार्तासुद्धा नाही; कोणी सांगावें तिकडे मेलाही असेल! त्यानंतर सारें आपल्या मालकीचें होणार; हा विचार त्यांना अटकावतो.

एबेनचा पितृविरोध —

परंतु बापाबद्दलच्या या विचारप्रदर्शनांत आपलें थोडें चुकतें आहे, हें पुत्रकर्तव्य नव्हे, याची क्षणभर त्यांना जाणीव होते आणि त्याचा मृत्यु प्रत्यक्ष होईपर्यंत असले विचार मनांत आणतां उपयोगी नाही याबद्दल त्यांचें एकमत होतें.

त्यांचें हें बोलणें एबेनच्या ओझरतें कानावर येतें आणि 'बापाचा मान राखा' ही बायबलमधली आज्ञा तो खवचटपणें उद्धारतो. आणि मी तर त्याच्या मरणाबद्दल प्रार्थना करतों आहें असें वर म्हणून त्यांना तो आंत जेवायला चलायला सांगतो. पीटरच्या मनांत कॅलिफोर्नियांतले सोनें अजून नाचतच असतें. परंतु दिवसभराच्या श्रमानंतर पोटांत चांगली भूक कडकडलेली होती; आणि भुकेचा तात्पुरता विजय होऊन ते आंत जाऊन जेवायला बसतात.

यानंतरच्या दुसऱ्या प्रवेशांत ते तिघेजण जेवायला बसले असतांना, पोट भरल्यावर सायमिऑन आणि पीटर यांना नीतीची आठवण होते. बापाच्या मरणाबद्दल एबेनने प्रार्थना करायला नको होती असें त्यांना वाटूं लागतें. त्यावर "तुमच्या पण तेंच मनांत नाही का?" असें एबेन त्यांना खोचून विचारतो. "अरे, तरी पण ते आपले वडील आहेत" या पीटरच्या म्हणण्यावर "वडील म्हणून आपल्याला त्याच्याबद्दल मुळीच जिव्हाळा वाटत नाही," असें एबेन उघडउघड सांगतो. "मी त्याच्या रक्ताचा नाही. थेब न् थेंब आईच्या रक्ताचा मी आहे" असा त्याचा दावा असतो. त्याची आई त्या दोघांची सावत्र आई असूनसुद्धा त्यांचें तिच्याबद्दल फार चांगलें मत होतें. सर्वांचें, खुद्द इफ्राइम कॅबटचेंसुद्धा ती फार प्रेमाने करीत असे, याची त्यांना आठवण येते. "पण म्हणूनच त्याने तिला ठार केलें" असें एबेन कडवटपणाने म्हणतो.

सायमिऑनचे खडे काव्यमय बोल—

हें ऐकून सायमिऑन क्षणभर घोटाळतो. आणि नंतर एक चिरकालीन सत्य त्या साध्या भोळ्या जीवाच्या तोंडून बाहेर पडतें. तो म्हणतो, "कोणी कोणाला मारीत नाही. मरणाचें कारण नेहमी कांही तरी वेगळेंच असते. त्याने माणूस मरतें!"

बापाने आईला कामाच्या रगाड्याखाली मारली असा एबेनचा आरोप असतो. "पण कॅबट स्वतःही कामांखालीं रगडला जातच होता. आपणही जात आहों. पण आपण काही कुणी अजून मेलों नाही." असें जेव्हा त्यावर पीटर म्हणतो त्या वेळीं सायमिऑनचें भाष्य असतें की, कांहीतरी कारणाने आपल्याला राबवावें असें बापाला वाटतें. पण हें काहीतरी काय हें त्याला सांगतां येत नाही. "त्याच कांहीतरीमुळे तुम्हांला कॅलिफोर्नियांत जायची ओढ लागली आहे—ऐकलें आहे मी—पण तुम्ही तेथे जाणार कसे? पैसे कुठे आहेत तुमच्याजवळ?" असा एबेन प्रश्न करतो.

पीटर म्हणतो, "आम्ही चालत जाऊं. खूप लांब आहे तें अंतर हें खरें. पण आजवर या शेतावर आम्हीं जेवढी पायपिटी केली आहे तेवढ्या पायपिटीने आम्ही चंद्रावरसुद्धा जाऊन पोचूं." पुन्हा एकदा काव्यमय सत्य रांगड्या मुखांतून सहज असें बाहेर पडतें!

परंतु या शेताचा हिस्सा मिळावा यासाठीं तुम्ही येथून हलणार नाही असा माझा अभिप्राय आहे, असें जेव्हा एबेन म्हणतो तेव्हा शेताच्या मालकीबद्दलचा एबेनचा दावा अगदी स्पष्ट होतो. त्याच्या मताने तें शेत त्याच्या आईचें होतें आणि तिच्या पाठीमागे तें त्याचें स्वतःचें एकट्याचें होतें.

एबेनचें मातृप्रेम : तिच्या छळाबद्दलचा संताप

आईबद्दलच्या त्याच्या चिडीला त्या दोघांजवळ खरें उत्तर नव्हतें. म्हणून, एवढे वडील तिला छळीत होते तर तूं कां नाही मधे पडलास, म्हणून ते त्याला ते आडवूं

जातात. पण, "मी तर लहान होतों; पण तुम्ही काय करीत होतात एवढे मोठे असून?" अशी तो त्यांच्यावरच बाजू उलटवतो. त्या वेळीं आईची कशी केविलवाणी अवस्था होती हें एबेन केवढ्या काव्यमय भाषेंत सांगतो. इतकी त्याची भावना तिच्या आठवणीने उसळून येते. त्याचा दोघां भावांवरही परिणाम होतो. ते तिघेही कांही वेळ हतबुद्ध झाल्यासारखे स्वस्थ बसतात.

मुसमुसणारी जवानी : स्त्रीसहवासाची ओढ —

त्यानंतर वडील कोठे गेले असावेत हा प्रश्न त्यांच्यामध्ये निघतो. त्यांना एवढेंच माहीत होतें की जातांना तो मोठ्या उत्साहाच्या भरांत होता. त्याचे डोळे खूप दारू प्यायल्यासारखे तारवटलेले होते. नाही तर आपण त्याला थांबविलें असतें, असें जेव्हा सायमिऑन म्हणतो तेव्हा तुझ्यासारख्या दोघांना म्हातारा भारी आहे अशी एबेन त्याची चेष्टा करतो. परंतु "तूं तरी काय एवढा मोठा सॅमसन लागून गेला आहेस!" असें जेव्हा सायमिऑन म्हणतो त्या वेळीं "पण मी दिवसेंदिवस बळकट होत चाललों आहे; इतका की, शक्ति माझ्या शरीरांतून जणू स्फोट होऊन बाहेर पडेल असें मला वाटूं लागलें आहे" अशा शब्दांनी एबेन आपल्या अंगीं मुसमुसूं लागलेल्या जवानीची जाणीव व्यक्त करतो आणि जरा बाहेर जाऊन येतो, म्हणतो. कारण, तो जायला निघालेला असतो त्याच्या रखेलीकडे. मिनी तिचें नांव. उघड उघड बाजारबसवी ती. पण एबेनला ती फार सुरेख वाटते. पण "आज एकवीस वर्षें लोक तिच्या सौंदर्याची लूट करताहेत – चाळीस वर्षांची ती बुड्ढी रंग लावला की, शिंगरासारखी दिसते – तुला काय तिचें माहीत आहे? तुझ्या आधी आम्हीं तिला भोगली आहे. आणि आमच्या आधी आपल्या बापाने." असें त्याला त्या स्त्रीचें सत्य स्वरूप त्याचे भाऊ उघडें करून सांगतात. त्या प्रसंगीं पुन्हा एकदा सायमिऑनच्या तोंडून साधें पण काव्यमय सत्य बाहेर पडतें की, "आपण आपल्या बापाचे एकूण एक बाबतींत वारसदार आहोंत.

कुत्र्याला कुत्रा खाणार —

त्यांची ती माहिती ऐकून त्या स्त्रीबद्दल एबेनच्या मनांत चीड उत्पन्न होते. "तिला जाऊन चांगली थोबाडतों" असें म्हणून तो दार धाडकन उघडून बाहेर पडतो. परंतु तो कितीही म्हणाला तरी तेथपर्यंत पोचला की, तो तिच्या पाशांत अडकणार याची त्याच्या भावांना पक्की खात्री असते. आणि शेवटीं घडतेंही तसेंच. जातांना त्याचा आवेश अगदी थेट बापासारखा दिसतो; त्यावरून दोघे भाऊ एकसुराने जणू पुढचें भविष्य वर्तवितात की, "कुत्रा कुत्र्याला खाणार!"

तिसऱ्या प्रवेशांत एबेन पहाटेच परत येतो आणि भावांना कांहीतरी केव्हा एकदां सांगूं असें होऊन गेल्याने त्या दोघांना उठवून जागे करतो. त्याची बातमी असते की, बाहेर जाऊन आपल्या बापाने पुन्हा लग्न केलें आहे. हें ऐकून आणि तें खरें आहे हें

समजून आल्यावर आता या घरांत राहण्यांत अर्थ नाही असें दोघां वडील भावांचें एकमत होतें आणि क्षणही न दवडतां लगेच त्या सकाळींच घर सोडावें असा त्यांचा विचार प्रकट होतो. चालत जायची सुद्धा त्यांची तयारी असते. "पंख लावतां आले असते तर या क्षणीं उड्डून मी कॅलिफोर्नियांत गेलों असतों," असें पुन्हां एक कल्पनारम्य वाक्य सायमिऑनच्या तोंडून बाहेर पडतें.

त्यांची पैशाची अडचण दूर करण्याची जबाबदारी एबेन घेतो. एक चुरगाळलेला कागद खिशांतून काढून तो म्हणतो, यावर सही करा म्हणजे दोघांना तीनतीनशे डॉलर मी देतों. तो कागद त्यांच्या दोन तृतीयांश हिश्शाचें खरेदीखत होतें. पैशाची व्यवस्था कशी करणार ? तर बापाने लपवून ठेवलेले पैसे एबेनला माहीत झाले होते त्यामधून.

सायमिऑनची भविष्यसूचक वाणी —

एबेनच्या मनांतून आपली थट्टा उडवायची आहे असें वाटून, रात्रीं मग काय झालें असे ते भाऊ त्याला मिस्किलपणाने विचारतात. पूर्वीचें कांही असो, पण आता मिनी पूर्ण माझी झाली आहे, असें तो उत्साहाने म्हणतो. या बाबतींत प्रेम किंवा लग्न याची त्याला फिकीर नव्हती. ती चांगली गुटगुटीत आणि कामुक होती. बापाची जी होती ती आज आपली झाली होती यांत एक प्रकारचा विजयानंद त्याला वाटत होता हें यांत विशेष. शिवाय त्याच्या मतें मिनी कांही तशी वाईट स्त्री नव्हती. जगांत तिच्याहून वाईट दिसणाऱ्या कितीतरी स्त्रिया असतील. उदाहरणार्थ, "आमच्या बाप्पाजींनी कोण रंभा आणली आहे तें दिसेलच आता !" असें एबेन म्हणतो. त्याबरोबर "कुणी सांगावें, मिनीप्रमाणे तिलाही तूं आपली करायचास एखादे वेळी" अशी न कळत भविष्यसूचक वाणी सायमिऑनच्या तोंडून बाहेर पडते.

पण एबेनची दृष्टि निराळी आहे. ती बाई आपल्या आईची जागा बळकावायला आली आहे, आईचें शेत बळकावायला आली आहे, हें शल्य त्याच्या मनांत एवढें तीव्र असतें की, "त्यापेक्षा एखाद्या नागिणीचें चुंबन घेईन मी !" असें तो चिडून म्हणतो आणि चूल पेटवूं लागतो. पुन्हा एकदा भूक सर्व शक्तिमान ठरते. कुणी सांगावें बापाच्या लग्नाची गोष्ट खरी नसेलही, तेव्हा थांबून, समक्ष पाहून मग ठरवावें, असा सबूरीचा विचार त्यांना सुचतो. पण तोंपर्यंत आपण काम म्हणून कांही करायचें नाही; दारू प्यायची आणि मजा करायची, काम करूं दे खुळ्या एबेनला; आणि कागदावर सही वगैरे कांही करावयाची नाही असें ते दोघे भाऊ ठरवितात आणि या बयेने बापाला चांगला इंगा दाखवावा, अशी इच्छा करतात.

चवथ्या प्रवेशांत तिघेजण न्याहरीला बसले आहेत. एबेनच्या चेहऱ्यावर खिन्नतेची छटा आहे. रात्रीच्या सुरत प्रसंगाचा हा परिणाम अशी त्याची चेष्टा भाऊ करतात. परंतु बापाच्या परत येण्यानंतर काय होईल याबद्दलच्या कल्पनेनें तो अस्वस्थ झालेला असतो. बापाची आपण आता काडीची फिकीर करणार नाही आणि त्याच्यासाठी कांही

कामही करणार नाही हा आपला निर्धार, त्यावर त्याचे भाऊ पुन्हा एकदा व्यक्त करतात. नाही तरी त्याला सगळें शेत एकट्याला हवें होतें ना ? मग काम पण त्याने एकट्यानेच करावें असें ते म्हणतात. तेव्हा एबेनला वाटतें की, हे बहुतेक आपला हिस्सा सोडणार. पण " तें पाहूं, विचार ठरतो आहे आमचा अजून; तूं आपला कामाला लाग " असें हुकुमी आवाजांत ते म्हणतात. परंतु जणू आपल्या आईचें शेत आपलें झालेंच या आनंदांत एबेन कामाला निघून जातो. पुन्हा एकदा त्याचें आणि बापाचें सामर्थ्य भावांना जाणवतें. " कुत्रा कुत्र्याला खाऊं दे " हा विचार त्याना पुन्हा स्फुरतो.

कॅलिफोर्नियांतील सोन्याची ओढ--

एबेन गेल्यावर स्वयंपाकघरांत नुसतें वसण्याचा कंटाळा येऊन ते बाहेर येतात. बाहेर सूर्य शानदार प्रकाशित असतो. त्याला पाहून " हें पाहा सोनें आता पूर्व दिशेला दिसतें आहे " असें सायमिऑन म्हणतो. परंतु पीटरचें चित्त कॅलिफोर्नियाच्या सोन्यामध्ये इतकें गुंतलें आहे की, तो म्हणतो " तसें नव्हे, हा सूर्य आपल्याबरोबर सुवर्णमय पश्चिमेकडे प्रवासाला तिघालेला आहे. "

बहुतेक हा आपला या ठिकाणचा शेवटचा दिवस होणार, मग संपूर्ण स्वातंत्र्य व सोनें यांचा आपल्याला लाभ होणार; आपणाला कोणाकडे नुसतें गुलामासारखें राबावें लागणार नाही; या आनंदांत ते दोघे मग्न असतात. परंतु या आनंदाच्या प्रसंगींसुद्धा त्यांनी स्वतःच्याच हातांनी उत्कृष्टपणें वाढविलेल्या गुरावासरांची आठवण होऊन त्यांना अवघड वाटतें. एबेनला या शेवटच्या दिवशीं तरी भाऊ म्हणून आपण मदत करावी असा नाजुकपणा त्यांच्या मनांत निर्माण होतो.

परंतु एवढ्यांत बाप येतो आहेसें आपल्याला वाटतें आहे, असें सांगत एबेन येतो आणि ते ताठ होतात. बापाचे पाय घरांत पडल्यावर आपण या घरांत पुन्हा पाऊल टाकणार नाही असा त्यांचा निर्धार होतो. एबेन त्यांना प्रत्येकी तीनशे डॉलर आणून देतो आणि ते त्याच्या त्या कागदावर सह्या करतात. मोठा आनंद त्यांना झालेला असतो. त्या भरांत कॅलिफोर्नियांतून आपण खूपखूप सोनें तुला पाठवूं असें आश्वासन ते त्याला देतात आणि जायला निघतात.

स्वातंत्र्याच्या कल्पनेने बेभान —

परंतु जाण्यापूर्वी एकदा नव्या आईचा चेहरा मोहरा तर पाहूं या या विचाराने ते रेंगाळतात. सकाळीं पुष्कळ दारू प्यायलेली असते त्यांनी; ती आता प्रभाव दाखवायला लागलेली असते. उल्हसित होऊन नाचावें असें त्यांना वाटूं लागतें. मिळविलेल्या स्वातंत्र्याच्या कल्पनेनेही त्यांचें डोकें फिरलेलें असतें; त्या कल्पनेची विचित्र अननुभूत अशी जाणीव त्यांना होत असते. या जाणीवेचें वर्णन सायमिऑन आपल्या काव्यमय भाषेंत असें करतो :

"पट्टा तुटला; जोखड मोडलें; कुंपणाच्या दाराच्या दांड्या निघाल्या; घराच्या दगडी भिंती धडधडून पडून गेल्या! आता आम्ही सारा रस्ताभर दाणदाण करीत निघून जाणार!" त्याला साथ देऊन पीटर पण म्हणतो, "या शेताची आता आम्हांला काडीची फिकीर नाही. ज्याला हवें असेल त्याला तें खुशाल लखलाभ होवो."

द्रव्यलोभ आणि कांतालोभ यांचा झगडा —

या सुमाराला म्हातारा कॅबट आणि त्याची नवी बायको प्रवेश करतात. घर पाहून ॲबी फारच खूष होते. "अगबाई, हें आता माझें घर ना!" असें ती अभिमानाने म्हणते.

पण तिचा "माझें घर" हा विचार कॅबटला मानवत नाही. तुझें कसें? माझें" असें तो म्हणतो आणि तिला खूष करण्यासाठी "आपलें दोघांचें" अशी दुरुस्ती करतो. द्रव्यलोभ आणि कांतालोभ यांच्यामधील हा झगडा हा असा पहिल्या फेरींतच प्रकट होतो. "घराला स्त्री हवीच" अशीही पुस्ती तो जोडतो. त्यावर "स्त्रीला घर हवेंच" असें उत्तरही ती देते. तिच्या संपत्तिलोभाचें हें लक्षण ध्यानांत घेण्यासारखें अहे.

मुलगे आढळत नाहींत म्हणून कॅबट अस्वस्थ होतो. ते दिसतांच "काम का करीत नाही?" म्हणून तो त्यांच्यावर खेकसतो. "वधूवरांचें स्वागत करायला उभे आहांत" असें खवचटपणाने सायमिऑन उत्तर करतो. त्यांच्याकडे टवकारून पाहून "मला माझें घर नीट पाहून घेतलें पाहिजे" असें म्हणून ॲबी आंत जाऊं लागते. तेव्हा "आंत एबेन आहे, त्याला हें घर तुझें स्वतःचें आहे हें सांगूं नकोस बया" असें पीटर तिला बजावून सांगतो.

पण "कोण हा एबेन! सांगणारच मी त्याला!" असें ॲबी हट्टाने म्हणते आणि या ठिकाणीं तिच्या आणि एबेनच्यामधील झगड्याचें बीज आपल्याला ठसठशीतपणें नजरेस पडतें.

ती आंत गेल्यावर कॅबट दोघां मुलांना पुन्हा एकदा कामाला लागण्याबद्दल बजावतो. पण आता त्यांनी स्वातंत्र्याची दारू चाखलेली असते. ते काम तर करीत नाहीतच; परंतु "आग लागो तुझ्या शेताला आणि घराला" असें म्हणून त्याच्यापुढे वाकुल्या दाखवून नाचूं लागतात, हूपहूप करून ओरडतात, नाना तऱ्हांचीं गाणीं गातात. "तळपट होवो तुमचें" असें कॅबट संतापून म्हणतो तर "तुमचा शाप तुम्हांलांच सव्याज परत" असें धट्ट उत्तर ते त्याला देतात.

या मुलांना झालें आहे तरी काय, यांना वेड तर लागलें नाही, या फिकीरींत कॅबट पडतो. परंतु त्यांना त्याचें काय? कॅबटभोवती फेर धरून ते नाचत आणि गातच राहतात. मधूनमधून हूपहूपचे आवाज काढतात आणि "आम्ही चाललों कॅलिफोर्नियाला" असें तालावर म्हणत म्हणत निघून जातात. दुरून तोच त्यांचा तालावर गाण्याचा ध्वनि कॅबटला किती वेळ तरी ऐकूं येतच राहतो.

एवेन व ॲबी यांची पहिली सलामी —

तोच इकडे एवेन आणि ॲबी यांची पहिली चकमक झडते. ॲबी माडीवर जाऊन खिडकींतून बाहेर डोकावते आणि मुलगे गेले का म्हणून विचारते. परंतु खालून कॅबट कांहीच उत्तर देत नाही. आपल्या शेजघराच्या मालकीहक्काच्या जाणिवेने ॲबी पुढे म्हणते "हें शेजघर छान आहे. आणि पलंगसुद्धा किती सुरेख आहे. माझीच ना ही खोली ?"

पण तिची मालकी मान्य करायची कॅबटची तयारी नाही. म्हणून तो "आपली दोघांची" असें म्हणून जातो. त्याच्या या स्वतःच्या मालकीच्या कल्पनेबद्दल घृणा वाटून ॲबी तोंड आंत घेते. तिकडे या पोरांनी गुरांना तर विषबीप चारलें नाही ना असा भयंकर विचार मनांत येऊन कॅबट गोठ्याकडे धावतो. इकडे ॲबी स्वयंपाक-घराचें दार लोटून आंत प्रवेश करते. क्षणभर ती एवेनकडे टक लावून पाहत राहते. आपल्या मानाने त्याची ताकद किती याचा ती खोल नजरेने अंदाज घेते. मग आपल्याकडे कोणी तरी पाहत आहे याची जाणीव होऊन एवेन तिच्याकडे पाहतो. त्याची ताकद अजमावतांनाच तिच्या मनांत त्याच्याबद्दल कामवासना जागृत होते – त्याच्या तारुण्यामुळे आणि दिसायला तो चांगला असल्यामुळे.

ॲबीला एवेनचें शारीरिक आकर्षण —

तिला पाहून एवेन लाल डोळे करून उसळतो आणि तिला अपशब्द बोलूं लागतो. तिचें आईपण तो मुळीच मान्य करीत नाही. एवेनच्या संतापाकडे दुर्लक्ष करून ॲबी त्याच्याशीं गोड वागण्याचा प्रयत्न करते. "तुझ्याशीं आईचें सोंग मी मुळीच करणार नाही. पण आपण मित्र म्हणून राहूं या. तुझ्या वडिलांचें आणि तुझें सूतही मी जुळवून देईन. माझ्यासाठी ते काय हवें तें करतील" असा लाघवीपणा ती त्याच्याशीं करते. तिरस्काराने तो हाः करून हसतो. परंतु त्यालाही तिचें शारीरिक आकर्षण वाटूं लागतेंच. आणि म्हणून मुद्दामच ओढून ताणून तो तिला शिवी हसडतो.

अर्थात तेवढ्याने दचणारी स्त्री ॲबी नव्हती. "तुला माझा असा राग येणार हें समजूं शकतें मी. माझ्या घरीं अशी कोणी तिऱ्हाईत स्त्री आई म्हणून आली असती तरी मीं हेंच केलें असतें," असें म्हणून ती आपला आईपोरका दुःखी जीवनाचा वृत्तांत सांगते आणि त्याची सहानुभूति मिळविण्याचा यत्न करते. असें करतांना "शेवटीं एकदा तुझ्या वडिलांनी येऊन मला आसरा दिला" असे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडतांच एबेन उसळून तिला दुरुत्तर करून म्हणतो, "आणि आपल्या घरीं तुला रखेली म्हणून आणून ठेवलें. त्यासाठी मोल काय दिलें तर हें शेत – माझ्या आईचें – आणि आता माझें शेत !"

ॲबी शांतपणे आणि आत्मविश्वासाने हसते आणि "तुझें शेत की काय तें आपण

पाहूं मग. पण मला घर हवें होतें यांत चुकलें कोठे ? नाही तर अशा म्हाताऱ्याशीं मीं लग्न कशाला केलें असतें ? " असें म्हणते. बापाला तिचें हें बोलणें सांगण्याची धमकी एबेनने दिली तरी ती गडबडत नाही. " तूं जाणून बुजून खोटें बोलतो आहेस असें त्यांना सांगून मी तुला त्यांच्याकडून घराबाहेर काढीन " असें जेव्हा त्यावर ॲबी म्हणते तेव्हा तिच्या उलट्या काळजाची चुणुक एबेनला समजते.

एबेन शिव्या देत असतो तरीही त्याच्याविषयीच्या कामुक इच्छेची विचित्र झांक ॲबीच्या चेहऱ्यावर आणि शरीरभर पसरलीशी वाटते. आपल्या शेजघराचा ती उन्मेखून निर्देश करते. आपण वाईट किंवा दुष्ट नाही - पण शत्रूची मात्र आपण गय करणार नाही; स्वतःला काय हवें असेल तें हिसकून, लढून घ्यायला मागेपुढे पाहणार नाही, असें म्हणून त्याच्याकडे मोहक दृष्टि टाकून ती म्हणते, " होऊं या ना आपण मित्र तर मग ? "

मोहिनी पडून एबेन हो म्हणून जातो आणि लगेच भानावर येऊन " छट्, छट्, ' असें म्हणून तिला शिव्या देत, तुझें तोंडसुद्धा पाह्यला नको असें ओरडत बाहेर निघून येतो.

बाहेर बापाशीं गाठ पडते त्याची. बाप त्या दोघां गेलेल्या मुलांचें तळपट करण्याबद्दल देवाला प्रार्थना करीत असतो. त्याला आणि त्याच्या देवालाही एबेन शिव्या मोजतो. तेव्हा " मूर्ख, नास्तिक " असें म्हणून कॅबट त्याला कामाला लागायला सांगतो. पण एबेन ऐकत नाही. उलट " ते दोघे कुठे काम करताहेत, - आणि तुम्ही स्वतः कुठे करतांहा - मग एकट्याने कसें करणार मी काम " असें तो उत्तर देतो. तेव्हा " कांही हरकत नाही. तुमच्यासारख्या दहाजणांना अजून मी पुरून उरेन. आणि तूं तर अर्धा पुरुष सुद्धा म्हणायच्या लायकीचा नाहींस " असें कॅबट उत्तर देतो. आणि " पुरें झालें, चल आता माचाकडे " असें म्हणून त्याच्यासह निघून जातो.

द्रव्यतृष्णा, मालकीची स्पर्धा आणि कामवासना यांच्यामधील झगड्याची ही अशी नांदी होऊन पाच प्रवेशात्मक पहिला भाग संपतो.

एबेन आणि ॲबी यांची ही पाहिली सलामी झडल्यानंतर आता दोन महिने होऊन गेले आहेत. उन्हाळा खूप आहे. म्हणून घराच्या दर्शनी उघड्या भागांतील कमानीमध्ये झुलत्या खुर्चीवर ॲबी बसली आहे. उत्तमांतला उत्तम पोषाख तिने केला आहे.

पलीकडून एबेन आपल्या खोलीच्या खिडकींतून कमानींत कोणी आहे की नाही हें पाहतो. आवाज न करण्याची दक्षता तो घेतो. परंतु ॲबीला त्याच्या हालचालीचा सुगावा बरोबर असतो आणि तो बाहेर पडण्याची ती अगदी श्वास निरोधून वाट पाहत असते. आपल्या मनांत तिचेच विचार यावेत याबद्दल निषेधदर्शक थुंकी एबेन टाकतो आणि खोलींत परत जातो, परंतु थोड्या वेळाने तो बाहेर येतो आणि त्या दोघांची दृष्टादृष्ट होतेच. पुन्हां आंत परत जावें असा त्याचा आविर्भाव पाहून ॲबी तोंडांतल्या तोंडांत हसते. तो तिच्याजवळून जाऊं लागतो तेव्हाही ती पुन्हा

हसते. "हसायला काय झालें?" म्हणून तो विचारतो. तेव्हा "तुलाच हसतें आहें; कसा प्रदर्शनांतल्या बैलासारखा हुबेहूब दिसतो आहेस म्हणून" असें त्याला ती डिवचते. त्यावर तूं तरी काय मोठी अफलातून लागून गेली आहेस म्हणून तो तिला टोमणा देतो.

प्रकृतीविरुद्ध वृथा झगडा —

पण "तूं हें मनांतलें बोलत नाहीस; तुझ्या मनांत काय आहे तें मला ठाऊक आहे. तें सहजही आहे. पण आपल्या प्रकृतीविरुद्ध तूं मी आल्यापासून उगीच झगडतो आहेस" असें म्हणून ती त्याला, केव्हां तरी हें तुला कबूल करावें लागणारच, मग आधीच केलेलें काय वाईट, असें सुचवते.

"बाबांनी तुझें हें बोलणें ऐकायला हवें होतें. पण त्यांना तर तूं ताटाखालचें मांजर बनविलें आहेस." एबेन चिडून म्हणतो. "तुझा सगळा डाव मीं ओळखला आहे. मला खिशांत घालून तुला सगळें कांही गिळंकृत करायचें आहे. पण हा मासा गळाला लावणें इतकें सोपें नाही."

एबेनला मोह पाडण्याचा प्रयत्न —

तरी पण "एबेन" अशी नाजुक हाक मारून ती त्याला मोह पाडण्याचा प्रयत्न करते. कुठे चालला आहेस म्हणून गोड आवाजाने विचारून त्या भिकार बाईवर का आपला एवढा चांगला जीव खर्ची घालतोस म्हणून त्याला खिजविते. परंतु "तुझ्याहून ती शतपटीने चांगली आहे; निदान माझें जें आहे तें – माझें शेत – तरी ती माझ्यापासून चोरण्याचा यत्न करीत नाही." असें जेव्हा तो म्हणतो, तेव्हा मात्र ॲनी संतापाने लाल होते. त्या बाईशीं आपली त्याने तुलना करावी हें तिला सहन होत नाही. आणि "मी आहें म्हणून तुला या घरांत जागा आहे, नाही तर तुझ्या वडिलांनी चाबूक मारून केव्हाच तुला घराबाहेर काढलें असतें" असें म्हणून त्याला आपल्यापुढून तोंड काळें करून निघून जायला ती सांगते. लाल डोळे करून तिच्याकडे रोखून पाहत एबेन निघून जातो.

त्या दोघांचें पुन्हा हें असें भांडण झाल्याचें पाहून कॅबट खुलासा विचारतो. हो ना करून, एबेनने बापाला ॲनीने ताटाखालचें मांजर बनवलें आहे असें म्हटल्याचें सांगून कॅबटला एबेनविरुद्ध भडकवण्याचा प्रयत्न ॲनी करते. तो प्रथम रागावतो. पण पुन्हा मऊ बनतो. कारण ते दोघे मुलगे गेल्यावर मला आता एबेनशिवाय दुसरें कोण आहे असें त्याला वाटतें. "म्हणजे मी कोणीच नव्हे तुझी?" हा त्यावर ॲनीचा त्याला सरळच प्रश्न असतो. तेव्हा तिच्यावर कॅबट काव्यात्मक प्रेममय भाषणाचा वर्षाव करूं लागतो. पण याने ती फसणारी नाही. "म्हणजे तुमची शेतीवाडी तुमच्यामागे तुम्ही एबेनला ठेवणार तर?" असा पुन्हा रोखठोक प्रश्न ॲनी कॅबटला करते.

आपल्या पाठीमागे कोणाला कांही ठेवण्याची कल्पना कॅबटला असह्य असते. कोणाला कांही ठेवण्याची त्याला इच्छा नसते. मरतांना हें सगळें बरोबर नेतां आलें असतें तर तें बरोबर घेऊन जाण्याची त्याची इच्छा असते. तें जर शक्य नाही, तर मरतांना मी हें माझ्या घामाने मिळवलेलें सारें तोडून, मोडून जाळून टाकीन; आणि माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला यांतल्या तनसडीचीसुद्धा मालकी मिळूं देणार नाही. गाई तेवढ्या मी नष्ट करणार नाही. त्यांना मी मोकळ्यावर सोडून देईन. अशी आपली भावना तो व्यक्त करतो.

"आणि माझें काय करणार? असें जेव्हा ॲबी विचारते," तेव्हा तुलाही मी स्वतंत्रता देईन असें कॅबट म्हणतो. तेव्हा एकीकडे याला एबेनबद्दल जिव्हाळा वाटायला लागला आहे तर दुसरीकडे हा सगळें मोडण्यातोडण्याच्या, ज्याला त्याला स्वातंत्र्य देण्याच्या गप्पा मारतो आहे, याचा सगळा अर्थ ध्यानांत घेऊन एबेनबद्दल कॅबटचें मन कलुषित करण्याचा निराळाच पवित्रा ॲबी टाकते. एबेनच्या मनांत आपल्याबद्दल विषयवासना जागृत झाली आहे हें ती कॅबटला सांगते. कॅबट संतापून एबेनला गोळी घालायला निघतो. पण हें कांही ॲबीच्या बेताशीं जुळणारें नव्हतें. तेव्हा, या शेतावर दुसरा कोण असा बिनखर्चाने मजूर मिळणार, अशी बतावणी करून त्याला घरीं ठेवून घेणेंच फायद्याचें आहे हें ॲबी कॅबटला पटवितें. म्हणजे एबेन तर घरीं पाहिजेच, पण त्याच्यावर कॅबटने माया मात्र करतां कामा नये अशी दुधारी योजना ॲबी अमलांत आणते.

पण याने पुन्हा एकदा कॅबट हळवा होतो. पहिल्या दोघांप्रमाणे एबेनही एक दिवस निघून जाणार असें त्याला भय पडतें. ॲबी असून कांही उपयोग नव्हता. कारण ती त्याच्या रक्तामांसाची नव्हे, रक्तामांसाचा म्हणजे मुलगा. मुलगा म्हणजे आपणच स्वतः ही त्याची भावना.

कॅबटला मुलगा हवा : हरकत नाही —

आणि मग ॲबीच्या लक्षांत सर्व कांही येतें. तिचा विचारही पक्का होतो. ती म्हणते, कांही हरकत नाही. देवाच्या दयेने मला मुलगा होईल. त्यासरशी कॅबट जणू वेडा होतो. मुलगा झाला तर मी तूं म्हणशील तें देईन, असें तो तिला म्हणतो. "मुलगा झाला तर हें शेत मृत्युपत्राने मी तुलाच देईन" असें वचन ॲबी त्याच्याकडून त्या आनंदाच्या भरांत घेते.

दुसरा प्रवेश त्याच रात्रीं आठ वाजतांचा आहे. माडीवर डाव्या बाजूच्या खोलींत एबेन फक्त गंजीफ्राक आणि अर्धी विजार घालून आपल्या खाटेवर बसला आहे. इकडे उजव्या बाजूच्या खोलींत भल्या मोठ्या पलंगावर ॲबी व कॅबट बसलीं आहेत. ॲबीने रात्रीचा पोशाख घातला आहे. दोन्ही खोल्यांत मेणबत्त्यांचा प्रकाश आहे. कॅबटचें डोकें अजून पुत्रजन्माच्या कल्पनेने भारलेलें आहे.

भिंतीआडचे कामवासनेचे आवेग—

शेताला मुलगा हवा. ॲबीला मुलगा हवा. कॅव्हटच्या चित्तांत शेत आणि ॲबी यांची गल्लत होते आहे. शेताच्या जागीं त्याला केव्हा ॲबी दिसूं लागते तर ॲबीच्या जागीं केव्हा शेत उभें राहतें. या धांदरटपणाबद्दल ॲबी त्याला दोष देते. पण तो हें कबूल करीत नाही; तुला माझें मन समजत नाही अशी तक्रार करतो. पण ॲबीचें खरें म्हणजे कॅव्हटकडे लक्षच नसतें. पलीकडच्या खोलींत एवेन असतो तिकडे तिचें सारें चित्त वेधलेलें असतें. या नाटकांतील हा प्रसंग अत्यंत नाट्यमय आणि कुतूहल-जनक असा दाखविलेला आहे. एवेन तिकडे ॲबीसाठी तळमळतो आहे. ती इकडे त्याच्यासाठी तळमळते आहे. मधे भिंत आहे. परंतु दोघांच्या हालचाली एकमेक एकमेकांना जणू पाहत आहेत इतक्या प्रकारें परस्परावलंबी चालल्या आहेत. इतकीं त्यांचीं अंतःकरणें खरोखर एकमेकाशीं एकरूप झालीं आहेत. त्याने तिकडे तिला जवळ घेण्यासाठी म्हणून हात पसरावे, इकडे त्याच क्षणीं ॲबीने अर्धवट उभे राहावें. आपण हें कांहीतरीच करतों या जाणीवेने त्याने तिकडे तोंडांतल्या तोंडांत शिवी हसडून अंथरुणावर तोंड खुपसून पडावें; ॲबीने इकडे हळूच उसासा टाकून शरीराचा ताण कमी करावा, परंतु भिंतींतून पलीकडचें पाह्यचें आहे अशा आवेशाने तिकडे टक लावून पाहतच राहावें. जणूं एवेनची लहानसहान हालचालसुद्धा कानांनी तिला टिपायची असते.

आपलें मन ॲबीला कधीच समजणार नाही याची एकदम जोराची जाणीव कॅव्हटला होते; ॲबीलाच काय, कोणाच स्त्रीला तें समजणार नव्हतें. ॲबीचें तर त्याच्याकडे लक्षच नव्हतें. तेव्हा तिचा गुडघा एकदम धरून कॅव्हट आपल्या मनांतलें सगळें तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. सोन्याच्या शोधार्थ दूर जायला आपण निघालों होतों; पण या जमिनीच्या प्रेमाने परत आलों; येथे दगडाधोंड्यांतून अत्यंत सुपीक शेत निर्माण करण्यासाठी आपण जिवापाड परिश्रम केले; त्यामुळे ही शेतजमीन आणि हें घर याबद्दल आपल्याला विशेष आत्मीयता वाटते, ही सगळी कहाणी मोठ्या उत्सुकतेने तो ॲबीला सांगतो. पण तिला त्यामध्ये मुळीच रस वाटत नाही. कष्ट करणाराच्या कष्टांचें फळ खायला – उपभोगायला – माणसें तयार असतात, पण कष्ट करणाराच्या कष्टांचें कौतुक करण्याचें कोणाला प्रयोजन वाटत नाही. यामुळे आपली बहुतेक सारी हकीकत सांगून झाल्यावर कॅव्हट ॲबीला जेव्हा "आता तरी तुझ्या डोक्यांत कांही प्रकाश पडला का ?" असें विचारतो तेव्हा ती त्याला "कुणास ठाऊक" असें अर्धवट उत्तर देते.

त्याला जी गोष्ट इतकी महत्त्वाची वाटत होती, जिच्यांत त्याचा सारा जीव गुंतून राहिला होता, त्या गोष्टीबद्दल ॲबीची इतकी बेफिकीरी पाहून ॲव्हट उदास होतो. आणि "तुझ्या डोक्यांत कधीच प्रकाश पडणें शक्य नाही. याची भरपाई म्हणून तुला जर मुलगा झाला नाहीं तर —" असें तो बोलूं लागतो. पण त्याला पुरें बोलूं न देतांच ॲबी म्हणते "खास सांगतें मी तुम्हांला; माझ्या पोटीं तुम्हांला मुलगा

होणारच ! " हें ऐकून कॅबट जरा दचकतोच. परंतु मला भविष्यकाळचें दिसूं शकतें असें म्हणून ॲबी त्याच्या मनांत कांही आशंका राहूं देत नाही.

पण यानंतर कॅबटला तेथे चैन पडत नाही. बूट वाजवीत तो खाली निघून जातो. त्याला होत नव्हतें कांही. पण आपण आतां पिकूं लागलों; खांदीवरून खाली पडण्याचा संभव निर्माण झाला, या जाणीवेने तो अस्वस्थ होतो.

तो गेला हें ॲबीच्या पथ्यावरच पडलें. पुन्हा, मघाशी वर्णन केल्याप्रमाणे एबेन आणि ॲबी यांच्या जणू परस्परावलंबी अशा कामातुरतेच्या हालचाली, मध्ये भिंत असूनही चालू होतात. शेवटीं मनाचा निर्धार करून ॲबी एबेनच्या खोलींत जाते; झपझप जाऊन एबेनच्या गळ्यांत हात घालते आणि त्याचें डोकें मागे वळवून त्याच्यावर चुंबनांचा वर्षाव करते. पहिल्यांदा विषयलालसेच्या आहारीं जाऊन एबेन कांही न बोलतां हें सारें सहन करतो. परंतु थोड्या वेळाने तिच्याविषयीचा त्याचा द्वेष जागा होऊन, तिला दूर ढकलून देऊन तो खाटेवरून उठून उभा राहतो.

त्याने असें दूर होऊं नये; आपण त्याला फारफार सुख देऊं, असा लडिवाळपणा ॲबी करते. परंतु एबेन ॲबीला डिवचून म्हणतो " तुझा मुका घेतांना मला वाटलें मी दुसऱ्याच कुणाचा मुका घेतो आहे. " मिनीला उद्देशून तो हें बोलतो आहे हें समजून ॲबी खूप चिडते आणि " मीं तुझ्यावरच्या प्रेमाने तुला जवळ घेतलें असें समजूं नकोस. माझा त्यांत निराळाच हेतु आहे " असें मुद्दाम त्याला डिवचण्यासाठी सांगते. तर मग माझ्या खोलींतून निघून जा असें तो खेकसतो. पण " घर आहे माझें आणि तूं आहेस इथे अन्नावारी काम करणारा मजूर " असें त्यावर ती म्हणते, तेव्हा एबेन तिचा खून करण्याची भाषा बोलतो.

एबेन ॲबीच्या पुरा कह्यांत —

परंतु एबेन आता आपल्या कह्यांत आलेला आहे हें ॲबीने पुरें हेरलेलें असतें. म्हणून ती मुळीच भीत नाही. " माझ्यार्शी विषयक्रीडन करण्यासाठी तूं किती आसुसला आहेस; चुंबन घेण्यासाठी तुझे ओठ किती फुरफुरताहेत. तेव्हा कां उगीच जिवाची तडफड करतोस ? आजपर्यंत या घरांतल्या एका भागाचा ताबा मीं घेतला नव्हता, तो आज मी घेणार आहें. तुझ्या आईच्या माजघराचा. तिथे मी जातें आहें. दिवे लावणार आहें तेथे. घरांतली सर्वांत सुरेख जागा ती आहे. तेव्हा तिथे येऊन कॅबट महाशय, तुझी माझी प्रेमयाचना करणार ना ? "

असें म्हणून ती तोऱ्याने निघून जाते. आई मेल्यापासून हा भाग बंद होता. तो उघडून वापरण्याच्या कल्पनेने एबेन व्यथित होतो. कुठे असेल आपली आई भूत होऊन, या विचाराने त्याच्या हृदयाचें पाणी पाणी होतें.

पण ॲबीच्या लाघवीपणाने आणि कामुकतेने एबेन इतका भारलेला असतो की, कोणीतरी ओढून न्यावें अशा रीतीने तो कपडे वगैरे करून खाली माजघरांत जातो.

"मी इथे आलें तेव्हा कुणीतरी मला दिसलेंसें वाटलें. पण आता तूं आल्यावर तें दिसत नाही. ती तुझी आईच असावी. मी तुझ्यावर प्रेम करतें हें पाहून तिचें समाधान झालें असावें" असें म्हणून ॲबी त्याचा हात हातांत घेते आणि तुझ्या आईच्या गोष्टी मला सांग असें त्याला म्हणते. आईशीं लग्न बापाने, या शेताच्या लोभाने कसें केलें आणि शेवटीं तिला कसें फसविलें, आपल्या कठोरपणाने तिचा मृत्यु त्याने कसा घडविला, हें सारें एवेन ॲबीला सांगतो.

भोगलालसेची शिरशिरी —

तेव्हा अत्यंत भावनाभराने "मीच तुला तुझ्या आईच्या ठिकाणीं होईन" असें म्हणून ती क्षणभर विशुद्ध भावनेने त्याला जवळ घेऊन त्याचे मुके घेते. पण चार दोन क्षणांत तिच्या सर्व शरीरांत भोगलालसेची शिरशिरी उठते आणि त्याला ती कामुक चुंबनांखाली दडपून टाकते. पुन्हा मघाच्यासारखा एवेन दूर होतो. हात पसरून ती त्याला विनविते "नाही रे, नुसत्या आईच्या प्रेमावर संपणार नाही. त्याच्याहून शतपट निराळी भावना बाळगल्याशिवाय आपण दोघे सुखी होणार नाही. मला तूं दूर करूं नकोस."

कांही वेळ एवेनचा निर्णय होत नाही. मग त्याच्या मनांत निराळाच प्रकाश पडतो. आपल्या आईवरील अन्यायाचा सूड घेण्याला हा मार्ग चांगला होय असें समर्थक कारण त्याला आपल्या लालसेच्या तृप्त्यर्थ सापडतें आणि "ॲबी, माझें तुझ्यावर प्रेम तूं इथे आलीस त्या दिवसापासून आहे; त्या प्रेमासाठी मी सारखा तळमळतों आहें" असें म्हणून एवेन मोकळ्या मनाने तिचें दृढ चुंबन घेतो.

हरपलेलें कांही तरी गवसल्याने एवेन धन्य —

दुसऱ्या भागांतला शेवटचा छोटा प्रवेश त्या रात्रीनंतर त्या दोघांच्या भावनेंत झालेला फरक दाखविण्यापुरताच घातलेला आहे. सकाळींच उठून शेतकामाचा पोषाख करून एवेन बाहेर शेतावर जायला निघाला आहे. त्याच्या ठिकाणची सळसळती अतृप्त वासना पूर्णपणें संतुष्ट झालेली आहे. त्यामुळे त्याच्या मनांत एक विशेष प्रकारचा उत्साह आणि ताजेपणा आला आहे. त्याचा घुमेपणा, बापाशीं तेढीने बोलणें, जीवनांत अन्याय झाल्याची जाणीव वगैरे सर्व गोष्टी नाहीशा झाल्या आहेत. हरपलेलें कांहीतरी गवसलें अशी कांहीशी धन्यतेची भावना त्याच्या ठिकाणीं आली आहे. कॅबट गोठ्याकडून उठून परत येतांना त्याला भेटतो तेव्हा याच मोकळेपणाच्या भावनेने तो त्याच्याशीं बोलत असतो. आपलें भांडण आता संपलें असें म्हणून तो बापाशीं हस्तांदोलन करायला हात पुढें करतो. कॅबट हात पुढें करीत नाही. या मुलाला झालें आहे तरी काय, दारूबिरू तर हा प्यायला नाही, असा त्याला संशय पडतो. परंतु "माझ्या मानगुटीवरचें आईचें भूत उठलें; तिला आता खरी शांति लाभेल" असें जेव्हा आपल्या समाधानाचें

कारण एबेन सांगतो तेव्हा "मला त्या तिकडे गोठ्यांत खरी शांति मिळाली. गाई मला शिकवितात झोप कशी घ्यावी तें" असें कांहीसें गोंधळून कॅबट म्हणतो. त्यावर "तर मग लागा आता कामाला" असा जणू हुकुमच एबेन कॅबटला करतो आणि तो याबद्दल तक्रार करतो तेव्हा "हो ऽ हो ऽ" करून हंसून "आता आम्हीच तुम्हांला हुकुम करणारे झालों" असें म्हणतो.

ॲबीचीही वृत्ति समाधानाची आणि आनंदाची होती खरी. परंतु तिची विलास-तृष्णा अजून पूर्ण शमलेली नाही. त्याचा सहवास तिला अजून पुरेसा वाटतच नाही. तशीच ती थोडीशी आळसावलेलीही असते; निजूनच राहावें असें तिला वाटत असतें. भोगानंतरच्या अवस्थेंतील स्त्रीपुरुषांमधील हा भेद नाटककाराने मोठ्या नाजुकपणाने सूचित केला आहे. परंतु ॲबीला आळसून चालण्यासारखें नव्हतें. नाटकाच्या – म्हणजे ती करीत असलेल्या – सजावासाठी आळस झटकून टाकून, कॅबट परत यायच्या आंत तिला माडीवर मुक्कामाला यायलाच हवें होतें.

शेवटच्या म्हणजे तिसऱ्या भागांत सुमारे दहा महिन्यानंतरच्या पुन्हा आलेल्या वसंत ऋतूंतल्या घटना आपल्यापुढे दाखविल्या जातात. पहिल्या प्रवेशांत वरच्या दोन खोल्यां-पैकी स्वतःच्या खोलींत एबेन भिन्न विकारांच्या तावडींत सापडून अस्वस्थ झालेला असा मुठीवर हनुवटी टेकून खाटेवर बसलेला असतो. शेजारच्या खोलींत मोठ्या पलंगा-शेजारी एक पाळणा असतो.

खाली स्वयंपाकघरांत मारे धामधूम माजलेली असते. तेथल्या त्या आरड्या-ओरड्याने एबेनच्या अवस्थतेंत अधिकच भर पडत जाते. खाली जवळ जवळ सारा गांव जमा झालेला होता. स्त्रीपुरुष, लहानमोठीं सारीजणें जमा झालेलीं होतीं. व्हिस्कीचा अमाप पुरवठा आहे. एक फिडलवाला साथीला आहे. त्याच्या साथीने नाचणारांना नाचायचें आहे.

ॲबीचा मुलगा कॅबटचा नव्हे —

या सर्व मंडळीच्या चेहऱ्यावर कांही एक मिस्किल हास्य आहे. एकमेकांना ते खुणावताहेत, ढोसळताहेत, एकमेकांत कुजबुजत आहेत. या सगळ्याचा अर्थ एकच आहे की, ॲबीला झालेल्या ज्या मुलाच्या नामकरणाच्या निमित्ताने त्याच्या पंधराव्या दिवशींच कॅबटने हा मेजवानीचा आणि नाचाचा थाट उडवून दिला आहे, तो मुलगा कॅबटचा नसून एबेनचा आहे याची जाणीव त्यांच्यापैकी प्रत्येकाला आहे आणि त्याबद्दल कॅबट आणि ॲबी यांची कटाक्षयुक्त थट्टा उडविण्याचा त्या सगळ्यांचा एकसारखा प्रयत्न आहे.

या प्रसंगीं एबेन खालीं न आल्याने बाळंतपणांतून नुकतीच उठलेली ॲबी विशेषच खिन्न आहे. एबेनच्या न येण्याचाच फायदा तिची थट्टा उडविण्याच्या कामीं ती मंडळी

घेत आहेत. "आम्ही एबेन आल्याशिवाय नाचणार नाही, त्याशिवाय मजा येणार कशी ? असें मुद्दामच म्हणून मंडळी नाचायला काचकूच करीत आहेत.

कॅबटला हें कळलेंच नव्हतें काय ? —

कॅबटला या सगळ्याचा अर्थ कळत होता असें कांही नाटककाराने दाखविलेलें नाही. परंतु त्याच्यासारख्या चतुर माणसाने या प्रकारांतली मख्खी ओळखलीच नव्हती असें मानणें फार कठीण आहे. उलट लोकांचा रोख त्याच्या ध्यानांत आल्यामुळेच बहुधा, तरुण मंडळी नाचण्याला काचकूच करीत असतांना कॅबट स्वतः नाचण्याला सुरुवात करतो. पाऊणशे वर्षांचा तो म्हातारा झपाट्याने लय वाढवीत इतक्या आवेशाने गाणीं म्हणतो की इतर सर्वजण तर चकित होतातच, परंतु त्याच्याबरोबरीने साथ करतांना तो फिडलवाला अगदी मेटाकुटीला येतो आणि शेवटीं थांबतो.

नाचतांना तो सगळ्यांचा इतक्या लहानपणीं थकल्याबद्दल उपहास करीत असतो, "माझ्या शंभराव्या वाढदिवसाच्या वेळीं या, म्हणजे त्या वेळींसुद्धा मी असाच नाच करून दाखवीन" म्हणत असतो. यांत त्याचा हेतु असाच असेल काय की, इतक्या म्हातारपणीं मुलगा झाल्याबद्दल आशंकित झालेल्या त्या सर्व मंडळींना आपली ताकद दाखवून चकित करावें आणि म्हातारा म्हणून माझ्याबद्दल वृथा शंका घेऊं नका असें बजावावें !

तें कसेंही असो. पण खालच्या या गोंधळांतून एबेनला वर कांही नवीनच प्रकाश दिसला असावा. त्या धोरणाने तो शेजारच्या खोलींत जाऊन पाळण्यापाशी उभा राहून नवबालकाकडे निरखून पाहूं लागतो. समोरासमोर नसूनही एकमेकांच्या हालचालींचें संवादित्व त्या दोघांमध्ये असायचें असा जणू संकेतच ठरून गेलेला होता. त्यामुळे एबेन उठून पाळण्यापाशी पोचतो न पोचतो तोच ॲबी खालून वर जायला निघते. बाळाच्या हितासाठीच एवढ्यांत तिने खालीवर करण्याचे श्रम घेऊं नयेत असें कॅबट तिला सांगूं जातो. पण "समजतंय मला, तुम्ही नको शिकवायला" असें त्याला झटकून ॲबी वर चालती होते. एबेनच्याजवळ जातांच त्याला मोठ्याने न बोलण्याची खूण करून ती त्याचें चुंबन घेते आणि "बाळ किती सुरेख आहे; अगदी थेट तुझ्यासारखा आहे," असें लाडिकपणाने म्हणते.

पण हें सगळें नाटक एबेनला सहन होत नाही आहे. या लपवालपवीचा त्याला अगदी वीट आला आहे. आपण यांतूनही कांहींतरी मार्ग काढूं असा ॲबी त्याला भरवसा देते; असें कांहीतरी घडेल की, यांतून आपण सुटूं असें म्हणून ॲबी पुन्हा त्याचें चुंबन घेते आणि त्यांची एकमेकांना मिठी पडते.

संशयाची न सोडणारी सावली —

आणि याच वेळी म्हातारा कॅबट त्या नाचगाण्यानेसुद्धा, मनांत जें कसेंसेंच होत

आहे तें शांत होत नाही म्हणून तडफडत गेटजवळ उभा आहे. हें जें कांहीतरी त्याचें मन अशांत करणारें आहे त्याचें वर्णन कॅबट असें करतो.

" असें वाटतें की, या एल्म वृक्षावरून तें खाली पडतें, कौलाघर चढून जातें, धुराड्यांतून खाली उतरतें आणि कोपऱ्याकोपऱ्यांत डोकावत राहतें. मन शांत आणि एकांत असें होतच नाही. एकसारखा आपल्याजवळ कुणी आहे असा भास होतो."

स्वतःच्या संशयाच्या सावलीचें हें निकटवर्तित्व केवढ्या काव्यमय शब्दांनी नाटककाराने त्याच्या तोंडून वदविलें आहे.

पुढच्या दुसऱ्या प्रवेशांतील घटना यानंतर अर्ध्या तासाने घडते. एबेन घरापुढच्या मोकळ्या जागेंत आभाळाकडे दुःखी आणि अगदी गोंधळलेल्या मनःस्थितींत पाहत उभा असतो. कॅबटच्या नजरेला तो पडतांच मघाचा कॅबटचा खिन्न भाव मावळतो. त्याच्या ठिकाणीं क्रूर आणि विकाराधीन वृत्ति जागृत होते आणि एबेनवर आपण खाशी मात केली अशा विजयी हास्याने पुढे होऊन तो एबेनच्या पाठीवर थाप टाकतो.

एबेन खाली सगळ्या लोकांत गंमत करायला आला नाहीं याबद्दल कॅबट नाराजी व्यक्त करतो. त्याच्या मानसिक अवस्थतेचें कारण नाहीसें व्हावें म्हणून तो त्याला लग्न करायला सांगतो; म्हणजे स्त्रीसुखही मिळेल आणि बायकोबरोबर शेताचा तुकडाही मिळेल.

परंतु बापाने केलें तसें आपल्याला आपल्या बायकोचें शेत चोरण्याचें कारण नाही, कारण आपलें शेत आपल्याजवळ आहे, असें म्हणून कॅबटच्या शेताच्या रोखाने हात फिरवून तो म्हणतो " हें पाहा माझें शेत ! "

एबेनला वारसा मिळूं न देण्याचें ॲबीचें कारस्थान —

त्याच्या म्हणण्याचा गर्भितार्थ कॅबटच्या लक्षांत आल्याशिवाय राहत नाही. म्हणून एबेनला तो म्हणतो " तूं शुद्ध गाढव आहेस. हें शेत – नव्हे त्याचा एक तुकडासुद्धा तुला मिळायचा नाही. मी मेल्यावर शेत व्हायचें आहे सर्वस्वी ॲबीचें. तुझा मोठा ॲबीवर भरवसा दिसतो. पण ती तुला चांगली ओळखून आहे. तुझी तिच्यावर वाईट नजर आहे; तिला फसवून आपल्या ताब्यूची करून घ्यायचा तुझा डाव आहे हें तिला चांगलें ठाऊक आहे. तिनेंच तर मला हें सांगितलें ! "

" हें अशक्य आहे " असें एबेन उसळून म्हणतो. पण त्याची या कल्पनेने तळमळ होत आहे हें पाहून ॲबट त्याला आणखी पुढे सांगतो, " एवढेंच नव्हे; तर तुला वारसा मिळूं नये यासाठी आपल्याला मुलगा व्हावा अशी तिने धडपड केली. कारण, मुलगा झाला तर सारी शेतीवाडी मी तिच्या नांवाने करून देईन असें वचनच तिने माझ्याकडून घेतलेलें आहे.

हें ऐकून एबेन बेभान होतो. " असा हिचा डाव होता काय ? मला संशय वाटतच होता. ठार करतों आताच्या आता जाऊन तिला. " असें म्हणून तो घराकडे धाव घेतो. परंतु कॅबट पुढे होऊन त्याला रोखतो. म्हाताऱ्याच्या ताकदीपुढे

एवेनचें कांही चालत नाही. कॅव्हट एवेनच्या गळ्यावर हात टेवून त्याला दगडाशीं रेटतो. याच क्षणीं ॲबी कमानींत येते आणि पुढचा हा झगडा पाहून ती धावतच त्यांच्यापाशी येते व कॅव्हटचा हात धरून एवेनच्या गळ्यावरील पकड ती सोडविते.

कॅव्हटचा हात सुटतांच गुदमरलेला एवेन बाजूला धाडकन खाली पडतो. किंकाळी फोडून ॲबी खाली बसून त्याचें डोकें मांडीवर घेते. पण तो तिला दूर ढकलून देतो. आपण जिंकली या भावनेने त्याच्याकडे आणि तिच्याकडे कॅव्हट तुच्छतेने पाहतो आणि म्हणतो, "मी कांही याचा खून नव्हतों करीत. पुन्हा जर या एवेनने कांही चाळे केलेन तर फोक आणून त्याला मी चांगला सडकून काढीन," आणि घरांत निघून जातो.

मुलगा जन्मालाच यायला नको होता – इति एवेन —

एवेनला लागलें बिगलें तर नाहीना म्हणून ॲबी नाजूकपणें पाहूं लागते. पण एवेन तिला खेकसून शिव्या हासडूं लागतो. तुझें तोंड पाह्यला नको, तूं व्यभिचारिणी आहेस, अशीं दूषणें देऊं लागतो. "प्रेमाचें सगळें तुझें नाटक होतें" असें म्हणतो. ॲबीचा तर हें ऐकून सारा धीरच सुटतो. एवेनचा हात हातांत घेऊन ती आपलें त्याच्यावर प्रेम आहे असें सांगूं लागते, पण तिचा हात तो हिसडून टाकतो.

"माझ्याबरोबर संग करून पुत्रोत्पत्ति करून द्यायची, तो मुलगा कॅव्हटचा आहे असें कॅव्हटला भासवायचें आणि मुलगा झाला या सबबीवर शेतवाडी आपल्या नांवावर करून द्यायची हा तुझा डाव आता मीं चांगला ओळखला आहे," असें म्हणून तो तिच्यावर उसळतो. तिच्या विनवणीकडे लक्ष देत नाही. "बापाला मुलगा कोणाचा आहे हें सांगतों आणि तुम्हांला दोघांना एकमेकांना विष द्यायला सोडून मी कॅलिफोर्नियाला निघून जाईन" असें आणखी म्हणतो. ॲबीच्या प्रेमाच्या आणाशपथा, क्षमा-याचना, याचा कशाचा त्याच्यावर परिणाम होत नाही. आपलें शेत लुबाडण्याच्या त्या कारस्थानामुळे इतकें त्याचें डोकें फिरल्यासारखें झालें होतें. तो आपणाला सोडून जाणार हा विचार तिला जणू वेडी करतो. परंतु तरीही एवेन म्हणतच राहतो, "कॅलिफोर्नियांत जाऊन मी खूप पैसा मिळवीन; परत येऊन तुम्हा दोघांना घरांतून हकलून देऊन माझें शेत मी परत मिळवीन. मग, बसा तुम्ही रस्त्यावर, नाहीतर जंगलांत अन्नासाठी भटकत. तुमच्याबरोबर तुमचा मुलगा पण —"

एवेनच्या प्रेमासाठी पोटचा गोळाही डोळ्यासमोर नको —

"पण तो तर तुझाच मुलगा आहे एवेन" असें ती तळमळून म्हणते त्यावर, "जन्मालाच आला नसता तो तर. या क्षणाला तो मरून जावा असें वाटतं आहे मला. नजरेला सुद्धा पडायला नको होता तो माझ्या. त्याच्यामुळे, तुला तो झाल्यामुळे, तुझ्या शेत लुबाडण्याच्या डावाला मदत झाली. त्याने आपल्यामध्ये सगळा बिघाड उत्पन्न केला आहे," असें एवेन आपल्या या बोलण्याचा तिच्या मनावर

काय परिणाम होईल याचा विचार न करतां भरकटतो. मुलगा होण्यापूर्वी ॲन्नीचें आपल्यावर प्रेम होतें असा त्याला विश्वास वाटे हें तो कबूल करतो. पण आता हा मुलगा झाल्यावर मात्र आपला सर्व विश्वास उडाला, आपल्याला तिच्याविषयी प्रेमाऐवजी भयंकर द्वेष वाटूं लागला असे तो सांगतो. हें ऐकून ॲन्नी एकदम स्तब्ध होते. आणि मग चमत्कारिक निर्धाराच्या आवाजाने म्हणते " त्याच्या जन्मामुळेच तुझा माझा वियोग होतो आहे हें खरें असेल, तर मग तो स्वर्गाहूनही सुंदर असला – माझ्या पोटचा गोळा असला – तरी मलासुद्धा तो डोळ्यासमोर नको ! "

एबेनच्या बोलण्यांत तरीही कडवटपणाच शिल्लक राहतो. " शेताचें एवढें मोठेंसें नाही; पण तूं असा मला फसविण्याचा घाट घालावास याने मला फार चीड येते. आणि फसविण्यासाठी साधन काय, तर पोटचा मुलगा ! असें तो म्हणतो तेव्हा " नाही रे तो तुला लुबाडणार ! ठार करीन मी त्याला. माझें तुझ्यावर किती प्रेम आहे हें सिद्ध करण्यासाठी — "

माझें प्रेम सिद्ध करून दाखवीन : ॲन्नीचा निर्धार —

पण एबेन तिला पुढे बोलूंच देत नाही; तिच्या शब्दांवर आपला काडीचा विश्वास नाही म्हणतो. " पण जर मीं तुझी खात्री करून दिली की, माझा कसलाही कट नव्हता, माझें खरेंखुरें प्रेम तुझ्यावरच होतें नी आहे; सारा बदल झाला आहे तो केवळ त्याच्या जन्मामुळे हेंच खरें असलें तर त्याची अडचण आपल्यामध्ये उभी नाही असें जर मीं केलें; तर – तर मग तरी तुला माझें प्रेम खरें वाटेल का ? मला जवळ घेशील का ? इथून जाणार नाहीस ना ? " या तिच्या तळमळीच्या उद्गारांनी तो हेलावतो आणि नाही जाणार म्हणतो. पण असें कांही घडून यायला तूं कांही कुणी परमेश्वर नाहीस असें आणखी तो तिला डिवचतो. त्यावर " पण तूं वचन दिलेलें मात्र विसरूं नकोस, मी परमेश्वर नाही. पण परमेश्वराने केलेली एखादी गोष्ट परतविण्याची शक्ति मला आहे. माझें तुझ्यावर प्रेम आहे – कुणाहीपेक्षा जास्त आहे हें मी सिद्ध करून दाखवीनच तुला " असें ॲन्नी पुन्हा तारवटल्यासारखी करून म्हणते.

परंतु तिच्या तारवटलेल्या अवस्थेच्या मागे केवढा भयंकर निर्धार होता याची एबेनच्या स्वार्थी पुरुषी मनाला कल्पनाच आली नाही. संपत्तिलोभापेक्षा वासनाप्रेम – पुरुषप्रेम–स्त्रीला अधिक असतें आणि स्त्री जेव्हा स्वतःचें दान करते तेव्हा तें संपूर्ण दान असतें, त्यांत जर तरला वाव नसतो, हें सत्य त्याच्या मनाला – कोणत्याही पुरुषाच्या मनाला – प्रतीत होणेंच शक्य नव्हतें. आणि म्हणूनच पुढच्याच प्रवेशांतील भीषण प्रसंग घडल्याचें पाहण्याचें त्याच्या नशिबीं आलें.

कारण त्याच रात्रीच्या पहाटे कॅब्रट झोपला असतांना ॲन्नीने मुलाच्या तोंडावर उशी दाबून त्याचा प्राण घेतलेला असतो. बेभानपणाने हें कृत्य झाल्यावर तिला हुंदके येऊं लागतात. पाळण्याजवळ गुडघे टेकून हंबरडा फोडावा असें तिला वाटतें. पण

मन आवरून, पाय न वाजवितां, कॅबटला पत्ता न लागूं देतां ती खाली स्वयंपाकघरामध्ये एबेन सुन्न होऊन तळहातावर हात टेकून बसलेला असतो तेथे येते.

एबेनला पाहिल्याबरोबर ती मोठ्या आतुरतेने "बघ, तुला म्हटलें होतें तसें मीं केलें आहे. आतां तुला पुनरपि माझी शंका येणार नाही. मीं जें कांहीं केलें आहे त्यानंतर तूं मला बाहुपाशांत घेण्याची फार आवश्यकता आहे."

पण एबेन थंड राहतो. त्याचा विचारच बदललेला असतो. बापाला कांही सांगूं नये; नाही तर तो त्या बिचाऱ्या बालकावर त्याचें उट्टें काढील. ॲबीच्या अपराधाचें प्रायश्चित्त त्या बिचाऱ्या जीवाला कशाला ? म्हणून त्याने मुकाट्याने निघून जायचें ठरविलें होतें. त्याच्यांतला बाप जागा झाला होता. आणि केव्हा तरी परत येऊन मोठा झालेला तो मुलगा आपण पाहूं हें स्वप्न तो अनुभवीत होता.

पण "आतां तुला जायचें कारणच उरलें नाही. मीं जें कांही केलें आहे त्यानंतर आपल्या दोघांमध्ये यायला आता कोणी नाही – मीं त्याला ठार केलें आहे" असें जेव्हा ॲबी म्हणते तेव्हा "थेरड्याचें चांगलें काम केलेंस" अशा अर्थाचा उद्गार एबेनच्या तोंडून बाहेर पडतो.

पण लगेच त्याला कळतें की, ॲबीने म्हाताऱ्याला नव्हे, बाळाला मारलेलें असतें. यामुळेही एबेन क्रुद्ध होऊन पुन्हा ॲबीला शिव्या देऊं लागतो. तिला हें सहन होत नाही. "मला हें करतांना गोड वाटलें का ? पण त्यावांचून तुझ्या मनाला माझ्या प्रेमाची खात्री पटवून द्यायला साधनच नव्हतें. त्याने मरावें अशी तूंच इच्छा दर्शविलीस – तो आड आला नसता तर तुझें माझें प्रेम जसेंच्या तसें राहिलें असतें, असें तूंच म्हणालास" असें म्हणून ती आपल्या कृत्याबद्दल त्याला दया करायला सांगते.

प्रथम तर एबेन "तूं खोटें बोलतेस – मी असें कधीच बोललों नव्हतों" असें त्वेषाने म्हणतो. आणि मग "तसा कांही माझा अर्थ नव्हता – तूं हें भलतेंच करशील असें स्वप्नांतसुद्धा मला वाटलें नव्हतें – त्याच्या लहानशा बोटालासुद्धा इजा होऊं नये यासाठी मीं माझे प्राण खर्ची घातले असते" असा एबेन ॲबीलाच बोल लावूं पाहतो. स्वतः खून करून त्याचा दोष माझ्यावर लादायचा तुझा डाव आहे असेंही म्हणतो. आपले दोन्ही कान हातांनी झाकून ती स्फुंदत त्याच्या पायावर लोळण घेते. पण एबेनच्या हृदयांत आणखीच एक वाकडा विचार उभा राहतो.

एबेनचा अति दुष्ट तर्क—

"माझी नुसती जमीन घेऊनच या हडळीचें समाधान होत नव्हतें. मला एक मुलगा झाला तोहि मला राहूं द्यायचा नव्हता. सगळें सगळें लुटायला ही आली आहे या घरांत," असा दुष्ट तर्क बांधून तो सूडाची भाषा बोलूं लागतो, पोलिसांना वर्दी देऊन मगच आपण कॅलिफोर्नियाला जाणार म्हणतो. "तुझ्यासारख्या खुनी आणि चोर स्त्रीचें तोंडसुद्धा कोणी पाहूं नये. अशी असून तूं मला मोहांत पकडण्याची

खटपट करतेसच्च आहेस. तेव्हा तुला पोलिसच्याच ताब्यांत दिलें पाहिजें " असें म्हणून घराबाहेर पडून तो ताडताड गावाच्या वाटेला लागतो.

इकडे ॲबी "माझें तुझ्यावर प्रेम आहे रे! तूं माझ्यावर प्रेम कर – मग तूं माझें कांही केलेंस तरी मी कांही म्हणणार नाही " — असें म्हणून हुंदके देत बसते. त्याच्या मागे धावावें असें तिला किती वाटतें, पण दाराशींच तिला भोवळ आल्यासारखी होते.

यानंतर एक तासाने या भागांतील आणि या नाटकांतील शेवटचा प्रसंग घडतो. एबेन पोलीसकडे वर्दी द्यायला गेल्यानंतर एक तासाने कॅबट झोपेंतून जागा होतो. मोठी गाढ झोप लागलेली असते त्याला आज किती एक महिन्यांत. त्याला वाटलें ॲबी सकाळची कांजी करण्यासाठी स्वयंपाकघरांत गेली असेल. म्हणून तेथे येऊन आरडा-ओरडा करूं लागतो. मोठ्या माणसांसाठी नाही तर छोट्या बाळासाठी सर्व तजवीज केली पाहिजे, म्हणतो.

कॅबटला सर्व उलगडा —

आतापर्यंत स्तब्ध आणि मख्ख बसलेली ॲबी बाळाच्या उल्लेखाने शहारते आणि आतां तो कधीच उठणार नाही – कारण, आपण त्याला ठार केलें आहे असें ती कॅबटला सांगते. पण "काय म्हणून मारलेंस, हक्क काय तुला त्याला मारण्याचा?" असें त्याने विचारल्यावर ॲबी पिसाळते आणि कॅबटचा त्या मुलाशीं कांही संबंध नाही, त्याचा तो कोणी नाही; तो मुलगा होता एबेनचा आणि कॅबटकडून पुत्रसंतति करून घेण्याआधी आपण जीव दिला असता; त्याच्या ऐवजी मीं तुमचाच जीव घ्यायला हवा होता, असा परखड जबाब ती कॅबटला देते.

हें ऐकून कॅबटचे डोळे आश्चर्याने फिरून गेल्यासारखे होतात. "तुझ्यांत आणि माझ्यांत अंतर पाडणारें कांही तरी कोपऱ्या कोपऱ्यांत माझ्यावर पाळत ठेवून होतें असा मला जो सारखा संशय येई त्याचा आता मला उलगडा झाला" असें तो म्हणतो. मूल गेल्याची खात्री करून घेतो आणि गरीब बिचारें पोर! असें म्हणून डोळ्यांतून नाकावर ओघळलेला अश्रू अंगरख्याच्या बाहीने पुसतो. त्या वेळीं डोकें फिरल्यासारखें होऊन "नका हो, नका हो" म्हणून ओरडून ॲबी हुंदके देऊं लागते.

"आता मला हृदय दगडासारखें केलें पाहिजे. एबेनचा तो पोर असेल तर गेला हें बरेंच झालें. कांही तरी संशय वाटायचाच मला. घरांत सगळें अस्वाभाविक वाटायचें. माझा जीव घ्यायचा होता काय तुला? पण मी तुझ्या जन्माला पुरून उरेन. चांगलीं शंभर वर्षें जगेन." असें कांहीतरी विचूक कॅबट बडबडूं लागतो आणि तोही पोलिसांत वर्दी द्यायला निघतो.

ॲबी एबेनचें समर्थनच करते —

पण तिच्याविरुद्ध वर्दी द्यायला स्वतः एबेनच गेला आहे हें ऐकून कॅबट थक्क

होतो; स्तब्ध होतो; एकपरी बरेंच झालें म्हणतो. कारण माझें जर तुझ्यावर प्रेम असतें तर तूं कांही केलें असतेस तरी पोलिसाकडे तुझ्याविरुद्ध वर्दी द्यायला मी गेलों नसतों, असा तो एव्हेनला दोष देतो. पण याही अवस्थेंत ॲबी एव्हेनचा बचाव करूं पाहते. यांत वर्दी द्यायला हवीच होती अशीं कांही कारणें असतील-तुलाकाय माहीत ?" ती ठसकारते.

"असतील, असतील" असें म्हणून कॅव्हट धीर धरायचा प्रयत्न करतो. पण त्याला यश येत नाही. "शेवटीं आमच्यावर एकाकी राह्यची पाळी" असें म्हणून तो उसासा टाकतो, तोच कोणी तरी आल्याची चाहूल लागून तो पुन्हा पहिल्याप्रमाणे ताठ होतो. एवढ्यांत एव्हेन येतो.

"झाली पोलिसाकडे वर्दी देऊन ?" कॅव्हट त्याला खोचून विचारतो आणि "छान! छान! आईच्या पोटीं हिरे निपजलात आपण; आता पोलिस येऊन हिला घेऊन गेल्यावर एक क्षणभर इथे थांबू नकोस, नाहीतर पोलिसांना परत येऊन आणखी एका खुनाच्या आरोपावरून मला पकडून न्यावें लागेल" असें त्याच्या अंगावर खेकसून चालता होतो.

एव्हेन ॲबीच्या पायांशीं गुडघे टेकून बसतो आणि "मला क्षमा कर" म्हणतो.

सर्व विश्व मिळाल्याइतका आनंद ॲबीला —

याने सर्व विश्व मिळाल्याइतका आनंद होऊन ॲबी त्याचें चुंबन घेते आणि त्याचें मस्तक आपल्या छातीशीं घट्ट धरते. एव्हेन पुन्हा "माझें तुझ्यावर प्रेम आहे, मला क्षमा कर असें म्हणतो. "तूं प्रेम आहे म्हटल्यावर तुझे हजार गुन्हे मी माफ करीन; आता काय वाटेल तें मी सहन करीन" असें त्यावर ॲबी म्हणते.

पोलिसला वर्दी दिल्यावर फौजदार निघण्यापूर्वी एव्हेनला थोडा वेळ थांबावें लागलें. तेवढ्यांत त्याला थोडा शांतपणें विचार करायला फुरसत मिळाली. आपलें ॲबीवर किती प्रेम आहे याची त्याला जाणीव झाली, आणि आपलें मस्तक फुटून तुकडे होत आहेत असें त्याला वाटूं लागलें. कांही झालें तरी आपलें प्रेम कमी होऊं शकणार नाही असें होऊन पळत पळत तिला सांगायला तो आला होता की, आपण दोघेजण इथून पळून जाऊं या.

एव्हेनचें किल्मिष धुऊन जातें —

परंतु आता पळून जायची ॲबीची तयारी नव्हती. गुन्ह्याची शिक्षा सोसायची असें तिने पूर्ण विचाराअंतीं ठरविलें होतें. पण तिच्या गुन्ह्याला कारण स्वतः एव्हेन होता, त्याच्या पापासाठी तिला बळी जावें लागत होतें. याचा आता एव्हेनला चांगला उमज पडला होता. सगळें कांही तिने सोसावें यांत तिच्यावर मोठा अन्याय होत होता. म्हणून या खुनांत आपलें साह्य असल्याचें आपण सांगणार एव्हेन असें ठरवितो. त्या वेळीं त्याने पूर्वी दाखविलेल्या स्वार्थीपणाचें किल्मिष धुऊन गेल्यासारखें वाटतें.

पोलिस येण्यापूर्वी कॅब्रटच तेथे येऊन दाखल होतो. त्या दोघांवर तो भयंकर संतप्त झालेला असतो. आणि त्याला वैराग्याचा मोठा झटका येतो. गुरें त्याने मोकळीं सोडून दिलेलीं असतात. "घर वगैरेला मी आग लावून देणार आणि शेत देवाच्या नांवाने करणार, आणि तुम्हांला पोलिसांनी नेल्यावर मी कॅलिफोर्नियाला निघून जाणार, असा मोठा निर्धार तो व्यक्त करतो. "भाड्यासाठी सहाशे डॉलर साठविलेले आहेत माझे" असा त्याला जोर असतो. पण हे पैसे चोरून एबेनने आपल्या दोघां भावांना दिल्याचें कळल्यावर मात्र त्याचे डोळे खाडकन उघडतात. आता हें शेत सोडून जायला आपल्याला कोठे स्थान नाही हें उमगून येऊन त्याचें डोकें गरगरूं लागतें. आणि "मीं हें शेत सोडून जाणें देवाला मंजूर नाही. म्हणून त्यानेच एबेनला चोरी करायला शिकवून हा धडा मला शिकविला" असें तो म्हणतो, आपल्या क्षणिक वैराग्याचा किंवा त्याग्याचा त्याग करतो आणि माझ्या "नशिबींच एकाकी जीवन आहे" असें म्हणून आलेल्या परिस्थितीला तो राजी होतो.

नंतर पोलिस येतात. एबेन स्वतःला गुन्ह्यांत गोवून घेतो. कॅब्रट त्यांचा निरोप घेतो आणि सोडलेल्या गायी मला एकत्र केल्या पाहिजेत असें म्हणून तेथून निघून जातो. ॲबी आणि एबेन पुन्हा एकदा आपल्या प्रेमाची आणभाक करतात आणि पोलिसांबरोबर निघून जातात. त्यांना शेताचा केवढा मोठा मोह सोडून हा वनवास पतकरावा लागत होता हें दाखविण्यासाठी नाटककाराने फौजदाराच्या तोंडीं पुढील वाक्य घातलें आहे.

"किती छानदार, गहरें शेत आहे हें, शंकाच नाही. माझ्या मालकीचें हें शेत असतें तर!"

आणि मालमत्तेच्या लालसेच्या या प्रबळ प्रदर्शनाबरोबरच हें भीषण आणि करुण नाट्य संपतें.

एका साध्या, सामान्य तरुणाची करुण कहाणी —

या नाटकाचा नायक एक साधा, खेडवळ, रांगडा शेतकरी आहे. त्याच्या ठिकाणीं विशेष कांही मोठेपणच मुळांत नाही. तेव्हा त्याचें प्रत्यक्ष दर्शन आम्हांला नाटककार कोठून घडविणार? किंबहुना त्याचें साध्य तें होऊंच शकत नाही. मालमत्तेच्या मालकीच्या लोभांत गुरफटून स्वतःचें आणि दुसऱ्याचेंही सुख नाहीशा करणाऱ्या एका साध्या सामान्य तरुणाची ही करुण कहाणी आहे. न्यायनीतीच्या मोठ्याशा धारदार कल्पना त्याच्याजवळ नव्हत्या. सृष्टिक्रमानुसार द्रव्यलोभाबरोबरच कामवासनेचा आवेगही त्याला घेरून राहिला होता. आपली मालमत्तेची हाव त्याने थोडीशी जरी कांबूत ठेवली असती तर, कोणी सांगावें, झालेला मुलगा कॅब्रटचा हें नाटक तसेंच चालूं ठेवून त्याला आणि ॲबीला सुखाचें जीवन घालवितां आलें असतें. तसा कांही उपाय काढतांही येईल, असें जाणत्याच चतुर असणारी ॲबी म्हणतही होती. परंतु आपल्या मालकीच्या माल-

मत्तेचें हरण करण्यासाठी बापाने यशस्वी जाळें आपल्या आईच्या भोवतीं विणलें होतें, यामुळे चिडून गेलेल्या त्या साध्या आणि तीव्र मनोवृत्तीच्या तरुणाला, तसाच डाव टाकून आपल्याला आपलें शेत कधीच मिळूं देऊं नये अशी खटपट करणारी स्त्री या स्वरूपांतच ॲबीचें दर्शन व्हावें; आणि ती स्त्री त्याच्याकडे खरोखर एक तरुण पुरुष म्हणून आकर्षित झाली होती, त्यासाठी ती आपलें सर्वस्व द्यायला तयार होती हें सत्य त्याला स्वतःच्या लोभापोटीं दिसूं नये; ही यांतली मन सर्वांत जास्त खिन्न करणारी घटना आहे. त्यापायीं एका पंधरा दिवसाच्या निरागस बालकाचा मृत्यु व्हावा, त्या दोघां एकमेकांवर नितांत प्रेम करणारांना तुरुंगाचा रस्ता, (कदाचित फाशीचाही, कारण त्या गोष्टीवरचा पडदा नाटककाराने उघडलेलाच नाही) सुधारावा लागावा आणि पाऊणशे-हून जास्त वयाच्या म्हाताऱ्या कॅबटचें जीवन संपूर्ण उध्वस्त आणि एकाकी व्हावें या या नाटकांतील भीषण घटना, हीं माणसें साधीं असूनही किती विदारक आहेत. एबेनला हें आपण काय केलें याचा उमज अखेरीस चांगलाच पडला – पण किती अखेरीस ! आणि म्हणून, 'हें असें झालें नसतें तर' हा सदाच माणसाचें मन कातर करून सोडणारा प्रश्न अखेरीस आपल्या मनापुढे उभा राहतो आणि आपलें मन त्या सर्वांविषयीं हळवें होऊन आपण या सगळ्या घटना खिन्नपणें मनांत घोळवीत नाटकाचा निरोप घेतों.

प्रकरण पंधरावें

ब्लॅन्श

यूजीन ओनीलपेक्षाही अगदी अलीकडचा एक प्रख्यात अमेरिकन नाटककार टेनेस्सी विल्यम्स याच्या 'ए स्ट्रीट कार नेम्ड डिझायर'–वासनारथ–या नाटकाची ब्लॅन्श ही नायिका आहे, आणि तिचें चित्र नाटककाराने कसें रंगविलें आहे हें या प्रकरणांत पाहावयाचें आहे. या नाटकाचा पहिला प्रयोग लंडनमध्ये ऑक्टोबर १९४९ मध्ये झाला. म्हणजे हें नाटक अगदी अलीकडचें, गेल्या दहा वर्षांतलें आहे. त्या दृष्टीने त्याचें विशेष महत्त्व आहे.

न्यू ऑर्लीन्स या छोट्या शहरांत 'एलिशिअन फील्ड्स' या नांवाच्या एका लहानशा घरांत या नाटकाचे सगळे प्रवेश घडून येतात; केव्हा घरांत, केव्हा घराच्या ओट्यावर आणि केव्हा समोरच्या रस्त्यावर. एका बाजूला आगगाडीचा रस्ता आणि दुसऱ्या बाजूला नदी यांच्या दरम्यानच्या रस्त्यावर हें घर आहे: या रस्त्यावरची वस्ती गरिबीची आहे; तथापि त्यामध्ये चंगीभंगी लोकांच्या वस्तींत असावें तशा प्रकारचें चोरटेंपणाचें आकर्षण आहे. आणखी एक विशेष म्हणजे या रस्त्यावर जागोजाग, वळणावळणाला पिआनोचा कर्णकर्कश आवाज एकसारखा चालू असतो असें नाटककाराने कटाक्षाने सांगितलें आहे. कारण या पिआनोच्या वादनाचा पार्श्वसंगीत म्हणून त्याने ब्लॅंशचे बदलते मनोविकार दाखविण्यासाठी उपयोग करून घेतला आहे. परंतु रंगभूमीच्या या आधुनिक तंत्राकडे आपल्या चर्चेच्या दृष्टीने विशेष लक्ष पुरविण्याचें कारण नाही.

'स्वर्ग–क्षेत्र' हें नांव असलेल्या या घरामध्यें रस्त्यालगत बऱ्याच उंचावर जोतें असलेल्या तळमजल्यावर एक बिऱ्हाड आहे आणि त्यावरच्या मजल्यावर खुद्द घरमालकाचें बिऱ्हाड आहे.

धसमुसळ्या स्टॅनले —

अशा या घरासमोर नायिका ब्लॅन्श हिच्या बहिणीचा नवरा स्टॅनले याची आपली गाठ पडते. सुमारे अठ्ठावीस–तीस वर्षें वयाचा, दणकट बांध्याचा आणि अंगांत तारुण्य मुसमुसत असल्यामुळे सदैव उसळत असलेला व दाणदाण हालचाली करणारा हा रेलवेकडील दुय्यम तंत्रज्ञ घरीं येतो तो बायकोच्या नांवाने मोठ्याने ओरडून हाका मारीत. बायको दारांतून बाहेर ओट्यावर येते न येते तोच हा आपल्या हातांतली मांसाची पिशवी धाडकन तिच्याकडे फेकतो आणि घरांत न जातांच आपण चेंडूचा

खेळ [लगोऱ्यांसारखा एक विशिष्ट अमेरिकन खेळ] खेळायला जातो म्हणून परतही फिरतो. बायको खेळ पाह्यला यावें म्हणते; त्यालाही त्याची हरकत नव्हती; पण ताबडतोब तिने निघायला पाहिजे; तरीपण ती येईपर्यंत तो थांबतच नाही. घरमालकीण यूनिस खेडेगांवच्या निरुद्योगी माणसांप्रमाणे ओट्यावरच एका नीग्रो स्त्रीपाशीं गप्पा करीत बसली होती तिला 'कसं काय' विचारून तो निघून जातो.

अशा या घसमुसळ्या माणसाच्या घराकडे आणि त्या चमत्कारिक वातावरणाच्या वस्तींत एक स्त्री येतांना आपण पाहतों. हातांतल्या कागदाच्या तुकड्याकडे ती पाहते आहे आणि रस्त्यावरच्या घरांकडे नजर टाकते आहे. तिचा पोशाख शहरी आणि पांढरा स्वच्छ आहे. शरीराचा उठाव स्पष्ट होईल असा ब्लाऊझ तिने घातलेला आहे. गळ्यांत मोत्यांची माळ आहे; कानांत कुडलें आहेत; हातमोजे घातलेले आहेत; डोक्यावर शानदार हॅट आहे. जणू कांही ग्रामीण भागांत वनभोजनासाठी किंवा समारंभासाठी ती आली आहे.

तेथील वातावरणाशीं न जमणारी स्त्री —

त्या वातारवणाशीं विसंगत अशा रूपाच्या आणि पेहरावाच्या त्या स्त्रीला कोठलें तरी घर हवें आहे. तें तिला सापडत नाही हें युनिस हेरते आणि "तुम्ही वाटवीट तर चुकला नाहीत ना?" असें तिला विचारते.

तिला सांगितलें होतें त्याप्रमाणे डिझायर – वासना – हें नांव असलेल्या बस गाडींतून ती आली होती; नंतर स्मशान या नांवाच्या गाडींत बसून ती पुढे या रस्त्याला आलेली होती. आणि याच रस्त्यावर तिला हवें असलेलें स्वर्गक्षेत्र नांवाचें घर, पाचसहा घरें टाकून गेल्यावर मिळेल असें तिला सांगण्यांत आलें होतें. पण तेथल्या त्या वातावरणांत स्वर्गक्षेत्र या नांवाला साजेल असें घर कांही तिला सापडत नव्हतें; त्यामुळे ती गोंधळून गेली होती.

पण तिला हवा असलेला घर क्रमांक ६२ म्हणजे हेंच यूनिसचेंच घर होतें. तिला हवी असलेली तिची बहीण स्टेला – म्हणजे सौ. स्टॅनले कोवाल्सकी ही त्याच घरांत राहत होती; हें समजल्यावर त्या नवख्या स्त्रीच्या तोंडून आश्चर्याचा आणि खेदाचा उद्गार बाहेर पडतो.

"हें, – हें घर तिचें म्हणतां?"

अशा या घराची यजमानीणही घरीं नव्हती. यूनिसनेच घरमालक या नात्याने या तरुणीला बहिणीचें घर उघडून दिलें. ओट्यावरून आंत पाय टाकतांच स्वयंपाकघर, त्यांतच एक घडीचा खाट, पलीकडे शयनघर आणि त्याच्या पलीकडे स्नानगृह अशा त्या बिऱ्हाडाच्या जागेंत सर्व कांही अस्ताव्यस्त पडलेलें होतें. घरमालकीण यूनिस हिलासुद्धा तें जाणवलें. "तशी ही जागा छान आहे. जरा चांगली आवरासावर करायचा अवकाश की झक्कास" अशी संपादणी करायचा ती यत्न करते, आणि पाहुण्या

बाईला कंटाळवाणें वाटूं नये म्हणून तिच्याशीं उगीच इकडचें तिकडचें बोलण्याचा प्रयत्न करते. "आपल्याला आता अगदी कंटाळा आला आहे" या त्या तरुणीच्या उद्गाराचा खरा अर्थसुद्धा त्या गांवढळ यूनिसच्या लक्षांत येत नाही. जवळ जवळ "बाई, आता इथून जा" असें सांगून ती तरुणी तिला बाहेर घालवते.

विचित्र परिस्थितींत येऊन पडलेली—

अशा या विचित्र परिस्थितींत येऊन पडलेली ही तरुण स्त्री म्हणजेच आपली नायिका ब्लॅन्श. तिच्या मानाने ती अत्यंत विलक्षण विसंगत परिस्थितींत येऊन पडली होती. तें जुनाट, रंग गेलेलें घर, त्यांत त्या नांवाला दोन खोल्या, आजूबाजूचीं माणसें अशीं गांवढळ; आणि घराचें नांव काय तर स्वर्गक्षेत्र! बिऱ्हाडांत धड फर्निचर नाही; साफसुफीचा किंवा व्यवस्थितपणाचा लेश नाही, घरीं किंवा दारीं स्वतःचें कांही खासगी असा भाव किंवा सोय नाही.

ती आली त्या गाडीचें नांव वासना! पुढची गाडी तिने पकडली तिचें नांव स्मशान. यांतच तिचा जीव गुदमरला होता. मग बहिणीचें हें स्वर्गक्षेत्र पाहून तर ती सर्दच झाली. तिच्या चेहऱ्यावर भयंकर भकासपणा प्राप्त झाला. तिला कांही सुचेंनासें झालें. एवढ्यांत तिला दारूची (व्हिस्की) बाटली दिसते आणि मोठा अर्धा ग्लास दारू ओतून ब्लॅन्श ती घटाघट पिऊन टाकते; आपण दारू प्यायल्याचा कोणाला संशय येऊं नये म्हणून बाटली जागच्या जागी ठेवते आणि ग्लास साफ धुऊन ठेवते.

त्यानंतर बहीण स्टेला, तिला निरोप गेलेला असल्यामुळे, घाईघाईने येते. बहिणी-बहिणींची भेट होते. सुरुवातीला ब्लॅन्शला जरा अडखळल्यासारखें होतें. परंतु लगेच ती अगदी मोकळेपणीं बडबडूं लागते. तिथला तो भडक प्रकाश तिला मुळीच रुचत नाही. एवढ्या भडक प्रकाशांत आपलें रूप उठून दिसत नाही अशी आपल्या रूपा-बद्दलची तिला काळजी आहे! स्टेलाला ती हें कर, तें कर, असे हुकूम सोडूं लागते आणि स्टेला ते निमूटपणें ऐकतेही. "हें घर म्हणजे भयंकर ठिकाण आहे" असें ब्लॅन्श म्हणून जाते आणि मग ओठ चावते.

ब्लॅन्शचें साहित्यप्रेम—

अशी ती स्वतःच एकसारखी बडबडत राहते, आणि वर, स्टेला बोलत नाही असा आरोप करते. आपण जणू अजून दारू घेतलीच नाही असें भासवून स्टेलाला दारू तयार करायला सांगते आणि ती घेतल्यावर पुन्हा मूळ पदावर येऊन "या घरांत तुला करमतें तरी कसें, राहवतें तरी कसें?" असें विचारते. "असल्या या जवळजवळ भुताट-कीच्या घराचें चित्र माझी कल्पनाशक्ति मीं किंतीही ताणली असती तरी मला डोळ्यां-समोर उभें करतां आलें नसतें. त्याला 'एडगर ॲलन पो' ची कल्पनाशक्ति पाहिजे, असेंही ती उघडउघड म्हणते. यांत त्या ठिकाणाबद्दलचें तिचें असमाधान जसें

व्यक्त होतें तसेंच तिचें साहित्यप्रेमही त्यामधून नाटककाराने सहज व्यक्त केलें आहे.

आपण अशा परिस्थितींत राहतों याची कल्पना स्टेलाने आपल्याला दिली नाही याबद्दल ब्लॅन्श तक्रार करते. हा संसार कांही इतका असमाधान वाटण्यासारखा नाही हें बहिणीचें म्हणणें ब्लॅन्शला मुळीच मान्य होत नाही.

आपण आल्याने बहिणीला बरें वाटलेलें नाही ? —

आपण या परिस्थितींत अगदीच विसंगत आहोंत या जाणीवेंतून, आपण आल्याने बहिणीला बरें वाटलें नाही असा तर्क ब्लॅन्श करते. म्हणूनच बहीण आपल्याशीं मोकळेपणीं बोलत नाही असें तिला भासतें. आपण स्वतःच आपल्या बडबडीमुळे तिला बोलायची संधि देत नाही हें कांही तिच्या लक्षांत येत नाही. आणि "तूं विचारीत नाहीस तर मीच सांगतें" असें म्हणून आपण या वेळी इकडे कशी आलों याची हकीकत ती स्टेलाला सांगते.

आपल्याला बडतर्फ केलें ही गोष्ट खरी नाही. खरें म्हणजे आपल्याला अत्यंत शीण झाला होताः थकवा आला होता. इतका की, वेड लागायची भीति वाटत होती. म्हणून शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्याला कांही आठवडे विश्रांति घ्यायला सांगितली; हें सांगून ती दारूचा ग्लास घेते. आणखी एक ग्लास घ्यायचें नाकारते, आपण अट्टल दारूबाज नाही असा खोटाच कांगावा करून.

आपण स्वतः कांही सुंदर दिसत नाही, पण स्टेला मात्र कांही तरी विशेष निराळी दिसते आहे, असें ती म्हणते. तोंडदेखलें नव्हे, पण स्टेलांत कांही तरी विशेष फरक झालेला आहे हें तिला खरेंच जाणवतें. "तुझ्या घरीं मोलकरीण आहे का ?" म्हणून ती स्टेलाला विचारते. आणि दोन खोल्यांच्या बिऱ्हाडाला मोलकरीण कशाला, असें स्टेला म्हणते तेव्हा "दोन खोल्या ? म्हणजे हें स्वयंपाकघर एक आणि दुसरी ती !" असें म्हणून ब्लॅन्श खो खो हसूं लागते आणि "अग, तूं अशी घुमी का ?" असें स्टेलाला डिवचते.

दोन बहिणी : किती भिन्न स्वभाव —

त्यावर पहिल्यापासूनच माझ्या अंगीं कांही तुझ्यासारखा हा उत्साहीपणा नाही हें स्टेलाचें उत्तर; आणि मला तुझ्यासारखें स्वतःचे विकार ताब्यांत ठेवण्याचें सामर्थ्य नाही हें ब्लॅन्शचें प्रत्युत्तर. या ठिकाणीं अगदी थोडक्यांत त्या दोघा बहिणींच्या स्वभावांतील मर्म आणि भिन्नपणा नाटककाराने आपल्या निदर्शनाला आणून दिला आहे.

स्टेला ब्लॅन्शच्या रूपाची स्तुति करते त्याने ब्लॅन्शला समाधान वाटतें. परंतु वाढत्या वयाबरोबर सौंदर्य आपल्याला झुकांडी देऊं लागलेलें आहे याची तिला जाणीव असते. आणि म्हणूनच दुसऱ्यांना आपण सुंदर दिसतों हें जाणून घेण्याची तिला उत्सुकता अधिकच असते.

भावी वेडाची स्पष्ट पूर्वसूचना —

त्या दोन खोल्या म्हणजे दोन खोल्या नव्हत्याच. त्यांच्यामध्यें दारही नव्हतें. नुसता एक पडदा होता. जागा ही अशी आणि स्टेलाकडे येणारी मंडळी पण सुसंस्कृत किंवा घरंदाज नव्हेत. नाना देशींच्या रक्ताची आणि चालीरीतींची भेसळ असलेले मिश्र संस्कारांचे लोक. ब्लॅन्शच्या चांगल्या पोशाखाची कदर त्यांच्यापैकी कोणी करणार नाही असें जेव्हा स्टेला स्पष्टपणेंच ब्लॅन्शला सांगते तेव्हा मात्र तिच्या घरीं राहणें अवघड होणार हें ब्लॅन्शला जाणवतें. पण करणार काय? मला तुझ्याजवळ राहिलेंच पाहिजे. मला कुणी तरी जवळ पाहिजे. "कारण – कारण तुझ्या लक्षांत आलेंच असेल की – मला – मला बरें नाहीं" असें बोलून मनांतलें मनांतच ठेवून ब्लॅन्श भेदरल्यासारखी स्टेलाकडे पाहूं लागते.

मघाशीं 'वेड लागायची भीति' हा तिने केलेला उच्चार आणि आतांचें हें तिचें बोलणें व ती भेदरलेली दृष्टि यांतून भविष्यकालीन वेडाची सूचना नाटककार स्पष्टपणें करतो; आणि स्वतः ब्लॅन्शला ही भीति अस्पष्टपणें जाणवली असल्याचें ध्वनित करतो.

बाकी सर्व जमेल. पण स्टॅनलेला आपण आवडूं का; त्याची तर कांही हरकत असणार नाहीना; हा मग तिला प्रश्न पडतो. स्टॅनले चांगला माणूस आहे; त्याचें आपल्यावर आणि आपलें त्याच्यावर फार प्रेम आहे. तो पुष्कळसा फिरतीवरच असतो; पण त्याचा विरह आपल्याला अगदी असह्य होतो; या स्टेलाच्या सांगण्यांतून आपलें आणि त्याचें कसें जमेल याचा कांहीच बोध ब्लॅन्शला होत नाही.

घरमिळकत गेली, नोकरी गेली —

त्यानंतर ब्लॅंश आपल्या घराकडील हकीकत स्टेलाला सांगते. त्यांचें तें मोठें घर आणि जागा आता त्यांच्या मालकीची राहिलेली नव्हती; ती दुसऱ्याची झाली होती, याबद्दल स्टेला आपल्याला दोष देईल म्हणून ती रागानेच म्हणते, "तूं लग्न करून इकडे आलीस आणि सगळी जबाबदारी माझ्यावर पडली. सगळे धक्केचपेटे मीं सोसले. एकामागून एक सारीं माणसें मेलीं. तूं फक्त अंत्यसंस्कारापुरती येत होतीस. पण घर उभें ठेवायला आणि त्या सगळ्या बिनमिळवत्या लोकांना पोसायला आणि त्यांचे अंत्यविधी पार पाडायला मला एकटीला किती जिवाचें रान करावें लागत होतें!"

एकूण सारांश असा की, त्यांचें तें भलें मोठें घर आणि ठिकाण आता त्यांचें राहिलें नव्हतें आणि नोकरी सोडून ब्लॅंश इकडे आली होती. अर्थात सांगत होती ती मात्र की, कांही आठवडे विश्रांतीसाठी आपण आलों आहोंत म्हणून. त्याबद्दल खुलासा पुढें होईलच.

स्टॅनले व ब्लॅंश : झटापटीला सुरुवात —

ब्लॅंशने आपलें घरदार गेल्याची कहाणी सांगितलेली ऐकून स्टेलाला फार वाईट

वाटतें; तिच्या डोळ्यांत पाणी उभें राहतें. म्हणून तोंड धुण्याच्या निमित्ताने ती स्नान-गृहांत जाते. त्याच वेळीं स्टॅनले दाणकन घरांत प्रवेश करतो. पावणेसहा फूट उंचीचा हा माणूस पाशवी सुखभोगाच्या जाणिवेने नुसता रसरसलेला होता. स्त्रियांचा उपभोग घ्यायचा आणि त्यांना उपभोग द्यायचा हा त्याचा तरुणपण प्राप्त झाल्यापासून स्थायी भावच आहे असें, त्याच्या गोंडा वर करून दिमाखाने, कोंबड्याप्रमाणे चालण्याच्या धाटणीवरून कोणालाही वाटावें. स्त्री पाहताच कामोपभोगाच्या दृष्टीने क्षणांत तिची प्रतवारी लावायची आणि त्याच दृष्टीकडे स्त्रियांकडे पाहून हसायचें हा त्याचा नित्यक्रम आणि स्वभाव होता.

अशा त्या पुरुषाला पुढे पाहून ब्लँश दचकतेच. स्वतःचीच ती ओळख करून देते. तो दारूची बाटली हातांत घेऊन पाहतो तो ती बरीच रिती झालेली असते. हें पाहून तो आश्चर्य व्यक्त करतो. "आपण तर दारूला शिवतसुद्धा नाही" हें ब्लँशचें सांगणें अर्थातच त्याला खरें वाटत नाही. आणि म्हणून "कांही माणसें दारूला स्पर्श करीत नाहीत आणि तरीसुद्धा दारू त्यांच्या अंगावर चढल्यासारखीं तीं असतात" असें तो खोचून म्हणतो. इथपासूनच ब्लँश आणि स्टॅनले या उभयतांमधील झटापटीला सुरुवात होते. तिच्यासारखी नवखी स्त्री तेथे आहे याची फिकीर न करतां तो आपले कपडे काढतो. "खा, प्या आणि मजा करा," हा आपला स्वभाव आहे हें तो उन्मेखून तिला सांगतो. किती दिवस ब्लॅन्श येथे राहणार आणि आपल्या त्या खोपटांतच सारा मुक्काम काढणार का, याची चौकशी करतो.

एवढ्यांत स्नानगृहांत कांहीतरी धडपडल्याचा आवाज होतो. त्यासरशी तेथूनच "काय स्टेला, धडपडून कांही लागून घेतलेंस काय?" असें स्टॅनले ओरडतो. आपला हा धसमुसळेपणा या शहरी नाजूक स्त्रीला रुचत नाही ही गोष्ट त्याच्या नजरेंतून निसटत नाही. तो खोचून विचारतोच तिला,

"मी एक असंस्कृत, गांवढळ मनुष्य वाटत असेन नव्हे तुला?"

आणि मग आणखी एक जिज्ञासा तो आपली पुरी करून घेतो. ब्लॅन्शचें लहानपणीं लग्न झालें होतें, पण तो मुलगा मरून गेला होता ही हकीकत तो काढून घेतो. पण हें सांगितल्यावर ब्लॅन्श जास्तच अस्वस्थ होते; भोवळ येते आहे म्हणते. इतका तिला तो त्या लग्नाचा विषय दुःखकारक होता.

नाटकांतील संघर्षाचें बीज—

अशा रीतीने नाटकाच्या या पहिल्या प्रवेशांत, तारुण्याचा ऐन भर संपून आपलें सौंदर्य ओहोटीला लागलेलें आहे याची कांहीशी भयप्रद जाणीव असलेली एक सुसंस्कृत, एका वेळची श्रीमंत परंतु आता घराला मुकलेली, घरंदाज तरुणी आपल्या विवाहित बहिणीच्या घरीं आलेली नाटककाराने आपल्यापुढे उभी केली आहे. जेथे ती आली आहे तेथे सर्वच तिच्या सुसंस्कृततेशीं आणि उच्च कुलीनत्वामुळे उत्पन्न झालेल्या

अपेक्षांशीं विसंगत असें वातावरण आहे. खेडवळ आणि कांहींसा हीन खुशालचेंडूपणा प्रतिबिंबित झालेली वस्ती, बिऱ्हाडाची जाग्रा अगदी लहान आणि तेथे खासगी वेगळेपणा बिलकूल संभाळतां येणार नाही अशी, आणि त्या बिऱ्हाडांत संबंध येणार बहिणीच्या नवऱ्याच्या, बहीण स्वतःच म्हणते त्याप्रमाणे खालच्या संस्कृतीचे नमुने असलेल्या मित्रांशीच केवळ नव्हे; तर बहिणीचा नवराही पशुवृत्तीचा, स्त्रियांचा आषक आणि सभ्य समाजांतील स्त्रियांच्याविषयीच्या नाजूक भावनांना पारखा. अशा स्थितींत या स्त्रीने स्वतःला पाडून घ्यावेंच कां ? याचा अजून नीटसा खुलासा नाटककाराने केलेला नाही. परंतु ब्लॅन्शला हॉटेलमध्ये जाण्याची इच्छा नाही, कोणाच्या तरी आश्रयाने राहण्याची आवश्यकता भासावी इतकी ती भांबावलेली आहे. एवढें सगळें ब्लॅन्शच्या तोंडून स्टॅनलेने वदवून घेतलें. अशी ही सुंदर, तरुण, भांबावलेली, भेदरलेली सुसंस्कृत तरुणी एका बाजूला आणि पशुवृत्तीखेरीज ज्याला कांहीं ठाऊक नाही असा तिच्या बहिणीचा नवरा व त्याच्या त्या वृत्तीला साजेल अशी एकंदर बाह्य सामाजिक आणि स्थानिक अवस्था दुसऱ्या बाजूला यांच्यामधील संघर्षाचें हें नाटक आहे हें याप्रमाणे सुरुवातीलाच आपल्याला स्पष्ट होतें.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळींच नवरोबा श्री. स्टॅनले याचा पारा चढलेला आपणाला दिसतो. बायको आपल्या बहिणीकडे लक्ष देते आणि त्यामुळे तिचें आपल्याकडे दुर्लक्ष होतें असें चोवीस तासांतच त्याला बोचायला लागलेलें आहे. त्यांतच त्या रात्रीं त्याच्या घरीं पोकर या पत्त्याच्या खेळाची बैठक ठरलेली होती. पोकरचा खेळ म्हणजे यथेच्छ दारूची मजलसच. त्यामुळे त्या दोघींनी, विशेषतः ब्लॅन्शने तेथे असूं नये, या उद्देशाने स्टेलाने बाहेर जाण्याचें ठरविलें होतें.

स्टॅनलेचा मालमत्तेचा मोह —

त्या वेळीं ब्लॅन्श टबमध्ये कढत पाण्याचें स्नान करीत होती. बेल रीव्ह हा बंगला हातचा गेला आहे. त्या कारणाने किंवा आणखी कशाने तिला फार मनस्ताप झालेला आहे. तो शांत व्हावा म्हणून ही आंघोळ आहे हें स्टेलाने सांगितल्यावर स्टॅनलेचा मालमत्तेचा मोह जागा होतो. ब्लॅन्शशीं स्टॅनलेने गोडीने वागावें, तिला जरा खूष ठेवावी असें स्टेलाचें सांगणें होतें. परंतु बेल रीव्ह इस्टेट गेली म्हणजे काय झालें याच्या चौकशीची आंच स्टॅनलेला अधिक लागलेली होती. म्हणून तो उसळून चौकशी करीत होता. पण इस्टेट गेली म्हणजे काय झालें हें स्टेलाला कांही सांगतां येईना; खरें म्हणजे तिला कांही ठाऊकच नव्हतें.

स्टॅनलेला आपल्या संस्थानांतल्या कायद्याची आठवण होते. त्या कायद्याप्रमाणे बायकोच्या सर्व मालमत्तेवर पुरुषाचा बरोबरीने हक्क असे. तेव्हा स्टेलाचा माहेरच्या मिळकतींतला हिस्सा नष्ट झाला म्हणजे आपलीच मालमत्ता गेली या दृष्टीने "याचा जाब ब्लॅन्शला विचारलाच पाहिजे, तुला या बयेने चांगलीच फसविलेली दिसते आहे" असें तो रागाने म्हणतो.

सध्याच्या मनस्थितींत ब्लॅन्शला कांही विचारूं नये, पुढे सावकाश विचारतां येईल, असा स्टेलाचा सल्ला. शिवाय आपल्या घरण्यांतल्या कोणी कोणाला फसविलें हा विचारच तिला सहन होत नव्हता. परंतु मिळकत नाहीशी झाली म्हणजे काय ? खरेदी-खताचे कागद कोठे आहेत याबद्दल स्टेलाला कांहीच सांगतां येईना.

ब्लॅन्शच्या ट्रंकची असभ्य तपासणी —

पण स्टॅनले अशाने स्वस्थ बसणारा गृहस्थ थोडाच होता. तो शयनघरांत जातो आणि ब्लॅन्शची ट्रंक उघडतो. त्यांतले ते नाना तऱ्हांचे पोशाख तिच्या शिक्षकिणीच्या तुटपुंज्या पगारांतून येणें शक्य कसें होतें ? त्यांत एक खऱ्या जरीचा पोशाख, खरे फरचे तुकडे – हें सगळें पाहून स्टॅनले स्टेलाला विचारतो, " तुझ्याजवळ नाहींत ते कुठे असले फरचे तुकडे ? "

हे फरचे तुकडे फार पूर्वीपासून ब्लॅन्शजवळ आहेत आणि त्यांची किंमतही फारशी नाही हें स्टेलाचें म्हणणें स्टॅनलेला पटत नाही. आपल्या ओळखीच्या असल्या वस्तूंच्या व्यापाऱ्याकडून त्यांची किंमत करून घ्यायची असें तो ठरवितो.

आणखी त्याला त्या ट्रंकेंत त्याच्या मताने खऱ्या हिऱ्यामोत्यांचे दागिनेही सापडतात. ते नकली असल्याबद्दचेंही स्टेलाचें म्हणणें स्टॅनलेला मान्य होत नाही.

स्टॅनलेचें हें वागणें अत्यंत असभ्य होतें. म्हणून ब्लॅन्श स्नानगृहांतून बाहेर येण्यापूर्वी ती ट्रंक लावून ठेवावी ही स्टेलाची सूचनाही तो मानीत नाही. उलट ट्रंक लाथाडून टाकण्याचा असभ्यपणाच तो करतो. आणि डुबॉई घराणें व कोवाल्स्की घराणें यांच्या कल्पनाच निराळ्या आहेत म्हणतो. तेव्हा स्टेला चिडून, आहेतच असें ठसक्याने आणि रागाने म्हणते.

परंतु स्टॅनलेला त्याची कांही फिकीर नाही. ब्लॅन्शचे कपडे करून होईपर्यंत त्याने आपल्याबरोबर बाहेर यावें हेंही तो स्टेलाचें मानीत नाही. ती एकटीच बाहेर जाते. आणि तो एकटाच स्वयंपाकघरांत असतांना ब्लॅन्श स्नानगृहांतून बाहेर येते. कपडे करण्यासाठी आडोसा म्हणून ती त्या दोन जाबत्यांमधला सरकपडदा सरकवते. पण आंतून स्टॅनलेशीं ती बोलतच राहते. रात्रीच्या पत्त्यांच्या खेळाचे वेळी आम्हां बायकांना बसायला परवानगी नाहीच ना, असें विचारते. कपडे घालून झाल्यावर पाठीवरचीं बटनें लावायला हवीं असतात. परंतु स्टेला तर घरांत नव्हती. तेव्हा मला थोडी मदत करतां का, असें म्हणून ती स्टॅनलेलाच आंत हाक मारते. तो रागाने गरम होऊनच आंत येतो. आल्याबरोबर त्याला ब्लॅन्शचा पहिला प्रश्न असतो " कशी दिसते मी ? " पण रांकट स्टॅनलेकडून " ठीक दिसतेस " असा अगदीच कोरडा शेरा तिला मिळतो. त्याचप्रमाणे तिचीं बटनें लावण्याचें कामही तो करीत नाही. त्याच्याचजवळची एक सिगारेट घेऊन ब्लॅन्श ओढूं लागते.

आणि मग आपली ट्रंक उघडली गेली होती हें ब्लॅन्शच्या लक्षांत येतें. " तुझे

हे सगळे पोशाख जमा करण्यासाठी पॅरिसमधील उंची उंची दुकानांवर तुझी संक्रांत वळली असली पाहिजे" हें स्टॅनलेचें कठोर बोलणें आपल्या स्तुतिपरच वाटून, पोशाखाचें मला फार वेड आहे असें ब्लॅन्श म्हणते. त्यानंतर त्या फरच्या तुकड्यांना काय पडलें या स्टॅनलेच्या प्रश्नाला ब्लॅन्श उत्तर देते "हे फरचे तुकडे मला माझ्या एका चाहत्याने दिले आहेत."

स्टॅनलनेही आपल्या रूपाचें कौतुक करावें ही धडपड —

"फारच मोठा चाहता असला पाहिजे हा" असें जेव्हा स्टॅनले फणकाऱ्याने म्हणतो तेव्हा, "आता जरी नाही, तरी थोडी लहान वयाची असतांना पुरुषांनी माझ्यावर एकदम फिदा व्हावें अशी मी दिसत असेन की नाही?" असें त्याला विचारून आपल्या रूपाचें त्याने कौतुक करावें अशी खटपट ब्लॅन्श करते. पण स्त्रियांच्या असल्या नाजुकसाजूक स्तुतिपाठांची त्याला सवय नव्हती. "सिनेमा नटींच्या या असल्या भपक्याने फसणारे पुष्कळ लोक असतील; पण मी त्यांतला नव्हे" असें तो तिला रुक्षपणें बजावतो.

"म्हणजे तुमच्यावर आपली मोहिनी टाकण्याची कुणाही स्त्री-चेटकिणीची शहामत नाही?" असा ब्लॅंश त्याला प्रश्न करते आणि त्याने होकार दिल्यावर "म्हणजे तुमचा सारा सरळ धोपट कारभार आहे. म्हणजे कांहीसे तुम्ही रानटी अवस्थेकडे झुकतां. तुम्हांला स्वतःकडे लक्ष द्यायला लावायचें म्हणजे कोणाही स्त्रीला—" एवढेंच बोलून ब्लॅन्श त्याच्याकडे अनाकलनीय नजरेने पाहत स्तब्ध राहते. तेव्हा स्टॅनलेच तिचें वाक्य पुरें करतो "आपले—पत्ते टेबलावर उघडे मांडले पाहिजे." त्यावर आपला स्वतःचा अभिप्राय म्हणून स्पष्टपणें ब्लॅन्श म्हणते "मला हा असला धट्टपणा फार आवडतो. माझ्या बहिणीला खराखुरा पुरुष नवरा मिळाला आहे असें काल तुम्हीं घरांत पाऊल टाकतांक्षणींच मला वाटलें."

ब्लॅंशचा पघळपणा धोक्याचा —

स्टेलाला बाहेर हें सगळें ऐकूं येत होतें. ब्लॅन्शने आपल्या नवऱ्याशीं इतका पघळपणा करणें किती धोक्याचें आहे हें स्टेलाला फार चांगलें माहीत होतें. तेव्हा हा प्रसंग अधिक लांबूं नये म्हणून ती स्टॅनलेला "इकडे बाहेर या पाहूं" म्हणून हाकारते. परंतु ब्लॅन्श स्टेलाचा विचार तडीस जाऊं देत नाही. उलट जवळच्याच औषधी दुकानांत जाऊन आपल्यासाठी लिंबाचें सरबत घेऊन येण्याकरिता स्टेलाला ब्लॅन्श दूर पिटाळते आणि स्टॅनलेला धट्टपणें म्हणते, "हं, आता बोला; काय विचारायचें असेल तें विचारा. मला कांही लपवायचें नाही. काय आहे तुमच्या मनांत?"

स्टॅनले तिला त्याच्या संस्थानी कायद्याची समजूत करून देऊं पाहतो. ती त्याचा हशाच उडवते. गुलाबदाणीने आपल्या आणि त्याच्याही अंगावर थोडासा शिडकाव करते.

स्टॅनलेचा अभिमान डिवचण्याचा अविचारी प्रयत्न —

स्टॅनलेसारख्याशीं तिचें हें वागणें अत्यंत अविचाराचें होतें. आपल्याला कोणी स्त्री–चेटकी मोहिनी घालूं शकत नाही या त्याच्या अभिमानाला डिवचण्याचा तिचा हा उघडउघड यत्न होता. परंतु या चेष्टांमुळे आपण एका असंस्कृत माणसाच्या पशु-वृत्तीला इंधन घालीत आहोंत हें तिच्या ध्यानांत येत नव्हतें. त्याला मात्र हा प्रकार कशांत परिणत होईल याची जाणीव झाल्यावांचून राहिली नाही. म्हणून तो म्हणालाही, "तूं माझ्या बायकोची बहीण आहेस म्हणून. नाहीतर तुझ्याबद्दल माझ्या डोक्यांत कांही भलतेंच शिरलें असतें!"

आणि म्हणूनच त्याच्या दृष्टीने तिच्या या माकडचेष्टांचा अंत करण्यासाठी तो मिळकतीबद्दलचे कागदपत्र ब्लॅन्शजवळ मागतो. आपल्याबद्दल स्टॅनलेने घेतलेल्या फसवेगिरीच्या संशयाने संतप्त होऊन ती आपल्या ट्रंकेंतले कागद त्याच्या हातीं देते. पण त्या कागदांच्या खालीं ट्रंकेंत स्टॅनलेला आणखी कांही कागद दिसतात. हे कागद ब्लॅन्शने न दिल्यामुळे "हे कागद कसले?" असें स्टॅनले संशयाने विचारतो.

तीं असतात प्रेमपत्रें; एका मुलाने लिहिलेलीं. तें पुडकें स्टॅनले तिच्याकडून हिसकावून घेतो. स्टॅनलेचा हस्तस्पर्श त्या पत्रांना होणें म्हणजे त्या पत्रांचा अपमान होय ही ब्लॅशची भावना स्टॅनले ओळखूं शकत नाही आणि तो तें पुडकें फोडतो. त्यासरशी तीं पत्रें त्याच्या हातून हिसकावून घेण्याचा प्रयत्न ब्लॅन्श करते आणि पत्रें त्याच्या हातांतून निसटून जमिनीवर पसरून पडतात. त्या पत्रांबद्दल ब्लॅशच्या मनांत इतका पवित्र भाव असतो की, त्यांना परक्याचा स्पर्श झाल्यावर आता तीं जाळून टाकलीं पाहिजेत अशी तिची भावना होते.

ब्लॅन्शबद्दल पहिला जिव्हाळा —

या ठिकाणीं प्रथम ब्लॅन्शबद्दल आपल्या मनांत जिव्हाळा उत्पन्न होतो. आताची तिची परिस्थिति कशी असो, तिचें वागणें कसें असो; तिच्यावर अल्प वयांत प्रेम करणाऱ्या एका मुलाचीं तीं पत्रें एक मधुर आणि पवित्र ठेव म्हणून – इतकीं पवित्र की त्यांना दुसऱ्या कोणाच्या हातांचा स्पर्शसुद्धा होणें तिला असह्य वाटावें – ती आपल्याजवळ ठेवूं शकत होती, यावरून तिच्या ठिकाणच्या खोल सत्प्रवृत्तीचा आपल्याला प्रत्यय येतो. अशा लहानशा छटांनीच नाटककार आपल्या नायकांबद्दल आपल्या मनांत अनुकूल संवेदना निर्माण करीत असतात.

नंतर मग स्टॅनलेचें लक्ष सॉलिसिटरांकडच्या कागदांकडे जातें. आपल्या पूर्वजांनी स्त्रीसंभोगाशिवाय इतर उद्योगच केला नाही; त्यांत त्यांची सारी मिळकत खलास झाली, हा ब्लॅन्शचा खुलासा स्टॅनलेच्या गळीं उतरत नाही. हे कागद वकिलाला दाखविले पाहिजेत असें तो म्हणतो. "कारण आमच्या कायद्याप्रमाणे बायकोच्या व्यवहारांत

लक्ष घालायला पुरुषाला अधिकार आहे; विशेषतः तिला आता मूल होण्याचा संभव असतांना."

ब्लॅन्शच्या सहृयतेची आणखी एक नाजुक साक्ष —

स्टेलाला मूल होण्याच्या मार्गावर आहे हें ऐकून ब्लॅन्श इतकी हर्षनिर्भर होते की, आंत आलेल्या बहिणीला ती कडकडून मिठी मारते. ब्लॅन्शच्या सहृदय अंतःकरणाची ही आणखी एक साक्ष लगोलगच आपल्याला मिळते. तसेंच "तुझ्या नवऱ्याला या मिळकतीच्या व्यवहाराबद्दल सगळें कांही समजून सांगितलें; जणू कांही ही सगळी थट्टाच आहे असें म्हणून मी हसलें. खरेंच, मीं त्याच्याशीं थोडासा प्रेमाचा चाळा सुद्धा केला." असें पुढे ती म्हणते; एवढेंच नव्हे तर आपल्या नवऱ्याने तिच्याशीं असें वागायला नको होतें असें स्टेला म्हणत असतां उलट स्टॅनलेच्या समर्थनपरच ब्लॅन्श बोलते, तेव्हा गर्भवती स्थितींत स्टेलाच्या मनाला कसलाही त्रास होऊं नये यासाठी स्वतःचें दुःखही विसरून जाण्याचा तिच्या मनाचा थोरपणाही लगेचच व्यक्त होतो.

एवढ्यांत पोकर खेळाचे गडी जमूं लागल्यामुळे मग त्या दोघी झटकन खाली जातात. ब्लॅन्श तेथे स्टेलाला विचारते, "स्टेला कोणत्या रस्त्याने जायचें आपण?" आणि स्टेलाकडून कांही उत्तर न मिळाल्यामुळे पुढे म्हणते, "आंधळ्याला आंधळें मार्ग दाखविणार!" झाल्या प्रकारानंतर कोठें जायचें याचा त्या दोघींनाही उमज पडत नव्हता, या गोष्टीचें ब्लॅन्शने हें किती काव्यमय वर्णन केलें आहे!

तिसऱ्या प्रवेशांत स्टॅनलेच्या बिऱ्हाडांत स्वयंपाकघरांत पोकरचा खेळ चालू आहे; अधूनमधून व्हिस्कीचे पेले रिकामे होत आहेत. खेळतां खेळतां कुठल्या तरी अश्लील गोष्टी सांगितल्या जात आहेत. कामवासनेचा परिणाम मनुष्यावर अधिक की अन्नाच्या भुकेचा, याचा निवाडा करणारी अशीच एक गोष्ट स्टीव्ह, घरमालक युनिसचा नवरा, सांगतो. एक कोंबडा विषयवासनातृप्तीसाठी कोंबडीच्या मागे धावत होता; पिसारा बिसारा उभारून आणि वेगाने. आता कोंबडी अगदी त्याच्या आवांक्यांत आली आणि तो तिच्यावर स्वार होणार, एवढ्यांत एक नीग्रो गडी धान्याचे दाणे त्याच्याकडे फेकतांना कोंबड्याच्या दृष्टीला पडला. त्यासरशी कोंबडीचा पाठलाग सोडून कोंबडा धान्यकण खाण्यांत दंग झाला. हें पाहून नीग्रो नोकर म्हणाला, "परमेश्वरा मला इतका भुकेचा दास कधी होऊं देऊं नको."

गोष्ट ऐकून हशा माजतो. पण स्टॅनलेला हें विशेष पटत नाही. खेळ म्हणजे खेळ; त्यांत त्याला असले व्यत्यय नको होते. याच्या आधी मिचच्या आईच्या आजाराचा विषय निघाला होता; तेव्हासुद्धा खेळांत व्यत्यय येतो म्हणून स्टॅनले गरम झाला होता.

ब्लॅन्शची काळजी : आपण दिसतो कशा ? —

अशा रीतीने खेळ अजूनही ऐन रंगांत असतांना स्टेला आणि ब्लॅन्श परत

येतात. आंत पुरुष मंडळी. तेव्हा ब्लॅन्शाला मुख्य काळजी आपण दिसूं कशा. तेवढ्यांत थोडी थांबून ती पावडर लावते. आता तूं डेसीच्या फुलासारखी दिसतेस असें स्टेला तिला म्हणतो. त्यामुळे तिला बरें वाटलें. तरीपण खुडून चार दिवस होऊन गेलेल्या फुलाइतपतच आपला ताजेपणा आहे याची खेदजनक जाणीवही ब्लॅन्शाला आहे.

आंत शिरतांच "नको, नको, कुणी उठायचें कारण नाही" असें ब्लॅन्शा म्हणते. पण "त्याची चिंता नको; कोणी उठणार बिठणार नाही" असें रोखठोक उत्तर स्टॅनले तिला देतो आणि तेथल्या सभ्यतेच्या कल्पनेबद्दल ब्लॅन्शाला चांगली जाणीव होते.

आता यांचा हा खेळ आणखी किती वेळ चालणार याची स्टेलाला काळजी वाटते. "आम्ही उठून जाईपर्यंत तुम्ही येथे कशाला बसतां? आंत व्हा चालत्या" असें उलट स्टॅनले म्हणतो. "आता अडीच वाजले, एखादा डाव खेळून संपवा आता," असें स्टेलाने म्हणताच सगळ्यांच्या समक्ष स्टॅनले स्टेलाच्या मांडीवर एक जोराचा सपाटा मारतो. स्टेला चिडते; पण पुरुष मंडळी उलट हसतातच. तेथल्या सभ्यतेचा ब्लॅन्शाचा हा दुसरा अनुभव. त्यामुळे म्हणा किंवा नेहमीच अर्लीकडे तिला उबगल्या-सारखें होत असें म्हणून म्हणा ती याही वेळीं स्नान करूं पाहते. परंतु मिच स्नानगृहांत गेलेला असल्यामुळे तो बाहेर येईपर्यंत तिला थांबावें लागतें. तो बाहेर येऊन खेळाच्या जागेकडे जात असतांना स्टेला त्याची तिची ओळख करून देते. मिच जरासा गोंधळतो. ब्लॅन्शा त्याचें चांगलें निरीक्षण करून घेते.

त्या मंडळींत हा माणूस तिला सगळ्याहून उच्च प्रतीचा वाटतो. त्याचें लग्न झालेलें नव्हतें हीही गोष्ट स्टेलाकडून ब्लॅन्शा काढून घेते. बायका पकडीत हिंडणारा तो ब्रह्मचारी नाही हीही माहिती ती करून घेते. अर्थात नोकरीमध्ये तो स्टॅनलेपेक्षां थोड्या कमी दर्जावर होता. आणि स्टॅनलेइतकी बढतीची आशाही त्याला नव्हती. कारण, स्टेला ब्लॅन्शाचें म्हणणें जरी मान्य करते की, स्टॅनलेमध्येही विशेष प्रतिभा नव्हती, तरी पण स्टॅनलेजवळ जो एक पुढे घुसण्याचा गुण होता त्यामुळे त्याला बढती लौकर लौकर मिळत जात होती. हें बोलणें चालू असतांना ब्लॅऊझ काढून जवळजवळ उघड्या अंगाने ब्लॅन्शा पूर्ण प्रकाशांत उभी आहे हें स्टेलाच्या ध्यानांत येऊन ती ब्लॅन्शाला सावध करते, कारण स्वयंपाकघरांतून पुरुष पाहतील म्हणून.

मिचचें लक्ष वेधून घेण्यासाठी : की स्वभावच ?—

अर्थात प्रकाशांतून ब्लॅन्शाला बाजूला व्हावें लागतें. बाजूला होऊन ती बाकीचा पोशाख उतरते. तिच्या अंगावर जपानी पद्धतीचा किमोनो तेवढा शिल्लक राहतो. वास्तविक त्या मंडळीच्या सभ्यतेच्या पातळीबद्दल ब्लॅन्शाला एव्हाना चांगली कल्पना आलेली असते. तेव्हा अशा अर्धनग्न अवस्थेंत तिने त्या ठिकाणीं उभें राहणें शहाण-पणाचें नव्हतें. पण तिचा देहस्वभावच पुरुषांवर मोहिनी टाकण्याचा प्रयत्न करीत राह-ण्याचा बनला होता म्हणून म्हणा किंवा या प्रसंगीं मिचचें लक्ष तिला आपल्याकडे खास

वेधून व्यायचें होतें म्हणून म्हणा, त्याच अवस्थेंत ब्लॅन्श स्टेलाशीं बोलत आणि हसत-खिदळत उभी राहते. स्टॅनलेला हा व्यत्यय बिलकूल सहन होत नाही. मिचचें लक्ष खेळापेक्षा तिकडेच अधिक आहे हें त्याच्या ध्यानांत येतें. म्हणून तो त्या दोघींना बोलणें बंद करा म्हणून खडसावतो आणि त्याच्या त्या झिंगलेल्या अवस्थेंत त्याच्याशीं अधिक बोलणें बरें नाही म्हणून स्टेला " मी पटकन मोरींत आधी जाऊन येतें " असें म्हणून स्नानगृहांत जाते.

ब्लॅन्शला हें हवेंच होतें. ती पुन्हा प्रकाशांत येऊन उभी राहते. मिचचें लक्ष खेळांत लागत नाही. " माझीं पानें वाटा " असें म्हणून तो आंत जाऊं पाहतो. असें काय झालें आहे याला, असें मिचचे जोडीदार म्हणतात. तेव्हा, " त्याचें लक्ष लागलें आहे त्या पडद्याच्या आंत " असें खवचटपणाने परंतु खरें बोलून स्टॅनले पडदा संपूर्णपणे ओढून घेतो आणि मिचला खेळायला बैस म्हणून फर्मावतो. परंतु तरीही मिच पडद्याच्या आंत जातोच.

तेथे त्याचें आणि ब्लॅन्शचें संभाषण सुरू होतें. आंत त्या मंडळीची दारूची मजलस चालू असल्याचा ब्लॅन्शचा आरोप. आम्ही फक्त बिअर घेत होतों असा मिचचा खुलासा. आपल्याला बिअर मुळीच आवडत नाही, असें म्हणून ब्लॅन्श मिचला त्याच्या सिगारेटची जात विचारते. त्याच्या चांदीच्या सिगारेटच्या डबीचें ती कौतुक करते. त्या डबीवर

" आणि परमेश्वराची तशी इच्छा असेल तर
मरणोत्तरच मी तुमच्यावर अधिक प्रेम करीन "

अशा अर्थाच्या मिसेस ब्राउनिंगच्या एका सुनीतांतील ओळी कोरलेल्या होत्या. त्याच्यावर प्रेम करणाऱ्या एका निःष्पाप आणि प्रेमळ मुलीने मरतेसमयी ती भेट मिचला दिलेली होती. मिसेस ब्राडनिंगच्या काव्याशीं त्या मुलीचा, मिचचा आणि स्वतः ब्लॅन्शचाही परिचय; यामधून मिच आणि ब्लॅन्श यांच्यामध्ये एक जिव्हाळ्याचा भाव निर्माण होतो.

दुःखी माणसेंच अधिक निष्ठावंत असतात —

या अनुषंगाने ब्लॅन्शच्या खिन्न मनोवृत्तींतून जीवनविषयक एक महत्त्वाचें तत्त्व बाहेर पडतें आणि त्यामुळे आपल्याला ब्लॅन्शबद्दल अधिक जिव्हाळा निर्माण होतो.

" दुःखी माणसेंच अधिक निष्ठावान असतात; दुःखांतूनच निष्ठावंतपणा जन्माला येतो. " असें Our Sincerest laughter with some pain is frought या शेलीच्या ओळींचें स्मरण करून देणारें तत्त्व ब्लॅन्श प्रतिपादन करते. " ज्याला दुःखाचा अनुभव नाही तो मनुष्य अगदीच पोकळ - उथळ असें मी म्हणेन. " असें ती म्हणते. पण आपली जीभ जड झालेली त्याच्या नजरेस येणार हें ध्यानीं येऊन ती पुढे बोलते " काय करणार ? सिनेमा लौकर संपेना; तुमचा खेळ चालू, तेव्हा घरीं यायची सोय

नाही. म्हणून आम्ही उपहारगृहांत गेलों. तेथें दारू. मी एक ग्लासाहून कधी अधिक घेत नाही. दोन म्हणजे अगदी हद्द झाली. पण आज तीन झालीं; तेव्हा मग काय विचारतां–" असें म्हणून आपली झिंगलेली अवस्था ती हसून गोड करते.

मिचला मोहविण्याचा यत्न —

स्टॅनले मिचला हाका मारीतच असतो. मिच ब्लॅन्शशीं बोलत राहतो. बोलतां-बोलतां स्टेला आपल्यापेक्षा मोठी आहे, सुमारे वर्षाने असें ब्लॅन्श त्याला सांगते. तिने दिव्यावर बांधायला एक कागदी शेड आणलेली असते ती दिव्यावर बांधायला मिचला ती सांगते. कारण भडक प्रकाशांत बसणें तिला आवडत नाही. त्याचप्रमाणे उद्धटपणाने बोलणें किंवा ग्राम्य वागणूक यांचाही आपल्याला तिटकारा आहे असेंही उपमेच्या आश्रयाने ती ध्वनित करते. त्यावर "मग आम्ही मंडळी म्हणजे तुम्हांला एक भलतेंच हुच्च टोळकें वाटत असूं" असें जेव्हा मिच म्हणतो त्या वेळी "परि-स्थितीप्रमाणे वागायला येते मला" असें जरी ब्लॅन्शनें उत्तर दिलें तरी मिचला तिच्या अभिरुचीचा चांगला प्रत्यय येतो.

ब्लॅन्श पुढे बोलत राहते. स्टेलाला बरें नव्हतें म्हणून चार दिवस आपण इकडे आलों. शाळेंत शिकविण्याचा आपला उद्योग; विद्यार्थ्यांना उच्चभ्रू कवींचीं काव्यें कशीं नको असतात; वसंत ऋतूंत प्रेमाचा अर्थ त्यांना उमगूं लागतो, तेव्हां त्यांचें जीवन किती रमणीय वाटतें, याबद्दलचा अनुभव ती त्याला सांगते.

दारूच्या नशेंत स्टॅनले स्टेलाला मारतो —

एवढ्यांत स्टेला स्नानगृहांतून बाहेर येते. त्याबरोबर रेडिओ सुरू करून ब्लॅन्श स्नानगृहांत जाते. वास्तविक बाहेरून घरीं येतांच तिने असाच रेडिओ सुरू केला होता आणि स्टॅनलेने तावातावाने येऊन तो बंद केला होता. तेव्हा पुन्हा आता तिने तो सुरू करायला नको होता. कारण त्यामुळे डोकें फिरून स्टॅनले आंत जातो आणि आपला लहनगा शुभ्र रेडिओ टेबलावरून धसकन उचलून खिडकीबाहेर फेकून देतो. त्याचा तो झिंगलेला अवतार पाहून स्टेला बाकीच्यांना निघून जायला सांगते. ब्लॅन्शला सुद्धा स्टॅनले कांहीतरी विपरीत करणार अशी धास्ती वाटते. स्टॅनले स्टेलाच्या अंगावर धावून जातो. मित्र त्याला थोपवूं पाहतात, पण त्यांना शिवी देऊन तो पुढें येऊं देत नाही. स्टेला त्याच्यापुढून दूर होऊन अंधारांत जाते. तोही तिच्यामागे जाऊन दिसेनासा होतो. चांगलाच मोठा गुद्दा मारल्याचा आवाज येतो. स्टेला मोठ्याने रडते. ब्लॅन्शही किंचाळत स्वयंपाकघरांत जाते. मित्र पुढे धावतात. झोंबाझोंबी झाल्याचें ऐकूं येतें. कांहीतरी धडपडतें.

"बहीण गर्भार आहे हो माझी!" ब्लॅन्श किंचाळते.

"खरेंच, ही भयंकर गोष्ट आहे" स्वस्थ पाहत राहिलेला मिच उत्तरतो.

"हा शुद्ध वेडेपणा – वेड आहे हें" – ब्लॅन्श.

"त्याला इकडे घेऊन या" – इति मिच.

स्टेलाला या स्थितींत घरांत एक क्षणभर राहूं नयेसें वाटतें. ब्लॅन्श गडबडींत तिचे थोडे कपडे गोळा करते आणि तिला आधार देऊन बाहेर घेऊन जाते व वरती यूनिसच्या बिऱ्हाडांत तिला नेते.

इकडे मित्रमंडळी स्टॅनलेला पकडून स्नानगृहांत खेचून नेतात आणि त्याच्या डोक्यावर पाण्याचा झोत सोडतात व आपण तेथून निघून जातात. गार पाण्याखाली बराच वेळ राहिल्यावर स्टॅनले जरा सावध होतो. बायको घरांतून गेल्याची जाणीव आता त्याला होते. फोनवरून तो यूनिसला स्टेलाला खाली पाठविण्याबद्दल विनवितो, धमकावतो. "आधी मारायचें आणि मग या अशा नाकदुऱ्या काढायच्या! कांही नाही येणार स्टेला" असें यूनिस म्हणते. त्याने स्टॅनलेचा धीर सुटतो. दीन होऊन तो स्टेलाच्या नांवाने हाका मारीत सुटतो. रस्त्यावर जाऊन उभा राहून स्टेऽऽला असा हंबरडा फोडतो.

शेवटी स्टेला खाली येते. ती दोघे एकमेकाकडे कांही वेळ टवकारून पाहतात. स्टॅनले गुडघे टेकून बसून आपलें डोकें पुढे आलेल्या तिच्या पोटावर ढोसळतो. पाण्याने डोळे डबडबून स्टेला त्याला हातांनी धरून उठवते आणि अंधारांत दार उघडून तीं दोघें स्वतःच्या बिऱ्हाडांत जातात.

ब्लॅन्श खालीं येऊन बहिणीच्या दाराशीं उभी राहते. आश्चर्यमूढ होऊन तिने आपला श्वास निरोधून धरलेला असतो. तशीच ती रस्त्यावर धावते; कुठेतरी आसरा ती शोधीत असते.

संसारोऽयमतीव विचित्रः --

हा आसरा त्या मनःस्थितींत तिला मिचकडून मिळतो. पलीकडून तिच्याजवळ येऊन तो तिला शांत व्हायला सांगतो. झालें हें बरें झालें नसलें तरी त्याबद्दल इतकें विशेष मानायचें कारण नाही, अशी मिच तिची समजावणी करतो. पण त्या मारामारीच्या प्रकाराने ब्लॅन्शचें चित्त बेभान होतें. मिच तिला तेथेच बसून सिगारेट ओढायला सांगतो. अजून तिच्या अंगावर फक्त किमोनोच होता. परंतु त्याबद्दलही या वस्तींत विशेष फिकीर करण्याचें कारण नाही, असा भरंवसा मिच तिला देतो. पुन्हा त्याची ती सुंदर चांदीची सिगारेटची डबी पाहून ब्लॅन्श तिचें कौतुक करते. तो डबीवरील कोरलेल्या मजकुराची आठवण देतो. "यां चिंतयामि"चाच हा प्रकार. ब्लॅन्शला खोलींत जें घडायला पाहिजे होतें तें अनपेक्षितपणें इथे बाहेर घडतें. त्या अर्धनग्न अवस्थेंत एकाट्या मिचबरोबर थोडा वेळ तिला मिळाला. परंतु मिचचें चित्त आपल्या मृत प्रेयसीकडे त्याही प्रसंगांत गुंतलें होतें. म्हणून ब्लॅन्श उद्गारते "संसारांत – खरेंच या संसारांत सगळा मोठा गोंधळ आहे हेंच खरें!"

विचाऱ्या मिचला तिचा ध्वन्यर्थ कळत नाही. त्याला वाटतें ब्लॅन्श त्याच्या मृत प्रेयसीबद्दलच्या खेदानेंच असें बोलते आहे. म्हणून त्याचा घसा दाटून येतो.

अखेर या प्रसंगांत तुम्हीं मला एवढा धीर दिलात म्हणून मी तुमची फार आभारी आहें असें कोरडेपणाने ब्लॅन्शला म्हणावें लागतें.

"संसारोऽयमतीव विचित्रः—" असें शंकराचार्यांनी म्हटलेंच आहे नव्हे का?

चवथ्या प्रवेशाची वेळ दुसऱ्या दिवशींच सकाळची आहे. स्टेला शयनघरांत अजून अंथरुणांतच आहे. अफीव्राजाच्या चेहऱ्यावर असावी तशा प्रकारची शांतता तिच्या चेहऱ्यावर आहे. खोलींत रात्रीचा अस्ताव्यस्तपणा तसाच आहे.

अशा स्थितींत ब्लॅन्श दारावाहेर येते. रात्र तिने बाहेर आणि झोपेशिवायच काढलेली असते. आंत येऊन ती स्टेलाच्या शेजारीं, जणू प्रेमळपणाच्या झटक्यांत अंग झोकून देतें.

स्टेलाला तिच्या या वर्तनाचा अर्थच समजत नाही. स्टॅनले बाहेर गेला आहे आणि लौकर परत यायचा संभव नाही याची खात्री करून घेऊन मग ब्लॅन्श बोलण्याचा प्रयत्न करते. परंतु रात्रीच्या त्या प्रसंगाने तिच्या हृदयाची जी दाणादाण उडाली होती तिचे परिणाम अजून कायम होते. त्या सर्व प्रसंगानंतर स्टेलाला आपल्या नवऱ्या-सोबत निजवलें कसें याबद्दल ती चकित झाली होती. त्याबद्दलच गडबड आणि बडबड ब्लॅन्शची चाललेली पाहून स्टेला तिला म्हणते, "तुझा स्वभाव धांदल्या आहे हें मला माहीत आहे. पण या प्रकरणाबद्दल तूं जो हा एवढा गोंधळ करते आहेस तसें त्यांत कांही नाही. हे पुरुष दारू प्यायले आणि पोकर खेळत असले म्हणजे काय करतील याचा नेम नाही. दारूचें जणू कोठार फुटावें तसें त्यांचें होतें. त्या वेळीं स्टॅनलेला कांही भान नव्हतें. पण मागून कसा कोकरासारखा दीन झाला होता तो. शिवाय ही अशी नासधूस करण्याचा त्याचा स्वभावच आहे. लग्नाच्या पहिल्या रात्रीं त्याने सगळे दिवे माझ्या स्लिपरने फोडून टाकले होते."

स्टेलाला स्वतःच्या परिस्थितीचा उबग नाहीच—

स्टेलाला या प्रकाराचें विशेष कांहीच वाटूं नये याचें तर ब्लॅन्शला जास्तच आश्चर्य वाटतें. स्टेला हसतेच आहे हें पाहून ब्लॅन्शला कांही सुचत नाही. वस्तुस्थितीशीं स्टेला योग्य मुकाबला करीत नाही याबद्दल तिला संताप येतो. त्यावर ही वस्तुस्थिति म्हणजे तरी काय? असा संथ प्रश्न स्टेला तिला करते.

"तुझें लग्न एका वेड्या माणसाशीं झालें आहे ही. मी स्वतःच विचित्र परि-स्थितींत सापडलें आहे; पण तुझी स्थिति त्याहून वाईट आहे. आणि दुःखाची गोष्ट अशी की, तुला त्याची नीट कल्पनाच नाही. माझ्या परिस्थितींतून सुटायची मी धडपड तरी करतें आहें. पण तूं तर आहे त्यालाच राजी झाली आहेस. पण हें बरोबर नाही.

तूं कांही अजून वयस्कर झाली नाहीस. यांतून बाहेर पडायचा तूं प्रयत्न केला पाहिजेस.

हा एकंदर ब्लॅन्शाच्या म्हणण्याचा आशय. एका दमांत कांही हें ती बोलली नाही. मधेमधे स्टेला तिचा निषेध करीतच होती. आपल्याला ज्यांतून बाहेर पडावेंसें वाटावें असें कांही घडलेलेंच नाही. काल रात्रीं दोन पेट्या दारू या घरीं खलास झाली सकाळीं स्टॅनलेला मोठा पश्चात्ताप झाला. पण त्यांतही कांही अर्थ नाही. यांत त्याला सुख वाटतें. मला सिनेमा आणि ब्रिजचा खेळ यांत सुख वाटतें. एकमेकांच्या सवयी माणसांनी समजून चालवून घेतल्या पाहिजेत, असें उलट स्टेला प्रतिपादन करते. तेव्हा तर ब्लॅन्शचा स्वतःच्या कानावरच विश्वास बसत नाही. कुठलें हें चिनी तत्त्वज्ञान तूं शिकली आहेस, असा ती स्टेलाला दोष देते. या बाईशीं बोलण्यांत कांही अर्थ नाही असा विचार करून घर साफ करण्यासाठी स्टेला हातांत केरसुणी घेते. तेव्हा अस-ल्या माणसाच्या घरीं हें काम मी तुला करूं देणार नाही, म्हणून ब्लॅन्श तिला विरोध करते.

आपण स्वतः काम केलें नाही तर दुसरें कोण करणार ? या स्टेलाच्या प्रश्नाने हा विषय पैशाच्या अडचणीचा आहे हा विचार ब्लॅन्शच्या मनांत येतो, आणि मग तिला एकाएकी एक विचार सुचतो. शेप हंटले या नावाच्या एका खाणीच्या तेलाच्या राजाची तिला आठवण येते. त्याची आणि तिची गेल्या नाताळांतच गाठ पडली होती. पैसा पाण्यासारखा खर्च करणें त्याला सहज शक्य आहे. तेव्हा त्याला म्हटलें तर कोठल्या तरी दुकानांत किंवा कारखान्यांत तो आपली सोय लावून देईल ही ब्लॅन्शला सुचलेली मोठी नवी कल्पना ! आणि लगेच ती त्या शेप हंटलेला फोन करायला बसते. आप-ल्याला हा एक फारच रामबाण उपाय सापडला या आनंदातिशयाने ती जणू बेहोष होते. फोनसुद्धा धडपणें करण्याइतकी मनाची स्थिरता तिच्या ठिकाणीं राहत नाही. मग कागद घेऊन आधी त्यावर शेप हंटलेला जें सांगायचें तें लिहून ठेवावें म्हणून मोठ्यानेच बोलून ती लिहूं लागते,

" प्रिय शेप. मी आणि माझी बहीण अत्यंत संकटांत आहोंत. तपशील मागा-हून सांगतें. पण मीं जर कांही तुला करायला सांगितलें तर – तर – तर – "

पण काय आणि कसें सांगावें हें कांही तिला जमत नाही. मदतीची अशी सरळ सरळ याचना करणें ही मोठीच कठीण गोष्ट आहे याचा तिला प्रत्यय येतो.

पण यांतून कांहीतरी मार्ग तर काढलाच पाहिजे. म्हणून पिशवींत पैसे किती आहेत हें ब्लॅन्श पाहते; तर फक्त पासष्ट सेंट. स्टेलाला तिचा हा धांदरेपणा मुळीच मान्य नव्हता. परंतु तिच्याजवळ अगदीच पैसे नसावेत हेंही स्टेलाला बरें वाटत नाही. सकाळीच पापक्षालनार्थ म्हणून स्टॅनलेने दिलेल्या दहा डॉलरपैकी पांच ती ब्लॅन्शला देऊं करते. पण ब्लॅन्श ते घेत नाही; त्यापेक्षा रस्त्यांत मी भीक मागेन म्हणते. " पण इतके तुझे पैसे संपले तरी कसे ? " असें स्टेला विचारते त्यावर " पैसा जातो – हजार ठिकाणीं जातो. केव्हा केव्हा झोपेचें औषध घेऊन विचारचक्र बंद करावेंसें वाटतें " असें ब्लॅन्श निराशेने म्हणते.

पण स्टेलाच्या घरांत आतां तिला राहणें शक्य वाटत नव्हतें. स्टेलानेही तेथे राहूं नये – नव्हे स्टेलाला खरोखर राहावेंसें वाटत नसलें पाहिजे – असेंही ब्लॅन्शचें मत असतें. कांही तरी मोहांत सापडून स्टेलाने या माणसाला हो म्हटलें असलें पाहिजे. आता तिचें त्याच्यावर प्रेम राहिलें असणें शक्यच नाही; शिल्लक असेल ती फक्त वासना-तृप्तीची लालसा असें ब्लॅन्श स्टेलाच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करते. त्यावर,

"तूं तरी या वासना-रथाच्या ओढीपासून मुक्त आहेस का" असें स्टेला तिला चिडूनच विचारते. पण "मी जरी त्याच वासनातृप्तीच्या चक्रांत सापडून येथे आलें असलें तरी त्यांत मला सुख नाही, समाधान नाही. जेथे आपण नकोसे आहोंत, जिथे राहण्यांत मनाला शरम आहे, अशा अवस्थेंत राह्यला मला दुःख वाटतें, असें ब्लॅन्श आपलें मोठेंपण सांगूं लागते. पण या तुझ्या मोठेपणाच्या बाता पुरे झाल्या असें स्टेला तिला चिडून सांगून गप्प करते.

ब्लॅन्शची ध्येयबुद्धी आणि सत्प्रवृत्ति —

त्यावर "स्टेला, मला तुझ्याबद्दल फार फार भीति वाटते" असें तळमळून ब्लॅन्श म्हणते. याच वेळीं स्टॅनले बाहेरून परत येतो आणि यापुढचा दोघी बहिणींचा संवाद त्यांना नकळत ऐकत राहतो, ब्लॅन्श मोठ्या जोशांत येऊन स्टॅनलेच्या विरुद्ध तिला वाटणारें सर्व मोकळेपणीं बोलून घेते. "स्टॅनले हा एक अगदी सामान्य माणूस आहे. सभ्यतेचा एक अंशसुद्धा त्याच्या अंगीं नाही. अगदीच गांवढळ माणूस – नाही निव्वळ पशुवृत्तीचा. पशूप्रमाणे खाणें, पिणें, हिंडणें एवढेंच त्याला माहीत आहे. अजून मानवाच्या पायरीपर्यंत तो पोचलाच नाही. माकडाच्याच अवस्थेंत तो अजून आहे. अश्मयुगांतला एक टिकून राहिलेला नमुना! माणसाची प्रगति अजून माणसाला देवपण येण्याइतकी झाली नाही हें खरें; पण थोडी तरी प्रगति माणसाने अवश्य केली आहे. काव्य आहे, संगीत आहे; जगांत ज्ञानाचा प्रकाश थोडा तरी पडला आहे. पुष्कळांच्या चित्तांत पशुवृत्तींहून वेगळ्या नाजूक भावनांचा शिरकाव झालेला आहे. या सगळ्याची आपल्याला वाढ करायची आहे; त्याला घट्ट पकडून राह्यचें आहे. निशाण खाली होऊं द्यायचें नाही. म्हणून ताई, या पशूंच्या नादाने तूं तरी मागे पडूं नकोस!"

अशा अर्थाचें मोठें भावनेनें ओथंबलेलें भाषण ब्लॅन्श करीत असते. मानवाच्या प्रगतीवरचा तिचा विश्वास आणि मागासलेपणाबद्दलची तिची चीड या गोष्टी अगदी अंतःकरणापासूनच्या असतात. तिच्या जीवनाची जी थोडीशीच ओळख आपणाला झाली आहे त्याच्याशीं आणि पुढे जी होणार आहे त्याच्याशीं ब्लॅन्शचें हें तत्त्व प्रतिपादन सुसंगत नसलें तरी तिची ध्येयबुद्धि उच्च आणि सत्प्रवृत्तीची आहे हें निश्चित. आणि अशा या स्त्रीला हें ध्येय गाठण्याच्या मार्गावर रस्ता आक्रमण्यासाठी पुरेसा अवसर तिच्या ठिकाणच्या आत्मसंयमाच्या अभावामुळे, तिच्या हातून घडलेल्या अविचाराचें

भूत तिच्या आड आल्यामुळे, मिळूं नये याबद्दल आपणाला विशेष हळहळ वाटते.

या वेळीं स्टॅनले आंत प्रवेश करतो. ब्लॅन्श आल्याचें आपणाला ठाऊकच नाही असें सोंग करतो. मोटारदुरुस्तीच्या वेळीं स्वतःच तो मोटारखाली पडलेला होता. त्याचे कपडे त्यामुळे मळलेले असतात. तरी स्टेला त्याला घट्ट मिठी मारते आणि स्टॅनले तिच्या मस्तकावरून ब्लॅन्शाकडे पाहून विजयी मुद्रेने हास्य करतो.

ब्लॅन्शाच्या केविलवाण्या पराभवाची ही नुसती सुरुवात आहे.

मागच्या प्रवेशांत शेप हंटलेला फोन करण्याचें जमलें नाही, म्हणून ब्लॅन्श शयन-गृहांत पंख्याने वारा घेत शेप हंटलेला लिहून नुकतेंच संपविलेलें पत्र वाचीत आहे आणि स्वतःशींच हसते आहे. हसण्याचें कारण म्हणून स्टेलाला ती सांगते, "अग, माणसांच्या थापांना कांही सीमा असावी!" हे उन्हाळ्याचे दिवस मी विमानांतून इकडे तिकडे उड्या मारीत हिंडतें आहें; तेव्हा एक दिवस माझ्या विमानाचा फेरा तुझ्या डलासमध्ये केव्हा होईल त्याचा नेम नाही. आपलें सुचवून ठेवलेलें बरें, हा भाग स्टेलाला वाचून दाखवितांना ब्लॅन्शाला विशेष वाटलें नाही. परंतु पुढचा भाग वाच-तांना ती स्वतःशींच थोडी दचकते. तिने लिहिलें होतें, "माझ्या बहिणीची बहुतेक मित्रमंडळी उन्हाळ्यांत उत्तरेकडे जातात. परंतु इकडेही त्यांचीं घरें आहेत. आणि त्यामुळे मेजवान्या, चहापार्ट्या, दारूच्या मजलशी – अशी माझी मोठी धांदल आणि चैन चालली आहे."

मनोराज्यें आणि वस्तुस्थिति : केवढा फरक —

आणि तिचें दचकणें सार्थ ठरावें अशी गोष्ट लगेचच घडते. वरच्या मजल्यावरच्या पतिपत्नींत मोठें भांडण जुंपतें. बाईचा आरोप असतो की, बुवा त्या विशिष्ट हॉटेलांत जो जातो तो तेथे ती एक बया असते म्हणून. त्यावरून प्रकरण हातघाईवर येतें. ब्लॅन्शाला तर भय वाटतें की, स्टीव्हने यूनिसचा जीवच घेतला. पण दुसऱ्याच क्षणीं "पोलीस, पोलीस" म्हणून ओरडत यूनिस रस्त्याच्या वळणावर जाते. इकडे "तुझ्या बहिणीचे कांही मित्र न्यू ऑर्लीन्समध्येही राहिले आहेत" असें स्टेला म्हणते आणि त्या दोघी हसतात.

स्टीव्हला वाटत होतें की यूनिस रुसून स्टेलाकडे जाऊन बसेल. पण ती सरळ ज्या हॉटेलमध्ये नवऱ्याने जाऊं नये म्हणून भांडली होती त्याच हॉटेलांत स्वतः गेली होती.

स्टॅनलेशीं दुसरी चकमक —

इकडे स्टॅनले घरांत येऊन त्याची धामधूम सुरू होते. थोड्या वेळाने त्याला कांही तरी टोचून बोलण्याच्या उद्देशाने "तुमची रास कोणती?" असा प्रश्न ब्लॅन्श त्याला करते. आणि रास मेष म्हणजे बोकड असली पाहिजे असें म्हणतें. व आपली स्वतःची रास कन्या म्हणजे कुमारिका असल्याचें सांगते. तेव्हा मात्र स्टॅनलेची चीड

जागृत होते. शॉ नांवाचा एक माणूस "तूं लॉरेलमध्ये फ्लेमिंगो नांवाच्या एका अत्यंत दुलौंकिक असलेल्या हॉटेलांत राहत असल्याचें सांगत होता," असें तो ब्लॅन्शला बजावतो. असल्या गलिच्छ हॉटेलांत मी कधी राहत नसतें, शॉची कांहीतरी गफलत असावी, असें ब्लॅन्श म्हणते. पण "हें हॉटेल गलिच्छ आहे कशावरून" असें स्टॅनले विचारतोच. त्यावर घाणेरड्या गोष्टींची घाण फार लांबून येते असें ब्लॅन्श अलंकारिकपणें उत्तर देते. तेव्हा शॉची अशी चूक होणार नाही; त्याला पुन्हा विचारून घेतलें पाहिजे अशी साधारण धमकीच स्टॅनले तिला देतो.

ब्लॅन्शापुढील भयंकर दिव्य —

स्टॅनलेला आपली सगळी खरी हकीकत समजण्याचें साधन उपलब्ध झालेलें पाहून ब्लॅन्शला गरगरूंच लागतें. तेवढ्यांत स्टीव्हने हाक मारल्यामुळे स्टॅनले बाहेर जातो. तेव्हा त्याने स्टेलाला आपल्याविषयीं काय सांगितलेलें आहे याचा अंदाज ब्लॅन्श घेऊं लागते. तिला बोलकी करावी म्हणून, आपल्याबद्दल लॉरेलमध्ये फार बोभाटा झाला होता असें ती आपण होऊनच स्टेलाला सांगते. स्टेला चकित होते, तेव्हा घरमिळकत हातून जाऊं लागल्यापासून गेलीं दोन वर्षें आपल्याला तसें चांगलें वर्तन ठेवतां आलें नाही, असें ब्लॅन्श सांगते आणि एकदम चिडल्यासारखी होऊन "बायकांनी तरी काय करावें! मी जात्याच दुबळी; मनांची दणकट नव्हें. दुबळ्या माणसाला कठोर माणसांचा आश्रय घ्यावा लागला म्हणजे काय अवस्था होते याची तुला कल्पना नाही, स्टेला! किती मोहजाल पसरावें लागतें; कामुक सूचना कराव्या लागतात; वाह्यात वागण्याचें सोंग जरा करावें लागतें; फुलपाखरी वृत्ति पांघरावी लागते. हंसावें लागतें. क्षणिक जादुगारिणीचे चाळे करावे लागतात. आणि हें सगळें कशासाठी तर एक रात्रीचा आसरा या किमतींत कुठे मिळाला तर पाहावा म्हणून! या कारणामुळे माझें वर्तन...अगदी तितकें निर्मळ राहिलेलें नाही. आसऱ्यासाठी मी एका गळल्या घरांतून दुसऱ्या गळत्या घराकडे अशी नुसती धावत होतें. कारण माझ्याभोवती चोहोकडे तुफान—नुसतें तुफान उसळलें होतें; मी त्यांत अगदी मध्यभागीं सापडलें होतें. स्त्रियांचें अस्तित्व त्यांच्याशीं शृंगारचाळे करायला मिळाल्याशिवाय लोक, विशेषतः पुरुष मान्यच करायला तयार नसतात. आणि कुणाचें संरक्षण मिळवायचें असलें तर निदान त्याने आपलें अस्तित्व तरी मानायला हवें ना! पण आता मला मोठी मीति वाटायला लागली आहे. कारण हें असें सदा न् कदा कसें चालणार? नुसतें गरीब आणि दुर्बळ असून माणसाचें भागत नाही. त्याला आणखी सुंदर असावें लागतें. आणि माझें सौंदर्य तर मावळलें आहे."

भावनाभरांतून काव्य —

ब्लॅन्शाच्या भाषणाचा हा उतारा मुद्दाम दिला आहे. गंभीर भावनात्मक प्रसंग

उत्पन्न होतांच ब्लॅन्श किती काव्यात्मक आणि तात्त्विक खडे बोल बोलूं लागली आहे पाहा. स्वतःवर अशी दुसऱ्याची याचना करण्याची परिस्थिति ओढवून घेण्यांत कदाचित तिचा दोष असेलही. परंतु एकदा ही संरक्षणाची भीक मागण्याची पाळी आली की, किती भयंकर दिव्यांतून स्त्रीला जावें लागतें आणि मुख्य भांडवल जें सौंदर्य तें वयामुळे आणि असल्या जीवनामुळे ओसरूं लागल्यावर तिच्या डोळ्यांपुढे कसे काजवे चमकूं लागतात याचें किती भेदक चित्र ब्लॅन्शने रेखारटलेलें आहे.

परंतु स्टेलाला तिची ही बडबड भ्रांतिष्टपणाची वाटते. त्यांतलें मर्म तिला कळत नाहीं. तिची वृत्ति थोडी उल्हासित व्हावी म्हणून ब्लॅन्शला ती खास उंची मादक पेय देते; इतकें उंची पेय तिनें सहसा इतर कुणाला दिलें नसतें; त्यामुळे ब्लॅन्शचें अंतःकरण भरून येतें. स्टेलाचा हात धरून तो आपल्या ओठाशीं लावून ब्लॅन्श घोगऱ्या आणि आंत ओढणाऱ्या आवाजाने म्हणते "तूं किती किती चांगली आहेस, स्टेला. भावनामय बोललेलें तुला आवडत नाही हें मला माहीत आहे. पण माझ्या मनांत इतक्या गोष्टींची गर्दी झाली आहे की, त्या सर्व तुला सांगणें अशक्य आहे, एवढें मात्र मी तुला वचन देतें – मी इथे फार दिवस राहणार नाही, लौकरच जाईन; तुझ्या नवऱ्याने मला घराबाहेर घालवीपर्यंत कांही मी तुला चिकटून राहणार नाही.

भयभीत ब्लॅन्श—

स्टॅनलेला आपलें पूर्ववृत्त सगळें समजून येईल व मग बहिणीच्या घरींही आपल्याला आसरा राहणार नाही या कल्पनेने ब्लॅन्श इतकी भयभीत झाली होती. या भीतीचा पगडा तिच्यावर इतका भयंकर बसला होता की, तें उंची पेय ओततांना त्याचा एक थेंब ब्लॅन्शच्या पांढऱ्या शुभ्र स्कर्टवर पडतांक्षणीं ब्लॅन्श एकदम भयंकर किंचाळली. कारण, संध्याकाळीं सात वाजतां मिच भेटायला येणार यासाठी ती तयारींत होती. त्याने यायचें कबूल केलें होतें. आणि त्यांत असा हा पोशाख खराब झाला म्हणजे हा जो नवा आसरा ती शोधीत होती तोही हातचा जायचा या भीतीने तिने ती किंकाळी फोडली होती. मिचविषयी तिला आशा वाटूं लागली होती. त्याचा आदर तिला गमवायचा नव्हता. सहजासहजी आपण त्याला मिळालों असें तिला होऊं द्यायचें नव्हतें; कारण स्वस्तपणें मिळणाऱ्या स्त्रीची पुरुषांना किंमत वाटत नाही. शिवाय स्वतःच्या वयाबद्दल तिला भय वाटत होतें. तीस वर्षांच्यावर गेल्यावर पुरुषांना स्त्री तितकीशी हवीशी वाटत नाही असा तिचा कटु अनुभव होता. फसवून का होईना मिचला आपलासा करण्याचा तिचा उद्देश होता. कपडा खराब झाल्यामुळे त्यांत व्यत्यय येईल या भीतीने ब्लॅन्शने किंकाळी फोडली.

पण तिची इच्छा असेल तर मिच तिला मिळेल, लग्नाचा नवरा म्हणून मिळेल अशी स्टेला खात्री देतें, तेव्हा "तर मग माझें सगळें संकट संपेल!" असा निश्वास ब्लॅन्श सोडते.

त्याच वेळीं स्टॅनले खालून स्टीव्ह, यूनिस, स्टेला अशा हाकांचा सपाटा सुरू करतो. क्षणाभरांत तीं चौघेजण रस्त्यावर चालूं लागतात.

वासनावेड दुर्दम्य —

त्यानंतर ब्लॅन्श एकटीच घरीं असतांना असा असा एक प्रसंग घडतो की, ज्यावरून ब्लॅन्शाचें वाढतें वय आणि मावळतें सौदर्य हेच कांही तिचे शत्रू होते असें नव्हे हें उघड होतें. भूतकाळ आपल्या मानगुटीस बसलेला आहे हें सत्य तिच्या डोळ्यांपुढे डोळे वटारून दटावीत असतांनाच, वर्तमानकाळींही तिच्या वर्तनांत संयम राहत नाही. कोणी एक तरुण कसलीशी वर्गणी मागण्यासाठी स्टॅनलेच्या घरीं येतो. वर्गणी द्यायला ब्लॅन्शजवळ फुटकी कवडी नसते. घरमालक घरीं नसतो. तेव्हां तो तरुण बिचारा सरळ परत गेला असता. परंतु त्याच्याशीं श्रृंगारचाळे करण्याची दुर्दम्य ओढ ब्लॅन्शला आवरतां येत नाही. त्याला ती प्रलोभनें दाखवूं लागते, पण तो बधत नाही. शेवटीं अगदी दाराशीं तो पोचला असतांना ही त्याला रोखते आणि मला एकतरी तुझा मुका अगदी तोंडाचा घेतलाच पाहिजे, असें म्हणून त्याने हो नाही म्हणण्याची वाट न पाहतां ती त्याच्याजवळ जाऊन आपले ओठ त्याच्या ओंठावर घट्ट दाबते आणि म्हणते " हं, आतां जाऊं शकतोस तूं. तुला स्वतःजवळ ठेवून घ्यावें इतका तूं चांगला आहेस; पण मला लहान मुलांवर हात टाकायला बंदी आहे."

अशी ही वासनांच्या आहारीं जाऊन जवळजवळ वेडी झालेली स्त्री मिचसारख्या साध्या सरळ तरुणाला जाळ्यांत पकडूं पाहत होती. पण नियति कठोर आणि न्यायी आहे. मिचवर ती हा प्रसंग येऊं देणार नव्हती; जरी त्यामुळे ब्लॅन्शाचें जीवन अत्यंत दुःखी होणार होतें तरीही. आणि हें जें होणार होतें तें योग्यच होतें असें वाटण्यासाठी हा लहानसा प्रसंग नाटकाच्या या ऐन मध्यभागीं योजलेला आहे.

पांचव्या प्रवेशाच्या अखेरीस ठरल्याप्रमाणें संध्याकाळीं सात वाजतां मिच ब्लॅन्शला भेटायला येतो आणि तीं दोघें भटकायला बाहेर जातात. परत यायला त्यांना पहांटेचे दोन वाजतात. जवळजवळ रात्रभर एकत्र काढूनसुद्धा मिच किंवा ब्लॅन्श कोणीच उत्साही नाही. एकमेक एकमेकाला माझ्यामुळे तुझी रात्र व्यर्थ गेली असे अपराधी बुद्धीने सांगत आहेत.

याचा अर्थ एवढाच की, तीं दोघेंही प्रवृत्तीच्या विरुद्ध फार संयमाने वागलेलीं आहेत. आणि बाहेरच्या मोकळेपणाचा फायदा आपण चांगला घेऊं शकलों नाही अशी कांहीशी हुरहुर त्यांच्या मनांत आहे; निदान मिचच्या तरी. कारण ब्लॅन्शाची ती रात्र अगदी तिच्या योजनेनुसार पार पडली होती.

आपण फार दमलों आहोंत अशा सबबीवर घराची किल्ली आपल्या पर्समधून त्याला ती शोधून पाह्यला सांगते. आणि त्याने काढलेली किल्ली आपल्या ट्रंकेची आहे असें म्हणून," ठीकच आहे, ट्रंक आतां मला लौकरच बंद करायची आहे " असें ती मुद्दामच

आणि कांहीशा खेदाने त्याला सांगते. कारण आतां आपल्याला स्टेलाकडे अधिक राहतां येणार नाही हें ध्वनित करून त्याच्या मनांत ब्लॅन्शला उन्मेखून हुरहुर उत्पन्न करायची होती.

ब्लॅन्शची सदाचरणाची बतावणी —

मिचला कुलूप काढायला सांगून ब्लॅन्श आकाशांत ससर्षी पाहते आणि त्यांचें मोठें काव्यात्मक वर्णन करते. दार उघडल्यावर आतां मिचची घरीं जाण्याची वेळ. तेव्हा तो भीतभीतच "एक चुंबन घेऊं का? म्हणून विचारतो. प्रत्येक वेळीं त्याने यासाठी परवानगी कां विचारावी असा प्रश्न ब्लॅन्श मुद्दामच करते. त्यावर "तुला हें पसंत आहे की नाही हें कळत नाही. त्या दिवशी तलावावर आपण गेलों असतां मीं तुझें चुंबन घेतलें. पण—" असें तो सांगूं लागतो तो त्याला थांबवून ब्लॅन्श मोठा सभ्याचाराचा आव आणून त्याला म्हणते,

"चुंबनाला माझी हरकत नाही. पण तूं त्याहून जरा वेगळी लगट केलीस—तें मला तुला करूं द्यायचें नव्हतें. म्हणजे मला तें आवडलें नाही असें मुळीच नव्हे—उलट त्यामुळे मला मूठभर मांस चढल्यासारखेंच वाटलें. पण काय करणार? माझ्यासारख्या एकाकी स्थितींतल्या कुमारिकेला आपल्या भावनांना आळा घालून वागायला पाहिजे, खरें ना! नाहीतर तिचा सत्यानाश व्हायचा!"

या सगळ्या बतावणीने मिचला ब्लॅन्शबद्दल अतीव आदर वाटूं लागतो. आपल्या अनुभवांत तरी इतकी संयमी स्त्री कोणी आली नाही असें त्याला वाटतें.

योगायोग की, स्टॅनले जोडपें अजून बाहेरच होतें. नेमका याचा फायदा घेऊन ब्लॅन्श मिचला आंत घेते आणि प्रकाश जाणून मंद करते. त्याला आंतल्या खोलींत बसायला सांगते आणि इकडे दारूची बाटली शोधतें म्हणते. दारू केवळ त्याच्यासाठी शोधायची असें ती म्हणते. कारण आजचा त्यांच्या एकत्र भेटीचा दिवस मोठ्या मजेंत गेला पाहिजे.

लाजल्याचें नाटक —

दारू प्यायला बसल्यावर आग्रहाने ती त्याचा कोट काढून घेते. त्या कोटाची ती स्तुति करते. जाड कपडा आपल्याला आवडत नाही; "कारण आधीच मी हा असा जाडजूड आणि त्यांत कपडा जाड म्हणजे झालेंच" असें तो म्हणतो. पण ब्लॅन्श म्हणते "इतके कांही तुम्ही लठ्ठ नाही. अर्थात तुमचें शरीर पिळदार आणि कसलेलें आहे हें मात्र खरें." त्यावर आपण आपल्या तालीम मंडळाचे एक निष्णात सभासद आहोंत असें सांगून आपलें वजन किती असावें असें तो तिला विचारतो. पुष्कळ मोठा अंदाज म्हणून ती १८० पौंड म्हणते. परंतु खरोखर आपलें वजन २०७ पौंड आणि उंची पायांत कांही न घालता सहा फूट दीड इंच असल्याचें तो कांहीशा अभि-

मानाने सांगतो. त्यावरून ब्लॅन्शच्या वजनाचा प्रश्न निघतो. ती विचारते, "सांगा पाहूं किती असेल ?"

या वेळीं मात्र ब्लॅन्शचा बाण लागूं पडतो. मिचचा संकोचीपणा मावळून जातो आणि तिच्या वजनाचा अंदाज करतां यावा म्हणून तो तिला कमरेशीं धरून अलद उचलतो आणि म्हणतो "तूं तर पिसासारखी हलकी आहेस." तिला तो खाली ठेवतो, पण कमरेवरचा हात काढीत नाही. लाजल्याचें नाटक करून ब्लॅन्श म्हणते "सोडा की आता मला - हात काढा की." पण बायकांचा नकार होकार असतो या सिद्धांताचाच जणू आता मिचच्या अंतःकरणांत उदय होतो आणि तो ब्लॅन्शला गाढ आलिंगन देतो. ब्लॅन्श लटकाच राग पांघरून म्हणते "स्टॅनले घरीं नाही याचा फायदा तूं असा घ्यावास असें नव्हे कांही !" त्यावर मिच म्हणतो, "माझ्या हातून मर्यादा सुटली की, चापटी देत जा एक मला."

अर्थात मिच सभ्य गृहस्थ आहे. तेव्हा आपल्यावर तसा प्रसंग येणारच नाही. शिवाय आपण म्हणजे कांही अगदीच शाळामास्तरीण किंवा आजीबाई पद्धतीची स्त्री नाही. फक्त जरा संभाळून असायला पाहिजे एवढेंच; असें त्याचा संकोच वाढूं नये म्हणून ब्लॅन्श त्याला सांगते.

मिचला स्टॅनलेबद्दल सावधगिरीचा इशारा —

स्टॅनले आणि स्टीव्ह कुटुंबें बाहेर भटकायला गेलीं होतीं तसेंच आपण सर्वांनी एकदा बाहेर जावें अशी मिच कल्पना काढतो. परंतु स्टॅनलेशीं आपलें जमत नाही हें त्याच्या नजरेला मोठ्या कौशल्याने आणून "तुझें मतसुद्धा तो उगीच कांही सांगून माझ्याविषयी कलुषित करायला चुकणार नाही" अतें ब्लॅन्श मिचला आधीच सावध-गिरीच्या दृष्टीने सांगून ठेवते. खरें म्हणजे स्टॅनलेच्या घरीं राह्यला तिला नको आहे. "कारण, स्टॅनले माझा तिरस्कार करतो. त्याने तसें तुला सांगितलेंही असेल." असें ब्लॅन्श मुद्दामच म्हणते. त्याच्यामाझ्यामध्ये कांहीतरी नैसर्गिक शत्रुत्वच आहे म्हणायचें, असें आणखी पुढें म्हणून ब्लॅन्श स्तब्ध होते.

शेवटीं मिच धीर करून "विचारूं का एक?" असें म्हणून ब्लॅन्शला तिचें वय विचारतो. "कां हा प्रश्न?" असें ब्लॅन्शने विचारल्यावर "आईने हा प्रश्न काढला होता" असें तो म्हणतो. कारण ब्लॅन्श आपल्याला आवडली आहे असें त्याने आईजवळ सांगितलें होतें. "आई आता फार दिवस जगणार नाही. तिचें माझ्यावर फार फार प्रेम आहे. मला एकदा संसारांत स्थिरस्थावर झालेला पाहावा अशी तिची इच्छा आहे" असें तो घोगऱ्या आवाजांत भावनाभराने म्हणतो.

ब्लॅन्शच्या पहिल्या विफल प्रेमाची कहाणी —

त्यावर "तुझ्या ठिकाणीं दुसऱ्याविषयी निष्ठा बाळगण्याचें फार मोठें सामर्थ्य आहे.

त्यामुळेच आई गेल्यावर तुला फार एकाकी वाटेल. या एकाकीपणाचा मला फार-फार अनुभव आहे" असें म्हणून ब्लॅन्श आपल्या पहिल्या प्रेमाची कहाणी मिचला सांगते. त्या पहिल्या लग्नाच्या तरुणावर आपलें फार प्रेम होतें. पण त्याला आपल्यापासून काय हवें होतें हें आपल्याला कधीच उमगलें नाही. आणि मग एक दिवस खोलींत कोणी नाही अशा भावनेने ती खोलींत गेली तो नवरा दुसऱ्या एका पुरुषाबरोबर तिला तेथे आढळला. जणू काही झालेंच नाही असें दाखवून आम्ही बाहेर गेलों. एका ठिकाणी नाचांत मिसळलों. परंतु नाचताना न राहवून "मला तुझी किळस येते" असें आपण बोलून गेलों. त्यासरशी नाचांतून तो निघून गेला आणि क्षणांतच पिस्तुलाचा आवाज झाला. त्याने आत्महत्या केली.

अशी आपल्या पूर्वायुष्यांतील कहाणी सांगून ब्लॅन्श म्हणते, "तेव्हापासून साऱ्या जगांत माझ्यापुढे अंधार पसरून राहिला आहे."

मिचवर याचा मोठा परिणाम होतो. जवळ जाऊन तो तिला आपल्या हातांत घेतो आणि म्हणतो " तुला कुणाची तरी गरज आहे. मला कुणाची तरी गरज आहे. आपण एकमेकांची गरज भागवूं शकणार नाही का ब्लॅन्श ? — "

त्याच्याकडे ती टवकारून पाहते. मग त्याच्या मिठींत शिरते. बोलायचा प्रयत्न करते; परंतु शब्दच बाहेर फुटत नाही. थोड्या वेळाने ती उद्गारते," केव्हा केव्हा, देव आहे असा प्रत्यय येतो ! "

नाटक संपतें – किल्मिष जळून जातें —

ब्लॅन्शने सुरूवात केली होती नाटक म्हणून. परंतु आपल्या जीवनांतील प्रेमाची करुण कहाणी सांगतांना ती खरें तेंच बोलली होती. तिचें अंतःकरण ढवळून निघून त्यांतील किल्मिष जणू पार जळून नाहीसें झालें होतें. पावित्र्याचा, पवित्र आनंदाचा क्षण तिच्या जीवनांत प्राप्त झाला होता.

परंतु हा क्षण एकटा एक आणि अखेरचा ठरायचा होता. तिचा भूतकाल तिला त्याचा पुन्हा अनुभव घेऊं देणार नव्हता. तिने कडू बोलून चिडविलेला तिचा मेहुणा– त्याच्या रूपाने हें कठोर जगच म्हणा – तिला सन्मार्गावर येण्याची संधि मिळूं देणार नव्हता. यांतच तिच्या जीवनाचा, आपलें चित्त हदरून टाकणारा, मऊ करणारा करुण विपाक आहे.

याच्या पुढच्याच म्हणजे सातव्या प्रवेशांत स्टॅनलेच्या कारवाईचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. मागच्या प्रवेशांतील प्रसंग घडून आता जवळ जवळ साडेचार महिने होऊन गेलेले आहेत. या दिवशी ब्लॅन्शचा वाढदिवस आहे. म्हणून स्टेलाने मोठी जेवणाची तयारी केली आहे. केक आणल्या आहेत. फुलें आणलीं आहेत. पण हा सारा थाट ब्लॅन्शसाठी स्टेलाने करावा हें स्टॅनलेला बिलकूल मान्य नाही. बाहेर शंभर अंश उष्णता आणि या वेळी स्टॅनले म्हणतो त्याप्रमाणे "राणीसाहेब" कदत

पाण्याच्या टबमध्ये बसून सारा दुपारचा वेळ अंग थंडगार करीत आहेत आणि त्यांची बहीण त्यांना छान छान पेयें नेऊन देत आहे. याबद्दल स्टॅनलेच्या अंगाचा तिळपापड झाला आहे. आपल्याला हलका माणूस म्हणून हिणविणाऱ्या या बाईचा मुलामा काढून टाकून तिचें खरें स्वरूप त्याने पाहिलें होतें. आणि तें केव्हा एकदा बायकोला सांगावें आणि तिचा भ्रमनिरास करावा यासाठी तो उतावीळ झालेला होता.

ब्लॅन्शच्या खऱ्या स्वरूपाची उघडीक —

ब्लॅन्श किती खोट्या गोष्टी सांगत आली आहे याची सविस्तर यादीच स्टॅनले देऊं लागतो. मिचला ब्लॅन्शने भासविलें की, चुंबनाच्या पलीकडे कोणाही पुरुषांशी आपण कसला संबंध ठेवला नाही. पण तें साफ खोटें होतें. साऱ्या अमेरिकेंत अध्यक्षाची जितकी प्रसिद्धि असते तितकी प्रसिद्धि ब्लॅन्शबाईची लॉरेल गांवांत होती. पण अध्यक्षाकडे लोक आदराने पाहतात आणि ब्लॅन्शबाईकडे हीन बुद्धीने. ही खोटी गोष्ट क्रमांक एक.

त्यांची घरमिळकत, बेल रीव्ह, हातांतून निसटल्यावर ब्लॅन्श फ्लेमिंगो हॉटेलांतच राहत होती. एक दुय्यम दर्जाचें हें हॉटेल. कोणीं कसेंही येऊन तेथे वागावें; चालकांची हरकत नव्हती. पण त्यांनासुद्धा ब्लॅन्शबाईचें वागणें इतकें आक्षेपार्ह वाटलें की, त्या हॉटेलांतूनसुद्धा तिची हकालपट्टी झाली.

स्टेलाला हें सर्व खोटें वाटतें. पण स्टॅनलेची यादी अजून संपली नव्हती. ब्लॅन्शच्या लीला आता साऱ्या लॉरेलला परिचित झाल्या होत्या. पूर्वीसुद्धा एक दोन वेळांपेक्षा जास्त ती कुणाला फसवूं शकत नसे. पण आता तर कोणी तिच्या वाऱ्याला उभा राहत नाही. कारण त्या लहानशा गांवांत बोभाटा व्हायला किती उशीर लागणार?

"आणि गेल्या एक दोन वर्षांत राणीसरकारांच्या चाळ्यांनी गांव इतकें हैराण झालें की, नगराध्यक्षांनी त्यांना गांव सोडून जाण्याची सूचना केली. लॉरेलच्या पलीकडेच सैनिकांचा तळ आहे. त्या सैनिकांना तुमच्या ब्लॅन्शबाई म्हणजे आव जाव घर तुम्हारा – कुणीही यावें, टिचकी मारून जावें. ठाऊक आहे तुला?" असें स्टॅनले विचारून स्टेलाची केविलवाणी अवस्था करतो.

पण एवढ्यानेही संपलें नव्हतें. शाळेंतून तात्पुरती रजा घेऊन ती आली नव्हतीच. शाळेंतून तिला हकलून देण्यांत आलें होतें. कारण काय, तर एका सतरा वर्षें वयाच्या मिचाऱ्या पोराला तिने स्वतःच्या नादीं लावलें होते. मुलाच्या बापाला हें कळलें. त्याच्यासमक्षच शाळेंत ब्लॅन्शची हजेरी घेण्यांत आली. आणि तिला तें गांवच नुसतें नव्हे, तर तो प्रदेश सोडून पळून यावें लागलें.

या सुमारास ब्लॅंशने कोरडा टॉवेल मागितल्यावरून स्टेला तिच्याकडे जाते. त्या वेळीं स्टेलाचा चेहरा इतका पांढराफटक पडलेला असतो की, ब्लॅन्शच्याही नजरेला तें येतें. फार धकवा वाटतो आहे असें म्हणून स्टेला वेळ मारून नेण्याचा यत्न करते.

माझ्यानंतर तूंही स्नान कर म्हणजे तुला बरें वाटेल असें ब्लॅन्श तिला सुचविते. तेव्हा स्वतःवरचा ताबा सुटून स्टॅनले ओरडतो "पण तुझी ही आंघोळ संपायची आहे तरी कधी ?"

"इतका कांही मोठा वेळ नाही लागायचा. तोपर्यंत डोकें जरा शाबूत ठेवा" असें ब्लॅन्श उत्तर देते आणि स्टॅनले उलट टोला देतो, "डोकें शाबूत ठेवायची काळजी मला नाही." त्याबरोबर ब्लॅन्श स्नानगृहाचें दार धाडकन लावून घेते.

स्टॅनलेही अगदीच भावनाशून्य नव्हता ?—

अजूनही स्टेला स्टॅनलेची हकीकत खरी मानायला तयार नाही. ब्लॅन्शाच्या लग्नाचा तो तसा फार्स झाला तेव्हा ती लहान होती. तो पोरगा कविता लिहायचा. पण प्रत्यक्षांत तो अस्वाभाविक लैंगिक संबंधांत गुंतलेला आढळून आला. आधीच मुळांत ब्लॅन्श जरा अधिऱ्या स्वभावाची. या प्रकाराने त्यांत भरच पडली. तेव्हा तिच्या बाबतींत थोडें समजुतीने घेतलें पाहिजे, असें स्टेलाचें म्हणणें.

स्टेलाच्या बोलण्याने स्टॅनलेचा पारा थोडा खाली येतो. त्यालाही ब्लॅन्शाबद्दल थोडी सहानुभूति वाटलीसें भासतें. पण लहानपणची ही हकीकत घडून आता इतका काळ लोटला आहे की, तेंच तुणतुणें वाजविण्यांत कांही अर्थ नाही अशी लगेच त्याची भूमिका बदलते. परंतु तोही अगदीच भावनाशून्य मनुष्य नव्हता एवढें येथे सूचित होतें.

मिचबरोबरच्या लग्नाचें स्वप्न भंगलें !

त्यानंतर संध्याकाळच्या वाढदिवसाच्या जेवणाला आणखी कोणी येणार आहे काय, असें स्टॅनलेनें विचारल्यावरून मिच येणार असल्याचें स्टेला सांगते. पण स्टॅनले म्हणतो, "मिच येणें शक्य नाही. त्याला मीं ही सारी हकीकत सांगितली आहे. आम्ही एकमेकांचे जिगरदोस्त. त्यामुळे मिचची फसवणूक व्हावी हें मी कधी घडून देणार नाही."

पण मिच तर ब्लॅन्शाशीं लग्न करणार होता ! यायोगें स्टेलाचें तें स्वप्न रसातळाला गेलें. लग्न नाही. नोकरी नाही. तेव्हा ब्लॅन्शने आता पुढे काय करायचें हा स्टेला-पुढे भयंकर प्रश्न उभा राहतो. त्यावर स्टॅनले आपला निर्णय तिला सुनावतो,

"ती आता इथे राहूं शकत नाही. मंगळवारच्या बसने तिचें येथून कुच !" ब्लॅन्श बसने जाणें पसंत करणार नाही ही स्टेलाची तक्रार रद्द. "ब्लॅन्श जाणार. पूर्णविराम. बसने, मंगळवारीं." असा स्टॅनलेचा अखेरचा निर्णय.

इकडे स्नानगृहांत ब्लॅन्श गातच असते. तेव्हा "अहो, चंडोलपक्षी, स्नानगृहां-मधून बाहेर निघा पाहूं. याहून अधिक स्पष्टपणे सांगायला पाहिजे काय ?" असें स्टॅनले ओरडतो.

ब्लॅन्श स्नानगृहांतून अगदी ताजीतवानी होऊन आनंदाने बाहेर येते, पण बाहेरच्या हवेंत कांहीतरी विचित्र बदल झाल्याची तिला जाणीव होते. तसें ती स्टेलाला विचारते. परंतु "कुठें काय ? कांही नाही" असें जेव्हा स्टेला उत्तर देते त्या वेळीं,

"तूं साफ खोटें बोलत आहेस. कांहीतरी खास घडलें आहे" असें म्हणून ब्लॅन्श भेदरलेल्या नजरेने स्टेलाकडे रोखून पाहत राहते.

आणि थोड्याच वेळांत ब्लॅन्शचे डोळे उघडले जायचे होते. मघाच्या प्रवेशांतले नवराबायकोचें तें बोलणें झाल्यानंतर पाऊण तासाने स्टॅनले, स्टेला आणि ब्लॅन्श अशीं जेवायला बसलीं आहेत. वाढदिवसाच्या जेवणाला नुसती सुतकी कळा आलेली आहे. स्टॅनले चिडून आंतल्या आंत धुमसतो आहे. स्टेला गोंधळून गेली आहे आणि खिन्न आहे. ब्लॅन्शचा चेहरा पडलेलाच आहे; परंतु त्यावर कृत्रिम स्मित आहे. टेबलावरची चवथी जागा रिकामीच आहे.

स्टॅनलेचा राग उफाळून वर येतो --

कांहीतरी बोलणें सुरू व्हावें म्हणून ब्लॅन्शच प्रयत्न करते. आज अशी काय सारीजणेंच घुमीं झालीं आहेत, असें म्हणून स्टॅनलेला कांहीतरी गमतीदार गोष्ट सांगायला सांगते. माझ्या गोष्टी तुला आवडत नाहीत; तुझ्याइतकी उच्च, सुसंस्कृत अभिरुची आमची नाही; असें तो धुरशांतच म्हणतो. शेवटीं स्टेलाच्या म्हणण्यावरून ब्लॅन्श स्वतःच एक पोपटाची गोष्ट सांगते. पण सुरुवातीलाच "हा पोपट मि. कोवाल्स्कीपेक्षाही जास्त ग्राम्य भाषा बोलत असे" अशी कोपरखळी ती स्टॅनलेला मारतेच. तथापि स्टॅनलेचें लक्ष गोष्टीकडे नव्हतेंच. आधाशी डुकराप्रमाणे कोवाल्स्कीला खाण्याशिवाय कांहीं सुचत नाही आहे हा त्याबद्दलचा स्टेलाचा शेरा इतर वेळीं कदाचित स्टॅनलेने हसत स्वीकारला असता. पण आज तो त्या मनःस्थितींत नव्हता. त्यामुळे "काय हे तुझे हात आणि तोंड घाण झालें आहे; टेबलावर घाण किती केली आहेस. जरा हात धुवून ये आणि टेबल साफ कर" असें कांहींसें थट्टेनच स्टेला त्याला म्हणते, त्या वेळीं आतापर्यंत दाबून ठेवलेला त्याचा राग उफाळून वर येतो. आणि तो आपल्यापुढची प्लेट जमीनीवर भिरकावून देतो – आणि "हें असें मी माझें टेबल साफ करीत असतों. कोण तुम्ही मला हें सांगणार ! मी डुक्कर, पोलॅक, किळस येण्याजोगा, ग्राम्य, घाणेरडा काय ? तुझ्या बहिणीचें फारच स्तोम माजलें आहे. कोण समजतां तुम्ही दोघी बहिणी स्वतःला ? राणी ? या एथला राजा मी आहे; मालक मी आहें" असें त्वेषाने बोलून स्टॅनले आणखी प्लेट व कप खाली फेकतो आणि दाराबाहेर कमानीमध्ये जातो.

ब्लॅन्श आल्यामुळें त्या दोघांच्या सुखांत व्यत्यय ? --

आपण स्नान करीत असतांना स्टॅनलेचें स्टेलाशीं कांही तरी बोलणें झालेलें असलें

पाहिजे; मिचबद्दलच तें कांही तरी असलें पाहिजे; पण स्टेला तर कांही नाही म्हणत होती, तेव्हा आपणच मिचला विचारावें, या विचाराने ब्लॅंश त्याला फोन करूं पाहते. स्टेला तिला थांबवूं पाहते. पण ती ऐकत नाही. कोणाकडून तरी मला समजलेंच पाहिजे असें म्हणून फोन करते. पण मिच घरीं नसतो. "आपल्या फोन नंबरवर आल्याबरोबर फोन करा, फार जरूरीचें काम आहे" असा निरोप ती ठेवते.

त्याच वेळीं स्टेला कमानींत जाऊन नवऱ्याने चालविलेल्या या गोंधळाबद्दल तीव्र नापसंती आणि दुःख व्यक्त करते. आपली बायको दुःखी व्हावी याने स्टॅनले खिन्न होतो. आणि "ब्लॅन्श आल्यापासून आपल्यामध्ये ही अशी हवा निर्माण झाली आहे, ती गेल्यावर सर्व कांही ठीक होईल" असें तिचें तो समाधान करूं पाहतो.

स्टेला आंत येऊन वाढदिवसानिमित्त मेणबत्त्या पेटवूं लागते. स्टॅनलेही आंत येतो. ब्लॅन्श बाहेर येऊन कांही वेळ विचार करीत उभी राहते आणि म्हणते, "मीं त्याला बोलवायलाच नको होतें." त्यावर, "आणखी पुष्कळ गोष्टी व्हायला नको होत्या" असें स्टॅनले टणकावतो. ब्लॅन्श त्याला पोलॅक म्हणून हिणवते त्यामुळे तो खूप भडकतो. इतक्यांत टेलिफोनची घंटा वाजते. आपलाच फोन – मिचकडून – असें वाटून ब्लॅन्श उडी मारते. पण "नाही, खास माझाच फोन आहे तो" असें म्हणून स्टॅनले फोन-कडे जातो. मिचचा फोन येणें शक्य नाही याची स्टेलाला पूर्ण कल्पना असते. म्हणून ब्लॅन्शाच्या खांद्यावर हात ठेवून ती तिला मागे खेचते. स्टेलॅाच्या या वागण्याचा अर्थच ब्लॅन्शाला समजत नाही.

वाढदिवसाची क्रूर देणगी – परतीचें तिकिट —

फोन करून स्टॅनले परत येतो आणि "आज मीं तुला वाढदिवसाची एक देणगी द्यायचें ठरवलें आहे असें तो ब्लॅन्शाला म्हणतो आणि तिच्या हातीं एक पाकीट देतो. त्यांतील वस्तु पाहून ब्लॅन्श भयंकर गोंधळून जाते. "हें तर – हें तर" असें ती करूं लागते तेव्हा स्टॅनले घुम्म चेहरा करून म्हणतो,

"हो, तिकिटच आहे तें. लॉरेलला परत जाण्यासाठी, ग्रेहाऊंड (शिकारी कुत्रा) बस सर्व्हिसचें. मंगळवारचें!"

स्टेला मान वळवून मागे रेलते. ब्लॅन्श हसायचा प्रयत्न करते. साधत नाही. मग ती स्नानगृहांत धूम ठोकते.

"तूं ब्लॅन्शशीं इतकें कठोर वागायला नको होतेंस" स्टेला रागाने स्टॅनलेला दोष देते.

सरळ स्वभावाच्या ब्लॅन्शाला जगाने बिघडवलें —

"हो – ती मोठी नाजूक मनाची पडली ना!" स्टॅनले घुश्शांतच उत्तर देतो. त्यावर स्टेलाने ब्लॅंशचें केलेलें समर्थन किती करुण आणि सत्याच्या जवळ आहे. ती म्हणते,

"आहेच नाजूक ती – होती ! लहान मुलगी असतांना ब्लॅन्श कशी होती हें तुला ठाऊक नाही. तिच्याइतकें नाजूक, तिच्याइतकें सगळ्यांवर निर्भर विश्वास टाकणारें दुसरें कोणी – कोणी नव्हतें. पण तुझ्यासारख्या लोकांनी तिच्या सरळ स्वभावाचा फायदा घेतला आणि तिच्या मनाविरुद्ध तिचा स्वभाव बदलून टाकला !"

स्टॅनलेजवळ यावर उत्तर नव्हतें. बायकोला तो अधिक दुःखी करू शकत नव्हता म्हणून शर्ट चढवून तो बाहेर जाऊं लागतो. पण स्टेला त्याचा शर्ट धरून केविलवाण्या स्वराने, पण रागावून त्याला म्हणते, "जाऊं देणार नाही मी ? का तूं तिच्याशीं असें वागलास सांग ?"

या ठिकाणीं स्टेलाच्या मनांतला ब्लॅन्शाविषयीचा जिव्हाळा आपल्याही ठिकाणीं संक्रमित झाल्याशिवाय राहत नाही. आपणही ब्लॅन्शचे पक्षपाती होतों. स्टेलाच्या प्रश्नाला "मी सामान्यच मनुष्यच आहे. पण ही बया येईपर्यंत, तरीही आपण आनंदांत नव्हतों का ? ही, ही येऊन आपल्या श्रेष्ठपणाचा टेंभा मिरवूं लागली, मला माकड म्हणूं लागली; म्हणून हें सारें झालें" असें स्टॅनले आंतडें तोडून उत्तर देऊं लागतो.

मनाला बसलेल्या धक्क्यामुळे स्टेलाचें पोट थोडें वेळेच्या आधीच दुखूं लागतें. मला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये न्या असें ती एकदम ओरडते.

स्टॅनले लगेच तिच्याजवळ येऊन तिला हाताचा आधार देतो. ब्लॅन्श एक जुनें फ्रेंच गाणें गुणगुणत राहते आणि रंगभूमीवरील प्रकाश हळुहळू मंद होत जातो.

स्टेलाने ब्लॅन्शाची केलेली तरफदारी आपलें मन ब्लॅन्शाविषयीं हळवें करते. आणि तरीही स्टॅनलेचें म्हणणें खरें आहे असेंच आपलें मन मान्य करतें. करुण रसाचें रहस्य यांतच आहे काय ?

यानंतर थोड्याच वेळानंतरचा त्याच संध्याकाळचा प्रसंग यापुढच्या प्रवेशांत दाखविला आहे. स्टॅनले स्टेलाला घेऊन इस्पितळांत गेला आहे. ब्लॅन्श एकटीच बसली आहे. समोर टेबलावर दारूची बाटली व ग्लास आहे.

अशा वेळीं बाहेर मिच येतो. अंगांत कारखान्यांतले कपडे, दाढी वाढलेली असा त्याचा थाट आहे. दारावर त्याची थाप ऐकून आणि तोच आलेला आहे याची खात्री करून घेऊन थोड्या वेळाने ब्लॅन्श दार उघडते. त्यापूर्वी धांदलीधांदलीने दारूची बाटली कपाटांत लपवून ठेवते. आरशांत पाहते, कोलनवॉटर शिंपडते, पावडर लावते, मिच येतांच, "आज संध्याकाळच्या तुझ्या वर्तनानंतर खरें म्हणजे तुला मीं घरांत घ्यायला नको होतें" असें त्याला ब्लॅन्श डिवचते. परंतु तो एक शब्द न बोलतां हुम्यासारखा पाहत राहतो. तेव्हा प्रथम ब्लॅन्श त्याची चेष्टा करूं लागते. पण नंतर हें प्रकरण कांहीतरी वेगळें आहे याची तिला जाणीव होते.

मिचला खुलविण्याचा विफल प्रयत्न ——

मिच तिला पंखा बंद करायला सांगतो. त्याला ती चैन नको असते. दारू द्यायची,

पण सापडत नाही, अशी बतावणी ब्लॅन्श करते. पण "स्टॅनची दारू मला प्यायची नाही" असें मिच फुरंगटल्यासारखें करून बोलतो.

त्यावर "दारू इथे असली तरी ती स्टॅनलेचीच असली पाहिजे असें नाही" असें म्हणून ब्लॅन्श त्याला आईचें कसें आहे म्हणून विचारते. पण त्याचेंही तो धड उत्तर देत नाही. हें पाहून ब्लॅन्श म्हणते. "कांहीतरी झालें आहे खास. पण जाऊं द्या. कांही झालेंच नाही असें समजून कसलेच प्रश्न मी विचारीत नाही." आणि बाहेर पिआनोवर कर्कश गाणें चालूच असतें त्याने डोकें उठून गेल्यासारखी, गडबडून गेल्यासारखी करते. कारण "तिचा नवरा ॲलन याने आत्महत्या केली त्या वेळीं हेच सूर वाजत होते" असें म्हणून ती त्या प्रकाराची पुन्हा मिचला आठवण करून देण्याचा प्रयत्न करते. शेवटीं दुरून एक पिस्तुलाचा बार ऐकू येतो, तेव्हा ती जरा शांत होते. कारण, हा बार झाल्यावर ते वाद्याचे सूर बंद होत असत.

अजूनही मिच घुमाच असतो. त्याला बोलका करण्यासाठी, "हं, ही इथे बाटली सापडली" अशी बतावणी करून ब्लॅन्श त्याला दारू प्यायचा आग्रह करते. परंतु "स्टॅनचीच ही दारू आहे आणि ती मला घ्यायची नाही हें मीं आधीच सांगितलें आहे" असें बोलून दारू घेण्याचें मिच नाकारतो आणि पुढें म्हणतो, "स्टॅन म्हणत होता, एखाद्या काळमांजरासारखी त्याची दारू तूं गेला उन्हाळाभर सारखी ढोशीत राहिली आहेस, म्हणून."

मला तुझें खरें रूप न्याहाळायचें आहे – इति मिच —

अशा रीतीने मिचचा राग बोलका होतो आणि इतक्या खालच्या संशयाच्या पातळीवर जाणारांच्या आरोपांना मी उत्तर देत नसतें असें ब्लॅन्श फूत्कारते. तेव्हा "तुझ्या मनांत कांहीतरी निराळेंच दिसतें आहे. डोळ्यांत हें असें काय भासतें आहे तुझ्या!" असें मिच म्हणतो. इथे प्रकाश नीट नाही, म्हणून तसें वाटत असेल, असें ब्लॅन्श उत्तर देते तेव्हा "आजपर्यंत आपलें रूप प्रकाशांत मला दिसूं द्यायचेंच नाही, असा एकसारखा तूं प्रयत्न करीत आली आहेस" असा तिच्यावर आरोप करून मिच दिव्यावरील कागदाची शेड ओढून काढतो. त्याबरोबर भीतीने आ करून ब्लॅन्श ओरडते "काय चालवलें आहेस तूं हें?"

"मला तुझें रूप खरेंखुरें कसें आहे तें न्याहाळायचें आहे." मिच उत्तर देतो.

"तुझा कांही भलतासलता विचार तर नाही ना?"

"नाही. मला फक्त वस्तुसत्य पाह्यचें आहे."

"मला वस्तुसत्याची मुळीच आवड नाही."

"तें तर उघडच आहे" असें रेखून मिच म्हणतो तेव्हा ब्लॅन्श एकदम उत्साहित होऊन म्हणते, "मला काय आवडतें सांगूं? जादू (मिच हसतो) हो, हो, जादूच. ही जादू मी लोकांना द्यायचा प्रयत्न करीत असते. म्हणून गोष्टी नाहीत तशा बनवून त्यांना

मी सांगते. खऱ्या गोष्टी सांगत नाही. गोष्टी जशा खऱ्या असाव्यात असें मला वाटतें तशा त्या आहेत असें कल्पून मी सांगतें. आणि खरोखर हें जर पाप असेल तर तें करून नरकांत जायची आपली तयारी आहे – म्हणून तेवढा तो दिवा लावूं नका.''

पण मिच दिवा लावतो आणि ब्लॅन्शकडे पाहत राहतो. घाबरून जाऊन ती आपला चेहरा हातांनी झाकून घेते. आपला चेहरा उतरलेला दिसेल याची इतकी तिला धास्ती वाटते. मिच नंतर दिवा घालवतो आणि म्हणतो,

'' तुझ्या मोठ्या वयाचें मीं एवढें मानलें नसतें. पण बाकीच्या ज्या भलभलत्या नीतिवादाच्या गोष्टींचें मोठें वलय साऱ्या उन्हाळाभर पांघरून तूं वागत होतीस त्याचा मला तिटकारा वाटतो. तूं सोळा वर्षांची पोरगी नाहीस हें मला दिसत होतें. पण तूं सरळ वर्तनाची स्त्री आहेस अशी माझी मूर्खासारखी समजूत झाली होती.''

'' मी सरळ नाही हें आमच्या प्रेमळ मेहुणेबुवांनी तुला सांगितलें असलें पाहिजे. आणि तूं त्याच्यावर विश्वास ठेवलास!'' ब्लॅन्श खोचून बोलते.

उंच जाणाऱ्या पतंगाच्या शेपटीला जुन्या पत्र्याचें डबडें —

व्यापारी कीफेबरकडून आपण सगळी शहानिशा करून घेतली आहे असें मिच म्हणतो. '' कीफेबरचा माझ्यावर डोळा होता. मी त्याला बधलें नाही म्हणून तो हवें तें बोलतो. मी फ्लेमिंगो हॉटेलांत राहत नव्हतें; तर टारांटुला हॉटेलांत राहत होतें'' असें म्हणून ब्लॅन्श पुढे सांगते, '' हो; त्याच हॉटेलांत माझ्या मित्रांना मी बोलावीत असें. माझें वय उताराला लागलें होतें. कुठेही जायला मला आधार नव्हता. तुझी माझी भेट झाली. तुला कुणी जवळ हवें होतें. मलाही पण. तूं मला सज्जन दिसलास. जगाच्या या प्रचंड फत्तरामध्ये तूं एक अशी लहानशी फट वाटलास मला की, जिच्यांत मला लपून राहतां येईल. दरिद्री माणसाला फक्त एकच स्वर्ग हवा असतो; शांति – थोडीशी शांति. ती मला तुझ्यापाशी मिळेलसें मला वाटलें. पण मला वाटतें मी फार मोठी गोष्ट हवी असें म्हणत होतें; फार मोठी अपेक्षा बांधीत होतें. कीफेबर, स्टॅनले, शॉ आणि मंडळींनीं माझ्या उंच जाणाऱ्या पतंगाच्या शेपटीला एक जुनें पत्र्याचें डबडें बांधलेलें दिसतें आहे.''

किती काव्यमय आणि किती यथार्थ वर्णन आपल्या परिस्थितीचें ब्लॅन्शने केलें. आणखी पुढे ती स्वतःशींच बोलत राहिल्यासारखी बोलूं लागली. मिच कान ताठ करून ऐकत होता. '' आमच्या प्रचंड मोठ्या घरांत सोबतीला म्हाताऱ्या बायकांशिवाय कोणी राहिलें नव्हतें. कोणाजवळ द्रव्य कांहीच नव्हतें. वडिलार्जित वारसा कांही मिळाला नव्हता. मागच्या आठवणी मात्र येत होत्या; ऐषआरामांच्या, नोकरचाकरांच्या. पण नुसत्या कल्पना आणि निश्वास. सगळें सगळें आमचें गेलें होतें. मृत्यूशिवाय घरांत आमचें असें कांही राहिलें नव्हतें.

'' आणि मृत्यु नको असेल तर? तर दुसरें टोक वासना – वासनातृप्ति. आमच्या घरापलीकडे सैनिकांची छावणी असायची. रात्रीं ते सोळभोक ब्लॅन्श, ब्लॅन्श अशा

अशा मला हाका मारायचे. एकच म्हातारी घरांत आतां शिल्लक होती. ठार बहिरी. आणि मग त्या हाका ऐकून मी बाहेर जायची !"

दारिद्र्याच्या खाईंतील करुण कहाणी —

अशा रीतीने दारिद्र्याच्या खाईंत सापडून घडलेली आपली सर्व करुण कहाणी ब्लॅन्श मोठ्याने पुटपुटते. तिला आशा असावी की, याने तरी आपल्याला शांत आणि निर्मळ जीवनाची किती ओढ लागली आहे, त्यासाठी आपण एक लहानसा निर्बंध आसरा कसा शोधीत आहों, हें मिचच्या लक्षांत येईल. तिचें बोलणें संपल्यावर ती कपड्यांच्या टेबलावर वाकून उभी राहिली असतांना मिच हेतुपूर्वक उठतो आणि तिच्या-जवळ जाऊन तिच्या कमरेला हात घालून तिला आपल्या सन्मुख फिरविण्याचा प्रयत्न करतो. त्यावर ब्लॅन्श विचारते,

"काय मनांत आहे तुझ्या ?"

"जें गेल्या सारा उन्हाळाभर माझ्या हातीं लागावें म्हणून मी धडपडतों आहे तें."

असें म्हणून तिला मिठींत घेण्यासाठी मिच धडपडतो.

"तें हवें असेल तर माझ्याशीं तुला लग्न केलें पाहिजे"

"छट् ! आता यापुढे मी तुझ्याशीं लग्न करणें शक्य नाही."

"कां ?"

"आईच्या सहवासांत घरांत घेण्याच्या लायकीची तूं शुद्ध नाहीस म्हणून."

म्हणजे या अशुद्ध स्त्रीशीं वाटेल तो व्यवहार करायला मिचला हरकत नव्हती. आजपर्यंत भेटलेल्या एकूण एक पुरुषांचाच हा आणखी एक नमुना ! त्यामुळे त्याचा कमरेवरील हात हिसडून टाकून ब्लॅन्श म्हणते,

"तर मग इथून चालता हो. लौकर बाहेर जा. नाही तर मी "आग, आग" म्हणून लोक जमा करीन."

तरी मिच तिच्याकडे टक लावून पाहत उभाच राहतो. तेव्हा खिडकीशीं जाऊन ती खरोखरीच ओरडूं लागते "आग, आग."

आश्चर्याचा धक्का बसून आ वासून धडपडतच मिच बाहेर रस्त्यावर धूम ठोकतो. ब्लॅन्श मटकन गुडघ्यावर खाली पडते.

दुर्बळांचे निर्धार सिद्धीस जायचे नसतात—

परंतु दुर्बळांचे सद्वर्तनाचे निर्धार या कठोर संसारांत सिद्धीस जायचे नसतात. आपल्या आजपर्यंतच्या जीवनाचें निरीक्षण करून स्वतःची चूक ब्लॅन्श उमजली होती. यापुढे तिने मनाशीं निर्धार केला होता की, लग्नाच्या पुरुषाशिवाय यापुढे कोणाला आपला देह द्यायचा नाही. तेंच तिने कटाक्षाने मिचला सांगितलें होतें. पण आत्म-संयमाच्या अभावीं हा निर्धार पाळणें तिला किती अवघड होतें हें त्या वर्गणी मागणाऱ्या

मुलाशीं तिने जें वर्तन केलें त्यावरून आपण पाहिलेंच आहे. त्याशिवाय जगांत सारींच कांही माणसें मिचसारखीं नसतात की, जीं 'आग, आग' म्हणतांच भिऊन पळून जातील. अशा भीतीला कःपदार्थ मानणारीं आणि आपल्या सामर्थ्याच्या बळावर आपल्याला हवें त्याचा कब्जा करणारीं माणसेंही जगांत असतात. कदाचित हींच माणसें जास्त असण्याचा संभव. अशाच एका माणसाच्या घरीं दुर्दैवाने तिला आसरा घेणें भाग पडलें होतें. आणि तोच तिच्या निर्धाराचा आणि तिच्या स्वतःचाही चोळामोळा करून फेकून देणारा ठरायचा होता.

स्टेलाला इस्पितळांत पोचवून, ती बाळंत व्हायला अजून अवकाश असल्यामुळे, थोडा वेळ डोळा लागला तर पाहावें म्हणून स्टॅनले आतां घरीं आला होता; मागच्या प्रवेशांतील प्रसंगानंतर दोन तीन तासांनी. याचा अर्थ आपण व स्टॅनले अशा दोघांनाच ती रात्र तिथे काढायची आहे या कल्पनेने ब्लॅन्शच्या हृदयांत धस्सच होतें. तो येण्यापूर्वी, आपण आता जाणार या कल्पनेने तिने ट्रंक पुढे ओढून ती नीट भरायला सुरुवात केली होती. आणि मग काय एकदम लहर आली तो तिने आपले त्यांतल्या त्यांत उंची कपडे काढून ते पेहेरले होते आणि कपाळावर आपला तो नकली हिऱ्यांचा झुबकाही घातला होता.

ब्लॅन्शचीं निराशेंतलीं मनोराज्यें—

स्वाभाविकच एवढ्या थाटाचें कारण स्टॅनले विचारतोच. तेव्हा ती त्याला जवळजवळ खिजवण्यासाठी थाप ठोकून देते की, आपल्या कॉलेजमधला प्रिय मित्र, ज्याची तिची अलीकडेच नाताळांत पुन्हा भेट झाली होती आणि जो सोन्याच्या खाणींचा डलास संस्थानांतला नवकोट नारायण होता त्याची, शेप हंटले याची, ही मंडळी इस्पितळांत गेल्यावर तार आली होती; त्याच्याबरोबर कॅरिबिअन समुद्रांत खासगी जहाजावर पर्यटनासाठी त्याने तिला बोलावलें होतें. "तेव्हा या प्रसंगाला योग्य असे कांही कपडे आपल्याजवळ आहेत का? ते कसे दिसतील? हें मी पाहत होतें," ब्लॅन्श म्हणते.

स्टॅनलेला हें खरें वाटत नाही. परंतु तसें नाही असें तरी तो कसा म्हणणार? "असेल – असेल, कुठला का असेना. आपल्याला काय त्याचें" असें म्हणून स्टॅनले कपडे काढूं लागतो. ब्लॅन्श असते आंतल्या झोपायच्या खोलींत आणि स्टॅनले बाहेरच्या स्वयंपाकघरांत. कपडे कांही तो सगळेच काढणार नव्हता. म्हणून मधला पडदा सरकविण्याची ब्लॅन्शची सूचना तो मानीत नाही. नंतर तो बरोबर आणलेल्या बिअरच्या बाटलीचें बूच कसें तरी उघडतो. तसा तिच्यांतून फेस फसफसून वर येतो. बाटली डोक्यावर धरून "आऽहा! स्वर्गीतला पाऊस" म्हणून तो बडबडतो. बाहेरून येतांनाच तो पुष्कळ पिऊन आलेला आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. बिअरची बाटली ब्लॅन्शपुढे करून तो तिला ती घ्यायला सांगतो. पण ब्लॅन्श नाकारते. त्यावर तो म्हणतो, "खरें म्हणजे आज आपल्या दोघांचाही आनंदाचा दिवस आहे. तुला

तुझ्या कोट्याधीश सापडला आहे आणि मला मूल होणार आहे!"

अशा रीतीने स्टॅनले घरांत जणू धुडकूस माजवीत होता. त्यामुळे ब्लॅन्शला थोडा-सुद्धा शांतपणा, आणि स्वतःसाठी जागा व वेळ मिळत नाही. म्हणून ब्लॅन्श म्हणते "लौकरच पुन्हा एकदा मला शांतपणा आणि स्वतंत्र जागा व वेळ मिळणार या कल्पनेने मला इतका स्वर्गीय आनंद झाला आहे की, माझ्या डोळ्यांतून अश्रू येऊं पाहताहेत."

फक्त स्नेहपूर्ण सहवासाची विफल आशा —

पण त्या श्रीमंताच्या घरीं ब्लॅन्शला केवळ आपलें स्वतंत्र खासगी जीवन घालवायला कसें मिळणार याचा उमज स्टॅनलेला पडूं शकला नाही. म्हणून तो ब्लॅन्शला विचारतो, "म्हणजे तुझा मित्र तुझ्या खासगी जीवनांत हस्तक्षेप करणार नाही! तुला मोकळी सोडील?" त्यावर ब्लॅन्श जरा ठसक्यानेच्च म्हणते "तुला वाटतें आहे तशा नात्याने कांही मी माझ्या मित्राकडे जात नाही. तो पूर्ण सज्जन गृहस्थ आहे. माझ्याबद्दल त्याला आदर आहे. त्याला फक्त माझा स्नेहपूर्ण सहवास हवा आहे. खूप पैसा असला म्हणजे माणसाला असें कांही वेळा अगदी एकाकी वाटूं लागतें!"

"आपल्याला यांत कांही समजत नाही" असें जेव्हा यावर स्टॅनले म्हणतो, तेव्हा त्याच्या अडाणीपणाची कीव करून "सुसंस्कृत, कला आणि साहित्य यांचा परिचय असलेली स्त्री पुरुषाच्या जीवनांत केवढा तरी आनंद आणि भरीवपणा उत्पन्न करूं शकते, हें ब्लॅन्श त्याला समजावून देऊं लागते. "पुरुषाला या गोष्टींचा लाभ करून देण्याचें सामर्थ्य आपल्याजवळ आहे. आणि हें सामर्थ्य देऊन कधी घटत नाही; उलट वाढतेंच. तेव्हा माझें वय वाढून सौंदर्य कमी होत असलें तरी मला वाईट वाटून घ्यायचें काय कारण आहे? कलासंपन्नता हीच माझी केवढी मोठी संपत्ति आहे. पण आजपर्यंत ही संपत्ति गाढवांसमोर – डुकरांसमोर उधळण्याचा मीं यत्न केला." असें ब्लॅन्श त्याच्या-वर मात करण्यासाठी म्हणते. डुक्कर म्हटल्याबद्दल स्टॅनले गरम होतो. तेव्हा त्याला अधिकच चिडविण्यासाठी ब्लॅन्श म्हणते, "डुक्कर म्हणून मीं कांही तुझाच निर्देश नाही केला. तर तुमचे ते छोटे मित्र मिच, तेही याच जातीचे. त्यांना मीं येथून चांगलाच डच्चू दिला!"

पण या बोलण्याच्या आवेशांत ब्लॅन्श स्टॅनलेच्या तावडींत सांपडते. मिचेल आपली क्षमा मागण्यासाठी आला होता आणि आपण त्याला वाटेला लावला हें तिचें म्हणणें खोटें असतें. मिच कोठें होता आणि आहे हें स्टॅनलेला चांगलें माहीत असतें. त्यामुळे तार आली वगैरेपासून आता मिच क्षमा मागण्यासाठी आला म्हणेपर्यंतचें ब्लॅन्शचें बोलणें म्हणजे निव्वळ थापा आहेत हें त्याला उमगतें आणि मग तो तिच्यावर चांगलाच उसळतो. "बाकीच्यांच्या डोळ्यांत तूं धूळ टाकलीस म्हणून तुला काय वाटलें तूं मलाही बनवशील!" पण तूं आल्यापासून तुझें बिंग मी चांगलें जाणून आहें आणि मी तुझ्या पाळतीवर आहें. काय पण दिमाख. आमच्या घरीं येऊन अंगावर वासाचें

पाणी शिंपडून घेतलेंस; पावडरी फासल्यास; हे दीडदमडीचे कुठूनतरी भाड्याने आणलेले कपडे घातलेस; आणि झालें, तुला वाटायला लागलें की, आमचें घर म्हणजे ईजिप्त देश आणि आपण स्वतः नाईल नदीच्या देशची राणी! पण तुझा सारा नखरा मी पहिल्यापासून चांगला ओळखून आहें."

असें म्हणून स्टॅनले स्वयंपाकघरांतून शयनघरांत येऊं लागतो. ब्लॅन्शची नजर त्याच्याकडे नसते; पण भिंतीवर त्याच्या पडणाऱ्या वेड्यावांकड्या सावलीनेच ती घाबरते; आंत येऊं नका म्हणून ओरडते आणि त्याचा कांहीतरी विचित्र विचार आहे या कल्पनेने घामाघूम होते. स्टॅनले सरळ स्नानगृहांत जातो. त्यासरशी फोन उचलून ब्लॅन्श फोन करायचा प्रयत्न करते, शेप हंटलेला. तिला त्याचा पत्ता किंवा फोननंबर माहीत नाही. म्हणून ती ऑपरेटरला सांगते की, तो एवढा मोठा माणूस आहे की, कोणीही माणूस त्या भागांत विचारतांक्षणीं त्याचा पत्ता सांगेल. पण तें जमत नाही. तेव्हा आणखीच भयभीत होऊन ती वेस्टर्न यूनियनच्या कचेरीशीं बोलायला मागते. आणि तेथे शेप हंटलेला निरोप कळवायला सांगते, "मी अत्यंत भयंकर भानगडीच्या परिस्थितींत सापडलें आहें. मला मदत कर. सापळ्यांत—सापळ्यांत सापडल्या-सारखी झालें आहें मी."

पारध्याच्या जाळ्यांत अडकलेली हरिणी—

लॉरेलमधून हकालपट्टी झाल्यावर निवाऱ्याला म्हणून ती बहिणीकडे आली होती. आपल्या या धांदरट, चैनी परंतु प्रेमळ बहिणीला त्या बहिणीने आजवर चांगल्या रीतीने संभाळलें होतें. त्यासाठी आपल्या नवऱ्याचा रोषसुद्धा तिने संपादला होता. पण आज ती असहाय झाली होती. त्याचा परिणाम म्हणूनच तिचें बाळंतपण लौकर ओढवलें होतें. आणि ही भेदरलेली हरिणी आता अक्षरशः पारध्याच्या जाळ्यांत अडकली होती! तिच्या अंतर्मनाने हेरलेलें तें एक भयाण सत्य होतें.

स्टॅनले स्नानगृहांतून आपल्या पायजम्याची दोरी कशीतच बाहेर येतो आणि ब्लॅन्शकडे रोखून पाहत उभा राहतो. "जरा बाजूला व्हा. मला बाहेर जायचें आहे" असें ब्लॅन्श म्हणते तेव्हा दाराकडे एक पाउलभर सरकून तो तसाच उभा राहतो. मला तुमच्या पलीकडे जायचें आहे. तुम्ही जरा त्या तिथे उभे राहा" असें म्हणून ब्लॅन्श बोटाने जागा दाखविते. पण "कां? या इथून जायला पुष्कळ जागा आहे की" असें स्टॅनले उर्मट उत्तर देतो आणि जागचा हलत नाही.

"पण तुम्ही त्या तिथे असतांना मला जायला यायचें नाही; आणि कांही करून याक्षणीं मला बाहेर जायलाच पाहिजे" असें ब्लॅन्श केविलवाणी होऊन म्हणते. त्यावर दांत विचकीत स्टॅनले म्हणतो, "म्हणजे माझें तुला भय वाटतें? तुझ्याशीं मी अतिप्रसंग करीन असें वाटतें?" तो आणखीच दांत विचकतो आणि पुढे म्हणतो "आणि तसें पाहिलें तर तुझ्याशीं अतिप्रसंग करायला काय हरकत आहे? तशी कांही तूं अगदीच वाईट—"

स्टॅनलेचा ब्लॅन्शवर अत्याचार —

ब्लॅन्श शयनगृहांत बरीच मागच्या बाजूला सरकते. "पुढे येऊं नका; खबरदार. नाहीतर कांहीतरी भयंकर घडेल" अशी ती किंचाळते. "ही आणखी कसली माकड-चेष्टा आहे!" असें म्हणून स्टॅनले शयनगृहांत येतो. ब्लॅन्श खाली पडलेली दारूची बाटली उचलून फोडते. "जवळ आलांत तर हें फुटकें टोक तुमच्या तोंडावर फेकीन" असें ती स्टॅनलेला बजावते. "फेकशील, फेकशील; कर्मी करायची नाहीस असें म्हणून तो समोरचें टेबल धडपडवून त्याच्यावरून, "तुला जबरदस्ती हवी आहे – मग घेच ही जबरदस्ती" असें म्हणत तिच्याकडे उडी घेतो. ब्लॅन्श बाटली उगारते. पण तिचें मनगट पकडून जोराने दाबून स्टॅनले म्हणतो "सोड – सोड बाटली." ब्लॅन्श हुंदके देते. तिची प्रतिक्रियाशक्ति संपते. हातांतून बाटली खाली पडते, आणि ती स्वतः खाली गुडघ्यावर पडते. स्टॅनले तिला उचलून अंथरुणावर नेतो.

आणि अशा रीतीने ब्लॅन्शच्या सत्प्रवृत्तीचा तर चोळामोळा होतोच; परंतु आज-पर्यंत कोणा पुरुषाकडून जें कधी तिच्या बाबतींत होऊं शकलें नव्हतें तें आज होतें. एक मस्त पुरुष तिच्या मर्जीविरुद्ध, बलात्काराने तिचा उपभोग घेतो. आणि हा पुरुष दुसरा तिसरा कोणी नसून जिच्याकडे ती निवाऱ्याच्या आसऱ्यासाठी आलेली होती तिचा नवरा असतो. आणि त्यानेच आपल्या मेहुणीच्या दुर्वर्तनाचा दांडोरा पिटून तिला मिचबरोबरोबर लग्न करून शांत जीवन मिळविण्याला प्रतिबंध केला होता!"

जीविताची इतिश्री : आता फक्त पुढची व्यवस्था —

दहाव्या प्रवेशाच्या अखेरीसच वास्तविक ब्लॅन्शच्या करुण विपाकाचा कळस झाला. तिच्या जीविताची इतिश्रीच तेथे झाली. आता राहिलें काम फक्त प्रेताची पुढची व्यवस्था लावण्याचें. आणि तें काम नाटककाराने अकराव्या प्रवेशांत उरकलें आहे. तेथेही त्याने आपलें कौशल्य जणू पणाला लावलें आहे.

त्या दुर्धर प्रसंगानंतर कांही आठवडे लोटले आहेत. ब्लॅन्श अजून बहिणीच्याच घरीं आहे. आजही ती नेहमीप्रमाणे स्नानगृहांत आहे. तो तिचा चाळा चालूच आहे. स्वयंपाकघरांत पोकरची बैठक चालू आहे. खेळणारे गडी पूर्वीचेच चौघे आणि वातावरणही त्या पूर्वीच्या रात्रीसारखेंच हिरवट आणि सणसणाटी आहे.

मात्र आज ब्लॅन्शची कोठे तरी जाण्याची तयारी चाललेली आहे. तिचें सामान स्टेला बांधीत आहे. खेळणारांमध्ये मिच अस्वस्थ आहे. त्या मंडळीच्या अविरत बडबडीबद्दल तो जोराची तक्रार करतो. आज त्याला काय झालें आहे हेंच त्याच्या संवगड्यांना कळत नाही. यूनिस खाली आहे; तीही खेळणारांवर नाखूष आहे. या पुरुषांना हृदयच नाही, असा शेरा ती मारते. पण त्याचाही अर्थ ध्यानांत घेण्याच्या अवस्थेंत खेळणारे नाहींत.

यूनिस स्टेलाकडे येते. "ब्लॅन्शने कांही खाल्लें नाही. फक्त पेय घेतलें; खेडेगांवांत तिला विश्रांतीसाठी पाठवायचें आहे, असें मीं तिला सांगितलें आहे" अशी माहिती तिला स्टेला देते.

ब्लॅन्श स्नानगृहांतून येऊन माझा फोन आला तर मला सांगा म्हणते. आणि आपले विशिष्ट कपडे काढून ठेवायला सांगते.

ब्लॅन्शला आपण जेथे पाठविणार आहोंत तेथे पाठविण्यांत आपली चूक होते आहे असें स्टेलाला वाटतें. स्टॅनलेबद्दल ब्लॅन्शने जें कांही सांगितलें तें खरें असेल तर मलासुद्धा स्टॅनलेबरोबर राहणें अशक्य आहे असें ती म्हणते. पण यूनिसचा हजार मोलाचा सल्ला "कांही झालें तरी आपला संसार आपण चालू ठेवला पाहिजे" असा आहे.

ब्लॅन्श भ्रमाच्या भोवऱ्यांत —

स्नानगृहांतून बाहेर येण्यापूर्वी ब्लॅन्श मधला पडदा बंद करायला सांगते. इतकी तिला त्या मंडळीची आता धास्ती बसली आहे. बाहेर येतांच तिचा प्रश्न, फोन आला का, हा आहे. शेप हंटलेकडून फोन येणार या भ्रमांतच ती अजून आहे.

ब्लॅन्शचा आवाज येतांच मिचचे डोळे तरारतात. तो विमनस्क होतो. त्याला एक धपाटा घालून "मिच, सावध हो" असें स्टॅनले ओरडतो. त्या आवाजाने ब्लॅन्श दचकते आणि मिचचें नांव उच्चारावें तसे तिचे ओठ हलतात. आपण कुठे आहों, सभोवार काय चाललें आहे याचीही तिला नीट जाणीव नसावी. कारण, थोडा वेळ स्तब्ध राहून ती विचारते, तिकडे काय चाललें आहे?

या तिच्या आवाजाने खेळणारांमध्ये विक्षेप उत्पन्न होतो. मिच खाली मान घालतो आणि उठण्यासाठी म्हणून स्टॅनले आपली खुर्ची जरा मागे सरकावतो. पण पीटर त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला दाबतो.

पण "इथे कांहीतरी विचित्र घडलें आहे. काय घडलें आहे? कळायला पाहिजे मला" असें जेव्हा पुन्हा ब्लॅन्श बोलते तेव्हा तिला शांत करायला स्टेला आणि यूनिस यांना फार कष्ट पडतात. शेवटीं आपण बाहेर ट्रिपला जाणार आहोंत याबद्दल तिची समजूत पटते. आणि "ठीक, ठीक! बाहेर जायलाच हवें आहे मला. हें ठिकाण म्हणजे एक सापळा आहे" असें ती म्हणते.

यूनिस तिला द्राक्षें खायला देते. त्या वेळीं ब्लॅन्शची शहरी सवय डोकें वर काढते. "धुतलीं आहेत का हीं?" असा ती प्रश्न करते. तेवढ्यांत चर्चमधली घंटा ऐकूं येते. त्यावर या घंटा तेवढ्या जगांत स्वच्छ आहेत, असें ब्लॅन्श म्हणते. इतकी तिला सगळीकडे घाण झाल्याची जाणीव खोल भिडली आहे. तिच्या डोक्यांत मरण्याचे विचार थैमान घालीत आहेत. आपण समुद्रावरच मरणार आणि खलाशी पांढऱ्या पिशवींत शिवून आपल्याला अलगद पाण्यांत टाकून देणार अशीं चित्रें तिच्या डोळ्यापुढे नाचताहेत.

इतक्यांत ज्यांच्याबरोबर ब्लॅन्शला पाठवायची होती तीं माणसें येतात. ब्लॅन्शला कुणी तरी भेटायला आलें आहे असें जेव्हा यूनिस सांगते तेव्हा "डलासहून माझ्यासाठी येणार होते तेच का?" असें ब्लॅन्श विचारते. यूनिस हो म्हणते. तेव्हा "आलेंच मी" म्हणून बाहेर जायला ब्लॅन्श उत्सुक होते. आपलें सौंदर्यप्रसाधनाचें सर्व साहित्य नीट बघून घेतलें आहे की नाही याबद्दल ती काळजी व्यक्त करते. बाहेर जातांना तिचा सर्वांत काळजीचा प्रश्न विचारायला आताही ती विसरत नाही : "कशी दिसते आता मी?"

जातांना त्या स्वयंपाकाच्या खोलींतून जावें लागणार म्हणून ती दचकते. स्टेला बरोबर आहे याने तिला जरा विश्वास वाटतो. जातांना तिच्या सवयीचें वाक्य तिच्या तोंडून बाहेर पडतेच --

"उठायला नको. मी चटदिशी जातेंच बाहेर."

पण बाहेर गेल्यावर ब्लॅन्शला कोणीं वेगळींच माणसें दिसतात. तेथे आलेला असतो एक डॉक्टर आणि एक त्याची मदतनीस. हीं माणसें सरकारी संस्थेंतील असतात. नाटककाराने प्रत्यक्षांत नांव त्या संस्थेचें सांगितलेलें नाही. पण वेड्याच्या इस्पितळांत पाठविण्याची ही जय्यत तयारी आहे हें त्या बनावावरून त्याने पुरेसें व्यक्त केलें आहे.

या माणसांची ब्लॅन्श वाट पाहत नव्हती! —

डॉक्टर आणि मदतनीसबाई यांचे चेहरे अगदी निर्विकार आहेत. डॉक्टर ब्लॅन्शला "कसें काय?" म्हणून विचारतो. परंतु "तुम्हांला मला भेटायचें नव्हतें" असें म्हणून ब्लॅन्श घराच्या पायऱ्या धापा टाकीत वर चढूं लागते; स्टेलाशीं कुजबुजते, "हा माणूस कांही शेप हंटले नाही."

स्टॅनलेखेरीज सर्वच माणसें स्तब्ध होतात. तो तेवढा पत्ते पिशीत असतो. ब्लॅन्श घरांत पाऊल टाकते. स्टेला डोळे मिटून घेते आणि हाताच्या घट्ट मुठी वळते. यूनिस तिच्या कमरेभोवती हात घालून तिला वरच्या मजल्यावर स्वतःच्या बिऱ्हाडाकडे नेऊं लागते. ब्लॅन्श दारांतून आंत जाऊन उभी राहते. मिच टेबलावर आपल्या हातांकडे दृष्टि लावून मान खाली घालून असतो. बाकीचेजण उभे राहून ब्लॅन्शकडे टक लावून पाहत असतात.

"तुझें कांही तरी राहिलें आहे काय?" स्टॅनले विचारतो.

"हो-हो-कांहीतरी विसरलंय्" असें किंचाळत्या स्वराने म्हणून ब्लॅन्श आंतल्या खोलींत धाव घेते. आणि खुर्चींची पाठ पकडून उभी राहते.

"डॉक्टर, तुम्ही आंत जा" स्टॅनले सांगतो. पण डॉक्टर मदतनीस बाईला आंत जाऊन ब्लॅन्शला घेऊन यायला सांगतात.

ती बाई आंत जाते. कांहीतरी विसरल्याचें ब्लॅन्श म्हणतच असते. मदतनीस बाईला ती भिते आणि मागे मागे जाते. "कोण तुम्ही? तुमची माझी ओळख नाही;

कां माझ्याकडे आलां तुम्ही ? मला कोणी जवळ नको आहे – कृपा करून मला एकटीला राहूं द्या –" असें ती भयभीतपणें म्हणत असते.

सुटकेचा शेवटचा प्रयत्न—

" असें काय बरें " असें मदतनीस बाई म्हणते आणि त्याच वाक्याचे प्रतिध्वनि जणू चोहोकडून उमटतात. स्टॅनलेचा तोल आता सुटतो. " कांही कांही हिचें इथे राहिलेलें नाही. ढोंग आहे सगळें " असें म्हणून दिव्यावरचें तिने आणलेलें कागदी वेष्टण हिसकून काढून तो तिच्याकडे फेकतो आणि " हवें असलें तर हें पण घेऊन जा " म्हणून खेकसतो. बाई ब्लॅन्शच्याजवळ जाते. किंकाळी फोडून ब्लॅन्श तिच्यापासून पळून जाऊं पाहते. तिची किंकाळी ऐकून स्टेला कमानींत धावते. यूनिस तिला घट्ट धरून ठेवते. " नका हो, नका हो, असें कांही नका हो करूं बिचारीला ! खरेंच काय करताहेत हे लोक तिला ? " असें स्टेला ओरडत राहते. " देवा, देवा काय हें माझ्या बहिणीचें केलें " असें म्हणून ती स्फुंदूं लागते.

पण स्टॅनलेचा निर्धार कायम असतो. तो म्हणतो, " डॉक्टर तुम्हांलाच आंत जाऊन हें काम केलें पाहिजे. " जें नको तें डॉक्टरच्या कपाळी आलेलें असतें.

एकट्या मिचची मात्र या सगळ्या प्रकाराने आंतडीं गोळा होतात. बेभान होऊन स्टॅनलेला तो म्हणतो, " तुझ्या, तुझ्यामुळे, जरूर नाही त्या गोष्टींत गाढवासारखें नाक खुपसण्याच्या तुझ्या मूर्खपणामुळे हें सगळें होत आहे ! " पण " बडबड बंद कर " म्हणून स्टॅनले त्याला बाजूला लोटतो. " खून करीन मी तुझा ! " असें म्हणून त्याच्या अंगावर धावून जाऊन मिच त्याला ठोसा देतो. बाकीचे मिचला धरून मागे खेचतात. तो टेबलाशीं गळून पडतो आणि हुंदके देऊं लागतो.

ब्लॅन्शने पळून जाऊं नये. म्हणून बाईने एवढ्यांत तिला घट्ट पकडलेलें असतें. ब्लॅन्श तिला नखाने ओचकारे काढते; बकरीसारखी ओरडते आणि गुडघे टेकून जमिनीला घट्ट चिकटल्यासारखी बसते.

परकी माणसाच्या दयेवरच जगलेली !—

शेवटीं जॅकेट वापरायचें का ? असें बाई विचारते. परंतु डॉक्टरला दया येते. तो आपली हॅट काढून ठेवतो. त्याच्या चेहऱ्यावर दयेचा प्रकाश स्पष्ट दिसूं लागतो. ब्लॅन्शजवळ जाऊन तो तिला अत्यंत भावनावेगाने हाक मारतो. " या बाईला मला सोडायला सांगा " ब्लॅन्श म्हणते. त्याच्या सांगण्यावरुन बाई दूर होते. डॉक्टर अत्यंत नाजूकपणाने ब्लॅन्शला हाताला धरून उठवतो आणि पडद्याच्या बाहेर आणतो. ब्लॅन्श त्याचा हात घट्ट धरून ठेवून म्हणते,

" तुम्ही कोणीही असा – परकी माणसांच्या दयेवरच आजपर्यंत अवलंबून राहून मी जगलें आहें. "

डॉक्टर उभे असणाऱ्या खेळणारांच्या अंगावरून तिला घेऊन जातो. आंधळ्याने दुसऱ्याचा हात धरून जावें त्याप्रमाणे ब्लॅन्श जाते. स्टेला "ब्लॅन्श, ब्लॅन्श" म्हणून स्फुंदून हाका मारीत राहते. मागे वळून न पाहतां ब्लॅन्श डॉक्टरबरोबर निघून जाते. यूनिस झटकन वरून आपल्या घरांतून स्टेलाचें बाळ स्टेलाच्या हातीं आणून देते. स्टॅनले-शिवाय बाकीचे गडी निघून जातात. स्टॅनले कमानींत जाऊन बायको आपल्याला काय म्हणेल याबद्दल शंकित होऊन तिला हाक मारतो, "स्टेला!" स्टेला अमर्याद अतिरेकाने हुंदके देऊं लागते. वहीण गेल्यावर आता बेहोष होऊन मनमुराद रडायला ती मोकळी झालेली असते. स्टॅनले "लाडके, लाडके" म्हणून तिचें सांत्वन करूं पाहतो.

आणि येथे हें करुण नाटक संपतें.

दयेच्या अभावीं वठलेली वेल!—

अशी ही करुण कहाणी ज्या ब्लॅन्शची आहे, जिच्याबद्दल आपल्याला जिव्हाळा वाटावा, हळहळ वाटावी, असें घडायला नको होतें, निदान घडलें नसतें तर बरें झालें असतें असें वाटावें, अशी नाटककाराची इच्छा आहे, आणि तसा परिणाम आपल्या अंतःकरणावर झालेला आपण अनुभवतोंही, ती ब्लॅन्श एक सामान्य स्त्री आहे. ती कलासक्त आहे, साहित्यप्रेमी आहे, सुंदर आहे, चांगल्या कुटुंबांतली आहे; हें सगळें खरें आहे. पण यापैकी कोणत्याही गुणांत असामान्यत्व किंवा अलौकिकत्व असें तिच्या ठिकाणीं कांही नाही. आणि त्याची आपल्याला गरजही वाटत नाही. तिच्यांत जें नाही आणि जें नसल्यामुळे तिचा नाश झाला त्यावरच आपलें चित्त नाटककाराने खिळविलें आहे; तेंच त्याचें साध्य होतें आणि तें त्याने मोठ्या कौशल्याने साधलें आहे. या एका सामान्य परंतु व्यवहार ओळखूं न शकलेल्या, वासनाधीन झालेल्या, आत्मसंयमाची जोपासना न केलेल्या तरुण स्त्रीचें जीवनसुद्धा इतकें भकास, भीषण आणि दया जागृत करणारें वाटूं शकतें, हें नाटकाराच्या प्रतिभेचें सामर्थ्य विशेष लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहत नाही. एवढेंच नव्हे तर १९५० सालांतल्या या नाटककाराची नायिकाही भावनेचा भर प्राप्त झाला की, सहज सुंदर काव्य बोलूं लागते आणि उच्च जीवनसत्येंही तिच्या तोंडून ओघळूं लागतात हें या नाटकाचें वैशिष्ट्य तर विशेषच्च जाणवतें.

स्वभावगत करुण विपाकाचा हा एक सुंदर नमुना आहे हें तर खरेंच. परंतु याही स्वभावाची परिस्थितिजन्य पार्श्वभूमि स्टेलाकडून आणि ब्लॅन्शकडूनही नाटककाराने आपल्याला सांगितली आहे. शेवटच्या प्रवेशांत डॉक्टरने दाखविलेली दया ब्लॅन्शला संसारांत कुठेच अन्यत्र मिळाली नाही हें नाटककाराने किती नाजूकपणें ध्वनित केलें आहे. त्यामुळें कठोर संसारांतील विरोधी परिस्थिति ही सुद्धा ब्लॅन्शच्या करुण विपाकाचें एक मोठेंच कारण होतें, हेंही नाटककार ध्वनित करतो आहे. किंबहुना त्यामुळेच्च तर ब्लॅन्शबद्दल आपल्याला अधिक जिव्हाळा वाटतो.

प्रकरण सोळावें

खाडिलकरांचे चार नायक

मराठीच्या नाट्यसंसारांत खाडिलकरांचें स्थान अजूनही पहिलें आहे हें सहसा कोणी नाकारणार नाही. त्यांच्यापेक्षा एकेक नाटक विशेष सरस लिहिणारे नाटककार मराठींत नाहींत असें नाही. परंतु हेतुगर्भता, रेखीव आणि श्रोत्यांच्या मनाची पकड घेणारी भाषा, कसदार स्वभावरेखन आणि नाट्यतंत्र, या बाबतींत भिन्न प्रकारचे विषय हाताळीत असतांही सारखीच आणि अविच्छिन्न प्रभुता त्यांच्याइतकी इतर नाटककारांनी दाखविलेली वाही.

अशा खाडिलकरांच्या चार नाटकांतील नायकांबद्दल या प्रकरणांत चर्चा करावयाची आहे. कीचकवध, भाऊबंदकी, कांचनगडची मोहना आणि सवाईमाधरावाचा मृत्यु हीं तीं चार नाटकें. त्यांच्या लेखनकालाचा क्रम याहून निराळा आहे. परंतु चर्चेच्या चढत्या साधनेच्या दृष्टीने वर सांगितलेला क्रम मुद्दाम पतकरला आहे.

१ : कीचक

कीचकवध नाटकाच्या पहिल्या अंकांतील पहिला प्रवेश बराच मोठा आहे. परंतु त्यामध्ये प्रामुख्याने व्यक्तींची ओळख करून देण्याचेंच कार्य साधलें आहे. अगदी पहिली ओळख सैरन्ध्रीची आहे. नाटककाराने कांही हीच द्रौपदी असें स्पष्टपणें सांगितलें नाही. परंतु " दुसऱ्याला आरती ओवाळायची आणि दृष्ट काढायची हीं कामें मला आवडत नाहीत" हें म्हणणारी आणि इतर दासी ज्याच्यावरून आपला देह ओवाळून टाकण्यासाठी झुरत आहेत त्या कीचकाच्या सेवेंत राह्यला ही सैरन्ध्री राहायला तयार नाही, ही तिची ओळख, भारतीय पुराणकथा माहीत नसणाऱ्या श्रोत्यालाही या स्त्रीची योग्यता दासीहून श्रेष्ठ आहे एवढें सूचित करायला पुरेशी आहे.

भावी अनर्थाची सूचना —

कीचकाचा हस्तिनापुरांत फार मोठा जयजयकार झाला, तो दुर्योधनाचा पक्का पक्षपाती बनला आणि तो फारच सुंदर मदनाचा पुतळा आहे, एवढा परिचय कीचकाचा झाल्यानंतर त्याच्या स्वागतार्थ जमलेल्या स्त्रियांमध्ये त्याची धर्मपत्नी रत्नप्रभा हिच्या जिवाला, आपला पति हस्तिनापुराहून आल्यावर आपल्याकडे पाहील सुद्धा का नाही अशी हुरहुर वाटत असलेली नाटककर्त्याने दाखविली आहे. यामध्ये भावी अनर्थाची सूचना थोडीशी व्यक्त होते. हस्तिनापुरच्या बायका सुंदर असतात म्हणून ख्याति;

आणि त्यांचा एक मोठा चांगला नमुना सैरन्ध्रीच्या रूपाने रत्नप्रभेपुढे उभा. तेव्हा अशा उत्तरेकडे आपल्या पुरुषांना फिरकूंसुद्धा देऊं नये असें रत्नप्रभा म्हणत असतांना, या स्त्रीच्या निमित्ताने कांहीतरी भानगड या नाटकांत होणार आहे याची अंधुक आशंका आपल्या मनांत उत्पन्न होते.

अशा वेळीं कीचक आपल्यापुढे पहिल्या प्रथम येतो. आणि कीचकाच्या स्वतःच्या तोंडून हस्तिनापुरांत झालेला आपला सन्मान, त्याला मिळालेली पदवी याबद्दलचे रसभरित आणि उथळ अहंकाराचें निदर्शक असें वर्णन आपल्याला ऐकायला मिळतें. प्रत्यक्ष राजा युधिष्ठिराचें छत्र कीचकाला दुर्योधनाने बक्षीस दिलेलें असतें. स्वतःच्या गदायुद्धप्रावीण्याबद्दल कीचक स्वतःच प्रौढी सांगतो; हस्तिनापुरांत त्या वेळीं तो नव्हता म्हणून; नाहीतर द्यूताचा खेळ शकुनीला रचावा लागला नसता; त्या आधीच गदाप्रहाराने भीमाची मांडी चूर्ण झाली असती आणि स्वयंवराच्या वेळीं तो हजर असता तर द्रौपदी त्याचीच झाली असती, इत्यादि वल्गनांनंतर कौरवपांडवांच्या युद्धांत भीष्म, द्रोण, कर्ण यांच्यापेक्षाही अधिक पराक्रम करण्याची तो प्रतिज्ञा करतो आणि द्रौपदी आपली दासी होणार म्हणून फुशारकी मारतो. हस्तिनापुरांत त्याचा जसा दुर्योधनाने द्रौपदीपति द्रौपदीपति म्हणून जयजयकार केला तसाच जयजयकार तो विराटाच्या येथेंही करवून घेतो.

सैरन्ध्रीच्या सौंदर्याने काममोहित नव्हे —

आणि मग त्याची नजर सुदेष्णेची दासी सैरन्ध्री हिच्याकडे जाते. तिच्या सौंदर्याने तो काममोहित होतो असें नाटककाराने दाखविलेलें नाही हें येथें विशेष लक्षांत घेतलें पाहिजे. दुर्योधनाने जशा आपल्याला सुंदर दासी नजराणा म्हणून दिल्या तशा तोलाची एकतरी दासी आपण त्याला नजर करूं शकूं एवढीच भावना सैरन्ध्रीला आपल्या तेनातींत पाठविण्याविषयी मागणी करतांना कीचकाच्या मनांत होती.

पुन्हा एकदा या प्रसंगांत रत्नप्रभेच्या मनाची चलबिचल दाखवून या सैरन्ध्री-प्रकरणीं तिला वाटणाऱ्या काळजीचा सूचक उल्लेख याही वेळीं नाटककाराने केला आहे.

सैरन्ध्री मोठी भाग्याची अशी साऱ्या दासींची आणि इतरेजनांचीही समजूत होते. परंतु कंकभट मात्र या सर्व प्रकाराने कष्टी होतो. मैत्रेय त्याला जेव्हा म्हणतो, "ही सैरन्ध्रीची शिकार हातची जाणार म्हणून तुझा चेहरा एवढा उतरला काय?" तेव्हा त्याच्या चित्ताची केवढी कालवाकालव होते. आणि या प्रसंगांतील स्वगताच्या साह्याने त्याच्या खिन्नतेचें कारण आपल्याला सांगितलें जातें. "आज स्वतःच्या छत्रचामरांचा व आपल्या भावांच्या नांवलौकिकाचा अपमान एका मदोन्मत्त व हेकेखोर अरेराव्याने केल्याचें पाहण्याचें आपल्या नशिबीं आल्याने" खिन्न झालेला राजा युधिष्ठिर कंकभटाच्या रूपाने आपल्यापुढे उभा आहे आणि दुःशासनाने भरसभेंत द्रौपदीच्या अपमानाचा प्रसंग आणला तसा प्रसंग पुन्हा निर्माण होणार या भीतीने त्याचें अंतःकरण खरें ग्रासलें

आहे. त्याच्या आजच्या असहाय परिस्थितींत त्याला केवळ विराट आणि सुदेष्णा याच्या सद्भावनेला आवाहन करून स्वस्थ राहावें लागत आहे.

कौरवपक्षपाती कीचकाची ओळख अरेराव, मदोन्मत आणि अहंमन्य अशी आपल्याला होते; कामी किंवा स्त्रीलंपट म्हणून नव्हे. परंतु सैरन्ध्रीची त्याने जी मागणी केली तिच्यांतून नवीच एक राजकारणाची भानगड उपस्थित होते. "अनुकीचकांनी कीचकाच्या मनांत भरवून दिलें की, कीचकानुकीचकांचें वर्चस्व सुदेष्णेला आवडत नसल्यामुळेच तिने कीचकाचा अपमान करण्यासाठीच सैरन्ध्रीला त्याच्याकडे पाठवून दिली नाही," हें आपल्याला दुसऱ्या प्रवेशांत समजतें.

नाटकाचें बीज —

येथे या नाटकांतील मूलभूत संघर्षाला खरें तोंड लागतें. ज्याचा स्वाभिमान डिवचला गेला आहे असा कीचक आणि जिच्यामुळे तो डिवचला गेला ती सैरन्ध्री – म्हणजेच द्रौपदी – यांच्यामधील हा संघर्ष असतो; हेंच या नाटकाचें बीज.

पहिल्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशांत धर्मराजा, भीम आणि द्रौपदी हीं तिघें आपलें स्वरूप आपल्यासमोर प्रकट करून आपसांत बोलत असतांना आपल्याला आढळतात. त्यामध्ये द्रौपदीने धर्मराजावर केलेली तीव्र टीका, त्याला शांतिसागर म्हणून दिलेला टोमणा, भीमाने धर्मराजाला टाकलेले प्रश्न की, "द्रौपदीला नाटकशाळेंत ठेवणार म्हणून कीचकाने म्हटल्याबरोबर तुम्ही गप्प कसे बसलात?" किंवा "त्या हलकटाचें उद्दामपणाचें वर्तन तुम्हीं सहन कसें केलेंत?" आणि "दादा, धिक्कार असो तुमच्या धर्माला आणि शांत शीलाला!" हा त्याचा रागाचा जळजळीत शेरा, या गोष्टी द्रौपदीवर येऊं घातलेल्या बिकट प्रसंगाची भयानकता आपल्या मनावर ठसविण्याला चांगल्या उपयोगी पडतात. "राजमंदिरांतील नोकराचाकरांना मिळणाऱ्या सुखाला लालचावलेले आजचे पांडव शरिराने तुकतुकीत पण मनाने घंढ झालेले पाहून कौरव आनंदाने टाळ्या पिटतील" हा द्रौपदीचा जळफळाट अन्यायाने जळणाऱ्या तिच्या अंतःकरणाची चांगली साक्ष पटवितो.

पण धर्माचा सल्ला काळ ओळखून वागण्याचा असतो. आडदांडपणें न वागतां पुढच्या उत्कर्षावर दृष्टि ठेवून आजचे वाईट दिवस आम्हांला कसें तरी काढले पाहिजेत आणि विराट व सुदेष्णा यांच्या सद्भावनेवर विसंबून धीर धरला पाहिजे हें त्याचें म्हणणें तर्कशुद्ध असल्याने भीम व द्रौपदी यांना अन्य कांही म्हणतां येत नाही.

दुसऱ्या अंकाचा पहिला प्रवेश मैत्रेय भटजी व दासी सौदामिनी यांच्या संवादाचा आहे. त्यामधून फक्त एवढेंच आपल्याला समजतें की, कीचकाला विराटाकडे मोठी मेजवानी आहे; तेथे वारा घालायला आणि वाढायाला सैरन्ध्रीची योजना केली असूनही तिचा कोटें पत्ता नाही आणि तिला शोधण्यासाठी हीं दोघें धांदलींत आहेत. नाटकाच्या

बीजपरिपोषासाठी किंवा स्वभावोत्क्रमण-दर्शनासाठी या व अशा प्रवेशांचा संबंध जवळ जवळ बिलकूल नाही. परंतु आपल्या बहुतेक नाटकांमध्ये खाडिलकरांनी असे प्रवेश मुक्त हस्ताने घातलेले आहेत. याचें कारण आपल्या बहुतेक सर्व नाटकांत खाडिलकरांनी इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील जित आणि जेते यांचें राजकारण, या देशांतील जहाल, मवाळ आणि सरकारनिष्ठ पक्ष व पुढारी यांच्यामधील परस्परसंबंध यावद्दल कटाक्षयुक्त दिग्दर्शन मोठ्या कौशल्याने केलेलें आहे. स्वतःचें असें कांही राजकीय तत्त्वज्ञानही त्यांत त्यांनी अनुस्यूत केलें आहे. परंतु विशेष म्हणजे मवाळ, सरकारनिष्ठ, लाळघोट्या आणि गचाळ स्वार्थी लोकांची आपल्या नाटकांतून मार्मिक परंतु बेहद्द बोचक आणि खोचक टवाळी केली आहे. आजच्या पिढीला व त्या पुढील पिढ्यांना त्यामधील बारकावे, श्लेष, ध्वन्यर्थ, व्यक्तिनिर्देश यांचें सम्यक आकलन होणें फार कठीण होईल. जसजसा काळ जाईल तसतसें या गोष्टींचें महत्त्व व आकर्षण नाहीसें होत जाईल. शेवटीं नाटकांकडे नाटक याच दृष्टीने पाहिलें जाईल व तेंव्हा हे अशासारखे प्रवेश नाट्य-वस्तूच्या परिपोषाला कितपत उपयोगी पडतात असा प्रपंच पुन्हा पुन्हा निर्माण होईल.

खोळंबा रत्नप्रभेसाठी नव्हता —

नंतरचा दुसरा प्रवेश मेजवानीच्या वेळचा आहे. परंतु सैरन्ध्री न आल्यामुळे कीचक अस्वस्थ आणि नाराज आहे. "ती आल्याशिवाय आपण एका पदार्थालाही हात नाही लावणार" या कीचकाच्या वाक्यांतील 'ती' चा संबंध सुदेष्णा आणि विराट रत्नप्रभा राणीकडे लावतात. परंतु कीचकाचें लक्ष अर्थात तिच्यावर नाही आणि म्हणूनच तो उसळून विचारतो "अधिराज विराटमहाराज, सुदेष्णा राणीसाहेब, हिच्या-करिता मी खोळंबून बसलों आहें असें कां तुम्हांला वाटतें ?"

दिल्लीच्या दरबारांत मवाळपक्ष आल्याने कर्झनचें समाधान नव्हतें, तर जहालपक्ष त्याला तेथे इंग्रजाचें अधिराज्य मोकळेपणीं मान्य करण्यासाठी यायला हवा होता, हा यांतील श्लेष कालांतराने लक्षणीय वाटणार नाही. पण सैरन्ध्रीबद्दलच्या कीचकाच्या मनांतील अभिलाषेच्या आणि धोरणाच्या दृष्टीने कीचकाचें हें उसळून विचारणें किंवा त्यापुढील "विराट व सुदेष्णा यांनी आपलें वचन पाळलें नाही" हा आरोप; "फराळ झाल्यावर ? मी पाटावर पाय ठेवल्यापासून सैरन्ध्री माझी झाली पाहिजे" हा त्याचा अट्टाहास; "पाटावर पाय ठेवल्या-बरोबर सैरन्ध्री माझ्या सेवेला हजर राहील म्हणून काल वचन आणि आज येथे येऊन बसलों तो हा धटिंगण बल्लव वाढायला आमच्या पुढे उभा ! जा, असल्या धटिंगणाने वाढलेले पदार्थ आम्ही खात नसतों" असें म्हणून ताट लोटणें या सर्व गोष्टी कीचकाच्या अरेराव आणि उद्दाम स्वभावाच्या दर्शनाच्या दृष्टीने अत्यंत सुसंगत आणि परिणामकारक आहेत.

खाडिलकरांच्या भाषासामर्थ्याची चुणुक —

त्या दृष्टीने "गप्प बसा भटुरग्यांनो" या अधिक्षेपाने सुरू झालेले कीचकाचें या

प्रवेशांतील भाषण मोठें प्रभावी, रेखीव आणि खाडिलकरांच्या भाषासामर्थ्याची सुंदर चुणुक दाखविणारें आहे. "असल्या मजसारख्या वीरपुरुषांच्यापुढे विश्वांतील सर्व सुखोपभोगांचे पदार्थ हात जोडून सेवेला तत्पर उभे राहिले पाहिजेत" हा कीचकाचा दर्प ज्या भाषेंत व्यक्त झाला आहे ती भाषा माणसाच्या रोजच्या संभाषणांतील साधी-सुधी भाषा खास नाही. तासून पुसून, कृत्रिम बनावटीने प्रभावी केलेली ती कलावंताची किमया आहे. आणि म्हणूनच कीचकाचा उद्दाम स्वभाव चपखलपणाणें, निःसंदेहपणे व्यक्त करण्याला ही भाषा समर्थ आहे.

कीचकाच्या मनांतील खरें शल्य—

कीचकाचें समाधान सैरन्ध्रीशिवाय होणारें नव्हतें. त्यामुळे इतरांचे सर्व त्याबद्दलचे प्रयत्न फुकट जातात. अखेर स्वतः सुदेष्णा सैरन्ध्रीला घेऊन येण्यासाठी म्हणून जाते. परंतु याच वेळीं कीचकाच्या मनांत खरें शल्य कोणतें बोचत आहे याचा स्फोट होतो. महाराणी सुदेष्णेचा हा सारा लपंडाव आपला अपमान करण्याचा आहे हें कीचक स्पष्टच सांगतो. सैरन्ध्रीला घेऊन येण्याचा प्रयत्न करीत असतां सुदेष्णेला (पडद्यांत) सैरन्ध्री विनवते, "बाईसाहेब पाया पडतें, पदर पसरून भीक मागतें, या दुष्ट लांडग्याच्या जुलुमांतून या गरीब गाईला कसेंही करून सोडवा;" तें ऐकल्याबरोबर कीचकाच्या अंगाचा तिळपापड होतो आणि राणीसाहेब, आता मला तुमचें कारस्थान समजलें. सैरन्ध्रीला प्रथम दूर पाठवून सर्वांदेखत माझा अपमान करायचा आणि पुन्हा त्या दासीकडून दुष्ट लांडगा, अशी मला शिवी देऊन सर्व नोकरांच्या दृष्टीने मला कःपदार्थ करून सोडावयाचें एवढ्याकरिता हा मेजवानीचा थाट अं ! " असा आपला जळजळीत संशय व्यक्त करून कीचक जाऊं लागतो. जातांना " याचे भयंकर परिणाम होतील " असा इषाराही देतो.

सुदेष्णा सैरन्ध्रीला मेजवानीच्या जागीं घेऊन येते तो कीचक निघून गेलेला. भयभीत होऊन सुदेष्णा सैरन्ध्रीला त्याच पावलीं जाऊन कीचकाच्यापुढे नाक घासायला आणि " आपली नाटकशाळा होऊन राहण्याकरिता मी आलें आहें " अशी कीचकाला विनंति करायला सांगते.

यावर सैरन्ध्रीचें जें उत्तर आहे तें पुन्हा एकदा खाडिलकरांच्या अर्थव्यक्तीच्या प्रभावी सामर्थ्याचें सुंदर उदाहरण आहे. सैरन्ध्री सुदेष्णेला, " पाठच्या बहिणीप्रमाणे तुझ्या अब्रूचें रक्षण करीन " या तिला सुदेष्णेने दिलेल्या वचनाची आठवण करून देते. धर्मही (कंकभट) " कीचकमहाराजांना धर्माच्या दोन गोष्टी सांगून त्यांची धर्मबुद्धि पुन्हा पूर्वीच्यासारखी प्रखर करण्याचें पुण्य आपल्यासारख्या पतिव्रतांच्याच पदरीं पडणें योग्य आहे " अशी तिच्या कर्तव्याची जाणीव सुदेष्णेला करून देतो. अशा वेळीं सैरन्ध्री पुन्हा पुन्हा पातिव्रत्यरक्षणाच्या धर्माचें तळमळीने वर्णन करून " आपल्या गरीब धर्मभगिनीच्या पातिव्रत्याचें रक्षण करा " अशी सुदेष्णेला विनंति

करते. त्या वेळची सैरन्ध्रीचीं सर्वच भाषणें नाट्यमय भाषेच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहेत.

सुदेष्णा मात्र मोठ्या कोंडींत सापडली आहे. पहिल्या दिवशीं सैरन्ध्रीबद्दलच्या कीचकाच्या मागणीची टाळाटाळ करण्यांत तिला यश आलें होतें. पण या वेळीं ती म्हणते, "आतां या सर्व प्रकरणाला राजकाजाचें स्वरूप येऊं पाहत आहे; आणि राजकाजाचा प्रश्न उद्भवला म्हणजे सद्गुणांना कर्तें पुरुष महत्त्व देत नाहीत हें तुला माहीतच आहे."

राजकाजाने धर्मबुद्धीची पायमल्ली करतां कामा नये —

यावर खाडिलकरांनी धर्मराजाच्या तोंडी घातलेल्या उत्तरांत पहिलींच वाक्यें अशीं आहेत —

"राजकाज आणि धर्मनीति ह्या जोडीने हातांत हात घालूनच चाललें पाहिजे. राजकाजाने धर्मबुद्धीची पायमल्ली करतां कामा नये."

धर्मराजाच्या तोंडून खाडिलकरांनी हें चिरंतन सत्य प्रकट केलें आहे. नाट्यवस्तु ज्या अणीवर येऊन ठेपली आहे त्या दृष्टीने या तत्त्वघोषणेला महत्त्व आहेच. परंतु १९१५–१६ सालानंतर या तत्त्वाची अट्टाहासाने घोषणा करणाऱ्या महात्मा गांधींच्या आधी आठ नऊ वर्षें टिळकांच्या एका निष्ठावंत शिष्याने आपल्या पात्राकरवी ही घोषणा केलेली आहे हें या प्रसंगीं विशेष नमूद केल्यावांचून राहवत नाही.

सुदेष्णा जरी हतबुद्ध झाली तरी सैरन्ध्रीच्या म्हणण्यांतील न्याय रत्नप्रभेला उमगला होता. तिची कर्तव्यबुद्धि जागृत झाली होती. कीचकाने जातां जातां विराटाला चार दिवसांचा अवधि दिला होता. त्याचा फायदा घेऊन रत्नप्रभा कीचकाचें मन वळविण्याची जिम्मेदारी घेते व हा नाट्यमय प्रवेश संपतो.

जिम्मा घेतल्याप्रमाणे रत्नप्रभेने कीचकाचें मन वळविण्याचा केलेला प्रयत्न दुसऱ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांत घडतो. याही प्रवेशांत ब्रिटिश राज्यधुरीणांची भारतांतील मवाळ पक्षाबरोबर वागण्याच्या पद्धतीची मोठी खोचक टवाळी आहे. परंतु साहित्याच्या दृष्टीने शृंगार रस खुलविण्याच्या खाडिलकरांच्या कौशल्याच्या दृष्टीने हा प्रवेश एक चांगला नमुना आहे.

परंतु रत्नप्रभा मुद्यावर येतांच कीचकाचा तो शृंगारखेठ एकदम विरल्यासारखा होतो. सैरन्ध्रीवर तिच्या मनाविरुद्ध जुलुम करण्यांत पुरुषार्थ नाही; दुसऱ्याच्या बायकोवर जुलुम करणें, ही गोष्ट कीचकाच्या आजपर्यंतच्या नांवलौकिकाला काळेपणा आणणारी आहे, असें रत्नप्रभा मोठ्या तळमळीने त्याला सांगूं पाहते. चौदा चवकड्याच्या रावणाने "जंगलांत संचार करणाऱ्या एका क्षुल्लक मानवाची स्त्री म्हणून सीतेवर जुलुम करण्याचा प्रयत्न" केल्यामुळे त्याच्यावर ओढवलेल्या परिणामाची कीचकाला ती जाणीवही देते.

नीति आणि कीर्ति विरुद्ध सत्ता आणि इभ्रत —

पण कीचकाचें उत्तर त्याच्या मनांतील खरी बोंच व्यक्त करणारें आहे. एक तर, "आपण एखादी गोष्ट मागितली आणि ती मिळाली नाही तर स्वस्थ बसण्याचा आपला स्वभाव नव्हे" असा त्याचा अहंकारी स्वभावदर्शक मुद्दा आहे. सुदेष्णेने सैरन्ध्रीला पाठविण्याची टाळाटाळ करावी आणि सैरन्ध्रीने आपला हुकूम न मानण्याचें धाडस करावें ही गोष्ट सहन करायला तो तयार नाही. शिवाय कीचकाला नीति आणि कीर्ति यांची पर्वा नाही. तो म्हणतोच मुळी – "स्वर्गातल्या कीर्तीहून आम्हां सत्ताधाऱ्यांना आमची इहलोकची इभ्रत जास्त किंमतीची वाटते." अशा रीतीने एका बाजूला नीति आणि कीर्ति तर दुसऱ्या बाजूला सत्ता आणि इभ्रत यांच्यामधील झगड्याचें स्वरूप या नाटकाला प्राप्त होतें. हाच झगडा आपण ॲन्टिगनीमध्येंही पाहिलेला आहे.

आणि इभ्रत श्रेष्ठ मानणारा कीचक, आपल्याबरोबर पत्नी म्हणून दीर्घकाल राहूनही पतीच्या वृत्तीचें आकलन न होऊं शकणाऱ्या रत्नप्रभेची कीव करतो, तिच्या प्रेमाला मुकण्याचीही फिकीर करीत नाही आणि दिलेली मुदत संपण्याबरोबर सैरन्ध्रीने आपल्या नाटकशाळेंत आलेंच पाहिजे असें म्हणून "माझा शब्द मी खरा करणार!" अशी प्रतिज्ञा तो करतो.

विराटाला वस्तुतः कीचकाचा हा सैरन्ध्रीबद्दलचा हट्ट योग्य वाटत नाही. "क्षुल्लक बाबतींत इतका अरेरावीपणा काय कामाचा?" असें त्याला वाटतें. परंतु त्यावर उत्तर म्हणून सुदेष्णेच्या तोंडून कीचकाच्या स्वभावदोषांचें नाटककाराने पुन्हा एकदा कथन केलें आहे. कीचक शांत स्वभावाचा नाही, उतावीळ आहे, संतापी आहे आणि हट्टी आहे. यामुळे तर सुदेष्णा मोठ्या फिकिरींत आहे. अशा स्थितींत सैरन्ध्रीनेच आपला हट्ट सोडावा असा प्रयत्न करणें एवढाच मार्ग विराटापुढे उरतो व तसें करण्याचें तो ठरवितो.

आणि पुढच्याच प्रवेशांत याच विराटाच्या धर्मबुद्धीची ग्वाही देतांना धर्मराज आपल्याला आढळतो. या तिसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत द्रौपदीवरील पेचप्रसंगावर उपाय योजण्यासाठी धर्मराज, भीम व द्रौपदी यांच्यामध्ये बोलणीं चालू आहेत.

रत्नप्रभेचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. सुदेष्णेचेंही कीचक ऐकत नाही. तेव्हा द्रौपदीचें म्हणणें आता फक्त दोनच मार्ग शिल्लक राहिले. एक कीचकाला तरी जगांतून नाहीसा केला पाहिजे. नाहीतर द्रौपदीने आत्मनाश केला पाहिजे.

धर्मराजाला हे दोन्ही मार्ग पसंत नाहीत. विशेष म्हणजे कीचकाचा नाश करणें हें इतकें सोपें आहे असें त्याला वाटत नाही.

परंतु आडदांड भीमाला तें कठीण मुळीच वाटत नाही. धर्मराजाची कीचकाच्या वधाला अनुमति नव्हती ही फक्त त्याची अडचण होती. अर्थात धर्मराजाला भीमाच्या शारीरिक शक्तीची शंका होती असें नव्हे : पण —

धर्माच्या 'पण' वर द्रौपदीचा मोठा राग—

आणि या 'पण' वरच्च द्रौपदीचा मोठा राग आहे. येथून पुढे या विषयाची चर्चा जी या तिघांमध्ये होते त्यांत नाटकांतील व्यवहार बाजूला राहून हिंसा–अहिंसा, शत्रूशीं वागण्याचा योग्य मार्ग, अशासारख्या सामान्य नीतितत्त्वांबद्दलच्च बोलणें होतें. ऐतिहासिक दृष्टीने या चर्चेला महत्त्व फार आहे. कारण या चर्चेंत हिंसावादी क्रांतिकारकांचें मत दौपदी आणि भीम यांच्या तोंडून अत्यंत तर्कशुद्ध रीतीने मांडलें आहे.

उदाहरणार्थ, धर्मराजाने 'पण–" म्हणतांच द्रौपदी "सापाशीं जर आम्ही दयेने वागलों आणि त्याची गय केली तर पुढे त्या सापाच्या दंशाने मरणारांची हत्या आपल्या माथीं बसेल; जे सांगून सवरून शत्रु त्यांच्याशीं कशाला इतकें नीतीने आणि दयेने वागायला पाहिजे ? भावी हत्येचें पातक चुकविण्याकरिता आज निष्ठुर व निर्दय होणें हाच सत्य मार्ग आहे" असा पक्ष मांडते. पुढे चवथ्या अंकांत पुन्हा याच विषयासंबंधी चर्चा होते त्याही वेळीं द्रौपदी "हा कीचक जर मदांध होऊन निरुपद्रवी आणि विचारी पुरुषांनी कितीही कानउघाडणी केली तरी जुमानीनासा झाला तर त्याच्या पापाचरणाचें साधन–त्याचें पापमय शरीर–त्याच्या हातून काढून घेणें हें प्रत्येक धर्मनिष्ठाचें कर्तव्य नाही काय!" असा "न हन्यते हन्यमाने शरीरे" या गीतेंतील न्यायाच्या अनुरोधाने अधिकाऱ्यांच्या खुनांचें समर्थन करणारा क्रांतिकारकांचा मुद्दा मोजका मांडते. परंतु धर्मराजाचें या सगळ्यावर जें उत्तर आहे तें स्वतः गांधीजींनी तरी इतक्या मोजक्या आणि निखालस शब्दांमध्ये कधी मांडलें आहे की नाही कोण जाणे. त्या दृष्टीने धर्माचीं पुढचीं भाषणें येथे देण्याचा मोह आवरत नाही.

"न्यायबुद्धीला केव्हा केव्हा बाहेरून निर्दयतेचें सोंग आणावें लागतें हें खरें; पण द्रौपदी, असला **निष्ठुरपणा जर केवळ स्वहिताकरताच असेल** (जाड ठसा माझा) तर कितीही शांतपणाने, सावकाशीने, पक्का विचार करून व अंतःकरण दयाळू ठेवून हा निष्ठुरपणा दाखविला असला तरी परमेश्वर त्यावर पापाचाच छाप मारल्यावांचून राहणार नाही. ज्याला आज दुःख द्यायचें त्याचें त्या दुःखापासून अधिक कल्याण होणार आहे, अशी पूर्ण श्रद्धा असल्याशिवाय क्रूरपणाचें प्रत्येक कृत्य पापमय आहे असें समजावें."

"आजचा हा कीचकवधाचा प्रश्न तर बाजूलाच राहूं दे, पण उद्या अज्ञातवास संपल्यावर कौरवांचें पापाचरण अत्युत्कट झालेलें पाहिल्याशिवाय व त्यांचा संहार न करतां दुसऱ्या कोणत्याही मार्गाने **कौरवांचा उद्धार होणें** शक्य नाही असें मला वाटल्याविना सुयोधनाचा वध समरांगणावरही करायला मी संमति देणार नाही."

टिळक–खाडिलकरांमधील चर्चेचे पडसाद ? —

या निमित्ताने एक प्रश्न सारखा मनापुढे उभा राहतो की, हिंसावादी पक्षाचें समर्थन करणारे खाडिलकर आणि धर्मशास्त्रावर नितांत श्रद्धा असणारे टिळक यांच्यामध्ये

वेळोवेळीं झालेल्या मोकळ्या संभाषणांचे तर हे पडसाद नव्हेत? पुढें याच प्रवेशांत सैरन्ध्रीच्या तोंडीं कीचकाशीं प्रतिवाद करतांना "मत्स्य देशांत आपणाहून दुसरा कोणी श्रेष्ठ नाही अशी जरी घमेंड तुला वाटत असली तरी सर्वांचा न्याय करण्यास परमेश्वर बसला आहे हें ध्यानांत ठेव" हें टिळकांच्या न्यायकोर्टांतील भाषणासारखें वाक्य पाहिलें म्हणजे ही शंका फार बळावते. "बाण सोडला की शत्रूंनी आपखुशीने व सुखाने मरणाला तयार व्हावें असली युद्धकला" धर्मराजाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें व्हावी लागेल हा भीमाचा हृदयपरिवर्तनवादाबद्दलचा शेरा आणि "नव्या पक्षाचीं तत्त्वें" यामध्ये टिळकांनी प्रतिपादलेला असहकारितेचा मार्ग यांचें केवढें तरी सादृश्य वाटतें. टिळकांची ब्रिटिश लोकशाहीच्या न्यायीपणाबद्दल श्रद्धा होती हें दे. भ. गंगाधररावजींचें मत डोळ्यांपुढे आलें म्हणजे तर ही शंका फारच दृढ होते.

पण हें विषयांतर झालें. चर्चेनंतर धर्मराजाने पुरस्कारिलेलाच मार्ग अवलंबिला गेला हें खरें. पण मुद्दा असा की, वस्तुतः या सगळ्या चर्चेचा द्रौपदी आणि कीचक यांच्यामधील संघर्षाच्या परिपोषाला तादृश उपयोग नाही. ही चर्चा तडीला लावण्यापूर्वीच कीचक त्या चर्चेच्या स्थानीं वसंत बागेंत येतो. तेथे सैरन्ध्रीला पाहून तिला जबरदस्तीने ओढून नेण्याचा तो विचार करतो. तिला गाठून तो स्वतःबरोबर चलण्यासाठी तिचें मन वळविण्याचा यत्न करतो. आपखुषीने जर ती आपल्याबरोबर आली नाही तर तिने स्वतःवरील जोखीम ओळखावी अशी तो तिला जाणीवही देतो. "तूं आपखुषीने आलीस तर द्रौपदीला तुझी दासी करीन" ही घमेंड कीचक व्यक्त करतो तेव्हा तेथे एक सुंदर पताकास्थान निर्माण होतें.

बायकोपुढे कीचक शरमतो : द्रौपदीवरचें संकट टळतें —

कीचकाचीं या वेळचीं सैरन्ध्रीबरोबरचीं भाषणें गद्यकाव्याचा उत्तम नमुना आहेत. सैरन्ध्रीचीं उत्तरेंही त्याच तोलाचीं आहेत. माझे रक्षक यक्ष तुला क्षणांत नाहीसा करतील असें भय सैरन्ध्री कीचकाला घालते. पण त्याने भिण्याइतका तो लेचापेचा नव्हता. सरळपणे सैरन्ध्री वळत नाही असें पाहून कीचक तिचा हात धरतो. ती धावा धावा म्हणून ओरडते. असें दोन तीन वेळा झाल्यावर कीचक सैरन्ध्रीच्या पदराला हात घालतो. आता भीमाला—तो थोडा बाजूला झाडाआड दडून होता—पुढे येणें अपरिहार्य झालें असतें. परंतु त्याच वेळीं सुदेष्णा आणि रत्नप्रभा त्या ठिकाणीं सैरन्ध्रीचा शोध करीत येतात आणि बायकोपुढे शरमून एवढ्या वेळेपुरती कीचक सैरन्ध्रीला सोडून देतो. परंतु सुदेष्णेला मात्र तो बजावतो की, "आजच्या रात्रीं विलासी अभिसारिकेला साजेसा शृंगार करून, पुष्पमालांनी सुशोभित करून, मद्यपात्रें घेऊन सैरन्ध्रीला मजकडे पाठविली पाहिजे. नाहीपेक्षा मी विराटाचा कोणी नाही आणि विराट माझा कोणी नव्हे."

सैरन्ध्रीच्या प्रश्नाचा निकाल संध्याकाळीं दरबारांत करावयाचा असें विराटाने

अनुक्रमांक २६३७० दि १७/४/५१
क्रमांक ४२१ कीचक नों: दि: २३/३/५० ५१७

ठरविलेलें होतें. परंतु दरबारांत जाण्याची संधि मिळण्यापूर्वीच सुदेष्णेकडून सैरन्ध्रीला मद्यपात्रें घेऊन कीचकाकडे जाण्याचा हुकूम झाला. म्हणून मग मद्यपात्रें घेऊन सैरन्ध्रीने बाहेर तर पडावें, परंतु त्यानंतर तीं मद्यपात्रें घेऊन दासी सौदामिनीने कीचकाकडे जावें आणि सैरन्ध्रीने राजदरबारांत जावें असें वल्लवाच्या सल्ल्याने सैरन्ध्रीने ठरविलें होतें. तथापि दरबारापर्यंत जाण्याची संधीच आपल्याला कदाचित मिळणार नाही ही सैरन्ध्रीच्या मनाला धास्ती होतीच. एकतर कीचक आपल्याला रस्त्यांतच गाठील किंवा दरबारांत आपल्या पाठोपाठ पोचेल; आणि त्याच्यासमक्ष राजा विराटाचें कांही चालणार नाही. हीच गोष्ट खाडिलकरांनी सैरन्ध्रीच्या तोंडून "या कीचकाचा उद्दामपणा पाहिला म्हणजे जगांत परमेश्वर नाही ही कल्पना पृथ्वीतलावर डौलाने वावरत आहेसें वाटतें व परमेश्वराची बेअब्रू करणाऱ्या या पापी प्रदर्शनाचा भपकारा पाहून साधुसंतांना जंगलांत व पर्वतांत दडून बसणें भाग पडलें असलें पाहिजे" अशा काव्यमय शब्दांनी किती मनोहरपणें वदविली आहे. तरीही कोणी अभ्यासजड माणसें 'ही कांही आपली रोजच्या व्यवहारांतील भाषा नव्हे, ही भाषा कृत्रिम आहे,' म्हणून स्वतःचें डोकें पिटून घेऊं लागलींच तर रसिकांनी काय करावें !

कीचकाच्या संतापाचें खरें कारण —

ठरल्याप्रमाणे मद्यपात्रें घेऊन सौदामिनी गेली असतां कीचक तिला लाथा मारीतच बाहेर आणतो. "आमच्याशिवाय चालेल असा विराटाला व सुदेष्णेला गर्व झालेला दिसतो" या विचाराने खरा त्याचा संताप झालेला आहे. परंतु सौदामिनीने जेव्हा सांगितलें की, शिव्याशाप देणाऱ्या सैरन्ध्रीपासून कीचकाला सुख होणार नाही म्हणून ती आपण होऊन मद्यपात्र घेऊन कीचकाकडे आली होती आणि सैरन्ध्री दरबारांत स्वतःची तक्रार गुदरण्यासाठी गेली होती, तेव्हा कीचक "कीचकाच्या शब्दाविरुद्ध ब्र काढण्याची प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचीही छाती नाही हें मी माझ्या कृतीने सर्व मत्स्य देशाला आज रात्रीं जाहीर करणार" अशी घोषणा करीत दरबाराकडे जातो.

दरबारांत जेव्हा विराटाला कळलें की सैरन्ध्री आपण होऊन कीचकाकडे गेली तेव्हा त्याला संकट टळलेंसें वाटलें. परंतु दुसऱ्या कोणाकरवी मद्य कीचकाकडे पोचवून सैरन्ध्री आपण स्वतः दरबारांत येणार आहे असें जेव्हा कंकभटाकडून कळतें तेव्हा विराटाची अवस्था फार कठीण होते. एका बाजूला धृतराष्ट्राच्या पुत्रप्रेमाप्रमाणे कीचकाबद्दलचें मित्रप्रेम आणि दुसऱ्या बाजूला अधर्माचरणाला संमति देण्याचा प्रसंग अशा कैचीमध्ये तो सापडतो. आणि धृतराष्ट्राने द्यूतप्रसंगीं केलें त्याप्रमाणे मित्रप्रेमच आपण अधिक ग्राह्य मानणार असा तो आपल्या मनाचा कल व्यक्त करतो. कंकभटाच्या गंभीर इषाऱ्याचाही कांही परिणाम होत नाही.

विराटाला धर्म कळत होता, पण प्रत्यक्ष व्यवहारांत वळत नव्हता. सैरन्ध्री मुकाट्याने बलात्काराला बळी पडली तर कीचकाच्या हौसेकडे आपण डोळेझाक केल्याशिवाय

राहणार नाही असें विराट म्हणतो, तोच तिकडे कीचकाने सैरन्ध्रीचा पदर धरलेला आहे व सैरन्ध्री आपली लाज सांभाळण्याची मागणी करीत आहे अशा स्वरूपांत ओरडा होत त्या दोघांचा दरबारांत प्रवेश होतो. विराट, गुरु व पुरोहित, सुदेष्णा, रत्नमाला, सर्वजण या कृत्याचा निषेध करतात. परंतु वेहोष झालेल्या कीचकाला त्याचें काय? सर्वांच्यासमक्ष, दिवसाढवळ्या, भरदरबारांत सैरन्ध्रीचा पदर तिच्या अंगावरून जबरदस्तीने ओढून काढून आजच्या रात्रीं सैरन्ध्री खात्रीने माझी रंडी होणार हें तिच्या अनुभवास मी आणून देणार, या अर्थाचें मोठें जोरदार आणि अहंकारी भाषण कीचक करतो.

नाटककाराचें साध्य आणि साधन—

कीचकाचें हें अतिप्रसंगी वर्तन दाखविणें व तेथपर्यंत पोचेतोपर्यंतचा त्याचा वाढता अहंभाव आणि दुराचार दाखविणें हें नाटककाराचें खरें साध्य आहे. अशा स्थितींत कीचक कितीही श्रेष्ठ असला तरी त्याच्या श्रेष्ठपणाचे पुरावे प्रत्यक्ष दाखवीत बसणें हें नाटककाराच्या या नाटकांतील भूमिकेशीं सर्वथा विसंगत होईल हें या प्रसंगावरून कोणाही सामान्य माणसाला मान्य होईल.

राजकाजासाठी विराटाचा गुळमळीत निर्णय—

कीचक सैरन्ध्रीचा अपमान करण्याचा प्रयत्न करीत आहे. सैरन्ध्री त्याला त्याच्या दुष्कृत्याबद्दल शिव्याशाप देते आहे. कीचक (गडकऱ्यांच्या वृंदावनाच्या भाषणांच्या वेळीं ज्यांची आठवण व्हावी अशीं) रसपूर्ण व आवेशपूर्ण भाषणें करीत आहे. अशांत रत्नप्रभा तेथे येऊन कीचकाला या अधर्मापासून परावृत्त करण्याकरितां त्याचे पाय धरते. त्या वेळीं, इतका बेफाट झालेला कीचकही, रत्नप्रभेच्या मानासाठी, 'त्या वेळेपुरती तरी' सैरन्ध्रीला सोडून देतो. परंतु तिचा नाद कायमचा सोडा असें वचन देण्याबद्दलचा तिचा पुढचा आग्रह मात्र तो मानीत नाहीं. "लग्नाची बेडी" तोडून पुन्हा सैरन्ध्रीला धरायला धावतो. ती विराटाच्या सिंहासनाच्या मागे आश्रय घेते. कीचक विराटाला परिणामाचा इषारा देतो. शेवटीं अत्यंत गुळमळीत असा निर्णय देऊन विराट आपल्यावरील जबाबदारी त्या क्षणापुरती टाळतो. भर दरबारांत सैरन्ध्रीचें वस्त्रहरण करण्याची कीचकाला तो मनाई करतो, परंतु ताबडतोब सैरन्ध्रीला वनवासांत पाठवून देण्याचा हुकूम करतो. आणि तिला सांगतो, "या दरबारांत मीं तुझी अब्रू राखली आहे. तुझ्यासारख्या एका दासीसाठी कीचकमहाराजांचा मी शत्रु होणें राजकाजाला विघातक असल्यामुळे वनवासांत मजवर विसंबून न राहतां तूं आपल्या यक्ष-किन्नरांचा धावा कर."

अशा रीतीने तिचा राजाचा आश्रय सुटला. आता कीचकाला रान मोकळें झालें. तेव्हा धर्मराजाने भीमाला, नाइलाज होऊन, कीचकाचा वध करायला संमति दिली.

तथापि असें करतांना ज्ञानवृद्ध ऋषींनी आखून ठेवलेल्या पुण्य मार्गापासून आपण ढळतों आहोंत या विचाराने धर्मराज खिन्नच होता. पण धर्मबुद्धीचें वळण संसारांतील लोकांना लावण्यासाठी अजून राज्यसाधन करण्याची इच्छा धर्मराजाला होती. म्हणून एवढ्यांत प्रकट होणें सोयीचें नव्हतें. शिवाय रत्नप्रभेपुढे कीचक मऊ पडलेला धर्मराजाने पाहिलेला होता. त्यामुळे त्याच्यामधली माणुसकी सगळीच मेलेली नाही असें धर्मराजाला वाटत होतें. तेव्हा भीमाने कीचकाला आपली प्रचंड शक्ति दाखवावी आणि पांडवांचा पक्षाभिमानी होण्याबद्दल त्याचें मन वळवावें; आणि हें नच साधलें तर अपरिहार्य म्हणून त्याचा वध करावा, तोही द्वेषबुद्धीने नव्हे, अशी सांगी धर्मराज त्याला देतो.

इकडे सैरन्ध्रीचा पाठलाग व शोध करण्यासाठी कीचक बाहेर पडत असतो. त्या वेळीं रत्नप्रभा या विचारापासून त्याला परावृत्त करण्याचा पुन्हा प्रयत्न करते. परंतु "तुझ्या नवऱ्याच्या मनांत मानापमानाचे, इज्जत बेइज्जतीचे कोणते विचार घोळत असतात याची तुला कल्पनाही नसावी, हें माझें दुर्दैव होय" असें म्हणून कीचक तिला दूर करतो. त्या वेळचा कीचक आणि रत्नप्रभा यांचा संवाद मोठा काव्यमय, रेखीव, नाट्यपूर्ण आणि प्रभावी आहे. भोळी रत्नप्रभा, मंदोदरीने रावणाला पापापासून परावृत्त करण्यासाठी केलेलीं आर्जवें मूळ रामायणांतूनच वाचून दाखवावीं, म्हणजे कीचकाचें मन फिरेल या आशेने पोथी आणण्यासाठी आंत जाते आणि याचा फायदा घेऊन कीचक आपल्या उद्दिष्ट कार्यासाठी रवाना होतो.

कीचकाचा अखेर वध —

यानंतरचा शेवटचा प्रवेश कीचकाच्या वधाचा – देवीवनांतील भैरवाच्या देवळांत सैरन्ध्री पोचून तेथे मूर्च्छित पडली होती. ती सावध होत असतांनाच प्रवेशाची सुरुवात आहे. सावध झाल्यावर भीम कोठे दिसत नाही म्हणून ती त्याला प्राणनाथ अशी हाक मारते. जवळच आलेला कीचक आपल्याकडे त्या आवाहनाचा संबंध जोडून सैरन्ध्रीला हार घालूं पाहतो. सैरन्ध्रीच्या यक्षकिन्नरांची भीति तर तो बाळगीतच नाही; पण खुद्द भैरवाला आपल्या हुजऱ्याइतका कःपदार्थ तो मानतो. सैरन्ध्री त्याला झिडकारते तेव्हा तो तिचा हात धरतो. सैरन्ध्री ओरडून स्वतःला सोडवून घेते. आणि "धावा प्राणनाथ, हा कीचक द्रौपदीची अब्रू घेत आहे" असें ओरडते.

ती द्रौपदी आहे हें समजून तर कीचकाला अधिकच चेव चढतो. मोठीच शिकार साधल्याचा मद त्याला चढतो. अखेरचा म्हणून द्रौपदी भैरवाच्या मूर्तीचा आश्रय घेते. द्रौपदी त्याला पुष्कळ धमकावण्या देण्याचा यत्न करते. परंतु प्रत्यक्ष भीम जरी या वेळीं प्रकट झाला तरी तुला मी भ्रष्ट केल्याशिवाय मी राहणार नाही अशा उद्दाम बलगनेने कीचक तिला आपल्या शक्तीचा प्रत्यय आणून देण्यासाठी भैरवाच्या मूर्तीचें चूर्ण करून दाखविण्याकरिता मूठ उगारून भैरवाच्या छातीजवळ नेतो. त्या क्षणीं भैरवाच्या मूर्तीच्या ठिकाणीं असलेला भीम कीचकाचा हात धरून पुढे होतो. कीचकाची

मल्लयुद्धाची किंवा गदायुद्धाची मागणी भीम नाकारतो. कारण अशा पाप्याशीं बरोबरीच्या नात्याने वागण्याची भीमाची तयारी नसते. त्याला खाली पाडून व त्याच्या उरावर बसून भीम त्याचा प्राण घेण्यापूर्वी, धर्माच्या आज्ञेसाठी, त्याने विराटाच्या दरबारांत क्षमायाचना करण्याचें कबूल केल्यास त्याला जीवदान देण्याची तयारी दर्शवितो. द्रौपदीही मोठ्या मनाने आणि रत्नप्रभेसाठी म्हणून या गोष्टीला संमति देते. परंतु कीचक अजून युद्धाची आणि द्रौपदीला रंगमहालांत ठेवण्याची भाषा बोलतो. तेव्हा त्याला पश्चाताप होण्याचा संभव नाही हें पाहून त्याच्या छातींत बुक्की मारून भीम त्याचा वध करतो.

आणि अशा रीतीने कीचकवध पुरा होतो.

या नाटकामध्ये कीचकाचा वध होतो हें खरें. आणि तरीही या नाटकाला करुण नाटक म्हणण्याचें धाडस करवत नाही. कीचकाच्या ठिकाणीं त्याच्या अधःपाताला कारणीभूत होणारी कारणपरंपरा नाटककाराने कशी दाखविलेली आहे हें आपण पाहिलें आहे. सर्वसामान्यपणे नाटककारांच्या आपण आतापर्यंत पाहिलेल्या पद्धतीप्रमाणे या नाटकांतही कीचकाच्या शौर्यधैर्याबद्दल कवीने दिलेला हवालाही आपण मानून चालायला तयार आहोंत. केवळ कामांधतेने कीचक सैरन्ध्रीचा अपमान करायला तयार झाला असता तर तो फारच हीन ठरला असता.. म्हणून त्याच्या अपमानाचें राजकारण उभें करून कीचकाचा हट्ट त्या कारणासाठी होता, असेंही वळण कथेला हेतुपूर्वक दिलेलें आहे. रत्नमालेबद्दलचें कीचकाच्या मनांतलें प्रेम आणि तिच्याबद्दलचा सात्विक आदर याही गोष्टी त्याच्या स्वभावांतील अंतर्गत उदारतेचें लक्षण म्हणून नाटककाराने दाखविल्या आहेत.

इतकें सगळें करूनही कीचकाबद्दल आपल्या मनांत आपुलकी, जिव्हाळा किंवा हळहळ खाडिलकर उत्पन्न करूं शकत नाहीत. पापात्मा म्हणूनच आपल्या मनावर त्याच्याबद्दल ठसा राहतो. दोष किंवा चुकी यांचा अतिरेक होऊन, अपरिहार्यपणें स्वतःच्या नाशास कारण होणारी व्यक्ति आणि म्हणून अशा व्यक्तीचा नाश अपरिहार्य असला तरी मनाला हिरमुसलें करणारा, असा कांही कीचकाच्या वर्तनाचा व जीवनाचा ठसा आपल्या चित्तावर उमटत नाही. उलट कीचक गुन्हेगार आहे, पापी आहे, आपल्या स्वभावदोषाच्या आहारीं गेलेला दयनीय माणूस नाही, असाच ठसा खाडिलकरांनी जास्त गडद केल्यामुळे कीचकाबद्दल सहानुभूति वाटत नाही. हॅमलेटचा, ॲन्टिगनीचा विनाश अपरिहार्य होता हें मान्य केलें तरी तो झाला नसता तर आपल्याला हवा होता; तो झाला तें फार चांगलें झालें असें आपल्याला वाटत नाही. या नाटकांत, कीचकाला शिक्षा झाली हें न्याय्यच झालें, भली या दुरात्म्याची खोड मोडली अशीच भावना निर्माण होते. त्याच्याशीं एकात्मभाव तर दूरच, पण सहभावसुद्धा आपल्या जागीं निर्माण होत नाही. अरेरे! असा खिन्नतेचा करुणेचा उद्गार त्याच्याबद्दल, आपल्या तोंडून

एकदाही आणि पुसटसुद्धा निघत नाही. उलट छान झालें, जगांतील एक नराधम गेला, असाच हुंकार आपल्या चित्तांत उत्पन्न होतो.

त्यामुळे कीचक आतांपर्यंत आपण पाहिलेल्या करुण नायकांच्या पंक्तींत बसत नाही. वध झाला म्हणून लिंकनचें जीवन करुणार्ह झालें असें आपण मानलें नाही. पण तेथें संसाराच्या अपुरेपणाबद्दल आपण हळहळलों. तसेंही येथें होत नाही. संसाराबद्दल हळहळ दूरच, उलट संसाराचें शुद्धीकरण झाल्याबद्दलचा धन्यतेचा उद्गार आपल्या तोंडून निघतो.

२ : राघोबादादा

कीचकापेक्षा राघोबादादाबद्दल खाडिलकरांनी आपल्या मनांत पुष्कळ अधिक सहानुभूति निर्माण केली आहे असें यापुढे आपणाला आढळून येईल. आणि तरीही भाऊबंदकी हें राघोबादाच्या करुण विपाकाचें नाटक आहे की नाही याचा संशय शिल्लकच राहतो. तें कसें तें आता यापुढे पाहूं.

भाऊबंदकीचा पहिला प्रवेश सुरुवातीला थोडा संथ गतीचा आहे. आनंदीबाईच्या पक्षांतील मातबर सरदारांमध्ये नारायणराव पेशव्यांचा बंदोबस्त करून राघोबादादाच्या हातीं पेशवाईचा कारभार कसा घ्यायचा याच्या वाटाघाटी चालू आहेत. या सरदारांतही कांही खास आनंदीबाईच्या पुढ्यांतले तर कांही सावध राजकारणी आहेत. बेत असा आहे की, गारद्यांना पांच लाख रुपये बक्षीस द्यावयाचें आणि गारद्यांनी दादासाहेब सांगतील त्याप्रमाणे नारायणरावाचा बंदोबस्त करावयाचा. परंतु पूर्वीच्या अनुभवावरून गारदी शहाणे झालेले असल्यामुळे या प्रसंगीं सहीशिक्क्याचा हुकूम त्यांना पाहिजे होता.

या कटाला कारभारी सखारामबापू कितपत अनुकूल होतील याबद्दल मोठा संशय होता. अल्लड धाकटे श्रीमंतच आपल्या स्वतंत्र कारभाराला अधिक चांगले म्हणून बापू नारायणरावांच्या अटकेच्या कटाला अनुकूल नव्हते. आणि त्यांचा प्रत्यक्ष विरोध आधीपासूनच येऊं नये म्हणून, तसा आमचा विचारच नाही, दादासाहेबांना कैदेंतून मोकळे करून नागपुरकर भोसल्यांकडे पाठवावयाचें एवढाच आपला बेत असल्याचें भवानराव प्रतिनिधींनी बापूंना सांगितलें होतें. आणि मुत्सद्यांचा कयास असा होता की, एकदा नारायणरावाला या धांदलींतून कैदेंत टाकलें म्हणजे बापू दादासाहेबाच्या विरुद्ध जाण्याचें धाडस करणार नाहीत.

कटाची मदार दादासाहेबांच्या हुकुमावर—

परंतु कटाची सर्व मदार होती दादासाहेबाचा हुकुम मिळतो की नाही यावर. आनंदीबाईच्या खास पुढ्यांतले भवानराव व सखाराम हरि एवढेच तेथे शिल्लक राहिल्यावर आनंदीबाई येते तेव्हा ते हाच प्रश्न उपस्थित करतात. कारण गारद्यांनी

उचललेला बेलभंडारा त्यांनी आणलेला असतो व गारद्यांना फक्त आता दादासाहेबांचा हुकुम हातांत पडण्याचाच काय तो अवकाश होता.

आनंदीबाईचा स्वच्छ मनोदय असा आहे की, "नारायणाच्या नुसत्या मुसक्या बांधून चालायचें नाही." परंतु आपल्या बेताला भवानराव व सखाराम हरि हे कितपत अनुकूल होतील याचा अंदाज नीटसा आलेला नसल्यामुळे नारायणरावांना कैद करण्यापेक्षा "आम्ही तुरुंगांत आहोंत तेच बरे" असा उलटा पवित्रा ती मुद्दाम घेते. अशाने आपण तोंडघशी पडल्यासारखे होऊं, नारायणरावाचा आपण किल्ल्यावर अगदी पक्का बंदोबस्त करूं, तेव्हा धरण्याच्या हुकुमावर भागवावें, असें ते मुत्सद्दी बाईला पुष्कळ सांगतात. पण तिचें समाधान नाही. बंदोबस्त आज आहे आणि उद्या नाही. तिला पाहिजे होता नारायणरावाचा पक्का बंदोबस्त करायला. गारद्यांचेंही म्हणणें होतें की, या प्रकरणाचा एकदा कायमचा सोक्षमोक्ष करून टाकावा.

परंतु अजूनही मुत्सद्दी नारायणरावाला धरण्याच्याच पत्राची अपेक्षा राखतातसें पाहून त्यांच्यापाशी आपल्या बेताची परिस्फुटता करण्याचें आनंदीबाई टाळते. अर्थात वेळप्रसंगीं ते आपल्याच बाजूला राहतील याची मनांतून खात्री ती करून घेते आणि गारदी नारायणरावाला पकडून घेऊन दादासाहेबांच्या दिवाणखान्यांत आले म्हणजे खुद्द दादासाहेबांनाच इकडे पाठवून द्या, त्यांच्यासमक्षच मी गारद्यांच्या हातांत हुकूम देईन असें म्हणून बाई मुत्सद्यांना रवाना करते.

राहतां राहिला तुळोजी. त्याला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न बाई करते. "पुढचें भय आज निर्मूळ उपटून टाकावें म्हणतें" असें त्याला ती सुचविते. तेव्हा "दादासाहेब या गोष्टीला कबूल आहेत का पण?" हा त्याचा स्वाभाविक प्रश्न असतो. त्यामुळे त्यालाही आपल्या विश्वासांत घेण्याची सोय नाही हें पाहून, लेखी हुकूम कसलाही असला तरी तुळाजी तो मानील एवढी खात्री करून घेऊन त्याला ती गारद्यांच्या पाळतीवर राघला पाठविते.

'ध' चा 'मा' —

"धनदौलत कमवायची कशी हें पुरुषांना समजतें; पण घरांत चालून आलेली लक्ष्मी घरांतच कोंडून कशी ठेवायची ही अक्कल पुरुषांनी बायकांपासूनच घेतली पाहिजे" या तत्त्वाचें पालन म्हणून आणि पुन्हा आपल्यावर कमीपणाने राहण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून बाई हुकुमांतील 'ध' चा 'मा' करते.

तेवढ्यांत दादासाहेब येतात. त्यांना अनुकूल करून घेतल्याशिवाय मारण्याचा हुकूम गारद्यांच्या हातांत देण्याची बाईची छाती झाली नाही. गोडीगुलाबीने स्तुति करून, शृंगाराचा आविर्भाव करून आपल्या दुरुस्तीला दादासाहेबांची संमति मिळविण्याचा बाई कौशल्याने प्रयत्न करते. परंतु त्या दुरुस्तीला संमति देण्याचा दादासाहेबांचा हिय्या होत नाही.

त्याच्या पापभीरू मनाला भय वाटतें की, या पापामुळे आपले पुण्यशील पूर्वज आपल्या कुळांत आपल्या पोटीं जन्म घेणार नाहीत. आपल्याला शासन करण्यासाठी एखादा दुरात्मा आपल्या पोटीं येईल. मग अशा कुलांगार पुत्रपौत्रांकडे गादी चालून काय उपयोग ? असें त्याचें चांगल्या संस्कारांत वाढलेलें मन त्याला सांगत होतें.

प्रजाजनांना उत्साही आणि आनंदी करून पेशव्यांच्या गादीवर स्वपराक्रमाने बसण्याची त्याची पुरुषार्थी वीराप्रमाणे इच्छा होती.

खुनाच्या पापाशीं बिलगून असणारीं दुष्ट पिशाच्चें आपल्या अपत्यांच्या रूपाने पेशवाईला दुष्टबुद्धीने आग लावतील असें त्याचें श्रद्धाळू मन त्याला सांगत होतें.

पण माधवराव, नारायणराव हे आमचे शत्रू; त्यांना मारण्यांत पाप नाहीच असा आनंदीबाईचा पवित्रा असतो. "असल्या गळेकापू शत्रूला (नारायणरावाला) तुम्ही पुतण्या का समजतां ?" असा रागाने ती राघोबाला प्रश्न करते.

परंतु "हो, त्याला मी माझा पुतण्या समजतों" असें दादासाहेब खडसून सांगतात. "शत्रु झाला तरी पुतण्या आहे; तुझ्या डोळ्यांत जितका तो सलतो तितका माझ्या डोळ्यांत सलत नाही" असें ते साफ साफ म्हणतात.

आनंदीबाईचा आक्रस्ताळेपणा —

यावर आनंदीबाई आक्रस्ताळेपणा करून, नारायणरावाला आपण मारणार नसाल तर आधी कट्यारीने माझा प्राण घ्या व मग नारायणरावाचा प्राण वांचवा, असें नाटक दादासाहेबापुढे करते. "आवडती पत्नी म्हणूनच फक्त आपण तुझा वध करीत नाही, नाहीतर अशा स्त्रीला मारून स्त्रीहत्येचें पातकही मीं स्वीकारलें असतें" इतकें म्हणण्यापर्यंत दादासाहेबाचा सात्त्विक भाव जागृत होतो.

त्यावर आनंदीबाईच्या जिवाचा तडफडाट होतो. "आमच्या या सुखाच्या आड येणाऱ्या नारायणाचा निःपात इकडच्या मरणाशिवाय कशानेही होणार नाही असें परमेश्वराने जर मला सांगितलें तर या पोरट्यास जगांतून निदान नाहीसा करण्याकरिता, काळाच्या तडाख्याने माझें कुंकूं असें पुसलें जाऊन सती जाण्याचा प्रसंग नारायणाच्या कैदेंत राहण्यापेक्षा मजवर येऊं दे अशी परमेश्वराची करुणा भाकण्यास मी चुकणार नाही" इतका बेभानपणाचा आव ती आणते.

परंतु तरीही तसा हुकूम गारद्यांच्या हातीं देण्यासाठी तिला परवानगी मिळत नाही. त्यापूर्वीच "काका, माझे प्राण वांचवा" असें म्हणत येऊन नारायणराव राघोबाच्या एका बाजूला गुडघे टेकून उभा राहतो. दुसऱ्या बाजूला आनंदीबाई तशाच पवित्र्यांत असते. सुमेरसिंग वगैरे गारदी आणि तुळोजी हेही तेथे येतात.

राघोबा पत्नीप्रेमाला बळी पडतो —

एका बाजूला नारायणरावाची प्राण वाचविण्याची काकुळती तर दुसऱ्या बाजूला

कट्यार उचलून स्वतःचा प्राण घेण्याचा आव आणलेली आवडती पत्नी, अशा पेचांत राघोबादादा पत्नीप्रेमाला बळी पडतो. " तुम्हांला जर त्या सापाला जिवंत ठेवायचें असेल तर तुमच्या हातांनी – नाही माझ्या हातांनी ह्या कटारीने मी माझा प्राण – " असें म्हणणाऱ्या आनंदीबाईला " हा तुझा प्राण मी तुला परत देतों असें म्हणून राघोबा हुकुमाचा कागद देतो आणि आता तुझे प्राण तूं हिऱ्याकडून मागून घे, असें नारायण-रावाला सांगतो.

नारायणराव आनंदीबाईच्या परोपरीने विनवण्या करतो. त्याने काढलेल्या जुन्या आठवणींमुळे दादासाहेबाचें जात्या प्रेमळ मन विरघळेल या भयाने बाई राघोबाला दिवाणखान्याच्या बाहेर घालवून देते आणि मग नारायणाला मारावें हा हुकूम गारद्यांच्या हवालीं करते. तिच्या हुकुमावरून तुळोजी आणि गारदी तलवारी चालवून नारायण-रावाचा प्राण घेतात. इतक्यांत राघोबा तिकडे येतोशी चाहूल लागून नारायणरावाच्या वधाचें काम पुरें झालेलें स्वतः पाहिल्याशिवाय आपण दादासाहेबाच्या नजरेस पडणें बरें नव्हे, असें म्हणून आनंदीबाई दिवाणखान्यांतून निघून जाते.

दादासाहेबाच्या पापी मनाचें भित्रें चित्र यापुढच्या त्याच्या स्वगतांत रेखाटलेलें आहे. नारायणराव मारला गेला ही खात्री असूननही काका, काका, या हाका त्याच्या कानावर आदळत राहतात. आनंदीबाई येऊन आपला शत्रू मेल्याबद्दल या पाहा नौबती झडताहेत असें त्याला सांगते तरीही काका, काका हे शब्द मला कसें ऐकूं येतात असें तो विव्हळ होऊन विचारतो.

लोकगंगेला न भिऊन भागायचें नाही —

सुमेरसिंगादि गारदी, सखाराम हरि आदि मुत्सद्दी येऊन राघोबाचें अभिनंदन करतात. राघोबादादा पुढच्या व्यवस्थेची आखणी करूं लागतो. हरिपंत फडक्याला कैद करण्याचें ठरतें. परंतु बापूंचा प्रश्न कसा सोडवावा ही मोठी समस्या असते. दादा-साहेबाला एक आशा असते की, बापू पूर्वापार आपल्या बाजूचे, तेव्हा ते या वेळीं आपल्याविरुद्ध जाणार नाहीत. परंतु अशा लोकांना जर आपण भिऊं लागलों तर मग गांवगन्ना आपणाला लोक दूषण देऊं लागले तर त्यांनाही आपल्याला भ्यावें लागेल असा युक्तिवाद आनंदीबाई करते. त्या वेळीं " लोकगंगेला न भिऊन भागायचें नाही. लोकगंगा जर विरुद्ध खवळूं दिली तर निजाम अल्लीवर आपण स्वारी करून गेलों असतां लोकांचा हिय्या व उत्साह निर्माण होणार नाहीं " हें समजण्याइतकें शहाणपण दादा-साहेबाजवळ असतें.

लाचलुचपतीने, भेदनीतीने, एकेकट्या विरोधकाला बाजूला काढून त्याचा खरपूस समाचार घेऊन, आपली सत्ता कायम करण्याच्या कुटिल राजनीतीचा सल्ला आनंदी-बाईचा कायम राहतो. बापूंची इतकीशी फिकीर करण्याचें कारण नाही असाच तिचा दर्प असतो.

बापूंची अर्धवट भूमिका —

अशा वेळीं बापू प्रवेश करतात. त्यांची पहिली अंतःकरणापासूनची ऊर्मि "दादासाहेब, कोणत्या नरकाचें हें साधन करून ठेवलेंत?" असें म्हणून नारायणरावाच्या खुनाबद्दल दादासाहेबाला उघडपणें दोष देण्याचीच असते. परंतु आनंदीबाई मोठ्या मानभावीपणाने दादासाहेबांना दोष देण्याजोगें कारण नाही असें प्रतिपादते आणि दादासाहेबही तिलाच साथ देतो. तेव्हा बापूंच्यामधला मुत्सद्दी जागा होतो. रामशास्त्र्यांप्रमाणे राघोबाच्या तोंडावर अधिक बोलण्यांत तेथे शहाणपणा नाही हें बापू ओळखतात. शिवाय चपखल पुरावाही कांही हातीं नसतो. तेव्हा ही खुनाची गोष्ट ऐकून आणि पाहून आपलें चित्त भ्रमिष्टासारखें झालें आहे आणि आपण म्हातारे झालों आहोंत, या सबबीवर कारभाराची जबाबदारी नाना फडणीस वगैरेंच्यावर टाकून कारभार चालवावा असें बापू सांगतात आणि मोठ्या कौशल्याने राघोबाचा कारभारी होण्याचा प्रसंग टाळतात. सध्यातरी अशी अर्धवट भूमिका घेण्यांवाचून बापूंना अन्य मार्ग दिसत नव्हता.

अशा रीतीने भाऊबंदकी नाटकांतील हा अत्यंत नाट्यमय आणि कोणत्याही भाषेला अभिमान वाटावा इतका प्रभावी आणि कलापूर्ण प्रवेश व अंक संपतो. या प्रवेशांत व त्यापुढेही शेक्स्पीअरच्या दोन नाटकांची – मॅकबेथ व ज्यूलिअस सीझर यांची – मोठी छाप पडलेली आहे. परंतु त्यासंबंधी चर्चा शेवटीं करूं.

दुसऱ्या अंकांतील पहिला प्रवेश आणि दुसऱ्या प्रवेशाचा बराच मोठा भाग तितक्या तपशीलवारपणें पाहण्याजोगा नाही. तत्कालीन समाजस्थितींतील जातिभेदाचीं भांडणें, स्वार्थी भटाभिक्षुकांच्या लटपटी, समाजांतील अंधश्रद्धा इत्यादिकांचें दर्शन करण्यासाठी त्या प्रवेशांना महत्त्व असलें तरी प्रत्यक्ष नाट्यवस्तूच्या परिपोषाला त्यांचा व पुढच्या तशाच तऱ्हेच्या प्रवेशांचा साक्षात उपयोग फार थोडा आहे, रामशास्त्री यांना दादासाहेबांनी पुतण्याचा खून केला याबद्दलचा प्रत्यक्ष पुरावा हवा असतो. प्रत्यक्ष पुरावा म्हणजे हुकुमाचा कागद. तो कोणाच्या हातीं लागूं नये म्हणून एका ताईतांत बंद करून तो ताईत स्वतःच्या गळ्यांत तुळोजीने ठेवून दिलेला असतो. पापी तुळोजीला नारायणरावांचें भूत दिसूं लागतें. रात्रीं त्याला झोप मिळेनाशी होते. यावर उपाय म्हणून तो मंत्रजपानुष्ठानाची योजना चमकभटजी आणि नमकभटजी या भिक्षुकांकरवी करवितो. त्या भांडकुदळ भिक्षुकांच्या व त्यांच्याहूनही जास्त भांडकुदळ अशा त्यांच्या बायकांच्या भांडणाच्या हातघाईत, जपानुष्ठानासाठी दिलेल्या ताईताची ओढाताण होते आणि त्यांत तो फुटून हुकुमाचा कागद बाहेर पडतो व त्याच वेळीं रामशास्त्री आदि मंडळी तेथे आल्यामुळे त्यांना तो वाचायला मिळतो. अशी घटना घडविण्यापुरता फक्त नमकभटजी, चमकभटजी, तुळोजी, म्हाळसा व दुर्गा यांच्या खूपच लांबलेल्या प्रवेशांचा, अतिशयोक्त भांडणांचा आणि त्यांतील उपरोधदर्शनाचा प्रत्यक्ष नाट्यवस्तूशीं संबंध

आहे. त्यामुळे या प्रवेशांचा ओझरता उल्लेख करून मुख्य नाट्यवस्तुपरिपोषाकडेच लक्ष पुरविणें अधिक योग्य होईल.

म्हाळसा व दुर्गा यांच्या भांडणाचा तमाशा नदीच्या वाळवंटावर नको म्हणून चमकभटजी व नमकभटजी त्यांचा पसारा तेथून हलवितात त्या सुमारास (अंक २ प्रवेश २) नाना आणि बापू तेथे बोलत येतात, या कांहीशा निवांत जागीं त्यांच्यामध्ये घडल्या प्रसंगाबद्दल गंभीर चर्चा होते. दादासाहेबाविरुद्ध जी एक फळी उभारण्याचें नाना फडणिसाच्या मनांत आलें आहे त्याला बापूंसारख्या 'वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व कर्त्या' मुत्सद्याचें साहाय्य त्याला पाहिजे आहे.

बापूंची अडचण, पुरावा नाही --

पुढचें सर्व कांही जमेल. परंतु नारायणरावाचा खून दादासाहेबांनी केला असें चारचौघांत म्हणायला मुत्सद्दी तयार नाहीत; तसें म्हणण्याइतका पुरावा त्यांच्याजवळ नाही व धाडसही नाही. ही बापूंना कोणताही उपक्रम करतांना पहिली मोठी अडचण वाटते. म्हणून दादासाहेबांच्या दुष्कृत्याला तोंड पडून आंतील घाण आपोआप बाहेर पडूं लागेपर्यंत आपण स्वस्थ बसावें" असा बापूंचा पोक्त सल्ला पडतो.

नाना बापूंना दुखवूं इच्छीत नाहीत परंतु "पाप वाहूं लागूं द्या, मग वणांत चोच खुपसून शत्रूला जेरीस आणूं" हा मार्ग कावळ्यांना शोभतो. बापू कर्तुम् अकर्तुम् समर्थ. अशा स्थितींत बापूंसारखे पुरुष जर असे स्वस्थ बसून राहूं लागले तर "लोक असें म्हणतील की नारायणरावसाहेबांचा खून बापूंनीच करविला असल्याशिवाय आनंदीबाईची वेसण बापूंच्या नाकांत बसलेली नाही" असें नाना मोठ्या हिकमतीने बापूंना सुनवावयास सोडीत नाहीत. आणि म्हणूनच बापूंनीच दादासाहेबांच्या पापाला तोंड फोडलें पाहिजे असा नाना आग्रह धरतात.

बापू मुत्सद्दी असले तरी त्यांना अंतःकरण होतें. नरायणरावांच्या खुनामुळे त्यांचें हृदय दुभंगून गेलें होतें. यासंबंधी त्यांच्या तोंडीं खाडिलकरांनी घातलेलें भाषण त्या महान मुत्सद्याच्या मनाचा उडालेला गोंधळ व्यक्त करायला केवढें मोठें उपयोगी पडतें. अशा ठिकाणीं घरगुती व्यवहारांतील भाषा खाडिलकर वापरते तर श्रोत्यांच्या मनावर कितपत प्रभाव पडूं शकला असता याचा रसिकांनी विचार करावयास पाहिजे.

रामशास्त्र्यांचा असहकाराचा मार्ग —

याच सुमाराला रामशास्त्री तेथे येतात आणि "बापू, खुनाला तुमची संमति असली पाहिजे असें कां म्हणूं नये?" असा रोखठोक प्रश्न विचारतात. ज्यांनी खून केला आहे त्यांना दादासाहेबांनीच उच्च पदावर चढविले आणि त्यांनाच बापू पांच लाख रुपये आणि अधिकारभूषणें देण्यास तयार होतात, यावरून दुसरा तर्क काय करणें शक्य आहे, असा त्यांचा कटाक्ष असतो.

नाना फडणीस मुत्सद्दीगिरीने बापूंचा बचाव करूं पाहतात. कारण रामशास्त्र्यांनी उल्लेखिलेल्या पापांत स्वतः नानाही भागीदार होतेच. परंतु रामशास्त्री साफसाफ सांगतात की, ब्राह्मणांकडून रुद्राभिषेक करवून पापाची निष्कृति होत नाही. खून, अन्याय व पाप ह्यांच्या पायावर आधारलेल्या सत्तेचा वरून परमेश्वर व खालून लोक धिक्कार करीत असतात. म्हणून हे आनंदोत्सव, मानमरातब आणि जपजाप्य बंद करण्याचा प्रत्यक्ष मार्ग आपण स्वीकारणार असें रामशास्त्री उद्घोषित करतात. "प्रायश्चित्ताशिवाय कोणा हिंदूने दादासाहेबांची नोकरी करूं नये, कोणीही ब्राह्मणाने धर्मकृत्यें करूं नयेत" असा असहकारितेचा मार्ग आपण स्वीकारणार असल्याचें सांगून "तुम्हां मुत्सद्यांचे मार्ग निराळे, आम्हा शास्त्र्यांचे निराळे; चालूं देत तुमचीं खलबतें" असें ठणकावून रामशास्त्री आपल्या मार्गाला लागतात.

नाना फडणीसांना रामशास्त्र्यांच्या या आवेशांत एका महान तत्त्वाचा आढळ होतो : श्रीमंतीच्या व वतनवाडीच्या आडकाठ्या निःस्पृह विद्वानाच्या आड येत नसल्यामुळे त्याची शक्ति अमर्याद असते आणि नवीन राजे, नवीन मुत्सद्दी, नवीन कारभारी, नवीन सरदार यांना प्रसवणाऱ्या काळाचा तो प्रवर्तक होतो.

लोकशाहीचीं तीन पथ्यें —

युगप्रवर्तक टिळकांची मूर्ति खाडिलकरांच्या पुढे हें लिहितांना होती काय? तें कसेंही असो. पण रामशास्त्र्यांच्या निःस्पृह बाणेदारपणाने बापूंचें मन खुलें होतें. त्यांच्या मनांतली अडचण दूर होते. पुढचे डाव ते भराभर सांगूं लागतात. बारभाईंच्या कारस्थानाची घोषणा ते तात्काळ करतात. या प्रयत्नाचीं तीन पथ्यें खाडिलकरांनी बापूंच्या तोंडून सांगितलीं. (१) नवीन काळाच्या उत्पत्तीचीं सूत्रें रामशास्त्र्यांसारख्या निःस्पृह विद्वानाच्या हातीं; (२) जातिभेदामुळे उद्भवणाऱ्या कलहांना मूठमाती; आणि (३) आपसांतील दुहीने लोकगंगेच्या विजयाचा लय होऊं नये म्हणून परमेश्वराचें साहाय्य.

अजूनही या तीनही गोष्टींचा उदय या भारतांत व्हावयाचाच आहे ना!

रामशास्त्र्यांच्या विरोधाला, अथवा तुळोजी वगैरे म्हणतात त्याप्रमाणे बंडाला बरीच धार येऊं लागली होती. सर्व विद्वानांचा आणि धर्माधिकाऱ्यांचा कट करून त्यांनी राघोबादादाला आशीर्वाद देण्याचें नाकारल्यामुळे पेशवाईचीं वस्त्रें देण्याचा दरबार अजून भरूं शकत नव्हता. तथापि लाचलुचपतीचा प्रयोग करून रामशास्त्र्यांच्या कटांतून नमकशास्त्री – चमकशास्त्री यांच्या साहाय्याने ब्रह्मवृंदांना फोडण्याची खटपट आनंदीबाईने चालविली होती.

पण राघोबाला स्वतःच्या अंगावर पेशवाईचीं वस्त्रें पाहण्याची केवढी घाई झाली होती. शेक्स्पीअरच्या चवथा हेनरी या नाटकांत पुढे पांचवा हेनरी होणारा चवथ्या

हेनरीचा मुलगा, बाप मेला अशा प्रामाणिक समजुतीने, बापाच्या शय्यागृहांतच स्वतःच्या मस्तकावर राजमुकुट ठेवून पाहतो, कसा काय दिसतो तें, असा प्रसंग शेक्सपीअरने चितारला आहे. त्याच प्रकारें, गुपचूपपणें दादासाहेबाने पेशवाईचा पोशाख स्वतःच अंगावर चढविला आणि प्रत्यक्षांत दरबारांत हा योग केव्हा येईल याचीं तो मनोराज्यें करूं लागला. पण त्या पोशाखासह आपलें रूप आरशांत पाहण्यासाठी आरसा वर करायला त्याचा हात धजेना. आणि अखेर मोठा हिय्या करून त्याने आरसा आपल्या-पुढे धरला तर स्वतःच्या आजोबांचे, बाळाजी विश्वनाथांचें दुःखी रूप त्याच्यापुढे उभें राहून, त्यांच्या पूर्वायुष्याप्रमाणे आपलें उत्तर आयुष्य दुःखी जाणार या भीतीने राघोबा दचकतो आणि कापूं लागतो. अशा वेळीं आनंदीबाई तेथे येते.

राघोबाचें पापाने भ्यालेलें चित्त —

भयाचें कारण आनंदीबाई विचारते. परंतु तो म्हणतो त्याप्रमाणे आरशांत आनंदी-बाईला काही बाजीरावाचा चेहरा दिसत नाही. राघोबाला मात्र पुन्हा पाहून तोच चेहरा दिसतो आणि बाजीरावाचा अत्यंत रागावलेला अविर्भाव पाहून राघोबा गर्भगळित होतो.

शृंगारिक लाडिकपणा करून आनंदी त्याच्या मनांतील भीति नाहीशी करण्याचा प्रयत्न करते. आपल्या नेहमीच्याच कौशल्याने खाडिलकरांनी या भागांत शृंगाराच्या रंगतीची सुंदर झलक दाखविली आहे. अगदी जवळून त्याचा पेशवाईचा पोशाख पाहावा म्हणून आनंदीबाई राघोबाला स्वतःजवळ बसवून घेते आणि आपण स्वतः तयार केलेला नवा शिरपेच त्याच्या मस्तकावर घालते. छत्रपतींनी दिलेला शिरपेच माधव-राव व नारायणराव यांच्या उदाहरणांवरून अपेशी असें ठरवून आनंदीबाईने खास स्वतःच्या दागिन्यांमधून हा शिरपेच तयार केलेला असतो. कंठाही नवाच, छत्रपतीं-कडून आलेला नव्हे, ती राघोबाच्या गळ्यांत घालते आणि तरवार त्याच्या हातांत देऊन आता आपलें रूप आरशांत पाहावें अशी लडिवाळपणाने त्याला सूचना करते. राघोबा शृंगाराच्या भरांत येऊन आनंदीबाईला आरसा घेऊन आपल्याजवळ बसविते, तिचा एक हात आपल्या गळ्यांत घालवितो. तिच्या हातांतून आरसा स्वतःच्या हातांत घेऊन तो तिचा हात आपल्या कंठावर ठेवितो. आणि आरशांत आपलें दोघांचें रूप पाह-ण्याचा विचार करतो. परंतु त्याचें पापी मन शंकित होतेंच. म्हणून "या वेळीं तुझ्या शेजारीं मी आणि माझ्या शेजारी तूं दोघांशिवाय कोणीही या आरशांत, दिसतां कामा नये" असें तो मुद्दाम आपल्या मनाला आश्वासन देण्यासाठी म्हणतो.

परंतु आनंदी त्याला बजावीत असतांही त्याच्या मनांत नारायणरावाचा खुनाचा विषय उभा राहतोच. आणि आरशांत त्याला बाळाजी विश्वनाथापासून नारायणरावा-नंतर स्वतःपर्यंत पेशव्यांच्या पुरुषांची मालिका दिसते आणि तो ओरडतो, "प्रत्येकाची मानगुटी एका हाताने पकडून दुसरा हात प्रत्येकाच्या नरडीवर ठेवून सर्व पेशव्यांचे

प्राण तूं घेत आहेस – धावा – धावा – खून – ही आनंदी ध चा मा करून नारायणरावाचा खून करीत आहे !"

आणि अशा रीतीने राघोबाचें पापी मन त्याला घरांतल्या घरांत सुद्धा पेशवाईंचीं वस्त्रें परिधान केलेलीं पाहण्याचा सोहळा अनुभवूं देत नाही.

"आनंदी 'ध' चा 'मा' करून नारायणरावाचा खून करीत आहे" हा दादासाहेबाचा आक्रोश ऐकून एक दासी त्या वेळीं तेथे आंत कसला ओरडा म्हणून पाहण्यासाठी गेली होती. ती दासी आपल्याबरोबरीच्या दुसऱ्या दासींना आणि अटीतटीने भांडणाऱ्या म्हाळसा दुर्गीना, आपण दादासाहेबांना काय म्हणतांना ऐकलें हें सांगत असतांना, नेमके त्याच वेळीं रामशास्त्री, दादासाहेब व आनंदीबाई यांच्यासह तेथे येतात आणि त्यांच्या कानांवर दासीचें तें बोलणें पडून ते म्हणतात,

"दादासाहेब, हा संशय मलाच येतो असें नाही; तर लहानथोर सर्व लोक हाच संशय कुजबुजत असतात."

आनंदीबाई दादासाहेबाचे ते उद्गार स्वप्नांतले म्हणून संपादणी करते.

दादासाहेब आपलें मन उदास झाल्याचें रामशास्त्र्यांना सांगतो. अपशकुन टाळण्यासाठी प्रायश्चित घ्यावें, शांत करावी असा आपला विचार प्रदर्शित करतो.

त्याबरोबर प्रायश्चित्ताच्या विचाराला बगल देण्यासाठी आनंदीबाई शांत, दानधर्म, देवळांचा जीर्णोद्धार वगैरेची नामावली जोरांत उच्चारते आणि दोषावांचून प्रायश्चित्त कशाचें असा पेच रामशास्त्र्यांना टाकते. आणि राघोबा तिला पाठिंबा देतो.

श्रीमंतांना रोज प्रायश्चित्ताची जरूर आहे : इति रामशास्त्री —

रामशास्त्र्यांनाही राघोबा निर्दोषी असल्याचा संभव अगदीच डोळ्याआड करतां येत नाही. परंतु भाऊबंदकीला मुख्य कारण राघोबा आणि भाऊबंदकींतून नारायणरावाचा खून झाला; यासाठी राघोबाने प्रायश्चित घ्यावें असें ते म्हणतात. तेव्हा त्यांची बाजू कचवट आहे हें हेरून आनंदीबाई त्यांच्यावर मोठाच हल्ला चढविते. "अखेरीस आम्ही पेशव्यांच्या गादीवर बसलों एवढ्यासाठीच आम्हीं प्रायश्चित घ्यावयाचें, असेंच ना आपलें म्हणणें ? ... पण श्रीमंती व सत्ता ही परमेश्वरी शक्ति नसून पापाची हंडी असेल तर सर्व श्रीमंतांना आणि सत्ताधिकाऱ्यांना रोज प्रायश्चित्त घ्यावें लागेल." असें ती म्हणते आणि रामशास्त्रीही "गरीबांपेक्षां श्रीमंतांना रोजच्या प्रायश्चित्ताची जरूरी अधिक आहे" हें मान्य करतात.

परंतु असें प्रायश्चित्त घेण्याला आपणाला मुळीच कमीपणा वाटत नसला तरी नारायणाच्या खुनाबद्दल आम्हांला प्रायश्चित्त काय म्हणून हा मुद्याचा प्रश्न राघोबा उभा करतो. "लोकांचा संशय दूर करण्याकरिता तरी प्रायश्चित्त घ्यावें" असें रामशास्त्री म्हणतात. "पण आमचा संशय तरी लोकांना कां यावा ? आम्हीं काय असें लोकांचें घोडें मारलें आहे ?" असें त्यावर आनंदीबाई आवेशाने विचारते.

तथापि तितक्याच आवेशाने रामशास्त्री दादासाहेबाच्या फाजील महत्त्वाकांक्षेने माजविलेल्या आपसांतील दुहीवर बोट ठेवून राघोबाबद्दल लोकांची तक्रार रास्त आहे असें ठणकावतात. रामशास्त्र्यांच्या तर्कशुद्ध आणि निर्भीड प्रतिपादनाचा राघोबाच्या जात्या हळुवार आणि पापभीरू मनावर परिणाम होतो आणि आनंदीबाईची समजूत एकदोन दिवसांत काढून शास्त्रीबुवा ठरवितील त्याप्रमाणे प्रायश्चित्त घेण्याला तो संमति देतो.

रामशास्त्री व दादासाहेब दोघेही मग जातात. परंतु आनंदीबाईची समजूत घालणें ही अशक्य गोष्ट होती. कारण प्रायश्चित्त म्हणजे खुनाच्या अपराधाची कबुलीच. मग त्यांतून लोकसमुदायाकडून देहांत प्रायश्चित्त. ही अनर्थपरंपरा आनंदीबाई चांगली पाहूं शकत होती. आणि मी नाहीच घेऊं द्यायची प्रायश्चित्त, असा ती निर्धार करते.

नानांना अजून विश्वास नाही —

इकडे बारभाईंच्या राजकारणाला उठाव येऊं लागला होता. बापू त्यामुळे खूष होते. परंतु नानांना आनंदीबाईच्या कारस्थानीपणाचें भयंच वाटत होतें. रामशास्त्र्यांपाशी दादासाहेबांनी कबूल केलेली प्रायश्चित्ताची गोष्ट बाईने वाऱ्यावर विरवून टाकली होती. त्याबद्दल नानांच्या मनाला हुरहुर होती. परंतु प्रायश्चित्ताची बावटळ अशी घे म्हटल्या संपेल असें बापूंना वाटत नाही. दादासाहेबाचा लेखी हुकूम प्रत्यक्ष पाह्यला मिळाल्याखेरीज रामशास्त्री या गोष्टीचा पिच्छा सोडणार नाहींत असा त्या म्हाताऱ्या मुत्सद्याचा यथार्थ कयास होता. तथापि मारुतीच्या मंदिरांत शपथेचा कार्यक्रम व्हावयाचा हें ठरल्यापासून नानांच्या मनाला जी आशंका उत्पन्न झाली होती की, दादासाहेबाचें सावज रामशास्त्र्यांच्या हातून निसटणार, ती कांही बापूंच्या या आशावादामुळे शमूं शकली नाही. उलट नमकशास्त्री येऊन शपथेचें नक्की झाल्याचेंच सांगतात. रामशास्त्री या शपथेच्या प्रसंगासाठी यायला निघालेच होते. तेव्हा ते येईपर्यंत चमकशास्त्रीच्या घरीं जरूर सुमेरसिंगाचा थोडा भेद घेण्याचा प्रयत्न करावा या विचाराने बापू नानांसह तिकडे जातात. येथे तिसऱ्या अंकांतील दुसरा प्रवेश संपतो.

तिसऱ्या प्रवेशांत मागे सांगितल्याप्रमाणे ताईताची ओढाताण होण्याच्या दृष्टीने म्हाळसा आणि दुर्गा या चमक-नमक शास्त्र्यांच्या गृहिणींचें मारुतीच्या पुढच्या दक्षिणेसंबंधी कडाक्याचें भांडण आपल्यापुढे दाखविलें जातें. दोघीजणी ताईताच्या गोफाचीं दोन टोकें धरून हिसकाहिसकी करतात. दुर्गा, ताईत मोडेल यंत्र फुटेल, मंत्राचा कागद बाहेर येईल, अशी धमकावणी देते. म्हाळसा, ताईत मोडूं दे, यंत्र फुटूं दे, मंत्राचा कागद बाहेर येऊं दे " असें उत्तर त्याच तालांत देते आणि ओढाओढींत ताईताचीं टोपणें एकमेकांतून निघतात आणि त्या दोघी दोन बाजूला कोलमडून पडतात. " ताईताशीं झोंबाझोंबी, मंतरलेला ताईत – ताईत फुटला " असें चमक-नमकशास्त्री पडद्यांतच ओरडतात. तुळोजीही पडद्यांतूनच " बलभीमाच्या मंत्राचा कागद हातांत घेऊं नका, प्राणास मुकाल " असें ओरडतो. तोच नाना, बापू, रामशास्त्री बाहेरच्या

बाबऱ्या प्रवेश करतात आणि रामशास्त्र्यांच्या हातीं तो कागद पडून तो ते वाचूं लागतात. त्यांनी तो वाचला असें पाहून तुळोजीला भोवळ येते. तो प्राण कासावीस झाल्या-सारखें करून कागद परत मागतो.

त्याचे प्राण कासावीस होऊं नयेत म्हणून रामशास्त्री त्याला तो कागद परत देतात. परंतु त्यांनी हुकूम वाचलेला असल्यामुळे त्यांची पक्की खात्री झालेली असते. तथापि अजूनही, गारद्यांना दिलेल्या हुकुमाचा तो कागद नाही, एका सिद्धाने दिलेला मंत्राचा कागद आहे अशीच बतावणी तुळोजी करतो व कागद फाडून चोळामोळा करतो. सुमेरसिंग त्याला पुष्टि देतो. खरकसिंगही गारद्यांनी हुकूम नाहीसा केल्याचें सांगतो. अर्थात या सगळ्याचा रामशास्त्र्यांवर कांही परिणाम होणें शक्य नसतें. त्यांनी समक्ष तो हुकूम वाचलेला असतो. स्वतःच्या खात्रीशिवाय इतर कसल्या पुराव्याची त्यांना आवश्यकता वाटण्याइतक्या कच्च्या दिलाचे ते नव्हते.

तुळोजीचा शपथेचा विफल प्रयत्न —

परंतु तरीही तुळोजीला वाचविण्याच्या बुद्धीने चमकशास्त्री तुळोजीला मारुतीच्या पायावर डोकें ठेवून शपथ करायला सांगतात की, ताईतांत हुकुमाचा कागद नव्हता. तुळोजीचा शपथेचा प्रयत्न यशस्वी होऊं शकत नाही. मारुतीच्या जागीं त्याला नारायणरावाचें भूत दिसतें. आणि अखेर सुमेरसिंग वगैरे सक्तीने तुळोजीचें डोकें मारुतीच्या पायांवर ठेवूं पाहतात तेव्हा, "मी नाही याच्या पायावर डोकें ठेवणार" असें म्हणून आपण सर्वांनी नारायणरावाचा खून केल्याचें तो बोलून जातो.

त्यावर शपथेचा तो कार्यक्रम पुरे करायला सांगून आपण जें प्रत्यक्ष पाहिलें आणि ऐकलें तें दादासाहेबास सांगण्यासाठी रामशास्त्री तडक शनिवारवाड्याकडे जातात.

यानंतर चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत दादासाहेब व आनंदीबाई यांच्यामध्ये निजामावरच्या स्वारीसंबंधीच्या, कोणाला बरोबर घ्यावें, कोणाला बंदोबस्तासाठी मागे ठेवावें या संबंधीच्या, वाटाघाटी चालू असतात. त्यामध्ये रामशास्त्र्यांनी हुकूम पाहिल्याची गोष्ट सगळीकडे प्रसृत झाली असून जो तो प्रायश्चित कोणतें सांगितलें जाणार याची चर्चा करूं लागल्याची गोष्ट दादासाहेब काढतो आणि व जो तो आपल्याकडे खुनी म्हणून बोट दाखविणार म्हणून विषण्ण होतो. भटांभिक्षुकांना भरपूर दक्षिणा देऊन त्यांचीं तोंडें बंद करावींत, कोणाकोणाला वृत्तिच्छेद करून पोटाला चिमटा बसेलसें करावें; म्हणजे सगळेजण मुक्कामाला आपण पंढरपुरीं जाऊन राहूं तेथे नाक घाशीत येतील आणि प्रायश्चित्ताचा डाव उधळून जाईल हें आनंदीबाईचें बोलणें दादासाहेबास पटतें. पण रामशास्त्र्यांचा विचार मनांत येऊन त्याचे हातपाय गळाठतात. "राजसत्तेला निर्माल्यवत् करण्याची शक्ति एखाद्या बुद्धिवान तपस्व्याच्या अंगीं असावी अं!" हा विचार त्याला बेचैन करून टाकतो.

परंतु आनंदीबाईच्या सल्ल्याने ठरतें की, प्रायश्चित्त घेतों म्हणून तोंडदेखलें कबूल करावें; पण प्रायश्चित्ताची जागा पंढरपूर ठरवावी. तेथे रामशास्त्र्यांना नेऊन पाठीमागे पुण्यास त्यांना निष्प्रभ करावें आणि अशा रीतीने रामशास्त्र्यांचा काटा दूर करावा.

रामशास्त्र्यांची बिनतोड भूमिका —

या सुमारास रामशास्त्री तेथे येतात; आणि रामशास्त्र्यांनी राघोबाला देहांत प्रायश्चित्त सांगितल्याचा भाऊबंदकी नाट्यांतील तो अत्यंत प्रभावी प्रवेश आपल्यापुढे उभा होतो. रामशास्त्र्यांनी स्वतः हुकुमाच्या कागदांत मारावें हें वाचलें होतें. दादासाहेबावर हा खुनाचा आरोप येऊं नये अशीच त्यांच्या मनाची ओढ होती. पण प्रत्यक्ष हुकूम पाहिल्यामुळे ते विचारतात, " मी खोटें कसें बोलूं ? "

त्यावर आनंदीबाई मखलाशी करते की गारद्यांनी किंवा तुळोजीने 'ध' चा 'मा' मागाहून केला नसेल कशावरून ? परंतु " तसें असतें तर स्वतः दादासाहेब, गारद्यांचे सरदार, प्रत्यक्ष हजर असतांना नारायणरावांचा खून होताच ना " हें रामशास्त्र्यांचें निरुत्तर करणारें उत्तर येतें.

तेव्हा या वाटाघाटीपासून फायदा नाही असें म्हणून दादासाहेब ठरल्याप्रमाणे पंढरपुरास जाऊन प्रायश्चित्त घेण्याचा विचार सांगतो व त्यासाठी रामशास्त्र्यांना समक्ष पंढरपुरीं येण्याची विनंति करतो.

परंतु रामशास्त्री म्हणतात, " मी पंढरपुरास कसचा येतों आणि तुम्हांला प्रायश्चित्त देऊन कसचा शुद्ध करून घेतो ! "

या पापाला प्रायश्चित्त, देहांत प्रायश्चित्त —

कारण, या पापाला देहांत प्रायश्चित्ताशिवाय प्रायश्चित्त नाही ! हा रामशास्त्र्यांचा निर्णय होता. आनंदीबाई रामशास्त्र्यांची जीभ छाटण्याची धमकी देते. पण खोटें बोलण्याचा मोह होण्यापूर्वी जीभ छाटली गेली तर बरेंच, असें म्हणून रामशास्त्री पुणें सोडल्याचें जाहीर करतात. तेव्हा शेवटीं रामशास्त्र्यांना पकडून अंधारकोठडींत ठेवण्याचा हुकूम आनंदीबाई देते. पण राघोबाची सद्भावना त्याच्या हातून आणखी हें एक पाप घडवूं देत नाही. रामशास्त्रींनी एकदम आपलें राज्य सोडून निघून जावें एवढाच हुकूम फक्त राघोबा करतो.

अखेर पराभूत होऊन दादासाहेबावर तहनाम्यावर सही करण्याचा प्रसंग येतो. आनंदीबाईचा सही न करण्याचा सल्ला दादासाहेब मानीत नाही. महादजी शिंदेही आनंदीबाईच्या गळाला लागत नाही. कारण त्याची सुद्धा श्रद्धा, " पण रामशास्त्री तर खोटें नाही ना बोलायचे ? " अशीच आहे.

आणि म्हणूनच " या रामशास्त्र्याने अखेर येथेंही आपला दावा साधला तर "

असा आनंदीबाईचा जळफळाट होतो आणि आपल्या गर्भावस्थेंतील मुलाला, बाजीरावाला ती उपदेश करते, "आम्हांला पेशवाईस अंतरावयास लावणाऱ्या बारभाईंचीं घरें जमीनदोस्त करण्यास चुकूं नको. असा सूड उगवितांना बारभाईंबरोबर महाराष्ट्राचेंही वाटोळें करण्याचा प्रसंग आला तरी मागेपुढे पाहूं नको!"

तहनामा होऊन बारभाईंचा विजय होतो. गंगाबाईला पुत्र झालेला असतो. त्याला घेऊन पेशव्यांचा दरबार भरलेला असतो. त्यांत "महाराष्ट्रांत सर्वांची एकी अशीच नांदो व बाल श्रीमंतांबरोबरच बारभाईंच्या कारभाराचें यश रोजचे रोज वाढीला लागो" अशी रामशास्त्री परमेश्वराची करुणा भाकतात आणि महादजी शिंद्यांनी आणलेला तहनाम्याचा कागद बाल श्रीमंतांच्या चरणीं अर्पण करतात.

आणि येथें हें नाटक संपतें.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे या नाटकावर ज्यूलियस सीझर या शेक्सपीअरच्या नाटकाची छाया पडलेली आहे. त्या नाटकांत सीझर मारला गेला, परंतु लोकांची सीझरविषयीची निष्ठा मेली नाही. त्या निष्ठेच्या बळावर ॲन्टनीला जनतेचा उठाव करतां आला आला, ब्रूटस व त्याचे मदतनीस यांचा पाडाव करतां आला. प्रतीकरूपाने त्या नाटकांत सीझरचें भूतही दाखविलें आहे. सीझर मरतो पण सीझरच्या गादीचें भूत मरत नाहीं. तोच भाव या नाटकांत खाडिलकरांनीही वठविला आहे. अर्थात, नारायणराव मारला जातो आणि पेशव्याच्या गादीच्या निष्ठेने बारभाईंचें राजकारण जन्माला येऊन त्याला यश मिळतें; नारायणरावाचें भूतही सीझरच्या भुताप्रमाणे या नाटकांत डोकावते; एवढ्यापुरतेंच हें साम्य आहे. नारायणराव कांही सीझरप्रमाणे मातब्बर राजपुरुष नाही; किंवा सीझरच्या ठिकाणीं राजसत्ता एकवटून तो हुकूमशहा होईल या भीतीने त्याच्या वधाला संमति देणारा तत्त्वज्ञ लोकशाहीप्रेमी ब्रूटस जसा ज्यूलियस सीझरमध्यें आहे तसा कांही या नाटकांतला नारायणरावाच्या वधाला संमति देणारा राघोबादादा नाही. परंतु माणूस मारून माणसाचें व्यक्तिमत्व किंवा अधिकारपद मरत नाही या तत्त्वापुरतें आणि लोकांच्या उठावामुळे खुनी लोकांचें राजकारण अपेशी होऊन खुनी लोकांचें पारिपत्य होतें व मृत व्यक्तीवरची निष्ठाच यशस्वी होते एवढ्यापुरतें हें साम्य खास उल्लेखनीय आहे.

नाटकांतील झगड्याचें बीज—

कारण त्यामध्येच या नाटकाचें बीज आहे. नारायणरावाचा खून करणारा राघोबा व त्याचा पक्ष यांच्याविरुद्ध पेशवाईची व महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची इभ्रत संभाळणारे लोकगंगेचे प्रतिनिधि बारभाई यांच्यामधील झगडा हें या नाटकाचें स्वरूप आहे. लोकगंगेला आपण भ्यालें पाहिजे हें पहिल्या अंकांतच नाटककाराने स्वतः राघोबाच्या तोंडून वदविलें आहे.

याच्या जोडीला खाडिलकरांच्या नित्याच्या रीतीप्रमाणे या नाटकांत गेल्या दोन पिढ्यांमागच्या पक्षभेदावर आधारित खुसखुशीत उपहास करण्याचा अट्टाहास खाडिलकरांनी केलेला आहे. त्याच्याच भरीला ऐतिहासिक कालांतील सामाजिक गुणदोष दाखविण्याची खटपटही त्यांनी, आपण हें ऐतिहासिक नाटक लिहीत आहों या जाणिवेने, यशस्वीपणाने केलेली आहे. या दोन्ही दृष्टींनी, विशेषतः ऐतिहासिक गुणदोषांचें विवेचन आणि भविष्यकालीन दृष्टिफेक या दृष्टीने, या नाटकाचें महत्त्व असाधारण आहे.

राघोबाच्या चरित्रांत करुण नाटकाची भरपूर सामुग्री—

परंतु याचमुळे राघोबादादाच्या स्वभावचित्रणालाच सर्व महत्त्व देऊन हें नाटक लिहिलें गेलेलें नाही. वस्तुतः राघोबादादाच्या स्वभावांत, त्यानें केलेल्या कृत्यांत व त्याच्यावर ओढवलेल्या प्रसंगांत करुण नाटकाचीं बीजें व सामुग्री भरपूर आहे. राघोबा महत्त्वाकांक्षी आहे; महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी पडेल तें अघोर कर्म करण्याची त्याच्या मनाची तयारी आहे. पण हाच राघोबा भावनावश आहे; पूर्वइतिहास, परंपरा यांना जाणणारा व भिणारा आहे; पापभीरू आहे, प्रेमळ आहे; शूर पण विलासप्रिय आहे. पण हे गुण त्याच्या महत्त्वाकांक्षेपायी मातीमोल होतात. स्वतःच्या पराक्रमाच्या दृष्टीने पेशवाईपद आपल्याला मिळावें हें त्याला न्याय्य वाटतें. योगायोगाने तो धाकटा भाऊ झाला हें शल्य त्याला सहन होत नाही. आणि म्हणून सतत पेशवाईत दुही माजवून पेशवाईपद आपल्या हातीं मिळविण्याची खटपट तो करीत राहिला. माधवराव पेशव्यापुढे त्याचें कांही चाललें नाही; त्याला पराभूत व्हावें लागलें, कैदेंत पडावें लागलें. त्याने त्याचें अंतःकरण डिवचलेलें होतें, पराभवाची आग त्याच्या चित्तांत होती. त्यामुळें तर त्याचे गुण मातीमोल झालेच; पण त्याची पत्नी आनंदीबाई हिने त्याचा अधःपात घडवून आणण्याच्या कामीं आपल्या लोभी, खुनशी आणि सैतानी स्वभावाने जेवढें कांही करणें शक्य होतें तेवढें केलें. परिणामीं राघोबाचा अधःपात झाला, चांगल्यांचा त्याच्याशीं विरोध निर्माण झाला, दुःख भोगावें लागलें, परधार्जिणेपणा पतकरून इंग्रजांच्या आश्रयाला जाऊनही उपयोग झाला नाही, देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा ऐकण्याचा प्रसंग आला आणि शेवटीं अपमानास्पद तहनामा स्वीकारून जीव घेऊन पळून जावें लागलें.

राघोबाचा मॅकबेथ करतां आला असता —

अशा रीतीने ही एक चांगली शोककथा होती. ब्रूटस नव्हे, पण राघोबाचा मॅकबेथ बनविणें खाडिलकरांना सहज शक्य होतें. तसा कांहीसा त्यांचा विचार असावाही. बँकोचें भूत, राघोबादादाला आरशांत पूर्वज दिसणें; नारायणरावाचें काका काका ओरडणें ऐकूं येणें, मॅकबेथमधील दारावरील थाप; इत्यादि गोष्टी या दृष्टीने सूचक आहेत. आणि आनंदीबाई तर प्रति लेडी मॅकबेथच आहे. तिनेच राघोबाची महत्त्वाकांक्षा फुलवून

त्याच्या हातून पापकृत्य करविलें आहे; आणखी पापकृत्यें करून पूर्वीचें पापकृत्य पचवावें कसें याचा सल्लाही दिला आहे. लेडी मॅकबेथ माझें पोर मी आपटलें असतें म्हणते तर आनंदीबाई नवऱ्याचा मृत्यू इच्छून कुंकू पुसून टाकण्याचा आक्रस्ताळेपणा करते हें साम्य विशेष उल्लेखनीय आहे.

पण रामशास्त्र्यांच्या चित्राने खाडिलकर प्रभावित --

परंतु बारभाईंचें राजकारण व त्याचा विजय हाच नाटकाचा मुख्य बिंदु कल्पिल्यामुळे खाडिलकर राघोबाचा मॅकबेथ करूं शकले नाहीत. आणि खुद्द इतिहासांत तसा कांहीच आधार नसल्यामुळे ज्यूलियस सीझरमधील ब्रूटसही त्यांना राघोबामध्ये निर्मितां आला नाही. मनावर ज्यूलियस सीझरचा प्रभाव असल्यामुळे भाऊबंदकींत ॲन्टनी व त्याचे साथीदार यांच्यार्शी समान असे नाना, बापू वगैरे मंडळी सहजच आली. पण मराठ्यांच्या इतिहासांत खाडिलकरांना शेक्स्पीअरला उपलब्ध नव्हती अशी एक महान व्यक्ति सापडली; ती म्हणजे रामशास्त्री. रामशास्त्र्यांचे निस्पृह बाणेदार चित्र रेखाटण्याचा मोह खाडिलकरांसारख्या प्रतिभावंताला झाला नसता तरच नवल. आणि हें चित्र रेखाटण्यांत त्यांनी आपलें जणू सर्व कौशल्य खर्ची घातलेंही.

नाटक राघोबाचें की रामशास्त्र्यांचें ? —

परंतु त्याचमुळे हें नाटक रामशास्त्रींचें की राघोबाचें, असा संभ्रम निर्माण होतो. त्यामुळेच राघोबादादा हा एक चांगला करुण नायक होण्याजोगा असतांहीं खाडिलकरांचें त्याच्याकडे बरेंचसें दुर्लक्ष झालें. आणि म्हणून मराठी वाङ्मयांतील एक नमुनेदार व अविस्मरणीय करुण नायक इतकें रसरशीत स्वरूप राघोबादादाला प्राप्त झालें नाही.

तरीसुद्धां, खाडिलकरांनी त्याचें जें चित्रण केलें आहे त्यामध्ये त्याच्या पूर्व पराक्रमाचा किंवा मोठेपणाचा कोणताही प्रसंग रेखाटण्याचें त्यांना प्रयोजन वाटलें नाही. नुसत्या उल्लेखावरच तें काम त्यांनी भागविलें आहे हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. कारण त्याचीं पापी आणि हीन कृत्यें व मनोभूमिका यांचाच आविष्कार करणें हें त्यांनी आपलें मुख्य साध्य मानलें. अशा पापी राघोबाबद्दलही आनंदीबाईइतका तिरस्कार आपल्याला वाटूं नये यासाठी त्याच्या ठिकाणच्या नाजूक आणि पापभीरू वृत्तीचें मात्र त्यांनी वेळोवेळीं आपल्याला दर्शन घडविलें आणि म्हणूनच या गृहस्थाच्या हातून हें पाप घडायला नको होतें अशी आपल्या चित्तांत हळहळ कायम ठेवण्यांत खाडिलकरांनी चांगलें यश मिळविलें.

नाटकांतील भाषेच्या रेखीव-ताशीवपणाविषयी संदर्भानुसार लिहिलेंच आहे. जास्त तपशीलवार चर्चा चारी नाटकांचा एकत्र विचार करतेवेळीं करूं.

३ : मोहना - प्रतापराव

मोहना ही खाडिलकरांच्या "कांचनगडची मोहना" या नाटकाची नायिका

ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेली ही एक नितांत करुण कहाणी आहे. 'सवाई माधवरावाचा मृत्यू' प्रमाणे या नाटकावर खाडिलकरांचा विशेष सफाईचा हातही फिरलेला आहे असें वाटत नाही. दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी महत्त्वाचे फेरफार केल्याची नोंद प्रस्तावनेंत आहे. तरी १९०६।७ च्या सुमारास आणि त्यानंतर खाडिलकरांच्या लेखणीला जी एक विशेष धार आली तिचा लाभ या नाटकाला झाला आहे असें म्हणवत नाही.

तालिकोट येथे विजयानगरचा राजा रामराव याचा पराभव झाल्यानंतर सोळाव्या शतकाच्या अखेरीस विजयानगरचा एक सरदार प्रतापराव जाधव याने पुन्हा मराठ्यांची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी कांचनगडासारखा एक बुलंद किल्ला मोठ्या झुंजार सामग्रीनिशी सज्ज करून चालविलेला विजापुरविरुद्ध लढा आणि त्यांत फितुरी मराठा सरदारांनीच विश्वासघाताने केलेला प्रतापरावाचा व त्याच्या पत्नीचा करुण अंत अशा प्रकारची ही करुण कहाणी आहे. परंतु या कहाणीचा प्रतीकात्मक उपयोग करून छत्रपतीनंतरच्या स्वातंत्र्यकालीन गुलामी वृत्तीच्या आणि अगदी अर्वाचीन काळच्या परधार्जिण्या वृत्तीच्या भारतीयांचा जळजळीत उपहासही साधण्याची खटपट खाडिलकरांनी या नाटकांत केलीच आहे.

मोहना विरुद्ध तिने नकार दिलेला हंबीरराव —

यमुना आणि मोहना या दोन बालमत्रिणी कांचनगडावर पांच वर्षांनी एकमेकींना भेटतात. मोहना ही कांचनगडावर बंडाचें निशाण फडफडावणारा प्रतापराव याची पत्नी. यमुना विजापुरचा सरदार हंबीरराव याची पत्नी. हा हंबीरराव कांचनगडावर, बाहेर दुसराच कांही बहाणा करून, परंतु खरें म्हणजे मोहनेला हस्तगत करावी या हेतूने आलेला असतो. हंबीररावाने यमुनेशीं लग्न करण्यापूर्वी मोहनेला मागणी घातलेली होती; मोहनेने ती नाकारली होती. हंबीररावाचा त्यामुळे फार मोठा हिरमोड झालेला असतो; व हें शल्य नाहीसें करण्यासाठी तो गडावर आलेला असतो. एवढी गोष्ट नाटकाच्या पहिल्या प्रवेशांत व्यक्त होते. त्यातच हंबीररावाचा मोहनेशीं झगडा सूचित होतो.

कांचनगडावर प्रतापरावाशीं आंतून कट करण्याच्या मिषाने हंबीररावाने प्रवेश मिळविलेला असतो. नाहीतर विजापुरच्या एका सरदाराला कांचनगडावर पाय ठेवायला मिळालाच नसता. प्रतापरावाचा दोस्त व सहकारी दौलतराव हंबीररावाशीं जपून बोलणें करण्याबद्दल प्रतापरावाला सावध करीत असतांही आणि मी वाटाघाट करीतच नाही असें स्वतः प्रतापराव म्हणत असतांही विजापुरच्या बाजूचे सरदार दिसतांच प्रतापरावाचा पारा चढतो; आपण बोलून आपली मसलत बिघडवितो की काय याचें त्याला भान राहत नाही. जितका त्याचा स्वभाव ज्वलंत आणि स्वाभिमानी आहे तितकाच त्याचा स्वभाव उतावीळ आणि अव्यवहारी आहे हें पहिल्या अंकाच्या

दुसऱ्या प्रवेशांतील त्याच्या रसरसणाऱ्या भाषणांवरून उघड होतें. त्याच्या अव्यवहारी-पणाचाही नमुना तेथेच पाहायला मिळतो. हंबीररावावर पहिल्या प्रतीचे गुलाम अशी सरबत्ती उडविणारा प्रतापराव हंबीररावाच्या मायावी भाषणाला भुलून लगेच त्याच्यावर विश्वास टाकतो आणि किल्ल्याखाली छावणी ठोकलेल्या खानावर हल्ला करण्याचें त्याला वचन देतो. म्हणूनच प्रतापरावाचा साथी दौलतराव त्याला म्हणतोही, "एक घाव की दोन तुकडे ही पद्धत मला नाही पसंत. उतावीळ होतां कामा नये. तुम्हांला कोणत्याही गोष्टीचा संशय हा येतच नाही. तुम्हांला कोणाचेंही म्हणणें एकदम खरें तरी वाटतें किंवा खोटें तरी वाटतें.

मोहनेच्या सुखी संसारावरचें आणखी एक ग्रहण—

येथून प्रतापराव आपल्या अर्धांगीकडे जातो. तेथे यमुना आणि मोहना यांचा एकमेकींशीं चाललेला हास्यविनोद पाहून प्रतापरावाच्या मनावर खिन्नतेची लाट पसरते. कारण, इतकी आनंदाने बेहोष झालेली मोहना वस्तुतः खरी सुखी नाही ही कल्पना त्याचें चित्त अस्वस्थ करते. ध्येयवादी, स्वातंत्र्योत्सुक, लढवय्या पुरुषांबरोबरचें स्त्रियांचें जीवन म्हणजे एक मोठें दुःखच, इतकें की, "जगांत कोणीच सुखी असूं नये, मोहनेने देखील आनंदी राहूं नये" असाच ईश्वरी संकेत असावासा दिसतो" असें म्हणण्या-इतका कडवटपणा प्रतापरावाच्या मनांत उत्पन्न झालेला असतो.

हें एक मोहनेच्या संसाराला लागलेलें आणखी ग्रहण; एक तिच्या प्रेमाने वेडा झालेल्या विश्वासघातकी हंबीररावाचें; आणि दुसरें ज्याला सदैव हातावर शिर घेऊन झुंजण्याचें व्रत चालवावयाचें आहे अशा प्रतापरावाशीं तिचें जीवन जखडलें गेलें होतें हें. यांतच प्रतापराव अनाहूतपणें पुढच्या अरिष्टाचें भविष्यच जणू बोलून जात आहे.

प्रतापरावाची आयुष्यांतील सर्वांत मोठी चूक ? —

म्हणूनच मोहनेबरोबरच्या अत्यंत मधुर अशा शृंगाराच्या प्रवेशाच्या अखेरी-अखेरीस प्रतापराव कडवटपणाने म्हणतो, "मोहने, तुला खरें सांगूं का ? मोहना माझी राणी ज्या वेळीं झाली त्या वेळीं माझ्या आयुष्यांतील सर्वांत मोठी चूक मीं केली असें मला वाटतें."

मोहनेवर जणू हा वज्राघातच होतो. आपलें चुकतें तरी कोठें हें तिला कळत नाही. परंतु तिची चूक नसतेच. पातशहाच्या जुलुमाचें जूं झुगारून देण्याचे हाडा-मासांत भिनून राहिलेले बेत, 'लग्नपाशांत अडकूं नकोस, लग्नपाशांत सापडूं नकोस' असें ओरडत असतां त्याने मोहनेच्या मोहांत मन अडकूं दिलें हीच त्याची चूक त्याला खिन्न करीत होती.

त्या वेळीं हें सगळें उसळून यावयाचें कारण आता लढाई जुंपण्याचा क्षण अगदी जवळ आल्यामुळे त्याला मोहनेच्या सुरक्षिततेची काळजी पडलेली असते. आणि

म्हणून अशा वेळीं तिने माहेरीं जाऊन राहावें हें सुचवायला तो आलेला असतो. पण मोहनेला त्याची सूचना पसंत पडत नाही. सीतेने जसा रामाबरोबर वनवासांत जाण्याचा हट्ट घेतला तसा आणि जवळ जवळ तशाच शब्दांत मोहनाही नवऱ्याबरोबरच सर्व संकटांत राह्यचा निर्धार प्रकट करते; नव्हे, सीतेचा आणि दमयंतीचा ती स्पष्ट उच्चारही करते.

कर्तव्य आणि लग्नपाश यांतील झगडा —

कर्तव्य आणि लग्नपाश यांच्यांतील झगड्याचें या नाटकांतलें बीज हें असें स्पष्ट होतें. लग्नपाश कर्तव्याच्या आड न येऊं देण्याइतकें वीरपत्नीत्व मोहनेच्या अंगीं होतें. तसा तिचा विश्वास होता; अनुभवही तसा आला. पण यांतून जो अग्निडोंब उसळला त्यांत हीं दोघें भस्म झालीं. सीता आणि दमयंती यांचा उल्लेख भावी अनर्थ-सूचकच ठरला !

कारण, नेमकें मोहनेचेंही रूपच तिच्या नाशाला कारण घडतें. त्याचमुळे हंबीर-रावासारखा रावण कांचनगडावर प्रवेश मिळवितो, तिच्यासाठी कपटकारस्थान रचतो, त्यामध्ये प्रतापरावावर संकट आणतो आणि अखेर भ्रांत होऊन प्रताप राव – मोहना यांच्याबरोबरच स्वतःचाही नाश करून घेतो.

प्रतापरावाचा अव्यवहारी फाजील विश्वास घातक —

प्रताप राव जसा उतावीळ, अव्यवहारी होता, तसाच किंबहुना जास्त तो कोणावरही फाजील विश्वास टाकणारा होता. याचें एक अत्यंत दुर्दैवी उदाहरण म्हणजे किल्ल्या-वरील भक्कम दारूगोळ्याच्या संरक्षणाची जबाबदारी दादासाहेबासारख्या एका मूर्ख, नादान म्हाताऱ्यावर त्याने सोपविलेली असते हें होय. या माणसाच्या, अफू ओढणें व दारू पिणें या व्यसनांचा गैरफायदा हंबीररावाचा दुय्यम पंचहजारी सरदार पिलाजी-राव माने हा हा म्हणतां करून घेतो. त्यांतच तो दादासाहेबाची म्हातारपणची पाटाची तरुण बायको लक्ष्मी – छिनाल लक्ष्मी – हिला वश करून घेऊन आपल्या दुधारी कारस्था-नाची उभारणी यशस्वीपणाने करतो. एका बाजूला त्याला परस्पर खानाचाही नाश झाला तर हवा होता. त्याचबरोबर हंबीररावही विजापुर–विरोधी म्हणून पटला जावा आणि त्याच्याऐवजी मोहिमेचें श्रेय स्वतःला – आपल्याला मिळावें व वर साधल्यास यमुना व मोहना या दोघींचाही कबजा करतां आल्यास पाहावें असा त्याचा दुसरा डाव होता.

खुळ्या लक्ष्मीकडून पिलाजीरावाने दारूचें कोठार तोफेची खूण होतांच उडवून सबंध कांचनगडचा नाश करण्याची योजना आखून ठेवली होती. प्रताप राव किल्ल्या-खाली खानावर हल्ला करण्यांत गुंतला असतांना नेमका दारूच्या कोठाराचा स्फोट व्हावा आणि प्रतापरावाचाही काटा अशा रीतीने आयता निघावा अशी पिलाजीरावाची हिकमत होती.

याबद्दलची शंका सुद्धा मनांत येऊं नये इतका प्रतापराव गाफील होता. इतका त्याने हंबीरराव व पिलाजीराव यांच्यावर नितांत पण घातकी विश्वास टाकला होता.

प्रतापराव आणि दौलतराव यांच्यामधील फरक —

ठरल्याप्रमाणें खानातर्फे प्रतापरावाकडे शरणागतीची मागणी करण्यासाठी म्हणुन विजापुरचा सरदार राघोजीराव येतो. त्याच्याशींही पूर्वीच्या उखाळ्यापाखाळ्या काढून प्रतापराव एकेरीवर येतो आणि अखेर, वकील या नात्याने आलेल्या राघोजीरावाला हकलून देतो. तेव्हा दौलतरावाने म्हटल्याप्रमाणे "आजच्या या कृत्याने प्रत्यक्ष लढाईलाच सुरुवात केली." दौलतराव लगेच आपल्या कटांतील सरदारांना ही वार्ता देऊन तयार ठेवण्याच्या उद्योगाला लागतो. प्रसंग खरोखर मोठा गंभीर असतो. पण अशा वेळींच प्रतापरावाच्या आनंदाला मोठा बहर येतो. आपल्या आनंदाचें स्वरूप आपल्या स्वगत भाषणांत तो असें वर्णन करतो,

"विजापुरकरांनी विजयानगरचें राज्य बुडविल्यानंतर पातशहाचे गुलाम होऊन सरदारकीचीं सुखें भोगण्यापेक्षा तरवारीच्या तीक्ष्ण धारेवर चालत जाऊन सूड उगविण्याचा प्रयत्न करणें जाधव कुळांतील पुरुषाला अधिक प्रियच वाटलें पाहिजे. समरांगणावर मरण येऊन सर्व घराण्याचा नायनाट झालेला पत्करला; पण तुझ्या अधिकाराचें जूं आम्ही असें फेकून देतों म्हणून पातशहाला सांगण्याचा प्रसंग विजयानगरच्या सरदारांनी आनंदाचाच मानला पाहिजे !"

धीरगंभीरपणें आणि जबाबदारी ओळखून लढाईच्या पूर्व तयारीला लागलेला दौलतराव आणि आपल्याच स्वप्नरंजनांत गुंग होऊन राहणारा प्रतापराव यांमधील फरक या प्रसंगाने किती स्पष्ट होतो.

प्रतापरावाच्या उतावीळपणाची मोहनेलासुद्धा कल्पना आहे. त्यामुळे या लढाईच्या विचाराने ती बेचैनच असते. आपले वडील या वेळीं येथे असायला पाहिजे होते म्हणजे प्रतापरावाच्या उतावीळपणाला आळा घालणारें कोणीतरी आहे असा भरवसा वाटला असता. परंतु आपल्याच पतीची शंका घेऊन वडिलांना असें पत्र परस्पर पाठविणें योग्य होणार नाही ही शंका तिला तसें करूं देत नव्हती. परंतु आपल्या विश्वासू दासीच्या सल्ल्याने अखेर तसें पत्र घेऊन ती दासीला पाठविते.

हंबीरराव प्रेमवेडा होतो —

प्रतापरावाला नसला तरी मोहनेला हंबीररावाबद्दल संशय खास होता. विशेषतः यमुनेशीं तो नीट वागत नाहीं आणि तेंही आपल्या कारणावरून ही कल्पना आल्यापासून त्याचा या लढाईशीं असलेला संबंध तिला अपशकुनीच वाटत होता. आणि त्यामुळे हंबीररावाला टाळायचाच ती प्रयत्न करीत होती. परंतु चंपा तें पत्र घेऊन गेली ही वेळ नेमकी प्रतापरावाने गाठली आणि मोहनेची तो प्रेमयाचना करूं लागला. जाधवांच्या—

प्रतापरावाच्या—कटांत आपल्याला काळसर्प करणें किंवा साधु करणें सर्वस्वी मोहनेवर अवलंबून आहे अशीं तिचीं तो आर्जवें करूं लागला. त्याने यमुनेशीं सरळ वागावें शौर्य गाजवावें, त्याचेही मुलगे प्रतापशाली व्हावे, वगैरे सद्भावाच्या गोष्टी मोहना त्याला सांगते. पण पालथ्या घागरीवर पाणी. यमुनेशीं आपण पतिपत्नीसंबंधही ठेवला नाही, असें सांगून तो मोहनेशीं लगट करूं पाहतो. पण तिने दटावल्यानंतर मात्र अतिप्रसंग करण्याची त्याची छाती होत नाही. तो दूर होतो आणि मोहना निघून जाते.

परिणाम मात्र असा होतो की आडदांडपणाने मोहना मिळणार नाही अशी हंबीररावाची खात्री होते. आणि प्रेमाच्या भाळवणीशिवाय दुसरा मार्ग नाही हें उमजून तो प्रेमवेडाच होतो.

प्रतापरावाला हंबीररावाचा हा अतिप्रसंग सांगून हंबीररावाचा बंदोबस्त करावा या विचाराला मोहना संमति देत नाही. आपल्या कारणामुळे प्रतापरावाचा डाव फसला असें होऊं नये, हंबीरराव व पिलाजीराव यांनी बिथरून किल्ल्याच्या वाटाच रोखून धरूं नयेत यासाठी अद्यापि तरी ही गोष्ट तशीच दडपून ठेवायची असें दौलतरावाजवळून मोहना कबूल करून घेते.

पिलाजीरावाला हवी ती संधि—

पिलाजीराव हिकमतीने प्रतापरावाला किल्ल्याच्या बाहेर काढण्याच्या खटपटींत होता. खानाचें सैन्य फक्त चारपांच हजार. पिलाजीराव अथवा हंबीरराव यांचीं सैन्यें गप्प राहतील. तेव्हा रात्रीं छापा घालून खानाचें सैन्य कापून काढावें अशी मोठी साळसूद धाडशी योजना पिलाजीरावांने सुचविली. पण त्यासाठी गडावरून खाली सैन्य कशाला पाठवायला पाहिजे ? आयतें पिलाजीरावांनी व हंबीररावांचें सैन्य खाली होतेंच. तेव्हा त्यांनीच हें काम उरकावें, असा दौलतरावाने तिढा घातला. परंतु आपल्या सैनिकाना कटाची वार्ता नाही, तेव्हा त्यांना असा हुकूम दिल्यास गोंधळ माजेल; म्हणून प्रतापरावांच्या सैन्यानेच तें काम उरकावें हें पिलाजीरावाचें म्हणणें दिसायला तरी सुंदर दिसत होतें. परंतु दौलतरांवाचा पिलाजी-हंबीररावाविषयीचा संशय नाहीसा होत नाही. शेवटी हंबीरराव व पिलाजीराव यांना किल्ल्यावर ओलीस ठेवण्याच्या अटीवर दौलतराव किल्ल्याखालच्या हल्ल्याला संमति देतो.

परंतु हंबीरराव गडापाशी येऊनही गडाच्या आंत मुक्कामाला जायला तयार होत नाही. कारण, जेथे मोहना मिळण्याचा संभव नाही तेथे जाण्यांत त्याचें मन उल्हसित नाहीं. तथापि मोहनेने त्याच्या अतिप्रसंगाची वाच्यता केली नाही या गोष्टीवरून आंतून तिचें मन हंबीररावाला अनुकूलच आहे; तेव्हा त्या रात्रीच्या बेताला तेवढें हंबीररावाने साह्य करावें म्हणजे दुसऱ्या दिवशीं मोहना हंबीररावाची झालीच असा पिलाजीराव हंबीररावाला भरीं घालतो. आणि हंबीरराव नाखुषीनेच त्याच्याबरोबर किल्ल्यांत प्रवेश करतो.

तेथें दौलतराव व प्रतापराव त्यांची वाटच पाहत होतें. ते दोघे छाप्यावर जाणार होते. रंभाजीरावांनी तोपर्यंत पायथ्याचें संरक्षण करायचें आणि संताजीरावांनी गडाचें संरक्षण करायचें हा आपला बेत प्रतापराव खुशाल पिलाजीला सांगून टाकतो. आणि सैन्याला उद्देशून उत्तेजनात्मक भाषण करतो.

ओलीस म्हणून पिलाजीराव – हंबीररावांना ठेवलें यावर दौलतराव विसंबून होता. परंतु यांत पिलाजीरावाला जें हवें तेंच मिळालें होतें. लक्ष्मीला फितवून दारूच्या कोठाराला आग लावण्याचें त्याचें कारस्थान पुरें करायला त्याला त्यामुळे आयतीच नामी संधि मिळाली होती.

चवथ्या अंकांत मोहना पश्चिम बुरुजावर उभी राहून छाप्याचें काम आटोपून प्रतापराव अजून कां परत येत नाही याची थोडी विवंचना करीत असते. हंबीरराव ओलीस म्हणून गडावरच असल्यामुळे दगाफटक्याची भीति तिला वाटत नव्हती. परंतु हंबीररावाबद्दलच्या हा विचार तिच्या मनांत यायला आणि हंबीरराव त्या ठिकाणीं यायला एक गांठ पडते.

रात्रीची वेळ, आपण एकटी; यामुळे मोहनेला मोठी काळजी वाटते. हें वेड सोडून क्षात्रतेज जगाला दाखविण्याचा उपदेश ती हंबीररावाला करते. परंतु तुझ्या हस्तस्पर्शाशिवाय माझ्यांतलें क्षात्रतेज उत्तेजित होणार नाही असें म्हणून तो मागच्या वेळेप्रमाणे तिच्याशीं लगट करण्याच्या उद्देशाने तिच्याजवळ जाऊं लागतो. मोहना त्याला दरडावते. या कांचनगडावर मोहना एकटी असली तरी तिच्या वाटेस जाण्याने तुम्ही स्वतःवर भयंकर शिक्षा ओढवून घ्याल, असें त्याला धमकावूं जाते. तोच पिलाजीरावाचा हेतु सिद्धीस जाऊन दारूचें कोठार पेट घेतें – स्फोटाचा मोठा आवाज होतो आणि " आतां कांचनगडाला कोण भिणार ? " असें हंबीरराव उत्साहातिरेकाने म्हणतो.

प्रतापराव आणि मोहना – दोघेही दुर्दैवी —

या दग्याच्या जाणीवेने मोहनेच्या हृदयाचें पाणी पाणी होतें. ती हंबीररावाला कटु वाक्प्रहार करते. आपल्यामुळे कांचनगडाबरोबरच आपल्या पतीचे सर्व मनसुबे कोसळून पडावे याचा तिला अनावर शोक होतो.

हंबीरराव तिला शांतवूं पाहतो. गंगेच्या तीरावर असे हजार कांचनगड बांधण्याच्या गोष्टी बोलतो; आणि तिच्याजवळ जाऊं लागतो; अधिक जवळ जाऊन तिला पकडूं पाहतों. तशी मोहना बुरुजाच्या खाली होऊन फक्त एका हाताने कठडा धरून खाली उडी घेण्याच्या पावित्र्यांत उभी राहते. हंबीरराव केसभर जरी पुढे झाला असता तर तिने कठड्याचा हात सोडून आपला देह टोकावरून खोल खाली फेकून दिला असता.

परंतु त्याच वेळीं पिलाजीराव तेथे येतो आणि जवळजवळ ओढून हंबीररावाला तेथून घेऊन जातो. कारण, प्रतापरावाचा तिकडे जय झाला होता. तेव्हा तो वर येण्यापूर्वी त्या दोघांनी गड सोडून खाली जायला पाहिजे होतें. नाहीतर जीव जायची पाळी; मग मोहना कोठली !

इकडे मोहना स्वतःच्या सुटकेचा निःश्वास क्षणभर टाकते खरी. पण आपल्यामुळे आपल्या पतीच्या साऱ्या आकांक्षाचा चक्काचूर झाल्याची जाणीव होऊन ती पुन्हा वेड्यासारखी होते आणि म्हणते,

" देवा ! मला जन्माला घालून, माझ्यामुळें, माझ्यापायी त्यांच्यासारख्या नरवीरांच्या हालअपेष्टेस प्रारंभ केलास त्यापेक्षा मला जन्मालाच घातली तसतीस, तर फार बरें झालें असतें ! "

दोघेंही दुर्दैवी; आपण लग्न करून विनाकारण या साध्वी स्त्रीला दुःखाच्या खाईंत लोटली असा खेद करण्याची पाळी प्रतापरावावर आली होती; तर आपल्या सौंदर्यामुळे आपल्या शूर पतीचे सर्व मनसुबे ढासळतांना पाहून तिला वेडें होण्याची पाळी आली होती.

प्रतापराव बेहोष होतो —

विजापुरचा प्रतिनिधी खान मारला गेला. हंबीररावाला तर प्रत्यक्ष वेडच लागलें. या संधीचीच पिलाजीराव वाट पाहत होता. ती मिळतांच सरलष्कराचा हुद्दा तो आपल्याकडे घेतो आणि मोहनेला आणून हंबीररावापुढे उभी करा म्हणजे हंबीरराव बरे होतील असें सांगून हंबीररावांच्या सरदारांचा विरोध नाहीसा करतो. स्वतःच्या नांवाची सरलष्कर म्हणून ग्वाही फिरविण्याची तो व्यवस्था करतो आणि राघोजीरावाला आपल्या कटांत घेऊन विजापुरीं हंबीरराव वेडा न ठरतां प्रतापरावाला सामील म्हणून स्वतः बंडखोर ठरला पाहिजे अशी योजना करतो.

कांचनगडावरील कोठाराचा स्फोट पिलाजीरावानेच केला होता. प्रतापराव व दौलतराव वर किल्ल्यावर पोचण्याचा अवकाश तोच पिलाजीरावाने स्वतःच्या दमांत किल्ल्याला वेढा दिला. मात्र त्याने एवढी घोषणा केला की, दोन प्रहर दिवस येईतो जे कोणी शस्त्रास्त्रें खाली ठेवून पिलाजीरावाच्या छावणींत जातील त्यांना पुढे मर्जीस येईल तिकडे जायला बंदी केली जाणार नाही. परंतु पिलाजीरावाच्या विश्वासघातकीपणाचा प्रतापरावाला आता एवढा उबग आलेला होता की, गडावरील सर्व गडकरी प्राण वाचविण्यासाठी निघून गेले तरी आपण भीषण युद्धच खेळणार असा त्याचा निर्धार होतो.

याही ठिकाणीं दौलतरावाच्या शांत चित्ताचा आणि धोरणीपणाचा प्रत्यय येतो. तो बेहोष होत नाही. आहे त्यांत आपल्या आणि शत्रूच्या शक्तीचा तो संताजीरावाकडून अंदाज घेतो. प्रतापराव बेहोष झाल्याचें चिन्ह म्हणजे स्वतः प्रतापरावानेच द्वंडी

पिटून गडकऱ्यांना जाण्याबद्दल घोषणा केली. त्याबद्दल खुलासा तो करतो की, ज्यांना प्राण वाचवायचे असतील त्यांची अडगळ लवकर दूर व्हावी आणि फक्त खंदे लढवय्ये तेवढे गडावर शिल्लक राहावेत.

त्यानंतर मात्र प्रतापरावाला मोठ्या कसोटीच्या प्रसंगांतून जायचें होतें. पहिल्या प्रथमच त्याने मोहनाला गडावर राहण्याला विरोध केलाच होता. आता तर तिला एकटीला सोडून जवळजवळ लढाईची अखेरची चकमक लढ्यासाठी तो रणांगणावर जाणार होता. आणि ही बातमी निरागस अशा आपल्या स्त्रीला सांगण्याचा प्रसंग त्याला नको असतो. तेंच अत्यंत अवघड काम त्याला आता करायचें होतें.

तिकडे मोहना आपल्यामुळे प्रतापरावावर संकट कोसळलें म्हणून दुःख करीत बसली होती. तेथे जाऊन प्रतापराव आपण तुला दुःख द्यायला तयार झालों म्हणून आपल्या मनाची वेदना व्यक्त करीत होता व तिला कांचनगड सोडून सोनगडला माहेरीं जायला सांगत होता.

पण आतां तर मोहनेचा अशा स्थितींत प्रतापरावाला सोडून जायचें नाही हा निश्चय पक्का झालेला असतो. एक मला लढाईत तरी येऊं द्या किंवा रजपुतांप्रमाणे माझे प्राण घेऊन मग लढाईला जा असा खडा सवाल ती त्याच्यापुढे टाकते.

पण रजपुतांप्रमाणे आम्हांला आमच्या बायकांना एकटे सोडून जाण्याची भीति वाटत नाही; आमच्या बायका पातिव्रत्य सांभाळायला चांगल्या खंबीर आहेत; असें म्हणून एकट्यानेच रणांगणावर जाण्याच्या निर्धाराने तो मोहनेच्या मिठींतून स्वतःला सोडवून घेऊं लागतो. त्यांत मोहनेला मूर्च्छा येते. त्या वेळीं कठोर मन करून प्रतापराव तिला तशीच सोडून निघून जातो. सावध झाल्यावर मोहना रणांगणांत जाऊन प्रतापरावाच्या बरोबर राहून लढण्याचा निर्धार करते. येथे चवथा अंक संपतो.

पांचव्या अंकांत मोहना पुरुषवेषांत प्रतापरावाकडे जायला निघाली आहे आणि हंबीररावाचे सरदार तिला पकडण्यासाठी तिचा पाठलाग करीत आहेत असा प्रसंग घडतो. मोहना थांबून त्यांना लढण्याचें आव्हान देते तेव्हा ते थोडे थबकतात, परंतु पिलाजी त्यांची निर्भर्त्सना करतो. त्यामुळे हंबीररावाचे लोक तरवारी उपसून मोहनेवर धावतात. तोच हंबीरराव येऊन मध्ये उभा राहतो. वेड्यासारखा बडबडून त्यांना मोहनेवर हल्ला करायला प्रतिबंध करतो. याचा फायदा घेऊन मोहना तेथून निसटते. त्यावर हंबीररावाला पकडण्याचा हुकूम देऊन पिलाजीराव प्रतापरावाला तोंड देण्यासाठी रवाना होते. परंतु तेवढ्यांत प्रतापरावाचा सासरा सूर्याजीराव मोहिते पंधरा हजार सैन्य घेऊन प्रतापरावाच्या मदतीला आल्याची बातमी कानावर येऊन पिलाजीरावाचा धीर खचल्यासारखा होतो.

वीर स्त्रीचा अजब नमुना : मोहना —

असे सर्व अनुकूल वनाव बनत होते. प्रतापराव आपल्या शौर्याची व नेतृत्वाची

शर्थ करीत होता. त्याच्या बरोबरीने लढून मोहना वीरस्त्रीचा अजब नमुना दाखवीत होती. पिलाजीरावांचा सहकारी फेजल प्रतापरावावर वार करणार एवढ्यांत मोहनेने त्याच्या हातावर वार केला आणि त्यामुळे त्याचें डोकें उडविण्याला प्रतापरावाला संधि मिळाली. पण हिंमतबाजपणाच्या भरांत दोघेंही पतिपत्नी आरब सैन्यांत फार आंतवर पुढे जातात आणि एकीकडे प्रतापरावाच्या पक्षाचा विजय होण्याचा क्षण प्राप्त झाला असतांना त्याच क्षणीं तीं दोघें पतिपत्नी आरबांच्या हल्ल्यांत प्राणांतिक जखमी होतात. मोठ्या शर्तीने त्यांचे देह संताजीरावाने परत आणले आणि तिकडे पिलाजीरावाच्या सैन्याची दाणादाण होऊन तें सैरावैरा पळत सुटलें; आणि प्रतापरावाच्या सैन्याचा जय झाला.

'परंतु प्रतापराव आणि मोहना हीं दोघें मात्र इकडे प्राणाला मुकलीं. परंतु त्यापूर्वी शेवटच्या प्रवेशांत, मरण्यापूर्वी ती दोघें पुन्हा एकदा आपल्या मनाची वेदना व्यक्त करतात; आपल्यामुळे दुसऱ्याला दुःख भोगावें लागलें ही.

प्रतापरावाची अखेरची निरवानिरव —

प्रतापराव शेवटीं मरतो. मरतांना तो सर्वांचा निरोप घेतो. हंबीररावाचें मोहनेवर खरें प्रेम होतें, म्हणून त्याला कडक शिक्षा करूं नका असें तो सांगतो. सासऱ्याची क्षमा मागतो. दौलतरावावर पुढची सर्व जबाबदारी टाकून सर्वांचा निरोप घेऊन तो प्राण सोडतो.

अशी ही एक मोठी दुःखद कहाणी आहे. तिची रंगतही खाडिलकरांनी रसपूर्ण केली आहे. करुण नाटकामध्यें पुष्कळ चांगल्या नाटककारांची रीत आपण पाहिली त्याप्रमाणे प्रतापरावाने केलेली अखेरची निरवानिरव या नाटकांत खाडिलकरांनी योजलेली आहे.

अर्थात फार मोठ्या अंशाने ही केवळ दुःखद अशा दैवयोगाची कहाणी आहे. प्रताप्राव आणि मोहना यांचा एखादा स्वभावदोष कांही त्या उभयतांच्या दुःखद अंताला प्रामुख्याने कारण झालेला नाही. त्यामुळे या नाटकांतील नायकाच्या चित्रणाला वळण स्वभावतःच निराळें लागलें आहे. मोहना आणि प्रतापराव यांचें सुजनत्व व श्रेष्ठत्व दाखविणें व त्या पार्श्वभूमीवर या दुर्दैवी दैवयोगाचें भीषणत्व दाखवून आपलें मन द्रवविणें हा मार्ग नाटककाराला अनुसरावा लागला आहे.

परंतु असें करतांना सुद्धा प्रतापरावाचा उतावीळपणा, अव्यवहारीपणा आणि स्वप्नाळूपणा यांचें दिग्दर्शन केल्याशिवाय नाटककाराला राहवलें नाही. किंबहुना नाटकांतील प्रवेशांपैकी बहुसंख्य प्रवेश त्याच्या उतावीळपणाचें दिद्दर्शन करणारेच आहेत. त्यामुळे दैवयोग तर खराच; परंतु प्रतापराव जर दौलतरावासारखा सावध आणि विचारी असता तर हा दैवयोगही टळण्याचा पुष्कळ संभव होता असेंच नाटककाराला सूचित करावयाचें असावें.

तीच गोष्ट मोहनेच्या बाबतींत आहे. हंबीररावाचें सत्य स्वरूप तिला समजलें असतांना प्रतापरावाला तिने सावध करूं नये ही तिच्या जीवनांतली मोठीच घातकी आणि अक्षम्य चूक ठरते. मागाहून तिने पुष्कळ शौर्य धैर्य दाखविलें. पण या चुकीचें परिमार्जन करणें त्यामुळे तिला शक्य झालें नाही.

अगदी शेवटच्या क्षणीं तर ती स्वतःच प्रतापरावाच्या अविवेकी, उतावीळ आवेशांतच समरस झाली. त्या आवेशांत शत्रुसैन्याच्या फळींत आंतवर घुसणें ही गोष्ट इतकी अव्यावहारिकपणाची होती की, त्यामुळेच त्या दोघांचा नाश ओढवला असें म्हणणेंसुद्धा सयुक्तिक व्हावें.

तेव्हा निव्वळ बाह्य परिस्थितिजन्य अशा दैवयोगाच्या झटक्यावर या नाटकांतसुद्धा नाटककाराचें समाधान झालें नाही; नायकनायिकांच्या स्वभावदोषांचीही कास त्याला धरावीच लागली असें म्हणावें लागतें.

४ : सवाई माधवराव

सवाई माधवराव यांचा मृत्यु हें नाटक खाडिलकरांच्या यापूर्वीच्या तीन नाटकांहून वेगळ्या प्रकारचें आहे. १८९३ सालीं बी. ए. परीक्षेच्या 'त्रासांतून' सुटल्याबरोबर त्यांनी हें नाटक लिहिलें. त्या वेळीं त्यांच्यामध्ये राजकारणाची ती पुढची तीव्र धार निर्माण झालेली नव्हती. त्यामुळे राजकीय प्रतीकात्मकता या नाटकांत शिरली नाही. नाटकाला निव्वळ साहित्यिक रूप लाभलें. त्यानंतर प्रयोगाच्या दृष्टीने त्यांत खाडिलकरांनी बराच फेरफार केला व १९०६ सालीं हें नाटक रंगभूमीवर येऊन पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालें. या दुरुस्तीमध्ये नाना फडणीस यांच्या स्वभावचित्रणाला उठाव देण्याच्या दृष्टीनेच मुख्यतः भर पडली. त्यामुळे सवाई माधवरावाच्या चित्रणांत फरक तर झालाच नाही; उलट नानांच्या पार्श्वभूमीवर सवाई माधवरावाच्या चित्रणाला अधिकच उत्कट प्रभाव प्राप्त झाला. या दृष्टीने करुण नाटक या स्वरूपांत हें नाटक पाहणें विशेष उपयुक्त होईल.

नाटक तत्त्वप्रतिपादनासाठी नाही —

हें नाटक कसल्याही तत्त्वप्रतिपादनासाठी नसून शेक्स्पीअरचीं दोन पात्रें, हॅम्लेट व आयागो हीं एकाच नाटकांत सामावावींत अशा केवळ स्वभावचित्रणाच्या साहित्यिक दृष्टीने तें लिहिल्याचें स्वतः खाडिलकरांनीच प्रस्तावनेंत सांगितलें आहे. हॅम्लेटचा आविष्कार त्यांना, त्यांच्या मताप्रमाणे, सवाई माधवरावांत आयता सापडला. केशवशास्त्र्याच्या रूपाने आयागो त्यांना कल्पनेंतून निर्माण करावा लागला. आता माधवरावाचें हॅम्लेटशीं कितपत साम्य आहे आणि केशवशास्त्री आयागोसारखा भासतो का, हे विचार करण्याजोगे आणि कांहीसे विवाद्य प्रश्न आहेत. त्यांचा विचार आपण यापुढे करूंच. परंतु या नाटकाची भूमिका ही केवळ साहित्यिक, म्हणजेच एक विशिष्ट स्वभावचित्र रंगविण्याची आहे हें यांत विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.

एका करुण नाटकाचा नायक म्हणून सवाई माधवरावावर खाडिलकरांची दृष्टि

खिळावी यांत अस्वाभाविक कांहीच नाही. कारण, सरदेसाईंसारख्या रुक्ष इतिहासाच्या दृष्टीने पाहणाऱ्या विद्वानांनीसुद्धा सवाई माधवरावाबद्दल पुढीलप्रमाणे उद्गार काढलेले आहेत —

" ऐन आशेच्या उच्च भरारींत सर्व महाराष्ट्राच्या आशा क्षणांत नाहीशा करून टाकणारा, आकाशांतील कुऱ्हाड कोसळते त्याप्रमाणे सज्जांतून खाली पडून झालेला त्याचा हृदयद्रावक अंत पाहिला म्हणजे, त्याचें एकंदर चरित्र अत्यंत शोकपर्यवसायी नाटकाप्रमाणे मनास कायमचा चटका लावतें. *

तेव्हा खाडिलकरांसारख्या हाडाची नाट्यवाङ्मय प्रसविण्याची प्रवृत्ति असणारांना या स्वभावचित्राने मोहित करावें आणि त्यांनी तें रेखाटावें हें सर्वथा उचितच झालें. खाडिलकरांसारखा उत्कट प्रतिभावंत नाट्यलेखक या चित्रणाच्या कामाला लाभला हें मराठी वाङ्मयाचें मोठें भाग्य म्हणावें, इतक्या तोलाने खाडिलकरांनी सवाई माधवराव आमच्यापुढे आपल्या नाटकांत उभा केला आहे.

आणि खाडिलकरांचें हें अगदी पहिलें वहिलें, अल्पवयांतलें नाटक असूनही एखाद्या मुरब्बी नाटककाराप्रमाणे त्यांनी माधवरावाला नाटक सुरू होतां होतांच आपल्यापुढे आणलें आहे. उगीच प्रस्तावनेपायीं रट्याळपणा केला नाही. आणि नाटकाचा मध्यबिंदु असा जो समरप्रसंग तोही सांगून टाकून पहिल्याच प्रवेशांत प्रत्यक्ष कथानकालाही खूप वेगाची गति देऊन टाकली आहे.

नाटकांतील मूलभूत झगडा – सत्ता कोणाची ? —

आयागो म्हणून खाडिलकरांनी कल्पिलेला केशवशास्त्री पहिल्या प्रवेशाच्या सुरुवातीलाच " आनंदीबाईचे हेतु अखेरीस तडीस जाऊन बाजीरावाला पेशव्याचें पद मिळावें ' अशासाठी चाललेल्या कारस्थानाचा सुगावा आपल्याला देतो; आणि या कारस्थानावर मात करून पेशवाईपदाचा बोज आणि मान राखण्यासाठी नाना फडणीस करीत असलेल्या प्रयत्नांचा मासलाही, नानांनी सवाई माधवरावाला न विचारतां, स्वतःच्या अधिकारांत, माधवरावाच्या पत्नीचे मानलेले वडील बाबासाहेब यांना खासगी कारभारीपदावरून दूर करून तडकाफडकी विजयदुर्गाकडे रवाना केलें या गोष्टीबद्दलच्या चर्चेतून आपणाला पाहावयास मिळतो. आनंदीबाईचा पक्ष आणि नाना फडणिसांचा पक्ष या दोन पक्षांचा झगडा ही नाटकाची पार्श्वभूमि स्पष्ट करून तावडतोब त्या झगड्यामध्ये सवाई माधवरावाच्या जीवनांत उभ्या राहिलेल्या संघर्षाचा स्फोटक निर्देश आपल्यापुढे बोचक रीतीने सवाई माधवरावाच्या तोंडून केला जातो तो असा —

" मी पंतप्रधान की नाना पंतप्रधान ? बाबासाहेब म्हणतात, नाना पंत प्रधान – तेंच खरें. "

---

* सरदेसाई : मराठी रियासत, उत्तरविभाग, खंड १, पृ. ४६७

या मानसिक कुचंबणींतून सवाई माधवरावाच्या जीवनांतलें सगळें वादळ निर्माण झालेलें आहे. सवाई माधवरावाचा कल बाजीरावाकडे. माधवरावाच्या सल्ल्याने आणि संमतीने बाबासाहेब आणि नागनाथ यांनी बाजीरावाकडे कांही संधानें बांधण्याचा प्रयत्न केला. अर्थात ही गोष्ट प्रस्थापित पेशव्यांच्या अहिताची वाटून नानांनी ती फितुरी उजेडांत आणली, मोडून काढली आणि नागनाथाला देहांत शिक्षा करण्याचा मनसुबा आखला.

यामध्ये फक्त नानांचा अधिकारच कसा प्रभावी आहे आणि प्रत्यक्ष पेशव्याला त्यांत कांहीच कसें महत्त्व नाही हें आपल्या खवचट भाषणांनी केशवशास्त्री फार उत्तम रीतीने सूचित करतो. माधवरावालाही या प्रकरणीं नागनाथाला शिक्षा होऊं नये असें वाटतें आहे; पण पत्नी व तिची मावशी यांना हें रुचत नाही. म्हणून क्षणार्धांत तो आपला विचार बदलून 'नानांच्या म्हणण्याप्रमाणे कां होईना'–या निर्णयाला येतो. परंतु यांत त्याच्या मनाचें समाधान सहजच नसतें. त्याला स्वतःच्या अधिकाराचा यांत संकोच होतो हें उमजून अस्वस्थ वाटत असतें. या अस्वस्थपणाचा भडका व्हावा यासाठीच, प्रथम पुष्कळ आढेवेढे घेऊन आणि माधवरावाची उत्सुकता वाढवून, बाबासाहेबांचा जातेवेळचा निरोप म्हणून केशवशास्त्री सांगतो,

"त्यांच्या तत्पर आणि मानी स्वभावाला अनुसरूनच निरोप आहे.–ते म्हणाले, श्रीमंतांप्रमाणे मी कांही नानांच्या ताटाखालचें मांजर होऊन राहणार नाही.–ज्यांना गादीची हाव असेल त्यांनी पाहिजे तर नानांची थुंकी झेलून राहावें, वेसणीच्या बैलाला वळवितात त्याप्रमाणे नाना वळवितील तिकडे वळावें."

आणि यांतूनच माधवरावाच्या अंतःकरणांतील संताप बाहेर पडून स्फोट झाला, "नाना पंतप्रधान की मी पंत प्रधान!"

आपल्या अधिकाराच्या अभावाची किंवा संकोचाची माधवरावाला फार मोठी खंत वाटते. त्याचें वय लहान म्हणावें तर, निजामावर स्वारीला जातांना बाजीरावाचें, पानपतावर जातांना विश्वासरावाचें आणि पेशवाईची जबाबदारी घेतावेळचें प्रौढप्रताप-निधी माधवरावाचें किंवा त्याच्या वडिलांचें वय कांही अधिक नव्हतें. मग आपल्यालाच तेवढी नानांची भीति वाटावी याबद्दल त्याला स्वतःचा संताप येतो आणि सुरुवात म्हणून आज एका तरी बाबतींत नानांचा विचार खोडून काढायचाच असा तो निर्धार करतो.

हॅम्लेट की ऑथेल्लो ?—

येथे पहिला प्रवेश संपून नाटकाच्या प्रगतींत आपण एक केवढा तरी मोठा टप्पा गाठला असें होतें. पण या प्रवेशांतील माधवराव हॅम्लेटच्या तोंडावळ्याचा मुळीच वाटत नाही. अमुक गोष्ट करावी की नाही याचा निर्णय आत्मनिष्ठ, विचारी, प्रौढ आणि तत्वज्ञ हॅम्लेटच्या बाबतींत कोणाला ती गोष्ट आवडते की नाही यावर मुळीच

अवलंबून नव्हता. या नाटकांत या ठिकाणीं पत्नी आणि तिची मावशी यांची किंचितशी नाखुषी ओझरती दिसतांच, नागनाथाला शिक्षा करायची नाही हा आपला निर्णय सवाई माधवराव फिरवितो. हा एकच फरक एवढा मोठा आहे की तो, माधवराव हा जात्याच हॅम्लेटच्या उंचीपर्यंत चढण्याला असमर्थ आहे हें स्पष्ट करण्यास पुरेसा आहे.

बाबासाहेबांबद्दलचा नानांचा हुकूम माधवरावाला सांगून बदलून घेऊन आजच्या आज बाबासाहेबांना अर्ध्या वाटेंतून परत आणवितें ही यशोदेची भूमिका तर कॉर्शिओच्या बाबतींत ऑथेल्लोचा हुकूम आपण सहज पालटून घेऊं या भ्रमांत असणाऱ्या डेस्डेमोनाच्या जातीची आहे. आणि त्यामुळे माधवरावाच्या साम्याचा कल ऑथेल्लोकडेच झुकल्यासारखा होतो. साऱ्या विश्वांत हॅम्लेटला एक स्वतःच्या विवेकशक्तीशिवाय कोणीही वांकवूं शकत नव्हतें; कोणाचेंही भय त्याला वाटत नव्हतें. नानांची मला भीति कां वाटते ? अशासारखा दुबळा, केविलवाणा प्रश्न हॅम्लेटच्या पोलादी मनांत स्वप्नांतसुद्धा उभा राहणें शक्य नव्हतें.

केशवशास्त्री पाताळयंत्री आहे खरा. त्याच्या त्या कौशल्याची चुणूक या पहिल्या प्रवेशांत आपल्याला चांगलीच दिसते. परंतु त्याच्या पहिल्याच भाषणांत तो "आनंदीबाईचे हेतु अखेरीस माझ्या मंत्राने तडीस जातील व पेशव्याचें पद बाजीरावाला माझ्यामुळे मिळेल" असें म्हणतांना आपण ऐकतों तेव्हा आयागोशीं त्याचें साम्य नसल्याचाच भास होऊन जातो. आयागो आपल्या 'मंत्रामुळे' दुसऱ्याचें कांही साधावें असें केव्हाच कांही करीत नाही. उलट दुसऱ्यांना त्याने आपल्या स्वतःसाठी सदैव राबविलें आहे. रॉडरिगोला डेस्डेमोना मिळावी हा त्याच्या मनांत दुरुनसुद्धा कधी विचार नव्हता. एवढेंच नव्हे तर आपल्या कपटकारस्थानांतून स्वतःसाठी तरी त्याला कांही साधायचें होतें की नाही याबद्दलसुद्धा पुष्कळांना शंका आहे. त्यामुळे प्रथमदर्शनीं तरी केशवशास्त्री आणि आयागो यांच्या निःसंदेह साम्याचा ठसा कांही आपल्या चित्तावर उमटत नाही.

गादीची कीर्ति आणि स्वतःचा दरारा —

दुसऱ्या प्रवेशांत गोमाजीपंत नातूमार्फत केशवशास्त्र्याचें ईस्ट इंडिया कंपनीकडे कांहीतरी कारस्थान चाललें आहे आणि आवडी नायकिणीच्या देवडीवर त्यांच्या गाठीभेटी होत असतात एवढाच ओझरता सुगावा आपल्याला मिळतो.

त्यानंतर, नानांची एक तरी गोष्ट आज मोडून काढायची या विचाराने जेथे माधवराव आला होता तो दरबारचा प्रसंग तिसऱ्या प्रवेशांत आहे. नागनाथाच्या शिक्षेच्या प्रकरणांतच नानांचा विचार मोडून काढावा असा प्रयत्न माधवराव करतो. येतां येतां, नागनाथाला दरबारांत आणूं नका असा सांगावा शास्त्रीबुवाकरवी पाठवून आपल्या अधिकाराचा वापर करावयास त्याने सुरुवात केलेलीही असते. "छे! तसें कांही नाही होतां कामा!" असें म्हणून माधवरावाच्या संमतीची अपेक्षाही न राखतां नाना

नागनाथाला दरबारांत आणविण्याचा हुकूम देतात आणि "सरकारच्या मनाविरुद्ध मी वागत आहे हें खरें. पण ह्या गादीची कीर्ति व दरारा सर्व हिंदुस्थानांत कायम राहावा एवढ्याचकरिता माझी खटपट आहे" अशी संपादणी करतात. त्यावर माधवरावाचा तळमळून प्रश्न येतो,

"गादीच्या कीर्तीबरोबर माझा स्वतःचा दरारा नको का वाढायला?"

पण पेशव्यांची गादी आणि खुद्द सरकारस्वारी यामध्ये आपण भेद मानीतच नाही, असा त्यावर नानांचा युक्तिवाद होतो. बाजीरावाला अजून जिवंत ठेवला याचें कारण पेशव्यांचें घराणें आणि भानूंचें घराणें यांच्यामध्ये झालेल्या विशिष्ट नेकीच्या आणाशपथा असें नाना सांगतात. त्यावर

"आणि त्या आणाशपथा नसत्या तर ह्या पोरक्या माधवरावाला पेशव्यांच्या गादीवरही बसविण्यांत आलें नसतें" या शब्दांत आपला नानांविरुद्धचा जळफळाट आणि आपली असहाय स्थिति माधवराव व्यक्त करतो,

नानांना माधवरावाची भूमिका आणि त्याचे शब्द फार लागतात. त्यांमध्ये बाजीरावाच्या कारस्थानाचा दर्प जाणवून नानांचे हातपाय लटपटल्यासारखें होतें. आपल्याला माधवरावाच्या आधार नाहीसा वाटून निराधारपणाने वैताग येतो व संन्यास घेऊन निघून जावेंसें वाटतें. या खिन्नतेच्या भरांत नाना म्हणतात, "नागनाथाची आणि बाजीरावाची सरकारला जर इतकी आवड असली तर मला फडणिशीचे जागेवरून दूर करा. असें नाही तसें मराठ्यांचें साम्राज्य लयास जाऊन जलचरांची पोळी पिकणार खरी – मग या गादीशीं नाना निमकहराम झाला असें निदान सरकारच्या तोंडून तरी ऐकायला नको."

माधवराव लटपटतो —

नानांच्या या अवताराने माधवराव लटपटतो. नानांच्याविरुद्ध जाण्याची त्याची तयारी होत नाही. पण त्याचमुळे जिवाचा कोंडमारा होऊन त्याला तब्बेत बिघडल्याची आठवण येते; काय बोलावें न बोलावें हें समजत नाहीसें होतें.

माधवरावाची ही कोंडमाऱ्याची अवस्था अत्यंत करुणास्पद आहे. त्यामुळे नानांचा युक्तिवाद खरा असूनही आपलें मन माधवरावाकडे ओढतें. त्याच्याबद्दल आपलें मन अत्यंत हळवें होतें. पण असा दुबळेपणा हॅम्लेटच्या ठिकाणीं सुतराम् नव्हता – त्यामुळे हा कांही हॅम्लेट नव्हे हेंही त्याच वेळीं जाणवल्यावाचून राहवत नाही.

माधवरावाच्या राजकीय बुद्धिचातुर्याची चमक —

नागनाथाला दरबारांत आणविण्याला माधवरावाने संमति दिल्यावर तो येईपर्यंत दरबारांत राजकारणाच्या इतर गोष्टींची चर्चा होते. मेहेंदळे यांनी रास्त्यांना रिकामी प्रतिष्ठा मिरविण्याची हौस मोठी असा चिमटा काढला असतांना, "तसें नव्हे मेहेंदळे:–

इंग्रज जर निजामाला मिळाले असते तर खर्ड्याची रणभूमि इतकी मऊन सापडून कोपराने खणण्याची तुम्हांला संधीही मिळाली नसती " असा तडाखा मेहेंदळ्यांना माधवराव देतो, तेव्हा लहानग्या पेशव्याच्या बुद्धीची चमकही आपल्याला प्रत्ययाला येते. त्याचप्रमाणे निजाम, टिपू आणि इंग्रज यांना आपल्याविरुद्ध एक होण्याची संधि आपण निर्माण होऊं देऊं नये हें प्रतिपादतांना त्याच्या राजकीय चातुर्याचीही चुणूक दिसून येते. परंतु इंग्रजांना भिण्याजोगी आता आपली दुर्बळ अवस्था राहिलेली नसल्याने त्या भीतीपायीं इंग्रजांना व्यापाराच्या सवलती देण्याचें कारण नाही असें नाना समर्पक युक्तिवादाने दाखवून देतात त्या वेळीं " इंग्रजांना भिण्याचें कारण नाही आणि जबरदस्तीने ते परवानगी मागत असले तर साफ आम्ही देणार नाही " असें बाणेदारपणाने म्हणणारा माधवरावच " विलायती चिजा मोहक होत्या; मला वाटतें त्यांनी जर आमच्या शहरांत पेढ्या घातल्या तर आपल्या शहराला शोभा येईल " असें म्हणतांना आपण ऐकतो, तेव्हा त्याच्या कोत्या पोरबुद्धीमुळे आपण चकित आणि भयभीतही होतो. आणि त्याच्यावरचें नानांचें दडपण समर्थनीय आहे असें वाटण्याकडे आपल्या मनाचा कल होतो. म्हणूनच नाना जेव्हा पुन्हा एकदा समर्पक युक्तिवादानिशी अभिप्राय व्यक्त करतात की, –" सरकार हें इंग्रजाच्या व्यापाराचें पिलूं आमच्या घरांत नको " तेव्हा त्यांचीच बाजू खरी असल्याची ग्वाही आपलें मन आपल्याला देतें.

तथापि माधवरावाचा पक्का निर्णय न घेतां आपणच जेव्हा नाना म्हणतात– " जाधवराव, मॅलेट साहेबाला कळवा – "

तेव्हा माधवरावांतील पंतप्रधान जागा होऊन म्हणतो, " इतक्यांत कांही कळवायचें नाही. प्रत्येक गोष्टींत आमची आज्ञा व्हावयाच्यापूर्वीच तुम्ही हुकूम सोडतां हें मला नाही पसंत. "

यावरूनच वास्तविक मी पंतप्रधान की नाना पंतप्रधान या प्रकरणाचा निकाल, बहुधा माधवरावाच्या विरुद्धच लागला असता. परंतु या ऐन वेळीं नागनाथाला दरबारांत आणण्यांत आल्यामुळे तो चकमकीचा प्रसंग टळला.

नागनाथाला हवी ती शिक्षा करायला नानांना माधवराव परवानगी देतो. चौकशींत नागनाथ " पेशव्यांच्या बीजाच्या बाजीरावाचे हुकूम मीं मानले त्यांत पेशव्यांच्या विरुद्ध मीं फितुरी केली असें होत नाही. असें असतें तर श्रीमंतांनी उलट उत्तरें स्वदस्तुरचीं मजकडे कां पाठविली असतीं ? " असा आपला पक्ष उन्मेखूनच मांडतो. एवढेंच नव्हे तर " भानूंच्या कुळांतील पुरुष जर गादीवर असतील तर मला शिक्षा योग्य आहे. मीं भानूंच्याविरुद्ध फितुरी केली. पेशव्यांच्याविरुद्ध नाही " असें म्हणून माधवरावाच्या चित्तांत आणखीच विक्षेप निर्माण करण्याचा नागनाथ प्रयत्न करतो. पण त्या क्षणीं तरी माधवरावाच्या चित्तांत विक्षेप निर्माण होत नाही. " आम्ही आणि नाना एकच आहों " हें जगाला समजावें म्हणून नागनाथ आजच्या आज हत्तीच्या पायाखाली चिरडून मेला पाहिजे असा तो हुकूम देतो.

नागनाथाने टाकलेली ठिणगी —

नागनाथाला नेलें जात असतांना तो शेवटची जळती ठिणगी टाकल्याशिवाय जात नाही. "बाजीराव म्हणतात पेशव्यांच्या कुळांतला पुरुष आज गादीवर नाही तेंच अखेरीस खरें ठरलें. नानाच्या वशिल्याचा – कोणाचा तरी उचलून आणलेला –" असे विषदिग्ध शब्द उच्चारीतच तो जातो. केशवशास्त्री मानभावीपणाने त्याच्या त्या शब्दांबद्दल मीच जाऊन त्याची जीभ कापतों असें म्हणतो. परंतु मेलेल्यार हात टाकण्यांत काय पुरुषार्थ आहे, असें म्हणून माधवराव आपला विचारी शांतपणा व्यक्त करतो. पण शांत मनाचा हा समाधानीपणा माधवरावाच्या अशांत मनावर जाऊन आदळलेल्या नागनाथाच्या त्या शब्दांनी कोठच्या कोठे वाऱ्यावर विरून जायचा होता – नागनाथाच्या त्या ठिणगीने त्याच्या चित्तांत फार मोठा वणवा पेटायचा होता आणि हें महान पापकृत्य केशवशास्त्र्याच्याच हातून व्हायचें होतें याची त्या सत्वस्थ तरुणाला कोठे कल्पना होती.

यापुढचा चवथा प्रवेश पुन्हा एकदा केशवशास्त्र्याचा आवडी नायकिणीशीं संबंध व तिच्या नवऱ्याचा तिच्या मैफलींत साथीसाठी केशवशास्त्री करूं पाहत असलेला उपयोग अशा अगदीच दुय्यम गोष्टीसाठी खर्ची पडला आहे

केशवशास्त्र्याची संशयपेरणी —

पांचव्या प्रवेशांत मात्र नाट्यवस्तूचा आणखी एक वरचा टप्पा चढलेला आपण पाहतों. प्रश्न निघायचा असतो बाबासाहेबांच्या ऐवजी खासगी कारभारी कोणाला नेमावें हा. म्हणून केशवशास्त्री वाड्यांत येतो तेव्हा सर्व सामसूमच पाहून त्याला आश्चर्य वाटतें. स्वतः माधवरावच आईसाहेब – त्याच्या पत्नीच्या, यशोदेच्या मावशी – यांचा तपास करीत येतो तेव्हा आईसाहेब व नाना यांच्या वांकड्या संबंधाबद्दल संशयपेरणीचीं संधि केशवशास्त्री साधून घेतो. "खरें पाहिलें तर आईसाहेबांना नानांची एवढी काय प्रतिष्ठा! – पण त्यांचा आपला पहिल्यापासून नानांकडे ओढा! बाबासाहेबांना झालें तरी याच गोष्टीची चीड होती!" असें चावतचावत बोलून, नाना व आईसाहेब त्याच बाजूला येतांना दिसतांच आणि नाना अजून माधवरावाकडे गेले नव्हते हें माधवरावाने सांगतांच केशवशास्त्री पुन्हा आग पेटांवतो, "वाड्यांत तर नाना केव्हाच आले आहेत – सरकारला अद्याप वर्दी नाही! मग आईसाहेब नानांच्याकडे गेल्याच नाहींत. प्रथम त्यांच्याशीं एकांत करून नाना सरकारच्या दर्शनास आले असतील."

पण जमीन अजून पुरी तापली नव्हती —

पण या ठिणगीने पेट घेण्याइतकें अजून माधवरावाचें चित्त तापलें नव्हतें. खाजगी कारभाऱ्याच्या नेमणुकीबाबत ठरविण्यासाठी नानांना मुद्दाम बोलविण्यांत आलें होतें.

म्हणून नाना आईसाहेबांचा सल्ला घेण्यासाठी गेले होते. पण अशा रीतीने माधवरा-वाला हें प्रकरण लांबणीवर टाकायचें नव्हतें. तेव्हां बाबासाहेबांना पुन्हा खाजगी कारभारी नेमायला आपण संमति देणार नाही व यांत श्रीमंतांच्या देहाचें संरक्षण व्हावें यापेक्षा आपला दुसरा कोणताच हेतु नाही, असें नाना सांगतात. त्यावर " स्वतःच्या देहाचें कसें संरक्षण करावें हें सुद्धा मला आता दुसऱ्यांनी शिकविलें पाहिजे अं !" असा नानांचा अधिक्षेप करून व बाबासाहेबांकडे खाजगींतील अमुक एक काम नको असें म्हणण्याचा नानांना अधिकार काय असा रोखठोक प्रश्न उपस्थित करून माधवराव धीर करतो आणि " माझा असा हुकूम आहे की– खाजगी व्यवस्थेंत आपण कोणत्याहि प्रकारची ढवळा-ढवळ करतां कामा नये " असें निग्रहाने बजावतो.

केशवशास्त्र्याचा दुसराही बाण फसतो —

पण बाबासाहेबांच्या हातीं कारभार दिल्याने गोता निर्माण होण्याचा धोका नाना स्पष्ट करतात आणि आईसाहेब आपल्या मुलीच्या कल्याणाच्या दृष्टीने त्यांनाच पाठिंबा देतात. बाजीरावाचा पक्ष घेणाऱ्या कोणाच्याच हातीं कारभार राहूं नये या बाबतींत नाना व आईसाहेब यांचें एकमत पाहून व खुद्द बाबासाहेबांविरुद्ध आईसाहेबांचा हा हट्ट पाहून माधवराव बुचकळ्यांत पडतो. आणि आईसाहेबांच्या हातीं कारभार सोपविण्याची नानांची कल्पना निरुपायाने मान्य करतो. वरवर असें दिसतें खरें, परंतु केशव-शास्त्र्याचा कयास मात्र निराळाच, म्हणजे यशोदेच्या विचाराने माधवरावाने हें केलेलें असतें असा असतो.

खाजगींत तुमची ढवळाढवळ नको असें नानांना खडसावल्याबद्दल माधवरावाची खुशामत करण्याच्या मिषाने माधवरावाचें मन कलुषित करण्याचा केशवशास्त्री पुन्हा एकदा प्रयत्न नाना व आईसाहेब निघून गेल्यावर करतो. " ताटाखालचीं मांजरें जर ताटांतल्या जिनसांवर यथेच्छ ताव मारूं लागली तर पानावर बसलेला यजमान कसचा ?" हा त्याचा बाण या वेळींही फुकटच जातो. केशवशास्त्री आईसाहेबांबद्दल किंचित आशंका व्यक्त करतो. परंतु त्याबद्दलचें बाबासाहेबांचें मत विचारण्यासाठी पत्र लिहावयाला त्याला सांगून माधवराव त्याचें पुढचें बोलणें बंदच करतो.

तरीपण हें नाणें हॅम्लेटचें नव्हे —

यानंतरचें माधवरावाचें भाषण आहे तें मात्र हॅम्लेटची कांहीशी आठवण करून देणारें आहे. नाना, डोळे वटारले म्हणजे भिणारा लहानपणाचा माधव मी आता नव्हे - वगैरे त्याचें बोलणें मोठें परिणामकारक आणि विचारीपणाचें निदर्शक आहे.

परंतु या सर्वांचें श्रेय जेव्हा तो यशोदेकडे देतो तेव्हा त्याच्या निर्मळ पत्नीप्रेमाबद्दल कौतुक वाटलें तरी हें नाणें हॅम्लेटचें नव्हे याची पुन्हा जाणीव होते. यशोदा आल्यावर त्या दोघांचा मधुर प्रेमप्रसंग खाडिलकरांनी आपल्या नित्याच्या धोरणानुसार दाखविला

आहे. यशोदेच्या इच्छेनुसार खासगी कारभार आईसाहेबांच्या हातीं सोपविल्याबद्दलचें बक्षीस माधवराव यशोदेजवळ मागतो तेव्हा,

"प्रेम–निष्कपट प्रेम याशिवाय या गरीब दासीजवळ आपणांस द्यायला काय आहे?" असें अंतःकरणपूर्वक उत्तर यशोदा देते. तिलाही कोठें माहीत होतें की तिच्या या निष्काम प्रेमाची काय आणि किती परवड व्हायची होती!

दुर्दैव खदखदा हसलें असेल! —

त्यानंतर शेल्यावर कोणतें चित्र काढावें याबद्दल या पतिपत्नींत जो संवाद होतो त्याला भविष्यसूचकतेच्या दृष्टीने महत्त्व आहे. रामसीतेसारखें चित्र काढावें ही सूचना यशोदा मान्य करीत नाही. कारण, असें चित्र काढलेला शेला रमाबाईनीं तयार करून ठेवला होता तो माधवरावाने पांघरल्याचें पाहण्याचें भाग्य त्यांना लाभलें नव्हतें. यावरून रमाबाईच्या पतिप्रेमाबद्दल भरतें येऊन माधवराव यशोदेला विचारतो "इतकें तुझें प्रेम माझ्यावर आहे?" तिने हो म्हटल्यावर माधवराव शंका प्रकट करतो, तेव्हा ती, खंजीर घेऊन माझ्या हृदयांत खुपसायचें म्हटलेंत तरी मी कां कूं करणार नाही, अशी आपल्या प्रेमाची ग्वाही देते. त्यावर तिचा संशय घेण्याचें आपल्या मनांत नव्हतें असें म्हणून मी तुला कधीही अंतर देणार नाही अशी शपथ तो वाहतो. त्याच वेळीं त्याचें दुर्दैव खदखदा हसलें असेल!

दुसऱ्या अंकांतील पहिला भला मोठा प्रवेश केशवशास्त्री व आवडी नायकीण यांच्यामधील शृंगारांत आणि गोमाजीपंत नातूचें कंपनीकडील बाजीरावाला मदत करण्याचें कारस्थान आणि त्यासाठी केशवशास्त्र्याला मिळावयाची बक्षिसी या विषयांत खर्ची पडला आहे. यांतील शृंगारदर्शन खाडिलकरांच्या नित्याच्या कसबाला अनुरूप असेंच आहे. परंतु नाट्यवस्तूच्या परिपोषाच्या दृष्टीने या प्रवेशाचा संबंध जवळ जवळ कांही नाही. एवढेंच नव्हे तर आयागोची प्रतिकृति म्हणून रेखाटलेला केशवशास्त्री एका नायकिणीच्या घरीं गुलगुल गोष्टी करीत बसलेला पाहून आयागोच्या अवताराबद्दलच्या खाडिलकरांच्या कल्पनेबद्दल विस्मय वाटतो.

नाट्यवस्तुपरिपोषाच्या दृष्टीने तेलंग्या भटजीचा दुसरा प्रवेशही असाच बहुतांशीं निरर्थक आहे.

केशवशास्त्र्याच्या कारस्थानाला बहर —

तिसऱ्या प्रवेशांत मात्र केशवशास्त्र्याच्या कारस्थानाला बहर येण्याला नामी संधि मिळते. शास्त्रीबुवाने आपल्या कल्पनेनुसार बाबासाहेबांचें म्हणून पत्र, हुबेहूब बाबासाहेबांच्या अक्षरांत लिहून बनवून आणलेलें असतें. शास्त्रीजी आपल्या या कसबावर बेहद्द खूष असतात. त्या वेळचें त्यांचें स्वगत भाषण खाडिलकरांच्या प्रभावी

भाषेचा एक चांगला नमुना आहे. पत्राने पसरलेल्या या आपल्या जाळ्यांत आपली सावजें जणू चालून येतांना पाहून केशवशास्त्र्याला मोठा हर्ष होत असतो.

माधवराव आणि यशोदा दोघे प्रवेश करतात ते माधवराव यशोदेवर तणतणत असतांनाच. स्वतःच्या इच्छेविरुद्ध नागनाथ मारला गेला असतांना त्यानिमित्त यशोदेने दीपोत्सव करावा, महापूजा करावी यावद्दल माधवराव तीव्र नापसंती व्यक्त करीत असतो. यशोदेने केलेला नवस हा त्याला, आपल्या नवऱ्याचें कांही चालूं नये म्हणून केलेला, त्याच्या मानहानीसाठी केलेला नवस वाटतो.

यशोदा काकुळती येते. मी असें कसें करीन म्हणते. पुन्हा अशी चूक करणार नाही, पण या वेळेपुरती पूजेची तयारी आहे म्हणून माधवरावाने यावें अशी विनंति करते आणि माधवरावाची आज्ञा न घेतां यापुढे देवदर्शनसुद्धा आपण घेणार नाही असा निर्धार व्यक्त करते.

पण पूजा करतांना देवाच्या जागीं नागनाथ मला दिसूं लागला तर मग तुम्ही कोणी त्याला फूल वाहूं द्याल का मला ? असें माधवराव वांकडें विचारतो आणि " दुःख झालें म्हणून नवस फेडण्याचा प्रकार पुराणांत कोठे आढळतो कां हो ? " असें केशवशास्त्र्याला विचारतो.

हवी होती ती संधि शास्त्रीबुवाला मिळाली. दात विचकून तो म्हणतो, " हें सर्व मानण्यावर आहे. शिवाय नवस करण्यासंबंधाने आईसाहेबांचा आणि नानांचा आग्रह !"

माधवरावाच्या कानाचा कडकडून चावा —

नानांनी नवस करावा हें माधवरावाला समजतें. पण आईसाहेबांनी आणि यशोदेने या फंदांत कां पडावें याचा उलगडा त्याला होत नाही. तेव्हा रामायणांतलें एक उदाहरण सांगून केशवशास्त्री माधवरावाच्या कानाचा कडकडून चावा घेतो. रामाने वालीला मारलें. त्या वेळीं वालीचा भाऊ सुग्रीव आणि वालीची बायको तारा यांनी देवाने खैर केली म्हणून परमेश्वराची पूजा केली; हा दाखला केशवशास्त्री चावत चावत देतो आणि हा दाखला तितकासा परिपूर्ण लागूं पडत नसला तरी या महापूजेबद्दल आईसाहेब व नाना यांनी आग्रह धरावा याला आणखीही कारणें आहेत म्हणून माधवरावाची उत्सुकता वाढवून ठेवतो. पण ती पुरी करायची संधि मिळण्यापूर्वीच नाना, आईसाहेब, यशोदा ही मंडळी तेथे येतात.

नाना मुळी माधवराव पर्वतीवर महापूजेला येणार हें गृहीत धरूनच विचारतात की, स्वारी पालखींतून होणार की अंबारींतून होणार ? त्यासरशी माधवरावाच्या रागाचा स्फोट होतो. " माझा कसला हुकूम ! तुम्ही पाहिजे तर मला पालखींतून न्याल, अंबारींतून न्याल, मी बसलों आहे असाच्या असा उचलून न्याल ! "

आता केलेला नवस पुरा करायला माधवराव गेला नाही तर सरदारांच्या मनांत भलतें सलतें येईल असा विचार आईसाहेब मांडतात तेव्हाही माधवराव असाच

उसळतो आणि म्हणतो, " भलतें सलतें काय येणार ? नागनाथ मरावा असा मी पर्वतीला नवस केला होता म्हणून सरदारांना सांगत सुटूं की काय ? "

माधवराव तात्पुरती तोड काढतो —

नानांना माधवरावाच्या या वृत्तीने भीति उत्पन्न होते. माधवरावाची तेही पण निराळ्या रीतीने मनधरणी करतात. बाजीरावाचा पुरा बंदोबस्त करण्यापुरता अवसर माधवरावाने द्यावा; मग आपण गंगाकिनारीं तपश्चर्येला जाऊं असेंही नाना सांगतात. यशोदा तर फारच खिन्न होते. तेव्हा शेवटीं माधवराव तोड काढतो. पूजाअर्चा पर्वतीवर जाऊन यशोदेकडून करवावी. आणि त्याने फक्त दीपोत्सवाच्या वेळीं अंबारींत बसून पर्वतीवर फिरत यावें. म्हणजे नवसही झाला आणि नानांचें राजकारणही साधलें.

ज्या गोंधळ्याच्या पोवाड्याने पुढे माधवरावाचें डोकें फिरावयाचें आहे त्या गोंधळ्याची आणि आपली गाठ पडण्याइतक्याचपुरता पुढच्या चवथ्या प्रवेशाचा उपयोग आहे.

पांचव्या प्रवेशांत बाबासाहेबांप्रमाणे आपण दौलतीच्याविरुद्ध वागणार नाही अशी आणभाक पर्वतीच्या देवळावर आईसाहेब नानांजवळ करीत असतांनाच माधवराव व केशवशास्त्री तेथे येतात. तीं दोघें असें नेहमी काय एकमेकांशीं कुजबुजत असतात असा संशय माधवराव व्यक्त करतो. त्याबरोबर केशवशास्त्र्याला हवी असलेली संधि पुन्हा एकवार मिळते. वालीसुग्रीवाच्या कथेचा निर्देश करून पुन्हा माधवरावाच्या मनाची उत्कंठा तो वाढवितो आणि मग हळूच बाबासाहेबांचें पत्र आल्यापासून सर्व गोष्टींचा शहानिशा झाला असें पिलूं सोडून देतो.

वरात की धिंड ? —

माधवराव त्या पत्राची पिच्छा पुरविणार नाही असें थोडेंच होतें ! किंबहुना तें पत्र आपल्याकडून घेऊन वाचल्याशिवाय माधवरावाने राहूं नये हेंच केशवशास्त्र्याचें ईप्सित होतें. पुष्कळसे ओढेवेढे घेतल्यावर केशवशास्त्री तें बनावट पत्र माधवरावाच्या हातीं देतो आणि तें वाचून माधवरावाचें मस्तक गरगरूं लागतें. आपल्या लग्नाची थाटाची वरात आठवून माधवरावाला किळस उत्पन्न होते. " माधवा, वरात ? .नव्हे ती वरात; एखादा नीच मुत्सद्दी आपल्या पापाची घाण धन्याच्या अंगाला कशी सारवतो ह्याचें प्रदर्शन करण्याकरितां ती धिंड काढली होती धिंड ! पेशव्यांच्या दरबारांत भयंकर अपराधी शिक्षेवाचून कसा निसटतो, तें पाहून घेतल्यावांचून मी राहणार नाही " असे जळजळीत उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडतात.

माधवरावाला बंदोबस्तांत ठेवण्याची पाळी —

बाबासाहेबांनी प्रत्यक्ष काय काय लिहिलें होतें याचा उघड स्फोट खाडिलकरांनी

अजून केलेला नाही. परंतु जें काही लिहिलें होतें त्यामुळे भडकून जाऊन माधवरावाच्या डोक्यावर आणि शरीरावरही परिणाम फारच भयंकर झाला. आणि त्याच्या बडबडीमुळे उगाच अवघड प्रसंग येऊं नये म्हणून माधवरावास बंदोबस्तांत ठेवण्याची पाळी आली होती हें आपण तिसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत पाहतो. नानांचा किंवा आईसाहेबांचा प्रत्यक्ष हुकूम असल्याशिवाय कोणालाही माधवरावाच्या महालांत जायला बंदी घातली होती; आणि या कामावर नानांच्या खास विश्वासांतला बजाबा याची मुद्दाम नेमणुक करण्यांत आली होती. माधवरावाची वृत्ति इतकी भडकली होती की, यशोदेलासुद्धा एकटीला त्याच्याजवळ बसायची भीति वाटूं लागली होती. म्हणून बजाबांना जवळ असूं दे असें तीही म्हणते. परंतु केशवशास्त्र्याबद्दल अजून कोणालाच संशय नसल्याने माधवरावाचें ग्रहमान पाह्यला अजून त्यालाच सांगतात आणि त्या कामासाठी शरीरावरील रेषा वगैरे पाहण्याच्या निमित्ताने माधवरावाकडे जाण्याचा परवाना केशवशास्त्र्याला मिळूं शकतो.

दुसरा प्रवेश पुन्हा पेशव्यांच्या दरबाराचा आहे. परंतु सुरुवातीला पेशव्याची गादी रिकामीच आहे. दरबारांत नाना मराठ्यांच्यावर, खर्ड्याच्या लढाईंत विजय मिळविला असूनही संकटाची सावली अजून कशी आहे याचें विवरण करतात. त्यांना विशेष भय मराठा सरदारांमधील परस्परांबद्दलच्या अविश्वासाचें, चुरशीचें आणि स्वतःच्या कर्तृत्वाला आणि राज्यविस्ताराला पुरेसा वाव न सापडल्यामुळे उत्पन्न झालेल्या स्पर्धाशीलतेचें, अधिक वाटत होतें. आणि म्हणून ताराबाईच्या शाहूविरुद्धच्या बंडाच्या वेळीं शिवाजी-महाराजांचें स्वराज्य संपुष्टांत येतें की काय असें भय निर्माण झालें असतां, बाळाजी विश्वनाथांनी जशी युक्ति योजिली तशी युक्ति नाना सुचवूं पाहत होते. अशा वेळीं माधवराव दरबारांत प्रवेश करतो. दरबारांत आल्याने मस्तकाला जरा बरें वाटेल या बुद्धीने तो तेथे आला होता. पण येथेही त्याला शांत वाटेना; म्हणून आल्या पावलींच महालांत परत जाण्याची भाषा तो काढतो. तथापि नाना त्याला सांगतात,

"श्रीमंतांनी बाजीरावासंबंधाने उगीच मनाला दुःख करून घेऊं नये. बाजीराव-साहेबांची काव्य व्यवस्था लावायची हें नक्की ठरविण्याकरताच आजचा हा दरबार आहे."

प्रत्येकाच्या मृत्यूची व्यवस्था जन्माच्या वेळींच लागलेली असते! —

त्यावर माधरावाचें उत्तर किती कडवट आहे आणि त्यासाठी खाडिलकरांनी भाषा किती ताशीव वापरली आहे पाहा. तो जणू गरजतो,

"व्यवस्था तुम्ही काय लावणार? प्रत्येकाच्या मृत्यूची व्यवस्था त्याच्या जन्माच्या वेळींच लागलेली असते. बाजीरावाचा किंवा आणखी कोणाचाही मृत्यु फार झालें तर आणखी दोन दिवस अगोदर ओढून घ्याल ह्याहून निराळी व्यवस्था सर्व सरदारांची जूट करून काय लावणार?"

सामान्य व्यवहारांत माणसें बोलत असतांना इतकीं मोजकीं, रेखीव, निःसंदिग्ध

अर्थवाहक भाषणें करूं शकतात का? आणि तीं जशीं भाषणें करतात तशींच भाषणें वापरावयाचीं म्हटलें तर नाटकाच्या संसारांत निर्वाह लागेल का? याचा विचार या ठिकाणीं रसिकांनी करून पाहावा.

मला पेशवा समजूं नका —

आपलें बोलणें तरी ऐकून घ्यावें अशी यावर नाना माधवरावाला विनंति करतात. परंतु "मला विनंति कसली करतां? सरदारहो, तुम्ही मला पेशवा समजूं नका...मी दरबारला येगार नव्हतों. पण माझ्या सरदारांना माझ्या कैदखान्याची गोष्ट सांगण्यास पुन्हा संधि आईसाहेब व नाना देणार नाहींत म्हणून आलों" असें कडवट उत्तर पुन्हा माधवराव देतो. आणि मला आता कसचें बरें वाटणार? असें निराशेचें बोलणें बोलून कोणाची विनंति न ऐकतां दरबार सोडून तो निघून जातो. या प्रसंगांत माधवराव हॅम्लेटसारखा किंचितही वाटत नाही. कांही सारखेपणा असलाच त्याचा तर तो ऑथेल्लोशीं वाटतो.

नानांच्या पुढचें संकट हेंच होतें. आणि त्यावर नानांनी मोठी धाडशी युक्ति मनाशीं योजिली होती. ती म्हणजे भाऊसाहेबाच्या मनांतली दिल्लीस मराठ्यांची सत्ता स्थापण्याची कल्पना. बाजीरावाला दिल्लीच्या छत्रपतीचे उत्तरचे पेशवे म्हणून काश्मीरांत नांदूं द्यावें आणि दख्खन पेशव्यांना व त्यांच्या सरदारांला मोकळी ठेवावी ही ती कल्पना होती.

या बाबतींत सरदारांनी नानांना पाठिंब्याचें आश्वासनही दिलें. परंतु माधवरावाचा आजार, त्याची बिघडलेली वृत्ति, त्यामुळे त्याच्यावर घालावें लागलेलें बंधन आणि त्यांतून आपणही बाजीरावाप्रमाणे नानांचे कैदीच आहोंत हा समज निर्माण होऊन माधवरावाची झालेली चित्ताची तळमळ, या सगळ्यांतून एवढी भयानक घटना घडावयाची होती की, नानांचे सगळे मनोरथ फार रसातळाला जाऊन मिळणार होते.

केशवशास्त्र्याच्या कारस्थानांतला एक धागा —

याच्यापुढच्या तिसऱ्या प्रवेशांत आवडी नायकिणीचा नवरा सदोबा याला केशवशास्त्री नानांच्या नजरेला पाडतो व त्याच्या अर्जाचा विचार करण्याची विनंति करतो. कारण, त्याची तक्रार बाजीरावाने आपल्या बायकोला घराबाहेर काढल्याबद्दल असते. तेव्हा "बाजीरावाचीं असलीं दुष्कृत्यें श्रीमतांच्या कानावर जितकीं जातील तितकीं चांगलीं" या भावनेचा पगडा बसून नाना त्याला बरोबर घेऊन केशवशास्त्र्यांना माधवरावाकडे जायला मिळावें या बेताला संमति देतात. केशवशास्त्र्याच्या कारस्थानांतला एक धागा अशा रीतीने जमून येतो.

याच धाग्याचा प्रभाव आपल्याला पुढच्या चवथ्या प्रवेशांत पाह्यला सापडतो. माधवराव शनिवारवाड्यांतील बागेमध्ये स्वतःच्या दुःखी जीवनाची, कैदखान्यासारख्या

जीवनाची खंत करीत बसलेला असतो. त्याच्या मनाला थोडी करमणुक व्हावी म्हणून आईसाहेब, इंग्रज वकिलाकडून फिरंगी कारागिराने काढलेल्या तसबिरा आलेल्या असतात त्या त्याला दाखविण्याचा प्रयत्न करतात. त्याने भडकून नानांना दाखवा त्या तसबिरा म्हणजे ते खूष होऊन पर्वतीवर आणखी एखादा दीपोत्सव करतील, असें आवेगाने त्यांना माधवराव सांगतो. श्रीमंतांशिवाय आम्हांला दुसरा आसरा नाही असें त्यावर आईसाहेब म्हणतात. परंतु तसें असतें तर बाजीरावाशीं पत्रव्यवहार करायला बंदी; पुरंदरला जाऊन राहावें म्हटलें तर नानांना आवडणार नाही हें म्हणणें, या गोष्टी तुम्ही कशा करतां ? असा कांहीसा बिनतोड प्रश्न टाकून माधवराव त्यांना नानांचा आसरा घ्या, म्हणून पुन्हा सांगतो.

यादरम्यान केशवशास्त्री येतो. आईसाहेबांशीं जपजाप्यासंबंधी बोलून त्या तसबिरा आपणच माधवरावांना दाखविणार म्हणतों आणि जातां जातां नानाच्या परवानगीने गोंधळीबाबा पोवाडे म्हणणार असल्याचेंही आईसाहेबांच्या कानावर घालून ठेवतो.

आईसाहेब धोरणी होत्या. पोवाडे ऐकूं लागल्यावर माधवरावाच्या तोंडून कांही उद्गार बाहेर पडल्यास कदाचित त्यामधून माधवरावाच्या मनोव्यथेचें कारण समजेल या कल्पनेनें त्या तेथून निघून जाण्याचा बहाणा करतात, परंतु बाजूला सर्व कांही ऐकूं येईल अशाच रीतीने दबा धरून बसतात.

नानांच्या आणि आपल्या चेहऱ्यांत इतकें साम्य का ? —

तसबिरा दाखविण्याच्या वेळीं केशवशास्त्री चावत चावत नाना आणि माधवराव व नाना आणि यशोदा यांच्यामधील विशेष साम्य माधवरावाच्या मनावर ठसवितो. बाबासाहेबांचें म्हणून केशवशास्त्र्याने दिलेल्या पत्रांत नाना आणि आईसाहेब यांच्या नीतिबाह्य संबंधातूनच यशोदेचा जन्म झाला असल्याचें लिहिलेलें होतें हें या वेळीं आपल्याला सूचित होतें. कारण त्या पत्रावरून पाहतां नाना आणि यशोदा यांच्या चेहऱ्यांत साम्य असावें हें आपल्याला समजूं शकतें असें माधवराव म्हणतो. परंतु आपल्या स्वतःच्या आणि नानांच्या चेहऱ्यांत इतकें साम्य कां असावें याचा मात्र त्याला उलगडा झाला नाही.

परंतु आताच याबद्दलचा स्पष्ट उलगडा केशवशास्त्री करीत नाही. त्या बाबतींत त्याची भिस्त गोंधळ्याच्या पोवाड्यावर अधिक असावी. गोंधळी आल्यावर, ओळख-देख पटल्यानंतर तो नाना फडणिसांच्या पोवाड्यांतील एक चौक म्हणून दाखवितो. "नानाचा अवघा खेळ श्रीमंतांला बरोवर घेऊन," "उठा नानांच्या रे उठा नानांच्या हुकूमा" या ओळी ऐकून माधवराव भडकतो आणि "जेथे तेथे नानांचा हुकूम, आणि मी कोणीच नव्हे; जावें तेथें नाना; दरबारांत जा, नाना आहेतच, पर्वतीच्या दर्शनाला जा, नाना आहेतच!" असें वैतागाने म्हणतो. तेव्हा याऐवजी बाजीरावाने नानांबद्दल केलेला पोवाडा केशवशास्त्र्याच्या सांगण्यावरून गोंधळी म्हणतो. त्यांत

स्वकुळाचें मूल वसविलें वाढविले माधवराव। नागनाथा मरण आलें पेशवेकुळास कैदखाना! पर्वतीवर विलास करितो जैसा गोकुळीं हा कहाना। श्रीमंत सवाई–" इत्यादि ओळी म्हणून नानांचा संबंध खुद्द गंगाबाईशीं आणि कदाचित यशोदेशींही असल्याचें सूचित करतो.

एवढ्याने केशवशास्त्र्याचें काम झालें. म्हणून गोंधळ्याला दटावून, असला कसला हेंगाडा पोवाडा असें म्हणून तो त्याला पोवाडा पुढें म्हण्याला बंदी करतो. परंतु माधवराव मस्तकतिडिकेने "म्हणूं देत – म्हणूं देत – झाल्या प्रकारानंतर लोकांनी मला नानांच्या वशिल्याचा कां म्हणूं नये? हा पोवाडा आईसाहेबांना म्हणून दाखवा जा!" असें म्हणतो. परंतु आता अधिक हें प्रकरण लांबविण्यांत अर्थ नाही हें जाणून केशवशास्त्री गोंधळ्याला घेऊन निघून जातो.

पुढच्याच प्रवेशांत गोंधळ्याला केल्या कामगिरीबद्दल शाबासकी देऊन आता येथून तडक बाजीरावाकडे जा आणि पुन्हा या बाजूला तोंड दाखवूं नकोस म्हणून केशवशास्त्री त्याला बजावतो. अशा रीतीने केशवशास्त्र्याचें कारस्थान सिद्धीस गेलेलें असतें. "आता आमचा मंत्र पुरा झाला. नानांच्या वाड्यावरून गाढवाचे नांगर फिरतात की शनिवारवाडा ढासळून पडतो एवढेंच काय तें पाहावयाचें आहे" असें तो हर्षोत्साहाने म्हणतो आणि आपणच तयार केलेल्या बाबासाहेबांच्या त्या बनावट पत्राचा पुराव्यांत केव्हा उपयोग होण्याचा संभव राहूं नये म्हणून तें पत्र नष्ट करून टाकतो.

केशवशास्त्र्याच्या मात्रेचा मूर्तिमंत दुष्प्रभाव —

पुढच्या सहाव्या आणि तिसऱ्या अंकाच्या शेवटल्या प्रवेशांत केशवशास्त्र्याच्या मात्रेचा दुष्प्रभाव मूर्तिमंत आपल्यापुढे माधवरावाच्या चित्ताच्या तळमळीच्या स्वरूपांत उभा राहतो. सासूबाईच्या पंक्तीला माझ्या आईला लोक बसवितात काय? हा विचार त्याचें अंतःकरण जाळीत असतो. त्याचें एक मन ही गोष्ट आपण कदापि कबूल करणार नाही असें म्हणत असतें तर एक मन पापी आणि कारस्थानी नानांच्या बाबतींत काय वाटेल तें शक्य आहे या कल्पनेने आईही सासूप्रमाणे भ्रष्ट असली पाहिजे असें त्याला पटवूं पाहतें. यामुळे पुणे शहराचा त्याला तिटकारा वाटतो. शनिवारवाडा जाळून राख केला पाहिजे असें त्याला वाटूं लागतें. अशा वेळीं यशोदा नानांची तसबीर घेऊन त्याच्याकडे आलेली पाहतांच "नानांनी स्पर्श केलेली चिंधी देखील मला खपत नसतांना नानांची तसबीर मजपुढे आणण्याला लाज नाही वाटत?" असें भडकल्या चित्ताने ओरडून, तसबीर हिसकावून घेऊन तो फेकून देतो. "प्रत्यक्ष हाडामासांचा नाना जिवंत असतांना त्याच्या तसविरीवर सूड उगवून स्वस्थ बसणें" यांतील स्वतःच्या दुर्बळतेची अत्यंत तीव्र जाणीव माधवरावाला होते आणि त्या आवेगांत त्याला मूर्च्छा येऊन तो पलंगावर पडतो.

थोड्या वेळाने तो सावध झाल्यावर यशोदा त्याच्या मनोव्यथेचें कारण समजावून

घेण्याचा प्रयत्न करते. परंतु तिच्या प्रेमाची आता त्याला मुळीच किंमत वाटेनाशी झाली होती. आपल्या मनांतील आग तिच्याही मनांत पेटवून काय उपयोग हाही विचार त्याला जाळीत होता. त्यामुळे आपल्या मनांतलें तिला उघड करून सांगायला माधवराव तयार होत नाही. पण माधवराव जर दुःखी तर आपणाला तरी कसें सुखी राहतां येईल—म्हणून मन मोकळें करून बोलायची विनंति त्याला यशोदा काकुळतीला येऊन करते.

माधवरावाच्या जिवाची कालवाकालव —

इतक्या प्रेमळ जीवाची उत्पत्ति व्यभिचारापासून व्हावी ही कल्पना त्याच्या जिवाची कालवाकालव करते. आणि हॅम्लेट ऑफिलियाला "तूं मठांत जाऊन जोगीण हो" हा उपदेश ज्या थाटांत करतो त्याच थाटांत यशोदेला तो "माझ्याबरोबर तूंही दुःखी होऊं नको,—जा मला सोडून दे. माझ्यावर जर तुझें प्रेम असेल तर मला एखाद्या रक्तपित्याप्रमाणे समजून दूर पळून जा" असें सांगतो.

परंतु आफिलियाला हॅम्लेटला सल्ला तूं मला सोडून जा असा नव्हता. या संसारांत पवित्र राहणें अशक्य आहे म्हणून तो तिला संसारत्याग करून जोगीण व्हायला सांगत होता. स्वतःबद्दलच्या कसल्याही हीन भावनेने तो तळमळत नव्हता. त्यामुळे आवेश आणि थाट हॅम्लेटचा असला तरी मूलभूत तुलनेंत हें साम्य लटकेंच पडतें.

चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत नानांच्या वाड्यांत आईसाहेब, नाना, यशोदा व बजाबा यांच्यामध्ये माधवरावासह सीमोल्लंघनाची स्वारी काढावी की नाही याबद्दलचा विचार चालू असतो. दीपोत्सवाच्या वेळच्या अनुभवाने शहाण्या होऊन या असल्या स्वारीबिरीच्या फंदांत पडूं नये असा आईसाहेबांचा सल्ला होता. परंतु एक तर माधवरावाची तब्बेत थोडी सुधारली होती आणि मुंबईकर व बाजीराव यांच्यामध्ये बऱ्याच घट्ट स्वरूपाच्या उलाढाली चालू असल्याचें कळलें असतांना स्वारी न काढून "आपण दुर्बळ आहोंत आणि माधवराव नानांच्या छळांतून सुटण्याकरिता, कोणी शनिवार-वाड्यावर गर्दी केली तसतां आपण होऊन बंडखोरांच्या स्वाधीन होऊन बाजीरावाच्या आश्रयाला जाईल" ही बाजीरावाने कंपनीच्या मंडळीना भासविलेली गोष्ट खरीच आहे, असा पुरावा आपण उत्पन्न केल्यासारखा होईल, यासाठी स्वारी काढावी असें नाना आणि बजाबा यांचें मत असतें.

सीमोल्लंघनाचा बेत कायम होतो —

यावरून माधवरावाच्या तोंडून उल्लेख झालेल्या बाबासाहेबांच्या पत्रांचा विषय निघतो. तें पत्र बनावट असल्याबद्दल माधवरावाची खात्री पटवून देण्याचा प्रयत्न बजाबाने केला होता. त्या वेळीं जरी माधवराव हो किंवा नाही कांहीच बोलला नसला तरी आज

सकाळीं त्याची वृत्ती पुष्कळच शांत दिसत होती. म्हणूनंही सीमोल्लंघनाकरितां स्वारी निघायला हरकत नाही असें बजाबाचें म्हणणें पडलें.

बाबासाहेबांच्या त्या तथाकथित पत्राबद्दल आपण बाबासाहेबांकडे जासूदामार्फत मुद्दाम पत्र पाठविलें आहे; बाबासाहेबांचा मजवर कितीही राग असला तरी मी जें करीत आहें तें श्रीमंतांच्या हिताकरिताच करीत आहें हें ते जरूर मान्य करतील, व लगेच इकडे निघूनही येतील. तेव्हा एकंदर वातावरण निवळण्याच्या मार्गावर असतांना सीमोल्लंघनाचा समारंभ उरकून घ्यावा आणि माधवरावाच्या कैदेसंबंधाने व तव्वेतीसंबंधाने बाजीरावाच्या पक्षाकडून मुद्दाम पसरविण्यांत आलेल्या अफवांना परस्पर उत्तर मिळेलसें करावें हा नानांचा सल्ला, बाबासाहेब स्वतःच दोनतीन दिवसांत इकडे येऊन सर्व खुलासा होईल या आशेवर यशोदाही मान्य करते.

मात्र एवढ्यांतच केशवशास्त्र्याला कैद करूं नये, "बाबा आल्यावर हा सूर्य आणि हा जयद्रथ असें करून त्या मेल्याला शिक्षा केली तर तिकडच्या मनावर ह्या गोष्टीचा अधिक चांगला परिणाम होईल" हा यशोदेचा सल्ला मान्य करण्यांत येतो.

परंतु सीमोल्लंघनाचा उद्याचा दिवस नीट पार पडला व बाबासाहेब येऊन श्रीमंतांच्या डोक्यांतील भ्रम नाहीसा झाला म्हणजे पुन्हा आपण जिंकली, ही नानांना वाटणारी आशा नियतीच्या चक्रांत पुरी व्हायची नव्हती.

तिसऱ्या प्रवेशांत सीमोल्लंघनाच्या स्वारीच्या प्रसंगांत नानांचें सरदारांना उद्देशून स्फूर्तिप्रद भाषण आहे. पानपतचा पहिला घाला, मोठ्या माधवरावाच्या अकाली निधनाचा दुसरा घाला आणि नारायणरावाच्या वधाचा तिसरा घाला या "दुर्दैवाच्या तीनीही फेऱ्यांतून बचावून नानासाहेबांच्या वेळेप्रमाणे (मराठ्यांचें) साम्राज्य पुन्हा तेजस्वी झालें आहे. सरदारहो, दुर्दैवाशीं तीन वेळा टक्कर देऊन आम्हीं दुर्दैवाला पुरून उरलों आहों; आमचा जय खात्रीने होणार. इजा बिजा तिजा होऊन गेलेली असून चौथ्यांदा–" असें म्हणून नाना आपला पुढचा बेत विशद करून सांगणार असतांनाच माधवराव खूप अस्वस्थ होतो आणि,

"मी सूड उगवणार–माझा खंजीर शत्रूच्या पोटांत खुपसून पापाचीं आंतडींच मी चव्हाट्यावर आणल्याशिवाय राहणार नाही" असें ओरडून तो अंबारींतून खाली उडी टाकूं पाहतो. त्याच्या हातांतला खंजीर काढून घेऊन बजावा त्याला धरून ठेवतो. स्वारींत गडबड माजते. माधवरावाची प्रकृति बिघडल्याचें निमित्त करून स्वारी पुढें ताबडतोब स्थगित केली जाते, "माझें मन अगदी उदास झालें आहे व सर्व विश्व अंगावर कोसळून पडतें आहेसें वाटतें!" असें उदासवाणें चित्त या प्रकारामुळे नानांचें होतें. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, "पळत सुटलेल्या सैन्यास गाठून हजारो लोकांची कत्तल अहंमदशहाने केलेली स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली, त्या वेळीं सुद्धा आताच्यासारखें विपरीत" नानांच्या मनाला वाटलें नव्हतें.

हा प्रसंग नानांनी आपल्याच स्वभावाने स्वतःवर ओढवून घेतला होता का? याहून

अधिक मोकळेपणाने वागून, माधवरावाला प्रेमाने विश्वासांत घेऊन नानांना हें संकट टाळतां आलें नसतें का? असे पुष्कळ प्रश्न या प्रसंगीं मनांत निर्माण होतात. परंतु तो विषय इतिहासचर्चेचा आहे. नाटकाचा विचार करतांना त्या प्रश्नांकडे डोळेझाकच करून चर्चा केली पाहिजे.

केशवशास्त्र्याचें कारस्थान चिरकाल गुप्त थोडेंच राहणार होतें? तेव्हा या बाबतींतलें कंपनीकडून मिळावयाचें बक्षीस पदरांत पाडून घेऊन पुण्यांतून पोबारा करावयाचा असा त्याचा बेत चालला होता. बाजीरावाकडे राघोबादादाचा खजिना कंपनीने परस्पर पाठविला ही गोष्ट गोमाजीपंत नातूकडून कळल्याने त्याला थोडें अस्वस्थ वाटत होतें. त्यांतच बाजीरावाचा हेर तो गोंधळी याच वेळी येथें यावा हेंही त्याला दुश्चिन्हच वाटलें. परंतु दरबारांत माधवराव झाल्या प्रकाराबद्दल काय बोलतो हें ऐकण्याची उत्कंठाही त्याला दाबून ठेववत नव्हती. म्हणून तेवढ्यापुरता दरबारांत हजर राहून पुणे सोडण्याचा त्याचा विचार चवथ्या प्रवेशांत आपल्याला कळतो.

माधवरावाची भ्रांत वृत्ति —

पांचव्या प्रदेशांत सीमोल्लंघनाची स्वारी परतून शनिवारवाड्याच्या दिल्लीदरवाजाशीं माधवराव अंबारींतून खाली उतरतो. त्याची मुद्रा कावरीबावरी झालेली असते. आपली कट्यार माधवराव बजाबाजवळ मागत असतो. तिचा उपयोग तो स्वतःच्या नोकरावर करणार नसेल, शत्रूविरुद्ध करणार असेल तरच आपण देऊं असें बजाबा म्हणत असतो. पण माधवराव, भडकलेल्या अवस्थेंत, "बाहेरच्या शत्रूची आपल्याला पर्वा नाही; बाहेरचे शत्रू आणि घरचे शत्रू सर्व एका माळेचे मणी!" असें म्हणतो; घरच्या शत्रूचाच नायनाट करण्यासाठी त्याला खंजीर हवा असतो. बजाबा खंजीर देत नाही, म्हणून आपले सगळे पूर्वज कसे रागाने डोळे वटारून पाहत आहेत पाहा, असें तो बजाबाला भ्रांतपणें म्हणतो.

आईसाहेब माधवरावाला शांत करूं जातात. पण तो, "कोण बाई आपण? कोणाच्या कोण? आपल्या व्यभिचाराने कोणत्या नवऱ्यास रात्रंदिवस तळमळत पाडलेंत?" इत्यादि जास्तच भ्रांतपणें बोलून आपल्या मनाची तळमळ बाहेर ओकतो.

गद्यकाव्याचा एक उत्कृष्ट नमुना —

ओवाळणी घेऊन उभी असलेल्या आपल्या पत्नीलासुद्धा त्या भ्रांत अवस्थेंत तो ओळखत नाही. "आई आणि लेक. जेथे जावें तेथें हीं नांवें ऐकायला येतात. आईशिवाय प्राणी उत्पन्न होता तर किती उत्तम झालें असतें." हें या वेळचें माधवरावाचें भाषण गद्यकाव्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. त्याचबरोबर माधवरावाच्या भ्रांत चित्ताची इतकी यथार्थ कल्पना अशा काव्यमय भाषेशिवाय इतक्या थोड्या शब्दांत आणि इतक्या चपखलपणें करून देणें अशक्य झालें असतें याचाही साक्षात्कार येथे पटतो.

माधवरावाची स्त्रीजातीविषयीची चीड —

यशोदा त्याला नीरांजनें ओवाळूं लागते. परंतु मध्येच तिचा हात तो धरतो.

"हें काय हें? हीं नीरांजनें म्हणजे तुम्ही काय समजतां? जगांतील सर्व स्वच्छ व पुण्यकारक पदार्थांचें सत्व काढून ह्या तेजस्वी ज्योती बनविलेल्या असतात! वाईट, घाण व पापमय पदार्थांपासून निर्माण झालेल्या स्त्रीने हीं यशाचीं चिन्हें हातीं धरणें म्हणजे निष्कलंक सत्याची व धर्माची थट्टा करण्यासारखें आहे" असा आपला भावनावेग माधवराव व्यक्त करतो आणि नीरांजनें जमिनीवर फेकून देतो. यशोदा दुःखभराने रडते. परंतु,

"तूं अशी रडतेस कां? तुला काय कमी आहे? पुरुषांना फसवून सर्व जगावर राज्य करण्याचा मक्ता परमेश्वराने बायकांना दिला आहे–" असें बोलून स्त्रीजातीविषयींची चीड माधवराव व्यक्त करतो.

येथे चवथा अंक संपतो. वास्तविक म्हणजे नाटकाच्या चढत्या रंगतीचा परमोच्च बिंदूही येथेच गाठला जातो. हिंदूंच्या धार्मिक श्रद्धेप्रमाणे, नीरांजनें फोडलीं तेव्हाच यशोदेचें कपाळ फुटलें. आता यापुढील नाटक म्हणजे झालेल्याच्या निरवानिरवीच्या स्वरूपाचें आहे.

कारण, पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतील, भिक्ष्या सदोबाला तोफेचा आवाज ऐकून लटपटत असतांना त्याचे नोकर घेऊन जातात हा प्रसंग फक्त श्रीमंतांचा दरबार संपल्याच्या निदर्शक तोफांचा उल्लेख करण्यापुरताच उपयोगी आहे. दुसऱ्या प्रवेशांत गोंधळ्याने बाजीरावाकडून आणलेल्या बक्षिसाची वाटणी गोंधळी, आवडी व केशवशास्त्री यांच्यामध्ये चाललेली असते. नाटकाचा अणीवर येऊन पोचलेला पसारा आवरता घेण्याच्या वेळींही या प्रवेशांत श्रृंगारसाची चावटी करण्याचा मोह खाडिलकर आवरूं शकत नाहीत हें पाहून त्यांच्या श्रृंगारसराजाच्या आवडीबद्दल थोडासा मनाचा विरसच होतो. असा श्रृंगाररस वाहत असण्याच्या ऐन वेळीं नानांचा कोतवाल येऊन त्या तिघांना नानांच्या हुकुमावरून मुद्देमालासह व कागदपत्रांसह कैद करतो, एवढाच संबंध नाट्यवस्तूशीं या प्रवेशाचा आहे.

माधवरावाची केविलवाणी भ्रांतिष्ट अवस्था —

तिसरा प्रवेश माधवरावाची केविलवाणी भ्रांतिष्ट अवस्था दाखवून आपलें हृदय करुणा आणि भीषणता या दोन्ही कारणांनी कंपित करतो.

माधवरावाला झोप नीट नसते. थकून थकून काय डोळा लागेल तेवढाच. पोटांत अन्न नाही. यशोदेनें आर्जवें करावीं, रडून घट्ट पाय धरावे, तर माधवरावाने तिला मारायलाच धावावें आणि मारावेंही. बजाबा आणि आईसाहेब दोघेही पलीकडे जरा आडच बसतात. कारण त्यांना पाहिलें की, माधवरावाचें पित्त अधिकच खवळतें

नोकर असून सेवेसाठी कोणाचा उपयोग नाही सर्व भार एकट्या यशोदेवर आणि त्यांत घर मार खाण्याची पाळी. माराला यशोदा कचरत असते असें नव्हे. औषध लागू पडाव आणि माधवरावाला गुण पडावा याहून अन्य तिला कांही नको होते. स्वतःच्या पातिव्रत्याचें पुण्य हें माधवरावाचें औषध ठरावें. आपलें आयुष्य माधवरावाला मिळून आपल्या आयुष्याची आताच समाप्ति व्हावी. अशी ती जगदंबेची प्रार्थना करते. पण या सगळ्याचा कांही उपयोग होत नाही

पृथ्वीला एवढें पाप सहन तरी कसें होतें ? –

जाग यताच माधवराव विसंगत बडबड करूं लागतो. पृथ्वीला एवढें पाप सहन तरी कसें होतें असें एकवार त्याला वाटतें. तर पुन्हा या पापाने पृथ्वी बुडणार असा साक्षात्कार त्याला होतो. पूर्वीच्च असें झालें असतें. पण मूर्ख परमेश्वराने वराहाचा अवतार घेऊन या बऱ्याला वाचविलें, असें बोलून रागाचा रोख पुन्हा पुन्हा बजाबावर वळतो. कारण बजाबाने खंजीर काढून घेतलेला असतो आणि तो खंजीर बजाबा परत देत नाही म्हणून माधवरावाच्या अंगाचा पुन्हा पुन्हा संताप होत असतो.

यशोदेलाच्च तो बजाबा समजतो आणि तिची वेणी धरून तिला ओढून, कोणत्या तोंडाने खंजीर नाही म्हणालास मांग म्हणतो आणि कुचकामाचें आहे तुझें तोंड असें म्हणून तो विषय तितकाच सोडून देतो.

पुन्हा वेणीला धरून यशोदेचे दात पाहतो. एवढे मुळे असल्यावर खंजीर करायचा काय ? असें म्हणतो. पण पुन्हा म्हणतो, "फुकट तुझे हे कोवळे दात – पण गड्या बजा, तुझे केस चांगले लांब आहेत. ते कापून दे म्हणजे त्यांचा चाबूक करून मारायला सापडेल." कोणाला ? तर पुन्हा बजाबालाच्च !

यशोदा त्याची समजूत बांधू पाहते. आज उद्या बाबा येतील. त केशवशास्त्र्याचें कपट कारस्थान उघड करून दाखवितील. मग आमच्या शत्रूंना, म्हणजे बाजीरावाने केलेला कट उघडकीस येईल, हें ती सांगू पाहते.

माधवरावाच्या अंतःकरणाची खरी बोच —

पण शत्रू शब्द ऐकतांच माधवरावाच्या भ्रम त्या दिशेने पलटी घेतो. बाहेरचे शत्रू आले असतील तर राघो भरारीचा मुलगा बाजीराव दुर्गणीला आणि महादजी इंग्रजाला खडे चारील असें तो म्हणतो. पण घरचे शत्रू कोण आहेत ? म्हणून विचारतो. ही त्याच्या अंतःकरणाची खरी बोच असते.

यशोदेच्या तोंडून पानपतच्या लढाईचा उच्चार होतांच तेथल्या त्या पराभवाचें आणि पळापळीचें चित्र त्याच्या डोळ्यांपुढे नाचूं लागतें आणि तो हळहळतो, "अरेरे, बुडलों, होळकरांनी एकाएकी पाय काढला. विश्वासघात ! विश्वासघात ! हा नानाचा कर्मचांडाळ बजाबा सर्व नाशास कारण ! "

अशा रीतीने माधवरावाच्या भ्रमाचें करुण चित्र व यशोदाबाईचा दारुण शोक यांच्या दर्शनांत हा प्रवेश संपतो.

आणि मग शेवटचा प्रवेश. बाबासाहेबांकडून माधवरावाला पत्र आलें होतें. त्यामुळे त्याचें चित्त थोडेंसें स्वस्थही झालें होतें. आवडीच्या माडीवर सापडलेलीं पत्रें यानंतर वाचलीं म्हणजे माधवरावाची ग्वाही होईल अशी आशा रास्त्यांना वाटत असते. पण त्यासाठी आधी माधवरावाचें मन शांत व्हावयास हवें होतें. आणि ती गोष्ट कशी घडणार यावद्दल सरदारांच्या, विशेषतः नानांच्या मनाला चिंता होती. या सगळ्या प्रकाराने राजकारणाचा आपल्याला फार तिटकारा येतो असें म्हणून नाना आपल्या स्वतःच्या जीवनाचा करुण विपाक स्वतःच पुढीलप्रमाणें वर्णन करतात.

नानांचें खडतर दुर्दैव —

"सद्धेतूने आपण महत्कार्य अंगावर घ्यावें आणि भलताच आरोप करून आपल्यापैकींच कांही स्वार्थसाधूंनी त्या कार्यावर विच्चा घालावा, याहून खडतर दुर्दैव कोणतें ? असा वारंवार प्रश्न करतांना माऊसाहेबांना मीं ऐकलें आहे."

अशी ती माऊसाहेबांची किंवा नानांची करुण कथा नाट्यरूपाने मराठी साहित्यांत रुजू करण्याची इच्छा ग्वाडिलकरांसारख्या सिद्धहस्त नाटककाराला झाली नाही हें आम्हां मराठी भाषिकांचें केवढें दुर्दैव !

"ह्या वेळेला मला तर आशा दिसत नाही" अशी निराशेची भविष्यवाणी नाना उच्चारतात त्याच वेळीं केशवशास्त्र्याला नानांच्यापुढे आणतात. या ठिकाणीं आवडीची भूमिका आयागोची पत्नी एमिलिया हिच्याशीं बरीच सदृश अशी वाटते. त्याचप्रमाणें केशवशास्त्र्याला खुलाशासाठी रास्ते जेव्हा म्हणतात, "काय रे चांडाळा, तोंड नाही उघडत !" त्या वेळीं "ह्या कागदपत्रांत तें पुरें उघडलें आहे" असें केशवशास्त्री उत्तर देतो तेव्हा, आयागोच्या अशाच धर्तीच्या शेवटच्या वेडर उत्तराची आठवण होते.

मानवी बेत दैवी संकल्पाविरुद्ध —

केशवशास्त्र्याला शिक्षा होते खरी. पण ज्या कुतर्काने माधवरावाला वेडें केलें होतें त्या कुतर्काने नानांचें मन फारच हळवें झाल्याचें आढळतें. "दिल्लीवर आमचें भगवें निशाण लावूं, इराणी तुराणीवर छत्रपतींचे सरदार राज्य करण्यास पाठवूं, म्हणून इकडे आमचे बेत आणि तिकडे श्रीमंतांना असें वेड लागलेलें ! मला वाटतें आमचे हे मानवी बेत दैवी संकल्पाच्या विरुद्ध असले पाहिजेत; नाहीतर असले भयंकर प्रसंग—"

परंतु नानांचें तें वाक्य पुरें होत नाही. जणू त्यांची बत्तीशीच भविष्यवाणीचें रूप घेते. एकीकडे बाबासाहेब आल्याची बातमी देण्यासाठी हुजरे धावतात तोच, "नाना घात झाला" असें ओरडतच बजावा येतो आणि "आम्हां सर्वांचें दुर्दैव ओढवलें ! श्रीमंतांनी तिसऱ्या मजल्यावरून कारंजावर उडी घेतली" ही भयंकर बातमी सांगून तो

सर्वांनाच हतबुद्ध करतो. त्याने सांगितलेली हकीगत अशी : यशोदेला आलेलें बाबासाहेबांचें पत्र तिने वाचून दाखविल्यावर माधवरावाने केशवशास्त्र्याला शिवी दिली; खंजीरावरून पुन्हा रागावणार नाही असें आपल्याशींच तो पुटपुटला आणि बाबासाहेब आल्याची वार्ता कळतांच केव्हा एकदां त्यांना भेटूं अशी उताविळी होऊन, " तुम्ही एकदम वर येत नाही तर मीच हा खाली आलों " असें म्हणून माधवरावाने कारंज्यावर उडी टाकली.

नानांनी म्हटल्याप्रमाणे " श्रीमंतांबरोबरच महाराष्ट्राच्या साम्राज्याची इमारत ढासळून पडली " असाच इतिहासानेही दाखला दिला.

अशी ही चटका लावणारी सवाईमाधवरावाची करुण कहाणी आहे. त्याच्याबद्दल आपल्याला चटका लागतो, सहानुभूति किंवा साधारणीकरण होतें याचें कारण तो कोणी महान शूर वीर अथवा उदारधी पुरुष आहे म्हणून मुळीच नव्हे. खाडिलकरांनी अगदी जातां जातां त्याच्या बुद्धिमत्तेची आणि राजकीय विचारशीलतेची उगीच ओझरती छटा आपल्याला दाखविली आहे. पण तीही पुढे कोणता मोठेपणा अपेक्षित होता हें दाखवून, हीं अपेक्षित मोठेपणाचीं बीजें फळाफुलाला येण्यापूर्वीच करपून गेलीं, माधवरावाची अर्धस्फुट कळी पूर्ण उमलत नाही आणि म्हणून त्याच्या दैवहत जीवनाबद्दल ' हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार ' असें नियतीविरुद्ध म्हणण्यास आपण प्रवृत्त व्हावें, यापुरताच त्या मोठेपणाच्या बीजदर्शनाचा उपयोग त्यांनी केला आहे.

माधवराव जन्मतःच दुर्दैवी —

माधवराव जन्मतःच दुर्दैवी. तीन वर्षें वयाचीं होतात न होतात तोच त्याची आई पण त्याला सोडून गेली. आणि बाविसाव्या वर्षींच त्याचा अत्यंत दुःखद आणि भीषण अंत होतो. आपल्या लहान वयांतही स्वतःची सत्ता गाजवावी असा त्याला हुरूप आहे, आवेश आहे. बाजीरावाच्या चेतवणीने त्या आवेशाला बरीचशी धारही चढलेली आपण पाहतों. पण पोरवयानुरूप तो दुबळा आहे. स्वतःचा हुकूम चालविण्याची धमक त्याच्या अंगीं आलेली नाही. त्यामुळे त्याचा अतीव कोंडमारा होत आहे; मनाची अत्यंत कुचंबणा होते आहे. असें झालें म्हणजे त्याचें डोकें फिरतें आणि आपण आजारी आहोंत या दीनवाण्या सबबीखाली त्याला पळपुटेपणा स्वीकारावा लागतो. त्यांतच बाजीरावाच्या कारस्थानांमुळे आपल्या आणि आपल्या पत्नीच्या जन्माशीं नानांचा अनैतिक व्यवहार निगडित असल्याचें वेड त्याच्या डोक्यांत शिरतें; त्यामुळे तो खरोखरीचाच भ्रांतिष्ट होतो.

आत्मीयता कां वाटते ? —

सत्ता गाजविण्याची उमेद तो बाळगतो यामुळे आदर वाटून आपल्याला त्याच्याबद्दल

आत्मीयता वाटते, कां तो प्रयत्न वरच्यासारख्या कारणांनी लंगडा पडतो याबद्दल हळहळ वाटून आपल्याला ही आत्मीयता वाटते हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःच्या मनाला विचारून पाहण्यासारखा आहे. पूर्वी एकदा दुसऱ्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे शौर्य, धैर्य वगैरे कारणांनी आदर उत्पन्न होईल, पण जिव्हाळा वाटणार नाही. माणसाच्या मनाच्या हळवेपणाच्च गुणचा असा आहे की, त्याला दुःखिताबद्दलच्च अधिक आत्मीयता वाटते. तशीच अवस्था माधवरावासंबंधानेही आपली होते.

आणि अशी ही आत्मीयता उत्पन्न व्हावी यासाठी त्याच्या दुर्दैवी जीवनाचें आणि त्याच्या अंतःकरण वेडें करणाऱ्या मनोव्यापारांचें चित्रण खाडिलकरांनी क्रमाक्रमाने, चढत्या आवेगाने आणि तन्मयतेने कसें केलें आहे हें आपण पाहिलें. एक गोष्ट मात्र खटकते; वाटतें की, शेवटी खाडिलकरांनी जरा घाई केली. दुसरे अनवश्यक प्रवेश कमी करून शेवटचा मृत्यूचा प्रसंग त्यांना हल्लीपेक्षा अधिक स्थिरपणाने आणि भावनेच्या तारा खूप उंच ताणल्या जातील अशा रीतीने लिहितां आला असता. आणि करुण नाटकाच्या अखेरीस एक प्रकारचा उदात्त शांत रस निर्माण करण्याची जी श्रेष्ठ कवींची प्रथा आपण पाहिली तिचाही अवलंब त्यांना करता आला असता. माधवरावाचें समाधान झाल्याचें नुसतें कथन बजाबाच्या तोंडून त्यांनी जें केलें आहे त्यापेक्षा यशोदेने पत्र वाचून दाखविण्याचा प्रसंग प्रत्यक्षच त्यांनी रंगवावयास हवा होता. आपण आपल्या प्रिय मातेला, सासूला आणि कांही अंशीं पत्नीलाही दूषणें दिलीं याबद्दलचा माधवरावाला झालेला पश्चाताप मग त्यांना या प्रवेशांत दाखवितां आला असता; आपण बालवयाचे होतो, आपल्यालाहि कांही भावना होत्या, पण त्यांकडे कोणी लक्ष देत नव्हतें; तुमचें राजकारण चाललें होतें आणि त्यांत माझ्या जीवाचा कोंडमारा होत होता; अशा स्थितींत मला विश्वासांत कां घेतलें नाहीं ? सर्व कांही नीट मनमोकळेपणाने समजावून का सांगितलें नाही? नानांनी तरी मजवर नुसती हुकूमत गाजविण्याचाच कां प्रयत्न केला ? अशी तक्रार—नैतिक दृष्ट्या खरी तक्रार—मग तेथे माधवरावाच्या तोंडीं शोभून दिसली असती. त्यामुळे नानांच्याबद्दल त्याचें आणि त्यामुळे इतरेजनांचेंही मन साफ झाल्याचा प्रत्यय उत्पन्न झाला असता. नानांवरील अपवाद टळायला त्यामुळे मदत झाली असती आणि माधवरावाचें अंतःकरण विशुद्ध झाल्याचा आगळा आनंद नाटकाच्या रचनेंत निर्माण झाला असता.

आपली ही तक्रार, आपला हा खुलासा, आपला हा भ्रमनिरास केव्हा एकदा बाबासाहेबांना सांगतो, अशा आवेशाने त्याने बाहेर धाव घ्यावी; अजून तो भ्रमिष्टच्च आहे या खोट्या समजुतीने बजाबाने त्याला सरळ वाटेने खाली जाण्याला प्रतिबंध करावा; आणि त्याला विरोध करण्याच्या धांदलींत माधवरावाची खाली उडी पडावी असें दाखवून नाटकाची रंगत अधिक वाढली असती.

त्यानंतरही घटका अर्धी घटका माधवरावाला जिवंत आणि अर्धवट सावध ठेवायला पाहिजे होतें. मोकळ्या मनाने सर्वांचा निरोप घेऊं द्यावयाला पाहिजे होतें. त्या

शेवटच्या भाषणांतही त्याला नानांना सांगतां आलें असतें की, निव्वळ सत्ता गाजवूं नका; तुमचा शुद्ध हेतु आम्ही समजतों; पण त्यामुळे आमचीं मानी अंतःकरणें दुखावतात आणि असे अनर्थ होतात; म्हणून राजकारणांतही मानवी अंतःकरणाला स्थान असूं द्या; अशी विनंति तो करूं शकला असता. बाजीरावाला परत आणा, त्याचें अंतःकरण जिंका, एकी साधा आणि महाराष्ट्राला यश मिळवून द्या – नाही तर महाराष्ट्राचें साम्राज्य कोसळून पडायला वेळ लागणार नाही हा गंभीर इषारा खाडिलकरांना माधवरावाच्या या निरोपाच्या भाषणांत अधिक परिणामकारकपणें देतां आला असता.

पण निरंकुशः कवयः हेंच खरें. त्यांनी अमुक करावें आणि अमुक करूं नये असें सांगण्याचा आम्हांला अधिकार काय ? त्यांनी जें केलें आहे त्याचा यथायोग्य आस्वाद घेणें एवढाच आमचा अधिकार.

खाडिलकरांची भाषा —

खाडिलकरांच्या या चार नाटकांपैकी कांचनगडची मोहना आणि बाकीचीं तीन नाटकें यांच्यामध्ये भाषेच्या दृष्टीने एकदम फरक जाणवतो. कांचनगडच्या मोहनेंतील भाषा कसलेली, तासलेली अशी फारशी नाही. ती भाषा थोडीशी अडखळणारी, लडथडणारी अशी वाटते. परंतु या उणीवा कीचकवध, भाऊबंदकी आणि सवाई माधवरावाचा मृत्यु या नाटकांत सव्याज भरून निघतात. भाऊबंदकीमध्ये सरस निरस असें निवडून दाखविण्याला मुळी अवसरच नाही. त्यांतील सर्वच पात्रांचीं सर्वच भाषणें घासून, पुसून, तासून परिणामकारक केलेलीं आहेत. इतकीं रेखीव भाषणें खाडिलकरांच्या इतर कोणत्याही नाटकांत नाहीत म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाही. गद्य संवादांतही काव्याची लय त्या नाटकांत खाडिलकरांनी जागोजाग साधली आहे. आणि आपल्या भाषेचें आणि शब्दांचें प्रभावी सामर्थ्य प्रत्ययाला आणून दिलें आहे.

कीचकवधांत याहून सफाई थोडी कमी असली तरी धर्म, भीम आणि द्रौपदी यांचे सर्वच संवाद भाऊबंदकीमधील भाषेचें स्मरण करून देण्याइतके सुंदर आहेत. कीचकाचीं शृंगाराचीं तशींच उद्दामपणाचीं सर्वच भाषणें अलंकारांनी आणि रसवत्तेने नटलेलीं आहेत. ज्यूलियस सीझरमधील ब्रूटसची पत्नी पोर्शिया ब्रूटसला आपल्या मनांतलें स्वतःजवळ उघडें करण्याला सांगत असतांना तिच्या ठिकाणीं जो आवेश शेक्सपीअरने दाखविला आहे त्या आवेशाचें स्मरण व्हावें अशींच कीचकाची पत्नी रत्नमाला हिचीं भाषणेंही कीचकवधांत आहेत.

सवाई माधवरावाचा मृत्यु या नाटकांतील बहुतेक भाषणांच्या रसवत्तेबद्दल व प्रभावी रेखीवपणाबद्दल जागच्या जागींच उल्लेख केला आहे. केशवशास्त्रीची आयागोच्या धर्तीचीं भाषणें तर कलापूर्ण आहेतच. पण आवडीबरोबरचे त्याचे शृंगारिक संवादही खाडिलकरांच्या भाषासामर्थ्याची चुणूक चांगली दाखवितात.

यांत दोन प्रश्न निर्माण होतात. हीं सर्व संभाषणें नेहमींच्या व्यवहारांतील

माणसांच्या संवादांसारखीं आहेत का ? सामान्य व्यवहारांत माणसें इतकें रेखीव, इतकें निःसंदिग्ध, इतकें निरपवाद बोलतात का ? आणि नसतील तर या नाटकांतील भाषणांना कृत्रिम आणि म्हणून नाटकी हें दूषण लावतां येईल का ?

आणि कांचनगडची मोहना लिहून झाल्यानंतर पुढच्या आपल्या विकासाच्या काळांत खाडिलकर रेखीव, अर्थपूर्ण, अलंकारिक आणि रसगर्भ भाषणें लिहिण्याकडे अधिकाधिक झुकत गेले यांचें मर्म काय ? त्यामुळे त्यांनी रेखाटलेल्या स्वभावचित्रणांत कोठेंही न्यून तर आलें नाहीच; उलट त्यामुळेच कदाचित तीं स्वभावचित्रें अधिक चित्तवेधक ठरलीं असें म्हणतां येणार नाही काय ? अशा स्थितींत भाषेच्या आतषबाजीसाठी खाडिलकरांनी नाटकें लिहिलीं असा आरोप त्यांच्यावर करतां येईल काय ?

येथे हे प्रश्न नुसतेच मुद्दाम उपस्थित करून ठेवले आहेत. सामग्र्याने जेव्हा अखेरीस या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे त्याच वेळीं या प्रश्नांचीं उत्तरें देणें अधिक योग्य होईल.

प्रकरण सतरावें

दत्तकपुत्राची आई – इंदुमती

खानदेशांतील शिरपुर येथील वकील आणि विचित्रलीला, खडाष्टक, मायेचा पूत, छत्रपति, लग्नसाम्राज्य इत्यादि नाटकांचे कर्ते कै. शंकर परशुराम जोशी यांच्या मायेचा पूत नाटकांतील प्रमुख भूमिका इंदुमती हिच्यासंबंधी या प्रकरणात थोडक्यांत विचार करावयाचा आहे. जाणून बुजून दत्तकाच्या रूढीबद्दल विरोधी प्रचार करण्याच्या बुद्धीने लिहिलेलें हें नाटक आहे. त्यामुळे रसनिर्मिति आणि पात्रस्वभावरेखन या गोष्टींना या नाटकांत नाटककाराने तसें महत्त्व दिलेलें नाही. असें असूनही इंदुमतीच्या करुण चित्रणांत जिवंतपणा निर्माण करण्यांत नाटककाराला पुष्कळच यश लाभलेलें आहे. त्याचमुळे मराठीच्या नाट्यसंसारातील करुण नाट्याच्या दालनामध्ये कांही थोड्याच चटका लावून बसलेल्या भूमिकांमध्ये इंदुमतीच्या स्वभावचित्रणाचा समावेश अनुचित होणार नाही.

नाटकांतील झगड्याचें सुरुवातीलाच दिग्दर्शन —

पहिल्या अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत एका बाजूला इंदुमतीसारखी भोळी श्रीमंत विधवा आणि दुसऱ्या बाजूला तिच्या असाह्यतेचा आणि भोळेपणाचा फायदा घेऊन स्वतःची द्रव्यतृष्णा व विषयवासना यांची पोळी पिकवूं पाहणारा तिचा कारभारी भय्यासाहेब व त्याची साथीदार मंडळी यांच्यामधील झगड्याचा विषय नाटकाचा मध्यबिंदु आहे, हें नाटककाराने ठसठशीतपणे व्यक्त केलें आहे. आणि या पहिल्याच प्रवेशांत दत्तकाच्या या नाटकाला निव्वळ प्रस्तावनेहून पुष्कळच अधिक गति देण्यांत नाटककाराला यश मिळालें आहे.

भय्यासाहेबांचें कुटिल कारस्थान उघडकीस आणण्यांत फार पुढाकार घेतलेली सरस्वती हिच्या तोंडून पहिल्या प्रवेशाच्या शेवटीं नाटकाच्या या बीजाचा स्पष्ट उल्लेख पुढीलप्रमाणे आहे –

"नेहमीप्रमाणे बाईसाहेबांसारख्या अजाण विधवांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन स्वार्थाची उठाठेव करण्याचा तर या संभावितांचा कांही विचार नसेल ना ?"

पुत्रसुखाची तळमळ —

पंचवीस लाखांची मालमत्ता नियमित स्वामित्वाने स्वाधीन असलेल्या या विधवेची, इंदुमतीची, पुत्रसुख नाही याबद्दलची तळमळ सुरुवातीलाच चांगली व्यक्त केली आहे.

आपल्या प्रेमाचा विषय होणारी अशी एकही वस्तु आपल्या त्या नागबगीच्यांच्या, विपुल संपत्तीच्या, दासदासींच्या जोडीला देवाने दिली नाही म्हणून तिचें हृदय तळमळतें आहे. त्याचमुळे सरस्वतीसारख्या नवशिक्षित तरुणीने आग्रहाने आणि तात्त्विक कठोरतेने दत्तकाच्या चालीला केलेला विरोध तिला रुचत नाही. भोळी धर्मश्रद्धाही इंदुमतीच्या ठिकाणी अजाणपणाच्या भरीला आहे. त्यामुळे सरस्वतीचें बोलणें तिला "धर्मबाह्य बहकणें" वाटतें. देवतुल्य ऋषींनी लिहून ठेवलेलीं धर्मशास्त्रें खोटीं असें सरस्वतीने भासवावें हें तिला रुचत नाही. आणि 'पितर स्वर्गाला गेले तरी ते कायमचे तिथे राहावें म्हणून त्यांच्या नांवाने पिंडदान देऊन श्राद्धपक्ष करायला मागे पुत्र असावा लागतो" असा ती सरस्वतीशीं प्रतिवाद करते.

"दत्तक घेणें म्हणजे परमेश्वराजवळ बाळंतपणाची भीक मागून आपल्या हातांनी भिकेचें बाळंतपण करण्यासारखें आहे" हाही सरस्वतीने सांगितलेला जगाचा कटु अनुभव ती जाणून घ्यायला तयार नाही. कारण "निसर्गाप्रमाणे ज्या गोष्टी घडायला पाहिजेत त्या घडल्या नाहीत म्हणजे सोंग आणून तरी कांही समाधान झालें तर पाहावें" ही माणसाची प्रवृत्ति तिला स्वाभाविक आणि म्हणून स्वीकाराई वाटते.

सरस्वतीचे खडे तात्त्विक बोल तिला कोरडे वाटतात. ती म्हणतेच मुळी, "कोरड्या वादविवादापेक्षा माझ्या त्रासलेल्या जीवाला ओल्या सहानुभूतीची जरूर आहे. माझें उदास मन कशाकडे सुद्धा लागत नाही. माझा जीव एखाद्या अगदी निर्जन अरण्यांत कुठे तरी आणि कसा तरी वणवण भटकत आहे असें मला वाटतें. त्याला प्रेमाचें असें कोणतें ठिकाण दाखवूं, कोणत्या वस्तूकडे लावूं, कोणत्या मार्गाने जायला सांगूं? कांही सुचत नाही."

बुडत्याला काडीचा आधार —

निराशेंत बुडणाऱ्या आपल्या जीवाने दत्तक घेणें म्हणजे केवळ आशेच्या काडीला हात घालण्यासारखें आहे हा युक्तिवाद तिला समजत नाही असें नाही. परंतु पतिनिधनानंतर कपाळीं आलेलें एकाकी जीवन, शिक्षणाच्या अभावाने अंतःकरण गुंतविण्याला चांगल्याशा छंदाच्या अभाव, स्वाभाविक अशा पुत्रसहवासाची लालसा, कृत्रिम कां होईना जिव्हाळ्याने प्रशमित करण्याची धडपड, अशी परिस्थितींत सापडून जिवाची तडफड करून घेणाऱ्या त्या बिचारीला बुडतांना तेवढा तरी आधार मिळाला तर पाहून आपली तडफड नाहीशी करण्याचा प्रयत्न करावा असा मोह होणें अपरिहार्य होतें.

अशा रीतीने दत्तकाला अनुकूल अशा तिच्या भूमिकेचा फायदा घ्यायला टपलेला भय्यासाहेब व त्याला साहाय्यक राधाकाकू व तिचा मुलगा मधोजीराव हें त्रिकूट तयारच होतें. भय्यासाहेबाला आपला बावळट व छांदिष्ट मुलगा नागेश याला दत्तक द्यायचें होतें. त्यामुळे कारभारीपणावरून जवळ जवळ मालकाच्या पदावर उडी मारायला त्याला मिळणार होती आणि आर्थिक दृष्ट्या दुबळी झालेली ती सुंदर तरुण विधवा आपल्या

संरक्षणाच्या आशेने आपलें देहदानही स्वतःला देईल याही मनोराज्याचा त्याच्या चित्तांत उठाव झाला होता; तर भय्यासाहेबांचा मुलगा दत्तक झाल्यावर त्या श्रीमंताला आपली माची सरस्वती देऊन त्याच्या मालमत्तेवर भय्यासाहेबाबरोबर निदानपक्षी अर्ध्या हिश्शाने डल्ला मारायला मिळावा हें स्वप्न राधाकाकू आणि त्यांचा कारस्थानी मुलगा मधोजीराव यांच्या चित्तापुढे तरळत होतें.

नागेश काय, दत्तक बसून चुटकीसारखा श्रीमंत व्हायला हुरळायला मुळीच अडचण नव्हती. त्यामुळे त्याच्या नाटकी छंदांची चैन चालायला चांगलाच उपयोग होण्यासारखा होता हें कळण्याइतपत त्या बावळट तरुणालाही समजूत होती. आणि सरस्वतीसारखी शिकलेली फटकळ मुलगी आपल्यासारख्याची पत्नी होणें शक्य नाही आणि सुखाचेंही नाही हें कळण्याइतकी अक्कल मात्र नसल्याने तिच्याशीं आपलें लग्न व्हावें या गोष्टीलाही तो हुरळून मान्यता देतो.

प्रश्न होता फक्त हा बेत इंदुमतीच्या गळीं उतरविण्याचा. कारण पुत्रकल्पनेने कालवाकालव होणाऱ्या तिच्या अस्थिर हृदयावर अजून जरी सरस्वतीने सांगितलेल्या तर्कशुद्ध गोष्टी ठसत नव्हत्या तरी त्यांतील तर्कशुद्धता तिलाही जाणवत होती. "स्त्री म्हणजेच मातृहृदय, त्या मातृहृदयाची वात्सल्यप्रेमाशिवाय दुसऱ्या कशाने तृप्ती व्हायची नाही, आपल्या हृदयांतले वात्सल्य अनंत आकाशांत आंधळ्यासारखें भटकून स्थिर व्हायला त्याची वस्तु त्याला मिळाली नाही म्हणजे अगदी वेड लागायची पाळी" असें त्या पतिप्रेमाला पारखी झालेल्या विधवेला वाटत होतें. त्यामुळे पुत्रसुखाच्या रम्य स्वप्नांत ती गुंगून जातें. आणि त्या स्वप्ननिद्रेचा कधी भंगच होऊं नये असें तिला वाटतें. अगें जरी आहे तरी "खेळणें नसलें म्हणजे कांही तरी मिळावें म्हणून जसा बालकें हट्ट धरतात तसाच, अगदी त्याप्रमाणेच हा" आपला मुलाचा हट्ट आहे हेंही ती अगदीच दृष्टिआड करूं शकत नाही.

पतीची शेवटची पवित्र इच्छा —

अशा द्विधा मनस्थितींतच अमुकच एक मुलगा, तोही भय्यासाहेबांचा नागेशच दत्तक घ्यावयाचा अशा निर्णयाला इंदुमतीने येणें ही कांही एवढी सोपी गोष्ट नव्हती. त्यासाठीच दादासाहेब वकिलांना हाताशीं धरून त्यांच्या साह्याने व सल्ल्याने इंदुमतीच्या मृत पतीच्या सहीचा खोटाच कागद, नागेशला दत्तक घ्यावा अशा अर्थाचा, तयार करण्याचा खटाटोप भय्यासाहेब आदि मंडळींनी केला. कोठल्या तरी एका दाव्यासाठी कोऱ्या कागदावर दोन सह्या करून दिलेला कागद वकीलसाहेबांजवळ होता. तो मधोजीरावाने मिळविला व त्याचा खालचा भाग कापून वरच्या भागावर तें आदेशपत्र तयार करण्यांत आलें. हा कागद देण्याची किंमत म्हणून मधोजीरावाने भय्यासाहेबांकडून सरस्वतीला नागेशची पत्नी करून घेण्याचें करारपत्र लिहून घेतलें. आणि सर्वांनी मिळून, दादासाहेब वकिलांनी सुद्धा, मृत रावसाहेबांच्या मृत्युसमयींचा तो लेखी आदेश इंदुमतीच्या मनावर ठसविण्याचा कट पार पाडला. हळव्या, हतभागी आणि पतिनिष्ठ

अशा इंदुमतीला " पतीची इच्छा म्हणजे पतिव्रतेचा पवित्र धर्म, तो मला पाळलाच पाहिजे; नागेश त्यांना आवडला...मलाही आवडला " असें मनापासून वाटलें आणि आपल्या पतीची इच्छा व्यक्त करणारा तो कागद आपल्या हृदयाशीं भावनाभराने धरून पहिल्याच मुहूर्तावर नागेशला दत्तक द्यावयाचा निश्चय तिने जाहीर केला.

इंदुमतीच्या या निश्चयाला अनुसरून दत्तविधान होतें आणि नागेशाचा प्रभाकर होतो. त्याच्या नाटकाच्या छंदांतील मित्र नटेश आता स्वाभाविकच नागेशला मिळूं घातलेल्या संपत्तीमध्ये वाटा मिळविण्यासाठी बद्धपरिकर होतो; या साध्यासाठी आपली मुलगी ललिता हिच्या नादीं तो लागावा अशा प्रकारचे डावपेच सुरू करतो. सरस्वतीने जरी नागेशाशीं लग्नाला, आपलें तेथील स्थान कांही काळ टिकून राहावें म्हणून नकार दिला नसला तरी ती त्याच्याशीं लगट करीत नव्हती. तसा तिचा हेतु नव्हता आणि तितकी ती धट्टपणा करूं शकलीही नसती. त्यामुळे अननुभवी नागेशवर ललितेच्या शरीरस्पर्शाची भलतीच मोहक पकड बसावी हें स्वाभाविक होतें. आणि त्या कारणाने दत्तकानिमित्ताच्या सत्यनारायणाच्या दिवशीं ललितासह नटेश प्रत्यक्ष वाड्यांत येऊन तेथे ललिताचा गायनाचा कार्यक्रम होण्याचेंही ठरतें.

नागेशची ही प्रगति अवघ्या आठहा दिवसांत होत आहे तोच भय्यासाहेबांची विषयलालसा बहरूं लागते. " हिऱ्यासारखी सुंदरी आणि सुखापभोगाचे नवे नवे प्रकार चाखायचें मुख्य साधन संपत्ती या दोघांचाही एकाच वेळीं समागम करून देणाऱ्या " दत्तविधानाच्या भावी अनुकूल परिणामाचीं स्वप्नें त्यांच्या दृष्टीसमोर गर्दी करूं लागतात.

दत्तकाचा अधिकार अंशतः तरी लगेच सुरू —

दत्तक का होईना पण तो मुलगा आहे या भावनेनें इंदुमतीचें अंतःकरण भारून जातें. त्याचे ती लाड करते. त्याच्यासाठी नवा पोशाख शिवविते. त्याच्या अंगावर दागिने घालते. त्याशिवाय त्या घराण्यांतील मंगलदर्शक आणि मंगलदायक समजला जाणारा एक विशिष्ट जडावाचा ताईतही त्याच्या गळ्यांत ती प्रेमाने घालणार होती. इतक्यांत भय्यासाहेब त्याला हाक मारीत तेथे येतात आणि तो दागिना घालायचें तसेंच राहून जातो. भविष्यसूचक असाच हा प्रकार ठरतो.

तेवढ्यांत प्रभाकरची–नागेशची–शिकविलेली अक्कल काम करूं लागते; तो आईकडून तिजोरीची किल्ली हट्टाने मागून घेतो. ती भोळी बिचारी, मुलगाच तो आपला असें समजून त्याला किल्ली देतेही. दत्तकाचा अधिकार असा हा अंशतः चालू होतो. त्याचा परिणाम घटका अर्धा घटका होतांच दिसावयाचा असतो.

भय्यासाहेबांची लालसाही प्रकट होते —

एवढ्यात भय्यासाहेब येऊन आपली मनांतील विषयवासना आडपडद्याने व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात. " बालपण, तारुण्य, वार्धक्य या मनुष्याच्या तीन अवस्थांना

अनुरूप असलेल्या तीन प्रकारच्या लालसा असतात. मनुष्याच्या हृदयाची दुःखाने तळमळ होते याचें खरें कारण त्या लालसा अतृप्त राहणें हें होय " अशा भाषणाने ते आपलें मनोगत व्यक्त करतात.

इंदुमती यांतील मर्म न समजण्याइतकी भोळी नव्हती. मोठ्या कौशल्याने ती या प्रसंगीं भय्यासाहेबांना टाळते. पण तिचें चित्त चरकल्याशिवाय राहत नाही. सत्यनारायणाच्या त्या शुभदिनीं या गोष्टीच्या स्मरणाचा विटाळ नको म्हणून ती आपलें चित्त शांत करूं जाते; पण ही संधि तिला मिळायची नव्हती.

पाळण्यांतले पाय दिसूं लागले —

दत्तकाला किल्ली मिळाली होती खरी. परंतु राधाकाकू आणि मधोजीराव यांचें कार्य अजून साधायचेंच होतें. तें साधण्यासाठी भय्यासाहेब जवळपास नाहीत असा प्रसंग त्यांना हवा होता. सत्यनारायण, पानसुपारी, हळदकुंकू हें सारें आटोपलें आणि आता ललिताचें गाणें सुरू करावयाचें होतें. याच्या दरम्यान त्या दोघां मायलेकरांनी संधि साधून प्रभाकराला सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचा कानमंत्र दिला. राधाकाकूंनी त्याच्या डोक्यांत चांगलेंच भरविलें की "आता घरांत काय राहिलें आहे आईचें? हो; आम्ही किती झालों तरी बायका. घरांत कुणी पुरुष नसला तर आमचा अधिकार. दहांची लुडबुड म्हणजे संसाराला कांही सूड लागत नाही." मधोजीराव याच गोष्टीला पाठिंबा देतो. हिरोबाच्या वह्यासुद्धा प्रभाकराच्या स्वाधीन करूं पाहतो. अर्थात जमाखर्च पाहण्याची कुवत बुद्धीला नसल्याने आपल्या छांदिष्ट बुद्धीला अनुसरून नागेश ललितेला जवळ बोलावतो. तिच्या एका गाण्याला दहा हजार रुपयांची बिदागी पाठवायला हुकूम देतो. बाकीच्यांनाही, आपण मोठा विनोद करतों आहोंत अशा भावनेने, किंमतवान पण न साजेशा देणग्या देण्याचा आचरटपणा करतो. आणि राधाकाकू निषेध करीत असतांही एक मोठ्या किंमतीचा कंठा स्वतःच्या हाताने ललितेच्या गळ्यांत घालून आपला हात तिच्या गळ्यावर तसाच राहूं देतो. अशा रीतीने "बाळ एवढ्यांत पाळण्यांतले पाय दाखवायला लागलें" हा साक्षात्कार खुद्द मधोजीरावालासुद्धा होतो. त्याच वेळीं इंदुमतीला घेऊन सरस्वती तेथे येते आणि हें दृश्य पाहून इंदुमतीलाही "हाय! काय हा दत्तकाच्या संसाराचा आरंभ!" असें म्हणून कपाळाला हात लावण्याची पाळी येते.

एका बाजारबसवीशीं चाललेल्या या अतिप्रसंगाबद्दल आईच्या नात्याने इंदुमती नागेशला चांगला झाडते आणि ललितेच्या अंगावर, चालती हो म्हणून धावून जाते. नागेश नको म्हणत असताही ललिता आणि नटेश तेथून जातात.

कृष्णरावाचें आगमन आणि नवाच धक्का —

याच वेळीं सरस्वतीबरोबर इंदुमतीच्या मागून तिच्या पतीचा कायदेशीर वारस

असलेला कृष्णराव तेथे आलेला असतो. त्याची आणि नागेशची चांगलीच हमरी-तुमरी होते. दादासाहेब वकील या प्रकरणीं दोघांनी आपसांत तडजोड करावी अशी साळसूद सूचना करतात. तेव्हा यांत कांहीतरी कारस्थान आहे अशी शंका येऊन या दत्तविधानाविरुद्ध आपण कोर्टांत दावा करणार असल्याचा निर्धार कृष्णराव व्यक्त करतो.

इंदुमतीला हा तिसरा मोठा धक्का बसतो लागोपाठ ! कोर्टांत जाण्याचा हा विचार तिला सहन होत नाही. म्हणून ती आपल्या नशिबाच्या निर्घृणतेबद्दल हळहळ करूं लागते.

पण याच्या पाठोपाठ तिला आणखी एक धक्का बसायचा होता. प्रभाकराच्या – नागेशाच्या – या छंदी वागण्यामुळे कृष्णराव चिडला होता हें तिला दिसतच होतें. शिवाय आपल्या मुलाने अशा छंदापायीं असा वेफाट खर्च करावा हें तिला स्वतःलाही पसंत नव्हतें. म्हणून त्याला मी तुझे हे असले छंद चालूं देणार नाही असें मोठ्या अधिकाराच्या आवेशाने बजावते; त्याला मदत करण्याचा मूर्खपणा केल्याबद्दल राधाकाकू आणि मधोजीराव यांना दागिने काढून देऊन वरांतून जायला सांगते आणि पुन्हा या घरांत पाऊल टाकूं नका म्हणा म्हणून हुकूम करते.

कोरडा ठणठणीत आईपणा तेवढा शिल्लक ! —

पण तिचा हुकूम कोणी मानीत नाहीत. दागिने काढून देत नाहींत किंवा तिथून हलतही नाहींत. आणि मग तिला दादासाहेब वकिलांच्या बोलण्यावरून कळून येतें की "आईची मालकी जाऊन ती मुलाकडे येते. आईची मालकी कांहीच राहत नाही !" आपली पंचवीस लाखाची मालकी दत्तविधानाच्या होमांत जळून तिची राख झाली ! मुलाला बहकविणाऱ्यांनासुद्धा अधिक उणा शब्द बोलायची मालकी आपल्याला राहिली नाही. मुलावरची मालकी जाऊन नुसता कोरडा ठणठणीत आईपणा तेवढा शिल्लक राहिला ! झालेला प्रकार पाहून वाडा पुत्रसुखाने भरून जाण्याऐवजी भूतपिशाच्चांचें स्मशान झालें की काय असें तिला वाटूं लागलें. या तिच्या बोलण्यामुळे नागेश तिला दुरुत्तरें करतो त्या वेळीं मुद्दाम एकदम पुढे होऊन भय्यासाहेब इंदुमतीची बाजू घेतल्यासारखें करून नागेशाला चमकावतो; पण याच संधीचा फायदा घेऊन मधोजीराव आणि राधाकाकू सरस्वती आणि नागेशच्या लग्नाबद्दलचा खुंटा हलवून बळकट करून घेतात. लग्नाची गोष्ट आपल्याला कबूल आहे हें दाखविण्यासाठी सरस्वती मुद्दामच मानभावीपणाने "मामंजी, तुम्हांला नमस्कार असो" असें म्हणते.

असा हा पांचवा धक्का इंदुमतीला एका घटका अर्ध्या घटकेच्या आंत बसतो. कारण मुलाच्या लग्नाच्या कामीं तिची संमति विचारण्याचीही कोणाला आवश्यकता वाटली नाही. दुःखांत सुख त्या विचारीला एवढेंच वाटलें की मिळणारी सून तरी सरस्वती-सारखी चांगली आहे.

लिअरच्या अविचाराशीं साम्य —

अशा रीतीने दत्तक पुत्राचा सोहळा इतक्या मोठ्या तीव्र धक्क्यांनी ताबडतोब सुरू झाला. लिअर राजाने आपली संपत्ति आणि सत्ता पोटच्या मुलींना दिली होती ! त्याला जो अनुभव पंधरा दिवसांत आला तोच अनुभव इंदुमतीला आठ दिवसांत आला. लिअरने अविचाराने सत्ता आणि संपत्तीचा त्याग केला होता. इंदुमतीने अविचाराने दत्तक घेतला; आणि या गोष्टीचा परिणाम म्हणून तिच्या मनाविरुद्ध स्वतःची संपत्ति व सत्ता यांना ती पारखी झाली होती.

कोर्टात फिर्याद करायला इंदुमती कृष्णरावाला अनुमति देत नाही. आणि कोर्टात दाखविण्यासाठी म्हणून आपल्या मृत पतीचें दत्तविधानावद्दलचें आदेशपत्रही त्याला देत नाही. नागेश तिचा धर्मशास्त्राप्रमाणे ठरलेला मुलगा. त्याच्यावर दावा करण्याची कल्पनाही तिला सहन होत नाही. यावरून कृष्णरावांविरुद्ध आपण या घरांत वागलेलें पचून जाईल असा विश्वास वाटून भय्यासाहेब इंदुमतीचें चित्त कृष्णरावाविरुद्ध कलुषित करतात आणि स्वतःच्या हातीं अधिकार घेऊन कृष्णरावाला त्या क्षणीं वाडा सोडून जायचा हुकूम करतात. त्याच्यामुळे रोज भांडणें वाढायचीं आणि त्यांत त्याने आणखी फिर्याद लावलेली असायची. तेव्हा इंदुमतीलाही वाटतें की कृष्णराव दूर असलेलाच बरा. म्हणून रडत कां होईना पण ती त्याला निरोप देते.

कामी स्वताम् पश्यति ! भय्यासाहेबांनी तर्क केला की, "या प्रकारावरून ही मला अनुकूल होणार; नाही तर कृष्णरावाला कागद न दाखवितां घालवून द्यायला ती अशी सहज तयार झालीच नसती." आणि म्हणून विश्वास वाटून ते पुन्हा एकदा मागचा आपला मनोदय व्यक्त करतात. परंतु या वेळीं मात्र इंदुमती त्यांची गय करीत नाही. तेथून ती त्यांना एकदम चालते व्हायला सांगून म्हणते, "एक अक्षरही उच्चारूं नका. मला तोंड सुद्धा दाखवूं नका."

खग्रास ग्रहण —

आणि मग इंदुमती म्हणते त्याप्रमाणे तिच्यापुढे खग्रास ग्रहण, काळाकुट्ट अंधार उभा झाला. वाड्यांत ती आता एकटी – असहाय अशा स्थितींत "त्या राक्षसाने" लाथाडायला अगदी उघडी पडली. आठ पंधरा दिवसाच्या अवधींत लिअर राजाप्रमाणेच ती एका तुफानांत सापडली.

थोड्याच दिवसांत ललिता – ती वेश्येची पोर – उघडउघड घरांत येऊन राहूं लागली. तिच्यामार्फत दहा दहा हजारांच्या मागण्या नागेशकडे पटूं लागल्या. इंदुमतीचें आईचें हृदय तळमळतें; नागेशला कांही हिताच्या गोष्टी सांगण्यासाठीच ती उत्कंठित होते. पण ललितेच्या नादांत तिची प्रभाकराची गाठही होऊं शकत नाही. अशा चिंताग्रस्त मनस्थितींत ती असतांनाच भय्यासाहेब आपलें मनोगत अधिक नेटाने

तिच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न करतात. थोडासा अतिप्रसंग करतात; म्हणजे खाली बसून एकदम तिचे पाय धरतात. परंतु "हो दूर नीचा" असें म्हणून इंदुमती त्यांना लाथ मारून दूर करते आणि 'प्रभाकर प्रभाकर' अशा हाका मारीत निघून जाते.

परंतु याने लिअर नाटकांत एडमंडचा झाला त्याप्रमाणे भय्यासाहेबाच्या अंगाचा तिळपापड होतो आणि तिला संकटाच्या आर्चीत होरपळून काढावी असा घोर विचार त्याच्या मनांत उद्भवतो. परंतु अजूनही एकदम समोरून हल्ला करण्यांत हित नाही हें जाणण्याइतका भय्यासाहेब चतुर आहे. आणि म्हणून प्रभाकरालाच इंदुमतीविरुद्ध चिथवावें; म्हणजे अनुमतिपत्राचा कागदही मिळेल आणि प्रभाकराच्या माराने घायाळ होऊन क्वचित आश्रयासाठी ती आपल्याकडे वळेल या विचाराने तो जरा सबूरीने घ्यावयाचें ठरवितो.

आणि म्हणून तें अनुमतिपत्र घेण्यासाठी तो प्रभाकरालाच तिच्याविरुद्ध बिथरवतो. इंदुमती किल्ल्या असहाय होऊन देत असतांही त्या हिसकून घेण्याच्या मिषाने तो तिच्या अंगाला स्पर्श करतो. त्यांत किल्ल्या दोरी तुटून खाली पडतात. स्वाभाविकच ती भय्यासाहेबांवर शिव्यांचा मारा करते. परंतु प्रभाकराला त्याचें काय? तो हवी होती तेवढी तिजोरीची किल्ली घेऊन जातो आणि "बाकीच्या किल्ल्या घेऊन तुम्हींच शोधा; तुम्हांला हवा तो कागद" असें म्हणतो; एवढेंच नव्हे तर "हिची गुर्मी अजून गेली नाही. हिचे सारे कपडेलत्ते हिरावून घेऊं. इतक्यानेही ताळ्यावर आली नाही तर घ्या वाड्याबाहेर घालवून" अशी धमकी जातां जातां देतो.

घर सोडावें लागण्याची कल्पना इंदुमतीला असह्य होते. भय्यासाहेबाने आपल्या वासनातृप्तीच्या दृष्टीने आपलें शील भ्रष्ट करण्याचा प्रसंग आणला तर काय, हा अवघड प्रश्न तिच्यापुढे उभा राहतो. पण त्यावर जहरी विष खाऊन मरून जाण्याचा मार्ग ती कवटाळायला तयार असते. परंतु आपला मृत देहसुद्धा या वाड्याच्या बाहेर जाऊं नये अशी तीव्र प्रतिक्रिया तिच्या मनाची असते.

भय्यासाहेबाचा दुहेरी डाव —

भय्यासाहेबाची कामवासना पेटलेली असतेच. पण त्यापेक्षाही कृष्णरावाचा दावा दाखल झाल्यामुळे मधोजीराव आणि दादासाहेब वकील यांची तो अनुमतिपत्राचा कागद परत मिळविण्याबद्दल निकड फार असते. नाहीतर सर्वचजण कचाट्यांत सापडण्याचा संभव असतो. आणि म्हणून भय्यासाहेब, राधाकाकू, प्रभाकर, ललिता, सगळीच मंडळी त्यासाठी एकदम इंदुमतीकडे येतात. त्यांची आणि सरस्वतीची चांगलीच तोंडा-तोंडी होते. कागद शोधूनही सापडत नाही यामुळे संतप्त झालेला भय्यासाहेब कृष्णरावाला दावा करायला इंदुमतीचीच फूस असली पाहिजे आणि त्या दाव्यांत साक्षीदार म्हणून पुढे आणायच्या दृष्टीने इंदुमती सरस्वतीला इतकें शेफारून देत असली

पाहिजे असा आरोप करतो. त्यांतून प्रभाकर भडकतो. कागद ती देत नाही म्हणून चिडतो. ललिता तिच्या देवपूजेला थोतांड म्हणते. त्यावर सरस्वती अत्यंत कटु उत्तर देते. तेव्हा प्रभाकर तिला तेथून चालती व्हायला सांगतो. ती न जायचा प्रयत्न करते. परंतु अखेर तिला जावेंच लागतें. भय्यासाहेबही अनुमतीचा कागद मिळविण्याचें काम प्रभाकरावर सोपवून आपण स्वतः दाव्याच्या कामीं मधोजीराव व दादासाहेब यांना मदत करण्याच्या मिषाने निघून जातो. अर्थात ललिता इंदुमतीला चांगली छळील आणि मग इंदुमती आपल्याकडे आश्रयार्थ वळेल हाच यामध्ये भय्यासाहेबांचा दूरगामी हेतु होता.

कोंडून घालण्याचा प्रसंग —

प्रभाकर इंदुमतीला पूजेचें वंड आटोपायला सांगतो आणि देव्हाऱ्यांत कागद ठेवला असेल म्हणून सोन्याचे देवही काढून घेतो. ललिता भांडी गोळा करते. त्यावर चिडून इंदुमती अंगावरची शालही तिच्या अंगावर फेकते. पण ललितेचें एवढ्यानें समाधान झालें नाही. ती इंदुमतीचें नेसूचें लुगडेंही काढून घेते. तरी कागद मिळत नाही म्हणून इंदुमतीला कोंडून ठेवण्याची भाषा निघते. इंदुमती देव्हाऱ्याला घट्ट धरून बसते. तेव्हा हातघाईची भाषा निघते. शेवटीं संमतिपत्र द्यायला इंदुमती तयार होते. परंतु आज्ञापत्र देवांच्या खालच्या बाजूला ठेवलेलें होतें तें तेथें नसतें. अर्थात प्रभाकराला तिचा हा कांगावखोरपणाच वाटतो. आणि मग तो तिच्याशीं प्रत्यक्ष हातघाईवर येतो. ती देव्हारा घट्ट धरलेला सोडीत नाही, म्हणून देव्हाऱ्यांतले देव तो लाथेने उडवतो. त्याचा परिणाम म्हणून इंदुमती शोकभराने खाली पडते. त्यानंतर प्रभाकर देव्हारा धुंडाळतो तरी त्यालाही कागद स्वाभाविकच सापडत नाही. तेव्हा तो ललितेला इंदुमतीची अंगझडती घ्यायला सांगून निघून जातो. ललिता इंदुमतीला गजांच्या खोलींत कोंडून ठेवण्यासाठी घेऊन जाते.

देव लाथाडले गेले याने इंदुमतीचें चित्त भयभीत झालेलें असतें. "देवाला लाथ – याबद्दल देवा, तुझ्या या हतभागी कन्येचें, निपुत्रिक विधवेचें हें पुत्रसौभाग्य पाहून तरी तिला क्षमा कर" असें ती देवाला विनविते. पण क्षणांतच तिला उमज पडतो की ही लाथ देवांना नव्हती. ती मातेच्या वात्सल्याला लाथ होती. ती तिच्या पुत्रसुखाच्या कल्पनेची राखरांगोळी होती. निपुत्रिक विधवेच्या मुलाच्या हौसेची ती फेड होती !

बलात्काराचा प्रयत्न —

आणखी तीन दुःखाचे प्रसंग इंदुमतीवर आलेले चवथ्या अंकांत दाखविले आहेत. पैकी पहिला पुन्हा भय्यासाहेबांच्या कामयाचनेचाच आहे. त्या वेळीं इंदुमती त्या गजांच्या खोलींत कोंडून ठेवलेली आहे. "सुख – संसाराचें सुख - जगांतलीं

सुखें म्हणजे सूर्यास्ताच्या वेळचे सुंदर रंगांत चमकणारे पण लौकरच गाढ अंधकारांता गडप होणारे थोड्या वेळचे सोबती असलेले देखावे आहेत. आणि अशा सुखाकरिता धडपडणाराची आयुष्याची आवड तरी किती विलक्षण" अशा तऱ्हेच्या निरुत्साही तात्त्विक विचारांत तेथे इंदुमती मग्न आहे. अशा वेळीं भय्यासाहेब येऊन तिच्याशीं लाडीगोडीचें बोलणें करूं पाहतो. त्याचा अर्थात दुहेरी डाव आहे. अनुमतिपत्र हस्तगत करावें आणि बाईचें प्रेमही मिळवावें. कितीही सांगितलें तरी इंदुमती ऐकत नाही हें पाहून त्याच्या चित्तांतला राक्षस जागा होतो आणि तिच्यावर बलात्कार करण्यासाठी म्हणून त्या खोलींत प्रवेश करण्याकरिता कुलूप काढून भय्यासाहेब आंत जातो. पतीच्या वर्षश्राद्धाचा दिवस म्हणूनच माझ्या सुखाबरोबर तुझ्या शीलाच्या श्राद्धाला चांगला मुहूर्त आहे" असें म्हणून तो इंदुमतीच्या जवळ जातो. परंतु इंदुमतीला मूर्च्छा येते आणि त्याच वेळी मोलकरीण चणकाई तेथे येते व भय्यासाहेबाला कोर्टांत तातडीने बोलावल्याचें सांगते. यामुळे त्याला तिकडे जावें लागून हा प्रसंग टळतो.

त्यानंतरचा चणकाई आणि इंदुमती यांच्यामधील प्रसंग. चणकाईने आपलें लुगडें इंदुमतीला नेसायला द्यावें हा प्रसंग चटका लावणारा आहे. अर्थात त्यामध्ये गडकऱ्यांची सिंधु व गीता यांच्यामधील प्रसंगाची दाट छाया आहे हें अगदी उघड आहे. "मी भिकाऱ्यापेक्षाही भिकारी. तुझ्यापेक्षाही भिकारी. तुझें लुगडें मला शोभायचें नाही," हें अंतःकरण पिळवटून निघालेले इंदुमतीचे उद्गार हृदय हळहळून सोडतात.

तशाही अवस्थेंत कसें कां होईना पण पतीचें वर्षश्राद्ध करावें अशी इंदुमतीच्या मनाला मोठी ओढ. तो तिच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. त्यासाठी तिने आज पोटांत अन्नाचा अंशसुद्धा घेतला नव्हता. तें श्राद्ध प्रभाकराच्या हातून व्हावें या तिच्या इच्छेतून दुसरा मनस्तापाचा प्रसंग उभा राहिला. वर्षश्राद्धाला आपल्याला ती हाका मारते यांत तिचा आपल्याला मुद्दाम चिडविण्याचाच हेतु आहे या वाकड्या कल्पनेनेच प्रभाकर तिच्या खोलींत जातो. कोर्टांत खटल्याचा निकाल बहुधा प्रतिकूल लागला आहे याची कल्पना येऊनही त्याचें चित्त भडकलेलें असतें. आणि म्हणून कोंडलेल्या खोलींत इंदुमतीने आपल्या सद्भावनेची कितीही ग्वाही दिली तरी प्रभाकर तिला अद्वातद्वा बोलतो आणि इंदुमती त्याच्या पाया पडते तरीही तिला तो लाथाडतो आणि पिंडही लाथेने भिरकावून देतो.

आता फक्त तिचें शील भ्रष्ट व्हायचें एवढाच सोहळा बाकी राहिलेला असतो. कोर्टांत खटल्याच्या निकालाचा अंदाज आल्यावर त्याच क्षणीं सूडबुद्धीने भय्यासाहेब हळूच तेथून इंदुमतीकडे येतो तो याच नेमक्या वेळीं. निकाल विरुद्ध झाल्याची कल्पना प्रभाकराला, भय्यासाहेबाच्या तोंडून येतांक्षणींच निघालेल्या "माझ्या आयुष्याचा सर्वस्वी नाश करणाऱ्या कर्मचांडाळणी–" या उद्गारांनी येते आणि तो चडफडत निघून जातो.

इंदुमती एकटी सापडतांच भय्यासाहेब "तुला आता वेश्येच्या कीर्तीनेच राहिलें

पाहिजे" असें म्हणून एकदम तिचा हात धरतो. परंतु त्याच वेळीं नाटकी योगायोगाने पोलिससह कृष्णराव–सरस्वती तेथे पोचून तो प्रसंग टळतो.

अशा रीतीने इंदुमतीचें हें चित्रण खरोखरच चांगल्या करुण नाट्यांतील प्रधान पात्राच्या लायकीचें आहे. तिचा हळवा, अजाण, श्रद्धाळू स्वभाव आणि तिची भोळी आशा यांच्या पोटीं तिच्यावरील सारे भयाण प्रसंग निर्माण झालेले आहेत. ती कोणी चतुर, शिक्षित, अनुभवी अशी स्त्री नाही. समाजांत विशेष चमकून उठावेत असे गुण तिच्या ठिकाणीं मुळीच नाहींत; नव्हे स्वतःचें आणि स्वतःच्या संपत्तीचें यथायोग्य संरक्षण करावें याची सुद्धा तिला माहिती आणि शक्ति नाही. अशा या गरीब परंतु साल्स स्त्रीबद्दल त्या तिच्या उणीवांमुळेंच आपल्याला जिव्हाळा वाटतो. लिअर राजा होता; इंदुमती एक सामान्य स्त्री आहे. परंतु दोघांची व्यथा एकच आहे. आणि दोघांबद्दल आपणाला वाटणारा जिव्हाळाही सारखाच आहे. इंदुमती कोणी श्रेष्ठ स्त्री नाहीच. त्यामुळे नाटकांत तिचा श्रेष्ठपणा दाखविण्याची शक्यताच नाही. पण तरीसुद्धा त्यामुळे तिच्याविषयींची आपली सहानुभूति मुळीच कमी होत नाही.

नाटक सुखपर्यवसायी करण्याचा वृथा आटापीट—

अर्थात विरोधी स्वार्थी त्रिकूटाच्या ज्या कारस्थानामुळे तिच्यावर सारे प्रसंग गुदरले त्या कारस्थानाचे धागे आणि तिच्यावर ओढवणारे प्रसंग यामध्ये अधिक विविधता आणि अधिक गाढता व भीषणता आणून हेंच स्वभावचित्र याहून पुष्कळ जास्त चटका लावणारें असें नाटककाराला करतां आलें असतें. परंतु नाटकाचा शेवट गोड करावा, आणि कोणा तरी तरुण-तरुणीचें लग्न लावावें या मोहाला बळीं पडून त्याला तसें करतां आलें नाही. वास्तविक कृष्णराव आणि सरस्वती या पात्रांची या नाटकांत नीटशी सांगड बसत नाही याची जाणीव स्वतः नाटककाराला असल्याचें प्रस्तावनेंत नमूद आहे. परंतु कोणीकडून तरी ही सांगड बसवावयाची आणि त्या दोघांचें लग्न लावून द्यायचें, यासाठी मग त्या जोडीच्या निमित्ताने कांही वेगळेंच शृंगारानुकूल वातावरण नाटकांत उभें करावें लागलें. सरस्वतीच्या संपत्तिविषयक त्यागी ध्येयवादित्वाचा पसारा खूप मोठा करावा लागला. यांत रंग भरावा म्हणून मर्चंट ऑफ व्हेनिसमधल्या पोर्शियाप्रमाणे सरस्वतीला बॅरिस्टर बनवावें लागलें आणि नाटकाच्या करुणामय गंभीर परिणतीकडे तितकें लक्ष पुरविण्याला नाटककाराला अवसर राहिला नाही.

नाटककाराचा पिंड विनोदी—

वस्तुतः या जोडीचें लग्न लावायचें होतें तरीही इंदुमतीचा शेवट याहून अधिक दुःखाचा आणि अधिक भीषण असा नाटककाराला करतां आला असता. त्यामुळे जें तत्त्व प्रतिपादावयाचें होतें तें अधिक प्रभावीपणें प्रेक्षकवाचकांच्या चित्तावर ठसवितां

आलें असतें. परंतु नाटककाराचा मूळचा पिंडच विनोदी आणि सुखमय कथानक व घटना रंगविण्याचा; त्यामुळे तसा प्रयत्न त्याच्या हातून संपूर्णपणे होऊं शकला नाही.

भाषेंतील हृद्य ठसका आणि काव्यमयता —

खटकेबाज संवादांकरिता श्री. जोशी यांचीं तीन्ही नाटकें मराठी नाट्यसंसारांत चांगलीं गाजलेलीं आहेत. त्यांचें खडाष्टक तर अजूनही या गुणामुळेच बक्षिसें मिळण्याइतकें रंगभूमीवर रंगतें. या प्रस्तुत नाटकांतील सर्वच भाषणें या दृष्टीने चित्तवेधक आणि अभ्यसनीय आहेत. कृष्णराव आणि सरस्वती यांचे सर्वच संवाद मोठे आकर्षक आहेत. तरुण प्रणयीजनांचे खटकेबाज, पेचदार संवाद लिहिण्यांत मराठी नाट्यसंसारांत श्री. जोशी यांचें यश मोठेंच स्पृहणीय आहे, हेवा करण्याइतकें मोठें आहे. पण या नाटकांतील राधाकाकू या पात्राच्या भाषणांत जो एक हृद्य ठसका नाटककाराने साधला आहे त्याची गोडी कांही निराळीच आहे. याच्याच पुढच्या प्रकरणांत देवदत्ताची आई आणि बहीण यांच्या बोलण्यांत हाच ठसका फार दिवसांनी (जोशीबुवांनंतर) ऐकूं येतो. याच्या जोडीला करुण भावनेने ओथंबल्यामुळे भावनापूर्ण काव्यमयतेपर्यंत पोचणारीं इंदुमतीचीं भाषणेंही याच नाटकांत आणि वर उल्लेखिलेलीं खटकेबाज आणि ठसकेबाज भाषणें लिहिणारांनीच लिहावींत, हें श्री. जोशी यांच्या सव्यसाचित्वाचें चांगलें उदाहरण आहे.

अर्थात स्वाभाविकच ही सर्व भाषा घासून पुसून, तासून बनविलेली आहे. म्हणजेच एका अर्थी ती कृत्रिम आहे. या अशा प्रकारच्या भाषेसाठी नाटकें लिहिलीं असा सुद्धा आरोप श्री. जोशी यांच्यावर करतां यावा इतका त्यांचा भाषेविषयीचा हा साक्षेपी बनावटीचा प्रयत्न अनुभवास आल्यावाचून राहत नाही. परंतु त्यामुळे त्यांच्या नाटकांत रसवत्तेचा कोणत्याही प्रकारें भंग झाला आहे असा अनुभव तीं भाषणें ऐकतांना किंवा वाचतांना मुळीच येत नाही.

प्रकरण अठरावें

देवदत्त

कुलवधु या रांगणेकरांच्या गाजलेल्या नाटकाचा नायक देवदत्त याच्या चित्रणाचा आपल्याला विचार करावयाचा आहे या प्रकरणांत. कुलवधु हें नाटक करुण नाट्याच्या क्षेत्रांत बसणारें आहे की नाही हा एक विवाद्य प्रश्न आहे. "प्रत्यक्ष तीव्र स्वरूपांत सहसा कधी न दिसणाऱ्या अशा अगदी जिव्हाळ्याच्या विषयांवर लिहिलेलीं नाटकेंच आजच्या प्रेक्षकांचें चित्त वेधून टाकण्याला समर्थ होतील" असा प्रत्यय कुलवधु नाटकामुळेच रांगणेकरांना आला आहे. म्हणजे प्रत्यक्ष तीव्र स्वरूपांत दिसणाऱ्या कोणत्या एका घटनेचा अविष्कार या नाटकांत अभिप्रेत नाही. आणि करुण नाट्य तर तीव्र, तीव्रतर, तीव्रतम अशा समरप्रसंगावर आधारलेलें असतें असें आतांपर्यंत आपण पाहिलें आहे. "स्त्रीपुरुषांच्या जीवनांतील समरप्रसंग" रेखाटणें हा जरी रांगणेकरांचा नाट्यलेखनाचा हेतु आहे तरी या समरप्रसंगांचा अंत नायिकेची (नायकाचा उल्लेख ते करीत नाहीत) करुण अखेर दाखवून करणें त्यांना सर्वंग दुर्बळपणाचें वाटतें. त्यामुळे कुलवधु हें नाटक ज्याला आपण ट्रॅजेडी म्हणजे करुणविपाकप्रधान नाटक म्हणतों अशा नाटकांच्या पंक्तीस बसेल की नाही याबद्दल सहसा एकमत होणार नाही. परंतु हा विचार या प्रकरणाच्या अखेरीकरिता राखून ठेवून देवदत्ताचें चित्रण रांगणेकरांनी कसें केलें आहे तेंच आपण आधी पाहूं या.

देवदत्ताच्या मनाची बोच : नाटकाचें बीज —

देवदत्त ऑफिसांतून घरीं आलेला आहे. परंतु पत्नी भानुमती अजून घरीं आलेली नाही. तिचें काम वाढलें तर तिला यायला रात्र होण्याचा संभव देवदत्ताला वाटतो आहे. अशा स्थितींत आपली देवदत्ताशीं गाठ पडते. पत्नीला येण्याला उशीर होणें, नव्हे कदाचित बराच जास्त उशीर होण्याचा संभव असणें, यामुळे तो कांहीसा नाराज आहे हें आपल्या ध्यानांत आल्यावाचून राहत नाही. बायको नोकरी करते हीच गोष्ट त्याला विशेषशी रुचत नसावी. परंतु त्यापेक्षा नवऱ्याचा पगार साठ आणि बायकोचा पगार पंधराशे रुपये यांतील फरक त्याला बोचत असल्याचें दिसतें. 'नवरा कुठला आणि बायको कुठली' असा प्रश्न नोकरांपुढे उभा होतो अशी त्याची नाजुकशी तक्रार आहे. अर्थात घरांत नवरा सत्ताधीश असावा ही त्याची कल्पना जशी यांत व्यक्त होते तशीच अशी सत्ता आपल्याला नाहीशी होत असल्याची आशंकाही त्यांत दिसते. पत्नीच्या मानाने आपण दरिद्री आहोंत अशी बोच त्याच्या मनाला लागलेली

अनु. २६३७० वि. निबंध ५८३
क्रमांक १२१५ दैवदत्त नोंद दि. २३/३/६०
ठाणे. स्थळमत.

आहे. आणि यांतूनच पुढे पतिपत्नींमधील समरप्रसंग निर्माण होण्याचा संभव आहे याची जाणीव देवदत्ताच्या या सूचक अस्वस्थतेंतून आपल्याला झाल्याशिवाय राहत नाही. अस्फुट रूपांत कां होईना नाटकाचें बीज या ठिकाणीं सूचित होतें.

मग आपली त्याच्या पत्नीशीं, भानुमतीशीं गाठ पडते. मोठी खट्याळ बोलणारी, चिमखडा स्त्री ती आहे, याचा प्रत्यय आपणाला पहिल्या क्षणापासूनच येतो. पण पतीच्या सहवासाची उत्कंठा असलेली ती स्त्री आहे; पुरुषाला बायकोपेक्षा क्लबचें जीवन जास्त आवडायला लागूं नये असा तिचा ओढा आहे. आणि सहवासशून्य जीवनाची परिणति एकमेकांची ओळखही कांही दिवसांनी न राहण्यांत व्हायची, हें तिने आपल्या थट्टेखोर स्वभावाला अनुरूप असें केलेलें वर्णन खेदगर्भ आहे हेंही आपल्याला जाणवतें.

देवदत्ताच्या चित्तांतील कडवटपणा —

यापुढे त्या दोघांचा पाचपेची, लटक्या रुसव्याचा परंतु अथांग प्रेमदर्शन ज्यात होतें असा संवाद आपणाला मोठ्या सुखद मेजवानीसारखा सुखद जरी होतो तरी त्यांतही, "कोणत्या नवऱ्याला अभिमान वाटेल आपली बायको आपल्यापेक्षा पंचवीसपट जास्त पगार मिळवीत असलेली पाहून?" "तूं अलीकडे माझं मुळीच ऐकत नाहीस" अशा सारखीं देवदत्ताचीं वाक्यें; पार्वती भानुमतीचें पत्र आपल्याला कशी देईल, ही त्याची कटाक्षयुक्त शंका; या गोष्टी, त्यांच्या प्रेमाच्या आणि विनोदाच्या भरांतसुद्धा, देवदत्ताच्या चित्तांत कांहीसा कडवटपणाचा भास आपल्याला करून दिल्याशिवाय राहत नाहींत.

वास्तविक किती प्रेमळ आणि परस्परावद्दल अथांग विश्वास असणारें तें जोडपें आहे. आपले आईबाप येणार याबद्दलची काळजी देवदत्ताला वाटते ती केवळ स्वतःसाठी नाही. वडील नाही नाही तें दोघांना बोलतील अशीच त्याची उत्स्फूर्त काळजी आहे. ते आल्यामुळे तुझी आणि माझी चांगलीच दामटी वळणार आहे अशीच चिंता तो व्यक्त करतो. किंबहुना आपण आपल्या वडलांचें कसें काय तें पाहून घेऊं—परंतु "कुठली दुर्बुद्धि झाली आणि त्यांना आग्रह करून बोलावलं" असें भानुमतीला होईल हीच काळजी देवदत्ताला अधिक वाटते.

लढाई खुद्द देवदत्ताशींच होती—

असें हें प्रेमळ जोडपें. त्यापैकी एकाच्या मनांत मात्र थोडीशी रुखरुख; अगदीच मंद ठिणगी जणू. पण त्या ठिणगींतूनच वडवानल उत्पन्न होणार आहे हें त्या वेळीं कोणी त्या उभयतांना सांगतें तर त्याची त्यांनी वेड्यांतच गणना केली असती. मोलकरीण पार्वती भानुमतीच्या सासऱ्यांना उद्देशून जेव्हा म्हणते, "तुमच्यावर रागावणारीं कसलीं हो हीं माणसं?" तेव्हा या असल्या माणसांतच देवदत्त सामील होणार आहे हें तिच्या ध्यानींमनींसुद्धा नसेल. आणि "चला भानुमतीबाई, व्हा तयार आता लढाईला" असें म्हणून सासूसासऱ्यांशीं सामना देण्याला सिद्ध होणाऱ्या भानुमतीला फार उशीरा

कळायचें होतें की तिची लढाई सासूसासऱ्याशीं नव्हती, तर खुद्द देवदत्ताशींच होती आणि त्या लढाईत अखेरीस शांतीसाठी तिला सासूसासऱ्यांच्याच आश्रयाला जावें लागणार होतें!

हें जें त्या उभयतांच्या जीवनांत वादळ उठलें खाणि त्यांतून तो वडवानल पेटला त्याला कारण घरीं मुद्दाम भानुमतीने बोलावून आणलेली मंडळी – त्याचे आईबाप आणि त्याची बहीण. आपण काय करतों आहोंत याचा उमज न पडून आपल्या कांटेरी जिभा त्यांनी अशा कांही वारेमाप चालविल्या की, देवदत्ताच्या हृदयाच्या कोपऱ्यांत, आहे की नाही इतकी मंद अशी जी एक ठिणगी असावी हा संशय होता, त्या ठिणगीचा चांगला रसरशीत निखारा झाला.

" ज्यांना स्वतःला मिळविण्याची अक्कल नाही त्यांनी पाठवावं आपल्या बायकांना सिनेमांत, " " बाप्पा म्हणतात तें खोटं नाही की, तूं हिच्या ताटाखालचं मांजर झाला आहेस," "बायको महिन्याला पंधरारो रुपये मिळविते आणि हा साठ रुपये मिळवितो," " पण नटीचा नवरा म्हणवून घेण्यांत भूषण वाटत असेल ना त्याला ! " इत्यादि बनू-वन्संचे फूत्कार व तशाच अर्थाचीं आईबापांचीं बोलणीं यांचा महिनाभर वारा मिळून तो निखारा चांगला धगधगूं लागला.

परिणाम म्हणजे देवदत्त नाखूष दिसूं लागला. नवरा बायकोचें भांडण झालें असावें, जमत नसावें एकमेकांचें असा संशय यावा, असें त्यांचें वागणें होऊं लागलें. त्याच्या कपाळाला सदान्कदा आठ्या पडलेल्या दिसतात आणि त्याला कारण सूनबाईच होय असा राधाईबाचा अभिप्राय जो पडतो तो सिनेमाकंपनींतून मानुमतीबद्दल अत्यंत अनुकूल ग्रह करून आलेल्या बाप्पांनासुद्धा खोडून काढतां येत नाही. 'देवदत्त सदाच असा दुर्मुखल्या चेहऱ्याचा " हा बाप्पांचा अभिप्राय टिकण्यासारखा नसतोच. कारण पूर्वी तो आनंदी, हसतमुख असायचा हें त्यांनाही अमान्य करतां येत नाही.

ठिणगीचा निखारा : निखाऱ्यांतून आगीचा लोळ —

असा हा कडवटपणा देवदत्ताच्या ठिकाणीं केवढ्या मोठ्या थराला गेलेला असतो याचें प्रत्यंतर थोडक्यांतच दुसऱ्या अंकांत आपल्याला मिळतें. बाप्पांच्या आग्रहावरून भानुमती भक्तिगीत गात असतांनाच देवदत्त बाहेरून परत येतो. परंतु आंतील गाणें चाललेलें पाहून थबकतो. मोकळ्या मनाने गाणें ऐकायला आंत जात नाही. उलट कांहीसा रुष्ट होऊन तेथून दिवाणखान्यांत जाऊन बसतो. आणि तीं दोघेंच राहिल्या-वर भानुमती त्याच्यापुढे सरबताचा पेला करते तेव्हा त्या निखाऱ्याचा पेटून जाळ झालेला असतो.

गाणें चाललें असतांना आंत न आल्याबद्दल भानुमती त्याच्याच बोलण्याच्या अनु-षंगाने थोडासा राग व्यक्त करते आणि "बायकोचं कौतुक स्वतः करीत नाही तें नाहीच" असें म्हणते तेव्हा "तुला डोक्यावर घेऊन नाचताहेत आणि मला पायांखालीं तुडवताहेत !

तुझ्या सद्‌गुणाच्या झगझगाटामुळे मी म्हणजे त्यांना मेणबत्तीसारखा वाटतों" असा देवदत्ताचा पहिला स्फोट होतो.

पण त्याने भानुमतीच्या सिनेमाकंपनीतर्फे होऊं घातलेल्या सत्काराच्या वेळीं हजर राहावें असा आग्रह भानुमती करते, त्या वेळी देवदत्ताची मळमळ खरी जोराने बाहेर पडते. "कार्यशोभा म्हणण्यापेक्षां स्वतःची शोभा म्हण! कारण तुझ्या आसपास मी कुठेतरी पुतळ्यासारखा बसणार!...मग असं कर, पार्वतीलाही नेऊं या. तिच्याही गळ्यांत एखादा हार पडेल. लोकांच्या दृष्टीने आम्ही दोघे सारखेच. एक तुझी स्वयंपाकीण, एक तुझा नवरा!" हें देवदत्ताचें बोलणें कांही विनोदाचें खास नव्हतें. त्याच्या चित्तांत पेटलेल्या आगीचा उसळून बाहेर पडलेला तो लोळ होता!

आणि हा लोळ पेटवायला प्रत्यक्षांत आईबाप कारण झालेले जरी आपण पाहत असलों तरी आईबाप हे बाकीच्या सगळ्या टवाळ आणि सहानुभूतिशून्य समाजाचे प्रतिनिधीच एका अर्थी आहेत असें म्हटलें पाहिजे. समाजांत चाललेल्या अनिर्वाच्य वाच्यतेचाच उच्चार त्यांच्या जिभांकडून होत होता. म्हणून लोकांच्या दृष्टीने पार्वती आणि मी सारखेच असें लोकांच्या कटाक्षांना उद्देशूनच देवदत्त बोलतो.

आईबापांचें तें मत प्रत्यक्ष अनुभवाने पालटलें जातें हें खरें. परंतु राधाबाईचा म्हणजे स्त्रीसमाजाचा मनपालट कांही खरा मनापासून होतच नाही. भानुमती स्वतः सरबत घेत नाही, देवदत्ताची येण्याची वाट पाहावी म्हणते त्या वेळी राधाकाकू ठसकतात,

"पाहिलंस का बने! नीट बघून ठेव हं. नवऱ्याबद्दल असं प्रेम दाखवायचं असतं चार मंडळी असली म्हणजे." आणि त्यावर मग देवदत्ताच्या कपाळावरील आठ्यांबद्दल पुढील उद्‌बोधक संवाद त्या दोघींत होतो.

भानुमती — त्या माझ्यामुळेच असतील कशावरून?

राधाकाकू — मग काय आमच्यामुळे – मग उघड सांग म्हणावं की तुमची ट्रंक – बिछाना घेऊन जा कोकणांत म्हणून.

देवदत्ताच्या स्वभावांतील खाचाखोचा —

आणि यांतून भानुमतीला जाब विचारला जातो, "काय ग तुला सिनेम्यांत जायला कशाला हवं होतं ग?" याच्या जबाबावरून भानुमतीने नवऱ्यासाठी सोसलेल्या कष्टांची करुण हकीकत आपल्याला समजते. देवदत्ताची नोकरी जाणें, त्यांतून तो मोठ्या कष्टाने बरा होणें वगैरे ती सगळी हकीकत येथे देण्याचें प्रयोजन नाही. पण त्यामधून भानुमतीने हेरलेल्या देवदत्ताच्या स्वभावांतील खाचाखोचा ज्या आपल्याला दिसून येतात त्या मात्र आपल्याला टिपून घेतल्या पाहिजेत.

नोकरी नसण्याच्या काळांत देवदत्ताने स्वतःची देणगी म्हणून मिळालेली अंगठी खर्चासाठी विकली. पण बायकोचे दागिने विकायला मात्र त्याचा विरोध होता. म्हणजे त्याग करायचा तो संरक्षक पुरुषाने करावा आणि स्त्रीचा मायना उपभोगाचा असावा ही

मध्यमवर्गीय कल्पना त्याच्या मनांत प्रभावी होती. दारिद्र्याच्या त्या दिवसांत स्वतः नोकरी करावी असें भानुमतीला पुष्कळ वाटे; पण "आपल्याला पोटापुरतं मिळवायची शक्ति नाही आणि दुसऱ्याच्या जिवावर जगायचा आपल्यावर प्रसंग यावा ही कल्पना-देखील त्यांना सहन होणार नाही हें" भानुमतीला चांगलें ठाऊक होतें. म्हणून नोकरी करण्याचें तिने टाळलें. परंतु परिस्थितीच अशी आली की, त्याचा स्वाभिमान डिवचला जाईल अशा त्या गोष्टी करण्यावांचून गत्यंतर राहिलें नाही. अनुभवानंतर त्याला भानुमतीने नोकरी करणें योग्य आहे असेंच वाटूं लागलें. घरांत एका पुरुषानें मिळवावें आणि बाकीच्या मंडळीनी खावें या वाईट चालींतील दुर्दशा आता त्याने चांगली ओळखली होती.

परंतु असें जरी होतें तरी "मी एवढा पगार मिळवितें म्हणून आम्ही सुखांत राहूं शकतों ही जाणीव त्यांना चुकूनसुद्धा होऊं नये म्हणून मी डोळ्यांत तेल घालून जपत असते. तुम्ही त्यांना बोललांत तर त्यांच्या मनाला ती जाणीव झाल्यावांचून राहणार नाही आणि त्यांचं मन पालटेल. त्यांना पूर्वी कांही वाटत नव्हतं, पण उद्यां त्यांच्या मनांत कोणी भरवलं की, माझ्या जिवावर ते ऐश्वर्य आणि सुख भोगताहेत तर त्यांना मरणप्राय दुःख होईल. त्यांचा मान दुखावला तर तें आपलं पोटसुद्धा मारतील." याची भानुमतीला एवढी तीव्र जाणीव होती की त्याला जरासुद्धा असें वाटूं द्यायचें नाही असा भानुमती सतत प्रयत्न करीत आली होती आणि आता एवढें हें चालू चित्रपटाचें काम संपलें की सिनेमाचा व्यवसायसुद्धा सोडून देण्याचें तिने ठरविलें होतें.

कटु भावनेमुळे खिन्न देवदत्त—

पण भानुमतीची ही सर्व खटपट व्यर्थ गेली. जें भूत त्याच्या अंगांत संचरूं नये तेंच नेमकें त्याच्या मनांत संचरायला साऱ्या समाजाची प्रतिनिधीभूत अशी त्याचीं आईबापें आणि बहीण ही मंडळी कारण झाली, आणि त्याच्या मनांत स्वाभाविकपणेंच जागृत असलेल्या ठिणगीचा आगलोळ उडाला. मग "मला दोन हजार पगार मिळाला तर तुम्हांला दोन हजार साठ मिळतो हें विसरूं नका. तुमच्याकडेच नाही कां मी सारा पगार देतें? म्हणजे माझ्यापेक्षा साठ रुपयांची जास्त मस्ती तुम्हांला येईल आणि तुम्हीच मला सोडून द्याल" हा तिचा विनोदगर्भ कोटिक्रम देवदत्ताच्या डोक्यांत मुळीच शिरत नाही; आणि आपल्या ठिकाणची कटु भावना हिला समजूं शकत नाही या विचाराने देवदत्त अतिशय खिन्न झालेला आपण पाहतों.

या कटु भावनेचाच असह्य स्फोट तिसऱ्या अंकांत आपण पाहतों. भानुमती देवदत्ताला सत्कारसमारंभाला हजर रहाण्याचा आग्रह करीत होती तेव्हाच्या त्याच्या तेढीच्या उत्तराची नोंद आपण घेतली आहे. परंतु तरीही तो येईल अशी भानुमतीला आशा वाटत होती. देवदत्त कार्यक्रमाला गेला; पण राजरोस भानुतीच्या बरोबर नाही. तर एकटा, तिकिट काढून आणि एका आडबाजूला बसून पाहण्यासाठी.

अर्थात यामुळे भानुमतीला फारफार वाईट वाटलें बाहेरच्या हजारो माणसांनी कितीही स्तुति केली तरी आपल्या माणसाच्या तोंडचे गोड शब्द ऐकून जो अतुलनीय आनंद होतो त्याची भानुमतीला तहान लागली होती. पण तो आनंद तिला मिळायचा नसतो. भानुमतीला वाटतें होतें की आपण जर नवरा असतों तर बायकोचें कौतुक पाह्यला अवश्य गेलों असतों. पण पार्वतीला पुरुषांच्या मनाची एवढी खात्री नाही. आणि तिचाच अंदाज खरा ठरतो.

देवदत्त मिसेस भानुमतीचा नवरा —

देवदत्त घरी परत येतो तोच मुळी घुस्शांत. त्यांतच आल्या क्षणीं त्या आचरट साम्रणविक्या एजंटाशीं त्याची गाठ पडते. बाहेर जें त्याच्या कानावर एकसारखें आदळत होतें तेंच त्याचें वर्णन त्याला या एजंटाकडून स्वतःच्या घरीं ऐकावें लागलें. काय, तर मिसेस भानुमतीचा नवरा. आणि वर त्याने दिलेल्या सर्टिफिकिटाच्या जाहिरातींत अमुक अमुक नटीचा नवरा असें लिहिलें म्हणजे आपल्या कंपनीचें काम भागेल, अशी त्या बावळटाने पुस्ती जोडली !

आधीच पेटलेल्या आगींत त्यामुळे आणखीच भर पडली. त्या मनःस्थितींत जेव्हा भानुमतीच्या तोंडून तो ऐकतो, "हं हं, हं. कांही वाटतं का पाहा. कौतुक म्हणून करायला नको बायकोचं," त्या वेळीं तिचा थट्टेचा स्वरसुद्धा त्याला जाणवत नाही आणि तो तिला तेढीं उत्तरें देतों.

देवदत्ताची व्यथा —

तो सत्कारसमारंभाला आला होता. पण आपला नवरा म्हणून स्वतःची मानहानी करून घ्यायची त्याची इच्छा नव्हती; म्हणून तो तिकिट काढून आडजागीं बसला होता; आणि तिने असें कांही मोठें कांहीच केलें नव्हतें की, ज्यासाठी लोकांनी तिच्यावर एवढी स्तुति उधाळावी, असें त्याचें मत होतें, हें ऐकून भानुमतीलाही वेदना झाल्या. "तूं जितकी उंचउंच जात आहेस तितका मी ठेंगणा ठेंगणा होत आहे" अशी देवदत्त आपली व्यथा व्यक्त करीत असतां, आपण कधी त्याच्या उंच जाण्यांत, भराऱ्या मारण्यांत व्यत्यय आणला नाही; म्हणून त्याने आपल्याला खाली ओढण्याचा प्रयत्न का करावा हें तिला कळत नाहीसें होतें.

"पण या घरातलं वातावरण तुझ्या वर्चस्वानं इतकं भरून गेलं आहे की, माझा स्वतःबद्दलचा अभिमान, माझं स्वतंत्र अस्तित्व सारं सारं कांही मला सोडून दूरदूर गेलं आहे. एखाद्या शोभेच्या वस्तूपेक्षा या घरांत माझं अस्तित्व जास्त महत्त्वाचं राहिलेलं नाही" असें जेव्हा आपल्या चिडीच्या समर्थनार्थ देवदत्त म्हणतो तेव्हा बायकांच्याइतका उदारपणा पुरुषांत असत नाही, आपल्या बायकोचा गौरव म्हणून त्यांना पाहवत नाही असा आरोप भानुमती त्याच्यावर करते.

पौरुषाच्या अहंकाराला विटून भानुमती घर सोडते —

अमुक स्त्रीचा नवरा म्हणून लोकांनी आपल्याला ओळखावें हें शल्य पुरुषाला कधी सहन होणार नाही असें त्यावर देवदत्त म्हणतो. निसर्गाची रचनाच तशी आहे हें त्याचें म्हणणें भानुमतीला पटत नाही. त्याच्यांतील नवरेपणाची सत्ताकांक्षा जागृत झाल्याचा तिला प्रत्यय येतो. "सगळं सगळं मीं केलं. कुणासाठी, फक्त तुमच्या प्रेमासाठीं. पण जिच्याशीं तुमची जन्माची गाठ पडली आहे, जी तुमच्या सुखदुःखांत भागीदारीण आहे, त्या तुमच्या प्रत्यक्ष बायकोबद्दल देखील तुमच्या मनांत मत्सर आणि अहंकार दिसावा!" असा भानुमती देवदत्ताचा अधिक्षेप करते. आणि आपल्या बायकोच्या सद्गुणाची होळी करून टाका म्हणजे तुमचा पुरुषी आत्मा शांत होईल असें फणकाऱ्याने म्हणून आंत जाऊन स्वतःची बॅग घेऊन येते व "ज्या घरांत स्त्रीला अडगळीएवढं देखील अस्तित्व नाही, ती स्त्री असल्या घरांत राहण्यापेक्षा घराबाहेर पडण्यांतच जास्त आनंद पत्करील. तुम्ही मात्र आपल्या पौरुषाच्या अहंकारांत कल्पांतापर्यंत राहा" असा जळजळीत शाप त्याला दिल्यासारखें करून "जिथं माणुसकी आहे – अंतःकरणाचा जिवंतपणा आहे – तिथं – बाप्पांच्या – घरीं" जाण्यासाठी म्हणून ती घर सोडून जाते.

अर्थात भानुमती सासऱ्याकडे जाते ही गोष्टच या नाटकाचा शेवट शोकमय होणार नाही याची दर्शक असते. शाकुंतलांत पांचव्या अंकाच्या अखेरीला ज्याप्रमाणे गडद करुण विपाकाची छाया नाटकाच्या परिणतीवर पडते, परंतु पुढे सातव्या अंकाच्या अखेरीस दुष्यंत–शकुंतला यांचें मंगल मीलन होतें, तसाच काहीसा प्रकार या नाटकाचा होणार हें भानुमतीचें सासऱ्याकडे जाणें, देवदत्त व भानुमती यांचें परस्परांवरील निर्व्याज प्रेम आणि जात्या दोघांचीं सत्प्रवृत्त अंतकरणें यामुळे निश्चितच वाटतें.

परंतु जेथपर्यंत आपण पोचलों आहोंत तेथली परिस्थिति चांगलीच स्फोटक आहे. एकमेकावर नितांत प्रेम करणारीं हीं दोघें एकमेकापासून इतकीं दुरावलीं आहेत कीं, हीं दोघें आता कायमचीं एकमेकाला अंतरणार असा भास प्रथमदर्शनीं तरी व्हावा. भानुमतीने तर कल्पांतापर्यंतचा उल्लेख प्रत्यक्षच केला आहे. आणि प्रस्तावनेंत रांगणेकरांनी ज्या भारतीय स्त्रीच्या मनाचा उल्लेख केला आहे तें मन भानुमतीचें आहे म्हणूनच आणि देवदत्ताचाही तो वैतागच होता, त्यांत भानुमतीचा कायमचा अधिक्षेप करण्याचा त्याचा हेतु सुतराम नव्हता, नाही तशी त्याला आशंकाही नव्हती, म्हणूनच हें नाटक पुढच्या भागांत सुखात्मक होण्याची शक्यता होती. नाहीपेक्षा आतापर्यंतच्या अवस्थेंत तें एक करुण नाटकच आहे असें म्हणण्यासारखी त्याची रचना आहे.

भानुमतीचें निर्मळ प्रतिप्रेमच चटका लावणारें —

अर्थात प्रा. वाळिंबे यांनी हर्फर्डच्या ज्या मताचा आधार घेतला आहे त्याच्याशीं

मुळीच जुळणारा रांगणेकरांचा देवदत्त नाही. तो कोणी मोठी श्रेष्ठ व्यक्ति नाही. त्याच्या पत्नीला नायक मानण्याचा कोणी आग्रह धरलाच तर तीही कोणी असामान्य व्यक्ति आहे अशांतला भाग नाही. तिच्यामध्ये आपल्या मनाला विशेष चटका लावणारी जी गोष्ट आहे ती म्हणजे तिचें यशस्वी सिनिमा-नटीचें जीवन खास नाही. तर नवऱ्यावरील तिचें निर्मळ प्रेम आणि त्यासाठी हवा तो त्याग करण्याची तयारी ही ती गोष्ट आहे.

तथापि या त्यागाचेंही प्रत्यक्ष दर्शन करविण्याच्या भानगडींत रांगणेकर मुळींच पडले नाहींत. सर्व भार त्यांनी कथनावरच टाकला आहे. नाटककाराचें कथन आम्हीं गृहीत का धरावें, त्याने कांही प्रत्यक्ष पुरावा आमच्यासमोर घडवायला नको का ? असला आडमुठा प्रश्न कोणी विचारील हें बहुधा त्यांना केव्हा भासलेंच नाही. आणि भासलेंच असलें तर अशा टीकाकारांची कदर करण्याइतके ते लेचेपेचे नाटककार नव्हेत.

रांगणेकरांचें साध्य आणि साधन —

त्यांचें साध्य होतें दोघा प्रेमी जीवांची ताटातूट दाखविण्याचें; किंवा त्यांच्या नाटकांतील उपदेशाचा भाग त्यांनी जो कल्पिला होता की, स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचें स्थान असून तिच्यावर पुरुषी अहंकाराने सत्ता गाजविण्याचा काळ यापुढे आता राहिलेला नाही, तें सांगण्याचें. दोन्ही दृष्टींनी जेवढें नाटकांत दाखविणें आवश्यक होतें तेवढेंच त्यांनी प्रत्यक्ष दाखविलें आणि बाकीच्यापुरती, समंजस वाचक आपल्या – म्हणजे आपल्या पात्रांच्या कथनावर अविश्वास करणार नाहींत अशी श्रद्धा बाळगली.

अर्थात, प्रस्तुत लेखकाच्या मनावरचा ठसा तरी कुलवधु नाटकांत ज्या व्यक्तीवर विशेष-करुणास्पद प्रसंग ओढवतो अशी व्यक्ति म्हणजे देवदत्तच असा आहे. आणि असा प्रसंग त्याच्यावर ओढवण्याचें प्रमुख कारण त्याच्या भोवंतालची परिस्थिति हेंच आहे. भानुमतीने त्याच्यावर पुरुषी अहंकाराचा कठोर आरोप केला आहे. आपल्या बायकोचा त्याला मत्सर वाटतो, तिचा गौरव त्याला सहन होत नाही हाही तिचा आरोप आहे. या गुन्ह्याबद्दल तिने त्याला एकाकी राहण्याची शिक्षा फर्माविली आहे. तिलाही त्यांत सुख आहे असें नव्हे. पण तिला निदान सासूसासऱ्यांचा आसरा आहे; आणि आपण आपल्या स्वाभिमानाचें रक्षण केलें हा अहंकार आहे.

देवदत्ताला विचाऱ्याला यापैकी कांही नाही. त्याची नुसती बायको त्याला सोडून गेली एवढेंच घडलें नाही. तर जातांना ती त्याच्यावर अत्यंत अन्याय्य आरोपांचा आघात करून गेली. कारण त्याला तिचा मत्सर वाटत होता हा आरोप कितीसा बरें खरा आहे ? आपल्यापेक्षा तिला जास्त पगार मिळतो याच्याबद्दल त्याची बिलकुल तक्रार नाही. त्याला जी एकच गोष्ट असह्य होते आहे ती म्हणजे तिचा मोठेपणा नव्हे, तर तिचा मोठेपणा जसाजसा वाढत जातो तसातसा आपला उणेपणाही वाढत जातो आणि आपण समाजाच्या तिरस्काराला, हेटाळणीला पात्र होतो ही.

देवदत्ताच्या हृदयावर करुण आघात —

प्रत्यक्ष त्याचे आईबाप आणि पाठची बहीण त्याला याबद्दल इतकीं दुरुत्तरें बोलत होती, त्याला इतकें टोचीत होती की बाकीचा समाज त्याहून किती क्रूरपणे त्याची थट्टा करीत असेल आणि त्यामुळे त्याचें मन – जें अत्यंत अभिमानी होतें याची चांगली जाणीव भानुमतीला आहे – किती खट्टू होत असलें पाहिजे याचा विचार त्याच्यावर नितांत प्रेम करणाऱ्या भानुमतीने करूं नये आणि वर उलटा त्यावर मत्सराचा आरोप करावा, याच्यासारखा त्याच्या हृदयावर अधिक करुणास्पद आघात तरी कोणता !

भानुमतीचें म्हणणें आहे की, पुरुष जेव्हा स्त्रीपेक्षा फार उंच उंच चढतो त्या वेळीं आम्ही स्त्रिया किती मोकळ्या आणि उदार मनाने त्यांचें कौतुक करतों. आम्हांला कांही त्यामुळे कमीपणा वाटत नाही, वैताग येत नाही. पण पुरुषांच्या ठिकाणीं ही उदारता नाही. स्त्री ही त्यांना पायांतली वहाणच राहिली पाहिजे असें वाटतें. त्यामुळे स्त्रीला एवढीही पुढे येण्याची संधि द्यायची तयारी पुरुषांची नसते. परंतु भानुमती हें विसरते की आपल्याहून श्रेष्ठ पुरुषाच्या वैभवाचें कौतुक करणाऱ्या आणि त्याच्या तुलनेने लीनता स्वीकारून राहणाऱ्या स्त्रीचें जसें समाज कौतुक करतो तसें कौतुक त्याच स्थितींत असलेल्या पुरुषाचें समाज करीत नाही. अमुक पुढाऱ्याची बायको असें जेव्हा समाज म्हणतो तेव्हा त्यांत त्या स्त्रीबद्दल कौतुकाची भावना असते. पण अमक्या मंत्रीणबाईचा नवरा, अमक्या नटीचा नवरा असें म्हणतांना समाजाचा स्वर हेटाळणीचा असतो. समाजाचा म्हणजे केवळ पुरुषांचा नव्हे तर स्त्रियांचाही. किंबहुना स्त्रियाच अशा पुरुषाची अधिक बेहद्द टवाळी करतात. भानुमतीला हा अनुभव होता ना की, देवदत्ताबद्दल सर्व हकीकत कळल्यावर सहानुभूतीचा आणि समजुतीचा स्वर बाप्पांचा निघतो; तितका काही राधाकाकूंचा निघत नाही ?

समाजाची विकृत दृष्टि —

समाजाची ही विकृत दृष्टि नाट्यसृष्टीच्या बाहेर जाणवल्याचींही उदाहरणें आहेत. एक मोठें उदाहरण द्यावयाचें झालें तर श्रीमती विजयालक्ष्मी पंडित आणि त्यांचे सुविद्य पति कै. रणजित पंडित यांचें देतां येईल. विजयालक्ष्मी पंडित मंत्रीपदावर आल्यावर कै. रणजित यांना आपल्याबरोबर घेऊन जाणें त्यांनाच मोठें अवघड वाटे. कारण मंत्र्याची बायको मंत्र्याबरोबर फिरण्यांत त्या स्त्रीला भूषण असें जो समाज मानतो तोच समाज मंत्रीणबाईबरोबर फिरणाऱ्या तिच्या पतीबद्दल आदर बाळगत नाही हा त्यांचा अनुभव होता. आणि म्हणून कै. रणजित पंडितांची होणारी अवघड अवस्था टाळावी असेंच त्यांना वाटे.

हा प्रकार कै. रणजित पंडितांसारख्या चांगल्या विद्वानाचा – ज्यांना स्वतःचें स्वतंत्र असें श्रेष्ठ स्थान समाजांत होतें, जे बायकोच्या नांवावर विकले जाण्याचा संभव नव्हता

अशा एका थोर गृहस्थांचा. तेथे भानुमतीसारखी लौकरच दरमहा दोन हजार रुपये मिळवूं लागणार होती अशी लोकप्रिय आणि लोकांच्या डोळ्यांवर आलेली नटी आणि देवदत्तासारखा साठ रुपये मिळविणारा कारकुन अशी परिस्थिति असतांना हें दोघां-मधील अंतर देवदत्ताला समाजांत किती जाचक होईल याची कल्पना करण्यासारखी आहे. आणि देवदत्त म्हणतो त्याप्रमाणे हें अंतर कमी होण्याऐवजी वाढतच जात होतें. म्हणूनच तो वैतागून म्हणत होता, "तूं जितकी उंचउंच जात आहेस तितका मी ठेंगणा ठेंगणा होत आहे!"

दोघांमधलें अंतर फारच मोठें —

रांगणेकरांनी हें अंतर या दोघांमधलें फार मोठें ठेवलें आहे. पैसे मिळविण्याच्या दृष्टीने अंतर ठेवूनसुद्धा दुसऱ्या कांही बाबतींत देवदत्ताला जर स्वतःचें असें कांही स्थान जीवनांत श्रेष्ठत्वाचें असतें तर त्याच्याकडे पाहण्याची समाजाची दृष्टि थोडी तरी पालटून गेली असती. दरिद्री परंतु एखादा श्रेष्ठ कलावंत जर देवदत्त असता, मोठा राजकीय कार्यकर्ता असता, देहदंड शोसणारा त्यागी समाजकर्ता असता, तर भानुमतीच्या श्रीमंतीच्या तुलनेमुळेच केवळ त्याचें पारडें खाली ठरलें नसतें. आणि मग इतका तळमळण्याचा आणि वैतागाचा प्रसंग त्याच्यावर आलाच नसता. मग पत्नीच्याबरोबर जातांना त्याचें अंतःकरण व्यथित झालें नसतें. मग आपल्याला स्वतंत्रपणें लोक जाणतात – ओळखतात या गोष्टीचा अभिमान त्याला पुरेसा झाला असता. नटीचा नवरा अशी थट्टा त्याला ऐकावी लागली असती.

पुरुषांवरील सरसकट आरोप तर्कशुद्ध नाही —

यावर भानुमती म्हणणार हाच तर पुरावा पुरुषी बाणा म्हणून म्हणतें मी त्याचा. आम्हां बायकांना जर असा कमीपणा वाटत नाही, तर पुरुषांना तरी तशाच परिस्थितींत तो असा कां वाटावा? पण पुरुषाचा हा स्वभावधर्म आहे हें तिचें म्हणणें तर्काच्या कसोटीला उतरतें का? पांढरपेशा समाजाच्या बाहेर अशी ही कमीपणाची बोचणी पुरुषाला किंवा स्त्रीला वाटूं शकतच नाही. कारण त्या समाजामध्ये एकापेक्षा दुसरें फार उंच किंवा मोठें अशी तुलना होण्यालाच जागा नसते. पार्वती स्वयंपाकिणीचें काम करते; तिचा नवरा पट्टेवाल्याचें काम करतो. दोघांत आर्थिक स्थिति समान आहे, सांस्कृतिक बैठक समान आहे. त्यामुळे वेळीं बायको थोडी वरचढ झाली तरी पुरुषाला किंवा पुरुष थोडा वरचढ झाला म्हणून स्त्रीला वैषम्य वाटण्याचा प्रसंग येतच नाही. अशा स्थितींत पुरुषांना सरसकट अहंकारी आणि सत्तालोलुप आणि म्हणून बायकांना दास्यांत ठेवूं पाहणारे असा शेरा भानुमतीने कां द्यावा?

पांढरपेशा समाजांतील स्त्रियांच्या कपाळीं मात्र पुरुषाहून उणें मानलें जाण्याचा प्रसंग गेल्या तीन पिढ्यांत चढत्या प्रमाणांत आपल्या देशांत येत राहिला आहे. आमच्या

पिढीच्या वरची दुसरी पिढी म्हणजे प्रस्तुत लेखक किंवा त्याच्या वयाची मंडळी यांच्या आजीआजोबांची पिढी, या बाबतींत पुष्कळच समानतेच्या पायावर उभी होती. स्त्री-पुरुषांत शैक्षणिक किंवा सांस्कृतिक भेद म्हणण्यासारखा मुळीच नव्हता. आणि सर्वच समाजाची आर्थिक पातळी इतकी ठेंगणी होती कीं, त्यामध्ये उंचनीचपणाच्या प्रचंड फरकाच्या पायऱ्या पडण्याला अजून सुरुवातच झालेली नव्हती. त्यामुळे स्त्रीला पुरुषाहून आपण कमी आहोंत असें वाटण्याजोगी परिस्थितीच नव्हती. घरसंसार स्त्री पुरुषाच्या बरोबरीने संभाळीत होती.

त्याच्या पुढची पिढी म्हणजे प्रस्तुत लेखकाच्या वयाच्या मंडळीच्या आधीची पिढी घेतली तर त्या वेळी स्त्रीपुरुषांमधील हें अंतर वाढत जाण्यास सुरुतात झाली. नव्या शिक्षणाने हें अंतर अधिकच मोठें करावयास मदत केली. पुरुषच शिकणारे. स्त्रियांचें शिक्षण म्हणजे अपवाद. त्यामुळे पति ग्रॅज्युएट तर पत्नी अक्षरशत्रू असा पुष्कळसा प्रकार सर्व पांढरपेशा समाजांत होऊं लागला. त्याच्या पुढच्या म्हणजे प्रस्तुत लेखकाच्या पिढींत या अंतराची तीव्रता अधिकच जाणवण्याजोगी झाली. त्याच्या आधीच्या पिढींत हें अंतर होतें तरी असें अंतर असणारांची संख्या फार थोडी होती. सर्व-साधारण पांढरपेशा समाजाचें दुखणें तें अजून झालें नव्हतें. परंतु आमच्या पिढींत पांढरपेशा समाजांत पुरुषांत शिक्षणाचा प्रसार सररहा झाला. मॅट्रिक पास न झालेला पुरुष विरळा. फार मोठी संख्या ग्रॅज्युएट झालेल्यांची. कितीएकजण परदेशांत जाऊन आलेले. परंतु शेकडा एक या प्रमाणांतसुद्धा पुरुष त्यामध्ये, ज्यांची पत्नी पाचसहा इयत्ता इंग्रजी शिकलेली असेल असे नव्हते. प्रस्तुत लेखकाच्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजांत पहिल्या वर्षांत दोनशेहून अधिक मुलगे होते तर मुली फक्त सहा होत्या. यावरून या प्रमाणाची कल्पना येईल.

पत्नी नव्हे; स्वयंपाकीण व दासी —

याचा परिणाम पांढरपेशा वर्गांत पुरुषांची सत्ता अमर्याद वाढण्यामध्ये झाला. घरांत स्वयंपाकीण आणि दासी याहून अधिक स्थान पांढरपेशा स्त्रीला राहिलेंच नाही. पुरुषांला घरीं सहजीवन मिळणें अशक्य झालें. क्लबांत जाण्याची प्रथा त्यामुळे फार मोठ्या प्रमाणांत वाढली. घर म्हणजे दोन वेळ जेवण्याचें आणि दोन वेळ चहा पिण्याचें स्थान बनलें; आणि विषयतृप्तीचें !

तेव्हा स्त्रीला हा जो कमीपणा पांढरपेशा वर्गांत प्राप्त झाला व त्यांतच तिने सुख मानलें यांत पुरुषांचा स्वभाव अहंकारी आणि सत्तालोलुप आणि स्त्रियांचा स्वभाव प्रेमळ आणि उदार अशांतला कांही भाग नाही. हा केवळ परिस्थितीने आलेल्या अगतिकतेचा परिणाम आहे. कॉलेजांत विद्यार्थिनी असतांना सौ. (त्या वेळच्या कु.) इरावती कर्वे एकदा वादविवादमंडळांत गंभीरपणे म्हणाल्या होत्या, " पुरुष स्त्रियांवर सत्ता गाजवितात याबद्दल त्यांना दोष देण्यांत किंवा स्त्रियांच्या परवशतेबद्दल हळहळण्यांत कांही

अर्थ नाही. आज सत्ता पुरुषांच्या हातीं केंद्रित झाली आहे. उद्या जर हीच सत्ता स्त्रियांच्या ठिकाणी केंद्रित झाली तर आम्ही स्त्रिया कांही ती कमी गाजवूं असें मुळींच नव्हे. ''

काव्यांतील एक उदाहरण —

अशा स्थितींत देवदत्त आणि भानुमती यांच्यांत मनस्वी अंतर असल्यामुळे आणि समाजाचा आजपर्यंतचा पांढरपेशा पुरुषाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन बनलेला असल्यामुळे भानुमतीच्या मोठेपणाचा परिणाम देवदत्ताला कमी लेखण्यांत होत होता, आणि यांत त्याच्या मनाच्या व्यथेचें मूळ होतें हें भानुमतीने ओळखावयास हवें होतें. स्त्रियांच्या ठिकाणीं फार प्रेम असतें; त्यांना आपल्या पतीच्या गौरवांत स्वतःचा गौरव वाटतो, यांत पांढरपेशा स्त्रीचा अगतिकपणा वगळला तर कितपत तथ्य आहे ? काव्यांतील उदाहरण द्यावयाचें तर कवि निशिगंध (आता जाहीरपणें सांगावयास हरकत नाही की कवि निशिगंध म्हणजे प्राध्यापक रा. श्री. जोग) यांच्या निशागीत या संग्रहांतील ' नुसतें प्रेम ' या कवितेची नायिका

'' प्रेम कसें माझ्यावरती, असणें आहे शक्य
थोर तुम्ही – अज्ञानी मी होइल कैसें ऐक्य ? ''

अशा तीव्र शब्दांनी आपणा दोघामधील अंतर किती असह्य होतें हें स्पष्ट करते. निव्वळ प्रेमाच्या बळावर हें अंतर भरून निघणें शक्य नाही आणि म्हणून आपलें उभयतांचें जीवन सुखी व्हावयाचें नाही हा तिचा आंतडें तोडून व्यक्त झालेला प्रत्यय,

आणि मला सुद्धा आली हृदयाची मम शंका
'' पुरेल का आधार मला प्रेमाचा या एका ? ''

अशा रीतीनें नायकालाही खेदाने मान्य करावा लागतो. आमच्या पिढींतील स्त्री-पुरुषांमधील अंतराबद्दलचें हें एक विदारक प्रातिनिधिक उदाहरणच समजण्यास हरकत नाही. याच स्त्रीच्या तोंडीं त्या कवितेंतच याहून स्पष्ट प्रश्न पुढीलप्रमाणे घातला आहे,

— '' विचारितें मी कांही
खरें खरें सांगायचें । फसवायाचें नाही;
विद्येने, बुद्धीने वा । भिन्न अशा व्यक्तींचे
कधी तरी जडतिल कां हो । जीवा जीव अशांचे ''

आणि त्यावर तिचें समाधान करण्याच्या प्रयत्नाचें प्रकरण कवींनी नायकाच्या तोंडून असें वदविलें आहे :

रोख तुझा समजुनि वदलों । जातां मी निमिषैक
'' नाही कां (हरकत कसली ?) । तूं आणिक मी एक ? ''
स्तुति न परि झाली तुज ही । झाला मर्माघात
भिन्नपणा आपुल्यामधला । होई उलटा व्यक्त

न हो कमी शिक्षण म्हणुनी । तुजसी तितकें दुःख
असें मला जाणिव त्याची । वाटे म्हणुनि अधीक

आणि प्रत्यक्षांतील अनुभव —

तेव्हा, स्त्रिया मोकळ्या मनाने ही भिन्नता, हा कमीपणा पत्करून पुरुषांच्या गौरवांत सामील होत होत्या हें म्हणणें त्या काळच्या सुबुद्ध माणसांचा अनुभव पाहिला तर वस्तु-स्थितीला धरून नाही. प्रत्यक्षांतील उदाहरण पाहावयाचें तर मोठ्या अंमलदाराची पत्नी एखाद्या शाळेंत बक्षिसें वाटण्यासाठी येते तेव्हाची तिची होणारी केविलवाणी स्थिति लक्षांत घ्यावी. तिला स्वतःला भाषण तर धड करतां येत नाहीच, पण लिहून आणलेलें भाषण नीट वाचतांही येत नाही. आणि मग कोठून आपण या जंजाळांत सापडलों असें त्या बिचारीला होऊन जातें.

नाहीतर पुष्कळसे षष्ठ्यब्दपूर्ति समारंभ अलीकडे साजरे होतात ते पाहावे. अशा वेळीं पुरुषाच्या बरोबरीने खुर्चीवर अवघडून बसलेल्या स्त्रीचें चित्र डोळ्यांपुढे आणावें. आणि अशी ती स्त्री पुरुषाचा गौरव करण्यासाठी – त्याच्या गौरवांत आनंद मानण्यासाठी आलेली असते का, याचा विचार करावा. त्या बिचारीला स्वातंत्र्य असतें तर हजार हिरव्यांनी या अशा समारंभांत नवऱ्याच्या बरोबरीने भागीदार व्हायला ती कबूल झालीच नसती. तिची अगतिकता तिला तसें करायला लावते. कारण, नाही म्हणण्याचा तिला अधिकार नाहीं. नाहीपेक्षा चतुर प्रेक्षक-श्रोत्यांच्या नजरा आपल्या-कडे लागलेल्या आहेत हें न कळण्याइतकी कांही ती बिचारी खुळी नसते. तिला तो सोहळा खरें म्हणजे मनापासून नको असतो.

भारतीय स्त्रीला सुद्धा बाहुली होणें आवडत नाही —

डॉल्स हाऊसमधील नोरा ही तर हेल्मरपेक्षा संस्कृतीने किंवा आर्थिक दृष्ट्या कमी म्हणण्यासारखीही नव्हती. तरीही पतीच्या घरची एक त्याच्या लाडांत वाढण्यासाठी राहिलेली बाहुली होऊन राहणें हें तिलासुद्धा असह्य झालें आणि ती घरदार आणि मुलेंसुद्धा सोडून गेली. रांगणेकर म्हणतील, नोराचा युरपीअन चष्मा माझ्या भानुमतींत नाही. पण भारतीय भानुमतीसुद्धा पुरुषावर अहंकाराचा आरोप करून जात असतांना "ज्या घरांत स्त्रीला अडगळीएवढं देखील अस्तित्व नाही, ती स्त्री असल्या घरांत राहण्यापेक्षा घराबाहेर पडणंच जास्त आनंदाने पत्करील" असें निव्वळ स्वतःपुरतें नव्हे, तर समस्त स्त्रीवर्गाच्या वतीने म्हणते आहे. यांतच नवऱ्याच्या गौरवांत स्वतः केवळ खेळणें म्हणून, बाहुली म्हणून, शोभेची–नव्हे अडगळीची वस्तु म्हणून राहून भाग घेत राहण्यांत भारतीय स्त्रीलासुद्धा खरें समाधान वाटत नाही हें सत्य, स्वतःच्या अंतःकरणांतील खळबळ दाबून न ठेवतां येण्याइतकी प्रबळ झाल्यावर खुद्द भानुमतीला सुद्धा मान्य करावें लागल्याचा हा केवढा उद्बोधक पुरावा आहे!

देवदत्ताची व्यथा नेमकी हीच आहे —

आणि जी गोष्ट सहन करण्यापेक्षा घरसंसाराचा त्याग करणें न्यायाचें असें भानुमती मानते तीच गोष्ट सहन करण्याची पाळी आली असतांना देवदत्ताने मात्र त्याबद्दल तक्रार करूं नये आणि स्त्रियांचा तो तथाकथित भ्रामक उदारपणाचा दावा मान्य करून आपण तशा प्रकारचा उदारपणा दाखवावा असें तिनें म्हणावें हें कसें न्यायाचें होईल ! त्याची व्यथा तरी हींच आहे ना की, " एखाद्या शोभेच्या वस्तूपेक्षा माझं अस्तित्व जास्त महत्वाचं राहिलेलं नाही ? "

त्याच्यावर या व्यथेचें शल्य सोसण्याची पाळी यावी इतके तो आणि भानुमती यांच्यामध्यें फार मोठें अंतर निर्माण व्हावें आणि या त्याच्या करुणास्पद अवस्थेची नीटशी जाणीव भानुमतीला सुद्धा होऊं नये आणि त्याच्यावर नाही नाही ते तर्कतुष्ट आरोप करून तिने त्याला एकटें वणवण करायला सोडावें ही घटना देवदत्ताच्या जीवनांतली खरी दुर्दैवाची घटना आहे. कोणत्याही समाजांत जेथे पति आणि पत्नी यांच्यामध्ये इतकें महान अंतर – आर्थिक आणि सांस्कृतिक दोन्ही प्रकारचें – असेल तेथे संसार सुखाचा होणेंच शक्य नाही. आजपर्यंत भारतीय पांढरपेशांतील तीन पिढ्यांचीं कुटुंबें एकत्रित राहिलीं आणि म्हणून सुखी झालीं असें कोणाला म्हणावयाचें असेल तर खुशाल म्हणावें; स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व मुळीच न उरलेल्या एका मोठ्या स्त्रीसमाजाची ती एक अखंड आणि भयानक अशी करुण कहाणीच आहे. तीच करुण कहाणी उलट्या प्रकाराने भानुमती आणि देवदत्त यांच्या जीवनाची, त्यांनी एकत्र राहण्याचा प्रयत्न केला तरी व्हावयाची ही निर्विवाद गोष्ट आहे. एकत्र राहून, पुन्हा पूर्वीप्रमाणे समान पातळीवर येऊन दोघें गरीबीचा संसार करूं म्हणतील तरी तें आता तसें खरें शक्य नाही. कारण झाल्या घटनांचा ठसा दोघांच्याही मनावरचा पुसला जाणें दुर्घट काम आहे. एकमेकांच्या प्रेमाच्या जोरावर एकत्र राहण्याचा प्रयत्न तीं दोघें करतीलही. परंतु त्या एकत्र राहण्यांत देवदत्ताला तरी अखेर शोभेच्या वस्तूचें स्थानच पत्करून राहावें लागेल; किंवा भानुमतीला आपलें सगळें कर्तृत्व आणि सामर्थ्य कुजवून राहावें लागेल. यांतील कोणतीही एक अवस्था अस्वाभाविक आणि सुखपरिणामी न घडणारी आहे. हीच तर त्यांच्या जीवनांतील करुणतम गोष्ट होय.

देवदत्त एक चांगल्या करुण नायकाचा नमुना —

आणि म्हणून प्रस्तुत लेखकाला तरी देवदत्त हा एक चांगल्या करुण नायकाचा नमुना आहे असें वाटतें. अर्थात त्याला तसा बनविण्याचा हेतु रांगणेकरांचा नाही. संसारांत पतिपत्नी ह्या दोन सारख्याच योग्यतेच्या व्यक्ती आहेत हें मुख्यत्वेकरून ' मांडण्या 'साठी त्यांनी हें नाटक लिहिण्याचा चंग बांधला आहे. पण ते कांही साधक-बाधक प्रमाणांनी सजविलेला तर्कपुष्ट निबंध लिहावयाला बसले नव्हते. ते नाटक

लिहीत होते. आणि त्यांची तशी जागृत जाणीव असो वा नसो, एक रसरशीत संसार-चित्र त्यांच्या हातून उभारलें गेलें आणि पतिपत्नींमधील सारख्या योग्यतेच्या अभावा-मुळे दुर्दैवी ठरलेल्या एका निर्मळ मनाच्या तरुणाचें चित्र तयार होऊन आपणापुढे उभें राहिलें.

पुष्कळ प्रसंगीं अभिजात कलावंताचें हें असेंच होतें. कवि आणि नाटककार यांच्या भूमिकांमधील फरक श्री. रांगणेकर कितीही मोठा करून सांगोत, अखेर नाटक हेंही एक काव्यच आहे; आणि नाटककार जेव्हा आपल्यापुढे बसलेल्या असंख्य आणि भिन्न अभिरुचीच्या प्रेक्षक-श्रोत्यांकरिता म्हणून नाट्यरचना करतो म्हणून म्हणतो, त्याही वेळीं या सर्व असंख्य प्रेक्षकांशीं नाटककार आपला अगदी एकजीव करून घेतो आणि अशा त्या असंख्य श्रोत्यांचें मूर्तिमंत रूपच अशा आपलें समाधान करणें हेंच त्याचें साध्य होतें आणि त्यासाठीच त्याचा प्रयत्न होतो. म्हणजे तोही आपल्या नाट्यविषयांत रंगून जातो, स्वतःच एकाच वेळीं निर्माता आणि उपभोक्ता होतो आणि कदाचित त्याच्या जागृत मनाला उमजलें नसेल असें कांही तरी त्याच्या हातून होऊन जातें. रांगणेकर म्हणतात, फक्त नाटककाराच्या दोन डोळ्यांनी नाटक पाहण्याचा प्रसंग येणें हा नाटक-कंपनीवर मोठा दुर्धर प्रसंग होय. पण नाटक निर्माण होतांना निर्माण करणारा आणि निर्माण होत जाणारें पाहणारा असा एकरूप झालेला नाटककार हा दोन तर नव्हेच पण एका डोळ्यानेसुद्धा पाहत नसतो. किंबहुना असें कांही पाहिलें तो वेगळा राहिलेलाच नसतो. इतका तो आपल्या कलाकृतीशीं एकरूप होतो, तेव्हाच त्याच्या हातून रसरशीत कृति बाहेर पडते; पण ती कशी निर्माण होऊन बाहेर पडली हें सांगण्याची शक्यतासुद्धा जागृतावस्थेंत त्याला नसते; कित्येकदां तो स्वतःच उद्गारतो, "काय मींच हें सारें लिहिलें – निर्माण केलें?"

प्रकरण एकोणिसावें

राजा राम

प्रस्तुत लेखकाच्या वाचनांत कांही थोडींच संस्कृत नाटकें आलेलीं आहेत. त्यामध्ये करुणरसप्रधान नाटक फक्त भवभूतीचें उत्तररामचरित्रम् हेंच आढळांत आलें. शाकुंतलाच्या सहाव्या अंकांत थोडासा करुणरसाचा आश्रय कालिदासाने केल्यासारखा वाटतो. परंतु तें कांही त्याचें मुख्य साध्य नव्हतें. उत्तररामचरितामध्यें मात्र तिसऱ्या अंकाच्या शेवटीं तमसा म्हणते त्याप्रमाणे करुण हा एकच रस प्रामुख्याने भवभूतीने खेळविला आहे आणि बाकीचे रस जरी आहेत तरी ते करुणरसरूपी जळावर तरंगस्वरूप भिन्नता धारण करणारे आहेत. त्यांचा मूलाधार आणि खरें स्वरूप करुणाचेंच आहे. म्हणून भवभूतीच्या या नाटकाचा थोडातरी विचार केल्याशिवाय आपली ही चर्चा पुरी होणार नाही.

भविष्यसूचक प्रस्तावना —

उत्तररामचरितम् नाटकाची सुरुवात अयोध्येमध्ये राज्यारोहणसमारंभ वगैरे समाप्त झाल्यावर नगरी कांहीशी सामसूम झाल्यासारखी होते अशा वेळीं होतो. रामाच्या कौसल्यादि माता जावई श्रृष्यश्रृंग याच्याकडे वसिष्ठऋषीसहवर्तमान बारा वर्षेंपर्यंत चालणाऱ्या यज्ञासाठी म्हणून जातात. जनक राजाही जावयांकडील वनवासानंतरचे सर्व सोहळे संपवून विदेहनगरीला गेला होता. इकडे गर्भवती सीता त्यामुळे एकटे एकटे वाटून विमनस्क स्थितीमध्ये होती. त्यांतच डोहळे कठीण लागलेले होते. म्हणून राजधर्मस्थान सोडून राजा राम तिच्या मनाला थोडा विरंगुळा उत्पन्न करावा यासाठी आपल्या राहत्या घरीं गेला आहे, अशा प्रस्तावनेने नाटकाची सुरुवात होते. प्रस्तावनेंतच पुढच्या अतिकरुण अशा बनावाची सूचनाही करून ठेवली जाते. सामान्यतः लोकसमाज स्त्रियांच्या बाबतींत आणि भाषासाहित्याच्या बाबतींत दोषदर्शी – दुर्जन – असतो असें सूत्रधार नटाला उद्देशून जेव्हा म्हणतो तेव्हा नुसता दुर्जन नव्हे तर अतिदुर्जन असतो अशी पुस्ती नट जोडतो; कारण सीतेसारखी तेजस्वी स्त्री, तिचा दोष काय तर राक्षसाच्या घरीं राहावें लागलें; बरें त्याबद्दल अग्निपरीक्षाही झाली; तरी त्यावर विश्वास न ठेवून लोक जनकतनया सीतेवरसुद्धा अपवाद घेतात.

ही वार्ता रामराजाच्या कानावर गेल्यावर फार अनर्थ उद्भवेल अशी सूत्रधाराची भविष्यसूचक शंका; आणि त्यावर ऋषि आणि देव सर्व कांही भलेंच करतील असें नटाचें आश्वासन. हा या नाटकाचा मध्यवर्ती विषय आहे अशी सूचक प्रस्तावना होऊन पुढचा देखावा आपल्यापुढे उभा राहतो.

राम आणि सीता एका आसनावर बसलेलीं आहेत. आहिताग्नित्व आणि गृहस्थ-धर्मपालन या कारणांमुळे गुरुजनांना अनिच्छेनेच आपणांला सोडून जावें लागलें असें राम सीतेचें समाश्वासन करीत आहे. तर "हें मला कळत कां नाही! पण सुहृज्जनांचा वियोग संतापकारक होतोच" अशी आपली मनःस्थिति व्यक्त करून सीता जणू तिच्यावर ओढवूं घातलेल्या भावी बंधुजनवियोगाच्या महान संकटाची पूर्वसूचनाच देत आहे. आणि राम तिची ही पूर्वसूचना दृढच करीत आहे. कारण तो म्हणतो, "संसारांतील हे व्यवहार असेच मर्मच्छेदी असतात. म्हणूनच मनावर विजय मिळविणारे लोक या व्यवहारांची किळस मानतात. आणि सर्व कामनांचा त्याग करून अरण्यांत शांति प्राप्त करून घेतात."

लोकाराधनार्थ जानकीचासुद्धा त्याग —

अशीं बोलणीं चाललीं असतांना ऋष्यश्रृंगाच्या यज्ञस्थानापासून वसिष्ठ ऋषींचा रामाला निरोप घेऊन अष्टावक्र मुनि येतो की, "आम्ही इकडे जावयांच्या यज्ञांत गुंतून पडलों आहों. तूं बालवयी आहेस. राज्य नवीनच स्थापन झालेलें आहे; तेव्हा प्रजा-नुरंजनांत दक्ष राहा, त्यांतच यश आहे आणि त्यांतच तुझी परम संपदा आहे." या निरोपावर राम उत्तर देतो तेंही भविष्यसूचक आहे. "लोकांच्या आराधनेसाठी मला स्नेह, दयाशीलता, सुख यांचा, फार कशाला प्रत्यक्ष जानकीचासुद्धा त्याग करण्याची वेळ आली तरीसुद्धा मला वाईट वाटणार नाही."

यासाठी जानकीचा त्याग करण्याची पाळी त्याच्यावर जवळ जवळ ताबडतोबच यायची होती; पण "नाऽस्ति मे व्यथा" हा त्याचा बोल मात्र अगदी अयथार्थ ठरावयाचा होता.

या सुमारास लक्ष्मण आपण काढलेल्या रामचरित्राच्या चित्रांचें आल्बम सीतेच्या करमणुकीसाठी म्हणून घेऊन येतो. सीतेची अग्नींत शुद्धि केली तेथपर्यंतचा कथाभाग चित्रित केल्याचें लक्ष्मण सांगतो तेव्हा अग्निशुद्धीच्या स्मरणाने रामाला वेदना होतात. जन्मतः जी शुद्ध तिची शुद्धि काय करायची! परंतु जन्मभर सीतेच्या मागे हा प्रवाद लटकून राहणार याबद्दल रामाचें चित्त व्यथित होतें. तथापि तिकडे विशेष लक्ष न देतां सीता लक्ष्मणाला चित्रें दाखविण्याला सांगते. एकेक प्रसंग दाखवीत असतां कांही सुखाचे, कांही खेदाचे रंगपट रामसीतांच्या डोळ्यांपुढून सरकतात; मागच्या नाजुक आठ-वणी मनांत उठाण घेतात. पुढे सीताहरणामुळे दुःखित होऊन राम वणवण वनांत हिंडत असतांवेळचीं चित्रें पुढे येतात. त्या वेळीं पुन्हा एकदा सीतेला आपला रामाशीं वियोग झाल्याच्याच स्थितींत आपण आहोंत असा भ्रम होतो. रामाच्याही मनाची स्थिति सीताविरहाचा तो प्रसंग आठवून अत्यंत कष्टी होते आणि माल्यवान पर्वतावर येऊन पुढच्या हकिकतीचें दर्शन लक्ष्मण करविणार तोच 'नाही, आता मला हें पाहवत नाही; जणू कांही पुन्हा एकदा जानकीचा वियोग मला झाला आहे असें मला भासतें आहे"

असें म्हणून राम लक्ष्मणाला चित्रें दाखविणें थांबवायला सांगतो; सीतेलाही दमल्यासारखें होतें; आणि म्हणून लक्ष्मणाकडूनही तीच सूचना होऊन हा चित्रदर्शनाचा प्रसंग संपतो.

परंतु चित्रदर्शनामुळे डोहाळतुली सीतेच्या मनांत पुन्हा एकदा अरण्यांत जाऊन भागीरथीमध्ये स्नान करावें अशी इच्छा निर्माण होते. तेव्हा लक्ष्मणाला राम रथाची व्यवस्था करायला सांगतो. त्या वेळीं " आपण सुद्धा माझ्याबरोबर यायला हवें " असें सीता म्हणते. त्यावर " हें सांगायला का हवें ? असें तुझ्याशिवाय मला राहवेल कसें " या अर्थाचें उत्तर देऊन राम तिला त्याबद्दल, किती कठीण हृदय तुझें असा चिमटा घेतो.

लक्ष्मण रथाची तयारी करायला जातो. सीता व राम अशीं दोघेंच पुन्हा तेथे असतात. आधुनिकांनाही हेवा वाटावा इतकी त्यांची निर्भर आणि निर्मळ प्रेमाचीं भाषणें चालतात. आणि दमलेली व रामप्रेमाच्या आश्वासनाने सुखित झालेली सीता रामाच्या वक्षस्थळावरच डोकें टेकून निद्रिस्त होते.

वादळापूर्वीची शांतता —

केवढ्या मोठ्या वादळापूर्वीची ही शांतता होती ! दिवसाची वेळ असूनसुद्धा विश्रब्ध वृत्तीमुळे सीतेला गाढ झोप लागली होती ! त्या झोपेंतही तिला रामविरहाचेंच स्वप्न पडत होतें. आणि त्याच वेळीं इकडे तिच्याबद्दल समाजांत लोक कसा संशय घेऊन बोलतात ही गोष्ट रामचंद्राचा हेर त्याच्या कानांत येऊन सांगतो. दिव्य करायला लावून हा परगृहवास-दोषसंशय नाहीसा करण्याचा प्रयत्न केलेला असूनही दैवदुर्विपाकामुळे कुत्र्याचें विष उठावें त्याप्रमाणे तोच संशय उद्भूत झालेला पाहून रामाचें हृदय दुःखकंपित होतें. तो मूर्च्छित होतो. परंतु घराण्याचा आचार व वसिष्ठांचा उपदेश आठवून लोकाराधनाच्या पवित्र कर्तव्याचीही त्याला जाणीव होते. आणि इतक्या पवित्र सीतेवर आपल्याशीं संबंध आल्यामुळे लोकवार्तेचें हें काजळ चिकटावें याबद्दल राम स्वतःचा धिक्कार करतो. परंतु अखेर लोकाराधनकर्तव्याच्या जाणिवेचाच जय होतो " आणि सीतेला वनांत नेऊन तिचा त्याग करण्याबद्दलचा नवा राजा राम हुकूम देत आहे " असें हेरामार्फत लक्ष्मणाला कळविण्याचें काम – अतिबीभत्स आणि नृशंसाला शोभण्याजोगें काम असें ज्याचें स्वतः रामानेच वर्णन केलें आहे तें काम – रामचंद्र करतो.

पाषाणालाही पाझर फोडील अशी शोकव्यथा —

त्या वेळीं गद्यांत आणि त्याहूनही पद्यांत रामाने आपली शोकव्यथा जी व्यक्त केली आहे ती पाषाणालाही पाझर फोडील इतकी करुण आहे. मांसभक्षकांपुढे बळी टाकावा त्याप्रमाणे मी सीतेला टाकतों आहें – गर्भिणी आणि विश्रब्धपणें स्वतःच्या वक्षस्थळावर मान टाकून निजलेल्या सीतेला – याबद्दल राम स्वतःला दूषणें लावून घेतो. निद्रिस्त सीतेचे पाय आपल्या डोक्यावर धारण करून विलाप करतो. परंतु अखेर जनकाच्या आणि

रघूच्या कुळांचें संपूर्ण मंगल अशा सीतेचा निद्रिस्त अवस्थेमध्येच त्याग करून त्याला जावें लागतें. कारण त्याच क्षणीं राक्षसांच्या त्रासापासून जनसंरक्षणाची योजना करण्याचें राजकर्तव्यही त्याच्यापुढे अकस्मात येऊन उभें होतें.

त्यानंतर सीता जागी होते. अजूनही रामविरहाच्या स्वप्नांत ती गढलेली असते. जागी झाल्यावर राम जवळ नाही हें पाहून प्रथम ती संभ्रमित होते. पण नंतर आपण निद्रिस्त असतांच रामाने आपल्याला सोडून जावें याबद्दल तिला राग येतो; त्याच्यावर चांगलें रुसायचा ती बेत करते. तोच 'रथ तयार आहे' हा लक्ष्मणाचा निरोप येतो. आपल्या ठरलेल्या बेताप्रमाणेच हें घडतें आहे या भोळ्या भावनेने ती गर्भ-भारामुळे हळुहळू जाऊन रथांत बसते.

दुसऱ्या अंकांत जनस्थानांत पूर्वी राहत असतांना सीतेची सखी झालेली जन-स्थानवनदेवता वासंती आणि कार्यानुषंगाने तेथे आलेली तपस्विनी आत्रेयी यांचा संवाद आहे. त्यावरून सीतेच्या दोन मुलांना ते आईच्या दुधापासून सुटल्यानंतरपासून संभाळण्याची जबाबदारी वाल्मीकि ऋषींनी घेतल्यामुळे आणि रामचंद्रकथा काव्यांत ग्रथन करण्याचें कार्यही त्यांनी अंगावर घेतल्यामुळें आपला दूरस्थ आश्रम सोडून दक्षिण-भागांत त्यांनी प्रवास आरंभिला होता हें वृत्त आपल्याला विदित होतें. गोदावरी, पंचवटी इत्यादि स्थानांच्या साहचर्याने आत्रेयीला जणू सीतेच्याच, ती आता नांवालाच जिवंत असूनही, प्रत्यक्ष सहवासाचा अनुभव घेत आहोंत असें वाटतें.

त्यावरून आशंकित होऊन वासन्ती सीताकथा आत्रेयीकडून समजून घेते. अरुंधती, वसिष्ट, वृद्ध राण्या असतांना हें कसें घडलें याचा वासन्तीला विस्मय वाटतो. परंतु हे गुरुजन अयोध्येंत मुळी नव्हतेच. आणि आता बारा वर्षांनी ऋष्यशृंगाचें यज्ञसत्र संपल्यानंतरही ज्या अयोध्येंत सूनबाई नाही त्या अयोध्येंत जाण्याचें अरुंधतीसह सर्व वृद्ध स्त्रियांनी नाकारलें आणि आर्य वसिष्ठांनीही अयोध्येऐवजी वाल्मीकि ऋषींच्या आश्रमाचा मार्ग स्वीकारला.

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपे —

मग रामाची कथा काय? तर त्याने अश्वमेध यज्ञाचा आरंभ केला होता. म्हणजे त्याने लग्न केलें पुन्हा? पण वासन्तीची ही शंका फोल होती. सीतेची सुवर्णप्रतिमा करूनच रामाने काम चालविलें होतें. लोकाराधनासाठी अतिकठोरहृदय झालेल्या रामाची भावना इतकी मृदु-कोमळ होती. म्हणूनच वासन्तीच्या तोंडून शब्द निघतात,

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि।
लोकोत्तराणाम् चेतांसि को हि विज्ञातुमर्हति॥

अश्वमेधाचा अश्व घेऊन लक्ष्मणाचा पुत्र फिरत होता. परंतु रामचंद्राच्या नशिबीं मात्र पुन्हा दंडकारण्यनिवास आला होता. कारण शंबूक नामक कोणा शूद्राने तपाचरण

चालविलें होतें. हें अधर्माचरण झाल्याने एका ब्राह्मणाचा मुलगा रामराज्यांतसुद्धा अकालीं मरण पावला होता. त्यामुळे शंबूकाला शासन करण्यासाठी रामचंद्राला पुन्हा या भागांत संचार करण्यासाठी यावें लागलें होतें. एवढा भाग दुसऱ्या अंकाच्या शुद्ध विष्कंभकांत कथनरूपाने आपल्याला समजतो.

सीतात्यागाची टोचणी —

आणि प्रत्यक्ष घटना घडते ती रामाने शम्बूकाचा वध केल्याची. शम्बूकावर बाण टाकतांनासुद्धा रामाला सीतात्यागाची टोचणी किती लागली आहे हें अत्यंत चटका लावावा अशा रीतीने व्यक्त होतें. आपल्या उजव्या हाताला उद्देशून राम म्हणतो, "ब्राह्मणाचा मुलगा जगावा यासाठी बाबा तूं या शूद्र मुनीवर टाक बाण. तूं हात कुणाचा ? तर सीतेला अरण्यांत टाकून देण्याची चतुराई ज्याच्या ठिकाणीं अशा रामाचा. खुशाल मार तूं या मुनीला. तुझ्या ठिकाणीं करुणा कशी संभवेल बाबा !"

अशा खिन्न मनःस्थितींत असतांनाच दंडकारण्यांतल्या पूर्वस्मृति रामाच्या चित्तांत गर्दी करतात. जी पाहावी ती गोष्ट पूर्व आणि पूर्ण परिचयाची. त्याचे आणि सीतेचे किती धागेदोरे तेथल्या अखिल वस्तुजाताशीं जुळलेले. त्यामुळे खिन्न अशा रामचंद्राचा चित्तभ्रम आताच व्हायचा. परंतु तो आल्याची वार्ता, वध झाल्यावर दिव्यपुरुषत्व पावलेल्या शम्बूकाकडून अगस्ति ऋषींना कळते आणि त्यांचें आमंत्रण रामाला शम्बूकच परत येऊन पोचवितो. रामाला गुरुजनाची आज्ञा मानून जावें लागतें. परंतु असें करून आपण पंचवटीचा जणू अपराधच करीत आहोंत असें रामाला वाटून अल्पकाळपर्यंत माझा हा अपराध तूं क्षमा कर अशी क्षमा मागून राम अगस्ति आश्रमाकडे जातो.

अगस्ति आश्रमांतून परत जातांना राम पंचवटी भागाला पुन्हा भेट देणार हें निश्चित होतें. इतके त्याच्या आणि सीतेच्या जीवनाचे बंध तेथे जुळलेले होते. परंतु दीर्घकाळपर्यंत अतिशय शोक केल्यामुळे राम आता अति क्षीण झाला होता. त्या स्थितींत जनस्थानांतील पूर्वस्मृति डोळ्यापुढे नाचूं लागल्यावर त्याला संभ्रम होण्याची, मूर्छा येण्याची फारच भीति होती. आणि त्यांत कांही विपरीत होणार नाही असें कोणी सांगावें ? म्हणून अगस्तिपत्नी लोपामुद्रेने मुरला नदीला गोदावरीला निरोप सांगण्या-साठी पाठविलें होतें की, गोदावरीने सावध राहावें आणि रामाची अशी कष्टावस्था होईल तेव्हा त्याला संजीवनार्थ साहाय्य करावें.

रामाच्या संजीवनार्थ योजना —

लोपामुद्रेप्रमाणेच भागीरथी नदीलाही तीच आशंका होती. तिनेच सीता दुःखभरांत उडी घेत असतांना सीतेला स्वतःच्या तळाशीं नेऊन वाचविलें होतें. आणि आता सीतेच्या हस्तस्पर्शाने रामाला तात्काळ संजीवनी लाभेल या उद्देशाने सीतेला घेऊन

भागीरथी स्वतःच त्या ठिकाणीं आलेली होती. मात्र व्यवस्था अशी केली होती की, सीता वनदेवतांना सुद्धा दिसूं नये; मग ती माणसांना दिसणें तर त्याहून असंभवनीय. सीतेला जवळ कोणी साहाय्यार्थ असावें म्हणून तमसा नदीची योजना केलेली होती. येवढी प्रस्तावना तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीच्या शुद्ध विष्कंभकांतून होते आणि मूर्तिमंत करुण किंवा प्रत्यक्ष शरीर धारण केलेली विरहव्यवस्थाच जणू अशी सीता, अति दीर्घ शोकाने क्षान्त झालेली आणि इतरांना न दिसणारी अशी आपल्यासमक्ष रंगभूमीवर गोदावरीच्या अंतर्भागांतून म्हणून उपस्थित होते.

सीतेला अर्थात आपली जनस्थानांतील प्रिय सखी वनदेवता वासन्ती दिसत असते. रंगभूमीवर सीता आहे आणि आंतून वासन्तीचा स्वर तिच्या कानावर येतो. सीतेने वाढवून मोठा केलेला हत्तीचा छावा दुसऱ्या मत्त गजाच्या हल्ल्यांत सापडला आहे, असें वासन्ती म्हणत असते. तें ऐकून सीतेला रामाची अति आवेगाने आठवण येते आणि "आर्यपुत्र माझ्या मुलाला वाचवा हो" असे शब्द तिच्या तोंडांतून बाहेर पडतात. अजून हे शब्द मला सोडीत नाहींत या विचाराने तिला क्षोभ वाटतो आणि त्या आवेगांत ती मूर्च्छित होते. तमसा त्याच वेळीं तेथे येऊन तिला सावध करते तोच आंतून रामाचे स्मृतिनिर्भर विलापाचे स्वर सीतेला ऐकूं येऊं लागतात. त्यासरशी विव्हळ होऊन सीता पुन्हा मूर्च्छित होते. पुन्हा तिला तमसा सावध करते. परंतु पुन्हा रामाचा दुःखाभिभूत स्वर कानीं पडून सीता पुन्हा मूर्च्छित होते. राम असा दुःखतप्त होऊन जनस्थानांत भटकणार हेंच तर भागीरथीने हेरलेलें होतें. कारण मला मूर्च्छा आल्यासारखें होतें आहे असें राम म्हणत होता. सावध झाल्यावर सीतेला फार दुःख होतें की, आपल्या निमित्ताने रामाला मूर्च्छा यावी, त्याचा श्वासनिरोध व्हावा. परंतु अशा वेळीं उपयोगी पडण्यासाठीच तर सीतेने तेथे येण्याची व्यवस्था करण्यांत आलेली होती, याचें स्मरण तमसा सीतेला करून देते आणि सीतेच्या हस्तस्पर्शाने राम सावध होतो.

परिचित स्पर्श —

रामाला तो स्पर्श परिचित वाटतो. आपल्यावरचा राग विसरून सीता खरोखरीची तेथे आली नाही ना असें त्याच्या मनांत येते आणि तो रोखून पाहूं लागतो. आपण दिसूं शकत नाही हें सीता विसरते आणि आपल्याला पाहून राम रागावेल, त्याच्या जीवनांत आपण पुन्हा प्रवेश केल्याबद्दल तो आपल्याला दोष देईल या भयाने सीता व्याकुळ होते; तमसा मग तिला नीट भानावर आणते.

हा प्रिये जानकी, म्हणून राम हाका मारतो. ती इकडे तिकडे कोठे आहे का पाहतो. पण व्यर्थ. "तुझा तो स्नेहार्द्र शीतल प्रत्यक्ष स्पर्श अद्यापि मला आनंदित करीत आहे; पण तूं कोठे आहेस" असा तो शोक करूं लागतो. त्या वेळी आपल्याला त्याने अकारण टाकल्याचें शल्य हृदयांत असूनसुद्धा त्याचा तो प्रेमाविष्कार सीतेला आनंदित केल्यावांचून राहत नाही.

आणि त्याच वेळीं सीतेने वाढविलेल्या त्या हत्तीच्या छाव्याचें रक्षण करा असें सांगत वासन्ती तेथे प्रवेश करते. अर्थात तिलाही सीता दिसत नाही.

राम त्या हस्तिशावकाचें रक्षण करतो. तो एवढा मोठा झालेला पाहून सीतेला आनंदाचें भरतें येतें. 'हा एवढा मोठा झाला; कुशलव आता केवढे झाले असतील' असा उत्कंठाभरित विचारही सहजच तिच्या मनांत स्फुरतो. आणि "अशी मी दुर्दैवी; भर्त्याचाच नव्हे तर पुत्रांचाही विरह माझ्या कपाळीं" असें म्हणून सीता अति दुःखित होते.

इकडे वासन्ती रामाला आणखी पूर्वीच्या संबंधी वस्तु दाखवूं लागते. दाखवितां दाखवितां ती त्याला आश्रमाजवळ घेऊन येते. आश्रमाच्या बाजूच्या कदली वनांतील ती शिला वासन्ती रामाला दाखविते; तिच्यावर राम सीतेसह बसत असे, तेथे बसून सीता वनपशूंना गवत चारीत असे आणि हरिणें तेथून तिला सोडून जायला तयार नसत.

ती शिला पाहून मात्र रामाचा धीर सुटतो. आता आणखी कांही पाहणें अशक्य आहे असें म्हणून शोक करीत राम तेथेच बैठक घेतो. सीताही म्हणते, "वासन्ती, कशाला तूं हें सारें दाखविते आहेस ? तेंच तें हें सर्व आहे. परंतु मला दुर्भागिनीला हें सर्व असूनही नाही असेंच नाही का ? रामाविना सीता किंवा सीतेविना राम हें असें दैवाने कसें केलें ?" असें म्हणून शोकान्वित सीता एक क्षणभर तरी शिलास्थित रामाला पाहून घ्यावें, म्हणते.

देवा, तूं इतका कठोर कसा रे ? वासंतीचा दारुण प्रश्न —

इकडे भ्रमण बंद करून राम वासन्तीला म्हणतो आता येथे थांबूं या. बसल्यावर स्वाभाविकच वासन्ती रामाच्या घराकडील गोष्टी काढते. लक्ष्मणाचें कसें आहे म्हणून ती विचारते. परंतु सीतास्मरणामध्ये गुंग झालेल्या रामाला तिचा तो प्रश्न ऐकूंही येत नाही. त्यावर 'महाराज !' अशी हाक मारून वासन्ती पुन्हा तोच प्रश्न करते, तेव्हा तिच्या हाक मारण्यांत स्नेहाचा अभाव रामाला जाणवतो आणि सीतेचा वृत्तांत तिला कळलेला असला पाहिजे हें त्यावरून उमजून राम तिच्याशीं बोलूं लागतो. तेव्हा वासन्तीला दुःखावेग सहन न होऊन "देवा ! इतका कठोर तूं कसा रे !" असें म्हणून वासन्ती रडूं लागते. "तूं माझें सर्वस्व असें तूं तिला सांगत होतास; आणि तिलाच तूं कसें टाकलेंस ?" असें ती तळमळून विचारते आणि मूर्च्छित होते. स्वतःच्या करुण अवस्थेने भ्रांत झालेल्या रामावरच तिचें सांत्वन करण्याचा प्रसंग येतो. सावध झाल्यावर वासन्ती रामावर आणखीच कठोर शब्दप्रहार करते. तिने रामाला असें कठोर टाकून बोलूं नये असें सीतेला मात्र फार फार वाटत असतें.

"घोर वनामध्ये त्या बिचाऱ्या हरिणीची काय अवस्था झाली असेल याचा विचार तरी तुला आहे का ?" असें वासन्ती रामाला विचारते. त्यावर राम जेव्हा म्हणतो "नवजात मृणालतंतूसारखी अशी ती कायमची विलोप पावली असणार, याहून दुसरें

काय ? " तेव्हा सीता " नाही हो, ही मी येथे आहे " असें म्हणते. पण रामाला तें कसें समजणार ? म्हणून कोठें आहेस तूं सीते ? " असें आक्रंदन राम करूं लागतो.

सामान्य माणसाप्रमाणे रामाने रडावे हें सीतेला त्याही स्थितींत विचित्र वाटतें. परंतु हें रडणें रामाच्या आताच्या अवस्थेंत उपकारकच कसें आहे हें तमसा सीतेला पटवून देते.

रामाचा शोकावेग वाढतच जातो. त्याचें व्यक्तीकरण करणारे या ठिकाणचे श्लोक जगांतील कोणत्याही महान कवीला भूषणास्पद वाटावेत इतके अर्थगंभीर आणि करुण-रसपूरित आहेत. सीता गेल्यामुळे शून्य झालेल्या संसाराची बारा वर्षे उलटलीं. सीता नावालासुद्धा शिल्लक राहिली नाही. राम मात्र अजून जिवंत नाही असें झालें नाही, असें राम शोगावेगाने उद्गारतो.

जें दाखवावें त्यांतून सीतेचेंच स्मरण —

त्याचा तो आवेग पाहून उगीच आपण हा विषय काढला असें वासन्तीला वाटतें आणि त्याचें मन त्या विषयांतून दूर करण्याकरितां आणखी कांही परिचित स्थळें पाहूं या असें ती सुचविते. राम तिच्याबरोबर पुन्हा हिंडूं लागतो. पण तेथे अशी एकही वस्तु नाही की, जिच्यामुळे सीतेचें स्मरण झाल्याशिवाय राहील. त्यामुळे जें दाखवावें त्यांतून सीतेचें स्मरण व्हावेंच असें होऊं लागलें. आपल्या मंद भाग्याचा दुःसह आघात सहन न होऊन राम पुन्हा मूर्च्छित होतो; पुन्हा सीतेच्या स्पर्शानेच तो सावध होतो. हा स्पर्श त्याला इतका सुखद, इतका निकट, इतका हातीं लागलासा वाटला की, सावध होतांच तो " वासन्ती, आनंद आनंद – धन्य आहेस तूं " असें म्हणतो आणि कारण म्हणून सांगतो, " दुसरें काय कारण ! जानकी पुन्हा मिळाली ! "

" काय हे देवा ! कुठे आहे ती ? " वासन्ती विचारते.

आपल्याला तिचा पुन्हा स्पर्श होतो आहे अशा आविर्भावाने राम म्हणतो, " ही इथे समोरच आहे की ! "

रामाच्या नशिबांत झोप आहेच कोठे —

अरेरे ! केवढी करुण दुःखावस्था विचाऱ्याची ! वासन्ती तर त्याला " हें काय असें वेड्यासारखें बोलतोस आणि मला पुनःपुन्हा दुःखांत पाडतोस देवा " असें विचारते. पण राम म्हणतो, " वेड्यासारखें कसें ? जो हात विवाहसमयीं मीं धरला होता तोच तो मला स्पर्श करणारा, मला चिरपरिचित असलेला हात होता – तोच तो हात – हा बघ इथें आहे. " आणि मोहाने स्पर्शसुखसंवेदनेचा भरांत त्याच्या अति निकट सरकलेल्या सीतेचा हात राम हातांत धरतो. परंतु पुन्हा पाहूं लागतो तो कोणीच नाही. सीता नाही. त्याला ती दिसत नाही; वासन्तीलाही नाही. तेव्हा सीता येथे नसलीच पाहिजे; झालें तें सर्व स्वप्न असलें पाहिजे असें रामाला क्षणभर वाटतें.

अनुक्रमांक २६३७ वि: निघ्घु.....
क्रमांक १२१५ राजा राम नोंः दिः 33/3/६० ६०५

पण हें कसें शक्य आहे? कारण राम म्हणतो, रामाच्या नशिबांत झोप आहेच कोठे?

त्यानंतर वासन्ती आणखी कांही भाग रामाला दाखवूं पाहते. परंतु मनोरंजनाकरिता केलेला प्रत्येक प्रयत्न अखेर संतापालाच कारण व्हायचा असें होतें. आणि म्हणून पूर्वीच्या या स्मृति पुनर्दर्शनाने अधिकच कटु होतात, व सीतेचा माग तर कोठे आढळतच नाही यासाठी व आपल्या दर्शनाने सुहृज्जनांना आणखी दुःख तरी नको यासाठी, राम वासन्तीजवळ परत जाण्याची अनुज्ञा मागतो आणि म्हणतो, "सीत तर नाहीच. पण आमची अश्वमेध यज्ञांतील सहधर्मचारिणी तरी निदान आहे ना?" यामुळे साशंक होऊन "म्हणजे दुसरें लग्न केलेंत काय?" असें वासन्ती विचारते. तेव्हा, "नाही; सोन्याची प्रतिमा आहे" असें राम उत्तर देतो आणि सीतेच्या हृदयावरचा मोठा आशंकेचा भार उतरल्यासारखा होऊन ती म्हणते,

"आता त्यागावद्दलचें माझ्या मनांतलें शल्य पार पार निघून गेलें. जिचा आर्यपुत्र एवढा बहुमान ठेवतात ती किती धन्य!"

आणि मग "ही आत्मस्तुति होते बरें का?" असें म्हणून तमसा सीतेची थट्टा करते तेव्हा सीता लाजेने चूर होते आणि क्षणभर करुणाच्या गाढ पार्श्वभूमीवरच विनोदगर्भ शृंगाराची एक अतिसूक्ष्म लहरी तरळून जाते!

राम निघून जाऊं लागल्यावर सीतेचें मन पुन्हा जड होतें. तिचे पायच तेथून निघत नाहींत. दुरूनच रामाच्या पायांना ती अभिवादन करते आणि पुन्हा मूर्च्छित होते. याच वेळीं

एको रसः करुण एव निमित्तभेदा
द्विन्नः पृथक्पृथगिव श्रयते विवर्तान्।

हा भवभूतीचा करुण रससंभावनेचा श्लोक तमसेच्या तोंडून बाहेर पडतो. आणि वसिष्ठ मुनि सर्वांचें कल्याण करोत असा आशीर्वादही तमसा तिसऱ्या अंकाच्या शेवटीं देते.

चमत्कृतिपूर्ण नाट्यरचना—

असा हा अत्यंत नाट्यमय आणि करुणरसनिर्भर तिसरा अंक आहे. त्याच्यांतील चमत्कृतिपूर्ण नाट्यरचना रसनिर्मितीला फारच उपकारक आहे. रामाला सीता दिसूं नये; म्हणूनच तिच्याविषयीचा उत्कंठामय करुण शोक त्याने मोकळ्या मनाने करावा; आणि त्याच वेळीं सीतेचा शोक आणि रामाच्या शोकाबद्दलची तिची प्रतिक्रिया दोन्ही एकदम आम्हां प्रेक्षकांना पाहावयास मिळावी, ही योजना करुण रसाची गाढता संपादण्याच्या आणि वाढविण्याच्या दृष्टीनेही अत्यंत समुचित आणि उपकारक आहे. करुण रस हा तर या अंकाचा सर्वथा आत्माच आहे. परंतु त्यांतही विनोद, किंचित् विप्रलंभ शृंगार यांच्या अति तरल व सूक्ष्म लहरी भवभूतीने इतक्या लीलेने आणि कौशल्याने मिसळल्या आहेत की रसिकाचें मन आणि शरीर दोन्ही पुलकित व्हावींत. तसाच वत्सलाचाही अनुभव जातां जातां त्याने आणून दिला आहे.

अत्यंत यशस्वी करुणदर्शन —

असें असलें तरी करुणदर्शनाचीच अत्यंत यशस्वी प्रक्रिया या ठिकाणीं भवभूतीने साधली आहे. राजा लिअरमधील तुफानाच्या किंवा त्यानंतरच्या प्रवेशांत स्वतः शेक्सपीअरलाही लिअर राजाच्या करुण निर्वासनाने आपलें अंतःकरण इतकें हलवितां आलेलें नाही. संभाषणें आणि अभिनय या जोडगोळीचा मोठ्या कौशल्याने उपयोग करून आणि वनवासांतील मर्मबोधक आणि मर्मच्छेदक स्मृतिस्थळें मदतीला घेऊन, ज्याचें अंतकरण फूटून जणू त्याच्या ठिकऱ्या होत आहेत असा राम भवभूतीने आपल्या-पुढे आणि नाटकांतर्गत सीतेपुढे उभा केला आहे. आणि एकीकडे विरहदुःख; पुन्हा एकीकडे रामप्रेमाचें संपूर्ण आश्वासन तर आणखी पुन्हा एकीकडे आपल्याकरिता इतक्या महान अंतकरणाच्या महाभागाला इतके कष्ट सोसावें लागावेत याबद्दलची हळहळ; अशा नाना प्रकारच्या भावनांनी चोहोकडून खेचली जाणारी आणि त्यामुळे व्याकुळ होणारी नाजुक सीता त्याने किती नीहार कौशल्याने आपल्यापुढे उभी केली आहे.

हेंच त्याचें प्रामुख्याने साध्य असल्यामुळे रामाच्या बाकीच्या पराक्रमाचा वगैरे त्याने उल्लेखही केला नाही. अर्थात तसा उल्लेख करण्याचें त्याला कारणही नव्हतें; इतकी रामकथा विश्रुत होती हें तर खरेंच. परंतु रामाचें युद्धसमाप्तीनंतरचें चरित्रही लोक-विश्रुत नव्हतें असें थोडेंच आहे? परंतु तें कारुण्यमय चरित्र रंगवीत असतांना पूर्वीचे शौर्यपराक्रमादियुक्त चरित्र प्रत्यक्ष नाटकांत दाखविण्याची त्याला आवश्यकता आणि शक्यताही वाटली नाही हें नाट्यतंत्राच्या दृष्टीने विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.

रामाचाही दोष भवभूतीने दाखविला आहे —

रामाचा दोषलवसुद्धा दाखविणें रामभक्तीमुळे भवभूतीला शक्य नव्हतें. म्हणून झाल्या घटनेचा सर्व दोष त्याने दैवदुर्विपाकावर ढकलला आहे. तरीसुद्धा वासन्तीच्या तोंडून रामाचा कठोरपणा सूचित केल्यावांचून त्यालाही राहवलें नाही. स्वतः रामही आपल्या राक्षसीपणाची जाणीव व्यक्त करतो. लोकाराधन हें रामाचें एक कर्तव्य होतें खरेंच. परंतु त्यासाठी इतकें कठोर होऊन त्याने स्वतःचें, सीतेचें आणि तिच्या पोटीं येऊं घातलेल्या बालकांचेंही जीवन दुःखपूर्ण करून टाकलें यांत त्याचा व्यक्तिगत कांही दोष नव्हताच असें भवभूतिसुद्धा निःसंदिग्धपणे सांगत नाही. लक्ष्मणाला सुद्धा नवा राजा राम आज्ञा करीत आहे असा निरोप रामाला पाठवावा लागला. नाही तर कोणी सांगावें भावाचा हा अन्याय्य बेत त्याने धुडकावून लावला असता. रामाच्या वृद्ध माता आणि गुरुजन या वेळीं अयोध्येंत असते तर ही सीतात्यागाची घटना घडून आली नसती असेंही भवभूतीने ध्वनित केलें आहे. एवढेंच नव्हे तर बारा वर्षें होऊन गेल्यावर-सुद्धा जेथे सून नाही तेथें परत जाण्याचें वृद्ध माता नाकारतात आणि वसिष्ठ गुरु त्यांचेंच

अनुकरण करतात, यांत त्यांच्या दृष्टीने रामाचें हें कृत्य दूषणीयच होतें हें भवभूतीला ध्वनित करावयाचें आहेसें वाटतें.

व्यक्तिधर्म आणि राजधर्म यामधील विरोधांत रामजीवनाची दुर्दशा—

आणि दैवाला तरी दोष का द्यावा ? दोष द्यायचाच झाला तर ज्या लोकांचें आराधन करण्यासाठी रामाने हा दुर्धर कठोरपणा स्वीकारला त्या लोकांच्या दुर्जनत्वालाच तो दिला पाहिजे. आणि रामाच्या तोंडून भवभूतीने निःसंदिधपणें तसा तो दिलाही आहे. नट तर त्यांना अतिदुर्जन म्हणतो. अशा अति दुर्जन जनतेच्या मूर्खपणामुळे एक श्रेष्ठ पुरुष आणि त्याची श्रेष्ठतर आणि पवित्रतम पत्नी यांना इतका दीर्घ काळ कष्टांत काढावा लागला, वसिष्ठाची आणि आपल्या मातांची सहानुभूति सुद्धा रामाला गमवावी लागावी, त्याची झोप नाहीशी व्हावी, सीतेला पुत्रसहवासाच्या सुखाला अंतरावें लागावें आणि तोंड लपवून राहण्याचा तिच्यावर प्रसंग यावा यासारख्या करुण घटनांचा समुच्चय दुसरा कोणता असेल ? त्यामुळे रामचंद्राबद्दल आपलें मन अतिशय हळवें होऊन जातें. त्या वेळीं रावणावर जय मिळवितांवेळचा त्याचा पराक्रम किंवा पित्याच्या सुखासाठी त्याने केलेला त्याग या त्याच्या श्रेष्ठ गुणांची आठवण आपणाला होत नाही. तर त्याच्या करुणमय जीवनावरच आपलें चित्त खिळून राहतें. आणि अशा अति दुर्जन लोक-समाजाचें आराधन करीत राहण्यापेक्षा आपल्या व आपल्या पत्नीच्या निरागसतेवरच विसंबून राहणें रामाने अधिक योग्य मानावयास नको होतें का, अशी शंका आपल्याला व्याकुळ करते. पण तसें झालें नाही. रामाने दुर्जनांच्या आराधनेलाच कर्तव्य मानलें. व्यक्तिधर्म आणि राजधर्म यांच्या विरोधांत त्याने राजधर्माला मान तुकावली. हें व्हायला नको होतें; पण तें टळलें नाही. म्हणून रामसीतांच्या युद्धोत्तर जीवनाची ही दुर्दशा ! आणि ती रंगविण्यासाठी भवभूतीचें हें श्रेष्ठ प्रभावी करुण नाटक !

पण येथेच भवभूति थांबला नाहीं. आणखी चार अंक त्याने पुढें लिहिले. त्यामध्यें कारुण्याच्याच पार्श्वभूमीवर लवकुशांचा पराक्रम आपल्याला पाहायला मिळतो. आणि लवकुशांबरोबरच्या संभाषणांतून पूर्वस्मृति उसळून पुन्हा एकदा रामाचा शोकोद्रेक होतो. त्याच वेळी अरुन्धतीसहित वसिष्ठ आणि रामाच्या सर्व माता आल्याची वार्ता ऐकून तर त्यांना आता तोंडही कसें दाखवावें असा खुद्द रामाला प्रश्न पडतो. त्याऐवजी माझे शतशः तुकडे कां झाले नाहीत असें तो तळमळून म्हणतो. परंतु खरोखरच राम इतका कठोर – दगड – आहे की त्याला यामध्येही कांही कठीण नाही, असा तो स्वतःला बोलही लावून घेतो. तोच आंतून घोषणा होते की, रामाची ही कठीण अवस्था पाहून रामाच्या वृद्ध माता मूर्च्छित झाल्या; आणि मग रामाच्या करुणमय अवस्थेचें माप जणू भरून वाहूं लागलें असें वाटूं लागतें.

पण एवढ्यानेही भवभूतीचें समाधान नाही. सातव्या अंकांत त्याने उपनाटकाचा प्रबंध उभा केला आहे. आणि रामादि सर्व मंडळीच्या समोर "दिवस भरत आलेल्या

सीतेचा त्याग, तिने गंगेंत उडी घेणे, लवकुशांचा जन्म, पृथ्वी आणि गंगा यांनीं तिचें व त्याचें संरक्षण करणें, वाल्मीकीने त्यांचें संवर्धन करणें हे सर्व प्रसंग त्या उपनाटकांत दाखवावयाचे असतात. प्रत्यक्षांत या सर्वांची सूचनाच फक्त आहे. सूत्रधार येऊन आम्ही पावन वचनामृतांनी भरलेलें, करुण आणि अद्‌भुत रसांनी ओथंबलेलें असें नाटक दाखवितों तें पाहावें अशी विनंति करतो आणि एकदम आंतून सीतेचा आवाज कानावर येतो. "आर्यपुत्र, कुमार लक्ष्मणा, एकाकी, संरक्षणाला कोणी नसलेली, प्रसूतिसमय जवळ आल्यामुळे पोटांत वेदना उत्पन्न होऊं लागलेली, निराश झालेली, अशा मला हीं हिंस्र श्वापदें खाऊं पाहत आहेत रे! म्हणून दुर्दैवी अशी मी भागीरथीमध्ये आता उडी घेतें."

हा तेवढा प्रसंग आपल्यापुढे ध्वनित होतो. आणि हीं पाहा राम राजाने टाकलेली सीता भागीरथीमध्ये उडी घेत आहे असें म्हणून सूत्रधार जातो.

परंतु नाटक पाहत आहोंत हें राम विसरून जातो आणि आवेगाने तो ओरडतो, "देवी, लक्ष्मणाकडे तरी पाहा!" अभिप्राय असा की मी अपराधी म्हणून तुझ्या दृष्टीने त्याज्य असलों तरी या लक्ष्मणावर तूं पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम केलें आहेस; त्याच्यासाठी तरी गंगेंत उडी घेऊं नकोस!"

विकलहृदय रामाला मग लक्ष्मणाने सांगावें लागतें की, अहो हें नाटक आहे; ऋषीनी लिहिलेलें हें नाटक स्वस्थ चित्ताने पाहिलें पाहिजे. परंतु राम, सीतेवर हा आपल्यामुळें ओढवलेला दुःखद विपाक आहे असा स्वतःला बोल लावून घेतो आणि "हो, आहेच मी वज्रासारखा दगड हृदयाचा. हा पाहतों नाटक" असें म्हणून आपली निराशा आणि हृदयव्यथा दोन्ही व्यक्त करतो.

नंतर नाटक सुरू होतें. त्यांतही करुण रसाचा प्रकर्ष साधला जातो. दोघे मुलगे रामाकडे ठेवून शेवटीं सीता पृथ्वीबरोबर अंतार्हित होते. राम कांही तिचा – त्या उपनाटकांत – मोकळ्या मनाने स्वीकार करीत नाही; हा कथाभाग पाहून रामाचें अंतःकरण दुभंगतें आणि "शेवटीं तुझा अंत लोकान्तरांत जाण्यांत झाला" असें म्हणून राम मूर्च्छित होतो.

वास्तविक नाटक येथेच संपावयास हवें होतें. इतिहासकथा पण तशीच आहे. परंतु वाल्मीकि, कुशलव, अरुन्धती वगैरेंना तेथे आणून भवभूति त्यांच्या हस्तें रामसीतांचा संगम घडवून आणतो, अश्वमेध यज्ञांत सीतेच्या प्रतिमेच्या जागीं प्रत्यक्ष सीतेची प्रस्तावना करायला गुरुजनांकरवी रामाला सांगतो. अशा तऱ्हेचा गोड शेवट भवभूतीने केलेला आहे तो इतिहासाशीं आणि त्याने आतापर्यंत रचलेल्या कथावस्तूंशींही विसंगत आहे.

म्हणूनच "निरंकुशः कवयः!"

प्रकरण विसावें

जयंत – लीला

कै. राम गणेश गडकरी यांच्या प्रेमसंन्यास नाटकामधील या दोन जोडपात्रांच्या स्वभावचित्रणासंबंधी या प्रकरणांत विचार करावयाचा आहे. हें नाटक पुनर्विवाहाचें मंडन करण्याकरितां म्हणून लिहिलें गेलें, परंतु कोणत्या तरी भीतीला बळी पडून गडकरी यांनी जयंत-लीलांचा त्यामध्ये पुनर्विवाह लावण्याचें टाळलें अशी टीका प्रस्तावनाकार प्रा. भाटे यांनी आधीपासूनच केलेली असल्यामुळे जयंत-लीलांच्या स्वभावचित्रणाचा मागोवा घेत जात असतांना या टीकेचा धागा डोळ्यांपुढे राहून पाहिलें जाणें कांहीसें अपरिहार्य आहे.

नाटकाच्या सुरुवातीच्या प्रवेशांत बाबासाहेब आणि तात्यासाहेब हे दोघे बंधु स्टेशनवर गाडीची वाट पाहत असतांना कांही घरगुती बोलत बसलेले आपण पाहतों. बाबासाहेब बरेचसे वडील आणि नव्या सुधारकी मतांबद्दल अनुकूलता नसणारे आहेत, तर तात्यासाहेब हे धाकटे बंधु सुधारणेला पूर्ण अनुकूल असलेले गृहस्थ आहेत. व्यवसायनिमित्ताने बाबासाहेबांनी आपल्या दोघी तरुण मुली आपल्या सुधारक भावाच्या घरीं ठेवल्या आहेत. तेथे आधीच वातावरण सुधारकी आणि शिवाय आता तेथे दोन तरुण पुरुष यावयाचे होते; जयंत आणि त्याचा मित्र विद्याधर. यामुळे बाबासाहेबांना काळजी वाटत होती की, या तरुण मुलींच्या हातून एखादे वेळीं कांही अनाचार होईल; अनाचार म्हणजे पुनर्विवाह होईल; जो झाला तर चांगलें असें तात्यासाहेबांना वाटत होतें तर जो झाला असता तर बाबासाहेबांना वाईट वाटलें असतें.

जयंताची पहिली ओळख —

तात्यासाहेबांच्या घरीं जमणारीं सगळींच माणसें सुधारकी वळणाचीं. त्यामुळे सुधारणा आणि पुनर्विवाह याशिवाय तेथे विषयच निघणार नाही, ही भीति तर बाबासाहेबांना वाटतच होती. परंतु त्यांत भर जयंताच्या स्वभावाबद्दलची पडली होती. त्यांच्या मतें, "तो शहाणा, समजूतदार असला तरी मोठा उतावळा, सहृदय आणि थोडासा अविचारी आहे. तो केव्हा काय बोलेल याचा नेम नाहीं", असा जयंताचा स्वभाव आहे.

ही आपली व जयंताची पहिली ओळख. उन्मेखून नाटककाराने त्याच्या उतावळ्या आणि अविचारी स्वभावाचें दिग्दर्शन आपल्याला इतक्या अगदी सुरुवातीलाच केलेलें आहे हें ध्यानांत घेऊनच आपल्याला जयंताच्या पुढील चरित्राकडे पाहयला हवें. तो त्याचा स्वभाव आणि ज्या सुधारणा जयंतादि सर्व तरुण मंडळींना प्रिय आणि ज्यांना

तात्यासाहेबांची अनुकूलता त्या सुधारणांना लीलाचे वडील बाबासाहेब यांचा सक्त विरोध, या वातावरणांत नाटककाराने आपल्याला पहिल्याच प्रवेशांत आणून सोडलें आहे.

झगड्याची सूचना —

यापाठोपाठच जयंताविषयी असूया बाळगणारा कमलाकर आपल्यापुढे खडा होतो. बाबासाहेबांची ब्याद घरांतून बाहेर जाईल आणि मग मिळणाऱ्या मोकळ्या वातावरणांत लीला, सुशीला, वीणा द्रुमन इत्यादि तरुणींच्यावर स्वतःची मोहनी टाकायला थोडीशी मोकळीक मिळेल या आशेंत तो आहे तोच, " ज्याच्यावर त्या घरांतील साऱ्या छबेल्या आजन्म फिदा झालेला दिसतात " असा ज्याच्याबद्दल कमलाकराचा राग होता तो जयंत घरीं येतो. आणि " हा कृष्ण आल्यामुळे नारदाप्रमाणे कृष्णविरहित गोपी धुंडाळण्याचा प्रयत्न निष्फळ होऊन आपल्याला कलागतीवर भिस्त ठेवावी लागणार " असा कमलाकरचा पुढचा आडाखा आपल्या नजरेसमोर येतो. आणि हें स्वच्छ ठरतें कीं, उतावीळ स्वभावाचा जयंत आणि त्याच्याशीं सामना खेळायला सिद्ध झालेला कमलाकर यांच्यांतील झगड्याचें हें नाटक आहे.

याच्या पुढचा प्रवेश विसरभोळा गोकुळ व त्याची तोंडाळ बायको मथुरा यांचा आहे. त्यामधून नाटकाच्या कथावस्तूशीं संबंध आपणाला एवढाच मिळतो की, तात्यासाहेबांकडे बरीच पाहुणेमंडळी जमायची आहे; त्यांत तरुण स्त्रियांचा घोळका मोठा आहे आणि त्यांच्यांत बसून वेडेचार करायला सापडतात म्हणूनच गोकुळ उठल्या सुटल्या देशमुखांकडे जायला उत्सुक असला पाहिजे अशी गोकुळच्या पत्नीची तक्रार आहे. कारण, मथुरेच्या मतें देशमुखांकडच्या स्त्रिया संशयित वर्तनाच्या साळकाया आहेत आणि त्यांच्यामध्ये विलायती वसंतरावाची विधवा बहीण जी द्रुमन आहे तिला तर लग्न न होतांच गर्भ राहून कांही दिवस लोटलेले आहेत, अशी मथुरेची खात्रीची माहिती आहे.

द्रुमनसंबंधीची ही वार्ता मनांत घोळत असतांनाच पुढचा तिसरा प्रवेश आपणापुढे उभा होतो. त्यामध्ये लीला आणि सुशीला या दोघी विधवा बहिणी आपल्याला भेटतात. सुशीला मोठी आणि लीला लहान आहे. स्वतःच्या अभागी विधवा स्थितीबद्दलच स्वाभाविक त्यांचें बोलणें सुरू असतें. " तांब्यांच्या कवितेंतील विधवेप्रमाणे सौभाग्याच्या स्वप्नांतून जागे होऊन भयंकर वैधव्याची जागृति भोगीत बसायचें त्यापेक्षा आपलें हें वैधव्याचें स्वप्न संपून ईशज्योतींत एकरूप झालेल्या पतीबरोबर अखंड सौभाग्याची तेजोमय जागृति अनुभवणें कितीतरी चांगलें नाही का ? " हा सुशीलेचा तत्त्वविचार लीलेला अत्यंत आदरणीय वाटला तरी तिच्या तो आवांक्याबाहेरचा असतो. तिला आपल्या एकटेपणाचें दुःख अतिशय असह्य वाटतें. तिच्यावर अपत्यवत प्रेम करणाऱ्या सुशीलाताईचा अधार होता म्हणून जीवन तिला थोडेंतरी सह्य होत होतें. नाहीपेक्षा तिला जगणेंच अशक्य झालें असतें. " दुःखमय स्थितींतून परदुःखाची जाणीव झाल्याने खरें आपलेपण सर्वोठायी दिसून येतें आणि नसत्या आपलेपणाचा विसर पडतो "

हाही सर्वात्मभावी विचार सुशीलेप्रमाणे आत्मसात करणें लीलेला सर्वथा अशक्य असतें. उलट तिच्या विचारशक्तीचा उपयोग स्वतःच्या दुःखाची तीव्रता अधिक भासण्याकडेच तिला होतो. म्हणूनच सुशीला तिला म्हणते,

" तुझ्यासारखीं अतिकोमल मनाचीं माणसें प्रेमाच्या आधारावांचून जिवंत राह्यचीं नाहींत. "

अशी आपली लीलेशीं ओळख होते. तिच्या विचारी बहिणीच्या मताने सुद्धा लीलेने पुनर्विवाह करून प्रेमाचा आधार मिळवावा असें आहे. त्याशिवाय नाजुक मनाची लीला जिवंतच राहूं शकणार नाही इतकी ती कोमल – म्हणजेच दुबळी – आहे. असें हें प्रेम लीलालाही हवें आहे. पण ज्याचें प्रेम तिला हवें आहे त्याचें प्रेम तिला मिळणें जवळ जवळ अशक्य आहे हें सुशीलेला माहीत आहे. प्रेमाचा विचार काढतांच लीलेला जयंताची आठवण होते. आणि म्हणूनच सुशीला स्वतःशींच चरकून म्हणते " देवा या निराशेच्या प्रेमाचा खेळ कसा संपविणार आहेस कोणाला ठाऊक ! "

प्रेमसंन्यास नाटक म्हणजे निराशेच्या प्रेमाचा खेळ —

अशा रीतीने नाटककाराने आपल्या नाटकाचें मुख्य बीज आणि त्याचें नांवही सुशीलेच्या तोंडून येथे स्पष्ट स्पष्ट सांगितलें आहे. हें नाटक म्हणजे निराशेच्या प्रेमाचा खेळ आहे. त्याच दृष्टीने यापुढच्या घटना आपण पाहत राहिलें पाहिजे. पुनर्विवाहाचें मंडन करण्यासाठी तात्त्विक प्रतिपादन म्हणून त्याकडे पाहण्यांत नाटककारावर अन्याय करण्यासारखें आहे.

कारण, सुशीला आणि लीला यांचा हा संवाद चालू असतांनाच जयंत, विद्याधर व कमलाकर, वीणा, वसंत, द्रुमन ही मंडळी येऊन दाखल होतात. आणि मग त्यांच्यामध्ये सर्वांच्या ओळखी पाळखी झाल्यावर पुनर्विवाहाबद्दलची साधकबाधक चर्चा पुष्कळच होतांना आपण पाहतों. सुशीलेच्याच पुनर्विवाहाचा प्रश्न निघतो. परंतु सुशीलेला स्वतःलाच पुनर्विवाहाची कल्पना संमत नसल्याचें आपण पाहतों. सुशीलेला पुनर्विवाहाची सूचना करणारा श्रीमंत पद्माकर हा दुर्वर्तनी असल्यामुळे हा पुनर्विवाह जयंतासारख्या पुनर्विवाहवादी तरुणालाही मान्य नाही हेंही आपण ऐकतों. परंतु या सगळ्या संवादप्रसंगीं पुनर्विवाहापेक्षा नाटककाराचें खरें लक्ष जयंतावरच कसें खिळून राहिलें आहे आणि लीला – जयंतांच्या निराशेच्या प्रेमाचा खेळच दाखविण्याचें त्याचें प्रमुख साध्य कसें आहे हें त्याच प्रवेशांत हा वादविवाद आटोपून सर्व तरुण मंडळी जात असतांना मागे राहिलेल्या जयंताशीं गाठ त्याच्या लग्नाच्या बायकोची – मनोरमेची – पडते त्या वेळीं आपल्या ठसठशीतपणाने लक्षांत येतें.

स्वाभाविकच मनोरमेला जयंताने आपल्याकडे दुर्लक्ष करून इतर स्त्रियांच्या घोळक्यांत रममाण होणें हें आवडत नाही. त्याबद्दलच कठोरपणाने बोलून ती त्याची अक्कलच बाहेर काढते. तेव्हा जयंत स्वतःच जे उद्गार काढतो ते असे,

"अरेरे ! आनंदाच्या भरांत इतका वेळ माझ्या दुर्दैवाची मला आठवण झाली नव्हती ! क्षणभरच कां होईना मी स्वतःला विसरलों होतों. पण दैवाला तें कोठून रुचणार ! "

खडतर दैव —

असें खडतर दैव होतें जयंताचें आणि लीलेचें. पुनर्विवाहाला लीलेच्या वडिलांची संमति नव्हती हें तर एक मोठें विघ्न होतेंच; परंतु त्याहीपेक्षा खरें विघ्न म्हणजे जयंताचें आधीच लग्न झालें होतें. आणि म्हणून लीलेच्या प्रेमाचा खेळ निराशेचा होणार ही उघड गोष्ट होती.

जयंताचें दुर्दैव दुहेरी होतें. एक तर बाळपणापासूनची त्याची प्रेमिका त्याला दुरावली होती. त्या दोघांचा संगम होण्याची शक्यता त्याच्या स्वतःच्या लग्नामुळे, इतर परिस्थिति आणि माणसें अनुकूल असती तरीही संपली होती. आणि जी पत्नी त्याला मिळाली होती ती काव्यकल्पनांशीं संपूर्ण अपरिचित असून "लग्नाचा आणि प्रेमाचा काय संबंध ?" असा खडखडीत प्रश्न विचारण्याइतकी निव्वळ व्यवहारी स्त्री होती. जयंतासारख्या काव्यतरल स्वभावाच्या माणसाचा आणि तिचा एकत्र संसार सुखाचा होण्याची शक्यता फारच असंभवनीय आणि अस्वाभाविक होती.

शुद्ध प्रेमाने, निष्काम बुद्धीने स्त्रीपुरुषांनी एकमेकांशीं बोलणें चालणें ठेवणें जयंताला अशक्य वाटत नाही. एका दुःखी जीवाने – म्हणजे त्याच्यासारख्या – दुसऱ्या दुःखी जीवाला – म्हणजे लीलेसारख्या विधवांना – धीर देऊन समाधान देण्यांत कांही चुकतें किंवा धोक्याचें आहे असें त्याला वाटत नाही. पण यापैकी कशावरही मनोरमेचा विश्वास नाही. तिच्या मतें जयंताचा या स्त्रियांशीं, विशेषतः लीलेशीं, कांहीतरी आगळाच संबंध आहे आणि म्हणून स्त्रीस्वभावानुरुप 'नवऱ्याला राजरोस पकडण्याचाच' विचार तिच्या मनांत उद्भवून बळावणें स्वाभाविक होतें.

काव्यसृष्टि व्यवहारांत उतरायचीच नाही का ? —

आणि ती गेल्यावर जयंताला आपलें चित्त स्थिर करणें फार बिकट होतें. लहानपणापासूनच्या लीलेविषयीच्या काव्यमय प्रेमाच्या स्मृतीने त्याचें अंतःकरण कंपित होतें. पण त्याच वेळीं त्याची न्यायबुद्धि लीलेविषयीं बंधुप्रेमाशिवाय इतर भावना आपण मनांत बाळगणें उचित नाही हें त्याला बजावीत असते. आणि म्हणून "अद्भुतरम्य काव्यसृष्टि जर व्यवहाराच्या वस्तुस्थितींत कधीच उतरण्यासारखी नसेल तर प्रतिभाशाली कवि निर्माण करून त्यांच्या आशापूर्ण भविष्यचित्रांनी तरुणांना नसता मोह कां पाडतोस ?" असा तो देवाला दोष देतो.

अशा दोलायमान मनःस्थितींत तो असतांनाच इतर मंडळींतून फुटून निघून लीला जयंताकडे परत येते. त्याचें मन स्वस्थ नाही हें तिने हेरलें होतें. आणि म्हणूनच

ती मुद्दाम त्याच्याकडे आली होती. आपल्या मनांत अस्वस्थता उत्पन्न होण्यासारखें आपल्याला दुःखच कांही नाही हें जयंताचें प्रतिपादणें ती मुळीच मान्य करीत नाही. त्याने सांगितले नाही तरी त्याचें दुःख आपल्याला त्याच्या चेहऱ्यावरून अगदी स्पष्ट दिसतें असें म्हणून ती अशा कांही भेदक नजरेने जयंताकडे पाहत राहते की, जयंताला त्या दृष्टींतला संपूर्ण बोलका प्रेमभर अतीव जाणवतो; त्याला तिच्या नजरेला नजर देण्याचा धीर होत नाही. आपल्या मनावरचा ताबा सुटूं देतां उपयोगी नाही, म्हणून तो दुसरीकडे नजर फिरवितो तोच त्याला हा प्रसंग मत्सरी नजरेने पाहत उभी असलेली मनोरमा आढळून येते.

निराशेच्या प्रेमाच्या खेळाची जय्यत तयारी —

निराशेच्या प्रेमाच्या खेळाचा मालमसाला व रंग हा असा आपल्यापुढे उभा होतो. उतावळा, अविचारी आणि अद्‌भुतरम्य काव्यसृष्टींत तरंगत राहून कठोर व्यवहारापासून पळूं पाहणारा जयंत; त्याला जखडून राहिलेली त्याची रुक्ष आणि अतिव्यवहारी पत्नी मनोरमा; वैधव्यदुःखांत होरपळून निघणारी, जयंताविषयीच्या प्रेमाशेने तळमळणारी, प्रेमाच्या आसऱ्याशिवाय जिवंत राहण्यास असमर्थ अशा अत्यंत नाजुक स्वभावाची लीला; पुनर्विवाहास विरोध करणारा जुना समाज; आणि आपल्या स्वार्थासाठी या सगळ्या परिस्थितीचा उपयोग करून प्रत्येकास गोत्यांत आणूं पाहणारा कमलाकर ! या कमलाकरानेच चवथ्या प्रवेशांतील आपल्या प्रदीर्घ स्वगत भाषणांत या सर्व परिस्थितीची मीमांसा मोठ्या कुशाग्र बुद्धीला शोभेशी केली आहे आणि साऱ्या मानवी कुटुंबाच्या सुखाची धुळधाण करण्याचें एकमेव कारण लग्नबंधनाची कल्पना होय असा निष्कर्ष त्याने आपल्या खलस्वभावानुरूप शोधून काढला आहे. थोडाफार तो स्वतःही या लग्नबंधनाच्या ओढीने, हाताशीं आलेलें स्त्रीसहवाससुख दूर लोटण्याच्या मोहांत सापडत नाही असें नाही. पण हा मोह झुगारून देण्याच्या प्रयत्नांतील पहिला धडा त्याने द्रुमनच्या बाबतींत गिरविलेला आहे; आणि थोडासा निर्ढावून आता तो कानमंत्र देतो आहे की, जगांत जीव नुसता जड होऊन निभणार नाही. प्रसंगीं दुसऱ्याचा जीव घेऊन मग स्वतःचाही जीव घेऊन पळत सुटण्याची तयारी असली पाहिजे. आणि हें कशासाठी तर जयंताला लीलेच्या नादांतून सोडविण्यासाठी. त्यासाठी लीला आणि जयंत यांच्यामध्ये चोरटें प्रेम असल्याचें विष कमलाकर मनोरमेच्या मनामध्ये भरवितो आणि जयंताला दुःखी करून स्वतःला सुखी करण्याच्या मार्गांत एक पाऊल टाकल्याचें समाधान त्याला वाटतें.

पांचव्या प्रवेशांत लीला नदीतीरावर स्वतःच्या कवितेच्या ओळी वाचीत बसली आहे. उत्तररामचरितांतील सर्व भाव तिच्या हातून कवितेंत उमटूं शकत नाही. चित्रपट पाहत बसलेल्या सीतारामांच्या मूर्ति तिच्या डोळ्यांपुढून हलत नाहीत आणि तिच्या मनांतली जयंत-लीलांची बाळपणची जोडी तिच्या मनःश्चक्षूंपुढे उभी राहते. तिच्या

दृष्टीने तें मंगल चित्र होतें. पण जगाच्या न्यायाने तें पापचित्र होतें. कितीही मनाला बोध केला तरी तें चित्र तिला पापी वाटत नाही. तिच्या डोळ्यांतून त्या स्मृतीने आणि जाणिवेने अश्रू ओघळतात. त्या लहान वयांतही कमलाकराला या जोडीचा हेवा वाटतच होता. आणि म्हणून एकदा जयंत-लीला वयाच्या दहाव्याराव्या वर्षी फुलांची माळ दोघांच्या गळ्याभोवती घालून बसली असतां मागून येऊन कमलाकराने ती माळ मत्सराने तोडून टाकली होती, हें चित्र तिच्या डोळ्यांपुढे उभें राहतें.

कमलाकराचा अतिप्रसंग --

आणि या स्मृतिचित्राचाही भंग करण्यासाठी कमलाकर त्याच वेळीं तेथे येतो. नेमका याच जागीं तो लहानपणचा माळेचा प्रसंग घडलेला होता. म्हणून लीला त्याच जागीं नेमकी बसायची. अर्थात कमलाकराला ही गोष्ट असह्य आहे. म्हणून असल्या एकचित्तत्वाची तो हेटाळणी करतो. भाविकपणाची क्रूर थट्टा करतो. तुळशीची सेवा करून असा कोणता मोक्ष लीलेला मिळवायचा आहे असा अधिक्षेप करतो, धर्माचरणाने शांति मिळवूं पाहण्याच्या तिच्या प्रयत्नांची हुर्रेवडी उडवितो आणि पोरवयाला शोभणाऱ्या या श्रद्धा प्रौढ वयांत मूर्खपणाच्या होत असें प्रतिपादितो.

त्यावर लीला हळवी होऊन आपल्या दुःखी जीवनाचा आपल्याला उबग आला असून बाळपणाचाच सारखा ध्यास करून मनाने तसेंच शरीराने पण बाळरूप व्हावें अशी आपल्या मनाची ओढ असल्याचें व्यक्त करते. त्या वेळीं "पापपुण्याच्या नसत्या कल्पनेने तुम्हींच सर्वांनी आपली निराशा करून घेतली आहे आणि या वयांतल्या सुखोपभोगांसाठी वेळ तुम्हीं न ठेवल्यामुळे तुम्हांला जीवन जड झालें आहे" असा सूचक प्रतिवाद करून कमलाकर पुढे सरकतो आणि लीलेचा हात धरून तिला म्हणतो, "हा पाहा, तुझा हात धरून मी तुला सुखाच्या मंदिरांत नेऊन सोडतों" आणि लीला रागावली असें पाहिल्यावर तिचे पाय धरून प्रेमासाठी तिच्या विनवण्या करूं लागतों.

लीला नाजुक, हळुवार मनाची असली तरी मूर्ख नव्हती; सुखाशेच्या पोटीं कोणालाही शरीर देण्याइतकी अधीर नव्हती. त्यामुळे कमलाकराचा यत्न फसतो. त्याला तिची क्षमा मागावी लागते. त्या घरांतलें आपलें वास्तव्यही नाहीसें होण्याचा प्रसंग न यावा म्हणून या प्रकरणाची कोठेही वाच्यता न करण्याच्या वचनाची भीक तो लीलेजवळ मागतो.

लीला त्याला तसें वचन देते आणि भोळेपणाने त्याला म्हणते, "आजपर्यंत जयंतांच्या कृतीचा तुम्हीं तिरस्कार केला; आता तिचें अनुकरण करा. त्यांचा मनोनिग्रह त्यांची पुण्यशीलता, त्यांची उदारविचारशीलता डोळ्यांपुढे समोर ठेवून यापुढे वागत चला."

सापाच्या फणेवर पाय —

वेडी लीला. यामुळे तर तिने त्या सापाच्या फणेवरच पाय दिल्यासारखें झालें.

कमलाकराचा मत्सराग्नि त्यामुळे जास्तच धडकूं लागला. तो म्हणतोच मुळीं, "आकाशांतल्या दिवट्यांनो पाहिलात आजचा हा नाटकी प्रकार! लौकरच या नाटकाचा शेवटचा अंक तुम्हाला दिसेल. जयंतासाठी रात्रंदिवस झुरणाऱ्या या छचकडीने मला नीतिपाठ शिकवावे काय? इतका मी मूर्ख नाही!"

आणि म्हणून जयंत–लीलांच्या चोरट्या सुखाची राखरांगोळी करण्याची घोर प्रतिज्ञा कमलाकर करतो. त्यासाठी मनोरमेचा शह जयंताला बसवून त्याने लीलेकडे ओढलें जावें आणि मग त्याच्या पापी संबंधाचा डांगोरा पिटून जयंताच्या तोंडाला काळें फासावें; लीलेबरोबरच पद्माकराच्या सुशीलेला पळविण्याच्या कटांत दहा हजार रुपयांच्या बक्षिसासाठी सामील होऊन तिच्याही पातिव्रत्याचा सौदा करावा; असा कमलाकर निश्चय करतो. या दुखावलेल्या सापाचा डाव किती भयंकर असतो याची लीलेला लौकरच ओळख पटेल असें मनोमन तो तिला बजावतो.

येथे पहिला अंक संपतो. एवढ्यावरून तरी नाटककाराने हा खेळ पुनर्विवाहाच्या खंडनमंडनार्थ मांडलेला नाही याबद्दल रसिकांची खात्री व्हावी.

याच पहिल्या अंकांत गडकऱ्यांनी एका उपकथानकाची लहानशी सूचना देऊन ठेवली आहे. सुशीलेच्या पुनर्विवाहाची वाटाघाट चालल्याचें पाहून जयंताबरोबर नवीन आलेला पाहुणा विद्याधर याच्या मनाची चलबिचल होते हें कमलाकराने हेरलें होतें आणि या प्रकरणावर नीट लक्ष देऊन राहिलें पाहिजे असें तो म्हणाला होता. तो धागा दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत गडकऱ्यांनी पकडला आहे. वस्तुतः सबंध नाटकाच्या परिणतीशीं सुशीला–विद्याधर यांच्या या उपकथानकाचा संबंध फार थोडा आहे. परंतु तुलनेसाठी म्हणून असें एक उपकथानक राजा लिअरसारख्या यशस्वी नाटकांत घालण्याचा मोह शेक्स्पीअरला जेथे आवरला नाही तेथे शेक्स्पीअरचा ठसा ज्यांच्या मनावर भरपूर उमटलेला होता त्या आणि मिश्र कथानकाची भलतीच आवड असणारे श्री. कृ. कोल्हटकर याचें शिष्यत्व मानणाऱ्या गडकऱ्यांना तो आवरला नसला तर विशेष दोष देण्याचें कारण नाही.

तुलनेसाठी उपकथानक —

हें उपकथानक, लीलेच्या मानाने सुशीला आणि जयंताच्या मानाने विद्याधर हीं दोघें किती धीरगंभीर आणि संयमी होती हें तुलनेने दाखविण्याच्या हेतूने वापरलेलें आहे. त्यांतला पहिला प्रसंग म्हणजे दुसऱ्या अंकांतला पहिला प्रवेश. त्यामध्ये विद्याधर रात्रीच्या वेळीं एकट्या सुशीलेच्या खोलींत प्रवेश करून तिच्या प्रेमाची याचना करतो. सुरुवातीलाच आपल्याला या प्रयत्नांत यश येऊं नये अशी त्याने परमेश्वराची करुणा भाकली आहे. यावरून विद्याधर सुशीलेची परीक्षा पाहण्याचें हें नाटक करीत आहे एवढी अंधुक सूचना आपल्याला मिळते. त्याच्या या इच्छेला यश येतें. सुशीला

शांतपणे आणि निर्धाराने विद्याधराला तेथून निघून जाण्यास सांगते. त्याच्यासारख्या सुविद्य आणि सुशील तरुणाच्या प्रमोहनालासुद्धा ती बळी पडत नाही. निदान आपल्याला घरांतून तरी बाहेर घालवूं नये, अशी विद्याधर सुशीलेला भीक मागतो. पण स्वतःच्यासाठी जरी नाही, तरी लीला, द्रुमन, वीणा यांच्यासाठी तरी त्याचा बंदोबस्त करणें सुशीला आवश्यक मानते. त्या वेळीं "लीला जशी तुझी बहीण तशीच माझीही; तुझ्याखेरीज सर्व स्त्रिया मला मातेसमान आहेत" असें जेव्हा विद्याधर म्हणतो तेव्हा या प्रकरणांतील कांहीशा निराळेपणाची साक्ष आपल्याला पटते व "मागेपुढे तुझें माझ्याबद्दलचें इतकें वाईट मत एका क्षणांत बदलून टाकीन अशी मला आशा आहे" असें आणखी तो म्हणतो तेव्हा ती साक्ष अधिकच दृढ होते.

शेवटीं घरांत राहण्याची संधि विद्याधराला मिळते.

दुसऱ्या प्रवेशांत गोकुळ तात्यासाहेबांना द्रुमन नाहीशी झाल्याची माहिती देण्यासाठी आलेला असतो. पण सांगायचें विसरून जातो. तेवढ्यासाठी तात्यासाहेबांना सोंगट्या खेळायला नाटककाराने बसविलें आहे. फाशांच्या दानांत पोबारा असा पडलेल्या दानाचा उल्लेख त्यांनी केल्यावर द्रुमन पळाल्याची बातमी सांगण्याची आठवण गोकुळला व्हावी म्हणून.

सुधारकाच्या आवरणाखालचा जुनाट पुरुष —

ही बातमी कळल्यावर सुधारकाच्या आवरणाखालील जुनाट हिंदु पुरुष तात्यासाहेबांच्या ठिकाणचा उघड होतो आणि या तरुण स्त्री-पुरुषांनी एकत्र बसण्याउठण्याला, एकमेकांकडे जाण्यायेण्याला तात्यासाहेब सरसहा बंदी पुकारतात.

परंतु स्वातंत्र्य उपभोगण्याला सरावलेली वीणा आता अशी दबणारी नसते. वसंतरावाबरोबर एकच वेळ बोलण्याला तात्यासाहेबांनी दिलेल्या परवानगीचा फायदा घेऊन ती त्याच्यासह पळून जाण्याचा बेत नक्की करते.

द्रुमनचें गर्भारपणाचें पाप लोकांच्या डोळ्यांवर येण्याइतकें मोठें होऊं लागलें होतें. त्याचा कांही तरी बंदोबस्त करण्यासाठी तिला घराबाहेर काढून गावाबाहेरच्या एका ओसाड भुताटकीच्या घरांत कमलाकारानेच नेऊन ठेवलेलें होतें. अजून मुंबईस जाऊन तिच्याशीं लग्न उरकून घेण्याच्या थापा तो मारीतच असतो. मात्र मुंबईस जातांना कोणाला संशय येऊं नये म्हणून तिने बायकांच्या दूरच्या डब्यांत बसून जावें अशी त्याची योजना असते. त्याआधी तिने स्वतःजवळचा दागिन्यांचा डबा मात्र त्याच्या स्वाधीन करायला हवा. म्हणजे हा डल्ला मारून तिला बायकांच्या डब्यांत एकदा बसवून दिली की, कमलाकराचा कार्यभाग झाला. तो म्हणतोच मुळी की,

"मग जाईल नशीब फिरेल तिकडे !

वीणा गेली, – द्रुमन गेली. मनोरमा जाण्याच्या मार्गांत होती हें आपल्याला लौकरच दिसायचें आहे. त्याच्याआधी ही पळापळीची साथ सर्वत्रच पसरत होती,

म्हणूनच की काय गोकुळच्या घरीं, पाहुण्या विद्याधराच्या समोर मथुरेचें आणि गोकुळचें भांडण नाटककार उभें करतो; आणि मथुरा माहेरीं जाण्याचा निर्धार करून मालक आणि पाहुणा या दोघांनाही प्रवासाच्या तयारीसाठी वेठीला धरते; असा दुसऱ्या अंकाचा चवथा प्रवेश आहे. कथापरिणतीशीं दुरून सुद्धा त्याचा संबंध दाखविणें कठीण आहे. माहेरीं म्हणजे मुंबईस बापाच्या शांतिसदन नांवाच्या राहण्याजेवण्याची सोय असलेल्या खानावळींत मथुरा गेली होती. वसंतराव आणि वीणा पळून जाऊन तेथेच उतरलीं होतीं. त्यांची आणि मथुरेची तेथे गांठ पडली आणि त्यामुळे मथुरेकडून त्यांचा पत्ता मिळायला पुढे उपयोग झाला इतका, मानलाच तर, या प्रवेशाचा ओढून ताणून कथावस्तूशीं संबंध जोडतां येईल. पण त्यासाठी एवढ्या यातायातीची गरज नव्हती. पुढची शांतिसदनांतील मथुरेची झालेली वसंत – वीणांशीं भेट तेवढी एवढ्या कामाला पुरे होती.

घरांतील तरुण स्त्रीपुरुषांनी एकमेकांशीं बोलायचें नाही असा तात्यासाहेबांचा हुकूम सुटल्यामुळें, जी गोष्ट मोकळेपणीं करतां येत होती ती चोरून करावीशी वाटून जयंत आणि लीला यांनी घराच्या मागील बाजूस एकीकडे चोरून बोलत बसण्याचा प्रसंग साधला. बंदीपूर्वी वाटत नव्हती इतकी त्यांना आता एकमेकाच्या सहवासाची ओढ वाटूं लागली.

वेळ सकाळची, रम्य उषःकालची. त्याबद्दल प्रथम काव्यमय बोलणें दोघांचें झालें. मग आकाशांतील चांदण्यावरून लहानपणीं त्यांचें भांडण झालें होतें त्याच्या आठवणी निघाल्या. विधाता माणसांना दुःख देण्यासाठीच निर्माण करतो हा आपला कटु अनुभव क्षणभर त्या काव्यात्म संभाषणसुखांत लीला विसरून गेली. पण प्रत्यक्ष तिची करुण मूर्ति पुढे असतांना विधाता निर्दय नाही किंवा तो निर्दय विधाता मेला असावा ही लीलेची कल्पना जयंताला कशी पटावी. त्यावरून लीलेच्या दुःखी जीवनाचा प्रश्न निघून गाडी पुनर्विवाहाच्या, धर्मशास्त्रांतील पुरुषपक्षपाताच्या चर्चेकडे वळली आणि आजकालच्या शास्त्रीपंडितांच्या भकण्याकडे मुळीच लक्ष न देतां लीलेने धाडस करून पुन्हा विवाहाला तयार व्हावें असा सल्ला जयंताने तिला दिला.

लीलेचा जयंताला रोखठोक पण बिकट प्रश्न —

यांतूनच पुढचा करुण प्रसंग उद्भवला. लीलेचा रोखठोक पण बिकट प्रश्न होता, "पुनर्विवाहाच्या प्रसंगीं तुमचा हात द्याल का?" खुलासा म्हणून लीला एकमेव जयंतावरच आपलें प्रेम असल्याचा निर्वाळा देते. पण जयंतावर सत्ता होती मनोरमेची हें जयंत विसरूं शकत नव्हता. आणि विवाहित स्त्रीचा त्याच्याकडून अनादर न व्हावा अशीच लीलेचीही प्रथमच्या उमाळ्यांतील प्रतिक्रिया होती. परंतु जयंत इतका जवळ असूनही त्याच्या आपल्यामधील अंतर कमी होऊं शकत नाही याबद्दल तिला वेदना झाल्यावांचून राहत नाहीत.

अन् मग शरीराची ओढ जोर करते. मनोरमेची अडचण नसती तर मी तुला अशी जवळ ओढली असती असें म्हणून जयंत लीलेचा हात धरतो. त्यांत आपल्या हातून मनोरमावहिनीच्या हक्काची चोरी होत आहे या जाणिवेने लीलेचे पाय थरथर कांपतात; पण त्यासाठी तरी जयंताचा हात आश्रयाला असावा अशी ती आपली भ्रामक समजूत करून घेते.

जयंताला क्षणांत ही अनवस्था उमजते. आपलें हें वागणें बंधुप्रेमाचें नाही याची त्याच्या मनाला साक्ष पटते आणि तो लीलेला दूर व्हायला सांगतो. पण लीला आपल्या हृदयाला आवर घालूं शकत नाही. हा जो तिला जयंताच्या सहवासाचा, पापी का होईना, एक क्षण लाभला होता तो हातांतून गमावायला तिचें मन तयार नव्हतें. आणि जयंत तिला निवारीत असतांही त्याला न जुमानून लीला त्याला मिठी मारण्यासाठी पुढे होते आणि तिला निवारण्यासाठी जयंत तिचे दोन्ही हात धरून उभा राहतो.

कमलाकर नेमका त्या क्षणीं तेथे पोचून हें दृश्य पाहतो आणि तात्यासाहेब वगैरेंकडे आग पेटविण्यासाठी त्वरेने जातो.

मोहाचा क्षण टळला, पण —

लीला जें करीत होती तें आपल्या हृदयस्थ परमेश्वराला, देशांत चाललेल्या सुधारणेच्या प्रयत्नाला, ज्या कवितादेवीचे आपण स्वतःला भक्त म्हणतो त्या कवितादेवीला न रुचणारें आहे, त्या सर्वांना कमीपणा आणणारें आहे आहे अशी लीलेची समजूत घालण्याचा गंभीर प्रयत्न जयंत करतो आणि आपल्या सांसारिक प्रेमप्रवृत्तीची आहुति देऊन आपण दोघेजण उगवत्या सूर्याला आपल्या उष्ण अश्रूंचें अर्घ्यप्रदान करूं या असें म्हणून लीलेसह गुडघे टेकून बसून दोघेजण डोळे मिटून सूर्यासन्मुख होतात.

अशा वेळीं तात्यासाहेब, मनोरमा, गोकुळ यांना घेऊन कमलाकर तेथे येतो. जयंत–लीलांच्या चित्तांतील भाव तात्यासाहेबांच्या ध्यानीं येणें अशक्यच होतें. त्यांनी त्यांच्या या अवस्थेचा जग घेईल तोच अर्थ घेतला आणि अकांडतांडव करायला सुरुवात केली. जयंत त्यांचा भाचा होता एवढ्याचसाठी त्याला त्यांनी घरांतून हकलून दिलें नाही; पण एका अटीवर कीं यापुढे लीलेशीं त्याने एक शब्द बोलायचें नाही.

मनोरमा अर्थात या प्रसंगानंतर जयंताला विलक्षण कटु बोलते. त्याने विटल्यासारखें होऊन ज्या घरांत त्याचे कान पकडून त्याला कोंडून ठेवायला मनोरमा उत्सुक झाली होती त्या घरावर तो लाथ मारतो आणि त्याचा त्याग करतो.

मनोरमेला घराबाहेर काढायला संधि —

मनोरमेला घराबाहेर काढायला कमलाकाराला ही मोठी नामी संधि सापडली. दिवाणींत दावा केला तर सरकार उडाणटप्पू नवऱ्याला सक्तीने बायकोच्या ताब्यांत देते असा अजब कायदा कमलाकर सांगतो; पण कामना तशी भावना या न्यायाने मनोरमेला

तो खरा वाटतो आणि कमलाकराबरोबर वडिलांकडे त्या क्षणीं निघून जायला मनोरमा तयार होते.

त्याच रात्रीं द्रुमनला बायकांच्या डब्यांत बसवून मुंबईकडे पाठविण्याचा कमलाकराचा बेत होता. म्हणून सकाळच्याच गाडीने तात्यासाहेबांच्या कामासाठी म्हणून मुंबईला जाण्याचा बहाणा करावयाचा आणि रात्रींच द्रुमन आणि मनोरमा यांना वेगवेगळ्या डब्यांत बसवून निघायचें असा त्याचा बेत ठरतो. द्रुमनला पुढे जाऊं द्यावयाची; आपण मात्र मनोरमेचा उपभोग घेण्यासाठी तिला घेऊन मध्येच उतरावयाचें अशी योजना तो करतो.

जयंताला सहानुभूति फक्त विद्याधराची —

एक विद्याधरच तेवढा आता जयंताबद्दल सहानुभूति बाळगणारा राहतो. जयंत जरी उतावळा आणि आत्यंतिक वृत्तीचा असला तरी तो अगदी खुल्या दिलाचा, नीतिमान आणि कांटेतोल सरळ चालीचा आहे, अशी विद्याधराची भावना असते. आणि म्हणून अविचाराने स्वतःवर कांही वाईट प्रसंग जयंताने ओढवून घेऊं नये यासाठी तो त्याच्या पाळतीवर राहतो.

दुसऱ्याच रात्रीं घाटांत गाडी असतांना कमलाकर मनोरमेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्यापासून स्वतःला सोडविण्यासाठी मनोरमा गाडींतून खाली उडी घेते. मरायचीच ती; पण पुलाच्या तारांत अडकून मूर्च्छित पडते. कमलाकराची गाडी पुढे निघून जाते,

हलक्या कानाचे तात्यासाहेब सुधारकाचे कट्टे सुधारणाविरोधी झाल्यासारखे वागूं लागतात; तर इकडे जुन्या मताच्या बाबासाहेबांच्या चित्तांत एकदम क्रांति व्हावी अशी घटना घडते. द्रुमन बाबासाहेबांच्या घाटाखालच्या दवाखान्यांत बाळंत झाली आहे. मुलाचा तिने नाश केला आहे. हॉस्पिटलचे शिपाई व बाबासाहेब चौकशीसाठी तिच्या खोलींत आले आहेत. स्वतःचें मूल तिनें मारलें, समाजांत अशा स्त्रीकडे कोणी सहानुभूतीने पाहत नसल्याने कोणाजवळ हें संकट सांगण्याचीसुद्धा तिला चोरी झाली, वगैरे हकीकत सांगून द्रुमन बाबासाहेबांची करुणा भाकते. 'मी मनुष्य आहे, मला अंतःकरण आहें' असें म्हणून बाबासाहेब तिच्या अपराधाची वाच्यता होणार नाही अशी व्यवस्था करतात.

द्रुमनचा कमलाकराविरुद्ध डांगोरा पिटण्याचा निश्चय —

तोच गाडींतून उडी टाकलेली मनोरमा तेथे येते. तिच्यासारख्या खवट स्त्रीचेंसुद्धा चित्त तो प्रसंग पाहून विरघळतें. द्रुमन जशी फसगतीने कमलाकराच्याच नादीं लागून फसली होती तशीच, पण थोड्या निराळ्या कारणाने कमलाकराच्याच नादीं लागून मनोरमाही इस्पितळांत आली होती, हें कळून द्रुमनच्या अंगाचा तिळपापड होतो.

आणि बाहेर जाऊन सगळ्या जगाला त्याची कसाबकरणी जाहीर करण्याचा द्रुमन निश्चय करते. मात्र तूर्तास मनोरमेची वार्ता तिने कोठे सांगूं नये एवढें मनोरमा तिच्याकडून कबूल करून घेते. कारण, नाही तर कमलाकर उगीच कांही कुभांड रचून तिची नापत करावयाचा.

यानंतर थोड्याच वेळापूर्वी उल्लेखिलेला, वीणा – वसंत यांची शांतिसदनांत मथुरेशीं गाठ पडण्याचा प्रसंग, यापुढच्या म्हणजे तिसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत घडून येतो. आणि त्याच वेळीं गोकुळकडून मथुरेच्या बापाला सर्व हकीकतीचें पत्र येऊन सगळा खुलासा होतो. तेव्हा नावाप्रमाणेच स्वभावानेही दुर्वास ऋषीसारखा असणारा तो ताबडतोब मथुरेची गोकुळकडे रवानगी करतो.

कमलाकराविरुद्ध डांगोरा पिटण्याकरिता म्हणून द्रुमन बाहेर येते. परंतु अखेर कमलाकराच्याच पाशांत ती सापडते. पुन्हा आपण त्यांना भूतमहालांत पाहतो. मनोरमेची हकीकत द्रुमनला समजल्याचें कमलाकराला कळल्याने चिंताक्रांत होऊन तो मनोरमेचा पक्का बंदोबस्त करण्याचा बेत बोलून जातो. तेव्हा त्याच्या हातून तसें काही होऊं नये म्हणून मनोरमा मेल्याची द्रुमन थाप मारते. कमलाकराला स्वतःच्या परिस्थितीवरून ती खूप शिव्या देते. पण तिला तेथेच आपल्या उपयोगासाठी आपण कोंडून ठेवणार असें राक्षसी हृदयाने कमलाकर तिला सांगतो. एवढेंच नव्हे तर आरडाओरडा करून कोणी साहाय्याला आणण्यांत तिला यश येण्याचा यदाकदाचित संभव वाटला तर तिला जगांतून नाहीशी करण्याची धमकीही तो तिला देतो.

सुशीलेला पळविण्याचा प्रयत्न—

पद्माकराच्या फुशीने आणि आपली विषयवासना तृप्त करण्यासाठी सुशीलेला दरोडेखोरांच्या हातून पळवून नेण्याचा बेत कमलाकराने योजिला होता. पण तात्यासाहेबांकडच्या या मध्येच उपटलेल्या पळापळीमुळे या सत्कृत्याला (!) थोडा विलंब होतो. चवथ्या प्रवेशांत दरोडेखोर तात्यासाहेबांच्या घराखाली आलेले आहेत. कमलाकर अजून आलेला नाही. त्याला दोर सोडायची व्यवस्था करायची होती. ती करून तोही लगेच आलाच.

वर चढून कोणीं जायचें यावद्दल दरोडेखोरांत थोडी कुजबूज होते. त्याची चाहूल सुशीलेच्या शेजारच्या खोलींत असलेल्या विद्याधराला लागून तो सावध होतो. बाकीच्या मंडळींना जाणीव न देतां आपण खोलींत एकटेच राहिलों तर आपल्याच माथीं हा गुन्हा लादला जायचा अशी सावधपणाची शंका घेऊन तो तात्यासाहेब वगैरेंना उठवायला जातो

दरोडेखोर वर जातात व सुशीलेला बांधलेल्या स्थितींत खाली घेऊन येतात. त्यांच्या भीतीने सुशीला बेशुद्ध झालेली असते. त्यामुळें दरोडेखोरही थोडे कचरलेले असतात. तोच विद्याधर खिडकींतून खाली उडी मारतो व दरोडेखोरांच्या अंगावर

जातो. तात्यासाहेब वरून खिडकींतून त्याला एकट्याला पुढे न जायला सांगतात. बाजूने कमलाकर, गोकुळ येतात. विद्याधराला पाहून दरोडेखोर सुशीलेला टाकून पळून जातात. पण जातां जातां त्यांच्यापैकी एकजण विद्याधराला चांगलीच जखम करतो. त्यामुळे बाकीचीच मंडळी दरोडेखोरांचा पाठलाग करण्यासाठी निघून जातात. सुशीला आणि विद्याधर दोघेंच तेथे राहतात.

पुन्हा एकदा सुशीलेच्या परीक्षेची वेळ. आता तर विद्याधराचा तिच्यावर केवढा तरी उपकाराचा भार झाला होता. परोपकाराच्या पार्श्वभूमीवरील विद्याधराची प्रेम-याचना नाकारणें हें त्यामुळे तितकें सोपें नव्हतें. परंतु कठोरपणाने ती विद्याधराला झिडकारते. आणि मनांतल्या मनांत विद्याधर, सुशीला अशा प्रसंगींसुद्धा कर्तव्य विसरत नाही याबद्दल तिला शाबासकी देतो.

जयंतावर गहजब —

पण हें प्रकरण एवढ्यावर संपत नाही. जयंत ही गडबड ऐकून सर्वांच्या मागून दरोडेखोरांचा पाठलाग करण्यासाठी धावला होता. तेवढ्या त्याच्या मागास राहण्याचा फायदा घेऊन कमलाकराने तात्यासाहेबांच्या मनांत भरविलें की, दोर जयंतानेच सोडला असला पाहिजे. कारण आपण सारी मंडळी ही येथे आहोंत. जयंत दोर सोडणार कशासाठी ? तर चोरून लीलाची भेट घेण्यासाठी. तिच्याशीं अक्षरही न बोलण्याची बंदी तात्यासाहेबांनी केली असतांना.

आपल्याबद्दल असा संशय मनांत येऊं द्यावा, याबद्दल जयंताचा संताप होतो. मामांची चांगली कानउघाडणी करावी असें त्याला वाटूं लागतें. पण एक घाव की दोन तुकडे या त्याच्या वृत्तीपासून विद्याधर त्याला परावृत्त करतो. तमासगीर जग केवळ ठळक गोष्टींकडे चालतां चालतां पाहत असतें. म्हणून संशयाला जागा राहील असें आपण न वागणें हेंच सुरक्षितपणाचें आहे; मागून मग कोणाचें समाधान करण्याचा प्रसंगच येऊं देतां कामा नये हें विद्याधराचें म्हणणें त्याच्या मनावर ठसतें.

आधी लीला, मग मनोरमा आणि आता सुशीला, तिघींच्या बाबतींत लोकदृष्टीने जयंतच गुन्हेगार ! आणि विद्याधराच्या मताने त्याचें वागणेंच असें होतें की, जगाने त्याच्याबद्दल संशय घेणें अन्यायाचें नव्हतें. मनोरमेशीं तर त्याचें वर्तन इतकें तिटकाऱ्याचें होतें की, लोकांनी सहज काय हवा तो तर्क करावा. बरें अजूनसुद्धा पहिल्या रात्रींच कशामुळे त्याला मनोरमेचा एवढा तिटकारा वाटला हें तो विद्याधरालासुद्धा स्पष्टपणें सांगू शकतच नव्हता.

अखेर जयंताला वैताग वाटतो. घरचसें काय देशही सोडून जाण्याचा विचार त्याच्या मनांत येतो. पण त्यामुळे निंदकांना अधिकच फावलें असतें; तेव्हा मग घर सोडून दुसरीकडे राह्यचें तो ठरवतो. विद्याधरासारख्या तिऱ्हाइताने या अवस्थेंत तात्यासाहेबांकडे राहणें योग्य नव्हतें. म्हणून विद्याधरही दुसरीकडे राहण्याचें ठरवितो,

एक गोष्ट मात्र या ठिकाणीं बोचते की, राहण्यासाठी बिऱ्हाडाची जागा पाहण्याचें काम विद्याधरासारख्या माणसाने सुद्धा कमलाकरावर सोपविलेलें असतें.

द्रुमनच्या आत्महत्येंतून कुटिल कारस्थान —

पांचव्या प्रवेशांत कमलाकर भूतमहालांत जेथे द्रुमनला ठेवलेली होती तेथे जेव्हा येतो तेव्हा द्रुमनने स्वतःला टांगून घेऊन आत्महत्या केली असल्याचें त्याला आढळून येतें. पण याही गोष्टीचा फायदा घेण्याचें कुटिल कारस्थान त्याच्या तरल मेंदूंत जन्म घेतें. द्रुमनच्या प्रेताचे तुकडे मनोरमेच्या कमलाकराजवळ मागे राहिलेल्या पेटींत भरून तात्यासाहेबांच्या घराच्या मागच्या विहिरींत टाकायचें असें तो ठरवितो. लीलेचें खोटें पत्र देऊन जयंताला गफलतीने विहिरीपाशीं आणावयाचें; मनोरमा मेल्याचें कोणाला ठाऊक नव्हतेंच, तेव्हा जयंताने मनोरमेचा खून केल्याची खात्री सर्वांच्या मनांत निर्माण करणें शक्य होईल; असा सगळा बेत पक्का होऊन कमलाकर पुढच्या कामाला लागणार, तोच त्याला द्रुमनच्या हातांत तिनेच लिहून ठेवलेलें पत्र दिसतें. द्रुमनची आशा की, आपल्या व मनोरमेच्या सर्व हकिकतीचें तें पत्र कमलाकराच्याऐवजी इतरांच्या हातीं पडेल. पण तें नेमकें कमलाकराच्याच हातीं पडतें आणि अलगत कमलाकराच्या पाकिटांत लपून जातें.

बाबासाहेबाच्या चित्तांत द्रुमनच्या प्रकरणाने एकदम एवढा पालट झाला की, त्यांनी सुशीला व लीला यांना पुनर्विवाहाची परवानगी दिली. त्याबद्दल सहाव्या प्रवेशांत विद्याधर आणि गोकुळ यांच्यामध्ये संभाषण होतें. त्याच वेळीं लीलेच्या नांवचें खोटें पत्र जयंताला गोकुळाकरवी देण्याची कमलाकराची योजना वाट चालूं लागली असल्याचें आपल्याला कळून येतें.

कमलाकराने ठरविल्याप्रमाणे पूर्वीचेच दरोडेखोर पेटी घेऊन तात्यासाहेबांच्या घरामागच्या बागेंतील विहिरीजवळ येतात. अंधार असतो. बक्षीसादाखल कमलाकर दरोडेखोराला शंभराची नोट देतो. नोट आणि तीही शंभराचीच आहे ना अशी थोडी शंका दरोडेखोराला येते. पण अशा वेळीं परस्परावर विश्वास टाकण्यावांचून गत्यंतर नसतें. कमलाकराने सांगितलेलें खरें मानून दरोडेखोर ठरल्याप्रमाणे पोलीस शिपायाला सावध करण्यासाठी निघून जातो. हवा पावसाळी आहे. काळे कुट्ट ढग आलेले आहेत. कोणी कोणाला दिसत नाही. पत्राप्रमाणे जयंत तेथें आल्याचा सुगावा लागतांच कमलाकर, द्रुमनचें डोकें कापलेलें त्याने आणलें होतें तें पेटीवर ठेवतो आणि विहिरींत दगड टाकून निघून जातो.

जयंत खुनाच्या आरोपाच्या कचाट्यांत —

तो आवाज ऐकून जयंत स्वतःच्या तंद्रींतून भानावर येतो. लीला तर अंधारांत चुकून विहिरींत पडली नाही ना अशा संशयामुळे तो विहिरीजवळ जातो. तो पुढे

पेटीचा भास होतो. नीट कांही दिसत नाही. तो चापचतो. तो पेटीवर काय हें म्हणून चमकतो. द्रुमनच्या डोक्याचे केस त्याच्या हाताला लागतात. एवढ्यांत पोलीस शिपाई येऊन त्याला पकडतात. आरडा ओरडा करतात. घरांतून लीला, सुशीला वगैरे मंडळी बाहेर येतात. तोच वीज चमकते आणि जयंत एकदम घाबरुन म्हणतो,

" अरे बाप रे, हें काय माझ्या हातांत ? "

शिपाई ओरडतात, " अरे बाप रे, हा तर खून !" आणि जयंताला खुनी म्हणून ते पकडून घेऊन जातात.

लीला, मनोरमा, सुशीला यांच्या बाबतींतील मागच्या आरोपांच्या मागोमाग जयंतावर हा चौथा आरोप – या वेळीं मनोरमेचा खून केल्याचा. जयंत आततायी असला तरी मनोरमा आणि सुशीला यांच्याबद्दलचे आरोप त्याच्यावर यायला त्याचा स्वभाव मुळीच कारण झाला नव्हता. ही सगळी कमलाकराची करणी होती हें या ठिकाणीं ध्यानांत ठेवलें पाहिजे.

नंतर चवथा अंक. जयंतावरील खुनाचा खटला सुरू झालेला असतो. विद्याधरासारखा कायदेपंडितही हताश व्हावा इतका जयंताविरुद्ध सबळ पुरावा असतो. कमलाकराने कां कोण जाणे, विद्याधराला भूतमहालांतच जागा दिलेली होती. कदाचित घरांतील आपल्या कारवाया अनिर्बंध चालाव्यात म्हणून असेल. पण त्याच गोष्टीचा फायदा विद्याधराला झाला. त्यालाच कमलाकर समजून त्या दिवशीचा दरोडेखोर त्याच्याकडे कमलाकराने अंधारांत शंभर रुपयांच्या नोटेऐवजी दिलेलें द्रुमनचें पत्र परत देतो. त्यामुळे अचानकच मोठाच पुरावा विद्याधराच्या हातीं सापडतो. पण मनोरमा मरणोन्मुख होती, तेव्हा तिला ताबडतोब गाठणें अत्यावश्यक वाटून तो घाटपायथ्याच्या दवाखान्याकडे जातो. तेथून खटल्याची मुदत लांबविण्याबद्दल तात्यासाहेबांना तो तार करणार असतो.

इकडे दुसऱ्या प्रवेशांत मथुरा गोकुळकडे परत येऊन त्याची क्षमा मागते. पण विद्याधर वकील गडप झाल्यामुळे गोकुळने इतर वकीलांकडे हेलपाटे घातले असतां त्यांनी नन्नांचा पाढा वाचलेला असतो. त्यामुळे तात्यासाहेबांना काय सांगावें या फिकिरींत गोकुळ असलेला पाहून मथुरा, वसंतराव बॅरिस्टर मुंबईस आपल्या वडिलांच्या शांतिसदनांत असल्याची गोष्ट सांगते. आणि तारेने वसंतरावाला बोलाविण्याची व्यवस्था तात्यासाहेबांकडून करविण्यासाठी गोकुळ जातो.

तिसऱ्या प्रवेशांत विद्याधराची तार येते. पण ती कमलाकराच्या हातीं आधी पडते. त्यामुळे खटल्याचें काम न थांबतां सहाव्या प्रवेशांत तें सुरू होतें.

विद्याधराजवळ भरपूर पुरावा —

त्यापूर्वी घाटमाथ्याच्या दवाखान्यांतून बाबासाहेबांच्या रागाच्या भयाने निघून गेलेली

मनोरमा विद्याधराला दुसऱ्या एका दवाखान्यांत मिळते. ती आसन्नमरणच होती. विद्याधराच्या समक्षच ती मरते. त्यापूर्वी तेथे घडलेल्या गोष्टीचा फौजदाराकडून दाखला आणि मनोरमेच्या प्रेताच्या पंचनाम्याची नक्कल मिळविण्याची तजवीज करून विद्याधर घरीं जायला निघतो.

पांचव्या प्रवेशांत जयंताचें खटल्याच्या शेवटच्या दिवशीचें एक मोठें स्वगत आहे. आपण दोन नाही पण तीन लग्नें केलीं असतीं तरी समाजाने आपल्याला पुण्यात्माच मानलें असतें. परंतु असल्या अन्यायी सामाजिक सवलतीचा फायदा घ्यायची कल्पना सुद्धा आपल्याला शिवलेली नव्हती. दुसरें लग्न म्हटलें की, मनोरमेची मूर्ति पुढे उभी राह्यची; स्वतःच्या सुखाची हानि झाली खरी; पण तिच्याही सुखाची झाली हें स्पष्टपणें उमगून आपला जीव भांबावून जायचा. त्यामुळे लीलेला पुनर्विवाहाची परवानगी बाबासाहेबांनी दिली असली तरी दुसऱ्या लग्नाचा विचार आपल्या डोक्यांत आला असता तर आपण स्वतःचें डोकेंच उडवलें असतें, इत्यादि गोष्टी लीलेला उद्देशून बोलून, लीलेचें पत्र न फोडतां हातांत तसेंच ठेवून, तिने त्यांत काय लिहिलें असेल, तिनेही आपल्याला दोषीच ठरविलें असेल का? आणि म्हणूनच आपलें मनोगत तिने पत्राने कळविलें असेल काय, अशा चिंतेंत जयंत मग्न होतो.

परंतु मग पत्र उघडून पाहतो तो आंत नुसता कोरा कागद. कागद पुढे घेऊन लीला बसली खरी. पण तिच्याने कांही लिहवलेंच नाही; डोळ्यांपुढचा कागद अश्रुधारांनी भिजून गेला. तोच कागद लीलेने आपल्या अंतःकरणाची साक्ष म्हणून पाठविला असला पाहिजे, या कल्पनेने जयंत उत्साहित होतो आणि लीलेला आपण दोषी वाटत नाही या समाधानाच्या बळावर कसलीही घोर शिक्षा सोसायला तो मन घट्ट करतो. आणि पुढील जन्मांत आमचीं अंतःकरणें अशा कोणत्याही शुद्ध, पवित्र आणि निकट प्रेमाने जोडून टाक की, ज्यापासून ऐहिक सुखाच्या कल्पनेचा सुद्धा उपद्रव होणार नाही" अशी देवाला तो प्रार्थना करतो.

निष्पाप जयंताला फाशीची शिक्षा —

सहावा प्रवेश खटल्याचा. त्यामध्ये कथावस्तूशीं बिलकुल सुसंगत नसलेली गोकुळची साक्ष आहे. मुद्याची गोष्ट ही की, विद्याधर खटल्याच्या चौकशीच्या वेळीं येऊन पोचूं शकत नाही आणि न्यायाधीश जयंताला, "आपली बायको मनोरमा हिचा बुद्धिपुरःसर खून केल्याचा आरोप शाबीत धरून" फासावर लटकविण्याची शिक्षा देतो.

पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत जयंताला फाशी देण्यासाठी नेत आहेत असा नाट्यमय देखावा आहे. प्रत्यक्ष फाशीच्या ठिकाणीं न्यायाधीश, जेलर वगैरे अधिकारी असतात; नातेवाइकांना तेथपर्यंत जाण्याचा अधिकार नसतो. परंतु फाशीपूर्वीची तुरुगांत होणारी नातेवाईकांची भेट आणि प्रत्यक्ष फाशीचा प्रसंग एकाच वेळीं घडतो

एवढें दाखविण्याची सवलत नाटकापुरती नाटककाराला देऊन हा प्रवेश पाहिला पाहिजे. त्या भेटीच्या वेळचीं सर्वच भाषणें आतापर्यंतच्या भाषणांपेक्षा अधिक चित्तस्पर्शी आहेत, काव्यात्म आहेत. लीला त्या ठिकाणीं भावभराने जयंताला मिठी घालते आणि तोही "इहलोकचा संबंध सुटल्यावर त्याची लाज तरी कशाला धरावी" या विचाराने तिला प्रतिबंध करीत नाही. वेळ झाली म्हणून शिपाई तिला दूर करूं पाहतात त्या वेळीं,

गडकऱ्यांच्या सामर्थ्याची साक्ष —

"बाबारे, अगदी प्रेताला वारा लागूं नये म्हणून त्याच्यावरसुद्धा पांघरूण घालण्याची माया जेथे आवरत नाही तेथे जिवंत माणसाचा लोभ कसा सुटणार?" असा केवढा मर्मभेदक प्रश्न सुशीला उभा करते आणि अल्पवयीन नाटककाराच्याही सामर्थ्याची केवढी प्रभावी साक्ष आपल्या मनाला पटते.

कमलाकरही तेथे असतो. त्या दोघांचें तें अखेरचें सुखही त्याला सहन होत नाही. म्हणून तो त्यांची ताटातूट लौकर व्हावी अशा अर्थाची सूचना करतो. जयंत फासावर चढण्यासाठी जातो तेव्हा तो प्रसंग आपल्याला पाहवणार नाही म्हणून लीला घरीं निघून जाते.

शेवटच्या क्षणीं जयंताची सुटका —

परंतु जयंत फासावर लटकण्यापूर्वींच विद्याधर तेथे येऊन पोचतो आणि बिनतोड पुरावा मिळामुळे जयंताची जामिनावर सुटका होते. शेवटचा निकाल नंतर रीतसर पुन्हा खटला चालून व्हावयाचा असतो.

कमलाकराच्या कौटिल्याची आता तेथल्या सर्वांना चांगली कल्पना येते. तारही त्यानेच दाबून ठेवल्याचा तर्क होतो. पण पाहतात तो कमलाकराने तेथून केव्हाच पळ काढलेला असतो.

सर्वांबरोबर सुशीलाही जाऊं लागते. पण तिला थांबवून विद्याधर तिला त्याच ठिकाणीं तिसऱ्यांदा विवाहाची मागणी घालतो. पहिल्या दोन वेळांप्रमाणे कठोर बोलून त्याचा धिक्कार करणें सुशीलेला कठीण असतें. इतकी त्याच्या उपकारांच्या भाराने ती हलुवार झालेली असते. परंतु विवाहाचा हा विचार सोडून देण्याबद्दल विद्याधराला नम्र पण दृढ वृत्तीने ती विनविते. विद्याधर तिच्या परमेश्वराच्या नियत हेतूबद्दलच्या सर्व कल्पनांना वेड म्हणतो आणि "हें वेड सोडून दे" असें तो तिला सांगूं पाहतो. पण "असेल, हें वेड असेल; तरी तें मला फार सुखकारक आहे! तें काढून टाकण्याची माझी इच्छा नाही" असें सुशीला निग्रहाने सांगते.

सुशीला – विद्याधरांचें मीलन —

तिच्या शुद्ध शीलाबद्दल व पतिप्रेमाबद्दल संपूर्ण खात्री होऊन, त्याला आणि तिलाच

फक्त जें नांव माहित होतें अशा "गुणिला" या नांवाने विद्याधर तिला हाक मारतो आणि मग मधल्या काळांतील विद्याधराच्या जीवनक्रमाचा खुलासा होऊन तीं दोघें एकत्र होतात आणि जयंत-लीलांचा पुनर्विवाह घडवून त्यांचा आनंद आपल्या मीलनामुळे द्विगुणित करावा या बुद्धीने घरीं जातात.

लीलेचा उतावळा आत्मघात —

परंतु हें घडायचें नव्हतें. मंडळी येऊन पोचण्यापूर्वी घरीं लीला एकटीच गेल्यावर आपणाला जगण्यांत स्वारस्य काय या विचाराचा स्वतःशींच काव्यमय परिपोष करीत बसली होती. तेथे कमलाकर येतो. लीला सुखी होणार या कल्पनेने त्याची सूडबुद्धि भडकते. फाशींतून जयंत वाचल्याचें लीलेला कळलेलें नसून जयंत मेल्याचीच अजून तिची कल्पना आहे हें लीलेच्या अस्फुट उद्गारांवरून जाणून कमलाकर त्या गोष्टीचा फायदा घेतो; आणि जयंत गेल्यावर आपण तरी कशाला जिवंत राहावें या विचाराने सगळ्यांचा डोळा चुकवून आपण स्वतः आत्महत्या करण्याच्या हेतूने घरीं आल्याचा तो बहाणा करतो. त्यासाठीच म्हणे त्याने विष आणलेलें होतें. त्या विषापैकी कांही भाग आपल्यासाठी लीला मागून घेते आणि सूडासाठी कमलाकर तें तिला देतोही. तिने तें विष पोटांत ढकलल्यावर त्याचा कार्यभाग होतो आणि मग मरतांना तिच्या अंतःकरणाला दुःखाचे शतशः विंचू डसावेत म्हणून जयंत खटल्यांतून सुटल्याची आणि जिवंत असल्याची वार्ता तो लीलेला सांगतो. परंतु मरणाच्या जवळ गेलेल्या लीलेला आता त्याचें तें बोलणें लवभरसुद्धा बोचत नाही. उलट "माझी दृष्टि आता स्वर्गांतल्या सुखाकडे लागली आहे. आज ना उद्या जयंत तिथेच येतील. आणि मग आम्ही जगन्नाथाच्या कृपादृष्टीच्या अक्षय्य किरणांत अनन्त सुखाचा उपभोग घेऊं. तिथें तर तुमचें विष बाधणार नाही ना?" असा कांहीसा भ्रांत मनोवृत्तींतून स्फुरलेला प्रश्न ती करते. जयंत तेथे येतांच "आनंदी आनंद गडे." ही कविता लीला मोठ्याने गुणगुणूं लागते.

या आनंदाच्या वाटणाऱ्या प्रसंगीं कमलाकराला पाहून जयंताला त्याची दया येते. शिपाई येऊन पकडण्यापूर्वी पळून जायला तो त्याला सांगतो. पण लीलेला आपण विष दिलें आहे हें सांगण्यासाठीच कमलाकर तेथे रेंगाळत होता.

शेवटीं ही विषाची गोष्ट "अगदी सत्य, विषापेक्षाही कडू सत्य" हें जयंताला लीलेच्या तोंडून कळून त्याच्या सर्व आशांची राखरांगोळी होते.

या ठिकाणीं जयंत – लीलांच्या विकल अंतःकरणाची यथायोग्य कल्पना देणारीं भावनामय दीर्घ भाषणें त्या दोघांच्या तोंडीं घातलीं आहेत, तीं त्या ठिकाणीं चांगलीं शोभून दिसतात.

आत्महत्या करूं नका म्हणून लीला जयंताला शपथ घालते. तिची करुण कहाणी सांगून समाजाच्या कठोर हृदयाचें परिवर्तन करण्याचें त्याने कार्य करावें ही आपली अखेरची इच्छा म्हणून ती त्याला सांगते. बाकीची मंडळी आल्यावर दुःखित होण्याऐवजी लीला स्वतःच सर्वांना धीर देण्याचा प्रयत्न करते; आणि एक प्रकारच्या अनिर्वचनीय

अनुक्रमांक ठा. स्थलमत.
जयसांकलीला वि: ६२७
नों: दि.

आनंदाच्या भरांत केशवसुतांच्या " झपूर्झा " मधील " हर्षखेद ते मावळले " हें कडवें.. म्हणत प्राण सोडते.

काव्यरूप भाषेचें प्रजोजन —

यानंतर कमलाकर खटल्याच्या कामीं गोवला जाईल व मग आपल्यावरही तो गुन्हा शेकेल याचें भय वाटून दरोडेखोर त्याचा निर्दयपणे खून करतात ही गोष्ट विशेष ध्यानांत न घेतां शेवटचा पांचवा प्रवेशच आपण पाहूं. हा शेवटचा प्रवेश लीलेच्या जळत्या चितेचा आहे, आणि तेथे संन्यासवेष घेतलेला जयंत आणि इतर मंडळी आहेत. जयंताची त्या ठिकाणीं चारपांच भलीं लांबलचक भाषणें आहेत. त्याच्या त्या वेळच्या उद्भ्रांत मनस्थितीचें दर्शन आणि स्वतःच्या विवाहविषयांत नडलेल्या सामाजिक रूढींबद्दलचें मतप्रदर्शन गडकऱ्यांनी कांहीशा कृत्रिम वाटणाऱ्या त्या जयंताच्या भाषणांतून चांगलें केलें आहे. आपल्या हृदयांत धडधडणारी आग व्यक्त करतांना जयंत इतकें सूत्रबद्ध बोलूंच शकला असता की नाही, नव्हे तो कांहीही बोलूंच शकला असता की नाही, हे प्रश्न वास्तवतेच्या दृष्टीने खुशाल चर्चेला घ्यावेत. पण तशा त्या प्रसंगीं अशाच कांही विचारांचा कल्लोळ मनांत माजलेला असणें हें स्वाभाविकच आहे हें कोणालाही अमान्य करतां येणार नाही. आणि हा कल्लोळ आम्हा प्रेक्षकांना अनुभूतीला आणून द्यावयाचा म्हटला म्हणजे नाटककाराला अशीच कांहीतरी भाषा वापरल्यावांचून सुटका नाही हेंही मान्यच करावें लागेल. जयंतासारखा माणूस प्रत्यक्षांत कदाचित आभाळाकडे दृष्टी लावून शून्यमनस्क झालेला बाहेर भासेल. परंतु त्याच्या निर्मात्याला त्याच्या मनांत काय गोंधळ माजला आहे हें चांगलें ठाऊक आहे. आणि आम्हाला तें प्रतीत करतांना तोटक्या आणि कृत्रिम भाषेचा आधार घेतल्यावांचून अन्य चांगलें साधन त्या चित्राच्या निर्मात्याजवळ उपलब्ध नाही, त्याला त्याने काय करावें !

अखेर या खेळाचें नांव प्रेमसंन्यास या जयंताच्या विधानानंतर नाटकाचा शेवटचा पडदा पडतो.

गडकऱ्यांनी हें नाटक जयंताचा प्रेमसंन्यास दाखविण्यासाठी लिहिलें, जयंत-लीलांच्या निराशेच्या प्रेमाचा हा 'खेळ' आहे, हें आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट व्हावें. द्रुमन आणि मनोरमा या दोघींचा दुःखद अंत आपण पाहतों. जयंत मरण न पत्करतां लीलेच्या सांगीनुसार निवृत्त वृत्तीने स्त्रियांच्यावरील अन्यायनिवारणाचें कार्य हातीं घेऊन जीवनाचें सार्थक करूं पाहतो. तरीही खरी हळहळ आपल्याला जयंत-लीला या जोडीबद्दल आणि त्यांतही अधिक जयंताबद्दलच वाटते. लीलाबद्दल हळहळ वाटायला ती बालविधवा आहे, हें एक कांहीतरी कारण तरी आहे. त्या बाबतींत समाजाबद्दल सात्विक राग आणि तिच्याबद्दल अनुकंपा वाटतें हें पुष्कळसें समजण्यासारखें आणि स्वाभाविक आहे. जयंताबद्दलही अनुकंपा वाटण्याचें एक लहानसें बाह्य कारण जयंताचा मनोरमेशीं झालेला विषम विवाह हें आहे खरें. परंतु तें कारण इतकें खात्री वाटविणारें नाही.

जयंताच्या जीवितवैफल्याबद्दलच करुणा —

कारण, जयंत आणि लीला यांच्या लग्नाची गोष्ट उभय कुटुंबांत मान्य असतांना तें लग्न कां होत नाही आणि जयंताला मनोरमेशीं लग्न कां करावें लागलें याचा कांहीच खुलासा नाटककाराने केलेला नसल्यामुळे मनोरमेचें जयंताशीं तेढें वागणें हें अन्यायाचें म्हणतां येईल की नाही आणि त्यांत जयंताच्या दुर्दैवाचा भाग किती याबद्दल मनाचा निश्चय होऊं शकत नाही.

आणि तरीही जयंताबद्दल जिव्हाळा वाटतो, हळहळ वाटते, ती कां ? अकारण त्याच्यावर संकटें येतात आणि त्याचा दोष नसतांना अपरिहार्यपणे तो त्यांमध्ये भाजून निघतो यामुळे आपलें मन त्याच्याकडे जास्त ओढतें. परस्परांना अनुरूप आणि त्याच आशेवर लहानपणापासून वाढलेल्या त्या दोघांचें लग्न होऊन त्यांना सुखी संसार करायला मिळाला नाही याबद्दल आपलें मन हळहळतें; आणि लीलेबद्दलचें मनांत एवढें आकर्षण असूनही मनोरमेला डावलून देण्याला जयंत तयार होत नाही या त्याच्या कर्तव्य-बुद्धीमुळे तो आपल्याला अधिकच जवळचा वाटूं लागतो. त्याचा सहृदय, निष्कपट, काव्यानंदांत रंगणारा स्वभाव आपल्याला मोह पाडतो. मनोरमेबद्दलची कर्तव्यभावना सकाळच्या त्या उत्साहभराच्या क्षणांत तो किंचित विसरतो आणि लीलेला जवळ घेण्याचा त्याला मोह होतो; पण जणू ऐन कड्याच्या टोकावरून माघारें फिरून आपलें शील न विटाळण्याचा संयम तो दाखवितो, त्या वेळीं, उतावीळ असूनही न्यायनीतीला पारखी न होणारी त्याची वृत्ति आपल्याला त्याच्याबद्दल अधिकच कौतुक वाटायला लावते. या सगळ्याच्या पोटीं जयंताबद्दल आपल्याला फार फार सहानुभूति वाटते आणि म्हणून त्याच्या जीवितांतील अथांग वैफल्याबद्दल आपल्या मनांत करुणा निर्माण होते.

रचना व भाषा यांच्या सफाईचा अभाव —

असें जरी आहे तरी लीलेचा मरतावेळचा अंतःकरण स्थिरावत गेल्याचा प्रवेश जितक्या सफाईने आणि प्रभावीपणाने लिहिला गेला आहे तितके जयंताचे आणि लीलेचें इतर प्रवेश स्वाभाविक परिणामकारकता धारण करूं शकत नाहीत. प्रत्यक्ष तुरुंगांतील, लीलेला नीतिन्यायाची फिकीर न बाळगतां जवळ घेण्याचा जयंताने केलेला प्रयत्न आणि त्यांतून माघार घेऊन स्वतःच्या बंधुप्रेमाचा केलेला उच्चार या गोष्टी अगदीच ढोबळपणाच्या आणि परिणामकारकतेच्या दृष्टीने दुबळ्या वाटतात. त्यांत नाटकी भावना-विष्काराचा रंग फाजील ठळकपणाने उमटलेला आहे असें वाटल्यावांचून राहत नाही. याला अपवाद फक्त एकच प्रवेश; मृत्यूच्या अगदी निकट पोचल्यावर, अखेरच्या क्षणाच्या टोकावर दिगंतांत विलीन होतांवेळच्या लीलेच्या हृदयाच्या धीरगंभीर अवस्थेचा. . त्या ठिकाणची भाषा मात्र या अवस्थेचें प्रकटीकरण करायला चांगली पुरी पडल्याचें दिसतें.

जयंताचा काय किंवा लीलाचा काय, स्वभाव व त्यांचीं भाषणें तितकी प्रत्ययकारी न

होण्याचें कारण गडकरी त्या वेळीं नाट्यक्षेत्राला अगदीच नवखे होते हें मुख्यतः असूं शकेल. परंतु कोल्हटकरांच्या नाट्यरचनेच्या तंत्रांत सांपडल्यामुळेही असें झालें असण्याचा फार मोठा संभव आहे. कथानकांत एकाहून अधिक उपकथानकांचें वृथा मिश्रण करावयाचें; कथानकाची शेवटची उकल होण्यासाठी कथावस्तूंशीं एकदम सरळ झुंज न घेतां लांबून लांबून कारस्थानासारखे धागे जुळवीत आणून स्वाभाविकता वाटविण्याचा इतका दीर्घसूत्री प्रयत्न करावयाचा की, त्यामुळेच तें सारें कृत्रिम आणि विश्वास ठेवण्याला कठीण वाटावें. अशा या तंत्रांत कारस्थानाच्या धाग्यांच्या नादीं लागल्यामुळे जयंत – लीलांपेक्षा कमलाकराच्या वाट्याला नाटकांत जास्त जागा मिळाली आहे. इतकी की, हें नाटक जणू त्याचेंच नाटक आहे की काय अशी भ्रांति वाटावी. भावबंधनांतही गडकऱ्यांनी अधिक लक्ष प्रभाकर – लतिका यांच्यापेक्षां घनःश्यामावर इतकें पुरविलेलें आहे की, त्यामुळे तोच त्या नाटकाचा नायक ठरावा. भावबंधनांत तसा गडकऱ्यांचा हेतूही असेल. परंतु प्रेमसंन्यास हें नाटक त्यांना खासच कमलाकराचें नाटक करावयाचें नव्हतें. असें असून तसें तें आहेसें वाटावें इतकी अप्रमाण जागा त्याला नाटकांत मिळाली आहे; त्यामुळे जयंत – लीलांचा स्वभावपरिपोष अधिक प्रत्ययकारी करायला गडकऱ्यांना अवसरच सापडला नाही.

'रोमिओ आणि ज्यूलिएट 'शीं साम्य व भिन्नता —

शेक्सपिअरच्या रोमिओ आणि ज्यूलिएट या नाटकाची गाढ छाया या नाटकावर पडलेली आहे. पण शेक्स्पीअरच्या नाटकांतील उत्कट प्रत्ययकारीपणा यांत नाही. एक गोष्ट सारखी आहे. रोमिओ आणि ज्यूलिएट या जोडींत जयंत – लीलांप्रमाणेंच जन्मजात किंवा स्वकर्तृत्वांतून निर्माण झालेलें असें कसलेंही श्रेष्ठत्व किंवा भव्यत्व नाही. दोन्ही जोड्या तुमच्याआमच्यासारख्याच साध्यासुध्या माणसांच्याच आहेत. परंतु रोमिओ आणि ज्यूलिएट यांची परस्परावलंबनाची प्रेममयता इतकी उत्कट आहे की, अन्य विश्वच उरलेलें नाही त्यांच्यापुढे. यामुळे आमचें सारें अंतःकरण वेधून भेदून टाकण्याची त्यांच्या स्वभावांत आणि चरित्रांत शक्ति आहे. त्यामुळेच त्यांच्या जीवनांत त्यांच्या ठिकाणीं आत्यंतिक उताविळी उत्पन्न झाली आहे. त्या उताविळीचें दर्शन घडविणें हें त्या नाटकांतील प्रमुख साध्य आहे. आणि त्याकडेच शेक्स्पीअरने आपलें सर्व लक्ष पुरविलें आहे. गडकरी कोल्हटकरी गुंतागुंतीच्या तंत्रांत सापडल्यामुळे, जयंताच्या उतावीळ, अविचारी, उत्कंठाभरित आणि आत्यंतिक स्वभावाचा प्रत्यक्ष आणि प्रत्ययकारी परिपोष करायला त्यांना वावच मिळाला नाही. त्या मानाने लीलेच्या स्वभावाच्या नाजुक छटा त्यांनी पुष्कळच अधिक प्रत्यय वाटविण्याजोग्या दाखविल्या आहेत. पण जयंत–लीलांच्या प्रेमाची उत्कटता दाखविणारे प्रसंग त्यांना पुरेसे आणि पुरेसे प्रभावी असे दाखवितां आले नाहींत.

रोमिओचा उतावीळपणा इतक्या शिगेला पोचला होता की ज्यूलिएटच्या मरणाची

बातमी कळल्यावर तो घराकडे परत आला तोच विष घेऊन आला. ज्या धर्मगुरूने त्याचें लग्न लावण्याच्या कामीं त्याला साहाय्य केलें होतें त्यालासुद्धा विचारीपर्यंत त्याला धीर निघाला नाही. लीलेनेही विष घेतांना इतकाच उतावीळपणा केला असें क्षणभर भासतें खरें; परंतु त्यासाठी कमलाकराचें तिला समर्थनपूर्वक साह्य घ्यावें लागावें ही गोष्ट तिच्या आत्यंतिक उतावीळपणाची साक्ष पटवूं शकत नाही.

रोमिओ आणि ज्यूलिएटमध्ये त्या दोघांच्या घराण्यांमधील पिढीजाद कटु वैराच्या पोटीं त्या दोघांचें लग्न अशक्य कोटींतलें ठरलें; आणि दोघांच्या आत्यंतिक उतावळ्या स्वभावामुळे हें अशक्य दिसणारें लग्नही शक्य करून दाखविण्याच्या घाईत त्यांचा अंत झाला. घराण्यांच्या विरोधाची ही जागा या नाटकांत सुधारणावादी आणि सुधारणा-विन्मुख अशा दोघां भावांनी घेतली आहे; म्हणजे समाजांतील या दोन विरोधी प्रवृत्तींच्या थरांनी. परंतु त्यांच्यामधील विरोध हा मॉन्टेग्यू व कॅप्युलेट या घराण्यांतील विरोधा-इतका जीव घेणारा विरोध नव्हता. त्यामुळे त्या विरोधांत होरपळूनच आत्यंतिक उता-वीळ अशा जयंत–लीलांच्या नाश व्हावा इतकी अगतिकता त्या विरोधांत गडकऱ्यांना सापडली नाही. त्यामुळे समाजाच्या नैतिक मूल्यांतील ढोंगबाजीचा आणि पुरुषपक्ष-पाताचा त्यांना आश्रय घ्यावा लागला. तोही पुरेसा न पडून मनोरमेचा एक अनुल्लंघ्य अडथळा जयंत आणि लीला यांच्यामध्ये त्यांनी उभा केला. एवढेंही तंत्र अपुरेंच वाटून कमलाकराच्या कारस्थानाची त्यांनी मदत घेतली; इतकी की जयंत–लीलांचा जीवनांतील करुण विपाक हा विरोधी वातावरणांत सापडलेल्या त्यांच्या स्वभावगत दोषांचा परिणाम की कमलाकराच्या दुष्ट कारस्थानाचा तो परिणाम अशी द्विधा मनोवृत्ति होण्याला कारण उत्पन्न झालें.

अर्थात या ढिल्या रचनेमुळे, वस्तुतः जयंत–लीलांच्या स्वभावगत कारणांनी घडून आलेल्या करुण विपाकाचें असलेलें हें नाटक आमचें अंतःकरण करुणामय बनवून नित्याच्यापेक्षा निराळ्या आणि उंच जगांत नेऊन त्यांत विशुद्ध रसमयता निर्माण करण्या-इतकें प्रभावी ठरलें नाही. त्याचमुळे जयंताची शेवटच्या चितेच्या प्रवेशांतील काव्य-मय भाषणेंही तितकीं परिणामकारक झालीं नाहींत.

हें सगळें होण्याचें कारण प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्यासारख्या कांही टीकाकारांच्या मताप्रमाणें गडकऱ्यांच्या प्रतिभेचें खरें कार्य विनोदनिर्मिति हेंच होतें. गडकऱ्यांची कविता आणि त्यांचीं पुण्यप्रभाव आणि भावबंधन हीं नाटकें यावरूनसुद्धा या मताचा फोलपणा पुरेसा सिद्ध होण्यासारखा आहे. परंतु विनोदाबरोबरच करुणासारखा हृद-यांत खोलवर जाऊन चित्ताची खळबळ उडविणारा आणि विशुद्धता साधणारा रस निर्माण करण्याची शक्तीही गडकऱ्यांच्या ठिकाणीं खास होती हें त्यांच्या एकच प्याला नाटकांत प्रतीत झाल्याशिवाय राहवत नाही. याच विषयाची चिकित्सा त्या नाटकाच्या चर्चेच्या वेळीं अधिक तपशिलांत शिरून करून पाहूं.

प्रकरण एकविसावें

संभाजी

कै. विष्णुपंत औंधकर यांच्या बेबंदशाही नाटकाने प्रस्तुत लेखकाचें चित्त आज पसतिसांहून अधिक वर्षेंपर्यंत सारख्याच ओढीने वेधून घेतलें आहे. १९२४ सालीं या नाटकाचे पुण्यांत पहिले प्रयोग झाले. त्या वेळीं पहिले दोन चार प्रयोग होत आहेत तोच प्रस्तुत लेखकाने फर्ग्युसन कॉलेजच्या ॲंफीथिएटरमध्ये या नाटकाची चर्चा एका व्याख्यानांत केली होती. सुयोग असा की, लेखकाच्या विनंतीचा आदर करून स्वतः औंधकर या व्याख्यानाला हजर राहिले होते आणि सभा–समारंभांत बोलण्याचा सराव नसतांही थोडा वेळ आपल्या नाटकासंबंधीची भूमिका त्यांनी मांडली होती. तेव्हांपासून आज पसतिसांहून अधिक वर्षें हें नाटक पुन्हा पुन्हा वाचूनही त्यांतील गोडी अवीटच राहिली आहे. रंगभूमीवरची सुद्धा या नाटकाची पकड अजून कायम आहे, हें रंग-भूमीच्या पडत्या काळांत सुद्धा पुन्हा पुन्हा हौशी नटांना या नाटकाचें आकर्षण सतत वाटत आलें आहे यावरून दिसून येतें. अशा या श्रेष्ठ नाटकांतील संभाजीच्या चित्र-णाबद्दलची चर्चा या प्रकरणांत करायची आहे.

अत्यंत कलात्मक दृष्टीने निवडलेली सामग्री —

संभाजीच्या दुःखद मृत्यूचें हें नाटक आहे यांत संशयच नाही. तत्कालीन इति-हासांतील बेबंदशाही पार्श्वभूमि म्हणून नाटककाराने उपयोगांत आणली असली तरी त्या बेबंदशाहीच्या स्वरूपाची किंवा तिच्या आधाराने हल्लीच्या काळच्या राजकारणाची उकल करण्याचा खटाटोप औंधकरांनी मुळीच केलेला नाही. आणि म्हणून त्यांच्या नाटकां-तील एकरूप परिणामकारकता बिघडली नाही.

औंधकरांनी निवडलेला विषय नाट्याच्या दृष्टीने अत्यंत अनुकूल आणि भव्य आहे. मराठ्यांच्या इतिहासांतील एका केवढ्या तरी भयंकर आघाताची पार्श्वभूमि त्यांनी मोठ्या कौशल्याने हेरून नेमकी टिपली आहे. आणि त्या पार्श्वभूमीवर मरणकाळच्या बेडर निर्भयतेमुळे व स्वातंत्र्य आणि धर्म यांच्यावरील परम निष्ठेमुळे ज्याचें सर्व दोषजाल प्रेक्षक–वाचकांच्या मनांतून विसरलें जातें आणि त्याच्याबद्दल आदर, आपुलकी आणि तळमळ उत्पन्न होते असा नायक आपल्यापुढे मूर्तिमंत उभा करण्यासाठी त्यानी निव-डला आहे. अत्यंत कलात्मक दृष्टीने निवडलेल्या आपल्या या सामग्रीचा उपयोगही अतिशय कौशल्याने औंधकरांनी कसा केला आहे पाहा.

पहिल्या प्रवेशांतच नाटकाला वेगाची गति—

पहिल्या अंकांतील पहिल्या प्रास्ताविक प्रवेशांतच नाटकाच्या कथानकाला एखाद्या कसलेल्या नाटककारालाही हेवा वाटावा एवढी मोठी गति त्यांनी दिली आहे. अष्टप्रधानांनी संभाजीला कैद करून राजारामाला छत्रपतींच्या गादीवर बसविलें होतें; पण संभाजीने या त्यांच्या मनसुब्याचा धुव्वा उडवून, शिरक्यांचें शिरकाण करून, राजारामाची आई सोयराबाई हिला भिंतींत चिणून आणि मातबर सरदारांना नामोहरम करून गादी मिळविली होती आणि स्वतःबद्दल दरारा आणि चीडही निर्माण केली होती. अशा संभाजीच्या नजरकैदेंत असलेली राजारामाची पत्नी, महान कारस्थानी ताराबाई, हिच्या संभाजीविरुद्ध कारस्थान उभारण्याच्या प्रयत्नापासून नाटकाची सुरुवात होते. तिच्या अगदी सुरुवातीच्या भाषणांतच कथानकाला गति मिळते.

"घातल्या अन्नावर आणि दिल्या वस्त्रावर लाजिरवाणें जिणें जगण्यांत, नजरकैदेच्या त्या कोंडवाड्यांत चोराटोराप्रमाणे कोंड्रून घेण्यांत खंती" न वाटणाऱ्या राजारामाची ती महत्त्वाकांक्षी पत्नी संभाजीच्या विरुद्ध फितुरी करण्याचा कट सूर्याजी पिसाळाच्या हातून उभारण्याचा प्रयत्न त्या ठिकाणीं करीत आहे.

पण ती अशा माणसाचा आधार घेऊं पाहत होती की, ज्याला शिर्क्यांची मोहबत मिळवून दौलत मोंगलाच्या घशांत टाकण्याच्या कारस्थानांत सामील होण्याची उत्कंठा होती. अर्थात आपल्या अंतरंगांतील या कलमषाचा थांग तो ताराऊला लागूं देत नाही. आणि त्यासाठी कांहीशा मानभावीपणाने, परंतु पुष्कळशा सत्याच्या दडपणाने सूर्याजी संभाजीच्या बेफाम धडाडीची ढाल पुढे उभी करून "अशा या सिंहाच्या जबड्यांत घरधनिणीचें कुंकू पुसून पुन्हा कोण शिरणार?" असा संभाजीची आपल्याला पहिली ओळख करून देणारा प्रश्न उत्पन्न करतो.

छत्रपतींच्या सिंहासनाची दुर्दशा : नायकाची पहिली ओळख—

परंतु ताराऊ त्याच्या या "बोहल्यावरच्या पोरीच्यासारख्या" घाबरण्याची हेटाळणी करते. आणि, "आपली भाकरीची चाकरी छत्रपती भोसल्यांच्या रायगडाच्या अभेद्य किल्ले कोटांत, दख्खन दरबारीं बजावली जाते," असें कांहीसें मानभावीपणाने व रायगडाचा भेद करणें ही साधीसुधी गोष्ट नाही हें सांगण्याच्या इराद्याने जेव्हा सूर्याजी पिसाळ सांगतो, त्या वेळीं छत्रपतींच्या सिंहासनाच्या दराऱ्याची आणि अभेद्यतेची झालेली आजची दुर्दशा ताराऊ अशी वर्णन करते :

" दारूच्या धुंदीने छत्रपतींच्या तक्ताच्या झोकांड्या अलमगिराच्या दिल्लीदरबाराकडे झुकताहेत या आठवणीची उचकी चाकरीच्या भाकरीचे घास गिळतांना या मावळमराठ्याला ढाचत नाही का ? अव्वल राजेपणा लयाला जाऊन रिकामटेकड्या फटिंगाच्या बुद्धिबळाच्या राजाची हालत हिंदुपदपादशाहीला आली आहे, हें बेमान.नसलेल्यांना उमगत नाही का ! "

अशा रीतीने बेफाम धडाडी आणि सिंहासारखें शौर्य असलेला संभाजी दारुडा आणि रिकामटेकड्यांच्या संगतींत फसलेला असा झाला होता याची ओळख पटवितां पटवितांच ताराऊच्या कारस्थानाचे धागे हळुहळू अधिकाधिक विणले जात असतांना आपण पाहतों.

बुडती दख्खनशाही तारण्यासाठीही आपण तळमळतों आहोंत असा ताराऊ वरकरणीं तरी, कोणाही सच्चा मराठ्याला खरा वाटावा असा आव आणते. परंतु केलेल्या कारस्थानांत धनी आणि चाकर यांना दोघांना ठीक कमाई होण्याची खात्री असल्याशिवाय "बेफायदा धुडकोसांत जीव रमणार नाही सरकार!" अशी सूर्याजीची वृत्ति त्या वेळीं उघड होते.

नकळत भविष्याची सूचना —

"बेफायदा धुडकोसाने इत्तीच्या पायीं जीव बांधायला इतरांचे प्यारे जीव तरी कुठे वर आलेत?" असा, नकळतपणे भयंकर भविष्यसूचक खडा सवाल करून ताराऊ सूर्याजीला नुसता वाईचा देशमुखच नव्हे तर साऱ्या हिंदुपदपादशाहीचा हिंमतदार बनण्याचें आमिष दाखविते. आणि कोणत्याही प्रसंगांत ताराऊचा आपल्याला पाठिंबाच राहील या आश्वासनावर विसंबून सूर्याजी ताराऊच्या कारस्थानांत मदत करण्याची केवळ वरकरणी तयारी दाखवितो.

कारण त्याचे हात आधीच गणोजी शिरक्याच्या कारस्थानांत गुंतलेले असतात. त्याच्याच फितुरीने गणोजीचा रायगडासारख्या अभेद्य किल्ल्यावर प्रवेश झालेला असतो.

ताराऊचा जळफळाट —

गणोजीचा प्रवेश गडावर झाल्याबद्दलची बातमी दवंडी पिटून जाहीर केली जाते. त्याला पकडून देणाराला इनाम जाहीर केलें जातें. त्या वेळीं राजाराम घाईघाईने येऊन पिसाळाला या गोष्टीबद्दल फार कडक दोष देतो. सूर्याजीला तडक तपासासाठी जावेंच लागतें; कारण या अशा वेळीं ताराऊ आणि राजाराम यांच्यासह आढळणें म्हणजे संभाजीच्या मनांत राजारामाविषयींच संशय येण्याला कारण व्हावयाचें. सूर्याजीला जातां जातां संभाजीचें कुशल वर्तमान कळवायला राजाराम मोठ्या जिव्हाळ्याने सांगतो. पण त्यानेच ताराऊचा मस्तकशूळ उठतो. आणि झालें तें सर्व इतिहासजमा होऊन जावें आणि भोसल्यांच्या कुलस्वामी शंकराने "आमच्या शंभुराजांना छत्रपतीचीं बुद्धि आणि उदंड आयुष्य द्यावें" अशी राजाराम मोकळ्या मनाने व राज्यकल्याणाच्या शुद्ध बुद्धीने प्रार्थना करतो, तेव्हा तर ताराऊ,

"दौलत रसातळाला न्यायला त्याला उदंड आयुष्य द्या आणि या भोळ्या शंकराला बंदिवास घडूं द्या" असा आपला जळफळाट व्यक्त करते. पण राजाराम तिचा त्याबद्दल कडक निषेध करतो.

अशा रीतीने मुत्सद्दी, महत्त्वाकांक्षी आणि कारस्थानी ताराऊ व उदार आणि सद्भावनेच्या आचीने रंजीस झालेला राजाराम यांचें हें विरोधी जोडपें आपल्यासमोर उभे होतें न होतें तोच दुसरें एक याहून अगदी विरोध दर्शविणारें जोडपें आपल्या-समोर येतें.

कारण, खंडोजी घाब-्यां घाब-्याच येऊन राजारामाला सावध करूं पाहतो. संभाजी संशयाने वेभान होऊन राजारामाच्या रोखाने येत होता. संभाजीला पाहून सूर्याजी त्याचा राग टाळण्यासाठी जरा आडोशाला गेला याचा फायदा घेऊन त्याच्याविरुद्ध – तो स्वतःच्या कटांतला असूनही – कलुषाने संभाजीच्या मनांत काळें भरविलें आणि आता यांत राजारामाचें अंग असल्याशिवाय सूर्याजीचें हें धाडस होणार नाही या संशयाने भारून जाऊन संभाजी त्याला जाब विचारण्यासाठीच सूर्याजीला पुढे घालूनच येत असतो. या प्रकरणांत महाराणी येसूबाई आल्याशिवाय तोड निघायची नाही या विचाराने प्रथम राजारामाला सावध करून खंडोजी येसूबाईकडे जातो.

गडावर गणोजीचा शिरकाव व्हावा या गोष्टीचा संताप संभाजीला यावा हें रास्तच होतें. परंतु त्याबद्दलचा जाब राजारामाला तो विचारूं जातो तेव्हा, "आम्हीही वडि-लांचें नांव छत्रपती लावतों; मग फितुरीबाबत आम्हांपाशी जाब मागण्याची पाळी कां आली?" असा धीरगंभीर सवाल राजाराम विचारतो, त्यावेळीं कलुषा मध्येच तोंड घालून गादी बळकावण्याच्या प्रयत्नाचा आरोप राजारामावर करतो. त्याही वेळीं मोठ्या खुबीने राजाराम त्याला चूप करायचा प्रयत्न करून "दादासाहेबाशीं बोलण्याचा मान" मागतो.

संभाजीकडे सहानुभूतीचा काटा —

परंतु भावाविरुद्ध संभाजी कलुषाचाच पक्ष घेत असल्याचा करुण देखावा आपण पाहतो. तथापि त्याही वेळीं संभाजी आपली सीध्या शिपाई गड्याची भूमिका एवढ्या तळमळीने सांगतो की, या माणसावर झालेल्या अन्यायानेच हा वाममार्गाला लागला नसेल ना? म्हणूनच कलुषा कब्जीचें फावलें नसेल ना!" असें वाटून आपल्या सहानु-भूतीचा काटा त्याच्याकडे झुकतो.

"बुद्धिबळाने आम्हांला खेळतां येत नाही आणि दुसऱ्यांनी आम्हांशीं खेळलेलें आम्हांला खपत नाही! आम्ही गादीवर येण्यांत दौलतीला धोका आहे, अशा अंदाजी हिशेबाने आम्हांला जन्मठेपीचे कैदी करण्याचें कारस्थान करण्यापेक्षा, राजाराम महा-राजांना छत्रपती होऊं द्या असा सीधा सवाल अष्टप्रधानांनी टाकायचा होता; सिंहा-सनाच्या पायऱ्या उतरून मानाने मुजरा ठोकला नसता तर भोसल्यांची अवलाद सांगि-तली नसती" हे संभाजीचे बोल आपल्याला फुशारकीचे वाटत नाहीत; त्यांतील तळमळ आणि सच्चेपणा त्याच्या थोर हृदयाचीच साक्ष आपल्याला पटवितात. आप-ल्यालाच नव्हे तर ज्याच्याशीं तो इतक्या तेढीने वागत होता त्या राजारामालाही. कारण राजारामाचें अंतःकरणसुद्धा संभाजीच्या या थोर निष्ठेने हेलावतें. त्याच्या अंगावर मूठ-

भरं मांस चढल्यासारखें त्याला वाटतें. छत्रपतींनी, राजांनी निःस्वार्थी राहिलें पाहिजे ही प्रत्यक्षांत सिद्ध करून दाखविलेली वृत्तीच संभाजीच्या ठायीं असल्याचें पाहून राजाराम गहिवरला आणि "छत्रपतीच्याच पायाची आण की राजाराम छत्रपतीपदाची रखवाली आणि रखवालीच करील! सिंहासनाला यावज्जीव पाय लावणार नाही" अशी प्रतिज्ञा करतो.

कारुण्याचा उद्गम —

भविष्यसूचक आणि नाट्यमय अशा या प्रसंगाने नाटक असें नुकतें कोठें सुरू होतें न होतें तोच नाटककार आपल्याला केवढ्या तरी उंच भूमिकेवर घेऊन जातो. दोघां भावांच्या स्वभावांतील अथांग भिन्नतेच्या पोटीं दोघांच्याही ठिकाणीं छत्रपतींची थोर निःस्वार्थी वृत्ति बाणलेली पाहून आपले डोळे अभिमानाने पाणावतात. आणि अशा त्या दोघांपैकी एकाचा स्वभाव असा थोर आणि त्यागी असूनही स्वभावांतील कांहीं हिणकस भेसळीमुळे त्याचें पुढचें करुण चित्र पाहण्याचें आपल्या नशिबीं यावें या गोष्टीची आपल्याला फार हळहळ वाटते.

परंतु राजारामाच्या फुशीशिवाय सूर्याजी पिसाळाने फितुरी करून गणोजीला गडावर येऊं देणें शक्य नव्हतें, हा संभाजीचा संशय अजून नाहीसा होत नाही. त्याबद्दलची कबुली पिसाळाच्याच तोंडून वदवावी म्हणून संभाजी शिपायाकरवी पिसाळाला बेदम मार देऊं लागतो. कालीमातेच्या दृष्टांताच्या कल्पनेने कन्जीने संभाजीस भारून टाकलें होतें. आणि मार असह्य होऊन पिसाळाने खोटीच कबुली दिली असती म्हणजे मोठाच बाका प्रसंग उद्भवण्याची भीति होती.

परंतु आयत्या वेळीं येसूबाई तेथे येऊन पोचतें. गोषाच्या कारणाने कन्जीला तेथून जावें लागतें. या संधीचा फायदा घेऊन राजारामावरील संशय दूर करण्यासाठी येसूबाई खोटें बोलण्याचेंसुद्धा पाप करते. तथापि कन्जीला खोटें मानायला संभाजीचें मन तयार होत नाही. तेव्हा "कालीमातेचा दृष्टांत समजून घेण्यांत कांहीतरी चूक होत असली पाहिजे, भोसल्यांना स्वतःला देवीचा दृष्टान्त घडत असतो; मांत्रिकाकडून असा विपरीत दृष्टान्त ऐकायची आम्हांघरीं रीत नाही" असें म्हणून या वेळेपुरती तरी येसूबाई संभाजीच्या हातून कांही वेडेवांकडें होऊं देत नाही. आणि कन्जींना पुन्हा खोदून विचारण्याच्या निमित्ताने हा प्रसंग पिसाळाला कैदेंत ठेवल्यानंतरच संपतो.

कन्जींच्या मुलाखतीने राजारामाचा निकाल ठरायचा ही गोष्ट राजारामाच्या हृदयाला अर्थातच अत्यंत बोचते. परंतु सिध्या तब्बेतीच्या माणसांना कधी ना कधी उपरती झाल्याविना राहत नाही, असा आपल्या मनींचा आशावाद सांगून येसूबाई राजारामाचें कसेंबसें समाधान करते.

फितूर लोक आणि दौलतीचे रक्षक यांच्यांतील झगडा —

अशा रीतीने एका बाजूला कलुषा कन्जीची फितुरी आणि तिच्यांत गुरफटत जाणारा

संभाजी आणि दुसऱ्या बाजूला येसूबाई, खंडोजी आणि राजाराम ही सत्प्रवृत्त व दौलतीच्या हितार्थ झटणारी मंडळी, असा हा सामना पहिल्या प्रवेशाच्या अखेरीस आपल्यापुढे उभा होतो. खंडोजी तर लगेच कलुशावर नजर ठेवून त्याच्या कारस्थानाचा पत्ता लावण्यासाठी हेरगिरी करण्यांत प्रवीण अशा शाहिराची योजनाही करतो. शाहिराची सुंदर तरुण पत्नी चंद्रावळ हिला शाहिराने संभाजीच्या गुणवर्णपर पोवाडा गायला नकार दिला यासाठी संभाजीकडून कलुषाने ओलीस म्हणून कैद करविली होती; पण वस्तुतः तिच्यासारख्या रूपवतीची प्राप्ति करून घेण्याचा त्या दुष्टाचा खरा हेतु होता. पत्नीच्या विरहामुळे निराश होऊन शाहीर कर्तव्यविन्मुख झालेला होता. परंतु कन्जीचा फितुर शोधून काढल्यास दौलतीवरचें संकटही टळेल आणि चंद्रावळीची मुक्तताही होईल अशी त्याची समजूत करून खंडोजी त्याला त्या कामगिरीला उद्युक्त करतो.

यापुढचा तिसरा प्रवेश कोणत्याही नाटकांत विनोदाचे कांहीसे अँचकटविचकट प्रवेश असलेच पाहिजेत या मराठी नाटककारांच्या दृढ होऊन गेलेल्या समजुतीच्या पोटीं जन्माला आला आहे; निदान त्यांतील अर्ध्याहून अधिक भाग. या प्रवेशाचें स्थळ रायगडनजीकच्या दरींतील एक मंदिर आहे. हीच कन्जीची गुप्त खलबतखान्याची जागा आहे. आंतल्या दरवाज्यावर खाशाबा म्हणून तरुण शिपाई आहे. बाहेरच्या भागावर सर्जाबा नांवाचा उतार वयाचा शिपाई आहे. या दोघांनाही चंद्रावळ आपल्याला वश व्हावी अशी इच्छा आहे. त्यापायी त्यांच्यांत अल्प काळ चुरस आणि झटापट उद्भवली आहे. चंद्रावळ अर्थात ह्या दोघांनाही वश झाली नाही आणि होण्याचा सुतराम संभव नाही.

शाहीर कब्जीच्या खलबतखान्यांत —

त्यांच्या त्या झटापटींत सर्जाबाकडून त्याच वेळीं खाशाबावर प्राणघातक हल्लाच व्हावयाचा. पण खलबतखान्यांत असा प्रकार केल्याने प्रकरण अंगाशीं येईल या भीतीने तेवढ्यापुरती माघार घेऊन सर्जाबा निघून जातो, तोच कातकऱ्याचा वेष घेऊन बरऱ्या घळींतून दोरावरून सरकत येऊन शाहीर त्याच्यापुढे थांबतो. याच्यासारखा माणूस आपल्याला साह्य असला तर सर्जाबाची भीति नको या बुद्धीने आणि कातकऱ्याच्या सरळ भोळ्या स्वभावाची खात्री पटलीशी वाटून खाशाबा कातकऱ्याने तेथेच राहावें असा विचार करतो. शिवाय कातकऱ्याशीं भांडण काढून त्याच्यासारख्या बाचिशूराचा निभावही लागण्यासारखा नव्हता.

चंद्रावळ आणि शाहीर यांना परस्परांची ओळख पटते. खाशाबा जरा बाजूला गेला होता तेवढ्यांत चंद्रावळीकडून गणोजी शिर्के कन्जीशीं खलबत करायला येत असतो आणि आजही येणार आहे ही मुद्याची गोष्ट शाहिराला कळते. एवढ्यांत खाशाबा परत येतो. पाठोपाठ कन्जी आल्याची परवलीच्या शब्दाची ललकारी झडते. आता कातकऱ्याला तेथून घालविणें अशक्य होतें. तेव्हा त्याला तेथेच एका कपारींत

दडवून बसवावें लागतें. तेथून गणोजी, कव्जी आणि मुकर्रबखान यांच्यामधील सारें खलबत शाहिराला ऐकायला मिळतें.

संभाजीचें कव्जीने केलेलें मोल—

मराठ्यांचा राजा संभाजी बिनलढाईने, बिनसायासाने कव्जीने बादशहाच्या सुपूर्त करावा आणि या फितुराखातर मेहेनताना कुलपरंपरेने दहा लाखांची जहागीर दिल्ली प्रांतीं कव्जीला मिळावी असा कव्जीचा खुला सवाल होता. संभाजीच्या मानाने ही किंमत गणोजीला फार वाटते. कवजी जेव्हा म्हणतो की, संभाजीला मराठ्यांचा राजा या वजनाने मोजा आणि मग बोला, तेव्हा हा राजा वेजबाबदारीने कवडीमोल झाला असल्याचें गणोजी म्हणतो. अशा वेळीं कव्जीसारख्या संभाजीच्या दुष्मनाने संभाजीच्या गुणांचें केलेलें मोल संभाजीच्या मोठेपणाची कल्पना येण्याला फार उपयोगी आहे. "आज आठ नऊ वर्षें औरंगजेबासारख्या बादशहाने ज्याच्याशीं जातीने झुंज मांडली असतां, कडव्या जातीच्या रोहिले पठाणांची लाख लाख फौज हल्ल्याहल्ल्याने कत्तल खेळत असतां, ज्याने चौफेर नजर राखून मराठ्यांची भालाबरची बहाद्दरीने नाचविली, त्याच्या मनगटांतली दिल्लीश्वराच्या मनगटाला भिडण्याची रग पहिल्याइतकीच जिवंत आहे हें विसरूं नका" असा कव्जीचा अभिप्राय आहे. आपली जहागिरीची मागणी सजविण्यासाठी तो थोडी फार अतिशयोक्ति करीत होता असें मानलें तरीही त्याच्या म्हणण्यांतील सत्य कोणालाही जाणल्यावांचून राहत नाही.

संभाजीला पकडून देण्याचा कट —

अर्थात 'रायगडासकट संभाजी' असा सौदा केला व पार पाडला तर वाटेल तेवढ्या जहागिरीची सनद बादशहाकडून देववितों असा गणोजी पेच टाकतो. पण असलें भलतें साहस करायला कबजी तयार होत नाही. आणि आपला पहिला हेका सोडीत नाही. तेव्हा 'सुसरीची पाठ मऊ' या न्यायाने त्याची मागणी आज मान्य करावी आणि काम साधल्यावर मग जहागीर पोटांतून ओढून काढण्याचा मार्ग कांही कोणी रोखला नाही' असें एकीकडे मुकर्रबखानाशीं खलबत करून गणोजी कव्जीची मागणी मान्य करतो. अर्थात बादशाही शिक्कामोर्तबाने सनद हातीं पडल्याशिवाय संभाजीचा पत्ता गणोजी आणि मुकर्रबखान यांना मिळणार नाही असें कबजीने निक्षून बजावलेलें असतें.

एवढी संकटाची वार्ता कळल्यानंतर लाडक्या बायकोसाठी कातकऱ्याच्या सोंगाची बतावणी करीत तेथे राहण्याचा कृतघ्नपणा करण्याची गोष्ट शाहिराच्या रक्तांतच नव्हती. त्यामुळे आपण तेथे कशासाठी आलों याची चंद्रावळीला नीट समजूत देऊन चंद्रावळीने या कारस्थानाचा छडा अधिक लावण्याच्या सोयीच्या दृष्टीने तेथेच राहावें, एवढेंच नव्हे तर खाशाबा-सर्जाबा यांच्या फाजील लगटीला या हेतूच्या सिद्धयर्थ वरपांगीं उत्तेजनच द्यावें आणि प्रसंग आला तर खंजीराने आत्मनाश करावा असा

तिचा त्याचा विचार होऊन खंडोजीला सगळी खबर देण्यासाठी वाऱ्याच्या वेगाने गड चढून जाण्यासाठी शाहीर तेथून जातो.

यानंतर दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत पुन्हा आपल्याला खाशाबा आणि सर्जाबा यांच्या झटापटीची वानगी थोडा वेळ पाहावयास मिळते. मरणाच्या भीतीने खाशाबा सर्जाबाला चंद्रावळीशी लगट करण्याला सवड द्यायचें कबूल करतो; परंतु तशी सवड मिळण्यापूर्वीच कऱ्हाडकडचा जासूद येऊन सर्जाबाला पाहरा सोडून दुसरीकडे भटकत असल्याबद्दल हटकतो, आणि सांगावा देतो की "याच घडीला भल्या बंदोबस्ताने चंद्रावळीला घेऊन गड उतरा. पायथ्याला चोरवाटेच्या तोंडाशीं आलांत म्हणजे कुठें जायचें तें कळेल. लवकर परतायचें नाही अशा सरंजामाने मात्र निघा." हा शेवटचा सांगावा एवढाच काय तो सर्जाबा - खाशाबांच्या या प्रवेशाचा प्रत्यक्ष कथावस्तूशीं संबंध आहे.

दुर्दैवाची अपशकुनी खूण —

यापुढचा प्रवेश मात्र या नाटकांत एक अत्यंत गहिऱ्या भावनात्मकतेचा प्रवेश आहे. खंडोजी येसूबाईच्या महालांत शाहीराची परत येण्याची वाट पाहून दमला आहे. अजून तो न आल्याने नाही नाही त्या आशंकांनी त्याचें मन भरून गेलें आहे. मराठ्यांच्या स्वातंत्र्यसूर्याला उगवतां उगवतांच बेबंदशाहीचें ग्रहण ग्रासीत असलेलें पाहून त्याचें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे. फाटलेल्या आभाळाला टाके घालण्यासाठी साध्वी येसूबाईच्या मदतीने तो चिमुकला जीव मोठ्या शर्थीने मनसुबे रचीत आहे. अशा वेळीं त्याची भोळी भाबडी, राजवाडा आणि राणी पाह्यला म्हणून आलेली बहीण, दोन्ही दाखवायला त्याला वेळ मिळत नाही म्हणून त्याच्यावर रुसते आहे आणि आपल्याला घरीं परत पाठवायला सांगते आहे.

अशा वेळीं येसूबाई तेथें येते. पण खंडोजीच्या बहिणीला कोठे ठाऊक आहे की हीच ती राणी. आपल्या वडिलांना संभाजीने हत्तीच्या पायीं दिल्याची गोष्ट ती कांहीशा चिडीने तिच्याच तोंडावर सांगते आणि साध्वी राणीने आपल्या भावांना मायममतेने पोटाशीं धरलें याबद्दल तिचे गुण गाते. केवढें सुंदर पताकास्थान या ठिकाणीं नाटककाराने साधलेलें आहे. कारण तीच राणी येसूबाई आहे हें समजल्यावर "राणीच्या तोंडावर आपण राजाला नांवें ठेवलीं" याबद्दल ती अगदी भांबावून जाते.

राणी येसूबाई तिला शांत करते. राजकारणाच्या या उठाठेवींत खंडोबाच्या बहिणीची विचारपूस करायला सवड झाली नव्हती म्हणून ती स्वतःच खेद व्यक्त करते. आतां ही बहीण जाणार म्हणून तिची पाठवणी करण्यासाठी येसूबाईने वेळांत वेळ काढला होता. पण दोघींच्याही नशिबीं तें घडायचें नव्हतें. कारण त्याच वेळीं शाहीर "रक्षी रक्षी प्रभो नृप" असे सूचक शब्द ललकारत येत असल्याचें ऐकून आता हें

पाठवणी बिठवणीचे समारंभ करायला वेळ नाही हें खंडोजी जाणतो; दासीला कोणी तरी हुजऱ्या बरोबर देऊन माईला चिटणिसांच्या वाड्यांत पोचवायला सांगतो. अशा रीतीने आल्या संकटाच्या काळजींत खंडोजीने कधी नव्हे ती सुवासीण भोसल्यांच्या भरल्या राजवाड्यांतून कुंकू लावल्याविना पाठविली, तेव्हा येसूबाईचें मन चरकल्याशिवाय राहिलें नाही. माईवर आणि त्या भरल्या राजवाड्यावरही थोड्याच दिवसांत ओढवणाऱ्या दुर्दैवाची ही अपशकुनी खूण नाटकाराने येथे केवढ्या कौशल्याने वापरली आहे!

गणोजी आणि कन्जी यांच्या कटाची बित्तंबातमी सांगून शाहीर शिकारीच्या सोंगाने आजच संभाजीला बाहेर नेण्याचें ठरलें असल्याचेंही सांगतो. "अबघडी खाशांची आणि कन्जींची ताटातूट झाली नाही तर राजांचा घात झाल्यविना राहत नाही" असा त्यांचा अभिप्राय असतो.

आपल्या भावानेच सूड उगविण्याच्या ईर्ष्येने भोसल्यांबरोबरच सर्व महाराष्ट्राचें वाटोळें करायला तयार व्हावें, बहिणीला सौभाग्यहीन करण्याची तातडी करावी आणि शिर्क्यांच्या उज्ज्वल कीर्तीला कलंक लावावा या विचाराने येसूबाई हतबुद्ध होते.

पण उपाय कोणता? शाहिराला वाटतें कन्जीला ताबडतोब कंठस्नान घालून मोकळें व्हावें; पण असें करण्यांत अविचार झाला असता हें खंडोजी चांगलें ओळखत होता. पुन्हा एकदा संशयपिशाच्याच्या तावडींत सापडून संभाजीने मातबरांच्या रक्ताचा सडा सांडावा, हा परिणाम त्याला टाळायचा होता. "कन्जीच्या जिवाची रखवाली खुद्द दख्खनच्या बादशहानेच पत्करली असल्याने सर्वांचाच नाइलाज झाल्याचा" खंडोजीचा अनुभव होता.

एवढ्यांत दौलती खबर घेऊन येतो की, संभाजीला गडाखाली घेऊन जाण्यासाठी तुळशीने मोहजाल पसरलें आहे. त्यावर आता रक्तपाताला भिऊन कसें चालेल असा पुन्हा शाहिराचा सवाल येतो. परंतु अकलमंदीने वागल्यावांचून गत्यंतर नाही अशी खंडोजीची अजूनही भावना असते. तेव्हा येसूबाईने आताच्या आता संभाजीच्या मुलाखतीला जावें; गोपाचा मान राखण्यासाठी कन्जीला दूर व्हावें लागेल. त्या संधीचा फायदा घेऊन संभाजीला किल्ला सोडण्यापासून परावृत्त करावें आणि असा त्याचा बचाव करावा. नंतर कन्जीच्या नाशाचा विचार करावा. अशी तर्काला सुसंगत वाटणारी मसलत खंडोजी ठरवितो.

जगांतील घडामोडी तर्काशीं विसंगतही असतात —

पण जगांतल्या घडामोडी नेहमीच तर्काशीं सुसंगतपणें घडून येतात असें नाही हा अत्यंत खेदकारक प्रत्यय यापुढच्याच प्रवेशांत खंडोजीसकट सर्वांना येतो. तिसऱ्या प्रवेशांत कन्जी तुळशीला बजावून सांगतो आहे की ह्याच घडीला संभाजीला गडाबाहेर काढला नाही तर आपले सगळ्यांचे मुडदे गाडले जातील. तुळशी आपल्या रुसण्याफुगण्याच्या जोरावर संभाजीला आपण हवें तें करायला लावूं अशा खुषींत आहे. परंतु कन्जीला संभाजीची योग्यता चांगली ठाऊक आहे. दौलतीला धोका असल्यावर तिच्या

रुसण्याफुगण्याची पर्वा करण्याइतका तो ढिला शिपाई नाही हा त्याने त्या वेळीं दिलेला निर्वाळा, त्यांत ढोंग करण्याचा कांही हेतु नसल्यामुळे संभाजीच्या स्वभावावर फार उत्तम प्रकाश टाकणारा आहे.

आपल्या कटाचा सुगावा येसूबाईला लागल्याचें कळल्यामुळे कन्जी बेचैन झालेला आहे. त्यामुळें ताबडतोब संभाजीला गडाबाहेर काढून आडवळणाला नेण्याची त्याला निकड वाटते आहे. गणोजीच्या वचनाचा त्याला भरंवसा नाही. त्यामुळे सरळसरळ गडाबाहेर पडल्याबरोबर संभाजीला तो गणोजीच्या स्वाधीन करायला तयार नाही असें त्याचें व तुळशीचें बोलणें होत आहे तोच संभाजी येतो. राजारामाच्या फितुरीबद्दल पत्र्यामुद्यानिशीं शाबिती करण्याबद्दलचा संभाजीचा हुकूम होण्याचा संभव आहे, या रागरंगाची कल्पना कन्जीला देऊन तुळशी पसार होते आणि संभाजी प्रवेश करतो.

संभाजीचें डोकें अजून शाबूत आहे —

येसूबाईने राजारामाच्या निरपराधीपणाबद्दल दिलेला निर्वाळा संभाजीच्या संशयी मनाला पटत नाही. तिने असा निर्वाळा द्यावा तरी कसा याचेंच त्याला कोडें पडलेलें असतें. कारण गेल्या नऊ वर्षांतील आपल्या सोयरेधायऱ्यांच्या सतत घरभेदी कारवायांमुळे संभाजीचा आता कोणावर भरंवसाच बसत नाहीसा झालेला होता. घरीं घरभेद आणि बाहेर हाणामाऱ्या यांत होणाऱ्या रक्तपातामुळे त्याचा जीव रंजीस झालेला असतो. त्यामुळे राजारामाची फितुरी मुद्यापुराव्याने शाबीत केल्याशिवाय आणि कत्तलींतून फरारी झालेल्या शिर्क्यांचा माग काढून त्यांना जिवंत गाडल्याविना ह्या घरभेदाच्या गांजणुकींतून आपली कायमची सुटका होणार नाही अशा मनस्थितींत तो असतांना, आता त्याची कन्जीशीं गाठ होते. आणि दृष्टांताच्या खरेपणाची शाबिती करून देण्याची जबाबदारी कन्जीची आहे असें तो कन्जीला बजावतो. "दृष्टान्ताची कसोटी मुद्यापुराव्याने कधी लांगत नाही; दृष्टान्तानुरूप वर्तन केल्यानेच त्याची कसोटी पटते" हा कन्जीचा सोईस्कर वेदांत संभाजी बिलकूल मान्य करीत नाही. संभाजीचें डोकें अजून शाबूत होतें. येसूबाईच्या शंकेचें निरसन करावयाचें तर मुद्यापुराव्याची गरज आहे; राणीसाहेबांसारखी साध्वी गुन्हेगारांचा निर्वाळा देत असतांना बिनपंचाइतीने राजारामाला सजा देण्याची सुलतानशाही रयतेंत बेदिली माजवील व दौलतीची धूळधाण उडेल, हें जाणण्याची अक्कल त्याची अजून संपलेली नाही. "राजांचें राजेपण रयतेच्या दिलजमाईवर अवलंबून आहे" हा भोसले छत्रपतींचा सिद्धांत त्याच्या रक्तांत अजून सळसळत होता. त्यामुळे राजांनी बाईल बुद्धीने वागूं नये, ही राणीचा अपमान करणारी कन्जीची सूचना संभाजी धुडकावून लावतो. "राणीसाहेबांचा केव्हा किती मान राखायचा असला लांडा कारभार आम्हीं तुम्हांला पुसला नाही" अशी ठोकर संभाजी कन्जीला देतो तेंव्हा त्याच्याबद्दल आम्हांला किती किती कौतुक वाटूं लागतें; आणि मग दारूची नशा चढल्यावर हाच संभाजी त्याच आपल्या राणीची इज्जत संभाळूं

शकत नाही असें आम्ही पाहतो तेव्हा 'अरेरे !' असा करुणोद्गार आपल्या तोंडून सहज बाहेर पडतो.

राजेपणाचें अवजड ओझें —

कन्जी पुराव्याने राजारामाची फितुरी सिद्ध करण्याला टाळाटाळ करतो आहे हें ध्यानीं येतांच हेंही प्रकरण आपल्या दुर्लौकिकाला कारण होणार या कल्पनेने संभाजी फार वेचैन होतो. शेक्स्पीअरच्या बहुतेक सर्व राजांप्रमाणे संभाजीला राजेपणाचें ओझें फार अवजड वाटूं लागतें. पूर्वजन्मींच्या पापाचे झाडे देण्याकरिता आपण राजेकुलांत जन्मलों; जें करावें त्यांत अपेश आणि दुर्लौकिक आपल्या वाट्याला येतात याचा त्याला वैताग येतो.

अखेर कन्जीची अवलाद खाल्ल्या मिठाला जागणारी नव्हे असा सरळ आरोपच संभाजी करतो. आता कां कूं करणें कन्जीला कठीण होतें. आणि तो धोरणी माणूस यांतूनच स्वतःचा कावा साधतो. मंत्राच्या साह्याने मुद्दापुरावा उपलब्ध करायची गोष्ट तो काढतो आणि मंत्रसिद्धि होईपर्यंत राजांनी आपण सांगूं त्या गुप्त स्थळीं आलें पाहिजे अशी अट तो करतो. राजाराम महाराजाबाबत आपण अन्याय केला नाही असें सिद्ध करण्यासाठी आतुर झालेला आणि कन्जीच्या मंत्रतंत्रावर भोळा विश्वास असलेला संभाजी कन्जीच्या या अटीला राजी होतो. त्यासरशी कन्जी घोड्यांची तयारी करण्याचे हुकूम बजावून संभाजीला बेहोश करण्यासाठी त्याला मद्य देऊं लागतो.

दारूच्या नशेनें अकलेचें खोबरें —

या वेळीं येसूबाई, बाळराजा शिवाजी आणि खंडोजी तेथे येऊन पोचतात. बाळराजा कन्जीला मद्य देण्याबद्दल निषेधाने दरडावतो आणि राणीसाहेबांना तेथे मोकळेपणीं यावयाला मिळावें म्हणून कन्जीला तेथून निघून जाण्यास फर्मावतो.

परंतु क्षणापूर्वीच येसूबाईच्या साध्वीपणाची तरफदारी करणारा संभाजी दारूच्या नशेच्या तावडींत सापडून "कन्जीसारख्या संभावितांना तेथे असायला हरकत नाही" असा अभिप्राय व्यक्त करतो.

बाळराजे पोपटपंची करतात असा कन्जी त्याचा अपमान करतो त्या वेळीं रागावून, कन्जीने तत्क्षणीं बाळराजांची क्षमा मागावी, नाहीतर त्याची गर्दन उतरली जाईल असें म्हणून खंडोजी तरवार उपसतो. परंतु संभाजी त्याला मना करतो. एवढेंच नव्हे तर कन्जीने तेथें राहूं नये असें स्पष्टपणे स्वतः येसूबाई सुचवीत असतांही, कन्जीसारख्या स्वामिनिष्ठादेखत गोष्ट कशाला ? असा विपरीत निर्णय तो देतो.

त्यावर कार्यदर्शी येसूबाई नाखुषीने बुरखा टाकून देते. बळेंच खंडोजीकडून कन्जीची क्षमा मागविते आणि महाराजांपाशीं आम्हांला खाजगी बोलावयाचें आहे तेव्हा तुम्हीं येथून चालते व्हावें असें ती कन्जीला फर्मावितें.

परंतु कन्जी न हलतां राजांची मर्जी विचारतो आणि संभाजीचा कौल कन्जीच्या बाजूने पडून आपल्या चित्तांत चरर्र होते. संभाजीच्या व्यसनांध स्थितींतला हा हुकूम खरा हुकूम नव्हे, म्हणून कन्जीने चालते व्हावें असा येसूबाई पुन्हा हुकूम करते. परंतु कन्जीला तेथून हलूं नका म्हणून सांगून उलट, आम्ही नशेंत असतांना या वेळीं तुम्हीं येथें येण्याचें साहस कां केलेंत, असा तेढा प्रश्न संभाजी येसूबाईलाच करतो. आणि तिला राजवाड्याकडे जायला सांगून आम्ही कन्जीबरोबर चालते होणार असें म्हणतो.

नशेंतही सत्यप्रेम आणि राणीबद्दलचा आदर जागृत —

कोठे चालते होणार ही त्या बिचारीला खरी काळजी. शिकारीला जाणार हें कन्जीचें उत्तर तिला खरें कसें वाटणार ? म्हणून परोपरीने ती खरें राजांना कोठे नेणार म्हणून कन्जीला विचारते. कन्जी मख्ख आहे. तो तिच्या त्या तळमळीला थोडीच भीक घालणार ? मासाहेब खरोखरच आम्ही शिकारीला जात आहोंत, असेंच तो सांगूं पाहतो. परंतु संभाजीचें सत्यप्रेम आणि येसूबाईबद्दलचा आदर हीं त्या नशेंतही क्षणभर उसळून वर येतात आणि तो कन्जीला राणीसाहेबांशीं खोटें बोलाल तर खबरदार असें बजावून " राणीसाहेब, आम्ही खरोखर शिकारीला जात नाही " असें येसूबाईला सांगतो.

धन्यतेपोटीं हळहळ —

राजाच्या सत्यवचनी बाण्याबद्दल येसूबाईप्रमाणेंच आपल्यालाही धन्य वाटतें. पण या धन्यतेपोटींच हळहळीची निर्मिति होते. कारण, राजकारणाच्या नांवावर आपण कोठें जातो हें सांगण्याची सोय नाही असें येसूबाईला बजावून, " कैफाच्या भरांत वचनभंगाचें पाप पत्करून गोतावळ्यांतच रमायचें असेल, मसलतीचा स्फोटच करायचा असेल तर हुजुरांनाच करूं द्या " अशी नेमकी संभाजीला बेभान करणारी तेढी बात कन्जी उन्मेखून बोलतो. वचनभंगाचा आरोप संभाजीला क्षणभर सहन होणें शक्य नव्हतें. त्यामुळे कन्जीबरोबर जाण्याचा त्याचा निश्चय कायम होतो. काम आटपून लौकरच आपल्या मुलाखतीला येऊं असें नशेंतच तो येसूबाईला आश्वासन देतो. पण तिला तें खरें कसें वाटावें ? कारण, तिला कन्जीच्या कटाचा सुगावा चांगलाच लागलेला होता. त्या कटाची गोष्ट ती अखेर संभाजीला सांगूं जाते. पण नशेच्या भरांत तें त्याला खरें वाटत नाही. शिवाय कन्जीवर बेइमानीच्या आरोप करणारे सर्व स्वतःच बेइमान ठरल्याचा त्याचा अनुभव होता. म्हणून मग त्याचे पाय धरून आपल्याला आम्ही कांही झालें तरी आज जाऊं देणार नाही असा हट्ट येसूबाई धरते. परंतु " वचनभंगाचें पातक करून आपला मान राखण्यापेक्षा आपल्यालाच असें लाथाडून वचनाची चाड राखणें आम्हांला अधिक पुरुषार्थाचें वाटतें " असें म्हणून गृहलक्ष्मीला आणि राजलक्ष्मीला लाथाडून संभाजी कन्जीबरोबर निघून जातो.

सामोपचार संपला म्हणून येसूबाई खंडोजीला घोड्याला घोडा भिडवून कन्जीची

गर्दन उडवायला सांगते. तो हुकूम बजावण्यासाठी खंडोजी धावतोही – पण लथाडलेली गृहलक्ष्मी व राजलक्ष्मी परत मिळण्याचा संभवच नाही अशा रीतीनेच संभाजीचा पाय गडाबाहेर पडत होता. या नियतीच्या निर्णयापुढे सर्वांचे प्रयत्न थिटे पडायचे होते.

तिसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत सूर्याजी पिसाळ गणोजीशीं मोठ्या भांडणावर आला आहे. कन्जीनेच आपल्या फितुरीचा बभ्रा केला आणि गणोजीची त्याला साथ, या रागाने सूर्याजी बेभान झालेला आहे. कन्जीच्या चुगलखोरीला गणोजीची आणि मोंगलांची फूस असली पाहिजे याबद्दल त्याला तरी शंका वाटत नाही. परंतु दौलतीशीं निमकहरामी करायचा आपला कन्जीशीं कट नाही; फक्त व्यक्तिशः संभाजीला स्वाधीन करण्यापुरता तो कट आहे याबद्दल प्रत्यक्ष कागदपत्र दाखवून सूर्याजीची खात्री पटविण्याची तयारी गणोजीने दाखविल्यावर सूर्याजीच्या रागाचा पारा थोडा खाली येतो. त्यानंतरच्या समाजवणीच्या बोलण्यांतून लाख मोलाची माहिती कळते की, कन्जी गडावर नाही. शिकारीच्या सोंगाने संभाजीसह तो कोठे तरी गुप्त स्थळीं गेला होता. पण त्याचा मुक्काम संगमेश्वरीं असावा असा सूर्याजीचा कयास होता. कन्जीच्या फितुरीचा वहीम आल्याने येसूबाईने संभाजीला परतविण्याची केलेली खटपट व्यर्थ गेल्याचेंही तो गणोजीला सांगतो. कलुष्टाला मारण्यासाठी खंडोजीने घोडा दामटला होता. पण संभाजीपुढे त्याचें कांही चाललें नाही. म्हणून आता कलुष्टाला वाटेल त्या उपायांनी गारद करून संभाजीला गडाच्या बंदोबस्तांत आणण्यासाठी येसूबाई बरोबर शेलके लढवय्ये शिपाई घेऊन निघाली आहे. ही सर्व बातमी कळून गणोजीला खूप आनंद होतो. नगारे वाजवून तो कुचाची तयारी करतो. मुकर्रबखानाला ताबडतोब संगमेश्वराकडे कूच करायला सांगतो आणि आपण स्वतः राणी येसूबाईला गिरफदार करण्यासाठी रिसाल्याची दौड करायचें ठरवितो. हें काम उरकून आपण खानाच्या आधीच संगमेश्वराला पोचूं अशी गणोजीला उमेद असते.

राजांजवळ हत्याराविना न्याय नाही —

याच्यापुढच्या दुसऱ्या प्रवेशांत संगमेश्वर येथील एका जुनाट वाड्यांत शाहीर आणि चंद्रावळ आपल्याला भेटतात. शाहिराने संभाजीला संगमेश्वरीं आणून ठेवल्याचा सांगावा रायगडीं पाठवून तीन दिवस झाले, तरी अजून गडावरून कोणी येईना, म्हणून शाहीर अत्यंत चिंताग्रस्त होतो. गांवांतून एखादा घोडा पैदा करून आपणच गडावर जावें असें त्याला वाटतें. पण तेवढ्यांत मोंगलांचें धरणें आलें तर राजांचें रक्षण कोणी करावें, या चंद्रावळीच्या प्रश्नाला दैवावर हवाल्याखेरीज त्याच्याजवळ उत्तर नसतें. दैवावर हवालाच टाकायचा तर मग तो संगमेश्वरासच राहून टाकलेला काय वाईट, हा चंद्रावळीचा मुद्दा त्याला मान्य करावा लागतो. आणि मग त्याच्या त्रस्त मनाला थोडा विरंगुळा वाटावा म्हणून चंद्रावळ त्यानेच केलेला एक पोवाडा त्याला म्हणून दाखविते. इतक्यांत खाशाबा येतो. आणि शाहिराची आणि तिची एवढी सलगी पाहून त्या

दोघांचें थोडेंसें खारट तुरट बोलणें होतें. तेवढ्यांत सर्जाबाही तेथे हजर होतो. आणि खाशाबाच्या व सर्जाबाच्या चंद्रावळीबद्दलच्या झालेल्या रंगबाजीच्या गोष्टी स्वतः आड उभा राहून कन्जीने ऐकल्याची वार्ता तो सांगतो. त्यामुळे त्या दोघांचेही पाय लटपटूं लागतात. आता काय करावें हा त्यांना प्रश्न पडतो. एकीकडून संभाजीला गिरफदार करण्याच्या रोखाने निघालेला मुकर्रबखान आणि दुसरीकडून येसूबाईचा मेणा मारायला निघालेला गणोजी दोघेही मध्यान्हीच्या सुमाराला संगमनेरला दाखल होणार असल्याची वार्ताही सर्जाबा, आपण कन्जीच्या हातून निसटण्यासाठी लौकर कांहीतरी केलें पाहिजे हें ठसविण्याच्या दृष्टीने सांगतो.

त्यासाठी सर्वांनी जाऊन चंद्रावळीच्या साक्षीसह संभाजीपुढे फितुरीची फिर्याद गुदरावी ही कातकरी वेशांतल्या शाहिराची कल्पना खाशाबा–सर्जाबांना मानवत नाही. कारण खाशाबाच्या मतें, "राजांजवळ हत्याराविना न्यायच नाही."

अखेर चंद्रावळीची मसलत त्यांना पसंत पडते की, सर्वांनी मिळून रात्रीं चोरून रायगडाकडे पळून जावें. या मसलतीच्या अंमलबजावणीच्या तयारीला ते लागतात. तेव्हा मोंगलांचा हल्ला किती प्रहर रात्रीला येणार याची खबर काढून आणायला चंद्रावळ सर्जाबाला सांगते आणि जवळपास दहापांच कोसांत लपायला निवांत जागा पाह्यला कातकऱ्याला पण मी धाडतें, असें ती त्या दोघांना सांगते. तेव्हा मग ते दोघे जातात.

शाहीर येसूबाईच्या मदतीला —

मिळायला हवी होती ती वार्ता आता मिळाली होती. आता शाहिराने दैवावर हवाला टाकून तेथे राहण्यांत कांही अर्थ नव्हता. म्हणून घोडा पैदा करून रायगडची वाट धरायला चंद्रावळ त्याला सांगते. त्याने राणीसाहेबांच्या मेण्याजवळच्या थोड्या पण नेकदार शिपायांच्या मदतीला जावें हा तिचा विचार असतो.

यानंतर या नाटकांतील एक अत्यंत भावनाविवश करून टाकणारा प्रवेश आपण पाहतों. बैलगाडींत बसून दौलती शिपायाच्या संगतीने खंडोजीची बहीण रायगडावरून आपल्या घरीं परत चालली आहे. मोंगली हेरांनी कन्जीने संभाजीला कोठे गुप्त ठेवलें आहे हें शोधून काढण्यासाठी साऱ्या मुलुखभर जाळें विणलें असल्यामुळे दौलतीला वाट आडमार्गी शोधून काढावी लागली होती. त्या वाटेवरचे ते उंच उंच कडे आणि किर्र रान यामुळे संतुमाई भयभीत झाली आहे. आपण यांतून नीट निभावून बाहेर पडत नाही अशी भविष्यसूचक स्वप्नें तिला पडूं लागलीं आहेत.

दमल्यामुळे तिला निदान डोळ्याला लावायला पाणी मिळावें म्हणून एका मोटेवर दौलती संतुमाईला नेतो. तो त्या शेतकऱ्याकडून त्याला कळतें कीं, आता हेच त्याच वाटेने मोंगली हेर गेले. याच दरम्याला दौलती भीत होता. तेव्हा गाडींतून उतरून त्या शेतकऱ्याच्या घरीं तूर्त संरक्षणार्थ जावें असें ते ठरवितात तोच शाहीर दौडत त्या ठिकाणीं येऊन दौलतीला भेटतो. त्याच्यासारखा जिवाभावाचा नेकदार मराठा साथीला

मिळतो आहे यांत आपल्या कामांत शुंभशकुन आहे असें शाहिराला वाटतें. शाहिराने अशा वेळीं संभाजीची पाठ सोडावी याचें दौलतीला आश्चर्य आणि वाईट वाटतें. पण शाहीर एकटा दोन्हीकडे कसा पुरा पडणार? कारण तिकडे संभाजीचा जीव धोक्यांत होता तर इकडे येसूबाईच्या मेण्यावर हल्ला होण्याची धास्ती होती.

खंडोजीपुढे भयंकर पेच —

अखेर शाहिराने परत संगमेश्वरीं जावें आणि दौलतीने येसूबाईचा मेणा सांभाळायच्या कामगिरीवर राहावें असें ठरतें. आणि मग माईची वाट? तिचा हवाला दैवावर सोपवून त्या शेतकऱ्याच्या हवालीं तिला करून ते दोघे शिपाई जायला निघतात तोच खंडोजी तेथे येऊन पोचतो. केवढ्या तरी पेचांत सापडल्याची खेदकारक जाणीव त्याला होती. "आता या मूठभर मावळ्यांच्या बळावर मी करूं तरी काय? ही दख्खनची पुण्याई मासाहेब संभाळूं की तिकडे तो सिंहाचा छावा – शंभुराजा – फशीं पडतो आहे तिकडे धाव घेऊं" असें त्याला होऊन जातें.

चिटणीसांच्या घराण्यांतील त्याने अशी रडकी भाषा बोलावी याबद्दल संतुमाई त्याला कठोरपणें छेडते. तेव्हा खंडोजी विप्रकृत पन्नगासारखा उसळून मी एकटा ही सगळी जबाबदारी पेलायला तयार आहे असें म्हणतो. पण या प्रसंगीं राणीच्या जीवासाठी आपला प्राण सोडायला तयार होशील का असा थोडा तेढा प्रश्न तो संतुमाईला करतो.

अर्थात तीही खंडोजीची बहीण होती. त्याने आपल्याबद्दल नसती शंका घ्यावी यामुळे तिला जिव्हारीं घाव बसल्यासारखें होतें. वाटेल तो त्याग करायची तिची तयारी असते. भाऊ असा राजीखुशीने खाईंत उडी घालायला निघाल्यावर मागे राहणारी ती नव्हती. हिरकणी कडाडा चावून प्राण देण्याचा हिय्या तिच्या ठिकाणीं होता. आणि प्रसंगांतून निभावून जाण्यासाठी खंडोजीने आपल्या हातांतली हिरकणी तिच्या स्वाधीन केलीही.

राणीच्या रक्षणार्थ खंडोजीच्या बहिणीचा बळी —

त्याच वेळीं येसूबाईचा मेणा तेथे येतो. खंडोजीने बहिणीला हिरकणी दिल्याचें पाहून तिचा जीव थरकतो. खंडोजीने केलेले खुलासे तिला मुळीच पटत नाहीत. एवढ्यांत शत्रूचा घाला अगदी जवळ आल्याची वार्ता टेहळ्या आणतो. त्या वेळीं खंडोजीने माईला हिरकणी कां दिली याचा लख्ख प्रकाश येसूबाईच्या डोक्यांत पडतो. हे भाऊ नव्हत, वैरी आहेत, असें ती वैतागाने म्हणते; त्या कोवळ्या जीवाची कत्तल करून स्वतःचा जीव वांचविण्याची येसूबाईची तयारी नसते; त्या ताणामुळे ती मूर्च्छित होते.

आणि त्यामुळेच खंडोजीचा बेत साधतो. शेतकरी येसूबाईला उचलून घेऊन जातात. माई येसूबाईच्या मेण्यांत बसून खंडोजीचा अखेरचा निरोप भावभराने घेते. आणि खंडोजी संगमेश्वरीं जाण्यासाठी दौडतो.

इकडे भोई संतुमाईसह मेणा उचलूं लागतात. तोच गणोजी शिर्के शिपायांसह तेथे येतो. थोड्याशा चकमकीनंतर तो मेण्याचा कब्जा घेतो. "अभी संभाजीपर हल्ला ! चालवा मामासाहेबांचा मेणा" असें मोठ्या फुशारकीने म्हणत तो पुढे चालू होतो. जखमी झालेल्या नाइकाच्या उद्गारावरून उघड होतें की, राणी गणोजीच्या तावडींत सापडलेली नाही. संतूमाईने तिच्यासाठी आपल्या जिवाचा होम केला.

औंधकरांनी हा प्रवेश अत्यंत हळुवार हातांनी रंगविलेला आहे. त्याच्या पार्श्वभूमीवर दगलबाज कब्जी आणि आता थोडे डोळे उघडूं लागलेला संभाजी यांच्यामधील पुढचा चवथा प्रवेश फार परिणामकारक होतो.

कब्जीच्या पोटांतसुद्धा धडकी —

त्या रात्रीचा भयाणपणा कब्जीसारख्या उलट्या काळजाच्या माणसालाही संगमेश्वर येथे जाणवतांना आपण पाहतों. मोगलांच्या येण्याची तो सारखी वाट पाहतों आहे. त्या वेळीं अपशकुनी आवाजाखेरीज दुसरें कांही त्याला ऐकूं येत नाही. इतकी तो करीत असलेल्या पापाची जणू त्यालासुद्धा धडकी भरली आहे. खंडोजीच्या प्रयत्नांना आता यश येणार नाही असें आश्वासन तो आपल्या धडधडत्या हृदयाला देत आहे, तोच तुळशी येऊन वाड्यांत संभाजी निजला होता त्या दिवाणखान्याच्या मागच्या बाजूला दाणादाण वाजलेलीं पावलें आणि "राजा वैऱ्याची रात्र आहे सावध राहा" असे खोल आवाजाने उच्चारलेले शब्दही ऐकूं आल्याची हकीगत भयभीतपणे कब्जीला सांगते. ती हें सांगत असतांनाही तोच आवाज पुन्हा ऐकूं येतो आणि संभाजीलाही जाग येऊन, "कोण वैऱ्याची रात्र आहे म्हणून पुकारतें आहे ?" असें तो म्हणत असल्याचें ऐकूं येतें. कब्जी घाईघाईने तिकडे जायला निघतो आणि पडदा वर जाऊन झोपेंतून उठलेला संभाजी आपल्याला दिसतो. वैऱ्याची रात्र आहे सावध राहा, या त्या आरोळ्यांनी एकदम गडावर कब्जीच्या फितुरीबद्दल राणीने केलेल्या गाऱ्हाण्याची संभाजीला आठवण होऊन तो अस्वस्थ होऊन कब्जीला पुकारतो.

संभाजी आशंकित होतो —

संभाजीला भास झाला असेल अशी कब्जी संपादणी करतो. स्वप्नांत छत्रपतींची स्वारी येऊन त्यांनी त्याला सावध होऊन स्वतःच्या राजवटीचा मार्ग स्वीकारायला तळमळून सांगितलें आणि त्याच वेळीं हा पुकारा ऐकूं आला. त्यावरून साता पाहऱ्यांच्या बंदोबस्तांतून उमटणारे ते अचंब्याचे शब्द आणि "संभ्या जागा हो, आणि राजवटीचा मार्ग धर" ही स्वप्नांतील छत्रपतींची सांगी, आणि "जिवलग जिवांच्या गाठीभेटी अंतरतील" ही राणीची करुण वाणी या सगळ्याची सांगड घालून संभाजी थोडासा आशंकित होतो. कब्जीच्या भुताखेतांच्या बातांवर त्याचा विश्वास बसत नाही, आणि त्याच घडीं रायगडीं कूच व्हायला पाहिजे असा तो निर्णय करतो. कब्जीच्या नसत्या

शंकाकुशंकांना तो धुडकावून लावतो आणि जिवासाठी नाही, पण रियासतीच्या तोलासाठी रायगडावर जाण्याची आपण जलदी केली पाहिजे अशी त्याच्या जिवाची तळमळ होते. पण कन्जी थंड राहून हुकुमाची ताबिली करण्याची अळंटळं करतो हें पाहून शेषाचें सोंग धरून कालिया तर आमचे भोवती घोटाळत नाही ना असा संशय त्याच्या मनांत जोरावतो आणि तो पुन्हा लगबगीने रायगडीं जायला निघण्याबद्दल कन्जीला हुकूम देतो.

कन्जी हुकुम मानीत नाही —

खाशाच्या हुकुमाची ताबिली करतां येणार नाहीं हें कन्जीचें उत्तर ऐकून संभाजी संतापाने बेभान होतो. मोठ्या सायासाने जमविलेली मंत्रसिद्धीची योजना यशाच्या जवळ येऊन ठेपली असतांना असें मध्येच निघून जाणें योग्य नाही अशी संपादणी तरीही कन्जी करतो हें पाहून, "सर्वांना लाथाडून तुझी सोन्नत केली त्याचे पांग असे फेडतोस" असें म्हणून संमाजी त्याच्या अंगावर जाऊन त्याच्या नरडीला हात घालतो. तरीही "कोण शाबीत करतो मी फितूर आहें म्हणून!" असें ताठ्याने म्हणायला कन्जी कमी करीत नाहीच.

दैवाची वक्र गति —

त्याच वेळीं चंद्रावळ पुढे होऊन कन्जीच्या फितुरीची हकीकत सांगू पाहते. तोच बाहेर लढाईची धुमश्चक्री चालल्याचे आवाज ऐकूं येतात आणि खंडोजी खिडकींतून आंत उडी घेतो. मुकर्रबखानाच्या सैन्याने वाडा घेरला होता. महाराष्ट्राचें वाटोळें होण्याची घटका जवळ आली होती. गाईब्राह्मणांच्या प्रतिपाळ ही छत्रपतींच्या ब्रीदाची भोळी श्रद्धा याही वेळीं संभाजीला सोडीत नाही. कन्जीच्या कारस्थानाबद्दल खात्री होऊनही "मरणकाळीं तरी हातून ब्रह्महत्या नको व्हायला" म्हणून त्याला संभाजी लाथ मारुन घालवून देतो. खंडोजी आणि संभाजी दोघेजणच खिडकींतून बाहेरच्याशीं लढा देण्याचा यत्न करतात. त्यांतला फोलपणा जाणून चंद्रावळ तिने हेरलेल्या भुयाराच्या मार्गाने त्यांना तेथून तडक निघून जायला सांगते. संभाजीला ही गोष्ट नामुष्कीची वाटते. पण गनिमी काव्याशिवाय अशा वेळीं निभाव नसल्याचे सांगून खंडोजी संभाजीला त्या मार्गाने नेण्याचा यत्न करतो. वाट दाखविण्यासाठी चंद्रावळ भुयारांत आधी उतरते; मागोमाग खंडोजी उतरतो आणि संभाजीला हात देऊन तो भुयारांत घेणार तोच भुयाराच्या दारावर भिंत कोसळून खंडोजी खाली दडपला जातो आणि संभाजी वर वाड्यांतच राहतो. दैवाची वक्र गति ही अशी नडक होते.

त्याच वेळीं सूडभावनेने पिसाटलेला गणोजी तेथे येतो. एकट्या संभाजीचा त्याच्या सैनिकापुढे किती वेळ निभाव लागणार? थोड्याच वेळाने संभाजी गिरफदार होतो. गणोजीचा तो उग्र वचनांनी अपमान करतो आणि त्यामुळे चिडून संभाजीला ठार

करायला गणोजी धावतो. पण त्याचा हा हेतु तडीला जाऊं देण्याइतका मुकर्रबखान गाफील नव्हता. बादशहाचा हुकूम संभाजीला जिवंत पकडून घेऊन येण्याचा होता याची आठवण गणोजीला देऊन त्याला तो संभाजीचा वध करूं देत नाही. संभाजीने इस्लामी धर्म स्वीकारला तर बादशहा त्याला जिवंत ठेवणार हें ऐकून गणोजीचें मस्तक भिरभिरूं लागतें. संभाजीला बादशहा जिवंत ठेवणार आणि जातगोताची दावेदारी पत्करून परक्यांची मोहबत ज्या सूडासाठी केली त्या सूडाचें काय होणार या विचाराने तो वेड्यासारखा होतो.

गणोजीला पश्चाताप —

गणोजीच्या या मनस्थितींतच मौलवीच्या वेषाने जाऊन खंडोजी भेटतो. त्याला साह्यभूत करून संभाजीची सुटका करतां येईल का हें खंडोजीला पाह्यचें होतें.

सूडापरी सूड घेतला नाही; स्वकीयापरी स्वकीय अंतरले; परके ते परके झाले; आणि आपण मात्र अफाट जगांत एकटे पडलों – अशा प्रकारच्या आत्मदोषदर्शनाच्या जाणिवेने गणोजीचें मन हळुवार झालेलें होतें. त्याच वेळीं मौलवीच्या वेषांत खंडोजी येतो आणि तो मुसलमान आहे याचें भान न राहून, बाहेरची संभाजीला पकडल्याची दवंडी ऐकून गणोजी "ऐका, ऐका हा, परकीयांच्या मोहबतीपायीं आम्ही हिंदु लोक स्वकीयांचीच कशी राखरांगोळी करतो, त्याचा हा डांगोरा नीट कान देऊन ऐका" असें बोलतो. संभाजी ही व्यक्ति आणि संभाजीचें राजेपण यांतला फरक आपल्याला उमजला नाही म्हणून तो फार कष्टी होतो. आपण मोंगलाविरुद्ध चिडीने बोलत असतांही मौलवी आपल्याबद्दल अत्यंत हळुवार सहानुभूति बाळगतो हें पाहून हा तसा वेष धारण केलेला कोणी मराठा तर नाही, अशी शेवटीं गणोजीला शंका येते, आणि गणोजीच्या पश्चातापाने जळणाऱ्या अंतःकरणाचा विश्वास वाटून खंडोजी त्याला आपलें स्वरूप आणि तेथे येण्याचा हेतु दोन्ही उघडे करून सांगतो. गणोजीने पापक्षालनासाठी संभाजीची सुटका करावी असें तो सुचवितो. परंतु शौर्याच्या बळावर संभाजीची सुटका करण्याची संधि दुर्दैवाने मुळींच राहिली नव्हती. कांही तरी कारस्थान रचल्यावाचून सोप्या उपायाचा कांही अर्थ नव्हता. असें कांही कारस्थान औरंगजेबाच्या लाडक्या लेकीची भेट मिळवितां आली तर रचतां येईल ही खंडोजीची मसलत गणोजीला चांगली वाटते. पण ही धडपड यशाला येईल अशी त्याला खात्री वाटत नाही. आणि संभाजीचें वेडेंवाकडें झालें तर बहिणीला तोंड दाखवायची आपल्याला छाती होणार नाही आणि मराठ्यांचाही आपल्यावर विश्वास बसणार नाही, म्हणून नाईलाजाने आपल्याला असेंच मोंगलांच्या कळपांत राहण्यावांचून गति नाही असें तो निराशेने म्हणतो.

कालचक्राला क्षमा मंजूर नाही —

आणि मग या नाटकांतील शेवटचा आजवर अनेकांना चटका लावून राहिलेला आणि

अनुक्रमांक 23360 दि. ... संकेतांक ... संभाजीसांकेतांक ...72-74... नोंद दि. ...

पुढेही नेहमी असाच चटका लावून राहील असा प्रवेश. औरंगजेबाच्या छावणींत संभाजी बेड्या घातलेला, कैद्याच्या वेषांत बसलेला आहे. मरणकाळच्या शेवटच्या घटकेची छाया पडल्यामुळे त्या लढवय्याच्या तोंडून सुद्धा आता काव्यगंगा स्रवूं लागली आहे; महान तात्त्विक बोल बाहेर पडूं लागले आहेत. अंतर्निरीक्षणाने आपल्या सर्व दोषांची हळहळती स्मृति त्याला होऊं लागली आहे.

सृष्टीची उलथापालथ झाली नाही ना ? मुंग्यांनी मेरू पर्वत गिळला नाही ना ? वडवानळाने समुद्र जाळला नाही ना ? अशा रीतीने आपल्या कमनशिबी जीवनाचें चित्र त्याच्या डोळ्यांसमोर उभें राहतें. " मनाचा मानी, माथ्याचा संतापी, क्रूर कर्दनकाळ तूं ! तब्येतीने सीधा असलास तरी अकलेने आडदांड निपजलास ! माणसांची पारख चुकलास ! संगतीची निवड हुकलास ! भले भरडलेस, खोटे कंठीं धरलेस ! " असा स्वतःच्या दोषांचा कठोर पाढा वाचून तो " कालचक्राला क्षमा मंजूर नाही " असा तात्त्विक निष्कर्ष काढतो आणि स्वतःला देहांताची शिक्षा फर्मावितो.

आपण दुःखी केलेल्या, अवमानलेल्या सज्जनांची आठवण होऊन त्याचें अंतःकरण तळमळतें. त्या तळमळींत त्याला खंडोजीची तीव्र आठवण येते. आणि त्याच वेळीं अन्न पोचविणाराच्या हीन वेषांत खंडोजी तंबूंत आल्याचें पाहून त्याचें हृदय दुभंगल्यासारखें होतें. खंडोजीसारख्या थोर थोर स्वामिभक्तांचें आपल्याला चीज करतां आलें नाही हें खंडोजीच्या या स्थितींत येण्याने विशेषच उमगून संभाजी, विलक्षण कष्टी होतो. " चिटणीसांनी आपल्या अंगावरील कातड्याचे जोडे शिवून भोसल्यांच्या चरणीं घातले तरी फिटायचे नाहीत इतके चिटणीसांवर छत्रपतींचे उपकार आहेत ! मग अशा प्राणांतिक संकटांत खंडोजीने धन्यासाठी नको का उडी घ्यायला ? " या खंडोजीच्या प्रश्नाला, या शंभुराजासाठी मराठ्यांनी आता कोणताही शीण घ्यायला नको असें संभाजीचें निर्वाणीचें उत्तर येतें. तो कळकळीने खंडोजीला सांगतो, " ह्या नालायक राजासाठी आयुष्याची माती करून घेऊं नकोस. सुखाने रायगडीं जा. राजारामराजांना सांग, म्हणावें तुम्हीच आता दौलतीचे धनी ! "

येसूबाईला आणि बाळराजांना, " आपल्या मरणाची वार्ताच त्यांना लौकरच ऐकायला मिळेल " याहून दुसरा निरोप सांगायला त्याला तोंडच उरलें नव्हतें.

मरणकाळची निरवानिरव —

अशा तऱ्हेने खंडोजीसमोर संभाजीने मरणकाळची निरवानिरव चालवली होती. " जगण्यासारखें जवळ कांही उरलें नाही म्हणून मरण पत्करायचा " त्याने निर्धार केला होता. त्यामुळे खंडोजीला आपल्या जागीं बसवून स्वतः त्याने निसटून जावें ही मसलत त्याला मानवत नाही. झिबुन्निसाबाईची मर्जी संपादन करून संभाजीला दरम्यानच्या चारदोन दिवसांत सोडविण्याचा खंडोजीने बांधलेला चंगही त्याला पटत नाही. " अवघी उमर दुर्लौकिकांत गमाविलेल्या तुझ्या या धाडशी धन्याला मरतां मरतां जरासा

चांगुलपणा जर कोणत्या दिव्याने लाभणार असेल तर तो आता एक मरणानेच" असें संभाजी खंडोजीला निर्वाणीचें सांगतो. परंतु जनतेच्या हितासाठी तरी संभाजीने जगलेंच पाहिजे हा खंडोजीचा विचार त्याला त्याही क्षणीं दूर सारवत नाही. बंदिवासांतून सुटलोंच तर स्वतःच्या हातांनी राजारामाची गादीवर स्थापना करून आपण आपल्या पापांचें क्षालन करूं असा आशेचा एक अंधुक कवडसा त्याच्या चित्तांत चमकून जातो. पण अशा सुटकेचा भरंवसा त्याच्या जाणत्या मनाला मुळीच येत नाही. आणि म्हणून खंडोजीच्या प्रेमाखातर खंडोजीला "माय भवानी तुला यश देवो" असा तोंडभर आशीर्वाद जरी तो देतो तरी अंतर्यामीं त्याला ग्वाही मिळत होती की, "पातक्या हवेंतल्या बुडबुड्याहून तुझ्या वाणीला अधिक काय किंमत आहे?" आणि शिक्षा फर्मावितो जाण्याला चारपांच दिवसांचा अवधि न लागतां आधीच आपलें मरण ओढवणार असें त्याचें मन त्याला सांगू लागतें.

कब्जीची वाट कोरिओलेनेससारखी —

खंडोजी तेथे येऊन गेल्याचा संशय कब्जीने व्यक्त केल्यामुळे मुकर्रबखान चौकशीला येतो. पण संभाजी त्याच्याशीं एक अक्षर बोलत नाही, त्याच्याकडे ढुंकून पाहतही नाही. औरंगजेब संभाजीचा हा दिमाख पाहून निहायत खूष होतो. संभाजीसारखा बहादूर राजा मुसलमान होईल तर सारा भारत मुसलमान व्हायला बिलकूल अवधि लागणार नाही असें त्याचें धर्मवेड त्याला सांगतें. इतक्या उमद्या मनाच्या माणसाशीं कब्जीने इतका विश्वासघात करावा याची कांही खरी आणि कांही राजकारणी सोयीची किळस दाखवून औरंगजेब कब्जीला ठार करण्याची शिक्षा फर्मावतो. अशा रीतीने कोरिओलेनेसमध्ये कोरिओलेनेसचें ओढवलें तसें मरण कब्जीच्या वाट्याला येतें.

औरंगजेबाशींही संभाजी बोलत नाही. संभाजीने मुसलमान धर्म स्वीकारला तर त्याला बडा नबाब बनविण्याची औरंगजेब लालूच दाखवितो. पण त्याला बळी पडण्याइतका संभाजी लेचापेचा नव्हता. म्हणून स्वधर्मासाठी मृत्यूला कवटाळायला आपण तयार असल्याचा जबाब तो बेदरकारपणे देतो. आणि नाना प्रकारच्या क्रूर शिक्षांची धमकी औरंगजेब देत असतां,

"कृतांत काळ बनून कशाही हालअपेष्टा कर. मराठ्यांच्या बेबंदशाहीला कारण झालेला हा छत्रपती संभाजी स्वधर्मासाठी प्राणांची आहुति देऊन हिंदुपदपादशाहींत एकीचा नवा जोम निर्माण केल्यावांचून राहत नाही" अशी निर्भय घोषणा संभाजी करतो.

येथे या करुण नाटकाचा शेवट होतो. संभाजीच्या आडदांड आणि संशयी स्वभावामुळे दौलतींत माजलेल्या बेबंदशाहीविरुद्ध सामना करण्यासाठी जिवावर उदार झालेल्या सर्वांचा पराभव होतो आणि त्या बेबंदशाहीच्या परिणामीं संभाजी राजा प्राणाला मुकतो.

संभाजीच्या स्वभावाची चढती रंगत —

संभाजीच्या स्वभावाच्या विशुद्धीकरणाची चढती रंगत औंधकरांनी कशी साधली आहे हें आपण पाहिलें. पण त्यामध्येही त्याच्या शौर्यधैर्यापेक्षा, मुत्सद्देगिरींतील कौशल्यापेक्षा किंवा श्रेष्ठतेपेक्षा विशिष्ट मानवी गुणांच्या उत्कटतेवरच त्यांनी भर दिलेला आहे. त्याचा साधासुधा शिपाईबाणा, राणीचा त्याच्यावरील दबदबा आणि तिचा आदर आणि मान संभाळण्याचा त्याचा आटोकाट प्रयत्न, व्यसनांधतेंतही न लोपणारी सत्यप्रियता व न्यायप्रियता या गोष्टींनी आणि अतिरेकाने दोषांत परिणाम झालेल्या त्याच्या स्वाभिमानादि गुणांनीच औंधकरांनी संभाजीबद्दल आपल्या मनांत जिव्हाळा, आपुलकी व हळहळ निर्माण केली आहे. त्यांतही वेळोवेळच्या त्याच्या उच्च मानवी गुणांच्या दर्शनाच्या जोडीला अखेरीअखेरीस त्याचे डोळे पूर्ण उघडतात, पश्चातापाने तो होरपळून निघतो आणि नियतीला किंवा विरोधकांना दोष देण्याऐवजी, स्वतःचीच नादानी आपल्या सगळ्या अधःपाताला आणि नाशाला कारण झाली आहे असें अगदी मनमोकळेपणाने मान्य करतो, तेव्हा आपल्या मनांत त्याच्याबद्दल अपार सहानुभूति उत्पन्न होते आणि त्याचे सर्व पूर्वापराध विसरून संभाजीवर असा प्रसंग यायला नको होता असें आपण मनांतल्या मनांत हळहळून म्हणूं लागतों.

वैयक्तिक अहंकार जाऊन समधातता —

आतापर्यंत आपण करुण नायकांचें जें चित्रण पाहिलें त्यापेक्षा औंधकरांनी थोडी निराळी पद्धति चित्रणाची अंगीकारली आहे. संभाजीच्या ज्या दोषांमुळे त्याचा नाश ओढवला त्यांचें आणि त्याच्या प्रतिकूल दैवयोगाचें दर्शन अतिशय ठसठशीतपणाने करून देण्याचें आपलें साध्य साधीत असतांनाच त्यांनी संभाजीच्या मानवी सद्गुणांचें, न्यायी बुद्धीचें, सत्यप्रियतेचें, रयतेविषयीच्या जिव्हाळ्याचें प्रत्यक्ष दर्शनही पुन्हा पुन्हा घडवीत संभाजीचा स्वभाव अधिकाधिक विशुद्ध होत गेल्याचें चढत्या क्रमाने त्यांनी दाखविलें आहे आणि नाटकांत परिणामकारकपणा निर्माण केला आहे. नायकाच्या ठिकाणची क्षुद्र स्वार्थपरायणता कमींतकमी करीत जाऊन क्रमाक्रमाने तो सामुदायिक, विश्वात्मक प्रेमाच्या, सहानुभूतीच्या आर्द्रतेचा भागीदार होत आहे आणि त्याच्या ठिकाणचा वैयक्तिक अहंकार धुऊन जाऊन त्याला समधाततेची अवस्था प्राप्त होत आहे हें दाखवून एक उत्कृष्ट करुण नाटकाचा नमुना औंधकरांनी आपल्यापुढे उभा केला आहे.

एक गोष्ट या ठिकाणीं जातां जातां नमूद करावयाची. शेक्सपीअरचें दुसरा रिचर्ड हें नाटक, विशेषतः त्यांतील रिचर्डने संभाजीप्रमाणेंच शत्रूच्या तुरुंगांतून निसटून जाण्यास दिलेल्या नकाराचा शेवटचा प्रवेश, यामध्ये पुष्कळसें साम्य आहे. रिचर्डचा मद्यपीपणा, व्यसनांधता, त्यामुळे होणारें राजकारणाकडे दुर्लक्ष आणि हलक्या लोकांवर विश्वासून राहणें या बाबतींत संभाजीचें रिचर्डशीं पुष्कळ साम्य आहे. परंतु संभाजी-

मध्ये जे अंतःकरणाचे पुष्कळ श्रेष्ठ कप्पे औंधकरांनी दाखविले आहेत ते रिचर्डच्या ठिकाणीं मुळींच नाहीत हा त्या दोघांत आणि त्यांच्या चित्रणांत मोठाच फरक आहे.

शिवशाहींतील वातावरणाचा आभास उत्पन्न करण्याच्या हेतूने औंधकरांनी नाटकाच्या भाषेला अगदी निराळा थाट मोठ्या यशस्वीपणाने दिला आहे. बखरींतील किंवा ऐतिहासिक कागदपत्रांतील किंवा आज्ञापत्रांतील भाषेशीं काटेकोर तुलना करून पाहतां बेबंदशाहींतील भाषा त्या काळच्या भाषेसारखी नाही आणि म्हणून ती हेंगाडी, अस्वाभाविक आणि कृत्रिम आहे असा पंडिती दावा करतां येणार नाही असें नाही. परंतु औंधकर हे कांही कोणी भाषापंडित म्हणून तत्कालीन भाषा वठवायला सिद्ध झालेले नव्हते. तथापि संभाजी नि येसूबाई, राजाराम नि ताराबाई, खाशाबा आणि शाहीर हीं माणसें, आंग्ल भाषेशीं परिचय होऊन कांहीसें रुक्ष पुस्तकी वळण लागलेल्या मराठी भाषेंत बोलूं लागतीं तर तें अधिकच कृत्रिम झालें असतें. म्हणून थोडासा जुन्या भाषेचा आभास निर्माण करून आपण चालू शतकांतल्या माणसांच्यीं भाषणें ऐकत नाही आहोंत एवढा पुरेसा ठसा आमच्या मनावर उठविण्यांत औंधकरांना यश प्राप्त झालें आहे. ऐतिहासिक व्यक्तींचा आभास अधिक बळकट करण्यासाठी त्यांनी भाषणें कांही ठिकाणी खूपच पल्लेदार योजिलीं आहेत; तर खटकेबाज संवादही मधूनमधून त्यांनी कांही कमी योजले नाहीत. काव्यमयता त्यांच्या बहुतेक श्रेष्ठ पात्रांच्या भाषणांत आढळते. भावगंभीरता जसजशी वाढत जाते तशी ही काव्यमयता पण अधिक ओजस्वी होत जाते. सुंदर काव्याचें अर्थान्तरन्यासप्रचुरता हें जर एक चांगलें गमक असेल तर अशीं हृद्य अर्थान्तरन्यासाचीं उदाहरणें या नाटकांत आपल्याला जागोजाग विखुरलेलीं आढळतील.

प्रकरण बाविसावें

बॅरिस्टर विश्राम

आचार्य अत्रे यांचें उद्यांचा संसार हें नाटक या प्रकरणांत पाहावयाचें आहे. आणि या नाटकाचा नायक बॅरिस्टर विश्रामच आहे की अन्य कोणी आहे, याचा शोध घ्यावयाचा आहे. म्हणून प्रथम नाटक पाहूं आणि मगच इतर प्रश्नांबद्दल विचार करूं.

पहिल्या अंकांत बॅरिस्टर विश्रामच्या घराच्या दिवाणखान्यांत विशेष शानदार पोशाख केलेला विश्रामाचा मुलगा शेखर आणि शेखरची आई करुणा यांची आपली भेट होते. मुलगा एवढा ऐटीचा पोशाख करून कोठे जात आहे याची अंधुक कल्पना आईला आहे. पण तिने विचारल्यावर मात्र तो उडवाउडवीचीं उत्तरें देतो. आपल्या मुलाने आपल्याशीं मोकळेपणीं आणि खरें बोलूं नये याचा तिला विषाद वाटतो. परंतु हें खोटें बोलायला लावणारें मुलांचें तारुण्य असतें हें तिला अनुभवाने उमगलेलें आहे. आणि म्हणून " सांग पाहूं खरें ! म्हणजे कुणाच्या प्रेमपाशांत सापडली आहे स्वारी हें कळेल तरी ! " असें ती त्याला नाजुकपणें छेडते.

तरीही तो अळंटळं करतो. तेव्हा त्याच्या प्रेयसीचें नांव 'नयना' आहे असें करुणाच सांगते. मग मात्र तो स्तंभितच होतो. त्याने नयनेला लिहावयाला घेतलेल्या पत्रांतील एक कागद खिडकींतून उडून खाली बागेंत जाऊन पडलेला करुणेला सापडतो. आणि त्यावरून तिने कांही अंदाज बांधलेले असतात. अशा शेखरच्या कांहीशा बावळटपणाने त्याच्या प्रेमप्रकरणाचा थोडासा अवेळींच स्फोट होतो.

काव्याने तरुण मुली फसतात —

त्यामुळे, पत्रांत आपण लिहीत होतों तें कांही सगळें खरेंच होतें असें नव्हे, त्यांत काव्यच पुष्कळसें होतें, अशी संपादणी शेखर करूं पाहतो तेव्हा,

" मला माहीत आहे तें काव्य ! याच काव्याने मुली फसतात ... प्रेम सत्य आहे– चिरंतन आहे असें म्हणतात ! कुणाला असा अनुभव येत असेल जगांत तो येवो ! " असें करुणा निराशाभराने म्हणते. जणू आपल्या स्वतःच्या जीवनाचा करुण विपाकच ती सूचित करीत होती.

अर्थात शेखरला वयोमानानुसार हें पटत नाही. " प्रीतीविना ना सुख जीवना, कळलें मना ! " या प्रेमवेडांतच तो रंगलेला आहे. मग तर करुणा आपल्या स्वतःच्या जीवनांतील पंचवीस वर्षांपूर्वीच्या शेखरच्या वडिलांच्या तशाच भावनेचा निर्देश करते आणि त्यामुळे खरोखर करुणा आणि शेखरचे वडील यांच्या जीवनाबद्दल कुतूहल आपल्या चित्तांत उत्पन्न होतें.

आईचें प्रेम शेखरला मान्य आहे. परंतु जग मंगल आहे हें आईमुळें त्याला जाणवलेलें असलें तरी जग मनोहर आहे हा प्रत्यय त्याला त्याच्या नयनामुळेच आला होता. अशी ही त्याची नयना आहे तरी कोण, हें पाहण्याची अर्थातच करुणेला उत्कंठा वाटते. पण ती कोण आहे, आईला ती आवडेल की नाही हें शेखर कांही सांगतच नाही. परंतु आपण तिलाच भेटायला जात आहों आणि तिला दाखविण्यासाठी घरींच घेऊन येऊं एवढेंच सांगून वडिलांपासून तूर्त ही गोष्ट लपवायला आईला सांगून शेखर निघून जातो.

त्याच्या त्या प्रेमभराने करुणा खिन्न होते. माणसें पतंगासारखीं या प्रेमदीपावर कां झेप घेतात हें कोडें तिला सुटत नाही. या मनःस्थितींत ती असतांना विश्रामचा मित्र डॉ. गौतम हा तेथे येतो. तो येत आहे तोच शेखर दुसरीकडून जात होता. गौतमाला तर वाटलें की विश्रामच गेला. इतका शेखर हुबेहूब विश्रामसारखा दिसूं लागला होता.

पण खरोखर तो होता शेखर. त्यावरून शेखरच्याच वयाचा विश्राम असतां-वेळची विश्रामची शेखरसारखीच रंगेल वृत्ति गौतमाला आठवते; सध्याच्या विश्रामच्या जीवनाचा पट त्याच्या डोळ्यांसमोर सरकतो आणि "या तरुण मंडळींचं नेहमी भय वाटतं" असें डॉ. गौतम चिंतेने म्हणतो. पण दुसऱ्याच्या अनुभवाने जगांत कोणी शहाणें होत नाही आणि त्यामुळे आपल्याला सगळ्या आयुष्याचेंच भय वाटतें, असें करुणा त्यावर निराशेचे उद्गार काढते. तेव्हा पुन्हा करुणा आणि विश्राम यांच्या जीवनाचें गूढ उकलण्याबद्दल आपली उत्सुकता बळावते. परंतु करुणेच्या मनाला दुःख नको म्हणून डॉ. गौतम तो विषय बदलतो. डॉक्टरची पत्नी, तिचा कंटाळवाणा आजार, घरोघर त्याच त्या विस्तवाने – म्हणजे पतिपत्नीमधील वेदनावाने – धुमसणाऱ्या चुली, वगैरे गोष्टी होऊन करुणेची मुलगी शैला हिचा विषय निघतो.

शैलाची मनोबाधा —

एम. ए. झालेल्या या मुलीला अलीकडे पुरुषांना शिव्या देणारीं व्याख्यानें देण्याच्या साथीची जणू बाधा झाली होती. डॉ. गौतमच्या मताने या रोगावर एकच औषध. तें म्हणजे मुलींचीं लग्नें करून टाकणें. पण शिकवून मोठ्या केलेल्या मुलींचीं लग्नें जुन्या पद्धतीने आईबापांनीच जुळवीत बसणें हें करुणेला अप्रशस्त वाटतें.

डॉ. गौतम कबूल करतो की, आपण जुन्या मताचे आहों. धड नवेंही नाही आणि धड जुनेंही नाही अशी हल्लीच्या पिढीची धरसोडी वृत्ति त्याला पसंत नाही. या वृत्तीमुळे मुलींना वाटतें, आईबाप आपलें लग्न जमवितील; आईबापांना वाटतें, मुली परस्पर पाहून घेतील. आणि या मुलींच्या – प्रौढ कुमारिकांच्या भवितव्याची भीति वाटायला लागण्याजोगी अवस्था आहे असें डॉ. गौतमाला वाटतें.

एवढ्यांत डॉ. गौतमाला समाज – स्वास्थ्य मासिकाचा अंक टेबलावर आढळतो.

भिंतीवर ओलेतीचें चित्र दिसतें. घरांतील वातावरणांत ही नवीन प्रगति पाहून गौतम अधिकच खिन्न होतो. आणि न राहवून विश्रामचें हल्ली कसें काय चाललें आहे हा प्रश्न तो विचारतोच.

विश्रामची ओळख —

विश्रामचें गेलीं अठरा वर्षें जें चालू होतें तेंच अजून चालू होतें. कोर्टांत तरी तो वेळेवर जातो की नाही हेंही निश्चित सांगण्यासारखें नव्हतें. घरांत तर त्याचा पायच ठरत नव्हता. घरांत करमण्यासारखें त्याला कांही नव्हतें. एक बायको सोडली की जगांत विश्रामला सारेच मित्र असें करुणा तीव्र स्वराने म्हणते. ज्या बाईच्या नादाने विश्रामच्या जीवनांत हें परिवर्तन झालें होतें ती बाई मरून सहासात वर्षें होऊन गेलीं होतीं. पण करुणा म्हणते त्याप्रमाणे अशा माणसाला त्याचें काय—"एक गेली तर दुसरी ! कोण विचारतें आहे त्यांना !"

वास्तविक मुळांत विश्राम किती शांत, सुशील, प्रेमळ व आनंदी ! कॉलेजांत जाई-पर्यंत ही त्याची वृत्ति कायम होती. पुढे करुणेच्या वडिलांसारखा आधार त्याला मिळाला. एकुलती एक मुलगी पत्नी मिळाली. गरीब असला तरी कर्तबगार म्हणून या तरुणाला सासऱ्याने हाताशीं धरलें. त्याला विलायतेला जायला पैसा दिला. पण तें विलायतेला जाणेंच दुर्दैवाचें ठरलें. विलायतेहून लग्न करून गोरी बायको घेऊन विश्राम आला. त्या गोऱ्या बाईची समजूत काढण्यासाठी पन्नास हजार रुपयांचा मलिदा चारावा लागला. परंतु ती बाई गेली तर दुसरी आली. आणि अठरा वर्षें अशी संसाराची परवड करुणेने मोठ्या सहनशीलतेने सोसली. आता मात्र तिला अगदी उबग आला होता. घरांतून चालतें व्हावें असें तिला वाटूं लागलें होतें. पण "संसाराचा डाव मनासारखा जमला नाही, म्हणून तो वाटेल तेव्हा उधळून टाकतां येत नाही," यामुळे करुणा अडकून गेली होती. कसल्याही हालअपेष्टा सहन करायला धीर देणारा पतिप्रेमाचा आधार करुणेला मुळीच नव्हता. दोन मुलें चांगलीं होतीं. त्यांच्या आशेवर दिवस काढायचे. पण तीं आता शिकून सवरून करतीं झालेलीं. आपलें तीं ऐकतील की नाही हें भय, यामुळे "आमचा संसार म्हणजे पोकळ डोलारा आहे झालं; कधी कोसळून पडेल याचा नेम नाही" असें करुणा निराशेने म्हणते.

करुणेच्या संसाराचा डळमळीत डोलारा —

तोच विश्रामचा बटलर रसूल, दुकानदाराचा भय्या पैसे मागायला आला आहे आणि उद्या यायला सांगितलें तरी जात नाही, असें सांगत येतो. अशा रीतीने गौतमच्या समोरच करुणेच्या संसाराचा डोलारा किती डळमळीत आहे याचें प्रदर्शन घडतें. भय्या दीडशे रुपये मागत होता. गौतम शंभराची नोट रसूलला देऊं लागतो, भय्याची कटकट संपवावी म्हणून. पण करुणेला तें असह्य होतें,. रसूलच्या हातून करुणा नोट

हिसकावून घेते. तोच भय्याला "चले जाव ! लाथ मारीन पुन्हा इथे आलास तर" असें बाहेरच्या बाजूला गुरकावीत, शेहचाळीस सत्तेचाळीस वर्षांचा, दारूने झिंगलेला, वयाच्या मानाने तरुण दिसणारा बॅरिस्टर विश्राम आंत येतो.

भय्याला शिवीगाळ चालूच असते त्याची. आगकाडी पेटत नाही म्हणून चिडतही असतो तो. त्याचें प्रदर्शन गौतमसमोर पाहून करुणा शरमते. त्याला आंत जाऊन कपडे काढायला ती सांगते. पण तिच्या हातांत नोट पाहून विश्राम ती हिसकून घेतो आणि म्हणतो,

"कुठून आणलेस हे पैसे? यू लायर! आणि सकाळीं मला म्हणालीस पैसे नाहीत काय?" आणि डॉ. गौतमने ती नोट दिली आहे हें कळल्यावर "माझ्या बायकोला पैसे देण्याचा तुझा काय संबंध" असें विचकटपणें विचारून, हा घाणेरडा कागद मी फाडून टाकतो असें म्हणून नोट फाडूं लागतो.

गौतम त्याला तसें करूं देत नाही. विश्रामला तो चार उपदेशाच्या गोष्टी सांगूं पाहतो. पण पालथ्या घागरीवर पाणी! लोक काय बोलतात याची आपल्याला फिकीर नाही आणि ते खरें तेंच बोलतात, असें उत्तर देऊन विश्राम अत्यंत खवचटपणें गौतमला म्हणतो, "आणखी लोक काय बोलतात सांगूं तुला? लोक म्हणतात की, हा बॅरिस्टर विश्राम दिवसभर बाहेर हिंडत असतो म्हणून त्याच्या जिवलग दोस्तांना त्याच्या घरांत वाटेल तें करायला मोकळीक असते."

गौतम त्याचा निषेध करतो. पण विश्राम मानावरच्च कोठे होता? तसाच आंत जाऊन तो व्हिस्कीचा प्याला पीत पीत बाहेर येतो आणि स्टेशनवरून कोणाला तरी घेऊन येण्याची बात मारून फिरून घराबाहेर जातो.

विश्रामच्या स्वभावाला औषध नव्हतें —

असा होता करुणेचा संसार; आणि ती "मेली तरी विश्रामचें जीवन हें असेंच चालणार होतें," असा जणू भविष्यसूचक निराशेचा उद्गार करुणेच्या तोंडून बाहेर पडतो. विश्रामच्या स्वभावाला डॉक्टरलोकांजवळ—नव्हे कोणाजवळच्च कांही औषध नसतें.

जणू कांही घरांतून कांही तरी घेऊन यावें अशा आविर्भावाने करुणा या क्षणीं आंत जाते. कदाचित आलेला दुःखाचा उमाळा तिला आंत जाऊन रडून जिरवायचा असेल. इकडे गौतम एकटाच्च टेबलावरील वर्तमानपत्रें चाळीत उभा असतो. तेव्हा शैला आणि सुमारें पस्तीस वर्षांचा उल्हास अशीं दोघेंजण प्रवेश करतात. कॉलेजमधील एका व्याख्यानाच्या प्रसंगीं विद्यार्थ्यांनी केलेल्या दंग्याबद्दल आणि असभ्य वर्तनाबद्दल तणतणतच्च शैला आलेली असते. मुली दिसल्या की, मुलांचीं डोकीं फिरून जातात म्हणून ती दोष देते. परंतु मुलीही कांही कमी नसतात, असें उल्हासचें मत असते. व्याख्यानप्रसंगीं एका बाईचें व्याख्यान मात्र विद्यार्थ्यांनीं शांतपणें ऐकून

घेतलें होतें; पण तें कांही बाई मोठी कोणी बुद्धिमान होती म्हणून नव्हे, तर ती सुंदर होती म्हणून – असा हीन शोध लावणाऱ्या उल्हासची त्यामुळें आपल्याला थोडी ओळख होते. त्या दोघांच्या भाषणांत कसलाही मुद्याचा विषय न निघतां, जें डोळ्यांपुढे किंवा मनांत येईल त्याची नुसती थट्टा उडवायची हेंच धोरण आढळून येतें. अशा बडबडण्याला कदाचित कधीच अंत येणार नाही हें जणू ओळखून नाटककार त्यांचें भाषण संपविण्यासाठी शैलाला आठवण करून देतो की, उल्हास आपल्याकडून एक पुस्तक नेण्यासाठी आला आहे; म्हणून तीं दोघें आंतल्या बाजूला जातात आणि दिवाणखान्यांत डॉ. गौतम आणि करुणा यांना झाल्या प्रकाराबद्दल बोलायला सवड मिळते.

शैला आणि उल्हास यांचा निकोप नसणारा परिचय —

गौतमाला शैला आणि उल्हास यांचा हा नवा परिचय निकोप वाटत नाही. त्याच्यापासून शैलाने सावध राहायला पाहिजे असा त्याचा सल्ला पडतो. कारण "अविवाहित पुरुषांपेक्षां विवाहित पुरुषांपासून कुमारिकांना जास्त धोका असतो" असा गौतमाचा अनुभव होता. करुणेला सावध राहायला सांगून गौतम जातो.

शैला आणि उल्हास आंतून बाहेर येतात. उल्हासबरोबर सिनेमाला जाण्याची गोष्ट शैला काढते. पण घरांत कोणी नाही आणि आपलें डोकें जरा दुखतें आहे, तेव्हा शैलाने बाहेर जाऊं नये असें करुणा सुचविते. पण "जायलाच पाहिजे मला" असें शैलाने उत्तर दिल्यावर "तुला काय वाटेल तें कर" असें निराशेने म्हणून करुणा आंत निघून जाते.

करुणा आणि गौतम या दोघांना आपल्या संबंधाबद्दल संशय आल्याचें उल्हासला जाणवतें. तरीही तो शैलाशीं तेथेच थोडी लगट करूं पाहतो. त्यावर सिनेमाला जायचें असल्यास त्याने तेथें कसले चाळे करतां उपयोगी नाहीत असें शैला त्याला बजावते. एकाएकी, कां कोण जाणें, तिचें मन गंभीर होतें. कवि विनायकांची एक कविता तिला आठवते. आणि "वेलीवरचं सुंदर फूल निर्दयपणें तोडून तें हुंगायचं व सुकलं म्हणजे तें चुरगाळून फेकून द्यायचं हीच ना पुरुषांची रसिकता! हेंच ना पुरुषांचें प्रेम!" असें ती कांहीशा गोंधळलेल्या मनःस्थितींत उल्हासला विचारूं लागते.

शैलाच्या सदविवेकबुद्धीची टोचणी —

तरीही उल्हास तिच्याशीं प्रेमाची लाडकी भाषा करूं लागतो. तेव्हा एकदम गंभीर होऊन शैला विचारते, "तुमच्या बायकोनं हें ऐकलं तर तिला काय वाटेल?"

वास्तविक आपल्या बोलण्यांत उल्हासच्या बायकोचें नांव काढायचें नाही असा त्यांचा करार होता. पण विवाहित माणसाने दुसऱ्या स्त्रीवर प्रेम करणें हें पापच आहे हा विचार बोचूं लागल्यामुळे उल्हासच्या पत्नीची आठवण शैलाला होते. एका स्त्रीशीं

पुरुष जन्माचा जखडला गेला म्हणजे दुसऱ्या सौंदर्यदेवतेची त्याने मनोभावाने पूजा करणें हें पाप नाहीच हें उल्हासचें मत तिला आतांच्या मनःस्थितींत मानवत नाही. किती केलें तरी उल्हास आपल्या पत्नीचा आहे. तिचें त्याच्यावर प्रेम असेल, त्यामुळे आपल्याला उल्हासवर प्रेम करण्याचा हक्क नाही; असें तिची सद्‌द्विवेकबुद्धि या क्षणीं तिला सांगते आणि "उल्हास, तुम्ही मला इतके आवडतां – इतकें प्रेम आहे तुमच्यावर माझं – पण तुमच्याशीं लग्न करण्याचा विचारही मला सहन होत नाहीं" असें शैला म्हणते.

लग्न हेंच धोक्याचें स्थान आहे! लग्नापूर्वी आवडणाऱ्या माणसाचा लग्नानंतर तिटकारा वाटूं लागतो, असे विचार त्या क्षणीं शैलाच्या मनांत गर्दी करूं लागतात. निराशेने आंत निघून गेलेल्या आईच्या जीवनाची स्मृति होऊन तर तिच्या हृदयांत गडबड माजली नसेल? आपण काय बोलतों आणि काय करतों हेंच तिला कळेनासें होतें. आजपर्यंत पुस्तकें वाचून मनाशीं बांधलेले सगळे आडाखे प्रत्यक्ष-अनुभवाच्या पुरांत एकामागून एक विरघळून चालले आहेत अशी तिला जाणीव होते. तिच्या मनांत कांहीतरी भेसुर कुजबूज उत्पन्न झालेली असते आणि ती कुजबूज स्वतःची स्वतःला ऐकूं येऊं नये म्हणून "मी इतकीं कामं स्वतःला लावून घेतें, सभेंत बोलतें, लेख लिहितें आणि स्वतःभोवती एवढा कोलाहल उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतें," असें आपल्या मनःस्थितीचें शैला किती करुण आणि विवेचक विश्लेषण करते.

उल्हासबरोबर ती माथेरानला जाऊन येईपर्यंत तिची ही मनःस्थिति नव्हती. तोपर्यंत तिची तिला खात्री वाटत होती. पण माथेरानला त्या दिवशीं तिचा भ्रम दूर झाला होता. "कां आपल्याला उल्हासने त्या दिवशीं मोहांत पाडलें?" असें आतां तिचें मन तिला तीव्रपणें विचारूं लागलें होतें. त्या मोहाच्या क्षणाचा भयंकर परिणाम तिचें डोकें भिरभिरवूं लागला होता. आणि "जायलाच पाहिजे मला आज!" असें आईला सांगणारी शैला आता संत्रस्त मनःस्थितींत सिनेमाला जायला नकार देते आणि चिडून उल्हासला "मला तुमचा तिटकारा वाटतो" असें म्हणून घालवून देते.

शैलाचा उसना आव —

परंतु तीच शैला आईने, "पुरुषांबरोबर हें असं एकटं वेळीं अवेळीं जाणं – वाटेल तिथं फिरणं हें बरं दिसतं का?" असें विचारल्याबरोबर, आपला संशय घेतला जातो या विचाराने दुखावून, "ज्याचा आपल्या मनावर ताबा नसेल त्यांनी खुशाल पुरुषांपासून चार हात दूर राहावं! स्वतःचं संरक्षण करण्याचं चांगलं सामर्थ्य आहे माझ्याजवळ" असें उसना आव आणून म्हणते. आणि उल्हास कांही तिला वाटतो तितका चांगला माणूस नाही या आईने सांगितलेल्या सत्याचा प्रकाश तिला मानवत नाही. आपल्या मित्रासंबंधीं डॉ. गौतमनीच हें भलभलतें सांगून आईचें मन बिथरवलें असलें पाहिजे असें म्हणून "मला काय वाटेल तें मी करीन, वाटेल त्याबरोबर हिंडेन, नाहीतर

वाटेल तिथे जाईन " असें चिडीने बोलून ती सिनेमाला न जाण्याचा निश्चय बदलते आणि उल्हासाला गाठायला जाण्यासाठी निघते.

तिच्या दुबळ्या मनाची ही चीड किती वृथा होती आणि ज्या गौतमवर ती एवढें ठसकली त्याचेच पाय धरण्याची पाळी तिच्यावर यायची होती हें पुढचें भविष्य या तावांत तिला कोठून दिसणार होतें ? पण ती थोडी पुढची गोष्ट आहे.

शैलाच्या त्या मनःस्थितीने गंभीर होऊन करुणा आंत जाते आणि इकडे नयनाला घेऊन शेखर तेथे येतो. शेखरचे आईवडील काय म्हणतील या भीतीने नयना संकोचत असते. पण आईला तर सगळें ठाऊक होतें. आणि वडील विलायतेला जाऊन आलेले; तेव्हा त्यांना असल्या प्रकाराबद्दल कांही वाटणार नाही; असा शेखर तिला विश्वास देत होता. त्यावरून आपलेही वडील विलायतेला जाऊन आल्याचें नयनाला आठवतें. पण सध्या ते कुठे असतात, काय करतात, हें नयनाला माहीतच नसतें. ती नऊ वर्षांची होती तोपर्यंत ते तिच्या आईकडे येत असत; पण त्या घरीं फारसे राहत नसत. पुढे त्यांचें आईशीं भांडण झालें आणि ते येत नाहीसे झाले. नंतर आई वारली. नयना मावशीजवळ मोठी झाली. पण मावशी तिला तिच्या वडिलांबद्दल जास्त कांही कधी सांगत नसे. मात्र तिच्या घरीं वडिलांचा मोठा फोटो होता.

नयनाची आशंका—

अशी आपण कोण आहों, काय आहों याची माहिती नसतांना शेखरने आपल्यावर प्रेम करावें हें नयनाला थोडेंसें नवलाचें वाटतें. आपण कोण आहों हें कळल्यावर शेखर आपल्याला झिडकारील अशी ती आशंकितही होते. आपण त्याच्या जातीची नसलों तर; आपण हलक्या कुळांतील असलों तर; काय करील शेखर ? अशा शंका ती उपस्थित करते. परंतु " कमळाचं फूल चिखलांत जन्माला आलं म्हणून त्याचा जन्म कांही चिखलापासून होत नाही " असें तिचें समाधान करून शेखर मोठ्या उत्साहाने आईला बाहेर घेऊन येण्यासाठी म्हणून आंत जातो.

नयना मोठ्या आरशासमोर उभी राहून स्त्रियांच्या जातिस्वभावानुसार केस साफ करीत असते. इतक्यांत पाठीमागून विश्राम प्रवेश करतो. त्याचें प्रतिबिंब तिला आरशांत दिसून एकदम दचकून मागे वळून नयना म्हणते " कोण ? काका ? "

नयना आणि शेखर एका बापाचीं मुलें —

नयना त्या ठिकाणीं शेखरबरोबर आली आणि शेखरचें तिच्यावर प्रेम आहे हें समजून येऊन विश्राम स्तंभित होतो. तोच करुणा आणि शेखर दिवाणखान्यांत येतात. शेखरला विश्राम कर्कश आवाजांत विचारतो, " तुझं हिच्यावर प्रेम आहे ? " शेखर शांत असतो. त्याला कांही कल्पना नसते. प्रेम आहे हें तो कबूल करतो. पण " हिच्याशीं तुझें लग्न होणें शक्य नाही " असें जेव्हा विश्राम ओरडतो तेव्हा त्याला

कांही तरी सांगण्यासाठी "बाबा" म्हणून शेखरने हाक मारतांच नयनाला शेखर आपल्या वडिलांचा मुलगा असल्याचा उलगडा होतो आणि तीं दोघें जडमूढ होऊन जातात.

वरच्या प्रवेशानंतर पंधराच दिवसांनी शैला टेलिफोनवरून उल्हासला ताबडतोब येऊन आपणाला भेटण्याविषयीं सांगत असतांना करुणा एकदम तिला वर्तमानपत्रांतील बातमी वाचून दाखविते की, शैलाची मैत्रीण ऊर्मिला प्रधान हिने आपल्या बहिणीच्या नवऱ्याशीं बहीण आणि तिचीं मुलें जिवंत असतांना लग्न केलें. व्याख्यानांतून 'पुरुषांना चाबकाचे फटकारे मारले पाहिजेत' म्हणणारी ही ऊर्मिला असें करते तेव्हा, मुलींच्या शिक्षणावर विश्वास कसा ठेवावा आणि प्रौढ मुलींचें भवितव्य खोटें आहे, असे विचार करुणा प्रकट करते. परंतु शैला ऊर्मिलेला मुळीच दोष देत नाही. दोघांचें एकमेकांवर प्रेम बसलें, त्यांनी लग्न केलें. समाजाला त्यांना यांत कांही सांगण्याचा अधिकार नाही. पहिल्या बायकोने काय करावें याचा त्यांनी विचार करण्याचें कारण नाही. जिच्यावर प्रेम नाही त्या बायकोसह संसार करण्यापेक्षा जिच्यावर प्रेम आहे तिच्याशीं लग्न करण्यांत नैतिक धैर्यच आहे. आणि म्हणून आपण ऊर्मिलाचें अभिनंदनच करणार, समाजाच्या रूढीला जबरदस्त धक्का देणाऱ्या ऊर्मिला घरोघर निर्माण व्हायला पाहिजेत, असें ऊर्मिला प्रतिपादते.

तिच्या बोलण्याचें आपल्याला फार भय वाटतें असें जेव्हा करुणा म्हणते, तेव्हा "का? मी उर्मिलेसारखं करीन असं तुला वाटतं की काय? आणि समज मीं असंच कांही केलं–" असें शैला अर्धवट बोलते. तुझी दुर्दैवी आई जिवंत राहावी अशी तुझी इच्छा असेल तर तूं असें करणार नाहीस, असें अर्धवट त्यावर बोलून करुणा निघून जाते.

शैलाच्या परस्परविरोधी ऊर्मींचा उगम—

किती सहज केवढें मोठें पताकास्थान या ठिकाणीं साधलें आहे. शैलाच्या दोन परस्परविरोधी ऊर्मींचा उगम कशांत आहे आणि आपल्यावर खरोखरच मृत्यु ओढवणार आहे त्यांत शैलाच्या अशाच कांही मोहाचा परिणाम कारण होणार आहे याची विचाऱ्या करुणेला कल्पना तरी आहे काय? नव्हे आपणा प्रेक्षकांनासुद्धा त्या गोष्टीची फक्त अंधुक आशंकाच आहे. मात्र क्षणाभरांतच त्या आशंकेचें रूपांतर करुणामय खात्रीमध्ये व्हावयाचें आहे.

कारण टेलिफोनवरील निरोपाप्रमाणे उल्हास आल्यावर शैला उल्हासच्या प्रेमांतील अलीकडच्या थंडपणाबद्दल त्याला खूप दोष देते. आणि आता जर तुम्ही आला नसतात तर मीच तुमच्या घरीं येणार येणार होतें, असें म्हणते. तेव्हा "तिला जर हें कळलं तर जीव घेईल ती माझा!" असें उत्तर उल्हास देतो. आणि "इतके तुम्ही आपल्या बायकोला भितां? मग–मग तुम्ही माझ्याशीं लग्न कसं करणार?" असें

त्यावर शैलाने विचारल्यावर उल्हास स्तंभित मुद्रेने "लग्न? म्हणजे?" असें विचारून शैलाचा लग्नाचा विचार म्हणजे कांहीतरी अकल्पित घटना असा भाव व्यक्त करतो; त्या वेळीं थोडा थोडा प्रकाश आपल्या मनांत पडूं लागतो.

आपल्याला या चोरटेपणाचा कंटाळा आलेला आहे हें त्यानंतरचें शैलाचें म्हणणें म्हणजे तिच्या लहरीपणाचाच एक नमुना म्हणून उल्हास उडवून लावतो. नाहीपेक्षा लग्नसंस्थेला कडकडीत विरोध आसणारी शैला असा विचार करील कसा?

परंतु माथेरानला देहभान विसरून उल्हासच्या स्वाधीन झाल्याचा परिणाम आता शैलाला जाणवूं लागला होता, त्यामुळे लग्न नाकारून त्या वेळच्या सुखाच्या उंच कड्यावरून तुम्ही मला एकटीला खाली ढकलून देणार काय, असा केविलवाणा प्रश्न शैला उल्हासला करते.

लाचार झालेली शैला —

पण आपलीं तत्त्वें सोडल्याबद्दल जग तुला हसेल अशी उल्हास शैलाची समजूत करूं पाहतो. पण स्वतःच्या मनाचें भेसुर हास्य सहन करतां न येणारी शैला ज्या पुरुषांचा ती धिक्कार करीत आली त्यांच्यापैकीं एकापुढे आज लाचार होत होती; त्याबद्दल कोणी कांही म्हटलें तरी तिला पर्वा नव्हती.

पण हें लग्नाचें निव्वळ वेड आहे; आणि तें करायला शैला मोकळी असली तरी विवाहित असल्यामुळे आपण तें करायला मोकळे नाही असें उल्हास म्हणतो तेव्हा शैलाचे डोळे थोडे उघडतात. आपल्याला मोहांत टाकतांना त्याला पत्नीची आठवण कशी झाली नाही म्हणून उल्हासला ती छेडते. पण आपलें आपल्या पत्नीवरही प्रेम आहे आणि एकाच वेळी दोन स्त्रियांवर पुरुष प्रेम करूं शकतो असें सांगून आपण लग्न केल्यावर आपल्या पत्नीला कांही दुसरें लग्न समाज करूं देणार नाही; तशी संधि समाजांत तिला मिळत नाही. म्हणून आपल्यासारख्यांनी एकमेकासाठी मनांतल्या मनांत झुरत राहण्यावांचून मार्ग नाही आणि म्हणूनच समाजाच्या अन्यायाविरुद्ध आपण एवढ्या चळवळी करतों; असें तत्त्वज्ञान सांगून तो भेकड पुरुष शैलाला मनावर ताबा ठेवण्याचा उपदेश करतो.

भेकड आणि बेरड उल्हास —

आपल्याला मोहांत पाडल्याबद्दल शैला त्याला कठोर शिव्या देऊं लागते. तेव्हा "माझ्यावर प्रेम केलंस हें कांही उपकार केले नाहीस माझ्यावर. मीं एकट्यानं तेवढा स्वार्थ साधला आणि तूं मात्र हातांत तुळशीपत्र घेऊनच उभी होतीस नाही?" असें उत्तर देऊन भेकडपणाच्या जोडीला बेरडपणाचीही भेसळ आपल्या स्वभावांत असल्याचें उल्हास दाखवितो.

शैला त्याच्या विनवण्या करूं लागते. त्याची नोकरी गेली तरी आपण त्याचा

संसार त्याच्या पहिल्या बायकोमुलांसुद्धा संभाळूं असें ती म्हणते. पण तिला नाटकी-पणाचा दोष देऊन उल्हास जाऊं लागतो. तुमच्या गळ्याभोवती हाताची मगरमिठी घालून प्राण घेईन मी तुमचा, ही शैलाची भाषा फोल असते. तिचे हात हिसडून आणि तिने कितीही ओरडा जगांत केला तरी बेअब्रू तिचीच होईल; आपल्यासारख्या विवाहित माणसाची होणार नाही, असें तिला बजावून "असला देखावा जर तूं फिरून करणार असशील तर या घरांत पाऊलही टाकणार नाही मी कधी" असा उलटा तोच कांगावा करतो आणि निघून जातो.

डॉ. गौतमचे पाय धरण्याची शैलावर पाळी —

आणि मग डॉ. गौतमचे पाय धरण्याची पाळी शैलावर येते. डॉ. गौतमला आपली कथा सांगण्यासाठी म्हणून मनांत मुख्य जळणारी गोष्ट लपवून ठेवून आपण उल्हासशीं लग्न करणार असल्याचें एकदम ती गौतमला सांगते. अर्थात गौतम तिचा निषेधच करतो; पुस्तकें वाचून जग समजत नाही वगैरे दोष तो तिला नेहमीप्रमाणें देतो. आणि लग्न करावें असें तिचें मत पालटलें याबद्दल कांही आपण दोष देणार नाही, परंतु "उल्हासशीं लग्न करण्याचा तिचा आत्मघातकी हट्ट" आपल्याला मान्य होणार नाही असें तो तिला प्रेमळ शब्दांत सांगतो.

अखेर कबुलीजबाब देण्यावांचून इलाज राहत नाही. "समाजांतील माझ्या अस्तित्वासाठी, केवळ माझ्या संरक्षणासाठी मला लग्न करणं भाग आहे. मनाशीं प्रतारणा केल्याबद्दल देहानं माझ्यावर सूड घेतला अखेर! मोहाच्या एका क्षणासाठी मला आता सर्वस्वाचं मोल द्यावं लागणार. डॉक्टर मी सुखासाठी लग्न करीत नाही—समजलं?" असा केविलवाणा कबुलीजबाब शैला देते. आणि कसेंही करून उल्हासला आपल्याशीं लग्न करायला प्रवृत्त करा अशी ती डॉक्टरची दया भाकते. गौतम मनाचा दयाळू आहे. शैलाला सर्व प्रकारची मदत करायला तो तयार होतो. परंतु उल्हास-सारखा पाजी मनुष्य या गोष्टीला कबूल होईल असा त्याला विश्वास वाटत नाही. असा गौतम विचार करतों आहे तोच उल्हासहून अधिक मोठा पाजीपणाचा नमुना त्या सर्वां-समोर येऊन उभा होतो.

उल्हासहून मोठा पाजीपणाचा नमुना —

न्यायकोर्टांत दोन दावे जिंकून खिसे गरम करून त्याचाच जणू कैफ चढल्याच्या आवेशांत विश्राम त्या ठिकाणीं प्रवेश करतो. त्याच्या येण्याची चाहूल लागून भीतीने शैला धावतच आंत निघून जाते. विश्रामने आज एक विनयभंगाची केस जिंकलेली होती. अलीकडे केव्हा कोणती स्त्री विनयभंग झाला म्हणून ओरडत उठेल याचा नेम राहिला नाही असें म्हणून, पूर्वीच्या खऱ्या आर्य स्त्रिया देवदर्शनाच्या गर्दीत पुरुषांचे किती धक्के आणि कोपरखळ्या खाव्या लागल्या तरी तक्रार करीत नसत, अशी त्यांची

विश्राम तारीफ करतो. विश्रामने जिंकलेला दुसरा खटला वचनभंगाचा होता. एका मध्यम वयाच्या, दोन मुलांचा बाप असलेल्या विवाहित पुरुषाने एका बाईला नादीं लावलें. या संबंधाचा परिणाम त्या स्त्रीला त्या व्यापाऱ्याशीं लग्न केलेंच पाहिजे असा झाला. पण लेखी कोठे कांही व्यापारी गुंतलेला नव्हता. तेव्हा कोर्टात साफसाफ त्याच्याकडून विश्रामने सर्व गोष्टी नाकबूल करविल्या. बाईचे साक्षीदार पैसे चारून फोडले आणि उलट बाईलाच बदचालीची ठरविली. आपल्या या कोर्टातल्या करामतीवर विश्राम बेहोष खूष होता. डॉ. गौतमला मात्र हा प्रकार असह्य वाटून तो म्हणतो "माणुसकीला डांबर फासून असल्या न्यायाची दलाली करण्यापेक्षा प्रामाणिकपणे रस्त्यावर हमाली केलेली काय वाईट ?"

पण त्यासाठी विश्राम उलट त्याला "तूं डॉक्टर होण्यापेक्षा पाद्री व्हायला हवं होतंस" असें हिणवितो. माणसाने कायद्याप्रमाणे वागलें पाहिजे असें तो प्रतिपादतो. कायदे न्यायासाठी असावेत, कायद्यांसाठी न्याय नसावा हा डॉ. गौतमचा सिद्धांत विश्राम मान्य करीत नाहीं. आणि गौतमला त्या बिचाऱ्या मुलीबद्दल वाटणारी हळहळ विश्रामला अनाठायीं वाटते. त्याचा पवित्रा असा आहे. "मी जरी अतिशय उदार मताचा सुधारक असलों, तरी असली उजळ माथ्याने चालविलेली अनीति आपल्यास कधी सहन व्हावयाची नाही ! कांही म्हटलं तरी माणसाला कॅरॅक्टर नाही तर माणसाची किंमत काय ? तूं कांहीही म्हण, पण या शिकलेल्या मुलींची अशीच नाचक्की व्हायला पाहिजे. फार शेफारून गेल्या आहेत त्या !"

आणि कॅरॅक्टरचें हें गुणज्ञान करीत असतांनाच हे शीलवान गृहस्थ दारूचे ग्लास खाली करीत असतात.

त्याच्या मुर्दाडपणाचें प्रदर्शन एवढ्यावरच थांबत नाही. पत्नी जिवंत असलेल्या आपल्या मेहुण्याशीं विवाह केल्याबद्दल एका स्त्रीचा निषेध करण्यासाठी सभा होती; त्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याला तो मोठ्या आनंदाने–उत्साहाने फोनवर संमति देतो. आणि "मीं आतापर्यंत कांही केलं असलं तरी तें चोरून केलं आहे. निर्लज्जपणाने असं उघड उघड कांही करणारा मी नाही" असें आपल्या दुर्वर्तनाचें तो समर्थन करीत राहतो.

या प्रकरणाची डॉ. गौतमला एवढी किळस येते की, शैलाबद्दल विश्रामशीं अवाक्षर न काढतां तो निघून जातो.

विश्रामची नयनाशीं शिसारी आणणारी वागणूक —

त्याच वेळीं नयना पेते. पंधरा दिवसांत तिच्या चेहऱ्यांत एवढा फरक झालेला असतो की, ही नयनाच का अशी भ्रांति पडावी. तिच्याशीं विश्रामचें होणारें कठोरपणाचें वर्तन पाहून त्या माणसाबद्दल आपल्याला अधिकच शिसारी येते. नयना कांही त्याने आपल्या विवाहाला संमति द्यावी अशी विनंति करायला आली नव्हती. ती गोष्ट

अशक्य आहे हें ठरविण्याइतकें शहाणपण तिच्याजवळ होतें. तिला फक्त आपला पिता या नात्याते विश्रामचा प्रेमाचा एक गोड शब्द हवा होता. विश्राम तिचा बाप ठरला आणि तिचें प्रेम निष्फळ ठरलें. अमृताचा पहिला घोट तिला विषासारखा ओकावा लागला. पण यासाठी विश्रामला दोष द्यावा म्हणूनही ती आली नव्हती. स्वतःच्या सर्वस्वाची आहुति देण्याचें तिने ठरविलें होतें. दहा दिवस जिवाची तडफड होऊन तिने आज जगाबाहेर पाऊल पाऊल टाकण्याचा ठाम निश्चय केला होता. फक्त त्यापूर्वी आपल्या पित्याच्या पायावर डोकें ठेवून पोट भरून रडायची संधि तिला हवी होती.

परंतु ती संधि विश्राम तिला देत नाही. आपली मुलगी म्हणून तिला मान्यता द्यायला तो तयार होत नाही. " तूं माझी मुलगी आहेस असं जगाला सांगतांना मला मान खाली घालावी लागेल " असें तो निर्घृणपणाने तिला सांगायला कचरत नाही. " ज्या क्षणीं मी तुझ्या आईच्या घराचा उंबरा सोडून चालतां झालों त्या क्षणींच सारं नातं संपलं " असें तो निर्दयपणें तिला सांगतो.

त्यावर कांहीशी चिडून तुम्हीं माझ्या आईचा सर्वस्वी नाश केलांत असा आरोप नयना विश्रामवर करते. त्यावर " ज्या मार्गाने पैसा आला त्या मार्गानं तो नाहीसा झाला– बोलून चालून वेश्या– " असें विश्राम म्हणूं लागतो तेव्हा बेभान होऊन नयना एकेरीवर येते. त्याला तो शब्द परत घ्यायला सांगते, नाहीतर तुमच्या घराच्या उंबरठ्यावर डोकें फोडून प्राण देऊन तुमची बेअब्रू करीन " असें ती ओरडते.

पण अशाने दबणारा विश्राम नाही. " हजार वेळा ओरडून सांगेन जगाला तुझी आई वेश्या होती " असें म्हणून तूं प्राण दिलास तर बेवारशी कुत्र्याप्रमाणे तुला अशी फेकून देईन, असें म्हणत तो रागाने तिच्याशीं दंगामस्ती करायला पुढे जातो, तोच शेखर येतो व या माणसासाठी तूं कशाला इथे आलीस, मी तुला घरी पोंचवितों चल असें तो नयनाला म्हणतो. विश्राम त्याला जायला प्रतिबंध करूं जातो. नयनाचा नाद आपण सोडणार नाही असें शेखर त्याला निक्षून सांगतो. तेव्हा लग्न न करतां राहणार असलास तर खुशाल राहा असें संपूर्ण वाक्य विश्रामच्या तोंडून बाहेर पडेण्यापूर्वीच शेखर बापावर फ्लॉवरपॉट उगारतो. पण " शेखर " असें नयनाने दटावल्यामुळे त्याचा हात लुळा पडतो व तो प्रसंग टळतो. मात्र या घरांतून चालता हो, असा शेखरला हुकूम करून विश्राम तणतणत आंत निघून जातो.

दुष्ट कल्पनांचीं पिशाच्चं पाठ सोडीत नाहीत! —

अर्थात शेखरशीं आता नयना प्रेमाचा संबंध ठेवूं शकत नव्हती. दूर दूर जाऊं की जेथे नीति अनीति हे शब्द आपल्याला ऐकूंच येणार नाहीत, हा शेखरचा विचार तिला अव्यवहार्य वाटतो. " आपण कुठंही गेलों तरी समाजानं निर्माण केलेल्या कल्पनांचीं दुष्ट पिशाच्चं आपला पाठलाग करीत आल्याशिवाय राहणार नाहींत. पळून

जाणारांच्या मागं लोक हात धुवून लागतात " असें म्हणून नयना त्याला माझ्यासाठी स्वतःच्या जीवनाचा नाश करून घेऊं नकोस म्हणून विनविते. त्याच्या नाना तऱ्हेच्या विनवण्या ती परतवून लावते. सुखी होण्याचा तर राहोच, पण जगण्याचासुद्धा आता आपल्याला अधिकार नाही असें तिच्या मनाने घेतलेलें होतें. आणि शक्य असेल तर आता आपण पुढच्या जन्मीं भेटूं असें म्हणून नयना निघून जाते.

करुणा येते आणि शेखरची समजूत करण्याचा यत्न करते. पण तिचें तत्त्वज्ञान शेखरला पटत नाही. आयुष्यांत कांही न्याय नाही, अशी त्याची निराशापूर्ण भावना होते. आई निवारीत असतांही आपल्या बापाला तो पाजी म्हणतो. आपला आयुष्यावरचा सर्व विश्वास उडून गेल्याचें सांगतो. आई केवळ त्या दोन मुलांच्यासाठी एवढे कष्ट सोसून जीवन कंठीत होती या गोष्टीची पर्वा करण्याइतकें त्याचें मन शांत होत नाही. आणि आयुष्याचा सूड घेण्याची बडबड करीत तोही निघून जातो.

शेखरचें कसें होणार असें काळजीने करुणा त्याच वेळीं तेथे आलेल्या गौतमला विचारते; तर गौतमच " शैलाचं कसं होणार या काळजीनं माझं मस्तक अगदी फुटायला आलं आहे " असें उलट म्हणतो; उल्हासने शैलाशीं लग्न करावें ही गौतमची खटपट यशस्वी होत नाही. उलट उल्हासने शैलाच्याच शीलावर शिंतोडे उडविले. हें आता शैलाला कसें सांगावें या पेचांत गौतम असतो.

शैलाला आईचा आधार —

त्याच वेळी शैला येऊन आईच्या कुशींत शिरते आणि तुझ्यावाचून माझे अपराध कोण पोटांत घालील, म्हणून रडूं लागते. करुणा तिला धीर देते. जगाच्या निंदेचें तुझ्यावर आभाळ कोसळलें तर माझ्या काळजाचें ठिगळ माझ्या आतड्याच्या दोऱ्याने शिवून मी लावीन अशा काव्यपूर्ण भावनावेगाने करुणा तिला सावरून धरूं पाहते.

अर्थात लोकांकडून ही गोष्ट कळल्यावर विश्रामने अकांडतांडव करण्यापेक्षा आपण आधीच हा प्रकार त्याच्या कानावर घालावा हा गौतमचा विचार करुणा जरी अगदीच मोडून काढीत नाही तरी विश्रामच्या साह्याची विलकूल अपेक्षा न करतां आपल्या स्वतःच्या बळावर शैलाला सर्व प्रकारची मदत करण्याचा करुणा निर्धार करते.

अशा वेळीं सभेला जाण्यासाठी निघालेला विश्राम तेथे येतो. शैलाला तो व्याख्यानाला चल म्हणतो. कारण, " तुम्हां सुशिक्षित मुलींवर आज मी तोफांची सरबत्ती डागणार आहें. "

त्या निमित्ताने स्वतःच्या पायाखालचा आगीचा डोंब आधी विझव असें गौतम त्याला बजावतो. आणि याचा खरा अर्थ समजून आल्यावर शैलाबद्दल एवढीसुद्धा दया न वाटतां तो तिला दंडाला धरून खरें का हें ? असें तिच्यावर खेकसतो – कोण हा माणूस असें दरडावून विचारतो.

हा माणूस उल्हास असून आता तो शैलाशी लग्न करायलाही तयार नाही असें

गौतमने सांगितल्यावर विश्राम उल्हासचेंच समर्थन करतो; स्त्रियाच पुरुषांना मोहांत पाडतात असा सिद्धांत सांगतो आणि विश्वविद्यालयाची तिची पदवी आज कृतार्थ झाली असेल असें म्हणून शैलावरच उलटून उसळतो. आता यापुढे कोणत्या तोंडाने आपण समाजांत हिंडावें याच गोष्टीची विश्रामला काळजी वाटते.

करुणेचा विश्रामवर सरळ हल्ला —

त्यावर भाडभीड सोडून " कवडी किमतीच्या तुमच्या अब्रूचं मोल तुम्हांला आपल्या मुलीच्या प्राणांपेक्षा अधिक मोलाचं वाटतं " असा करुणा विश्रामवर सरळ सरळ हल्ला चढविते. पापाच्या चिखलांत सारा जन्म एखाद्या किड्याप्रमाणे लोळत राहणाऱ्या माणसाने कशाला स्वतःच्या अब्रूच्या गोष्टी सांगाव्यात, म्हणून विचारते. शैला पापी नाही. अज्ञानी आहे, असें तिच्यांतील जागी झालेली माता शैलाचें समर्थन करते.

विश्राम कायद्यावर बोट ठेवतो. कायदा अज्ञानाची सबब मानीत नाही. शैलाने आपल्या अपराधाचें शासन भोगलेंच पाहिजे असा विश्रामचा क्रूर जबाब असतो.

तेव्हा शैला, आपण आत्महत्या केली तर विश्रामची अब्रू वाचेल का, असा तळमळून प्रश्न करते. " तुझ्या जगण्यामरण्याने कांही आता माझी बदनामी थांबत नाही " असें म्हणून विश्राम विचारांत पडतो. आणि डाक्टरी कसबाने यांतून मार्ग काढावा अशी भेकडपणाचो सूचना करतो.

पण शैलाला तें बिलकूल मान्य नाही. " समाजाच्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारण्यासाठी ही शैला अविवाहित माता म्हणूनच जगणार! " असा निर्धार ती जाहीर करते.

त्यावर " तुला या घरांतून तोंड काळं करावं लागेल " असें रागाने म्हणून विश्राम तिला बाहेर घालविण्यासाठी धावतो. पण घरावर मालकी होती करुणेची. वाघिणीसारखी ती शैलाच्या संरक्षणाला धावते आणि " तुमच्या ढोंगीपणाला हें पाहवत नसेल तर तुम्हींच हें घर सोडून द्या " म्हणून ती नवऱ्याला त्वेषाने फर्मावित. त्यावर विश्राम पुष्कळ तगतगतो. परंतु " काय वाटेल तें होवो, शैला या घरांतून बाहेर पडणार नाही " असा करुणा अखेरचा निर्धार जाहीर करून शैलाला मिठी मारते.

या आवेशापुढे विश्रामचें कांही चालूं शकत नाही,

मागील अंकांतल्या प्रसंगानंतर दहा बारा दिवसानंतर तिसऱ्या अंकाची सुरुवात आहे. विश्रामचें वैभव एवढ्यांतच थोडें ओहटीला लागल्याच्या खुणा दिसूं लागलेल्या आहेत. पाईपच्या तंबाखूचा डबा संपलेला आहे तेथे नवा आणलेला नाही. बाहेर जायचें आहे, पण हॅटवरची धूळसुद्धा झड पुसलेली नाही. पाईपही जाग्यावर नाही. मुलगी म्हणजे घरांत एक जळती शेगडी आहे असें त्याला वाटूं लागलें आहे. फोनवर गौतमला तो निला कोठे तरी घेऊन जायला सांगतो आहे. या घरांत राइणें नको असें होऊन तो रागाने निघून जातो.

बायको मेल्यामुळे उल्हासची लग्नाला तयारी —

तेवढ्यांत उल्हास येतो. रसूल आंत जाऊन शैलाला पाठवून देतो. उल्हास शैलाची क्षमा मागण्याचें नाटक करतो. कारण त्याची बायको मरून सात दिवस झाले होते. तो आता लग्नाला मोकळा झाला होता. हें पाहून शैलाला त्याची किळस येते. बायको मेल्याबद्दल त्याला आनंद झाला याचा तिला तिरस्कार वाटतो.

उल्हास आपलें बायकोवर प्रेम होतें हें पुन्हा एकदा स्पष्ट करतो. पण आपल्या अपराधामुळे शैला संकटांत पडलेली होती; त्या संकटांतून तिला वांचविण्याचें सामर्थ्य आता त्याला प्राप्त झालें होतें; आणि म्हणून उत्सुकतेने तो तिच्याकडे आला होता. तेव्हा तिने आपली निर्भर्त्सना करावी हें त्याला रास्त वाटत नाही;

शैलाला उल्हासचे उपकार नकोत —

पण आपल्यासाठी त्याने स्वार्थत्याग करावा हें आता शैलाला मानवत नाही. त्याचे उपकार तिला नको असतात. मी उपकारासाठी आलों नाही; पापाचें परिमार्जन करण्याची संधि मिळावी म्हणून मी आलों आहें, या त्याच्या बोलण्यावर शैलाचा विश्वास बसत नाही. तुमच्याशीं लग्न करण्यापेक्षा मी दगडावर डोकें आपटून प्राण देईन असें म्हणून ती त्याला जायला सांगते. आतां ती कोणाशींच लग्न करणार नव्हती. समाजाच्या अन्यायाविरुद्ध ती बंड करून उठणार होती. यांत ती आत्मनाश करून घेत आहे हेंही उल्हासचें म्हणणें ती धुडकावून लावते. दुर्दैवी कुमारिका मातांना मनुष्यप्राणी म्हणून जगतां येईल की नाही याच्या शोधार्थ प्रयत्न करण्यांत शैलाला आता आयुष्य वेंचावयाचें आहे.

कुमारिका मातांचा हा पंथ तिच्या अनुकरणाने वाढीस लागला तर उद्या लग्नसंस्थाच नष्ट होईल या उल्हासच्या भीतीची तर शैला टरच उडविते.

कुटिल उल्हासचा अपमान —

आणि मग उल्हासचें खरें स्वरूप थोडें थोडें बाहेर पडूं लागतें. आईच्या आश्रयाने बंड करण्याच्या शैलाच्या या प्रयत्नाची "धन्याच्या उंबरठ्यांत बसून यःकश्चित कुत्रंदेखील जगावर भुंकूं शकतं" अशी तो क्रूर हेटाळणी करतो. बापाचें घर सोडून जरा बाहेर जगांत ती जाईल तर तिचा हा बंडाचा बुडबुडा किती वेळ टिकतो तें पाहूं, असें तो कुचेष्टेने बोलतो. आणि तो तिला पाऊण तासाचा वेळ देतो. तेवढ्यांत तिचा लग्नाचा विचार ठरला तर टेलिफोनवर तिने आपणाला बोलवावें; त्याहून अधिक थांबण्याची आपली तयारी नाही असें धमकावून तो जाऊं लागतो.

त्याला आपण परत केव्हाच बोलावणार नाही; त्याचं नांवसुद्धां घेणार नाही, असें ती त्याला निर्धाराने बजावते. पण लोक कांही स्वस्थ राहणार नाहीत; ते वाटेल ते तर्क

करतील; आणि मग या घरांत कोंडून घेऊन राहणंसुद्धा तिला अशक्य होईल, असें बोलून कुत्सितपणाने तो असेंही ध्वनित करतो की तिच्या बापाच्या बदफैलीपणामुळे तिच्या बाबतींत लोक वेळीं खुद्द विश्रामचेंही नांव घेतील.

त्या वेळीं वेभान होऊन शैला त्याच्या तोंडांत भडकावते आणि या अपमानाचें उत्तर एक तासाने देईन असें म्हणून क्रोधाने उल्हास निघून जातो.

भ्रांतिष्ट शेखर —

अशा वेळीं शेखर दारूचा ग्लास पीत पीत प्रवेश करतो. नयनाचा लाभ होत नाही हें कळल्यापासून तो असा व्यसनाधीन झाला आहे आणि भ्रांतिष्टासारखी बडबड करूं लागला आहे. शैलाच्या कोणत्याही बोलण्याकडे तो मुळीच लक्ष देत नाही. आणि शेवटीं म्हणतो कीं, "आईला जाऊन सांग की शेखरची आशा करूं नकोस. शेखर मेला, जगाला कायमचा मुकला." बिचारी शैला आंत निघून जाते.

त्यानंतर नयना येते आणि त्याला दारू पितांना पाहून तीरासारखी जाऊन त्याचा दारूच्या पेल्याचा हात खाली घेऊं पाहते. पण दारूच्या नशेंत तो नयनाला धड ओळखत सुद्धा नाही. तो म्हणतो "नयना केव्हाच चालती झाली. या ग्लासांत नयना केव्हा केव्हा दिसते मात्र. तुला दिसते का पाहा."

नयना आत्महत्येचा निश्चय करून शेखरच्या घरून निघून गेली होती. परंतु जातां जातां वाटेंत तिला शेखर दारू पिऊन पडलेला आढळला. त्या वेळची त्याची थट्टा आणि कुटाळकी करणारांची गर्दी पाहून नयनाला परतावेसें वाटलें. शेखरला दारू-पासून सोडविणें तिला आपलें कर्तव्य वाटलें.

पण शेखर वेहोषच असतो. आपलें नयनावर प्रेम नाही; नयनावर प्रेम करणें पाप आहे; असें विसंगत कांहीतरी तो बोलत राहतो. शपथेवर नयना विचारते, तरी "प्रेम संपलं, अबीर खलास हुवा, तुम मर जाव —" अशीच असंबद्ध भाषा शेखरची चालू राहते. तो दारूच्या अमलांत बोलतो आहे याचें भान नयनाला राहत नाही. आणि तो जर दारू पिऊन आपलें आयुष्य जाळून टाकणार असेल तर आपण शरीरविक्रय करून आयुष्य जाळून टाकूं असा वेडा विचार नयनाच्या मनांत ठाणें मांडतो.

शेखर संपूर्ण धुंदींत नव्हता. तर त्याला नयनाचा आणि आपला संबंध केव्हाच येणार नाही असें करायचें होतें, असें थोडेंसें यापुढच्या त्याच्या वर्तनावरून वाटतें. कारण, "नयनाच्या आयुष्याचा नाश करण्याइतकें सामर्थ्य माझ्या अंगांत येऊं शकलं — आता मला दारूची जरूरी नाही" असें त्याला दारू पिऊं नको म्हणून सांगायला आलेल्या करुणेला सांगतांना तो आढळतो.

शेखरच्या बोलण्याने करुणेचें अंतःकरण दुभंगतें. आईबद्दलची शेखरची सगळी माया आटून जावी, त्याचें अंतःकरण दगडासारखें कठोर व्हावें याचें तिला फार वाईट वाटून ती रडूं लागते. थोडासा शुद्धीवर आलेला शेखरही रडूं लागतो. पण आपल्या

हृदयांत उमटलेला हा मातृप्रेमाचा पाझर आता फार काळ टिकणार नाही हें त्याला उमगलेलें असतें. आपल्या शरीराची आग झालीसें त्याला वाटूं लागतें. ही आग एकाच जालीम विषाने विझविणें शक्य आहे असें म्हणून ती आग विझवायला जातो असें म्हणून तो धावत आणि गाणें गुणगुणत निघून जातो.

शैला घर सोडते —

तोच घराबाहेर जाण्याच्या तयारींत शैला येते. हीं दोघें मुलें आपल्याला मारण्याचा कट करून उठलीं आहेत या विचाराने करुणा वैतागते. पण शैलाने घर सोडून जाऊं नये हें तिचें म्हणणें शैला ऐकत नाही. आईच्या पाठीशींच आपण सदैव राहिलों तर एकट्याने झगडण्याची संधि आपल्याला कशी मिळणार असें तिला वाटत असतें. जगांत कुणीतरी दया करणारें माणूस आपल्याला मिळेल अशी तिला आशा होती. "पुरुष तुझ्या असहायपणाचा फायदा घेऊन तुला आपल्या दुष्टपणाच्या जाळ्यांत गुंतविल्याशिवाय राहणार नाहीत" या आईच्या इशाऱ्याप्रमाणे जगाच्या भयाने घरांत दडून राहण्यापेक्षा जगासमोर जाऊन जें काय होईल तें पत्करणें तिला अधिक श्रेयस्कर वाटतें. तिच्या आईने तरी आणखी आता कुणाकुणाचें ओझें सहन करावें! म्हणून "मी जातें, माझी अगदी काळजी करूं नकोस तूं" असें म्हणून शैला निघून जाते.

करुणा भ्रमिष्ठासारखी इकडेतिकडे पाहत असतां विश्राम येतो. तेव्हा त्याला ती शैलाच्या पाठीमागे जाऊन तिला परत घेऊन यायला विनविते.

परंतु शैला गेली तर केव्हा तरी परत येईल. परंतु आज आपली जाऊं पाहत असलेली अब्रू गेली तर ती मात्र केव्हाच परत येणार नाही या चिंतेंत विश्राम असतो. त्याच्या अब्रूच्या जगांत काय कमी चिंधड्या व्हायच्या राहिल्या होत्या म्हणून तो या अब्रूसाठी एवढा जीव पाखडीत होता याचा करुणेला बोध होत नाही. विश्राम रसूलला दारू घेऊन यायला सांगतो. पण ती त्याला दटावून दारू आणायला बंदी करते. आणि हुकुमी स्वराने "जरा शुद्धीवर राहून, मी काय म्हणतें तें ऐकून घ्या" असें विश्रामला म्हणते. विश्रामचें मस्तक फुटायची वेळ आली होती, तर करुणेच्या आयुष्याची दोरीच तुटायची वेळ आली होती. म्हणून काळजाच्या कपाटांत इतके दिवस कोंडून ठेवलेलें विचाराचें हालाहल आज तिला त्याच्या घशांत ओतायचें होतें. आयुष्यांतलें भेदक सत्याचें तिखट अंजन त्याच्या डोळ्यांत तिला घालायचें होतें.

विश्रामच्या डोळ्यांत सत्याचें तिखट अंजन —

म्हणून त्वेषाने, आज अठरा वर्षेपर्यंत विश्रामने आपला छळवाद कां मांडला आहे याबद्दल ती जाब विचारते. एक क्षणभर तरी या आयुष्यांत तुम्हांला कधी पश्चात्ताप होणार आहे का, असा प्रश्न करते.

पण कशाचा पश्चाताप! असाच उलट विश्वासचा सवाल. तेव्हा तुम्हीं आमच्या

संसारावर दरवडा घातला आहे, स्वतःच्या सर्वस्वाचा खून केला आहे असा करुणा आरोप करते. आपण आपल्या स्वतःचा नाश केला तर तसें करायला आपण मुखत्यार होतों. पण दुसऱ्या कोणाच्या आयुष्याचा आपण नाश केला ही गोष्ट मात्र विश्रामला बिलकूल मंजूर नाही. उलट करुणा आणि करुणेचे वडील यांनीच आपल्या आयुष्याचा नाश केला असा दावा विश्राम करतो. " तुझ्या वडिलांनीं माझ्यापुढे सोन्याचें वाळवंट पसरलं म्हणून मोहाच्या मृगजाळामागं धावून मीं माझ्या आयुष्याचा नाश केला, " अशी त्याची मीमांसा असते. आपण दुबळे असलों तर सहानुभूति दाखवून आपल्याला योग्य मार्गावर ठेवणें हें करुणेचें कार्य होतें. तें तिने केलें नाही; एकसारखा आपला तिरस्कार केला. त्यामुळे तिचें आपल्याला भय वाटूं लागलें. त्या भयामुळे आपण करुणेपासून दूर जाऊं लागलों, अशी तक्रार करून तो म्हणतो, " तुम्ही सद्गुणी माणसं सहनशील नसतां–दुर्गुणी माणसांचा द्वेष करून तुम्ही त्यांना अधिक दुर्गुणी बनवतां. "

विश्रामने केलेल्या उलट आरोपाने करुणा संतप्त —

त्याच्यासाठी आजवर दुःखाचे डोंगर सहन केले तरी त्याने आपल्याला सहनशील नसल्याचा दोष द्यावा याचा संताप येऊन करुणा विश्रामला सैतान म्हणून शिवी देते. पण विश्रामला करुणेच्या यातनांच्या रडगाण्याने कांही द्रव सुटत नाही. उलट दुबळीं माणसें जगांत नेहमीच यातनांचीं रडगाणीं गात बसतात ! असें तो म्हणतो.

परंतु स्त्रियांचा सोशिकपणा म्हणजे दुबळेपणा नव्हे असें म्हणून गेलीं अठरा वर्षें आपण केवढ्या धैर्याने काय काय सहन केलें याचा अंगावर शहारे आणणारा पाढा करुणा वाचते. आणि एवढें सगळें सोशीत असतां प्रेम तर दूरच; पण एक दिवससुद्धा विश्रामाने साधी दया सुद्धा आपल्यावर दाखविली नाही असें म्हणून तळमळून ती विचारते,

" कुठे आहे तुमच्या दुनियेंतला न्याय – दया – प्रेम ! या जगांत परमेश्वर आहे कुठे ? -- असला तर तो पुरुषांचा पाठीराखा असला पाहिजे स्त्रियांचा नाही. "

स्त्रियांच्या संसारांत प्रेम आणि कर्तव्य हीं अभिन्न —

परंतु अजूनही विश्रामच्या मरुस्थ हृदयाला पाझर फुटत नाही. " इतक्या हाल-अपेष्टा सहन करुन तूं माझ्या संसारांत कां राहिलीस ? " असा वांकडा प्रश्न तो विचारतो. त्यावर स्त्रियांच्या संसारांत प्रेम आणि कर्तव्य हीं अभिन्न असतात. पत्नीला आपल्या संसाराशीं बेइमान होतां येत नाही. पत्नी म्हणून मेली तरी तिला माता म्हणून जगावें लागतें. स्त्री माता होणार नसती तर या जगांत जगली नसती. असें उत्तर देऊन पुरुष हा स्वार्थी कृतघ्न पशु आहे असा ती दोषारोप करते.

पण " याबद्दल दोष निसर्गाला द्यावा. निसर्गाला पुरुषाचा कृतघ्नपणा मान्य आहे " असें अजून मस्तवालपणें म्हणून विश्राम तिला पशुसृष्टींतलीं उदाहरणें देऊं पाहतो.

स्थलप्रत.
अनुक्रमांक २६३७० वि. निबंध
विश्राम १२१५ नों: दि: ६७१ २३/३१

परंतु करुणा त्याला पुढे बोलूं देत नाही. " लग्नरूपी पिंजरा निर्माण करून पुरुषांनी स्त्रियांना अडकवून ठेवलें आहे. हा पिंजरा तोडून मोडून फेकून दिला तरच उद्यांच्या संसारांत स्त्रियांना न्याय मिळेल " असें ती त्याला सांगते आणि थकल्यासारखी होऊन म्हणते " जा– मला सांगायचं होतं तें मीं सांगितलं. "

करुणेला हवा असलेला विश्रमाचा हुंदका —

तेव्हा विश्रामचें हृदय थोडें हलतें. तो तिच्याजवळ जाऊं पाहतो. परंतु करुणा त्याला झिडकारते. विलायतेला जायला विश्राम निघालेला होता तेव्हा वियोगाच्या जाणिवेने त्याला हुंदका आला होता. त्याची आठवण करुणेला होते. तेव्हा त्याचें आपल्यावर प्रेम आहे असें करुणेला पटलें होतें. परंतु तो, विलायतेहून परत आल्यावर असा हुंदका करुणेने कधी ऐकला नाही. त्यामुळे त्याच्या प्रेमाचा कधी कधी अनुभव तिला त्यानंतर आला नाही ... अशा अर्थाचें अत्यंत तळमळीचे उद्गार त्या भयंकर थकलेल्या अवस्थेंत करुणा काढते. त्या वेळी विश्राम सद्गदित होऊन तिचे पाय धरतो आणि तिची क्षमा मागतो. त्याला तो, करुणेला ज्याची आस लागली होती तो हुंदका फुटतो. विश्रामचें हृदय जळालें नाही; इतक्या वर्षांनी आज तें फिरून जिवंत झालें याची करुणेला साक्ष पटते. विश्राम पुन्हा तिची क्षमा मागून, भविष्यकालावर नजर ठेवून करुणेला आशावादी व्हायला सांगतो. पण करुणेची भविष्याची सर्व आशा संपलेली असते. म्हणून निरवानिरव केल्यासारखी करुणा शेखर आणि शैला यांची काळजी घ्यायला विश्रामला सांगते.

एवढ्यांत उल्हास वेलिफ घेऊन येतो आणि विश्रामवर वारंट बजावायला सांगतो. हें जप्ती वारंट होतें. करुणेची बनावट सही करून विश्रामने करुणेचें घर गहाण टाकलें होतें. तें घर आता विकलें जाणार होतें.

पश्चातापाच्या वेळींसुद्धा विश्रामने आपल्या या पापाचा उल्लेख केला नव्हता याची विश्रामला लाज वाटते. म्हणून कोणाच्याही दयेला मी पात्र नाही असें तो म्हणतो.

विश्रामचा संसार संपला —

करुणा भ्रमिष्ट होऊन आपण आता कोठे जाणार असें हताशपणाने म्हणते. डिंकाची बाटली शोधण्याच्या निमित्ताने ती वर जाते. विश्राम संतापून बेलिफाचा गळा दाबायला जातो त्याच वेळीं डॉ. गौतम येतो. त्याला विश्राम " डॉक्टर, संपला आमचा संसार " असें म्हणतो आहे तोच " बाई पडली – बाई पडली " असा रस्त्यावरून आवाज येतो. मंडळी बाहेर जाऊन करुणेचा निश्चेष्ट देह घेऊन येतात. विश्राम दुःखाने व्याकुळ होतो. शेखर तेथे येतो त्याला " शेखर तुझ्याबरोबर आज मी पोरका झालों रे — " असें दुःखावेगाने विश्राम म्हणतो. परंतु विश्रामबद्दल शेखरला काडीचा जिव्हाळा वाटत नाही. आणि " बाजूला व्हा ! सबंध आयुष्यभर

जो हात माझ्या आईच्या अंगाला लावला नाही तो तुमचा पापी हात या शेवटच्या क्षणीं तिच्या शरीराला लावून तिचं पावित्र्य विटाळूं नका!" असें म्हणून शेखर विश्रामला करुणेपासून दूरच ठेवतो.

हें नाटक शंभर टक्के स्वतंत्र नाही —

अशा या नाटकाचा नायक विश्रामच आहे का या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी दुसऱ्या एका दुय्यम आणि आनुषंगिक मुद्याचा विचार करूं. श्री. अत्रे यांचा दावा हें नाटक स्वतंत्र आहे असा आहे. हा दावा शंभर टक्के समर्थनीय नाही. या नाटकावर इब्सेनच्या घोस्ट्स (Ghosts) या नाटकाची पुष्कळच छाया आहे.

ईब्सेनचा कॅप्टन ऑलविन, मिसेस ऑलविन आणि मॅन्डर्स यांचे आणि अत्रे यांचे विश्राम, करुणा आणि डॉ गौतम यांचे चेहरेमोहरे, स्वभाव, वर्तन यांच्यामध्ये फारच साम्य आहे. एक मोठा फरक म्हणजे इब्सेनच्या नाटकांतील प्रत्यक्ष घडणारी घटना, मिसेस ऑलविनने करुणेच्याच प्रकारचें जीवन एकोणीस वर्षेपर्यंत घालविल्यावर कॅप्टन ऑलविनचा मृत्यु झाल्यानंतरची आहे. नाटकांत त्या पतिपत्नीचें जीवन केवळ कथनानेच आपल्याला दाखविलें आहे; तर विश्राम तशाच प्रकारच्या अठरा वर्षांच्या जीवनानंतर जिवंत आहे, आणि त्याचा निदान दारुडेपणा तरी आपल्याला प्रत्यक्ष पाहावयास मिळतो. परंतु आपल्या मुलांच्या हिताकरिता तरी आपल्या नवऱ्याची वेअब्रू होऊं नये यासाठी नवऱ्याबरोबर व्यसनकर्दमांत सुद्धा साथ होऊन घालविलेल्या जीवनाचें कथनच करुणेने अत्रे यांच्या नाटकांत केलें आहे, अगदी तशाच प्रकारचें कथन मिसेस ऑलविन इब्सेनच्या नाटकांत करते. पूर्व पिढीच्या पापांचीं पिशाच्चं पुढच्या पिढ्यांच्या पाठीमागे लागतात हा विचारही दोन्ही नाटकांत समान आहे. अत्रे यांची नयना जास्त काव्यात्म आहे, सहृदय आहे. ईब्सेनची रेजिना ही महत्त्वाकांक्षी, सुखलोलुप आहे. इब्सेनच्या ऑस्वॉल्डची दोस्ती तिला हवी आहे, ती स्वतःला श्रीमंती आणि चैन मिळावी यासाठी हवी आहे. परंतु ऑस्वॉल्ड आणि रेजिना हीं जशीं कॅप्टन ऑलविनचींच पण दोन भिन्न स्त्रियांपासून झालेलीं अपत्यें आणि भावंडें आहेत, तीच हुबेहूब परिस्थिति अत्रे यांच्या शेखर आणि नयना या भावंडांची आहे. इब्सेनचा ऑस्वॉल्ड रेजिनाशीं थोडा अतिप्रसंग कोठींत करतो. शेखरचाही नयनाशीं अतिप्रसंग कोठींतच होतो. शेखर हा भाऊ असल्यामुळे नयनाला त्याच्याशीं लग्न करतां येत नाही. नेमकी हीच अडचण ऑस्वॉल्ड आणि रेजिना यांच्यामध्ये आहे. विशेष म्हणजे नयनाने अखेरीस आपल्या मूळ स्वभावाशीं विसंगत असा देहविक्रयाचा निश्चय केलेला आढळतो. रेजिनाही हाच निश्चय करते; परंतु तारुण्य आहे तोंपर्यंत देह आणि सौंदर्य यांचा उपयोग करून पुढच्या वयाची तरतूद करून ठेवण्यासाठी म्हणून तिचा तो निश्चय असतो. रेजिनाचा निश्चय स्वभावाशीं सुसंगत आहे. पण रेजिनाची प्रतिकृति नयना हिच्यामध्ये मात्र तो निश्चय केवळ मूळ छापाच्या कारणाने, प्रयोजन नसतांही, आला आहे असें

वाटल्यावाचून राहत नाही. या नाटकांत शेखर अखेरीला जशा प्रकारचे विषाचे वेग आले म्हणून आपल्या शरीरप्रकृतीबद्दल चिंता व्यक्त करतो तशाच प्रकारच्या विकृतीने ऑस्वॉल्डचा जीवही गुदमरू लागलेला असतो.

याहूनही सूक्ष्म खुणा कोठे कोठे आढळतात. डॉ. गौतम दुसऱ्या अंकांत ज्या वेळीं "माणुसकीला डांबर फासणाऱ्या न्यायाची दलाली करण्यापेक्षा रस्त्यावर हमाली केलेली काय वाईट" असें म्हणतो त्या वेळीं "तूं डॉक्टर होण्यापेक्षा पाद्री झाला असतास तर फार चांगलं झालं असतं" असें विश्राम उत्तर देतो. गोष्ट अशी आहे की, इब्सेनचा मॅन्डर्स हा खरोखर पाद्रीच आहे. आणि त्याच्या छापांतूनच गौतमची निर्मिति असल्यामुळे विश्रामच्या तोंडांत पुराणिक, शास्त्री, पंडित असा शब्द घालण्याऐवजी नेमका पाद्री हा शब्द अत्रे घालतात. मिसेस ऑलविन ऑस्वॉल्डला आपण केवळ त्याच्यासाठी आजपर्यंत जगल्याचें सांगते तेंच करुणा शेखरला सांगतांना आढळते. अत्रे यांचा गौतम समाजस्वास्थ्य मासिकाचा अंक उचलून 'हें कोण वाचतं या घरांत?" असें विचारतो. मॅन्डर्सही घोस्ट्सच्या पहिल्याच प्रवेशांत मिसेस ऑलविनच्या टेबलावर नवनीतिविषयक पुस्तकें पाहून चकित आणि अस्वस्थ झालेला आढळतो. What are these books doing here? Who reads these books? असाच त्याचाही तेथे प्रश्न आहे.

हुडकीतच बसलों तर आणखीही समान स्थळें आढळून इबेसनचें घोस्ट्स आणि अत्र्यांचें उद्यांचा संसार यांचें साम्य दाखवितां येईल. पण आपल्या मुद्याची गोष्ट अशी आहे की, असें हें साम्य मुळांत असलें तरी या सामग्रीला आपल्या नाटकांत अगदी स्वतंत्र आणि निराळें वळण देत असतांना, इब्सेनने मुळांत मेलेला दाखविलेला कॅप्टन ऑलविन अत्रे यांनी विश्रामच्या रूपाने आपल्यापुढे उभा केला आहे. एवढेंच नव्हे तर विश्राम आणि करुणा यांच्या चौकटींत शैलाच्या करुण जीवनाचें चित्र, आपल्यापुढे रेखाटायला बसलेले अत्रे आपल्या विश्रामच्या चित्रांतच इतकें रंगून गेले की, चौकटीचेंच मुख्य चित्र होऊन बसलें; पार्श्वभूमीच पुरोभूमी झाली.

अगदी सुरुवातीपासूनच अत्रे यांनी विश्रामकडे किती बारकाईने लक्ष पुरविलें आहे पाहा. गौतमला विश्रामचें हल्ली कसें चाललें याचीच जास्त काळजी आहे. विश्रामच्या बाळपणाची किती तपशीलवार आणि आपल्या मनांत त्याच्याविषयी सहानुभूति उत्पन्न व्हावी अशी कितीतरी माहिती डॉ. गौतम आपल्याला सुरुवातीलाच सांगतो आहे. सासऱ्याने विश्रामची जावई म्हणून केलेली निवड; स्वाभिमानाच्या अतिरेकांत त्याचें सासऱ्यापासून वेगळें राहूं लागणें; विलायतेस जाणें, तेथे मोहांत सांपडणें; वगैरे किती बारीक बारीक तपशील विश्रामबद्दल अत्रे आपणास सांगवितात. शैलाच्या बाबतींतील प्रौढ कुमारिकांच्या अवघड प्रश्नाला या एवढ्या प्रचंड पार्श्वभूमीची तादृश आवश्यकताच नाही. त्यावांचूनही तो प्रश्न ज्वलंत असा प्रेक्षक-वाचकांपुढे उभा राहूं शकत होता.

विशेष म्हणजे शैला कुमारिका मातांची तरफदारी करण्याचें कंकण बांधून

गेल्यानंतरही अत्रे तिला विसरून विश्रामचीच कथा आपल्याला पुढे सांगत राहतात. नव्हे, करुणेने त्याच्यावर अत्यंत निर्घृण आणि वस्तुतः खरा असा हल्ला चढविला असतांना त्यांचा विश्राम आपलें समर्थन ज्या प्रकारें करतो त्यांत, विश्रामच्याही म्हणण्यांत थोडें तथ्य असण्याचा संभव आहे, करुणेसारख्या, सद्गुणाच्या अतिरेकामुळे दुर्गुणी माणसांविषयीची सहानुभूति गमावून बसलेल्या स्त्रीच्या तुसड वागणुकीमुळे तर खरेंच विश्राम दुर्गुणांच्या खाईंत अधिक खचत गेला नसेल ना, असा संशय वाटून, त्या शेवटच्या अंकांतील करुणेच्या दुःखार्त आक्रंदनाच्या वेळींही आपली सहानुभूति अभावितपणें, थोडीशी कां होईना, क्षणभर विश्रामकडे झुकावी अशी रचना अत्रे यांनी केलेली आहे.

त्यामुळे, कुमारिका मातांच्या प्रश्नांतील अन्याय वेशीवर मांडायला सजलेल्या शैलापेक्षा हें नाटक अखेर विश्रामचेंच नाटक होऊन राहिलें आहे. नाटकांत इतरांना करुण विपाकाचे चटके सोसावे लागत नाहींत असें नाही. शेखर आणि नयना यांच्या जीवनांतील परिणति खरोखरच अति करुण आहे. शैला आपली अतीव अडचणीची परिस्थिति धीराने पचवायला सज्ज झाली असली तरीही तिची अवस्था आपलें हृदय कंपित केल्यावांचून राहत नाही. करुणा तर प्रत्यक्ष कारुण्यमूर्ति आहे. आणि तरीही या सर्व गोष्टी विश्रामच्या जीवनांतील करुण विपाकाच्या परिणामरूप आहेत असें वाटल्यावांचून राहत नाही. ऑथेल्लोची प्रियतमा डेस्डेमोना हिचा अंत कमी का करुण आहे? परंतु कोलरिजसारखा सहृदय कवि आणि टीकाकार "शेवटीं पडदा पडतांना आपणांला हळहळ कोणाबद्दल वाटते? कोणाबद्दल अरेरे असा उत्स्फूर्त उद्गार आपल्या तोंडून निघतो?" असा प्रश्न उपस्थित करतो आणि "ऑथेल्लोबद्दलच" असें आपणच उत्तर देतो. तशीच स्थिति विश्रामबद्दल आहे. अगदी शेवटीं किंचित अस्वाभाविकही वाटावा असा पश्चातापाचा आवेग विश्रामच्या अंतःकरणांत प्रस्थापित करून तर त्या स्थितींत त्याच्याविषयीं जिव्हाळा वाटूं लागलेल्या आपल्या अंतःकरणाला आकस्मिकपणे करुणेच्या आत्मघातामुळे विश्रामबद्दलच हुरहुर लागावी अशी व्यवस्था अत्रे यांनी केली आहे.

हॅम्लेटमधील ऑफिलियाचा मृत्यूही तसें पाहिलें तर किती करुण आहे! तीच गोष्ट लिअरच्या कॉर्डेलियाची. उत्तररामचरितांत सीतेचें दुःख केवढें मोठें आहे. वाल्मीकि तर, "सीतायाः परमम् दुःखम्" वर्णन करण्यासाठी रामायणाच्या रचनेची प्रतिज्ञा करतो आहे. परंतु या सर्वांचीं दुःखें आपल्याला स्वतंत्रपणें न जाणवतां हॅम्लेट, लिअर, राजा रामचंद्र यांच्या दुःखाचे आनुषंगिक भाग म्हणूनच जाणवावींत अशीच त्या त्या कवीची रचना आहे. तीच गोष्ट अत्रे यांच्या रचनेने विश्रामच्या बाबतींत झालेली आहे.

असा हा विश्राम अत्रे यांनी रेखाटलाही आहे मोठ्या कौशल्याने. मूळचा तर तो चांगलाच माणूस होता. गौतमाच्या या कथनावर आपले प्रेक्षक – श्रोते–वाचक विश्वास ठेवून पुढचें विश्रामचें चरित्र पाहतीलच या विश्वासाने त्याच्या मूळच्या चांगुलपणाचे प्रत्यक्ष पुरावे नाटकांत देण्याच्या भानगडींत अत्रे पडलेले नाहींत. विश्रामने आपला धंदा चांगला चालविला आहे; त्याचीं मुलें चांगलीं आहेत, शिकलीं आहेत. विशेष म्हणजे

दारू आणि बाई यांचीं व्यसनें विश्रामने जणू संपूर्णपणें पचविलेलीं आहेत. दारू पितां-वेळची त्याची बेदरकार वृत्ति त्याच्याबद्दल आदर नाही तरी आश्चर्य वाटविणारी आहे. घरीं त्यांच्या संसाराची सर्व काळजी वाहायला कर्तबगार पत्नी आहे. लोकांमध्ये त्याला चांगलें स्थानही आहे. कारण ऊर्मिला प्रधानच्या विवाहाच्या निषेधाच्या सभेचें अध्यक्षपद त्याला जणू हक्काने मिळतांना आपण पाहतों.

परंतु असा हा विश्राम संयमी नाही; व्यसनलोलुप आहे. त्यामुळे तो अतिशय स्वार्थी आणि स्वकेंद्रित बनलेला आहे. आपल्या अनाचाराचें समर्थन करण्यासाठी आपल्या तरल बुद्धींतून एखादें विचित्र तत्त्वज्ञान बनविण्याची त्याची लकब आहे.

गडकऱ्यांच्या सुधाकराची छाया विश्रामवर पुष्कळच आहे. सुधाकर अधिक सहृदय आहे. कदाचित त्यामुळेच आपलें व्यसन पचविल्याचा अहंकार सुधाकराला नाही. तसा अहंकार विश्रामला आहे. व्यसनें पचवून, जीवनाशीं झगडा करीत, मान उंच ठेवून राहण्याचा यत्न विश्राम करीत आहे. परंतु त्याचीं पापें अखेरपर्यंत त्याला मान उंच ठेवण्याचें हें यश लाभूं देत नाहींत.

त्याचीच मुलगी नयना हिच्यावर शेखरने प्रेम करूं लागावें या स्वरूपांत त्याचें पहिलें पाप त्याच्या जीवनांत उततें. शैलाच्या रूढिबाह्य वागण्याने त्याच्यावर दुष्कीर्तीचा प्रसंग येतो. जन्मभर त्याचा छळ जिने सोसला ती त्याची साध्वी पत्नीही अखेर आपल्या मुलीच्या संरक्षणार्थ त्याच्यावर उलटते. पैशाचे अवघड व्यवहार लपवालपवी करून कसे तरी संभाळीत असतां, लपवालपवीची शेवटची मर्यादा गाठल्यामुळे त्याचा आर्थिक डोलारा तर कोसळतोच; पण ज्या त्याच्या पत्नीच्या घरावर थोडेंबहुत त्याला विसंबतां आलें असतें तें घरही विश्रामच्या लबाडीच्या कारणाने लिलावाला निघतें.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे विश्रामची शेवटची शोकदारुण अवस्था ! गौतमला तो म्हणतो "संपला डॉक्टर आमचा संसार ! आणि करुणा ? ती वर गेली." आणि क्षणभरांत खरोखरीचीच ती पृथ्वी सोडून वर गेली. पश्चात्तापाने शुद्ध होऊं घातलेल्या त्याच्या मनाला करुणेच्या सहानुभूतीचा ओलावा मिळाला नाही. एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष विश्रामच्या मुलाने येऊन विश्रामने आपले पापी हात करुणेच्या प्रेताला सुद्धा लावूं नयेत असा आग्रह धरून त्या क्षणिक सुखापासूनही विश्रामला वंचित केलें.

विश्रामबद्दल आपल्याला जिव्हाळा, आपुलकी, आदर किंवा समभावना वाटावी असें विश्रामच्या स्वभावांत फार थोडें आहे. शेवटीं शेवटीं बेरडपणांत परिणमित झालेला त्याचा स्वभाव चीड आणणाराच आहे. परंतु त्याही स्वभावांत मूळचा एक सद्भावनेचा अंकुर असलेला आपण ऐकला आहे. तोच अंकुर वाढून मोठा व्हावा असें आपलें मन इच्छितें. आणि तसें न झालेलें पाहिल्यामुळे आपलें मन हळहळतें. अशा रीतीने उद्यांचा संसार हें विश्रामच्या करुण विपाकाचें एक चांगलें नाटक मराठी नाट्यवाङ्मयाला श्री. अत्रे यांनी दिलें आहे.

प्रकरण तेविसावें

सामान्य निष्कर्ष

आतापर्यंत आपण पंचवीस नाटकांची बरीचशी तपशीलवार पाहणी केली. त्यांमधील सर्वांत जुनीं दोन नाटकें, इडिपस आणि ॲन्टिगनी हीं, जवळजवळ चोविसशें वर्षांपूर्वीचीं आहेत. तर त्यांतील अगदी अलीकडचें नाटक गेल्या दहाबारा वर्षांतील आहे. म्हणजे सुमारे चोविसशे वर्षांच्या काळांतील करुण नाट्याचे पंचवीस प्रातिनिधिक नमुने आपण नजरेखालीं घातले. यांत ग्रीक नाटकें आहेत; इंग्रज नाटककारांचीं नाटकें आहेत; अलीकडील अमेरिकन नाटककारांचीं नाटकेंही त्यांत आहेत; तशींच नॉर्वेतील प्रख्यात नाटककार इब्सेन याचींही तीन नाटकें त्यांमध्ये आहेत. भारतीय नाटकांत 'एको रसः करुण एव' असें मानणाऱ्या भवभूतीचें उत्तररामचरितम् हें सर्वांत जुनें नाटक आहे, तर अगदी आधुनिक नाटक म्हणजे कुलवधू हें आहे.

एवढ्या मोठ्या दीर्घ कालखंडांत विखुरलेलीं हीं नाटकें पाहून त्यांमधून आपणाला करुण नाट्याचा विषय, त्याचें रचनातंत्र, भाषा आणि मूल्य याविषयीं कांही सामान्य निष्कर्ष काढतां येतात का हें पाहावयाचें आहे. अर्थात असे कांही निष्कर्ष सापडले आणि ते सुसूत्र मांडतां आले तरीही करुण नाट्याच्या तंत्राचे ते यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारे, दोन अधिक दोन बरोबर चार अशा जातीचे निरपवाद नियम होत असें म्हणण्याला अधिकार आपणाला मुळीच येणार नाही. या नियमांप्रमाणेंच जगांतील एकूण एक नाट्यलेखकांनी आपापलीं नाटकें लिहिलीं आहेत असें त्यांवरून म्हणतां येणार नाही. त्याचप्रमाणें याच नियमांना अनुसरून यापुढे नाटकें लिहिलीं जावींत किंवा लिहिलीं जातील आणि तशीं तीं लिहिलीं गेलीं तरच त्यांना करुण नाट्याच्या क्षेत्रांत स्थान मिळेल असाही आग्रह आपल्याला बाळगतां येणार नाही.

ठोकळेबाज नियमांचा आग्रह नाही —

साहित्यांतील नियम किंवा तंत्राचे ठोकताळे यांना असें निरपवाद बंधनकारकत्व कधीच येऊं शकत नाही. व्यक्तीच्या प्रतिभेचा विलास हेंच साहित्याचें उघड उघड निर्माणमूळ आहे. आणि प्रतिभावंत व्यक्तींच्या स्वतंत्र सृजनव्यवहाराला आम्हीं कोणीं बंधनें घालूं म्हटलें तरी अशा प्रतिभावान व्यक्ती त्या बंधनांपुढे कधीच मान तुकविणार नाहीत. प्रतिभावंताचें स्वातंत्र्य अबाधितच मानलें आणि राहिलें पाहिजे. नवीन नवीन विषय आणि तंत्रें वापरण्याचें त्यांचें स्वातंत्र्य कसल्याही नियमांनी जखडून टाकतां कामा नये. उदाहरणार्थ, अलीकडे लघुकथेचें म्हणून जें एक तंत्र मानलें जातें त्या

तंत्राहून वेगळी अशी कथा कोणी लिहिली तर 'ही लघुकथा नाही' असें म्हणून तशा ह्या कथेचें मूल्य कमी मानण्याकडे किंवा त्या कथेकडे दुर्लक्ष करण्याकडे केव्हा केव्हा तथाकथित टीकाकारांचें धोरण जें कललेलें आढळतें तें अशा तऱ्हेच्या नियमांनी त्यांनी स्वतःला जखडून घेतलेलें असतें त्यामुळें. साहित्याच्या अप्रतिहत वाढीला आणि त्याच्या खऱ्या आस्वादाला ही ठोकळेबाज रीति अत्यंत अनुपकारक होय.

परंतु मार्गदर्शक आडाखे मात्र —

म्हणून असे कांही ठोकळेबाज नियम शोधून काढून त्यांच्याबद्दल आग्रह धरण्याचा या ठिकाणीं प्रयत्न नाही किंवा हेतूही नाही. तथापि एवढ्या दीर्घ कालखंडांतील भिन्न-भिन्न देशांमधील व भाषांमधील प्रतिभावंत नाटककार पुष्कळशा प्रमाणांत एकाच प्रकारचें तंत्र वापरतांना जर आढळले तर त्यांच्यामधील हें साम्य कोणत्या प्रकारचें आहे याबद्दल कांही आडाखे बांधणें हें पुष्कळ दृष्टींनी बोधप्रद आणि उपकारक ठरेल. अशा या आडाख्यांची मांडणी जर कांही कार्यकारणभावांच्या आधारावर करतां आली तर या आडाख्यांना विशेष प्रकारचें महत्त्व प्राप्त होईल. त्याणि त्यांहून अन्य प्रकारचे आडाखे आढळेपर्यंत किंवा प्रस्थापित होईपर्यंत या आंडाख्यांशीं सदृश अशी कृति ही करुण नाट्यकृति आहे असें निर्विकल्पपणें म्हणण्याला हरकत राहणार नाही. एखादें नाटक करुण नाटक आहे की नाही, असा जर आणि जेव्हा वाद निर्माण होईल तेव्हा या आडाख्यांचा आधार घेऊन जर दाखवितां आलें की, तें नाटक या अडाख्यांशीं बहुतांशीं जुळणारें आहे तर त्या नाटकाला त्याच्या गुणवत्तेच्या मानानें करुण नाटकाच्या सदरेवर प्रवेश द्यायला हरकत पडूं नये. चोविसशे वर्षांतील श्रेष्ठांचा मार्गच अशा नाटकांत नाटककाराने अनुसरलेला असेल, तर टीकाकारांनी आपल्या पदरच्या कांही खऱ्याखोट्या कल्पनांचा निकष लावून अशा नाटककाराला त्याच्या मानाच्या स्थानापासून ढळविण्याचा प्रयत्न करणें न्यायाचें नाही. एवढ्यापुरता तरी अशा आडाख्यांचा उदयोग करणें अनुचित तर नाहीच, परंतु तर्कशुद्ध आणि समंजसपणाचें ठरावें असें प्रस्तुत लेखकाला म्हणावेंसें वाटतें.

परिस्थितिजन्य आणि स्वभावगत असे करुण नाट्याचे हवाबंद गट नाहीत —

अशा रीतीने कांही सामान्य निष्कर्ष शोधीत असतां पहिला शोधविषय, करुण नाटकामध्ये परिस्थितिजन्य करुण विपाक आणि स्वभावगत करुण विपाक असे दोन हवाबंद गट पाडतां येण्याजोगा पुरावा आपल्याला आढळतो का, असा मनापुढे येतो. आपल्या नाटकांपैकी सर्वांत जुनें नाटक राजा ईडिपस हें आहे. आणि त्यामध्ये राजा ईडिपसचा करुण विपाक, जन्मतःच त्याच्या नशिबीं जो शाप लिहिला गेला होता त्या शापामुळें होतो असें दाखविलें आहे. दैवहत राजा ईडिपसचें तें नाटक आहे. त्याने किती प्रयत्न केले तरी या विपरीत दैवापुढे ते लंगडेच पडले; तसे ते लंगडे पडावयाचेच

असाच विधिसंकेत होता. अशा रीतीने ज्याला केवळ परिस्थितिजन्य विपाकाचें नाटक म्हणतां येणें शक्य आहे अशा प्रकारचें हें एक नाटक आपण पाहिलें.

ग्रीक नाट्याच्या सुरुवातीच्या काळांत अशींच करुण नाटकें लिहिलीं गेलेलीं आहेत. त्यामध्ये मानवी स्वभावापेक्षा निसर्ग – बाह्य – शक्तींचा कोप आणि शाप यांचा परिणामच अधिक दाखविलेला आढळतो. अगदी अलीकडच्या युजीन ओनीलच्या लॅव्हिनियाच्या स्वभावाची चिकित्सा करतांना इस्किलसच्या ॲगॅमेम्नॉन व इलेक्ट्रा या नाटकांचा तुलनेसाठी आपण विचार केला. त्या नाटकांतही ॲगॅमेम्नॉनचा मृत्यु अशाच शापामुळें झालेला असतो.

नुसतीच दैवाची भीषणता दाखवून पुरत नाही —

परंतु नियतिगत दुर्दैवी व्यक्तींबद्दल आपल्या म्हणजे प्रेक्षकांच्या मनांत निव्वळ भीषणतेची भावना व्यक्त करून त्या नाटकाकारांना थांबावयाचें नव्हतें. आपल्याला त्याही नियतिकृत दुःखाबद्दल आणि त्या दुःखित व्यक्तींबद्दल विपण्णता उत्पन्न व्हावी, हळहळ वाटावी हेंही त्यांना साधावयाचें होतें. त्यामुळें अशा व्यक्तींविषयी आमच्या मनांत आपुलकी उत्पन्न होण्याजोगें कांही तरी दाखविणें त्यांनाही आवश्यक वाटलें. आणि म्हणून सामान्यतः अशी दुःखित व्यक्ति ते निवडीत कीं जिच्या ठिकाणीं कांही विशेष श्रेष्ठत्व आहे, जी व्यक्ति विशेष विख्यात आहे. करुण नाटकाच्या नायकाच्या ठिकाणीं श्रेष्ठत्व आणि कीर्ति यांचा संगम असतो असें जें ॲरिस्टॉटलने प्रतिपादन केलें आहे तें याच कारणाने केलें आहे आणि त्यासाठी उदाहरण सुद्धा ईडिपस नाटकाचेंच दिलें आहे. अशा श्रेष्ठ व विख्यात व्यक्तीला दैवी प्रकोपामुळेच दुःखद स्थिति प्राप्त व्हावी यामुळे आपल्या मनाला हळहळ वाटणें साहजिक आहे.

ग्रीकांची ही श्रेष्ठतेची कल्पना स्वाभाविकच युद्धगत शौर्यावर प्रामुख्याने आधारलेली होती. त्यांची मनोवृत्तीच दणकट लढाऊ व मृदु भावनांना फारसा थारा न देणारी अशी होती. शिवाय मुखवटे घालून आणि दहा दहा, पंधरा पंधरा हजार प्रेक्षक बसतील अशा प्रचंड प्रेक्षागृहांमध्ये त्यांचीं नाटकें होत असल्यामुळे मृदु मानवी भावनांचा आविष्कार करायला त्यांना नीटसा अवसरच कसा नव्हता हें आपण पाहिलें आहे.

नियतिविरोधाबरोबर मानवी निर्णयच्युति ॲरिस्टॉटलही अपरिहार्य मानतो —

अशा रीतीने ग्रीक करुण नाट्य हें नियतिजन्य करुण नाट्य असें म्हणतां येण्यासारखें आहे असें भासतें. परंतु हीही गोष्ट निरपवाद नाही. ईडिपसच्या उदाहरणावरूनच आपले निष्कर्ष सांगत असतांना, ॲरिस्टॉटलने नायकाच्या श्रेष्ठतेवर आणि त्याच्या नियतिजन्य दुर्गतीवर भर मोठा दिला असला तरी नायकाच्या दुर्गतीला कारण नायकाची निर्णयच्युति किंवा त्याचें मनोदौर्बल्य हें किंवा हीं दोन्ही असतात हें खुद

ॲरिस्टॉटलला सुद्धा मान्य करावें लागलें आहे. राजा ईडिपस नाटकाची चर्चा करतांना ईडिपसचा अहंकार आणि एककल्लीपणा त्याच्या नाशाच्या कारणांत प्रमुख अंशभागी कसा होता हें आपण पाहिलेंच आहे. त्यामुळे नियतिप्रधान अशा नाटकांच्या त्या काळींसुद्धा निखळ नियतिप्राधान्यापेक्षा नियति आणि स्वभावगत उणीवा यांच्या मिश्र परिणामानेच नायकावरील दुःख ओढवलेलें दाखविण्याकडे सोफोक्लीससारख्या श्रेष्ठ नाटककाराचा कल होता आणि या संमिश्र परिणामाची दखल ॲरिस्टॉटललाही घ्यावी लागली होती हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

एवढेंच नव्हे तर सोफोक्लीसचेंच आणि त्याच काळाच्या आसपास लिहिलेलें ॲन्टिगनी हें नाटक तर अगदी विसाव्या शतकांतल्या एखाद्या नाटकाप्रमाणे प्रामुख्याने स्वभावगत करुण विपाकाचें नाटक आहे असें आपण पाहिलें आहे. त्यामुळे चोविसशे वर्षांपूर्वीसुद्धा प्रतिभावंत नाटककार निव्वळ नियतिजन्य दुर्गतीचींच करुण नाटकें लिहिण्याची शक्यता मानीत नव्हतें हें मान्य केलें पाहिजे. मात्र दुर्गतिकारणांत त्या काळीं प्रमाणाच्या दृष्टीने दैवावर मोठा भर दिला जात होता एवढें मान्य करायला हवें.

विपरीत दैव हें कारण सोफोक्लीसलाही अपुरें वाटलें —

पंचवीस नाटकांपैकी फक्त एका नाटकाचें धोरण हें असें दैवावर फार मोठा भर देणारें आढळतें आणि बाकीच्या चोवीस नाटकांमधून कांही वेगळीच परिस्थिति आढळून येते. विपरीत दैव हें दुःखाचें पुरेसें कारण नव्हे असें खुद्द सोफोक्लीसलासुद्धा वाटलें, हें ॲन्टिगनीच्या त्याच्या चित्रणावरून स्पष्ट होतें. ॲन्टिगनी व राजा ईडिपस या दोन टोकांमधील सोफोक्लीसच्या नाटकत्रयीमधील दुसरें नाटक 'कोलोन येथें ईडिपस" हें आहे. इडिपस आंधळा होऊन भटकत असतां, त्या परकी राज्यांत जाऊन दिव्य पद्धतीने मरून अंतराळांत विलीन होतो, अशा प्रकारची कथा त्या नाटकांत आहे. या नाटकांतही सोफोक्लीसने दैवहततेपेक्षा मनुष्यकृत विरोध आणि तज्जन्य दुःख यावरच अधिर भर दिलेला आढळतो; आणि अखेरी अखेरीस ईडिपसचें चित्त अधिकाधिक विशुद्ध होत होत तो पंचतत्त्वांत दिव्य ज्योतीच्या रूपाने विलीन होतो, अशा चित्रणाच्या साहाय्याने सोफोक्लीस आपल्याला एकदम केवढ्या तरी उंच मानवतेच्या पायरीवर नेऊन पोचवितो.

माणसाच्या नाशाचीं बीजें माणसाच्याच ठिकाणीं —

अशा रीतीने निव्वळ दैवहतता चोविसशे वर्षांपूर्वी सोफोक्लीसलासुद्धा अपुरी वाटली. पुढें पुढे हा अनुभव अधिकाधिक येत गेला. संसारांतील जास्त जास्त व्यापक अनुभवानंतर मानवाच्या दुःखाचीं कारणें – दुर्गतीचीं कारणें – करुण विपाकाचें मूळ मानवाच्या व्यवहारांतच आहे, त्याच्या स्वभावांत आहे, त्याच्या हातून घडणाऱ्या चुकांत आहे, त्याच्या ठिकाणच्या असंयमांत, अतिरेकांत, दुर्बलतेंत आहे याचा प्रत्यय

येत गेला. उत्पत्ति स्थिति आणि लय, Thesis, antithesis व Synthesis या सिद्धान्तानुसार माणसाच्या नाशाचीं बीजें माणसाच्याच ठिकाणीं असतात; अनुकूल अवस्थेंत हीं बीजें दबून असतात; परंतु कालांतराने आणि प्रतिकूल अवस्थेंत तीं उफाळून वर येतात, प्रभावकारी होतात, तीव्र परिणामी होतात; आणि त्यांमधून माणसाचा विनाश होतो; हें अधिकाधिक प्रत्ययाला येऊं लागलें. आणि मग दुःखद घटनांचें मूळकारण म्हणून मानवी स्वभावांतील घटक शोधण्याचा प्रयत्न होऊं लागला. यामधून रोमॅन्टिक ट्रॅजेडी म्हणजेच अद्भुतरम्य करुण नाटक निर्माण झालें. या प्रकारच्या नाटकाचे अत्युत्कृष्ट नमुने पुरविण्याचें काम जगांत प्रामुख्याने इंग्लंडच्या शेक्स्पीअरने मोठ्या प्रभावीपणें केलें.

परंतु याचा अर्थ अद्भुतरम्य करूण नाटकाने दैवाला अजीबात फाटा दिला असें मात्र मुळीच नव्हे. मनुष्याच्या संसाराचें कितीही सूक्ष्म आणि सांगोपात्त निरीक्षण करण्याचा यत्न केला तरीही त्यामध्ये कांही भाग तरी आपल्या आकलनाच्या आटोक्याच्या बाहेरचाच राहतो. त्यांतील कार्यकारणभाव उकलणें आपल्याला अशक्य होतें. दगड, तो फोडण्यासाठी हातोडा, तो हातोडा उचलून मारण्याच्या विविध प्रकारच्या क्रिया आणि मारणाऱ्या माणसाचा चांगला बळकट हात अशीं सर्व साधनें उपलब्ध असूनसुद्धा दगड फुटेलच, किंवा अमुक इतक्या घावांनंतर फुटेल याची खात्री देतां येणार नाही. अगदी एकाच दर्जाचा दगड एका प्रसंगीं दहा घावांत फुटला तर दुसऱ्या वेळीं तो पहिल्या घावालाही फुटेल किंवा आणखी एखाद्या वेळीं शंभर घाव घालूनही तो फुटेलच असें नाही. म्हणजे हीं सर्व साधनें उपलब्ध असूनही कार्यसिद्धीसाठी आणखी कांहीतरी अज्ञात परंतु निश्चितपणें अस्तित्वांत असणाऱ्या कारणाची किंवा कारणांची जोड जरूर असते. यालाच गीतेने "दैवम् च एव अत्र पंचमम्" या श्लोकभागांत दैव म्हणून संबोधलें आहे.

अद्भुतरम्य करुण नाटकाने 'दैव' ही ध्यानांत घेतलें —

तेव्हा करुण विपाकाचीं कारणें मनुष्यस्वभावांत कितीही शोधलीं तरी त्या सर्व ज्ञात कारणांच्या जोडीला अज्ञात असें एक किंवा अनेक कारणें असूं शकतात. म्हणजेच ज्ञात कारणांच्या जोडीला दैव हेंही उभें असतें, ही गोष्ट अद्भुतरम्य करुण नाटकें लिहिणारांनी दृष्टीआड केली नाही. कधी या अज्ञात कारणाला त्यांनी निवळ दैवाचें किंवा अपघातांचें स्वरूप दिलें; तर कधी तें कारण त्यांनी बाह्य सृष्टीमधील किंवा मानवी व्यवहारामधील विरोधांत पाहिलें. म्हणूनच अगदी सुरुवातीचीं ग्रीक नाटकें (आणि लॅटिन भाषेंतीलही अशींच कांही नाटकेंही) सोडलीं तर एकूण करुण नाट्याच्या क्षेत्रांत निव्वळ दैवहततेमुळें होणारा करुण विपाक किंवा निव्वळ स्वभावदोषजन्य करुण विपाक असा हवाबंद भेद नाटककारांनी पाळलेला दिसत नाहीं. जीवन हें या दोन्ही प्रकारच्या कारणांनी बनतें, बादतें. त्याचप्रमाणे या नाटककारांच्या करुण नाट्यांतील करुण विपाकही या दोहोंच्या

मिश्रणानेच त्यांनी सिद्ध केलेले आढळतात. कोणी कोठे आवश्यकतेप्रमाणे स्वभावदोष-जन्य परिपाकावर भर देईल; तर कोणी कोठे दैवावर अधिक भर देईल. पण केवळ एकाच बाजूवर विसंबून राहतांना कोणी आढळणार नाही. आपण पाहिलेल्या कांही नाटकांचा धावता आढावा जर आपण घेतला तर ही गोष्ट किती स्वच्छ दिसून येईल.

उदाहरणें —

हॅम्लेट नाटकच घ्या. हें नाटक निव्वळ स्वभावदोषजन्य करुण विपाकाचें नाटक म्हणून समजलें जातें. पण त्यांतही डेन्मार्कमधली कुजलेली समाजव्यवस्था, अधिक त्याच्या आईच्या बाबतींतील बिकट प्रश्न, अधिक त्याच्या स्वभावांत या असल्या भानगडींत पडण्याची प्रवृत्ति नसतांनाही संसारांत झालेला सर्व बिघाड सुरळीत करण्याची त्याच्यावर येऊन पडलेली व त्याला नको असलेली जबाबदारी, या बाह्य प्रतिकूल आणि ज्यांच्यावर त्याचा कांही ताबा नव्हता अशा गोष्टींचें मिश्रण करुण विपाकाच्या कारणांमध्ये असलेलें आपणाला आढळतें. मॅकबेथचा महत्त्वाकांक्षी स्वभाव, पापभीरुत्व, कलावंताचें तरल हृदय या स्वभावगत कारणांच्या जोडीला त्याची त्याला स्वस्थ बसूं न देणारी कृत्या पत्नी आणि त्याच्या मनांत अतिरिक्त महत्त्वाकांक्षेला अवसर करून देणारा एक कर्तृत्वशून्य राजा अशी दुजोडी व्यवस्था मॅकबेथमध्येही आपण पाहतों. ऑथेल्लोच्या स्वभावगत उतावळेपणाच्या जोडीला त्याचें प्रेम भिन्न व उच्च संस्कृतिसंपन्न अशा वर्गांतील स्त्रीवर बसण्याचा योगायोग आणि एका विशाल बुद्धिमान व कारस्थानी व्यक्तीचा विरोध अशी जोडगोळी बाह्य कारणांची आहेच.

अथवा औंधकरांचा संभाजी घ्या. तो उतावीळ आहे; आडदांड आहे; संशयी आहे. परंतु या दोषांचा तीव्र आविष्कार होण्याजोगी वागणूक वडिलांकडून व अष्ट-प्रधानांकडून त्याला मिळणें; त्यांतून त्याला जाच होणें आणि कलुषासह अनेकांचीं फितूरी कारस्थानें, या बाह्य परिस्थितीचेंही त्याच्या विनाशाला फार मोठें कारण झालें आहे. आणि शेवटीं तर भिंत पडून भुयाराची वाट बंद होणें हा निव्वळ दैवयोगाचा भाग यांत भरीला आहे.

गाल्सवर्दीचा स्टीफन प्रामुख्याने लोकप्रवाहाच्या विरुद्ध वागण्याचा प्रामाणिकपणा दाखवितो म्हणून त्याचा विनाश ओढवतो हें तर खरेंच. परंतु त्याचा कांहीसा अव्यव-हारी हटवादी आणि अहंकारी स्वभावही त्या गोष्टीला जबाबदार आहे. इब्सेनच्या स्टॉकमनचीही तीच गोष्ट आहे. उतावीळपणा, आग्रहीपणा, अव्यवहारीपणा या त्याच्या दोषांनी स्वार्थी समाजाच्या स्वार्थमूलक विरोधाला साहाय्यच केल्याचें आपण पाहतों. इब्सेनची हेडा गाब्लर मोठ्या चतुराईने आपलें पूर्वचरित्र पुसून टाकून नवीन संसार थाटूं पाहत होती. परंतु अनवधानाने पिस्तुलाबाबतची तिची झालेली चूक – एक अपघातच – तिला मुक्ततेचीं सर्व द्वारें बंद करतांना आपण पाहतो. जयंत आणि लीला यांना परिस्थितीचा विरोध संपूर्णपणें मारक होता. परंतु दोघांचाही उतावीळ

स्वभाव त्यांत भरीला होता. लीला थोडी कमी उतावीळ असती तर कदाचित आलेला दुर्धर प्रसंग टळताही.

इब्सेनच्या हालवर्ड सोलसेनचें उदाहरण पाहा. तरल प्रतिभेच्या त्या कलावंताला त्याचें अंतःकरण न जाणणारी रुक्ष वृत्तीची पत्नी मिळून त्याचें जीवन निःसार कां व्हावें? पण या बाह्य आघातावर मात करून स्वतःचें ध्येय गाठण्याचा प्रयत्न करण्याइतकी एकचित्तता त्याच्या ठिकाणीं नव्हती हा त्याचा स्वभावदोषच होय. आणि हा दोष त्याला उमगला इतक्या उशीरा कीं, त्याचें बिचारें वृद्ध आणि थकलेलें शरीर त्याच्या प्रतिभेच्या भरारीबरोबर उंच चढण्याला असमर्थ ठरलें.

युजीन ओनीलचा एवेन घ्या. स्त्रीच्या निरतिशय प्रेमापेक्षा त्याला शेतीवाडीचें प्रेम अधिक वाटलें. परंतु याच्याच जोडीला त्याच्या बोलण्याचा अगदी विपरीत अर्थ घेऊन त्या स्त्रीने आपल्या मुलाचाच घात केला, हा एक प्रकारचा अपघातच घडला.

राजा रामचंद्राने लोकाराधनेच्या पायीं सीतात्याग करून स्वतःला दुःखी करून घेतलें. लोक दुर्जन असतात हें त्याला ओळखलें नाही. शेवटींसुद्धा लोकाराधनेच्याच पोटीं सीतेचा वास्तवांत तो मोकळ्या मनाने स्वीकार करूं शकला नाही. परंतु त्याच्यासारख्या आणि सीतेसारख्या विशुद्ध व्यक्तीबद्दलसुद्धा जगांत असे भलते प्रवाद माजावेत हें तरी त्यांचें दैवच नव्हे काय?

टेनेस्सी विल्यम्सची ब्लँश वेडी होते याला कारण तिचें अविचारी जीवन हें तर खासच होतें. पण ज्या आपल्या बहिणीच्या अश्रयाला ती आली तिचा नवरा स्टॅनले हा जर तिच्या हात धुऊन पाठीस न लागता, तर कदाचित मिचेलशीं तिचें लग्न होऊन ती सुखी होण्याचा एक दूरचा संभव होता. आणि शिवाय ती अशी बेजबाबदार आणि अविचारी जीवन घालवूं लागली यांत तरी तिच्या कुटुंबांतील आळशी पुरुषांच्या पिढ्या, त्यामुळे आलेलें दारिद्र्य, मोठें मनुष्य मार्गदर्शनाला कोणी नाही, तिच्या तारुण्याचा निर्लज्जपणे उपभोग घेऊन तिला वाऱ्यावर सोडणारे तरुण लोक आणि तिच्या नाजुक कलासक्त अंतःकरणाची एवढीसुद्धा जपणूक न करणारें जग, या गोष्टीही तिच्या असंयमी वृत्तीच्या बरोबरीने तिच्यावर संकट ओढवायला, किंबहुना तिची वृत्ति अशी विषयलोलुप होण्याला कारण होत्या. शेप हंटलेकडून ब्लॅन्श केवढी मोठी आशा करीत करीत होती. परंतु शेप हंटले एकवार तिचा उपभोग घेतल्यानंतर पुन्हा तिची आठवण ठेवायला थोडाच बांधलेला होता!

कुलवधूमधील देवदत्त तसा मनाने कांही दुबळा किंवा मत्सरी नव्हता. परंतु त्याने आजारी कां पडावें? तो आजारी न पडता तर त्याच्यावर बायकोच्या नोकरीला संमति देण्याची पाळी आली नसती. ती नोकरी करूं लागल्यावर त्या दोघांच्या मिळकतींत फार मोठें अंतर पडलें, एवढेंच नव्हे तर या अंतराचें त्याला कांही वाटूं नये अशी कोणती गुणवत्ता देवदत्ताजवळ नव्हती, हें त्याचें आणखी दुर्दैव होतें. पण लोकांच्या टीकेने स्वतःच्या मनाला न खाण्याइतका चिवट स्वभाव त्याचा नव्हता आणि

त्याची खरी मनोव्यथा जाणण्याइतकी शांतता भानुमतीच्या ठिकाणीं नव्हती, हे त्यांचे स्वभावदोषही त्यांच्या वियोगाला थोडेफार कारण झालेच.

दत्तकाची आई इंदुमती ही आपल्या भोळ्या श्रद्धाळूपणामुळेच अडचणींत येते. परंतु दैवाचा भाग त्यांतही आहेच थोडा. सगळींच दत्तक मुलें नागेशसारखीं किंवा त्यांचे बाप नागेशच्या बापासारखे नसतात.

मोर्निंग विक्म्स इलेक्ट्रामधील लॅव्हिनियाचा अथपासून इतिपर्यंतचा झगडा विरोधी परिस्थितीशीं आहे हें तर खरेंच. पण त्यांतही तिच्या ज्ञात आणि अज्ञात स्वार्थीपणाचें किल्मिष तिच्या सर्व चांगल्या प्रयत्नांना हीनपणा आणि विपरीत परिणामकारकता आणण्यास कारण झालें आहे हें उघड आहे.

राघोबा आणि त्याची साथीदार आनंदीबाई हीं माणसें दुष्ट तर खरींच. पण रामशास्त्र्यांसारख्या निस्पृह, बाणेदार व निस्वार्थी माणसाचा पाठिंबा बारभाईच्या कारस्थानाला मिळाला हें राघोबाच्या दृष्टीने त्याचें दुर्दैव ठरलें. शास्त्रीबुवा खोटें कसे बोलतील, या महादजी शिंद्यांच्या शेऱ्यांत राघोबाचें मूर्तिमंत दुर्दैव साठवलेलें आहे.

सवाई माधवराव वयाने लहान, नानांच्या काचांत वाढलेला आणि म्हणून उतावीळ. याशिवाय केशवशास्त्र्यासारखा पाताळयंत्री स्वार्थी मनुष्य त्याच्या उतावीळ वृत्तीचा फायदा घ्यायला टपलेला; या दृष्टीने या नाटकांत विरोधी परिस्थितीचा जोर फार मोठा असला तरी त्यामध्ये सवाई माधवरावाच्या दुबळ्या, संशयी स्वभावाचा हातभार मुळीच नाही असें कसें म्हणतां येईल? प्रतापराव आणि मोहना यांचे जीव कारस्थानाच्या आगींत बळी पडले हें तर खरेंच. परंतु प्रतापरावाचा आग्रही, अव्यवहारी, आडदांड स्वभाव आणि त्या दोघांची व्यवहाराआगळी भावनाशील वृत्ति यांच्या पायीं त्यांच्यावरील संकटाचे मेघ अधिक गडद झाले आणि शेवटीं तर केवळ अविचारी साहसाने त्यांनी ऐन यशाच्या मोक्याला आपले प्राण धोक्यांत टाकले.

कीचकाचा नाश मात्र केवळ त्याच्या अहंकारामुळे झालेला आहे. आणि त्याच-मुळे तर आपल्याला त्याच्याबद्दल सहानुभूति वाटत नाही. राजा लिअरचा नाश त्याच्या कृतघ्न मुलींमुळे झाला असें वाटतें.. पण ऐशी वर्षांपर्यंत राज्य करूनही खरें मानवी जीवन म्हणजे काय याबद्दलच्या अज्ञानांत राहणारा लिअरही त्याबद्दल तितकाच जबाब-दार आहे. कोरिओलेनस मात्र कीचकाप्रमाणे आपल्या फाजील अहंकारापायीं अत्यंत हीन कोटीच्या वृत्तीपर्यंत घसरतो आणि अखेर त्याचा नाश कब्जीच्या नाशासारखा होतो. त्याच्याबद्दलही आपल्या मनांत तितकीशी हळहळ वाटत नाही. एकदाच तो आपल्याला खूप चटका लावतो. आईच्या धिक्काराच्या बोलण्यानंतर दीन होऊन तो रोमवरचें संकट टाळण्याकरिता तयार होण्याचा मोठेपणा दाखवितो तेव्हा. पण त्याचाच परिणाम म्हणजे बाह्य परिस्थिति एकदम त्याच्यावर उलटते आणि त्यांतच त्याचा अंत होतो.

राहतां राहिला बॅरिस्टर विश्राम. त्याच्या स्वभावदोषांमुळे आणि पापांमुळेच शेवटीं तो सर्वस्वाला मुकला आहे. परंतु त्यांतही थोडासा योगायोगाचा भाग हा

आहेच. विश्रामला लग्न न झालेल्या बाईच्या पोटीं एक मुलगी झाली होती. पण त्याच्च मुलीवर शेखरचें प्रेम बसावें हा विश्रामच्या स्वभावदोषांच्चा म्हणण्यापेक्षा विपरीत दैवाचा तडाखाच म्हणतां येण्यासारखा नाही का ? शैला मोहाला बळी पडून तिच्यावर कुमारी माता होण्याचा प्रसंग यावा आणि नंतर स्वार्थीपणाने कां होईना उल्हास तिच्याशीं लग्न करायला तयार झाला असतांना अव्यवहारी तत्त्वप्रेमाने तिने त्याला झिडकारून आईच्या घराची विक्री करण्याला त्याला प्रवृत्त करावें हा तरी दैवाचाच एक तडाखा नव्हे का ?

अद्भुतरम्य करुण नाटकाची नवी मजल —

आणि म्हणूनच तर आपल्याला विश्रामसारख्या दुबळ्या आणि असंयमी माणसांबद्दल जास्त हळहळ वाटत नसेल ना ? या दृष्टीनें पाहिल्यास अद्भुतरम्य करुण नाटकाने आणखी एक नवीन मजल मारलेली दिसेल. सुरुवातीच्या ग्रीक नाटकांतील दैवहतता एकमेव महत्वाची मानण्याची प्रथा जरी या अद्भुतरम्य करुण नाट्याच्या प्रांतांत सोडून देण्यांत आली होती तरी अद्यापि नायकस्थानावरील व्यक्ति कोणत्या ना कोणत्या तरी प्रकाराने श्रेष्ट दर्जाची असावी हा संकेत पाळला जात होता. परंतु पुढच्या पुढच्या काळांत हाही संकेत सोडलेला आढळतो. कथानकांतील दुःखद परिणतीची भीषणता कायमच राहिली. नायकासंबंधी अनुकंपा वाटावी हें धोरणही कायम राहिलें. तात्कालिक भीषणदर्शनाने अंतःकरण विस्फारित किंवा भयभीत करणाऱ्या घटनांमुळे व्यथित होणारें आपलें अंतःकरण सृष्टींतील विशाल समप्रमाणतेच्या जाणिवेने किंवा नायकाचें चित्त पश्चातापाने विशुद्ध होत गेल्याचें पाहून, समधात व शांत अवस्थेला पोचावें अशा प्रकारच्चा नाटकाचा अंतिम परिणामही, तसाच कायम राहिला. पण या सर्व करुण विपाकाचें अधिष्ठान कोणी ऐश्वर्यसंपन्न किंवा श्रेष्ठ व्यक्ति न राहतां तुमच्या आमच्यासारख्या सामान्य व्यक्तीच्याच तशा करुण जीवनाचें चित्रण करण्याची प्रथा पडत गेली. अशा सामान्य व्यक्तीविषयी प्रेक्षकवाचकांना उलट अधिक जिव्हाळा वाटतो असा अनुभव आल्यावर आधुनिक कवींचें लक्ष या प्रकाराकडे जास्त जास्त वळलेलें दिसतें.

सामान्य परंतु दुःखित माणसांबद्दल जिव्हाळा अधिक —

कारण, कसा कोण जाणें, पण सामान्य परंतु दुःखित माणसाबद्दल माणसांना जिव्हाळा अधिक वाटतो; इतका की, या जिव्हाळ्याने आर्द्र झालेलें चित्त अशा दुःखितांच्या दोषांकडेही डोळे झाक करूं लागते. नाझी तत्त्वज्ञानांतील क्रूर मानवाच्या ध्येयाने अकारण आकृष्ट झालेली कांही भारतीय मंडळी सोडली तर, मानवाची ही दुःखितांशीं समरस होण्याची वृत्ति सार्वत्रिक आढळणारी आहे असें दिसून येईल. त्यामुळे श्रेष्ठ व्यक्तीच्या पतनाविषयी व दुर्गतीविषयी वाटणाऱ्या अनुकंपेपेक्षा दुर्बलांच्या पतनाविषयी व दुर्गतीविषयी वाटणारी अनुकंपा जास्त जिव्हाळ्याची, जास्त जिव्हारीं जाऊन भिडणारी असते. श्रेष्ठ व्यक्ति आणि सामान्य प्रेक्षकवाचक यांच्या दरम्यान एक सूक्ष्म कां होईना पण

पडदा राहणें अपरिहार्य असतें. परंतु सामान्य माणुस, तुमच्या आमच्यासारखा माणुस असला की, त्याचें आपलें नातें, साधारणीकरण व्हायला असा कसला अंतराय आड येत नाही.

उदाहरणें —

आणि म्हणूनच सामान्य व्यक्तीच्या अंतर्गत दुबळेपणामुळे किंवा अपरिहार्य व्यक्तिगत दोषांमुळे अशा व्यक्तीला आपल्या तीव्र विकारांवर किंवा विचारांवर विजय मिळवितां येऊं नये, किंवा बाह्य परिस्थितीबरोबर करावा लागणारा झगडा अशा व्यक्तीच्या जीवनांत निष्फळ व्हावा, आणि त्यामुळे त्या व्यक्तीचा आणि त्या व्यक्तीवर अवलंबून असणारांचा अपरिहार्य नाश व्हावा, या प्रकारचें करुण दर्शन करणारीं नाटकें पुढच्या पुढच्या काळांत अधिकाधिक लिहिलीं गेलेलीं आढळतात. आपण पाहिलेल्या नाटकांमध्ये ॲन्टिगनी, स्टीफन, एवेन, ब्लॅन्श, मोहना, सवाई माधवराव, इंदुमती जयंत – लीला, विश्राम आणि आपण पुढच्या प्रकरणांत पाहूं तो सुधाकर हीं अशा सामान्य, परंतु ज्यांच्या दुर्दैवाबद्दल आपल्याला अतिशयच जिव्हाळ्याची हळहळ वाटते अशा नायकांचीं उदाहरणें आहेत.

अर्थात स्टीफनच्या बाबतींत आणि इब्सेनच्या डॉ. स्टॉकमनच्या बाबतींत प्रकार थोडासा निराळा आहे. हीं माणसें सामान्यच आहेत. पण त्यांच्या स्वभावांतील उणीवा, खरें पाहिलें असतां ज्यांमुळे माणसाचा नाश होणें अपरिहार्यच आहे अशा स्वरूपाच्या मुळीच नाहींत. त्यांचा नाश होतांना, या उणीवांच्यामुळे तो अधिक वेगाने होण्याला मदत होते हें जरी खरें असलें, तरी ज्या बाह्य कारणांमुळे हा नाश होतो तीं बाह्य कारणें नसतीं तर या उणीवा असूनही त्यांचें जीवन यशस्वी व्हायला हरकत नव्हती. हीं बाह्य कारणें – स्टीफनच्या बाबतींत आंधळा देशाभिमान आणि स्टॉकमनच्या बाबतींत धनिकांचा स्वार्थ व धनिकांच्या विरोधापुढे मान टाकणारा दुबळा कनिष्ठ मध्यम वर्ग, हीं त्या दोघांच्या अपयशाचीं बाह्य कारणें – इतकीं जबरदस्त ठरलीं की, त्या दोघा सत्प्रवृत्त माणसांचा झगडा अशक्य ठरला, त्यांचा पराभव अपरिहार्य ठरला.

दैवहतता, पण तीही सामान्य माणसाची —

म्हणजे ग्रीक करुण नाटकाचीच ही एक प्रकारें आवृत्ति – पण एका बाबतींत महत्त्वाचा बदल केलेली अशी – पुन्हा एकदा प्रचारांत आलेली दिसते. फरक हा की दैवहतता जरी कायम राहिली तरी दैव हें केवळ अज्ञात अशा दैवी अगर निसर्ग-शक्तींच्या आधीनचें न राहतां, सामाजिक रूढी, दुर्ग्रह किंवा स्वार्थ यावर आधारलेलें असें तें झालें आणि नाटक हें श्रेष्ठ व्यक्तींचें नाटक न राहतां, अशा बाह्य विरोधांत सापडलेल्या तुमच्या आमच्यासारख्याच सामान्य व्यक्तीचें तें नाटक झालें. स्टीफन, स्टॉकमनप्रमाणेंच कांही अंशीं ॲन्टिगनी, देवदत्त हीं अशा प्रकारचीं उदाहरणें आपल्याला आढळतात.

आणखी एक किंचित निराळा प्रकार —

याहून किंचित निराळा असा आणखी एक करुण नाट्याचा प्रकार निर्माण होत आहे असेंही आढळून येईल. त्यामध्ये नायकस्थानची व्यक्ति तुमच्या आमच्यासारखीच आहे. पण त्या व्यक्तीचा झगडा जो आहे तो कसल्याही बाह्य विरोधी शक्तींशीं नसून – अर्थात बाह्य अज्ञात विरोधी शक्ति नाहीतच असें नाही – पंचम असलेलें दैव त्याही व्यक्तींच्या जीवनांत आहेच – प्रामुख्याने स्वतःच्या अंतःकरणांतील परस्परविरोधी प्रवृत्तींशीं आहे. हेडा गाब्लरचेंच पाहा. सुखासीन संसारासाठी तिला टेसमनबरोबरचें वैवाहिक जीवन हवें आहे. परंतु त्याचबरोबर सामान्यपणें अडचणींचा होणार नाही असा वाटणारा जज्ज ब्रॅकचा सहवासही तिला हवा आहे. आणि त्याशिवाय लव्हबर्गसारखा ज्वालामुखी माणसाळून पचनीं पडला तर त्यालाही सांभाळण्याची ऊर्मि तिच्या ठिकाणीं आहे.

हालवर्ड सोलनेसची हीच अवस्था आहे. त्याचा कलात्मक ध्येयवाद त्याला एक बाजूला खूप ओढतो. पण त्यासाठी कराव्या लागणाऱ्या त्यागाला त्याच्या अंतःकरणाची तयारी नाही; सांसारिक जीवनांतील व्यावहारिक सुखाचीही ओढ त्याला सोडवत नाही. लॅव्हिनियाचीही आंतरिक धडपड कांहीशी याच स्वरूपाची आहे. ब्रॅन्टबरोबरचा सहवास तिलाही हवा आहे. पण लौकिक नीति–अनीतींच्या कल्पनांचें जाळें दूर करण्याची हिंमत तिला नाही.

अशा रीतीने चोविसशे वर्षांच्या या कालखंडांतील प्रातिनिधिक अशा करुण नाटकांवरून एक सामान्य निष्कर्ष काढायला आपणाला हरकत नाही कीं, निव्वळ नियतिजन्य करुण विपाक किंवा निव्वळ स्वभावदोषजन्य करुण विपाके अशा दोन हवाबंद गटांमध्ये करुण नाटकांची विभागणी करतां येण्यासारखी नाही. या दोहोंचें मिश्रणच करुण नाटकांत आढळून येतें. प्रमाणांत फरक होईल व त्या फरकानुसार नायकाच्या चित्रणाच्या रीतीमध्येही कदाचित थोडा फरक होईल. परंतु दोन वेगळे प्रकार कल्पिण्याला कांही आधार सापडत नाही. अन्टिगनीसारखें चोविसशे वर्षांपूर्वीचें पहिल्या पहिल्या काळांतील नाटकसुद्धा अशा विभागणीला आधार देत नाही; किंवा त्यानंतर सातआठशे वर्षांनी लिहिलेलें भारतामधील उत्तररामचरितम् हें नाटकही असा आधार देत नाही. पुढच्या पुढच्या काळांत तर दैवहततेवरचा भर कमीकमीच झालेला आढळून येतो.

नायक श्रेष्ठ व्यक्ति असलीच पाहिजे असें नाही —

याच चर्चेंत आपणाला असेंही आढळतें की करुण नाट्याचा नायक कोणी अत्यंत श्रेष्ठ व्यक्तिच असली पाहिजे असाही अनुभव आपल्याला येत नाही. नायक म्हणजे अत्यंत विख्यात आणि ऐश्वर्यशाली व्यक्ति असली पाहिजे हा मुळांत ॲरिस्टॉटलचा

निष्कर्ष. त्याने तो सोफोक्लीसच्या राजा ईडिपसच्या उदाहरणावरून बसविला. परंतु सोफोक्लीसच्या ॲन्टिगनीने त्या निष्कर्षाच्या निरपवादतेला धक्का दिला आहे. ॲन्टिगनी ऐश्वर्यवर्ती तर मुळीच नव्हती. प्रथम आपल्या दैवहत बापाबरोबर जवळजवळ भिक्षेकऱ्याप्रमाणें भटकत काळ कंठल्यानंतर बापाच्या मृत्यूनंतर केवळ क्रीऑनच्या दयेवरच ती जिणें जगत होती. त्याप्रमाणे तिला प्रख्याति – कीर्ति – लाभावी असा कोणताही विशेष तिच्या ठिकाणीं नव्हता. खुद्द ॲरिस्टॉटलने ज्या नाटककाराच्या नमुन्याच्या नाटकावरून आपला निष्कर्ष रचला त्याच अत्यंत प्रतिभावान नाटककाराच्या दुसऱ्या नाटकांतील नमुन्याची ही गोष्ट. पुढे तर या कल्पनेला बहुतेक फाटाच दिलेला आढळतो. हॅम्लेट एवढा करुण नायकांचा जणू राजा. परंतु प्रचंड कीर्ति किंवा ऐश्वर्याचें श्रेष्ठत्व त्याच्या ठिकाणीं जवळजवळ नव्हतेंच. वस्तुतः अशा ऐश्वर्याविषयी मुळीच आस्था नसलेला एक विद्याप्रेमी, कलाप्रेमी, तत्त्वचिंतनपर प्रवृत्तीचा, मोकळ्या मनाचा तरुण गृहस्थ म्हणूनच आपल्याला तो अधिक जवळचा वाटतो हें आपण पाहिलें आहे. त्यानंतरच्या काळांत तर सामान्य व्यक्तींच्या करुणामय जीवनानेच आपल्या अंतःकरणाची पकड अधिकाधिक घेण्याचा प्रयत्न नाटककार करीत आले आहेत हें आपण पाहिलें आहे. आपण पाहिलेल्या पंचवीसांहून अधिक नायकांपैकी अगदी अलीकडची, गेल्या दहाबारा वर्षांतील ब्लॅन्श ही तर किती सामान्य स्त्री आहे. आणि तरी वेडामध्ये परिणत होणाऱ्या तिच्या दुःखद विपाकाने आपलें हृदय किती हेलावून जातें हें आपण अनुभवलें आहे. तेव्हा करुण नाट्याचा नायक हा कोणी कीर्तिमान श्रेष्ठ व्यक्ति असलाच पाहिजे हा आग्रह धरायला, या विसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धांत, या श्रेष्ठ कवींच्या रीतीवरून मुळीच आधार मिळत नाही, एवढा निष्कर्ष आपणांला निर्विवादपणें काढतां येईल.

कथानक व व्यक्तिदर्शन यांना सर्वांत अधिक महत्व —

तिसरा आणि याहून महत्वाचा निष्कर्ष आपणाला या पाहणींतून दिसतो तो म्हणजे करुण नाटकांत कथानक आणि व्यक्तिदर्शन या गोष्टींना सर्वांत अधिक महत्व आहे. या बाबतींत दोन हजार वर्षांपूर्वी ॲरिस्टॉटलने काढलेला निष्कर्ष आजपर्यंत तरी संपूर्णपणें निरपवाद ठरलेला आढळतो. एवढेंच नव्हे तर कथानक हें सुद्धा एका विशिष्ट व्यक्तीच्या, म्हणजेच करुण नायकाच्या व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने विणलेलें आणि त्या व्यक्तिचित्रणाला ढिलेपणा येणार नाही इतकें एकरूप आणि एवढेंसुद्धा इकडेतिकडे न भटकणारें असें असलें पाहिजे; "कथानकाच्या प्रत्येक वळणावर, त्यांतील प्रत्येक घटनेवर अधिसत्ता, प्रखर प्रभाव, केवळ नायकाचाच असला पाहिजे" हा ॲरिस्टॉटलचा निष्कर्ष आपल्याला आपण पाहिलेल्या नाटकांमधून प्रत्ययाला येतो.

उदाहरणें —

म्हणूनच उत्तररामचरितामध्ये भवभूतीनेही "एको रसः करुण एव" अशी घोषणा

केली. त्या नाटकांतले बाकीचे वीर, शृंगार, वत्सल, आदि रस हे केवळ करुणाच्या अंगभूतच त्याने ठेवले व राम आणि सीता यांच्या करुणामय जीवनाच्या गांभीर्यांत ज्याने बिघाड येईल असा हास्यरस त्याने जणू कटाक्षाने दूर ठेवला. शेक्स्पीअरचीं करुण नाटकें पाहतांना आपण पाहिलेंच की, ऑथेल्लो, हॅम्लेट आणि पुष्कळ अंशीं मॅकबेथ या नाटकांत, एकूणएक घटना ही, नायकाचें जें व्यक्तिदर्शन शेक्स्पीअरला करावयाचें आहे त्याच्यासाठी खेचून उपयोगांत आणलेली आहे. हॅम्लेटमध्ये तर या प्रकारचा परिपोष सर्वांत अधिक साधला आहे. त्या नाटकांत प्रत्येक हालचालींत जणू हॅम्लेटचेंच वारें शिरलेलें आहे असा आपल्याला प्रत्यय येतो. त्यामुळेच हॅम्लेट हें शेक्स्पीअरचें सर्वश्रेष्ठ करुण नाटक मानलें जातें. मॅकबेथमध्ये लेडी मॅकबेथ केव्हा केव्हा मॅकबेथवर सावट टाकते. ऑथेल्लोमध्ये आयागो हा जणू नायकाचा प्रतिस्पर्धी वाटावा इतक्या प्रभावाने कथानकाच्या विणींत ताण उत्पन्न करतो. आणि लिअरबद्दल पाहा. वस्तुतः मानवी उदात्तीकरण– विशुद्धीकरण– शेक्स्पीअरच्या सर्व नाटकांत लिअरचेंच अधिक चांगलें साधलेलें आहे. मानवी दुःखाच्या विशालतेची आणि तीव्रतेची परिसीमाच जणू लिअरमध्ये गाठलेली आहे. तात्विक विचाराच्या दृष्टीने पाहिलें तरी लिअरचा सृष्टीशीं एकरूप होऊन जाण्याचा उन्मेष केवढा तरी उदात्त आणि श्रेष्ठ आहे. आणि तरीही रसिकांच्या मनाला हॅम्लेटनेच चिरंतन वेड लावलेलें आहे. यांचें एक मोठें कारण लिअरच्या कथानकाची वीण ढिली आहे. तसें पाहिलें तर लिअरचें कथानक हॅम्लेटपेक्षाही अधिक पल्लेदार आहे. पण त्यांत एकट्या लिअरची अधिसत्ता नाही. दुसऱ्यांना त्यांत जवळजवळ तितकीच अधिसत्ता मिळाल्यासारखी आहे. असा प्रतिस्पर्धी नाटकांत हॅम्लेटला कोणी नाही. आणि म्हणूनच हॅम्लेटच्या कथानकांत हॅम्लेटशिवाय दुसऱ्या कोणाचें बोटही शिरकूं शकत नाहीं; मग कोणाला प्रभावीपण येण्याची गोष्टच दूर. वास्तविक ऑफिलियाची कथाही किती विदारक आहे. पण नाटकांत तिचें अस्तित्व केवळ हॅम्लेटमुळे आहे. इतकें कीं, शेवटीं हॅम्लेटने "माझी खरी हकीकत जगाला सांग" असें होरेशिओला सांगून जगाचा निरोप घेतल्यानंतर ऑफिलियाची आठवणसुद्धा प्रेक्षकश्रोत्यांना राहत नाही.

शेक्स्पीअरच्या कोरिओलेनसचेंही व्यक्तिमत्व पुष्कळच चित्तवेधक आहे. परंतु कथानकाची रचना, इतकीं लहानमोठीं, एकमेकांशीं एकजीव न होऊं शकणारीं वळणें घेत झाली आहे की, शेक्स्पीअरच्या श्रेष्ठ करुण नाटकांमध्ये त्या नाटकाला स्थान मिळूं शकलें नाही.

प्राचीन नाटकांत राजा ईडिपसचें व्यक्तिचित्रणच साऱ्या नाटकावर दबदबा गाजवितें. त्या प्रमाणांत ॲन्टिगनीमध्ये, ॲन्टिगनीचा प्रियकर हीमॉन हा थोडासा प्रतिस्पर्धी झाल्याने, एवढेंच नव्हे तर क्रीऑनलाही त्या मानाने अधिक महत्त्व दिलें गेल्यामुळे, ॲन्टिगनी ही सोफोक्लीसच्या या नाटकाची नायक आहे कां नाही याबद्दलसुद्धा संशय निर्माण झालेला आहे. या दृष्टीने कथानकाची दृढता आणि बांधेसूदपणा

कमी असल्याने नाट्याच्या साध्याच्या परिणामकारकतेलाच कसा उणेपणा येतो याचें हें उदाहरणच मानतां येईल.

आधुनिकांमध्ये ड्रिंकवॉटरच्या लिंकनइतका सर्व कथानकावर अप्रतिहत वर्चस्व गाजविणारा नायक आपल्यापुढील नाटकांत दुसरा नाही. त्याचमुळे तें नाटक विलक्षण प्रभावी ठरलें आहे. त्याच्या खालोखाल इब्सेनचीं, हेडा गाब्लर आणि हालवर्ड सोलनेस हीं व्यक्तिचित्रें कथानकाला केवळ आपल्या व्यक्तिमत्वाशीं जखडून ठेवणारीं अशीं आहेत. हें महत्त्व 'एनिमी ऑफ् दि पीपल 'मधील स्टॉकमनला येऊं शकलें नाही. युजीन ओनीलचा एबेन हासुद्धा नाटकांत सर्वंकष प्रभाव गाजवीत नाही. त्याची प्रेयसी, सावत्र आई ॲबी, हिला तर नाटकांत त्याच्याबरोबरीने महत्त्व आहेच; पण त्याहूनही अधिक प्रभाव कथानकाच्या बांधणीवर एबेनच्या बापाचाच पडतो की काय असें वाटावें, अशा प्रकारचें वैशिष्ट्य त्या व्यक्तिदर्शनाला आलें आहे. लॅव्हिनियाशीं स्पर्धा तिची आई आणि भाऊ यांची आहे. ड्रिंकवाटरनंतर पुष्कळशा प्रमाणांत गाल्सवर्दीला कथानकाच्या एकरूप बांधणीचें श्रेय त्याच्या मॉब या नाटकाचा नायक स्टीफन याच्या बाबतींत साधलेलें आढळतें. आणि त्यानंतर पुन्हा एकदा, टेनेस्सी विल्यम्सची ब्लॅन्श कथानकाची एकमेव अधिष्ठात्री झालेली पाहिली, म्हणजे करुण नाटकाच्या प्रभावीपणांत, एक नायकस्थानावर अधिष्ठित झालेल्या व्यक्तीच्या दर्शनार्थच केवळ सर्व कथानक बांधेसूदपणें रचलें जावें या गोष्टीला केवढा मोठा अर्थ आहे हें ध्यानीं येतें.

आपल्याकडे उत्तररामचरितम् सोडलें तर दुसऱ्या – मराठी – नाटकांत या बाबतींत बहुतेक सर्वत्र ढिलेपणाच दिसून येतो. कीचकवधांत दासी आणि मैत्रेय यांचा पचकळपणा तर कीचकाच्या कथानकावरील घट्ट पकडीमध्ये, उणेपणा आणतोच; परंतु हिंसा-अहिंसा याविषयीचे गंभीर चर्चाप्रसंगही हीच उणीव उत्पन्न करतात. भाऊबंदकींत राघोबाला रामशास्त्री एवढा मोठा प्रतिस्पर्धी आहे की, हें नाटक राघोबाच्या करुण विपाकाचें की रामशास्त्र्यांच्या तेजस्वी निस्वार्थीपणाचें, असा संशय निर्माण व्हावा आणि त्या दोघांचीही पकड कथानकावर पुरेशी बसूं नये इतक्या अस्ताव्यस्तपणें नमकशास्त्री, चमकशास्त्री, दुर्गा, म्हाळसा आणि तुळोजी यांचे प्रवेश कथानकाला जागोजाग आडवळणाला घेऊन जातात. दादासाहेबाच्या दुसऱ्या लग्नाच्या बायकोचा, दारूच्या कोठारासंबंधीच्या पिलाजीरावाच्या कारस्थानाला उपयोग होतो. पण नुसत्या उल्लेखावर न भागवितां तिच्या आणि पिलाजीरावाच्यामधील चोरट्या प्रेमाचें प्रदर्शन करण्यांत आणि तिच्या म्हाताऱ्या नवऱ्याची तिच्यामुळे झालेली तिरस्करणीय अवस्था दाखविण्यांत खाडिलकरांनी कथानकाचा एवढा मोठा भाग अडविला आहे की, प्रतापराव आणि मोहना यांच्यामागून धावण्याला कथानक जणू विसरूनच जातें असें होतें.

एक सवाईमाधवरावामध्ये मात्र कथानकाची ही एकसूत्रता पुष्कळशी सांभाळलेली दिसते. पण तेथेही केशवशास्त्र्याचा आडगिऱ्हाइकी शृंगार डोकें वर करून कथानकाला राजरस्ता सोडून गल्लीकुचींत नेल्यावांचून राहत नाही.

बेबंदशाहीमध्ये खाशाचा आणि सर्जाचा यांची लुडबुड असह्य वाटावी इतकी अस्ताव्यस्त आहे. विशेषतः नाटकाच्या बाकीच्या सर्व भागांत कथानकाचें सर्व लक्ष मोठ्या हिरीरीने केवळ एका संभाजीवर अतिशय कौशल्याने केंद्रित केलेलें असतांना तर ही लुडबुड अधिकच रसभंगकारक होते. त्या मानाने अत्रे यांचा बॅरिस्टर विश्राम नाटकांत आपल्या प्रभावीपणाला उणेपणा यावा असें फारसें कांही घडूं देत नाही. पण नाटककाराची समजच मुळांत अशी कीं, आपण शैलाचें, कुमारी मातृपदाचें नाटक लिहीत आहों. त्यामुळे त्या प्रकरणाने नाटकांत आपल्या अंगापेक्षा बोंगा अधिक मोठा केल्याचा भास झाल्यावांचून राहत नाही.

तत्त्वप्रचाराचें स्थान केव्हाही गौणच —

कथानक आणि त्याची नाटकांतील प्रमुख व्यक्तिचित्रणाच्या घडणीशीं एकरूपता यावर यशस्वी करुण नाटकांत जितकें विशेष कटाक्षानें नाटककाराकडून लक्ष पुरविलें जातें, तितकें लक्ष विचारप्रकटन किंवा तत्त्वप्रचार यावर नाटककारांनी दिलेलें आढळत नाही. ॲरिस्टॉटलने करुण नाटकाचीं जीं सहा अंगें सांगितलीं त्यांमध्येही कथानक आणि तें जिच्याशीं एकरूप झालें आहें अशी व्यक्ति यावरच विशेष भर दिला. त्यांतही करुण नायकावरच जास्त. त्या मानाने thought किंवा तत्त्वप्रचार याला त्याने दिलेलें स्थान गौणच आहे.

या दृष्टीने आपण जर आपल्या या पंचवीस नाटकांकडे पाहिलें तर काय आढळतें ? ड्रिंकवाटरने तर लिंकनचें गुलामगिरी नष्ट करण्याविषयींचें तत्त्वज्ञान किंवा राष्ट्राची घटनात्मक एकता अभंग राखण्यासाठी म्हणून लिंकनने दक्षिणेकडील संस्थानांविरुद्ध मांडलेलें व यशस्वी केलेलें युद्ध यासंबंधी, या किंवा त्या बाजूने मत व्यक्त करण्याचा आपला हेतु नाही, अशी आरंभींच प्रतिज्ञा केली आहे; आणि काळाच्या प्रवाहाबरोबर वाहत न जातां काळावरच आपला प्रभाव गाजविणारा – काळाला आपल्या व्यक्तिमत्वाने विशिष्ट वळण देणारा – असा सामर्थ्यवान पुरुष आपल्या नाटकांत चित्रित करण्याचेंच फक्त आपलें काम आहे, अशी घोषणा करून तेवढेंच काम त्याने यशस्वीपणें पार पाडलें आहे. कलाकार या नात्याने माझें काम व्यक्तिचित्रण करणें हें आहे, तत्त्वमंडन किंवा खंडण नव्हे, हें त्याने आपल्या उक्तीने आणि कृतीने सिद्ध केलें आहे. याचा अर्थ त्याच्या लिंकनच्या चित्रणांत लिंकनच्या विचारांच्या दर्शनाला स्थान नाही असा नाहीं. परंतु त्या विचारांचें खंडणमंडन करण्याचें एक साधन म्हणून लिंकनच्या व्यक्तित्वाची घडण तो घडवीत नाही. तर लिंकन ही व्यक्तीच आपल्यापुढे उभी करावी आणि आपलें आणि त्या व्यक्तीचें सामरस्य – साधारणीकरण साधावें हाच त्याच्या कलाकृतिनिर्माणाचा प्रधान हेतु आहे.

शेक्सपीअरच्या नाटकांत कोणत्याही तत्त्वप्रचाराचा अंश धुंडूं जाणाराची निराशाच होईल; इतका त्याचा भर व्यक्तिचित्रणावर आहे. त्याच्या ऐतिहासिक नाटकांमध्येसुद्धा

इतिहासकथनापेक्षां व्यक्तिदर्शनावर तो अधिक लक्ष देतो. हॅम्लेटमध्ये, मॅकबेथमध्ये तत्त्वविचार नाही असें थोडेंच आहे? माणूस आहे तेथे तत्त्वविचार त्याच्यासोबत येणारच. पण तो नाटककाराचा तेथे चित्रणविषय नव्हे. ऑथेल्लोसारखे संशयी बनूं नका – किंवा संशय खट झोटिंग महा – हें सिद्ध करण्याकरिता कांही शेक्सपीअरने ऑथेल्लो नाटक खास लिहिलें नाही. ऑथेल्लो नाटक हें ऑथेल्लोचें आणि त्याच्या अंगत्वाने डेस्डेमोना आणि आयागो यांचें नाटक आहे. फार कशाला, संशय खट झोटिंग महा या तत्त्वाचा ज्या नाटकात उन्मेखून उल्लेख केलेला आहे तें सुखात्मक विनोदी नाटकही अखेर फाल्गुनराव आणि कृत्तिका, अश्विनशेट आणि रेवती यांचेंच नाटक राहतें. तें करुण नाटक नसल्यामुळे केवळ एका व्यक्तीच्या अधिराज्याने त्यांतील घटना वळण घेत नाहींत एवढेंच.

राजा ईडिपस हें नाटक तर बोलून चालून शापग्रस्त ईडिपसचें नाटक. त्यांत तत्त्व-ग्रथनाला मुळांतच अवसर नाही. राजाची सत्ता श्रेष्ठ की सामान्य मानवाची तत्त्व-निष्ठा श्रेष्ठ असा प्रश्न ॲन्टिगनीमध्ये अनुस्यूत आहे हें खरें. परंतु अखेर सोफोक्ली-सने नाटकाला नांव ॲन्टिगनीचेंच दिलें आहे. आणि कोणत्याही तत्त्वाचें खंडनमंडन न करतां त्याचें नाटक तत्त्वाच्या निष्ठेपायीं आत्मार्पण करायला तयार झालेल्या एका सामान्य निष्ठावान स्त्रीचें नाटकच झालें आहे.

इब्सेनच्या तीनही नाटकांत तत्त्वदर्शन हेंच नाटकाचें साध्य कल्पिलेलें नाही. हेडा गाब्लर हें तर सर्वतोपरी हेडाच्या धडपडीचें नाटक आहे. सोलनेसची अवस्था तीच आहे. एनिमी ऑफ् दि पीपलमध्ये, इब्सेनच्या मनांत स्वार्थी धनिक आणि त्यांचे बगल-बच्चे संधिसाधू कनिष्ठ मध्यमवर्गीय लोक यांच्याबद्दल चीड आहे व म्हणून तें नाटक त्याने लिहिलें आहे हें व्यक्त झाल्यावांचून राहत नाही हें खरें; पण म्हणून कांही तें नाटक त्या तत्त्वाच्या प्रचारासाठी रचलेले संवाद अशा स्वरूपाला गेलेलें नाही. अखेर जय कला-वंताचाच झाला आणि आपल्यापुढे समाजाने शत्रू म्हणून टर उडविलेला निष्ठावंत आणि उदारहृदय असा डॉक्टर स्टॉकमन उभा राहिला; नुसता त्या क्षणींच उभा नाही राहिला, तर प्रेक्षक वाचकांचा तो हर वेळचा, हर ठिकाणचा सोबतीच बनला. गाल्सवर्दीने मोठ्या राष्ट्रांची लहान राष्ट्रांशीं होणारी वागणूक या पार्श्वभूमीवर लोकसमाजाच्या आंधळ्या हुल्लडीचें नाटक लिहिण्याचाच विचार प्रमुख मानला; नाटकाला नांवही त्याने MOB जनता वेताळ हें दिलें. पण अखेर जनता – वेताळाच्या चित्रणाला पार्श्व-भूमीचेंच स्थान मिळून त्यावर स्टीफनचेंच चित्र त्याने ठसठशीतपणें निर्माण केलें. तत्त्वनिष्ठेसाठी साऱ्या स्वकीयांविरुद्ध झगडणारा, प्रसंगीं प्रियतम पत्नीचाही चिरविरह सहन करण्याला सिद्ध होणारा एक धीरवीर पुरुषच त्या नाटकांतून आम्हांला कायमचा साहित्यमित्र म्हणून लाभला.

दाबलेल्या मनोभावनांच्या तांडवांतून अखेर जिला शोक करणेंच शोभतें अशी लॅव्हिनिया युजीन ओनीलने निर्माण केली. जमिनीचा आणि स्त्रीचा लोभ किती दुस्तर

असतो, त्यापायी केवढे अनर्थ माजतात, पितृसत्ताक कुटुंबांत भिन्नभिन्न प्रकारचे स्फोट कसे होतात, हें दाखवायला निवालेला युजीन ओनील, शेवटीं ॲबी, कॅबट आणि विशेषतः एबेन हीं तीन व्यक्तिचित्रेंच रसरशीतपणें निर्माण करून राहिला. टेनेस्सी विल्यम्सला ब्लॅन्शाच्या रूपाने आधुनिक जगांतील बेजबाबदार आणि विषयलोलुप स्त्रियांच्याविरुद्ध, आणि स्वार्थी विषयांध पुरुषांविरुद्ध आपल्या स्ट्रीटकार नेम्ड डिझायर नाटकांत प्रचार करावयाचा आहे, म्हणून त्याने तें नाटक लिहिलेलें आहे, असें म्हणणें किती अन्यायाचें ठरेल, हें त्या नाटकाची पाहणी जी आपण केली तिच्यावरून अगदी स्पष्ट होईल.

उत्तररामचरितामध्ये भवभूतीला कोणतें तत्त्वप्रतिपादन करावयाचें आहे ? खाडिलकर तर भारतीय राजकारणाचा प्रच्छन्न आविष्कार करायला सरसावलेले नाटककार. परंतु त्यांच्या सवाई माधवरावामध्ये चुकूनसुद्धा तत्त्वप्रचाराची भूमिका नाही. कांचनगडची मोहनामध्ये मुसल्मानांच्या हातून देश स्वतंत्र करण्याच्या तीव्र प्रयत्नांचा उपयोग केला आहे, तो केवळ पार्श्वभूमि म्हणूनच आहे; नाटककाराचें लक्ष आहे मोहनेच्या स्वभाव-चित्रणावरच. भाऊबंदकी हें तर ऐतिहासिक आणि प्रचलित राजकारणावर कटाक्षाने प्रकाश पाडणारें नाटक. पण त्यांतही खाडिलकरांच्यामधील कलावंताने राघोबादादा आणि रामशास्त्री या दोन व्यक्तीच प्रामुख्याने आम्हांला दिल्या. फक्त कीचकवधाचा प्रश्न थोडा वेगळा आहे. त्या नाटकांत धर्मराजाच्या तोंडून हिंसा-अहिंसा-विवेक विशेष सूक्ष्मपणाने खाडिलकरांनी मांडला आहे; इतक्या साक्षेपाने की, तें नाटक या विषया-वरचा एक निबंध या स्वरूपाला पोचावें. पण त्यामुळेच त्यामधील व्यक्तिचित्रें पुसट झालीं आहेत आणि एक करुण नाटक या दृष्टीने त्याच्या मूल्यांत उणेपणा आला आहे.

जयंत आणि लीला यांच्या नाटकांत पुनर्विवाहाच्या खंडनमंडनाचा प्रश्न नाही हें आपण पाहिलेंच आहे. बेबंदशाहींत संभाजीचें अत्यंत प्रभावी चित्रण हेंच शेवटीं आपल्या चित्तावर ठसून राहणारें आहे.

अशा रीतीने पाहिलें तर या पंचवीस नाटकांवरून, प्रतिभावंत नाटककार नाटक लिहितो तें तत्त्वप्रचाराचा एक निबंध म्हणून लिहीत नाही; एवढेंच नव्हे, अशी एखाद्या वेळीं त्याची समजूत झालेली असली तरीही त्याच्यामधील कलावंत त्याला तसें करूं देत नाही, आणि त्याच्या हातून प्रभावी मानवी चित्रणच घडतें, किंवा भवभूति म्हणतो त्याप्रमाणें करुणरसप्रधान व्यक्तिदर्शनच तो आपणाला घडवितो; असा आणखी एक निष्कर्ष आपण पाहूं शकतों.

प्रसंगांपेक्षा व्यक्तिचित्रणेंच रसिकाला मोहून राहतात —

कलावंत साहित्यनिर्मात्याचें अधिकांत अधिक लक्ष व्यक्तिचित्रणावरच असतें याचें एक मोठें गमक म्हणजे साहित्यांतील श्रेष्ठ श्रेष्ठ कलाकृतींतील प्रसंगांपेक्षा व्यक्तीच आपलें चित्त अधिक आणि अधिक काळ वेधून राहतात हा आपला अनुभव आहे. नाटकांतील

मराठी ग्रंथ
अनुक्रमांक 2.6.360 दि
सामान्य निष्कर्ष क्रमांक ...२९५... नोंः

व्यक्तिचित्रणें तर अधिकच कोरलेलीं राहतात हृदयावर; कारण प्रसंगांपेक्षा नाटककाराला व्यक्तिचित्रणाकडे जास्त लक्ष पुरविणें हें तंत्रदृष्ट्या अपरिहार्यच असतें. परंतु कथा-वाङ्मयांतही हाच अनुभव येतो. अशा या कलावंतांनी चित्रित केलेल्या व्यक्तींपैकी कांही कांही व्यक्ती तर इतक्या अविस्मरणीय असतात की, त्या आम्हां वाचकांच्या नित्य सहवासाच्या जणू स्नेहीच बनतात. शेक्स्पीअरचा हॅम्लेट; व्यासांचा विदुर किंवा कृष्ण, किंवा त्यांची द्रौपदी; भवभूतीचे रामसीता; व्यासांचाच, आर्यांनी ज्याच्यावर महान अन्याय केला असा महाधनुर्धर एकलव्य; हरिभाऊंची यमुना, प्रोफेसर डॅन्डी, सोन्याबापू, रावजी, यशवंतराव, श्रीधरपंत, सत्यभामाबाई हीं मंडळी; वामन मल्हारांची रागिणी, उत्तरा, आनंदराव, इंदु काळे, आणि सरला भोळे, खाडिलकरांचा रामशास्त्री, सवाई माधवराव, अशी अनेक मंडळी आमच्या संसारांतील प्रत्यक्ष शरीरधारी सहचरां-पेक्षाही आम्हाला जास्त उपयोगी पडतात. क्षणभराच्या हाकेसरशी ही माणसें आमच्याशीं बोलूं लागतात, सुखद संवाद करूं लागतात, भांडूं लागतात; वेळेचें बंधन किंवा स्थळाचें बंधन त्यांच्या आमच्या सहवासांत व्यत्यय आणूं शकत नाही.

म्हणून कित्येकदा तर असें म्हणावेंसें वाटतें की, ती कथा, तें नाटक, तें काव्य श्रेष्ठ कीं जें असें स्थलमर्यादांचें बंधन नसलेली स्नेहमंडळी आम्हांला पुरवितें. या कसोटीवर घासून जगांतील सर्व वाङ्मयकृतींची एकवार तपासणी करण्याचा उद्योग खरो-खरच करून पाहण्यासारखा आहे. त्यावरून जगांत, काळाच्याही सर्वभक्षक वाटचालींत टिकून राहिलेल्या साहित्यकृतींचें श्रेष्ठत्व, या चिरंतन मानवस्नेही होऊन राहण्याजोग्या व्यक्तिदर्शनांतच आहे असा निष्कर्ष प्रस्थापित होण्याचा फार मोठा संभव आहे.

व्यक्तिचित्रणें मोहित कां करतात ?

पण या संदर्भांत आणखी एक विचार केल्याशिवाय हा शोध पुरा व्हावयाचा नाही; या कलावंतांच्या व्यक्तिचित्रणावर आमचें चित्त इतकें लोभावतें, त्यासाठी तें इतकें वेडें होतें, याचें तरी कारण काय ? आमच्या अंतःकरणाचा एवढा खोल ठाव घेण्याचें सामर्थ्य या व्यक्तिचित्रणांत कोठून प्राप्त होतें ?

याचा खुलासा करण्याचा प्रयत्न आपल्याकडील साहित्यचर्चाकारांनी अनेक रीतींनी केल्यानंतर आता रसोत्पत्तीचा सिद्धांत त्या बाबतींत सर्वांशीं मान्य झालेला आहे. या रससिद्धांताची विशेष खोल चर्चा करण्याचें हें ठिकाण नाही. आणि त्याचें तसें कारणही नाही. मराठींत सुदैवाने गोदावरी केतकर यांचें भारतीय नाट्यशास्त्र, प्रा. जोगांचा आधुनिक काव्यप्रकाश, प्रा. द. के. केळकर यांचें काव्या-लोचन, प्रा. वाटवे यांचा रसविमर्श आणि अगदी अलीकडे प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचा भारतीय साहित्यशास्त्र हा ग्रंथ या व अशा पुस्तकांमध्ये रससिद्धांताची फोड पुष्कळच चिकित्सापूर्वक केलेली आहे. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचा ग्रंथ तर त्या दृष्टीने खास उल्लेखनीय आहे.

रसानंद लौकिक सुखाहून आगळा —

परंतु एका गोष्टीबद्दल थोडा खुलासा करणें आवश्यक वाटतें. रसोत्पत्तीमुळे रसिकाला आनंद वाटतो याचा अर्थ सुख होतें असा नाही, हें या बाबतींत विशेष कटाक्षाने जाणावयास पाहिजे. सुख हें त्या त्या इंद्रियाच्या वासनेचें समाधान होय. आणि म्हणूनच तें जसें लौकिक आहे तसेंच तें अपूर्णतेने ग्रासलेलें आहे. एका इंद्रियाला एका वेळीं वासनापूर्तीचें सुख मिळत असतांना बाकीचीं इंद्रियें त्यांच्या त्यांच्या सुखप्राप्तीपासून वंचित होण्याचा बहुशः संभव असल्यामुळे त्यांचा असंतोषच निर्माण होणार आणि त्यामुळे उपभोगलेलें सुखही मनुष्याच्या मनाला सर्वतोपरी आनंदी करण्याला समर्थ होणार नाही. आकंठ श्रीखंड खाल्ल्याने जिव्हेची वासानातृप्ति जरूर होईल; परंतु तें खात असतांनासुद्धा पचनसंस्था आपल्यावर पडणाऱ्या जादा बोजाबद्दल कुरकुर करूं लागेल; आणि प्रत्यक्ष त्या बोजाचा तणावा सुरू झाल्यानंतर तर कदाचित ती संस्था बंड करून उठेल. शिवाय जिभेची वासनातृप्ति करण्यांत व्यक्ति गुंतली असतांना स्पर्शवासना, दृष्टिवासना श्रुतिवासना, घ्राणवासना यांच्या तृप्तीचा विषय भोजन करणाराच्या चित्तांत ठरणार नाहीच; आणि म्हणून तीं इंद्रियें त्या वेळीं अतृप्तच राहतील; सर्व इंद्रियांचें एकसमयावच्छेदेकरून तृप्ति होण्याचें साधन त्या जिव्हेच्या तृप्तीमध्ये नसल्यामुळे मानवाच्या चित्ताला संपूर्ण तृप्तीनंतर जें समाधान लाभावें तें केवळ एका जिभेच्या तृप्तीमुळे लाभणार नाही. कांठें तरी, कांही उणेपण असल्याची सुप्त वा असुप्त जाणीव राहून, एक पक्षीं सुखी असूनही मानवाच्या मनाची हुरहूर नाहीशी होणार नाही; आनंदी आनंद झाल्याचा अनुभव मानवाला येणार नाही.

सामान्य लौकिक सुखांच्या ठिकाणीं ही अपूर्णता निसर्गजात आहे. निसर्गतःच हीं इंद्रियगत सुखें अपुरीं आणि दुःखाभिभूत आहेत. हा अपुरेपणा, हें दुःखाभिभूतत्व रसजन्य आनंदामध्ये नाही. म्हणूनच रसानंद हा अलौकिक, ब्रह्मानंदसदृश मानला आहे.

सर्व रसांचा अंतिम परिणाम शांत रस —

मनुष्याच्या सर्व चित्तवृत्तींचें एकाच क्षणीं इतकें आतृप्तिपर्यंत समाधान होणें कीं, क्षणभर त्याचें देहभान विसरून त्याने संपूर्णतया तदाकार, तल्लीन व्हावें, ही प्रक्रिया रसनिष्पत्तीमध्ये मानलेली आहे. ज्ञानेश्वरांनी या प्रक्रियेचें कांही ठिकाणीं जातां जातां सुंदर दिग्दर्शन केलें आहे. गीतार्थ श्रवण करणाराच्या कर्णेंद्रियाच्या ठिकाणींच जीभ येऊन स्थिरावते; डोळ्यांचें तेथेच पारणें फिटण्याचा योग येतो; स्पर्शसुखाचेंही समाधान तेथेंच निर्माण होतें; असें सर्व इंद्रियांच्या तृप्तीचें निधान गीतार्थश्रवण आहे असा दावा त्यांनीं मांडला आहे. सोनें नुसतें डोळ्यांना सुख देतें. पण त्याच सोन्याला कर्णमधुर ध्वनि असेल, अमृतसमान रुचि असेल आणि कुसुमसहज गंध असेल तर जी बहार

येईल तशी अलौकिक, निसर्गात न सापडणारी, आनंदाची अवस्था गीतार्थश्रवणाने प्राप्त होते असें रूपकात्मक वर्णनही त्यांनी केलें आहे. म्हणूनच सर्व रसांचा अंतिम परिणाम किंवा परिपाक म्हणजे शांत रस असें त्यांनी आग्रहाने प्रतिपादिलें आहे.

तन्मयतेने होणाऱ्या आनंदाने मानवाचें मन शांत होतें, त्याची प्रज्ञा स्थितप्रज्ञा-प्रमाणे स्थिरावते. 'हर्षखेद ते मावळले, अश्रु निमाले' अशा ज्या अवस्थेचें झपूर्झा असें नामाभिधान केशवसुतांनी केलें ती उन्मनी अवस्था रसानंद मनुष्याला प्राप्त करून देतो. म्हणून लौकिक सुख आणि साहित्याचा – किंवा कलांचा – आनंद यांमध्ये गल्लत होतां कामा नये.

अशी गल्लत होते आणि म्हणूनच शोकमय कथाश्रवणाने किंवा दर्शनाने आनंद कसा होऊं शकेल असा प्रश्न विचारला जातो. वस्तुतः याचें उत्तर असें आहे की, शोकप्रसंगांच्या दर्शनाने आपणालाही सुख होत नाहीच; दुःखच होतें. आणि तरीही शोकाचें किंवा दुःखाचें स्वरूप विशुद्धतर होऊन आमचा अहंभाव नाहीसा होतो आणि या अवस्थेंत प्राप्त होणाऱ्या अलौकिक समभावनेंतून मनुष्याच्या ठिकाणीं अननुभूत आनंद – शांत अवस्था – साम्ययोगस्थिति निर्माण होते.

हें सामर्थ्य करुण रसाच्या ठिकाणीं सर्वांत अधिक —

अर्थात सर्वच रसांच्या ठिकाणीं हें सामर्थ्य आहे हें जरी खरें असलें तरी शृंगार आणि करुण या रसांच्या ठिकाणीं हें सामर्थ्य इतर रसांच्यापेक्षा फार मोठ्या प्रमाणांत आहे; आणि त्यांमध्येही करुण रसाचें हें सामर्थ्य जवळ जवळ अतुलनीय आहे; फक्त एक भक्तिभावनेचीच त्याच्याशीं बरोबरी होईल.

शृंगार रसांत वर्ण्य व्यक्तीशीं आपलें तादात्म्य होतें हें जरी खरें असलें, तरी मूलतः या रसांत भोगपरायणतेचा पुष्कळ अंश असल्यामुळे चित्तविशुद्धीची उंच पायरी या रसाच्या प्रक्रियेंत साधणें शक्य नाही. दुःखिताबद्दल, अपंगाबद्दल, दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेल्याबद्दल जिव्हाळा वाटणें हें अहंभावनेच्या लोपाला आणि विशाल समभावनेच्या निर्मितीला फार मोठें उपकारक साधन आहे. आपण पाहिलेंच आहे की, करुण विपाकाच्या परिणामाने खुद्द त्या झंझावातांत सापडलेल्या व्यक्तीचे दोषसुद्धा लोप पावत जातात; त्या व्यक्तीची चित्तवृत्ति निर्मळ होत जाते; त्या व्यक्तीच्या ठिकाणचे क्षुद्र हेवेदावे, रागलोभ संकोचतात, जवळजवळ नाहीसे होतात; त्या व्यक्तीचें आत्मसंशोधन सुरू होतें, आत्मप्रत्यय फार मोठ्या प्रमाणांत सुरू होतो आणि अंतःकरणाच्या उंच विशालतेच्या वैभवांत अशी व्यक्ति आपलें दुर्धर भवितव्य शांत मनाने भोगायला तयार होते. सर्वच करुण नायकांच्या ठिकाणीं अशी करुणोदात्त परिस्थिति निर्माण होते असें नाही; आणि झाली तरी विशुद्धतेचें – उदात्ततेचें प्रमाण सर्वांच्याच ठिकाणीं एकसारखें असतें असेंही नाही. पण थोड्यातरी प्रमाणांत ज्याच्या ठिकाणीं या त्यांचा उदय झाला नाहीं असा करुण नायक असलाच तर तो अगदी विरळा.

आपण पाहिलेल्या नायकांत लिअर आणि स्टीफन, ऑथेल्लो, ब्लॅन्श, राजा रामचंद्र आणि संभाजी हीं विशुद्धीच्या – उदात्ततेच्या परिसीमेचीं उदाहरणें आहेत. विषयगर्तेंत रुतून गेलेल्या ब्लॅन्शासारख्या स्त्रीलासुद्धा डॉक्टरच्या ठिकाणीं अनपेक्षितपणें मानवी मृदुतेचा अनुभव येतांच ती कशी एखाद्या कोकराप्रमाणे मृदुमवाळ बनते हें पाहण्यासारखें आहे. जयंत जरी या पराकोटीला पोचला नाही तरी लीलेने ही झपूर्झाची अवस्था गाठली. जगाविरुद्ध तिची कसलीही तक्रार राहिली नाही. अनंतांत विलीन होतांना ती आनंदी आनंद गडे या भावनेंत रंगली. एवेन आणि ॲबी यांनीसुद्धा फौजदारी शिक्षेचा रस्ता धीरोदात्तपणे स्वीकारला.

आत्मनिरपेक्ष करुणामयतेचा अनुभव —

अशा या विशुद्ध होत जाणाऱ्या नायकांबद्दलच्या सहानुभावामुळे, समभावनेमुळे, एकात्मभावनेमुळे, आपल्याही ठिकाणचे रागद्वेष मावळतात, दयाभावना, करुणा, या भावनांच्या बाबतींतीलसुद्धा स्वार्थाची भेसळ नाहीशी होते, आंपण आपल्या स्वतःला विसरतों, नायकाच्या त्या विशुद्ध जीवनाशीं एकरूप होऊन, निरपेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष – शुद्ध करुणामयतेचा अपूर्व आनंद आपण उपभोगतों; आपलेही हर्षखेद मावळतात, शरीरगत सर्व चित्तवृत्ती एकदम समधात होतात आणि त्या सर्व हृदयाच्या ठिकाणीं एकवटून हृदय तल्लीनतेने आर्द्र होतें; नुसत्या डोळ्यांतूनच नव्हे, तर सर्व शरीरांतून जणू आर्द्रता पाझरूं लागते; आणि अपूर्व समाधिस्थितीचा आनंदमय अनुभव येऊन शरीर आणि मन अलौकिक समतेची शांतता अनुभवतात.

करुण रसाच्या ठिकाणींच हें सामर्थ्य या कारणामुळे सर्व रसांपेक्षा अधिक आहे; किंबहुना इतकी विशुद्ध समाधिस्थिति निर्माण करण्याचें सामर्थ्य फक्त एकट्या करुण रसाचेंच आहे. त्याच्याच ठिकाणीं आम्हांला आमचें वेगळेंपण विसरून पराशीं एकरूप होण्याचा अलौकिक आनंद देण्याचें सामर्थ्य आहे.

अरविंदांचा आक्षेप यथार्थ नाही—

यामुळे अरविंद घोषांसारख्यांनी आपल्या कालिदासावरील निबंधांत करुण नायकाच्या चित्रणाला तें पाश्चात्यांच्या पाशवी संस्कृतीचें प्रतीक म्हणून नाकें मुरडायला तयार व्हावें याचें सखेदाश्चर्य वाटतें. करुण नायकाचें चित्रण म्हणजे "माणसाच्या आत्म्याला केसांनी धरून ओढून भयानकता, कीव आणि क्रूरता यांच्या तुफानांत गरगर फिरविणें आणि त्या तुफानी पावसांत त्याला ओलाचिंब करून, पूर्ण पराभूत करून भयभीत अवस्थेंत थरकाप करीत परत जेथल्या तेथे नेऊन ठेवणें" असें त्यांनी त्वेषाने वर्णन केलें आहे. म्हणजे करुण भावनेच्या अवलंबनाने हृदय विशुद्ध होतें हें नाकारण्याचा हा प्रकार आहे. राजा लिअर तुफानांतून भटकला, पण त्यामुळे तो पराभूत झाला नाही, भयभीत झाला नाही. किंबहुना त्या वादळांतच लिअरला खरें विश्वदर्शन

झालें; तेव्हाच त्याला विश्वांतील सहृदयतेची ओळख पटली; तेव्हाच जीवनांतलीं सारीं कंटकशल्यें त्याच्यापुरतीं पार त्रोथटलीं; आणि त्याचें अंतःकरण विशाल आणि विशुद्ध करुणेने व आत्मीयतेने भरून गेलें.

आणि यांतच करुण नायकाच्या व्यक्तिचित्रणाचें महत्त्व आहे, उपयोगित्व आहे. साधारणीकरणाच्या सिद्धांतानुसार नायकाच्यात्ररोत्रर्त्च आमच्याही हृदयाची विशालता त्याने वाढत जातें, तें अधिकाधिक विशुद्ध, निर्मळ होत जातें, त्याच्या ठिकाणीं अधिकाधिक सर्वात्मभाव जागृत होतो.

करुण नाटकाच्या दर्शनाने आनंद कां आणि कसा होतो हें एवढ्या चर्चेवरून सामान्यपणें दिग्दर्शित व्हावें. या विषयाची ही सांगोपांग चर्चा नव्हे; हें त्याबद्दलचें नुसतें ओझरतें टिपण आहें हें या ठिकाणीं ध्यानांत ठेवायला हवें.

राहतां राहिला प्रश्न, नाटकांत असें व्यक्तिचित्रण करतांना कांही विशिष्ट तंत्र पाळण्याबद्दलचा कांही निष्कर्ष आपल्याला या पंचवीस नाटकांवरून त्रांधतां येण्यासारखा आहे काय ?

या त्रात्रतींत नाटककाराच्या साध्याला अनुसरून तंत्र कसें बदलतें हें आपण प्रत्येक नाटकाची तपशीलवार पाहणी करीत असतांना पाहिलें आहे. व्यक्तिदर्शनामध्ये त्रहुतेक नाटकांत, स्वभावगत दोषांमुळें होणारा करुण विपाक आणि त्यांतून होणारें नायकाच्या चित्ताचें विशुद्धीकरण हेंच दाखविणें, हें नाटककाराचें साध्य आहे असें आपण पाहिलें. आणि मग हें साध्य साधण्यापुरतेंच व्यक्तिदर्शन घडविणें हें नाटककाराला अपरिहार्य झालें.

नाटकावर स्थळकाळाचें बंधन —

कारण, कथावाङ्मयाच्या तुलनेने पाहतां स्थळ आणि काळ या दोहोंचें नियंत्रण नाटकामध्यें फार मोठ्या प्रमाणावर पडत असतें. कथा ही निव्वळ वाचकाच्या चित्तगत स्थळामध्ये घडावयाची असल्याने, त्या स्थळाचा विस्तार अवघ्या विश्वाएवढा ठेवला तरी कथाकाराला कसला प्रत्यवाय वाटत नाहीं. परंतु नाटककाराला पंचवीस तीस हात लांबरुंद चौकोनांत, कितीही प्रयत्न करावयाचा म्हटला तरी एवढ्या विस्तृत स्थळाचा आभास निर्माण करणें ही अशक्यप्राय गोष्ट आहे. याचा अनुभव लिअर नाटकांत तुफानाच्या प्रवेशाच्या निमित्ताने आपण पाहिला आहे. लिअरमधील तुफानाची वास्तविक स्थलमर्यादा एवढी विशाल आहे की, छोट्याशा रंगभूमीवर तिचा आभास निर्माण करणें जवळ जवळ अशक्य कोटींतलें. आणि म्हणूनच लँत्रसारख्या, शेक्सपीअरच्या सर्वांत जास्त रसिक भक्ताचाही, रंगभूमीवरील त्या देखाव्याच्या तोटकेपणामुळे विरस झाला. शाकुंतलांत असेंच होण्याचा संभव फार. कितीही प्रयत्न केला तरी प्रत्यक्ष रथ रंगभूमीवर आणून, कालिदासाने त्याच्या वेगाचें जें वर्णन केलें आहे तो वेग प्रत्यक्ष

आपल्या डोळ्यांसमोर दाखविणें ही अशक्यच गोष्ट आहे. त्यासाठी प्रेक्षकांच्या कल्पना-चक्षूंवरच विसंबून राहिलें पाहिजे. शेक्सपीअरच्या कोरिओलेनस नाटकांतील पहिल्या अंकांतील प्रत्यक्ष लढाईच्या प्रवेशांचें पर्यवसान नैयक्तिक चकमकींत कसें होतें आणि कोरिओलेनसच्या कोरिओलीमधील शौर्यांवरहल नाटककाराने करविलेल्या कथनावरच अवलंबून राहणें कसें अपरिहार्य झालें आहे हें आपण पाहिलेंच आहे.

काळाच्या बंधनानुसार प्रसंगांची तिवड —

हें स्थळाचें जें बंधन आहे तें निदानपक्षी प्रेक्षक-श्रोत्यांच्या कल्पनाशक्तीवर थोडा फार भार टाकून कांही प्रमाणांत तरी सैल करणें शक्य आहे. परंतु काळाच्या कितीही लांब मर्यादेचा आभास कल्पनाशक्तीवर विसंबून निर्माण करणें शक्य असलें, विंटर्स टेलमधल्याप्रमाणे पंधरा सोळा वर्षांचा काळ सबंध नाटकांतील घटनांचा म्हणून भासविणें शक्य झालें, तरी प्रत्यक्ष जेवढ्या घटना रंगभूमीवर दाखवावयाच्या त्या अतिशय निवडक तेवढ्याच दाखविणें हें नाटकाच्या बाबतींत अपरिहार्य आहे. जास्तींत जास्त चारपांच तासांच्या अवधींत रंगभूमीवर प्रत्यक्ष करून दाखवितां येतील एवढेच प्रसंग निवड-ण्याचें बंधन त्यामुळे नाटककारावर अपरिहार्यपणें पडतें. अशी निवड करावयाची म्हणजे ज्यामुळे स्वभावजन्य दोषांचा परिणाम आणि तज्जन्य चित्तविशुद्धीकरण यांचाच ठसा प्रेक्षक-श्रोत्यांच्या चित्तावर ज्यामुळे बठेल असे प्रसंगच फक्त नाटककाराने निवडावें हेंही अपरिहार्य आहे. असा ठसा उत्पन्न करण्याच्या ओघाशीं विसंगत असा कोणताही प्रसंग निवडण्याचें टाळणें हें त्यामुळे नाटककाराचें कर्तव्यच झालें.

आणि म्हणूनच राजा ईडिपससारख्या दैवहततेच्या नाटकामध्येसुद्धा, ईडिपसच्या वैभवाचें आणि कीर्तीचें, शौर्यधैर्याचें आणि श्रेष्ठतेचें फक्त धावतें कथन करूनच सोफो-क्लीसला त्या बाबतींत प्रेक्षक श्रोत्यांच्या विश्वासावरच विसंबावें लागलें. कारण दैवहत ईडिपसचें पुढचें दुर्दैवी चरित्र दाखविणें हेंच त्याचें मुख्य साध्य होतें.

किंवा प्रा. रा. शं. वाळिंबे यांनी शेक्स्पीअरचें अगदी नमुनेदार करुण नाटक म्हणून ज्याचा उल्लेख केला आहे तें कोरिओलेनस नाटकच घ्या. त्यामध्यें आपण एक ऐतिहासिक नाटक लिहीत आहों या कल्पनेच्या भरीं पडल्यामुळें कोरिओलेनसच्या लढायांचें रंगभूमीवर प्रत्यक्ष न दाखवितां येण्याजोगें प्रदर्शन करण्याचा किती दुबळा प्रयत्न शेक्स्पीअरला करावा लागला आहे हें आपण पाहिलेंच आहे. आणि मॅकबेथमध्यें मॅकबेथच्या शौर्याचें वर्णन डंकन राजाच्या दरबारांत होतें तेवढेंच कोरिओलेनसच्या पराक्रमाचें वर्णनही कोरिओलेनस नाटकांत कसें अगदी पुरेसें झालें असतें हें, कॉमिनि-अस त्यासंबंधांत ज्या प्रवेशांत वर्णन करतो त्या प्रवेशाची चर्चा करतांना आपण पाहिलेंच आहे. त्याच नाटकांतील पहिल्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशांत सुरुवातीलाच कोरिओलेनसची आई व्हॉल्युमिना हिने आपण लहानपणापासूनच कोरिओलेनसला, संकटाची त्याला बिलकूल तमा बाटूं नये अशा कठोर पद्धतीने, कसें वाढविलें याचें थोडक्यांतच

कथन केलें आहे. कोरिओलेनस हें नाटक नसतें, कादंबरी असती, तर आपल्या पोटच्या एकुलत्या एक प्रिय मुलाला त्याच्या आईनेच जाणून बुजून कसें निर्दयपणाने, संकटाच्या प्रसंगांतून ओरबाडून काढलें हें, निरनिराळे किती तरी अंगावर शहारे आणणारे प्रसंग दाखवून शेक्सपीअरला सांगतां आलें असतें. पण तो बिचारा नाटक लिहीत होता. त्यामुळे व्हाल्युमिना दोन तीन मिनिटांच्या अवधींत जेवढें यावद्दलचें कथन करतें तेवढ्यावरच समाधान मानून चालण्यावांचून त्याला अन्य उपायच नव्हता. आपण व्हाल्युमिनाच्या तोंडून जें कथन करतों त्यावर आपले प्रेक्षक-श्रोते श्रद्धा ठेवतील असा त्याला पूर्ण भरंवसा होता. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठी भाषेंतील एक प्राध्यापक, नाटककाराच्या या कथनावर आम्हीं विश्वास कां ठेवावा असा प्रश्न उपस्थित करतील अशी शंका त्याला आली नसावी. आणि आली असती तरी ग्रीक साहित्यांतील स्थलकालांच्या ऐक्याचा नियम लीलेने झुगारून देणाऱ्या त्या श्रेष्ठ कलावंताने भवभूतीप्रमाणेच "जानन्ति ते किमपि तान्प्रति नैष यत्न:!" असें उद्वेगाने म्हणून आपला योग्य तोच मार्ग चालू ठेवला असता.

पूर्वश्रेष्ठतेचें कथनच अपरिहार्य—

अशा प्रकारें प्रत्येक नाटकाच्या चर्चेच्या वेळीं हें बंधन त्या त्या नाटककाराने कसें पाळलेलें आहे आणि नायकाच्या श्रेष्ठतेबद्दल किंवा कीर्तिमंतपणाबद्दल वाचकांनी आपल्या कथनाचा विश्वास बाळगावा अशी अपेक्षा कशी ठेवली आहे हें आपण पाहिलें आहे. त्यामुळे त्या तपशिलांत येथे पुन्हा न शिरतां करुण नाटकांत नायकाचा श्रेष्ठपणा प्रत्यक्ष रंगभूमीवर घडणाऱ्या घटनांनी दाखविणें हें करुण नाट्याच्या साध्याच्या दृष्टीने सर्वतोपरी अशक्य आहे, त्यासाठी नाटककाराला केवळ कथनावर किंवा सूचनेवर भागवून घेणें भाग आहे, हें आपण निष्कर्ष म्हणून मान्य केलें पाहिजे. नायकाच्या श्रेष्ठत्वाच्या निदर्शक प्रत्यक्ष घटना रंगभूमीवर दाखविल्या पाहिजेत असा कोणी आग्रह धरल्यास श्रेष्ठ कलावंतांच्या प्रत्यक्ष कृतींच्या दृष्टीने तें समर्थनीय नाही हें आपणांस मान्य करावें लागेल; नाटककारावर स्थलकालांची, विशेषतः कालाचीं जीं बंधनें आहेत तीं पाहतां तशी अपेक्षा ठेवणें योग्य होणार नाही आणि कोणीही श्रेष्ठ कलावंत आपल्या रसिक प्रेक्षक-श्रोत्यांच्या समंजस श्रद्धेविषयीं इतका अविश्वास बाळगणार नाही.

जिव्हाळा उत्पन्न करण्याचे कलावंताचे नाजुक मार्ग —

शिवाय करुण नाटकांत नायकाबद्दल आपुलकी किंवा जिव्हाळा उत्पन्न करणें हें त्याच्याबद्दल करुणा वाटविण्याच्या दृष्टीने नाटककाराचें प्रमुख साध्य आहे. अशी ही आपुलकी वाटण्यासाठी नायक व्यक्ति श्रेष्ठ दर्जाची आणि कीर्तिमान असलीच पाहिजे असें नव्हे, हेंहि आपण या पंचवीस नाटकांच्या तपशीलवार चर्चेंत आणि प्रस्तुत प्रकरणाच्या पहिल्या भागांत पाहिलें आहे. किंबहुना तुमच्या आमच्यासारख्या सामान्य

व्यक्तींच्या दुःखाबद्दलच आपल्याला अधिक लौकर हळहळ वाटते हेंहि आपण पाहिलें आहे. त्याचप्रमाणें असा जिव्हाळा उत्पन्न करण्याचे नाटककारांचे मार्ग किती नाजुक आणि एखाद्या लहानशा सूचक प्रसंगांवर अवलंबून असतात हेंही आपण पाहिलें आहे. या ठिकाणीं एकदोनच उदाहरणांचा निर्देश केला तरी पुरेल. आपल्या बहिणीला बाळ होणार आहे हें कळतांक्षणीं ब्लॅन्श जेव्हा अत्यंत निर्मळ आनंदाने हर्षोत्साहित होतांना आपण पाहतों त्या वेळीं तिचे पूर्वीचे सर्व अपराध विसरून ती आपल्याला किती जवळची वाटते हें आपण पाहिलें आहे. त्याचप्रमाणें निर्धाराने मृत्यूला कवटाळायला निघालेली ॲन्टिगनी शेवटीं क्षणभरच मृत्यूच्या कल्पनेने दचकल्यासारखी झालेली आपण पाहिली, त्याबरोबर तिच्याशीं एकदम आपला समभाव कसा निर्माण झाला हेंहि आपण पाहिलें आहे.

तेव्हा नायकाविषयीं जिव्हाळा उत्पन्न करण्यासाठी करुण नाटककाराला नायकाच्या श्रेष्ठत्वाविषयीं ताशावाजंत्रीं लावून घोषणा करावी लागत नाही. त्यासाठी कलावंताचे उपाय फार नाजूक असतात. ते ओळखणें आणि हृदयाला पटून आपल्या ठिकाणीं समरसता निर्माण होणें यांतच रसिकाच्या रसग्रहणाच्या सामर्थ्याची खूण आहे. सर्वच नाटकांची चर्चा करीत असतांना, प्रत्येक नाटकाविषयीं अशा रीतीने अगदी सूचक अशा सूक्ष्म प्रसंगांनी त्या त्या नाटककाराने आपल्या मनांत कसा जिव्हाळा उत्पन्न केला आहे हें पूर्वी दाखविलेंच आहे. त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाही.

नायकाचें पश्चातापपर-समर्थनपर निवेदन —

नायकाबद्दल जिव्हाळा उत्पन्न करण्याच्या तंत्राचाच एक भाग म्हणजे नाटककार नायकाकडून स्वतःच्च पश्चातापपर आणि स्वसमर्थनपर निवेदन करतांना आढळतात, हा आहे. हॅम्लेटने तर होरेशियोला आवर्जून सांगितलेलें आपण पाहिलें कीं, जगाला माझी खरी हकिकत सांग. ऑथेल्लोनेही शेवटी हाच आग्रह धरलेला आपण पाहतों. लिअर राजाची पश्चात्तापाचीं आणि आत्मसमर्थनाचीं सगळींच भाषणें किती अंतःकरण वेधून टाकणारीं आहेत. लिंकनसारख्यालासुद्धा, आपण हिंसेच्याविरुद्ध असतांना युद्धाचा आटापीट कां करतों याचें समर्थन करावें लागलें आहे. ब्लॅन्शनेही आपल्या जीवनांतील अपयशाच्या कारणांचा पाढा किती हृदयद्रावक रीतीने वाचला आहे. स्टीफन, स्टॉकमन यांनीही आपल्या भूमिकेचें त्वेषाने समर्थन केलें आहे. संभाजीचा स्वतःच्या जीवनांतील चुकांचा पाढा आणि त्यानें स्वतःलाच फर्मावलेली शिक्षा यांचा प्रसंग तर मराठी रसिकांना सदैव कंपित करीत आला आहे. बॅरिस्टर विश्रामनेही पश्चाताप आणि समर्थनपर भाषण केलेलेंच आहे. सवाईमाधवरावाचीही यांतून सुटका झालेली नाही. अशा रीतीने करुण नाट्यलेखनाचें हें एक अविभाज्य तंत्रच आहे की काय असें म्हणावें लागावें, इतका हा प्रकार गेल्या चोविसशे वर्षांत सार्वत्रिकपणे अवलंबिलेला आढळतो. आपण ज्याच्याविषयी प्रेक्षक-श्रोत्यांच्या मनांत आधीच आपुलकी उत्पन्न केलेली असते,

त्याचे अंतःकरणाच्या तळमळीने निघालेले स्वतःविषयीचे उद्गार अनुकूल बुद्धीनेच ते प्रेक्षक श्रोते ऐकतील आणि त्यामुळें त्यांची आपल्या नायकाविषयीं अधिकच सहभावपूर्ण आणि म्हणून करुणार्द्र वृत्ति होईल हा आडाखा बांधूनच, बहुधा सर्वच श्रेष्ठ कलावंतांनी हें तंत्र अनुसरलें असावें.

काव्यमय भाषेची अपरिहार्यता —

स्थळ आणि काळ यांच्याबद्दलच्या बंधनामुळेच नाटककाराला नाटकामध्ये सर्वच कारभार मोठ्या काटेकोरपणाने आणि काटकसरीने करणें भाग होतें. याच अपरिहार्य काटेकोरपणाच्या पोटींच नाटकांतील आणि त्यांतही करुण नाट्यांतील भाषेची कृत्रिम आणि काव्यरूप घडण ही क्रमप्राप्तच ठरली. ग्रीक रंगभूमि आणि तेथे पूर्वीच्या योद्धायचा आभास निर्माण करण्यासाटी मुखवटे वापरण्याची पद्धति, यामुळे भावना–प्रतिक्षेपणाचा सर्व भार बोलण्यावर, भाषेवर कसा पडला हें आपण पाहिलें आहे. त्याचमुळे बहुधा ॲरिस्टॉटलने करुण नाटकाचीं जीं सहा अंगें सांगितलीं, त्यांमध्ये लयबद्ध, काव्यमय, अलंकारप्रचुर भाषा आणि पद्यें किंवा गीतें असें एक अंग सांगितलें. ग्रीक नाट्यांत रंगभूमीवर प्रत्यक्ष न दाखवितां येण्याजोगे प्रसंग वृंदगायकांकरवी कथनाच्या पद्धतीनेच निवेदित करावे लागत असत. असे ते प्रसंग पद्यांत गुंफून गायिले असतां गानश्रवणाच्या लोभाने श्रोते–प्रेक्षक त्यामध्ये रंगू शकत असत. आणि पंधरावीस हजार प्रेक्षकांना आंगिक किंवा चेहऱ्यावरच्या अभिनयाच्या अभावीं खेचून धरावयाचें म्हटलें म्हणजे आकर्षक, मोहक आणि कांहीशी आतषबाजीच्या स्वरूपाची भाषा पण अपरिहार्य झाली.

यांत्रिक साधनांच्या काळांतील निकष जुन्या नाटकांना लावणें अन्यायाचें —

हाच वारसा पुढेही पाश्चिमात्य रंगभूमीवर चालूं राहिला. त्याचें कारणसुद्धा त्या रंगभूमीवर गेल्या तीस चाळीस वर्षांत यांत्रिक साहाय्याची जशा प्रकारची जोड मिळाली आहे, तशी जोड त्यापूर्वी मिळालेली नव्हती हें आहे. प्रकाशनियंत्रण आणि यांत्रिक ध्वनिक्षेपण, त्याचप्रमाणे यंत्राच्या साहाय्याने फिरता रंगमंच, या साधनांची जोड मिळाल्यावर व्याख्यानबाजीच्या स्वरूपाचीं भाषणें आतां नाटकांत रंग भरायला किंवा प्रेक्षकांना खेचून धरायला आवश्यक राहिलीं नाहींत. एका पात्राने दुसऱ्या पात्राच्या कानांत अगदी हळू आवाजांत बोललेले चारदोन शब्द, तितक्याच स्पष्टपणाने आणि तितक्याच हळू आवाजांत श्रोतृवर्गांत अगदी शेवटच्या कोपऱ्यापर्यंत ऐकूं येण्याची सोय, आता अगदी अलीकडे झाली. ही सोय जोपर्यंत नव्हती तोपर्यंत नाटककारांना आपल्या पात्राच्या तोंडी भलीं मोठीं आतषबाजीचीं आणि आज ज्यांना आपण कृत्रिम म्हणूं लागलों आहोंत अशीं, भाषणें घातल्यावाचून, सर्व श्रोतृवर्गाला खेचून धरायला दुसरें साधनच नव्हतें.

नाटकांतच कशाला, व्याख्यानांमध्ये सुद्धा अशा प्रकारच्या आरडाओरड्याचीं

आणि अलंकारप्रचुर भाषणांची पद्धति अगदी अलीकडे अलीकडेपर्यंत होती. परंतु यांत्रिक ध्वनिक्षेपक आल्यानंतर ती पद्धति आता झपाट्याने बदलली आहे, बदलत आहे. या यांत्रिक ध्वनिक्षेपणाचा किती कौशल्याने उपयोग महात्मा गांधी करूं शकत असत आणि स्वतःच्या आवाजाला एवढाही ताण पडूं न देतां अगदी कानाकोपऱ्यांतल्या माणसाला सुद्धा ते जणू आपल्याशींच गुजगोष्ट करीत आहेतसें वाटावें असें बोलत असत, हें ज्यांनी पाहिलें ऐकलें आहे आणि त्याच वेळीं यांत्रिक उपकरणाचें हें साहाय्य घेण्याचें भान न राहून, पूर्वीच्या राणा भीमदेवी वक्तृत्वाच्या सवयीमुळे तें न साधून, वल्लभभाई पटेल आरडाओरड्याचें भाषण करूं लागले, म्हणजे यंत्रांतून त्यांचा आवाज आपले कान बधिर करण्यासारखा कसा येऊन आदळे आणि खरखरे हें ज्यांनी अनुभवलें आहे, त्यांना यामधील फरकाचें मर्म चांगलें ध्यानीं येईल. यांत्रिक साधनानंतर होत आलेला भाषेचा आणि बोलण्यांतला फरक लक्षांत घेऊन, त्याच्या तुलनेने पूर्वीच्या पद्धति आणि भाषा कृत्रिम होत्या असा आरोप करणें हें या दृष्टीने पाहिल्यास अन्यायाचें आहे हें आता ध्यानांत यावें.

जगावें की मरावें हा हा प्रश्न असतो; हें चित्र पाहा आणि तें चित्र पाहा; ही हॅम्लेटचीं भाषणें पूर्वी गणपतराव ज्या पद्धतीने म्हणत असत त्या पद्धतीने म्हणण्याची गरज आता लॉरेन्स आलिव्हिएला राहिलेली नाही. गणपतरावांच्या काळीं गणपतरावांना रंगभूमीची जेवढी अनुकूलता होती तेवढीसुद्धा अनुकूलता शेक्सपीअरच्या काळीं नव्हती. नटाच्या – रंगमंचाच्या म्हणा – तीनही बाजूला श्रोत्यांची गर्दी असावयाची. अशा वेळीं हीं भाषणें व्याख्यानबाजीच्या पद्धतीने म्हणण्यावाचून गत्यंतर नव्हतें. आज आपण पाहतों की, ऑलिव्हिए अगदी एकटा किल्ल्याच्या तटावर समुद्राकडे पाहत अस्वस्थचित्त बसतो आणि स्वतःशींच तोंडांतल्या तोंडांत 'जगावें की मरावें हा प्रश्न पडतो' हें भाषण पुटपुटल्यासारखें बोलतो. परंतु त्याच ऑलिव्हिएलाही तिसऱ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांत आईशीं बोलतांना अशा शांतपणाने बोलतां येत नाहीच; तेथे राग आणि आवेश यांचें मिश्रण असल्याने तेथलीं त्याचींही भाषणें कांहीशीं तावा-तावाचीं आणि आरडाओरड्याचीं होणें अपरिहार्य होतें.

रंगभूमीच्या रचनेचा आणि परिस्थितीचा परिणाम म्हणून जशीं पात्रांचीं भाषणें व्याख्यानाच्या स्वरूपाचीं होणें आवश्यक झालें त्याप्रमाणे नियमित कालाच्या मर्यादेमुळेही तीं रेखीव आणि पुस्तकी थाटाचीं वाटावींत अशा प्रकारचीं होणें आवश्यक झालें. थोड्या वेळांत पुष्कळ अर्थ आणि तोही निःसंदिग्ध स्वरूपांत व्यक्त करणें हें नाटक-कारापुढचें कार्य होतें आणि असतें. त्यामुळे प्रत्येक शब्द तोलून, मापून आणि एका विशिष्ट लयींत बांधून वापरण्यावाचून त्याला इलाज राहत नाही. रंगभूमीवरील पात्रांना तर परस्परांच्या भाषणांतून नेमका नाटककाराला जो अभिप्रेत आहे तोच अर्थ समजला पाहिजेच; पण श्रोतृवर्गांतसुद्धा कोणाला त्यांतून एवढाही भिन्न अर्थ प्रतीत न होणें हें परिणामाच्या एकरूपतेच्या आणि सुसंवादित्वाच्या दृष्टीने अत्यावश्यक होऊन बसतें.

यासाठी जितकी काटेकोर आणि जितकी प्रगल्भ अर्थवाहक भाषा नाटकांत वापरणें आवश्यक होतें तितकी काटेकोर आणि तारेवरची कसरत केल्यासारखी भाषा सामान्य व्यवहारांत अगदी आणीबाणीच्या प्रसंगींसुद्धा माणसें वापरूं शकतात का, हें पाहण्यासारखें आहे. सामान्य माणसाला तर इतकें सुसंबद्ध आणि एकार्थवाचक बोलतां येत नाहीच; परंतु चांगलीं बुद्धिवान आणि तरल प्रकृतीचीं माणसेंसुद्धा इतकें चपखल आणि खोचकरोचक बोलणें आपल्या रोजच्या व्यवहारांत बोलूं शकत नाहीत. आता ध्वनिमुद्रणाची चांगलीं सोय झाली आहे. त्याच्या साहाय्याने, एखादा अगदी सहज स्वरूपांत चाललेला चांगल्या विद्वान आणि चतुर लोकांचा आपसांतील वादप्रसंग, त्यांना न कळत ध्वनिमुद्रित करून ठेवावा. आणि मग तो ध्वनिक्षेपित करून पाहावा, म्हणजे त्यांचीं तीं भाषणें किती मूळ मुद्दा सोडून भटकणारीं, पुन्हा पुन्हा तें तेंच सांगणारीं, बोलणाराला तरी आपला आशय समजाला आहे की नाही याचा संशय उत्पन्न व्हावा, इतकीं सैल आणि भोंगळ व ऐकणारावर कांहीच परिणामकारक न होणारीं, अशीं कशीं होतात हें पाहून, तिऱ्हाइतांनाच नव्हे, तर खुद्द त्या संवादांत भाग घेणारांनाही आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाही.

अशा तऱ्हेचीं भाषणें स्वाभाविक म्हणून नाटककाराने नाटकांत वापरायचीं म्हटलें तर त्याच्या नाटकाला एक तर केव्हा अंतच येणार नाही; बहुसंख्य श्रोत्यांचीं मनें एकाच बिंदूवर केंद्रित करून खेचून धरण्याचें सामर्थ्यही त्यांच्या ठिकाणीं असणार नाही. त्यांच्यामध्ये निश्चयात्मक अर्थवाहकता असणार नाही आणि नाटककाराचा आशय श्रोत्यांच्या चित्तांत खोल, पण ऐकणारांना विशेष प्रयास न पडतां ठसविण्याचें सामर्थ्यही तशा भाषणांत असणार नाही.

म्हणून घासून, पुसून, तोलून, रेखीव बनविलेलीं भाषणें आपल्या पात्रांच्या तोंडीं नाटककाराने घालणें ही अपरिहार्य गोष्ट आहे. अगदी सहजतेचा आभास उत्पन्न करणारीं रांगणेकरांचीं बाप्पा आणि बनुवन्सं व आई यांचीं भाषणें सुद्धा अशा प्रकारच्या सामान्य व्यवहारांत सहज बोलणारांचीं भाषणें खास नाहींत. त्यावर सुटसुटीतपणा, निश्चितार्थव्यक्तता आणि खोचकपणा यांच्या दृष्टीने कसबी नाटककाराचा सफाईचा हात फिरलेला आहे हें सूक्ष्म नजरेने पाहिल्यास ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाही.

अलंकारांचा परिणामकारकतेसाठीही उपयोग —

शिवाय अलंकार, विशेषतः अर्थालंकार हे निव्वळ चमत्कृति उत्पन्न करण्याच्या दृष्टीनेच उपयोगी आहेत असें नव्हे. अर्थाची पकड ऐकणाराच्या चित्तावर दृढ आणि परिणामकारक रीतीने ठसविण्यासाठी अर्थालंकाराचा उपयोग फार मोठा होतो. उपमा, उत्प्रेक्षा, प्रश्नालंकार यांच्या उपयोगाने भाषेचें नुसतें सौंदर्यच वाढतें असें नव्हे, तर भाषेची अर्थवाहकताही त्यांमुळे मोठ्या प्रमाणावर वाढते. अर्थांतरन्यासाचा कुशल उपयोग तर अर्थव्यक्तीला आणि बोलणाराचा आशय ऐकणाराच्या चित्तांत निःसंदिग्ध-

पणें आणि चिरपरिणामी रीतीने ठसविण्यास किती मोठा होतो हें वेबंदशाहींतील औंधकरांच्या अर्थांतरन्यासांच्या उपयोगाचा अभ्यास केल्यास फार चांगलें दिसून येईल.

शिवाय नाटकांत, करुण नाटकांत तर विशेषच प्रमाणांत, ताणलेल्या भावनांचेंच व्यक्तीकरण करावयाचें असतें. नाटकांतील भाषणें म्हणजे शिळोप्याच्या गप्पा नव्हेत. नाटकाचा विषय हाच मुळापासून कसल्या तरी झगड्याचा असतो. आणि या झगड्यांतील पक्ष, उपपक्ष, प्रतिपक्ष यांतील प्रत्येक व्यक्ति आपला पक्ष, आपली बाजू, अगदी शेंडी तुटो का पारंबी तुटो अशा आग्रही भावनात्मकतेने व्यक्त करूं इच्छीत असते. अशा ताणलेल्या भावनात्मकतेची अभिव्यक्ति काव्याच्या भाषेंत न झाली, तरच तें मानसशास्त्राच्या दृष्टीने अस्वाभाविक म्हणावें लागेल. म्हणून आपण पाहिलें की, भावनेचा आवेग येतांक्षणींच आपल्यापुढील सर्व नाटकांतील पात्रांच्या भाषणांत ध्वनिमधुर आणि अलंकारप्रचुर काव्यात्मता आल्यावांचून राहिली नाही. त्यामुळे काव्यात्मता हा करुण नाटकांतील भाषेचा एक अविभाज्य विशेष आहे असें म्हणावें लागतें.

याचा अर्थ गेय पद्यांची आवश्यकता नेहमीच आहे असा नव्हे. काव्यपूर्ण गद्यही नाटककार फार चांगलें प्रभावी करूं शकतात. विशेषतः यांत्रिक ध्वनिक्षेपणाच्या काळांत ही काव्यात्मता आणि अलंकारिकता गद्यांत किती तरी प्रभावीपणें प्रत्ययकारी करतां येईल. म्हणून गेय पद्य ही नाटकांत, करुण नाटकांतही, आवश्यक बाब समजण्याचें कारण नाही. त्या दृष्टीने संगीताचा उपयोग प्रत्यक्ष पात्रांच्या तोंडीं न करतां पार्श्वसंगीताच्या रूपाने आणि रंगभूमीवर चाललेला भावाविष्कार अधिक गडद करण्यासाठीच करण्याची रीत अलीकडे अधिकाधिक अवलंबिली जाऊं लागली आहे. परंतु ही सोय नव्हती त्या वेळीं ही रीत त्या वेळच्या नाटककारांना अवलंबितां आली नसली तर तो त्यांचा दोष समजणें अन्यायाचें होईल.

सामान्य निष्कर्षांची थोडक्यांत नोंद —

अशा रीतीने जे थोडे समान्य निष्कर्ष आपण पाहिले त्यांची नोंद पुन्हा एकदा थोडक्यांत अशी करतां येईल.

(१) नियतिजन्य करुण नाट्य आणि स्वभावदोषजन्य करुण नाट्य असे हवाबंद गट कल्पितां येणार नाहीत.

(२) करुण नाटकाचा नायक म्हणजे कोणी कीर्तिमान श्रेष्ठ अशी व्यक्तीच असली पाहिजे असें नाही. सामान्य व्यक्तीच्या दुःखदर्शनाने श्रोत्यांची – प्रेक्षकांची वृत्ति अधिक हेलावते; त्यांचें अंतःकरण अधिक करुणामय होतें. आणि चित्तविशुद्धीचा अनुभव त्यांना अधिक लाभतो. त्यामुळे आधुनिक नाटककारांचा कल तुमच्याआमच्यासारख्या सामान्य व्यक्तींचेंच दर्शन करुण नाट्यामध्ये करण्याकडे आहे.

(३) करुण नाटकांत कथानक आणि व्यक्तिदर्शन यांना सर्वांत अधिक महत्त्व आहे. विशेष म्हणजे कोणातरी एका व्यक्तीवर करुण नाटकांतील सर्व लक्ष केंद्रित असतें आणि

कथानकाची बांधणी केवळ त्या व्यक्तीच्या चित्रणाला पोषक होईल अशी जखडबंध आणि त्या व्यक्तीला सोडून अन्य वळणें न घेणारी अशी असते.

(४) दुःखपरिणाम ज्या व्यक्तीला सोसावा लागावयाचा त्या व्यक्तीचा करुण विपाक दाखविणें हेंच एकमेव साध्य करुण नाट्याचें आहे. बाकीचे इतर रस करुण नाट्यांत करुणरसाच्या अंगत्वानेच राहिले पाहिजेत; त्यांना अंगापेक्षा बोंगा असें मोठें स्थान येतां कामा नये.

(५) तत्त्वप्रतिपादन हें करुण नाटकांत प्रधान साध्य असत नाही. व्यक्तिदर्शन, मानवी स्वभावरेखन आणि करुण रसाची निर्मिति हेंच करुण नाट्याचें प्रधान साध्य आहे.

(६) करुण नाटकांत इतर साहित्यप्रकारांतल्यापेक्षांही अधिक प्रमाणांत श्रोत्यांच्या मनाची पकड घेणाऱ्या, त्यांना चिरंतन स्नेही म्हणून होणाऱ्या व्यक्ती कलाकार निर्मितात. किंबहुना अशा व्यक्तींची निर्मिति हें करुण नाट्याच्या श्रेष्ठतेचें एक गमक आहे असें म्हणावें लागतें.

(७) साहित्यांतील व्यक्तिचित्रणाची पकड आपल्या मनावर एवढी बसते याचें प्रमुख कारण, किंबहुना एकमेव कारण, त्यापासून होणारा आनंदाचा, रसोद्भूत आनंदाचा अनुभव. हा आनंद म्हणजे लौकिक, वासनातृप्तीमुळे होणारें सापेक्ष आणि अपूर्ण सुख नव्हे. हा आनंद व्यक्तिनिरपेक्ष, अलौकिक आणि समत्वसाधक योगाच्या आनंदाच्या जातीच्या आहे. असा आनंद देण्याचें सामर्थ्य करुण रसांतच सर्व रसांमध्ये अधिक आहे. चित्तविशुद्धि, देहभावना व अहंकार यांचा लोप आणि परसाधर्म्य किंवा साधारणीकरण यांचा लाभ करुण रसाने अधिकांत अधिक साधतो. म्हणून करुण विपाकांत सापडणाऱ्या व्यक्तीबद्दल दुःख वाटत असूनही मनाच्या समधातते चा अलौकिक आनंद करुणरससेवनाने मिळतो.

(८) करुण नायकाचें चित्रण करतांना त्याच्या करुण विपाकाला साधनीभूत होणाऱ्या गोष्टी चित्रित करण्यावरच फक्त लक्ष केंद्रित करणें हें नाटकाच्या स्थळविषयक आणि कालविषयक मर्यादांच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. म्हणूनच सर्व श्रेष्ठ नाटककार नायकाच्या श्रेष्ठत्वाचें निव्वळ कथन आणि तेंही थोडक्यांत करून तो भाग उरकतात आणि प्रत्यक्ष करुण विपाकाला कारण होणाऱ्या गोष्टींचें चित्रण करण्याकडे लक्ष पुरवितात. ज्या नाटकांत करुण विपाकाला कारण प्रामुख्यानें स्वभावदोष असेल त्या ठिकाणीं तर या स्वभावदोषदर्शनावरच नाट्याचा सगळा ओघ नाटककाराला वळविणें भाग होतें. जेथे नियतिजन्य करुण विपाकाला जास्त प्राधान्य असेल तेथें मात्र, स्वाभाविकच नायकाचें कर्तृत्व आणि मोठेपण अधिक तपशीलाने व्यक्त करणें, साध्याच्या दृष्टीने नाटककाराला आवश्यक वाटतें. परंतु असें करतांनाही, त्यासाठी मोठेमोठे प्रसंग रंगभूमीवर उभे करण्याऐवजी, नाजूक आणि सूक्ष्म सूचनांनीच आपला कार्यभाग उरकतांना नाटककार आढळतात. व या सूचकतेचाही उपयोग प्रेक्षक-श्रोत्यांच्या मनांत नायकाबद्दल जिव्हाळा, समभाव उत्पन्न होण्याकडे ते करतात.

(९) असा हा जिव्हाळा, समभाव, साधारणीकरण निर्माण करण्याचें एक मोठें प्रभावी साधन सर्वच नाटककार वापरतात असें आढळतें; तें म्हणजे नायकाच्या तोंडींच आणि तेंही बहुधा नाटकाच्या शेवटीं, प्रश्नातापदर्शक, चित्तविशुद्धिदर्शक, आत्मसमर्थनपर भाषण घालणें.

(१०) नाटकावर पडणाऱ्या स्थळकालांच्या मर्यादेमुळेच आणि निःसंदिग्ध अर्थ-व्यक्तीच्या साध्यासाठी, नाटकाची भाषा रेखीव, ताशीव अशा घडणीची, म्हणजेच कृत्रिम होणें अपरिहार्य असतें. काव्यात्मता आणि अलंकारिकता यांचा या दृष्टीने मोठाच उपयोग असतो. करुण नाटकांत तर ताणलेल्या भावनांचाच सगळा उठाव असल्याने त्या भावनांचें व्यक्तीकरण काव्यमय भाषेंत होणें हें नुसतें अपरिहार्यच नव्हे, तर स्वाभाविक ठरतें. या दृष्टीने काव्यमय आणि लयबद्ध भाषा हें करुण नाटकाचें एक अविभाज्य अंग आहे.

प्रकरण चोविसावें

पडताळा : सुधाकर

मागच्या प्रकरणापर्यंत जवळजवळ चोविसशे वर्षांच्या कालखंडांत हिंडून आपण जे निष्कर्ष काढले, त्यांचा पडताळा एकच प्याला या गडकऱ्यांच्या नाटकांत कितपत मिळतो हें या प्रकरणांत पाहावयाचें आहे. अर्थात तसें करतांना इतर नाटकांच्या बाबतींत अनुसरलेली पद्धतीच आपण अंगीकारूं आणि सुरुवातीपासून शेवटपर्यंत, एकचित्त होऊन हें नाटकच प्रथम पाहूं.

सुधाकराचें नाटक : पहिली खूण —

पहिल्या प्रवेशांत हृदयाला कांही अज्ञात हुरहूर लागलेली सिंधू आणि तिचें समाधान करणारा सुधाकर यांच्याशीं आपली गाठ पडते. कसलेल्या नाटककारांप्रमाणेच, गडकऱ्यांनी येथें प्रस्तावनेंत बिलकूल वेळ न घालवितां एकदम सुधाकराची आपली गाठ घालून देऊन कथानकाची वाटचाल एकदम सुरू केली आहे. आतापर्यंत आपण पाहिलेल्या नाटकांवरून पाहतां ही एक पहिली खूण सुद्धा हें दाखवायला पुरेशी आहे की, हें सुधाकराचें नाटक आहे; आणि त्या नाटकाचा अंत दुःखद होणार आहे. म्हणूनच नाटकाची सुरुवात गडकऱ्यांनी सिंधूच्या हुरहुरीपासून मुद्दाम केली आहे.

सुधाकराशीं आपुलकीचा संबंध सुरू —

रामलालसारखा सुधाकराचा मोठा हितकर्ता परदेशीं जायला निघाला आहे, यामुळे सिंधूचें मन अस्वस्थ आहे, हें तर खरेंच. अर्थात रामलालबद्दल कितीही प्रेम व आदर असला तरी आपल्या स्वार्थासाठी त्याला त्याच्या महत्कार्यापासून आपण निवृत्त करूं नये हें सुधाकराचें सांगणेंही खरें आहे. परंतु सुधाकराच्या तुलनेने रामलाल, सुधाकर म्हणतो त्याप्रमाणे, खरोखरच पढतमूर्ख आहे. सिंधूच्या हृदयाची हुरहूर शांत करण्याऐवजी ती वाढविण्याजोगेंच तो बोलत राहतो. कदाचित ही आपणा सर्वांची शेवटची भेटही असेल, या चंचल संसारांत कडू सत्यांची मनुष्यानं निदान तोंडओळख तरी करून ठेवलेली असावी, म्हणजे आपल्या दुर्दैवीं तीं अनुभवण्याचा प्रसंग आलाच तर त्यांच्या पहिल्या दर्शनाने अशा वेळीं आपण गांगरून तरी जात नाही, असले अव्यवहारी, अप्रस्तुत आणि स्त्रियांच्या कोमल मनाची यथार्थ कल्पना नाही हें स्पष्ट करणारे तत्त्वविचार तो बडबडतांना आपण पाहतों. त्या मानाने सुधाकर जास्त सहृदय आहे हें या ठिकाणीं दिसून येतें. इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून त्याने थोपवून धरलेल्या

सिंधूच्या गंगायमुना रामलालच्या बडबडीने दुथडी वाहून जाण्याचा प्रसंग आला तेव्हा सुधाकराने केलेलें भाषण त्याच्या सहृदयतेचें जसें निदर्शक आहे, तसेंच त्याच्या ठिकाणच्या तरल काव्यप्रतिभेचेंही तें निदर्शक आहे. त्याचप्रमाणे गंभीर प्रसंगाला विनोदाने बगल देण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं आहे हेंही त्यांत दिसून येतें. "इतक्यांत शरद येईल. तिच्या गंगायमुनांची जोडी चालायला लागेल. ती तळिरामाची गीता येईल– त्या भोळ्या जीवाला तर ·हसण्यारडण्याला आपलं स्वतःचंसुद्धा सुखदुःख लागत नाही. हां हां म्हणतां इथं एका भूगोलपत्रकाच्या भरतीइतक्या नद्या जमून आपल्या महाराष्ट्राला पंजाबी पवित्र्यांत उभं करतील" हा भाग ज्या त्याच्या पुढच्याच भाषणांत आहे त्यांत सुधाकराची सहृदयता, दुसऱ्याच्या टिकाणचे गुण अचूकपणें हेरण्याचें कौशल्य, काव्यवृत्ति, विनोदशीलता आणि तरल कल्पनाशक्ति, यांचें सगळ्याचें दर्शन, आपल्याला गडकरी किती मोजक्या शब्दांत आणि काळांत अत्यंत प्रभावीपणाने करून देतात आणि या माणसाचा आणि आपला आपुलकीचा संबंध येथपासूनच सुरू होतो. म्हणूनच "आमच्या इथं थट्टेला काळ वेळ नाही आणि सुमारही राहत नाही. एक गंगायमुना सांपडायची खोटी, सर्वांसकट वाहून जायची तयारी," या सिंधूच्या अत्यंत कौतुकाच्या शेऱ्यांत आपणही सहभागी होतों.

पण तत्त्वज्ञ रामलाल या रसमय काव्यप्रसंगांत आपल्या उपदेशाचें खारट पाणी ओतायला चुकत नाही. सिंधूच्या मनाला शांतता मिळण्याजोगें कांही बोलण्याऐवजी, सुधाकराची काळजी घेण्याबद्दल सिंधूला बजावून बजावून सांगून त्याने तिला दुसरी एक काळजीच मात्र उत्पन्न करून ठेवली. पण हें करतांना सुधाकराच्या स्वभावाचें त्याने जें मर्मभेदक विश्लेषण केलें तें नाटकांतील घटनांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचें आहे. किंबहुना आपल्या नाटकाचें साध्य – बीज – इतक्या लौकर त्यामध्ये गडकऱ्यांनी किती स्वच्छ शब्दांत सांगितलें आहे.

सुधाकराचें स्वभावविश्लेषण —

"सुधाकर जनसमुद्राच्या गरीब तळाशीं सापडलेलं एक अमूल्य रत्न आहे" असें जेव्हा रामलाल सांगतो, तेव्हा त्याच्यावर अविश्वास करण्याच्या वृत्तींत आपण नसतोंच मुळी. आपला हा काव्यात्म रसिक गडी गरिबींतून श्रेष्ठतेला चढलेला आहे हें ऐकून तर आपल्याला अंगावर थोडेंसें मासच चढल्यासारखें वाटतें.

"परंतु अशीं रत्नं सापडल्यावर त्यांना हातीं ठेवणं तर फारच कठीण. सुधाकर बुद्धिवान आहे – खरोखरीच अलौकिक बुद्धिवान आहे. – तो जात्याच मानी आहे आणि केवळ स्वावलंबनानं नांवलौकिकाला चढल्यामुळे त्याचा मूळचा मानीपणा हल्लीं इतका उग्र झाला आहे की, तो त्याच्या चांगल्या मित्रांना सुद्धा असह्य होईल. – त्याच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हा सामान्य वर्गांतून पुढे जात असल्यामुळे याच्या बरोबरीचे लोक द्वेषानं आणि मत्सरानं त्याला मागं ओढीत आहेत.....तरुण बुद्धिमत्तेची आत्मविश्वासाची उग्रता

या जुन्या लोकांना उर्मटपणाची आणि अहंपणाची वाटून ते त्याचा उपमर्द आणखी तिरस्कार करतात .....धंद्याच्या पटांगणांत याचं कौतुक करणारा, आणि रागाच्या ऐन भरांत त्याचा तोल सांभाळणारा कोणी तरी जिव्हाळ्याचा मनुष्य सध्या त्याच्या नेहमी जवळ असणं अवश्य आहे..... सिंधू, त्याच्या बुद्धिमत्तेला पुरून उरण्याजोग्या कामगिरीमध्ये त्याला नेहमीं गुंतवून ठेव. कधी काळीं त्याचा मनोभंग झाला तर चतुर मुली,..... ”

नुसतें नाट्यबीजच नव्हे, संपूर्ण आराखडाच जणू —

वगैरे जें रामलालचें भाषण या ठिकाणीं गडकऱ्यांनी सुरुवातीलाच घातलें आहे त्यामध्ये त्यांनी नाटकाचें बीजच केवळ नव्हे तर जवळजवळ सर्व आराखडाच रेखून ठेवला आहे. गरिबींतून केवळ आपल्या स्वावलंबनावर उदयास आलेला एक अलौकिक बुद्धिमत्तेचा पुरुष; स्वावलंबनावरच श्रेष्ठपणा प्राप्त केलेल्या माणसाच्या ठिकाणीं नेहमीच उग्र स्वरूपांत वाढत असणारा मानीपणा त्याच्याही ठिकाणीं आलेला; त्यामुळे मित्रांना-सुद्धा तो असह्य होणारा; त्याच्या आपल्याहून जास्त त्वरेने होणाऱ्या प्रगतीमुळे त्याच्या बरोबरीचे लोक त्याचा द्वेष करणारे आणि मत्सरग्रस्त होणारे; जुन्या यशस्वी लोकांना सुद्धा त्याच्या बुद्धिमत्तेच्या आत्मविश्वासाची उग्रता उर्मटपणाची व अहंकाराची वाटणारी; त्यामुळे तेही त्याचा उपमर्द आणि तिरस्कार करणारे; रागीट असल्यामुळे त्याचा तोल संभाळावयाला नेहमी कोणीतरी जवळ पाहिजे; सतत बुद्धि गुंतून राहण्याजोगी कामगिरी त्याला हवी; आणि मनोभंग कधीकाळीं झाला तर सर्व भार संभाळायला सर्वगुणसंपन्न सिंधूच त्याच्या उपयोगी पडण्याजोगी; या रामलालच्या विश्लेषणामध्ये सुधाकराचें सर्व चरित्रच, चार श्लोकांत रामायण सांगावें तसें गडकऱ्यांनी सांगून टाकलें आहे. त्यामुळे हें नाटक, सुधाकराचें आहे हा आपला ठसा अधिकच बळकट होतो.

टीकाकार विचारतात, सुधाकराच्या बुद्धीची चमक गडकऱ्यांनी आम्हांला दाखविलीच आहे कोठें ? पण ते विसरतात की, त्याची बुद्धि आजपर्यंत तरी चमकत होती न्यायकोर्टांत. मग काय गडऱ्यांनी नाटकांत त्याचें खटला चालविण्यांतील बुद्धिकौशल्य दाखविणारा प्रवेश दाखवायला हवा होता ? एक तर चारपांच तासांच्या नाटकांत असा भला मोठा प्रवेश घातल्याने, बाकीचा त्याचा मनोभंग आणि त्यामुळे ओढवणारा दुःखद विपाक हें दाखविण्याच्या जागेचा वृथा संकोच झाला असता. नाटकाच्या एकरूप परिणामाशीं आणि साध्याशीं असा प्रवेश विसंगत झाला असता; आणि तरीही न्यायकोर्टातील बुद्धिकौशल्याच्या अशा प्रवेशांत भिन्न रुचीच्या प्रेक्षक-श्रोत्यांच्या समूहाचें मन कितपत रमलें असतें कोण जाणें ! म्हणून गडकऱ्यांनी श्रोत्यांवर भरवसा टाकण्याचें ठरविलें आणि त्यांत त्यांची फसगत झाली नाही.

नाटकाचें मर्म —

सुधाकर जसा काव्यात्म विनोदी रसिक आहे तसाच तो परमेश्वरावर श्रद्धा ठेवणारा

आहे हेंही पुढच्याच त्याच्या भाषणांत व्यक्त होतें. त्याच भाषणांत, "तो अतर्क्य सामर्थ्यवान प्रभु मला एखाद्या लहानशा पेल्यांतसुद्धा बुडवून टाकील" असें म्हणून आपल्यावरील पुढे कोसळणाऱ्या गंभीर संकटाचीच जणू अजाणतांच तो पूर्वसूचना देतो. पण त्यांत हें स्पष्ट होतें की, परमेश्वरी कृपा फिरल्यामुळे एका पेल्यांतसुद्धा बुडून नष्ट होणाऱ्या सुधाकराचें हें नाटक आहे. प्रभूची कृपा फिरावयाची आहे ती आतापर्यंत आपल्याला जवळचा झालेल्या सुधाकरावर फिरावयाची आहे; ती फिरल्यानंतरचें त्याच्या नाशाचें साधन मात्र परमेश्वराच्या हातच्या लहानसा पेला आहे. अत्यंत सुंदर अशा या पताकास्थानांत गडकऱ्यांनी आपल्या नाटकाचें हें मर्म किती कुशलतेने व्यक्त केलें आहे.

आणि पुढच्या दुसऱ्याच प्रवेशांत या एकच प्याल्याचें पहिलें दर्शन आपल्याला घडतें. त्यांत तल्लख बुद्धीचा तळिराम भगीरथाला मद्यपानाचे धडे देत आहे. दारूवरचा मोठा आरोप म्हणजे "म्हणे दारू सुटत नाही." पण नाही सुटली म्हणून भिण्यासारखें काय आहे, असें त्याचें तत्त्वज्ञान आहे. बायकोचा लबेदा जन्मभर मागे लागतो म्हणून बायका करायचं कुणी टाकून दिलं आहे का? असा त्याचा युक्तिवाद आहे. सुशिक्षितांचें बोलणें आणि दारूबाजांची बडबड यांत सरसनिरस, त्याच्या मताने कांहीच नाही. दारूपेक्षा प्रेमाचें वेड हें अधिक घातक आहे. मद्यपान नीतिमत्तेला अधिक पोषक आहे, कारण मद्यपी खोटें बोलत नाही; तो कधी कुणाचा विश्वासघात करीत नाही; कारण त्याच्यावर कोणी विश्वासच ठेवीत नाही. तसेंच दारूमुळे मनुष्याची कर्तबगारीही कमी होत नाही; असें तळिरामाचें प्रतिपादन आहे. आणि त्यासाठी साहेब लोकांच्या उदाहरणावर त्याची भिस्त आहे. त्याच्या या सगळ्या विपर्यस्त बडबडीचा परिणाम म्हणून नव्हे, तर अत्यंत निराशेने ज्याने "जगाचा जितेपणीच निरोप घेतला" अशा वृत्तीच्या तो आहारीं गेल्यामुळे भगीरथ दारूचें व्यसन लावून घ्यायला तयार होतो.

भावी दुःखद घटनांची अजाणती पूर्वसूचना —

वस्तुतः, आतापर्यंत पहिल्या प्रवेशांत झालेल्या नाट्यघटनेशीं या दुसऱ्या प्रवेशांतील तळिरामाच्या येथपर्यंतच्या बडबडीचा कांहीच संबंध नाही. कथानकाशीं थोडा तरी संबंध या प्रवेशांत येतो तो भगीरथ निघून गेल्यावर गीता येऊन, सिंधूला माहेरीं नेण्याला तिचा भाऊ आला आहे व सिंधूबरोबर सुधाकराची बहीण शारदही जाणार आहे, ही वार्ता सांगते तेव्हा; आणि त्याच वेळीं पुढे स्थापन होणाऱ्या आणि या नाटकांतील दुःखद घटनांत ज्याचा फार संबंध येणार आहे त्या कलहाच्या स्थापनेचें सूतोवाच तळिराम करतो तेव्हा भावी घटनांशीं हा प्रवेश थोडा फार जोडला जातो.

त्यांतून कलहाच्या स्थापनेसाठी प्रस्थमूल असलेल्या तंडुलांची – पैशाची गोष्ट निघते. अर्थात तळिरामाच्या दारूच्या व्यसनाने घर सगळें धुऊन गेलेलें असतें. आता गीतेच्या मणिमंगळसूत्राशिवाय घरांत दुसरें कांही राहिलेलें नसतें. परंतु तरल बुद्धीचा

तळिराम, सौभाग्याला पोत गळ्यांत असली म्हणजे झालें, त्यासाठी सोन्याच्या मण्यांची गरज काय, अशा सोयिस्कर तत्त्वज्ञानाच्या आधारावर, गीतेची मान धरून तिच्या गळ्यांतील मणि घेऊं लागतो.

अशा रीतीने दारूच्या परिणामाचें विकट प्रदर्शन आणि भविष्यकाळीं घडणाऱ्या प्रसंगाची अंधुक पण अजाणती पूर्वसूचना देऊन हा प्रवेश संपतो.

आणि तिसऱ्या प्रवेशांत पुन्हा एकदा सिंधु आणि सुधाकर यांची आपली गाठ पडते. सिंधूचा भाऊ पद्माकर हा, सुधाकराचा कांही दिवस राहण्याचा आग्रह आपण मान्य करूं शकत नाही हें सांगतांना, सुधाकराचा विद्वद्रत्न म्हणून उल्लेख करतो आणि कारखानदारींत जीवित घालविणाऱ्या आपल्यासारख्याला त्याच्याशीं बोलतांना किती संकोच वाटतो असें सांगून, आपणा दोघांमधील अंतर केवढें मोठें आहे हें ध्वनित करतो. नाटककाराने हा केलेला सुधाकराच्या श्रेष्ठतेचा उल्लेख उगीचच आहे असें कां मानावयाचें? रामलाल प्रेमाच्या पक्षपाताने बोलला असें एक वेळ मानतां येईल. पद्माकराचें तर तसें नाही. तेव्हा गडकऱ्यांनी सुधाकराच्या विद्वत्तेबद्दल दिलेला हा पुरावा अपुरा मानण्याचें कारण नाही.

तळिराम आणि आयागो —

नंतर सिंधूच्या जाण्याची तयारी करण्याचें काम तळिरामावर सोपविण्याला सुधाकर सांगतो. त्या वेळीं आपल्या या कारकुनाचें वर्णन सुधाकर, "मनुष्य मोठा चलाख, हुशार आणि जिवाला जीव देणारा आहे" असें तो करतो. या ठिकाणीं, आयागोचें अगदी असेंच वर्णन ऑथेल्लोने मोठ्या विश्वासाने केलें, त्याची आठवण सहजच होते; डेस्डेमोनाला सायप्रसवर पोचवण्याची जबाबदारीही ऑथेल्लोने आयागोवरच टाकली होती आणि तीही इतक्याच विश्वासाने. त्या वेळी जशी नियति हसली तशीच याही वेळीं ती विकट हसली असेल. कारण, आयागो जसा ऑथेल्लोच्या विनाशाचा बाह्य कारक होणार होता, तसाच तळिराम सुधाकराच्या नाशाचा कारक होणार होता. यामधील हें साम्य अगदीच आकस्मिक असेल काय?

सुधाकराला मनोभंगाच्या वेळीं, किंवा रागाच्या भरांत असतांना तोल संभाळण्यासाठी, सिंधूसारखी सर्वगुणसंपन्न पत्नी जवळ असावयाला हवी होती. तिच्या माहेरीं जाण्याने त्याचा हा सांगाती जवळ नाहीसा होण्याची वेळ आली. याबद्दलची जाणीव सिंधूला रामलालने कांहीशी कटाक्षाने करून दिलेली होती. म्हणूनच ती म्हणते,

"पण भाईनं सांगितलेलं लक्षांत आहे ना? माझ्या जिवाला नाहीतर टांगल्यासारखं होईल. इथं एकटंच राह्यचं."

हा उल्लेखही गडकऱ्यांनी उगीचच केला असें म्हणायचें का? यांत काळजी आहे ती सुधाकराच्याच जीवनाची आहे, असें नव्हे का?

चवथ्या प्रवेशांत आर्यमदिरामंडळाच्या स्थापनेसाठी मद्यपी मंडळी जमली आहे.

तेथे तळिरामला यायला उशीर होतो. कारण तळिरामचे वकील मालक – म्हणजेच सुधाकर – यांची सनद न्यायाधीशांनी सहा महिनेपर्यंत रद्द केली होती. सुधाकराच्या वाइटावर, तळिरामने म्हटल्याप्रमाणे, लोक होतेच. त्यांत सुधाकराचा चांगला असला तरी तापट स्वभाव. त्यामुळे एका मुद्यावर, मतभेदाच्या वेळीं, सुधाकर मुन्सफाला नाही नाही तें बोलूं लागला. मुन्सफाने त्याची सनद सहा महिने रद्द केली. तेव्हा विरोधी लोक सुधाकराची हुर्रेवडी उडवूं लागले. त्यामुळे वेभान झालेल्या सुधाकराला घरीं पोचवून मगच तळिरामाला मंडळाकडे यायला फुरसत मिळाली.

सुधाकराच्या कथानकाशीं या प्रवेशाचा एवढाच कथनापुरता संबंध. नंतरचा प्रवेश आर्यमदिरामंडळाची स्थापना, त्याचे उद्देश वगैरेमध्ये खर्च झाला आहे. तिकडे आपल्याला ताद्दश लक्ष पुरविण्याचें कारण नाही.

शरीराचा नाश केल्यावांचून मरणाची जोड देणारें विष —

आपल्या दृष्टीने पुढच्या पांचव्या प्रवेशाचें महत्त्व अधिक आहे. कोर्टीतील अपमानाचा प्रसंग घडून चोवीस तास झाले तरी सुधाकराची वृत्ति शांत झालेली नाही. त्याच्या डोक्यांत नुसते घणाचे घाव बसताहेत. हलकटांनी हेटाळणी करावी, लब्धप्रतिष्ठितांनी छीः थू करावी; वैऱ्यांनी समाधानानं हसावं; संपत्तीची सुधाकराला फिकीर नाही; पण अपमानाच्या या जाचण्या त्याला असह्य झाल्या आहेत. त्यामुळे त्याची तरल कल्पनाशक्ति असें एखादें विष सापडावें म्हणून चिंतन करीत आहे की, ज्यामुळे आपण सिंधूला तर अंतरूं नये आणि अपमानाची आग तर शांत व्हावी. शरीराचा नाश केल्यावाचून मरणाची जोड करून देणारें विष त्याला हवें होतें.

आणि असें तळिरामाच्या दृष्टीने विष नव्हे तर अमृतच असणारें औषध म्हणजे दारू; तिची भलावणी तळिराम करतो. दारू या शब्दाच्या उच्चारानेच सुधाकर दचकतो. पण ती एवढीशी घ्यायची – केवळ औषधापुरती – म्हणजे सवय लागण्याची भीति नाही, अशी संपादणी तळिराम करतो. आणि यांतच नेमका सुधाकराच्या मानी अहंकाराला दंश होतो. एखाद्या व्यसनाची आपल्याला सवय लागेल अशी शंका कोणी घ्यावी म्हणजे काय? आणि त्यासाठी, व लौकिक दृष्ट्याही, केवळ औषध म्हणून दारू घेण्यांत आपण वाईट कांही करीत नाही, असें मनाचें समाधान करून सुधाकर फक्त एकच प्याला दारूचा घेतो.

जें होईल म्हणून रामलालला भीति वाटत होती तें नेमकें घडतें. तें न घडण्याला जिचा उपयोग झाला असता तिच्या गैरहजिरीचा असा नेमका विपरीत परिणाम घडतो.

अशा रीतीने पहिल्या अंकाच्या शेवटींच सुधाकर दारूच्या कचाट्यांत सापडतो. यापुढचें सगळें नाटक म्हणजे सुधाकराच्या अधःपतनाचें, करुण विपाकाचें नाटक होणें स्वाभाविकच आहे.

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला सिंधू आणि शरद सिंधूच्या माहेराहून परत आलेल्या आहेत; आणि सिंधूला असा अनुभव येतो आहे की, आल्यापासून दोनतीन दिवसच काय तो अपवाद; बाकी संध्याकाळचा सुधाकर घरीं ठरतच नाही. आपण माहेरीं फार दिवस राहिल्याने तो रागावला असेल म्हणून सिंधू त्याची क्षमा मागते. पण तो म्हणतो की सनद परत मिळविण्याच्या खटपटीसाठी जावें लागतें तेव्हा राग कशावरून ? परंतु सिंधूचा अनुभव आहे की, सुधाकराचें वागणें त्रासाचें होतें, बाळाचें कोडकौतुकसुद्धा त्याच्या हातून होत नाही. सुधाकर तरीही तिला खरें सांगत नाही. दुसऱ्याच दिवशीं सनद परत मिळावयाची असल्याने ही भटकंती संपेल असें म्हणून तिचें कांही तरी समाधान करण्याचा प्रयत्न करून सुधाकर जातो.

प्रभु मजवरी कोपला—

पण सिंधूपुढे हा लपंडाव किती दिवस चालणार असतो ? कारण, सिंधू कांही स्वाभाविकपणेंच परत आलेली नसते. रामलालला इंग्लंडमध्ये लढाईच्या कारणाने फार दिवस राहतां आलें नाही. तो परत आल्यावर सुधाकराच्या सनदरद्दीची वार्ता त्याला लागली, म्हणून तार करून सिंधूला त्याने एकदम माहेराहून बोलावून घेतलें. त्यामुळे सिंधूला काळजी वाटूं लागली होती आणि ही काळजी स्वतः रामलालला अजून चिंतातुर करीत होती.

सुधाकर गेल्यावर रामलाल येतो. पण त्याच्याकडूनही सिंधूचें समाधान होत नाही; आपल्यावर प्रभु कोपला अशी तिची तीव्र भावना होते. "परमेश्वर कोपला तर" असेच सुधाकराचे पहिल्या प्रवेशांतले शब्द होते हें या ठिकाणीं आठवल्यावांचून राहत नाही.

तळिरामची बायको गीता सुधाकराच्या घरचें काम करणारी. तिला सिंधूचें हें बोलणें ऐकून राहवत नाही. ती येऊन रामलालला वार्ता देते की, आताशा सुधाकराने प्यायला सुरुवात केली आहे. रामलालचें हृदयही ही दुर्दैवाची झलक पाहून चरकून जातें.

या गोष्टीची शहानिशा करण्यासाठी रामलाल भगीरथाचें साह्य घेतो. भगीरथ त्याच्या परिचयाचा आहे आणि तो तळिरामाच्या आर्यमंदिरामंडळाचा सभासद आहे ही माहिती रामलालला मिळाली आहे. रामलालची मंडळाचा सभासद होण्याची कल्पना भगीरथाला विचित्र वाटली. तरीही रामलालच्या आग्रहावरून मंडळी रंगांत आल्यावर रामलालला मंडळांत घेऊन जाण्याचें भगीरथ कबूल करतो.

आणि मग आपल्यापुढे आर्यमंदिरामंडळाची रंगलेली बैठक गडकरी मांडतात तेथे सुधाकराला नको नको म्हणत असतांना दारूचा आग्रह होत असलेला आपण पाहतों. तो झिंगलेला असतांना त्याचे हे नवे दारूबाज दोस्त त्याच्या डोक्यांत एक अजब कल्पना घुसवितात. अशी की, सुधाकराची निंदा करणाऱ्या त्याच्या हितशत्रूंचा उद्या

सनद मिळून कोर्टांत गेल्यावर सुधाकराने चांगला समाचार व्यावा आणि त्यासाठी त्या लोकांच्या नाकावर टिच्चून दारू पिऊनच कोर्टांत हजर राहावें. दारूच्या नशेंत, आपण ही हिंमत करूं शकतो असा अभिमान सुधाकर व्यक्त करतो. आता याचा परिणाम फार तर काय होईल? सनद कायमची रद्द होईल. पण झाली रद्द तर काय फिकीर आहे? त्याला वाटेल तितक्या नोकऱ्या देण्याचें वचन देणारे दारूत्राज मित्र त्याचे होतेच ना सगळे!

स्वत:च्या सिद्धांतावरच गडकऱ्यांचा प्रहार —

आणि हा निर्णय पक्का होतो. त्याच्या भरांत सर्वजण अतिरिक्त दारू पितात आणि सुधाकर गुंगींत पडतो. बाकीची मंडळी अजून प्याले भरीतच असतात. अशा वेळीं भगीरथासह रामलाल तेथे प्रवेश करतो, आणि त्याला व भगीरथाला तेथले ते दारुड्यांचे भेसूर चाळे पाहायला मिळतात. भागीरथाचे डोळे या सर्व प्रसंगाने उघडावेत म्हणून रामलाल स्वाभाविकच प्रयत्न करतो. त्याच्या त्या प्रयत्नाने भगीरथालाही त्या तेथल्या प्रकाराची किळस येते. सुरुवातीपासूनच यांत आपण सामील होत असल्यामुळे हा सर्वस्वी निंद्य प्रकार आपल्या कधीही लक्षांत आला नाही याची आता त्याला जाणीव होते, आणि भगीरथ तळिरामाचा एकच प्याला घेण्याचा आग्रह जुमानीत नाही. "आजपासून भगीरथ तुम्हांला आणि तुमच्या दारूला पारखा झाला" असें तळिरामला तो बजावून सांगतो.

अशा रीतीने दारूचा पहिला प्याला घेतला की, माणुसपण सर्व संपलें असा सिद्धांत माडूं पाहणाऱ्या गडकऱ्यांनी आपण होऊनच हा प्रहार त्या सिद्धांतावर केला. म्हणजे अखेर दारू ही निरपेक्ष विनाशकारी न ठरतां, माणसामाणसांमध्ये त्या घडतींत सापेक्ष परिणामाची शक्यता सूचित झाली. आणि म्हणूनच सुधाकर या व्यक्तीचा दारूशीं येणारा संबंध अशा रीतीच्या सुधाकराच्या स्वभावचित्रणावर आधारलेल्या नाटकाच्या ओघालाच सहज महत्त्व चढलें.

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीला सिंधू मनाचा धीरच सुटल्यासारखी चिंताग्रस्त होऊन बसली आहे. त्या ठिकाणीं 'दहति मना नाना कुशंका' हें तिच्या तोंडीं घातलेलें पद तिची मनस्थिति दाखविण्याच्या दृष्टीने उचितच वाटतें. "मन चिंती तें वैरी चिंतीना तशांतलं तुमचं चाललं आहे हें वहिनी," असें तिचें समाधान शरद करूं पाहते खरी. परंतु तिच्या वैऱ्यानेही चिंतलें नसावें असें कांहीतरी ऐकायचें तिच्या नशिबीं होतें. कारण अनाकाना करीत अखेर रामलालच्या तोंडून सिंधूच्या कानावर पडतेंच की, सुधाकराला दारूचें व्यसन लागलें! हें ऐकूनच सिंधूला मूर्च्छा येऊं लागते. पण तिच्या दुःखाचें माप अजून पुरें भरलें नव्हतें. ठरल्याप्रमाणे सुधाकर दारू पिऊनच कोर्टांत गेला आणि तेथे त्याची सनद कायमची रद्द झाली. ही वार्ता घेऊन रामलालच्या पाठोपाठच भगीरथ येतो. एवढ्यानेही पुरें झालें नाही की काय म्हणून तळिरामाने पुढे घालून आणलेला

सुधाकर दारूच्या नशेंत गुंगलेल्या अवस्थेंत घरांत दाखल होतो; आणि "सनद गेली तरी हरकत नाही; मी नामर्द नाही– हा रामलाल नामर्द आहे– सनद सामर्द आहे–" अशी नशेंतील त्याची बडबड चालू असते.

सापाच्या शेपटीवर पाय —

रामलालही हा प्रकार पाहून हतबुद्ध होतो. त्याचा तोल सुटतो. तळिराम सुधाकराला आंत निजवून परत आल्यावर रामलाल त्याला "असाच्या असा चालता हो. इतःपर या घरांत पाऊल टाकशील तर खबरदार" असा हुकूम करतो.

निव्वळ दारूचेंच हें नाटक असतें तर तळिरामासारख्या सापाच्या शेपटीवर रामलालने पाय देऊन त्याला असें डिवचल्याचें दाखविण्याचा प्रसंग या नाटकांत दाखविण्याची जरूर काय होती ? बेबंदशाहींत कन्जीला असेंच संभाजीजवळून दूर व्हायला खुद्द येसूबाईने सांगितलें होतें. पण खुद्द संभाजीच कन्जीचा पाठिराखा झाला. तीच्च गत येथे झाली. अवनधानाने तळिरामाचें भूत रामलालने जागें केलें.

तिसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत पुन्हा एकदा तळिराम आणि गीता यांची झटापट पाह्यला मिळते. पण गीता तशी दळूबाई स्त्री नाही. ती तळिरामला सरळ ढकलून देते. दारूबाजाचा जोर सगळा त्याच्या जिभेंत. त्यामुळे तिला शिव्या देत राहण्यावांचून तळिरामाला दुसरें काय करतां येणार !

पुढच्या तिसऱ्या प्रवेशांत भगीरथ शरदबरोबर निबंधमाला वाचीत बसला आहे. विधवांवरील अन्यायाबद्दल तो तावातावाने बोलतो आहे. त्याला एवढेंही भान नाही की, एका बालविधवेपुढे हे विचार मांडून आपण तिच्या हृदयाची कालवाकालव करीत आहोंत. पण ती स्त्री चतुर आहे. विषय बदलून ती, दारूची सवय सुटणें शक्य आहे का, हा तिच्या मनाला आपल्या भावाच्या निमित्ताने जाळीत असलेला प्रश्न भगीरथाला करते; स्वतःच्या मनाचें समाधान करून घेण्यासाठी ती त्याला, "तुम्हांला पुन्हा आठवणसुद्धा झाली नाही ?" असें विचारते. अगदी चुकूनसुद्धा नाहीं, असें उत्तर देऊन याचें श्रेय तो तिच्या शीतल चंद्रप्रकाशासारख्या सहवासाला देऊं जात असतो, तोच रामलाल तेथे येतो आणि भगीरथाप्रमाणे साऱ्यांचीच दारू सुटेल असें नाही हें दर्शविणारी धक्का देणारी बातमी सांगतो.

कारण आता सुधाकराने राजरोस घरांतच दारूचा अड्डा उघडलेला होता. तळिरामाने गीतेला घरांतून हकलून दिलेली असल्याने ती सुधाकराकडेच राहायला गेल्याचें रामलाल सांगतो आणि तिकडे शरदला पाठवून देतो. आणि भगीरथाकडून सिंधूच्य भावाला तार करून बोलावण्याची व्यवस्था करतो.

रामलालच्या भाषणांचें प्रयोजन—

यानंतर लगेच रामलालचें एक भलें मोठें राजकीय तत्त्वज्ञानाचें भाषण भगीरथापुढे

होतें आणि त्याचा नाटकाशीं संबंध काय असा प्रश्न उपस्थित होतो. पण "सुधाकराजवळ गोष्ट काढायला मी गेलों; पण माझ्या सांगण्याचा कांही उपयोग नाही," हा रामलालने जो हताशपणा व्यक्त केला त्याच्या पार्श्वभूमीवर या व्याख्यानाचा खुलासा होतो. सुधाकराची मनोभूमि दुसऱ्याचा उपदेश जिरवून घेण्याइतकी अनुकूल नव्हती, भगीरथाची मनोभूमि तशी अनुकूल होती, आणि म्हणून रामलाल जीव तोडून, समाजकार्यप्रवण करून दारूच्या मोहापासून त्याला दूर ठेवण्याचा यत्न करीत होता; पण त्याच रामलालची सुधाकरासारख्या विचित्र मानी आणि स्वावलंबनाने यश मिळविल्यामुळे हटवादी झालेल्या माणसावर कसलीही मात्र चालूं शकत नव्हती; या विरोध-दर्शनाच्या निमित्ताने, आणि तसें नसतें तर रामलालच्या वाणींत केवढें सामर्थ्य आहे हें दाखविण्याच्या दृष्टीने या भाषणाला या नाटकांत विशेष महत्त्व आहे. १९१७ सालीं हें नाटक लिहून पुरें होण्याच्या सुमारास महात्मागांधींना महात्मेपण अद्यापि प्राप्त झालें नव्हतें. त्या वेळीं काळाचीं पावलें आधीच ओळखून, "भगीरथ, आर्यावर्ताच्या उदयोन्मुख भाग्याचा अचुक मार्ग सांगणारा मंत्रद्रष्टा महात्मा अजून अवतरावयाचा आहे" अशी त्या महात्म्याच्या अवताराची नांदी पुकारतांना गडकऱ्यांना पाहिलें म्हणजे, त्यांच्या देशविषयक तळमळीच्या चिंतनाची जशी साक्ष पटते, तशीच असे विचार करणारा त्यांचा रामलाल अगदीच कुचकामी आणि या नाटकांत बांडगुळासारखा त्यांना तरी वाटत नव्हता, ही गोष्टही दिसून येते. पण अशा अल्पांशाने का होईना क्रान्तदर्शी अशा रामलालसारख्या माणसाचेंही सुधाकरापुढें कांही चालू शकत नव्हतें. आणि याला कारण दारू नव्हे तर सुधाकराचा स्वभावच.

सुधाकराच्या स्वभावदोषाचेंच नाटक —

रामलालने झिडकारलेला तळिराम आता सुधाकराचा जिवलग दोस्त बसला आहे; आपल्याला त्याने नुसतें सुधा म्हणावें असा सुधाकर त्याला आग्रह करतो आहे; आणि तळिराम हलके हलके रामलालविरुद्ध सुधाकराचे कान फुंकतो आहे, असा प्रसंग तिसऱ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांत आहे. सिंधूच्या देखत तळिरामाच्या हातून दारू घेऊन पिण्यापर्यंत सुधाकराची मजल तळिरामाच्या चिथावणीवरूनच जाते. शरद तळिरामाचा त्याबद्दल निषेध करते, तर "दादासाहेब तुमच्या बायका आम्हांला शिव्या देतात, ऐका" अशी तळिराम सुधाकराला चिथावणी देतो; परिणाम, सिंधू आणि शरद यांना लाथ मारण्याची भाषा सुधाकर बोलतो.

ऐन नशेच्या भरांत संभाजीचासुद्धा एवढा तोल सुटला नव्हता. यावरून तरी येथे सुधाकराच्या स्वभावदोषाचें हें नाटक आहे हें जास्त स्पष्ट व्हावें.

या क्षणीं सिंधूचा माऊ पद्माकर, रामलाल, सिंधूचे वडील हीं माणसें येतात आणि पद्माकर तिरस्काराने तळिरामाला लाथेने दूर उडवितो.

रामलालला बाई अनुकूल, असें विष यापूर्वीच तळिरामाने सुधाकराच्या कानांत

ओतलें होतें. आता आपल्या या अपमानाची संधि घेऊन, "तुमची सनद गेली त्या वेळीं यानं बाईसाहेबांना मिठी मारली" असें म्हणून काट्याचा केवढा मोठा नायटा तळिराम करतो आणि म्हणून मला घरांत यायची बंदी यानं केली, असा एकेरीवर येऊन तो बोलूं लागतो.

नाटककाराचें सर्व लक्ष सुधाकरावर केंद्रित —

पद्माकर आणि बाबासाहेब यांना आपल्या घरांतून निघून जायला सुधाकर सांगतो. त्या वेळीं आपल्या बहिणीने या नरकांत आता यापुढे राहूं नये या बुद्धीने पद्माकर सिंधूला आपल्याबरोबर माहेरीं चलण्याला सुचवितो. परंतु सिंधू नवऱ्याचे पाय सोडायला तयार नाही (याबद्दल सिंधूवर पुष्कळांचा राग आहे; परंतु त्याबद्दल पुढे थोडक्यांत उल्लेख करूं.) पायावर लोळण घेणाऱ्या सिंधूला सुधाकर लाथाडतो. तरीही सुधाकराला सोडायला सिंधू तयार नाही. शेवटीं माहेरचा किंवा रामलालचा पैसा, कोणाचें कांही कांही घरांत आणायचें नाही, अशी शपथ सिंधूने घेतल्यावर त्या अटीवर तिला घरांत राह्यची परवानगी मिळते. पद्माकराचा कसलाही युक्तिवाद ऐकत नाही. सुधाकराच्या प्रेमाबद्दल स्वतःची श्रद्धा ती व्यक्त करते आणि दारूमुळे बेभान झालेल्या सुधाकराबद्दल राग करण्याऐवजी त्याची ती कीवच करते. शेवटीं स्वतःच्या गळ्याची शपथ घालून ती सगळ्यांना तेथून रवाना करते आणि या तिसऱ्या अंकाच्या अखेरीस सिंधूच्यादेखत सुधाकर एक मिळेल तेवढा दारूचा प्याला पिऊन घेतो. अशा रीतीने तिसऱ्या अंकाच्या या चारी प्रवेशांत नाटककाराचें सारें लक्ष एकट्या सुधाकरावर केंद्रित झालेलें आहे हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.

चवथ्या अंकांतही सुरुवातीला तरी गडकऱ्यांना तळिराम आणि त्याच्या आर्य-मदिरामंडळाचे सभासद यांची आठवण झालेली दिसत नाही. पहिल्या प्रथम त्यांत आपण शरद आणि रामलाल यांचा प्रवेश पाहतों. हाच तो रामलालने चर्चेच्या भरांत शरदला स्पर्श केल्याचा प्रवेश. हा स्पर्श करतांच रामलालच्या मनाचा समधातपणा बिघडतो. त्या स्पर्शासरशी आपल्या हातावर काटा उभा राहिला व हात थरथर कापूं लागला याबद्दल रामलालचें चित्त अस्वस्थ होतें, आणि तो झटकन हात काढून घेतो तेव्हा शरद त्याच्याकडे चमत्कारिकपणें पाहते. त्याने चपापून हात काढून घ्यावा यांत त्याचा हात आपल्या पाठीवर बापाने किंवा भावाने फिरवावा तशा भावनेने रामलालने तो फिरविला नाही असा तिला संशय आला आणि "आज तुमचा बापासारखा वाटणारा तुमचा बापासारखा वाटणारा तुमचा आधार तुटून मी पोरकी झालें" असें म्हणून तिला रडें कोसळलें. एका क्षणांत तिच्या उभ्या जन्माचा विश्वास उडाला असें म्हणून क्रुद्ध होऊन ती चालती झाली. रामलालला मोठी भ्रांति पडली की, आपल्या हातून खरोखरच कांही गुन्हा झाला का? आपलें मन खरोखरच चलित झालें का? त्या बाबतींत त्याच्या मनाचा निश्चय न होऊनच हा प्रवेश संपतो.

गडकऱ्यांचें प्रतिभासामर्थ्य —

याच्या पुढचा चवथ्या अंकाचा दुसरा प्रवेश गडकऱ्यांच्या प्रतिभेच्या सामर्थ्याची केवढी प्रभावी साक्ष पटविणारा आहे. सिंधू कागदाच्या घड्या चार पैसे मिळविण्याच्या उद्देशाने घालीत आहे. तिला माहीतच नाही की, सुधाकर येऊन मागे उभा आहे. अशा वेळीं गीता येऊन सिंधूला कामांत मदत करूं पाहते. पण सिंधू नको म्हणते. कारण दुसऱ्याची काडी घरांत न घेण्याची शपथ तिने घेतलेली होती. गीतेच्या समाधानार्थ ती म्हणते, " तुम्ही हे कागद घड्यांसाठी घेऊन येतां हें तरी तुम्ही काम आणि मदतच करतां की नाही ?

पण आज हें काम आणण्याचें समाधानही गीतेला लाभलें नव्हतें. लढाईमुळे कागदाचा तुटवडा पडल्याने असलीं कामेंच नियत नाहीशीं झालीं होतीं. त्यामुळे काळजींत पडून, घरच्या घरीं करायला म्हणून कुठलं दळण मिळेल का, असें सिंधु विचारते. तेव्हा गीताबाईच्याच हृदयाचें पाणी पाणी होतें असें नव्हे, तर दारूचा दास बनलेला सुधाकरही विरघळून जातो. गीतेचा कोणताही आक्षेप सिंधु मानीत नाही आणि तिला दळण आणण्याचा आग्रह करते. अर्धपोटीं हें काम कसें होईल याचीसुद्धा फिकीर करीत नाहीं.

आणि मग भोळी गीता, मोठा धीर करून सिंधूला अमृतेश्वरीं याल का, म्हणून विचारते. कां, तर तेथे चार दिवस लक्षभोजनें चाललीं होतीं. तेथे चार गोडधोडाचे घास तरी पोटभर सिंधूला खायला मिळतील असें त्या वेड्या जीवाला वाटलें.

सिंधूच्या चित्तावर दारुण आघात —

केवढा भयंकर आघात होता सिंधूच्या चित्तावर हा. तो पाहून सुधाकराचें हृदयसुद्धा फाटून गेलें.आपल्या व्यसनाचा आणि पुरुषार्थाचा मनांतल्या मनांत तो धिक्कार करूं लागला.

सिंधूच्या डोळ्यांत आपल्या बोलण्याने अश्रू उभे राहिलेले पाहून गीतेला अतिशयच शरमल्यासारखें झालें. सिंधूच्या जिवाला लागेल असें आपण बोललों याबद्दल तिला मेल्याहून मेल्यासारखें झालें. पण तिला असें वाईट वाटूं नये या उदार उर्मीच्या पोटीं सिंधू खोटेंच तिला म्हणते, " माझ्याही मनांतून यायचं होतं. पण हें बघा, असं जुनेर आड करून चार लोकांत कसं बरं यायचं बाहेर ? म्हणून मला वाईट वाटलं हो ! "

आणि मग तसें कांही आपलें विशेष चुकलें नाही या विश्वासाने गीता आणखी सूचना करते की, मग त्यात काय मोठंसं, मी आपलं पातळ आणून देऊं का ?

पहिल्या धक्क्याहून हा धक्का आणखीनच जबरदस्त होता. पण तशाही स्थितींत मन शांत ठेवून सिंधूने चातुर्याने तो विषय बदलला; हा प्रसंग पाहून तर सुधाकराचें अंतःकरण अधिकच हळवें आणि पश्चात्तापदग्ध झालें. सिंधूची महत्ता त्याला तीव्रपणें जाणवली.

गीतेच्या तोंडच्या दगडधोंड्यांच्या माराने सुधाकर जागा —

सिंधूचा मोठेपणा पाहून गीतेचें हृदय भरून आलें. ती हतवाक् झाली. इतक्या महान साध्वीबद्दल आपल्या नवऱ्याने अभद्र बोलावें याबद्दल तिला पोटांतून इतकी किळस आली की, अशा माणसांच्या जिभा सडून कशा पडत नाहीत असें ती जळफळून बोलूं लागली. नवरा म्हणजे देवासारखा, त्याच्याबद्दल असें बोलूं नये, हा सिंधूचा सात्विक उपदेश तिला मुळीच मानवत नाही. असल्या देवांची नित्यनेमाने रोज खेटरांनी पूजा करायला हवी असें ती म्हणते आणि पुढे ती खुद्द सुधाकरावरच्च अत्यंत तीव्र हल्ला करते. अशा सीतासावित्रीसारख्या पत्नीची त्याने काय ओज ठेवली म्हणून संतापाने विचारते. त्याच्या शहाणपणाचे ती वाभाडे काढते. त्याने कधी गोळाभर अन्नसुद्धा तिला देण्याची काळजी वाहिली नाही. असले कसले हे देव! "मला कुणी राज्य दिलं तर मी साऱ्या बायकांना सांगून ठेवीन की, नवरा दारू पिऊन घरीं आला तर खुशाल त्याला दाव्यादोरखंडानं गोठ्यांत नेऊन बांधीत जा. नवरा म्हणे देवासारखा! अशानं तर नवरेपणाचे देव्हारे माजले! दारू पितो तो कसला हो नवरा! माणसांत देखील जमा व्हायची नाही त्याची!" हें तिचें जळजळीत भाषण सुधाकराचें डोळे उघडण्याला उपयोगीच पडतें. स्वतः सिंधू यदाकदाचित हें बोलती तर त्याच्यावर असा परिणाम झाला नसता. परंतु या साध्यासुध्या स्त्रीचे, व्यक्तिस्वार्थनिरपेक्ष असे हे अंतःकरण पिळवटून निघालेले उद्गार त्याच्या हृदयाचा खोल ठाव घेतात. सुधाकर मागे हें सगळें ऐकत उभा होता याची जाणीव होऊन त्या दोघी चपापून आंत जातात त्या वेळीं, सुधाकर स्वतःच स्वतःशीं कबूल करतो की, "दारूच्या धुंदींत बहिरून निजलेला माझा जीव तुझ्या नाजुक बोलाफुलांनी कसा जागा होणार? त्याच्यावर गीतेच्या तोंडचा दगडधोंड्यांचा असा निष्ठुर माराच व्हायला पाहिजे."

विशुद्धीकरणाचा मनोज्ञ नमुना —

या जाणिवेने सुधाकर स्वतःला खूप ताडन करतो आहे तोच सिंधू गीतेला घालवून परत येते. त्या वेळीं तिला तोंड दाखविण्याचीसुद्धा सुधाकराला शरम वाटते. म्हणून तोंड झाकून तो रडूं लागतो. फटकळ गीतेच्या बोलण्याचें इतकें मनावर घेऊं नये, असें उलट सुधाकराचें सांत्वनच सिंधू करूं पाहते. आणि सुधाकराच्या हृदयांतील सर्व किल्मिष संपूर्ण धुऊन जाऊन, "सिंधू, आजपासून मी दारू सोडली" अशी अमृततुल्यवाणी त्याच्या तोंडून बाहेर पडते.

सिंधूचा आनंद गगनांत मावेनासा होतो. सुधाकराला आपले दोष, आपलीं सर्व पापें तीव्रतेने आठवतात. पश्चातापाच्या तीव्र अग्नींत त्या सगळ्याची जळून राख होऊन जाते. "झालं घेलं तें गंगेला मिळालं" असें सिंधू म्हणते. तसेंच सुधाकराचें चित्त विशुद्ध झालें, आता हा सुधाकर तुझ्या एका शब्दाबाहेर जाणार नाही, अशी सिंधूला

शुद्धबुद्धीने सुधाकर ग्वाही देतो; आपल्या निष्पाप बाळाची शपथ घेऊन, दारू अगदी सोडली असा तो निर्धार व्यक्त करतो.

या प्रवेशांत सुधाकराच्या ठिकाणची जी सहृदयता व्यक्त झाली आहे ती आपल्याही हृदयाचा खोल ठाव घेणारी आहे. विशुद्धीकरणाचा, Sublimation चा हा एक मनोज्ञ नमुना आहे. सुधाकराच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागावेत यांतच त्याची माणुसकी आहे, मोठेपणा आहे. विशुद्धीकरणाचें हें उत्कृष्ट स्वरूप दिसत असतांही त्याकडे कांही टीकाकारांचें दुर्लक्ष व्हावें याचें नवल वाटतें.

याचवरून हेंही स्पष्ट व्हावें की, गडकऱ्यांचें लक्ष सुधाकराकडेच किती वेधून गेलेलें आहे; सुधाकराच्याबद्दल त्यांच्या ठिकाणीं किती आत्मीयता आहे; त्यांच्यांतील कलावंताने सबंध तिसऱ्या अंकाच्या आणि चौथ्या अंकाच्या आतापर्यंतच्या भागांत त्यांची दृष्टि एकरूपतेने सुधाकरावरच कशी खिळवून ठेवलेली आहे.

सुधाकर – दुष्यन्त – लिऑन्टीस—

शाकुंतलांत सातव्या अंकांत दुष्यन्ताचेंही असेंच विशुद्धीकरण झालें तेव्हां तोही सुधाकराप्रमाणे, शकुंतलेचे पाय धरूं पाहतो, हें साम्य मोठें लक्षांत घेण्यासारखें आहे. शेक्स्पीअरच्या विंटर्स टेलमधील लिऑन्टीसचीही, पुतळ्याची पत्नी झाल्यावर, अगदी नेमकी हीच अवस्था होतांना आपण पाहतों. हे सगळे लोक एकाच सहृदयतेच्या कोटींतील आहेत.

फरक एवढाच की, त्या दोघांप्रमाणे सुधाकराचें हें मीलन चिरकालीन ठरलें नाही. जगाने, आणि त्याच्या स्वभावानेही, त्याला ती संधि दिली नाही. जगांतील निर्दयतेच्या दर्शनाने त्याची एवढी मोठी निराशा झाली की, त्याच्या उतावीळ स्वभावाला ती सहन झाली नाही. आणि मग मात्र तो या जगाला विटून त्यांतून नष्ट होण्याच्या मार्गाला लागला; त्याच्यांतील जागा झालेला देव त्याच्यांतील राक्षसापुढे विलीन झाला.

ही घटना याच्यापुढच्या प्रवेशांत घडलेली आपण पाहतों. गडकऱ्यांच्या जाणिवेच्या दृष्टीने हा प्रवेश या नाटकाचा अगदी परमोच्च भावनाविष्काराचा बिंदु आहे; या नाटकांतील सुधाकराचें जीवन अनिर्वाह्यपणें घसरगुंडीला लावणारा तो प्रसंग आहे.

विशुद्ध अंतःकरणाने सुधाकर आपल्या मित्रांची गाठ घेण्याचा प्रयत्न करतो. रंगभूमीच्या सोयीसाठी एकाच वेळीं आणि एकाच स्थळीं या भेटी दाखवाव्या लागल्यामुळे त्यामध्ये कांहीशी कृत्रिमता कोणाला वाटेल. पण त्याबद्दल तक्रार करणें हें एक अरसिकपणाचें लक्षण म्हणावें लागेल.

जगाचें कठोर दर्शन —

मित्रांच्या भेटींत सुधाकराला केवढा निराशेचा धक्का बसला. वास्तविक खुदाबक्ष वगैरेसारख्या स्वतःच्या गतपातकांच्या मूर्तिमंत पिशाच्चांसारख्या साथीदारांना भेटायला

तो निघाला नव्हता. पण तींच किंवा त्यासारखींच पात्रें त्याच्यापुढे उभीं राहिलीं. आणि दारू सोडण्याच्या त्याच्या निश्चयाबद्दल त्यांनी त्याचा भेसुर उपहास केला.

बुद्धिमत्तेच्या तीव्र अभिमानामुळे बहुतांशीं बरोबरीच्या माणसांच्यासुद्धा हातांत हात घालण्याची ज्याने कधी कदर केली नव्हती, त्या सुधाकरावर आज दारूबाज स्नेह्यांच्यापुढे तोंड वेंगाडण्याचा प्रसंग आला होता. अशांपैकी एका सामान्य गृहस्थाने तर सुधाकराचा नमस्कार स्वीकारलाही नाही. "या भिकारड्या दारूबाजाबरोबर बोलतांना आपल्याला कोणी पाहिलें तर चारचौघांत अंगावर शिंतोडे उडायचे" या भयाने नुसतीच हस्तिदंती करून, जणू आपल्याला कामाची अतिशय घाई आहे असें दाखवीत दुसरा एक गृहस्थ त्याला झटकून चालता झाला.

तिसरा गृहस्थ त्याहून अधिक व्यवहारी आहे. सुधाकराची विशेषशी ओळखच पटत नाही असें तो आधी दाखवतो. त्याला वाटलें सुधाकर एवढ्यावर उमजेल. पण अगतिक सुधाकराला हें उमजून सोय नव्हती. त्यामुळे त्या गृहस्थाने दिलेल्या मदतीच्या वचनांची आठवण सुधाकर त्याला करून देऊं लागतो. त्या वेळीं दारूबाजांची मैत्री फक्त दारूबजांच्या मैफलींत, तिचा असा उजेडांत उल्लेख करायचा नसतो, हा सिद्धांत सुधाकराच्या अंगावर फेकून, सुधाकराच्याप्रमाणे स्वतःची अब्रू चव्हाट्यावर नाचवायची आपली इच्छा नाही, या तोऱ्यांत तोही गृहस्थ निघून जातो.

तेव्हा चौथ्या गृहस्थाशीं सुधाकर थोड्याशा कडवटपणाने बोलतो. हा गृहस्थ चांगलाच मरव्वल आहे. त्याने, सुधाकर, तुम्ही आम्हाला पाठच्या भावासारखे, असें म्हणत म्हणत, त्याच्या हुशारीची व लायकीची तोंडभर स्तुति करीत करीत, सुधाकर पंधरा रुपयाचीसुद्धा, एखादी कुंभाराचा उकिरडासुद्धा उपसायची चाकरी करण्याची तयारी आहे, अशी दीनवाणी भीक मागत असतां, एक नोकरी मिळेल, पण त्या जागीं सचोटीचा माणूस पाहिजे, त्यासाठी जामीन पाहिजे, अशी मानभावी भाषा सुरू केली. सुधाकराला मोठी आशा वाटली की, आपला हा वडील भाऊ म्हणविणारा गृहस्थच जामीन राहील आणि आपलें काम होऊन जाईल. परंतु सुधाकरासारख्या व्यसनी माणसाची जामिनकी पत्करायला हा मोठा भाऊ तयार झाला नाही; आणि दुसरा कोणीही तयार होणार नाही याचा व्यावहारिक निर्वाळा त्याने दिला. आणि यांतून सुटायचा एकच मार्ग म्हणजे, "सुधाकर तुम्ही दारू सोडा" असा संभावित सल्ला देऊन त्या माणसाने काढता पाय घेतला.

सुधाकराविषयी अनुकंपा का दारूबद्दल चीड ?—

जगाच्या या कठोर दर्शनाने सुधाकर हताश होतो. दारूबाज दोस्तांनी लाथाडलेलें आपलें थोबाड घेऊन उपाशी बाळ आणि काबाडकष्ट उपसणारी सिंधू यांच्यापुढे उभे राहण्याची त्याला भयंकर शरम वाटूं लागली. जगांतूनच बाहेर जावें अशी त्याच्या मनाची ओढ त्या आत्यंतिक निराशेच्या पोटीं होऊं लागली. "दारूबाजाच्या ओळखीचं

मृत्यूचं रूप एकच, म्हणजे दारू," "दारूबाजाला आत्महत्या करण्याचं धैर्य असत नाही," या विचारांनी ग्रस्त होऊन, "मुलासकट माणुसकीला, सिंधूसकट संसाराला, सद्गुणासकट सुखाला, जगासकट जगदीश्वराला सुधाकराचा हा निर्वाणीच्या निराशेंतला शेवटचा प्रणाम" असें म्हणून, "आता यापुढं एक दारू; प्राण जाईपर्यंत दारू, शेवटपर्यंत दारू" अशी आर्त वाणी सुधाकराच्या तोंडून बाहेर पडते.

अशा रीतीने सुधाकरासारख्या महत्त्वाकांक्षी, मानी, अहंकारी, सहृदय, परंतु व्यसनाच्या तावडींत सापडून, नंतर आपल्या खऱ्या स्थितीची संपूर्ण जाणीव झाली असतांही आणि व्यसनांतून बाहेर पडण्याची अंतर्यामीची तीव्र आणि विशुद्ध इच्छा असतांही, जगाच्या निर्घृण स्वरूपाने बेफाम झालेल्या माणसाचे हे निर्वाणीच्या निराशेचे उद्गार त्या माणसाविषयी आपल्या मनांत दारुण निराशा आणि अनुकंपा उत्पन्न करतात की, दारूच्या व्यसनाबद्दलची चीड आपल्या मनांत निर्माण करतात, या प्रश्नाचा रसिकांनी आपल्या मनाशीं शोध घेण्यासारखा आहे.

सुधाकराच्या स्वभावाची परीक्षा झाली नाही —

वास्तविक सुधाकराचें चरित्र जवळजवळ येथे संपलें. आता सुधाकराचें पिशाचच जणू आपल्यापुढे वावरतांना गडकऱ्यांनी दाखविलें आहे. सुधाकर यानंतर आजारी तळिरामाच्या घरीं दारूबाजांच्या मैफलींतच भेटतो. शास्त्रीबुवाला अभिमान वाटतो की, सुधाकराच्या स्वभावाची आपली परीक्षा तंतोतंत बरोबर ठरली. कारण, सुधाकराची दारू न पिण्याची प्रतिज्ञा फुकट जाणार असा निर्णय चवथ्या अंकांत सुधाकराच्या तोंडावरच शास्त्रीबुवाने खुद्दाक्षाला सांगितला होता. पण या वेळीं शास्त्रीबुवाला उत्तर म्हणून सुधाकराचें जें एक सुंदर भाषण आहे त्यांतही गडकरी आपल्यापुढे निराशेने बेभान झालेला सुधाकरच उभा करतात. एवढेंच नव्हे तर बाकीच्या सर्व दारूबाजाहून सुधाकर किती वेगळ्या प्रकारचा मनुष्य होता, हेंही ते त्यामधून व्यक्त करतात.

"माझ्या जोडीदार मूर्खांनो, तुम्हांला माझ्या स्वभावाची परीक्षा झाली असें नाही. पण मला माझ्या दुर्दैवाची परीक्षा झाली नाही.....मला हसायचं आहे ? माझी कुचेष्टा करायची आहे ? करा, खुशाल करा; पण एका बाजूला जाऊन करा," असें जेव्हा सुधाकर म्हणतो तेव्हाच दारूबाजांची पायरी कोणती आणि दुर्दैवी, निराश, बुद्धिमान अशा सुधाकराची पायरी कोणती हें स्पष्ट दिसून येतें. दारूबाज आपली पायरी ओळखून बाजूला होतात आणि मग एकटा एकच सुधाकर, त्यांच्याहून वेगळा झालेला, सर्वस्वी निराळा सुधाकर आपल्यापुढे अस्खलित वक्तव्य करूं लागतो.

दारूबाज नव्हे, निराशेच्या गर्तेंत सापडलेला प्रतिभावंत —

या वक्तव्यांतील सुधाकराची दारूबद्दलची मीमांसा आणि त्यापूर्वीच्या क्षणभरापर्यंत चाललेली दारुड्यांची बडबड आणि वळवळ यांच्यामध्ये काडीचें तरी साम्य आहे काय ?

रामलाल तेथे येऊन सुधाकराच्या हातचा दारूचा पेला काढून घेऊं पाहत असतांना, 'बेअकली, नादान!' असें म्हणून, आपल्या हातचा पेला काढून घेण्याचा प्रयत्न करणें हें केवढें साहसाचें काम आहे हें सुधाकर सांगतो, तेव्हा त्याची जीभ दारू पिऊन दुबळ्या झालेल्या नादान माणसाची नसते – तो खुदाबक्ष किंवा मन्याबापू नसतो, एवढेंच नव्हे तर तरल बुद्धीचा तळिरामही नसतो. तर एक पिसाटलेला – दारूमुळें नव्हे तर आपल्या दोषांची परिपूर्ण जाणीव झाल्यामुळे–आणि आता परत भरल्या आणि सुखाच्या संसारांत जाण्याचा मार्ग खुंटल्यामुळें सिंधूसारख्या साध्वीच्या दुःखास कारण होण्याच्या पातकाबद्दल हृदयाला हजारो इंगळ्या लागलेला, एक निराशेच्या टोकावर जाऊन ठेपलेला अत्यंत बुद्धिमान व अहंकारी प्रतिभावंत तो असतो. या त्याच्या वेगळेपणाची प्रचीति रामलालशीं केलेल्या त्याच्या लांबच लांब, दारुण सत्याने भरलेल्या परंतु निराशेमुळे भडक झालेल्या भाषणांमध्ये किती सुंदरपणें आपल्याला येते.

आपल्या त्या भयाण भाषणांचें स्वरूपवर्णन स्वतः सुधाकराच्याच शब्दांत आपल्याला ऐकायला मिळतें. निराशेचा शेवटचा एक काळ माणसाच्या जीवितांत असा येतो की, त्या वेळीं मनुष्याचा जीविताचा मोह अजीबात विरून जातो. स्वतःच्या देहावर मृत्यूच्या दरबाराची सत्ता तो कबूल करायला लागतो. मृत्यूच्या भयानक स्वरूपाशीं मनुष्याची दृष्टि एकरूप होते आणि क्षणभंगुर जगाकडे काळाच्या क्रूर दृष्टीने तो पाहूं लागतो, अशा प्रकारचें आपलें स्वतःचें त्या स्थितींतलें रूप रामलालला पटवीत असतांना सुधाकर म्हणतो,

"मनुष्यहृदयांतल्या सहज काव्यस्फूर्तींतही हा दृष्टींतला क्रूरपणा खेळूं लागतो. अशा वेळीं तीव्र निराशेंत कडवटलेल्या मृत्यूच्या क्रूर काव्यदृष्टीनें पाहतांना सुंदर वस्तूबद्दलसुद्धा भयाण कल्पना आठवतात."

ही शब्दप्रेमाची आतषबाजी नव्हे —

अशा रीतीने जगाला कंटाळून मृत्यूला कवटाळायला निघालेल्या अंतःकरणांतून निवडून निघालेले क्रूर, कडू पण सत्य असे खडे तात्त्विक बोल हें सुधाकराच्या त्या भयाण भाषणांचें स्वरूप आहे. ती दारूबाजाची बडबड तर नाहीच; पण तरल कल्पना-शक्तिशील माणसाची शब्दप्रेमाची आतषबाजीही नाही. नाटकांतील संवाद पुष्कळसे सुटसुटीत असावे लागतात हें गडकऱ्यांना कळत नव्हतें असें नाही. एकच प्याला नाटकांत तर हा वेळपर्यंत अशा खुसखुशीत आणि सुटसुटीत संवादांची त्यांनी किती लीलेने खैरात केलेली आहे. परंतु त्यांचा सुधाकर हा सहज काव्यस्फूर्तीने रसरसलेला माणूस आहे हें आपण (अगदी सुरुवातीपासूनच) पाहिलें आहे. त्याच्या त्या काव्यस्फूर्तीचे, आता जीवनाचा फोलपणा अनुभवून, मृत्यूच्या जवळ गेल्यावर अंतःकरण ढवळून निघून, आपलें हृदयस्थ सर्व कल्मष पार धुऊन निपटून काढून, मृत्यूला श्रांत परंतु शांत हृदयाने कवटाळण्यासाठी आतुर झालेल्या हृदयांतले, ते त्या व्यक्तीला विशुद्ध

करणारे आणि आपल्यालाही त्याबरोबर उंच घेऊन जाणारे, त्या उदार आत्म्याचे क्रूर परंतु हळुवार आलाप आहेत ते; दारूबाजाची बडबड नव्हे.

सिद्धांत केवळ दारूपुरता नव्हे —

आणि स्वतः सुधाकरही आपल्या अपयशी जीवनाचें अखेरचें सार म्हणून सांगतांना "केवळ दारूपुरता हा सिद्धांत मीं तुला सांगितला नाही. मोहाची जी जी वस्तु असेल त्या प्रत्येकीच्या बाबतींत हाच सिद्धांत आहे" असें ओरडून सांगतो आहे. सर्व व्यक्तींना, सर्व स्थळीं, सर्व काळीं लागू पडणारा सिद्धांत बोलणारा सुधाकर एक नादान दारुडा म्हणून आपल्या श्रोत्यावाचकांपुढे नाचवावा अशी गडकऱ्यांची खास इच्छा नव्हती. परंतु सुधाकर विषण्ण हास्य करून, "तुम्हांला माझ्या स्वभावाची परिक्षा झाली नाही" असें आपल्या जोडीदारांना म्हणतो, तेंच टीकाकारांच्या बाबतींतही म्हणण्याचें दुर्दैव प्रस्तुत लेखकाच्या वाट्याला आलें आहे की, बाबांनो गडकऱ्यांचा सुधाकर तुम्ही पूर्ण ओळखलेलाच नाही.

"यावज्जीवनहि काय मी न कळलें आतांप्रती नीटसें" हा गडकऱ्यांचा कवितेमधील स्वतःविषयीचा उद्गार आणि सुधाकराचा वरील उद्गार यांमध्ये केवढें विदारक साम्य आहे. गडकरी स्वतः दारूच्या पेल्यांत बुडाले. पण त्यांना निव्वळ दारूबाज म्हणून ओळखणें म्हणजे त्यांची खरी ओळख कधीच न होणें हें जितकें खरें, तितकेंच सुधाकराची ओळख एक बेहिमती, अकर्तृत्ववान, नादान दारुडा म्हणूनच फक्त टीकाकारांना होणें, म्हणजे त्या टीकाकारांना सुधाकराची खरी ओळखच न होणें हेंही खरें आहे.

कदाचित रामलालही अशा टीकाकारांच्या वृत्तीनेच सुधाकराला दारूपासून परावृत्त करण्याच्या मोहिमेवर गेला होता. परंतु त्यालाच उलट शहाणपण शिकून परत यावें लागलें. आणि दुःखाचा स्वानुभव नसलेल्या पुस्तकी पंडितापेक्षा दुखःतप्त अनुभवाच्या नरकांतून गेलेल्या सामान्य माणसाचें शहाणपण अधिक प्रभावी असतें हा न्याय खरा ठरला.

जागा झालेल्या राक्षसाचें घोर पाप —

सुधाकराने दारू सोडण्याची प्रतिज्ञा केली होती. आतां तो नोकरी मिळाल्याची वार्ता घेऊन घरीं परत येईल या आशेवर सिंधू दिवस काढीत होती. परंतु अखेर दारूने बेभान झालेला सुधाकर तिच्यापुढे येऊन उभा ठाकतो. तेव्हा मात्र तिची कंबरच खचते. इतकी दारू पिऊनही अजून तो क्षण त्याला अनुभवायला मिळत नव्हता की, ज्या क्षणीं दारूबाजालाही तृप्ति वाटावी. म्हणून दारूसाठी सिंधूजवळ तो पैसे मागतो. तिच्याजवळ पैसे होतेच कोठे? त्या दिवशींच्या दळणाचे पैसे दळण दळून देण्यापूर्वीच मिळण्याची सोय झाली तरच तिला, स्वतःच्या पोटांत कांही

वालण्यासाठी नव्हे, तर भुकेल्या बाळासाठी थोडें दूध आणणें शक्य होणार होतें; आणि सुधाकर आला असता तर त्याच्यासाठी मूठभर तांदूळ उकडून ठेवतां आले असते. पण ही आगाऊ मजुरी मिळण्याचीही शक्यता नव्हती; माणसें मजुरांना इतकें उदारतेने क्वचितच वागवितात. तेव्हा नकोच ती लाचारी, यासाठी अगदी शेवटचे जवळ राहिलेले खरोखरीचे तांब्याचे दोन पैसे तिने गीतेजवळ बाळाला दूध आणण्यासाठी दिले होते.

पण वेभान झालेल्या सुधाकराच्या राक्षसाला यांत सिंधूचें पापच आढळतें. नवऱ्यापेक्षा तें कारटें जास्त काय? असा विचार त्याच्या मस्तकाला घेरतो. सिंधू पतिव्रता नाही, तें कारटं रामलालचं आहे, या भुताने सुधाकर पछाडला जातो आणि काठी घेऊन तो मुलाला मारायला धावतो. सिंधू बाळाला वाचविण्यासाठी मधे पडल्याने तिलाच काठीचा तडाखा बसून खोक पडते. पण तेवढ्यानेसुद्धा भानावर येण्याइतकी माणुसकी सुधाकरामध्ये शिल्लक राहिलेली नाही. म्हणून जखमी सिंधूकडे मुळींच न पाहतां "तूं मर! कार्टे मर जाव" असें विकट बोलून सुधाकर मुलाला काठी मारून ठार करतो.

सांधा न जुळणारे दोन प्रवेश—

यानंतरच्या पाचव्या अंकांतील तीन प्रवेश अजिबात गाळून फक्त चवथ्या प्रवेशानेच गडकऱ्यांनी नाटक संपविलें असतें तर फार बहार झाली असती. मोहाचा पहिला क्षण टाळला पाहिजे या सुधाकराच्या तोंडून घोषित केलेल्या तत्त्वाला पुष्टि देण्यासाठी रामलाल आणि शरद याचें कथानक नाटकांत यापूर्वी गडकऱ्यांनी उपयोजिलें, तें विसंगत वाटलें नाही. भगीरथाचें कथानकही, मनुष्य जात्याच संयमी असेल तर, क्षणिक मोहाला बळी पडूनसुद्धा त्या मोहांतून त्याचा बचाव होणें शक्य आहे, हें दाखविण्याच्या दृष्टीने, आणि सुधाकर तसा नसल्याने, तो भावनांच्या आहारीं जाणारा हटवादी माणूस असल्याने, अहंकारी असल्यामुळे, रामलालच्या उपदेशाचा त्याच्यावर कांही परिणाम होण्यासारखा नव्हता हें दाखविण्याच्या दृष्टीने सुसंगत वाटूं शकतें. परंतु पांचव्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत भगीरथाने आपल्या प्रेमाचा त्याग गुरुभक्तीच्या कारणाने करणें आणि शरदला रामलालशीं लग्न करण्याला प्रवृत्त करणें हा प्रसंग आणि तिसऱ्या प्रवेशांत रामलालने, शहाणपणा सुचून, त्या मोहापासून स्वतःला वाचविणें व शरदचा हात भगीरथाच्या हातांत देणें हा प्रसंग, यांचा एकच प्याला नाटकाच्या कथावस्तूंशीं कसलाही संबंध लावणें हें खरोखरच तर्कशक्तीच्या पलीकडचें आहे. एकच प्याला हें दारूचें नाटक आहे या समजुतीशींसुद्धा या प्रसंगाचा सांधा बसणें सर्वथा अशक्य आहे. सुधाकराचें तें नाटक आहे असें ठरल्यानंतरही त्यांचा कोठे सांधा जुळण्यासारखा नाही.

त्यापेक्षा दारूचें नाटक या दृष्टीने तिसरा प्रवेश कांही तरी सुसंगत म्हणावा लागेल. पण एक तर आतापर्यंतच्या विवेचनावरून हें नाटक सुधाकराचें नाटक आहे हें सिद्ध

मानलें जावें. पण तसें तें न मानलें तरी दारूचा एवढा विदारक परिणाम, सुधाकराच्या हातून स्वतःचा मुलगा आणि थोड्याच वेळांत त्याची पत्नी यांचा मृत्यु होण्याच्या प्रसंगाने चित्रित व्हावयाचा असतांना, मूर्ख दारुड्यांचा अड्डयांत तळिरामाच्या मृत्यूचा प्रवेश, दारूच्या विदारकतेचें दर्शन करविण्यासाठी आवश्यक आहे का? त्याचा उपयोग तरी आहे का? सूर्यापुढे काजवा अशी त्या प्रवेशाची दशा होत नाही का?

देवतास्वरूप सिंधू —

म्हणून आतां राहिला फक्त शेवटचा प्रवेश. त्यामध्ये पद्माकर तावातावाने, सुधाकराला गुन्ह्याबद्दल सरकारी शासन व्हावें या हेतूने, फौजदाराला घेऊन सुधाकराच्या घरीं आला आहे. पद्माकर इतका बेभान झालेला असतो की, रोजगाराच्या निमित्ताने कोमलता विसरावी लागणारा फौजदारसुद्धा त्याला जरा शांत व्हायला सांगतो. पण या विलक्षण प्रसंगांतही सिंधूची शांति ढळलेली नाही. भाऊ घरीं आला, तेव्हा त्याला चार घास खायला घातले पाहिजेत ही स्त्रियांच्या स्वभावांत मुरलेली आतिथ्यशीलता त्या अवस्थेंतही ती विसरत नाही. पण पद्माकराला त्याची फिकीर नाही. म्हणून काय झालें तें विचारून घ्यायला तो फौजदारला सांगतो. पण त्याचा आवेश निष्फळ होतो. कारण, सिंधू अगदी शांतपणें सांगते,

"यांनी कांही केलं नाही. कुणी सांगितलं आपल्याला हें? मी दोन दिवसांची उपाशी होतें. मला राहून राहून भोवळ येत होती. मुलाला घेऊन माळ्यावरून उतरतांना मला घेरी आली. पडल्यामुळं मला कपाळाला खोक पडली! मूल माझ्या अंगाखालीं चेंगरलं. इकडचा कांही संबंध नाही त्यांत. काठीला रक्त लागलं याचं कारणही मी काठी टेकीत रक्त भरल्या हातीं इथपर्यंत आलें. तिकडचा कांही संबंध नाही यांत!!

सिंधूला मार जबर लागला होता. झाल्या प्रकाराने सुधाकराचे डोळे साफ उघडले होते. यापुढे जगणें त्याला अशक्य होतें. म्हणून दारूच्या प्याल्यांत तो विष टाकतो तोच सिंधूची त्याला अखेरची हाक येते. तिला तो मांडी देतो आणि "देवतास्वरूप सिंधू, या अनंत पातकी अपराध्याला क्षमा कर" अशी तिची क्षमा मागतो. पुन्हा दारू घ्यायची नाही अशी शपथ घ्यायची विनंति ती त्याला शेवटची म्हणून करते. परंतु ही विनंति मान्य करणें त्याला शक्य नव्हतें. त्याने तयार करून ठेवलेला शेवटचा एकच प्याला त्याला अजून प्यायचा होता.

तोही शेवटचा समाधानाचा शब्द न मिळतांच सिंधू मरते. त्याच क्षणीं, रामलालला त्याच्या हातचा हिसकावून घ्यायला संधि मिळण्यापूर्वीच तो विष घातलेला दारूचा प्याला सुधाकर पिऊन टाकतो.

अखेरचें आत्मनिवेदन —

शेवटच्या निरवानिरवीच्या भाषणांत सुधाकराने दारूच्या अनर्थाबद्दल पुन्हा एकदा

जीव तोडून आपला अनुभव सांगितला आहे. दारूचा पहिला प्याला घेतला की, दारूबाजाला दारूनेच मेलें पाहिजे, शेवटचा विषासह दारूचा प्याला मग त्याच्या कपाळीचा सुटायचा नाही, असें तो आवर्जून सांगतो. सिंधूजवळ जाऊन विशुद्ध अंतःकरणाने तिच्या रक्ताला ओठ लावतो आणि रामलालला आपला म्हणून जगाला संदेश सांगायला सांगतो की "मुक्त कंठानं प्रत्येकाला सांग की, काय वाटेल तें पातक कर, पण दारू पिऊं नकोस."

पण असा दारूविषयी संदेश सांगणारा सुधाकर शेवटीं सिंधूच्या पायावर मस्तक ठेवतों आणि मग मरतो. त्याच्या त्या मरणाचा चटका आपलें सर्व अंतःकरण व्यापून राहतो; दारूच्या परिणामाचा नव्हे. दारूमध्ये थोड्याच वेळापूर्वी तळिरामही मेला होता. त्याच्या दारूबाज सवंगड्यांनी त्याच्या मृत्यूबद्दल बेताल बडबडही खूप केली होती. पण या प्रसंगाने ती बडबड आपण जणू ऐकलीच नाही, इतकी आपल्या चित्तावरून पुसून जाते आणि आपलें अंतःकरण जड होतें तें एका अभिमानी, बुद्धिमान, परंतु दुर्दैवाने व्यसनाधीन होऊन राक्षस बनलेल्या सहृदय कविप्रतिभेच्या माणसाच्या मृत्यूमुळे.

याही नाटकांत हवाबंद भेद नाहीत --

असें हें नाटक पाहिल्यानंतर या नाटकांतही निव्वळ देवहततेमुळे झालेली दुःखद परिणति किंवा निव्वळ स्वभावगत करुण विपाकाचें चित्र असा भेद पाडण्यासारखी अवस्था नाही हें सहज आढळून येईल. केवळ बाह्य परिस्थितीच्या परिणामाचें तर हें नाटक नाहीच; एवढेंच नव्हे तर बाह्य परिस्थितीच्या परिणामाचा त्यांत प्रमुख अंशही नाही. जेथे बाह्य परिस्थितीमुळे होणाऱ्या करुण विपाकावर नाटककाराचें जास्त लक्ष असतें तेथें स्वाभाविकच नायकाच्या मोठेपणाची पार्श्वभूमि अधिकाधिक प्रमाणांत व्यक्त करणें हें तंत्रदृष्ट्या अपरिहार्य होतें हें आपण पाहिलें आहे. तशी आवश्यकता या नाटकांत नसल्याने गडकऱ्यांनी सुधाकर हा कोणी महान पुरुष होता असें दाखविलेंच नाही. तो एक साधासुधा, तुमच्या आमच्यांतलाच माणूस आहे. त्याचें जीवन म्हणजे बाह्य विरोधी परिस्थितीशीं मोठा विशाल पौरुषार्थी झगडा, अशी परिस्थितीच या नाटकांत नाही. म्हणून अशा विशाल पौरुषार्थयुक्त श्रेष्ठतेची अपेक्षा सुधाकराच्या ठिकाणीं बाळगावयाची आणि तसा तो नाही म्हणून हें नाटक करुण विपाकाचें नाटक नाही असें म्हणावयाचें, म्हणजे जें मुळांतच नाटककाराच्या मनांत नाही तें त्याच्यापासून अपेक्षून त्याच्येावर वृथा अन्याय करण्यासारखें आहे.

दारूच्या नाटकाच्या पक्षपात्यांची उडालेली गडबड —

कारण या नाटकांतील बाह्य विरोधी परिस्थिति म्हणजे तरी काय? तर दारूचें व्यसन. सुधाकर दारूच्या व्यसनांत सापडला, दारुडा झाला, म्हणून त्याचा नाश झाला; त्यामुळे दारूच्या व्यसनाच्या परिणामाचें हें चित्र; त्यांत सुधाकराबद्दल हळहळ वाटावी

असें सुधाकराचें झगडणारें किंवा अन्य मोठेपण कांही नाही, असें कोणा कोणाचें म्हणणें. परंतु अशी भूमिका मांडणारांच्याहीपुढे, सुधाकराच्या स्वभावांतच असे कांही दोष होते की, त्यामुळे वास्तविक त्याचा संसार उध्वस्त झाला ही वस्तुस्थिति ठळकपणें उभी राहून, त्यांची गडबड उडविल्याशिवाय राहत नाही. एकच प्याला हें नाटक केवळ दारूचेंच नाटक आहे असा आग्रह धरणारेच मग, *

" बुद्धिमत्तेच्या तीव्र अभिमानामुळें बहुतांशीं बरोबरीच्या माणसांच्यासुद्धा हातांत हात मिळविण्याची ज्याने कधीच कदर केली नाही असा हा मनुष्य आपल्या अतिरिक्त मानीपणामुळे व तापटपणामुळे कांही तरी अनर्थ ओढवून घेणार हें त्याचा प्रथम परिचय झाल्याबरोबरच आपणास कळून चुकलें " असें अभावितपणें खरें लिहून जातात आणि एकांतिक पक्ष मांडण्याची भूमिका पत्करल्यामुळे सोयीस्करपणें एवढेंच विसरतात की " या माणसाचा घात त्याच्या तापटपणानेच होणार " हें ज्या वेळीं त्यांच्यासारख्यांनाही वाटते त्या प्रसंगीं एकच प्याला नाटकांतील पुढच्या दारूच्या प्रकरणाची अंधुकसुद्धा कल्पना नाटककाराने आपणाला दिलेली नसते.

एवढेंच नव्हे, तर सुधाकराची सनद जी गेली ती कांही दारूच्या व्यसनामुळे नव्हे. ती त्याच्या हटवादी अविवेकीपणामुळे गेली आणि " त्याच अविवेकीपणामुळे तो तडकाफडकी दारूच्या मोहाला बळीं पडतो " असें निदानही याच मंडळींना केल्यावाचून गत्यंतरच राहत नाही. सुधाकराचा अविवेकीपणा, तापटपणा या गोष्टी त्याच्या अधःपाताला कारण आहेत; दारू हें एक केवळ बाह्य चिन्ह आहे असा पक्ष मांडणारांचा अधिक्षेप करण्यासाठी बद्धपरिकर झालेल्यांनाच शेवटीं मान्य करावें लागतें की, " कदाचित दुसऱ्या एखाद्या प्रकारानें त्याचा अधःपात झाला असता. त्याचा तापटपणा लक्षांत घेतां त्या तापटपणांत त्याच्या हातून आणखी अविचार घडण्याचाच संभव अधिक होता व दारूच्या आहारीं न जातांही अशा अविचारपरंपरेमुळे त्याचा निश्चित घात झाला असता यांत शंका नाही. "

याचाच साधा, सरळ अर्थ एकच प्याला हें नाटक सुधाकराचें आहे, केवळ दारूच्या एकच प्याल्याचें नाही असा आहे. पण ही मंडळी विचारतात, " पण सुधाकराने दारूच प्यावी असा गडकऱ्यांचा आग्रह आहे त्याला काय करणार ? " आणि म्हणून आग्रह धरूं पाहतात की, हें नाटक दारूचें आहे, सुधाकराचें नाही.

दारूचे दुष्परिणाम दाखविण्यासाठी माध्यम नाटक —

गडकऱ्यांना दारूच्या व्यसनाचा भयंकर दुष्परिणाम दाखवावयाचा होता हें अर्थातच मान्य करायलाच हवें. पण हा दुष्परिणाम दाखविण्याचें त्यांचें माध्यम नाटक होतें हें विसरून चालणार नाही. ते एखादा प्रबंध लिहावयाला बसले नव्हते. अशा

---

* प्रा. वाळिंबे : सुधाकर की एकच प्याला, पृ. १७–१८–१९ व ५२

एखाद्या प्रबंधांतही शोभून दिसतील अशीं दारूच्या व्यसनाच्या निरनिराळ्या अवस्थांची व परिणामांची चिकित्सा करणारीं भाषणें त्यांनी सुधाकराच्या तोंडीं घातलीं आहेत हें खरें. पण तींही सुधाकराचीं भाषणें आहेत म्हणून त्यांना महत्त्व आहे; एखाद्या तत्त्व-चर्चाप्रधान निबंधाचीं अंगोपांगें म्हणून नव्हे हें विसरून चालणार नाही.

कार्यकारणभावाचें सामान्य सूत्र —

शिवाय निव्वळ दारूच्या परिणामाचे प्रसंग दाखवून गडकऱ्यांच्या बुद्धीचें समाधान होण्यासारखें नव्हतें. दारूचे दुष्परिणाम दाखविणें हा जसा त्यांचा निश्चित ज्ञात उद्देश होता, तसाच यांतच एखादें सर्वसामान्य मानवी जीवनाला लागू पडेल असें तत्व निगडित करण्याचाही त्यांचा ज्ञात हेतु आणि प्रयत्नही होता. निव्वळ प्रसंगवर्णनाने त्यांच्या बुद्धीचें समाधान होण्यासारखें नव्हतें. त्या प्रसंगांमध्ये कार्यकारणभावाचें एक सामान्य सूत्र त्यांना ठेवावयाचें होतें आणि त्यांत आपल्या प्रसंगांची गुंफण करायची होती.

हें सूत्र, ही तात्त्विक बैठक, त्यांनी 'मोहाचा पहिला प्रसंग टाळणें आवश्यक आहे' या स्वरूपांत पाहिली आणि आपल्या नाटकाची सगळी रचना या सूत्राशीं सुसंगत होईल अशी करण्याचा कटाक्ष बाळगला. याचमुळें नाटकाच्या नांवांतील चकार उद्भवला, म्हणूनच त्या चकाराचा पुन्हा पुन्हा उल्लेख त्यांनी केला. आपल्या नाटकांत दारूचें अगदी पहिलें दर्शन ते आपल्याला घडवितात तेंच मुळी तळिरामच्या, "म्हणे दारू सुटत नाही; एकदा घेतली म्हणजे सुटत नाही, म्हणे" या वाक्यांनी. व्यसनाचा, मोहाचा पहिला प्रसंग टाळला पाहिजे ही, गडकरी आपल्या मनाशीं बांधलेली तत्त्वाची पकड अशी अगदी सुरुवातीलाच स्पष्टपणें आपल्यापुढे व्यक्त करतात. दारूची सवय सुटण्याचा काळ ती सवय लागण्यापूर्वी, "दारूचा पहिला एकच प्याला," अशा रीतीच्या वाक्यांनी व शब्दांनी हा आपला तत्त्वविचार त्यांनी पुन्हापुन्हा व्यक्त केलेला नाटकांत आढळतो. चवथ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांत तर प्रत्यक्ष सुधाकराच्या तोंडींच गडकऱ्यांनी पुढील-प्रमाणे आपला विचार केवढ्या तळमळीने घातला आहे पाहा –

"रामलाल, एकच प्याला, एकच अनुभव, केवळ दारूपुरताच हा सिद्धांत मीं तुला सांगितला नाही. मोहाची जी जी वस्तु असेल, त्या प्रत्येकीच्या बाबतींत हाच सिद्धांत आहे."

उपकथानकाचें प्रयोजन —

या सिद्धांताची पकड गडकऱ्यांच्या मनावर होती म्हणून तर रामलाल आणि शरद् यांचें उपकथानक एकच प्याला नाटकांत समाविष्ट झालें. निव्वळ दारूचें नाटक लिहिण्याचा गडकऱ्यांचा अट्टाहास असता तर त्यांना या उपकथानकाचें प्रयोजन वाटलेंच नसतें. कारण शरद् किंवा रामलाल यांचा दारूच्या व्यसनाशीं दुरूनसुद्धा संबंध नाही.

अशा स्थितींत गडकऱ्यांनी स्वतः स्पष्टपणें आपल्या नाटकाची तात्त्विक भूमिका सर्व-सामान्य स्वरूपांत मांडली असतांना आणि तिच्याशीं सुसंगत असें स्त्रीस्पर्शाबद्दलचें एक उपकथानक स्वतःच्या नाटकांत त्यांनी घातलें असतां, त्यांना फक्त दारूचेंच, एकच प्याल्याचेंच नाटक लिहावयाचें होतें ही आपल्या मनची कल्पना गृहीत धरावयाची आणि या आपल्या कल्पनेशीं शरद-रामलाल यांचें उपकथानक विसंगत दिसतें, म्हणून तें एकच प्याला नाटकांत वांडगुळासारखें आहे असें म्हणावयाचें, एवढेंच नव्हे, तर तेवढ्यावरून गडकऱ्यांच्या नाट्यरचनाकौशल्याचाही अधिक्षेप करावयाचा, ही पद्धति नाटककारावर अन्याय करणारी, त्याच्या नाटकाची गैरवाजवी ओढाताण करणारी आणि टीकाकाराने जी भूमिका घेऊं नये ती घेणारी, अशा स्वरूपाची आहे. साहित्यनिर्मिति करणारा हा आपली जी सामग्री वापरतो तिच्यांत त्याचा कांहीतरी हेतु असतो. तो हेतु कोणता हें शोधून काढणें, तो समजून घेणें, त्या हेतूंशीं समरस होऊन त्याच्या कृतीचा, तिच्या निर्मितीचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करणें, ही वास्तविक रसिक टीकाकाराची भूमिका असावी. तिच्याऐवजी आपण कल्पिलेल्या एखाद्या सिद्धांताशीं साहित्यनिर्मात्याच्या कृतीभधील कांही भाग जुळते नाहींत म्हणून ते कापून काढावेत असें म्हणणें, म्हणजे त्या साहित्यकृतीच्या जिवंत एकसंधपणाचा असमर्थनीय भंग करण्या-सारखें आहे. टीकाकाराचें काम रसास्वादपूर्वक कोणत्याही साहित्यकृतीचें यथार्थदर्शन करणें हें असावें; तिची चीरफाड करून तिच्यावर शस्त्रक्रिया करून, तिच्यांतून स्वतःच्या कल्पनेनुसार नवीनच आकृति निर्मिण्याचें नसावें. बिचारा आधुनिक शस्त्रवैद्यसुद्धा असें हें काम फारच मर्यादित स्वरूपांत करूं शकतो. बहुतांशीं आहे तसाच मानव मान्य करूनच त्याला आपलीं हत्यारें चालवावीं लागतात. त्याच्याहीपेक्षा मोठा चीरफाडीचा अधिकार वाङ्मयटीकाकार बजावूं लागला म्हणजे त्याच्या अहंकाराची प्रस्तुत लेखकासारख्याला तरी कीव वाटते.

राजा लिअरशीं साम्य —

एखाद्या विशिष्ट सामान्य तत्त्वाचें दर्शन करविण्यासाटी आपण नाटकाची रचना करीत आहोंत ही जाणीव नाटककाराच्या ठिकाणीं जास्त स्पष्ट असली म्हणजे त्याला असें उपकथानक योजण्याची ओढ कशी उत्पन्न होतें, हें आपण शेक्सपीअरच्या राजा लिअर या नाटकांत पाहिलेंच आहे. त्या नाटकांत मुख्य कथा आहे खरोखर राजा लिअरची. पण पितृद्रोहाचें दर्शन करविण्याच्या कल्पनेपोटी शेक्सपीअरने त्या नाटकांत ग्लॉस्टर, एडमंड आणि एडगर यांचें एक केवढें मोठें व लिअरच्या कथेशीं कोठेच एकरूप न होतां, जवळजवळ समांतर रेषेंत चालणारें कथानक घातलें आहे हें आपण पाहिलें. त्या उपकथानकामुळे राजा लिअर नाटकाची एकरूप परिणामकारकता किंचित कमी होते हेंही आपण पाहिलें. परंतु त्यामुळें तें नाटक लिअरचें नाहीच, तर केवळ पितृद्रोह-दर्शनाचें तें नाटक आहे असें कांही आपण म्हणूं शकत नाही. या श्रेष्ठ नाटककाराच्या

हातून प्रमेयदर्शनाच्या जाणिवेने जें घडलें तेंच एकच प्याला नाटकांत गडकऱ्यांच्या हातून घडलें आहे, एवढेंच फार तर म्हणतां येईल.

आधी रससिद्धि – मग प्रमेय —

याच कारणाने बहुधा, प्रा. वाटवे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, (पाहा – प्रस्तावना : एकच प्याला की सुधाकर) एकच प्याला हें नाटक प्रमेयप्रधान की स्वभावरेखाप्रधान. प्रा. वाटव्यांनी, रसविमर्शासारखा सुंदर ग्रंथ लिहिणाऱ्या सहृदय रसिकांनी, असा प्रश्न उपस्थित करावा याचें आश्चर्य वाटतें. त्यांच्यासारख्यांनी तरी काव्य – साहित्य – त्यांतच नाटक हें सर्वश्रेष्ठ – हें मूलतः रसप्रधान आहे या गोष्टीची पकड सोडतां उपयोगी नाही. रस हा कथा आणि नाट्यवाङ्मयांत मुख्यतः व्यक्तिचित्रणांतून साधावयाचा असतो, साधारणीकरण नायकाशीं व्हावयाचें असतें, याकडे त्यांच्यासारख्यांची तरी डोळेझाक होऊं नये. रससाधनेनंतर आणि रससाधनेच्या साहाय्यानेच साहित्यनिर्मितिकार प्रमेयाच्या अनुसूचनाचें कार्य साधील – किंवा क्वचित साधारणा- रही नाही; त्याचा तो हेतूही नसूं शकेल. म्हणून प्रथम कलाकृति सिद्ध झाली पाहिजे, रसवत्ता निर्माण झाली पाहिजे. आणि नाटकांत – आपण पाहिलें त्याप्रमाणें करुण नाटकांत तर विशेषच – ही रसवत्ता नाटककार आपलें सर्व चित्त नायकाच्या स्वभाव- चित्रणावर केंद्रित करून साधीत असतो; नव्हे, ही गोष्ट अपरिहार्य आहे. कथानक व तेंही ज्या एका व्यक्तीच्या अंकित, ज्या व्यक्तीमुळे प्रभावित असतें, ती व्यक्ति या गोष्टी आपण पाहिलेल्या सर्व नाटकांमध्ये किती अपरिहार्यपणे व अविभाज्यपणें एकत्र असतात हें आतापर्यंत दाखविलें आहे. अशा या नायकाच्या रसपूर्ण करुण चित्रणांतून नाटककार नायकाच्या आणि आपल्याही मनाची विशुद्धता – समधातता साधीत जातो, त्यांतून व्यवहाराशीं असदृश आणि म्हणून अलौकिक अशा आनंदाची तो आपल्याला प्राप्ति करून देतो, हेंही आपण पाहिलें आहे. या आपल्या समधात अवस्थेंत एखाद्या तत्त्वाचा अनुबोध आपल्याला झाला तर त्याला तो नको असतो असें नाही; पण हा तत्त्वबोध करण्याचें त्याचें जें साधन असतें तें रसनिर्मिति हेंच असतें, हें प्रा. वाटव्यां- सारख्यांना तरी मान्य व्हायला हवें.

निव्वळ मोजदादीच्या हिशेबानेही लक्ष सर्व सुधाकरावर —

गडकरी दारूचें नाटक लिहित होते, किंवा मोहाचा पहिला क्षण टाळला पाहिजे, नाही तर मग मनुष्य नुसता पशु बनतो, या तत्त्वाचें प्रतिपादन करण्यासाठी त्यांनी नाटकाची उभारणी केली, हें म्हणत असतांना वरचा रसनिर्मितीचा मुद्दा डोळ्याआड करणें योग्य नाही. कारण, गडकरी एखादा प्रबंध लिहीत नव्हते; नाटक लिहीत होते. आणि या आपल्या नाटकांत त्यांचें लक्ष अगदी सुरुवातीपासून शेवटपर्यंत केवळ सुधाक- रावर कसें खिळून राहिलें आहे हें यापूर्वी आपण तपशीलवार पाहिलें आहे ? निव्वळ

मोजदादीच्या हिशेबाने पाहिलें तरी एकच प्याला नाटकांतील एकूण एकवीस प्रवेशांपैकी तेरा प्रवेश हे केवळ सुधाकरावर केंद्रित झालेले आहेत. उरलेल्या आठ प्रवेशांपैकी तिसऱ्या अंकांतील तिसरा प्रवेश शरद, रामलाल व भगीरथ यांच्या उपकथानकाशीं संलग्न असला तरी त्याच्यावर सुधाकराची दाट छाया आहेच. चवथ्या अंकांतील पहिला प्रवेश मात्र रामलालच्या मनांतील शरद्विषयीच्या आसक्तीबद्दलचा आहे. त्याच्यावर सुधाकराची छाया नाही हें खरें आहे. पण दारूच्या व्यसनाच्या परिणामांशींही त्याचा संबंध नाही. पाचव्या अंकांतील पहिला आणि तिसरा प्रवेश या दोन्ही प्रवेशांची गत तीच आहे. त्यांच्यावर सुधाकराची छाया नाही. पण दारूचाही त्यांत कसला संबंध नाही. शरद् आणि रामलाल यांचें जें उपकथानक स्वतःच्या जाणिवेंतील तत्त्वप्रतिपादनाच्या रोखाने गडकऱ्यांनी निर्माण केलें त्याची कांहीशी उकल करण्यासाठीच त्या प्रवेशांची योजना आहे.

मग राहिले चार प्रवेश. त्यामध्ये पहिल्या अंकांतील दुसरा प्रवेश तळिराम, गीता, भगीरथ यांची ओळख करून देणारा प्रवेश आहे. त्यांत दारू सुटत नाही म्हणे, या दारूच्या – म्हणजेच व्यसनाच्या पहिल्या पकडीच्या धोक्याची कल्पना गडकऱ्यांनी प्रथम मांडली आहे. तरी पण एका तल्लख बुद्धीच्या दारुड्याच्या उजाड संसाराचें चित्र त्यामध्ये दाखविलेलें आहे व त्या दृष्टीने या प्रवेशाचा संबंध मुख्यतः दारूच्या व्यसनाशीं आहे हें स्पष्ट आहे. पहिल्या अंकाचा चवथा प्रवेशही असाच दारूच्या व्यसनाशीं निगडित आहे. परंतु हा एक अगदीच छोटेखानी प्रवेश आहे; आणि त्यावर हा सुधाकराची छाया चांगलीच गडद आहे.

उरलेल्या दोन प्रवेशांपैकी तिसऱ्या अंकाचा दुसरा प्रवेश हा फक्त दीडपानी असून त्यामध्ये दारूबाज तळिराम गीतेला घराबाहेर हकलून देण्याचा प्रयत्न करतो व गीतेला घरांत राहणें नकोसें वाटूं लागतें हा प्रसंग आहे. त्यामध्ये दारूबाजाच्या उजाड संसाराचें ओझरतें दर्शन आपल्याला होतें हें खरें; परंतु परिणामकारकतेच्या दृष्टीने हा प्रवेश अगदीच तोटका ठरतो.

शेवटीं राहिला फक्त पांचव्या अंकांतील दुसरा प्रवेश आणि चवथ्या अंकांतील चवथ्या प्रवेशाचा अर्धा भाग. पैकी चवथ्या अंकांतील चवथ्या प्रवेशांत आपल्यापुढे दारूबाजांचा अड्डा आहे हें स्पष्ट आहे. परंतु त्यामध्ये दारूबाजांच्या दारूच्या गोंधळापेक्षा डॉक्टर आणि वैद्य यांच्याविषयीच्या निव्वळ उपरोधिक आणि नाट्यवस्तूशीं दूरतःही संबंध नसणाऱ्या विनोदाचाच सगळा पसारा आहे. एवढेंच नव्हे, तर हा सगळा पसाराही पुढच्या सुधाकराच्या दारूविषयीच्या दारूण संभाषणांची पार्श्वभूमि म्हणूनच मुख्यतः उपयोगांत आणलेला आहे. म्हणजे पाचव्या अंकांतील दुसरा प्रवेश हाच तेवढा एक असा आहे की, ज्याच्यावर सुधाकराची दुरून सुद्धा छाया नाही. तो तळिरामाच्या मृत्यूचा प्रवेश आहे व दारूबाजांच्या विचकट बडबडीशिवाय त्यांत दुसरें कांही नाही. निव्वळ दारूशीं ज्याचा संबंध आहे असा हा एकच भला मोठा प्रवेश आणि तोही

नाटक अगदी संपत आल्यावेळीं गडकऱ्यांनी घालावा याबद्दल उलट असमाधानच वाटल्यावांचून राहत नाही. म्हणूनच गडकऱ्यांचा विनोद या आपल्या निबंधांत प्रस्तुत लेखकाने लिहिलें,

"सुधाकराने या प्रवेशांत (अंक ४ प्रवेश ४) शेवटीं आपली मद्या केलेली दारू पिण्याची प्रतिज्ञा पार पाडली. आणि रामलालसुद्धा त्याच्या वाक्प्रवाहापुढे हतबुद्ध होऊन गेला. गडकऱ्यांच्या दृष्टीने नाटकाचें रहस्यही त्यांनी या ठिकाणीं सांगून टाकलें. दारूने होणाऱ्या मानवतेच्या हानीची ओळख येथे वाचकांना पुरी पटली. तथापि अंक ५ प्रवेश २ मध्ये तळिरामाच्या घरीं पुन्हा मजलस आहेच! तिजमध्ये तर हवी त्याची घोर हेटाळणी चालू असून संविधानकाच्या स्वाभाविक द्रुत गतीला संपूर्ण अटकाव या ठिकाणीं झाला आहे."

सुधाकराचा प्रत्यक्ष संबंध ज्यांत नाही अशा या आठ प्रवेशांत चार प्रवेश शरद–रामलाल प्रकरणाचे आहेत. बाकीच्या चार प्रवेशांचाच संबंध प्रत्यक्ष दारूशीं आहे. त्यांतही एकावर सुधाकराची गडद छाया आहे; एक प्रस्तावनेच्या स्वरूपाचा आहे; एकांत दीड पानांतच, पण दारुड्याच्या उजाड संसाराचें परिणामकारक चित्र दाखविलें आहे. आणि राहिलेला जो पांचव्या अंकांतील दुसरा, नाटकाच्या गतीला विनाकारण अटकाव करणारा प्रवेश, त्यामध्ये दारूड्यांची टवाळीची बडबड मात्र आहे. या बडबडींतून दारूच्या दुष्परिणामाचें परिणामकारक चित्र गडकऱ्यांना वठवायचें होतें असें म्हणणें त्यांच्यावरच अन्याय करण्यासारखें होईल.

गडकऱ्यांना दारूबद्दल लिहावयाचें होतें, पण—

पण मग गडकऱ्यांना दारूबद्दल लिहावयाचेंच नव्हतें काय? असा कांही प्रस्तुत लेखकाच्या म्हणण्याचा आशय नाही. गडकऱ्यांना नाटक दारूबाजाचेंच लिहावयाचें होतें. पण हा दारूबाज त्यांच्यापुढे तळिराम किंवा त्याचे साथीदार यांच्या स्वरूपांत नव्हता. तर सुधाकराच्या रूपाने तो त्यांच्यापुढे उभा होता. दारूबाजाने – नव्हे, प्रत्येक व्यसनी माणसाने – दारूचा – व्यसनाचा – पहिला मोहाचा क्षण टाळला पाहिजे; तो क्षण त्याने चुकविला आणि तो व्यसनाला बळी पडला की त्याचा संपूर्ण अधःपातच व्हावयाचा, हें तत्त्वही गडकऱ्यांना निदर्शित करायचें होतें. पण तेंही तळिरामाच्या अधःपातापासून नव्हे, तर सुधाकराच्या अधःपतनांतून. तळिरामाचा उजाड झालेला संसार त्यांनी दाखविला आहे. परंतु त्यांत तळिरामावर आपलें चित्त खिळून राहावें, असा एवढासुद्धा प्रयत्न त्यांनी केलेला नाही. मग त्याच्याविषयी हळहळ वाटविण्याचा प्रयत्न तर दूरच. उलट एक प्रकारची घृणाच वाटावी त्याच्याबद्दल, असेंच त्याचें आणि त्याच्या आर्यमदिरामंडळांतील सदस्यांचें चित्रण त्यांनी केलें आहे.

सुधाकराबद्दल हळहळ उपन्न करायची होती —

गडकरी नाटक लिहीत होते. त्या नाटकाचा नायक त्यांनी सुधाकर हा कल्पिला

होता. या नायकाचें चित्रण त्यांना प्रामुख्याने करावयाचें होतें. आणि तेंच त्यांनी केलें आहे. या आपल्या नायकाबद्दल प्रेक्षक – श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या मनांत हेटाळणी तर दूरच राहो, पण नुसती उदासीनताही त्यांना उत्पन्न करावयाची नाही. त्याच्याबद्दल जिव्हाळा वाटावा, त्याच्यासारख्या माणसाला पहिला पेला टाळतां येऊं नये आणि त्या व्यसनांत सापडून त्याचा संसार सर्वस्वी विसकटून जावा, स्वतःच्या पत्नीचा आणि मुलाचा आणि अंतीं स्वतःचाही घात त्याच्या हातून व्हावा, त्याच्या अंगचे गुण मातीमोल व्हावे, व त्याबद्दल आपल्याला हळहळ वाटावी, हें चित्रण करावयाचें होतें; आणि तें त्यांनी किती प्रभावीपणें केलें आहे हें आपण पाहिजे.

कलावंत या नात्याने सर्व लक्ष सुधाकरावर—

ज्ञात उद्देश कांही असला तरी कलावंत या नात्याने गडकऱ्यांचें सर्व लक्ष सुधाकरावर केंद्रित होणें अपरिहार्य होतें. नाटकाची एकंदर उभारणी पाहतां, त्यांनी हें स्वभावचित्रणाचें कार्य चांगलें जाणीवपूर्वक केलें आहे, असेंच दिसतें. पहिल्याच अंकांत आपलें सर्व लक्ष त्यांनी सुधाकरावर किती कौशल्याने खिळविलें आहे. पहिल्या प्रवेशांत रामलाल किंवा सिंधू या दोघांचाही सगळा प्रयत्न आम्हांला सुधाकराचेंच संपूर्ण दर्शन करविण्याचा आहे. स्वावलंबनाने उच्च पदवीला चढलेला सुधाकर, नावालौकिकाला चढलेला उग्र, मानी, तरुण, ज्याच्या बुद्धिमत्तेबद्दल समवयस्कांतच केवळ नव्हे, तर ज्येष्ठ वयाच्या माणसांतही मत्सर, हेवा आणि चीड निर्माण झालेली आहे, असा सुधाकर गडकऱ्यांनी सुरुवातीलाच आपल्यापुढे अगदी एवढ्या साक्षेपाने उभा केला आहे, तो उगीचच काय ? त्याची कल्पनाशक्ति कशी तरल आहे, स्वभाव किती मनमोकळा, विनोदशील आणि काव्यप्रेमी आहे याचें तर प्रत्यक्षच दर्शन – नुसतें कथन नव्हे– पहिल्या आणि तिसऱ्या प्रवेशांत आपल्याला घडतें. म्हणजे गडकरी जसे कांही कांही सुधाकराचे गुणविशेष रामलाल किंवा सिंधू यांच्या तोंडून व्यक्त करतात, तसेच त्याचे कांही गुण – आणि हे गुण सहृदय माणसाला केव्हाहि आदरणीय आणि आकर्षक वाटण्यासारखेच आहेत – गडकरी प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखवून राहिले आहेत. प्रा. वाटवे यांना सुद्धा सुधाकर हा एक मानी, सद्गुणी, बुद्धिमान व सरळ पुरुष आहे हें मान्य करावेंच लागलें आहे. नव्हे, त्याचा उल्लेख प्रा. वाटवे यांनी 'नररत्न' असा केला आहे. अशा नररत्नाचा अधःपात गडकऱ्यांना दाखवावयाचा होता हें त्यांनाही मान्य करावें लागलें आहे. अशा स्थितींत सुधाकराचें हें मोठेपण, नररत्नपण आम्हांला गडकरी यांनी नाटकांत दाखविलेंच नाही असें प्रतिपादन करणारांच्या भूमिकेस दुजोरा द्यायला प्रा. वाटवे यांनी सिद्ध व्हावें याचें सखेद आश्चर्य वाटतें.

दारूबाज सुधाकरही गुणी राहतो —

असा हा सुधाकर दारूबाज झाल्यावरही त्याचे हे सारेच गुण सर्वथा लोप पावतात

असेंही नव्हे. असें होणें हीसुद्धा त्याची करुण कहाणीच झाली असती. पण सर्वथा तसें झालें नाही. मोहापासून सुटण्याची त्याची प्रामाणिक इच्छा कायम राहिली. हें प्रा. वाटव्यांना त्याचें जें दर्शन झालें आहे तेंच तर त्याच्याविषयी आपल्याला हळहळ वाटविणारें केवढें मोठें तरी कारण आहे. त्याचमुळे मॅकबेथसारख्या खुनी माणसाबद्दलसुद्धा थोडीशी हळहळ वाटलेली आपण पाहिली. त्याच्या तुलनेने सुधाकर खास आपल्या करुणेला केव्हाही अधिक पात्र असा गडकऱ्यांनी दाखविलेला आहे.

दारूबाजांच्या अड्ड्यांतही सुधाकराचें वेगळेंपण —

त्याच्या बुद्धिमत्तेमुळे, त्याच्या काव्यप्रकृतीमुळे, तरल कल्पनाशक्तीमुळे नव्हे, तर त्याच्या या मोहाच्या, व्यसनाच्या पकडींतून सुटण्याच्या तीव्र प्रामाणिक इच्छेमुळे, सुधाकर आपल्या जोडीदार दारूबाजांपेक्षा सर्व नाटकभर किती वेगळा दिसतो हें आपण चांगलें पाहिलें आहे. दारूबाजांच्या अड्ड्यांत सुधाकर एवढा वेगळा दाखविण्याचा प्रयत्न गडकरी करून राहिले आहेत, याचा अर्थच त्यांचें लक्ष सुधाकराच्या चित्रणावरच विशेष आहे असा नव्हे काय ?

तळिरामानेसुद्धा सुधाकराचे गुण कसे चांगले ओळखलेले आहेत हें आपण पाहिलें आहे. सुधाकराच्या रसवन्तीचा आवेश आहे तो काव्यप्रतिभेच्या उत्कटत्वाचा निदर्शक आहे. शेक्सपीअरच्या बहुतेक करुण नायकांच्या ठिकाणीं हीच काव्यप्रतिभा आपण अनुभवली आहे.

सुधाकराची सहृदयता आणि शुद्धबुद्धि —

याहूनही विशेष म्हणजे दारूच्या आहारीं पूर्णपणें गेला असूनही सुधाकर मुर्दाड बनलेला असा गडकरी यांनी दाखविला नाही. गीतेच्या शब्दांच्या माऱ्याने त्याची सद्भावना ढवळून निघावी इतकी त्याची शुद्धबुद्धि चांगली शाबूत आहे. एवढेंच नव्हे, तर जागृत आणि प्रभावी झालेल्या या त्याच्या बुद्धीचें चीज होण्याजोगी बाह्य सामाजिक परिस्थिति आणि स्वभावाची अनुकूलता त्याला लाभती तर तो परत दारूकडे वळला नसताही. दारूच्या पहिल्या मोहाचा क्षण टाळतां न आलेला भगीरथ दारूपासून परावृत्त होऊं शकतो हें दृश्य गडकरी यांनीच दाखविलेलें आहे हें या बाबतींत मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सुधाकराच्या प्रेमाबद्दल सिंधूचा विश्वास —

गडकऱ्यांचें लक्ष सुधाकराचें श्रेष्ठत्व दाखविण्याकडे विशेष होतें याचें एक मोठें प्रत्यंतर म्हणजे सिंधूचें सुधाकरावर अत्यंत निर्मळ आणि कोणत्याही परिस्थितींत न ढळणारें प्रेम होतें हें आहे. या प्रेमाचें कारण केवळ सिंधूची जुनी आर्य स्त्रियांची भोळी, भाविक सोशिक वृत्ति असें गडकऱ्यांनी दाखविलेलें नाही. आर्य स्त्रियांतच प्रेम

संन्यासांतील मथुरा आणि या नाटकांतील गीता यांच्यासारख्या स्त्रिया असूं शकतात हें कांही गडकऱ्यांना ठाऊक नव्हतें असें थोडेंच आहे. तरीही सिंधूच्या मनांत सुधाकराबद्दल या दोघींप्रमाणे तिटकारा माजला नाही याचें कारण सिंधूचें सुधाकरावरचें नितांत प्रेम. हें तिचें प्रेम निव्वळ आंधळ्या श्रद्धामयतेच्या पोटीं निर्माण झालेलें प्रेम नाही. तिसऱ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांत सिंधूचे उद्गार पुढीलप्रमाणे आहेत —

"इकडची अशी अवस्था झालेली, घरांत हा प्रकार; आतां तर डोळ्यांत तेल घालून मला बसायला पाहिजे. मला कांही वेडंवाकडं झालं असतं तर इकडून मला टाकणं झालं असतं का? माझ्याकरिता आकाशपाताळ एक करायचं झालं नसतं का?"

अशी श्रद्धा डेस्डेमोनाची तरी होती का? —

या तिच्या भावनेंत तिचें प्रेमच केवळ नव्हे, तर सुधाकराच्या तिच्यावरच्या प्रेमाबद्दलची तिची नितांत श्रद्धा किती उज्ज्वलपणाने व्यक्त होते. सुधाकराबद्दल तिचा हा मनापासूनचा विश्वास हाच सुधाकराच्या श्रेष्ठपणाचा केवढा तरी मोठा पुरावा आपल्याला गडकऱ्यांनी दिला आहे. डेस्डेमोना आणि सिंधू यांच्यामध्ये निर्व्याज निर्मळतेच्या बाबतींत रेसभरही कमीजास्त पाहण्यासारखें नाही. परंतु अखेरी अखेरीस ऑथेल्लोबद्दल डेस्डेमोनाच्या मनांत इतकी श्रद्धा शिल्लक राहिलेली दिसली नाही. आपल्या प्रेमामुळे शेवटच्या क्षणीं तिनेही ऑथेल्लोवर आपल्या वधाचा आरोप येऊं नये म्हणून खटपट केली. यांत तिचें मनाचें मोठेपण सिंधूशीं तुलना करतां लवभरही उणें नाही. तरीपण सिंधूची सुधाकराच्या प्रेमाबद्दल जी खात्री आहे ती डेस्डेमोनाहून आगळी आणि प्रत्ययाधिष्ठित आहे. सिंधूसारख्या निष्पाप स्त्रीच्या मनांत स्वतःबद्दल एवढी निष्ठा निर्माण करणारी व्यक्ति कोणी अगदीच सामान्य व्यक्ति होती असें म्हणतां यावयाचें नाही.

अशा या सुधाकराचेंच एकच प्याला हें नाटक आहे. तें नाटक दारूबाज तळिरामाचें नाही; दारू सोडणाऱ्या भगीरथाचें नाही; मोहाला बळी पडूं शकणाऱ्या रामलालचे नाही; एवढेंच नव्हे, तर सिंधूचेंही नाही. साऱ्या नाटकांत सिंधू, गडकरी यांनी जी दाखविली आहे, ती सुधाकराची छाया म्हणून दाखविली आहे. सुधाकराच्या स्वभावाबद्दल साक्षेपाने सर्व बाजूंनी लिहून त्यांनी आपलें लक्ष जसें सुधाकरावर खिळविलेलें आहे, तसें तिच्यावर खिळविलेलें नाही. सिंधू आणि गीता यांच्यामधील अत्यंत कारुण्योत्पादक संवादाच्या प्रसंगांत सिंधूच्या हृदयांतलें श्रेष्ठत्व आणि तिच्या विपन्नावस्थेचें दर्शन जें गडकऱ्यांनी घडविलें आहे तेंसुद्धा त्या पार्श्वभूमीवर सुधाकराच्या त्यामुळेच झालेल्या पश्चातापानंतरही घडून आलेल्या पतनाचें चित्र अत्यंत उठावाने आपल्याला दिसावें म्हणून, त्यामुळे सुधाकराच्या चित्ताची विशुद्धता आपल्या प्रत्ययाला यावी म्हणून.

सुधाकराच्या दोषांवर मुद्दाम बोट ठेवलें आहे —

अशा या सुधाकराला दारूच्या व्यसनांत बुडवून गडकऱ्यांनी त्याचा संसार उध्वस्त झालेला दाखविला आहे हें तर खरेंच आहे. परंतु एवढेंच दाखवून गडकरी थांबलेले नाहींत हें मुद्दाम लक्षांत घ्यायला हवें. सुधाकर कांही सर्वगुणसंपन्न होता असें गडकऱ्यांनी दाखविलेलें नाही. त्याच्या अधःपाताला कारण होण्याजोगे एकदोन दोष त्याच्या ठिकाणीं होते हें गडकऱ्यांनी सुरुवातीलाच स्पष्टपणें सांगितलें आहे. तिकडे टीकाकारांचें दुर्लक्ष होतें याचें नवल वाटतें.

स्वावलंबनाने नांवलौकिकाला चढल्यामुळे सुधाकराचा मानीपणाचा गुण अतिरेकास जाऊन त्याचें दोषांत रूपांतर झाल्याचा धोका स्वतः रामलालच्या तोंडून गडकऱ्यांनी मुद्दाम पहिल्याच प्रवेशांत कटाक्षाने वदविला आहे. हा मानीपणा आता इतका उग्र झाला होता की, तो सुधाकराच्या चांगल्या मित्रांनासुद्धा असह्य व्हावा. मानी-पणाच्या भरीला आत्मविश्वासाची अतिरेकी उग्रता हेंही एक सुधाकराच्या अधःपाताला कारण होण्याची भीति रामलालने हेरलेली आपण पाहतों. आणि अतिरेकाने दोष-स्वरूप झालेल्या या त्याच्या दोन्ही गुणांच्या जोडीला सुधाकराचा स्वभाव इतका तापट होता की, त्यामुळे त्याचा केव्हा तोल जाईल हें सांगतां येण्यासारखें नव्हतें. म्हणूनच "रागाच्या ऐन भरांत त्याचा तोल सांभाळणारा कोणी तरी जिव्हाळ्याचा मनुष्य सध्या नेहमी त्याच्याजवळ असायला पाहिजे" हें सुधाकराचें नाजुक वर्म, गडकऱ्यांनी रामलालच्या तोंडून आम्हांला आवर्जून सांगून ठेवलें आहे, तें कांही उगीच नव्हे. स्वतः सिंधूलाही त्याच्या या मर्मस्थानाची जाणीव आहे आणि म्हणूनच "माझ्या जिवाला अगदी टांगल्यासारखं होईल. इथं एकटं राहायचं" अशी तिच्या मनांतली काळजीची जाणीव तिसऱ्या प्रवेशांत गडकऱ्यांनी दाखविलेली आपण पाहतों.

अधःपाताची पूर्वतयारी आणि तिचा परिणाम —

ही एवढी तयारी जी गडकरी करून राहिले आहेत ती कांही अगदी उगीचच नव्हे. कारण सुधाकराच्या अधःपाताची सुरुवातही या त्याच्या अतिरिक्त मानी, उग्र, तामसीपणामुळेच झाली असेंही गडकऱ्यांनी दाखविलेलें आहे. त्याची सनद प्रथम सहा महिने रद्द झाली ती कांही तो दारूबाज होता म्हणून नव्हे, हें पुष्कळजण विसर-तातसें दिसतें. मुळांतच सुधाकराचा स्वभाव कितीही चांगला असला तरी त्याला तापटपणाचा दोष चिकटलेला आहे हें निदान तळिरामाचेंसुद्धा आहे. अशा त्याला अलीकडे शत्रूच होत चालले होते. कारण, तळिरामानेच म्हटल्याप्रमाणे, "एखाद्याचं नव्यानं नांव होऊं लागलं म्हणजे सारा गांव त्याच्या वाईटावर असतो. आमच्या दादा-साहेबाचं बरं इथं कोणालाही बघवत नाही. चारचौघांनी चहूकडून चाव-चाव केल्यामुळं चिडल्यासारखे झालेले!"

ज्या दत्ताला रामलाल आणि सिंधू दोघें भीत होतीं तेंच नेमकें अशा रीतीने घडून आलेलें होतें. तोल सांभाळायला जिवाभावाचें जवळ कोणी न राहिल्यामुळे सुधाकराचा ताठपणा वाढतच चालला होता. त्याच्या उग्रपणामुळे आणि सहजी यशस्वीपणामुळे दंशित झालेले त्याचें अकारणशत्रू त्याच्याविरुद्ध चावचाव करीत असतांना, त्याचें शांतवन करायला कोणी नसल्यामुळे तो अधिकाधिक चिडून जात होता. या अवस्थेंत तो असतांना सनद जाण्याच्या वेळचा कोर्टांतला तो प्रसंग घडला. त्याचें वर्णन तळिरामने असें केलें आहे –

" कुठल्याशा मुद्यावर त्याचं म्हणणं मुन्सफांना पटेना; दादासाहेबांनी नीट समजावून द्यायला पाहिजे होतं. पण नव्या दमांत एवढा पोच कोठून राहणार? हें रागारागानं बोलूं लागले. चारचौघांनी हसून हेटाळणी करायला सुरुवात केली. झालं. दादासाहेबांचा सुमार सुटला. अन् मुन्सफाला होय नव्हे, वाटेल तें बोलूं लागले. तेव्हा मुन्सफांना असं करणं भाग झालं. तरी बरं, म्हातारा पुष्कळ पोक्त; म्हणून सहा महिन्यांच्या मुदतीपुरतीच त्यानं सनद रद्द केली. दुसरा कोणी– अहो, मी असतों तरीसुद्धा जन्माचं संसारांतून उठवलं असतं! हा एवढा प्रकार झाल्यावर मग काय! ज्यानं त्यानं दादादासाहेबांची तोंडावर हेटाळणी करायला सुरुवात केली. त्या बिचाऱ्याला मरणापेक्षा अपेश खोटं असं होऊन गेलं."

हें सर्व झालें त्या वेळीं कांही सुधाकर दारू पिणारा नव्हता हें सोयिस्करपणें दृष्टिआड केलें जातें. सुधाकराच्या स्वाभिमानाचा अतिरेकी आततायीपणा तो दारू पिण्याला लागण्यापूर्वीच इतक्या कळसाला गेला होता की, तळिरामाने म्हटल्याप्रमाणे त्याला मुन्सफाने कायमचा तो संसारांतून उठावा अशी शिक्षा द्यावी हें योग्य झालें असतें.

दारू अधःपाताचें कारण नव्हे, परिणाम आहे —

सुधाकराच्या संसारांत हें जें संकट उभें राहिलें, नुसतें द्रव्यनाशाचें नव्हे, तर संभावितला मरणापेक्षाही जिचें दुःख अधिक वाटतें त्या अकीर्तीचें, तें संकट दारूमुळे आलेलें नाही; तें केवळ त्याच्या स्वभावदोषामुळे आलेलें आहे. दारू हें त्याच्या अधःपाताचें मूलकारण नाही; तर त्याच्या अधःपाताचा दारू हा एक परिणाम आहे हें यावरून किती स्पष्ट दिसण्यासारखें आहे. एकदा दारू घेऊं लागल्यावर सुधाकराचा अधःपात शतमुखाने होऊं लागला हें उघडच आहे. पण मुळांत तो दारू घेऊं लागला याचें कारण त्याच्या स्वभावदोषांमुळे त्याच्यावर आलेला मरणापेक्षाही वाईट वाटणारा अपमानाचा प्रसंग हें आहे.

अभिमानामुळेच सुधाकर सिंधूकडे जात नाही —

रामलालला भय होतें त्याप्रमाणे नेमका सुधाकराचा हा उग्र स्वाभिमान आणि तापटपणा हाच त्याला नडला. आणि त्याचें दुर्दैव असें की, नेमकी याच वेळीं त्याला

धीर देणारी, देऊं शकली असती कदाचित अशी, सिंधू त्याच्याजवळ नव्हती. अर्थात तिच्याकडे त्याला जातां आलें असतें. पण येथेही त्याचा स्वाभिमान – अतिरेकी, अहंकारी मानीपणाच त्याच्या आड आला असणार. अशा स्वभावाच्या माणसांना आपल्या अपमानाच्या वेळीं आपल्या खऱ्या हितचिंतकांपुढे मन मोकळें करणें हें नेमकें अपमानास्पद आणि म्हणून अतिशय अवघड वाटतें. म्हणून सिंधूच्या माहेरीं, मेहुणा आणि सासरा यांच्याकडे, आश्रयासाठी नव्हे, तर मनाच्या समाधानासाठी त्याने जाणें हें त्याच्या स्वभावाच्या घडणीप्रमाणेच अशक्य होतें.

तळिरामाचा उद्देश सुधाकराचा नाश करण्याचा नाहीच —

सुधाकराचें दुसरें दुर्दैव असें की, नेमका याच वेळीं त्याला तळिरामासारखा व्यसन-प्रवर्तक मिळाला. तळिरामाने सुधाकराच्या असा नाश करायला कां प्रवृत्त व्हावें? असा प्रश्न उपस्थित करण्यांत आला आहे. परंतु तळिराम सुधाकराला संसारांतून उठविण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी त्याला दारूचें व्यसन लावीत आहे ही कल्पनाच मुळी खरी नाही. तळिरामाला हें मान्यच नाही की, दारुमुळे संसाराचा नाश होतो. तो तर आर्यमदिरामंडळ स्थापून दारूच्या व्यसनाला प्रतिष्ठितपणा आणून देण्याला बद्धपरिकर झालेला एक तल्लख बुद्धीचा दारूबाज होता. दारू पीत असूनही त्याचा वकिलाच्या कारकुनाचा व्यवसाय यथायोग्य चालत होता. त्याचे इतर जे सोबती होते, त्यांचेही व्यवसाय कांहीं दारू पिण्यामुळे उध्वस्त झालेले नव्हते. तेव्हा दारूची चटक सुधाकराला लावल्यामुळे आपण सुधाकराचा कांही मोठा विनाश ओढवून घेत आहोंत अशी कल्पना तळिरामाला असण्याचें कारणच नव्हतें. तशा दुष्ट बुद्धीने त्याने ही सूचना सुधाकराला केलीच नव्हती.

तळिरामाचा हेतु अगदी स्पष्ट आहे. आर्यमदिरामंडळाला एक चांगला प्रतिष्ठित सभासद मिळेल, त्यामुळे मंडळाचें यश वाढेल; नुसतें यशच नव्हे, तर द्रव्यही; कारण सुधाकर हा एक यशस्वी वकील होता. आणि शिवाय त्याच्या सासऱ्याकडून पैसा मिळविण्याचीही त्याला चांगली शक्यता होती. आपण स्वतः नाही दारूच्या व्यसनापायी घर धुऊन टाकलें! प्रत्यक्ष बायकोच्या गळ्यांतील मण्यालाही हात घालायला कमी केलें नाही! तसेंच सुधाकरही करील, ही तळिरामाची कल्पना. सनद गेली तरी सिंधू माहेराहून पैसा आणीतच राहील आणि मग आर्यमदिरामंडळाची, निदान आपली स्वतःची तरी दारू मिळण्याची चांगली सोय होईल, एवढी खूणगाठ बांधण्याइतकी तल्लख स्वार्थदर्शी बुद्धिमत्ता तळिरामाजवळ खास होती. दारूबाज द्रव्यासाठी कोणाजवळही हात पसरूं शकतो, हें त्याचें स्वानुभवावरून निदान असलें पाहिजे. कितीएक चांगले वकील दारू पचवूनही यशस्वीपणाने वकिली करीत असलेले त्याने पाहिलेले असतील. तसेंच सुधाकराचेंही चांगलें चालायला कांही हरकत पडणार नाही असाच त्याचा कयास असला पाहिजे.

पण सुधाकर दारू पचवूं शकत नाही —

तळिरामाचें आणि सुधाकराचेंही दुर्दैव की, सुधाकर असा बेडरपणें दारू पचवून संभावितपणें वागणारा होऊं शकला नाही. दारू पिऊं लागल्यावर त्याचा मूळचा अहंकारी उग्रपणा अधिकच कळसाला पोचला; अविवेकी उतावीळपणांत त्याचें रूपांतर झालें. दारू पचवून संभावित दारूबाज तो होऊं शकला नाही या सुधाकराच्या स्वभाववैशिष्ट्यामुळें त्याच्या चांगुलपणाबद्दल आदरच वाटावा. पण त्याचमुळे त्याला संसारांतून उठण्याची पाळी आली.

कारण, मुद्दाम दारू पिऊन तो कोर्टांत गेला याचें कारण तो दारूबाज झाला होता हें मुळीच नव्हे. तर त्याच्या अहंकार कमी न होतां वाढलाच होता. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे की, दारूचा पहिला प्याला घेतांनासुद्धा तो सुधाकराने या आपल्या अहंकाराच्या दर्पानेच घेतला होता. "एवढीशी दारू घेतल्यामुळे दारूची कायमची सवय लागेल" ही कल्पना आपल्या बाबतींत नादानपणाची होय असा सुधाकराचा अहंभाव होता. या अहंभावनेचेंच रूपांतर त्याच्या गैरहिशेबी हिंमतबाजीच्या आक्रस्ताळेपणांत होतें. यांतूनच, कोर्टांत जाऊन, भर कचेरींत निंदकांची खेटरांनी पूजा करण्याची त्याची भाषा निघते; यांतूनच दारू पिऊन कोर्टांत जाण्याचा बूट कायम होतो. आणि यांतूनच सुधाकराची सनद कायमची जाते.

सुटकेच्या वाटाही अभिमानामुळे बंद —

असा हा खरोखर सुधाकराच्या स्वभावदोषामुळे घडून आलेल्या अधःपतनाचा इतिहास आहे. याच स्वभावदोषामुळे या अधःपतनाच्या अंतिम टोकाला जाणें सुधाकराने अपरिहार्य करून टाकलें आहे. नाहीपेक्षा अशक्य वाटणारी गोष्टसुद्धा त्याच्या बाबतींत प्रत्यक्षांत घडली होती; त्याने दारू सोडली होती. सिंधूच्या त्यागाची थोरवी उमगून तिच्या त्याच्या प्रेमाला नवीन सात्विक रंग चढण्याची संधि त्याला मिळाली होती. आता फक्त जगांत समाधानाने जगण्यापुरती मीठभाकर त्याला हवी होती. तो व्यवसाय अशा प्रकारचा शिकलेला होता की, इतर ठिकाणीं त्याचा नोकरीच्या दृष्टीने उपयोग होणें थोडेंसें अवघड होतें. शिवाय त्याचा दारूबाजपणा आणि त्याहीपेक्षा जाहीर झालेला त्याचा तापट, भांडकुदळ स्वभाव, या अडचणी खरोखरच दुस्तर होत्या. पण यांतूनही मार्ग काढतां यावा अशा दोन वाटा त्याला सहज उपलब्ध होत्या. पण त्या वाटांना जाण्याचें त्याने मनांतसुद्धा आणलें नाही. याचें कारण त्याची व्यसनांधता नव्हती; तर अतिरेकाला पोचलेच्या अभिमानाचा कडवटपणा होता. त्यामुळेच आपल्या हाताने त्याला त्या वाटा बंद झाल्यासारख्या होत्या.

सुंभ जळतो, पीळ जळत नाही—

या दोन वाटा म्हणजे रामलाल आणि सुधाकराचा मेहुणा पद्माकर यांच्या साहाय्याच्या

होत. रामलाल तर लहानपणापासूनच सुधाकराचा साह्यकर्ता. पण सुधाकराच्या स्वभावांतील मानीपणाची गोम एवढी मोठी होती की, त्यानेच पहिल्या प्रवेशांत म्हटल्याप्रमाणे, या हितकर्त्याकडूनसुद्धा स्वतःच्या शिक्षणासाठी सुधाकराने मदत घेतली नव्हती. त्याच रामलालकडे आता या अपमानित अवस्थेंत जाण्याची कल्पनासुद्धा त्या मानी अंतःकरणाला सहन होणें शक्य नव्हतें. कारण, त्याच रामलालवर तळिरामने केलेले अश्लाघ्य आरोप, दारूच्या नशेंत का होईना, पण सुधाकराने मान्य केले होते. इतका ज्याचा घोर अन्याय त्याच्या हातून झाला होता त्याच्याचकडे, आणि स्वतःच्या दीनवाण्या अवस्थेचें प्रदर्शन करण्यासाठी जाणें, हें अशा विचित्र अहंभावी अंतःकरणाच्या माणसाला सर्वथैव अशक्य होतें. वास्तविक सरळ मनाच्या माणसाने अशा स्थितींत रामलालची जाऊन मोकळ्या मनाने क्षमा मागितली असती. परंतु सुधाकरासारख्या अहंकारी स्वभावाचीं माणसें इतका सरळपणा दाखविण्याच्या प्रवृत्तीचीं केव्हाच नसतात. सुंभ जळतो पण पीळ जळत नाही त्यांचा; अशीच त्यांची वृत्ति असते. ज्याच्यावर आपण अन्याय केला त्यानेच येऊन, आपण चांगलें वागूं लागल्यावर आपल्याशीं समझोता करावा अशी कांहीशी अपेक्षा राखून, अडेलपणाने वागण्याची प्रवृत्ति ज्या प्रकारच्या अहंकारापोटीं जन्माला येते, त्या प्रकारचा आत्मघाती अहंकार सुधाकराच्या चित्तांत होता. त्यामुळेच, रामलालने म्हटल्याप्रमाणे, स्वतःच्या चांगल्या मित्रांनासुद्धा सुधाकराचें वागणें असह्य होऊं लागलें होतें. त्याचमुळे रामलालला त्याची काळजी वाटूं लागली होती. अशा या मानीपणाच्या कुऱ्यामुळे, आपणच लाथाडलेल्या रामलालकडे मनाच्या समाधानार्थसुद्धा जाण्याचा विचार सुधाकराला सहन होणें शक्य नव्हतें.

रामलालबद्दल जेथे एवढी तिरकस भावना तेथे पद्माकर तर काय सोयरा. त्याचा तर सुधाकराने केवढा मोठा अपमान केला होता. शिवाय सुधाकराला त्याज्य ठरवून सिंधूला तेवढी सुखांत ठेवण्यासाठी माहेरीं घेऊन जायला पद्माकर सिद्ध झाला होता याची दंशयुक्त स्मृति या अवस्थेंतही सुधाकराला अतिशय दुःसह होणारी होती.

आणि म्हणून आपल्यासारख्या बुद्धिमान व गुणी माणसाला, स्वकर्तृत्वाच्या बळावरच आपला संसार अजून सावरतां येईल व आला पाहिजे या अहंभावनेमुळे, त्याला सहज उपलब्ध होऊं शकणाऱ्या या दोन वाटांकडे त्याने ढुंकूनसुद्धा बघितलें नाही; आणि ज्या वाटांवर त्याला आसरा मिळण्याचा मुळीच संभव नव्हता अशा वाटा शोधण्याचा त्याने यत्न केला. त्यांत त्याला अपयश आलें नसतें तरच आश्चर्य. या अपयशाने तो निराश झाला. आणि त्याचा परिणाम काय झाला हें आपण पाहिलें आहे.

अहंभावनेंतून अटळ विनाश —

रामलाल आणि पद्माकर यांचें सहज मिळूं शकणारें साह्य जें सुधाकराने उपलब्ध करून घेतलें नाही त्याला कारण त्याचें दारूचें व्यसन मुळीच नव्हे. त्याचा विचित्र मानी, अहंकारी स्वभाव हेंच त्याचें कारण आहे. म्हणूनच त्याच्या या विनाशकारी

स्वभावाचें एवढें कटाक्षयुक्त दर्शन गडकऱ्यांनी नाटकाच्या सुरुवातीलाच घडविलें आहे. त्याच स्वभावापायी त्याची सनद गेली. त्या अहंभावनेंतूनच, दारूचें आपल्याला व्यसन लागणें शक्य नाही, या भ्रमांत त्याने तें व्यसन लावून घेतलें. त्याच अभिमानाच्या भरांत कोर्टांत दारू पिऊन जाण्याचें वेडें साहस करून त्याने आपली सनद कायमची गमाविली. रामलाल आणि पद्माकर यांना त्याने आपल्या घरांतून हकललें याला कारण जसा कांही अंशीं त्याचा नशाबाजपणा होता, तसाच त्याचा हा भीपणाही होता. याच अडेल अभिमानापोटीं, ऐन गरजेच्या प्रसंगींसुद्धा रामलाल किंवा पद्माकर यांचें साह्य घेण्याचा सुविचार त्याला सुचला नाही; चित्त विशुद्ध होत असतांनाही, त्या दोघांवर आपण केलेल्या अन्यायाचें परिमार्जन करावें हाही सुविचार त्याला स्फुरला नाही, यालाही कारण सुधाकराचा सर्वथा स्वकेंद्रित अभिमानीपणाचा अतिरेकच.

पडताळा —

असें पाहिल्यावर सुधाकराचा नाश केवळ दारूमुळें झाला, एकच प्याला हें नाटक निव्वळ दारूचें नाटक आहे, सुधाकराच्या करुण अधःपाताचें चित्र गडकऱ्यांना रेखाटायचें नव्हतें, असा पक्ष मांडणें किती असमर्थनीय आहे हें स्पष्ट व्हावें. गेल्या प्रकरणांत आपण जे सामान्य निष्कर्ष पाहिले त्यांच्या दृष्टीने बघूं गेल्यास एकच प्याला नाटकाबद्दल आतां आपणास पुढील गोष्टी मान्य होण्याला अडचण पडूं नये:

(१) एकच प्याला प्रामुख्याने स्वभावदोषगत करुण विपाकाचें नाटक आहे. दारूचें व्यसन लागणें, ऐन प्रसंगीं सिंधू जवळ नसणें, तळिरामासारखा पापप्रवर्तक नेमका जवळ असणें हीं बाह्य कारणें आहेत; पण तीं त्या मानाने गौण आहेत.

(२) सुधाकर हा कांही कोणी महान व्यक्ति नाही. पण तरीही त्याच्याबद्दल आपुलकी वाटावी, हळहळ वाटावी असें त्याचें दर्शन गडकऱ्यांनी भरपूर घडविलेलें आहे.

(३) एकच प्याला नाटकांत कथा सर्वस्वी सुधाकराची आहे आणि मराठी नाटकांत सर्वत्रच आढळते तशी ढिलाई थोडी दृष्टीआड केली तर त्या कथेवर अप्रतिहत सत्ता सर्वस्वी सुधाकराचीच आहे.

(४) दारूच्या परिणामांपेक्षा दारू पिऊं लागलेल्या सुधाकराचा करुण विपाक दाखविण्यावरच गडकऱ्यांचें लक्ष खिळलेलें आहे.

(५) गडकऱ्यांच्या जाणिवेंत तत्त्वविचार अवश्य होता. पण त्यांच्यांतील कलावंताने त्याला आपल्यावर प्रभुत्व गाजवूं दिलें नाही.

(६) सुधाकराचें चित्रण, त्याचे गुण आणि दोष यांच्यासह, गडकऱ्यांनी इतक्या हळुवार हातांनी केलें आहे की, कथानाट्यवाङ्मयांतील दुसऱ्या कितीएक व्यक्तिचित्रणांप्रमाणें सुधाकराचें व्यक्तिचित्रणही, तो आपला एक चिरस्नेही व्हावा इतक्या तोलाचें झालें आहे.

(७) सुधाकराची सहृदयता आणि चित्तविशुद्धि, त्याचा शेवटचा पश्चाताप आणि निरहंकार वृत्तीने प्राप्त विपत्तीचा स्वीकार करण्याची समाधातता, या गोष्टी करुण रसाची गाढता निर्माण करण्याला फारच उपकारक आहेत व त्यामुळे आपल्यालाही उच्च सात्विक आनंदाचा लाभ होतो.

(८) गडकऱ्यांना सुधाकराचा स्वभावदोषजन्य करूण विपाक दाखवावयाचा होता; तें त्यांचें साध्य होतें. त्यासाठी सुधाकराच्या पूर्वश्रेष्ठतेबद्दल बहुतांशीं नुसत्या उल्लेखावर भागविणें हें अपरिहार्य होतें. तथापि नाटकाच्या स्थळकाळाच्या मर्यादा संभाळून त्याच्याबद्दल गडकऱ्यांनी इतकें पुरेसें सांगितलें आहे की, तेवढ्यानेसुद्धा प्रा. वाटवे त्याला 'नररत्न' हा किताब देऊं शकले आहेत. तेव्हा आम्हांला सुधाकराबद्दल आपुलकी वाटावी असें गडकरी यांनी कांही दाखविलें नाही हा दावा असमर्थनीय आहे.

(९) इतर बहुतेक सर्व नाट्यकांतल्याप्रमाणे सुधाकरानेही आत्मनिवेदन किती उत्कटतेने केलें आहे; हा एक मोठाच पुरावा आहे की, गडकऱ्यांना सुधाकराच्या करुण विपाकाचेंच नाटक लिहावयाचें होतें; आणि त्या बाबतींत त्यांनी मुख्यतः शेक्स्पीअरच्या नाट्याच्या तंत्राचा अवलंब केला होता.

(१०) शेवटीं प्रश्न राहतो भाषेबद्दल. आतषबाजीच्या स्वरूपाच्या भाषेची प्रथाच ज्या काळांत जारी होती त्याच काळांत गडकरी नाटकें लिहीत होते. तेव्हा त्या प्रथेला व काळाला अनुरूप अशी भाषा त्यांनी लिहिली असली तर त्यामुळें नाटक केवळ सुधाकराच्या तोंडचीं दारूबद्दलचीं तत्त्वविचारप्रधान भाषणें लिहिण्याच्या मोहाने गडकऱ्यांनी लिहिलें हें म्हणणें तर्काला धरून होणार नाही. कोणत्याही गोष्टींत अतिरेकाचें टोक गांठणें हा गडकऱ्यांचा स्वभावविशेष होता. त्याला अनुसरून डी क्विन्सीच्या 'कनफेशन्स ऑफ ॲन ओपियम ईटर या ग्रंथासारख्या ग्रंथांत शोभून दिसतील अशा प्रकारचीं तत्त्वविवेचक भाषणें गडकऱ्यांनी सुधाकराच्या तोंडीं चवथ्या आणि पांचव्या अंकांत घातलीं आहेत. त्यापैकीं पांचव्या अंकांतील त्याचीं अखेरचीं आत्मसमर्थनपर भाषणें नाटकाच्या दृष्टीनेसुद्धा खरोखरच परिणामक होणारीं आहेत. मात्र तीं रंगभूमीवर बोलणारा नट तसाच कुशल पाहिजे. गडकऱ्यांची टिंगल करायला निघालेल्या एखाद्या बावदूकाप्रमाणे नुसती एका दमांत घडाघड पाठ म्हणून दाखविणारा टीकाकार तो नसला पाहिजे. चवथ्या अंकांतील सुधाकराचीं भाषणेंही त्या वेळची सुधाकरांची भ्रांत निराशावृत्ति दाखविण्याच्या दृष्टीने खरोखरच हृद्य आणि वेधक आहेत. फक्त त्यांची लांबण फार लागली आहे, एवढेंच. पण एकच प्याला नाटकांतील बाकीचे सर्व (अर्थात पंडित रामलाल याचीं व्याख्यानें सोडून) सुटसुटीत संवाद पाहतां केवळ भाषेच्या आतषबाजी-साठी गडकऱ्यांनी आपलें नाटक लिहिलें असें म्हणतां येण्यासारखें नाही.

त्याचप्रमाणे गडकऱ्यांची प्रतिभाशक्ति प्रामुख्याने विनोदनिर्मितीला अनुकूल होती असेंही या नाटकावरून दिसत नाही. वस्तुतः सर्वच नाटकामधील गडकऱ्यांची प्रवृत्ति गंभीर चिंतनपरतेलाच जास्त अनुकूल आहे. एकच प्याला नाटकांत तर विशुद्ध करुण

रसाचें त्यांनी इतकें मनोज्ञ उदाहरण दाखविलें आहे की, तेवढ्यावरुन सुद्धा करुणरस हाताळण्याच्या त्याच्या सामर्थ्याची उत्तम ओळख पटावी.

जगाने सुधाकरावर अन्याय केलेला नाही —

अशा रीतीने एकच प्याला हें नाटक प्रामुख्याने सुधाकराच्या करुण विपाकाचेंच नाटक आहे. कांहीसा दैवयोग, पण पुष्कळसा स्वभावदोष हेंच त्यांच्या करुण विपाकाचें कारण आहे. सुधाकर काही कोणी श्रेष्ठ विभूति नाही; रागलोभान्वित सामान्य माणूसच आहे. परंतु त्याच्याबद्दल जिव्हाळा वाटावा असे पुष्कळ गुण त्याच्या ठिकाणीं आहेत. मात्र जगाने त्याच्यावर कांही अत्यंत घोर अन्याय केला आणि या अन्यायी जगाला विटून, त्या जगापासून दूरत्व पावलेला तो एक प्रकारच्या भीषण तिरस्कारवृत्तीने जगाला लाथाडायला निघालेला, जगाने त्याची किंमत न जाणलेला प्रतिभावंत होता, असें मात्र मुळीच नाही. तो एक बुद्धिमान, कर्तृत्ववान, स्वाभिमानी, यशस्वी तरुण गृहस्थ होता; परंतु त्याच्या अतिरेकी अहंकारामुळे त्याच्या गुणांची माती झाली. त्याच्याबद्दल त्याला फार दारुण प्रायश्चितही भोगावें लागलें. तसें तें त्याला न भोगावें लागतें तर आम्हांला मनापासून बरें वाटलें असतें. परंतु त्याचा अर्थ जगाने कांही त्याच्यावर अन्याय केला होता हा दावा मात्र आम्ही कबूल करूं शकत नाही.

प्रकरण पंचविसावें

उपसंहार

अशा रीतीने करुण नाटकांच्या पाहणीचा हा प्रपंच पुरा करून ग्रंथरूपाने रसिक आणि विद्वान वाचकांना सादर करतांना लेखकाला स्वाभाविक आनंद वाटत आहे. विशिष्ट प्रकारच्या प्रायोगिक अभ्यासानंतर, प्रतिभावंत कवींनी करुण नाट्यांतील नायकांच्या चित्रणांत अवलंबिलेलीं अशीं कांही सामान्य धोरणें सापडलीं तर तीं एकत्र करावींत या उद्देशाने हा पाहणीचा प्रपंच केला. एकूण पंचवीस नाटकें तपासून पाहून त्यांमधून आढळलेसे वाटले ते सामान्य निष्कर्ष तेविसाव्या प्रकरणांत एकत्र केले आहेत; त्यांची तेथे थोडक्यांत कार्यकारणभावयुक्त चर्चाही केली आहे. आणि चोविसाव्या प्रकरणांत याच निष्कर्षांचा पडताळा गडकऱ्यांच्या एकच प्याला नाटकांत कशा रीतीने पाहावयास सापडतो हें दाखविलें आहे.

अभ्यासीचा आक्षेप —

जवळ जवळ चोविसशे वर्षांतील फक्त पंचवीसच नाटकें पाहणीसाठी निवडून अशा तऱ्हेचे सर्वंकष निष्कर्ष मांडणें तर्कशास्त्रदृष्ट्या कितपत रीतसर होईल अशी शंका या पाहणीच्या बाबतींत उपस्थित करण्यासारखी आहे. शिवाय हीं नाटकेंही पांचच भाषांमधलीं आहेत. यूरपमधील ग्रीस, नॉर्वे आणि इंग्लंड या देशांखेरीज इतर देशांतील नाट्यकृतींकडे त्यांत लक्ष मुळीच पुरविलेलें नाही. त्याचप्रमाणें भारतांतील अन्यप्रांतीय भाषांतील नाटकेंही विचारांत घेतलेलीं नाहींत. मग आशिया खंडांतील इतर नाट्यवाङ्मयाचा उल्लेख दूरच.

एका दृष्टीने हा आक्षेप मान्य केलाच पाहिजे. भारतांतील मराठीवांचून अन्य भाषांत मराठीइतकें समृद्ध आणि समर्थ नाट्यवाङ्मय नाही असें म्हटलें तर त्यांत विशेष चुकेल असें नाही. त्यांतच करुण नाट्याकडे भारतांत एकंदरींतच नाटककारांचा कल कमी. बंगालीमध्ये कितीएक करुण नाटकें आहेत हें खरें. पण त्यांचाही कस म्हणावा इतका श्रेष्ठ वाटत नाही. पण हें जें विधान केलें आहे तें या भाषांतील सर्व नाट्यवाङ्मयाचें साक्षात आलोडन करून केलेलें नाही. सामान्यतः भाषांतरांतून व संकलनात्मक ग्रंथांतून त्या त्या भाषांतील वाङ्मयाचीं जी कांही जुजबीच ओळख होण्यासारखी आहे, तेवढ्यावरूनच तें विधान केलेलें असल्यामुळे त्यांत अभावितपणें अन्यायही होणाचा संभव आहे. म्हणून मोकळेपणाने हें मान्य करणें जास्त योग्य आहे की, या सर्वच भाषांतील वाङ्मयाचें मुळांत वाचन करण्याइतकें त्या भाषांचें ज्ञान प्रस्तुत लेखकाला नाही;

आणि इंग्रजींत किंवा मराठींत भाषांतरांच्या रूपाने त्यांच्यामधील नाट्यवाङ्मयाचा परिचय करून घेण्याची सोयही उपलब्ध नाही. भारतीय भाषांमधील साहित्याच्या ज्ञानासंबंधीची ही अवस्था; मग चिनी, जपानी वगैरे आशियाई भाषांतील साहित्याच्या परिचयाचा प्रश्न किती अवघड आहे हें सहज ध्यानांत यावें.

फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्पॅनिश वगैरे भाषांतोल साहित्याचा परिचय इंग्रजी भाषांतराच्या द्वारें करून घेण्याची सोय अर्थातच चांगली उपलब्ध आहे. परंतु तेविसाव्या प्रकरणांत, साहित्यांतील व्यक्तिचित्रणांत त्या त्या व्यक्ति चिरस्नेही व्हाव्यात ही जी एक त्यांच्या वेधकतेची विशेष पर सांगितली, त्या परीचीं स्वभावचित्रणें अशा परभाषांतील नाटकांच्या, विशेषतः करुण नाटकांच्या, इंग्रजी भाषांतरांतून प्रस्तुत लेखकाच्या मनाची पकड घेण्याजोगीं आढळलीं नाहींत. अपवाद गोएटेच्या फाउस्ट नाटकाचा. परंतु हें नाटक इतकें प्रचंड मोठें आहे, आणि धर्मभावना, तत्त्वज्ञान, आणि रसनिष्पत्ति यांचें त्याच्यामध्ये इतकें कांही गोंधळून टाकणारें विलक्षण मिश्रण आहे की, ज्या पद्धतीची साहित्यक्षेत्रीय चर्चा या ग्रंथांत अभिप्रेत होती त्या पद्धतींत त्या नाटकाचा यथायोग्य समावेश करणें सोयीचें आणि त्या नाटकाला न्याय करणारें वाटलें नाही.

थोडे प्रातिनिधिक नमुने पुरे व्हावेत —

शिवाय अशा रीतीने सर्वच भाषांतील नाटकांची पाहणी करण्याची आवश्यकता होतीच असें तर्कशास्त्रदृष्ट्या म्हणतां येणार नाही. प्रातिनिधिक स्वरूपाचे असे नमुने घेतलेले असल्यावर ते एकूण एक भाषांमधून निवडलेले असलेच पाहिजेत असें नव्हे. यूरपमधील सर्वच साहित्यावर ग्रीक आणि लॅटिन भाषांतील साहित्याचा फार मोठा परिणाम झालेला आहे. परंतु नाट्यवाङ्मयाच्या क्षेत्रांत, त्यांतही विशेषतः अद्भुतरम्यताप्रधान करुण नाट्याच्या क्षेत्रांत, लॅटिन भाषेंतील साहित्याला महत्व केव्हाच आलेलें नाही. तें क्षेत्र सामान्यतः ग्रीक नाट्यवाङ्मयानेच विशेष प्रभावित राहिलेलें आहे.

ग्रीक नाट्याचा मागोवा घेतच, पण स्थळकाळांच्या ऐक्याच्या बाबतींतील बंधन बऱ्याच प्रमाणांत सोडून देऊन, करुण नाट्याची प्रभावी निर्मिति इंग्लंडमध्ये जेवढ्या जोमाने आणि रसाळपणाने झाली तितकी इतर यूरपीय भाषांत झाली नाही. त्यामुळे इंग्रजी नाटककारांचा मुकुटमणि शेक्सपीअर याचीं नाटकें हीं पाश्चिमात्य करुण नाटकांचीं प्रातिनिधिक म्हणून गृहीत धरून चालण्यास मुळीच हरकत नसावी. विशेषतः मध्य यूरपीय आणि पश्चिम यूरपीय देशांतील नाटकांचीं. पूर्व आणि उत्तर यूरपचा प्रतिनिधि म्हणून इब्सेनचा स्वीकार करण्यासही हरकत नाही. आणि याच्या जोडीला आधुनिक अमेरिकन नाटककारांपैकी प्रमुख अशा एकदोघांचा अंतर्भाव केला म्हणजे अमेरिका व यूरप या दोन्ही खंडांतील करुण नाट्याचे पुरेसे प्रातिनिधिक नमुने आपण घेतले आहेत असें म्हणतां यावें.

अतिव्याप्तीचा आक्षेप —

याच्या उलट असे सामान्य निष्कर्ष मांडण्यासाठी इतक्या नाटकांची पाहणी करण्याची आवश्यकता आहे का, असाही आक्षेप एका बाजूने घेण्यांत आला. शेक्स-पीअर आणि इबसेन यांचें एखादें दुसरें नाटक घेऊनसुद्धा हा प्रपंच पुरा करतां आला नसता का, असा त्या बाजूचा प्रश्न आहे.

अशा रीतीने अव्याप्ति आणि अतिव्याप्ति या दोन्ही दोषांचा आक्षेप या ग्रंथांतील नाटकांच्या निवडीवर घेतला जाणें शक्य आहे. अव्याप्तीपुरतें एवढेंच म्हणतां येईल की, पंचवीसच नाटकें घेऊनसुद्धा ग्रंथाचा विस्तार एवढा वाढला आहे. त्यांत आणखी भर घालावयाची म्हणजे ग्रंथ या स्वरूपांत हा अभ्यास वाचकांपुढे मांडणें हेंच बहुधा अशक्य झालें असतें; आणि असा अभ्यासही एकट्यादुकट्याच्या सामर्थ्याच्या पली-कडचा झाला असता. अतिव्याप्तीपुरतें बोलावयाचें तर, कांही एक किमान विस्ताराच्या क्षेत्रांत पाहणी केल्याशिवाय सामान्य म्हणून कांही निष्कर्ष मांडणें हें तर्कशुद्ध झालें नसतें. अर्थात हा विस्तार किती वाढवावा आणि त्याची मर्यादा कोठे संपवावी याबद्दल दुमत होण्याचा पुष्कळ संभव आहे. परंतु अखेरीस अभ्यासकाच्या मनाचें तरी न्याय्य समाधान व्हावे इतका विस्तार होणें हें योग्य समजलें जावें.

या प्रपंचाच्या हेतूची थोडी कुळकथा —

शिवाय ज्या विशिष्ट हेतूंतून हा असा प्रपंच करण्याची कल्पना रंगारूपाला आली त्या हेतूची कुळकथा थोडीशी सांगितली म्हणजे नाटकांची ही निवड आणि त्यांची संख्या यावर थोडा अधिक प्रकाश पडेल.

प्रस्तुत लेखकाच्या मनांत अगदी मुळापासून खरी ओढ होती मराठी नाट्यवाङ्मयाचा चर्चाप्रधान संकलित इतिहास लिहिण्याची. त्यासाठी अगदी प्राथमिक स्वरूपाच्या तयारीला सुरुवातही केली होती. परंतु संसारामधील विविध अडचणींमुळें प्रत्यक्ष कामाला हात लागत नव्हता. त्यानंतर १९३० सालापासून स्वातंत्र्याच्या लढ्यांत तुरुंगाच्या वाऱ्या करण्याचें घेड लागलें. तुरुंगाच्या बाहेरचा काळ संसाराची घडी थोडी ठाकठीक करण्यासाठी घालवावा, तो पुन्हा तुरुंगांत जावें लागावें; अशा रीतीने १९४४ सालापर्यंतचा काळ निघून गेला. तुरुंगांत आणि बाहेरही यादरम्यान लेखन झालें तें कांही कमी नव्हतें. परंतु नाट्यवाङ्मयाच्या इतिहासाचा विषय मात्र चिंतनांतच राहिला.

त्या बाबतींत आकस्मिक चाळणा प्रा. रा. शं. वाळिंबे यांच्या सातारा येथील एका व्याख्यानामुळे मिळाली. एकच प्याला नाटकाचे बाबतींत एक पक्ष त्यांनी व एक पक्ष प्रस्तुत लेखकाने मांडावा अशी योजना सुरुवातीला बोलली गेली होती. परंतु कसा कोण जाणें यांत बदल झाला. प्रस्तुत लेखकाने आपली भूमिका मुख्य वक्ता म्हणून मांडावी, प्रा. वाळिंबे हे अध्यक्षस्थानीं असावे आणि त्यांनी आपला पक्ष अध्यक्षपदावरूनच

मांडावा असा मांड मांडण्यांत आला. यांत प्रा. वाळिंबे यांच्या मुद्यांना उत्तर देण्याची संधि मिळणार नव्हती, हें एक मोठें वैगुण्य होतें. परंतु वाङ्मयचर्चेंत आपापलीं मतें मांडलीं गेलीं म्हणजे पुरे या बुद्धीने याही प्रकाराला लेखकाने मान्यता दिली.

परंतु अध्यक्षस्थानावरून प्रा. वाळिंबे यांनी आपली बाजू ज्या रीतीने मांडली त्या रीतीने फार असमाधान वाटलें. त्यांनी मांडलेले मुद्दे तर चिंत्य होतेच. पण गडकऱ्यांच्या नाट्यरचनाकौशल्याचाच अधिक्षेप करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. वावदूकपणाने त्यांनी प्रस्तुत लेखकांच्या तोंडीं, त्यानें न मांडलेला पक्षही घालण्याचा यत्न केला. तेवढ्यापुरता तेथल्यातेथे त्यांचा सभेंतील ज्येष्ठ आणि जबाबदार व्यक्तींकडून निषेधात्मक प्रतिवाद करण्यांत आला. परंतु गडकऱ्यांसंबंधी आणि करुण नाट्यासंबंधी त्यांनी मांडलेले मुद्दे अनुत्तरितच राहिले; अध्यक्षांच्या भाषणानंतर पुन्हा वादाला तोंड फोडणें रीतीचें नव्हतें.

या प्रसंगामुळे, या ग्रंथांत स्वीकारलेल्या पद्धतीने नाट्यवाङ्मयाची एकदा पुन्हा पाहणी करावी, मुद्दाम त्या दृष्टीने अभ्यास करावा अशी ओढ निर्माण झाली. कारण छत्तीस वर्षांपूर्वी, १९२५ च्या जानेवारी महिन्यांत, गडकऱ्यांचा विनोद या विषयावर प्रस्तुत लेखकाने फर्ग्युसन कॉलेजांत, महाराष्ट्र–वाङ्मय–मंडळातर्फे व्याख्यान दिलें, (यांतूनच लेखकाचा पुढे प्रसिद्ध झालेला गडकऱ्यांचा विनोद हा चर्चात्मक निबंध निर्माण झाला) त्यामध्ये एकच प्याला हें नाटक उत्तम ट्रॅजेडी आहे हा पक्ष मराठींत बहुधा पहिल्या प्रथमच मांडला. व्याख्यानाच्या वेळीं अध्यक्ष म्हणून गडकरीभक्त आणि लेखकाचे वर्गबंधू श्री. न. ग. कमतनूरकर यांची मुद्दाम योजना केली होती. लेखकाच्या गडकऱ्यांच्या विनोदाविषयींच्या भूमिकेवर श्री. कमतनूरकर यांनी प्रखर हल्ला चढविला; परंतु एकच प्याल्याबद्दलची भूमिका मात्र मान्य असल्याचा त्यांनीही निर्वाळा दिला. त्यानंतर व त्याआधीही याबद्दल पुष्कळ मातबरांनी याविषयी लिखाण केलें. प्रा. ना. सी. फडके आणि श्री. वि. स. खांडेकर या धुरंधरांनी एकच प्याला हें दारूचेंच नाटक आहे हा पक्ष हिरीरीने मांडला. त्यानंतर पुष्कळ वर्षांनी प्रा. क्षीरसागर यांनी एकच प्याला ही एक ट्रॅजेडी आहे या पक्षाचें मोठ्या विवेचक रीतीने मंडन केलें. मराठींतील एक मान्य नाटककार आणि तत्त्वदर्शी टीकाकार प्रा. गो. के. भट यांनी तर एकच प्याल्यावरील आपल्या निबंधांत ट्रॅजेडीवादीपक्ष इतका मुद्देसूदपणे आणि रसिक वृत्तीने प्रतिपादला की, त्यानंतर हा विषय वादाचा राहण्याचें वास्तविक कारणही नव्हतें.

अंतर्मुखतेने पुन्हा अभ्यास करावा ही ओढ —

पण तरीही प्रा. वाळिंबे, एकच प्याला हें नाटक दारूचेंच नाटक आहे, भाषेच्या आतषबाजीच्या मोहाने गडकरी नाटकें लिहीत होते, एकच प्याला नाटकाची संहिता नीट घासून पुसून नेटकी करण्याला मृत्यूमुळे गडकऱ्यांना संधिच मिळाली नव्हती, यामुळें त्यांतील उपकथानकाचीं बांडगुळें त्यांना झटकून काढायला सवड मिळाली नाही

आणि करुण नायकाच्या चित्रणाशीं सुधाकराचें दुरून सुद्धा साम्य नाही, असे मुद्दे आणि तेही आपल्यापूर्वी था विषयाचा जणू कोणी परामर्श घेतलाच नाही, आपणच जणू हा पक्ष प्रथमच मांडीत आहोंत अशा आविर्भावाने मांडतांना आढळले. तेव्हा अंतर्मुख होऊन, आपणच आपल्या भूमिकेचा फेरविचार करावा असें मनांत आलें. कारण करुण नाट्याची आणि विशेषतः करुण नायकाच्या चित्रणाबद्दलची जी कल्पना अनेक वर्षें मनांत बाळगली तिचीसुद्धा एकदा पुष्कळ उदाहरणें प्रत्यक्ष पाहून चांगली छाननी करावी, असा विचार स्फुरला.

यामधून हा अभ्यासाचा प्रपंच निर्माण झाला. अशा दृष्टीने की, प्रत्यक्ष श्रेष्ठ करुण नाटककार खरोखर काय करीत असतात हें तरी एकदा पाहावें. स्वाभाविकच गडकरी यांनी काय केलें होतें हें पडताळून पाहण्याच्या बुद्धीने मुख्यतः ही पाहणी करावयाची होती. गडकऱ्यांच्यावर, गडकऱ्यांच्याच का, सामान्यतः त्या काळच्या बहुतेक सर्वच मराठी नाटककारांवर, शेक्स्पीअरच्या नाट्यतंत्राचा फार मोठा प्रभाव पडलेला होता. त्यामुळे शेक्स्पीअरचा नाट्यसंसार पुन्हा एकदा ढवळून पाहणें हें ओघालाच आलें. पण तेवढ्यावर थांबणें योग्य नव्हे म्हणून शॉ, गाल्सवर्दी, इब्सेन आदि श्रेष्ठ नाटककार आणि मराठींतील बहुतेक सर्व श्रेष्ठ नाटककार यांचाही मग अभ्यास पुन्हा एकदा या नव्या दृष्टिकोनांतून केला; आणि त्यांच्याहून वेगळें असें तर गडकरी यांनी केले नाही ना याची खात्री करून घेतली. या हेतूने हा अभ्यासप्रपंच झाला असल्याने नाटककार आणि नाटकें यांच्या निवडीला एक विशिष्ट वळण लागलें. मुख्यतः मराठी नाटककारांवर ज्यांचा जास्त प्रभाव पडलेला आहे अशा नाटककारांचीं नाटकें निवडण्याकडे अधिक कल झुकला.

अभ्यासाची वानगी व्याख्यानरूपाने —

सुदैवाने कांही काळानंतर या अभ्यासाची वानगी विद्वान आणि रसिक श्रोत्यांपुढे व्याख्यानाच्या रूपाने मांडण्याची संधि मिळाली. कै. माधवराव पटवर्धन सभागृहांत, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि फर्ग्युसन कॉलेजांतील महाराष्ट्र वाङ्मय मंडळ या संस्थांच्या विद्यमाने, १९५० सालीं आगस्ट महिन्यांत ता. १८–१९–२०–२१ या चार दिवशीं व लगेच पुढच्याच सप्टेंबर महिन्यांत ता. ९–१०–११–१२ या चार दिवशीं मिळून आठ व्याख्यानें या विषयावर दिलीं. त्यांमध्ये सोफोक्लीसचीं दोन नाटकें, युजीन ओनीलचीं दोन नाटकें, हेडा गाब्लर व मास्टर बिल्डर हीं इब्सेनचीं दोन नाटकें, उत्तर-रामचरित, शेक्सपिअरचें राजा लिअर आणि टेनेस्सी विल्यम्सचें स्ट्रीटकार, हीं आता या ग्रंथांत समाविष्ट केलेलीं नऊ नाटकें सोडून बाकीच्या सतरा नाटकांची चर्चा केली होती. व्याख्यानांना निवडक रसिक आणि विद्वान श्रोते येत असत. लेखकाचे मित्र प्रा. श्री. रा. पारसनीस आणि प्रा. रा. श्री. जोग हे नेमाने रोज येत. त्याशिवाय प्रा. क्षीरसागर, प्रा. वा. दा. गोखले, महामहोपाध्याय द. वा. पोतदार, श्री. के. नारायण काळे ही मंडळीही हजर असत. प्रा. वाटवे दोनतीन वेळा आले होते.

व्याख्यान झाल्यावर थोडा वेळ एकत्र बसून गप्पा होत त्या वेळीं, झालेल्या प्रतिपादनाबद्दल या विद्वानांकडून सहजच मतप्रदर्शन व सूचना होत. त्यांत श्री. के. नारायण काळे यांच्या दोन सूचना विशेष विचारप्रवर्तक झाल्या. एक म्हणजे नायकाच्या विशुद्धीकरणाच्या sublimation च्या दृष्टिकोनांतूनही हा विचार व्हायला पाहिजे. आणि दुसरी म्हणजे अत्याधुनिक अमेरिकन करुण नाटककारांचाही मागोवा घेतला जावा.

पहिल्या सूचनेची अंमलबजावणी राहिलेल्या व्याख्यानांत तावडतोब होऊं शकली. पण संकल्पित चारा व्याख्यानांपैकी चार व्याख्यानें नंतर झालींच नाहींत, त्यामुळे आणि अमेरिकन नाटककारांकडे तत्पूर्वी लक्ष पुरविलेलें नसल्यामुळे, विषय तेवढ्यापुरता अपुराच राहिल्यासारखें झालें. पुढे अमेरिकन नाटककारांच्या वाचनांतून ग्रीक नाटकांच्या अभ्यासापासून सुरुवात केली पाहिजे हा विचार जास्त ठसठशीतपणें उद्भूत झाला. दिवंगत प्रा. ग. ह. केळकर यांच्या मार्गदर्शनांत ग्रीक नाटकांसंबंधीचा हा मुद्दा कटाक्षाने येऊन गेलेला होताच. म्हणून मग यूरिपिडीस, सोफोक्लीस आणि ईस्किलस या तीन श्रेष्ठ नाटककारांचीं तरी नाटकें अभ्यासिलीं पाहिजेत हें ओघाने आलें.

अशी ही नवी अभ्यासाची जोड मिळविण्यासाठी, योगायोगाने भिन्नभिन्न व्यापारी व उत्पादक संस्थांच्या कामाची फार मोठी जबाबदारी अंगावर येऊन पडल्यामुळे, पुरेसा वेळ आणि स्वस्थता लाभणें अशक्यप्राय झालें. तशांतही झाला एवढा अभ्यास पुरे झाला, तेवढ्याचेंच फलित जेवढें मांडतां येईल तेवढें मांडावें, नाहीपेक्षा याला केव्हा अंतच येणार नाही, असा विचार केला व निवडक पंचवीस नाटकांपुरतेंच लिहून, त्या नाटकांचा एकच प्याला नाटकाशीं पडताळा पाहावा आणि ग्रंथ पुरा करावा असें ठरविलें. ता. २ मे १९५८ रोजीं लेखनाला सुरुवात केली आणि १२ मे १९५९ रोजींपर्यंत, पाठीमागचे इतर नाना तऱ्हांचे व्याप व भानगडी संभाळून, प्रस्तुत प्रकरण आणि चोविसाव्या प्रकरणांतील थोडासा भाग एवढा मजकूर वळगतां, सर्व ग्रंथ लिहून तयार झाला. राहिलेला हा भाग मात्र गेल्याच आठवड्यांत पूर्ण झाला.

ही सामग्री अपुरी नाही —

याच नाटकांची निवड कां झाली याचा हा खुलासा आहे. इतर भाषांशीं परिचयाचा अभाव, लेखकाची आवडनिवड, ग्रंथविस्ताराची मर्यादा, आणि अभ्यासासाठी लागणाऱ्या काळाची व स्वास्थाची मर्यादा, या सर्व दृष्टींनी एवढ्याच मर्यादित प्रपंचावर विसावणें अपरिहार्य झालें. परंतु त्यामुळे सामान्य निष्कर्ष काढण्याच्या दृष्टीने ही सामुग्री अपुरी आहे असें मात्र मुळीच नव्हे. निवडलेल्या नाटकांत भिन्न प्रकारच्या करुण नाटकांचे भरपूर प्रातिनिधिक नमुने आहेत. आणि ज्या कांही प्रकारांचे नमुने नाहीत त्या प्रकारचीं निव्वळ दैवहत, मानवी हताशपणाचीं, भीषण, क्रूर आणि ज्यांच्याविरुद्ध अरविंदांची टीका पुष्कळशी बरोबर आहे असें म्हणतां येण्यासारखें आहे अशीं नाटकें यापुढच्या काळांत प्रतिष्ठेला येण्याचा संभव फारसा नाही.

याहून थोडीं कमी नाटकें घेऊन चाललेंच नसतें असें जरी अगदी कटाक्षाने, निःसंदेहपणाने म्हणतां आलें नाही, तरी शेक्स्पीअर आणि इब्सेन यांच्या करुण नाटकांचे एकाहून अधिक नमुने घेणे अपरिहार्य होतें हें मान्य व्हावें. कारण त्यांच्या प्रत्येक नाटकांतील तंत्राचें आणि स्वभावचित्रणाचें मर्म आणि वैशिष्ट्य वेगळें आहे. आपल्याकडील खाडिलकरांच्याही चारी नाटकांत केवढा तंत्रभेद आहे हें आपण पाहिलेंच आहे. सोफोक्लीसचीं दोन्ही नाटकें तर अगदी दोन वेगळ्या प्रवाहांचीं निदर्शक आहेत. एक प्रामुख्याने दैवहततेचें नाटक आहे तर दुसरें प्रामुख्याने मानवी स्वभावदोषजन्य करुण विपाकाचें आहे. एकाच नाटककाराने हे दोन वेगवेगळे नमुने सारख्याच प्रभावीपणाने आपल्याला द्यावे ही गोष्ट या चर्चेच्या आणि निष्कर्षसिद्धीच्या दृष्टीने केवढी मोलाची आहे हें आपण पाहिलेंच आहे.

या दृष्टीने निवडलीं एवढीं नाटकें किमान निवडावयालाच हवीं होतीं. दुसराही एक हेतु यांत होता. या श्रेष्ठ नाटकांतील चित्रणांची आणि तंत्राची, थोडीशी विस्तारानेच, तरुण अभ्यासकांना ओळख करून द्यावी, आणि त्यांच्या मनांत हीं नाटकें आणि त्या व त्यासारख्या नाटककारांचीं आणखीही नाटकें मुळांतून वाचण्याची आवड उत्पन्न व्हावी हा तो हेतु. आमच्या तरुण अभ्यासकांनी शेक्स्पीअर, इब्सेन, गाल्सवर्दी, टेनेस्सी विल्यम्स यांच्याप्रमाणेच तिन्ही श्रेष्ठ ग्रीक नाटककारांचीं नाटकें हीं मुळांतून वाचल्यास त्यांना नाट्यवाङ्मयांतील प्रभावी सामर्थ्यवंतांची खरीखुरी ओळख होईल. अडीच हजार वर्षांपूर्वी, मानवी संस्कृतीच्या अगदी प्रथमावस्थेंतसुद्धा ग्रीक नाटककारांनी दाखविलेली बुद्धीची विशाल आणि प्रसन्न फेक, व्यक्त केलेली मानव्यनिष्ठा आणि समाजहितदृष्टि आणि वापरलेलें अत्यंत रसपूर्ण नाट्यतंत्र या गोष्टी पाहून त्यांच्याबद्दल मनांत मोठा आदर निर्माण होईल. आणि या सर्वच नाट्यवाङ्मयामध्ये त्यांना त्यांना आपापल्या आवडीप्रमाणे चिरंतन वाङ्मयस्नेही मिळतील. हे स्नेही केव्हाही आणि कोठेही त्यांच्याबरोबर सुखदुःखाचीं बोलणीं करायला अत्युत्सुकतेने त्यांच्याजवळ येतील व त्याच्यासमवेत राहतील. इतके सहृदय, इतके स्वार्थनिरपेक्ष, इतके मनमोकळे स्नेही मनुष्याच्या प्रत्यक्ष संसारांत मिळणें ही जवळजवळ अशक्य गोष्ट आहे. मात्र या स्नेह्यांशीं, त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकून सहवास मिळविला पाहिजे. मध्यस्थांच्या साहाय्याशिवाय, जरूर पडल्यास पुन्हापुन्हा प्रयत्न करून, प्रत्यक्ष त्या त्या वाङ्मयीन स्नेह्यांशीं संवादित्व प्रस्थापित केलें पाहिजे.

त्या दृष्टीने पाहतां प्रस्तुत लेखकाची ही लुडबुडसुद्धा मर्यादेच्याबाहेर आक्रमण न करणारी व्हावी हेंच न्यायाचें होईल. तिचा उपयोग फक्त या सर्व नाटकांचा आणि त्यांतील स्वभावचित्रांचा प्रथम परिचय करून देण्यापुरताच व्हावा. असा हा उपयोग झाला आणि तरुण अभ्यासकांमध्ये साहित्याचा स्वतंत्र बुद्धीने, खोल आणि विदग्ध वृत्तीने अभ्यास करण्याची प्रवृत्ति वाढली तर लेखकाच्या श्रमांचें पुरेसें चीज झालें असें होईल.

शॉच्या प्रेमी वाचकांना या ग्रंथांत त्याचा दुरूनसुद्धा निर्देश न केल्याबद्दल

कदाचित वैषम्य वाटण्याचा संभव आहे. पिग्मॅलिअन, सेंट जोन, जिताज् अटोनमेन्ट, मेजर बार्बारा, अशीं करुणरसाचा चांगला उठाव करणारीं नाटकें शॉचींही आहेत. परंतु आजपर्यंतचें परंपरागत जें नाट्यतंत्र आहे त्याहून शॉचें तंत्र अगदी निराळें आहे. त्या परंपरागत तंत्रावर दृष्टि ठेवून केलेल्या या प्रपंचांत शॉला स्थान देण्यांत शॉचाच यथायोग्य मान राहिला नसता. नाट्यचर्चेच्या प्रांतांत, शॉला स्वतःचें असें एक अगदी स्वतंत्र विश्व आहे व त्या दृष्टीने त्याचा वेगळाच सखोल अभ्यास व्हावयास पाहिजे. तसा तो करायला कोणा अभ्यासकाला चेतवणी मिळाली, तर तेंही या ग्रंथाचें एक यश होईल.

कोठें तरी मर्यादा घातली पाहिजे म्हणून १९५० सालापर्यंतचीं नाटकेंच विचारांत घ्यायची अशी मर्यादा ग्रंथासाठी पतकरल्याने अगदी अलीकडच्या मराठी नाटकांचा विचार होऊं शकला नाही. नाहीपेक्षा, सुंदर मी होणार, तुझें आहे तुजपाशीं, वेड्याचें घर उन्हांत, दुरितांचें तिमिर जावो यांचा आणि विशेषतः तारा वनारसे यांच्या कक्षा नाटकाचा विचार करणें आवश्यक झालें असतें. शिवाय या नव्या नाटकांत वापरलें जाणारें तंत्रही त्यांना परंपरागत नाटकांहून वेगळें काढणारें आहे. या तंत्राचा आणि नाटकांच्या गुणांचा पोकळपणा किंवा भरीवपणा यांचा निवाडा व्हायला कांही काळ जाणें हेंच उचित मानावें लागेल. आंधळ्यांची शाळा हें प्रभावी नाटक पत्करलेल्या काळमर्यादेच्या आधीचें आहे. त्याच्यावर करुण रसाची केवढी तरी गाढ छाया आहे. परंतु तें नाटक स्वभावतः आनंद-पर्यवसायी नाटक आहे; त्याच्यामधील परिस्थितीचा आणि स्वभावांचा विरोध कोणा व्यक्तीच्या संसाराचा नाश व्हावा इतक्या तीव्रतेचा नाहीच. त्यामुळे त्याही नाटकाचा या चर्चाप्रपंचांत समावेश होऊं शकला नाही.

असो. प्रस्तुत लेखकाच्या फारा दिवसांच्या या वाङ्मयीन स्नेह्यांचा हा असा परिचय रसिक अभ्यासकांना करून देतांना त्याला स्वाभाविकच आनंद वाटत आहे. गेलीं जवळ जवळ दोन वर्षें त्याचा त्यांचा नित्य सुखद सहवास आणि संवाद चालू होता. तितका तो अविच्छिन्न संबंध यापुढे कदाचित, अन्य व्यवसायांत गुंतल्यामुळे किंवा त्यांच्याहून निराळ्या वाङ्मयीन स्नेह्यांशीं कांही काळ अधिक घनिष्ठ संबंध, दुसऱ्या एका संकल्पित ग्रंथाच्या निमित्ताने आल्यामुळें, राहणार नाही; यामुळे ग्रंथ संपवितांना लेखकाला थोडा विरसही वाटतो आहे. ग्रंथ लिहितांना, त्याच्या मुळाशीं असलेलीं व्याख्यानें देण्यासाठी तयारी करूं लागल्यापासून तो आजपर्यंत, चर्चेच्या वगैरे निमित्ताने किती तरी सज्जनांशीं गेलीं दहा बारा वर्षें पुन्हा पुन्हा संबंध आला; कितीकांचे प्रेमळ साहाय्य आणि प्रोत्साहन मिळालें. या सर्व सुखद स्मृतींच्या आनंदांत, संकल्पिलेलें एक काम या उतार वयांतही यथास्थित पुरें झाल्याच्या समाधानांत, आणि पुढें संकल्पिलेल्या लेखनप्रपंचाच्या चिंतनांत, लेखक हा ग्रंथ रसिक विद्वानांना आणि तरुण अभ्यासकांना सादर करीत आहे.

सूची

[व्यक्ति आणि विषय]

अत्रे, प्र. के. आचार्य – ६५३, ६७२, ६७३, ६७४, ६७५, ६९०,
अब्राहाम लिंकन (नाटक)— इतिहास नव्हे, नाटकच; स्वभावांतील नाट्यमयता व व्यक्तिमत्व यांचें चित्रण,२०८; ग्रीक नाट्याचें तंत्र, २०८; लोकशाही विरुद्ध पाशवी बळ यांचा झगडा,२०८ २०९; झगड्याचें बीज, २११; करुण विपाक कोणाचा, लिंकनच्या जीवनाचा ? २३०; लिंकनच्या अंताचें बीज दाखविलेलें नाही,२३०; खून दुःखद, परंतु करुणास्पद नाही,२३१;उणेपणा जगाचा आहे, २३१; समाजांतील अपूर्ण मानवतेचें दर्शन, २३१; संसाराच्या अपूर्णतेबद्दल हळहळ; २३२; साध्य बदलतांच तंत्र बदललें, २३२; भाषा, २३२
अस्लाक्सेन–लहान व्यापाऱ्यांच्या म्होरक्या, १६३; १६८, १७१
अॅगॅमेम्नॉन – ६७८
अन्टिगनी– ५६; नाटकाची नायक एकटीच आहे का ७७; निर्वासित ईडिपसबरोबर भिकाऱ्याचें वैराण जीवन व पितृसेवा, ७७; क्रीऑनबद्दल तिरस्कार, ७७; इस्मीनीबद्दल राग, ७८; भावाचें दफन करण्याचा निर्धार, ७९; हें कृत्य पाप नाही, ८०; कर्तव्यपालनासाठी जिवावर उदार झालेली सामान्य स्त्री; ८०; ८१–८६; सत्यन्यायांची प्रतिनिधी, ८१; बढाईखोर नव्हे, सत्यनिष्ठ, ८४; प्रेमांत भागीदार होणें आवडतें ८५; ८७; मृत्यु अटळ, ८९; तुमच्या-आमच्यासारखीच सामान्य माणूस, ८९; ९१, ९२, ९३, ९५; तत्त्वनिष्ठा व संकटें यामुळे हळहळ, ९६; ९८, ११५, ६७६, ·६७९, ६८५, ६८७, ६८८, ६९१, ७००.
अॅन्टिगनी (नाटक) – ६६, ७५; नाटकाचें बीज,७९,-सत्पक्षत्रादी स्त्रीचेंच नाटक, ८२; अॅन्टिगनीचेंच, ८४; नवाच रंग नवाच झगडा,८६; ९०, ९४, ९६; भाषा ९७, ९८; ६८६, ६८८, ६९२,
अॅबी –४४३; झगड्याचें बीज,४४९,४५०; कामुक इच्छा, काळजाची चुणूक,४५१; एबेनला मोह पाडण्याचा प्रयत्न ४५२ दुधारी योजना, ४५३; पुत्रोत्पादनाचा विचार नक्की, ४५३; भिंतीआडचे कामवासनेचे आवेग, ४५४–४५५; भोगलालसेची शिरशिरी,४५६; विलास-तृष्णा पूर्ण शमलेली नाही, ४५७; मुलगा कॅबटचा नव्हे, ४५७; प्रेमासाठी पोटचा गोळाही डोळ्यांसमोर नको,४६०-४६१; प्रेम सिद्ध करून दाखविण्याचा निर्धार, ४६१; उशी दाबून मुलाचा घात, ४६१; एवेनचें समर्थनच करते, ४६३–४६४; एवेनच्या पश्चातापाने सर्व विश्व मिळाल्याचा आनंद ४६४; ६८९, ६९२, ६९६,
अॅरिस्टॉटल – ३, ५६; करुण नायकाची व्याख्या, ९३; नाटकाची भाषा काव्यमय असावी म्हणतो, ९५; ६७८, ६७९, ६८६, ६८७, ६९०, ८०१,
अॅलीन (हालवर्डची पत्नी)– ३५५;कोरडी कर्तव्यबुद्धि, ३५९; ३६६, ३६७; कलावंताच्या साध्या सुध्या गृहिणीची करुण कहाणी, ३७७, पतीच्या जीवनाशीं जिव्हाळा नाही, ३७८, ३७९
आधुनिक काव्यप्रकाश – ६९३
आनंदराव – ६९३
आनंदीबाई – कटाची मदार दादासाहेबाच्या हुकुमावर, ५२१ – ५२२; मनोदय, नारायणाचा पक्का बंदोबस्त, ५२२; मुत्सद्यांची खात्री येत नाही, ५२२; 'ध' चा 'मा' ५२२; आक्रस्ताळेपण ५२३; वृत्तिच्छेद करून विरोधकांना नमविण्याचा सल्ला,५३१; रामशास्त्र्यांनी दावा साधला म्हणून पोटांतील मुलाला सूडाचा उपदेश, ५३३; लेडी मॅकबेथशीं साम्य, ५३४, ५३५; ६८३
आपटे, हरिभाऊ – ६९३
आयागो – ११७, ११९, १२०, १२१, १३१, १२८, १२९, १३२; पराचाकावळा १३३-१३४; १३५, १३६, १३७;

ऑथेल्लोच्या नाजूक मर्माला हात, १३८, १३९, भेदक भाष्य १४०; १४१, १४२; ऑथल्लोबद्दल मत, १४३; डेस्डेमोनाच्या पावित्र्याची ग्वाही, १४४; खलभुजंगाचें कार्य यशस्वी, १४६; १४८, १५१; पाताळयंत्री १५२ ५४५, ६८८
आल्बनी – २६८; २७८; २९२–२९३
आश्विनशेट – ६९१
ऑथेल्लो – ८९, ११७, पहिली ओळख, स्वतःच्या चागुलपणावर श्रद्धा, १२१; डेस्डेमोनाच्या प्रेमाने भारलेला, १२२; १२३, १२४; मानवी चांगुलपणावर विश्वास, १२५; संसारांतील खांचखळग्यांना पारखा शिपाईगडी, १२६; प्रेमाची साधी सरळ कहाणी, १२६–१२७; डेस्डेमोनाच्या श्रेष्ठपणाची जाणीव, १२७–१२८; विषारी इशारा, १२८; दुर्घटनेचें मूळ सत्वस्थवृत्ति १२९; डेस्डेमोना व आपण यांमधील फरकाची जाणीव; १३०–१३१; अंतर्मनांतील न्यूनगंड, १३१–१३२; परिस्थितीही विरोधी १३३; अंतर्मनाची बोच १३५; भडकला तर दावाग्नि, १३४–१३५; स्वाभाविक असमाधानाचा परिणाम, १३६–१३७; नाजुक मर्माला हात, १३८–१३९, संशयाग्नि प्रज्वलित, १४०; दुर्दैव, १४०–१४१; भाषणें काव्यपूर्ण १४१; रुमालाचा प्रसंग; १४२; संशयी नव्हे, भोळा, २४३;आगायोच्या कटाने डेस्डेमोनाच्या बेइमानीची खात्री, १४४; डेस्डेमोनाच्या अंगावर हात टाकतो, १४५; डेस्डेमोनाच्या सौंदर्याने मोहित, १४७; अखेरीस प्रकाश, १४८; शेवटची विनंति, १४८-१४९; स्वभावदोष की ग्राह्य परिस्थिति, १४९; व्यवहारी भूमिकेचा अभाव, १४९–१५०;ज्वालाग्राही प्रेम, १५१; दुर्दैवी परिस्थितीचें माप भरतें, १५२, भावना ताणल्या जातांच काव्यमय भाषणें, १५३; ५४७–५४८; ६७४, ६८१, ६९१, ६९६, ७००,
ऑथेल्लो (नाटक) – तंत्रदृष्ट्या सर्वश्रेष्ठ, ११८; २३३, २६७, ६९८, ६९१
ऑफिडियस – २३६, २३८, २४०, २४६, २५५; २५७–५८; २५९
ऑफिलिया – १५–१६, २०–२१, २१–२२, २३, २७, २८, ३०, ३१, ३२-३३, ४१, ४६–४७, ४८–४९, १४२, २३२, ५७४, ६८८
ऑलिव्ह (स्टीफनची मुलगी) – १८३; १८४, १८६
ऑलिव्हिए, सर लॉरेन्स, – ३३, ७०२
ऑस्वल्ड – २७६; २८१; २९६
इंदु काळे – ६९३
इंदुमती (दत्तकाची आई)– ५७०–५८१; पुत्रसुखाची तळमळ, ५७०–७१; बुडत्याला काडीचा आधार, ५७१; पतीच्या इच्छेसाठी नागेशाची निवड ५७२–५७३; दत्तकाचा अधिकार सुरू, ५७३; भय्यासाहेबाची विषयलालसा कौशल्याने टाळते, ५७४; दत्तकाच्या संसाराचा भयावह अनुभव, ५७४;दाव्याच्या निर्धाराने दुःखी, ५७५; हुकूम कोणी मानीत नाही;कोरडा आईपणा शिल्लक, ५७५; लिअरच्या अविचाराशीं साम्य, ५७६; कृष्णरावाला वाडा सोडून जाण्याची आज्ञा, ५७६ भय्यासाहेबाचा तर्क ती आपल्याला अनुकूल, ५७६; भय्यासाहेबाला झिडकारते, ५७६; खग्रास ग्रहण, ५७६; भय्यासाहेबाची पुन्हा लगट, ५७७; अनुमतिपत्र मिळविण्याचा प्रयत्न, ५७७; बलात्काराचा प्रयत्न, कोंडून घालतात, ५७८, ५७९; सिंधू व गीता यांच्या प्रसंगाशीं सदृश्य चणकाईशीं संभाषण, ५७९; वर्षश्राद्धाची ओढ, ५७९, शीलभ्रष्ट करण्याचा प्रयत्न, ५९०; चित्रण करुण नाट्यांतील प्रधान पात्राच्या लायकीचें ५८०; ६८३, ६८५
इब्सेन, हेनरिक – ११७, १५४, १५७, ३०३, ३५१, ३९०, ३९३, ६७६, ६८१, ६८९, ६९१, ७४६, ७४९

इलेक्ट्रा– ६७८
इस्किलस – ६७८, ७५०
इस्मीनी (ईडिपसची मुलगी)– ७८–८०; ८१ ८५, ८६, ८९
ईटिओक्लीस – (ईडिपसचा मुलगा) ७७–७८
उत्तररामचरितम् –(नाटक)– करुणरस-प्रधान नाटक, ५९७; भविष्यसूचक प्रस्तावना, ५९७; लोकसमाज सामान्यतः स्त्रियांच्या बाबतींत दोषदर्शी, दुर्जन, ५९७; अत्यंत यशस्वी करुण-दर्शन, ६०६; रामाचाही दोष दाखविला आहे, ६०६–६०७; ६७४, ६७६, ६८६, ६८७, ६७९, ६७८, ६९३, ७४९
उत्तरा –६९३
उद्यांचा संसार (नाटक.) – ६५२; शंभर टक्के स्वतंत्र नाटक नाही, घोस्ट्सची छाया, ६७२–६७३; विश्रामकडेच बारकाईने लक्ष; ६७३; विश्रामचेंच नाटक झालें आहे, ६७४; एक चांगलें करुण विपाकाचें नाटक, ६७५
उपसंहार – ७४५--७५२; अव्यासीचा आक्षेप, ७४५; थोडे प्रातिनिधिक नमुने पुरे व्हावेत, ७४६; अतिव्यासीचा आक्षेप, ७४७; या प्रपंचाच्या हेतूची कुळकथा, ७४७-७४८; अंतर्मुखतेने अभ्यास करावा ही ओढ, ७४८-७४९; आठ व्याख्यानें, ७४९; सामग्री अपुरी नाही, ७५०; १९५० सालाची मर्यादा ७५२
उल्हास -- ६५७; ६६१, ६६७
एकच प्याला (नाटक) – ३,४; २६८ नाटक सुधाकराचें, पहिली खूण, ७०७; साध्य किंवा बीज, ७०८; मर्म, ७०९–७१०; काळजी सर्व सुधाकराची, ७११; स्वतःच्या सिद्धांतावरच प्रहार, ७१४, सुधाकराच्या स्वभावदोषाचेंच नाटक, ७१५; सर्व लक्ष सुधाकरावर केंद्रित, ७१७; सुधाकराबद्दल अनुकंपा की दारूबद्दल चीड, ७२१–७२२; सिद्धांत केवळ दारूपुरताच नव्हे, ७२४; सांधा न जुळणारे प्रवेश, ७२५; हवाबंद भेद नाही ७२७; दारूच्या नाटकाच्या पक्षपात्यांची गडबड ७२७–७२८; दारूच्या दुष्परिणामाचें माध्यम नाटक, ७२९; कार्यकारणभावाचें सामान्य सूत्र, ७२९, उपकथानकाचें प्रयोजन, ७२९-७३०; राजा लिअरशीं साम्य ७३०-७३१; आधी रससिद्धि मग प्रमेय, ७३१; मोजदादीचा हिशेब, ७३१-७३३; सुधाकराबद्दल हळहळ निर्माण करायची होती, ७३३-७३४; कलावंत म्हणून सर्व लक्ष सुधाकरावर, ७३४; सुधाकराच्या दोषांवर मुद्दाम बोट, ७३७; अधःपाताची पूर्वतयारी आणि परिणाम, ७३७-७३८; दारू अधःपाताचें कारण नव्हे, परिणाम ७३८; पडताळा, ७४२-४४; सुधाकराच्या करुण विपाकाचेंच नाटक ७४४; ७४७-७४८; ७५०
एकलव्य – ६९३
एझरा मॅनन – कर्तृत्वाचें कथन मात्र, ३९३, पत्नी घराण्याला शोभेशी नाही, ३९४, लढाईवरून परत, ४००, क्रिस्टाईनची साखरपेरणी; ४०२-४०३ जीवनानंद भोगण्याचीं भोळीं स्वप्नें, ४०३ अखेर डोक्यांत लख्ख प्रकाश, ४०४; विषप्रयोग व अंत, ४०५
एडगर – २६७; २७३; २८२;२८८, २८९
एडमंड – २६७, २६८; २७३, २७९-२८०; २८९; ३००
एनिमी ऑफ दि पीपल (नाटक) – थोडक्यांत कथानक, १५४-१५६; रसपूर्ण आणि प्रमाणबद्ध रचना, १५७; पहिली ठिगगी, १५७; तत्त्व आणि व्यवहार, समाज आणि व्यक्तिनिष्ठा यांमधील झगडा, १५९; शक्य आणि अवश्य यांमधील झगडा, १६०; न्याय आणि सत्ता यांमधील झगडा, १६७, मन विकल करणारा प्रसंग, १६८; सत्तेचा विजय न्यायाचें घर उन्हांत, १६८-१७०; काव्यपूर्ण भाषा १७०, ३९०, ६८९, ६९१

एवेन--४४३--४६६, बळकट आणि खेडवळ, ४४४; पितृविरोध, ४४४; मातृप्रेम, तिच्या छळाबद्दल संताप, ४४५, ४४६; मुसमुसणारी जवानी ४४६, थेट बापासारखा, ४४६; बापाची नवी बायको आईचें शेत बळकावयला आली हें शल्य, ४४७; ॲबीशीं पहिली सलामी; ४५०; परस्परांना शारीरिक आकर्षण, ४५०; भिंतीआडचे कामवासनेचे आवेग, ४५४--४५५; ॲबीच्या पुरा कह्यांत, ४५५, हरपलेलें गवसल्यासारखा धन्य, ४५६–४५७; कारस्थानाच्या कल्पनेने वेभान, ४५९; मुलगा जन्मालाच यायला नको होता, ४६०; पोलिसला वर्दी, ४६३; पश्चात्ताप, ४६४; किल्मिष धुऊन जाते, ४६४; ६८२, ६८५, ६८९, ६९२, ६९६,

एमिलिया, १४२, १४३, १४५, १४६, १४७, १४८, १४९

एल्म वृक्षाखालील वासनादाह (डिझायर अंडर दि एल्म्स) – तीन भाग, प्रत्येकांत चार प्रवेश; स्वगत भाषणें ४४३; दबलेल्या विकारांचा दाह व स्फोट, द्रव्यलोभ व कामवासना यांचें थैमान, ४४३; एका साध्या सामान्य तरुणाची कहाणी, ४३५

एल्व्हस्टेड, मिसेस (ताया) -- ३१०; ३१३, ३१४; ३१५ ३२९--३३०; ३३५

ओनील, युजीन – ३९२, ४४३, ४६७, ६७८, ६८२, ६८९, ६९१, ६९२, ७४९.

ओरिन–४०७-४०८; आई पित्याच्या प्रेताकडे जाऊं देत नाही, ४०८ लॅव्हिनिया-विषयी मत कलुषित करण्याचा प्रयत्न, ४०९; आईच्या भेदरटपणाने उद्वग, ४१३; आईविषयी मत्सराने तडफडाट, ४१५; ब्रॅन्टच्या वधाचा गौप्य स्फोट, ४१७; ४१७; अपराधाच्या जाणिवेने झपाटतो, ४१८; घर झपाटलेंसें वाटतें, ४१९; डोकें फिरतें, ४१९; करुणास्पद कबाईत, ४२०; भूतकाळ विसरणें अशक्य, ४२१; खुनी या कल्पनेने भीति, ४२६; कोठे तरी दूर जाण्याची ओढ, ४३०; आत्महत्या, ४३२

औंधकर, विष्णु हरी – २९८, ६३१, ६४६, ७०४.

कब्जी – ६३६, ६३९, ६४०, ६४१, ६४२, ६४३, ६४४, ६४६ संभाजीचा हुकूम मानीत नाही, ६४७; ६५०, ६८३

कमलाकर – ६११-६१३; लीलेशीं अतिप्रसंग, ६१४; मत्सराग्नि ६१५; सुशीलेला पळविण्याचा प्रयत्न, ६२० ६२१; द्रुमनच्या आत्महत्येंतून कुटिल कारस्थान, ६२२; ६२३, ६२५, ६१६.

करुणा – स्वतःचा करुणविपाक सूचित, ६५३; मुलाच्या प्रेमभराने खिन्न, ६५४; संसाराचा उडमळीत डोलारा, ६५५-६५६; अंतःकरण दुभंगतें, ७६८; उलट आरोपाने संतप्त, ६७०; प्रेम आणि कर्तव्य हीं अभिन्न, ६७०

कमतनूरकर, न. ग. – ७४८

कक्षा, (नाटक) – ७५२

कॅथरीन (डॉक्टर स्टॉकमनची पत्नी) – १५७; दोघा भावांमधील स्पर्धा पसंत नाही, १५७–५८; ब्रिलिंगचा नवमतवाद मान्य नाही, १५९; नवऱ्याच्या शोधांबद्दल अश्रद्धा आणि भीति, १६०; दोन भावांत झगडा नको, १६२; न्यायाचा उपयोग वाटत नाही, १६७; अन्यायाबद्दलच्या चिडीचा उद्रेक, १७१; १७८,

कॅथरीन – (स्टीफन मूरची पत्नी) – १८०, १८२; तोल सुटतो, १८३; विषादाचें ओझें, १८४; विवेकशक्ति देशाच्या बाजूला १८५; स्टीफनला वाईट मानायला तयार नाही, ३८६; पतीचें समर्थन करण्याचा यत्न, १८७; अर्थपूर्ण मूक हालचाली, १८८; शृंगारसाज व सौंदर्य यांच्या बळावर स्टीफनचें मन वळविण्याचा विचार, १९३; मनाची अत्यंत विकल अवस्था, १९३

१९४; भावजयीचें सांत्वन करण्याचें कठिण काम, १९४; १९५,१९६,१९७; ह्यूबर्टच्या मृत्यूच्या वार्तेने धीर सुटतो, वेभान १९८; पतिप्रेमाची राख,२००; घर सोडून जाते, २०० नवऱ्याच्या उंच पायरीला चढूं शकत नाही, २००

कॅबट, इफ्राईम - ४४३; पुन्हा लग्न केल्याची वातमी, ४४६–४४७; द्रव्यलोभ आणि कांतालोभ यांचा झगडा, ३४९; त्याला मुलगा हवा, ४५३; मुलाच्या नामकरणाचा समारंभ ४५७; लोकांचा संशय त्याला कळलाच नव्हता काय ? ४५८; संशयाची सावली, ४५८–४५९; सर्व उलगडा, ४६३; ६८९; ६९२

कॅशिओ, १२९, १३३, १३४, १३५–१३६; १३७, १३९, १४१, १४२, १४४, १४५,१४६, १४९, १५२

कांचनगडची मोहना (नाटक), ५०८, ५३५; सफाईचा हात फिरलेला नाही; ५३६; नाटकाचें बीज, ५३८; फार मोठ्या अंशाने दैवयोगाची कहाणी, ५४४; स्वभावदोषाचाही भाग, ५४४–५४५; ६९२

काव्यालोचन –६९३

काळे, के. नारायण – ७४९, ७५०

कॉडारचा देन – ९९, १००, १०२

कॉमिनिअस – २३८, २३०, २४२, २४८

कॉर्डेलिया – १२७, २६८, २७०–२७१, २७२, २७१, २९३, २९६–२९७, ३००, ६७४

कॉर्नवॉल, ड्यूक, २६९, २८०, २८१, २८९

कीचक – ५०८--५२१; भावी अनर्थाची सूचना, ५०८; आत्मप्रौढी, ५०९; सौंदर्याने काममोहित नव्हे, ५०९, कौरवपक्षपातीची ओळख, ५१०; खोळंबा रत्नप्रभेसाठी नव्हता, ५११ मनांतील खरें शल्य, ५१२; नीति आणि कीर्ति यांची फिकीर नाही, ५१४, पत्नीपुढे शरमतो, ५१६; संतापाचें खरें कारण, ५१७; अहंभाव आणि दुराचार, ५१८; रत्नप्रभेशीं काव्यमय संवाद, ५१९; अखेर वध, ५१९–५२० करुण नायकांच्या पंक्तींत बसत नाही, ५२१; ६८३.

कीचकवध (नाटक) – नाटकाचें बीज, संघर्ष, ५१०; राजकारण व पक्ष यांची चर्चा व टीका, ५११; राजकाजाने धर्मबुद्धीची पायमल्ली करतां कामा नये, ५१३; नीति आणि अकीर्ति विरुद्ध सत्ता आणि इभ्रत. ५१४; हिंसा व अहिंसावाद्यांची पक्षमांडणी, ५१५–५१६; टिळक खाडिलकरांच्या संवादांचे पडसाद तर नव्हेत ? ५१६; साध्य आणि साधन, ५१८; करुण नाटक म्हणवत नाही, ५२०; ६८९–६९२

कुलकर्णी, वा. ल. प्राध्यापक--६३०

कुलवधु (नाटक) ५८२; करुण नाट्य आहे का, ५८२; बीज अस्फुट स्वरूपांत ५८३; शोकमय होणार नाही याची साक्ष, ५८८; करुण नाटक म्हणण्यासारखी रचना, ५८८; भानुमतीच्या त्यागाचें फक्त कथन, ५८९, ६७६, ६८२

कृत्तिका–६९१

कृष्ण – ६९३

कृष्णराव -- ५७४--५७५

केंट-- २७५; २८१, २८८

केतकर, गोदावरी– ६९३

केशवशास्त्री-- ५४५, ५४७, ५४८, ५५१, ५५२, ५५३, ५५४, ५५४, ५५७, ५५८, ५५९, ६८९

केशवसुत-- ६९५

केळकर, ग. ह. प्राध्यापक--७५०

केळकर, द. के. प्राध्यापक-६९३

कोरिओलेनस -- २३३--२६६ गब्हाणींतला दुष्ट कुत्रा, २३४; उर्मट आणि लोकहितशत्रु २३५; शिगेला पोचलेला अहंकार २३६; फक्त लढाईपेशाचा आदर्श, २३६--२३७ सैनिकांवर शिव्यांचा वर्षाव, २३८ माणुसघाणेपणा, २३८; उच्च माणुसकीही आहे, २३९--२४०; कोरिओलेनस हें नांव २४०; महत्त्वा-

कांक्षेचा स्पर्श नाही, २४१; आईची महत्त्वाकांक्षा फलद्रूप होऊन अंत २४१; लोकांच्या द्वेष्याची फिकीर नाही, २४२; मताची भीक मागणें अपमानाचें २४४; लोक प्रेमळपणा अपेक्षितात, २४४; अधिकारीपदाबद्दलचा रास्त उबग, २४४; दोषाचाच अधिक वाटा २४६; भडकतो, २४६; तोल सुटतो, २४७—२४८; अधिकाधिक हटवादी, २४८--२४९; राज्यद्रोही आणि लोकहित शत्रू म्हणून अटक, २४९; जनतेची हेटाळणी, २४९; देहांताचें शासन २४९; कडेलोटाची शिक्षा; २४९; अधःपात निश्चित, २४९—२५०; मरणाची पर्वा नाही, २५०; काव्यमय भाषा, २५२; शेवटीं हद्दपार, २५३; अहंकाराने बेभान, २५४; विवेक सुटतो, २५४—२५५; तुलनेने हिणकस, २५५; आग आणि पाणी एकत्र, २५६; कोमल भावनांचा विजय, २६०—२६१; अंतःकरणाची गडबड, २६३; शेक्स्पीअरची मध्यवर्ती कल्पना, २६३; स्तब्धता अधिकच बोलकी, २६५; चांगुलपणा जागा, तिरस्कार नाही करुणाच, २६६; वध, २६६; ६५०, ६८३, ६८८, ६९८, ६९९

कोरिओलेनस (नाटक)— ४, १७९, सर्वांत मोठें २३३, मुख्यतः ऐतिहासिक २३३, थोडें निराळें तंत्र, २३३, कथानकाला मुळीच गति न देणारे सहा प्रवेश, २३९; दारुण घटनांचें बीज, २४१, नाटकांतील साध्य, २५१, भाषा २५२, अहंकारी माणसाचें नाटक, २५२, श्रेष्ठ करुण नाटकांत मोडत नाही, २५५, २६९

कोलरिज— १२०, ६७४

कोलोन येथे ईडिपस (नाटक)— ७७, ९६, ६७९

कोल्हटकर, श्री. कृ.— ६१५

क्रिस्टाईन—३९९, ४००, ४००, ४०६, ४१०, ४१०, ४११, ४१४, ४१५, ४१७

क्रीऑन— ५६, ५९, ६०, राजाला संशय, ६३, ६५, बाणेदार भांडण, ६६, ७१-७६ ॲन्टिगनीचा छळ, ७७, ८१, ८५, सत्ता—सूड यांचा प्रतिनिधी, ८१ ८६, ८७, विसंगति, ८७, ८८, ८९-९१, जीवनाचा दुर्विलास, ९१, ९२, मनाची श्रेष्ठता, ९१, ९३, नाटकांतील स्थान, ९६, ९८, ११०, ११५

क्लाडिअस, राजा— ९, २३, २४, ३६—३७, ३८; ३९—४०; ४६—४७; ५०, ८१

खडाष्टक (नाटक) - ५७०

खंडोजी— ६३४, ६३८—६३९; ६४१ ६४५; बहिणीचा बळी, ६४५—४६; ६४७, ६४९, ६५०.

खाडिलकर, कृ. प्र.— मराठीच्या नाट्यसंसारांत पहिलें स्थान, ५०८; राजकारण चर्चेचे प्रवेश बहुतेक नाटकांत मुक्त हस्ताने, ५११, भाषासामर्थ्याची चुणूक, ५११—५१२; लोकशाहीचीं तीन पथ्यें, ५२७; रामशास्त्र्यांच्या चित्राने प्रभावित, ५३५; ५४५; भाषा, घासून पुसून परिणामकारक, ५६८—५६९; रसगर्भ भाषेच्या आतषबाजीसाठी नाटकें लिहिल्याचा आरोप समर्थनीय आहे का? ५६९; ६९२, ६९३

खांडेकर, वि. स— ७४८

खाशाबा—सर्जाबा— ६३६, ६३७, ६३८, ६४३—६४४, ६९०

गडकरी, राम गणेश— ४, १०४, ११८, ११९, २६८, ३९३, ५७९, ६०९, ६१५; सामर्थ्याची साक्ष ६२५; प्रतिभेचें खरें कार्य केवळ विनोदनिर्मिति नव्हे, ६३०; ७०८-७१०; ७१४, ७१६; प्रतिभासामर्थ्य, ७१८, शब्दप्रेमाची आतषबाजी नव्हे, ७२३—२४; ७२५, ७२७, ७२८, ७२९—३५; ७३६, ७४८

गणोजी, - ६३४ ६३५, ६३७; ६३९ ६४३; ६४७; ६४८;

गांधी, महात्मा— १२९, ७०२

गाल्सवर्दी, जॉन— १८०, २०७, ३९०, ३९२, ६८१, ६८९ ६९१, ७४९

गॉनेरिल, २६९ २७४, २७९, २८०, २८४, २८५, २९२, ३००
गीता – ५८९
गोएटे – ७४५
गोकुळ – ६१०, ६१६, ६१३
गोखले, वा. दा. प्राध्यापक – ७४९
गौतम, डॉक्टर – ६५४, ६६२, ६६३.
ग्रीक रंगभूमि, वृंदगायकांचें तंत्र – ५६-५७
ग्लॉस्टर – २६७, २६८, २८०, २८२, २८६, २८९, २९०-२९१, २९४,

चवथा हेन्री (नाटक) – ५२७
चंद्रावळ – ६३६, ६४३, ६४४, ६४६, ६४७
चाफेकर, श्री. नी. प्राध्यापक – १५१
चेटक्या – ९९, मॅकबेथचें त्रिविध स्वागत, १०० ११०–१११, ११४
छत्रपति (नाटक)–५७०
जज्ज ब्रॅक – ३१४, ३१६, ३१७, ३१८, ३३२, ३३३, ३३९, ३४०, ३४१-३४५, ६८६.
जनता-वेताळ (नाटक) –१८०, ६९१
जयंत – ६०९–६३०; पहिली ओळख, ६०९–१० खडतर दैव, ६१२; काव्य-सृष्टि व्यवहारांत उतरत नाही, ६१२–६१३; गैरसमज, ६१८, सहानुभूति फक्त विद्याधराकडून ६१९, गहजब, ६२१. खुनाच्या आरोपाच्या कचाट्यांत, ६२२–२३, खुनाचा खटला सुरू, ६२४, मनोभावनांचा उकल, ६२४, फाशीची शिक्षा, ६२४, शेवटच्या क्षणीं सुटका, ६२५, जीवितवैफल्याबद्दल करुणा ६२८; ६८१, ६८५, ६९२.
जॉर्ज, सर – १८२; १८३
जोकास्ता, राणी – ६६-६७, ६८-६९; ६९-७०, ७१-७२, ७३-७४, ८८
जोग, रा. श्री. प्राध्यापक–(कवि निशिगंध) १९३, ७४९
जोशी, गणपतराव – ७०२
जोशी, वामन मल्हार -- ६९३
जोशी, शंकर परशुराम -- ५७०, पिंड विनोदी, ५८०, खटकेबाज संवादा-करितां गाजलेलीं नाटकें ५८१
ज्यूलिअस सीझर – ७, ८, ५३३
ज्यूलियाना – ३०४, ३०६, ३०९
झपूर्झा -- ६९५

टेनेस्सी विल्यम्स -- ४६७, ६८२, ६८९, ६९२, ७४९
टेसमन जॉर्ज -- आत्याशीं प्रेमसंबंधाला एव्हाच तडा, ३०६; नवदंपतीमधील भिन्नतेचें दर्शन, ३०६; पुस्तकी पंडित, ३०७, विद्यापीठांतील जागा न मिळण्याच्या आनंदाने धांदल, ३१५, प्रवासांतही संशोधनकार्यांत दंग. ३१७, स्वतंत्रनिर्मितिक्षमतेचा लवलेश नाही, ३४०, ३४१-३४९
ट्रॅजेडी -- १, २
डग्लस, फ्रेडरिक -- २२१, २२२
डंकन, राजा -- ९९, १००, १०२, १०४, १०५, १०६, १०७, ११२, ११६
डॉल्स हाऊस -- (नाटक) -- १५४
डीन – १८०
डेस्डेमोना – ११९; करुणा अधिक तिच्याबद्दल वाटते का ? १२०; १२१, १२२; १२३, १२५, १२६, १२७, १२८, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६; प्रसंगाला उणी पडते १३७, १३८--१४२, १४४, प्रश्न जगात अशा स्त्रिया असतात का ? १४५, दीनवाणी, १४७, कॅशिओसाठी डोळ्यांत अश्रू, १४८, ऑथेल्लोला वाचवूं पाहते १४९, मृत्यु, १५१ वेडी घातकी समजूत, २३२, ५४८, ६७४, ६९१, ७३६,
डोनाल्बेन -- डंकनचा दुसरा मुलगा, १०८
ड्रिंकवॉटर, जॉन-- २०७, २०८, २३२, ३९२ ६८९, ६९०
तळिराम -- दारू सुटत नाही म्हणे, ७१०; आयागोची आठवण, ७११; त्याचा उद्देश सुधाकराचा नाश करण्याचा नाहीच, ७३९

तात्यासाहेब – ६०९; ६१६
ताराऊ ६३२; जळफळाट, ६३३
तुझें आहे तुजपाशीं (नाटक) – ७५२
तुळोजी – नारायणरावाचें भूत दिसूं लागतें, ५२५; हुकूमाचा कागद ताईतांत ५२५; शपथेचा विफल प्रयत्न, ५३१
तैरेसियास -- थीब्सिचा अंतर्ज्ञानी वृद्ध पुरुष, ६१; माहिती सांगायाला नाखूष राजाशीं तंटा, ६२--६३; ८३, ९०
थीबिस नगरी -- ५७; ६१; ८१, ८२, ८८, ८९, ९३
दुरितांचें तिमिर जावो (नाटक) -- ७५२
दुसरा रिचर्ड (नाटक) --६५१
दुष्यन्त -- ७२०
देवदत्त – मनांतील बोच, ५८३; काळजी भानुमतीबद्दलच, ५८३; भानुमतीची लढाई खुद्द त्याच्याशींच, ५८३–५८४; आईबाप बहीण यांच्या वारेमाप जिभांनी हृदयांतल्या मंद ठिणगीचा निखारा, ५८४;ठिणगीच्या निखाऱ्यांतून आगीचा लोळ, ५८४; पहिला स्फोट, ५८५; स्वभावांतील खाचाखोचा, ५८५–५८६; कटु भावनेमुळे खिन्न, ५८६; त्याची व्यथा, ५८७; शोभेच्या वस्तूपेक्षा महत्व नाही, ५८७; करुणास्पद व्यक्ति देवदत्तच, ५८९; मत्सर नव्हता, तिरस्काराची बोच होती, ५८९; मत्सराच्या आरोपाचा करुण आघात, ५९०; दुय्यम स्थितींत असलेल्या पुरुषाचें समाज कौतुक करीत नाही, ५९०; समाजाची विकृत दृष्टि, स्त्रियांची सुद्धा, ५९०–५९१; दोघांमधील अंतर फार मोठें, ५९१; स्त्रियानांही कमीपणाच वाटतो, ५९२; उदाहरणें, काव्यांतील आणि प्रत्यक्षांतील, ५९२–५९४; भारतीय स्त्रीला सुद्धा बाहुली होणें आवडत नाही, ५९४; भानुमतीची जी व्यथा तीच देवदत्ताची, ५९५; एक चांगल्या करुण नायकाचा नमुना, ५९५; निर्मळ मनाच्या दुर्दैवी तरुणाचें चित्र, ५९६; ६८२, ६८५,
देशपांडे, ग. त्र्यं. प्राध्यापक – ६९३
दौलतराव – प्रतापराव व दौलतराव यांच्यांतील फरक, ५३९
द्रुमन, ६१०, ६१६, ६१९, ६२०, ६२२
द्रौपदी (सैरन्ध्री) – येऊं घातलेल्या बिकट प्रसंगाची कल्पना, ५१०; धर्माच्या 'पण 'वर मोठा राग, ५१५; काव्यमय भाषा, ५१७; राजाचा आश्रय सुटला, ५१८; ६९३
नयना–६५४; ६५९;६५९–६६०;दुष्ट कल्पनांचीं पिशाच्चें पाठ सोडीत नाहींत, ६६४; शरीरविक्रय करून जगण्याचा विचार, ६६८
नागेश – ५७१; ५७२; ५७३; ५७४ ६८३
निशागीत, – ५९३

पटेल, सरदार वल्लभभाई– ७०२
पांचवा हेनरी – ५२७–५२८
पारसनीस, श्री. रा. प्राध्यापक– ७४९
पॉलिनिसीस– ईडिपसचा मुलगा ७७–७८; शत्रू म्हणून प्रेतसंस्कार नाहीत ७८–७९; ८१, ८२, ८३, ९०, ९१;
पिलाजीराव आणि लक्ष्मी, ५३८; ५४०
पेत्रा – १५९, १६०, १६१, १६९
पोतदार द. वा. महामहोपाध्याय, ७४९
पोलोनिअस – १, २३,२४, २५, २७, ३३; हॅम्लेटकडून वध, ४५--४६.
प्रतापराव – ज्वलंत स्वाभिमानी, पण उतावीळ व अव्यवहारी, ५३६--५३७; कर्तव्य व लग्नपाश यांमधील झगडा, ५३८, फाजील विश्वास घातक, ५३८; दोघे दुर्दैवी, ५४२; बेहोश होतो, ५४२ उतावीळपणाने मोहनेबरोबरच घायाळ, ५४४; अव्यवहारीपणा, स्वप्नाळूपणा, ५४४; ६८३, ६८९
प्रेमसंन्यास (नाटक) – पुनर्विवाहाचें मंडन ? ६०९; झगड्याची सूचना, ६१०; निराशेच्या प्रेमाचा खेळ, ६११; खरें लक्ष जयंतावर, ६११; निराशेच्या

प्रेमाच्या खेळाची जय्यत तयारी, ६१३; पुनर्विवाहाच्या खंडनमंडनार्थ नाही; ६१५, तुलनेसाठी उपकथानक, ६१५--६१६; काव्यात्म भाषेचें प्रयोजन, ६२७; जयंताच्या प्रेमसंन्यासाचें नाटक, जयंत-लीलांच्या निराशेच्या प्रेमाचा खेळ, ६२७; रचना व भाषा यांच्या सफाईचा अभाव, ६२८--६२९; रोमिओ आणि ज्यूलिएटशीं साम्य व भिन्नता, ६२९-६३०

प्रोफेसर डॅन्डी – ६९३

प्लेटो – ११९

फडके, ना. सी. प्राध्यापक, ७४८

फाउस्ट नाटक – ७४६

फॉर्टिब्रास – ७, ९, ४७-४८;

फाल्गुनराव – ६९१

बँको -- ९९; जास्त सावध, १००--१०१; १०२, १०५; मॅकबेथवद्दल संशय १०५, १०७; मॅकबेथवर अविश्वास, १०८, १०९, १११, ११५

बाबासाहेब -- ६०९; ६१९

बिआंका, कॅशिओची रखेली, १४३, १४४

बिलिंग-- १५९–१६१; निव्वळ द्रव्यार्थी, १६८; १७१, १७३, १७६,

बेबंदशाही (नाटक) – ६३१; अत्यंत कलात्मक दृष्टीने निवडलेली सामग्री ६३१; पहिल्या प्रवेशांतच नाटकाला वेगाची गति, ६३२; कारुण्याचा उद्गम ६३५; फितूर लोक आणि दौलतीचे रक्षक यांच्यामधील झगडा, ६३५--६३६; धन्यतेपोटीं हळहळ, ६४२; दुसरा रिचर्ड आणि बेबंदशाही, ६५१--६५२; भाषा, शिवशाहीचा आभास, काव्यात्मता, अर्थान्तरन्यासप्रचुरता, ६५३; ६९० ६९२, ७०४

ब्रॅडले -- ३

ब्रॅन्ट -- ३९६--३९७; ३९८; ४०९; ४१०

ब्रॅबॅन्टिनो – १२०–१२९; १३०, १३९, १४६, १४९

ब्रूटस (लोकप्रतिनिधी) – २४०, २४१, २४३; २४५; २४६–२४९; २५३, २५७

व्हॅलेन्शा – ४६७–५०७; बहिणीच्या घरांतील वातावरणाशीं न जमणारी स्त्री, ४६८–४६९; विचित्र परिस्थितींत येऊन पडलेली, ४६९; साहित्यप्रेम, ४६९-४७०; अट्टल दारूबाज नसल्याचा कांगावा, ४७०; भावी वेडाची पूर्वसूचना, ४७१; घराकडील हकीकत, ४७१; स्टॅनलेशीं झटापटीला सुरुवात, ४७१–४७२ स्टॅनलेनेही आपल्या रूपाचें कौतुक करावें ही धडपड, ४७५; पचळपणा धोक्याचा, ४७५; स्टॅनलेचा अभिमान डिवचण्याचा प्रयत्न, ४७६; जिव्हाळा, ४७६--४७७; सहृदयतेची आणखी एक साक्ष, ४७७; नित्याची काळजी आपण दिसतों कशा, ४७८; मिचचें आकर्षण, ४७८; मिचला वेधून घेण्याची खटपट, ४७८–४७९ ४८०; दुःखी माणसेंच अधिक निष्ठावंत असतात, ४७९; हवें होतें तें मिळलें, ४८१ पैसा हजार ठिकाणीं जातो, ४८३; ध्येयबुद्धि आणि सत्प्रवृत्तिः ४८४; पराभवाची नुसती सुरुवात, ४८५; स्टॅनलेशीं दुसरी चकमक, ४८५–४८६; भयंकर दिव्य, ४८६; भावनाभरांतून काव्य, ४८६-४८७; भ्रांतिष्ठ आणि भयभीत ४८७ मिचला आपलासा करण्याचा उद्देश, ४८७; बहिणीच्या आश्वासनाने निश्वास, ४८७; दुर्दम्य वासनावेड, ४८८; सदाचरणाची चतावणी, ४८९; लाजल्याचें नाटक, ४८९–४९०: पहिल्या निष्फळ प्रेमाची कहाणी, ४९०–४९१; नाटक संपतें, किल्मिष धुऊन जातें, ४९१; खऱ्या स्वरूपाची उघडीक ४९२-४९३; तिने गेलेंच पाहिजे, स्टॅनलेचा कठोर निर्णय, ४९५; वाढदिवसाची क्रूर देणगी, परतीचें तिकीट, ४९५–४९६; मिचला खुलविण्याचा पुन्हा प्रयत्न, ४९६–४९७; वस्तुसत्याची मुळीच आवड

नाही, ४९७; उंच जाणाऱ्या पतंगाच्या शेपटीला जुन्या पत्र्याचें डबडें, ४९८; ४९९; दारिद्र्याच्या खाईंतील करुण कहाणी, ४९९; मिचला हकलून लावते, ४९९; दुर्बळांचे निर्धार सिद्धीस जायचे नसतात, ४९९–५००; फक्त स्नेहपूर्ण सहवासाची विफल आशा, ५०१; स्टॅनलेच्या तावडींत, ५०१; पारध्याच्या जाळ्यांत, ५०२; स्टॅनलेकडून बलात्कार, ५०३; जीवनाची इतिश्री, आता फक्त पुढची व्यवस्था, ५०३; भ्रमाच्या भोवऱ्यांत, ५०४ सुटकेचा शेवटचा प्रयत्न, ५०६; परकी माणसांच्या दयेवरच जगलेली, ५०६–५०७; दयेच्या अभावीं वठलेली वेल, ५०६; भावनेचा भर येतांच सुंदर काव्य आणि जीवनसत्यें, ५०७; शेवटची डॉक्टरची दया, ५०७; ६८२, ६८५, ६८७, ६८९, ६९२, ६९६, ७००,

भट, गो. के. प्राध्यापक, ७४८

भय्यासाहेब – ५७१-५७२, ५७३, ५७६, ५७७; दुहेरी डाव, ५७७,

भवभूति – ५९७, ६७६, ६८७, ६९२, ६९९

भाऊबंदकी (नाटक) ५०८, ५३१-५३५; पहिला प्रवेश संथ गतीचा ५२१, कोणत्याही भाषेला अभिमान वाटावा असा पहिला अंक, ५२५, ज्यूलिअस सीझर नाटकाची छाया, ५३३; झगड्याचें बीज, ५३३; नाटक राघोबाचें की रामशास्त्र्यांचें ५३५ ६८९, ६९२

भानुमती -- ५८२, सासुसासऱ्यांशीं लढा देण्याला सिद्ध ५८३; सत्काराच्या सभेला उघडपणे देवदत्त जात नाही, ५८७, पौरुषाच्या अहंकाराला विटून घर सोडतें, ५८८, चटका लावणारें निर्मळ प्रेम, ५८९; पुरुषांवरील आरोप तर्कशुद्ध नाही, ५८१, ६८३

भूत (हॅम्लेटच्या बापाचें) – ७, ८, १३, १४, १५, तेंही काव्यमय भाषेंत बोलतें, १६, १७, १८, १०. ४१, ४३,

भारतीय नाटयशास्त्र – ६९३

भारतीय साहित्यशास्त्र – ६९३

मथुरा – ६१०, ६२३

मधोजीराव, – ५७१

मनोरमा, ६११, ६१२, ६१३, ६१६, ६१८, ६१९, ६१४

मम्मट – १३७

मराठी रियासत – (उत्तर विभाग खंड १) ५४६

मॅकडफ, सरदार -- १०७, १११, ११२, ११४, ११५

मॅकबेथ -- ८९; ९८-११८; निराळाच थाट ९८ शौर्याची माहिती वर्णनावरूनच, ९८ ९९; १००; चेटक्यांवर विश्वास, डोकें फिरतें, १००; जाया दुष्ट नाही, १०१; तरल कल्पनाशक्तीचा कवि, १०१-१०२; स्वभावाची गहिरी बाजू, १०२-१०३; १०४, १०५; खंजीराला उद्देशून भाषण, १०५; १०६; झोप संपली, १०६; सद्भावनेची चाहूल, १०६; मनःक्षोभ की नाटक? १०७; राजपदीं निवड, १०८; रक्ताची चटक १०९; ब्रँकोची भीति, १०९; काव्यालंकारांचें वेड, १०९: ११०; करुण कहाणी, ११०; मालकमचा अभिप्राय, ११२; दैव फिरलें, ११२; मनाने कच खातो, ११३; जोहाराचा मार्ग, ११४; जुलमी राजाचा नमुना, ११४; नायकाची वेगळी तऱ्हा, ११५; स्वार्थी महत्त्वाकांक्षा आणि उताविळी, ११६; स्वभावदर्शन – ११७; स्वभावगत करुण विपाक -- ११७, ११८, १५३, ५३४, ६८१, ६९१, ६९८

मॅकबेथ (नाटक) -- ९८ मोहवश माणसाचा शतमुख विनिपात हें रहस्य, १०१; मेजवानीचा, प्रवेश, १०९-११० २३३, २३९, २४३. २६७, ६८७, ६९८

मार्डेन किल – ६१२; ७१५, १७८

मालकम – डंकनचा मोठा मुलगा, १०२, १०३, १०८, १११, स्कॉटलंडचा राजा, ११४
मास्टर बिल्डर (नाटक) – ११७, १५४, कथनावर भर, ३५१; नाटकांतील पात्रें म्हणजे हालवर्डच्या प्रवृत्तींचीं प्रतीकें? ३८२; ७४९
मायेचा पूत (नाटक) – ५७०; झगड्याचें सुरुवातीलाच दिग्दर्शन, ५७०, सुखपर्यवसायी करण्याचा आटापीट, ५८०; भाषेंतील हृद्य ठसका आणि काव्यमयता ५८१; रसवत्तेचा भंग नाही, ५८१
मॉब (नाटक) – १८० झगड्याचें मूळ १८०; रेखीव काव्यमय भाषा, २०२; करुणप्रधान नाटक आहे का? २०२; बाह्य विरोधी परिस्थितीशीं झगडा, २०३; स्वभावगत करुण विपाकाचेंही मिश्रण, २०६; ६९१
मिचेल, ४७८-४८१; ४८७, ४८८, ४८९; ४९०; ४९३, ४९६--४९६
मेनेनिअस – सामान्य जनतेला त्यांतल्या त्यांत जवळचा सरदार, २३४; २४०, २४२, २४३, २४५, २४७, २४९; चतुर मध्यस्थी, २५०; २५३, विफल शिष्टाई, २५९
मेकॉले, ११९
मेंडिप – १८१, १८२, १९७
मोर्निंग बिकम्स इलेक्ट्रा (नाटक) – ग्रीक वाङ्मयाची मोठी छाया, ३९३; पहिलें पोटनाटक, गृहागमन, ३९३; भयानक घटनांचें मुख्यबीज, ३९५-३९६ दुसरें पोटनाटक पारध, ४०५; तिसरें पोटनाटक, भुताटकी, ४१८; ग्रीक नाटकांचें ऋण, ४३९; ओनीलने केलेला फरक, ४४०–४४१ सोफोक्लीसचाच आदर्श ४४१; फ्रॉईडच्या तत्वज्ञानाची भर ४४१–६८३
मोहना -- संसारावर हंवीररावाचें ग्रहण, ५१६ दुसरें ग्रहण प्रतापरावाच्या दुर्दैवाचें, ५३७ दोघेही दुर्दैवी, ५४१; कड्याखाली उडी घेण्याची तयारी, ५४३ प्रतापरावाला सोडून जायला तयार नाही, ५४३ वीरस्त्रीचा अजब नमुना, ५४३-५४४ घातकी अक्षम्य चूक, ५४५; अविवेकी उतावीळपणांत सामील, ६८३, ६८५, ६८९, ६९२

यमुना – ६९३
यूनिस – ४६८, ४६९
यूरिडिस – क्रीऑनची पत्नी, ९१; आत्महत्या ९२, ९४, ९६
येसूबाई – ६३५ दुर्दैवाची अपशकुनी खूण, ६३८–३९; ६४०, ६४१, ६४४

रसविमर्श – ६९३, ७३१
रससिद्धांत – २, ६९३
रागिणी – ६९३
राघोबादादा – ५२१–५३५ कीचकापेक्षा अधिक सहानुभूति, ५२१, हुकुमांतील दुरुस्तीला संमति देण्याचा हिय्या नाही, ५२२, पापभीरू मन, ५३, पत्नीप्रेमाला बळी, ५२३–५२४ पापी मनाचें भिंतें चित्र, ५२४, लोकगंगेला न मिऊन भागणार नाही, २२४ पापाने म्यालेलें चित्त, ५२८ प्रायश्चित घेण्याला खळखळ, ५२९–५३० रामशास्त्र्यांच्या सामर्थ्याने बेचैन, ५३१; देहांत प्रायश्चित्त, ५३२; करुण नाटकाची भरपूर सामग्री ५३४; मॅकबेथ करतां आला असता ५३४; ६८३, ६८९, ६९२;
राणी, (हॅम्लेटची आई), ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १६, १७, २७, ३७–३८, ४१, ४५--४६, ४२
राधाकाकू –५७१; ५७२; भाषेंतील हृद्य ठसका, ५८१
राजा ईडिपस, ५६–७६ सर्व मानवांहून अधिक दैववान व सामर्थ्यशील, थीबिसला संकटांतून सोडविलें, ५९; खून करणाराविरुद्ध व खुन्याला आश्रय देणाराविरुद्ध हुकूम, ६१; तैरेसियासला खुनी माणसाचा पत्ता सांगायला सांगतो, ६४; स्वार्थभावना प्रबळ होते, ६४; उदारवृत्ति लोपत नाही, ६४;

क्रोधवश ईडिपस आणि सत्याधिष्ठित क्रीऑन, ६५–६६; अविवेकीपणाचें पुनर्दर्शन, ६७–६८; पूर्व इतिहासाची चांगली जाणीव, ६८–६९; अनुतप्त वृत्ति, ६८; आशेला पालवी, ६९; सत्य समजतें पण उमजत नाही, ७१; भवितव्यापासून सुटण्याची केविलवाणी धडपड, ७२--७३; डोळे फोडून घेतो, ७४; निरवानिरवीचा अत्यंत करुण प्रसंग ७५–७६; हृदयाची माणुसकी, ७६; ८३, ८६, ८९, ९२, ९३, ९४, ९६, ९८, ११५, ६७६, ६७८, ६७९, ६८७, ६८८, ६९८,

राजा ईडिपस, नाटक – भाषा वृत्तबद्ध; भाषांतर गद्य असूनही लयबद्ध व अलंकारप्रचुर, ५८, कृत्रिम भाषेची अपरिहार्यता, ५८, नाटकाचें साध्य – बीज ५९–६० झगड्याचें स्वरूप, ६२, राजाच्या अविवेकी वर्तनाचा चित्रपट, ६६; ८८, ९०, ९२, नाटकाचें साध्य, ९४, ९५, ९६, ९७, ९८, २३२, ६९१, ६९८

राजाराम – ६३३; विरोधी जोडपें ६३४, ६३५

राजा लिअर, नाटक २३३, २६७, भीषणतेचें प्रचंड दर्शन, २६७, भीषण स्त्री-स्वभावदर्शन, २६७, उपकथानकाची जोड, २६७–२६८; नाटक लिअरचेंच, २६८, टीकाकारांमध्ये मतभेद, २६८, अनर्थपरंपरेची ठिणगी २६९, थोडक्या अवकाशांत केवढा मोठा पल्ला, २०९, हटवादी आत्मकेंद्रिततेचे करुण परिणाम, ३०१; दैवाचाही फटकारा, ३०२; गतिमान, उत्क्रांतिदर्शक चित्रण, ३०२; सर्व रसांचा रंगदार खेळ, एक महान करुण नाटक ३०२; ६८८, ६९७, ७३०-७३१, ७४९

राम, राजा -- ५९७–६०७ लोकाराधनार्थ सीतेचा त्याग करण्याची तयारी, ५९८, चित्रदर्शनाचा करुणप्रसंग, वादळापूर्वीची शांतता, ५९९, दूत लोकवार्ता सांगतो, ५९९; नव्या राजांचा लक्ष्मणाला हुकूम, ५९९; पाषाणाला पाझर फोडील अशी शोकव्यथा, ५९९; सीतात्यागाची टोचणी, ६०१; जनस्थानांतील अपूर्व करुणामय प्रसंग, ६०१-६०२; अलौकिक करुणनाट्य, ६०२–६०५, एको रसः करुण एव, ६०५, चमत्कृतिपूर्ण नाट्यरचना, ६०५, व्यक्तिधर्म व राजधर्म यांच्या विरोधांत रामजीवनाची दुर्दशा, ६०७; ६८२, ६८८, ६९३, ६९६

रामलाल -- सापाच्या शेपटीवर पाय. ७१५; भाषणांचें प्रयोजन, ७१५-७१६, शरदला स्पर्श, पापी ? ७१७,

रामशास्त्री – असहकाराचा मार्ग, ५२६-५२७; विरोधाला, बंडाला धार, ५२७; श्रीमंताना रोज प्रायश्चित्त जरुर, ५२९; हुकूमाचा कागद हातीं ५३१; स्वतःची खात्री हाच पुरावा, ५३१ राजसत्तेला निर्माल्यवत करण्याची शक्ति, ५३१; बिनतोड भूमिका ५३२; हद्दपारीचा हुकूम, ५३२; ६८३, ६८९, ६९२

रावजी – ६९३

रांगणेकर, मो. ग. – ५८२, ५८९, ५९६

रॉडरिगो – १२०, १२९, १३१, १४९, १५१

रॉस, उमराव – ९९, ११२

रेगन– २६९, २८०, २८१, २८२, २८४, २८५, २८६, २९३-२९४, ३००

रेवती – ६९१

रोमिओ आणि ज्यूलिएट, (नाटक)– ६२९

लग्नसाम्राज्य, (नाटक) – ५७०

लव्हबर्ग, ईलियट – हेडा गाब्लरच्या जीवनांतील धूमकेतु, ओझरती ओळख ३०७-३०८ ३११; ३१३; संशयित चारित्र्याचा स्वतंत्रनिर्मितिक्षम प्रतिभावंत, ३२१-३२२; ३२३–३२९; हेडाच्या कारस्थानाला बळी, ३३०, ३३१ ३३४, ३३५, ३३५, ३३६ मृत्यु ३३९-३४०, ३४१–३४७

लॅन्डॉर, कवि – ११९

लॅम्ब, चार्लस – ६९७

लॅन्हिनिया (इलेक्ट्रा)–३९२–४४२; पहिलें दर्शन, चिंताग्रस्त, ३९४; प्रेमाचा तिटकारा, ३९५; आई व मुलगी यांमधील पहिली चकमक, ३९६; आईविषयी मत्सर, ३९८–३९९; ब्रॅन्टबद्दल आरोप, प्रत्यारोप; ४०२; चित्ताचा भडका, ४०३–४०४; एझराच्या मृत्यूचा उलगडा, ४०५; ओरिनशीं एकट्याशीं बोलण्याचा प्रयत्न फसतो, ४०७; आईविषयीच्या क्रोधाने ताठते, ४०७; ओरिनचा आरोप, ४११; पुरावा देण्याची संधिच हवी, ४१२; औषधाच्या बाटलीचें कुशल नाटक, ४१३; क्रिस्टाईनच्या भीतींतून पुरावा, ४१४; निर्धार व योजकता, ४१६; ब्रँटचा बध, पुरावा नाहीसा करण्याची दक्षता, ४१६; वर्षाच्या प्रवासानंतर परत, ४१९; भरलेली आणि विषयासक्त, ४१९; मूर्तिमंत क्रिस्टाईनच, ४२०–४२१; विषयासक्तीची ओरिनला भीति, ४२१–४२१; तर्कशास्त्र लंगडें पडतें, ४२३; शृंगारचाळ्यांची वाच्यता, ४२४; धट्ट प्रणयाराधना, ४२४; सगळ्यांत मोठा गुन्हेगार, ४२७; मनाने भ्रष्टच, ४२८; ओरिनच्या मृत्यूच्या कल्पनेने भयभीत, ४२९; तिचें लग्न होतां कामा नये, ४२९–४३०; ओरिन म्हणेल तें करायचें वचन, ४३१; ओरिनचा भयंकर विचार, ४३१–४३२; तोल सुटतो, ४३२; विवाहसुखाची व्यर्थ आशा, ४३३–४३४; पीटरच्या जीवनावर लग्नाआधीच कृष्ण छाया, ४३४–४३५; सद्बुद्धि जागृत, ४३५; परिस्थितीची खरी जाणीव आणि चांगुलपणा, ४३५–४३६; आंतरिक ऋजुता व श्रेष्ठता, ४३६–४३७; खोटें बोलून पीटरला दूर करते, ४३७; करुण जीवनाची परिसीमा, ४३८; श्रेष्ठ म्हणून आदर नव्हे, ४४१–४४२; करुण अवस्थेने चित्त विरघळतें, ४४२, ६७८, ६८३, ६८६, ६८९, ६९१;

लिअर, राजा -- ११९, १२७, २६७, ३०२ यातनांची खाई, २६७; दैवाची निर्घृणता, २६८; राज्याच्या वाटणीचा प्रबंध, सहज केलेली गंमत घातक, २६९-२७० कॉर्डेलियावर संताप, केंटची हद्दपारी, विवेकभ्रष्ट आणि अहंकाराने बेभान, २७१--२७२ कॉर्डेलियाचा त्याग, २७२ कोणत्या मुली कृतघ्न हें ठरायला क्षणही लागत नाही, २९२ पीळ कायम, २७२; ऑस्वल्डला मारतो, २७६; जन्मजात खुळेपणाशिवाय सर्व किताब गेले, २७६; वाटाणे काढून टाकलेलें फोलकट, २७६ लिअर नव्हे, लिअरची सावली, २७७ गॉनेरिलची धमकावणी, २७७; संतापाचा असह्य आवेग, २७७--२७८ निम्म्या सेवकांना रजा, २७८; वेड लागण्याची भीति, भावी अनर्थाची पूर्वसूचना, २७९ राजा आणि बाप, दोन्ही अधिकारांचा अधिक्षेप, २८२; आगींतून फुफाट्यांत, २८२–२८३ रेगान गॉनेरिलकडे परत जायला सांगते, २८३; डोळ्यांवरची झापड दूर, २८५ लिअरमधील माणूस जागा, २८५; नवें ज्ञान, २८५; वेड्याचें घर उन्हांत की वादळांत ? २८६; वादळांत झंझावाती वृत्तीने वावरणारा, २८६–२८७ चुकीचा उमज नाही, २८७; विदुषकाची कीव २८८; सत्याचा प्रकाश दिसू लागतो, २८८; एडगरशीं गांठ, खरें वेड आणि खोटें वेड, २८८–२८९ भ्रमिष्ट, २९०; ऑफिलियाची आठवण होते, २९५; वेडांतही विवेक, २९५; दुःखानुभवांत दयामय वृत्ति, २९६; महान परिवर्तन, २९७ तरी पीळ कायम, २९७--२९८ कॉर्डेलिया भेटते, पण विधिघटना निराळी, २९८ खरें मोठेपण, २९८–२९९ तरीही भ्रमनिरास पुरा नाही, २९९ कॉर्डेलियाचें प्रेत हातावर–आकांत, ३०० अनर्थ-

परंपरा, ३००–३०१ ५७६, ६१५, ६७४ ६८३, ६९३, ६९६, ७००.
लिऑन्टीस – ७२०
लिंकन, अब्राहाम – २०६-२३२; बाह्य-परिस्थितीशीं मोठा झगडा, २०७; परिस्थितीवर हुकुमत गाजविणारी व्यक्ति, २०९; पहिली ओळख, पत्नीचें वर्चस्व व निष्ठा, २१०; सामान्याहून वेगळेपणाची साक्ष, २११; झगड्याचें बीज, २१२; पतिपत्नींची श्रद्धा, २१२ हट्टीपणाबद्दल निवेदन, २१३; स्फटिका-सारखें निर्मळ मन, २१३; ज्ञानवानाचा कठिण एकाकी मार्ग, २१३-२१४; दक्षिणेकडील प्रतिनिधींच्या कटाचा भोपळा, २१५; फुटीरांच्या खऱ्या स्वरूपाची उघडीक, २१५–२१६ सिवार्डचा भ्रमनिरास व दिलजमाई, २१६-२१७; शेक्स्पीअरप्रेम, २१७-२१८; २१८-२१९; सत्याच्या पक्षाला एकटा एक, २१८, जीवनांतील अत्यंत आणीबाणीचा क्षण, २१९; अपरिहार्य म्हणून युद्धाच्या मार्गाचा स्वीकार, २२०; स्वार्थी युद्धखोरांबद्दलची चीड. २२०; एकाच्या गुन्ह्यासाठी दुसऱ्याला शिक्षा हा अधर्म, २२२; युद्धाच्या काळजीने खंगतो, २२३; हुकचें बंड, २२३-२२४; स्वभाव आणि तत्त्वनिष्ठा, २२४-२२५; निर्णयाची जबाबदारी एकट्याची, २२५; हुकच राजीनामा, २२५-२२६; यशाच्या क्षणीं निर्मळ सदयता, २२६–२२७; जातीचें कनवाळू अंतःकरण, २२७; संसाराच्या विचित्र दर्शनाने खिन्न, २२८; लोकशाही पृथ्वीवर चिरकाल राहावी ही प्रतिज्ञा, २२९; भाग्य नव्हतें, गोळी लागून ठार, २२९; हळहळ किंवा अनुकंपा वाटावी असें जीवन नव्हे, २३०; काव्यात्म रसिक, २३२; ६८९, ६९०, ७००,
लीला -- ६०९-६३० पहिली ओळख, ६१०–६११; खडतर दैव, ६१२, सापाच्या फणेवर पाय, ६१४-६१५; जयंताला रोकठोक प्रश्न, ६१७; मोहाचा क्षण टळला, पण, ६१८, ६२५. उतावळा आत्मघात, ६२६ अनिर्वचनीय आनंदाच्या भरांत, ६२७; ६८१, ६८२, ६८५, ६९१, ६९६
लेअर्टीस – ९, १५, ४६-४७, ४८-५०;
लेडी मॅकबेथ -- १०३, १०४, १०५, १०६, १०८, १०९, ११२, ११३-११७, ५३४, ६८८,
लेनॉक्स, सरदार -- १०७, १११
लोकमान्य टिळक – ५१५
लोडोव्हिको, १४५, १४६, १४९

वनारसे, तात्या, ७५२
वर्डस्वर्थ -- ११९, १५३
वसंतराव, बॅरिस्टर, ६१०, ६२६, ६२०, ६२३
वाटवे, प्राध्यापक, ६९३, ७३१, ७३४, ७४९
वॉल्टन – ११९
वाल्मीकि -- ६७४
वालिंबे, रा. शं. प्राध्यापक, ३, ४, १२४, ६९८, ७२८, ७४७-७४८
विचित्रलीला, (नाटक) -- ५७०
विदुर -- ६९३
विदूषक -- २७६, लिअरची चांगलीच हजेरी घेतो, २७६-२७७
विद्याधर – ६२५-६२६
विंटर्स टेल, ७२०
विराट, राजा – ५१८–५१९
विश्राम, बॅरिस्टर – ६५३–६७५; शेखर-सारखीच लहानपणीं रंगेल वृत्ति, ६५४; ओळख, ६५५; दारुडा विश्राम, ६५६; स्वभावाला औषध नव्हतें, ६५६; उल्हासहूनही पाजीपणाचा नमुना, ६६२–६६३; नयनाशीं शिसारी आणणारी वागणुक, ६६३–६६४; उल्हासचीच तरफदारी, ६६६ करुणेचा सरळ हल्ला, ६६६; तिच्या आवेशापुढे कांही चालत नाही, ६६६; स्वतःच्या अब्रूची चिंता, ६६९; सत्याचें तिखट अंजन, ६६९–६६०;

करुणेला हवा असलेला हुंदका, ६७१; संसार संपला, ६७१–६७२; संयमी नाही, विषयलोलुप आहे, ६७५; शोकदारुण अवस्था, ६७५; सुधाकराची पुष्कळ छाया, ६७५; स्वभावदोषांप्रमाणें दुर्दैवही, ६७५; ६८३, ६८४, ६८५, ६९०, ७००
वीणा, ६११, ६१६, ६२०
वेड्याचें घर उन्हांत, नाटक – ७५२
व्यास – ६९३
व्हर्जिनिबस प्युएरिस्क – १५०
व्हर्जिलिया – २३६, २३७, २४१; अपूर्व शांतिदूत, २६०
व्हॅलेरिया – २३६; अपूर्व शांतिदूत, २६०
व्हॉल्युमिना – २३६–२३७; मुलाबद्दलच्यीं मनोराज्यें, २४१; बुद्धीची चमक, २५१; वेडावली तरी विवेक सोडीत नाही २५४; अपूर्व शांतिदूत, २६०; प्रखर युक्तिवाद, २६१–२६३; मातेचा तळतळाट, २६४; ६९८
शाकुंतल (नाटक)-- ६९७, ६९८
शॉ, जॉर्ज बर्नार्ड १२९, १३७, ७४५, ७५१
शेक्स्पीअर -- ४, करुण नायकाबद्दलची कल्पना, १८–२०; २१, ३३; श्रेष्ठ नाटककाराची किमया, ३४--३५, ५४, ९८, ९९, १०७, ११९, १२५, १२६, १३८, १५३, १५४, २३२, २३३, २४३, २५१, २५२, २५५ नाट्यरचनातंत्राची उंच पायरी, २५८--२६२; २६७, २७२, ५२७, ५३३, ५४५, ६१५, ६५१, ६८०, ६८८, ६९०, ६९७, ६९८, ६९९, ७२०, ७३०, ७४२, ७४९
शेखर -- ६५३, ६५४, ६६०, ६६५, ६६८, ६८४,
शैला -- तिची मनोवांधा, ६५४, ६५६; उल्हासशीं निकोप नसलेला परिचय ६५७; सदविवेकबुद्धीची टोचणी. ६५७--६५८ उसना आव, ६५८ परस्परविरोधी ऊर्मींचा उगम, ६६०-६६१; लाचार, ६६१ गौतमचे पाय धरण्याची पाळी, ६६२, आईचा आधार ६६५; अविवाहित माता म्हणून जगण्याचा निर्धार, ६६६; उल्हासचे उपकार नकोत, ६६७; उल्हासच्या तोंडांत भडकावते, ६६८; घर सोडते. ६६९; ६८४, ६९०
शोकांतिका – १
शोकात्मिका – १
श्रीधरपंत – ६९३
सखारामबापू – ५२५, ५२६
सत्यभामाबाई – ६९३
सरदेसाई -- गो. स. ५४६
सरला भोळे --६९३
संभाजी – २९८, ६३१--६५२; छत्रपतींच्या सिंहासनाची दुर्दशा, ६३२; ओळख, ६३३; सहानुभूतीचा काटा, ६३४, कारुण्याचा उद्गम, ६३५, कब्जीच्या तोंडून मोल, ६३७; जगांतील सर्वच बडामोडी तर्कांशीं सुसंगत असतातसें नाही, ६३९-६४०; डोकें अजून शाबूत ६४०; राजेपणाचें अवजड ओझें, ६४१ नशेने अकलेचें खोबरें, ६४१; नशेंतही सत्यप्रेम व राणीबद्दलचा आदर, ६४२; धन्यतेपोटीं हळहळ, ६४२ हत्याराविना न्याय नाही, ६४३; कब्जीबद्दल आशंकित, ६४६ दैवाची वक्रगति. ६४७; कालचक्राला क्षमा मंजूर नाही, ६४८--६४९; मरणकाळची निरवानिरव, ६४९-६५०; स्वभावाची चढती रंगत, ६५०; वैयक्तिक अहंकार जाऊन समधातता, ६५१, ६८१, ६८२, ६९६, ७००
सवाई माधवराव – ५४५ ५६९; करुण नायकाला अनुरूप चरित्र, ५४६; सत्तेचा झगडा, नाना पंतप्रधान की मी? ५४६-५४७; हॅम्लेट की ऑथेल्लो? ५४७-५४८; गादीवरोवर स्वतःचा दरारा वाढायला हवा, ५४९; नानांपुढे लटपटतो, ५४९; राजकीय बुद्धिचातुर्याची चुणूक, ५४९-५५०; नागनाथाने टाकलेली ठिणगी, ५५१; केशवशास्त्र्याची संशयपेरणी, ५५१; जमीन पुरी तापली नव्हती, ५५१-५५२; दुसरा बाणही

फसतो, ५५१; नाणें हॅम्लेटचें नव्हे, ५५२; दुर्दैव खदखदा हसलें असेल, ५५३; केशवशास्त्र्याच्या कारस्थानाला बहर, ५५३-५५४; कानाचा कडकडून चावा, ५५४; वरात की धिंड ५५५; तात्पुरत्या बंदोबस्तांत ठेवण्याची पाळी, ५५५-५५६; नानांना अत्यंत कडवट उत्तर, ५५६; मला पेशवा समजूं नका, ५५७; तसबिरींचें साम्य आणि बाजीरावाचा पोवाडा, ५५८-५५९; केशवशास्त्र्याच्या मात्रेचा मूर्तिमंत दुष्प्रभाव, ५५९; जिवाची कालवाकालव, ५६०; अंबारींतून उडी टाकण्याचा प्रयत्न, सूडाची भाषा, ५६१; भ्रांत वृत्ति, ५६२; स्त्रीजातीविषयीची चीड, ५६३; केविलवाणी भ्रांतिष्ट अवस्था, ५६४-५६५; घरच्या शत्रूबद्दलची खरी बोंच, ९६४; नानांचे बेत दैवी संकल्पाविरुद्ध, ५६५, सर्वांचे दुर्दैव—कारंज्यावर उडी व मृत्यु ५६६; जन्मतःच दुर्दैवी, ५६६; आत्मीयता का वाटते ५६७; ६८३, ६८५, ६८९

सवाई माधवरावाचा मृत्यु, नाटक – ५०८, ५३६; पहिलें नाटक, ५४५; निव्वळ साहित्यिक स्वरूप, ५४५; पहिल्याच प्रवेशांत कथानकाला वेगाची गति, नाटकांतील मूलभूत झगड्याचें दर्शन, ५४६; गद्यकाव्याचा एक उत्कृष्ट नमुना, ५६२; शृंगाररसाची चावटी ५६३; शेवटी जरा घाई केली, ५६७-५६८; ६९२;

सामान्य निष्कर्ष – ६७६–७०६; करुण नाट्याचा विषय, रचना तंत्र, भाषा, मूल्य यांविषयी कांही सामान्य निष्कर्ष ६७६; ठोकळेबाज नियमांचा आग्रह नाही, ६७६; मार्गदर्शक आडाखे मात्र, ६७७; परिस्थितिजन्य आणि स्वभावगत असे हवाबंद गट नाहीत, ६७७; नुसती दैवाची भीषणता पुरत नाही, ६७८; मानवी निर्णयच्युतीची गरज ॲरिस्टॉटल पण मानतो, ६७८-६७९; विपरीत दैव हें सोफोक्लीसलाही अपुरें वाटलें, ६७९; माणसाच्या नाशाचीं बीजें माणसाच्या ठिकाणीं ६७९--६८०; अद्भुतरम्य करुण नाटकाने दैवही ध्यानांत घेतलें, ६८०; अद्भुतरम्य करुण नाटकाची नवी मजल, ६८४; सामान्य परंतु दुःखी माणसांबद्दल जिव्हाळा अधिक, ६८४–६८५; दैवहतता पण तीही सामान्य माणसाची, ६८५; आणखी एक किंचित निराळा प्रकार, ६८६; नायक श्रेष्ठ व्यक्ति असलीच पाहिजे असें नाही, ६८६--६८७; कथानक व व्यक्तिदर्शन यांना सर्वांत अधिक महत्त्व, ६८७; तत्त्वप्रचाराचें स्थान केव्हाही गौणच, ६९०; प्रसंगापेक्षा व्यक्तिचित्रणेंच रसिकाला मोहून राहतात, ६९२--६९३; व्यक्तिचित्रणें मोहित कां करतात, ६९३; रसानंद लौकिक सुखाहून आगळा, ६९४, सर्व रसांचा अंतिम परिणाम शांत रस, ६९४; हें सामर्थ्य करुण रसाच्या ठिकाणीं सर्वांत अधिक, ६९५; आत्मनिरपेक्ष करुणामयतेचा अनुभव, ६९६; अरविंदांचा आक्षेप यथार्थ नाही, ६९६--६९७; नाटकावर स्थळकाळाचें बंधन, ६९७--६९८; काळाच्या बंधनानुसार प्रसंगांची निवड, ६९८--६९९, पूर्णश्रेष्ठतेचें कथनच अपरिहार्य, ६९९; जिव्हाळा उत्पन्न करण्याचे कलावंताचे नाजुक मार्ग-६९९–७००; नायकाच पश्चात्तापपरसमर्थनपर निवेदन, ७००–७०१; काव्यमय भाषेची अपरिहार्यता, ७०१, यांत्रिक साधनांच्या काळांतील निकष जुन्या नाटकांत लावणें अन्यायाचें, ७०१; अलंकारांचा परिणामकारतेसाठीही उपयोग, ७०३-७०४; निष्कर्षांची थोडक्यांत नोंद, ७०४--७०६

सॉक्रेटीस -- ११९

सिंधू -- ११९, २६८, ५७९, प्रभु कोपला,

७१३; धीर सुटला, ७१४; गीतेच्या बोलण्यांतून दारुण आघात, ७१८; देवतास्वरूप सिंधू, ७२६; केवळ सुधाकराची छाया, ७३६, ७३७, ७४२
सिसिनिअस (लोकप्रतिनिधी) -- २४० २४१, २४३, २४५, २४६--२४९; २५३—२५४, २५७
सिवार्ड -- २१४, २१७, २१८, २३१
सीता -- अपवादांतून सुटली नाही, ५९७: चित्रदर्शनांतून - भागीरथी-स्नानाची इच्छा, ५९९; रथ येतो, पूर्वसंकल्पानुसार जायचें या भोळ्या भावनेने जाते, ६००, ७७४, ६८२, ६८८, ६९३
सुदेष्णा -- मोठ्या कोंडींत सापडते, ५१३
सुधाकर -- १०४, १०५, ११८, ६८५, ७०७-७४४ त्याच्याशीं आपुलकीचा संबंध सुरू ७०७-७०८; स्वभावाचें मर्मभेदक विश्लेषण, ७०८-७०९; नुसतें नाट्यबीजच नव्हे, जणू नाटकाचा संपूर्ण आराखडा, ७०९; बुद्धिकौशल्य, ७०९; विद्वत्तेचा पुरावा, ७११; तळिरामावरचा नितांत विश्वास, ७११; सनद सहा महिने रद्द, ७१२; शरीराचा नाश केल्यावाचून मरणाची जोड देणारें विष हवें, ७१२; अहंकाराला दंश, ७१२; दारू पिऊन कोर्टात जाण्याचा बेत, ७१४; घरांत राजरोस अड्डा, ७१५; संभाजीहूनही जास्त तोल सुटतो, ७१६; सर्वांची हकालपट्टी, सिंधूदेखत एकच प्याला, ७१७; गीतेच्या तोंडचा दगड धोंड्यांचा मारा, ७१९; विशुद्धीकरणाचा मनोज्ञ नमुना, ७१९-७२० दुष्यन्त आणि लिऑन्टीस यांच्याशीं साम्य, ७२०; जगाचें कठोर दर्शन, ७२१; बद्दल अनुकंपा, ७२२; स्वभावाची परीक्षा झाली नाही, ७२२; निराशेच्या गर्तेत सापडलेला प्रतिभावंत, ७२२-७२३ काव्यस्फूर्तीने रसरसलेला माणूस ७२३ ७२४ टीकाकारानांही खरी ओळख झाली नाही? ७२४; जागा झालेल्या राक्षसाचं घोर पाप, ७२५; विष घातलेला शेवटचा प्याला ७२६; अखेरचें आत्मनिवेदन, ७२६-७२७ दारूबाज सुधाकरही गुणी राहतो, ७३५ दारूबाजांच्या अड्ड्यांतही वेगळेपण, ७३५, सहृदयता व शुद्धबुद्धि, ७३५; प्रेमावर सिंधूचा विश्वास, ७३५-७३६; अभिमानामुळे सिंधूकडे जात नाही, ७३८-७३९; दारू पचवूं शकत नाही, ७४०; सुटकेच्या वाटा अभिमानामुळे बंद, ७४० सुंभ जळतें, पीळ जळत नाही, ७४०-७४१ अहंभावनेंतून अटळ विनाश, ७४१-७४२ जगाने त्याच्यावर अन्याय केला नाही ७४४
सुधाकर की एकच प्याला – ७२८
सुंदर मी होणार, नाटक – ७५२
सुशीला – ६९३
सुर्याजी पिसाळ -- ६३२, ६३३, ६३५, ६४३
सोन्याबापू -- ६९३
सोफोक्लीस -- श्रेष्ठ ग्रीक करुण नाटककार, ५६, ७४; ७४; ५९-६०, ६६, ७७. ९०, ९३, ९४. ९५, ९६, ९८, १५४, २३२, ६८९, ६८७, ६८८, ६९१, ६९८, ७४९,
स्टॅनले -- धसमुसळ्या, ४६७–४६८; मालमत्तेचा मोह, ४७३--४७४ ब्लॅन्शच्या टंकची असभ्य तपासणी, ४७४; खेळांत व्यत्यय नको, ४७७; बायकोला मारतो, ४८०; अगदीच भावनाशून्य नव्हता, ४९३; मिच्ची फसवणूक होऊं द्यायला तयार नाही, ४९३; राग उफाळून येतो, ४९४; ब्लॅन्शच्या येण्याने पतिपत्नींच्या सुखांत व्यत्यय, ४९४; ४९५ ५००; ५०३, ५०४-५०५ ५८२
स्टॉकमन, डॉक्टर टॉमस -- १५४--१७९; १५४, १५५, १५६, पीटरच्या मतें उधळ्या, १५७; मोठ्या भावाहून निराळा थाट, १५८; चंडोल आनंदी, समाजप्रिय, १५८; आपलाच हेका चालवायची वृत्ति, १५९; उत्साही परंतु

उतावीळ, १५९; नव्या शोधाची घोषणा, १६०; वैयक्तिक अहंकाराची भेसळ १६१; भोळा शेखमहंमद, १६१; भावाबद्दल तक्रार, १६२; साध्या गोष्टीसाठी इतकी धडपड कशाला ? १६३; रिपोर्ट छापायला देण्यांतील प्रमाद, १६४; पीटरकडून धक्के, १६४; स्वप्नाळू अव्यवहारीपणा, १६४; संपूर्ण शहराचा नाश करण्याचें पाप, १६५; शोधाची वार्ता लोकांच्या कानावर घालण्यास प्रतिबंध, १६५; स्नानगृहांची कल्पना, १६६; मतें मांडण्याचें स्वातंत्र्य मागतो, १६६; तोल सुटतो. १६७; जनतेचा वैरी म्हटल्याचा संताप. १६७; जोखडाखाली मान तुकावणार नाही, १६८-१६९; यशाच्या भ्रमांत, १७०; एकेक आधारस्तंभ कोसळतो, १७०--१७१; कॅथरीनचेंही डोकें फिरतें, १७१; सभेंत विरोधी कट यशस्वी, १७२; जनतेचा क्षोभ करणारें भाषण, लोकांचा वैरी असा धिक्कार, १७३; बहिष्कार, १७३; लोकांचा वैरी होणें स्वभावांतच नाही, १७४; सासऱ्याच्या बळावर हटवादीपणा ! १७४; प्रामाणिकपणाच शंकित, १७५; मार्टेन किल्चा पेंच, १७५; श्रेष्ठ असला तरी माणूसच, १७५–१७६; निस्सीम निरागसता, १७६; नवा शोध १७७; स्वभावाचें मर्म १७७–१७९; १८०, १८१, १९१, २२५, स्टॉकमन ३९०, ६८१, ६८५, ६८९, ६९१, ७००

स्टॉकमन, पीटर, मेयर-- १५४, १५७, १५८, १६१, १६५, १६६; १६९,१७१, १७४, १७५, १७७

स्टीफन मूर-- १८०-२०६; लढाईला विरोध, राष्ट्रनिष्ठा की सत्यनिष्ठा, १८१; पत्नीप्रेमही सत्यनिष्ठेपासून ढळवूं शकत नाही, १८२--१८३; क्षणिक दोलायमानताही विरून जाते, १८३; पत्नीचा कुतरडा शब्द जिव्हारीं लागतो, १८३; स्टीलच्या युद्धानुकूलतेने धक्का, १८३; पार्लमेंटांत युद्धविरोधी भाषणासाठी, १८४ युद्धविरोधी भाषण केलेंच, १८४; फासा पडला, १८५, राजीनामा मुख्य प्रधानाकडे, १८५; पतिपत्नी दोन विरुद्ध निष्ठांच्या टोकाला, १८६; शिष्टमंडळाशीं मुलाखत, तत्त्वनिष्ठाची प्रशांत वृत्ति, नम्रपणा, १८६--१८७; तत्त्वनिष्ठाचीही कीर्तिलालसा, १८८; खुलासा पुरेसा समाधानकारक नाही, १८८; तुमच्याआमच्यासारखीच सामान्य व्यक्ति, १८८; पत्नीच्या विचाराने वृत्ति डळमळते, १८९; सात्विक आवेशाची पकड शिष्टमंडळावर, १८९; पत्नीविषयीची भावना स्वतःच्या निष्ठेच्या आड न येऊं न देण्याचा निर्धार, १९०; शिपायांचें संचलन पाहून शिष्टमंडळ भावनावश, १९०; युद्धखोरीची जाणीव, वचन देण्याचा नकार, १९१; मनाचे हेलकावे, १९१; तत्त्वनिष्ठेची परीक्षा, सभेनंतरच्या हुल्लडीच्या वेळीं, १९२; दोन महिन्यानंतर पत्नीची भेट, १९३; नर्सचा राग, १९४; कॅथरीनच्या भेटीची आतुरता, १९५; तिच्या पवित्र्याचा अर्थ कळत नाही, १९५; कॅथरीनचा हट्ट १९५--१९६; पत्नीवर सौदा, बाजार मांडल्याचा निर्घृण पण खरा आरोप, १९६; व्हायचा तोच परिणाम, १९७; देश किंवा लंडन सोडून जाण्याला नकार, १९७; नर्सचा जळजळीत हल्ला, १९८; बायकोच्या प्रेमाच्या अग्नि विझविणारा, १९९; पत्नी सोडून जाते, २००; ऑलिव्हही जाते २००; जमावाच्या हुल्लडींत ठार २०१; माथेफिरू माणूस नव्हे, २०२; सहृदय माणसाला मान्य व्हावी अशी निष्ठा, २०२; मतप्रचाराचें स्वातंत्र्य लाभलें नाही, २०३; जगांतला अखेरचा एकटा एक माणूस, २०३; बिनतोड परिस्थितीशीं झगडा, २०३; करुण अंत होण्यांतच श्रेष्ठत्व, २०४

हटवादीपणा की अहंकार २०४–२०५, निकोप आशावादित्वाचा व लोकनिष्ठेचा अभाव, २०५; स्वभावदोषही, २०६; युद्धाचा विरोधक, २०७ २५५, ३९०, ६८१ ६८५, ६८९ ६९६, ७००

स्टीव्हन्सन, रॉबर्ट लुई – १५०, १५१

स्टेला, ब्लॅन्शची बहीण – ४६९, ४७०–४७५; ४८१, ४८२–४८३, ४९२–४९३, ४८५, ४९६, ५०३, ५०५

स्ट्रीटकार नेम्ड डिझायर, नाटक (वासनारथ) ४६७; संघर्षाचें बीज, ४७२. भावनाभर उत्पन्न होतांच सहजसुंदर काव्य, ५०७, ६९२, ७४९

हंबीरराव -- ५३६ प्रेमवेडा होतो, ५३९-५४०; ५४१;

हर्बर्ट, जॉर्ज, ११९

हर्फर्ड, ३, ४

हॅम्लेट -- १, डेन्मार्कचा राजपुत्र, ७, पहिली ओळख, ८, स्वतःवर लक्ष खिळवून घेणारी व्यक्ति, ८. पहिली प्रत्यक्ष ओळख, ९-१०; राजामध्ये व त्याच्यामध्ये विरसता; वाकडा भाव, व कोटिबाजपणा, आईचा अनादर नाही, ९-१०; व्यावहारिक जगाच्या दृष्टींतून, ९-१०: आतुरता आणि जिव्हाळा, १०-११; राणीच्या लग्नाची घिसाडघाई–स्त्री म्हणजे मूर्तिमंत चंचलता, १२ इतरांपासून निराळेंपण, १२-१३; आईच्या लग्नाच्या घिसाडघाईची बोच, १३ १४; ताबडतोब निर्णय करण्याची वृत्ति, १४; काव्यमय भाषेची आणि सामान्य सिद्धांताची आवड, १४ लेअर्टिसच्या दृष्टीने, १५; तात्त्विक अव्यवहारी वृत्ति व कोटिबाजपणा, १६; बापासारखीच काव्यमय वृत्ति, १६; परिस्थितीचें तात्काल आकलन व झटकाफटकी निर्णय, १७-१८; भावी चमत्कारिक वागणुकीबद्दलचा इशारा १८; ऑफिलियाच्या अंतर्गृहांतील प्रवेशाने सहवेदना आणि जिव्हाळा, २१; करुण परिणतीचें आणखी एक बीज. २१-२२; अविचारी उतावीळपणा, २२-२३; प्रेमभंग, २३; अंतःकरणाची खरी बोच, २४; तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी २५; रस इतर उद्योगांत, २५; नाट्याची आवड, २५-२६; निर्णयकुशलता, २६ विचाराला बळी पडून कृति टाळण्याचा स्वभाव नव्हे, २७-२८; जगावें की मरावे चा खरा अर्थ, २८-३०; ३१ रंगभूमीचा जाणता; त्याच्यावरचा परिणाम, ३१-३२; ऑफिलियाकडून गुणसंपदेचें कथन, ३३; त्याचा दुःखाबद्दल अनुकंपा; अन्यायाबद्दल पक्षपाती, ३४-३५; पक्षपाती म्हणून न सांगितलेल्याही गोष्टी मानण्याची वृत्ति–वयाबद्दल ३६; ऑफिलियाशी सहेतुक फाजीलपणा, ३७; नाट्याचा दर्दी रसिक, ३७ हेर मित्र फजीत, ३८; आईबद्दल नाजूक भावना, ३८-३९; सामना सर्व दरबाराशीं ३९; निव्वळ राजाच्या खुनाने कार्य होत नव्हतें; ३९–४० धर्मश्रद्धा, ४०; वेभान, राजाचा, डाव ओळखतो, ४२ राजाच्या गुन्ह्याचा पक्का पुरावा हवा होता तो मिळाला, ४३–४४ बुद्धिमत्ता व निर्णय कौशल्य, ४४; बाजी हातांतून निसटते, ४४–४६ स्वभावनिदर्शनाचे कांहीकिरकोळ प्रसंग, ४७–४८; आत्मटीकेचें पुनरावर्तन, ४८ अन्याय होऊं नये ही तळमळ;श्रेष्ठपणाचें नाजूक दर्शन ४८, ४९, ५०;द्वंद्वयुद्ध-विषदिग्ध तरवार लेअर्टीस भोसकतो,५०;अखेरचें आत्मसमर्थन ५१, जिव्हाळा का वाटतो, ५२-५३; इतका संमिश्र स्वभाव क्वचितच चित्रित केला असेल, ५४, ६१, ८९, ९४; त्याचें ध्येय, ९८; ११४–११७ १४१, १४२, १५३, ५४५, ५५२, ६८१, ६८७, ६८८, ६९१, ६९३, ७००, ७०२

हॅम्लेट, नाटक, १, २०, उद्दिष्ट, ३३; काव्यमय भाषेची अपरिहार्यता, ४०-४२ काव्यमय भाषा आनंदकारकच, ५५-५६; ८१, ८२, ८३, ९४, ९८, २३३, २६७, ६७४, ६८८

हम्लेट; राजा (मृत) – ७
हॉलनर्ड सोलनेस, बांधकामाचा ठेकेदार, ३५१–३९१; मास्टर बिल्डर नाटकाचा नायक, ३५१; काया फासलीशीं लगट, ३५१; परिस्थिति अनुकूल लाभली, ३५१; राग्नारच्या लग्नाच्या कल्पनेने अस्वस्थ ३५३; तरुण पिढीच्या स्पर्धेचें शल्य, ३५३; काया राग्नारसाठी हर्वी, ३५५; विलक्षण अनुभव, इच्छा करावी तें होतें, ३५५–३५६; ॲलीनवरील अन्यायाची टोचणी, ३५६; वेड लागल्याची लोकांना शंका, ३५७; नवी पिढी हकलून देणार ही भीति, ३५७; तरुण पिढी हिल्डाच्या रूपाने दार ठोठावून आंत येते, ३५८; भीति होती त्याहून वेगळें ठोठावणें, ३५८; ती हुसकून लावण्यासाठी आलेली नाही, ३५८–३५९; स्मरणशक्ति चांगली नसल्याचा आरोप, ३५९; त्रस्त करणारी स्मृति, ३६०; हिल्डाला राणी करण्याचें वचन दिलें होतें, ३६०,३६१; वायदा पुरा करून घेण्यासाठी आली होती, ३६२; हवें असलेलें राज्य, ३६३; न परि हरपलें तें गवसें, ३६३–३६४; हिल्डाच्या आगमनाने नवा हुरूप, ३६४; निवृत्त होण्याची तयारी नाही, ३६५; अंधारांत प्रकाशाचा प्रवेश, ३६७; प्रतिस्पर्धी सहन होत नाही, ३६७–३६८; परमेश्वरावरील श्रद्धा उडाली, ३६८; सुखासाठी द्यावी लागलेली अवघड किंमत, ३६९; असाध्य तें साध्य करितां सायास, ३६९–३७०; भिन्न भावनांच्या रस्सीखेचींत, ३७०; दैवाने खास निवडलेला माणूस ३७१; प्रतिभासंपन्नाची विचित्र शक्ति आणि जबाबदारी, ३७१--३७२; त्याची सद्सद्विवेक बुद्धि आजारी ? ३७२; नव्या पिढीची भीति आणि ओढही, ३७३–३७४; उत्साहाला भरतें, ३७५; मनोऱ्यावर चढण्याची प्रतिज्ञा, ३७६; प्रतिभेची अविष्कारपूर्व तळमळ, ३७७; सांसारिक कर्तव्यांत समाधान नाही, ३८०; एक साधतें दुसरें सुटतें, ३८०–३८१; हेंही नाही आणि तेंही नाही, ३८२; हिल्डा म्हणजे प्रतिभाशक्ति ? ३८२; काया म्हणजे सुखाची आसक्ति ३८३; राग्नार म्हणजे तरुण पिढीच्या भीतीचें प्रतीक ? ३८३--३८४; प्रतिभावंताचा आकाशांतील राजवाडा, ३८५; त्याला अशक्य कांही नाही, ३८६; धर्मश्रद्धेने समाधान नाही, ३८७; मानवकल्याणधर्माने समाधान नाही, ३८७; कांहीतरी अलौकिक बांधण्याची उमेद, ३८८; सर्वांत जें सुंदर त्याची साधना, ३८९; यश आणि अंत, ३८९; श्रेष्ठ प्रतिभावान परंतु श्रेयःसाधनाला पारखा, ३९०; श्रेय गवसलें पण फार उशीरा, ६९०--३९१; जात्याच कलावंत; काव्यमय भाषा, ३९१; ६८२, ६८६, ६८९, ६९१
हिल्डा – ३५८–३६५; ३६७; ३६८–३६९; प्रत्यक्ष स्त्री की प्रतिमा, ३७०; ३७१–३७५; ३७७; पेच, ३७९–३८०; हालवर्डची प्रतिभाशक्ति ? ३८२–३८३; ३८४–३९०
हीमॉन, ८६, ८७, ८८, ८९, ९१, ६८८
हुक – २१३, २२३–२२४, २२५
हेडा गाब्लर -- ३०३–३५०; बाईसाहेब बडेजावीने वागणार, ३०४–३०५; जॉर्जशीं लग्न कसें झालें हें कोडें, ३०५; नव्या घराचें वातावरण खटकतें, ३०८; नवगर्भवतीची अस्वस्थता, ३०८–३०९; मरली असल्याच्या सूचनेने अस्वस्थ ३०९; मनाचा थांग न लागूं देण्याचा प्रयत्न, ३१०; दुसऱ्याच्या मनांतलें काढून घेण्याचें कौशल्य, ३१०--३११; लव्हबर्गला आमंत्रण देण्याची कल्पना, ३११; स्वतःवर लव्हबर्ग अजून आशक असल्याची जाणीव, ३१२–३१४; टेसनला विद्यापीठांतील जागा न मिळण्याचा संभव लव्हबर्गमुळे, ३१५; निश्चितपणाचें नाटक टिकत नाही,

रम्य स्वप्नाचा भंग, ३१५--३१६; सुटकेचा मार्ग बापाचीं पिस्तुलें, ३१६; बिकट अवस्थेतून सुटण्यासाठी झगडा, ३१६; बंधनें नको असलेली भोगासक्त स्त्री, ३१७; लग्न प्रेमासाठी केलें नाही, ३१८ जज्ज ब्रॅकशीं चोरटा संबंध ठेवण्याची तयारी, ३१७; भरलेल्या अवस्थेच्या उल्लेखाने पुन्हा अस्वस्थ, ३१९; सर्वांना फसविण्याचें सामर्थ्य, ३१९; भूतकाळाची भीति, ३१९-३२०; मातृपदाची जबाबदारी नको, ३२०--३२१; असहाय निराशाग्रस्तता व सुटकेची क्रूर धडपड, ३२१; नवरा निर्मितिक्षम नाही म्हणून अस्वस्थ, ३२२; लव्हबर्गच्या स्वाभिमानी औदार्याने विद्ध, ३२२, त्याच्या नैतिक विजयाने धक्का, ३२३; लग्न करून स्वातंत्र्य गमावायला नको होतें, ३२४; भोगासक्त पण कर्तव्यदक्ष, ३२४; करून सवरून नामानिराळे राहण्याची वृत्ति, ३२५ - ३२६; मत्सर लपून राहत नाही, ३२६; आणि तिरस्कारही, ३२६–३२७; लव्हबर्गला सदाचारापासून ढळविण्याचा यत्न, ३२७–३२८; खरा हेतु ? ३२८--३२९ हेडा आणि एल्व्हस्टेड, फरक, ३३९--३३०; हस्तलिखितांतून नवा कटाचा धागा, ३३१; आणीबाणीचा क्षण, ३३२; ब्रॅकचा हेतु ओळखते, ३३३; एका दगडाने दोन पक्षी, ३३४–३३५; तायाविषयीचा लव्हबर्गचा जिव्हाळा दुःसह, ३३६ हस्तलिखित जाळलें, ३३७; मनोभावनेंत बदल ? ३३७–३३९; लव्हबर्गच्या मृत्यूसंबंधांत सूचक उद्गार, ३४०; ध्येयवादी टेसमन, ३४१; पिस्तुलप्रकरणाने सापळ्यांत, ३४२–३४३ पापाची फक्त वाच्यता नको, ३४३; ब्रॅकच्या तावडींत, ३४४; गंभीर निर्णय, ३४४–३४५; सारे अंदाज चुकले३४५–३४७; सुटकेचा. मार्ग लव्हबर्गचा सत्यानाश, ३४७; टेसमनला आपली अडचणच, ३४८; कपाळांत गोळी मारून आत्महत्या, ३४८; विलक्षण निर्धाराची स्त्री, ३४९; पण तितकीच कातर, ३४९, ६८१, ६८६, ६८९

हेडा गाब्लर, नाटक – १५४; प्राक्कथनावर भर, मनोवृत्तींतील बदलांचें चित्रण ३०३; स्थळाची व सामानाची कल्पना ३०३-३०४ राजस प्रवृत्तीची तरुणी व सात्विक छायेखाली वाढलेला तरुण यांच्या जीवनपद्धतींतील विरोधाचें नाटक; नाटकाचें बीज, ३०५, ३५१, ३९१, ७४९

हेलन – ह्यूबर्टची पत्नी, भावनावेग, १८५

होरेशिओ, ७, १३-१४; १६, १८, ३२, ४३, ४९, ५१, ८९, ११७, ६८८, ७००,

होवस्ताद, १५७, १६०, १६१, १६३, १६८, १७०, १७१, १७६

क्षीरसागर, श्री. के. प्राध्यापक, ७४८, ७४९

ज्ञानेश्वर -- ६९४

शुद्धिपत्र

[टीप--(१) मुळे, खाली, कधी, पूर्वी, जणू, पुन्हा, अगदी, विषयी, या व अशा अव्ययांवर क्वचित चुकून अनुस्वार पडले आहेत, ते दाखविलेले नाहीत. (२) हें शुद्धिपत्र तयार करण्यांत पुणें येथील श्री. पांडुरंग रामचंद्र ढमढेरे, एम. ए. यांचें फार बहुमोल साह्य झालें आहे.

पान	ओळ	चुकीचें	बरोबर
७	१०	पिशाश्च	पिशाच
१४	७	तर रें	तर बरें
१६	२६	दिङ्मूढ	दिङ्मूढ
१७	२९	अनिर्वाय	अनिवार्य
२१	२७	हे	हें
२८	१	सडाच्या	सूडाच्या
२९	१५	उद्दापणा	उद्दामपणा
३०	१३	Ophilia	Ophelia
३७	१८	राचलेली	राहिलेली
४५	२२	बजाबतो	बजावतो
४६	११	काडीवरूही	काडीवरूनही
५५	२	नाहीहें	नाही हें
६१	२०	प्रत्यय	प्रयत्न
६५	२६	आघारलेल्या	आधारलेल्या
७१	६	येते	येतें
७४	६	आत्मघाताठी	आत्मघातासाठी
७४	१४	लावावी	लवावी
७६	३३	विसंबून राहतां	विसंबून न राहतां
७८	२१	करतो	करते
८१	३१	यांच्या	याचा
८६	८	आहोत	आहेत
१०१	७	पिशाश्च	पिशाच
११५	१६	होते	होतें
११७	२५	मित्रहोरेशिओ	मित्र होरेशिओ
१२५	३१	मी	मीं
१२६	७	मी	मीं
१३०	१४	उच्चभ्र	उच्चभ्रू
१४०	६	कारण तो,	कारण तो
१४०	१२	धुमसणाऱ्या	धुमसणाऱ्या

पान	ओळ	चुकीचें	बरोबर
१४३	३०	श्रद्दाळू	श्रद्धाळू
१४६	२९	अलतो	असतो
१४८	३४	वृतांतांत	वृत्तांतांत
१५०	२९	उत्मादकारक	उन्मादकारक
१५१	१४	प्रेअसीचा	प्रेयसीचा
१५९	५	आहे.	आहे,
१७०	६	तुम्हांला	तुम्हांला
१७४	२९	मृत्यु सर्व	सर्व मृत्यु-
१७७	३	वाढण्याची	काढण्याची
१७९	१२	दाखवावें तर्कशुद्धच	दाखवावें हें तर्कशुद्धच
१८०	२८	वाषरला	वापरला
२०१	८	एला	एका
२०५	२७	डॉक्र	डॉक्टर
२०८	१	व्यक्तिर्शादन	व्यक्तिदर्शन
२०८	१२	अशा	कशा
२०९	११	लिंककने	लिंकनने
२२५	३३	देऊक	देऊन
२३१	१०	म्दणजे	म्हणजे
२३१	२१	भानवा	भावना
२३४	१७	तेवड्यांतच	तेवढ्यांतच
२४०	२३	प्रसंसा	प्रशंसा
२५०	१७	आपुलकीन	आपुलकीने
२६०	१७	तीही	तींही
२६९	मथळा	लियर	लिअर
२६९	१७	पतीपासुन	पत्नीपासून
२७१	मथळा	.लियर	लिअर
२७१	१६	म्हतारपणामुळे	म्हातारपणामुळे
२७२	२४	त्यांची	त्यांचीं
२७५	२४	बिदूषकाने	विदूषकाने
२८१	८	गॉनोरिलला	गॉनेरिल्ला
२८१	२१	ठेवावें	ठेवावा
२८३	मथळा	लीअर	लिअर
२८७	१८	सृष्टीतींल	सृष्टींतील
३०२	२६	सर्व	सर्व
३११	२५	विनवितें	विनविते
३१५	१९	तीं	ती
३१६	२	ते	तें
३१६	८	अखेरच्या	अखेरचा
३१७	४	बंधने	बंधनें

पान	ओळ	चुकीचें	
३१७	१६	होतें	होते
३२०	५	प्रतिभावन	प्रतिभावान
३३४	५	एवर्ढेंच	एवढेंच
३४६	२	जॉज	जॉर्ज
३४९	१३	धारणाशक्ति	धारणाशक्ति
३४९	२७	निसटण्यासाटी	निसटण्यासाठी
३६२	८	बिश्वास	विश्वास
३६७	४	यामध्थे	यामध्ये
३७०	३	यताच्या	त्याच्या
३७३	२७	ओढते	ओढतें
३७८	१७	क्षुलक	क्षुल्लक
३७८	१८	तरीही मला त्यांचा	तरीही त्यांचा
३७८	२९	अंतकरणांत	अंतःकरणांत
३७९	१९	हालवडलाही	हालवर्डलाही
३८१	१५	प्रतिभाविलासाठी	प्रतिभाविलासासाठी
३८९	२४	घड-	धड-
३९५	२४	होता ?	होता.
४०२	२०	मानाने	मनाने
४०५	१५	लॅ हनिया	लॅव्हिनिया
४०६	१७	वाट बसते	बाट बघत बसते
४०६	२८	क्रिस्टाईच्या	क्रिस्टाईनच्या
४०६	३२	ओरिनल	ओरिनला
४०७	२०	दुखाचें	दुःखाचें
४०९	१२	कुलुषित	कलुषित
४१०	२	जमविलेल्या जोरावर	जमविलेल्या ओळखीच्या • जोरावर
४१०	२५	जाऊ	जाऊं
४११	६	सागते	सांगते
४१४	३२	क्रिस्टाईचा	क्रिस्टाईनचा
४१९	१४	सागते	सांगते
४२१	१	पडलेलाफरक	पडलेला फरक
४२२	२३	द्डणाखाली	द्डपणाखाली
४२४	१२	ओर्निचा	लॅव्हिनियाचा
४२९	३	तडक चमॅनन	तडकच मॅनन
४२९	७	आणल्याला	आपल्याला
४२९	१०	फीटर	पीटर
४२९	३१	तिची	त्याची
४४३	१८	द्रव्यलाभ	द्रव्यलोभ
४४४	१७	हतांत	हातांत

पान	ओळ	चुकीचें	बरोबर
४५५	२८	तुझी	तुम्ही
४५७	१९	अवस्थतेंत	अस्वस्थतेंत
४५९	१४	अवस्थतेचें	अस्वस्थतेचें
४६४	४	तुलाकाय	तुला काय
४७४	२	घरण्यांतल्या	घराण्यांतल्या
४७५	१९	पाहिजे.”	पाहिजेत. ”
४७८	३	म्हणतो.	म्हणते.
४८०	२३	लहनगा	लहानगा
४८३	४	खलास झाली	खलास झाली.
४९५	८	निर्पाण	निर्माण
५१८	३	रत्नमाला	रत्नप्रभा
५१९	३०	तुला मी भ्रष्ट	तुला भ्रष्ट
५२०	१८	रत्नमालेब्रह्मलचें	रत्नप्रभेब्रह्मलचें
५२४	१५	असूननही	असूनही
५३५	३१	नायिका	नायिका.
५३९	३२	प्रतापरावाने	हंबीररावाने
५४०	१९	पिल्लाजीरावांने	पिलाजीरावांने
५४०	२०	पिलाजीरावांनी	पिलाजीरावांचें
५४२	९	तसतीस	नसतीस
५४३	६	लढ्यासाठी	लढण्यासांठी
५४३	१५	त्याच्यापुडे	त्याच्यापुढे
५५१	६	मेलेल्यार	मेलेल्यावर
५५६	२५	काव्य	काय
५५६	३५	व्यवगंत	व्यवहारांत
५५८	२९	वरोवर	वरोवर
५६०	१३	हॅम्लेटला	हॅम्लेटचा
५६०	२४	तसतां	असतां
५६२	२६	गद्यकाव्याचा	गद्यकाव्याचा
५६३	२०	शृंगारसाची	शृंगाररसाची
५६३	२१	शृंगारसराजाच्या	शृंगाररसराजाच्या
५६७	४-५	हळवेपणाच	हळवेपणाचा
५६८	८	निरंकुशः	निरंकुशाः
५६८	२८	रत्नमाला	रत्नप्रभा
५७१	१४	स्वीकाराई	स्वीकारार्ह
५३१	२५	छंदाच्या	छंदाचा
५७३	१५	आठहहा	आठदहा
५७३	१६	हिच्यासारखी	हिच्यासारखी
५७९	१	अंधकारांता	अंधकारांत
५८३	११	ज्यात	ज्यांत

पान	ओळ	चुकीचें	बरोबर
५८३	१२	मोठ्या सुखद मेजवानीसारखा	मोठ्या मेजवानीसारखा
५८४	४	खाणि	आणि
५८५	१९	आठ्यांबद्दल	आठ्यांबद्दल
५८५	२२	राघाकाकू	राधाकाकू
५८६	३२	भानुतीच्या	भानुमतीच्या
५८७	२२	उधाळावी	उधळावी
५८९	४	सिनिमा	सिनेमा
५९२	९	सुरुतात	सुरुवात
५९४	२	असें	असे
५९६	४	उत्तररामचरित्रम्	उत्तररामचरितम्
५९७	१४	अशा वेळीं होतो	अशा वेळीं होते
६०२	५	विरहव्यवस्थाच्च	विरहव्यथाच्च
६०५	३	प्रयस्न	प्रयत्न
६०५	१९	निमित्तभेदा	निमित्तभेदा-
६०८	२९	प्रस्तावना	प्रस्थापना
६०८	३२	निरंकुशः	निरंकुशाः
६०९	२२	पुनर्विवाह	पुनर्विवाह
६१०	८	झालेला	झालेल्या
६१५	२३	याचें	यांचें
६१७	२२	लींलेच्या	लीलेच्या
६१८	१	मी	मीं
६२५	१७	मिळामुळे	मिळाल्यामुळे
६२७	३	काव्यत्म	काव्यात्म
६२७	३	प्रजोजन	प्रयोजन
६३०	१८	स्वमावगत	स्वभावगत
६३३	२७	छत्रपतीचीं	छत्रपतींची
६३६	५	गुणवर्णपर	गुणवर्णनपर
६३९	१६	संशयपिशाच्याच्या	संशयपिशाच्याच्या
६५१	७	परिणाम	परिणत
६५६	२६	आर्विर्भावाने	आविर्भावाने
६६४	६	पाऊल पाऊल टाकण्याचा	पाऊल टाकण्याचा
६६९	३२	विश्वासच्चा	विश्रामच्चा
६७१	९	परंतु तो,	परंतु तो
६७७	२२	उद्योग	उपयोग
६८०	७	प्रकारच्चा	प्रकारच्या
६८२	३	सोलसेन	सोलनेस
६९०	२८	खंडणमंडन	खंडनमंडन
७०१	९	योद्धायच्चा	योद्ध्यांच्चा
७०२	१४	मरावें हा हा प्रश्न	मरावें हा प्रश्न

पान	ओळ	चुकीचे	बरोबर
७०३	११	समाजाला	समजला
७१०	७	हातच्या	हातचा
७१४	११	भागीरथाच्या	भगीरथाच्या
७१५	२९	सिंधूच्य	सिंधूच्या
७१६	४	वेण्याइतकी	घेण्याइतकी
७१६	२१	बसला	बनला
७१७	२८-२९	तुमचा बापासारखा वाटणारा तुमचा	(हें गाळावें)
७१९	१७	निवालेले	निघालेले
७२४	१३	यावज्जीवनहि	यावज्जीवहि
७२७	१५	देवहततेमुळे	दैवहततेमुळे
७३०	२६	होतें	होते
७३१	१२	साधारणा–	साधणा–
७३१	२७	लिहित	लिहीत
७३४	८	आपण पाहिजे.	आपण पाहिलें पाहिजे.
७३५	१६	शेस्पीअरच्या	शेक्स्पीअरच्या
७३८	४	त्याचें	त्याचे
७३८	८	त्याचं	त्यांचं
७३९	१३	दारुमुळे	दारूमुळे

REFBK-0010932